अथर्ववेद–

मातृभूमि आणि स्वराज्यशासन

[भाग २]

लेखक

म. म. ब्रह्मर्षि पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर

विद्या–मार्तण्ड, साहित्य–वाचस्पति, गीतालंकार

पारडी (जि. वलसाड)

प्रकाशक :
वसंत श्रीपाद सातवळेकर,
स्वाध्याय-मण्डळ,
पोस्ट— ' स्वाध्याय मण्डळ (पारडी)
पारडी (जि. बलसाड)

★

अनुवादक :
श्री यशवन्त कृष्ण पटवर्धन, एम्. ए., एस्. टी. सी., बी. टी.
काव्यतीर्थ, स्वाध्याय-मंडळ पारडी (जि. बलसाड)

★

मुद्रक :
वसंत श्रीपाद सातवळेकर,
भारत मुद्रणालय, स्वाध्याय-मण्डळ,
पोस्ट— ' स्वाध्याय मण्डळ (पारडी) ',
पारडी (जि. बलसाड)

अथर्ववेदाचा सुबोध अनुवाद

‘ मातृभूमि आणि स्वराज्यशासन ’

भू मि का

मातृभूमि आणि सुयोग्य राज्यशासन

‘ सुयोग्य राज्यशासन ’ कोणास म्हणावें हा एक प्रश्नच आहे. उत्तम राज्यशासनामुळें प्रजेचें सुख वाढतें यांत शंका नाहीं, परंतु उत्तम राज्यशासन कोणतें हा एक विचारणीय प्रश्न आहे. आज पृथ्वीवर निरनिराळया देशांत अनेक प्रकारचीं राज्यशासनें चालू आहेत. रशियांत साम्यवादी राजशासन आहे, तर अमेरिकेंत लोक प्रतिनिधींचें राज्यशासन आहे, आणि इतर दुसऱ्या देशांत अनेक प्रकारचीं राज्यशासनें चालू आहेत.

प्राचीन कालींहि अनेक प्रकारचीं राज्यशासनें होतीं. राज्य, महाराज्य, साम्राज्य, स्वराज्य, सामन्तपर्यायी (सामंतशाही) राज्य, भौज्य, वैराज्य, आधिपत्यमय राज्य, जनराज्य इत्यादि अनेक प्रकाच्या राज्यशासनांचीं वर्णनें आपणांस वेदांत आणि ब्राह्मण ग्रंथांत पहावयास मिळतात. अर्थात् आज जशीं अनेक देशांत अनेक प्रकारचीं राज्यशासनें दिसतात, तद्वतच वैदिक काळीं सुद्धां आपणांस तीं पहावयास मिळतात. ब्राह्मण ग्रंथांत तर अमुक प्रकारचें राज्यशासन अमुक दिशेस चालतें असें स्पष्ट रीतीनें वर्णिलें आहे आणि शेवटीं म्हटलें आहे कीं—

समुद्रपर्यन्तायाः पृथिव्याः एकराट् (ऐ. ब्रा.)

‘ समुद्रापर्यंत पसरलेल्या या समस्त पृथ्वीवर एकच राजा आणि त्याचें एकच राज्यशासन होवो ! ’ आज ज्याप्रमाणें संयुक्त राज्याची कल्पना (युनो.) प्रचलित झालेली आहे आणि ती कार्य करीत आहे, त्याचप्रमाणें **‘ पृथिव्याः एकराट् ’** ही कल्पना आहे. पृथक् पृथक् राज्यें असलीं आणि तीं संपूर्णपणें स्वतंत्र असलीं तर त्यांच्यांत भांडणें आणि युद्धें होण्याचा संभव असतो; पण याप्रमाणें युद्ध होऊन त्यांत मानवसंहार न व्हावा, या हेतूनें **‘ पृथिव्याः एकराट् ’** ही कल्पना प्रचलित झाली आणि आजच्या संयुक्त राष्ट्रांच्या संस्थेची (युनो) कल्पना सुद्धां या हेतूनेंच उत्पन्न झालेली आहे. आतां या कल्पनेस कितपत् सफलता मिळाली आहे, हा एक निराळा प्रश्न आहे; परंतु पृथ्वीवर एकच राज्य असावें आणि त्याची शासनपद्धति एकच असावी, ही कल्पना सर्व काळीं होती, ती केवळ आजचीच आहे आणि पूर्वीं ही कल्पनाच नव्हती, असें नाहीं. ज्ञानी सज्जन संपूर्ण मानवजातीचें हित व्हावें, मानवांचा निरर्थक संहार न व्हावा, अशा प्रकारचा विचार करीतच असत, आणि अशा विचारांतूनच संयुक्त राज्यशासनाच्या कल्पनेचा उद्भव झाला आहे. जशी ही कल्पना आज उद्भवली तशीच वैदिक समयीं प्राचीन ज्ञानी नेत्यांमध्यें ती उद्भवली होती; याचें प्रत्यंतर **‘ पृथिव्याः एकराट् ’** यांत आपणांस पहावयास मिळतें.

‘ पृथ्वीवर एक राज्यशासन व्हावें ’ ही कल्पना जरी ब्राह्मण ग्रंथांत आपणांस पहावयास मिळते, तथापि तसें शासन कोठें झाल्याचें इतिहासावरून आपणांस पहावयास मिळत नाहीं. त्यामुळें आज आपण एवढेंच म्हणूं शकतों कीं, ही कल्पन ऋषींना अथवा त्या कालच्या नेत्यांना स्फुरली पण ती प्रत्यक्ष व्यवहारांत परिणत झाली नाहीं.

आज संयुक्त राष्ट्रसंघ (युनो.) चालू आहे, पण त्यापासून कांहीं कोणास लाभ होत आहे असें दिसत नाहीं. याचें कारण हेंच आहे कीं, प्रत्येक राष्ट्राचा स्वार्थ आडवा येत आहे आणि त्यामुळें या संस्थेचा मूळ उद्देशच नष्ट झाल्यासारखा झाला आहे. मानव स्वभाव असाच आहे. तो प्राचीन काळींहि असा होता आणि आजही असाच आहे.

येथें आम्हांस इतकेंच दाखवावयाचें आहे कीं प्राचीन काळीं या पृथ्वीवर अनेक राज्यें होतीं. त्यांच्यांत आपसांत युद्धें होतच

होतीं आणि त्यांतूनच **' पृथ्वीवर एकच राज्य व्हावें '** ही कल्पना प्रादुर्भूत झाली; पण पृथ्वीवर त्याप्रकारचें एक संपूर्ण राज्यशासन होऊं शकलें नाहीं. मानवांची बौद्धिक उन्नति पृथ्वीवर राज्य, साम्राज्य आणि स्वराज्य सुरु होण्याइतकीच झाली. त्यापुढें पृथ्वीवर संपूर्णपणें एकच राज्यशासन होईपर्यंत उन्नति झाली नाहीं !

यामुळें राज्य, साम्राज्य आणि स्वराज्य यांच्या कल्पना पृथ्वीवर पसरल्या, असें दिसतें. स्वराज्याचा अर्थ **' बहुपाय्य स्वराज्य '** असा वेदांत आहे. एका राजाच्या अनियंत्रित राज्यशासनाला **' राज्य '** म्हणावें आणि लोकनियंत्रित राज्यशासनाला **' बहुपाय्य स्वराज्य '** म्हणावें. वेदांमध्यें हीं सर्व प्रकारचीं शासनें आहेत, पण त्यांतल्या त्यांत **' बहुपाय्य स्वराज्यशासना '** च्या महात्म्याचें वर्णन विशेष आहे.

मातृभूमीविषयीं प्रेम

राज्यशासन कोणत्याहि प्रकारचें असो, त्यायोगें जनतेंत मातृभूमीविषयीं प्रेम अवश्य असलें पाहिजे. वेदांतील मातृभूमीचें सूक्त या दृष्टीनें मनन करण्यास योग्य आहे. दुसऱ्या कोणत्याहि धर्मग्रंथांत मातृभूमीवरील प्रेम अथवा भक्तीविषयीं कांहीं सांगितलेलें आढळत नाहीं. फक्त वेदांमध्येंच हें सूक्त आहे आणि तेंहि इतकें विस्तृत आहे कीं प्रत्येक विचारकाला त्याविषयीं आश्चर्य वाटेल !

वेदांमध्यें मानवधर्माची पूर्णता कशी वर्णिली आहे तें यावरून स्पष्ट होतें. मानवधर्माचे जेवढे पैलू आहेत त्या सर्वांसंबंधीं उत्तम आदेश वेदांमध्यें दिलेले आहेत. या पुस्तकांत वाचकांस **' मातृभूमि आणि राज्यशासन '** यासंबंधीं सर्व विषय एकत्र पहावयास मिळतील.

प्रथम भागांत ज्याप्रमाणें **' ब्रह्मविद्ये '** चीं सूक्तें दिलीं आहेत, त्याप्रमाणेंच या दुसऱ्या भागांत **' मातृभूमि आणि राज्यशासनाशीं '** संबंधित असलेलीं सर्व सूक्तें दिलीं आहेत, तीं अशीं—

१ **' मातृभूमि '**— मातृभूमि, विराट्, राष्ट्रदेवी, राष्ट्रसभेची राजाबद्दल अनुमति.

२ **' राजा '**— राजाचें कर्तव्य, राजाचें राज्यपदावर स्थैर्य, राष्ट्रीय ऐश्वर्याची अभिवृद्धि, राजाचा राज्याभिषेक, राजा निर्माण करणारे, राजाची निवडणुक करणारे, राजा, राजाची राज्यावर पुनः स्थापना.

३ **' राजाचा धर्म '**— क्षत्रियाचा धर्म, प्रजेचें पालन, दिशांचे पालक आणि रक्षक, राष्ट्राचें संवर्धन, संरक्षक इ.इ.

४. **' दुष्टांचा नाश '**— दुष्टनाश, शत्रुदमन, दुष्टांचा संहार, सेना संमोहन, पापापासून रक्षण, दुःखविमोचन, विजयप्राप्ति.

५ **' विजयाची प्राप्ति '**— अभ्युदयाची प्रार्थना, पराक्रमानें विजय, विजयाची प्रार्थना, कर्म आणि विजय, वर्चः प्राप्ति, ज्ञान आणि शौर्याची ओजस्विता, तेजस्वितेनें अभ्युदय, तेजस्वितेची प्राप्ति, अभ्युदयाची दिशा.

६ **' संरक्षण '**— सुरक्षा, बलप्राप्ति, आत्मशुद्धि, उत्तम आणि श्रेष्ठ होणें, यशस्वी होणें, निर्भयता, कल्याण, पवित्रता, शुद्धता, उत्तम मार्गानें जाणें.

७ **' आनन्द '**— पुष्टि, सुख, ज्ञान, बन्धनापासून मुक्ति, क्रोधशमन, सिद्धि.

८ **' युद्धसाधनें '**— युद्धाचीं साधनें, रथ, दुंदुभि, राजाचें स्थैर्य, शूर वीर.

या शीर्षकांचीं जवळ जवळ ११२ सूक्तें आणि सुमारें एक हजार मंत्र या पुस्तकांत दिले आहेत. या मंत्रांचा विचार केला असतां वेदकालीन राज्यशासन कसें होतें, त्याची पूर्ण कल्पना येईल. उदाहरणासाठीं कित्येक मंत्र येथें देतों—

मातृभूमीचा उद्धार

मातृभूमीचा उद्धार कोणत्या गुणांनीं होतो या विषयीं मातृभूमीसूक्ताचा प्रथम मंत्र असा आहे—

सत्यं बृहद् ऋतं उग्रं दीक्षा तपो ब्रह्म यज्ञः
पृथिवीं धारयन्ति ॥ (अथर्व १२।१।१)

' सत्य, सरलता, उग्रता, दक्षता, धर्मनियमपालन करीत असतां कष्ट सहन करणें, ज्ञान आणि यज्ञभाव हे गुण मातृभूमीचें रक्षण करतात.' मातृभूमीस स्वतंत्र ठेवण्यासाठीं, तिच्या स्वातंत्र्य रक्षणासाठीं प्रजाजनामध्यें या गुणांचें संवर्धन होणें आवश्यक आहे. जेथील प्रजा या गुणांनीं युक्त असते तेथील मातृभूमि स्वतंत्र, तेजस्वी, उज्ज्वल आणि कीर्तीनें युक्त असते. ही सूचना किती महत्त्वपूर्ण आहे याचा वाचकांनींच विचार करावा; आणि या गुणांचा विकास आपल्या ठिकाणीं करण्याचा सर्वांनीं प्रयत्न करावा. पुढें पहा—

यस्यां पूर्वे पूर्वजना विचक्रिरे यस्यां देवा असुरानभ्यवर्तयन्। (अथर्व १२।१।५)

' ज्या आमच्या मातृभूमींत प्राचीन पूर्वज पूर्वी मोठमोठे पराक्रम करीत असत आणि ज्या आमच्या मातृभूमींत देवांनीं असुरांस दूर हांकून लावलें.' हा इतिहास या आपल्या मातृभूमींतच घडला हें हा मंत्र दाखवीत आहे. यामुळें आपल्या प्राचीन इतिहासाचें स्मरण होतें, मातृभूमीविषयींचें प्रेम वाढतें आणि आपल्या

मातृभूमीच्या उन्नतिसाठीं आपणहि कांहीं केलें पाहिजे, अशी आपणांस प्रेरणा होते. अशा प्रकारची स्फूर्ति आणि उत्साह हा मंत्र देतो.

अजीतोऽहतो अध्यष्ठां पृथिवीमहम् ॥
(अथर्व १२।१।११)

'अजिंक्य होऊन युद्धांत न मरतां, जखमी न होतां मीं आपल्या मातृभूमीवर अध्यक्ष होऊन राहीन.' अध्यक्ष होऊन मीं आपल्या मातृभूमींत उत्तम कार्य करीत राहीन, असा विचार मनुष्यानें आपल्या मनांत बाळगावा.

त्वज्जाताः त्वयि चरन्ति मर्त्याः ।
तवेमे पृथिवि पञ्च मानवाः ॥ (अथर्व १२।१।१५)

'हे मातृभूमि ! आम्ही सर्व पांच प्रकारचीं माणसें तुझ्यापासून निर्माण झालों आहोंत आणि तुझ्यांतच भ्रमण करीत आहोंत.' हा मंत्र पांच प्रकारच्या लोकांचें (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, व निषाद यांचें) संगठन झालें पाहिजे असा उच्चभाव सूचित करीत आहे. तसेंच—

यो नो द्वेषत् पृथिवि यः पृतन्यात् योऽभिदा-
सात् मनसा यो वधेन । तं नो भूमे रंधय ।
(अथर्व. १२।१।१४)

'हे पृथ्वी ! जो आमचा द्वेष करतो, जो सैन्य पाठवून आमच्याशीं युद्ध करतो, जो मनानें आम्हांस दास करूं इच्छितो त्या सर्वांचा नाश कर.'

ऋषींचें स्मरण

पूर्वकालीं आपल्या मातृभूमींत उत्पन्न झालेले ऋषि ब्रह्मज्ञानी होते. त्यांचें स्मरण या सूक्तांत केलेलें आहे, तें पहा—

यस्यां पूर्वे भूतकृत ऋषयो गा उदानृचुः ।
(अथर्व. १२।१।३९)

'ज्या मातृभूमींत पूर्वकाळीं भूतकालीन इतिहास करणारे महान् ऋषि झाले होते.' याप्रमाणें प्राचीन काळच्या ऋषींचें उत्तम प्रकारें स्मरण केलें आहे. तसेंच—

मातृभूमीविषयीं उत्तम भाषण

आपल्या मातृभूमीविषयी नेहमीं उत्तमच बोललें पाहिजे, या याविषयीं म्हटलें आहे—

ये ग्रामा यदरण्यं याः सभा अधि भूम्याम् ।
ये संग्रामाः समितयस्तेषु चारु वदेम ते ॥
(अथर्व. १२।१।५६)

'गांव, अरण्य, सभा, संग्राम, समिति- या सर्व ठिकाणीं तुझ्याविषयीं आम्हीं चांगलेंच बोलूं.'

दीर्घं नः आयुः प्रतिबुध्यमाना
वयं तुभ्यं बलिहृतः स्याम ॥ (अथर्व. १२।१।६२)

'आम्हांस दीर्घायुष्य प्राप्त होवो, आम्हीं उत्तम ज्ञानी व्हावें आणि मातृभूमिसाठीं आम्हीं आमचें बलिदान करावें.'

याप्रमाणें आपल्या मातृभूमीविषयीं किति उच्च विचार वेदांमध्यें सांगितलें आहेत ! त्याविषयीं वाचकांनीं विचार करावा आणि आपल्या मातृभूमीविषयीं असेच विचार नेहमीं आपल्या मनांत बाळगावेत. तसेंच आपल्या मातृभूमीची सेवा करून स्वतः कृतकृत्य व्हावें, आपलें जीवन अशा प्रकारें सार्थकीं लावावें.

आतां आपण राज्यशासनाचा आणखी विचार पाहूंया. प्रथम '**वि-राट्**' नांवाचें राज्यशासन कसें असतें तें पहा. या विषयीं वेदमंत्र असें म्हणत आहे—

वैराज्याची व्यवस्था

विराट् वा इदम् अग्र आसीत् तस्या जातायाः
सर्वं अबिभेद् इयमेवेदं भविष्यति इति ।
(अथर्व. ८।१०।१)

'विराट् अवस्थाच प्रथम होती, त्यामुळें सर्वांना भीति वाटूं लागली कीं ही नेहमीं अशीच राहिली तर काय होईल ?' या विराट व्यवस्थेचें कोणतें भय आहे तें पहा—

'विराट् (वि-राज्)' चा अर्थ '**राजा नाहीं**' अशी स्थिति, राजा नसणें ही अवस्था, राजा नसणें अशी स्थिति. प्रारंभीं राजा नव्हताच. लोकच स्वतःचा कारभार स्वतः मिळून चालवित असत. गांवचे लोक एकत्र येऊन जीं कांहीं गांवांतील कामें करावयाचीं असतील, त्यांची व्यवस्था ते करीत असत. सर्व गांवें याप्रमाणें जनशासित होतीं. सर्वांचें शासन करूं शकेल अशी राजशक्ति उत्पन्नच झाली नव्हती. ही राजाविरहित अवस्था पाहून सज्जनांस भय वाटूं लागलें कीं जर अशी राजाविरहित स्थिति राहिली तर जनतेची उन्नति होणें कसें शक्य होईल बरें ? असें भय सज्जनांच्या मनांत निर्माण झालें आणि तें योग्यच होतें. विचारा अंतीं ग्रामस्थांनीं ग्रामसभा स्थापण्याचा निर्णय केला. त्यामुळें—

सा उदक्रामत् सा सभायां न्यक्रामत्
सा उदक्रामत् सा समितौ न्यक्रामत्
सा उदक्रामत् साऽमन्त्रणे न्यक्रामत् ।
(अथर्व. ८।१०-८।१०।१२)

' ती जनशक्ति उत्क्रांत झाली आणि ती ग्रामसभेंत परिणत झाली. ती जनशक्ति अधिक उत्क्रांत झाली आणि राष्ट्रसमितींत परिणत झाली. ती जनशक्ति अधिक उत्क्रांत झाली आणि मंत्रीमंडळांत परिणत झाली. '

याप्रकारें गांवांत ग्रामसभा, राष्ट्रांत राष्ट्रसमिति आणि मंत्रीमंडळ यांची स्थापना झाली आणि अशा रीतीनें राज्यशासन चालू झालें आणि शेवटीं या सभासमितींचा जो अध्यक्ष होता त्यासच राजा होण्याचा मान मिळाला. याप्रमाणें ' विराट् अवस्थेंतून ' राजाच्या शासनापर्यंत प्रजाशक्तीची उन्नति झाली. हिचेंच नांव ' राष्ट्रीशक्ति. ' ही राष्ट्राची जनशक्ति आहे आणि ती राजामध्यें केन्द्रित झाली. याविषयीं म्हटलें आहे—

राष्ट्री देवी

अहं राष्ट्री संगमनी वसूनां चिकीतुषी प्रथमा यज्ञियानाम् ॥ २ ॥
यं कामये तं तं उग्रं कृणोमि, तं ब्रह्माणं तं ऋषिं तं सुमेधाम् ॥ ३ ॥
अमन्तवो मां त उप क्षियन्ति श्रुधि श्रुत श्रद्धेयं ते वदामि ॥ ४ ॥
अहं सुवे पितरमस्य मूर्धन् ॥७॥ (अथर्व. ४।३०)

' मीं राष्ट्रशक्ति आहें, मीं धनास एकत्रित करणारी आहें. पूजनीयांत मीं पूजनीय आहें. आपल्या इच्छेप्रमाणें ज्यास इच्छितें त्यास उग्र वीर करूं शकतें. त्यास ब्रह्मा अथवा उत्तम बुद्धिमान ऋषि करूं शकतें. माझा अपमान करणाराचा नाश होतो. हे श्रद्धावान् मनुष्या ! तूं हें ऐक. मीं स्वतःच हें सांगत आहें. राष्ट्राचें पालन करणाऱ्यास मीं राष्ट्राच्या अधिकारावर नियुक्त करतें.'

हें राष्ट्रशक्तीचें कथन आहे. राष्ट्रशक्ति ही कांहीं कोणी मानवी व्यक्ति नाहीं कीं ती मनुष्याप्रमाणें बोलूं शकेल. परंतु येथें मनुष्याप्रमाणें ती बोलत आहे असें अलंकारिक वर्णन केलें आहे. तें मनुष्यास बोधप्रद व्हावें, म्हणून आहे. राष्ट्राच्या जीवित आणि जागृत शक्तीनेंच हें सर्व कार्य होतें. जगांत जीं राष्ट्रें जीवित आणि जागृत आहेत तींच विशेष प्रमाणांत कार्य करतांना दिसतात. या राष्ट्रशक्तीचा प्रभाव असा हा एवढा मोठा आहे.

राष्ट्रसभेची अनुमति

राष्ट्रशक्तीचा अर्थ राष्ट्रांतील जनतेची संघशक्ति. ती राष्ट्राच्या सभेमध्यें एकत्रित झालेली असते. जर राष्ट्र ज्ञानविज्ञानसंपन्न असेल तर ही शक्ति प्रभावित असते आणि जें राष्ट्र अज्ञानी असेल तेथें ही शक्ति प्रभावित होऊं शकत नाहीं. या राष्ट्रसभांचा प्रभाव केवढा मोठा असतो तें पहा—

सभा च मा समितिश्चावतां प्रजापतेर्दुहितरौ संविदाने । (अथर्व. ७।१२।१).

' राजा म्हणतो कीं, ग्रामसभा आणि राष्ट्राची समिति या मिळून माझें संरक्षण करोत. ' त्या राजाच्या आज्ञेनें निर्माण होतात, म्हणून त्या राजाच्या दुहिता म्हणजे मुली होत. अर्थात् त्या राजाच्या आज्ञेंत न राहतां त्या स्वतंत्रपणानें आपला राज्यव्यवहार चालवितात. त्यामुळें त्या राजाचेंही रक्षण करतात. राष्ट्रसमितीचें आणि ग्रामसभेचें सामर्थ्य एवढें मोठें आहे कीं त्या अनुकूल असल्या तरच राजा राज्यावर टिकूं शकतो, नाहीं तर नाहीं. एवढी मोठी शक्ति वैदिककालीं राजसभांना होती.

राजा कसा असला पाहिजे ?

राष्ट्राचें संरक्षण करण्यास कोणी उत्तम शासक राजगादीवर असला पाहिजे. त्या शासकांत असे गुण असावेत—

इंद्रः सुत्रामा स्ववां अवोभिः सुमृडीको भवतु विश्ववेदाः । बाधतां द्वेषो अभयं नः कृणोतु सुवीर्यस्य पतयः स्याम ॥ (अथर्व. ७।९१।१)

' राजा (**सु-त्रामा**) प्रजेचें उत्तम प्रकारें संरक्षण करणारा असावा. (**स्ववां**) स्वतःच्या शक्तीनें कार्य करणारा असावा. (**अवोभिः**) तो संरक्षक शक्तींनीं युक्त असावा. (**सुमृडीकः**) प्रजेस उत्तम सुख देणारा असावा. (**विश्ववेदाः**) तो सर्व धनांनी आणि ज्ञानानें युक्त असावा. तो शत्रूस दूर करील, आम्हांस निर्भय करील आणि आम्ही त्याच्या संरक्षणाखालीं राहून उत्तम पराक्रम करणारे होऊन धनाचे उत्तम स्वामी बनून राहूं. '

विश्वा अमीवाः प्रमुञ्चन् मानुषीभिः शिवाभिः अद्य परि पाहि नो गयम् । (अथर्व. ७।८४।१)

' सर्व रोगांस दूर कर आणि मनुष्यांचें कल्याण करण्याच्या सर्व साधनांनीं आमचें घर सुरक्षित कर. '

राजाच्या व्यवस्थेमुळें प्रजा निरोगी आणि सर्वत्र सुरक्षित झाली पाहिजे. त्याचीं लक्षणें अशीं आहेत.—

अपानुदो जनं अमित्रयन्तम् । (अथर्व ७।८४।२)

' शत्रुत्व करणाऱ्या लोकांस दूर करावें. ' राष्ट्रामध्यें शत्रु राहूं शकणार नाहींत असें संरक्षण राजानें केलें पाहिजे, तसेंच—

ध्रुवोऽच्युतः प्र मृणीहि शत्रून् शत्रूयतोऽधरान् पादयस्व । सर्वा दिशः संमनसः सध्रीचीः ध्रुवाय ते समितिः कल्पतामिह । (अथर्व. ६।८८।३)

' राजानें स्वकर्तव्य करीत स्थिर रहावें, कर्तव्य भ्रष्ट होऊं नये. शत्रूंचा नाश करावा, शत्रुत्व करणाऱ्यास खालीं पाडावें. सर्व दिशांत रहाणारे लोक एकाच उत्तम विचाराचे व्हावेत. राजाच्या स्थैर्यासाठीं राष्ट्रसमिति स्थापन करावी. '

राजाचें स्थैर्य राष्ट्रसभेच्या अनुकूलतेवर अवलंबून असतें, हें तात्पर्य येथें आहे.

राजाचे निर्माते

प्रजाजन हे राजाचे निर्माते आहेत. गांवचे लोकच ग्रामसभेचे सभासद निवडून देतात. राष्ट्रांतील लोक राष्ट्रसमितीचे सभासद निवडून देतात. हे सभासद स्वतः मधूनच मंत्री निवडत आणि मंत्रीमंडळ बनवीत. हें मंत्रीमंडळ एका शूर वीराला पसंत करून त्यास राजगादीवर बसवी.

ये राजानो राजकृतः सूताः ग्रामण्यश्च ये ।
उपस्तीन् पर्ण मह्यं त्वं सर्वान् कृणु अभितो जनान् ॥ (अथर्व. ३।५।७)

' जे शासक आहेत, जे राजा निर्माण करतात, जे सूत आणि ग्रामनेते आहेत, त्या सर्वांना राजानें अनुकूल करून ठेवलें पाहिजे. '

जर हे लोक राजास अनुकूल झाले तरच राजा राज्यावर सुरक्षित आणि स्थिर राहूं शकतो. राजाची शक्ति प्रजाजनांच्या अनुकूलतेवरच स्थिर राहणारी आहे. या विषयीं आणखी पहा—

त्वां विशो वृणतां राज्याय त्वां इमाः प्रदिशः पञ्च देवीः।
वर्ष्मन् राष्ट्रस्य ककुदि श्रयस्व ततो न उग्रो वि भजा वसूनि ॥ (अथर्व. ३।४।२)

' हे राजन् ! या चारी दिशांस रहाणारे हे पंचजन आहेत ते सर्व राज्याच्या शासनाधिकारासाठीं तुला निवडोत. सामर्थ्यसंपन्न होऊन तूं राज्याच्या उच्चस्थानीं विराजमान् हो आणि नंतर आम्हांस धन विभागून दे. ' आम्हांला योग्य प्रकारें धन प्राप्त होईल अशी सुव्यवस्था तूं कर. आणखी पहा—

स्वस्तिदा विशां पतिर्वृत्रहा विमृधो वशी ॥ १ ॥
वि न इन्द्र मृधो जहि नीचा यच्छ पृतन्यतः ॥२॥
(अथर्व. १।२१)

' राजा प्रजेचें पालन व कल्याण करणारा होवो, तो शत्रूचा वध करो आणि स्वतःस आपल्या आधीन ठेवो. स्वतःस उन्मत्त होऊं देऊं नये. सैन्यासह जे शत्रु आमच्यावर स्वारी करतील त्यांस खालीं पाडावें. आमच्या शत्रूंस राजानें नाहींसें करावें. '

राजाचा कर

राज्यशासन चालविण्यांत खर्च होतो. हा खर्च प्रजा स्वतः-च्या उत्पन्नातून देई त्यास ' कर ' म्हणत. या विषयीं असें म्हटले आहे—

यद् राजानो विभजन्त इष्टापूर्तस्य षोडशं यमस्यामी सभासदः । अविः तस्मात् प्र मुञ्चति दत्तः शितिपात् स्वधा ॥ (अथर्व. ३।२९।१)

' राजांनीं प्रजेजवळून तिच्या उत्पन्नाचा सोळावा भाग कर-रूपानें वसूल करावा. राजाचे नियामक तसेंच राष्ट्रसभेचे जे सदस्य आहेत ते या करास अनुमोदन देत आहेत. हा (**अविः**) संरक्षक कर आहे. तो प्रजेचें विनाशापासून संरक्षण करतो. '

येथें सोळावा हिस्सा कररूपानें घेण्याचा निर्देश आहे. स्मृति-ग्रंथांत प्रजेच्या उत्पन्नाचा सहावा भाग कररूपानें घ्यावा असें सांगितलें आहे. म्हणजे वेदकालीं १६ व्या भागानें राज्याचा खर्च चालत होता, तोच व्यवहार चालविण्यास स्मृतिकालीं ६ वा भाग घेण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. अर्थात् जर कोणाचें उत्पन्न १०० रु. असेल तर ६ रु. वेदकालीं कर घेतला जाई, तोच स्मृतिकालीं १६ रु. घ्यावा लागे, आणि आज तर धनिकांपासून शेंकडा ८० ते ९० रु. पर्यंत सुद्धां कर घेण्याची राज्यकर्त्यांना आवश्यकता वाटूं लागली आहे ! नव्हे परिस्थितिच तशी उत्पन्न झाली आहे. हेंच कालाचें परिवर्तन होय.

दुष्टांचा नाश

' ब्रह्मद्विषे क्रव्यादे घोरचक्षसे द्वेषो धत्तमनवायं किमीदिने ॥ (अथर्व. ८।४।२)

' जे ज्ञानाचा द्वेष करतात, जे कच्चे मांस खातात, ज्यांच्या दृष्टींत सुद्धां क्रूरता आहे आणि जे आज हें तर उद्यां तें —म्हणजे कांहीहि— खातात आणि सतत आतां काय खावें याचाच विचार करतात अशा क्रूरकर्म्यांचा द्वेष करा. ' असे लोक समाजास उपद्रव करणारे असतात. तसेंच—

उलूकयातुं शुशुलूकयातुं जहि श्वयातुमुत कोकयातुम् ।
सुपर्णयातुमुत गृध्रयातुं दृषदेव प्र मृण रक्ष इन्द्र ॥
(अथर्व. ८।४।२२)

' घुबडासारखे जे अज्ञानी आहेत, लांडग्याप्रमाणें जे क्रोधी आहेत, कुत्र्याप्रमाणें जे आपआपसांत भांडतात, चिमण्याप्रमाणें जे अतिकामी-स्त्रीलंपट आहेत, गरुडाप्रमाणें जे घमेंडी आहेत, गिधाडाप्रमाणें जे लोभी आहेत, त्या सर्वांचा नाश कर आणि आम्हांस सुरक्षित ठेव. ' हे सहा मनोविकार-षड्रिपु आहेत, ते काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर हे होत. माण-सानें यांच्यापासून दूर राहिलें पाहिजे. समाजांत सुद्धां अशीं माणसें फार कमी असावीं. हें राजाच्या नियंत्रणानें होणें शक्य

आहे. राजदंडाच्या भीतीनें राष्ट्रांत असें नियंत्रण होऊं शकतें. या सहा दुर्गुणांपासून जे अलिप्त रहातात त्यांसच सज्जन म्हणतात. ज्या समाजांत या सहा प्रकारचीं दुर्गुणी माणसें कमी असतील आणि सद्गुणी माणसांची संख्या मोठी असेल तो समाज चांगला आहे असें समजावें.

वध दंड

राज्यशासन दुष्टांस वधदंड देऊं शके. याबाबतींत हा मंत्रभाग पहाण्यासारखा आहे—

अत्रिणः हतं न्योषतं । अशंसं तर्हणं वधं वर्तयतम् ।
द्रुहः भंगुरावतः रक्षसः हतम् ।
पिशुनेभ्यो वधं शिशीते । (अथर्व. ८।४)

'भोगी, पापी, द्रोही, विनाशक, चहाडी करणारे, राक्षसी वृत्तीचे यांस वध दंड द्यावा.' तसेंच—

यो नः स्वो यो अरणः सजात उत निष्ट्यो ।
यो अस्माँ अभिदासति । रुद्रः शरव्ययैतान्
ममामित्रान् वि विध्यतु ॥ ३ ॥
यः सपत्नो योऽसपत्नो यश्च द्विषन् छपाति नः ।
देवाः तं सर्वे धूर्वन्तु ब्रह्म वर्म ममान्तरम् ॥ ४ ॥
(अथर्व. १।१९)

'जो आमच्या जातीचा आहे अथवा जो परजातीचा आहे, जो उच्च आहे वा नीच आहे, पण जो आम्हांस दास करूं इच्छितो अशा (सर्वांस) दूर कर. जो आमचा सावत्र अथवा सख्खा भाऊ आहे परंतु जो आम्हांस शाप देतो, जो नेहमीं आमचा द्वेष करतो, अशा आमच्या सर्व शत्रूंचा देव नाश करोत. सत्य ज्ञान हें माझें कवच आहे.'

शत्रूंच्या नाशासंबंधीं याप्रमाणें वेदांत सांगितलें आहे. शत्रूंचा नाश झाला तरच राष्ट्र सुखी होईल, निर्भय होईल आणि उन्नतीचीं कार्यें करण्यांत तत्पर राहील.

शत्रुसेनेचें संमोहन

शत्रुसेनेस संमोहित करून तिचा नाश करावा हें वैदिक नीति-प्रमाणें योग्य गणलें जाई. पहा—

स सेनां मोहयतु परेषां निर्हस्तांश्च कृणवत् ॥ १ ॥
इन्द्रः सेनां मोहयामित्राणाम् ॥ ५ ॥
इन्द्रः सेनां मोहयतु मरुतो घ्नन्तु ओजसा ।
चक्षूंष्यग्निरा दत्तां पुनरेतु पराजिता ॥ ६ ॥
(अथर्व. ३।१)

'त्यानें शत्रुसेनेस मोहित करावें, शत्रुसेनेस हस्तरहित करावें. वीरानें शत्रुसेनेस मोहित करावें, आणि सैनिकांनीं त्यांचा वध करावा. अग्नि त्यांचे डोळे बिघडवो आणि याप्रमाणें शत्रुसेना पराजित होवो आणि आपणांस विजय प्राप्त होवो.' पहा—

असौ या सेना मरुतः परेषां अस्मानैत्यभ्योजसा स्पर्धमाना । तां विध्यत तमसापव्रतेन यथैषां अन्यो अन्यं न जानात् ॥ (अथर्व. ३।२।६)

'ती शत्रुसेना स्पर्धा करीत आम्हांवर हल्ला करीत आहे, त्या सेनेस तमसास्त्रानें असें मारा कीं त्यांतील एक सैनिक दुसऱ्यास ओळखूं सुद्धां शकणार नाहीं. अशी भीति त्यांच्यांत निर्माण व्हावी, अशा परिस्थितींत आपण त्यांचा वध करून आपणांस विजय मिळेल असें करूं.' ही युद्धनीति आहे. वाचकांनीं याविषयीं अधिक विचार करून अधिक ज्ञान प्राप्त करावें.

पापी भावना दूर करा

व्यक्तींत काय किंवा राष्ट्रांत काय जे दोष असतात ते सर्व पापभावनेमुळें. यासाठीं राज्यशासनाच्या द्वारें अशी व्यवस्था व्हावयास हवी कीं ज्यामुळें पापी भावना कमी होत जाव्यात आणि पुण्यभावना अधिकाधिक वाढीस लागाव्यात. त्यामुळें राष्ट्राची उन्नति नक्की होईल. वेदांमध्यें पाप भावना दूर करण्याच्या आज्ञा अनेक ठिकाणीं दिलेल्या आहेत. त्या राष्ट्रहितास पोषक आहेत. पहा—

यद् विद्वांसो यदविद्वांस एनांसि चकृमा वयम् ।
यूयं नस्तस्मान्मुञ्चत विश्वे देवाः सजोषसः॥ १ ॥
यदि जाग्रत् यदि स्वपन्नेन एनस्योऽकरम् ।
भूतं मा तस्माद् भव्यं च द्रुपदादिव मुञ्चताम् ॥२॥
(अथर्व. ६।११५)

'जागून अथवा अजाणतां आम्हीं जीं पापें केलीं असतील, हे देव हो! त्या पापांतून तुम्हीं सर्व मिळून आम्हांस मुक्त करा. जागेपणीं अथवा झोपेंत पापी वृत्तीमुळें जीं पापें आम्हीं करतों त्या पापवृत्तीपासून मला बंधनस्थानापासून पशूंप्रमाणें मुक्त करावें त्या प्रमाणें मुक्त करा.

अभ्युदयासाठीं

अभ्युदयासाठीं वेदाचें मार्गदर्शन फार उत्कृष्ट आहे. वेद म्हणतात कीं मनुष्यानें आपला अभ्युदय अवश्य करून घेतला पाहिजे. यासंबंधीं खालील मंत्र मनन करण्यायोग्य आहे—

विषासहिं सहमानं सासहानं सहीयांसम् ।
सहमानं सहोजितं स्वर्जितं गोजितं संधनाजितम् ।
ईड्यं नाम ह्व इन्द्रमायुष्मान् भूयासम् ।
(अथर्व. १७।१।१)

'अत्यंत सामर्थ्यवान, अत्यंत बलशाली, नित्यविजयी, शत्रूंस

दूर करणारा, महाबलिष्ठ, पराक्रमानें दिग्विजय करणारा, स्वसामर्थ्यानें विजय मिळविणारा, गायी प्राप्त करणारा, धन जिंकून आणणारा, प्रशंसनीय, यशस्वी अशा प्रभूची मीं आयुष्मान् व्हावें यासाठीं मीं प्रार्थना करतों.

ही ईश्वराची प्रार्थना आहे. इंद्राची प्रार्थना आहे. त्यांत इंद्राचे गुण वर्णिले आहेत. या गुणांचा विचार केल्यानें विजय आणि अभ्युदय प्राप्त करण्याचा मार्ग कळून येतो. या गुणांचें सतत मनन केल्यानें मनुष्य या शुभ गुणांनीं युक्त होऊन तो आपला अभ्युदय प्राप्त करून घेऊं शकतो. या प्रार्थनेंत जे गुण सांगितले आहेत ते गुण साधकानें स्वतः आपल्यामध्यें धारण केले पाहिजेत, ते आपणामध्यें वाढविले पाहिजेत. असें केल्यानें काय होतें तें पुढील मंत्रांत सांगितलें आहे. पहा–

प्रियो देवानां भूयासम् ॥ २ ॥
प्रियः प्रजानां भूयासम् ॥ ३ ॥
प्रियः समानानां भूयासम् ॥ ५ ॥ (अथर्व. १७।१)

' मीं देवांना प्रिय व्हावें, मीं प्रजेला प्रिय व्हावें आणि माझ्यासारखे जे लोक आहेत त्यांनाही मीं प्रिय व्हावें. ' हेंच अभ्युदयाचें सत्य स्वरूप आहे. जो सर्व लोकांस अंतःकरणापासून प्रिय असतो त्यासच अभ्युदय प्राप्त झाला असें म्हणतां येईल.

पराक्रमानें विजयी

मनुष्य विजयाची इच्छा करतो म्हणून त्यानें पराक्रम केला पाहिजे. पराक्रमाशिवाय विजय अशक्यच आहे. म्हणूनच म्हटलें आहे कीं–

बृहद्धि जालं बृहतः शक्रस्य वाजिनीवतः ।
तेन शत्रूनभि सर्वान् न्युब्ज यथा न मुच्यातै कतमश्चनैषाम् ॥ ६ ॥
बृहत् ते जालं बृहत इन्द्र शूर सहस्रार्घस्य शतवीर्यस्य । तेन शतं सहस्रमयुतं न्यर्बुदं जघान शक्रो दस्यूनां अभिधाय सेनया ॥ ७ ॥
(अथर्व. ८।८)

' सैन्यासह रहाणाऱ्या महान् इन्द्राचें मोठें जाळें पसरलें आहे. त्याच्यायोगें सर्व शत्रूंस सर्व बाजूंनीं वेढून टाका, म्हणजे त्यांतील एक सुद्धां सुटून बाहेर जाणार नाहीं. हे शूर इन्द्रा ! हजारों जणांकडून सुपूजित आणि शेंकडोंजणांचें सामर्थ्य असणारा इंद्र शेंकडों, हजारों, लाखों आणि कोट्यावधि शत्रुसैनिकांस मारून टाकतो. '

असा आहे इंद्राचा पराक्रम. असा पराक्रम करण्यामुळेंच इंद्र विजयी होतो. यावरून सिद्ध होतें कीं आम्हीं जर असा पराक्रम करूं तर विजयी होऊं. पराक्रम हेंच विजयाचें मूळ आहे. त्यासाठीं मनुष्यानें पराक्रम करण्याची अभिलाषा बाळगावी, म्हणजे तो विजयी होईल.

ममाग्ने वर्चो विहवेष्वस्तु वयं त्वेन्धानास्तन्वं पुषेम ।
मह्यम् नमन्तां प्रदिशश्चतस्रः त्वयाध्यक्षेण पृतना जयेम ॥ (अथर्व. ५।३।१)

' युद्धांत माझें तेज प्रकाशित होत राहो. आम्हीं तुला प्रदीप्त करून आमच्या शरीरास पुष्ट करतों. चारी दिशा मजसमोर नम्र होऊन राहोत. तुझ्यासारख्या अध्यक्षाबरोबर राहून संग्रामांत आम्हीं विजय प्राप्त करूं. '

स्वतःचें तेज प्रत्येक कार्यांत प्रकाशित व्हावें. शरीर हृष्टपुष्ट आणि बलवान् व्हावें, शरीर शक्तिसंपन्न असावें. चारी दिशांस या वीरानें पराक्रम करावा, आणि चारी दिशांस रहाणाऱ्या लोकांनीं नम्र होऊन याला शरण यावें असा त्याचा प्रभाव असावा. प्रत्येक युद्धांत त्यास विजय मिळत रहावा. तसेंच पहा–

कृतं मे दक्षिणे हस्ते जयो मे सव्य आहितः ।
गोजित् भूयासं अश्वजित् धनंजयो हिरण्यजित् ॥
(अथर्व ७।५०।८)

' पुरुषार्थ माझ्या उजव्या हातांत आणि विजय माझ्या डाव्या हातांत आहे. मीं गायी आणि घोडे जिंकणारा, सुवर्ण आणि धन यांना जिंकून आणणारा व्हावें. '

या मंत्रांत जो आत्मविश्वास प्रकट झालेला आहे तसा प्रत्येक मनुष्यानें नेहमीं मनांत बाळगला पाहिजे. **' एका हातांत पुरुषार्थ आणि दुसऱ्यांत विजय '** असा विचार नेहमीं मनांत असावा. आत्मविश्वासाचा हा विचार मनास उत्साहित करतो आणि कार्यकर्त्यास विजयी करून यशाकडे खेंचून नेतो. असा विचार मनांत स्थिर होण्यास किती ज्ञान असलें पाहिजे आणि केवढी कार्यकुशलता असली पाहिजे याचा वाचकांनीं अवश्य विचार करावा. असा विचार मनांत स्थायी होण्यासाठीं जितकी स्वतःची तयारी करावयास पाहिजे तितकी मनुष्यानें करावी आणि म्हणत असावें कीं **' माझ्या एका हातांत पुरुषार्थ आणि दुसऱ्यांत विजय आहे. '**

ज्ञान आणि शौर्य

जर विजयप्राप्तीची इच्छा असेल तर आपल्यामध्यें ज्ञान आणि शौर्य हे दोनहि गुण वाढवले पाहिजेत, याविषयीं असें म्हटलें आहे-

संशितं म इदं ब्रह्म संशितं वीर्यं बलम्।
संशितं क्षत्रं अजरं अस्तु जिष्णुर्येषामस्मि पुरोहितः॥ १ ॥
समहमेषां राष्ट्रं स्यामि समोजो वीर्यं बलम्।
वृश्चामि शत्रूणां बाहूननेन हविषाहम् ॥ २॥
नीचैः पद्यन्तां अधरे भवन्तु ये नः सूरिं मघवानं पृतन्यान्।
क्षिणामि ब्रह्मणामित्रानुन्नयामि स्वानहम् ॥ ३ ॥
(अथर्व ३।१९)

' माझें हें ज्ञान तेजस्वी आहे. माझें हें वीर्य आणि बल तेजस्वी आहे. माझें तेजस्वी झालेलें क्षात्रबळ कधींहि क्षीण न होवो. मीं ज्यांचा विजयी पुरोहित आहें, त्यांचा विजय होईलच. मीं त्यांचें राष्ट्र तेजस्वी बनवितों. मीं या प्रजाजनांचें बल, वीर्य आणि ओज तेजस्वी बनवितों. मीं शत्रूंचे बाहू कापतों. आमच्या शत्रूंचा नाश होवो. आमच्या शत्रूंची अवनति होवो. जे आमच्या धनवान् आणि विद्वानांवर हल्ला करून त्यास त्रास देतात, त्या शत्रूंचा मी नाश करतों, आणि आमच्या लोकांस उन्नत करतों. '

राष्ट्रहित इच्छिणाऱ्यानें असे विचार मनांत बाळगावे. स्वतः-च्या लोकांचा उद्धार करण्याचा प्रयत्न केला पाहिजे; आणि शत्रूंचा अधःपात होईल असें केलें पाहिजे. आपल्या राष्ट्रांतील लोक जागृत व्हावेत आणि त्यांनीं शत्रूसैनिकांचा नाश करावा, ज्यामुळें शत्रु वाढणार नाहींत, शत्रूची शक्ति क्षीण होत जावी. असे प्रयत्न करीत असावे. वीर पुरुषांच्या चातुर्याचा उपयोग अशा प्रकारच्या आयोजनासाठीं झाला पाहिजे.

राष्ट्राची प्रतिष्ठा अशा आयोजनांनीं वाढते. राष्ट्र याप्रमाणें स्वशक्तीनें पुढें येतें. जनतेच्या उन्नतीवर राष्ट्रीय उन्नति आधारलेली आहे. यासाठींच वेदाची शब्दयोजना या गोष्टींची सूचना प्रत्यक्ष अथवा परंपरेनें वारंवार देत असते.

उन्नत राजाचें स्वरूप

जो राज्यशासन चालवितो त्यास राजा म्हणतात. तो उन्नति करून कोणत्या मर्यादेपर्यंत जाऊं शकतो त्याचा विचार खालील मंत्रांत आहे.

इममिन्द्र वर्धय क्षत्रियं म इमं विशामेकवृषं कृणु त्वम्।
निरमित्रानक्ष्णुह्यस्य सर्वांस्तान् रन्धय अस्मा अहमुत्तरेषु ॥ १ ॥
वर्ष्मं क्षत्राणामयमस्तु राजेन्द्र शत्रुं रन्धय सर्वमस्मै ॥ २ ॥
अयमस्तु धनपतिर्धनानां अयं विशां विश्पतिरस्तु राजा।
अस्मिन् इन्द्र महि वर्चांसि धेह्यवर्चसं कृणुहि शत्रुमस्य ॥ ३ ॥
(अथर्व. ४।२२)

' हे इंद्रा ! या क्षत्रियास वाढव, त्यास प्रजाजनांत अद्वितीय बलवान् कर. त्याच्या सर्व शत्रूंना निर्बल कर आणि युद्धांत त्याच्या शत्रूंस नष्ट-भ्रष्ट कर. हा राजा साक्षात् क्षत्रिय गुणांची मूर्ति होवो. त्याच्या सर्व शत्रूंचा नाश कर. हा राजा सर्व प्रकारच्या धनांचा स्वामी होवो ! हा राजा प्रजाजनांचा उत्तम पालक व्हावा. हे इन्द्रा ! या राजांत महान् तेजाची स्थापना कर आणि त्याच्या शत्रूंस निस्तेज कर. '

या मंत्रांत राजाच्या ठिकाणीं कोणते गुण असले पाहिजेत हें स्पष्टपणानें सांगितलें आहे. क्षात्रगुण सर्वांत आधीं अधिकांत अधिक राजामध्यें असले पाहिजेत. त्याच्या योगानेंच शत्रूंस दूर करणें त्यास शक्य होणारें आहे. त्याच्या ठिकाणीं पुष्कळ बलाची वाढ झाली पाहिजे. जो निर्बल, अशक्त व रोगी असेल तो उत्तम राजा होऊं शकणार नाहीं. शत्रूंस तो स्वतः-च्या ज्ञानानें आणि क्षात्रबलानें दूर करील आणि स्वतःकडे प्रजाजनांचें प्रेम आकर्षित करून घेईल. क्षात्रगुणांची तो प्रत्यक्ष मूर्तीच असला पाहिजे. राज्यशासनास आवश्यक गुण त्याच्या ठिकाणीं उत्कटतेनें प्रकट व्हावे. तो सर्व धनांचा स्वामी असावा. त्याचें कोशागार रिकामें नसावें. तें नेहमीं भरलेलें असावें. सर्व प्रजाजनांनीं त्यास प्रेमपूर्वक स्वतःचा राजा मानावें. त्यास विरोध करणारा पक्ष प्रजेंत निर्माण होऊं नये. त्याचे प्रतिपक्षी निस्तेज व्हावेत, आणि त्यानें अशीं कर्में करावीं कीं त्यामुळें त्याचें तेज वाढतच राहील.

राजा अशा गुणांनीं युक्त असावा. राजानें स्वतःच्या शुभ गुणांनीं प्रजेचें प्रेम आणि मन स्वतःकडे आकर्षित करून घ्यावें, कारण शेवटीं प्रजेच्या अनुमतीनेंच राजा राजगादीवर टिकूं

शकतो; म्हणून सर्व प्रजा ज्या राजावर प्रेम करते तो राजा स्थायी होतो.

आत्मशुद्धि

स्वतः आपली शुद्धि केली पाहिजे. इतर सर्व गुण असले आणि स्वतःचें आचरणच जर चांगलें नसलें तर बाकीचे सर्व गुण दुर्गुणच मानले जातात. इतकें महत्त्व आत्मशुद्धीचें आहे; म्हणून म्हटलें आहे कीं–

पुनन्तु मा देवजनाः पुनन्तु मनवो धिया ।
पुनन्तु विश्वा भूतानि पवमानः पुनातु मा ॥ १ ॥
पवमानः पुनातु मा क्रत्वे दक्षाय जीवसे
अथो अरिष्टतातये ॥ २ ॥ (अथर्व. ६।१९)

' दिव्यजन मला पवित्र करोत. मननशील ज्ञानी लोक स्वतः च्या मनानें आणि बुद्धीनें मला पवित्र करोत. सर्व भूतमात्र मला पवित्र करोत. पवित्र आचरण करणारा, कर्म बल आणि दीर्घायुष्य यांसाठीं पवित्र आचरण करणारा ज्ञानी मला पवित्र करो. कल्याणाचा असा सर्वत्र विस्तार होवो. '

जेथून पवित्रता होणें शक्य असेल तेथून माझी पवित्रता होवो. मीं निर्दोष व्हावें. माझें आचरण, माझें कार्य, माझे व्यवहार, कोणत्याहि प्रकारें दूषित अथवा पापयुक्त न व्हावेत. सर्व दिव्यजन अशा प्रकारें पवित्र आणि शुद्ध होण्यास मला सहाय्य करोत. पवित्रता होण्यासाठीं मदत करणें हें ज्ञानी लोकांचें कर्तव्यच आहे. दोष कोठें आहेत तें जाणून घेऊन तेथून ते दूर करण्यास ज्ञानी लोक सहाय्यक होवोत. शरीर, मन आणि इन्द्रियें यांच्या ठायीं जे दोष असतील ते, तसेंच राष्ट्रव्यवहार चालविण्यांत जे दोष असतील ते दूर झाले पाहिजेत. सार्वजनिक आचरण परिशुद्ध असलें पाहिजे. राज्याचे जे अधिकारी असतील त्यांचें आचरणही अवश्यमेव परिशुद्ध असलें पाहिजे; कारण त्यांचा आदर्श जनतेपुढें असतो. जनता त्यांचें अनुकरण करते.

ज्याप्रमाणें पवित्र होणें हें एक ध्येय आहे तद्वत् सर्वांत श्रेष्ठ होणें हेंहि ध्येय असावें. याविषयीं असें म्हटलें आहे–

समुद्र ईशे स्रवतामग्निः पृथिव्या वशी ।
चन्द्रमा नक्षत्राणाम् ईशे त्वमेकवृषो भव ॥ १ ॥
(अथर्व ६।८६)

' नद्यांचा स्वामी समुद्र आहे. पृथ्वीस ताब्यांत ठेवणारा अग्नि आहे. चन्द्रमा नक्षत्रांचा स्वामी आहे. त्याप्रमाणें तूं सर्वांत श्रेष्ठ बलवान् हो ! ' सर्वांत श्रेष्ठ होणें हें येथें मुख्य तत्त्व आहे.

अहमस्मि यशस्तमः । (अथर्व ६।३९।३)

' मीं अधिक यशस्वी व्हावें ' सर्वथैव माझें अधिक यश वाढावें, ही माझी महत्त्वाकांक्षा आहे. स्वतःची शुद्धि झाली असतां उत्तम यश प्राप्तच होतें. प्रत्येकानें या प्रकारची महत्त्वाकांक्षा स्वतःच्या मनांत धारण करावी, आणि तसें होण्यास आवश्यक ते प्रयत्न त्यानें करावे. तसेंच–

यशसं मेन्द्रो मघवान् कृणोतु यशसं द्यावापृथिवी उभे इमे ।
यशसं मा देवः सविता कृणोतु प्रियो दातुर्दक्षिणाया इह स्याम् ॥ (अथर्व. ६।५८।१)

' धनवान् इन्द्र मला यशस्वी करो, द्यु आणि पृथ्वी हीं मला यशस्वी करोत, सविता देव मला यशस्वी होण्यास सहाय्य करो. ' ही प्रार्थना आहे. आणखी पहा–

एवा विश्वेषु देवेषु वयं सर्वेषु यशसः स्याम ।
(अथर्व. ६।५८।२)

' आम्ही सर्व देवांत यशस्वी व्हावें. ' सर्वत्र आमचें यश वाढावें, जेथें जेथें आम्ही जाऊं तेथें तेथें आम्हांस यश मिळावें. सर्वत्र आम्हीं यशस्वी व्हावें. याप्रमाणें यशःप्राप्तीसाठीं परमेश्वराची प्रार्थना केली पाहिजे. यशःप्राप्तीमध्यें याप्रमाणें आम्हांस दैवी अनुकूलता मिळावी, हें येथें तात्पर्य आहे.

निर्भयतेची इच्छा

सर्व प्रजा निर्भय व्हावी. तिनें आनंदानें, सुखासमाधानानें रहावें, यासाठीं राज्यव्यवस्था असते. या हेतूनेंच म्हटलें आहे कीं–

अशत्रुः इन्द्रो अभयं नः कृणोतु
अन्यत्र राज्ञामभि यातु मन्युः ॥ २ ॥
अनमित्रं नो अधरादनमित्रं न उत्तरात् ।
इन्द्रानमित्रं नः पश्चात् अनमित्रं पुरस्कृधि ॥ ३॥
(अथर्व. ६।४०)

' इन्द्र आम्हांसाठीं शत्रुरहित निर्भयता निर्माण करो. राजांच्या रक्षकांचा क्रोध इतरत्र जावो. खालीं, वर, मागें, पुढें आम्हांस सर्वत्र निर्भयता प्राप्त होवो. आम्हांस कोणाचेंहि भय नसावें. आम्हीं सर्वदा निर्भय होऊन रहावें. '

उत्तम मार्गाचें अवलंबन

सर्व लोकांनीं उत्तम मार्गाचें अवलंबन करावें, म्हणजे त्यामुळें सर्वांस यश आणि निर्भयता प्राप्त होईल. याविषयीं अशी प्रार्थना आहे—

ये पन्थानो बहवो देवयाना अन्तरा द्यावा-पृथिवी संचरन्ति ।
तेषामज्यानिं यतमो वहाति तस्मै मा देवाः परि धत्तेह सर्वे ॥ १ ॥ (अथर्व. ६।५५)

' जो देवांचा येण्याजाण्याचा मार्ग आहे, जो द्युलोक आणि पृथ्वी यामध्यें आहे, जो उत्तम समृद्धि प्राप्त करून देतो, त्याच मार्गानें जाण्यास देव मला सहाय्य करोत. ' अर्थात् मीं सर्वांत उत्तम मार्गानें चालेन आणि अधिक कल्याण प्राप्त करून घेईन. राक्षस आणि पिशाचांच्या मार्गानें मीं जाणार नाहीं, परंतु देवांच्या मार्गांतील उत्तमोत्तम अशा मार्गानें मीं जाईन आणि उन्नति प्राप्त करून घेईन. मीं कल्याणयुक्त अवस्थेमध्यें रहावें.

मनुष्य जर स्वतःची खरोखर उन्नति करूं इच्छित असेल तर त्यानें स्वतःची अंतर्बाह्य शुद्धि राखली पाहिजे. त्यासाठीं म्हटलें आहे कीं—

यत् किं चेदं वरुण दैव्ये जनेऽभिद्रोहं मनुष्याश्चरन्ति ।
अचित्त्या चेत्तव धर्मा युयोपिम मा नस्तस्मात् एनसो देव रीरिषः ॥ (अथर्व० ६।५१।३)

' दिव्यजनांविषयीं जे कांहीं दुराचार सामान्य मनुष्य करतो आणि अजाणपणें तुझ्या धर्माचा भंग करतो, तें पाप आम्हां सर्वांपासून दूर कर. '

स्वतःची उन्नति साधूं इच्छिणाऱ्यानें मनुष्यधर्माचे जे उत्तम नियम आहेत, त्यांचे पालन केलेंच पाहिजे. तसें न केलें तर उन्नतीची इच्छा करणें अनुचित होय. राज्य-शासनाच्या योगानेंच जनतेसाठीं अशी व्यवस्था व्हावयास पाहिजे कीं, त्या राज्यशासनांत राहिल्यानें लोकांची जास्त जास्त प्रवृत्ति शुद्धाचरणाकडे होईल आणि अशुद्धाचरणाकडे त्यांचें लक्षसुद्धां जाणार नाहीं.

जेथें राज्यशासन आहे, तेथें सैन्य तर ठेवावेंच लागतें. तसेंच आधुनिक युद्धसामग्री आणि शत्रूविषयीं दक्षतासुद्धां ठेवली पाहिजे. सैन्याशिवाय अन्तर्बाह्य शत्रूंपासून स्वतःच्या राज्याचें रक्षण होऊं शकत नाहीं. त्यासाठीं युद्धरथ, दुन्दुभि इत्यादि साधनें ठेवावीं लागतात. दुन्दुभिविषयीं असें म्हटलें आहे—

विहृदयं वैमनस्यं वदामित्रेषु दुन्दुभे ।
विद्वेषं कश्मशं भयममित्रेषु नि दध्मसि अवैनान् दुन्दुभे जहि ॥ (अथर्व ५।२१।१)

' दुन्दुभे ! तूं शत्रूंच्या हृदयांत व्याकुळता आणि मनांत उदासीनता निर्माण कर. द्वेष, झगडे, कलह, भय हीं शत्रूंत वाढोत. आमच्या शत्रूंचा पराभव कर ! '

नगाऱ्यांचे अवाज ऐकून भयभीत होऊन शत्रु पळून जावोत, ते युद्धभूमींत स्थिर न राहोत. आपल्या नगाऱ्यांचे अवाज शत्रूंच्या अंतःकरणांत भय उत्पन्न करोत. आपली तयारी अशी पाहिजे कीं ती पाहूनच शत्रू भिऊन पळून जावे.

सूर्य चिन्हांकित ध्वज

वैदिककालीं आपला ध्वज सूर्यचिन्हांकित होता. या विषयीं खालील मंत्र पहा—

एता देवसेनाः सूर्यकेतवः सचेतसः ।
अमित्रान्नो जयन्तु स्वाहा ॥ (अथर्व. ५।२१।१२)

' या देवसेना तयार झाल्या आहेत. त्यांचा ध्वज सूर्यचिन्हांकित आहे. या सेना शत्रूवर विजय प्राप्त करोत. '

राजाची स्थिरता

राष्ट्रांत राजा स्थिर रहाण्यास त्याच्यामध्यें विशेष गुण असले पाहिजेत. ते शुभ गुण असे—

विशस्त्वा सर्वा वाञ्छन्तु मा त्वद्राष्ट्रमधि भ्रशत् ॥ १ ॥ इहैवैधि माप च्योष्ठाः पर्वत इवाविचाचलत् । इन्द्र इवेह ध्रुवस्तिष्ठेह राष्ट्रमु धारय ॥ २ ॥ (अथर्व. ६।८७)

' सर्व प्रजाजन हा राजा रहावा ' असें मनांत इच्छोत. राजाच्या राज्यशासनानें राष्ट्राचें पतन न व्हावें. राजानें पर्वताप्रमाणें सुस्थिर रहावें. राजानें राज्यावर स्थिर राहून राष्ट्राची उन्नति करण्याचा प्रयत्न करावा. '

राजाचें राज्यशासन असें असावें कीं त्यामुळें राष्ट्राची उन्नतीच होत रहावी. राष्ट्राचें पतन कधींहि न व्हावें. असा राजा राष्ट्रांत राज्यावर सुस्थिर राहूं शकतो, आणि अशा राजास राजगादीवर स्थिर राखण्यास प्रजा उत्सुक असते.

याप्रमाणें ' मातृभूमि आणि राज्यशासन ' या दुसऱ्या खंडाचा हा अल्प परिचय आहे. हा परिचय वाचून वाचक या विषयाचें स्वरूप कसें आहे तें जाणूं शकतील, अशी आशा आहे.

स्वाध्यायमंडळ,
पारडी

श्रीपाद दामोदर सातवळेकर

ॐ

अथर्ववेदाचा सुबोध अनुवाद

(भाग दुसरा)

‘ मातृभूमि आणि स्वराज्यशासन ’

मातृभूमीचें वैदिक गीत

कांड १२, सूक्त १

(ऋषिः - अथर्वा । देवता - भूमिः)

सत्यं बृहदृतमुग्रं दीक्षा तपो ब्रह्म यज्ञः पृथिवीं धारयन्ति ।
सा नो भूतस्य भव्यस्य पत्न्युरुं लोकं पृथिवी नः कृणोतु ॥ १ ॥

अर्थ— (बृहत् सत्यम्) महान् अथवा अचल सत्यनिष्ठा, (ऋतम्) यथार्थ ज्ञान, (उग्रम्) क्षात्रतेज, (तपः) धर्मानुष्ठान अथवा धर्मपालन, (दीक्षा) प्रत्येक कार्य करण्याचें चातुर्य अथवा दक्षता, (ब्रह्म) ज्ञान, (यज्ञः) यज्ञ, दान अथवा त्याग हे गुण (पृथिवीम्) भूमि, देश किंवा राष्ट्राचें (धारयन्ति) पालन, पोषण आणि रक्षण करतात. (सा पृथिवी) ती मातृभूमि (भूतस्य) प्राचीन आणि (भव्यस्य) भविष्यकालांतील, [आणि या दोहोंमध्यें असणाऱ्या] वर्तमानकालामधील सर्व पदार्थांची (पत्नी) पालन करणारी, अशी आमची मातृभूमि (नः) आम्हांस (उरुं) महान् (लोकं) कार्यक्षेत्र (कृणोतु) प्राप्त करून देवो. (१)

भावार्थ— जो मनुष्य राष्ट्रावर माझी सत्ता असावी, असें इच्छित असेल तर त्याच्यांत खालीं दिलेले गुण असणें आवश्यक आहे. सत्यप्रियता, उद्योगशीलता, महत्त्वाकांक्षेनें कार्यारंभ करणें आणि तें सिद्ध करण्याचा उत्साह, वस्तुस्थितीचें उत्तम प्रकारचें ज्ञान, धैर्य, साहस, तेजस्विता, धर्मनिष्ठा, इन्द्रियनिग्रह, ग्रंथपठण आणि व्याख्यानश्रवण, शांत स्वभाव आणि गंभीरपणा, परोपकार, ईश्वरभक्ति, स्वीकारलेल्या कार्यांत दक्षता, नियमानुसार वागण्याची संवय, विपुल धनसंचय, सर्व सहायक वस्तूंचा विपुल प्रमाणांत संचय, एक दुसऱ्याचा आपापसांत सत्कार, ऐक्यानें, सहकार्यानें रहाणें, दुःखी आणि आपद्ग्रस्त लोकांस साहाय्य करणें, यज्ञ अर्थात् आत्मसमर्पण करणें, मातृभूमीवर अचल निष्ठा इत्यादि. हे गुण ज्यांत असतील तोच स्वतःचें राज्य संभाळूं शकेल, अथवा दुसरें नवें राज्य मिळवूं शकेल. या पहिल्याच मंत्रांत मनुष्यासाठीं अत्यावश्यक राष्ट्रसंरक्षक गुणांचा स्पष्ट उल्लेख करून प्रार्थना केली आहे कीं– ‘ हे मातृभूमि ! आम्ही वरील संपूर्ण उत्तम गुणांनीं युक्त होऊन तुझें संरक्षण करूं आणि नेहमीं त्याप्रमाणें करण्यास तयार राहूं. तूं तुझ्या आश्रयानें भूत, भविष्य आणि वर्तमान या तीनहि कालांतील संपूर्ण पदार्थांचें उत्तम प्रकारें संरक्षण करण्यास समर्थ आहेस. तूंच आमच्या कीर्तीच्या वाढीस कारणीभूत आहेस; कारण कीं आम्हीं रात्रंदिवस तुझें संरक्षण करीत आहोंत. (१)

असंबाधं बध्यतो मानवानां यस्या उद्वतः प्रवतः समं बहु ।
नानावीर्या ओषधीर्या बिभर्ति पृथिवी नः प्रथतां राध्यतां नः ॥ २ ॥
यस्यां समुद्र उत सिन्धुरापो यस्यामन्नं कृष्टयः संबभूवुः ।
यस्यामिदं जिन्वति प्राणदेजत्सा नो भूमिः पूर्वपेये दधातु ॥ ३ ॥
यस्याश्चतस्रः प्रदिशः पृथिव्या यस्यामन्नं कृष्टयः संबभूवुः ।
या बिभर्ति बहुधा प्राणदेजत्सा नो भूमिर्गोष्वप्यन्ने दधातु ॥ ४ ॥

अर्थ-- ज्या (**यस्याः**) आमच्या मातृभूमीच्या (**मानवानां**) मननशील मनुष्यांच्या (**म [ब] ध्यतः**) मध्यें (**प्रवतः**) उच्च-नीच असे भेदभाव असूनसुद्धां (**बहु**) पुष्कळ (**समं**) समता आणि (**असंबाधं**) ऐक्य अथवा मैत्रीभाव आहे; (**या**) जी (**नः**) आमची (**पृथिवी**) मातृभूमि (**नानावीर्याः**) रोगांस दूर करणाऱ्या अनेक गुणांनीं युक्त (**औषधीः**) वनस्पतींस (**बिभर्ति**) धारण करते, ती मातृभूमि (**नः**) आमच्या (**प्रथतां**) कीर्ति आणि यशास वाढविण्यास (**राध्यतां**) साधन होवो. (२)

(**यस्यां समुद्रः**) ज्या आमच्या मातृभूमींत सागर (**उत**) आणि (**सिन्धुः**) अनेक नद आणि नद्या (**आपः**) झरे आणि पाण्याचे प्रवाह, तलाव आणि सरोवरें पुष्कळ आहेत, (**यस्याम्**) ज्या मातृभूमींत (**अन्नम्**) सर्व प्रकारचीं धान्यें आणि फळें, तसेंच भाजीपाला इत्यादि विपुल प्रमाणांत उत्पन्न होतो, (**यस्यां इदं प्राणत्**) ज्यांत सजीव (**एजत् जिन्वति**) प्राणी हिंडतात व फिरतात, जिच्यांत (**कृष्टयः**) शेती करणारे शेतकरी, शिल्पकर्मविशारद कारागीर तसेंच उद्योगशील मनुष्यें (**संबभूवुः**) संपूर्णपणें संघटित झालीं आहेत, (**सा**) या प्रकारची (**भूमिः**) ही आमची मातृभूमि (**नः**) आम्हांस (**पूर्वपेये**) समस्त भोगैश्वर्य (**दधातु**) देवो. (३)

(**यस्याम्**) ज्या आमच्या मातृभूमींत (**कृष्टयः**) उद्योगी, शिल्पकलाचतुर, तसेंच निपुण, स्वपरिश्रमानें शेती करणारे (**संबभूवः**) झाले आहेत, (**यस्याः पृथिव्याः चतस्रः प्रदिशः**) ज्या भूमीच्या चार दिशा आणि चार उपदिशा (**अन्नम्**) तांदूळ, गहूं इत्यादि धान्यें उत्पन्न करतात, (**या बहुधा**) जी अनेक प्रकारें (**प्राणत् एजत्**) प्राण धारण करणाऱ्या आणि हिंडण्या-फिरणाऱ्यांना (**बिभर्ति**) धारण-पोषण करते, (**सा नः भूमिः**) ती ही आमची मातृभूमि आम्हां सर्वांसाठीं (**गोषु अपि अन्ने दधातु**) गायी आणि धनधान्य देऊन आमचें धारण-पोषण करो. (४)

भावार्थ— ज्या आमच्या राष्ट्रांतील अथवा देशांतील मनुष्यांत परस्पर द्वेष नाहीं, म्हणजे त्यांच्यांत पूर्ण ऐक्यभाव आहे, विशेषतः आमचे पुढारी ज्यांच्यावर आमच्या संरक्षणाचा भार आहे अशा लोकाग्रणींत परस्पर मतैक्य आहे आणि ते संघटित होऊन कार्य करतात, ज्या भूमींत उत्तम प्रकारच्या अनेक पुष्टिकारक आणि रोगविनाशक वनस्पति (औषधि) उत्पन्न होतात, ती आमची प्रिय मातृभूमि आमची कीर्ति आणि यश दिगन्तरीं पसरविण्यास कारणीभूत होवो. (२)

ज्या आमच्या मातृभूमींत सागर, महासागर, नद, नद्या, तलाव, विहिरी, कालवे, झरे इत्यादि शेतीस पाणी पुरविणारीं भरपूर साधनें आहेत, आणि ज्या आमच्या मातृभूमींत सर्व प्रकारचें अन्न विपुल उत्पन्न होतें आणि सर्वांस भरपूर खावयास मिळतें, त्यामुळें सर्व प्राणीमात्र सुखी आहेत; ज्या भूमींत कारागीर लोक कलाकौशल्यांत निपुण आहेत, शेतकरी शेतीवाडींत प्रवीण आणि इतर लोकसुद्धां उद्योगी आहेत, ती आमची मातृभूमि आम्हांस उत्तमोत्तम भोग्य पदार्थ आणि ऐश्वर्य देणारी होवो. (३)

ज्या आमच्या या मातृभूमींत लोक कलाकौशल्यसंपन्न, शेतीवाडींत प्रवीण आणि परिश्रम करणारे निर्माण झाले आणि होत आहेत, आणि ज्या या भूमींत चारी दिशा आणि उपदिशांमध्यें सर्वत्र उत्तम धनधान्य पिकतें, जिच्यामुळें सर्व पशु, पक्षी आणि वनस्पति तसेंच अन्य जीवनोपयोगी धान्यांचें उत्तम पालन, पोषण आणि संरक्षण होतें, ती ही आमची मातृभूमि आम्हांस नेहमीं गायी, घोडे आणि अन्न इत्यादि देणारी होवो. (४)

यस्यां पूर्वे पूर्वजना विचक्रिरे यस्यां देवा असुरानभ्यवर्तयन् ।
गवामश्वानां वयसश्च विष्ठा भगं वर्चः पृथिवी नो दधातु ॥ ५ ॥
विश्वंभरा वसुधानी प्रतिष्ठा हिरण्यवक्षा जगतो निवेशनी ।
वैश्वानरं बिभ्रती भूमिरग्निमिन्द्रऋषभा द्रविणे नो दधातु ॥ ६ ॥
यां रक्षन्त्यस्वप्ना विश्वदानीं देवा भूमिं पृथिवीमप्रमादम् ।
सा नो मधु प्रियं दुहामथो उक्षतु वर्चसा ॥ ७ ॥

अर्थ— (यस्याम्) ज्या या आमच्या मातृभूमींत (पूर्वजनाः) प्राचीनकालीन आर्य लोक बल, बुद्धि, वीर्य,
ऐश्वर्यांनीं प्रसिद्ध, सर्व प्रकारें पूर्ण वीरपुरुष (विचक्रिरे) पराक्रमपूर्ण कर्तव्य उत्तमरीतीनें करीत असत, (यस्यां
देवाः) जिच्यांत विद्वान् आणि वीर (असुरान्) हिंसा करणारा शत्रु म्हणजे राक्षसी स्वभावाच्या लोकांना (अभ्य-
वर्तयन्) जिंकीत असत; जी (गवां अश्वानां वयसः च) गायी, घोडे आणि पशुपक्षी इत्यादींना (वि-ष्ठाः)
विशेष सुख देणारें आश्रयस्थान आहे, (सा नः पृथिवी) ती आमची मातृभूमि आम्हांस (भगं) ऐश्वर्य आणि
(वर्चः) तेज, वीर्य, शौर्य, विज्ञान (दधातु) देवो. (५)

जो (विश्वंभरा) सर्वांचें पोषण करणारी (वसुधानि) सोनें, चांदी, हिरे, माणिक-मोती वगैरे अनेक रत्नांची
खाण आहे, (प्रतिष्ठा) सर्व सृष्ट पदार्थांस आधारभूत (हिरण्यवक्षा) सुवर्णादि धातूंच्या खाणी जिच्या वक्षस्थळीं
आहेत, (जगतः) जितके जंगम पदार्थ आणि जीव आहेत त्यांस (निवेशनी) वसविणारी (वैश्वानरम्) सर्व प्रकार-
च्या मनुष्यांच्या समूहाला पूर्ण राष्ट्र अथवा देशरूपानें (बिभ्रती) धारण करणारी, आमची (भूमिः) मातृभूमि
(अग्निम्) अग्रभागीं नेणारा व (इन्द्र-वृषभौ) शत्रूंचा नाश करणाऱ्या शूरवीरास तसेंच ती मातृभूमि ज्ञान्यांना आणि
(नः) आम्हांस (द्रविणे) धन (दधातु) देवो. (६)

(अस्वप्नाः) निद्रा, तन्द्रा, आलस्य इत्यादि रहित (देवाः) विद्वान् वीर आणि कुशल माणसें (यां विश्व-
दानीम्) सर्व प्रकारच्या पदार्थांना देणारी आणि आमच्यासाठीं (मधुप्रियम् च दुहाम्) मधुर, हितकर आणि प्रिय
पदार्थ देते, (पृथ्वीं भूमिम्) त्या महान् आणि विस्तृत अशा आमच्या मातृभूमीचें (अप्रमादम्) प्रमादरहित असे
जे (रक्षन्ति) रक्षण करतात, (सा) ती भूमि (नः) आम्हांस (वर्चसा) शौर्य, वरितायुक्त ज्ञान तसेंच ऐश्वर्यांनीं
(उक्षतु) आम्हांस पूर्ण करो. (७)

भावार्थ— ज्या या आमच्या मातृभूमींत आमच्या प्राचीन पूर्वजांनीं–ब्राह्मणांनीं स्वतःच्या ज्ञानाच्या द्वारें, क्षत्रियांनीं स्वतःच्या वीर्यानें आणि वैश्यांनीं स्वतःच्या व्यापारकौशल्यानें, तसेंच कारागिरांनीं स्वतःच्या कारागिरीनें अनेक महान् पराक्रम केले होते, आमच्या देशाचे विद्वान्, शूर, व्यापारी आणि कारागीर लोकांनीं सर्वांनीं संपूर्णपणें एकत्रित येऊन हिंसक, आततायी, घातकी आणि दुष्ट लोकांचा नाश केला होता, आणि जी सुंदर भूमि सर्व पशुपक्ष्यांस उत्तम निवासस्थान देते ती आमची मातृभूमि आमचें ज्ञान, विज्ञान, शौर्य, तेज, वीर्य, धैर्य आणि ऐश्वर्य पूर्णपणें वाढवो. (५)

जी सर्वांचें पोषण करणारी, रत्नांस धारण करणारी, सर्व पदार्थांस आश्रय देणारी, सुवर्ण इत्यादि खाणी धारण करणारी, तसेंच स्थावर जंगम जीवांस तसेंच पदार्थांस स्थान देणारी, सर्व प्रकारच्या मनुष्यांनीं युक्त राष्ट्र अथवा देशाच्या उन्नतींत सहायता देणारी मातृभूमि आहे, ती आमचे पुढारी, ज्ञानी, वीर पुरुष तसेंच आम्हांसही सर्व प्रकारचें ऐश्वर्य देणारी होवो. (६).

निद्रा, तन्द्रा, आळस, अज्ञानादि दोषरहित, सर्व गोष्टींत चतुर आणि उद्यमी, परोपकारी विद्वान्, शूर आणि धनिक यांना सर्व पदार्थ देणाऱ्या विस्तृत मातृभूमीचें प्रमादरहित होऊन सर्व रक्षण करीत आहेत, ती आमची मातृभूमि सर्व उत्तम आणि प्रिय व हितकारी पदार्थांनीं परिपूर्ण सुसंपन्न होऊन आम्हांस ज्ञान, शौर्य आणि धन देऊन आमचें रक्षण करो. (७)

यार्णवेऽधि सलिलमग्र आसीद्यां मायाभिरन्वचरन्मनीषिणः ।
यस्या हृदयं परमे व्योमन्त्सत्येनावृतममृतं पृथिव्याः
सा नो भूमिस्त्विषिं बलं राष्ट्रे दधातूत्तमे ॥ ८ ॥
यस्यामापः परिचराः समानीरहोरात्रे अप्रमादं क्षरन्ति ।
सा नो भूमिर्भूरिधारा पयो दुहामथो उक्षतु वर्चसा ॥ ९ ॥
यामश्विनावमिमातां विष्णुर्यस्यां विचक्रमे ।
इन्द्रो यां चक्र आत्मनेऽनमित्रां शचीपतिः ।
सा नो भूमिर्वि सृजतां माता पुत्राय मे पयः ॥ १० ॥

अर्थ— (**या**) जी भूमि (**अग्रे**) प्रथम (**सलिलं अधि**) पाण्यांत (**अर्णवे**) समुद्रांत (**आसीत्**) होती, (**यस्याः पृथिव्याः हृदयम्**) ज्या पृथ्वीचा अंतर्भाग (**अमृतं इव**) अमर स्थानासारखा (**सत्येन**) सत्यसंकल्प शक्तीनें (**आवृतं**) व्याप्त झालेला आहे, जी भूमि (**परमे व्योमन्**) महान् आकाशांत आहे, (**याम्**) जिची (**मायाभिः**) कुशलतेनें (**मनीषिणः**) मननशील विद्वान् (**अन्वचरन्**) उत्तम प्रकारें सेवा करीत आले आहेत, (**सा नः भूमि**) ती ही आमची मातृभूमि आम्हांस (**उत्तमे राष्ट्रे**) उत्कृष्ट राज्यांत (**त्विषिम्**) तेज अथवा दीप्ति (**बलम्**) शूरता, वीरता, शारीरिक अथवा सैन्यबल (**दधातु**) देवो. (८)

(**यस्याम्**) ज्या भूमींत (**परिचराः**) सर्वत्र भ्रमण करणारे संन्यासी (**आपः**) जलाप्रमाणें (**समानीः**) समदृष्टीचे होऊन (**अहोरात्रे**) रात्रंदिवस (**अप्रमादम्**) सावधान होऊन (**क्षरन्ति**) परिभ्रमण करतात, (**अथो**) त्याप्रमाणें दुसरे जे (**भूरि-धारा**) अनेक प्रकारच्या (**पयः**) खाद्य तसेंच पेय पदार्थ, भोज्य अथवा पेय जसें दूध, तूप, इत्यादि जी (**दुहाम्**) देते, (**सा नो भूमिः**) ती ही आमची मातृभूमि (**वर्चसा**) तेज, प्रताप, बल, वीर्य आदींची (**उक्षतु**) वृद्धि करो. (९)

(**याम्**) ज्या भूमीचा भाग (**अश्विनौ**) अश्विगण, भर्ता आणि हन्ता शूरवीरांनीं (**अमिमाताम्**) मापून टाकला, (**यस्यां विष्णुः**) जिच्यांत पालन करणाऱ्यानें (**विचक्रमे**) निरनिराळे पराक्रम करून दाखविले, (**इन्द्रः**) शत्रु विनाशक (**शचीपतिः**) शक्तिपति, कर्मकुशल, ज्ञानवान् पुरुषानें (**यां आत्मने अनमित्राम्**) ज्यानें शत्रुरहित केली आहे, (**स नः माता भूमिः**) ती ही मातेसमान आमची मातृभूमि (**पुत्राय पयः**) ज्याप्रमाणें [आई] पुत्रास दूध पाजते त्याप्रमाणें (**पुत्राय मे**) आम्हां तिच्या सर्व पुत्रांस (**विसृजताम्**) खाद्यपेयांच्या वस्तु प्रदान करो. (१०)

भावार्थ— जी भूमि प्रथम समुद्राच्या आंत होती, जिच्या आंत बाहेर परमेश्वर व्याप्त आहे, जी आकाशांत फिरत आहे, जिची सेवा विचारवंत लोक विशेष प्रसंगीं गुप्त प्रयत्नांनीं आणि कुशलतेनें करतात, ती आमची मातृभूमि आमच्या उत्तम राष्ट्रांत तेजस्विता, विद्वत्ता, शौर्य, शक्तिमत्ता इत्यादि गुण सर्वदा वाढवणारी होवो. (८)

ज्याप्रकारें पावसाचें पाणी सर्व प्राणीमात्रांस सारखेंच प्राप्त होतें, त्याप्रमाणें जिचा उपदेश सर्वांसाठीं एकच आणि समान असतो, परोपकारी संन्यासी ज्या भूमींत रात्रंदिवस उत्तम आचरण न सोडतां नेहमीं एकसारखे संचार करीत असतात, आणि जी भूमि आम्हांस सर्व प्रकारें अन्न आणि जल देत असते ती आमची मातृभूमि तेजस्विता उत्पन्न करून आमचें रक्षण करो. (९)

मनुष्यांचें पोषण करणारे आणि शत्रूंचा नाश करणारे लोक जिच्यासाठीं नेहमीं उत्तम कामें करीत आहेत, जिच्यासाठीं पालन करणारे मोठमोठीं कार्यें करीत आहेत आणि ज्ञानी शूर पुरुष ज्यास स्वतःचा मित्र समजतात ती आमची मातृभूमि, ज्याप्रमाणें माता स्वतःच्या बालकास दूध पाजते त्याप्रमाणें आम्हांस संपूर्ण उपयुक्त पदार्थ देवो. (१०)

गिरयस्ते पर्वता हिमवन्तोऽरण्यं ते पृथिवि स्योनमस्तु ।
बभ्रुं कृष्णां रोहिणीं विश्वरूपां ध्रुवां भूमिं पृथिवीमिन्द्रगुप्ताम् ।
अजीतोऽहतो अक्षतोऽध्यष्ठां पृथिवीमहम् ॥ ११ ॥
यत्ते मध्यं पृथिवि यच्च नभ्यं यास्त ऊर्जस्तन्वः संबभूवुः ।
तासु नो धेह्यभि नः पवस्व माता भूमिः पुत्रो अहं पृथिव्याः । पर्जन्यः पिता स उ नः पिपर्तु ॥१२॥
यस्यां वेदिं परिगृह्णन्ति भूम्यां यस्यां यज्ञं तन्वते विश्वकर्माणः ।
यस्यां मीयन्ते स्वरवः पृथिव्यामूर्ध्वाः शुक्रा आहुत्याः पुरस्तात् । सा नो भूमिर्वर्धयद्वर्धमाना ॥१३॥

अर्थ-- हे (पृथिवि ! ते गिरयः हिमवन्तः पर्वताः अरण्यं च ते) मातृभूमि ! डोंगर, बर्फयुक्त पर्वत आणि अरण्यें तुला (स्योनम्) सुख देणारे (अस्तु) होवोत. त्या पर्वतांत शत्रू न राहोत, ते शत्रुरहित होवोत. त्यासाठीं तूं (बभ्रुम्) सर्वांचें भरणपोषण करणारी हो, (कृष्णाम्) कृषीकर्मास उपयुक्त हो, (रोहिणीम्) वृक्षादिकांस वाढविणारी हो, (विश्वरूपाम्) सर्व प्रकारचीं रूपें धारण करणारी, (ध्रुवाम्) स्थिर (पृथिवीं) पुष्कळ लांब-रुंद विस्तृत (इन्द्रगुप्ताम्) वीरांनीं रक्षिलेल्या (भूमिम्) मातृभूमि (अजितः) शत्रूंनें न जिंकलेला, (अहतः) युद्धांत न मरतां, (अक्षतः) ज्याच्या अंगावर कोठेंहि व्रण झालेला नाहीं, (अहं अध्यष्ठां) असा मीं तिचा अधिष्ठाता अथवा स्वामी होईन. (११)

हे (पृथिवि यत् ते मध्यम्) भूमि ! जें तुझ्या मध्यप्रदेशीं आहे (यत् च नभ्यम्) जें नाभिस्थानी आहे. (ते याः ऊर्जः) जे तुझ्यामुळें बलयुक्त अथवा अन्नानें पोसलेले (तन्वः) शरीरधारी म्हणजे मनुष्य (संबभूवुः) आपसांत संघटित होऊन एक झालेले आहेत, (तासु) त्या त्यांच्या समाजांत (नः) आम्हांस (अभिधेहि) स्थापित कर व याप्रमाणें (नः पवस्व) आमचें रक्षण कर. (भूमिः) ही भूमि आमची (माता) माता आहे, (अहम्) मी त्या (पृथिव्याः पुत्रः) पृथ्वीचा पुत्र आहें. [दुःखापासून जो त्राण म्हणजे रक्षण करतो तो पुत्र आहे. हे भूमि ! आम्हीं तुझीं दुःखें दूर करतों, म्हणून आम्हीं तुझे पुत्र आहोंत.] (पर्जन्यः) पाण्याची वृष्टि करणारा मेघ आमचा पिता अर्थात् सस्य संपत्तीचें पालन करणारा आहे. (स उ नः) तो आमचें निश्चयपूर्वक (पिपर्तु) पालन करो. (१२)

(यस्यां भूम्यां वेदिं परिगृह्णन्ति) ज्या भूमींत सर्व बाजूंनीं वेदीचा स्वीकार केला जातो, (यस्यां विश्वकर्माणः) जिच्यांत उन्नतीचीं साधनें तयार करणारे सर्व लोक (यज्ञं तन्वते) परोपकाराचें असें यज्ञकार्य करतात कीं जेथें चांगल्या माणसांचा सत्कार होतो आणि लोकांची संघटना होते, (यस्यां च पृथिव्यां पुरस्तात्) ज्या पृथ्वीवर प्रथम (ऊर्ध्वाः) उन्नति करणारे, (शुक्राः) वीर्ययुक्त (आहुत्याः) आहुतींसह (स्वरवः) यज्ञीय कुंडें असतात, जेथें उत्तम उपदेश (मीयन्ते) केले जातात, (सा नो भूमिः वर्धमाना) त्या पृथ्वीची वृद्धि आम्हां लोकांमुळें झालेली असो व ती आम्हां लोकांची (वर्धयतु) उन्नति करो ! (१३)

भावार्थ— हे मातृभूमि ! तुझ्यावर जे डोंगर, हिमाच्छादित पर्वत, लहानमोठीं वनें, उपवनें आहेत त्यांत तुझ्या शत्रूंचें वास्तव्य कधीं न होवो. शत्रुरहित होऊन तूं नेहमीं सर्वांचें पालन-पोषण आणि संरक्षण करणारी, उत्तम वृक्षादींनीं युक्त, स्थिर आणि वीरांनीं रक्षिलेली अशी सर्वगुणसंपन्न तूं आहेस ! तुझ्यावर शत्रूंकडून अपराजित, तसेंच मृत अथवा घायाळ न झालेले आम्हीं आनंदानें राहूं आणि राष्ट्रामध्यें स्वतंत्र होऊन राहूं. (११)

हे मातृभूमि ! तुझ्या आंत अथवा बाहेर तुझ्या आधारें जे जे पदार्थ आहेत, त्या सर्वांचें आणि तुझेंहि शत्रूंपासून रक्षण करण्यासाठीं जे विद्वान्, बलवान् आणि धनवान् एकत्रित होऊन प्रयत्न करीत आहेत, त्यांच्या संघांत आम्हांस स्थान दे आणि आमचें रक्षण कर. कारण कीं तूं आमची माता आहेस आणि आम्ही तुझे पुत्र तुला दुःखमुक्त करणारे आहोंत. या पर्जन्यानें धान्यादि उत्पन्न होतात, म्हणून तो आमचा पिता आहे, पालक आहे. तो नियमित समयीं पाऊस पाडो आणि आमचें रक्षण करो. (१२)

यो नो द्वेषत्पृथिवि यः पृतन्याद्योऽभिदासान्मनसा यो वधेन । तं नो भूमे रन्धय पूर्वकृत्वरि ॥१४॥
त्वज्जातास्त्वयि चरन्ति मर्त्यास्त्वं बिभर्षि द्विपदस्त्वं चतुष्पदः ।
तवेमे पृथिवि पञ्च मानवा येभ्यो ज्योतिरमृतं मर्त्येभ्य उद्यन्त्सूर्यो रश्मिभिरातनोति ॥ १५ ॥
ता नः प्रजाः सं दुह्रतां समग्रा वाचो मधु पृथिवि धेहि मह्यम् ॥ १६ ॥
विश्वस्वं मातरमोषधीनां ध्रुवां भूमिं पृथिवीं धर्मणा धृताम् । शिवां स्योनामनु चरेम विश्वहा ॥१७॥

अर्थ— हे (पृथिवि ! यः नः द्वेषत्) मातृभूमि ! जो आमचा द्वेष करतो, (यः पृतन्यात्) जो स्वतःच्या सैन्यानें आम्हांस पराजित करूं इच्छितो, (यः मनसा) जो मनांत आमचें अनिष्ट इच्छितो, (अभिदासात्) जो आम्हांस दास अथवा गुलाम करूं इच्छितो, (वधेन) जो आमचा वध करून आम्हांस कष्ट देऊं इच्छितो, हे (पूर्वकृत्वरि) अशा शत्रूंचा प्रथमपासूनच नाश करणारी मातृभूमि ! (तं रन्धय) त्या शत्रूचा नाश कर. (१४)

हे (पृथिवि) मातृभूमे ! जे (मर्त्याः) मनुष्य (त्वज्जाताः) तुजपासूनच उत्पन्न झाले आहेत, (त्वयि चरन्ति) तुझ्यावरच इकडेतिकडे फिरतात, ज्या (द्विपदः) दोन पायांच्या-मनुष्यांस (चतुष्पदः) चार पायांच्या पशूंस (त्वं बिभर्षि) तूं धारण करतेस आणि त्यांचें पोषण करतेस, (येभ्यः मर्तेभ्यः) तसेंच ज्या मानवांसाठीं (अमृतम्) जीवनास हेतुभूत (ज्योतिः) तेज (उद्यन् सूर्यः रश्मिभिः) उगवणारा सूर्य आपल्या किरणांनीं (आतनोति) पसरवितो (इमे) ते आम्हीं (पंच मानवाः) पांच प्रकारचे मनुष्य (तव) तुझी सेवा करण्याची इच्छा करीत आहों. (१५)

हे (नः पृथिवि ! ताः) आमच्या मातृभूमि ! आम्हीं सर्व लोक तुझी (प्रजाः) प्रजा (समग्राः) सर्वच (वाचः) वाणी (मधु) मधुर प्रेमपूर्ण (संदुह्रताम्) एकत्र येऊन बोलावी; (मह्यम्) आम्हांसहि मधुर वचन बोलण्याची शक्ति दे. (१६)

(विश्वस्वम्) सर्व (ओषधीनाम्) वनस्पती, वृक्ष, लता इत्यादींची (मातरं ध्रुवां पृथिवीम्) ही माता विस्तीर्ण, लांब रुंद, स्थिर पृथ्वी (धर्मणा) सत्य, ज्ञान, शूरता, वीरता इत्यादि धर्मांनीं (धृताम्) पालित आणि पोषित (शिवाम्) कल्याणमयी (स्योनाम्) सुख देणाऱ्या (भूमीम्) मातृभूमीची (विश्वहा) नेहमीं (अनुचरेम) आम्हीं सर्वांनीं सेवा करावी. (१७)

भावार्थ— ज्या भूमींतील लोक यज्ञवेदीजवळ जाऊन हवन करण्यास तत्पर असतात, ज्या भूमींत लोक नेहमीं परोपकार आणि उन्नतीचीं कामें करीत असतात, तसेंच ज्या भूमींत विशेषतः उन्नतिकारक आणि बलोत्पादक यज्ञ करण्यांत येतात आणि तशाच प्रकारें उपदेशात्मक आणि उत्साहवर्धक भाषणें नेहमीं करण्यांत येतात, अशा आमच्या कृत्यांनीं उन्नत होणारी आमची मातृभूमि आम्हांस सर्वतोपरि उन्नतीचें कारण होवो. (१३)

हे आमच्या मातृभूमि ! जे आमचा द्वेष करतात, आमचे जे शत्रु स्वतःच्या सैन्यासह आमच्यावर स्वारी करून आम्हांस जिंकूं इच्छितात, जे आमचा नाश व्हावा म्हणून टपून बसले आहेत, जे आम्हांस परतंत्र आणि गुलाम बनवूं इच्छितात, जे मनानेंसुद्धां आमचें अनिष्ट इच्छितात, त्या आमच्या सर्व शत्रूंचा पूर्णरूपें नाश कर. (१४)

हे आमच्या मातृभूमि ! तुझ्यापासून उत्पन्न झालेलों आम्ही तुझ्याच आधारावर आमचे सर्व व्यवहार चालवितों. सर्व पशुपक्षी, मनुष्यें आणि इतर प्राणीमात्रांस तूंच आधार देऊन पालन-पोषण करतेस. आमच्या जीवनासाठीं हा दीप्तिमान सूर्य स्वतःची अमृतमय किरणें सर्वत्र पसरवीत आहे. आम्हीं पांच प्रकारचे लोक-विद्वान् , शूरवीर, व्यापारी, कारागीर आणि सेवावृत्तीचे लोक-तुझी सेवा करण्याची इच्छा करीत आहों. (१५)

हे आमच्या मातृभूमि ! आम्हीं एकमेकांशीं जें कांहीं बोलतों तें सर्व सत्य, हितकर आणि मधुर, परस्परांविषयीं प्रेमयुक्त असो. तें अहितकारी आणि कटु नसो. आम्हां सर्व लोकांना एकत्र येऊन आपापसांत मधुर भाषणें करण्याची शक्ति दे. (१६)

महत्सधस्थं महती बभूविथ महान्वेग एजथुर्वेपथुष्टे । महांस्त्वेन्द्रो रक्षत्यप्रमादम् ।
सा नो भूमे प्र रोचय हिरण्यस्येव संदृशि मा नो द्विक्षत कश्चन ॥ १८ ॥
अग्निर्भूम्यामोषधीष्वग्निमापो बिभ्रत्यग्निरश्मसु । अग्निरन्तः पुरुषेषु गोष्वश्वेष्वग्नयः ॥ १९ ॥
अग्निर्दिव आ तपत्यग्नेर्देवस्योर्वन्तरिक्षम् । अग्निं मर्तास इन्धते हव्यवाहं घृतप्रियम् ॥ २० ॥

अर्थ—हे मातृभूमि ! तूं आम्हां सर्वांचें (महत् सधस्थम्) एकत्रित होऊन रहाण्याचें स्थान आहेस; त्याचप्रमाणें तूं (महती बभूविथ) मोठी होत आहेस. (ते) तुझी (एजथुः वेपथुः) हालचाल (महान्) महान् (वेगः) वेगयुक्त अथवा गतिमान् आहे. अशा प्रकारच्या (त्वाम्) तुझें (महान् इन्द्रः) शत्रूंचा नाश करणारा महाज्ञानी, बल, उत्साह, ऐश्वर्य व संपत्तीनें युक्त शूरवीर (अप्रमादम्) प्रमाद केल्याशिवाय (रक्षति) रक्षण करतो. (भूमे) हे मातृभूमि ! (सा) अशी तूं (हिरण्यस्य इव) सोन्यासारखी (संदृशि) चमकणारी, (नः) आम्हांशीं (कश्चन) कोणीहि (मा द्विक्षत) वैरभाव न ठेवो असें कर. (१८)

(भूम्याम्) पृथ्वीच्या मध्य भागांत (अग्निः) अग्नि आहे, (ओषधीषु) औषधींमध्यें (अग्निः) अग्नि आहे, ज्या औषधींच्या सेवनानें अन्न पचन होतें, दीपन म्हणजे भूक लागते, (आपः) पाणी जेव्हां मेघरूप असतें तेव्हां तें (बिभ्रति) विद्युत्‌रूपानें अग्नीस धारण करतें. (अश्मसु) चकमकीच्या दगडांत सुद्धां (अग्निः) अग्नि आहे, (पुरुषेषु) मनुष्यांत (अन्तः) जठराग्निरूपानें (अग्निः) अग्नि आहे, (गोषु अश्वेषु अपि) गाय, घोडा इत्यादि पशूंत सुद्धां (अग्निः) अग्नि आहे, ज्याच्यामुळें त्यांचें खाल्लेलें अन्न पचन होतें. (१९)

(दिवः) आकाशांत (अग्निः) सूर्याच्या रूपानें अग्नि आहे, (आतपति) तो सर्व बाजूंस प्रकाश देत तापत आहे. (देवस्य अग्नेः) तेजस्वी अग्नीच्या प्रकाशानें (उरु) महान् (अन्तरिक्षं) अन्तरिक्ष प्रकाशतें. याप्रमाणें अनेक रूपांनीं अग्नि विद्यमान आहे. (हव्यवाहम्) हवनांत टाकलेल्या हविर्द्रव्यांस वेऊन जाणारा, (घृतप्रियं) तूप ज्यास फार आवडतें असा, (अग्निं) भौतिक अग्नि ऋतूंच्या फेरफारामुळें निर्माण होणाऱ्या रोगांचा नाश करणारा अग्नि (मर्तासः) मनुष्यें (इन्धते) प्रदीप्त करतात. (२०)

भावार्थ—जिच्यावर सर्व प्रकारच्या उत्तम औषधि आणि वनस्पति उत्पन्न होतात, जी अत्यंत लांब, रुंद आणि स्थिर आहे; विद्या, शौर्य, सत्य, स्नेह, इत्यादि सदाचार आणि सद्गुणयुक्त पुरुष जिचें रक्षण करतात, जी कल्याणकारी आहे आणि सर्व प्रकारचीं सुखसाधनें आम्हांस अर्पण करते, त्या मातृभूमीची आम्ही नेहमीं सेवा करतों. (१७)

हे आमच्या मातृभूमि ! तूं आम्हां सर्वांस एकत्र रहाण्यास स्थान देतेस. तुझा विस्तार एवढा मोठा आहे कीं आम्हीं सर्व त्यांत समाऊन जातों. आकाशांत ज्या वेगानें तुझी हालचाल होते तो वेग अत्यंत तीव्र आहे. ज्ञानी, शूरवीर, उत्साही, ऐश्वर्यशाली आणि शत्रूंचा नाश करणारे वीरपुरुष अत्यंत दक्षतेनें तुझें रक्षण करूं शकतात. अनभिज्ञ, भित्रे आणि अर्थविहीन तुझें रक्षण करूं शकत नाहींत. तूं स्वतः सुवर्णाप्रमाणें प्रकाशमान् आहेस, तेजस्वी आहेस; तूं आम्हांसहि तेजस्वी कर आणि आम्हीं परस्परांचा द्वेष न करतां एकमतानें आम्हां सर्वांचें व्यवहार चालवावेत असें कर. (१८)

सर्व पदार्थ अग्निरूप आहेत. त्या अग्नीमुळें भूमि, औषधि, वनस्पति, जल (मेघादि), शिळा, मनुष्य, गाय, घोडे इत्यादि प्राणी वगैरेंचीं शरीरें तेजस्वी दिसतात. त्याचप्रमाणें आम्ही मनुष्यें सर्व पदार्थांचे भोक्ते आहोंत. आम्हीं आमच्या ब्रह्मचर्याचें रक्षण करून वीर्यरूप अग्नीस आमच्या शरीरांत सांठवून उत्तम तेजस्वी व्हावें. (१९)

आकाशांत सर्वत्र प्रकाश पसरविणारा सूर्य नांवाचा एक महान् अग्नि आहे. त्यामुळें सर्व द्रव्यांस हवनद्वारा चारी बाजूंस पसरविण्यासाठीं, तसेंच सुखाच्या प्राप्तीप्राठीं आणि दुःखाच्या परिहारासाठीं मनुष्य तुपानें होम करतो, त्या अग्नींत आम्हींही दिवसरात्र हवन करतों. (२०)

अग्निवासाः पृथिव्यसितज्ञूस्त्विषीमन्तं संशितं मा कृणोतु ॥ २१ ॥
भूम्यां देवेभ्यो ददति यज्ञं हव्यमरंकृतम् । भूम्यां मनुष्या जीवन्ति स्वधयान्नेन मर्त्याः ॥
सा नो भूमिः प्राणमायुर्दधातु जरदष्टिं मा पृथिवी कृणोतु ॥ २२ ॥
यस्ते गन्धः पृथिवि संबभूव यं बिभ्रत्योषधयो यमापः ।
यं गन्धर्वा अप्सरसश्च भेजिरे तेन मा सुरभिं कृणु मा नो द्विक्षत कश्चन ॥ २३ ॥
यस्ते गन्धः पुष्करमाविवेश यं संजभ्रुः सूर्याया विवाहे ।
अमर्त्याः पृथिवि गन्धमग्रे तेन मा सुरभिं कृणु मा नो द्विक्षत कश्चन ॥ २४ ॥

अर्थ— (अग्निवासाः) अग्नीनें व्याप्त (असितज्ञूः) काळ्या काजळामुळें जो ओळखला जातो तो अग्नि (पृथिवी असि) पृथ्वीच्या रूपांत राहून (मां) मला (त्विषीमन्तं संशितं) प्रकाशयुक्त (कृणोतु) करो. (२१)

मनुष्य ज्या भूमींत (भूम्यां अरंकृतं) अलंकृत, सुसंस्कृत (हव्यम्) आहुतियुक्त (यज्ञं) यज्ञ (देवेभ्यः) देवतांना (ददति) देतो, त्यामुळें ज्या भूमींत (स्वधया अन्नेन) उत्तम अन्न भक्ष्यभोज्य इत्यादि वस्तूंनीं (मर्त्याः) मरण ज्यांस असतें ते (मनुष्याः) मनुष्य (जीवन्ति) जिवंत आहेत. (सा नो भूमिः प्राणं आयुः) ती भूमि आम्हांस बल-आयुष्य (दधातु) देवो आणि तीच भूमि (मां) मला (जरदष्टिं) उत्तम आयुष्य वा उन्नति (कृणोतु) करणारी होवो. (२२)

हे (पृथिवि ! यस्ते गन्धः संबभूव) पृथ्वी, तुझ्यातून जो सुवास निर्माण झाला, (यं) ज्या सुवासाला (ओषधयः बिभ्रति) औषधि धारण करतात, (यः) ज्याला (आपः बिभ्रति) जल धारण करतें, ज्याला (गन्धर्वाः) गंधर्व धारण करतात, (अप्सरसः च) किरणें धारण करितात, (यं गन्धं) ज्या सुवासानें (भेजिरे) सुख भोगलें (तेन) त्या सुगंधानें (मा) मला (सुरभिं) सुगंधियुक्त (कृणु) कर. (नः) आमच्या लोकांत (कश्चन) कोणीहि (मा द्विक्षत) कोणाचा द्वेष करूं नये, सर्व लोकांनीं परस्पर मित्रभावानें रहावें. (२३)

हे (पृथिवि ! यः ते गन्धं पुष्करं) जो तुझा सुवास कमलांत (आविवेश) प्रविष्ट झाला आहे, (अग्रे) प्रथम (यं गन्धं अमर्त्याः) ज्या वासास वायु आदि देवतांनीं (सूर्यायाः) उषेच्या (विवाहे) विवाहसमयीं (संजभ्रुः) धारण केले, (तेन मां सुरभिं कृणु) त्या सुगंधानें मला सुगंधित कर. (कश्चन) कोणीहि (नः) आमचा (मा द्विक्षत) द्वेष न करोत. (२४)

भावार्थ— जी आमची मातृभूमि सर्व बाजूंनीं अग्नीनें व्याप्त आहे आणि ज्या भूमीचा रंग काळा आहे, अशी ही आमची मातृभूमि आमचें ज्ञान व कीर्ति वाढविणारी होवो. (२१)

ज्या या आमच्या मातृभूमींत मनुष्य यज्ञ करितात आणि त्यांत उत्तमोत्तम पदार्थांचें हवन करून वायु, जल वगैरेंस शुद्ध व पवित्र करतात, ज्या भूमींत यज्ञामुळें भरपूर पाऊस पडून विपुल धान्य निर्माण होतें, आणि जें खाऊन मनुष्य आनंदानें रहातात, ती मातृभूमि आम्हांस उत्तम प्राण आणि पूर्ण आयुष्य देणारी होवो. (२२)

हे मातृभूमि ! जो तुझ्याठायीं उत्तम सुगंध आहे, तो औषधि आणि वनस्पतींत प्रकट होतो. त्या सुगंधाला सूर्य स्वतःच्या किरणांनीं उद्दीपित करतो. आम्हांस त्या उत्तम सुगंधानें भूषित कर आणि आम्हांपैकीं कोणीहि एक दुसऱ्याशीं वैरभाव न राखो आणि सर्व लोकांनीं परस्पर मैत्रीभावानें वागावें असें कर. (२३)

हे मातृभूमि ! जो सुगंध कमलांत आहे, सूर्योदय समयीं ज्यास वायु चारी दिशांस पसरविण्यासाठीं घेऊन जातो, त्या सुवासानें आम्हांस सुगंधित कर. आमच्यांत कोणी एक दुसऱ्याचा द्वेष न करो. आमचा एक दुसऱ्याविषयीं स्नेह वृद्धि पावो आणि तो सर्व समाजासाठीं हितकारक होवो. (२४)

यस्ते॒ गन्धः॒ पुरु॑षेषु स्त्री॒षु पुं॒सु भगो॒ रुचिः॑ । यो अश्वे॑षु वी॒रेषु॒ यो मृ॒गेषू॒त ह॒स्तिषु॑ ॥
क॒न्या॑यां॒ वर्चो॒ यद्भू॑मे॒ तेना॒स्माँ अपि॒ सं सृ॑ज॒ मा नो॑ द्विक्षत॒ कश्च॒न ॥ २५ ॥
शि॒ला भूमि॒रश्मा॑ पां॒सुः सा भूमिः॒ संधृ॑ता धृ॒ता। तस्यै॒ हिर॑ण्यवक्षसे पृथि॒व्या अ॑करं॒ नमः॑ ॥ २६ ॥
यस्यां॑ वृ॒क्षा वा॑नस्प॒त्या ध्रु॒वास्तिष्ठ॑न्ति वि॒श्वहा॑ । पृ॒थि॒वीं वि॒श्वधा॑यसं धृ॒ताम॒च्छाव॑दामसि ॥ २७ ॥
उ॒दीरा॑णा उ॒तासी॑ना॒स्तिष्ठ॑न्तः प्र॒क्राम॑न्तः । प॒द्भ्यां द॑क्षिणस॒व्याभ्यां॒ मा व्य॑थिष्महि॒ भूम्या॑म् ॥ २८ ॥
वि॒मृग्व॑रीं पृथि॒वीमा व॑दामि क्ष॒मां भूमिं॒ ब्रह्म॑णा वावृ॒धाना॑म् ।
ऊर्जं॑ पु॒ष्टं बिभ्र॑तीमन्नभा॒गं घृ॒तं त्वा॒भि नि षी॑देम भूमे ॥ २९ ॥

अर्थ— हे (भूमे) भूमि ! (यः ते गन्धः वीरेषु पुरुषेषु स्त्रीषु पुंसु भगः) वीर पुरुषांत, स्त्रियांत, सामान्य पुरुषांत तेजोमय प्रभायुक्त आहे, (यः अश्वेषु उतं मृगेषु हस्तिषु) जो घोड्यांत, चतुष्पाद जनावरांत, हत्तींत व (यत् वर्चः) जें तेज (कन्यायां) अविवाहित कन्यांमध्यें आहे, (तेन) त्या दिव्य तेजानें (अस्मान् अपि) आम्हांकाहि (संसृज) उत्पन्न कर. (कश्चन मा द्विक्षत) आमच्यांत कोणी आपापसांत एक दुसऱ्याचा द्वेष न करो. (२५)

जी (शिला अश्मा पांसुः) शिला, पर्वत, दगड आणि धूळीनें युक्त (भूमिः) भूमि आहे, (सा भूमिः) ती आमची मातृभूमि विद्या, विज्ञान आणि वीरत्वानें (धृता) उत्तमरीतीनें रक्षिलेली, (संधृता) उत्तम आणि योग्य रीतीनें सुरक्षित होवो; (तस्यै हिरण्यवक्षसे) जिच्यांत सोन्याच्या खाणी आहेत, त्या भूमीस आम्हीं (नमः अकरं) नमस्कार करतों. (२६)

(यस्यां) जिच्या ठिकाणीं (वानस्पत्याः वृक्षाः) वनस्पती आणि वृक्ष, वेली वगैरे (विश्वहा) नेहमीं (ध्रुवाः) स्थिर (तिष्ठन्ति) रहातात, (विश्वधायसं) पूर्वोक्त गुणांनीं जी सर्वांस धारण करणारी आहे आणि (धृताम्) जी रक्षण केली गेली आहे, (पृथिवीं अच्छ) त्या पृथ्वीस उत्तमरीतीनें आम्हीं (आवदामसि) स्तवितों. (२७)

(उदीराणाः) हिंडतां फिरतां (उत आसीनाः) बसलें असतां (तिष्ठन्तः) उभे असतां (प्रक्रामन्तः दक्षिणसव्याभ्यां पद्भ्यां) उजव्या अथवा डाव्या पायानें चालत असतां (भूम्यां मा व्यथिष्महि) पृथ्वीवर आम्हीं कोणांसही दुःख न द्यावें. (२८)

(विमृग्वरीं) विशिष्ट रीतीनें शोधण्यास योग्य (ब्रह्मणा) परमात्म्याकडून (वावृधानां) वृद्धि पावलेली (ऊर्जं) शक्ति वाढविणारी (पुष्टं) पुष्टि करणारी (घृतं अन्नभागं च) तूप आणि इतर खाण्याचे पदार्थ (बिभ्रतीं) धारण करणारी (पृथिवीं) विस्तृत अशी (क्षमां) प्राणीमात्रांस निवास करण्यास योग्य (भूमिं) अशा आमच्या मातृभूमीची (आवदामि) आम्ही प्रार्थना करतों. हे (भूमे) मातृभूमि ! (त्वां) तुझा (अभिनिषीदेम) आम्ही आश्रय करतों. (२९)

भावार्थ—हे मातृभूमि ! वीर पुरुष तसेंच साधारण स्त्रीपुरुष, हत्ती, घोडे इत्यादि चतुष्पाद प्राण्यांत, ब्रह्मचारी तसेंच ब्रह्मचारिणी कन्यांच्या ठिकाणीं जें तेज आहे, तें आम्हांमध्यें लहानपणापासूनच असो. आमच्यांत कोणीहि एक दुसऱ्याचा द्वेष न करो. (२५)

ज्या आमच्या मातृभूमीवर शिळा, दगड, धूळ आणि ज्यांत सुवर्ण, रत्नें, इत्यादि अमूल्य पदार्थांच्या खाणी आहेत, त्या मातृभूमीस आम्हीं नमस्कार करतों. जोंपर्यंत ज्ञान शौर्यादि गुण आमच्यांत आहेत तोंपर्यंत' आमच्या मातृभूमीचें संरक्षण होत राहो. आम्हीं अशाप्रकारें आचरण करावें कीं हे गुण आमच्यांत सदैव रहातील आणि त्यामुळें आमच्याकडून आमच्या मातृभूमीचें संरक्षण होत राहावें. (२६)

ज्या या आमच्या मातृभूमीमध्यें वनस्पति वृक्षलता वगैरे विपुल संख्येनें पोसत आहेत, त्या वर वर्णिलेल्या आपल्या सर्व गुणांनीं भरपूर आहेत आणि जी सर्वांस आधार देते, ती ही आमची मातृभूमि आम्हांकडून संरक्षिली गेली आहे. तिची आम्हीं मोठ्या प्रेमानें स्तुति करतों. (२७)

आम्हीं कोणाच्या दुःखास कारण न व्हावें. (२८)

शुद्धा न आपस्तन्वे॑ क्षरन्तु यो नः सेदुरप्रिये तं नि दध्मः। पवित्रेण पृथिवि मोत्पुनामि ॥ ३० ॥
यास्ते प्राचीः प्रदिशो या उदीचीर्यास्ते भूमे अधराद्याश्च पश्चात्।
स्योनास्ता मह्यं चरते भवन्तु मा नि पप्तं भुवने शिश्रियाणः ॥ ३१ ॥
मा नः पश्चान्मा पुरस्तान्नुदिष्ठा मोत्तरादधरादुत।
स्वस्ति भूमे नो भव मा विदन्परिपन्थिनो वरीयो यावया वधम् ॥ ३२ ॥
यावत्तेऽभि विपश्यामि भूमे सूर्येण मेदिना। तावन्मे चक्षुर्मा मेष्टोत्तरामुत्तरां समाम् ॥ ३३ ॥

अर्थ— हे (पृथिवि ! नः तन्वे) मातृभूमि ! आमच्या शरीराच्या शुद्धीसाठीं (शुद्धाः आपः) निर्मळ पाणी (क्षरन्तु) वाहो; (यः नः) जो आम्हांस (अप्रिये) अनिष्ट अथवा अप्रिय आहे, (सेदुः) त्यास दूर कर. (पवित्रेण) पवित्र असें जें माझें कर्तव्यकर्म (मा उत्पुनामि) त्यानें मीं स्वतःस पवित्र करतों. (३०)

हे (भूमे) मातृभूमि ! (याः ते प्राचीः) जी तुझी पूर्व दिशा आहे, (याः उदीचीः) जी उत्तरदिशा आहे, (याः ते प्रदिशः) ज्या तुझ्या आग्नेयी, नैऋत्य, वायव्य, ईशान्य अशा चार उपदिशा आहेत, (याः ते अधरात्) ज्या तुझ्या खालच्या दिशा आहेत (याः ते पश्चात्) जी दिशा तुझ्यामागें आहे (ताः) त्या सर्व दिशा (चरते) हिंडणाऱ्या; (मह्यं स्योनाः भवन्तु) मला सुखदायक होवोत. (भुवने) ज्या देशांत आम्हीं (शिश्रियाणः) रहातों, (मा निपप्तं) त्याठिकाणीं आमचा अधःपात न होवो. (३१)

हे (भूमे) मातृभूमि ! (पश्चात् नः मा नुदिष्ठाः) जे तुझे पृष्ठभाग आहेत ते आमचा नाश न करोत ! (मा पुरस्तात् मा उत्तरात् उत अधरात् मा नुदिष्ठाः) पुढून, वरून व खालून आमचा नाश न करोत (स्वस्ति) आमचें कल्याण होवो ! (परिपन्थिनः) शत्रू आम्हांस (मा विदन्) न जाणोत. (किञ्च) त्या शत्रूंच्या (वधं) वधासाठीं (वरीयः) जे आम्हांत सर्वश्रेष्ठ आहेत (यावयः) ते जावोत. (३२)

(भूमे मेदिना) हे मातृभूमि ! स्वतःच्या प्रकाशानें आनंद देणाऱ्या (सूर्येण) सूर्याच्या प्रकाशानें (यावत् ते अभि विपश्यामि) जोपर्यंत सर्व बाजूंस तुझा विस्तार आम्हीं पहातों (तावत् उत्तरां उत्तरां समां मे चक्षुः मा मेष्ट) तोपर्यंत जसजसें माझें आयुष्य वाढत जाईल, तसतशीं माझीं नेत्रादि इंद्रियें स्वकार्यें करण्यांत शिथिल न होवोत; म्हणजे आमच्या सर्व आयुष्यभर आम्हीं उत्तम कार्यक्षम रहावें. (३३)

भावार्थ— जिच्या भूपृष्ठाचा शोध करण्यानें अनेक लाभ होतात, जिला अनंत शक्तिमान् परमेश्वरानें स्वशक्तीनें धारण केली आहे, शक्ति वाढविणारें तूप आणि पुष्टिकर भोजनपदार्थ, तसेंच अन्नादिक जी उत्पन्न करते, लांब, रुंद, अतएव विस्तृत, सर्व प्राणीमात्रांस रहाण्यास योग्य अशा त्या मातृभूमीची आम्हीं प्रार्थना करतों कीं हे मातृभूमि ! तूं आम्हांस आश्रय दे ! (२९)

हे मातृभूमि ! तूं चारी बाजूस आम्हांसाठीं उत्तम जलप्रवाह वाहत ठेवीत आहेस. जर कोणी आमचें अप्रिय अथवा अनिष्ट करण्याची इच्छा करील तर त्यांच्याशीं आम्हीहि तसेंच वागूं आणि उत्तम उद्योग करून आमची सर्व प्रकारें उन्नति करून घेऊं. (३०)

हे मातृभूमि ! तुझ्या सर्व दिशा आणि उपदिशांमध्यें राहणारीं मनुष्यें तुझें हित करणारीं होवोत, त्याचप्रमाणें तुझें हित करतां करतां प्रयत्नपूर्वक आम्हींसुद्धां त्या सर्वांचें कल्याण करूं. आम्हीं कोठेंहि रहावें. कोठेंहि आमची योग्यता वाढविण्याच्या कार्यांत आम्हीं दक्षतेनें रहावें. आमचा कधींहि अधःपात न व्हावा ! (३१)

हे मातृभूमि ! आम्हांस कोणत्याहि प्रकारें हानि पोहोंचूं नये ! सर्व प्रकारें आमची उन्नति व्हावी. आमची गति आमच्या शत्रूंस समजूं नये आणि आमचे पुढारी नेहमीं आमच्या शत्रूंचा नाश करीत राहोत. (३२)

हे मातृभूमि ! जोपर्यंत प्रकाश आणि ज्ञानाच्या सहाय्यानें आम्हीं तुझी बाह्य आणि आंतरिक स्थिति सूक्ष्म दृष्टीनें पाहूं शकतों, तोंपर्यंत आमचीं बाह्य इंद्रियें आणि आमची आंतरिक बुद्धि स्वकार्यें करण्यास समर्थ राहोत. (३३)

यच्छयानः पर्यावर्ते दक्षिणं सव्यमभि भूमे पार्श्वम्। उत्तानास्त्वा प्रतीचीं यत्पृष्टीभिरधिशेमहे।
मा हिंसीस्तत्र नो भूमे सर्वस्य प्रतिशीवरि ॥ ३४ ॥
यत्ते भूमे विखनामि क्षिप्रं तदपि रोहतु। मा ते मर्म विमृग्वरि मा ते हृदयमर्पिपम् ॥ ३५ ॥
ग्रीष्मस्ते भूमे वर्षाणि शरद्धेमन्तः शिशिरो वसन्तः।
ऋतवस्ते विहिता हायनीरहोरात्रे पृथिवि नो दुहाताम् ॥ ३६ ॥
याप सर्पं विजमाना विमृग्वरी यस्यामासन्नग्नयो ये अप्स्व१न्तः।
परा दस्यून्ददती देवपीयूनिन्द्रं वृणाना पृथिवी न वृत्रम्। शक्राय दध्रे वृषभाय वृष्णे ॥ ३७ ॥

अर्थ— हे (भूमे) मातृभूमि! (यत्) जेव्हां (शयानः) झोंपलों असतां (दक्षिणं सव्यं पार्श्वं) डाव्या आणि उजव्या (अभिपर्यावर्ते) कुशीवर आम्हीं वळतों (यत् त्वा) जेव्हां तुझ्यावर (प्रतीचीं) पश्चिमेकडे पाय करून (उत्तानाः पृष्टीभिः) पाठ जमिनीकडे करून उताणे (अधिशेमहे) आम्हीं झोंपूं, तेव्हां त्या स्थानीं (सर्वस्य प्रतिशीवरि) सर्व लोकांस आश्रय देणाऱ्या (भूमे नः मा हिंसीः) हे आमच्या मातृभूमि! आमचा नाश करूं नकोस. (३४)

हे (भूमे) आमच्या मातृभूमि! (ते) तुझ्यांत (यत् विखनामि) नांगरानें नांगरून आम्हीं धान्य पेरतों (तत् क्षिप्रं रोहतु) तें त्वरित उगवून येवो आणि वाढो. (विमृग्वरि) विशेष प्रकारें शोधण्यास योग्य अशा हे मातृभूमि! (ते) तुझ्या (मर्म) नाजुक मर्मस्थानीं कोणत्याहि प्रकारें घाव पडूं नये आणि (ते अर्पिपं) तुला अर्पण केलेलीं आमचीं (हृदयं) मनें आणि चित्तें (मा) दुःखी न होवोत. (३५)

हे (पृथिवि भूमे) विस्तृत मातृभूमि! (ते ग्रीष्मः वर्षाणि शरत् हेमन्तः शिशिरः वसन्तः) तुझ्या ठायीं उन्हाळा, पाऊस, शरद्, हेमन्त, शिशिर, वसन्त (ऋतवः ते हायनीः) हे सहा ऋतु तुझ्या वर्षाच्या अवधींत बनवले गेले आहेत आणि (अहोरात्रे) रात्रंदिवस ते (नः दुहाताम्) आम्हांस सुखदायक पदार्थ पुरवोत. (३६)

(या विमृग्वरी) जो विशिष्ट प्रकारें शोधण्यालायक आहे, (विजमाना अपसर्प) जो हालती चालती आहे, (ये अप्सु) आणि जे मेघांत (अन्तः अग्नयः) वीजरूपानें अग्नि आहेत, (यस्यां आसन्) ते जिच्या ठिकाणीं आहेत, अशी आमची मातृभूमि (देवपीयून) देवांच्या हिंसक (दस्यून्) ज्ञानमार्गाचा उच्छेद करणाऱ्या अनार्यांचा नाश करणाऱ्या (शक्राय) समर्थ (वृष्णेन) वीर्ययुक्त (वृषभाय) बलवान् वीरास (दध्रे) धारण करते आणि शत्रूंस (पराददति) दूर करते (वृत्रं न) शत्रूंचा (इंद्रं) नाश करणाऱ्या शूरवीरास (वृणाना) धारण करणारी म्हणजे स्वतःमध्यें आश्रय देणारी आमची मातृभूमि आहे. (३७)

भावार्थ— हे आमच्या मातृभूमि! ज्यावेळीं आम्हीं तुझे भक्त आराम करण्यासाठीं डाव्या-उजव्या कुशीस अथवा उताणे झोंपूं तेव्हां तूं आम्हांस आश्रय दे, म्हणजे आम्हीं निर्भयतेनें झोंपूं आणि त्यासमयीं कोणी आमचा घात न करो! (३४)

हे आमच्या मातृभूमि! तुझा उंच सखल असलेला भाग समतल करून आम्हीं जें त्यांत पेरतों तें उगवून त्याची सत्वर वाढ होवो. उंच सखल भाग आम्हीं तसेच राहूं दिले तर त्यांत पडून आमचा अधःपात होईल. तुझ्यासाठीं प्रयत्नशील आम्हांस मर्मस्थानीं कांहीं घाव पडूं नयेत अथवा जखमा होऊं नयेत. तुझ्यासाठीं आम्हीं तन, मन, धन अर्पण केलें आहे, कारण यामुळें तुझी उन्नति व्हावी. त्या आम्हां दुःखी न व्हावें आणि नेहमीं प्रसन्न आणि आनंदी रहावें. (३५)

हे मातृभूमि! फक्त तुझ्यांतच सहा ऋतु उत्पन्न करण्याचे उत्तम गुण आहेत. दुसऱ्या कोणत्याहि देशांत सहा ऋतु होत नाहींत. हे सहा ऋतु योग्यकालीं येवोत आणि फुलें आणि फळें इत्यादींनीं आम्हांस सुख देवोत. त्या त्या ऋतूंतील रात्र आणि दिवस आम्हांस सुखकारक होवोत. (३६)

आमची मातृभूमि अशी आहे कीं जसजसा तिचा शोध करावा तसतसें तिच्यापासून लाभदायक सत्वपूर्ण वस्तु मिळत रहातात. हिडतां फिरतां, चालत असतां मेघांत विजेच्या रूपानें अग्नि आहे, अशी आमची मातृभूमि सज्जनांस दुःख देणाऱ्या दुष्टांचा ज्ञानी वीरांकरवीं संहार करते. ती आमची मातृभूमि शत्रुनाशक वीरांसच स्वतःच्या ठिकाणीं धारण करते. (३७)

यस्यां सदो हविर्धाने यूपो यस्यां निमीयते । ब्रह्माणो यस्यामर्चन्त्यृग्भिः साम्ना यजुर्विदः ।
युज्यन्ते यस्यामृत्विजः सोममिन्द्राय पातवे ॥ ३८ ॥
यस्यां पूर्वे भूतकृत ऋषयो गा उदानृचुः । सप्त सत्रेण वेधसो यज्ञेन तपसा सह ॥ ३९ ॥
सा नो भूमिरा दिशतु यद्धनं कामयामहे । भगो अनुप्रयुङ्क्तामिन्द्र एतु पुरोगवः ॥ ४० ॥
यस्यां गायन्ति नृत्यन्ति भूम्यां मर्त्या व्यैलबाः । युध्यन्ते यस्यामाक्रन्दो यस्यां वदति दुन्दुभिः ।
सा नो भूमिः प्र णुदतां सपत्नानसपत्नं मा पृथिवी कृणोतु ॥ ४१ ॥
यस्यामन्नं व्रीहियवौ यस्या इमाः पञ्च कृष्टयः । भूम्यै पर्जन्यपत्न्यै नमोऽस्तु वर्षमेदसे ॥ ४२ ॥

अर्थ--(यस्यां सदो) ज्या भूमींत घर आहे, (हविर्धाने) ज्यांत हविष्य म्हणजे हवन करण्याचे पदार्थ सुरक्षित राहूं शकतात, (यस्यां यूपः निर्मीयते) जिच्यावर यज्ञस्तंभ पुरण्यांत आले आहेत, (यस्यां यजुर्विदः ऋत्विजः) जिच्या ठिकाणीं यजुर्वेद जाणणारे ब्राह्मण यज्ञ करणारे अथवा करविणारे (यस्यां ब्रह्माणः ऋग्भिः साम्ना अर्चन्ति) जिच्या ठिकाणीं ऋग्वेद आणि सामवेद जाणणारे ब्राह्मण ब्रह्मयाच्या स्थानीं बसून परमात्म्याचें पूजन करतात आणि (सोमं पातवे) सोमपानासाठीं (इन्द्राय युज्यन्ते) इन्द्राचें पूजन करतात. (३८)

(यस्यां पूर्वे भूतकृतः) ज्या भूमींत पूर्वी अद्भुत काम करणारे (ऋषयः वेधसः) अतीन्द्रियार्थदर्शी आणि ज्ञानी (सप्त सत्रेण) सात प्रकारच्या सत्रांनीं (यज्ञेन) यज्ञानें अथवा सत्कार, दान, मान वगैरे उत्तम कार्यांनीं (तपसा) तपश्चरणानें म्हणजे धार्मिक क्रियांनीं (गाः उदानृचुः) उत्तम वाणी द्वारा स्तुति करीत. (३९)

(सा नो भूमिः) ती आमची मातृभूमि (यत् धनम्) जें धन (कामयामहे) आम्हांस मिळावें अशी आम्हीं इच्छा करतों, तें आम्हांस (आदिशतु) देवो. (भगः) ऐश्वर्यसंपन्न स्वतःच्या ऐश्वर्यानें शूरवीर पुरुषांस (अनुप्रयुक्ताम्) सहाय्य करो. (इन्द्रः) शत्रूंचा नाश करणाऱ्या वीरांचा (पुरोगवः) नेता बनून (एतु) शत्रूवर चढाई करो. (४०)

(यस्यां भूम्यां मर्त्याः) ज्या भूमींत मनुष्यें (गायन्ति) गातात, (नृत्यन्ति) नाचतात (व्यैलबाः) विशेष प्रेरित झालेले वीरलोक स्वतःच्या राष्ट्रसंरक्षणासाठीं (युध्यन्ते) युद्ध करतात, (यस्यां आक्रन्दः) जिच्या ठिकाणीं घोड्याचें खिंकाळणें आणि (दुन्दुभिः च वदति) नगारा वाजतो, (सा नो भूमिः) ती आमची मातृभूमि (सपत्नान्) शत्रूंस (प्रणुदताम्) दूर पळवून लावो. (पृथिवी) भूमि (मा) आम्हांस (असपत्नम्) शत्रुरहित (कृणोतु) करो. (४१)

(यस्यां व्रीहियवौ) जिच्यांत तांदुळ, जव, गहूं इत्यादि धान्यें उत्पन्न होतात, (अन्नं) खाण्याचे पदार्थ जिच्यांत जास्त प्रमाणांत होतात, (यस्यां इमाः पंच कृष्टयः) जेथें पांच प्रकारचे लोक विद्वान्, शूरवीर, व्यापारी, कारागीर आणि कर्मचारी रहातात, (वर्षमेदसे) पाऊस पडण्यामुळें जेथें अन्न वगैरे उत्तम रीतीनें निर्माण होतें, (पर्जन्यपत्न्यै) पर्जन्यामुळें ज्या भूमीचें पालन होतें त्या (भूम्यै नमः अस्तु) आमच्या मातृभूमीस आमचा नमस्कार असो. (४२)

भावार्थ— ज्या आमच्या या मातृभूमींत वेद जाणणाऱ्या ब्राह्मणांनीं वारंवार यज्ञ केले, त्यावरून असें सिद्ध होतें कीं आमची मातृभूमि ही एक पवित्र यज्ञभूमि आहे. (३८)

आमची मातृभूमि अशी आहे कीं जिच्यांत अतींद्रियदर्शी सत्पुरुषांच्या रक्षणासाठीं महान् कार्यें करणारे, धर्मानुष्ठान करणारे आणि ज्ञानमार्गानें जाणारे सत्पुरुष झाले आहेत. अशा या आमच्या मातृभूमीची आम्ही स्तुति करतों. (३९)

ज्या ज्या सुखाची आम्हीं इच्छा करतों तीं तीं सुखें मातृभूमि आम्हांस देवो. ऐश्वर्यशाली आणि धनसंपन्न लोक स्वतःच्या ऐश्वर्य आणि धनानें वीरांस मदत करोत, आणि वीर पुरुष महान् पुढारी बनून धैर्यानें शत्रूंचा नाश करण्यासाठीं पुढें होवोत. (४०)

ज्या मातृभूमींत आनंद भरपूर आहे, जेथें लोक प्रसन्न आहेत, नृत्यगीतादिकांत गुंतून गेले आहेत आणि शूरवीर लोक शौर्यानें, उत्साहानें स्वतःच्या राष्ट्ररक्षणासाठीं युद्ध करतात, जेथें घोडे खिंकाळत आहेत, नगारे वाजत आहेत अशी आमची मातृभूमि आमच्या शत्रूंचा नाश करून आम्हांस शत्रुरहित करो. (४१)

यस्याः पुरो देवकृताः क्षेत्रे यस्यां विकुर्वते ।
प्रजापतिः पृथिवीं विश्वगर्भामाशामाशां रण्यां नः कृणोतु ॥ ४३ ॥
निधिं बिभ्रती बहुधा गुहा वसु मणिं हिरण्यं पृथिवी ददातु मे ।
वसूनि नो वसुदा रासमाना देवी दधातु सुमनस्यमाना ॥ ४४ ॥
जनं बिभ्रती बहुधा विवाचसं नानाधर्माणं पृथिवी यथौकसम् ।
सहस्रं धारा द्रविणस्य मे दुहां ध्रुवेव धेनुरनपस्फुरन्ती ॥ ४५ ॥
यस्ते सर्पो वृश्चिकस्तृष्टदंश्मा हेमन्तजब्धो भृमलो गुहा शये ।
क्रिमिर्जिन्वत्पृथिवि यद्यदेजति प्रावृषि तन्नः सर्पन्मोप सृपद्यच्छिवं तेन नो मृड ॥ ४६ ॥

अर्थ—(यस्याः देवकृताः पुरः) ज्या मातृभूमींतील नगरें देवांनीं बनवलेलीं आहेत, (यस्याः क्षेत्रे विकुर्वते) जिच्या प्रांतांत मनुष्यें आपआपलीं कामें उत्तम रीतीनें करतात, (प्रजापतिः) प्रजेचा पालक त्या भूमीला जी (विश्वगर्भां) सर्व पदार्थांस उत्पन्न करणारी आहे (पृथिवीं) अशा त्या आमच्या मातृभूमीला (आशां आशां) सर्व दिशांस (रण्यां) रमणीय करो ! (४३)

(बहुधा गुहा) पुष्कळ प्रकारच्या खाणींत (वसु) धन (मणिं) रत्नें, हिरे, पाचू इत्यादि (हिरण्यं) सोनें, चांदी, वगैरे किंमती धातूंचा (निधिं) संचय अथवा सांठा (बिभ्रती) धारण करणारी ही पृथ्वी (मे) आम्हांस तें सर्व धन (ददातु) देवो. (वसुदा) धन देणारी, (रासमाना) दानें देणारी (देवी) देवस्वरूप, आमचीं सर्व कामें पार पाडणारी (सुमनस्यमाना) जी आम्हांस प्रसन्न होऊन (नः) आम्हांस (वसूनि) धन (दधातु) देवो.(४४)

(बहुधा नानाधर्माणं) विविध प्रकारच्या धर्मांस मानणारा (विवाचसम्) अनेक भाषा बोलणारा (जनं) लोकसमुदाय (यथा ओकसं) ज्याप्रमाणें एका घरांत एक कुटुंब म्हणून रहावें तसा (बिभ्रती) धारण करणारी (अनपस्फुरन्ती) जी चंचल होत नाहीं अशी (ध्रुवा पृथिवी) स्थिर भूमि (द्रविणस्य धाराः) हजारों धारांनीं (मे) मला (धेनुः इव दुहां) गाय जशी दूध देते त्याप्रमाणें धन देवो. (४५)

हे (पृथिवि ते) आमच्या मातृभूमि ! तुझे (यः सर्पः वृश्चिकः) जे सांप आणि विंचू (तृष्टदंश्मा) ज्यांच्या चावण्यामुळें तहान वाढते यांसारखे जंतु (हेमन्तजब्धः) जे हिमविनाशक म्हणजे ज्वरकारक आहेत (भृमलः) अथवा ज्यांच्या दंशामुळें चक्कर येते (क्रिमिः) असे कीटक (गुहा शये) जे बिळांत राहून झोंपून रहातात (प्रावृषि) वर्षा ऋतूंत (यत् जिन्वत् यत् एजति) जे कांपत अथवा घसरत, खरडत चालतात (तत् सर्पन्) जे पोटानें सरपटत चालतात ते सर्व (नः मा उपसृपत्) ते माझ्या जवळपासहि न येवोत. (यत् शिवम्) जें आम्हांस कल्याणकारी आहे (तेन नः मृड) त्याच्या सहाय्यानें आम्हांस सुखी कर. (४६)

भावार्थ—जेथें तांदूळ, गहूं, जव इत्यादि प्रकारचीं धान्यें व खाण्याचे पदार्थ उत्पन्न होतात, जेथें विद्वान्, शूरवीर, व्यापारी, कारागीर आणि सेवक लोक अशीं पांच प्रकारचीं माणसें आनंदानें रहातात, ज्या भूमींत नियमित समयीं वृष्टि होऊन सर्व प्रकारचीं धान्यें उत्पन्न होतात आणि त्यामुळें लोकांचें पालन पोषण होतें, त्या मातृभूमीस माझा नमस्कार असो. (४२)

ज्या मातृभूमींत देवांनीं वसविलेलीं अनेक नगरें आहेत जिच्या प्रत्येक प्रदेशांत मनुष्यें अनेक प्रकारच्या उत्तम उत्तम उद्योगांत नेहमीं मग्न असतात म्हणजे जेथें दाट वस्ती आहे, जिचा कोणताहि भाग नापीक असा नाहीं, जिच्यांत सर्व प्रकारचे पदार्थ उत्पन्न होतात, त्या भूमीला प्रजेचें पालनपोषण करणारा पूर्ण करो म्हणजे तेथें विद्येचा अधिक प्रचार करून ती नैसर्गिक पदार्थांनीं आणि सौंदर्यानें सुसंपन्न होवो. (४३)

जिच्या (पोटांत) अनेक रत्नें आणि सुवर्णादि मूल्यवान् धातूंच्या खाणी आहेत, आणि जी आम्हांस उत्तम धनादि रत्नें देते ती ही आमची मातृभूमि आम्हांस नेहमींच धन देणारी होवो. (४४)

अनेक प्रकारच्या धर्मांचें पालन करणारी, विविध भाषा बोलणाऱ्या लोकांस आश्रय देणारी अशी आमची अविनाशी मातृभूमि ज्याप्रमाणें आम्हांस गाय दूध देते, त्याचप्रमाणें हजारों पदार्थ आणि धन देणारी होवो. (४५)

ये ते पन्थानो बहवो जनायना रथस्य वर्त्मानसश्च यातवे ।
यैः संचरन्त्युभये भद्रपापास्तं पन्थानं जयेमानमित्रमतस्करं यच्छिवं तेन नो मृड ॥ ४७ ॥
मल्वं बिभ्रती गुरुभृद्भद्रपापस्य निधनं तितिक्षुः ।
वराहेण पृथिवी संविदाना सूकराय वि जिहीते मृगाय ॥ ४८ ॥
ये त आरण्याः पशवो मृगा वने हिताः सिंहा व्याघ्राः पुरुषादश्चरन्ति ।
उलं वृकं पृथिवि दुच्छुनामित ऋक्षीकां रक्षो अप बाधयास्मत् ॥ ४९ ॥
ये गन्धर्वा अप्सरसो ये चारायाः किमीदिनः। पिशाचान्त्सर्वा रक्षांसि तानस्मद्भूमे यावय ॥ ५० ॥

अर्थ — हे भूमि ! (**ये ते बहवः पन्थानः जनायनाः**) मनुष्यांस हिंडण्या फिरण्यास योग्य असे जे तुझे अनंत मार्ग आहेत, (**रथस्य वर्त्म**) रथास चालण्या योग्य, (**अनसः यातवे**) गाड्यांस जाण्यायोग्य असे जे मार्ग आहेत, (**यैः संचरन्ति भद्रपापाः**) ज्या रस्त्यांनीं परोपकारी भले लोक तसेच स्वार्थी दुष्ट, पापांत बुडलेले लोकहि चालतात (**तं**) त्या रस्त्यास (**अनमित्रं**) शत्रुरहित (**अतस्करं**) लुटारु आणि ठग लोकांच्या भयापासून मुक्त कर. (**जयेम**) आम्हीं विजय प्राप्त करावा (**यच्छिवं**) जें कल्याणकारक आहे (**तेन नो मृड**) त्यानें आम्हांस सुख दे. (४७)

(**गुरुभृत्**) वजनदार पदार्थांस स्वतःकडे आकर्षणारी आणि (**मल्वं**) धारण करण्याची शक्ति (**बिभ्रती**) असणारी, (**भद्रपापस्य**) सुजन आणि दुष्टांचें (**निधनं**) मरण (**तितिक्षुः**) सहन करणारी ती (**पृथिवी**) भूमि, (**वराहेण**) उत्तम जल देणाऱ्या मेघाच्या योगानें (**संविदाना**) उत्तम वर्षाव करणारी होऊन (**सूकराय**) चांगल्या किरणांच्या (**मृगाय**) स्वतःच्या किरणांनीं सर्व दिशांच्या अपवित्रतेला पवित्र करणाऱ्या सूर्याच्या भोंवतीं (**विजिहीते**) विशेष प्रकारें भ्रमण करते. (४८)

(**पृथिवी ये ते वने हिताः**) हे आमच्या मातृभूमि ! जे प्राणी तुझ्या वरील जंगलांतून राहिले आहेत (**सिंहाः व्याघ्राः पुरुषादः**) सिंह, वाघ आणि इतर जीवहिंसक मांसाहारी प्राणी (**आरण्याः पशवः मृगाः**) वनांत रहाणारे चतुष्पाद आणि गवत खाणारे प्राणी (**चरन्ति**) हिंडतात, फिरतात, त्यांस आणि (**उलं वृकं दुच्छुनां**) वन्यपशु, पिसाळलेलीं कुत्रीं (**ऋक्षीकां**) आणि कोल्हे (**इतः अस्मत् अपबाधय**) या सर्वांस आम्हांपासून दूर ठेव. (४९)

हे (**भूमे ये गन्धर्वाः**) हे मातृभूमि ! जे हिंसक आणि आततायी लोक आमचा वध करण्यास तत्पर आहेत (**अप्सरसः**) जे आळशी अतएव कर्मपराङ्मुख आहेत, (**ये अरायाः**) जे निर्धन आहेत, (**किमीदिनः**) जे दुसऱ्याचें धन हरण करून नेतात, (**पिशाचान्**) मांस खाणारे (**रक्षांसि**) राक्षसी स्वभावाचे आहेत, (**सर्वान् अस्मत् यावय**) त्या सर्वांस आम्हांपासून दूर ठेव. (५०)

भावार्थ—हे मातृभूमि ! तुझ्या दऱ्याखोऱ्यांतून आणि गिरीगव्हरांतून रहाणारे साप, विंचवासारखे प्राणी, ज्यांच्या दंशामुळें आग होते, अथवा शोष पडतो, असे भयंकर जीव, कधींहि आम्हांस स्पर्श न करोत. जे पदार्थ आम्हांस हितकारक आणि कल्याणकारक आहेत ते नेहमीं आम्हापाशीं येवोत आणि आम्हांस सुखकारक होवोत. (४६)

हे आमच्या मातृभूमि ! ज्यांच्यावरून मनुष्यें हिंडतात फिरतात ते तुझे मार्ग रथ आणि गाडीघोड्यांस फिरण्यास योग्य आहेत, ज्यांवरून चांगले आणि वाईट दोन्ही प्रकारचे लोक चालतात, धान्यादि पदार्थ भरून ज्यांवरून गाड्या नेल्या जातात, त्या मार्गांस शत्रु आणि चोरांपासून निर्भय कर. आम्हीं विजयी होऊन त्या मार्गावरून चालावें. आम्हांस जें हितप्रद आहे तें आम्हांस प्राप्त होऊन आम्हीं सुखी व्हावें. (४७)

अत्यंत वजनदार पदार्थांस स्वतःकडे आकर्षिण्याची आणि धारण करण्याची शक्ति जिच्यांत आहे, सुष्ट आणि दुष्ट दोनहि प्रकारच्या लोकांस जी धारण करत्ये, दोघांचे मृत्यु जी सहन करूं शकते, स्वच्छ आणि पुष्कळ पाणी वर्षणाऱ्या मेघांनीं युक्त, जेथें सूर्य स्वतःच्या किरणांनीं अपवित्रतेस दूर करतो अशी आमची मातृभूमि सूर्याभोंवती फिरत आहे. (४८)

हे आमच्या मातृभूमे ! तुजवरील हिंस्र श्वापदें, शिकारी जनावरें, चतुष्पाद, रानडुकर, तरस, पिसाळलेलीं कुतरीं इत्यादींस आमच्यापासन दूर कर. (४९)

यां द्विपादः पक्षिणः संपतन्ति हंसाः सुपर्णाः शकुना वयांसि ।
यस्यां वातो मातरिश्वेयते रजांसि कृण्वंश्च्यावयंश्च वृक्षान्। वातस्य प्रवामुपवामनु वात्यर्चिः ॥ ५१ ॥
यस्यां कृष्णमरुणं च संहिते अहोरात्रे विहिते भूम्यामधि ।
वर्षेण भूमिः पृथिवी वृतावृता सा नो दधातु भद्रया प्रिये धामनिधामनि ॥ ५२ ॥
द्यौश्च म इदं पृथिवी चान्तरिक्षं च मे व्यचः । अग्निः सूर्य आपो मेधां विश्वे देवाश्च सं ददुः ॥ ५३ ॥
अहमस्मि सहमान उत्तरो नाम भूम्याम् । अभीषाडस्मि विश्वाषाडाशामाशां विषासहिः ॥ ५४ ॥

अर्थ—ती आमची मातृभूमि आहे (यां द्विपादः हंसाः सुपर्णाः शकुनाः वयांसिः पक्षिणः संपतन्ति) जेथें दोन पायाचे जीव हंस, गरुड इत्यादि पक्षी उडतात (यस्यां मातरिश्वा वातः) आकाशांत पुढें जाणारा आणि संचार करणारा वायु (रजांसि कृण्वन्) धुळ उडवित (वृक्षान् च्यावयन्) वृक्षांस मूळापासून उखडून टाकीत (ईयते) वाहतो (तस्य वातस्य प्रवां उपवां) त्या वायूच्या गतीचें अनुकरण करीत (अर्चिः) तेज अथवा प्रकाश (अनुवाति) अनुसरण करीत चालतो. (५१)

(यस्यां भूम्यां कृष्णं अरुणं च) ज्या भूमींत अंधःकार आणि प्रकाशमय दिवस (संहिते) एकत्र होतात (अहोरात्रे) दिवस आणि रात्र (अधि विहिते) होतात (सा पृथिवी भूमिः) ती विस्तृत भूमि (वर्षेण वृता-वृता) पावसानें आवृत झालेली (भद्रया) कल्याणासह (प्रिये धामनि धामनि) हितकारक स्थानांत (नः) आम्हांस (दधातु) धारण करो. (५२)

(द्यौः) द्युलोक (पृथिवी) भूमि (अन्तरिक्षम्) व अन्तरिक्ष यांमध्यें (अग्निः सूर्यः) अग्नि आणि सूर्य (विश्वेदेवाः) सर्वांस प्रकाशित करणारे देव, तसेंच विद्वान् लोक, विजयी आणि व्यवहार चतुर (इदं) हे सर्व (मे) मला (मेधां) धारणाशक्तियुक्त बुद्धि (मे व्यचः) आम्हां सर्वांस आकलनशक्ति (सं ददुः) उत्तम प्रकारें देवोत. (५३)

(अहं सहमानः) उन्हाळा, सरदी, सुख, दुःख इत्यादि द्वन्द्वें सहन करणारा (नाम) यश आणि प्रतिष्ठेनें (उत्तरः) अधिक उत्कृष्ट (भूम्यां अस्मि) माझ्या मातृभूमींत मी आहें. (आशां आशाम्) सर्व दिशांस (विषास-हिः) विशेष रीतीनें विजय करणारा (अभीषाड्) सर्व बाजूनीं पराक्रम करणारा (विश्वाषाड्) व सर्व शत्रूंचा नाश करणारा (अस्मि) मीं आहे. (५४)

भावार्थ— हे आमच्या मातृभूमि ! जे हिंसक, निर्धन, परक्याचें धन लुटणारे, मांसाहारी, अनात्मवादी, नास्तिक, अविचारी आणि जुलमी आहेत त्यांस दूर कर ! (५०)

ज्या भूमींत नेहमीं हंस, गरुड वगैरे पक्षी आकाशांतून आनंदानें स्वैर विहार करतात, जेथें वायु धूळ उडवित, वृक्षांस मूळा-पासून उपटून टाकीत, मध्यें कांहीं विक्षेप न येतां मुक्तपणें वहातो आणि ज्या जंगलांत दावाग्नि जोरानें पेट घेतो अशी आमची ही प्रिय मातृभूमि आहे. (५१)

ज्या भूमींत रात्र आणि दिवस प्रमाणबद्ध होतात आणि जेथें त्यांची व्यवस्था नीट रीतीनें झालेली आहे, ती आमची विस्तृत मातृभूमि आम्हांस हितकर स्थानीं सुखपूर्वक ठेवो. (५२)

स्थावर आणि जंगम, चेतन आणि अचेतन सर्व प्रकारच्या पदार्थांनीं आमची बुद्धि वाढो आणि कीर्ति चारी बाजूंस पसरो. (५३)

मीं माझ्या मातृभूमीसाठीं तसेंच तिचें दुःख निवारण करण्यासाठीं हरेक प्रकारचे कष्ट सहन करण्यास तत्पर आहें आणि सर्व प्रयत्नांनीं सर्व शत्रूंचा मी नाश करीन. एकही शत्रु राहूं देणार नाहीं. (५४)

अदो यद्देवि प्रथमाना पुरस्ताद्देवैरुक्ता व्यसर्पो महित्वम् ।
आ त्वा सुभूतमविशत्तदानीमकल्पयथाः प्रदिशश्चतस्रः ॥ ५५ ॥
ये ग्रामा यदरण्यं याः सभा अधि भूम्याम् । ये संग्रामाः समितयस्तेषु चारु वदेम ते ॥ ५६ ॥
अश्व इव रजो दुधुवे वि तान् जनान्य आक्षियन्पृथिवीं यादजायत ।
मन्द्राग्रेत्वरी भुवनस्य गोपा वनस्पतीनां गृभिरोषधीनाम् ॥ ५७ ॥
यद्वदामि मधुमत्तद्वदामि यदीक्षे तद्वनन्ति मा । त्विषीमानस्मि जूतिमानवान्यान्हन्मि दोधतः ॥ ५८ ॥
शन्तिवा सुरभिः स्योना कीलालोध्नी पयस्वती । भूमिरधि ब्रवीतु मे पृथिवी पयसा सह ॥ ५९ ॥

अर्थ— हे (देवि) दिव्य मातृभूमि ! तुझी (यत्) जेव्हां (पुरस्तात्) पूर्वी (देवैः) देव आणि विद्वान् यांनीं व व्यवहारकुशल लोकांनीं (प्रथमाना) कीर्ति (उक्ता) पसरविली तेव्हां (व्यसर्पः) विशेष उत्कर्षास पोहोंचून (तदानीम्) तेव्हां (चतस्रः प्रदिशः) चारी दिशांमध्यें तुझें (सुभूतम् महित्वम्) पुष्कळ महत्व (अकल्पयथाः) प्रसृत झालें. हे भूमि, तुझी ती प्रतिष्ठा (त्वा) तुझ्याविषयीं (आविशत्) आजसुद्धां पूर्ववत् होवो. (५५)

(ये ग्रामाः) जीं गांवें अथवा नगरें (यत् अरण्यं) जीं वनें (याः सभाः) ज्या राजसभा, न्यायसभा, धर्मसभा इत्यादि (ये संग्रामाः) जीं युद्धें (याः च समितयः) ज्या महान् परिषदा (अधिभूम्याम्) आमच्या भूमींत (सन्ति) आहेत (तेषु) त्या त्या ठिकाणीं (ते) तुझ्याविषयीं (चारु वदेम) आम्हीं चांगलेंच बोलूं. (५६)

(यात्) जेव्हां (पृथिवीम्) भूमीवर कोणी युद्धासाठीं (आक्षियन्) वास्तव्य करतो तेव्हां (तान् जनान्) त्या वास्तव्य करणाऱ्या मनुष्यांस (यः रजः) सैन्य येण्यामुळें उडणारी धूळ (अश्वः इव वि दुधुवे) घोड्यांच्या धांवण्यानें उडाली ती (मन्द्रा) प्रसन्न करणारी (अग्रेत्वरी) अग्रभागीं त्वरेनें जाणारी (भुवनस्य गोपा) विश्वाचें रक्षण करणारी (वनस्पतीनाम् ओषधीनां च गृभिः) वनस्पती आणि औषधींचें ग्रहण करणारी आहे. (५७)

(यत्) आम्हीं आमच्या राष्ट्रासंबंधीं (वदामि) जें बोलतों, (तत् मधुमत् वदामि) तें हितकारक व मधुर शब्दांत सांगतों, (यत् ईक्षे जें पहातों (तत्) तें सर्व (मा) आम्हांस सहाय्यक होवो. (अहं त्विषीमान्) मी प्रकाशमान्, तेजस्वी, दीप्तिमान् आणि (जूतिमान्) ज्ञानवान व्हावें ज्यामुळें (अन्यान्) दुसरे जे आमच्या मातृभूमीचें दोहन करून फायदा घेत आहेत त्यांचा आम्हीं (अवहन्मि) नाश करतों. (५८)

(शन्तिवा) शांतिकारक (सुरभिः) सुगंधयुक्त (स्योना) सुखकारक (कीलालोध्नी) अन्न देणारी (पयस्वती) जेथें पुष्कळ पाणी आहे अशी (मे पृथिवी भूमिः पयसा सह) अशी आमची मातृभूमि भोग्यपदार्थ विशेषतः जे पिण्यास उपयुक्त अशा विषयीं (अधि ब्रवीतु) आम्हांस सांगो. (५९)

भावार्थ— हे मातृभूमि ! प्राचीन लोक जेव्हां तुझी स्तुति करीत होते तेव्हां तुझें महत्त्व चारी दिशांस पसरत होतें, तें तुझें महत्त्व आज सुद्धां तितकेंच पसरत रहावें. (५५)

हे आमच्या मातृभूमि ! तुझ्या ठायीं जेथें जेथें नगर, वन सभा, परिषदा, संग्राम अथवा मनुष्यें एकत्रित होतात, तेथें तेथें आम्हीं तुझ्याविषयीं चांगलेंच बोलूं. तुझ्या अहिताची गोष्ट कधीं करणार नाहीं. (५६)

युद्धांत विजयी झालेल्या सैन्यांतील घोड्यांच्या चालण्यानें जेथें धूळ उडत आहे व ती मनुष्यांस प्रसन्न करीत आहे, अथवा कांहीं जेव्हां विशेष कारणांनीं मनुष्यें आपली संघटना करून एकत्रित होतात तेव्हां त्या संघामुळें एक प्रकारें विलक्षण शक्ति उत्पन्न होते; ती शक्ति सर्वांस आनंद देते; सर्व देशाचें रक्षण करणारी आणि सर्वांस औषधादि भक्ष्य पदार्थ देणारी असते, म्हणून त्या मातृभूमीस तिच्या भक्तांनीं नेहमीं ध्यानीं बाळगावें. (५७)

आम्ही आमचा देश अथवा राष्ट्राविषयीं जें कांहीं किंवा इतर वेळीं इतर विषयासंबंधीं बोलतों तें सर्व आमच्या मातृभूमीच्या हिताचेंच बोलूं. जें कांहीं आम्हीं डोळ्यांनीं पाहूं तें मातृभूमीस सहायक असेल. याप्रकारें आमचीं सर्व कामें मातृभूमीस अर्पण असोत. आम्हीं तेजस्वी व बुद्धिमान व्हावें आणि जे आमचे शत्रू आमच्या मातृभूमीचे दोहन करतील त्यांचा आम्हीं नाश करूं. (५८)

यामन्वैच्छद्धविषा विश्वकर्मान्तरर्णवे रजसि प्रविष्टाम् ।
भुजिष्यं१ पात्रं निहितं गुहा यदाविर्भोगे अभवन्मातृमद्भ्यः ॥ ६० ॥
त्वमस्यावपनी जनानामदितिः कामदुघा पप्रथाना ।
यत्त ऊनं तत्त आ पूरयाति प्रजापतिः प्रथमजा ऋतस्य ॥ ६१ ॥
उपस्थास्ते अनमीवा अयक्ष्मा अस्मभ्यं सन्तु पृथिवि प्रसूताः ।
दीर्घं न आयुः प्रतिबुध्यमाना वयं तुभ्यं बलिहृतः स्याम ॥ ६२ ॥
भूमे मातर्नि धेहि मा भद्रया सुप्रतिष्ठितम् । संविदाना दिवा कवे श्रियां मा धेहि भूत्याम् ॥ ६३ ॥

अर्थ— (यत्) जेव्हां (विश्वकर्मा) सर्व कामें करणारा (रजसि अर्णवे) अंतरिक्षांत (अन्तः प्रविष्टाम्) आंत प्रवेश करून ज्या भूमीस (हविषा) अन्नादि पदार्थांनीं (अन्वैच्छत्) सेवा करण्याची इच्छा करतो तेव्हां (गुहा निहिते) गुप्तस्थानांत ठेवलेलें (भुजिष्यं पात्रं) भोजनास योग्य असें अन्नादि (मातृमद्भ्यः) मातृभक्तांना (भोगे) उपभोगासाठीं (आविः अभवत्) प्राप्त होतें. (६०)

हे मातृभूमि ! (त्वं जनानाम् अदितिः) तूं लोकांस दुःख न देणारी (कामदुघा) इच्छित पदार्थ देणारी (पप्रथाना) स्तुति करण्यास योग्य (आवपनी) ज्यांत उत्तम प्रकारें पेरलें तर पुष्कळ अन्न उत्पन्न होतें, अशी (असि) तूं आहेस. (यत् ते ऊनम्) जी तुझ्यांत उणीव आहे ती (तत् ते ऋतस्य) तुझ्या ठायीं जे यज्ञ करण्यांत येतात त्यावेळीं (प्रथमजाः) सृष्टीच्या प्रारंभीं प्रगट झालेला (प्रजापतिः) परमेश्वर (आपूरयाति) पूर्ण करतो. (६१)

हे (पृथिवि ते प्रसूताः) मातृभूमि ! तुझ्यावर उत्पन्न झालेले सर्व लोक (अनमीवाः) रोगरहित (अयक्ष्माः) क्षयरोगरहित (अस्मभ्यं उपस्थाः) आमच्याजवळ रहाणारे (सन्तु) होवोत. (नः आयुः दीर्घं भवतु) आमचें आयुष्य दीर्घ व्हावें, आम्हीं पुष्कळ वर्षें जगावें (वयं प्रतिबुध्यमानाः) आम्हीं ज्ञान-विज्ञानयुक्त होऊन (तुभ्यं बलिहृतः स्याम) तुझ्यासाठीं बलि-कर देणारे होऊं. (६२)

हे (मातर् भूमे) मातृभूमि ! (भद्रया) कल्याणकारी बुद्धीनें आम्हांस (सुप्रतिष्ठितम्) सुस्थिर आणि युक्त करून (मा) मला (निधेहि) ठेव (दिवा) नेहमीं (संविदाना) सर्व जाणणारा कर (कवे मां) हे क्रान्तदर्शी ! आम्हांस (भूम्यां श्रियं धेहि) आमच्या मातृभूमीमध्यें संपत्ति प्राप्त होवो. (६३)

भावार्थ-- शान्ति, सुख, अन्न पाणी इत्यादि सर्व देणारी आमची मातृभूमि आम्हांस सर्व भोगाचे पदार्थ आणि ऐश्वर्य देणारी होवो आणि याप्रमाणें आमचें रक्षण करीत राहो. (५९)

जेथें सर्व प्रकारचीं कौशल्ययुक्त मनुष्यें मातृभूमीची सेवा करण्यास कटिबद्ध झालीं आहेत त्यांच्यासाठीं मातृभूमींत गुप्तस्थानीं ठेवलेलें, वाढून तयार ठेवलेलें ताट (जें फक्त मातृभूमीच्या भक्तासाठींच असतें) आपोआप भक्तांपुढें येऊन प्रगट होतें म्हणजे त्यांच्या उपभोगाचे सर्व पदार्थ त्यांस सहज प्राप्त होतात. (६०)

हे आमच्या मातृभूमे ! तूं आम्हां सर्वांस सुख देणारी आहेस, इच्छित पदार्थ देणारी आहेस म्हणून तुझ्यांत जी कांहीं उणीव असेल ती परमेश्वर पूर्ण करो. (६१)

हे आमच्या मातृभूमि ! आम्ही जे सर्व तुझ्या ठायीं निर्माण झालों आहोंत तीं सर्व मनुष्यें निरोगी, सशक्त, मजबूत शरीराचीं, दीर्घ आयुष्य असलेलीं आणि बुद्धिमान् तसेंच जागृत होऊन तसेंच मातृभूमीच्या हितासाठीं स्वतःचें बलिदान देण्यास तत्पर राहूं. तुझें हित करण्यास नेहमीं तयार आहोंत. (६२)

हे मातृभूमि ! तूं मला बुद्धिमान् आणि तुझ्याविषयीं नेहमीं काळजी करणारा, सूक्ष्म विचारी आणि दूरदर्शी मनुष्य कर. तसेंच मला माझ्या मातृभूमींत गुप्त असलेली संपत्ति प्राप्त करून देणारी तूं हो ! (६३)

मातृभूमीचें वैदिक गीत

मातृभूमीचें वैदिक गीत

ज्या देशांत जे लोक रहातात ते त्या भूभागास आपली मातृभूमि म्हणतात. जसें भारतीयांची भरतभूमि, चिनी लोकांची चीन, इंग्रजांची इंग्लंड आणि याप्रमाणें इतर प्रदेशांतील लोकांची ते जेथें रहातात त्यांची ती मातृभूमि आहे असें म्हटलें जातें. ज्याप्रमाणें मातेच्या रुधिरमांसादिकांपासून बालकाचें शरीर बनतें त्याप्रमाणें मातृभूमींत उत्पन्न होणाऱ्या धान्य, फळेंफुलें, वनस्पति, हवा, पाणी इत्यादींनीं त्या देशांतील माणसांचे देह पोसले जातात, म्हणून तद्देशीय लोक त्या भूमीस आपली मातृभूमि म्हणतात हें नैसर्गिकच आहे.

परमेश्वरी सूत्रच असें आहे कीं मातेच्या दुधावर तिच्या बालकाचाच हक्क असतो; कारण मातेच्या स्तनांत जें दूध परमेश्वर निर्माण करतो, तें मातेच्या उदरांत निर्माण होणाऱ्या बालकाबरोबरच निसर्गाच्या अटल नियमांनीं तें निर्माण होतें. बालकाचें पोषण मातेच्या दुधानेंच झालें पाहिजे हा सृष्टि नियमच आहे. मातेचें स्तन्य (दूध) पिणें हा बालकाचा जन्मसिद्ध अधिकार आहे. तो त्याचा धर्मच आहे.

जर एखादें जबरदस्त बालक आपल्या मातेचें दूध पिऊन दुसऱ्या बालकाच्या मातेचें दूधसुद्धां जबरदस्तीनें पिऊन टाकील आणि त्या दुसऱ्या बालकास उपाशी ठेवील, तर त्याचें तें कार्य सृष्टिनियमांविरुद्ध होईल; आणि तें जबरदस्त बालक परमेश्वराच्या घरीं अपराधी ठरेल. त्याचप्रमाणें एका देशांतील माणसें दुसऱ्या देशांतील लोकांस परतंत्र बनवून त्या देशांत उत्पन्न होणाऱ्या उत्कृष्ट वस्तूंचा उपभोग त्या देशांतील जनतेस घेऊं न देतां स्वतःच्या उपभोगासाठीं करतील तर तो त्यांचा महान् अपराध होय. ईश्वरीनियमाप्रमाणें तो गुन्हाच आहे. माता आणि बालकांची जी स्थिति वर वर्णन केली तशीच परिस्थिति मातृभूमि आणि तिच्या बालकांची-मनुष्यांची आहे.

आपण ज्या घरांत रहातों तें आपणांस किती प्रिय असतें हें प्रत्येकास माहित आहे. रात्रीच्या वेळीं जर कोणी चोर येऊन त्या घरांतील वस्तु स्वतःच्या उपयोगासाठीं चोरून नेईल, तर न्यायी सरकार अशा चोरास पकडून शिक्षा करतें. त्याचा उद्देश असाच आहे कीं कोणत्याहि घरांतील पूर्वजांपासून चालत आलेल्या वस्तूंवर त्या घरमालकाचा हक्क असला पाहिजे, त्या वस्तूंवर चोराचा कांहींच अधिकार नाहीं आणि म्हणूनच तो चोर दण्डास पात्र होतो. ज्याप्रमाणें एक लहानसें घर एका माणसाच्या मालकीचें आहे, त्याप्रमाणें एक समग्र देश हें एक विशाल घर आहे आणि तें त्यांत रहाणाऱ्या सर्व देशवासीयांचें आहे. जर या राष्ट्ररूपी घरावर दुसऱ्या देशाचे बलवान लोक हल्ला करतील, आणि त्यांतील वस्तूंवर स्वतःचा अधिकार गाजवूं लागतील, तर तो अपराध एका लहान घरावर हल्ला करून तें लुटणाऱ्या चोर दरोडेखोरा-इतकाच भयंकर, नव्हे त्यापेक्षां उग्र स्वरूपाचा आहे असें ठरेल. हें विशेष रीतिनें सिद्ध करण्याची जरुरी नाहीं. या जगांतील महान् तत्त्वज्ञानी हेंच सांगत आले आहेत; परंतु जगाचा कारभार तत्त्वज्ञान्यांच्या हातीं नसून बलवान् लोकांच्या हातीं असल्यानें अशा प्रकारच्या राष्ट्रीय लूट, चोरी-दरोडेखोरीस अपराध समजला जात नाहीं. त्यामुळें अशा अपराध्यास कोणी शिक्षेस पात्र समजत नाहीं, अथवा शिक्षाही करीत नाहींत. परंतु ईश्वरी नियमांत याप्रमाणें कधींहि पक्षपात होऊं शकत नाहीं.

अशा अपराध्यांस शिक्षा होणें योग्य कीं अयोग्य हें पहाण्याचें काम आमचें नाहीं. आम्हीं एवढेंच सांगूं इच्छितों कीं मातेच्या दुधावर तिच्या बालकाचा, घरावर घरमालकाचा, राष्ट्रावर त्या राष्ट्रांतील लोकांचा आणि मातृभूमींतील सर्व उपयुक्त वस्तूंवर त्या मातृभूमींतील लोकांचा अधिकार असतो.

मुलें आईचें दूध पिऊन वाढतात, त्यामुळें त्यांचें मातेवर असीम प्रेम असतें. मनुष्यें स्वतःच्या मातृभूमींत उत्पन्न होणाऱ्या फळें, धान्यादि पदार्थ खाऊन पुष्ट होतात, म्हणूनच त्यांचें मातृभूमीवर प्रेम असतें वा असलें पाहिजे. त्यामुळेंच कवींनीं मातृभूमीच्या वर्णनाचीं काव्यें केलीं आहेत आणि लोक तीं काव्यें गाऊन इतरांस उत्साहितहि करतात.

मातेविषयीं आणि मातृभूमिविषयीं लिहिलेलीं काव्यें हीं नैसर्गिक प्रेम उत्पन्न करतात, हें वाचकांस पुनः पुनः सांगण्याची आवश्यकता नाहीं. काव्यांतील भिन्न भिन्न रसांत प्रेमरस हा अधिक श्रेष्ठ होय. मातृदेवतेविषयींच्या काव्यांत ज्या प्रमाणांत प्रेमरस भरलेला असतो तसा तो इतर कोणत्याहि काव्यांत येणें शक्य नाहीं. माता कशी आहे ! ती असीम प्रेमाची मूर्ति आहे. तिच्या प्रेमास दुसरी कांहीं उपमा देण्यास योग्य नाहीं. तिचें प्रेम वास्तविक अनुपम आहे. जर मातेच्या प्रेमास दुसरी कोणती उपमा देणेंच असेल तर ती मातृभूमीवरील प्रेमाचीच होय. दुसरी कोणतीच उपमा त्यास शोभणार नाहीं.

स्वतःच्या मातेविषयीं ज्याला आदरभाव नाहीं असा मनुष्य क्वचितच असेल. मातेच्या प्रेमानेंच सर्व मनुष्यांचें पालन पोषण होतें. मातृभूमीविषयींहि तसेंच प्रेम प्रत्येक मनुष्यास असतें. हें देशप्रेम सुद्धां निस्सीम असतें. वाटेल तसलें संकट प्राप्त झालें, तरी मनुष्य सहसा मातृभूमीचा त्याग करण्यास तयार होत नाहीं. मातेच्या अथवा मातृभूमीच्या रक्षणासाठीं मनुष्य स्वतःचे प्राणहि ओंवाळून टाकण्यास तयार असतो.

सर्व देशाच्या लोकांनीं या निस्सीम प्रेमामुळेंच जन्मभूमीसंबंधीं गीतें भक्तिभावयुक्त उत्तमोत्तम रचिलीं आहेत. मातृभूमीसंबंधीं लोकांनीं भक्तिगीतें रचिलीं आहेत. सर्व देशांत आनंद अथवा उत्सवप्रसंगीं अशी पद्धत आहेत कीं तेथील देशवासी स्वतःचें राष्ट्रगीत भक्तिभावानें गातात.

अशा प्रकारचें राष्ट्रगीत अथवा मातृभूमीचें गीत भारतवासीयांमध्यें आहे किंवा नाहीं याविषयीं कित्येक विद्वानांत मतभेद आहेत. कित्येक विद्वान असेंहि म्हणणारे आहेत की भारतवासीयांचें एकच राष्ट्र कधीं नव्हतेंच; आणि त्यामुळेंच त्यांच्यांत एकच राष्ट्रगीत असण्याची शक्यता नाहीं. मध्यकालीं आपल्या विस्तृत देशांत पुष्कळ लहान लहान राज्यें होतीं, त्यामुळेंच जर केवळ असें म्हटलें जात असेल कीं त्यासमयीं एक राष्ट्रीयत्वाची कल्पना शक्य नव्हती, तर तें कदाचित् सत्य असेल, परंतु आमच्यापाशीं आमचें राष्ट्रगीत आहेच. या गोष्टीचा पुरावा म्हणूनच या लेखांत आम्हीं मातृभूमीसंबंधींच्या वैदिक सूक्ताचा विचार करीत आहों. हें सूक्त अथर्ववेदाच्या १२ व्या कांडांत पहिलें सूक्त आहे.

सूक्ताचा उपयोग

ज्या सूक्ताविषयीं आम्हीं लिहित आहों त्याला राष्ट्रीय महत्व आहे किंवा नाहीं हें त्याच्या उपयोगावरून समजूं शकतें; म्हणून या सूक्ताचा उपयोग कसकसा करण्यांत येत होता, तें पहा—

१ ग्रामपत्तनादिरक्षणार्थम् । (सायणभाष्य)
(अथर्व. १२।१।१)

' गांव, शहर, नगर इत्यादींच्या रक्षणाच्या प्रसंगीं याचा उपयोग करावा. ' म्हणजे गांव, नगर, प्रांत, देश, राष्ट्र इत्यादींच्या रक्षणाच्या प्रसंगीं याचा उपयोग करावा. स्वदेश रक्षणाचें कांहीं कार्य करावयाचें असेल तेव्हां याचा उपयोग केला पाहिजे. यावरून हें सिद्ध होतें की स्वराष्ट्ररक्षणाचा आणि या सूक्ताचा निकट संबंध आहे. सर्वांस हें माहित आहे की राष्ट्रगीताचा हाच उपयोग सर्व देशांत होत असतो. सर्व देशांत (राष्ट्रांत) राष्ट्रगीताचा हाच उपयोग केला जातो, परंतु या बाबतीचा आणखीहि विचार व्हावयास पाहिजे, म्हणून आणखीहि प्रमाणें यापुढें दिलीं आहेत—

२ पार्थिवीं भूमिकामस्य (नक्षत्र कल्प १७)

' पृथिवीची इच्छा करणाऱ्यानें (राजानें) पार्थिवी महाशांती करतेवेळीं याचा उपयोग करावा.' देशांत अथवा राष्ट्रांत जेव्हां अशांति होते, तेव्हां ती अशांत स्थिति दूर करण्याचे प्रयत्न व्हावयास पाहिजेत. अशा प्रयत्नास '**पार्थिवी महाशान्ति**' असें वैदिक नांव आहे. त्यांत कित्येक महत्त्वपूर्ण गोष्टी कराव्या लागतात. त्यावेळीं हें सूक्त म्हटलें पाहिजे, असें नक्षत्रकल्पकर्त्याचें मत आहे. '**भूमिकामः**' म्हणजे भूमीची इच्छा करणारा जो मनुष्य आहे त्यानें तें काम करण्याच्यावेळीं हें सूक्त म्हणावें. हें सूक्त म्हणण्यानें मातृभूमीच्या हिताचीं कामें करण्यास उत्साह प्राप्त होतो. त्याचप्रमाणें—

३ भौमस्य दृतिकर्मणि । (कौशीतकी सूत्र ५।२)

' (**भौम**) प्रदेशाच्या अथवा राष्ट्राच्या (**दृति कर्म**) आदरासाठीं जें काम करावयाचें त्या कामांत या सूक्ताचा उपयोग केला पाहिजे. ' ' **दृति** ' चा अर्थ आदर असा आहे. अतएव ' **दृतिकर्म** ' चा अर्थ आदरासाठीं केलेलें काम, राष्ट्रीय महोत्सव अथवा विजयोत्सव अशा प्रसंगीं या सूक्ताचा उपयोग करावा. सायणाचार्यांनींसुद्धां स्वतःच्या भाष्यांत या सूक्ताचा उपयोग कोणीं कोणीं करावा तें सांगितलें आहे; तें आतां पाहूं.

१ पुष्टिकामः । २ व्रीहियवान्नकामः ।
३ मणिहिरण्यकामः (सायणभाष्य अथर्व. १२।१)

' पुष्टीची इच्छा करणारे, अन्नाची इच्छा करणारे, रत्न, सुवर्ण इत्यादींची इच्छा करणारे या सर्वांनीं या सूक्ताचा पाठ करावा. ' तात्पर्य असें कीं जेव्हां जेव्हां आम्हीं कोणतेंहि राष्ट्रोन्नतिसंबंधीं कार्य करीत असूं, तेव्हां या सूक्ताचें गायन करावें. वाचकांनीं जर आज राष्ट्रगीत अशाच प्रसंगीं गायिलें जातें, ही गोष्ट ध्यानीं आणली तर सूत्रकार आणि भाष्यकार यांच्या वरील सांगण्यांतील रहस्य त्यांचें ध्यानीं येईल.

या सूक्ताचा जास्त विचार करण्यापूर्वी हें सूक्त कोणत्या गणांत आहे तें आपण पाहिलें पाहिजे. प्राचीन ऋषींनीं अथर्ववेदाचे कित्येक गण कल्पिले आहेत. त्यांतील ' **वास्तोष्पति** ' नांवाचा जो गण आहे त्यांत हें सूक्त येतें. ' **वस्तु** ' वर स्वामित्व दर्शविणारीं अथवा सिद्ध करणारीं सूक्तें ' **वास्तोष्पति**' गणांत आलेलीं आहेत. वर सांगितलेंच आहे कीं जेव्हां कोणी देशवासी लोक स्वतःच्या भूमीवर स्वतःचा अधिकार प्रस्थापित करूं इच्छितील तर त्यावेळीं हें सूक्त म्हणावें. या कारणानेंच हें

सूक्त ' वास्तोष्पति ' गणांत सामील केलें आहे.

जर याचा खोलवर विचार केला तर या सूक्ताचें महत्त्व सहज ध्यानीं येईल; आणि विशेषरूपानें त्याचें महत्त्वही समजेल. मातृभूमीचें हें वैदिक गीत हें विशिष्ट प्रकारचें राष्ट्रगीतच आहे. तसेंच तें राष्ट्रीय गीत तशाच कांहीं राष्ट्रीय प्रसंगींच गायिलें गेलें पाहिजे.

मातृभूमीची कल्पना

आतापर्यंत या सूक्ताचा विचार आपण फक्त बाह्य प्रमाणांनींच केला. आतां जर अंतःप्रमाणावरून विचार केला तर आपल्या ध्यानीं येईल कीं यांतील वर्णनें किती राष्ट्रीय महत्त्वाचीं आहेत; म्हणून प्रथम आपण या सूक्तांत जी मातृभूमीची कल्पना आहे ती कशा प्रकारची आहे तें पाहूं. जे लोक असें समजतात कीं आमच्यांत ' मातृभूमि ' ची कल्पनाच नाहीं त्यांनीं या पुढील वाचनांचा आणि आमच्या विधानांचा नीट विचार करावा, म्हणजे त्यांची खात्री होईल कीं आमच्या प्राचीन साहित्यांतसुद्धां मातृभूमीचा विचार आहे. एवढेंच नव्हे तर मातृभूमीची कल्पना सर्वांत प्रथम आमच्या ऋषीमुनींनींच प्रगट केली होती.

माता भूमिः पुत्रोऽहं पृथिव्याः । (अथर्व. १२।१।१२)

' भूमि ही माझी माता आहे आणि या मातृभूमीचा मीं पुत्र आहें. ' आमच्या देशाची भूमि ही आमची माता आहे आणि आम्हीं सर्व त्या मातृभूमीचे पुत्र आहोंत; म्हणजे सर्व देशवासी एकाच मातेचे पुत्र आहेत, त्यामुळें आम्हीं सर्व खऱ्या अर्थानें देशबन्धु आहोंत. यावरून हें स्पष्ट होतें कीं प्रत्येक देशवासीयांनीं असेच विचार बाळगले पाहिजेत. मातृभूमीच्या भक्तांच्या गौरवासंबंधानें खालीं दिलेले ऋग्वेदांतील मंत्र ध्यानीं घ्यावेत—

ते अज्येष्ठा अकनिष्ठास उद्भिदोऽमध्यमासो महसा विवावृधुः । सुजातासो जनुषा पृश्निमातरो दिवो मर्या आ नो अच्छा जिगातन ॥ ६ ॥
(ऋग्वेद ५।५९।६)

अज्येष्ठासो अकनिष्ठास एते सं भ्रातरो वावृधुः सौभगाय । (ऋग्वेद ५।६०।५)

' संपूर्ण (**पृश्नि-मातरः**) मातृभूमीस स्वतःची माता समजणारे सर्व (**मर्त्याः**) लोक खरे कुलीन आहेत. त्यांच्यांत कोणी (**ज्येष्ठ**) श्रेष्ठ, कोणी कनिष्ठ अथवा कोणी मध्यमहि नाहीं. त्या सर्वांचा दर्जा एकसारखाच आहे. ते सर्वजण (**उद्-भिदः**) स्वतःच्या वरचें दडपण नष्ट करून आपली उन्नति करून घेणारे आहेत. सर्वांचे विचार एकसारखे आहेत. ते (**भ्रातरः**) परस्पर भाऊ-भाऊ आहेत. ते स्वतःच्या (**सौभगम्**) ऐश्वर्यासाठीं (**सं-वावृधुः**) सर्व मिळून प्रयत्न करीत आहेत. '

या मंत्रांत (**पृश्नि-मातरः**) म्हणजे भूमीस माता मानणाऱ्या सत्पुरुषांसारख्यांचें वर्णन पहाण्यासारखें आहे. मातृभूमीचे सर्व भक्त एकाच विचाराचे असले पाहिजेत. त्यांच्यांत उच्च-नीच असा भेदभाव असतां नये. त्या सर्व लोकांचा दर्जा एकसारखा असावा. त्या सर्वांनीं मिळून मातृभूमीच्या उद्धाराचे प्रयत्न एकाचवेळीं एकसारखे करीत असावे. त्यांनीं आपआपसांत बंधुप्रेम बाळगावें आणि त्यामुळें त्यांनीं स्वतःची उन्नति साधावी. मातृभूमीस स्वतःची आणि सर्वांची माता समजल्यानें प्रत्येकाच्या आचरणांत जो फरक पडतो तो या मंत्रांत स्पष्टपणें दर्शविला आहे. स्वतःच्या व्यवहाराचें केंद्र मातृभूमि आहे असें मानणारे आणि असें न मानणारे यांच्या व्यवहारांत एवढा फरक असतो. हें या मंत्रांत स्पष्ट दाखवलें आहे. वेदामध्यें ही गोष्ट एवढ्या स्पष्टपणें सांगण्याचें कारण असें कीं वैदिकधर्मानुयायींना असें सांगावयाचें आहे कीं अशा विचारानें लोकांत मातृभूमीची भक्ति वाढेल आणि त्या भक्तीनें ते स्वतःची उन्नति साधूं शकतील. त्याचप्रमाणें—

इळा सरस्वती मही तिस्रो देवीर्मयोभुवः ।
बर्हिः सीदन्त्वस्रिधः (ऋ. १।१३।९)

' (**मही**) मातृभूमि, (**सरस्वती**) मातृसंस्कृति आणि (**इळा**) मातृभाषा या तीन सुखदायी देवता आहेत. त्या सर्वकाल अंतःकरणांत राहोत. '

या मंत्राच्या तीनहि देवतांत मातृभूमीचें स्थान प्रमुख आहे. तीनहि देवतांचा संबंध स्पष्ट करून दाखविण्याची येथें आवश्यकता नाहीं; कारण तो इतका स्पष्ट आहे कीं तो आपोआपच समजून येणें शक्य आहे. या सर्व मंत्रांचा विचार केला असतां हें ध्यानीं येतें, कीं आपल्या धर्मग्रंथांत मातृभूमीचें महत्त्व आणि श्रेष्ठत्व अत्यंत मोठ्या प्रमाणांत वर्णिलें आहे. त्यासंबंधीं जास्त विचार करण्यापूर्वीं हा मंत्र पहा—

भूमे मातर्नि धेहि मा भद्रया सुप्रतिष्ठितम् ॥ (अथर्व. १२।१।६३)

' हे (**मातः भूमे**) मातृभूमि ! मला कल्याणमय अवस्थेंत ठेव म्हणजे माझें सर्वतोपरि कल्याण कर.' यांत ' **भूमे मातः** ' इत्यादि पदांनीं मातृभूमीची योग्यता केवढी आहे तें समजतें. त्याचप्रमाणें—

सा नो भूमिः पूर्वपेये दधातु ॥ ३ ॥
सा नो भूमिर्गोष्वप्यन्ने दधातु ॥ ४ ॥
सा नो भूमिर्भूरिधारा पयो दुहाम् ॥ ९ ॥
सा नो भूमिर्वर्धयद्वर्धमाना ॥ १३ ॥
सा नो भूमिरादिशतु यद्धनं कामयामहे ॥ ४० ॥

सा नो भूमिः प्रणुदतां सपत्नानसपत्नं मा पृथिवी कृणोतु ॥ ४१ ॥ (अथर्व. १२।१)

' ती आमची मातृभूमि नेहमीं आम्हांस अपूर्व पेयपदार्थ देवो. ती आमची मातृभूमि आम्हांस गायी आणि अन्न देवो. ती आमची मातृभूमि आम्हांस पुष्कळ दूध देवो. ती आमची मातृभूमि आमचें संवर्धन करो. ती आमची मातृभूमि आम्हांस पुष्कळ धन देवो. ती आमची मातृभूमि आमच्या शत्रूंचा नाश करो आणि आम्हांस शत्रुरहित करो. '

पूर्वापार संबंध ध्यानीं आणला असतां हें समजेल कीं या सर्व मंत्रांत ' **भूमि** ' शब्द ' **मातृभूमि** ' या अर्थी योजिला आहे. ' मातृभूमीनें आमच्यासाठीं हें करावें आणि तें करावें ' ही भाषा अलंकारिक आहे. त्याचा वास्तविक अर्थ इतकाच होतो कीं ' मातृभूमीच्या कृपेनें आमच्या हातानें हें कार्य व्हावें अथवा हें कार्य सिद्धीस जाऊन त्याचें फळ आम्हांस मिळावें. ' कारण प्रत्येक काव्यांत अशा प्रकारची अलंकारिक याचना असतेच. या सर्व प्रार्थनांचे भाविक अर्थ भिन्न असतील पण आंतरिक अर्थ एकच असतो. या विषयीं विचारार्ह असा हा आणखी एक मंत्र पहा—

सा नो भूमिर्विसृजतां माता पुत्राय मे पयः ॥ १० ॥ (अथर्व० १२।१)

' ती आमची मातृभूमि मला म्हणजे स्वतःच्या पुत्राला भरपूर दूध देवो ! ' हा मंत्र जितका उत्तम आहे तितकाच तो अलंकारिक सुद्धां आहे. माता–पुत्रांचा संबंध मातेचें स्तन्य (दूध) पिण्यापासूनच सुरू होतो. आईचें दूध तिचें बालक पितें ही गोष्ट जगमान्य आहे. गायीचें दूध आपण पितों त्यामुळेंच गाय आपणां सर्वांची माता आहे. भूमींतील धान्य–कडधान्यादि रस आपणांस मिळतात म्हणून ती आपली माता आहे. हा सामान्य व्यवहार आहे. त्यामुळें वरील वर्णनांत जो भाग ' माझी माता मलाच दूध देवो, ' वगैरे प्रकारच्या वर्णनाचा आहे त्याचा सरळ अर्थ आमच्या मातृभूमींत उत्पन्न होणारे उपभोग्य पदार्थ आम्हांसच मिळोत, दुसरे कोणीहि ते आम्हांपासून हिरावून न घेवोत वगैरे जो भाव आहे तो किती सुंदर आणि बोधप्रद आहे ! या गोष्टींकडे वाचकांनीं अवश्य लक्ष द्यावें !

आतां कोणी असें म्हणेल कीं ' भूमि अथवा आमची भूमि ' इत्यादि शब्दांतून ' आमची मातृभूमि अथवा राष्ट्रभूमि ' असा अर्थ निघूं शकत नाहीं, आणि ही गोष्ट सिद्ध केल्यावांचून धर्मग्रंथांत मातृभूमीसंबंधीं पूर्ण वर्णन दिलेलें आहे असें आम्हीं म्हणूं शकत नाहीं. ही शंका योग्य आहे. तिचा निवार करण्याच्या वेळीं वाचकांसमोर आम्ही पुढील मंत्र ठेवतों—

सा नो भूमिस्त्विषिं बलं राष्ट्रे दधातूत्तमे । (अथर्व. १२।१।८)

' ती आमची मातृभूमि आमच्या उत्तम राष्ट्रांत तेज आणि बल वाढवो. '

यांतील ' **उत्तमे राष्ट्रे** ' चा अर्थ आणि ' **आमची भूमि** ' चा अर्थ एकच आहे. ' आमच्या उत्तम राष्ट्रांत ' म्हणजेच ' आमच्या मातृभूमींत ' तेज आणि बलाची वृद्धि होवो. ' आमच्या मातृभूमींत ' अथवा ' आमच्या राष्ट्रांत ' इत्यादि शब्दाचा अर्थ असाच आहे कीं ' आमच्या लोकांत ' अथवा ' आमच्या देशबांधवांत. ' ही गोष्ट तर सामान्य आणि साधारण विचार करणारे सुद्धां जाणूं शकतात. परंतु आमच्यांत अथवा ' देशबांधवांत तेज आणि बळ वाढो ' असें म्हणण्यापेक्षां ' आमच्या राष्ट्रांत अथवा आमच्या मातृभूमींत तेज आणि बळ वाढो ' असें म्हटलें तर तें जास्त उच्च भावना प्रगट करतें. या दृष्टीनें ' आमची मातृभूमि, आमचें राष्ट्र, आमचा देश ' वगैरे शब्दांत केवढा गूढ भाव भरलेला आहे तें पहा.

आतां या मंत्रांतील ' **उत्तमे राष्ट्रे** ' (आमच्या उत्तम राष्ट्रांत) हे शब्द अधिक उच्च भाव प्रदर्शित करतात. आतां त्याचा विचार करूं. राष्ट्रभक्तांच्या दृष्टीनें राष्ट्र कोणत्या स्थितींत असलें पाहिजे, तें या शब्दांनीं स्पष्ट होतें. या शब्दांनीं असें सूचित होतें कीं ' **आमचें राष्ट्र सर्व राष्ट्रांत उत्तम होवो** ' अशी आकांक्षा आमच्या राष्ट्रभक्तांची असली पाहिजे. ' तर आणि तम ' तुलनात्मक उच्चता दाखविणारे प्रत्यय आहेत. ' उत, उत्तर आणि उत्तम ' हे शब्द उच्चतेच्या तीन पायऱ्या दर्शवितात. ' उत्तम ' या शब्दानें सर्वोत्कृष्ट अवस्था दाखवली जाते. राष्ट्रभक्तांची अशी प्रबळ इच्छा असली पाहिजे कीं, इतर सर्व राष्ट्रांपेक्षां आमचें राष्ट्र उत्तम स्थितींत असलें पाहिजे. या इच्छेनें प्रेरित होऊन त्यांनीं आपल्या राष्ट्रास अत्युच्च कोटीचें बनविण्यास स्वतःच्या सर्व शक्त्यनुसार प्रयत्न केला पाहिजे. वरील शब्दांत हाच भाव आहे कीं, राष्ट्राच्या स्वतंत्र वा परतंत्र कोणत्याहि दशेंत संतोष न मानतां, त्यास उच्चतम कोटीस नेऊन पोंहोचविण्याचें ध्येय हेंच देशवासीयांचें लक्ष्य असलें पाहिजे आणि तें गांठण्यास भरपूर प्रयत्न केले पाहिजेत.

या मंत्रांचा विचार केला असतां असें लक्ष्यांत येतें कीं या वैदिक सूक्तांत केवळ मातृभूमीचीच कल्पना नाहीं; परंतु राष्ट्राविषयींहि विशेष उच्च कल्पना आहे आणि स्वतःचें राष्ट्र सर्व राष्ट्रांच्या अग्रभागीं रहावें अशी उच्च महत्त्वाकांक्षा यांत व्यक्त झाली आहे. वाचकांनीं ही गोष्ट विशेषेंकरून ध्यानीं आणावी

कीं, आपला धर्म इतकी उच्च राष्ट्रीय भावना जागृत करणारा आहे आणि तो हा आदर्श स्पष्ट शब्दांत जनतेसन्मुख मांडीत आहे. याविषयीं जर कोणास संदेह असेल तर त्यानें वरील वचनांचें पुनः पुनः मनन करावें आणि आपली खात्री करून घ्यावी.

इतका स्पष्ट राष्ट्रीय भावना उत्तेजित करणारा उपदेश आमच्या धर्मवचनांत असूनसुद्धां आमच्या राष्ट्रांत जेवढी जागृति व्हावयास पाहिजे तेवढ्या प्रमाणांत ती झालेली नाहीं. ही गोष्ट सत्य असली तरी त्याचें कारण कांहीं आमचा धर्म अयोग्य आहे असें नव्हे. तर त्याचें खरें कारण आपल्या धर्माकडे पुरेसें लक्ष्य न देणें आणि तद्विरुद्ध दुसऱ्या अयोग्य गोष्टींकडे जास्त लक्ष देणें हें होय. ज्या वेदांत अशी उच्च राष्ट्रीय भावना जागृत करणारी वचनें आहेत, त्या वेदाविषयीं लोकांत जी श्रद्धा आणि विश्वास आहे तो दिखाऊ आणि वरवरचा आहे. लोक आधुनिक ग्रंथांवर अधिक विश्वास ठेवतात. त्यामुळें खरें सुवर्ण दूर गेलें आणि माती तेवढी आपल्या हातांत आली.

आपल्या मातृभूमीविषयीं आणि आपल्या राष्ट्राविषयीं याप्रमाणें स्पष्ट विधानें अथर्ववेदीय मातृभूमीच्या सूक्तांत आहेत. तें राष्ट्रगीत वाचलें असतां सिद्ध होईल कीं आमचा धर्म राष्ट्रीय भावना जागृत करणारा आणि त्याची वृद्धि करणारा आहे. राष्ट्रसंबंधीं कर्तव्य करणें हें आपल्या धर्माचें एक प्रमुख अंग आहे, ही गोष्ट कोणीहि विसरूं नये.

अध्यात्मज्ञान आणि राष्ट्रभक्ति

आपल्या लोकांत धार्मिक बाबींकडे किती दुर्लक्ष होत आहे हें उदाहरणांसह सांगणें अयोग्य ठरणार नाहीं. **अध्यात्मज्ञान आणि मातृभूमीविषयीं प्रेम** (भक्ति) यांचा परस्परांशीं संबंध आहे असें सांगितलें तर तें आज लोकांस खरेंही वाटणार नाहीं, इतके भ्रमांत लोक पडलेले आहेत. अध्यात्म विचार करणारे वेदान्ती सर्वसंगपरित्याग करून गिरिगह्वरांत जाऊन बसण्याच्या मार्गास लागतात आणि ज्यांस लोक राष्ट्रभक्त समजतात ते तर स्पष्ट शब्दांत म्हणतात कीं धर्मांचा आणि राजकारणाचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं. असा या दोन गोष्टींचा स्पष्ट विरोध असतां जर कोणीं म्हणेल कीं, '**अध्यात्मविद्या आणि राष्ट्रभक्ति यांचा निकट संबंध आहे**' तर तें कोण खरें मानील बरें? त्यावर कोणाचा कसा विश्वास बसावा ? तेव्हां अशा वास्तविक स्थितीचा विचार करण्यापूर्वी आपण इतिहासांतील एक दोन उदाहरणें पाहून हा संबंध कसा काय आहे तें ठरवूं.

अर्जुन रणांगणांत युद्धास उभा राहिला होता, आणि शत्रूस जिंकण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून त्यानें युद्धासाठीं तयारी केली होती. परंतु युद्धास प्रारंभ होण्यापूर्वीच तो मोहांत सांपडला आणि अरण्यांत जाऊन तपश्चर्या करण्यास तयार झाला! त्याच्या मनांत असा विचार आला कीं युद्ध करून स्वराज्य प्राप्त करण्यापेक्षां तपश्चर्या करून त्यापेक्षां उच्चतर अवस्था प्राप्त करावी, हें श्रेष्ठ होय. त्यावेळीं भगवान् श्रीकृष्णानें अर्जुनास वैदिक अध्यात्मविद्येचा उपदेश केला. हा भगवद्गीतेचा उपदेश ऐकून अर्जुनाचा मोह दूर झाला, त्याला त्याच्या खऱ्या कर्तव्याचें ज्ञान झालें, तो शत्रूस मारण्यास तयार झाला, त्यानंतर त्यानें युद्ध केलें आणि निष्कंटक स्वराज्य पूर्णपणें प्राप्त केलें !

दुसरें उदाहरण श्री रामचंद्रांचें आहे. श्री रामचंद्राचा सर्व विद्याभ्यास पूर्ण झाल्यावर त्यास असा भ्रम झाला कीं, ' सर्वच गोष्टी दैवाधीन आहेत, आणि पुरुषार्थानें कांहींहि होऊं शकत नाहीं.' या भ्रमामुळें त्यानें पुरुषार्थाचीं कामें करणें सोडून दिलें. त्यावेळीं वसिष्ठऋषींनीं त्यास वेदान्त शास्त्राचा- अध्यात्मविद्येचा उपदेश केला. त्या उपदेशानंतर त्याचा तो भ्रम दूर झाला आणि तो प्रबल पुरुषार्थी बनला. त्यानंतर त्यानें लंकेंतील राक्षसांचा नाश केला. संपूर्ण भरतखंडांतील ३३ कोटी देवांना रावणाच्या कारागृहांतून मुक्त केलें आणि त्यांस पूर्ण स्वतंत्र केलें. अशा प्रकारें आर्य क्षत्रियांचें यश उज्ज्वल केलें.

या दोन्ही उदाहरणांत, अध्यात्मज्ञानाच्या उपदेशानंतरच प्रबल पुरुषार्थ करून स्वराष्ट्राच्या शत्रूंचा पूर्णपणें नाश करून स्वातंत्र्य मिळविल्याचें दाखविलें आहे.

श्री शिवाजी महाराजांसहि एकदां उदासीनता प्राप्त झाली होती. परंतु श्रीरामदास स्वामी आणि तुकाराम महाराज यांचा उपदेश ऐकून त्यांनीं ती उदासीनता सोडली. हा वृत्तांत मराठ्यांच्या इतिहासांत स्पष्टपणें सांगितला आहे. या सर्व गोष्टींचा विचार करतां असें म्हणणें प्राप्तच होतें कीं अध्यात्म ज्ञान अथवा वेदान्त विद्या ही राष्ट्रीय उन्नतिची पोषक आहे. हें ऐतिहासिक दृष्टान्त पाहिल्यानंतर आपण मातृभूमिविषयक ज्या वैदिक राष्ट्रगीताचा विचार करीत आहोंत त्याच्या मागच्या पुढच्या मंत्रांत कोणते विषय आले आहेत, तें पाहूं —

हें मातृभूमीचें वैदिक राष्ट्रगीत १२ व्या कांडाचें प्रथम सूक्त आहे. त्यापूर्वीचीं सूक्तें आणि त्यांचे विषय क्रमानें यापुढें दिले आहेत.

दशम कांड—

सूक्त २ रें- केन सूक्त (केन उपनिषदांतील विषय) **ब्रह्मविद्या**

सूक्त ३ ते ६ सूक्तें- शत्रूंचा नाश करण्याविषयीं.

सूक्त ७-८ ज्येष्ठ ब्रह्मसूक्त (**ब्रह्मज्ञान**).

सूक्त ९– शत्रूवर शस्त्रप्रहार करणें.
सूक्त १०– गोमातेचें रक्षण, गायींस दुःख देणाऱ्या शत्रूंचा नाश करणें.

एकादश कांड—

सूक्त १ लें– ब्रह्मौदन सूक्त (अन्न सूक्त).
सूक्त २ रें– रुद्र सूक्त (पशुपति सूक्त).
सूक्त ३ रें– ओदन सूक्त (भात, अन्न).
सूक्त ४ थें– प्राणसूक्त (प्राणशक्तीचें वर्णन).
सूक्त ५ वें– ब्रह्मचर्य (ब्रह्मचर्य पालन करणें).
सूक्त ६ वें– कालचक्र वर्णन.
सूक्त ७ वें– उच्छिष्ट ब्रह्मसूक्त (संपूर्ण जगतास धारण करणाऱ्या ब्रह्मानें सूक्त).
सूक्त ८ वें– **ब्रह्म सूक्त** (शरीरांत प्रवेश करणाऱ्या ब्रह्माचें सूक्त).
सूक्त ९ आणि १० युद्धाच्या तयारीचें सूक्त.

द्वादश कांड—

सूक्त १ लें– **मातृभूमीचें वैदिक गीत.**

या सूक्तांच्या क्रमांत युद्ध, शत्रूनाश इत्यादि विषयांपूर्वी ब्रह्मज्ञानाचीं सूक्तें आलीं आहेत. ब्रह्मज्ञानानंतर शत्रूनाशाचा विषय आलेला आहे. अथर्व वेदाच्या १० व्या कांडांत असा निर्देश दोनदां आला आहे. अकराव्या कांडांत अन्न, प्राण, ब्रह्मचर्य, काल वगैरे नंतर लागलींच ब्रह्मज्ञान आलें आहे. त्यानंतर युद्धाच्या तयारीचें वर्णन आहे, आणि त्यानंतर मातृभूमीचें वैदिक गीत आहे. सूक्तांचा हा क्रम पाहिल्यावर हें स्पष्ट दिसून येतें कीं **'ब्रह्मज्ञानानंतरच स्वातंत्र्यासाठीं युद्ध होत असावें.'** वाचकांस हें विधान कदाचित् आश्चर्यकारक वाटेल. त्यामुळें वरील सूक्तांचा अर्थ समजण्यासाठीं, त्याचप्रमाणें आम्हीं केलेलें विधान योग्य आहे कीं नाहीं त्याची खात्री करण्यासाठीं प्रत्येक सूक्तांतील एक एक मंत्र नमुन्यादाखल येथें देतों—

अष्टाचक्रा नवद्वारा देवानां पूरयोध्या ।
तस्यां हिरण्ययः कोशः स्वर्गो ज्योतिषावृतः ॥ ३१ ॥
तस्मिन् हिरण्यये कोशे त्र्यरे त्रिप्रतिष्ठिते ।
तस्मिन्यद्यक्षमात्मन्वत्तद्वै ब्रह्मविदो विदुः ॥ ३२ ॥
(अथर्व. १०।२।३१-३२)

'आठ चक्र आणि नऊ द्वारांनीं युक्त अशी देवांची अयोध्या नगरी आहे. त्या नगरींत तेजयुक्त स्वर्ग आहे. त्या कोशांत जे पूज्य देव आहेत त्यांना ब्रह्मज्ञानीच जाणूं शकतो.' हें हृदयस्थानांतील ब्रह्माचें वर्णन पाहिल्यावर लागलींच त्याचें पुढील सूक्तांत शत्रूस छिन्न भिन्न करण्याचा मंत्र आहे, तो पहा—

तेनारभस्व त्वं शत्रून् प्रमृणीहि दुरस्यतः ।
(अथर्व. १०।३।१)

अरातीयोर्भ्रातृव्यस्य दुर्हार्दो द्विषतः शिरः
अपि वृश्चाम्योजसा ॥ (अथर्व. १०।६।१)

'दुष्ट शत्रूंचा नाश करण्याच्या कार्यास आरंभ करा. दुष्ट शत्रूचें शिर मीं तोडितों.' याप्रमाणें हें सूक्त पाहिल्यावर ७ आणि ८ व्या सूक्तांतील वेदान्त वर्णन पहा—

यस्य सूर्यश्चक्षुश्चन्द्रमाश्च पुनर्णवः ।
अग्निं यश्चक्र आस्यं तस्मै ज्येष्ठाय ब्रह्मणे नमः ॥३३॥
(अथर्व. १०।७)

पुंडरीकं नवद्वारं त्रिभिर्गुणेभिरावृतम् ।
तस्मिन् यद्यक्षमात्मन्वत्तद्वै ब्रह्मविदो विदुः ॥ ४३ ॥
(अथर्व. १०।८)

'चंद्र आणि सूर्य ज्याचे डोळे आहेत, अग्नि ज्याचें मुख आहे त्या जेष्ठ ब्रह्मास मीं नमन करतों. नवदल कमलांत जो देव आहे त्यास ब्रह्मज्ञानीच जाणूं शकतो.' हें ब्रह्म वर्णन वाचल्यावर त्यापुढील सूक्ताचा पहिलाच मंत्र पहा—

अघायतामपि नह्या मुखानि सपत्नेषु वज्रमर्पयैतम् ॥ (अथर्व. १०।९।१)

'पापी लोकांचें तोंड बंद करा आणि हेंच शस्त्र शत्रूंवर फेंका.'

तिसऱ्या सूक्तांचा क्रम असाच आहे. त्या सूक्तांचे विषय येथें देत नाहीं. फक्त ११ व्या कांडांतील आठव्या सूक्ताचा एक मंत्र येथें देतों. बाकी प्राण आणि ब्रह्मचर्य सूक्तांचें वर्णन विस्तारभयास्तव सोडून देऊं—

तस्माद्वै विद्वान् पुरुषमिदं ब्रह्मेति मन्यते ।
सर्वा ह्यस्मिन्देवता गावो गोष्ठ इवासते ॥ ३२ ॥
(अथर्व. ११।८)

'यासाठीं या (पुरुषं) पुरुषास ब्रह्म म्हणतात. कारण कीं ज्याप्रमाणें गायी गोठ्यांत रहातात त्याप्रमाणें सर्व देवता याच्या आश्रयानें रहातात.' या ब्रह्मज्ञान सूक्ताच्या पुढील सूक्त पहा—

तेषां सर्वेषामीशाना उत्तिष्ठत सं नह्यध्वं मित्रा देवजना यूयम् । इमं संग्रामं संजित्य यथालोकं वितिष्ठध्वम् ॥ २६ ॥ (अथर्व. ११।९)

मित्र हो ! तयारी करा, उठा, या युद्धांत जिंकल्यानंतर आपआपल्या देशास जा.' त्याचप्रमाणें—

सहस्रकुणपा शेतामामित्री सेना समरे वधानाम् ।
विविद्धा ककजाकृता ॥ २५ ॥ (अथर्व. ११।१०।२५)

'शत्रुसेनेंतून हजारों प्रेतें युद्धभूमीवर पडोत.' अशाप्रकारचें वर्णन अध्यात्म ज्ञानानंतर लागलीच कित्येकदां आलें आहे.

असें वर्णन काकतालीय न्यायानें आलें असें म्हणतां येणार नाहीं, कारण असें वर्णन तीन ठिकाणीं आलें आहे. राम आणि अर्जुनाच्या उपदेशस्थळीं तसेंच झालें आहे. यावरून **'अध्यात्म ज्ञानानंतर स्वातंत्र्यासाठीं युद्ध'** होणें स्वाभाविक आहे. या सर्व सूक्तानंतर वैदिक राष्ट्रगीत आलें आहे. यावरून एवढें तर निश्चित समजूं शकतें कीं ज्या सूक्ताविषयीं प्रस्तुत लेख लिहिला आहे तें वास्तविक राष्ट्रीय महत्त्वाचें सूक्त आहे. कारण तें युद्धसमयीं आलेलें आहे.

या सूक्तासंबंधीं विचार करण्यापूर्वी आपण हें पाहिलें पाहिजे कीं अध्यात्मज्ञान, ब्रह्मज्ञान, इत्यादि विषयांचा युद्धादि राष्ट्रीय गोष्टींशीं काय संबंध आहे.

(१) अध्यात्मज्ञान

बुद्धि, मन, अहंकार, प्राण, इंद्रिय आणि शरीराच्या सर्व अंगांचा आधार आत्मा आहे. या सर्व महान् शक्ति आहेत; या शक्तीचें यथार्थ ज्ञान होणें यास अध्यात्मज्ञान म्हणतात.

या सर्व शक्ति आपणांमध्यें आहेत. आपण कांहीं अगदीं क्षुद्र नाहीं. आपले आधीन या महान् शक्ति आहेत. त्यांस चालविणारे आपण आहोंत. ही आपली शक्ति अध्यात्मज्ञानानेंच समजते. अध्यात्मज्ञान प्राप्तीपूर्वी स्वतःस क्षुद्र, निर्बल समजणारा मनुष्य जरा अध्यात्मज्ञान प्राप्तीनंतर स्वतःस सबल आणि समर्थ समजूं लागला तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. यामुळेंच तर श्रीरामचंद्र जे स्वतःस दैवाधीन अतएव परतंत्र समजत होते, तेच अध्यात्मज्ञान प्राप्तीनंतर दैवास आपल्या आधीन करण्यास समर्थ झाले आणि आपल्या पुरुषार्थानें विपरित दैवास आपल्या मतानुसार बनविण्यास स्वतःस समर्थ मानूं लागले ! अशी शक्ति अध्यात्मज्ञानानें प्राप्त होत असते.

(२) ब्रह्मज्ञान

विश्वव्यापी सच्चिदानंद शक्तीचें अस्तित्व स्थिर आणि चर जगांत सर्वत्र सारखेंच आहे. या ज्ञानामुळें जगाकडे पहाण्याची दृष्टिच बदलून जाते.

त्यास आपल्या अंतःशक्तीची आणि बाह्य जगत् शक्तीची नीट यथार्थ कल्पना होते. त्यामुळें योग्य काम करीत असतां त्यास शोक होणें अथवा मोह पडणें असंभवनीय आहे. तो उत्तमोत्तम मनुष्यांचें रक्षण करतो आणि दुष्टांचा नाश करतो. तो धर्माचें उत्तम पालन करून लोकांत शांतता राखतो. जीवनाकडे पहाण्याची त्याची दृष्टि इतकी उच्च झालेली असते, कीं त्यास स्त्री-पुत्रादिकांचा अथवा गृह अथवा धनादिकांचा मोह पडत नाहीं अथवा सुखोपभोग्यासाठीं अथवा ऐष आरामाच्या इच्छेनें तो स्वकर्तव्य सोडीत नाहीं.

याशिवाय ब्रह्मज्ञानानें आणखी एक लाभ होतो. तो असा कीं पृथ्वीवर स्वार्थासाठीं जीं युद्धें होतात तीं होणार नाहींत आणि या युद्धांमुळें सज्जनांस जे कष्ट होतात ते होणार नाहींत; कारण ब्रह्मज्ञान प्राप्तीमुळें त्यांची दृष्टि पवित्र झालेली असते. म्हणजे स्वतःच्या स्वार्थासाठीं दुसऱ्यास परतंत्र करणें अथवा त्यास लुटणें हें त्यांच्याकडून होणें असंभव आहे. उलट जगांतील सज्जनांस उपद्रव देणाऱ्या दुष्टांचें पारिपत्य करण्यासाठींच त्यांची तरवार सदैव बाहेर पडलेली असते. आजकाल निव्वळ स्वार्थासाठीं जीं युद्धें होत आहेत, दुसऱ्या राष्ट्रांस लुटण्यास संगठीत राष्ट्रीय अन्याय होत आहेत, निव्वळ आपणांजवळ चांगली व श्रेष्ठ युद्ध-सामग्री आहे एवढ्या खातरच दुसऱ्या राष्ट्रांस त्रास देणें, आणि त्यांची उन्नति होऊं न देण्यासाठीं भयंकर प्रयत्न होत आहेत, जर सर्व राष्ट्रांत अध्यात्मज्ञान आणि ब्रह्मज्ञानाचा प्रचार होईल तर हें सर्व बंद होईल. राष्ट्रांतील क्षात्रशक्ति ही एक प्रचंड शक्ति आहे. त्या शक्तीस ब्रह्मज्ञानी मनुष्यच उत्तम रीतीनें ताब्यांत ठेऊं शकतो. ज्यांस हें ब्रह्मज्ञान नसतें ते लोक राष्ट्रांतील या क्षात्रशक्तीचा दुरुपयोग करून जगांत जबरदस्तीनें पापी साम्राज्यसत्तेचा प्रचार करतात. या सर्व गोष्टींचा विचार करतां ध्यानीं येईल कीं प्रथम ब्रह्मज्ञान प्राप्त करून दृष्टि उच्च बनविली पाहिजे आणि त्यानंतर महान् राष्ट्रीय शक्तीचा उपयोग केला पाहिजे. हीच वेदांची आज्ञा आहे, आणि यावरूनच वेदांची अपूर्व दूरदर्शिता ध्यानीं येते. हेंच ज्ञान आमच्या वैदिक धर्मानेंच प्राचीनकाळीं सर्व जगाला दाखवून दिलें होतें. दुःखाची गोष्ट अशी कीं अति प्राचीनकाळीं भरतखंडांत प्रचलित असलेलें हें ज्ञान नंतर लुप्त झालें व पुनः तें येथें कधींहि सुरू होऊं शकलें नाहीं. हेंच ज्ञान पुनः येथें सुरू करण्यास आपणांस स्वतंत्रता असली पाहिजे. मग तें जगांत प्रचलित करून सर्व विश्वांत शांति प्रस्थापित करण्याचा महामंत्र आपण जगास दाखवून देऊं शकूं.

याप्रमाणें ब्रह्मज्ञान युद्धापूर्वी कां शिकविलें पाहिजे आणि त्याचें महत्त्व काय आहे तें येथें थोडक्यांत सांगितलें. वस्तुतः ही गोष्ट विस्तारपूर्वक सांगावयास हवी. परंतु तसें करण्यास येथें पुरेसें स्थान नाहीं. म्हणून तो विषय येथें संक्षिपानें दाखविला आहे. आतां वैदिक राष्ट्राच्या गीताचें स्वरूप स्पष्ट करूं या—

आतां पावेतोंच्या लेखांत मातृभूमीच्या वैदिक राष्ट्रगीतासंबंधीं

सामान्य परिचय होण्यास जितक्या गोष्टींची आवश्यकता वाटली तितक्याच येथें दिल्या आहेत. यावरून वाचकांची खात्री होईल कीं राष्ट्रगीताचा विचार राष्ट्राच्या पुष्टि आणि वृद्धीच्या दृष्टिनें किती महत्त्वाचा आहे; म्हणून आतां आपण या राष्ट्रगीताचे मंत्र कोणत्या महत्त्वाच्या विषयाचा उपदेश करतात तें पाहूं या. प्रथम मंत्रच आपण पाहूं—

सत्यं बृहद्दतमुग्रं दीक्षा तपो ब्रह्म यज्ञः पृथिवीं धारयन्ति । सा नो भूतस्य भव्यस्य पत्न्युरुं लोकं पृथिवी नः कृणोतु ॥ (अ. १२।१।१)

' सत्य, सरलता, उग्रता, उदारता, तप, ज्ञान आणि यज्ञ इत्यादि गुण मातृभूमीस धारण करतात. ती (मातृभूमि) आमच्या भूत, भविष्य आणि वर्तमान स्थितींचें पालन करणारी आमची मातृभूमि आम्हांस कार्य करण्यास विस्तृत स्थान देवो. '

या मंत्राच्या पूर्वार्धात स्पष्टपणें, मातृभूमीस कोणत्या प्रकारचे लोक धारण करूं शकतात त्यांचा निर्देश आहे. सर्व लोकांनीं ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. प्रत्येक मनुष्य स्वतःच्या राष्ट्राचें धारण-पोषण करूं शकत नाहीं. जे लोक विशिष्ट गुणांनीं युक्त असतात तेच राष्ट्राची उन्नति करूं शकतात. दुसरे केवळ संख्या वाढविण्यास कारणभूत होत. ही गोष्ट प्रथम मंत्रांत स्पष्ट सांगितली आहे आणि ती वाचकांनीं ध्यानांत ठेवली पाहिजे.

सर्व प्रथम राष्ट्रीय गुण ' **सत्य** ' आहे. ज्या मनुष्यांत सत्यप्रियता आहे, सत्यपालनासाठीं आत्मसर्वस्वाचें समर्पण करण्याची ज्याच्यांत तत्परता आहे, तोच राष्ट्राचा उद्धार करूं शकेल. ज्याच्यांत सत्याचा आग्रह आहे म्हणजे सत्यपालनासाठीं जो आग्रह (हट्ट) दाखवितो अथवा सत्याचें आग्रहपूर्वक पालन करतो तोच राष्ट्राचा उद्धार करूं शकेल. सूक्ताचा आरंभच ' सत्य ' शब्दानें झाला आहे. याप्रमाणें सूक्ताचा आरंभच मंगल अर्थयुक्त आणि सर्वांत अधिक महत्त्वाचा आहे. या विचारानें हें सिद्ध होतें कीं वैदिक राष्ट्रीयतेंत सत्य हा अत्यंत महत्त्वाचा गुण आहे. आणि आतां ही गोष्ट तर सुप्रसिद्धच आहे कीं सत्याग्रहरूपी शस्त्र निःशस्त्र प्रजा शस्त्रधारी राजाविरुद्ध उपयोगांत आणूं शकते, आणि त्याच्या सहाय्यानें विजय सुद्धां मिळवूं शकते. सत्याचे व्यक्तिगत, सामाजिक आणि राष्ट्रीय असे भेद होऊं शकतात. भारतवासी व्यक्तिगत सत्य पालनांत जगांतील इतर कोणत्याहि लोकांपेक्षां जास्त तत्पर म्हणजे दक्ष आहेत. परंतु ते सामाजिक आणि राष्ट्रीय म्हणजे सामूहिक सत्य पालन करूं शकत नाहींत. सामुदायिक सत्यपालनानेंच सत्याग्रहाचा मार्ग अधिक सफल होतो. सामुदायिक सत्य म्हणजे काय ? त्याचें पालन कशा प्रकारें करावयाचें ? एवढें जर भारतवासी शिकून घेतील आणि त्याबरोबरच योग्यरीतीनें त्याचें पालन करतील तर हा एकच गुण त्यांचें सर्वदेशिय कल्याण करील.

त्यानंतरचा गुण सरलता, ऋजुता हा आहे. तोसुद्धां सत्याइतकाच महत्त्वाचा आहे, आणि त्याचें आचरण सत्याच्या आचरणानंतरच होऊं शकतें. जे मनुष्य सत्यपालन करूं शकत नाहींत, आणि ज्यांचें आचरण सरळ नाहीं त्यांच्याकडून राष्ट्रीय उन्नतीचीं कार्यें होणें अशक्यच आहे. त्यांची स्वतःची तर अवनति होईलच पण त्यांच्याशीं ज्यांचा ज्यांचा संबंध असेल त्या सर्वांस ते आपल्याबरोबर अधोगतीस नेऊन पोंचवितील.

' **उग्रता** ' हा शूरवीरांचा गुण आहे. जे क्षत्रिय या गुणांनीं युक्त आहेत ते सत्याग्रहाच्या मार्गानें स्वतःच्या राष्ट्राचें वैभव वाढवूं शकतात. ' **दक्षता** ' हा त्यानंतरचा गुण आहे. त्याचा अर्थ दाक्षिण्य आणि सावधानता असा आहे. हे गुण प्रत्येक कार्य श्रेष्ठ करण्यासाठीं आवश्यक आहेत. कोणत्याहि कार्यांत दक्षतेशिवाय सफलता प्राप्त होणार नाहीं ही गोष्ट सर्वांस माहित आहे, म्हणून त्या विषयीं जास्त लिहिण्याची जरुरी नाहीं.

त्यानंतरचा गुण ' **तप** ' हा आहे. हा गुण राष्ट्रीय महत्त्वाचा आहे. जें कार्य करावयाचें आहे त्याच्या मार्गांत विघ्न करणाऱ्या थंडी आणि उष्णता, हानि आणि लाभ, सुख आणि दुःख वगैरे द्वंद्वांशीं टक्कर देऊन तें कार्य करण्यास पाऊल उचलणें याचें नांव तप होय. हाच तपाचा अर्थ आहे. थोडा वेळ उन्हांत फिरल्यानें जर उष्णता होत असेल आणि थंडींत काम करण्यामुळें सर्दी होत असेल तर अशीं नाजुक प्रकृतीचीं माणसें राष्ट्राचें कोणतेंच कार्य करूं शकणार नाहींत. यावरून सिद्ध होतें कीं थंडी उष्णता इत्यादि द्वन्द्वें सहन करण्याचें तप राष्ट्रीय सद्गुणांत सामील होऊं शकतें. आजकाल आपल्या देशांत तप नांवाखालीं मनुष्यें जें कांहीं व्रताचरण करतात तें वैयक्तिक तप होय. राष्ट्रीय तप निराळेंच असतें आणि तें सिद्ध केल्याशिवाय राष्ट्रीयदृष्टीनें आपण उन्नति साधूं शकणार नाहीं.

त्यानंतरचा राष्ट्रीय गुण ' **ब्रह्म** ' म्हणजे ' ज्ञान ' हा होय. ' **ज्ञानान्मोक्षः** ' हें सूत्र सर्वांस चांगल्या प्रकारें माहित आहे; पण तें राष्ट्रीयदृष्टीनेंहि सत्य आहे ही गोष्ट फार थोड्यांस माहित असेल. ज्याप्रमाणें ज्ञानानें कोणीहि व्यक्ति आत्मबंधनांतून मुक्त होते त्याचप्रमाणें ज्ञानानें राष्ट्रसुद्धां स्वतंत्र होतें, दुसऱ्याच्या गुलामींतून मुक्त होतें. जागृत राष्ट्रानें स्वतःचें ज्ञान जगाच्या ज्ञानाबरोबर वाढवीत ठेवलें पाहिजे, एवढेंच नव्हे तर जगाच्या ज्ञानापेक्षां स्वतःच्या राष्ट्राचें ज्ञान पुढें जाईल यासाठीं राष्ट्राच्या प्रत्येक नागरिकानें प्रयत्नशील राहिलें पाहिजे; तरच राष्ट्राच्या स्वातंत्र्याचें

रक्षण होईल. स्वतंत्रतेचा ज्ञानाशीं संबंध अनादिकालापासून ठरलेला आहे.

त्यानंतरचा गुण आहे ' यज्ञ. ' यज्ञानें आत्मसमर्पणाचा भाव प्रगट होतो. राष्ट्रोन्नतिसाठीं आत्मसमर्पण करण्याची लोकांची तयारी असली पाहिजे. तरच राष्ट्रोन्नति होण्याची शक्यता आहे. जर तिचा अभाव असला तर उन्नति कदापि होणें शक्य नाहीं.

वैदिक राष्ट्रगीताच्या पहिल्या मंत्रानें हाच महत्त्वपूर्ण उपदेश केला आहे. आपल्या राष्ट्राची उन्नति कोणते गुण वाढीस लागल्यानें होईल आणि कोणत्या गुणांच्या अभावामुळें अवनति होईल, ही गोष्ट या मंत्रांत स्पष्टपणें दाखविली आहे आणि त्याचा उपयोग आज सुद्धां होऊं शकतो.

राष्ट्रीय उन्नति करणारे गुण हे आहेत. ' सत्याग्रह, सरल वर्तन, उग्रता अथवा शौर्य, दक्षता अथवा तत्परता, सत्कार्यें करण्यासाठीं आवश्यक परिश्रम करण्याचें सामर्थ्य आणि तें करीत असतां उष्णता, थंडी इत्यादि द्वन्द्वें सहन करण्याचें सामर्थ्य, ज्ञान आणि महान् कार्यासाठीं आत्मसमर्पण करण्याची तत्परता. ' जर हे गुण जनतेंत अथवा जनतेच्या नेत्यांत असले तर त्या राष्ट्राचा उद्धार होईल, जर नसतील तर त्याचा उद्धार होणारच नाहीं.

आतां राष्ट्राच्या अवनतीस कारणभूत दुर्गुण पाहूं या– ' सत्याग्रहास तयार न होणें अथवा सत्याची पर्वा न करतां मन मानेल तसें स्वैराचरण करून येनकेन प्रकारानें जीवन व्यतीत करण्याची प्रवृत्ति ठेवणें, कपटाचरण, भीरुता अथवा शौर्याचा अभाव, दक्षतेचा अभाव, परिश्रम करण्याचें सामर्थ्य नसणें, अज्ञान, आत्मसमर्पणची अनिच्छा.' वाचकांनीं स्वतःच विचार करावा कीं राष्ट्राच्या उन्नतीसाठीं वरील राष्ट्रीय गुण स्वतःच्या ठिकाणीं अधिक आहेत कीं अवगुण अधिक आहेत. या गोष्टीचा विचार केला तर समजेल कीं आज आम्हांस काय करण्याची आवश्यकता आहे.

अशा प्रकारें मंत्राच्या प्रथमार्धभागांत राष्ट्रास धारण करण्यास आवश्यक गुणांची वाढ करण्याचा उपदेश आहे, आणि त्यानंतरच्या उत्तरार्धांत एक महत्त्वपूर्ण महत्त्वाकांक्षा जनतेपुढें ठेवण्यांत आली आहे. ती याप्रमाणें– **' आमची मातृभूमि आमच्या भूत, भविष्य आणि वर्तमान परिस्थितीची देवता आहे. ती आम्हांस आपल्या देशांत विस्तृत कार्यक्षेत्र देवो. '**

राष्ट्रभक्त मातृभूमीचे उपासक असतात. त्यांचीं सर्व कार्यें मातृभूमीस केन्द्रस्थानीं कल्पून होत असतात. यावरून हें स्पष्ट होतें कीं राष्ट्रभक्तांची भूत, भविष्य आणि वर्तमान काळची नियामक देवता मातृभूमीच असणार. भूतकाळीं त्यांनीं मातृभूमीची ज्या प्रकारें सेवा केली असेल तशी त्यांची वर्तमान परिस्थिति असते; आणि वर्तमानकाळीं ज्या प्रकारची उपासना ते करतील तद्वत् भविष्यकाळीं त्यांची स्थिति राहील. यासाठींच राष्ट्रभक्तानें सदैव मातृभूमीची उपासना उत्तम रीतीनें करावी. ज्यामुळें त्यांची अवनति होईल. असें कांहीं घातक वर्तन करूं नये.

प्रत्येक मनुष्यानें अशी महत्त्वाकांक्षा बाळगली पाहिजे कीं **' माझ्या राष्ट्रांत मला विस्तृत कार्यक्षेत्र मिळावें. '** जर परिस्थिति अनुकूल नसली तर ती तशी उत्पन्न करण्यासाठीं कठिणांत कठीण असें काम करण्याची जरुरी आहे. ज्याप्रकारें आपल्या घरांत कोणतेंहि कार्य करण्यास आपणांस स्वातंत्र्य असतें, तद्वत् देशाचें स्वातंत्र्य टिकविण्यासाठीं कोणतेंहि कार्य करण्यास आपण तयार असलें पाहिजे. त्यांत आडकाठी असतां कामा नये. इतरांनीं त्या राष्ट्रपुरुषाच्या कार्यांत हस्तक्षेप करूं नयेत आणि स्वदेशवासीयांच्या उन्नतींत विघ्नें आणि अडचणी उपस्थित करूं नयेत. स्वतःच्या घरांत प्रत्येकजण स्वतंत्र असला पाहिजे, आमच्या देशांत आम्हांस विस्तृत कार्यक्षेत्र मिळालें पाहिजे आणि आमचें कार्यक्षेत्र जर दिनप्रतिदिन मर्यादित होऊं लागलें तर ती परिस्थिति त्वरेनें बदलली पाहिजे. तशी परिस्थिति बदलून टाकणें हें आपलें प्रथम आवश्यक कर्तव्य आहे. वाचकांनीं मंत्राच्या या आशयाचा विचार करावा आणि वैदिक राष्ट्रगीताच्या उच्च ध्येयाचा अनुभव घ्यावा.

जर राष्ट्रीय उन्नति साधावयाची असेल तर राष्ट्रभक्तांत दृढ ऐक्याची आवश्यकता आहे. असें ऐक्य सिद्ध झाल्याशिवाय सामुदायिक कार्य सिद्ध होणें असंभवनीय आहे. सर्व लोकांस ही गोष्ट उत्तम प्रकारें माहित आहे, पण ही राष्ट्रीय एकता आपल्या देशांत कशी साध्य करावी हें लोकांस समजत नाहीं. लोकांस असें वाटतें कीं आपल्या देशांत भिन्न भिन्न धर्म आहेत, भाषा आहेत, जाति आहेत. रीतरिवाजांत सुद्धां अनेक भेद आहेत. अशा परिस्थितींत ऐक्य व्हावें कसें ? असें म्हणून लोक निराश होतात आणि गप बसतात. ऐक्यासाठीं जसजसे प्रयत्न केले जातात तसतसे त्याविरुद्ध विचार उद्भवतात आणि त्याचें फल वेगळेपणा आणि पक्षोपपक्ष निर्माण होण्यांत होतें. याच कारणानें राष्ट्रभक्त भयभीत होत आहेत. अशावेळीं खालीं दिलेला वैदिक राष्ट्रगीतांतील मंत्र फारच विचारणीय आणि बोधप्रद होण्यासारखा आहे. तो पहा—

जनं बिभ्रती बहुधा विवाचसं नानाधर्माणं पृथिवी यथौकसम् । सहस्रं धारा द्रविणस्य मे दुहां ध्रुवेव धेनुरनपस्फुरन्ती ॥ (अथर्व. १२।१।४५)

' (**वि-वाचसं**) अनेक भाषा बोलणारी आणि (**नाना धर्माणं**) नाना धर्म अनुसरणारी जी जनता आहे तिला (**यथा ओकसं**) एकाच घराप्रमाणें धारण करणारी मातृभूमि भाग्याचे हजारो प्रवाह आम्हांला देवो. ज्याप्रमाणें शांत राहणारी गाय शांतपणें दूध देते त्याप्रमाणें मातृभूमि मला ऐश्वर्य देवो.'

जेव्हां विविध भाषा बोलणारे, विविध धर्मानुयायी आणि विविध रीतरिवाज पाळणारे लोक एकाच कुटुंबांतील एकाच घरांत रहाणाऱ्या लोकांप्रमाणें भावाभावासारखे समानतेनें या देशांत वागतील तेव्हांच या राष्ट्राची प्रगति होईल. (**वि-वाचसं जनं**) अनेक भाषी लोक असूनसुद्धां आणि (**नानाधर्माणं जनं**) विविध धर्मानुयायी असतां त्या सर्वांची माता एकच– सर्वांची आदि माता हीच मातृभूमि आहे. त्यामुळें सर्वांनीं अंतस्थ भेदभाव विसरून जाऊन एकत्रित येऊन तिच्यासमोर उभें रहावें. मातृभूमीची उपासना करण्यांत भाषाभेद, प्रांतीय भेद, धर्मभेद अथवा जातिभेद आड येत नाहींत. सर्व लोकांनीं एकत्र होऊन असेंच समजलें पाहिजे कीं आपण सर्व (**यथा ओकसं**) एकाच घरांत रहाणाऱ्या कुटुंबीजनाप्रमाणें आहोंत. सर्व लोकांनीं अन्य कोणताहि भेदभाव न मानतां स्वतःची एकता सिद्ध केली पाहिजे.

एकाच घरांतील लोकांत कित्येक लहान, कित्येक मोठे, कोणी गोरे, कोणी सांवळे तर कित्येक मध्यम, कोणी वृद्ध, कोणी तरुण, कित्येक पुरुष, कित्येक स्त्रिया आणि कांहीं मुलेंहि असतात. एकाच घरांतील लोकांत एवढे भेद असतात. त्यांतील प्रत्येक जर म्हणेल कीं ' मीं दुसऱ्याहून भिन्न आहे ' आणि स्वतःच्या भिन्नतेच्या कारणानें तो जर कुटुंब हिताकडे दुर्लक्ष करील, तर त्या घराचा, त्या कुटुंबाचा आणि त्यांतील व्यक्तींचा नाश होण्यास किती वेळ लागेल ? या उलट जर घरांतील प्रत्येक व्यक्ति, प्रत्येक घटक क्षुद्र भेदभाव विसरून जाऊन स्वतःच्या मनांत समग्र कुटुंबाच्या हिताचाच विचार जर बाळगील तर तें घर नंदनवनाप्रमाणें आनंदानें भरपूर झालेलें दिसेल. जेथें पुष्कळ व्यक्ति एकत्र येतात तेथें भेदभाव हे असणारच. परंतु मनुष्याचा खरा धर्म असाच असला पाहिजे कीं वैयक्तिक क्षुद्र भेदभाव विसरून त्यांस गौण समजून सर्वांनीं मिळून मिसळून, स्वतःचें घर, स्वतःचा देश, स्वतःच्या राष्ट्राचें हित साधावें. राष्ट्रगीतांत हीच गोष्ट दर्शविली आहे. जेव्हां राष्ट्राचे घटक स्वतःच्या क्षुद्र भेदभावांस प्राधान्य देऊन आपसांत भांडतात, झगडतात, तेव्हां राष्ट्राची शक्ति क्षीण होते. परंतु भेदभाव मिटवून सर्व मिळून देशहिताच्या कार्यास लागतील तर त्यांची शक्ति वाढते, उन्नति साधते आणि त्या बरोबर राष्ट्राची उन्नतिहि होते.

कोणत्याहि देशांत पहा, भाषा, जाति, वंश, धर्म, धंदे इत्यादि कारणपरत्वें त्यांच्यांत (तेथील प्रजेंत) अनेक भेद झालेले असतात. आज जगांत असें एकहि राष्ट्र नाहीं कीं ज्यांत वरील कारणांनीं भेद पडलेले नाहींत. परंतु विचारशील राष्ट्रांतील समजुतदार लोक अशा भेदभावांकडे लक्ष देत नाहींत. त्यांचा एकच विचार असतो आणि तो म्हणजे राष्ट्रहित. तेंच एक त्यांचें ध्येय असतें. हा लक्ष्यबिंदु ध्यानांत बाळगून ते ऐक्यानें राष्ट्रहिताच्या कामास— तें लक्ष्य साधण्याच्या उद्योगास लागतात. आपआपसांत झगडणाऱ्या जातीसुद्धां, त्यांच्या समग्र राष्ट्रावर आपत्ति येऊन पडली असतां आपसांतील वादविवाद, भांडणें, झगडे वगैरे विसरून जाऊन एक दुसऱ्यांशीं सख्य करून एकत्रित येतात आणि राष्ट्रीय आपत्तीशीं टक्कर देतात. परिणाम असा होतो कीं तें राष्ट्र आपत्तींतून निभावून जातें. या उलट ज्या राष्ट्रांतील लोक आपसांतील भेदभाव राष्ट्रीय आपत्तीचे प्रसंगींसुद्धां विसरूं शकत नाहींत, ते राष्ट्रीय हितासंबंधीं निष्काळजी रहातात. अर्थात ज्यांना राष्ट्रहितापेक्षां वैयक्तिक हेवेदावे हे अधिक महत्त्वाचे वाटतात आणि जे अशा क्षुद्र भेदभावांतून बाहेर येऊंच शकत नाहींत, ते स्वतःची उन्नति कधींहि करूं शकत नाहींत. भेदभाव असून सुद्धां जे एकतेचा अनुभव करूं शकतात आणि ऐक्य करण्यासाठीं तत्पर असतात तेच राष्ट्रहित साध्य करूं शकतात.

आपल्या भारतांतच भेदभावामुळें लोक विभक्त आहेत असें नव्हे तर अन्य देशांत अशीच स्थिति आहे. मग आपसांतील मतभेद वाढवून भेदभाव चालूं ठेवणें आणि अशा प्रकारें शत्रूंस सहाय्य करणें हें भारतीयांस उचित आहे काय ? भारतवासी एवढ्या महत्त्वाच्या गोष्टीचा विचार करूं शकत नाहींत काय ? ' प्रथम आपसांतील भेदभाव मिटवा ' असे जे मानभावीपणानें सांगतात त्यांनीं हें ध्यानीं धरावें कीं पृथ्वीच्या पाठीवर असा एकहि देश अस्तित्वांत नाहीं कीं जेथील समाजांत कोणत्याहि प्रकारच्या भेदभावाचें अस्तित्वच नव्हतें अथवा नाहीं. कोणत्याहि देशांत कोणत्याहि कालीं जी गोष्ट घडली नाहीं तीं या देशांतच कशी घडावी ? सर्व देशांत एक मात्र गोष्ट नक्की झालेली आहे आणि ती ही किं अशा भेदभावांस वाढूं न देणें. हें आमच्या देशांतहि घडूं शकेल. यासाठीं असाध्य तें साध्य करण्याच्या प्रयासांत न पडतां लोकांनीं स्वतःची व पर्यायानें आपल्या राष्ट्राची उन्नति साधण्याच्या कार्यास लागावें.

भारतांत तीन धर्म विद्यमान आहेत. आर्य (हिंदु), इस्लाम आणि ख्रिस्ती. जोपर्यंत हे तीन धर्म आहेत तोपर्यंत स्वराज्यासाठीं प्रयत्नच करूं नयेत अथवा या तीन धर्मांचा नाश होऊन त्याजागीं एखादा नवाच धर्म येईल तेव्हांच स्वराज्य प्राप्तीसाठीं

प्रयत्न करावा असें मानणें हें उघड अज्ञान आहे. हे तीन धर्म अस्तित्वांत असून सुद्धां भारतवासीयांनीं खेळीमेळीनें मातृभूमीच्या उपासनेसाठीं तत्पर राहिलें पाहिजे. हे तीनहि धर्म एकदम नष्ट होणें तर अशक्यच आहे. हे धर्म भिन्न असले तरी प्रत्येकानें स्वतःचा '**राष्ट्रधर्म**' पाळण्यास झटलें पाहिजे. जातिभेद, वर्णभेद, भाषाभेद इत्यादि अनेकानेक भेदाभेद तर रहाणारच. कदाचित् हे भेदभाव एके दिवशीं नष्ट होतील असा आशावाद बाळगला तरी त्यांत एवढा काल निघून जाईल कीं तो पावेतों आपल्या राष्ट्रास दुसऱ्या राष्ट्रांपासून अलग ठेवण्यांत महान् हानि होणार आहे; म्हणून प्रत्येक मनुष्यानें, राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीनें हें शिकावयास पाहिजे कीं खेळीमेळीनें एकाच घरांत रहाणाऱ्या कुटुंबीजनांप्रमाणें, बंधुभावानें, ऐक्यानें रहावयास लागलें पाहिजे. या मंत्राचा असाच उपदेश आहे आणि तो प्रत्येक राष्ट्रभक्तानें ध्यानीं आणावा. आतां पुढील मंत्र पहा—

असंबाधं बध्यतो मानवानां यस्या उद्वतः प्रवतः समं बहु । नानावीर्या औषधीर्या बिभर्ति पृथिवी नः प्रथतां राध्यतां नः ॥ (अथर्व. १२।१।२)

' ज्या मातृभूमीच्या मनुष्यांमध्यें उच्च, मध्यम, कनिष्ठ अशा संबंधींचा (**अ-संबाधं**) पुष्कळच निर्वैरता आहे, म्हणजे कोणतेहि झगडे नाहींत आणि जी अनेक गुणसंपन्न औषधि उत्पन्न करणारी आमची मातृभूमि आहे ती आमची (**प्रथतां**) कीर्ति आणि ख्याती वाढवो. '

हा मंत्र विषमता असतांहि राष्ट्रहित कसें साधावें तें दाखवितो. समजा कीं मनुष्यांतील बाह्य (धर्म, भाषा, जातीभेद या संबंधींच्या) भेदभावांचें समूळ निर्मूलन झालें तरी शरीर, मन, इंद्रियें, बुद्धि, तसेंच आत्म्याच्या शक्तींच्या न्यूनाधिक्यामुळें त्यांच्यांत जो उच्च-नीच भाव निर्माण होतो त्यामुळें उत्पन्न होणारे भेद हे कायम रहाणारच. हें स्वाभाविक आहे. म्हणजे सर्व मनुष्यें एकसारखीं, सारख्या योग्यतेचीं होणें हें केवळ असंभवनीय आहे. म्हणून अशी असमानता असूनसुद्धां तिच्याकडे दुर्लक्ष करून, सर्व मनुष्यमात्र एकच आहेत असें समजून सर्वांच्या उत्कर्षासाठीं प्रयत्न व्हावयास हवेत.

या मंत्रांत '**अ-सं-बाधं**' शब्द आहे. तो अति महत्त्वाचा आहे. गौण भेदांस जर प्राधान्य दिलें तर एक समाजांतील माणसें दुसऱ्या समाजांतील माणसांशीं वैर करूं लागतील आणि त्याचा परिणाम एक समाज दुसऱ्याचा विरोधक होण्यांत होईल. असें झाल्यानें जाती-जातींत '**संबाध**' उत्पन्न होईल. या शब्दानें जाती-जातींतील वादविवाद, विरोध, झगडे इत्यादि उल्लेखिले आहेत. परस्पर एक दुसऱ्यांस विरोध आणि हरकती यांचेंच नांव ' संबाध.' संबाधाचा आणखी एक अर्थ आहे अंतःकलह, आंतर्युद्ध. जेव्हां असें युद्ध सुरू होतें तेव्हां राष्ट्राची शक्ति क्षीण होते. जेव्हां एक समाज दुसऱ्या समाजास विरोधी होतो, जेव्हां एक जात दुसऱ्या जातीस त्रास देऊं लागते, तेव्हां राष्ट्र क्षीण होते. म्हणूनच राष्ट्र हितैक्यबुद्धीनें जातीजातींत, सर्व समाजांत एकता असली पाहिजे. ही गोष्ट स्पष्ट करण्यास पुढील मंत्रांत म्हटलें आहे की—

' यस्या मानवानां बध्यतः बहु असंबाधम् । '

' ज्या मातृभूमीच्या मनुष्यांत अत्यंत निर्वैर भाव असेल ' तीच मातृभूमि स्वतःच्या सत्पुत्रांना उत्तम धन देऊं शकते, परंतु ज्या भूमींतील लोक आपसांत वैरभाव ठेवतात तेथील जनता अर्धपोटी असते. कोणी उच्च कोटीचा, कोणी ज्ञानी, कोणी अज्ञानी, कोणी शरीरानें हृष्टपुष्ट असेल, ते सर्व वैयक्तिक कसेहि असोत, त्यांनीं एकच ध्येय आपणांसमोर ठेविलें पाहिजे, तें असें कीं जें कांहीं करावयाचें तें मातृभूमीच्या हितासाठीं. आपल्या गुणाधिक्याच्या जोरावर त्यांनीं निर्गुणी मनुष्यांस दाबांत ठेवूं नये. कोणी तोतरा असेल, कोणी मितभाषी असेल तर कोणी वाचाळ असेल, तर त्या सर्वांनीं आपआपसांत कलह न माजवितां सर्वांच्या शक्ति एकवटून मातृभूमीच्या वेदीवर तिचें बलिदान करावें. तरच राष्ट्राची उन्नति होईल. मनुष्यांत जें (**उद्वतः**) उच्च (**समं**) सम आणि (**प्रवतः**) नीच असे भेदभाव आहेत ते कांहीं एक दुसऱ्याचा घात करण्यासाठीं नाहींत. एक मनुष्य एका बाबतींत श्रेष्ठ असला तर तो दुसऱ्या बाबतींत कनिष्ठ असेल. महाविद्वान् मनुष्य ज्ञानाच्या बाबतींत अत्यंत श्रेष्ठ असला तर शारीरिक शक्तींत तो कनिष्ठ प्रतीचा असेल; कोणी शक्तिशाली पहिलवान असला तर तो ज्ञानाच्या बाबतींत कमी पडेल हें संभवनीय आहे. परंतु मातृभूमीस तर दोघांचीहि सारखीच जरूरी आहे. ज्ञानी मनुष्यानें स्वतःच्या ज्ञानाच्या योगानें अथवा पहिलवानानें स्वतःच्या शक्तीच्या घमेंडींत एक दुसऱ्याचें डोकें न फोडतां, दोघांनीं मिळून आपल्या देशाच्या शत्रूंस दूर करून स्वतःचा व मातृभूमीचा उत्कर्ष साधला पाहिजे.

मानवांचें हें कर्तव्य आहे कीं त्यांच्यांत अनेक भेदभाव आहेत तरी सुद्धां अभेद भावानें त्यांतून मार्ग काढला पाहिजे. मनन करण्यास समर्थ आहे त्यास मानव म्हणतात. मनन करणारी व्यक्ति वाद निर्माण करीत नाहीं; उलट विचार विनिमय करून संघर्ष (वाद) कमी करून उन्नतीच्या मार्गानें प्रगति साधते. जो स्वतःच्या परिस्थितीचा विचार करीत नाहीं आणि स्वतःच्या उन्नतिसाठीं प्रयत्नही करीत नाहीं, उलट आपआपसांत कलह व

भांडणें वाढवितो, तो द्विपाद मनुष्य असला तरी त्यास मनुष्य म्हणणें योग्य नाहीं.

या मंत्राचा उपदेश आमच्या वर्तमान परिस्थितींत फार उत्तम रीतीनें उपयोगी पडूं शकेल असा आहे. वरील मंत्र वाचले असतां हें ध्यानीं येतें कीं या वैदिक राष्ट्रगीताच्या योगानें देशवासीयांत ऐक्याची वृद्धि होण्यासाठीं जें कांहीं सांगावयाचें तें सांगितलें गेलें आहे. आतां त्याचा उपयोग करणें न करणें आमच्या मर्जीवर आहे; आणि जर आम्हीं त्यापासून लाभ करून घेतला नाहीं तर त्यांत धर्मग्रंथांचा काय दोष ? दोष आहे अनुयायांचा. उपदेश वाचल्यानंतर प्रत्येकानें विचार केला पाहिजे की आपल्या मातृभूमीशीं पुत्र म्हणून आपला संबंध कसा काय आहे ? हा संबंध जाणून घेऊन तो त्यानें सदैव आपल्या मनांत जागृत ठेवला पाहिजे, आतां खालील मंत्र पहा–

त्वज्जातास्त्वयि चरन्ति मर्त्यास्त्वं बिभर्षि द्विपदस्त्वं चतुष्पदः। तवेमे पृथिवि पंच मानवा येभ्यो ज्योतिरमृतं मर्त्येभ्य उद्यन्त्सूर्यो रश्मिभिरातनोति ॥ १५ ॥

' हे मातृभूमे ! तुजपासून उत्पन्न झालेले आम्ही सर्व मानव तुजवरच चारी दिशांस सर्वत्र फिरतों आहोंत. तूंच द्विपाद आणि चतुष्पादांचें पोषण करतेस. आम्ही पांचीं प्रकारचीं मनुष्यें तुझींच आहोंत. प्रतिदिवशीं उगवणारा सूर्य स्वतःच्या किरणांनीं आम्हां मानवांना तेज आणि अमृत देतो. '

या मंत्रांत सर्वांत प्रथम हेंच सांगितलें आहे कीं, ' आम्हीं मनुष्य भूमातेपासून (**त्वत्-जाताः**) उत्पन्न झालों आहोंत, तुजवरच हिंडतों फिरतों आहोंत. ' हा भाव अगदीं स्पष्ट आणि असंदिग्ध आहे. प्रत्येक राष्ट्रभक्त हाच भाव स्वतःच्या अंतःकरणांत सांभाळून ठेवतो. जर हा भाव त्याच्या मनांत नसला तर त्यानें तो मनांत कायम ठेवला पाहिजे, तरच तो राष्ट्रीय उन्नतीचें योग्य कार्य करूं शकेल. मातृभूमि ही कांहीं आमची काल्पनिक किंवा अलंकारिक माता नव्हे तर ती वास्तविक माता आहे. हा अनुभव जितका आपल्या अंतःकरणांत जिवंत राहील तितका मनुष्य दृढपणें मातृभूमीची सेवा करील.

जर वाचक नीट विचार करतील तर त्यांच्या ध्यानीं येईल कीं आपल्या देशांत जातिजातींत जीं भांडणें आहेत त्यांचें कारण, ते सर्व एकच मातृभूमीचे पुत्र आहेत, हें त्यांस कळत नाहीं हें आहे. लोक स्वतःच्या सांप्रदायच्या हिताकडेच फक्त पहातात. परंतु सर्वांचा एकत्रित संमिश्र असा एक राष्ट्रधर्म आहे, त्याचें पालन तर कोणीच करीत नाहीं. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं सर्वांस एका राष्ट्रधर्माचें बंधन रहात नाहीं. प्रत्येकास स्वतःचा संप्रदायच अधिक प्रिय असतो. समग्र राष्ट्रधर्मपालनाची काळजी कोणासच नाहीं. असे घातक विचार कोणत्याहि देशांतील कोणत्याहि जातीनें ठेवतां कामा नयेत. या मंत्रांत स्पष्ट शब्दांत, '**आम्ही सर्व मातृभूमीचींच बालकें आहोंत.**' हें स्पष्ट सांगितलें आहे. वाचक जर या अनुपम मंत्राचा विचार करतील तर त्यांना लागलीच समजेल कीं आंतरिक कलह आणि भेदभाव दूर करण्यास हें उत्कृष्ट रसायन आहे. मनुष्यें कोणत्याहि धर्माचीं वा संप्रदायाचीं असोत, अथवा त्यांच्यांत जाती अथवा वर्णपरत्वें कितीहि भेद असोत, तरीसुद्धां जर ते एक राष्ट्रधर्मानें बांधलेले असतील तर त्यांच्यांत आपआपसांत वैरभाव कधींच उत्पन्न होणार नाहींत.

आमची मातृभूमि आम्हां द्विपादांचें आणि अन्य चतुष्पादांचेंहि उत्तम प्रकारें पोषण करते. हें म्हणणें कदाचित् स्वार्थी दृष्टीचें वाटेल. पण एवढें खरें कीं प्रत्येकानें स्वहृदयांत मातृभूमीविषयीं दृढ भक्ति बाळगावी आणि तिच्या रक्षणासाठीं सदैव तयार असावें. आपण आपल्या घराचें, शेतीवाडीचें रक्षण करतों, कारण तसें करण्यानें आपलें हितच होणार आहे. आमचें हित मातृभूमीमुळेंहि होतें, कारण तीच मातृभूमि, मनुष्यें, पशु–पक्षी इत्यादिकांस अन्न, जल, वगैरे देऊन त्यांचें रक्षण करते. जर मातृभूमीचें आम्हीं रक्षण करणार नाहीं तर ती दुसऱ्या कोणाच्या तरी ताब्यांत जाईल आणि त्यामुळें आम्ही मोठ्या अडचणींत सांपडूं. कदाचित् आम्हांस उपाशी मरण्याचीहि वेळ येईल.

हल्लीं भारतवासीयांची अशीच स्थिति आहे. त्यांनीं योग्यवेळीं मातृभूमीची सेवा केली नाहीं, त्या कारणानें आज त्यांस कष्ट पडत आहेत. आज स्वातंत्र्यप्राप्तीनंतरहि आम्हीं आपसांतील भांडणें विसरत नाहीं. तसेंच एकजुटीनें मातृभूमीची सेवा करण्यास तयार होत नाहीं. ज्याकाळीं ज्या चुका झाल्या त्या झाल्या. त्या विषयीं आतां कोणी कांहीं कितीहि म्हटलें तरी त्यांत बदल होणार नाहीं, परंतु त्या चुकांचे परिणाम भोगीत असतां जर त्यापासून योग्य बोध आम्हीं घेतला नाहीं, आणि तशा चुका पुनः पुनः करीत राहिलों, आपसांतील मतभेद, वाद, भांडणें तशींच चालू ठेवलीं अथवा वाढवित राहिलों तर भयंकर आपत्ति भविष्यकाळीं उत्पन्न होतील. भारतवासी याचा विचार करतील काय ?

मनांत असा विचार त्यांनीं बाळगूं नये कीं ' हे मातृभूमि ! आम्हीं तुझीं बालकें नाहीं, आम्हीं तर असेंच समजतों कीं आम्हीं निरनिराळ्या पंथांचे आहोंत.' असें जर ते मानतील तर तेवढी भयंकर चूक दुसरी कोणतीहि होणार नाहीं. सर्वांत प्रथम विचार आपण आपल्या राष्ट्राचीं मुलें आहोंत, हा मनांत ठेवावा. त्यानंतर आप-

त्या संप्रदायाचा विचार करावा. अशा प्रकारचा दृढ विचार प्रत्येक मनुष्यानें बाळगणें उचित होय. जर प्रत्येक मनुष्य याप्रमाणें विचार आणि वर्तन न ठेवील तर राष्ट्रहानी टाळतां येणार नाहीं. यावरून वाचकांस समजेल कीं अथर्ववेदाच्या या वैदिक राष्ट्रगीताच्या प्रत्येक मंत्रांत केवढा महत्त्वाचा उपदेश केला आहे. आमच्या वर्तमान परिस्थितींत हें अमूल्य उपदेशरूपी रत्नच आमचें पुनरुत्थान करूं शकेल. एवढेंच नाहीं तर आमच्या राष्ट्राची, यश व कीर्ति चारी दिशांस फैलावूं शकेल. प्रिय वाचक हो ! या दृष्टिबिन्दूनें सदर मंत्रांचा विचार करा आणि हा उपदेश आचरणांत आणण्याचा प्रयत्न करा.

आतां पावेतों मातृभूमीच्या वैदिक गीतांतील सामान्य बाबीच दाखविण्यांत आल्या, आणि लोकांत भिन्नता असली तरी एकतेची साधना कशी करावी आणि सर्वांनीं एकजूटीनें कशा-प्रकारें तयार असलें पाहिजे हेंहि सांगण्यांत आलें. यापूर्वीच्या विवेचनावरून वाचकांच्या ध्यानीं आलें असेल कीं या वैदिक राष्ट्र-गीतांत राष्ट्राच्या उन्नतीच्या उच्चतम तत्त्वांचा जितका समावेश केला आहे तितका तो दुसऱ्या कोणत्याहि देशाच्या राष्ट्रगीतांत नाहीं. असें असलें तरी या राष्ट्रगीताचा दुसऱ्या अनेक दृष्टि-कोनांतून विचार होणें आवश्यक आहे.

जनतेंत मातृभूमीविषयीं प्रेम उत्पन्न व्हावयास पाहिजे. हें प्रेम जर देशांतील नगरें, पर्वत, नद्या, जंगलें यांच्याविषयीं आदर असला तरच उत्पन्न होईल. असा आदरभाव दुसऱ्या कांहीं विशेष महत्त्वाच्या कारणांनेंहि उत्पन्न होऊं शकतो. आपण जर कोणांस म्हटलें कीं या स्थलाबद्दल आदर दाखवा तर असा आदर कोणी दाखवणार नाहीं. कोणत्याहि स्थळाविषयीं आदर जर त्या स्थळाचा कांहीं महत्त्वाच्या पुण्यकारक घटनेशीं संबंध असला अथवा कोण्या महात्म्याचा त्या स्थळाशीं संबंध असला अथवा अन्य कांहीं घटना त्या स्थळाशीं संबंधित असली तरच होतो. म्हणून आपण या वैदिक राष्ट्रगीतांत अशा प्रकारची सूचना आपणांस कशी काय दिली आहे तें पाहूं–

देवतांनीं वसविलेलीं स्थानें

यस्याः पुरो देवकृताः क्षेत्रे यस्या विकुर्वते ।
प्रजापतिः पृथिवीं विश्वगर्भामाशामाशां रण्यां नः कृणोतु । (अथर्व. १२।१।४३)

' आमच्या मातृभूमीचीं नगरें देवांनीं वसविलेलीं आहेत; आणि जिच्या क्षेत्रांत सर्व मनुष्यें विविध कार्यें करीत आहेत, त्या सर्व पदार्थांस स्वतःच्या गर्भांत धारण करणाऱ्या मातृभूमीस परमेश्वर सर्व दिशांस आमच्यासाठीं रमणीय करो. '

आतां यांतील (**यस्या देवकृतः पुरः**) ' जिचीं नगरें देवांनीं वसविलीं आहेत ' हा भाग पाहूं. जनतेस असा विश्वास असला पाहिजे कीं आमचीं नगरें देवांनीं वसविलीं आहेत म्हणजे देवांचा त्या नगरांशीं संबंध आहे; देवांचें दिव्यत्व आमचीं नगरें दाखवतात. अशा प्रकारचा जिवंत विश्वास जर जनतेच्या हृदयांत स्थिर होईल तर स्वतःच्या देशाविषयीं जागृति त्यांच्या मनांत उत्पन्न होईलच.

इतिहासांत भारतभूमीच्या निरनिराळ्या नगरांचा देवांशीं संबंध असल्याचे उल्लेख आहेत. भगवान् रामचंद्रांचा संबंध अयोध्या, पंचवटी, रामेश्वर या स्थळांशीं आहे. कृष्णाचा संबंध गोकुळ, वृंदावन, मथुरा, द्वारका इत्यादि स्थळांशीं आहे. इंद्राचा संबंध इंद्रप्रस्थाशीं आहे. याप्रमाणें अनेक नगरांचा संबंध अनेक देवतांशीं आहे हें आपल्या देशांतील आबालवृद्धांस माहीत आहे. तसेंच, नदी–तलाव, सरोवरें, पर्वतशिखरें, गुहा वगैरे स्थळांचे संबंध देव-देवतांशीं आहेत. हीं वर्णनें ग्रंथांतरीं आहेत आणि कथापुराणां-च्या द्वारें तीं स्त्री–पुरुषांस ज्ञात आहेत. गौरीशंकर आणि कैलास शिखरांचा संबंध प्रत्यक्ष भगवान् शंकराशीं आहे. बद्रिकेदार आश्रमाचा संबंध नर–नारायण ऋषि–मुनींशीं आहे. मातृभूमी-विषयक भक्ति दृढ होण्यास हे संबंध देशांतील सर्व स्त्री–पुरुषांस माहित असणें अगत्याचें आहे.

कित्येक बुद्धिवादी सुशिक्षित म्हणतील कीं, ' अशी अंधश्रद्धा काय कामाची ? अगदीं व्यवहारी दृष्टीनेंहि मातृभूमीविषयीं भक्ति उत्पन्न होऊं शकते. ' ही गोष्ट अगदीं सत्य आहे. परंतु व्याव-हारिक लाभाबरोबरच जर लोकांच्या हृदयांत वरील संबंध दृढ झाले तर त्यापासून कांहीं नुकसान होणार नाहींच. मुलाला आई-विषयीं प्रेम वाटतें तें केवळ ती सुंदर आहे अथवा त्याला पाजते एवढ्याकरतांच कांहीं नाहीं. तर ' **मातृदेवो भव** ' या वचना-नुसार ती एक देवता आहे म्हणून. मातेविषयीं मुलांना या दिव्य-भावनेनें प्रेम वाटतें. बालकाचें मातेविषयीं आणि मातेचें बालका-विषयीं प्रेम अगदीं अकृत्रिम व शुद्ध असतें. कांहीं मोबदल्याच्या आशेशिवाय केलें जातें तेंच प्रेम दिव्य होय. तेंच निरपेक्ष आणि अकृत्रिम प्रेम असतें, त्यामुळेंच मातृप्रेम हें व्यावाहारिक प्रेम नाहीं. मातृभूमीविषयींचें प्रेमही याप्रमाणेंच अकृत्रिम, निस्सीम, आत्यंतिक आणि दिव्य असलें पाहिजे. असें अकृत्रिम प्रेम निर्माण करण्या-साठींच वरील मंत्रांत आपल्या देशांतील नगरांचा संबंध देवांशीं असल्याचें वर्णिलें आहे. ही गोष्ट सर्वांच्या ध्यानीं राहिली पाहिजे आणि त्यांनीं असाच विचार केला पाहिजे कीं आमचीं नगरें देवांनीं वसविलीं आहेत.

जर कांहीं ज्ञानी लोक आर्थिक अथवा व्यावहारिक दृष्टीनें मातृ-

भूमीची भक्ति करीत असतील तर ते भले तसें करोत. तसें करण्यास त्यांना कोणी अडविणार नाहीं; पण सामान्य जनता इतक्या उच्च कोटीच्या ज्ञानाची नसते, म्हणून सामान्य जनसमुदायांत मातृभूमीविषयीं विशेष प्रेम उत्पन्न होण्यास सर्वांस हें माहित असणें आवश्यक आहे कीं आमच्या देशांतील स्थानांचा संबंध देवदेवता आणि ऋषिमुनींशीं जोडलेला आहे.

प्रतापगड आणि सिंहगडाशीं शिवाजी महाराजांचा संबंध आहे आणि उदेपुराशीं राणा प्रतापसिंहांचा संबंध आहे, महाराणी लक्ष्मीबाईचा संबंध झांशीशीं आणि गड मंडाळाशीं राणी दुर्गावतीचा संबंध आहे, तसेंच परळीशीं रामदास स्वामींचा संबंध आहे. अशाप्रकारें भिन्न भिन्न इतिहासप्रसिद्ध स्थलांचा ऐतिहासिक व्यक्तींशीं असलेला संबंध प्रत्येक व्यक्तीस माहित असणें अत्यावश्यक आहे. सिंहगड अथवा शिवाजीशीं संबंधित अन्य कोणत्याहि स्थानाचा अथवा दुसऱ्या कोणत्याहि ऐतिहासिक स्थलाचा, वस्तूचा अथवा व्यक्तीचा जर कोणी भंग अथवा अपमान करील तर त्या दुष्ट कृत्यामुळें संपूर्ण भारताच्या हृदयास आघात झाला पाहिजे, संपूर्ण भारतानें त्या दुष्ट कृत्याचा बदला घेण्यास तयार झालें पाहिजे. यांतच राष्ट्रीय उन्नतीचें बीज आहे.

यासाठींच परकीय सरकार जेव्हां इतर राष्ट्रांवर अथवा देशावर आपला अंमल प्रस्थापित करतें तेव्हां त्या देशाच्या ऐतिहासिक प्रसिद्ध स्थळांना लोकांच्या स्मृतींतून पुसून टाकण्याची प्रथम दक्षता घेतें. आणि हें कार्य इतक्या बेमालूमपणें केलें जातें कीं लोकांना त्या स्थळांची माहिती सहजासहजीं होऊं नये याविषयीं फार काळजी घेण्यांत येते. त्याचें मर्म हेंच आहे. मुसलमानांनीं प्रयागचें नांव अलाहाबाद, सहस्रतीर्थाचें नांव इस्लामाबाद, कर्णावतीचें अहमदाबाद आणि भागानगराचें हैद्राबाद, मार्तंडचें मटन झालें, बाबा महार्षिचें मोईदिनसिं असें बनविलें आणि श्रीशंकराचार्यांच्या स्थळाला तख्त-ई-सुलेमान बनविलें आणि यांप्रमाणें हजारों शहरांचीं आणि स्थळांचीं नांवें बदलून टाकलीं. त्यांतील रहस्य आम्हीं वर सांगितलेंच आहे.

जेव्हां इंग्रजांचें राज्य आलें तेव्हां त्यांनीं गौरीशंकरास एव्हरेस्ट केलें, गंगेस गँजीस, मथुरेस मुट्रा आणि सिमला महाबळेश्वरादिकांचें आणि इतर अन्य स्थळांचें असेंच इंग्रजीकरण केलें.

मुसलमानांनीं मंदिरांचा आणि मूर्तींचा नाश केला आणि जबरदस्तीनें लोकांस बाटवून स्वतःच्या-मुसलमानी धर्मांत सामील करून घेतलें. आतां ख्रिश्चनधर्मी लोक इतर धर्मीयांच्या सेवेच्या नांवाखालीं धर्मांतर करीत आहेत. बहुंशीं हे लोक आमच्या पवित्र तीर्थ स्थळांत अथवा देवस्थानांत राहून त्या स्थळांची निंदा करतात. त्याचें कारण हेंच कीं तेणेंकरून आमचा आमच्या देशाच्या उत्तम स्थळांचा अभिमान नष्ट व्हावा.

विजेते मग ते मुसलमान असोत, इंग्रज असोत, जपानी असोत अथवा अन्य कोणी असोत त्या सर्वांचा स्वभावधर्म एकच असावयाचा. जित लोकांच्या मनांतील मातृभूमिविषयक प्रेम अथवा भक्ति पुसून टाकण्याचे प्रयत्न करण्यास ते विसरत नाहींत अथवा मागें सरत नाहींत. यासाठीं मातृभूमीचें प्रेम आणि भक्ति उत्पन्न होण्यासाठीं आपल्या देशांतील देवस्थानांचा आणि तीर्थस्थानांचा गौरवशाली इतिहास जनतेच्या हृदयांत सदैव जागृत राहण्यासाठीं प्रयत्न व्हावयास हवेत. जोंपर्यंत मातृभूमीविषयीं प्रेम जनतेच्या हृदयांत जागृत आहे तोंपर्यंत जेत्यांचा पाय या देशांत कधींहि स्थिर होणार नाहीं. हा नियम सार्वत्रिक असल्यानें सर्व विजयी लोक जिंकलेल्या आणि पादाक्रांत प्रजेच्या मातृभूमीच्या आदर आणि प्रेमाच्या सर्व चिन्हांचा नाश जलद व्हावा असे प्रयत्न करतात. जगाच्या इतिहासावलोकनानें वाचकांस ही गोष्ट सिद्ध करण्यासारखे अनेक दृष्टांत स्पष्टपणें सांपडतील. असे दृष्टांत पाहिल्यानेंच त्यांना वरील मंत्राच्या उपदेशांतील रहस्य कळणार आहे.

जनतेस कळलें पाहिजे कीं आमचीं नगरें देवांनीं वसविलीं आहेत. आमच्या पूर्वजांचीं तीं गौरवस्थानें आज स्मरलीं पाहिजेत. मोठमोठ्या महात्म्यांचे चरणरज त्यास्थळीं पडले आहेत आणि त्यामुळें तीं स्थळें तारक आणि पवित्र बनलीं आहेत. ही गोष्ट अगदीं स्वाभाविक आहे. वेदमंत्रांनीं वरील राष्ट्रगीताच्या द्वारें या गोष्टीचा आपणांस उत्तम परिचय करून दिला आहे; म्हणून वाचक या मंत्राचा जेवढा अधिक विचार करतील तितका तो अधिक लाभदायक होईल.

वरील मंत्रांत आणखीहि कांहीं ध्यानांत ठेवण्यासारख्या गोष्टी आहेत. (१) लोकांनीं आपआपल्या कार्यक्षेत्रांत लक्षपूर्वक काम करावें आणि (२) देशवासीयांस आपल्या देशाच्या सर्व बाजू रमणीय वाटाव्या. आज आपल्या देशाच्या सर्व बाजू आपणांस रमणीय वाटतात त्याचें कारण आपली स्वतंत्रता आहे. स्वतंत्र लोकांस सर्व दिशा रमणीय वाटतात. 'सर्व दिशा आम्हांस रमणीय वाटतात' असें म्हणणें हें 'आम्हीं स्वतंत्र आहोंत हें म्हणण्यासारखें आहे.' पराधीनतेमुळें आपण पश्चिमेस आफ्रिकेंत, दक्षिणेस ऑस्ट्रेलियांत तसेंच अमेरिका व इतर देशांत गेलों तर आज आपणांस राहण्यास स्थान सुद्धां मिळूं शकत नाहीं; तर ते देश आपणांस रमणीय कसे वाटतील? स्वतंत्र देशांतील लोकांची स्थिति अशी असत नाहीं. स्वतंत्र देशांतील लोक जेथें जातात तेथें त्यांच्यासाठीं सुंदर रमणीय स्थळें तयार असतात. स्वातंत्र्य आणि पारतंत्र्यातील हा भेद लक्षांत ठेवला पाहिजे.

देशांतील नगरांविषयीं स्वत्वाचा भाव असण्याचें जें महत्त्व वरील मंत्रांत दाखविलें आहे तें किती महत्त्वाचें आहे, तें आपल्या देशांतील जनपरिस्थितीवरून सहज ध्यानीं येईल. आज जे सात कोटी भारतीय मुसलमान आहेत त्यांतील जवळजवळ नव्वद टक्के मूळचे हिंदूच आहेत. परंतु धर्मांतर केल्याच्या कारणानें ते हिंदूंतून कमी झाले. त्यामुळें काशीरामेश्वराबद्दल त्यांना स्वत्वभाव नाहीं. त्यांनीं परदेशांतील मक्का-मदीनेशीं संबंध जोडला आहे; त्यामुळें भारतदेश त्यांस मातृभूमि वाटत नाहीं. वाचकांच्या ध्यानीं यावें कीं राष्ट्रीय उन्नतीच्या दृष्टीनें हें आपल्या देशाचें केवढें नुकसान झालें आहे. धर्मांतराच्या बाबतींत जर प्राचीन हिंदूंनीं आपली नीति योग्य ठेवली असती तर आज अशी दशा आली नसती. या वर्तमान परिस्थितीस ध्यानीं ठेऊन उक्त मंत्राचा विचार केला पाहिजे तरच त्या मंत्राचें महत्त्व आणि त्यांतील अमूल्य उपदेशाचें रहस्य बरोबर समजेल.

ऋषींचें ऋण

यस्यां पूर्वे भूतकृत ऋषयो गा उदानृचुः ।
सप्त सत्रेण वेधसो यज्ञेन तपसा सह ॥ ३९ ॥

' ज्या मातृभूमींत पूर्वीच्या ज्ञानी व देशाचा भूतकाल उज्ज्वल करणाऱ्या ऋषींनीं सत्र, यज्ञ आणि तप करून सप्त (**गाः**) भूमींचा उद्धार केला ' ती आमची मातृभूमि श्रेष्ठ आहे.

(**भूतकृतः ऋषयः**) आमच्या देशाचा भूतकालीन इतिहास करणारे तपस्वी ऋषी होते. देशवासी जर याचा विचार करतील तर त्यांस प्राचीन काळच्या दिव्य समयाचा निश्चय होईल. पूर्व काळच्या भव्य दिव्यत्वाचा अशा प्रकारें निश्चय झाल्यानें भविष्य काळहि तसाच उज्ज्वल व्हावा अशी त्यांस स्वाभाविक इच्छा होईल आणि ते त्याप्रमाणें प्रयत्न करतील. कोणा एका कवीनें म्हटलें आहे, ' पूर्व दिव्य ज्यांचें त्यांना रम्य भावी काळ. '

आमचे प्राचीन पूर्वज ज्यांनीं महान् कार्यें केल्याचीं उदाहरणें इतिहासांत आहेत ते अत्यंत महान् तपस्वी होते. आमचा इतिहास रानटी लोकांच्या कर्तव्यहीनतेनें मलिन झालेला नाहीं; परंतु महान् ऋषींच्या प्रशस्ततम कार्यांनीं उज्ज्वल झालेला आहे. हा विचार किती उत्साहप्रेरक आणि उत्तेजक आहे. आमच्या मातृभूमींतील -राष्ट्रांतील सर्व लोकांचें एकमत व्हावें आणि ते सर्व लोक राष्ट्रभूमीसंबंधीं प्रेम दर्शवूं लागावेत, असें होणें आवश्यक आहे. त्यामुळें वरील भावना मनांत स्थिर होईल. आमच्या या कल्पनेविषयीं भारतांत दुमत असणें शक्यच नाहीं.

ज्यांनीं धर्मांतर केलें आहे तेसुद्धां आपलेच आहेत. तेसुद्धां त्याच प्राचीन ऋषींचे वंशज असतां केवळ धर्मांतराच्याकारणानें त्यांच्यांतील त्यांच्या स्वतःच्या प्राचीन दैदिप्यमान इतिहासाविषयींचा त्यांचा अभिमान नष्ट झाला आहे. त्यासाठीं त्यांची गोष्ट बाजूस ठेवली तरीसुद्धां वरील सिद्धांत कोणास नाकारतां येणार नाहीं.

वरील विवेचनावरून हें ध्यानीं यावें कीं मातृभूमीचें वैदिक राष्ट्रगीत किती निरनिराळया दृष्टींनीं वाचकांच्या मनांत स्वतःच्या मातृभूमीविषयींच्या सन्मानाची वृद्धि करीत आहे. याप्रमाणें वाचकांच्या मनांत या अति प्राचीन राष्ट्रगीताविषयीं निःसंदेह आदर निर्माण होईल.

ऋषिमुनि सत्र आणि यज्ञाच्या योगानें राष्ट्राची उन्नति आणि राष्ट्रजागृति साधित असत. वर्तमान यज्ञपद्धतीवरून कोणत्याहि प्राचीन सत्र अथवा यज्ञाची कल्पना करणें अथवा येणें शक्य नाहीं. पूर्वकालीन सत्र अथवा यज्ञ आजच्या सारख्या लहान मंडपांत होऊं शकत नसत. त्यांच्या मंडपांचा विस्तार कित्येक मैलपर्यंत पसरलेला असे. ही एकच गोष्ट दर्शवील कीं प्राचीनकालीन यज्ञाचें स्वरूप भिन्न होतें. राष्ट्रीयतेचा विचार ऋषींच्या परिश्रमांच्या कारणानेंच जनतेंत प्रसार पावला; त्यामुळेंच वरील मंत्रांत ' **भूतकाळ बनविणारे ऋषि** ' अशा बिरुदावलीनें त्यांचा सन्मान केला आहे. त्यासंबंधीं निम्नलिखित अथर्ववेदीय मंत्र पहा—

भद्रमिच्छन्त ऋषयः स्वर्विदस्तपो दीक्षामुपनिषेदुरग्रे । ततो राष्ट्रं बलमोजश्च जातं तदस्मै देवा उपसंनमन्तु ॥(अथर्व. १९।४१।१)

' लोकांचें कल्याण करूं इच्छिणाऱ्या आत्मज्ञानी ऋषींनीं प्रारंभीं तप केलें, त्यामुळें राष्ट्रांत बळ आणि ओज उत्पन्न झालें. म्हणून देवांनीं त्यांस नमन केलें पाहिजे. '

या मंत्रांत ऋषींच्या प्रयत्नांनीं राष्ट्रीयतेची कल्पना कशा रीतीनें उत्पन्न झाली तें दाखविलें आहे. वाचक आतां समजूं शकतील कीं ' ऋषी भूतकाळ बनविणारे कसे होते ? ' राष्ट्रीय भावना हें आपलें ऋषिविषयक ऋण आहे. तें फेडण्याचा प्रयत्न प्रत्येक व्यक्तीनें केला पाहिजे. ऋषींनीं ज्याप्रमाणें राष्ट्र निर्माण करण्याचे प्रयत्न केले त्याप्रमाणें आपल्या इतर पूर्वजांनींहि प्रयत्न केले आहेत. त्यामुळें त्यांचेंसुद्धां स्मरण आपण करणें आवश्यक आहे. पुढील मंत्रांत पूर्वजांचें स्मरण आहे—

देवांचें ऋण

यस्यां पूर्वे पूर्वजना विचक्रिरे यस्यां देवा असुरानभ्यवर्तयन् । गवामश्वानां वयसश्च विष्ठा भगं वर्चः पृथिवी नो दधातु ॥ ५ ॥

' आमच्या मातृभूमींत आमच्या प्राचीन पूर्वजांनीं पराक्रम केले आणि जिच्यांत देवांनीं असुरांस पळवून लावलें, जी गायी, घोडे आणि पक्ष्यांस राहण्यास उत्तम स्थान देते ती आमची मातृभूमि आम्हांस ऐश्वर्य आणि तेज देवो. '

प्राचीनकाळीं या मातृभूमीसाठीं आमच्या पूर्वजांनीं मोठमोठीं पराक्रमाचीं कृत्यें केलीं. लढाया आणि चढाया केल्या, गनिमी-काव्याचीं युद्धें केलीं आणि खुल्या मैदानांतीलही युद्धें केलीं. अशीं कृत्यें करून त्यांनीं मातृभूमीचें यश उज्ज्वल राखलें. अशा त्या आमच्या मातृभूमीची आम्हीं आज काय दशा केली आहे बरें ! आमच्या पूर्वजांचा प्राचीन इतिहास आमच्या नजरेसमोर आहे. आज आमची वागणूक त्या इतिहासास शोभेशी आहे काय ? त्या समरविजयी पूर्वजांविषयीं थोडातरी अभिमान आम्हीं बाळ-गावयास पाहिजे ! त्यांच्या कीर्तीस साजेल असें कांहीं तरी कार्य आम्ही केलें पाहिजे ! वाचक हो ! विचार करा ! आमचें वैदिक राष्ट्रगीत काय म्हणतें तें जरा पहा तर खरें !

प्राचीनकाळीं देवांनीं राक्षसांस युद्धांत पराजित करून या देशां-तून पळवून लावून हा देश आमच्यासाठीं स्वतंत्र केला. त्याच देशास पराधीनतेचा कलंक आम्हींच लाविला होता ना ? वाचकां-नींच विचार करावा कीं हें वैदिक राष्ट्रगीत आम्हांस कोणत्या गोष्टींचें स्मरण करून देत आहे ? आमच्या पूर्वजांनीं असें केलें आणि तसें केलें हें खोट्या अभिमानानें नुसतें सांगण्यासाठीं नाहीं. हें सांगण्याचा उद्देश असा कीं आमच्या पूर्वजांच्या शौर्याच्या कथा ऐकून आम्हांस स्फूर्ति मिळावी आणि आम्हींहि कांहीं अशींच कार्यें करून दाखवावीत. आपण असें पहावें कीं या उद्देशाची पूर्ति आपण कितपत करूं शकतों ? ती पूर्ण करण्याचा आपण दृढ निश्चय करावा.

आमचें हें वैदिक राष्ट्रगीत आमच्या धर्मग्रंथांत लिहिलेलें आहे. असें राष्ट्रगीत दुसऱ्या देशांच्या धर्मग्रंथांत तर नाहींच, पण दुसऱ्या कोणत्या ग्रंथांतहि नाहीं. असें असूनहि आमच्या देशाचे लोक राष्ट्राच्या उन्नतिविषयीं बेपर्वा आहेत; आणि दुसऱ्या कित्येक देशांत लोक राष्ट्रहिताविषयीं किती दक्ष असतात ! ही दशा पाहून किती आश्चर्य वाटतें. आमचें वैदिक राष्ट्रगीत एवढें विस्तृत आहे कीं त्यांत उदात्त विचारांचे भरपूर दिव्यमंत्र आहेत. असें असून सुद्धां राष्ट्रीयतेची भावनाच आमच्या साहित्यग्रंथांत नाहीं, हा भाव आम्हांस अगदीं परकीय आहे असे विचार प्रदर्शित करणारे लोक सुद्धां आमच्यांत आहेत. अशी परिस्थिति जशी आहे तशीच आम्हीं जनतेपुढें ठेवीत आहों. ' जेथें पिकतें तेथें विकत नाहीं, ' अथवा ' दांत आहेत तेथें चणे नाहींत आणि चणे आहेत तेथें दांत नाहींत ' म्हणजे हिऱ्याची किंमत खाणींत होत नाहीं ती सराफी बाजारांतच केली पाहिजे.' या म्हणी अक्षरशः खऱ्या आहेत. आतां पुढें पहा—

यामश्विनावमिमातां विष्णुर्यस्यां विचक्रमे । इन्द्रो यां चक्र आत्मनेऽनमित्रां शचीपतिः ॥ सा नो भूमिर्विसृजतां माता पुत्राय मे पयः ॥१०॥

(अथर्व. १२।१)

' ज्या भूमीचें माप अश्विनीकुमारांनीं केलें, ज्या भूमींत भगवान् विष्णूंनीं पराक्रम केला, जिच्यांतून शक्तिसंपन्न इन्द्रानें स्वतःसाठीं शत्रु दूर केले, तीच आमची मातृभूमि ज्याप्रमाणें माता स्वतःच्या बालकास पाजते त्याप्रमाणें मला उपभोगाचे पदार्थ देवो. '

देवांनीं आपल्या मातृभूमीसाठीं काय काय केलें तें या मंत्रांत स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे. अश्विनीकुमारांनीं देशदेशां-तरींच्या शेतांचीं मापें घेतलीं, देशाच्या सीमा निश्चित केल्या, जमिनीची मापणी केली आणि अशा रीतीनें मातृभूमीची सेवा केली. भगवान् विष्णूनें केलेले पराक्रम सर्व विश्रुत आहेत. इन्द्रानें हजारों युद्धें केलीं आणि या मातृभूमीस शत्रूंच्या त्रासांतून मुक्त केलें. याप्रमाणें इतर देव-देवतांनींहि त्यांच्यानें होईल तशी मातृ-भूमीची सेवा केली. कोणींहि अंगचोरपणा केला नाहीं. देव आणि असुरांच्या युद्धांत देववीरांनीं या मातृभूमीच्या उद्धारासाठीं युद्धक्षेत्रात स्वतःचें बलिदानहि केलें, आणि या मातृभूमीस पूर्ण स्वातंत्र्याचें सौभाग्य प्राप्त करून दिलें. हेंच देवांचें व्रत आपण पुढें चालविलें पाहिजे. देवांनीं नक्की केलेला मार्गच आपण पुढें चालवूं. कारण देवतांनीं आणि आमच्या प्राचीन वीर पुरुषांनीं आमच्यासाठीं जें कांहीं केलें त्यांच्या ऋणांतून मुक्त होण्यास आम्हीं असें केलेंच पाहिजे.

ऋषिगण कोणते आणि देवता कोण आहेत हें तर स्पष्ट करण्यांत आलें आहेच. त्यांच्या ऋणांतून मुक्त होण्यास आपण प्रयत्नशील व्हावयास पाहिजे. प्रत्येकानें विचार केला पाहिजे कीं, ' मीं त्या ऋणांतून मुक्त व्हावें व त्यासाठीं मीं प्रयत्न

करीत आहे कीं नाहीं. ' या देवऋणासंबंधीं आणखी एक मंत्र पहाण्यासारखा आहे—

यां रक्षन्त्यस्वप्ना विश्वदानीं देवा भूमिं पृथिवी-मप्रमादम्। सा नो मधु प्रियं दुहामथो उक्षतु वर्चसा ॥ ७ ॥ (अथर्व. १२।१)

' देव ज्या मातृभूमीचें रक्षण कांहीं चूक केल्यावांचून आणि आळस टाकून करीत आले आहेत, ती मातृभूमि आम्हांस तेज आणि मधुर मध इत्यादि खाद्य पदार्थ देवो. '

(**अ-स्वप्नाः देवाः**) आळस न करणारे देव या भूमीचें रक्षण करीत आले आहेत. आळस न करणाऱ्या देवांसमक्ष आळशी, प्रमादप्रिय लोकांस उभे रहाण्यास लाज वाटली पाहिजे. आमच्यासाठीं ज्या देवांनीं अविश्रांत असे परिश्रम केले त्या त्यांच्या अत्यंत पवित्र कार्याच्या मोबदल्यांत आम्हीं त्यांस काय दिलें ? स्वातंत्र्य रक्षणाचें त्यांचें कार्य आम्हीं चालू ठेवलें आहे काय ? फार कशाला ? त्यांच्याप्रमाणें सदैव राष्ट्रोन्नतीचें कार्य चालूं ठेवण्याचा निश्चय तरी आम्हीं केला आहे काय ? वाचकांनीं हें ध्यानीं बाळगावें कीं असा विचार करण्याची वेळ नेहेमींच असते !

वरील मंत्रांत देव चुका केल्याशिवाय (**देवाः अप्रमादं रक्षन्ति**) रक्षण करतात असेंहि सांगितलें आहे. चुका केल्याशिवाय रक्षण केलें म्हणून तर देव बंधनांतून मुक्ति मिळवूं शकले. असुरांनीं देवांना गुलामगिरीच्या सांखळ्यांनीं जखडून ठेवण्याचे प्रयत्न अनेकवार केले. रावण, बळीराजा वगैरेंनीं प्रयत्नांत कमतरता केली नाहीं. परंतु अशा कठीण समयीं सुद्धां देवांनीं स्वतःच्या पुरुषार्थाची पराकाष्ठा करून स्वतःचें स्वातंत्र्य टिकविलें आणि असुरांस पळवून लाविलें. चुका न करतां दक्षतेनें कर्तव्य करण्याचें बाळकडू देवांनीं आम्हांस पाजिलें आहे. मग काय त्यांचा कित्ता आपण गिरवूं शकणार नाहीं ? आपण आपल्या हट्टामुळें पावलों पावलीं चुका करीत आहोंत ना ? वास्तविक राष्ट्रकार्यासाठीं आत्मसमर्पणास आपण सदैव तयार असलें पाहिजे. पण आत्मसमर्पणाची वेळ आली तर भिऊन पलायन करणारे वीर आमच्यांत कितीतरी निघतील. जर वाचक गंभीरपणें या गोष्टीचा विचार करील तर आपण काय करणें आवश्यक आहे हें त्याला सहज कळेल.

विद्वानांचें ऋण

ऋषींचें राष्ट्रकार्य आपण पाहिलें. देवांनीं आमच्यासाठीं काय केलें तेंहि आपण पाहिलें. आतां जे ऋषि नाहींत अशा मननशील बुद्धिमान् विद्वानांनीं कोणतीं कार्यें करून देशसेवा केली तें आपण पाहूं—

यार्णवेऽधि सलिलमग्र आसीद्यां मायाभिरन्वचरन्मनीषिणः। सा नो भूमिस्त्विषिं बलं राष्ट्रे दधातूत्तमे ॥ ८ ॥

' आमची मातृभूमि आरंभीं समुद्राखालीं होती, आणि जिची सेवा मननशील विद्वानांनीं अनेक प्रकारचीं कुशलतेचीं कार्यें करून केली, ती आमची मातृभूमि आमच्या उत्तम राष्ट्रांत तेज आणि बल धारण करो. '

या मंत्रांत '**यां मायाभिः अन्वचरन् मनीषिणः**' हा भाग प्रस्तुत लेखांत प्रतिपाद्य विषयाच्या दृष्टिनें अतिशय महत्त्वाचा आहे. त्यांतील माया शब्द तर फारच महत्त्वाचा आहे. या माया शब्दाचा अर्थ अद्वैतमताचा मायावाद असा नाहीं. माया शब्दाचे कित्येक अर्थ आहेत. (१) ' कुशलता, कार्यकुशलता, चातुर्य, कुशलतेनें केलेलें कारागिरीचें काम. (२) कपट, गनिमीकावा ज्याची जरूरी राजनीतींत असते, शत्रूस भुलविण्याची विद्या. ' हे सर्व अर्थ माया शब्दाचेच आहेत. या दोन्ही अर्थांनीं माया शब्द प्रस्तुत मंत्रांत योजलेला आहे. (**मनीषी**) मननशील लोक समयानुसार कुशलतेनें, चातुर्यानें, कपटानें अथवा राजनीतीच्या नियमांनीं मातृभूमीची सेवा करतात. हाच या मंत्राचा आशय आहे.

या प्रकारें देव, ऋषि आणि अन्य विद्वान यांनीं आमच्या मातृभूमीची सेवा केली आहे. जो मार्ग देवतांनीं, अन्य ऋषिनीं आणि मोठमोठ्या ज्ञानी लोकांनीं आम्हांस दाखविला त्या मार्गाचें आम्हीं आक्रमण केलें पाहिजे. त्या रस्त्यानेंच आम्हीं गेलें पाहिजे. तेंच आम्हांस श्रेयस्कर आहे. आम्हांवर तीन ऋणें आहेत. ऋषि-ऋण, देव-ऋण आणि अन्य ज्ञानी जनांचें ऋण. आम्ही हीं ऋणें लक्षांत ठेवलीं पाहिजेत आणि त्यांतून मुक्त होण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

या लेखांतील वैदिक राष्ट्रगीताचे मंत्र आमच्या राष्ट्रीय कर्तव्याचा संबंध ऋषीकालांतील महान् विभूतींशीं जोडतात. आमच्या अखंड राष्ट्रीय कर्तव्यास ऋषींनीं प्रारंभ केला, देवांनीं तें परिपुष्ट केलें आणि अन्य विद्वानांनीं त्याची वाढ केली. अशा प्रकारच्या पवित्र त्रिवेणी संगमाच्या द्वारें तें आमच्याकडे आलें आहे. अर्थात् तें चालूं ठेवणें आम्हांस अत्यावश्यक आहे. तें आमचें मुख्य कर्तव्यच आहे. जर आम्हीं तें चालूं न ठेवलें तर त्याचा आम्हांस

ऋषी-देवांस जबाब दिला पाहिजे. प्रत्येकानें ही गोष्ट उत्तम प्रकारें ध्यानांत ठेवावी.

वाचकांनीं विचार करावा आणि या मंत्राचा उपदेश उत्तम रीतीनें लक्ष्य लावून पहावा कीं आमचा धर्म किती विलक्षण आणि उच्च राष्ट्रीयधर्माचा उपदेश देत आहे ! त्या अनुसार आचरण करण्यास आम्ही तत्पर असलें पाहिजे. आमच्या राष्ट्रास जगांतील अन्य राष्ट्रापेक्षां उच्चतर स्थानीं पोहोंचविण्याची जबाबदारी आमच्यावर आहे. ती पार पाडण्यास आम्ही नेहमीं तयार असलें पाहिजे.

मंत्रांची संगति

हें विवरण येथें संपविण्यापूर्वी या सूक्तांतील मंत्रांच्या संगतिविषयीं थोडें सांगणें जरूर आहे. या सूक्तांत एकूण ६३ मंत्र आहेत. त्यांतील सर्वप्रथम मंत्रांत मातृभूमीची धारणा कोणत्या गुणांनीं होते ती गोष्ट सांगितली आहे. त्यामुळें ते मंत्र सर्वांत अधिक महत्त्वाचे आहेत. प्रत्येक राष्ट्रभक्तानें ते वाचावेत, त्यांवर विचार करावा, त्यांचें मनन करावें आणि या गुणांचीं स्वतःच्या ठिकाणीं वाढ करून स्वतःच्या मातृभूमीची सेवा करण्यास स्वतःस सुयोग्य बनवावें.

दुसऱ्या मंत्रांत लोकांत ऐक्य आणि अभेदता असली पाहिजे, आपसांत भांडण तंटे नसावेत, इत्यादि महत्त्वपूर्ण उपदेश सांगितला आहे. तो सदा स्मरण करण्यायोग्य आहे. तिसऱ्या चौथ्या मंत्रांत सामान्य भूवर्णन आहे. परंतु त्यांत (**कृष्टयः संबभूवुः**) शेतकऱ्यांचें संगठन करण्याचा जो विषय आहे तो सनातन महत्त्वाचा आहे.

पांचव्या मंत्रांतून पूर्वजांच्या पराक्रमांचें (**पूर्वे पूर्वजना विचक्रिरे**) स्मरण करण्याची जी सूचना मिळते ती आबालवृद्धांनीं कधींहि विसरूं नये. ज्यांस स्वतःच्या पूर्वजांचा महत्त्वपूर्ण इतिहास माहित नाहीं, ते निःसंशय प्रगति करूं शकणार नाहींत; म्हणूनच त्या इतिहासाचा येथें उपदेश केला आहे. सातव्या मंत्रांत सुद्धां (**अस्वप्नाः भूमिं अप्रमादं रक्षन्ति**) आळस न करतां मातृभूमीचें रक्षण करण्याचा महत्त्वपूर्ण उपदेश आहे. त्याचा पांचव्या मंत्राशीं संबंध जाणून वाचक पुष्कळच बोध मिळवूं शकतील.

मंत्र ६ आणि ७ मध्यें मातृभूमीचें मनोहर वर्णन आहे. नवव्या मंत्रांत उदारचरित संन्याशांना जीवनांत सर्वत्र ज्ञान प्रचार करून सर्व प्रजाजनांची हृदयें ज्ञान-विज्ञान द्वारें शांतीनें भरून टाकण्याचें बोधप्रद वर्णन आहे. दहाव्या मंत्रांत इंद्र आणि विष्णूच्या पराक्रमाचें जें वर्णन आहे तें ५ व्या ७ व्या मंत्रांतील वर्णनासह वाचावयास हवें, तरच त्याची गंभीरता ध्यानीं येईल. ११ व्या मंत्रांत (**अजीतो अहं पृथिवीं अध्यष्ठां**) ' मीं अजेय होऊन मातृभूमीचा अधिष्ठाता होईन ' अशी उत्कर्षपूर्ण महत्त्वाकांक्षा राष्ट्रांतील प्रत्येक मनुष्यांत उत्पन्न व्हावयास हवी, असें जें सूचविलें आहे तो विशिष्ट आणि उत्तम संदेश आहे.

१२ व्या मंत्रांत भूमि माझी माता आहे आणि मीं तिचा पुत्र आहे, हें मातृप्रीति आणि बालवात्सल्य सूचित करणारें वाक्य वाचून वाचकाचें हृदय प्रेमानें सद्गदित होईल यांत कांहींच शंका नाहीं. १३ व्या मंत्रांत यज्ञाचा संदेश वाचकांस मिळतो. १४ व्या मंत्रांतील वीरोचित भाषा क्षात्रतेज वाढविणारी आहे. ' जे आमचा नाश करण्याची इच्छा करतात त्यांचा आम्हीं नाश करूं. ' हें वाक्य वाचून कोणाचें हृदय शौर्यानें खळबळून उठणार नाहीं ? १५ व्या मंत्रांत एकाच मातेपासून झालेल्या पांच मानवजातीच्या अभेद्यतेचें सुंदर वर्णन आहे. १६ ते १८ पर्यंतच्या मंत्रांत (**भूमिं विश्वहा अनुचरेम**) ' आम्ही मातृभूमीची सर्वदा सेवा करीत राहूं. ' ही प्रतिज्ञा सर्वांनीं स्वतःच्या मनांत दृढतापूर्वक बाळगून प्रयत्न करणें योग्य होईल. अशी प्रतिज्ञा करणारे मातृभूमीची कधीं उपेक्षा करतील काय ?

१९ ते ३१ मंत्रांपर्यंत मातृभूमीचें अतिसुंदर अलंकारिक वर्णन करण्यांत आलें आहे. अग्नि, यज्ञांत हवन, पृथ्वीचा गंधगुण, वनस्पतींची उत्तमता, पाण्याची महत्ता इत्यादि वर्णनांनीं खरोखर अंतःकरण आनंदोर्मीनीं उचंबळून येतें. ३२ व्या मंत्रांत (**परिपंथिनो वधं**) रस्त्यांत लुटमार करणाऱ्यांना वधदंड देण्यासाठीं शासनाला सूचना दिल्या आहेत. ३३ व्या मंत्रांत सूर्यप्रकाशानें नेत्रादि इंद्रियांचें उत्तम रक्षण करण्यासंबंधीं महत्त्वपूर्ण संदेश आहे. ३४ व्या मंत्रांत अहिंसा आणि ३५ व्या मंत्रांत मर्मच्छेदन करण्याचा उपदेश विचक्षण युक्तिपुरःसर करण्यांत आला आहे.

३६ व्या मंत्रांत सहा ऋतु, दोन अयनें, आणि अहोरात्रीच्या उल्लेखानें संवत्सरचक्राची परिपूर्ण कल्पना दाखवली आहे. ३७ व्या मंत्रांत इंद्र-वृत्राच्या युद्धाच्या दृष्टांतानें, मातृभूमीच्या सर्व शत्रूंस दूर करण्याची कल्पना फार मननीय आहे. ३८ व्या मंत्रांत सोम यज्ञाचें मनोरंजक वर्णन आहे. सत्र आणि यज्ञसंस्था चालविणाऱ्या ऋषींच्या अपूर्व सत्कर्म कार्याचा प्रशंसापूर्ण उल्लेख ३९ व्या मंत्रांत आहे.

४० ते ४४ पर्यंतचे मंत्र मुख्यतः धनाची इच्छा प्रगट करणारे आहेत. ४१ व्या मंत्रांत जनतेचें गायन, नर्तन आणि आनंदयुक्त नगरकीर्तन यांचा उल्लेख आहे. या गोष्टी राष्ट्रीय जीवनाची तेजस्विता दाखवितात. ४२ मंत्रांत मातृभूमीस नमन केलें आहे.

४३ व्या मंत्रांत आपल्या राष्ट्रांत देवांकडून वसविलीं गेलेलीं आणि वृद्धि पावलेलीं नगरें यांच्याविषयीं पूज्यभाव धारण करण्याचा उपदेश आहे. स्वतःसाठीं जगाच्या सर्व दिशा रमणीय कशा होतील हा महत्त्वपूर्ण भाव या सूक्तांतील हें मंत्र मननपूर्वक वाचले असतां वाचकास आढळेल.

४५ व्या मंत्रांत, ' नानाधर्म पाळणारे, अनेक भाषा बोलणारे विविध लोक राष्ट्रभक्तीनें कसे संगठित होऊं शकतात ' तो महत्त्वपूर्ण उपदेश आहे. त्यामुळें हा मंत्र निष्कारण आपआपसांत भांडणाऱ्या आणि वाद माजविणाऱ्या लोकांस चांगलाच बोधप्रद आहे. ४६ व्या मंत्रांत विषारी प्राण्यांच्या भावना न बाळगतां सद्भाव वाढविण्याचा उपदेश अपूर्व रीतीनें दिला आहे.

४७ व्या मंत्रांत सार्वजनिक स्थानांवर सर्वांचा समान हक्क असतो ही घोषणा केली आहे. दुराचारी आणि सदाचारी समान हक्कानें रस्त्यावरून जाऊं शकतात. सार्वजनिक बाग, उद्यानें पुस्तकालय वाचनालयांत प्रत्येक व्यक्ति जाऊं शकते. येथें एकास सूट आणि दुसऱ्यास प्रतिबंध असें चालूं शकणार नाहीं.

मातृभूमीस पापी आणि सदाचारी दोन्ही पुत्र समान असतात, हा भाव ४८ व्या मंत्रांत पहाण्यासारखा आहे. ४९ ते ५१ पर्यंतचे तीन मंत्र, पशुपक्षी, पिशाच्यादिकांच्या वर्णनपर आहेत. ५२ आणि ५३ मंत्रांत प्रियधाम आणि मेधा यांच्या प्राप्तीचें वर्णन आहे.

स्वतःच्या दिग्वजयी महत्त्वाकांक्षेचा उपदेश ५४ व्या मंत्रांत आहे, ५५ व्या मंत्रांत चारी दिशांस उत्कर्ष फैलावण्याचा संदेश आहे, आणि ५८ व्या मंत्रांत सार्वजनिक सभास्थानांत मातृभूमीविषयींच्या शुभभावना व्याख्यानद्वारा प्रसृत करण्याचा उपदेश आहे. ५७ व्या मंत्रांत सैन्याच्या तयारीचें वर्णन आहे. ५९ ते ६१ पर्यंतच्या मंत्रांत सर्व साधारण उपदेश आहे. ६२ व्या मंत्रांत मातृभूमीच्या हितार्थ आत्मसमर्पण करण्याचा आदेश आहे. ६३ व्या मंत्रांत सर्व प्रजेची सुप्रतिष्ठा स्थिर करण्याचा संदेश देऊन सूक्ताची पूर्णता केली आहे.

वाचकांनीं हा संगतवार मंत्रानुक्रम वाचून मनन करावा आणि जो बोध प्राप्त होईल तो घेऊन यशाचा भागीदार होण्याचा प्रयत्न करावा.

विराट्

कांड ८, सूक्त १०

(ऋषिः- अथर्वाचार्यः । देवता – विराट्)

[१]

विराड् वा इदमग्र आसीत्तस्या जातायाः सर्वमबिभेदियमेवेदं भविष्यतीति ॥ १ ॥

सोदक्रामत्सा गार्हपत्ये न्यक्रामत् ॥ २ ॥

गृहमेधी गृहपतिर्भवति य एवं वेद ॥ ३ ॥

अर्थ— [१] (विराट् वै) निःसंशयपणें विराट् (अग्रे इदं आसीत्) प्रारंभीं हें जग होतें. (तस्याः जातायाः) तें (तसें) असल्यामुळें (इयं एव इदं भविष्यति इति) हें असें होईल यामुळें (सर्वं अबिभेत्) सर्व भयभीत झालें. (१)

(सा उद् अक्रामत्) तें उत्क्रांत झालें आणि (सा गार्हपत्ये न्यक्रामत्) तें गृहपति संस्थेंत परिणत झालें. (यः एवं वेद) जो याप्रमाणें जाणतो तो (गृहमेधी) गृहयज्ञ करणारा (गृहपतिः भवति) गृहपालक होतो. (२–३)

सोदक्रामत्साहवनीये न्यक्रामत् ॥ ४ ॥
यन्त्यस्य देवा देवहूतिं प्रियो देवानां भवति य एवं वेद ॥ ५ ॥
सोदक्रामत्सा दक्षिणाग्नौ न्यक्रामत् ॥ ६ ॥
यज्ञर्तो दक्षिणीयो वासतेयो भवति य एवं वेद ॥ ७ ॥
सोदक्रामत्सा सभायां न्यक्रामत् ॥ ८ ॥
यन्त्यस्य सभां सभ्यो भवति य एवं वेद ॥ ९ ॥
सोदक्रामत्सा समितौ न्यक्रामत् ॥ १० ॥
यन्त्यस्य समितिं सामित्यो भवति य एवं वेद ॥ ११ ॥
सोदक्रामत्सामन्त्रणे न्यक्रामत् ॥ १२ ॥
यन्त्यस्यामन्त्रणमामन्त्रणीयो भवति य एवं वेद ॥ १३ ॥

[२]

सोदक्रामत्सान्तरिक्षे चतुर्धा विक्रान्तातिष्ठत् ॥ १ ॥
तां देवमनुष्या अब्रुवन्नियमेव तद्वेद यदुभय उपजीवेमेमामुप ह्वयामहा इति ॥ २ ॥

अर्थ— (सा उद् अक्रामत्) तें उत्क्रांत झालें आणि (सा आहवनीये न्यक्रामत्) तें आहवनीय अग्निसंस्थेंत परिणत झालें. (यः एवं वेद) जो याप्रमाणें जाणतो तो (देवानां प्रियः भवति) तो देवांना प्रिय होतो आणि (देवाः अस्य देवहूतिं यन्ति) सर्व देव याच्या ईश प्रार्थनेला जातात. (४-५)

(सा उद् अक्रामत्) तें उत्क्रांत झालें आणि (सा दक्षिणाग्नौ न्यक्रामत्) तें दक्षिणाग्नींत परिणत झालें. (यः एवं वेद) जो याप्रमाणें जाणतो तो (यज्ञर्तः दक्षिणीयः वासतेयः भवति) योग्य प्रकारें यज्ञ करणारा, सन्मान योग्य आणि दुसऱ्यांस रहावयास स्थान देणारा होतो. (६-७)

(सा उद् अक्रामत्) तें उत्क्रांत झालें आणि (सभायां न्यक्रामत्) त्याची परिणति सभेंत झाली. (यः एवं वेद) जो याप्रमाणें जाणतो तो (सभ्यः भवति) तो सभेस योग्य होतो आणि लोक (अस्य सभां यन्ति) त्याच्या सभेस जातात. (८-९)

(सा उद् अक्रामत्) तें उत्क्रांत झालें आणि (सा समितौ न्यक्रामत्) त्याची परिणति समितींत झाली, (यः एवं वेद) असें जो हें जाणतो तो (सामित्यः भवति) समितीस योग्य होतो आणि (अस्य समितिं यन्ति) लोक त्याच्या समितींत जातात. (१०-११)

(सा उद् अक्रामत्) तें उत्क्रांत झालें आणि (सा आमन्त्रणे न्यक्रामत्) तें मंत्रीमंडळांत परिणत झालें. (यः एवं वेद) जो हें जाणतो तो, (आमन्त्रणीयः भवति) मंत्रीमंडळास योग्य होतो, आणि (अस्य आमन्त्रणं यन्ति) लोक त्याच्या मन्त्रीमंडळांत जातात. (१२-१३)

[१] (सा उद् अक्रामत्) तें विराट उत्क्रांत झालें आणि (सा अन्तरिक्षे चतुर्धा) तें अंतरिक्षांत चार प्रकारें (विक्रान्ता अतिष्ठत्) विभक्त होऊन स्थिर राहिलें. (१)

(देवमनुष्याः तां अब्रुवन्) देव आणि मनुष्यें त्याच्याविषयीं म्हणाली कीं (इयं एव तत् वेद) तें तें जाणतें (यत् उभये उपजीवेम) ज्याच्यामुळें आम्हीं दोघेहि जीवित रहातों, त्यामुळें (इमां उप ह्वयामहै इति) आम्ही त्यास बोलावितों. (२)

तामुपाह्वयन्त ॥ ३ ॥
ऊर्जे एहि स्वध एहि सूनृत एहीरावत्येहीति ॥ ४ ॥
तस्या इन्द्रो वत्स आसीद्गायत्र्यभिधान्यभ्रमूधः ॥ ५ ॥
बृहच्च रथन्तरं च द्वौ स्तनावास्तां यज्ञायज्ञियं च वामदेव्यं च द्वौ ॥ ६ ॥
ओषधीरेव रथन्तरेण देवा अदुह्रन्व्यचो बृहता ॥ ७ ॥
अपो वामदेव्येन यज्ञं यज्ञायज्ञियेन ॥ ८ ॥
ओषधीरेवास्मै रथन्तरं दुहे व्यचो बृहत् ॥ ९ ॥
अपो वामदेव्यं यज्ञं यज्ञायज्ञियं य एवं वेद ॥ १० ॥

[३]

सोदक्रामत्सा वनस्पतीनागच्छत्तां वनस्पतयोऽघ्नत सा संवत्सरे समभवत् ॥ १ ॥
तस्माद्वनस्पतीनां संवत्सरे वृक्णमपि रोहति वृश्चतेऽस्याप्रियो भ्रातृव्यो य एवं वेद ॥ २ ॥
सोदक्रामत्सा पितॄनागच्छत्तां पितरोऽघ्नत सा मासि समभवत् ॥ ३ ॥
तस्मात्पितृभ्यो मास्युपमास्यं ददति प्र पितृयाणं पन्थां जानाति य एवं वेद ॥ ४ ॥

अर्थ— (तां उपाह्वयन्त) त्यांनीं त्यास बोलाविलें, हांक मारली. (३)

(ऊर्जे एहि) हे बल ! तूं ये. (स्वधे एहि) हे माझ्या धारणाशक्ति ! तूं ये. (सूनृते एहि) हे सत्या ! तूं ये. (इरावति एहि) हे अन्नमयि ! तूं ये. (४)

(तस्याः वत्सः इन्द्रः आसीत्) तिचा वत्स इंद्र होता. (गायत्री अभिधानी) गायत्री दोरखें होतें. (अभ्रं ऊधः) मेघ दुग्धस्थान होतें. (५)

(बृहत् च रथन्तरं च) बृहत् आणि रथन्तर (द्वौ स्तनौ आस्ताम्) दोन आंचळें होतीं आणि (यज्ञायज्ञियं वामदेव्यं च द्वौ) यज्ञायज्ञिय आणि वामदेव्य हीं दुसरीं दोन आंचळें होतीं. (६)

(देवाः रथन्तरेण ओषधीः अदुह्रन्) देवांनीं रथन्तरांतून औषधी दोहन करून मिळविल्या आणि (बृहता व्यचः) बृहतामधून आकाश काढलें. (७)

(वामदेव्येन अपः) वामदेव्यापासून जल आणि (यज्ञायज्ञियेन यज्ञं) आणि यज्ञायज्ञियापासून यज्ञ मिळविला. (८)

(य एवं वेद) जो हें जाणतो (अस्मै रथंतरं एव औषधीः दुहे) त्याच्यासाठीं रथंतर औषधी देतो, (बृहत् व्यचः) बृहत् अवकाश देतें, (वामदेव्यं अपः) वामदेव्य पाणी देतें आणि (यज्ञायज्ञियं यज्ञं) यज्ञायज्ञिय यज्ञ देतो. (९–१०)

[३] (सा उदक्रामत्) तें उत्क्रांत झालें आणि (सा वनस्पतीन् आगच्छत्) तें वनस्पतींजवळ आलें. (तां वनस्पतयः अघ्नत) त्यास वनस्पतींनीं मारून टाकलें, (सा संवत्सरे समभवत्) तें पुनः वर्षभरांत उत्पन्न झालें. (तस्मात् वनस्पतीनां वृक्णं अपि रोहति) त्यामुळें वनस्पतीचे व्रण भरून येतात. (यः एवं वेद) जो हें जाणतो (अस्य अप्रियः भ्रातव्यः वृश्चते) त्याचा अप्रिय शत्रू कापला जातो. (१–२)

(सा उदक्रामत्) तें उत्क्रांत झालें आणि (सा पितॄन् आगच्छत्) तें पितरांपाशीं येवून पोहोंचलें, (तां पितरः अघ्नत) त्यास पितरांनीं मारून टाकलें, परंतु (सा मासि समभवत्) तें प्रतिमासीं उत्पन्न होऊं लागलें. (यः एवं वेद) जो हें जाणतो तो (पितृयाणं पन्थां प्रजानाति) पितृयान मार्ग जाणतो आणि (तस्मात्) त्यामुळें (पितृभ्यः मासि उपमास्यं ददति) प्रतिमासीं पितरांस दान देण्यांत येतें. (३–४)

सोदक्रामत्सा देवानागच्छत्तां देवा अघ्नत सार्धमासे समभवत् ॥ ५ ॥
तस्माद्देवेभ्योऽर्धमासे वषट् कुर्वन्ति प्र देवयानं पन्थां जानाति य एवं वेद ॥ ६ ॥
सोदक्रामत्सा मनुष्याऽनागच्छत्तां मनुष्या अघ्नत सा सद्यः समभवत् ॥ ७ ॥
तस्मान्मनुष्येभ्य उभयद्युरुप हरन्त्युपास्य गृहे हरन्ति य एवं वेद ॥ ८ ॥

[४]

सोदक्रामत्सासुरानागच्छत्तामसुरा उपाह्वयन्त माय एहीति ॥ १ ॥
तस्या विरोचनः प्राह्रादिर्वत्स आसीदयस्पात्रं पात्रम् ॥ २ ॥
तां द्विमूर्धार्त्व्योऽधोक्तां मायामेवाधोक् ॥ ३ ॥
तां मायामसुरा उप जीवन्त्युपजीवनीयो भवति य एवं वेद ॥ ४ ॥
सोदक्रामत्सा पितॄनागच्छत्तां पितर उपाह्वयन्त स्वध एहीति ॥ ५ ॥
तस्या यमो राजा वत्स आसीद्रजतपात्रं पात्रम् ॥ ६ ॥
तामन्तको मार्त्यवोऽधोक्तां स्वधामेवाधोक् ॥ ७ ॥
तां स्वधां पितर उप जीवन्त्युपजीवनीयो भवति य एवं वेद ॥ ८ ॥

अर्थ— (सा उदक्रामत्) तें उत्क्रांत झालें आणि (सा देवान् आगच्छत्) तें देवांजवळ गेलें. (तां देवाः अघ्नत) त्यास देवांनीं मारून टाकलें, (सा अर्धमासे समभवत्) तें अर्ध्या महिन्यांत पुनः तयार होऊं लागलें; (यः एवं वेद) जो हें जाणतो तो (देवयानं पन्थां प्रजानाति) देवयान मार्गास जाणतो. (तस्मात्) त्यामुळें (देवेभ्यः अर्धमासे वषट् कुर्वन्ति) ते देवांसाठीं अर्ध्या महिन्यांत वषट्कर्म करतात. (५–६)

(सा उदक्रामत्) तें उत्क्रांत झालें (सा मनुष्यान् आगच्छत्) तें मनुष्यापाशीं गेलें (तां मनुष्याः अघ्नत) त्यास मनुष्यांनीं मारून टाकलें (सा सद्यः समभवत्) तें तात्काळ उत्पन्न झालें. (यः एवं वेद) जो हें जाणतो (अस्य गृहे उपहरन्ति) त्याच्या घरीं लोक उपहार आणून देतात. (तस्मात्) म्हणून (मनुष्येभ्यः उपमधुः उपहरन्ति) मनुष्यासाठीं रोज दोनदां अन्न तयार केलें जातें. (७–८)

[४] (सा उदक्रामत्) तें उत्क्रांत झालें. (सा असुरान् आगच्छत्) तें असुरांजवळ आलें (तां असुराः उपाह्वयन्त) त्यास असुरांनीं बोलाविलें (माये एहि इति) ' हे माये ! ये ' याप्रमाणें (तस्याः प्राह्रादिः विरोचनः वत्सः आसीत्) त्याचा प्रल्हादपुत्र विरोचन हा पुत्र होता. त्याचें (अयस्पात्रं पात्रं) एक लोखंडाचें पात्र होतें (तां द्विमूर्धा आर्त्व्यः अधोक्) त्यांचें ऋतुपुत्र द्विमूर्ध्यानें दोहन केलें (तां मायां एव अधोक्) त्याचें दोहन करतांना माया मिळाली (तां मायां असुराः उपजीवन्ति) त्या मायेवरच असुरांचें जीवन आधारलें आहे. (यः एवं वेद) जो हें जाणतो (उपजीवनीयः भवति) तो जीवनाचा निर्वाह करणारा होतो. (१–४)

(सा उदक्रामत्) तें उत्क्रांत झालें आणि (सा पितॄन् आगच्छत्) तें पितरांपाशीं आलें (तां पितरः उपाह्वयन्त) त्यास पितरांनीं बोलाविलें कीं, (स्वधे एहि इति) ' हे आमचे धारकशक्ति ! येथें ये. ' (तस्याः यमः राजा वत्स आसीत्) यमराज तिचा वत्स होता, आणि त्याचें (रजतपात्रं पात्रं) चांदीचें पात्र होतें (तां अन्तकः मार्त्यवः अधोक्) त्याचें मृत्युसंबंधीं अन्तकानें दोहन केलें. (तां स्वधां एव अधोक्) त्यामुळें स्वतःच्या धारकशक्तीचेंच दोहन झालें. (तां स्वधां पितरः उपजीवन्ति) त्या त्यांच्या धारकशक्तीनें पितरांचें जीवन होतें (यः एवं वेद) जो हें जाणतो तो (उपजीवनीयः भवति) जीवनाचा निर्वाह करणारा होतो. (५–८)

सोद॑क्रामत्सा म॑नुष्या॒३॑नाग॑च्छ॒त्तां म॑नुष्या॒३॑ उपा॑ह्वय॒न्तेरा॑व॒त्येहीति॑ ॥ ९ ॥
तस्या॒ मनु॑र्वैव॑स्व॒तो व॒त्स आसी॑त्पृथि॒वी पात्र॑म् ॥ १० ॥
तां पृथी॑ वैन्यो॒ऽधो॑क्तां कृ॒षिं च॑ स॒स्यं चा॑धोक् ॥ ११ ॥
ते कृ॒षिं च॑ स॒स्यं च॑ मनु॒ष्या॒३॑ उप॑ जीवन्ति कृ॒ष्टरा॑धिरुपजीव॒नीयो॑ भवति॒ य ए॒वं वेद॑ ॥१२॥
सोद॑क्रामत्सा स॒प्तऋ॑षीनाग॑च्छ॒त्तां स॑प्तऋ॒षय॒ उपा॑ह्वय॒न्त ब्रह्म॑ण्व॒त्येहीति॑ ॥ १३ ॥
तस्या॒ः सोमो॒ राजा॑ व॒त्स आसी॒च्छन्दः॒ पात्र॑म् ॥ १४ ॥
तां बृह॒स्पति॑राङ्गिर॒सो॒ऽधो॑क्तां ब्रह्म॑ च॒ तप॑श्चाधोक् ॥ १५ ॥
तद्ब्रह्म॑ च॒ तप॑श्च सप्तऋ॒षय॒ उप॑ जीवन्ति ब्रह्मवर्च॒स्यु॑पजीव॒नीयो॑ भवति॒ य ए॒वं वेद॑ ॥१६॥

[५]

सोद॑क्रामत्सा दे॒वानाग॑च्छ॒त्तां दे॒वा उपा॑ह्वय॒न्तोर्ज॒ एहीति॑ ॥ १ ॥
तस्या॒ इन्द्रो॑ व॒त्स आसी॑च्चम॒सः पात्र॑म् ॥ २ ॥
तां दे॒वः स॑वि॒ताधो॑क्तामू॒र्जामे॒वाधो॑क् ॥ ३ ॥
तामू॒र्जां दे॒वा उप॑ जीवन्त्युपजीव॒नीयो॑ भवति॒ य ए॒वं वेद॑ ॥ ४ ॥

अर्थ—(सा उदक्रामत्) तें उत्क्रांत झालें (सा मनुष्यान् आगच्छत्) तें मनुष्यापाशीं आलें. (तां मनुष्याः उपाह्वयन्त) त्यास मनुष्यांनीं याप्रमाणें हांक मारली कीं, (इरावति एहि इति) 'हे अन्न देणारी ! येथें ये.' (तस्याः मनुः वैवस्वतः वत्सः आसीत्) त्याचा विवस्वानाचा पुत्र मनु वत्स होता. त्याचें (पृथिवी पात्रं) पृथ्वी हें पात्र होतें. (तां पृथी वैन्यः अधोक्) त्याचें वेनपुत्र पृथीनें दोहन केलें. (तां कृषिं च सस्यं च अधोक्) त्या दोहनामुळें कृषि आणि धान्य झालें. त्यामुळें (ते मनुष्याः कृषिं स सस्यं च उपजीवन्ति) मनुष्यें शेती आणि धान्यावर स्वतःचें जीवन टिकवितात. (यः एवं वेद) जो हें जाणतो, तो (कृष्ट-राधिः) शेतींत सिद्धि प्राप्त करणारा होऊन (उपजीवनीयः भवति) दुसऱ्याचा जीवननिर्वाह करणारा होतो. (९-१२)

(सा उदक्रामत्) तें उत्क्रांत झालें (सा सप्तऋषीन् आगच्छत्) तें सप्तऋषींजवळ आलें (तां सप्त ऋषयः उपाह्वयन्त) त्यास सप्तऋषींनीं याप्रमाणें हांक मारली, (ब्रह्मण्वति एहि इति) 'हे ब्रह्मज्ञान युक्त ! येथें ये.' (तस्याः सोमः राजा वत्सः आसीत्) सोम राजा त्याचा वत्स होता. आणि (छन्दः पात्रं) छन्द हें पात्र होतें. (तां बृहस्पतिः आंगिरसः अधोक्) त्याचें आंगिरसकुलोत्पन्न बृहस्पतीनें दोहन केलें. (तां ब्रह्म च तपः च अधोक्) त्यामुळें ज्ञान आणि तप मिळालें. (तत् ब्रह्म च तपः च) त्यामुळें ज्ञान आणि तपानें (सप्त ऋषयः उपजीवन्ति) सप्तऋषि स्वतःचें जीवन धारण करतात. (यः एवं वेद) जो हें जाणतो तो (ब्रह्मवर्चसी) ज्ञानवान् होऊन (उपजीवनीयः भवति) जीवननिर्वाह करणारा होतो. (१३-१६)

[५] (सा उदक्रामत्) तें उत्क्रांत झालें. (सा देवान् आगच्छत्) तें देवांजवळ आलें. (तां देवा उपाह्वयन्त) त्यास देवांनीं अशी हांक मारली कीं (ऊर्जे एहि इति) 'हे बलवति ! येथें ये.' (तस्याः इन्द्रः वत्सः आसीत्) त्याचा इन्द्र वत्स होता. (चमसः पात्रं) चमस पात्र होतें (तां देवः सविता अधोक्) त्याचें सविता देवानें दोहन केलें. (तां ऊर्जां एव अधोक्) त्यामुळें त्यास बळ प्राप्त झालें. (तां ऊर्जां देवाः उपजीवन्ति) त्या बळाच्या योगें देवांचें जीवन चालतें. (यः एवं वेद) जो हें जाणतो, तो (उपजीवनीयः भवति) जीवननिर्वाह करणारा होतो. (१-४)

सोदक्रामत्सा गन्धर्वाप्सरस आगच्छत्तां गन्धर्वाप्सरस उपाह्वयन्त पुण्यगन्ध एहीति ॥ ५ ॥
तस्याश्चित्ररथः सौर्यवर्चसो वत्स आसीत्पुष्करपर्णं पात्रम् ॥ ६ ॥
तां वसुरुचिः सौर्यवर्चसोऽधोक्तां पुण्यमेव गन्धमधोक् ॥ ७ ॥
तं पुण्यं गन्धं गन्धर्वाप्सरस उप जीवन्ति पुण्यगन्धिरुपजीवनीयो भवति य एवं वेद ॥ ८ ॥
सोदक्रामत्सेतरजनानागच्छत्तामितरजना उपाह्वयन्त तिरोध एहीति ॥ ९ ॥
तस्याः कुबेरो वैश्रवणो वत्स आसीदामपात्रं पात्रम् ॥ १० ॥
तां रजतनाभिः काबेरकोऽधोक्तां तिरोधामेवाधोक् ॥ ११ ॥
तां तिरोधामितरजना उप जीवन्ति तिरो धत्ते सर्वं
पाप्मानमुपजीवनीयो भवति य एवं वेद ॥ १२ ॥
सोदक्रामत्सा सर्पानागच्छत्तां सर्पा उपाह्वयन्त विषवत्येहीति ॥ १३ ॥
तस्यास्तक्षको वैशालेयो वत्स आसीदलाबुपात्रं पात्रम् ॥ १४ ॥
तां धृतराष्ट्र ऐरावतोऽधोक्तां विषमेवाधोक् ॥ १५ ॥
तद्विषं सर्पा उप जीवन्त्युपजीवनीयो भवति य एवं वेद ॥ १६ ॥

अर्थ— (सा उदक्रामत्) तें उत्क्रांत झालें, आणि (सा गन्धर्वाप्सरसः आगच्छत्) तें गंधर्व आणि अप्सरां पाशीं आलें (तां गन्धर्वाप्सरसः उपाह्वयन्त) त्यास गन्धर्व आणि अप्सरांनीं अशी हांक मारली कीं (पुण्यगन्धे एहि इति) ' हे उत्तम सुवासयुक्त ! येथें ये. ' (तस्याः सौर्यवर्चसः चित्ररथः वत्सः आसीत्) त्याचा सूर्यवर्चस पुत्र चित्ररथ वत्स होता आणि (पुष्करपर्णं पात्रं) कमळपत्र पात्र होतें. (तां वसुरुचिः सौर्यवर्चसः अधोक्) त्याचें सूर्यवर्चसपुत्र वसुरुचीनें दोहन केलें त्यामुळें (तं पुण्यं गंधं एव अधोक्) त्यास उत्तम सुवास प्राप्त झाला. (तं पुण्यं गन्धं गन्धर्वाप्सरसः उपजीवन्ति) त्या पुण्य सुवासावर गंधर्व आणि अप्सरा जिवंत रहातात. (यः एवं वेद) जो हें जाणतो तो (पुण्यगन्धिः) उत्तम सुगंधयुक्त होऊन (उपजीवनीयः भवति) जीवननिर्वाह करणारा होतो. (५-८)

(सा उदक्रामत्) तें उत्क्रांत झालें (सा इतरजनान् आगच्छत्) तें इतर जनांजवळ आलें (तां इतर-जनाः उपाह्वयन्त) त्यास इतर जनांनीं अशी हाक मारली कीं, (तिरोधे एहि इति) 'हे अंतर्धान शक्ति ! येथें ये.' (तस्याः कुबेरः वैश्रवणः वत्सः आसीत्) त्याचा विश्रव्याचा पुत्र कुबेर वत्स होता. (आमपात्रं पात्रम्) आम-पात्र पात्र होतें. (तां रजतनाभिः काबेरकः अधोक्) त्याचें काबेरक पुत्र रजतनाभी यानें दोहन केलें (तां तिरोधां एव अधोक्) त्यामुळें त्यांस अंतर्धानशक्ति प्राप्त झाली. तेव्हांपासून (इतरजनाः तां तिरोधां उपजीवन्ति) इतर जन त्या तिरोधा शक्तीवर जीवित रहातात. (यः एवं वेद) जो हें जाणतो तो (सर्वं पाप्मानं तिरः धत्ते) सर्व पापांस दूर करतो आणि (उपजीवनीयः भवति) जीवननिर्वाह करणारा होतो. (९-१२)

(सा उदक्रामत्) तें उत्क्रांत झालें (सा सर्पान् आगच्छत्) तें सर्पांजवळ आलें (तां सर्पाः उपाह्वयन्त) त्यास सर्पांनीं अशी हाक मारली (विषवति एहि इति) 'हे विषयुक्त ! येथें ये. ' (तस्याः तक्षकः वैशालेयः वत्सः आसीत्) त्याचा विशालेचा पुत्र तक्षक वत्स होता. (अलाबुपात्रं पात्रम्) आणि अलाबुचें पात्र होतें. (तां धृतराष्ट्रः ऐरावतः अधोक्) इरावानाचा पुत्र धृतराष्ट्रानें त्याचें दोहन केलें. (तां विषं एव अधोक्) त्यापासून विषच प्राप्त झालें. (तत् विषं सर्पाः उपजीवन्ति) त्या विषानें सर्प जीवन धारण करतात. (यः एवं वेद) जो हें जाणतो तो (उपजीवनीयः भवति) जीवन निर्वाह करणारा होतो. (१३-१६)

[६]

तद्यस्मा एवं विदुषेऽलाबुनाभिषिञ्चेत्प्रत्याहन्यात् ॥ १ ॥
न च प्रत्याहन्यान्मनसा त्वा प्रत्याहन्मीति प्रत्याहन्यात् ॥ २ ॥
यत्प्रत्याहन्ति विषमेव तत्प्रत्याहन्ति ॥ ३ ॥
विषमेवास्याप्रियं भ्रातृव्यमनुविषिच्यते य एवं वेद ॥ ४ ॥

अर्थ- [६] (**तत् एवं विदुषे यस्मै**) म्हणून असें जाणणाऱ्या विद्वानांसाठीं (**अलाबुना अभिषिञ्चेत्**) भलाबुनें अभिषेक करण्यांत यावा. तो त्याचा (**प्रत्याहन्यात्**) प्रतिकार करो. (**न च प्रत्याहन्यात्**) आणि जर प्रतिकार करणार नाहीं तर (**मनसा त्वा प्रति-आहन्मि**) मनानें ' तुझा प्रतिघात करतों ' (**इति प्रत्याहन्यात्**) असा प्रतिकार करावा. (**यत् प्रत्याहन्ति**) जो प्रतिकार होतो (**तत् विषं एव प्रत्याहन्ति**) तो विषाचाच प्रतिकार होतो (**यः एवं वेद**) जो हें जाणतो (**विषं एव अस्य अप्रियं भ्रातृव्यं**) विषच त्याच्या अप्रिय बंधुभावावर (**अनुविषिच्यते**) पडतें. (१-४)

विराट्

कामधेनूचें दूध

या सूक्तांत जगन्माता विराट् देवीरूपी कामधेनूचें दूध कोणत्या लोकांनीं कसें काढलें, त्याचें उत्तम वर्णन आहे. कामधेनु ही तर सर्वांची समान माता आहे. तिच्या ठायीं कांहीं भेदभाव असत नाहीं, परंतु तिच्याजवळ जाणारे भिन्न भिन्न असतात. त्यांचीं मनें भिन्न, त्यांच्या इच्छा भिन्न, त्यांचा पुरुषार्थसुद्धां भिन्न. त्यामुळें त्यांचे परिणामहि भिन्नच असणार. कोणत्याहि गायीचें दूध जर सापाच्या पोटांत गेलें तर त्याचें विषच होणार, पण तेंच दूध जर एखाद्या आंब्याच्या मूळाशीं घातलें तर तो स्वादिष्ट रसयुक्त फळें देईल. त्याचप्रमाणें समुद्राचें पाणी मेघांत बाष्परूपानें जाऊन वृष्टिरूपानें खालीं पडतें आणि सर्व वृक्ष-वनस्पतींस जीवन मिळतें; पण या एकाच पाण्यानें सहा प्रकारचे निरनिराळे रस वृक्षांतून उत्पन्न होतात. उसांत मधुर, चिंचेंत आंबट, मिरच्यांत तिखट, याप्रमाणें विभिन्न रस निर्माण होतात. मेघांतून पडणारें पाणी एकच असतां वनस्पतींच्या भिन्नत्वामुळें रसांतसुद्धां भिन्नता निर्माण झाली. जमीन एकच असतां त्यांतून फुलणाऱ्या गुलाबाचा, पारिजातकाचा अथवा शेवंतीचा वास भिन्न असतो. एकाच भूमींतून रस शोषून घेणाऱ्या वनस्पति विभिन्न असल्यामुळें विभिन्न रसांची उत्पत्ति होते. त्याचप्रमाणें विराट्विश्वरूपी दिव्य कामधेनु एकच आहे परंतु तिच्याजवळून देव, ऋषि, गंधर्व, पितर, असुर, मानव, सर्प वगैरे भिन्न भिन्न गुण प्राप्त करतात. त्यांचें वर्णन या सूक्तांत पहाण्यासारखें आहे. तेंच खालील कोष्टकांत पहा—

१ विराट्-दिव्य कामधेनु

लोक	दूध काढणारा	वत्स	दोहन पात्र	बोलावण्याचें नांव	दूध	जीवनसाधन	काय करतें अथवा कसें असतें ?
असुर	द्विमूर्धा अर्त्व्यः	विरोचन प्राऱ्हादि	अयस्पात्र	माया	माया	माया	
पितर	अन्तको मार्त्यः	यमः राजा	रजतपात्र	स्वधा	स्वधा	स्वधा	
मनुष्य	पृथ्वी वैन्य	मनु वैवस्वतः	पृथ्वी-माती	इरावति	कृषि, सस्य	कृषि, सस्य	कृषि-राधिः
सप्तऋषि	बृहस्पति आंगिरस	सोमो राजा	छन्दः	ब्रह्मण्वती	ब्रह्म, तप	ब्रह्म, तप	ब्रह्मवर्चसी
देव	सवितादेव	इंद्र	चमस	ऊर्जा	ऊर्जा	ऊर्जा	

लोक	दूध काढणार	वत्स	दोहन पात्र	बोलावण्याचें नांव	दूध	जीवनसाधन	काय करतें अथवा कसें असतें.
गंधर्व	वसुरुचि	चित्ररथ	पुष्करपर्ण	पुण्यगन्धा	पुण्यगन्धः	पुण्यगन्ध	सुगंधित होतें
अप्सरा	सौर्यवर्चस	सौर्यवर्चस	कमलपत्र		सुगन्ध		
इतरलोक	रजतनाभिः काबेरक	कुबेर वैश्रवण	आमपात्र	तिरोधा	तिरोधा	तिरोधा	पाप दूर करतें
सर्प	धृतराष्ट्र ऐरावत	तक्षक वैशालेय	अलाबुपात्र	विषवती	विष	विष	

२ विराट्–दिव्य कामधेनु

दोहनकर्ता	दुग्धाशय ऊधस्	वत्स	रसना गाय बांधण्याची दोरी	गाईचें नांव	स्तन	दूध
देव, मनुष्य	अभ्र	इंद्र	गायत्री	ऊर्जा	बृहत्	व्यचः (आकाश)
				स्वधा	रथंतर	औषधिः
				सूनृता	यज्ञायज्ञिय	यज्ञ
				इरावति	वामदेव्य	आप

३ विराट् गाय

कोणाजवळ गेली	पुनः उत्पन्न होण्याचा समय	काय होतें	ज्ञान
वनस्पति	संवत्सर	एका वर्षात जखमेचे व्रण भरतात.	
पितर	मास	मासिक दान देते	पितृयान ज्ञान
देव	पक्ष	अर्ध्या महिन्यांत वषट् करते	देवयान ज्ञान
मनुष्य	सद्यः, तत्काल	प्रतिदिवशीं अन्न ग्रहण करते	

या कोष्टकांवरून विराट् जगद्रूपी कामधेनूपासून कोणीं कोणत्या प्रकारचें दूध मिळविलें तें कळतें. कामधेनूजवळ जें मागावें तें मिळतें. तुम्हांस वाटल्यास अमृत अथवा विष मागा. एकच कामधेनु अमृत मागणारास अमृत आणि विष मागणारास विष देते. कामधेनु वरदान मागणाराची इच्छा तृप्त करते, मात्र वरदान मागणाऱ्यास अक्कल असली पाहिजे. नाहींतर विराट् देवता प्रसन्न होऊनसुद्धां कांहीं तरी भलतेंच मागून स्वतःचाच नाश करून घेतल्यासारखें होईल.

वरील कोष्टकांवरून कळेल कीं असुरांनीं त्या विराट् देवीला ' माया ' नांवानें हांक मारली. माया शब्दाचे अर्थ आहेत– कपट, लबाडी, असत्य, फसविणें, जसें दिसतें तसें वास्तवांत नसणें, भ्रम, कौशल्य.

असुरांस हे गुण विराट् देवींत दिसले आणि त्यांनीं तिच्याजवळ तसेच गुण मागितले. त्यांना तसेच गुण मिळाले. जें असुरांनीं मागितलें तें त्यांना मिळालें. प्राचीन आणि अर्वाचीन असुरांत कपट आणि फसवणूकच दिसून येते. या फसवणुकीच्या कृत्यांनींच राक्षस ओळखूं येतात. याप्रमाणें असुरांचा इतिहास हा सर्व कपटाचा, फसवणुकीचा इतिहास आहे.

त्या विराट् कामधेनूजवळ देवांनीं बल आणि अन्नाची प्रार्थना केली आणि त्यांस बल आणि अन्न प्राप्त झालें. या बलानें देवांनीं असुरांचा पराभव केला आणि देवांचें राज्य या सृष्टींत झालें.

मनुष्यांनीं विराट देवीपाशीं कृषि (शेती) आणि फळें इत्यादि मिळावींत म्हणून मागणी केली, आणि कृषिविद्या प्राप्त केली. आजपावेतों मनुष्यें कृषीनेंच (शेतींतच) जीवननिर्वाह करीत आहेत.

अशा उत्कृष्ट देवीची प्रार्थना करून सर्पांनीं काय मागितलें ? त्यांनीं जें मागितलें त्यानें त्यांचाहि फायदा झाला नाहीं किंवा इतरांचें कांहीं हित साधलें नाहीं. अशी महान् जगताची आदि माता प्रसन्न झाली असतां सर्पांनीं अशी वस्तु मागितली कीं तिच्यामुळें अखिल जगाचा नाश व्हावा. जगद्रचना करणारी देवी

जर प्रसन्न झाली तर तिच्यापासून ज्याची इच्छा करावी तें मिळतें. परंतु सर्पांनीं तिच्याजवळ ' विष ' मागितलें. त्यापासून प्राणिमात्रांचा नाश होतो. याप्रमाणें आत्मघातकी मागणी करणें हें उचित नाहीं. जर सर्पांनीं त्या देवतेजवळ दुसरी कांहीं विशेष महान् शक्ति मागितली असती तर ती त्यांस निश्चित मिळाली असतीच, परंतु त्यासाठीं शुद्ध बुद्धीची जरुरी आहे. तिच्या अभावीं असेंच व्हावयाचें. यावरून तात्पर्य इतकेंच निघतें कीं मनुष्याच्या हातीं महान् शक्ति येऊनसुद्धां कांहीं उपयोग नाहीं, तर त्या शक्तीचा योग्य उपयोग करण्याचें ज्ञान असावें लागतें. त्या ज्ञानाच्या अभावीं प्राप्त झालेली महान् शक्ति निःसंदेह त्याची हानीच करील. ज्याप्रमाणें सर्प आणि असुर त्या देवतेची कृपा प्राप्त झाली असतांहि तिचा लाभ घेऊं शकले नाहींत पण देव, ऋषि आणि मानव यांनीं स्वतःचा मोठा फायदा करून घेतला. विशेषेंकरून ऋषींनीं जें ' ब्रह्म आणि तप ' प्राप्त करून घेतलें तें अखिल मानवजातीच्या उन्नतीचें एकमात्र साधन आहे, असें आपण निःसंशय म्हणूं शकतों. जर मागण्याची वेळ आली तर असेंच कांहीं मागितलें पाहिजे.

या सूक्तांतील इतर गोष्टी पूर्वोक्त उपदेशाचा गौरव वाढविणाऱ्याच आहेत. त्यामुळें त्यांचें जास्त विवरण करण्याची आवश्यकता वाटत नाहीं.

वाचकांनीं असें ध्यानीं आणावें कीं ही विराट् देवता फक्त असुर, पितर, देव, मनुष्य, इतरेजन, सर्प वगैरेंस प्रसन्न झाली आणि आपणां सर्वांस वरदान देण्यास ती तयार नाहीं असें कांहीं नाहीं. ती आदि जननी जगन्माता आपणां सर्वांस जें पाहिजे तें देण्यास तयार आहे, आणि आपण पाहिजे तें मिळवूं सुद्धां शकतों. परंतु जें मिळवावयाचें तें आपण मागत नाहीं. अयोग्य मागण्या करून आपण आपली अवनति करून घेत आहोंत; म्हणून वेदानें या सूक्ताच्या द्वारानें आम्हांस असा उपदेश दिला आहे कीं तिच्याजवळ मागतांना चांगली शक्तिच मागा. कांहीं हानिकारक मागूं नका.

प्रत्येक मनुष्य मनांत संकल्प करतो, इच्छा करतो, कामना बाळगतो, त्या सर्व पूर्वोक्त कामधेनूपाशीं मागावयाच्या मागण्याच आहेत. कामधेनु प्रत्येक मनुष्याच्या जवळच आहे. हें सर्व ' विराट् ' कामधेनूच आहे आणि तिच्या समोर बसून मनुष्य इच्छा करीत असतो. कल्पवृक्षातळीं अथवा कामधेनूपुढें बसून जी इच्छा करावी ती तात्काळ फलते. उत्तम कामना मनांत निर्माण झाली तर कांहीं दोष नाहींच पण जर वाईट कामना उत्पन्न झाली तर हानि होईल यांतहि कांहीं शंका नाहीं. वाचकानें हें ध्यानीं ठेवावें कीं दुष्ट इच्छा करण्यानें जें कांहीं नुकसान होईल त्याची जबाबदारी आपणांवरच आहे. असा विचार केला तर हें कळून येतें कीं मनुष्य आपणच आपला नाश करून घेत आहे. त्यानें दुष्ट इच्छा बाळगल्या आणि त्या कामधेनूच्या कृपेनें मिळाल्या तर त्यांत कामधेनूचा काय दोष ? सर्व दोष नसली इच्छा करणाऱ्याचाच आहे. ही गोष्ट वाचकांच्या मनांवर बिंबवण्यासाठींच या सूक्ताचा उपदेश आहे.

वाचकांनीं स्वतःच्या संकल्पशक्तीचा अदमास बांधून नेहमीं शुभसंकल्प करून स्वतःच्या उन्नतीचा मार्ग सुगम करावा.

राष्ट्रीय उपदेश

या सूक्ताचा जो पहिला भाग आहे तो राष्ट्रीय उन्नतीचा विषय आहे. त्यांत जनतेची उन्नति कशी झाली, राष्ट्रीय संघटना कशी झाली, आणि लोकांच्या प्रतिनिधींची सभा कशी बनली, या विषयांचा उपदेश या सूक्तांत आहे. येथें ' वि–राट् अथवा वि–राज् ' या शब्दाचा अर्थ ' राज्यहीन स्थिति ' असा आहे. ज्याकाळीं राजपद अस्तित्वांतच नव्हतें, राजा निर्माण करण्याची कल्पना अथवा राजासंबंधीं कल्पनाही जनतेला नव्हती त्या काळची अवस्था ' वि–राज ' शब्दानें येथें सांगितली आहे. राजसंस्थेचा प्रारंभ अथवा त्या पूर्वीची स्थिति या शब्दानें येथें दाखवली आहे. हा शब्द ' अ–राज–क ' शब्दाचा पर्याय शब्द नव्हे. अराजक लोक राजाच्या उत्पत्तिनंतर झालेले आहेत. प्रथम राजाची उत्पत्ति झाली, नंतर राजा अथवा राजपुरुष प्रजेवर अत्याचार जुलूम–जबरदस्ती करूं लागले. त्यांच्या अत्याचारांनीं त्रासून जाऊन राजाचा नाश करण्याची इच्छा बाळगणारे ' अराजक ' निर्माण झाले. म्हणजे राजाच्या उत्तरकाळीं ' अराजकां ' ची उत्पत्ति झाली, आणि पूर्वकाळीं ' विराज ' स्थिति होती. असा विचार केला म्हणजे विराजचा अर्थ वाचकांच्या मनांत स्थिर होईल. जनता विराज स्थितींत होती म्हणजे लोक विभागलेल्या अवस्थेंत होते, त्यांच्यांत कसलीच संघटना नव्हती.

त्यानंतर सर्व प्रथम जो संघटनेस प्रारंभ झाला तो ' स्त्रीपुरुष मेळा ' हा झाला. स्त्री आणि पुरुष हे भेद पशूंतहि असतात आणि ते एकत्र येतात पण त्यांस स्वतःचा घरसंसार असत नाहीं अथवा ते संसार करीत नाहीत. त्यांचें एकत्र येणें फक्त कामुकतेमुळेंच असतें. मनुष्यांत बुद्धि आहे, मन आहे आणि प्रेमहि आहे. प्रारंभीं मनुष्यांत सुद्धां पशुप्रमाणें स्थिति होती पण स्त्री–पुरुष संबंध पशुवत् होतां होतां त्यांतून परस्पर प्रेम निर्माण झालें. हें प्रेम जसजसें दृढ होत गेलें तेव्हां ते एकत्र राहूं लागले. या एकत्र रहाण्यानें धर्माचें नियंत्रण अस्तित्वांत आलें आणि त्यांतून

' गृहपति ' संस्थेची उत्पत्ति झाली. धर्म-नियंत्रणामुळें प्रतिदिनीं अग्निहोत्र आणि इतर गृहस्थधर्म मनुष्याच्या जीवनाशीं संबंधित झाले. त्यावेळेपासून मनुष्य घर करून राहूं लागला. घरांत रहाण्यानें घराचा स्वामी बनला, स्वामीची सहचारिणी स्त्री आणि त्याचे सहायक भाऊ आणि पुत्र आहेत, अशी कल्पना मनुष्यांत निर्माण झाली आणि ही कल्पना वाढतां वाढतां महान् साम्राज्यांत परिणत झाली. हा उन्नतीचा क्रम या सूक्तांत दाखविला आहे.

गृहपति, आहवनीय आणि दक्षिणाग्नि या तीन्ही संस्था गृहस्थाश्रमांतसुद्धां अधिकाधिक संघटना होण्याचा आशय दर्शवितात. गृहपति संस्थेंत यज्ञ लहान असतात. आहवनीय आणि दक्षिणाग्नींत यज्ञ संस्था वाढली आणि त्यामुळें मानवसंघटनाहि वाढली. परंतु अजून ग्रामसंस्थांचें अस्तित्व नव्हतें. अनेक कुटुंबें मिळून मिसळून एका ठिकाणीं रहात असत, पण ग्रामसंस्थेचीं बंधनें त्यांस नव्हतीं. एका स्थानीं अनेक कुटुंबें एकत्र राहिल्यावर त्या सर्व कुटुंबांची मिळून एक ग्रामसंस्था व्हावयास हवी, अथवा खरें म्हणजे (जरी त्यास ग्रामसंस्था असें नांव नंतर मिळालें तरी) ज्या स्थानीं हीं कुटुंबें रहात तेवढ्यांची त्या त्या ठिकाणीं संघटना व्हावी अशी कल्पना उत्पन्न झाली असावी. गृहपति संस्थेनंतर गांवाची अथवा ग्रामसंस्थेची कल्पना नैसर्गिकरीत्याच उत्पन्न होणार; कारण गृहपति संस्थेंत जें घराच्या नियंत्याच्या भावनेचें आणि संघटनेचें सुख अनुभवास येतें त्याच अनुभवानें अनेक गृहस्थांचें मिळून एक मोठें कुटुंब (ग्राम) बनविण्याची आणि अशा रीतीनें आपलें संघबल वाढविण्याची कल्पना मनुष्यांत उत्पन्न होणें हें स्वाभाविकच आहे.

यामुळेंच ' सभा ' उत्पन्न झाली. येथें सभा म्हणजे ' ग्राम-सभा ' होय. ' ग्राम ' शब्दाचा अर्थ संघटित समाज असा आहे. अनेक कुटुंबें एकाच नियमांनीं स्वतःस बांधून घेऊन एकाच स्थानीं एकत्र रहात त्याचें नांव गांव (ग्राम). या गांवाचीच सभा, तिचें नांव ग्रामसभा. ही सभा त्या गांवच्या निवडलेल्या प्रतिनिधींचीच असावयाची. बाहेरचा कोणी मनुष्य या सभेचा सदस्य होऊं शकणार नाहीं. त्या गांवांत रहाणारा, ज्याचें घरदार-कुटुंब त्या गांवांतच आहे आणि त्या गांवच्या लोकांनीं निवडून दिलेला प्रतिनिधीच त्या सभेचा सभासद होऊं शकेल. या प्रकारें जे लोकांचे प्रतिनिधि असतील त्यांची (ग्राम) सभा होईल, आणि ही सभा गांवाचें रक्षण, आरोग्याची व्यवस्था, शिक्षणव्यवस्था इत्यादि कार्यें करील, म्हणजे या ग्रामसभेमार्फत त्या गांवाचें नियंत्रण होत राहील.

याप्रमाणें अनेक गांवें आणि त्यांचें नियंत्रण करणाऱ्या व्यवस्थापक सभा बनल्या. त्यानंतर सहाजिकच त्यांचे आपआपसांत ' संग्राम ' होणें स्वाभाविक आहे. असे ' संग्राम ' झाल्यावर संग्रामामुळें अहिताचा अनुभव आला, ज्ञान झालें; त्यामुळें अनेक ग्रामांची एकच संघटित सभा बनविण्याची कल्पना सर्वांना प्रिय झाली असेल.

याच कारणानें सभेतून ' समिती ' चें निर्माण झालें असावें, असें पुढें सूक्तांत सांगितलें आहे. पूर्वोक्त ग्रामसभांनीं निवडलेल्या प्रतिनिधींचीच ही राष्ट्रसमिति अथवा राष्ट्रीय समिति अथवा राष्ट्रीय सभा होते आणि तिच्या द्वारानें राष्ट्रशासन होतें. या मधील टप्प्यांत लहान मोठ्या प्रांतसभा अस्तित्वांत आल्याची कल्पना वाचक करूं शकतील, आणि जरा आणखी पुढें जाऊन साम्राज्य महासभेचें अस्तित्वसुद्धां कल्पनेंत येऊं शकेल.

महासभा अथवा समिति सर्व राष्ट्राची असते आणि त्यांत गांवोगांवचे प्रतिनिधि आल्यानें तिची सभासद संख्या अधिक असते. जेव्हां सभासदांची संख्या फार मोठी असते, शेंकड्यांनीं असते तेव्हां त्यांचें एकत्र येणें आणि एकमतानें काम करणें कठीण होतें, म्हणून त्यांतून निवडून योग्य कार्यकर्त्यांचें ' मंत्रीमंडळ ' बनविणें आवश्यक होतें. कार्य करण्यास तें आवश्यक होतें. त्यामुळेंच या सूक्ताच्या अंतिम भागांत ' आमंत्रण ' परिषद् बनविण्याचा उल्लेख आहे. आमंत्रणा अथवा मंत्रणा करणारेंच मंत्रीमंडळ असतें. तें सर्व राष्ट्राच्या शासनव्यवहाराचा विचार करतें आणि त्याप्रमाणें सर्व अधिकाऱ्यांकडून राष्ट्राचा आणि तदंतर्गत गांवांचा शासन व्यवहार चालवितें. याप्रमाणें वेदकालीन लोकशासन. संस्थेच्या उन्नतीचा क्रम दाखविला आहे.

मनुष्याची जी आत्मशक्ति आहे ती अत्यंत प्रभावशाली आहे. त्या आत्मशक्तींत ज्ञान, वीरता, संग्रह आणि कर्म असे चार भेद आहेत. जेथें आत्मा आहे तेथें हे चार शक्तिविभाग कमी अधिक प्रमाणांत असतातच. मनुष्यांत हेच गुण ब्रह्म, क्षत्र, विट् आणि शूद्र या नांवांनीं प्रसिद्ध आहेत. ज्ञानसंग्रह, राष्ट्रपालन, धनसंचय आणि कर्मकौशल्य हीं त्यांचीं कार्यें जगांत प्रसिद्ध आहेत.

जेव्हां अनेक कुटुंबें एकाच स्थानीं एकत्र मिळतात तेव्हां त्यांतील कित्येक लोक ज्ञानाचा संग्रह करणारे, विचार संपन्न, केवळ ध्यान-धारणेंत रत असे असतात. ते जगाच्या व्यवहाररूपी जाळ्यांत अडकत नाहींत. दुसरे कित्येक असेहि असतात जे स्वतःच्या बाहुबलानें गांवाचें रक्षण करण्यास तत्पर असतात.

त्यांच्या बलाच्या आधारें होणाऱ्या रक्षणानें इतर लोक स्वतःस सुरक्षित समजतात. दुसऱ्यांसाठीं आत्मबलिदान करण्यांत त्यांचें यश सांठवलेलें आहे. असे लोक आपल्या गांवाच्या अथवा आपल्या राष्ट्राच्या रक्षणासाठीं प्रसंगीं स्वतःचें जीवितहि अर्पण करतात. परोपकारासाठीं हे क्षत्रिय मोठमोठ्या आपत्ति सहन करतात. स्वतःचें आयुष्य-जीवित अशा संकटांत आणि

साहसांत खुशाल अर्पण करतात, आणि सर्व जनतेचे धन्यवाद मिळवितात.

वैश्य लोक शेती आणि व्यापार-व्यवहार करतात; धन कमवितात, आणि जगाच्या हितार्थी कार्ये करण्यासाठीं तें धन समर्पण करतात. हे वैश्य लोक संग्रह करण्यांत कुशल असतात आणि दान करण्यांत शूर असतात. त्यांतच त्यांच्या यशाचें रहस्य आहे.

चौथा प्रकार कर्मवीरांचा आहे. त्यास शूद्र म्हटलें आहे. अनेक हुन्नर आणि कारागिरीचीं कार्ये करणें हें त्यांचें कर्तव्य आहे. विविध प्रकारचीं कुशलतेचीं कामें करून ते अनेक सुखसाधनें निर्माण करतात. सर्व अन्य लोकांस त्यांच्या कारागिरी-कौशल्यामुळें सुखसाधनें प्राप्त होतात. जे लोक या चार वर्गांत समावले जात नाहींत त्यांस अवर्गीकृत पंचम वर्गांत समावण्यांत येतें. असे पांच प्रकारचे पंचजन आहेत. या पंचजनांनींच गांव, शहर, नगर, पत्तन अथवा राष्ट्र बनतें. ह्याच ग्रामसभा, नगरसमिति, राष्ट्रसभा आणि आमंत्रण-परिषदा होत.

जेथें सभा असते तेथें अध्यक्ष, मंत्री वगैरे हुद्देदार असणारच. यामुळेंच ग्रामसभेंत सरपंच, राष्ट्रसमितींत राष्ट्रप्रमुख, आणि मंत्रीमंडळांत मुख्यप्रधान (मंत्री) असणें स्वाभाविक आहे. घरांत ज्याप्रमाणें घराचा स्वामी असून त्याच्या तंत्रानें घर चालतें त्याप्रमाणें सभेला नियामक हा असणें आवश्यक आहे. पुढें युद्ध उद्भवलें असतां नियुक्त सेनानायक सेनेच्या विशेष पाठबळावर स्वतःच अध्यक्ष अथवा शासक, राजा, किंवा महाराजा होतो. अथवा प्रजाजन ज्यास राज्याचा प्रमुख म्हणून निवडतात तोच प्रसंगीं स्वतःचें बल वाढवून स्वयंशासक राजा बनतो. अशा राजासंबंधीं येथें कांहीं सांगणें अप्रस्तुत होय. येथें फक्त ग्रामसभा, राष्ट्रसमिति आणि मंत्रीमंडळ प्रजाजनांनीं निवडलेल्या प्रतिनिधींचेंच कसे बनतें त्याचें वर्णन दिलें आहे. वाचकांनीं ही व्यवस्था अभ्यासावी आणि स्वतःचा गांव, प्रांत-देश आणि राष्ट्र यांत प्रजेनें निवडलेल्या प्रतिनिधींचीच शासक संस्था निर्माण व्हावी असा प्रयत्न करावा. त्यायोगानेंच त्यांची सर्वांगपूर्ण उन्नति सिद्ध होईल.

राष्ट्री देवी

कांड ४, सूक्त ३०

(ऋषिः- अथर्वा । देवता - सर्वरूपा सर्वात्मिका सर्वदेवमयी वाक्)

अहं रुद्रेभिर्वसुभिश्चराम्यहमादित्यैरुत विश्वदेवैः ।
अहं मित्रावरुणोभा बिभर्म्यहमिन्द्राग्नी अहमश्विनोभा ॥ १ ॥
अहं राष्ट्री संगमनी वसूनां चिकितुषी प्रथमा यज्ञियानाम् ।
तां मा देवा व्यदधुः पुरुत्रा भूरिस्थात्रां भूर्यावेशयन्तः ॥ २ ॥

अर्थ— (अहं) मीं परमात्मशक्ति (रुद्रेभिः वसुभिः आदित्यैः विश्वेदेवैः चरामि) रुद्र, वसु, आदित्य आणि सर्व देवांसह चालतें. (अहं उभा मित्रावरुणा बिभर्मि) मीं दोघांस-मित्र आणि वरुणांस धारण करतें. आणि (अहं इन्द्राग्नी, अहं उभा अश्विना) मी इन्द्र आणि अग्नि तसेंच दोघां अश्विनौंना धारण करतें. (१)

(अहं राष्ट्री) मीं प्रकाशक शक्ति (वसूनां संगमनी) वसूंस प्राप्त करविणारी आणि (चिकितुषी) ज्ञान देणारी आहें, त्यामुळें (यज्ञियानां प्रथमा) सर्व पूजनीयांत मीं प्रथम पूजेस योग्य आहें. (तां भूरिस्थात्रां मां) या प्रकारें विविध प्रकारें स्थिर झालेल्या मला (भूरिः आवेशयन्तः देवाः) पुष्कळ प्रकारच्या आवेशांस प्राप्त होणारे देव (व्यदधुः) विशेष प्रकारें धारण करतात. (२)

अहमेव स्वयमिदं वदामि जुष्टं देवानामुत मानुषाणाम् ।
यं कामये तं तमुग्रं कृणोमि तं ब्रह्माणं तमृषिं तं सुमेधाम् ॥ ३ ॥
मया सोऽन्नमत्ति यो विपश्यति यः प्राणति य ईं शृणोत्युक्तम् ।
अमन्तवो मां त उप क्षियन्ति श्रुधि श्रुत श्रद्धेयं ते वदामि ॥ ४ ॥
अहं रुद्राय धनुरा तनोमि ब्रह्मद्विषे शरवे हन्तवा उ ।
अहं जनाय समदं कृणोम्यहं द्यावापृथिवी आ विवेश ॥ ५ ॥
अहं सोममाहनसं बिभर्म्यहं त्वष्टारमुत पूषणं भगम् ।
अहं दधामि द्रविणा हविष्मते सुप्राव्याऽ यजमानाय सुन्वते ॥ ६ ॥
अहं सुवे पितरमस्य मूर्धन्मम योनिरप्स्व१न्तः समुद्रे ।
ततो वि तिष्ठे भुवनानि विश्वोतामूं द्यां वर्ष्मणोप स्पृशामि ॥ ७ ॥
अहमेव वात इव प्र वाम्यारभमाणा भुवनानि विश्वा ।
परो दिवा पर एना पृथिव्यैतावती महिम्ना सं बभूव । ॥ ८ ॥

अर्थ— (देवानां उत मानुषाणां जुष्टं) देव आणि मनुष्य यांना स्वीकार करण्यास योग्य (इदं) हें भाषण (अहं स्वयं एव वदामि) मीं स्वतःच बोलतें. (यं कामये) ज्याला मीं योग्य समजतें (तं तं उग्रं कृणोमि) त्याला त्याला मीं उग्र वीर करतें आणि (तं ब्रह्माणं तं ऋषिं तं सुमेधां) त्यास मीं ब्रह्मा, ऋषि अथवा त्यासच उत्तम बुद्धिमान् करतें. (३)

(यः विपश्यति) जो अशा विशेष दृष्टीनें पहातो (सः मया अन्नं आत्ति) तो माझ्या कृपेनें अन्न खातो. (यः प्राणाति) जो श्वास घेतो आणि (यः ईं उक्तं शृणोति) जो हें भाषण ऐकतो तें सर्व माझ्या शक्तिमुळेंच; जे (मां अमन्तवः) मला न मानणारे आहेत (ते उपक्षयन्ति) विनाश प्राप्त करून घेतात. हे (श्रुत) ऐकणाऱ्या ! (श्रुधि) ऐक. (ते श्रद्धेयं वदामि) तूं श्रद्धा बाळगावीस असा हा योग्य उपदेश मीं तुला करीत आहें. (४)

(ब्रह्म-द्विषे शरवे हन्तवै उ) ज्ञानाचा द्वेष करणाऱ्या, मारफाड करणाऱ्यांचा नाश करण्यासाठीं (अहं रुद्राय धनुः आतनोमि) मीं रुद्रासाठीं धनुष्य खेंचतें, (अहं जनाय समदं कृणोमि) मीं मनुष्यासाठीं आनंद देणारे पदार्थ उत्पन्न करतें, (अहं द्यावा-पृथिवी आविवेश) मीं द्यावापृथिवींत प्रवेश केला आहे. (५)

(अहं आहनसं सोमं बिभर्मि) प्राप्त करण्यास योग्य अशा सोम राजास मीं धारण करतें. (अहं त्वष्टारं उत पूषणं भगं) मीं त्वष्टा आणि पूषास धारण करतें. (अहं हविष्मते सुन्वते यजमानाय) हवन करणाऱ्या आणि सोम रस काढणाऱ्या यजमानासाठीं (सुप्राव्या द्रविणा दधामि) उत्तम रक्षण करण्यास योग्य धन देतें. (६)

(अस्य मूर्धन् पितरं सुवे) मीं त्याच्या शिरावर रक्षकास नेमतें. (मम योनिः समुद्रे अप्सु अन्तः) माझें मूलस्थान प्रकृतीच्या समुद्रजलांत आहे. (ततः विश्वा भुवनानि वितिष्ठे) तेथून सर्व भुवनांत विशेष प्रकारें मीं स्थित झालेली आहें. (उत वर्ष्मणा अमूं द्यां उपस्पृशामि) मीं माझ्या स्वतःच्या महात्म्यानें त्या द्युलोकास स्पर्श करतें. (७)

(विश्वा भुवनानि आरभमाणा) सर्व भुवनांचा प्रारंभ करणारी (अहं एव वातः इव प्रवामि) मींच वायुप्रमाणें पसरतें आणि (दिवा परः) द्युलोकाच्या पलिकडे आणि (एना पृथिव्यै परः) या पृथ्वीच्याहि पलिकडे (महिम्ना एतावती संबभूव) स्वतःच्या महत्त्वानें इतकी विशाल झालें आहे.

राष्ट्री देवी

राष्ट्री देवी

' राष्ट्री देवी ' हें परमात्म्याच्या प्रचंड तेजस्वी शक्तीचें नांव आहे. ही शक्ति स्वतःच स्वतःचें महात्म्य वर्णन करीत आहे, असें काव्यमय वर्णन या सूक्तांत आहे. तिसऱ्या मंत्रांत म्हटलें आहे कीं, (**अहं एव स्वयं इदं वदामि**) मीं स्वतःच हें सांगत आहें. त्यामुळें यांतील वर्णन इतर सूक्तापेक्षां विशेष महत्त्वाचें आहे, ही गोष्ट स्पष्टच आहे. वाचकांनीं या दृष्टीनें या सूक्ताचें मनन करावें. हें सूक्त परमात्मशक्तीचें वर्णन करीत असल्यानें या सूक्ताचे आध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक अर्थ संभवनीय आहेत. आधिदैविक अर्थ अग्नि, इंद्र इत्यादि देवतां-संबंधीं होऊं शकतो. तो अर्थ या मंत्रांचा अर्थ करतांनाचा आम्हीं दिला आहे. परमात्म्याची शक्ति अग्नि, इंद्र, अश्विनौ देव वगैरे सृष्टयंतर्गत महाशक्तींत प्रकाशित होत आहे. हा भाव आधि-दैविक अर्थात् मुख्यत्वें आहे. वाचकांनीं हा अर्थ पूर्व स्थळीं पहावा. आतां येथें आध्यात्मिक आणि आधिभौतिक अर्थ देत आहोंत. आध्यात्मिक अर्थ आपल्या शरीरामध्यें लागू करावयाचा असतो आणि आधिदैविक अर्थ जेथें परमात्म्याच्या शक्तीचा संबंध दिसतो व आध्यात्मिक अर्थ जीवात्म्याच्या शक्तीचा संबंध पहावयाचा असतो तेथें पहावा. आतां आध्यात्मिक अर्थ पाहूं—

आध्यात्मिक भावार्थ

' मीं जीवात्म्याची शक्ति आहें, मीं (**रुद्रेभिः**) प्राणांसह (**वसुभिः**) निवास करणाऱ्या जलादि शारीरिक धातुरसांसह (**आदित्यैः**) आदान शक्तींसह तसेंच (**विश्वेदेवैः**) सर्व इंद्रियांबरोबर राहून त्यांचे व्यवहार चालविते. मीं शरीराच्या (**मित्रावरुणौ**) सौर आणि सोम शक्ति म्हणजे उष्णताजन्य आग्नेय आणि रसात्मक शक्तींना धारण करतें. मीं (**इन्द्र-अग्नी**) जीवन विद्युत् आणि शरीराची उष्णता कायम ठेवतें आणि मींच (**अश्विना**) दोन्ही प्राण आणि अपानास चालवितें. (१) मीं शरीराची (**राष्ट्री**) प्रकाशशक्ति आहें. म्हणजे माझ्या प्रभावाच्या कारणानें या देहांत तेजस्विता स्थिर रहाते. मींच येथें (**वसूनां संगमनी**) रसरक्तादि विविध धातुरसांस उत्पन्न करून शरीर सुरक्षित ठेवतें. मींच (**चिकितुषी**) ज्ञान देणारी आहें त्यामुळें मीं येथें अध्यात्म यज्ञांत (**यज्ञि-यानां प्रथमा**) पूजनीयांत सर्व प्रथम पूजा करण्यास योग्य आहें. मीं (**भूरि-स्था-त्रां**) विविध अवयवांत आणि इंद्रियांत राहून शरीराचें रक्षण करतें. आणि (**आवेशयन्तः देवाः**) माझ्या प्रवेशामुळेंच जणुं काय सर्व इंद्रियें (**मां व्य-दधुः**) मलाच विविध प्रकारें धारण करतात; आणि माझ्या शक्तिनेंच स्वतःचीं कार्यें करण्यांत शक्तिशाली होतात. (२) देव काय अथवा मनुष्य काय माझ्या आत्मशक्तीचेंच महत्त्व गातात. मी स्वतःच हें माझें वर्णन करीत आहे. ज्याच्यावर मी प्रसन्न होतें तो मनुष्य उग्रवीर, ब्राह्मण, ऋषि आणि ज्ञानी महात्मा होतो. (३) मनुष्य खातो, पहातो, श्वासोच्छ्वास करतो, शब्द ऐकतो तें सर्व (**मया**) माझ्या शक्तीच्या सहा-य्यानेंच करूं शकतो. जे लोक मला मानीत नाहींत त्यांचा नाश होतो. सर्व लोकांनीं माझें हें भाषण ऐकून माझ्या आत्मशक्तीवर श्रद्धा ठेवावी. श्रद्धेनेंच माझ्या शक्तीचा त्यांना लाभ होतो. (४) ज्ञानविरोधी घातक विचार दूर करण्यासाठीं मीं आत्मशक्ति होऊन (**रुद्राय**) प्राणास प्रेरणा करतें. मींच मनुष्यास आनंद आणि हर्ष देतें. तात्पर्य या शरीरांत (**द्यौः**) मस्तकापासून आरंभ करून (**पृथिवी**) पायापर्यंत मीं शक्तिरूपानें पसरलेली आहें. (५) मीं प्राप्त करण्यास योग्य (**सोमं**) अन्नास येथें धारण करतें. मींच (**त्वष्टा**) भेदक आणि (**पूषा**) पोषक शक्तींस शरीरांत धारण करतें. मीं (**हवि**) उत्तम अन्न आणि रस स्वीकारणाऱ्या आणि या शरीररूपीं यज्ञशाळेंत शत सांवत्सरिक सत्र करणारांस उत्तम यश देतें. (६) मीं या शरीरावर रक्षक-शक्तीस नियुक्त करतें. येथें हृदयांत, त्यांतील जीवनरसांत रहातें. तेथून प्रत्येक अवयवांत कार्य करतें आणि वर मस्तकापर्यंत फैला-वून रहातें. (७) सर्व इंद्रियें आणि अवयवांस उत्पन्न करीत वाऱ्याप्रमाणें मीं पसरतें आणि या शरीरांत डोक्यापासून पाया-पर्यंत स्वतःचा महिमा पसरवितें. (८)

अध्यात्मवर्णनाचें मनन

पूर्वोक्त मंत्राचा हा आध्यात्मिक आशय आहे. जो आशय आपल्या आंतरिक शक्तिरूपानें असतो त्यासच आध्यात्मिक म्हणतात. मंत्रामध्यें जें दैवतवाचक शब्द आहेत तेच मनुष्या-मधील आंतरिक विविध शक्तींचे वाचक असतात. त्यांस आंतरिक शक्तींचे बोधक मानल्यास आध्यात्मिक अर्थ समजूं शकतो. वाच-कांनीं या दृष्टीनें आध्यात्मिक अर्थासाठीं या सूक्ताचें मनन करावें. वरील आध्यात्मिक अर्थाचा विचार केल्यानें वाचकांस

आपोआपच ध्यानीं येईल की कोणत्या शब्दाचा कसा अर्थ झाला आहे. आतां या सूक्ताचा आधिभौतिक आशय पाहूं. मानव अथवा प्राणी संघाच्या बाबतींत जो अर्थ लागू पडतो तोच आधिभौतिक अर्थ होय.

आधिभौतिक भावार्थ

' मीं राष्ट्रशक्ति (**रुद्रेभिः**) वीर (**वसुभिः**) धनिक (**आदित्यैः**) विद्या प्रकाशक विद्वान् आणि (**विश्वदेवैः**) सर्व ज्ञान्यांसह रहातें. मीं दोघांस (**मित्रावरुणौ**) मित्रजन आणि वरिष्ठ लोकांस (**इन्द्र-अग्नी**) शूरवीर आणि ज्ञानी तसेंच (**अश्विनौ**) दोन्ही प्रकारच्या अश्विनीकुमारांस म्हणजे वैद्यांस राष्ट्रांत धारण करतें. (१) मीं राष्ट्रशक्ति आहें. मींच सर्व धन आणि धनिकांना एकत्रित करतें. मीं राष्ट्रशक्ति (**चिकितुषी**) ज्ञान वाढविणारी आहें. पूजनीयांमध्यें मीं मुख्य आहें. मीं राष्ट्राच्या अनेक स्थानांत (**भूरि-स्था-त्रां**) राहून राष्ट्राचें रक्षण करतें. या माझ्या राष्ट्रशक्तिद्वारा (**आवेशयन्तः देवाः**) आवेश म्हणजे स्फुरणानें प्राप्त करून सर्व विद्वान् लोक जणूं काय मलाच विशेष प्रकारें धारण करीत आहेत. (२) मीं ज्याप्रमाणें देवजनांस त्याप्रमाणें सामान्य मनुष्यांसहि सेवनीय आहें म्हणजे सर्वांनीं माझी राष्ट्रशक्ति धारण करावी. मीं स्वतःच सांगतें की ज्याच्यावर मीं प्रसन्न होतें तो उग्रवीर, ज्ञानी, ऋषि अथवा बुद्धिमान् मनुष्य होतो. (३) राष्ट्रांत जीं मनुष्यें अन्नाचा भोग घेतात, पहातात, ऐकतात अथवा श्वासोच्छ्वास करतात ते सर्व माझ्या शक्तीनेंच करतात. (**मां अमन्तवः**) माझ्या राष्ट्रशक्तीचा अपमान करणारा अथवा मला मान न देणारा नाश प्राप्त करून घेतो. हे लोक हो ! ही गोष्ट तुम्हीं श्रद्धेनें ऐका त्यांतच तुमचें कल्याण आहे. (४) (**ब्रह्म-द्विषे शरवे हन्तवै**) ज्ञान प्रचार करणाऱ्या मत्सरी आणि मार फाड करणाऱ्या दुष्टांचा नाश करण्यासाठींच मीं (**रुद्राय धनुः आतनोमि**) वीर पुरुषांजवळ शस्त्रास्त्रें सिद्ध ठेवतें. माझ्या कृपेनेंच राष्ट्रांतील लोक आनंदांत असतात. जणूं काय मीं राष्ट्रशक्ति पृथ्वीपासून द्युलोकापर्यंत पसरलेली आहें. (५) मीं राष्ट्रशक्तीच प्राप्त करण्यास योग्य (**सोमं**) सोम इत्यादि वनस्पतींचें अन्न धारण करतें. (**अहं त्वष्टारं**) मीं कारागीरांस आणि (**पूषणं भगं**) पोषणकर्त्या धनवानांस राष्ट्रांत धारण करतें. जे (**हविष्मते यजमानाय**) अन्नादिद्वारां यज्ञ करणारे सज्जन असतील त्यांस मीं योग्य प्रमाणांत धन देतें. (६) मींच राष्ट्रशक्ति (**अस्य मूर्धन् पितरं सुवे**) या राष्ट्राचें रक्षण करणाऱ्याला (रक्षण करण्यासाठीं) उत्पन्न करतें. माझी उत्पत्ति (**सं+उत्+द्रे**) एक होऊन उत्कर्षासाठीं जे राष्ट्रीय प्रयत्न करण्यांत येतात त्या प्रयत्नांतच होते. येथें मीं उत्पन्न होतें आणि नंतर राष्ट्रांतील कोनाकोपऱ्यापर्यंत पसरतें. (७) राष्ट्रांतील सर्व संस्थांचा मीं आरंभ करतें, आणि त्या चालवितें. जणूं काय एकाद्या प्रचंड वावटळीप्रमाणें माझा संचार सर्वत्र होतो असतो, इतका की वरपासून खालपर्यंत माझाचा संचार सर्वत्र असतो. असें माझें महात्म्य आहे. (८) '

राष्ट्रीय अर्थाचें मनन

याप्रमाणें या सूक्ताचे आध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक असे तीनहि भावार्थ येथें दिले आहेत. वाचकांनीं तीन्हींची तुलना करून बोध प्राप्त करून घ्यावा. या अर्थांतून वैयक्तिक आणि राष्ट्राविषयीं जास्त उत्तम उपदेश प्राप्त करून घेतला पाहिजे, कारण मनुष्याचें कर्मक्षेत्र हेंच आहे. या मंत्रांतील शब्दांचे अर्थ तिनही ठिकाणीं कशा प्रकारचा अर्थ दाखवितात तें खालील कोष्टकावरून ध्यानीं येईल.

मंत्र-शब्द	आधिदैविक भाव	आधिभौतिक भाव	आध्यात्मिक भाव
रुद्राः	मेघस्थानांतील विद्युत्	वीर	प्राण
वसुः	पृथिव्यादि अष्टवसु	धन आणि धनिक	शरीरस्थ धातु
आदित्यः	सूर्य	ज्ञानप्रकाशक	मस्तक
विश्वेदेवाः	सर्व प्रकाशमान अग्नि वगैरे देवता	सर्व कर्मचारीगण	सर्व इंद्रियें
मित्रः	सूर्य	प्रकाशक विद्वान्	नेत्र
वरुणः	चंद्र	शांत ज्ञानी	मन
इन्द्रः	विद्युत्	शूर	जागृत मन
अग्निः	अग्नि	वक्ता	वाणी
अश्विनौ	अश्विनी	वैद्य	श्वास, उच्छ्वास
त्वष्टा	देव-शिल्पी	कारागीर	विभाजक शक्ति

मंत्र-शब्द	आधिदैविक भाव	आधिभौतिक भाव	आध्यात्मिक भाव
पूषा	पोषक दैवीशक्ति	पोषणकर्ता	पोषकशक्ति
समुद्रः	प्रकृति (निसर्ग)	लोकांची हालचाल	हृदय
द्यौः	द्युलोक	ज्ञानी	डोकें
पृथिवी	भूलोक	सेवक	पाय

मंत्रांतील शब्दांचे याप्रमाणें निरनिराळे अर्थ निरनिराळ्या स्थळीं होतात. हे अर्थ समजले तरच मंत्राचा पूर्ण सुसंगत अर्थ जाणता येईल. व्यक्तिमध्यें गुणरूपानें जे अर्थ तेच राष्ट्रांत गुणी जनरूपानें पहावयाचे आणि विश्वांत वर सांगितलेल्या देवांसंबंधीं घ्यावयाचे. ज्याप्रमाणें व्यक्तींत शौर्याचा गुण आहे त्यामुळें शत्रूस दूर करतां येतें; याच गुणानें गुणवान झालेले शूर क्षत्रिय वीर राष्ट्रांत होतात. त्यांच्यांत शौर्यगुण प्राधान्य आहे. त्याचेंच रूप विश्वांत इन्द्रशक्ति आहे, जी विद्युत् रूपें दिसते. व्यक्तीमध्यें शौर्य, राष्ट्रांत शूर आणि विश्वांत विद्युत् या सर्व वैदिक इन्द्रदेवतेच्या विभूति आहेत. वाचक जर याप्रमाणें सर्व देवतांच्या विभूति जाणून घेतील तर त्यांस एकाच वेदमंत्राच्या द्वारें सर्व भूमिकांचें ज्ञान होऊन त्यांपासून कोणता बोध घ्यावयाचा त्याचें पूर्ण ज्ञान होईल.

या सूक्तांत राष्ट्री शब्द आहे. राष्ट्र जिच्यामुळें टिकून रहातें, ज्या शक्तीच्या आधारें राष्ट्र उत्तम स्थितींत रहातें, ज्या शक्तीनें राष्ट्राची अभिवृद्धि होते, आणि राष्ट्र अभ्युदययुक्त होतें, त्या शक्तीचें नांव राष्ट्री असें आहे. ही राष्ट्रशक्ति आदित्य, रुद्र, वसु आणि विश्वेदेवांसह राहते, असें प्रथम मंत्राचें सांगणें आहे. हे देवतावाचक शब्द क्रमशः ' ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र ' म्हणजे कारागिरांना उद्देशून वापरलेले आहेत. ब्रह्मवर्चस संपूर्ण आदित्य ब्राह्मण वर्ण सुचवितो. रुद्र, वीर, भद्र इत्यादि नांवें शौर्याविषयीं सुप्रसिद्ध आहेत. म्हणजे तीं क्षत्रियवर्ण सुचवितात. वसु शब्द धनवान् आणि धनासाठीं प्रसिद्ध आहे. त्यामुळें तो वैश्यांचा सूचक आहे, आणि विश्वेदेव शब्द सर्व इतर व्यवहारकर्त्यांचा सूचक आहे. देवतांमध्यें या शब्दांनीं चातुर्वर्ण्याचा बोध होतो, आणि या देवतांच्या मंत्रांनीं चातुर्वर्णाच्या धर्मकर्माचा बोध होऊं शकतो. ही राष्ट्री शक्ति या लोकांत राहते. त्यांच्यांत कार्य करते आणि त्यांच्यांतच प्रकट होते.

ही राष्ट्रीय शक्ति (**अग्निः=ब्रह्म**) ब्राह्मण, (**इन्द्रः=क्षत्र**) क्षत्रिय, (**मित्र**) सहायक, (**वरुणो-राजा**) राजपुरुष आणि (**अश्विनौ=अश्विनी कुमार**) आयुर्वेदांतील विद्वानांस आश्रय देवून त्यांचें धारण आणि पोषण करते. राष्ट्रांत त्यांचें पोषण करून त्यांच्याद्वारां अन्य साधारण जनांस सुख पोंहोचविते, हा राष्ट्रीय शक्तीचा महिमा याप्रमाणें पहाण्यासारखा आहे.

ही राष्ट्रीय शक्ति (**वसूनां संगमनी**) सर्व प्रकारच्या धनधान्यांस प्राप्त करविते. राष्ट्रीय शक्तीचा ज्या देशांत उत्कर्ष होऊं लागतो, तेथें त्या शक्तीच्या विकासाच्या कारणानें सर्व प्रकारची संपत्ति एकत्रित होऊं लागते. तसेंच ज्या देशांत राष्ट्रीय शक्तीचा विकास बंद होतो, त्या देशांत दरिद्रता वाढूं लागते. पतित आणि उन्नत राष्ट्राचा दारिद्र्य आणि संपन्नता यांच्याशीं अशा प्रकारचा संबंध पहाण्यासारखा आहे. वाचकांस इतिहासांत त्याची भरपूर उदाहरणें पहावयास मिळतील.

या राष्ट्रशक्तीचा मनुष्यांत आविर्भाव म्हणजे प्रवेश होतो. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि निषाद जेव्हां राष्ट्रभक्तीनें एकत्रित होऊन महाराष्ट्रीय पुरुषार्थास प्रवृत्त होतात तेव्हां या राष्ट्रीदेवीचा संचार मनुष्यांत होतो. (**भूरि+ आवेशयन्तः**) विशेष प्रकारचा दैवी आवेश जेव्हां मनुष्यांत संचरतो आणि अशा दैवी स्फुरणानें युक्त लोक संख्येनें कमी असले तरी ते महान् कार्य करून दाखवितात. हा या राष्ट्री देवीचा चमत्कार आहे; म्हणून तर सर्व तिला (**यज्ञियानां प्रथमा**) पूजनीयांत प्रथम पूजा करण्यायोग्य समजतात. चारी वर्ण तिची पूजा स्वतःच्या अंतःकरणांत करतात आणि राष्ट्रभक्तीनें स्वतःचें हृदय परिपूर्ण करतात. वेदांत इतरत्र सुद्धां म्हटलें आहे कीं—

इळा सरस्वती मही तिस्रो देवीर्मयोभुवः ।
बर्हिः सीदन्त्वस्रिधः ॥ (ऋग्वेद १।१३।९)

' मातृभाषा, मातृसभ्यता आणि (**मही**) मातृभूमि या तीन देवी कल्याण करणाऱ्या आहेत. त्यामुळें त्यांस विस्मरणावांचून अंतकरणांत स्थान प्राप्त व्हावयास हवें. ' म्हणजे प्रत्येक मनुष्याच्या मनांत या तीन देवींसाठीं योग्य आणि सन्माननीय स्थान प्राप्त व्हावें आणि या तीन देवींचा आदर लोकांनीं करूं नये असें कधीं न व्हावें. या मंत्राच्या उपदेशाप्रमाणें मातृभूमीची भक्ति प्रत्येकानें करावी; आणि हाच उपदेश सूक्ताच्या दुसऱ्या मंत्रांत ' (**प्रथमा यज्ञियानां राष्ट्री**) ही राष्ट्रशक्ति पूजनीयांत सर्व प्रथम पूजा करण्यास योग्य आहे ' या शब्दांनीं

सांगितला आहे. जर या जगांत सुखपूर्ण जीवन व्यतीत करण्याची इच्छा असेल तर या राष्ट्रदेवीची पूजा केली पाहिजे. आणि या देवीसाठीं प्रसंगोपात् स्वतःचें बलिदान करण्यासहि तयार असलें पाहिजे.

लोक जेव्हां, राष्ट्रदेवीस प्रसन्न करण्यास स्वतःचें सर्वस्व अर्पण करण्यास तयार होतात तेव्हां ती प्रसन्न होते. ज्ञानीजन या राष्ट्रदेवीसाठीं स्वतःचें सर्वस्व अर्पण करण्यास तयार असतात. त्यामुळेंच असे त्यागी पुरुष (**सः अन्नं अत्ति**) अन्नभोग प्राप्त करतात, असें चतुर्थ मंत्रांत म्हटलें आहे.

मातृभूमीची (राष्ट्रीदेवीची) जर योग्य उपासना केली नाहीं अथवा तिचा अपमान केला, अथवा योग्य सन्मान न केला तर अशा (**अ-मन्तवः उपक्षयन्ति**) राष्ट्रीय शक्तीचा अपमान करणारे लोक त्वरित नाश पावतात. या गोष्टीवर (**श्रद्धेयं वदामि**) विश्वास ठेवणें योग्य होईल; आणि त्याप्रमाणें होतेंहि. वाचक यावरून राष्ट्रभक्तीचें महत्त्व काय आहे तें जाणून कधींहि राष्ट्रद्रोहाचें कार्य करणार नाहींत आणि नेहमीं राष्ट्रभक्ति करतां करतां आणि राष्ट्रासाठीं आत्मसर्वस्व समर्पण करून स्वतःच्या जीवनाचा सर्वमेध यज्ञ करून तद्द्वारा विजयी आणि यशस्वी होवोत.

राष्ट्रांत जे दुष्ट लोक असतात ते सज्जनांस क्लेशकारक होतात. तसेंच राष्ट्राबाहेर जे दुष्ट लोक असतात ते सुद्धां राष्ट्रावर हल्ला करून, हाणामारी, रक्तपात करतात. त्यांचा नाश करण्यासाठीं राष्ट्रांतील (**रुद्राय**) वीरपुरुषांजवळ (**धनुः**) विविध प्रकारचीं शस्त्रास्त्रें तयार ठेवण्याचें कार्य राष्ट्रशक्तीचेंच आहे. जें राष्ट्र जिवंत आणि जागृत आहे तें स्वतःच्या शत्रूंच्या नाशासाठीं आवश्यक शस्त्रास्त्रें नेहमीं तयार ठेवतेंच आणि योग्य प्रसंगीं योग्य रीतीनें त्यांचा उपयोग करतें, आणि विजय मिळवतें. अभ्युदय प्राप्त करूं इच्छिणाऱ्या राष्ट्रानें स्वतःच्या रक्षणाविषयीं जागृत रहाणें अत्यंत जरुरी आहे, तसेंच तें योग्यहि आहे.

ही राष्ट्रशक्ति (**त्वष्टारं**) कारागीरांचें पोषण करते. या प्रकारें जीं मनुष्यें इतरजनांचें पालनपोषण करतात (त्यांचें) (**पूषणं**) पोषकजनांचें अथवा त्या (**भगं**) भाग्यवान् मनुष्यांचें उत्तम प्रकारें धारण पोषण करते. अशा पुरुषांस कधीं अवनतींत राहूं देत नाहीं तर त्यांस उन्नत करते. अशा प्रकारें जे लोक स्वतःच्या धनधान्याच्या योगानें (**यजमान**) यज्ञ करतात म्हणजे जनतेसाठीं, जनतेच्या कल्याणासाठीं स्वतःचें ऐश्वर्य, संपत्ति, धनधान्य अर्पण करतात, त्यांस धनाची न्यूनता कधींहि येत नाहीं. अर्थात् ते जितकें द्रव्य वेंचतात त्यापेक्षां अधिक (**द्रविणा दधामि**) धन ते प्राप्त करतात. पुनः ते अधिक दान करतात आणि त्यांचें धन त्या प्रमाणांत वाढत रहातें. याप्रमाणें यज्ञद्वारें जनतेचें सुख वाढत रहातें.

राष्ट्रास कोणी पालक निर्माण करून त्यास राजगादीवर स्थापावा (**अस्य मूर्धन् पितरं सुवे**) हें कार्य राष्ट्रशक्तीच करते. म्हणजे जिवंत आणि जागृत राष्ट्रांतील लोक स्वतःच्या राज्यशासन व्यवस्थेसाठीं सुयोग्य राष्ट्राध्यक्ष-राज्याध्यक्ष स्वतःच निवडतात आणि त्यास राज्यावर नियुक्त करतात. या राष्ट्रशक्तीचें उत्पत्तिस्थान (**समुद्रे अन्तः**) राष्ट्रीय चळवळीच्या महासागरांत असते. ' (**सं**) एकत्रित होऊन (**उत्**) उत्कर्षासाठीं (**द्रु**) गति करणें अथवा प्रयत्न करणें ' (समुद्र) असें राष्ट्रीय चळवळीचें स्वरूप असतें. त्याचें नांव (**सं+उत्+द्रु**) म्हणजे समुद्र आहे. या चळवळींत राष्ट्रशक्ति प्रगट होते, आणि प्रत्येकाच्या अंतःकरणांत पसरते. जणूंकाय याप्रमाणें ती (**विश्वा भुवनानि वितिष्ठे**) सर्व भुवनांत संपूर्णपणें पसरते; म्हणजे भूमीपासून स्वर्गापर्यंत विस्तार पावते, दरेक कार्यांत प्रगट होते, प्रत्येक हालचालींत ती अंतर्गत असतेच. असें तिचें महात्म्य आहे.

ज्यावेळीं जनतेंत राष्ट्रशक्तीचा संचार होतो त्यावेळीं अशी प्रतीति होते कीं राष्ट्रशक्तिरूप वावटळीचा (**वात इव प्रवामि**) जोरदार प्रवाह चालू आहे आणि तिचा वेग रोकणें अशक्य आहे. या शक्तीचा वेग एवढा प्रचंड असतो कीं (**दिवः परः**) द्युलोकाच्याहि वर आणि (**एना पृथिव्याः परः**) या पृथ्वीच्या पलिकडे तो वेग कार्य करीत आहे असें वाटतें. आकाश, पाताळ या शक्तीनें परिपूर्ण आणि कोणतेंहि स्थान तिच्या वांचून रिकामें नाहीं.

राष्ट्रशक्तीचा महिमा असा आहे. जे त्याचे खरोखर उपासक आहेत ते स्वतःच्या राष्ट्रास अभ्युदयाच्या उच्च शिखरावर स्थापित करतात. हें जाणून वाचकांनीं राष्ट्रभक्तिद्वारें मिळणारी उन्नति प्राप्त करावी आणि पुढील अभ्युदयासाठीं स्वतःस योग्य बनवावें.

राष्ट्रसभेची अनुमति

कांड ७, सूक्त १२

(ऋषिः– शौनकः । देवता – सभा, पितरः, इन्द्रः, मनः ।)

सभा च मा समितिश्चावतां प्रजापतेर्दुहितरौ संविदाने ।
येना संगच्छा उप मा स शिक्षाच्चारु वदानि पितरः संगतेषु ॥ १ ॥
विद्म ते सभे नाम नरिष्टा नाम वा असि । ये ते के च सभासदस्ते मे सन्तु सवाचसः ॥ २ ॥
एषामहं समासीनानां वर्चो विज्ञानमा ददे । अस्याः सर्वस्याः संसदो मामिन्द्र भगिनं कृणु ॥ ३ ॥
यद्वो मनः परागतं यद्बद्धमिह वेह वा । तद्व आ वर्तयामसि मयि वो रमतां मनः ॥ ४ ॥

अर्थ— (सभा च समितिः च) ग्रामसभा आणि राष्ट्रसमिति या दोन्ही (प्रजापतेः दुहितरौ) प्रजेचें पालन करणाऱ्या राजानें पुत्रीप्रमाणें पालन करण्यास योग्य आहेत आणि त्या दोन्ही (संविदाने) परस्परांशीं एकमत होऊन (मा अवतां) माझें राजाचें रक्षण करोत. (येन संगच्छै) ज्यांच्या सहवासांत मी असेन (सः मा उपशिक्षात्) त्यानें मला शिक्षण द्यावें. हे (पितरः) रक्षक हो ! (संगतेषु चारु वदानि) सभामध्यें मीं उत्तम रीतीनें बोलेन. (१)

हे सभे ! (ते नाम विद्म) तुझें नांव आम्हांस माहित आहे. (नरिष्टा नाम वै असि) ' नरिष्टा ' म्हणजे अहिंसक हें तुझें नाम अथवा यश आहे. (ये के च ते सभासदः) जे कोणी तुझे सभासद आहेत (ते मे सवाचसः सन्तु) ते माझ्याशीं–राजाशीं समतेनें भाषण करणारे होवोत. (२)

(एषां समासीनानां) या बसलेल्या सभासदांजवळून (विज्ञानं वर्चः अहं आददे) मीं राजा विशेष ज्ञानरूपी तेज स्वीकारतों. हे इन्द्रा ! (अस्याः सर्वस्याः संसदः) या सर्व सभेचा (मां भगिनं कृणु) मला भागीदार कर. (३)

हे सभासद हो ! (वः यत् मनः परागतं) आपलें मन जें दूर गेलें असेल, (यत् वा इह वा बद्धं) जें त्यांत अथवा या विषयांत गुंतून राहिलें असेल (वः तत् आवर्तयामसि) आपल्या त्या चित्तास मीं पुनः परत वळवून घेतों, आतां आपलें (मनः मयि रमतां) मन माझ्यामध्यें रमो. (४)

भावार्थ— ग्रामसभा आणि राष्ट्रसमिति राष्ट्रांत असल्या पाहिजेत आणि राजानें त्यांचें कन्येप्रमाणें पालन केलें पाहिजे. या दोन्ही सभा एकमताच्या होऊन त्यांनीं राष्ट्रकार्य करावें आणि प्रजेचें रंजन करणाऱ्या राजाचें पालन करावें. राजा ज्या सभासदास राज्यशासनविषयक जी कांहीं सल्लामसलत विचारील त्याविषयीं त्या सभासदानें स्वतःचें योग्य मत राजास सांगावें. राजा आणि अन्य सभासद यांनीं सभेंत सभ्यतेनें वादविवाद करावा. (१)

या लोकसभेचें नांव ' नरिष्टा ' आहे, कारण तिच्या अस्तित्वामुळें राजाचाहि नाश होत नाहीं, आणि प्रजेचाहि नाश होत नाहीं. या सभेचे जे सभासद असतील त्यांनीं आपलीं मतें निःपक्षपातीपणें स्पष्ट शब्दांत सांगावींत. (२)

लोकसभेच्या सभासदांपासून राज्यशासनविषयक विशेष ज्ञान राजा प्राप्त करतो आणि त्यामुळें तो तेजस्वी होतो; म्हणून राजानें अशा सभांपासून राज्यशासनविषयक विशेष ज्ञान अवश्य मिळवावें आणि भाग्यवान् व्हावें.

लोकसभेचें कार्य चालू असतां कोणाहि सभासदाचें लक्ष अन्य कार्याकडे लागलें, तर त्यानें तेथून आपलें मन परत फिरवून राज्यशासनाकडे लावावें हें योग्य होय. सर्व सभासदांनीं आणि राजानें सुद्धां स्वतःच्या राज्यशासनांतच स्वतःचें मन केन्द्रित करावें. (४)

राष्ट्रसभेची अनुमति

राज्यशासनांत लोकांचा सल्ला

ग्रामसभा

गांवाची व्यवस्था लावण्यास एक ग्रामसभा असलीच पाहिजे. गांवानें निवडलेल्या सभासदांनीं या ग्रामसभेचें कार्य करावें. गांवातील जीं जीं कार्यें उदाहरणार्थ आरोग्य, न्याय, शिक्षण, धर्मरक्षण उद्योगवृद्धि इत्यादि असतील तीं सुरळीतपणें चालविणें हें या ग्रामसभेचें कार्य आहे. ही ग्रामसभा स्वतःचीं (गांवाचीं) कामें करण्यास संपूर्णपणें स्वतंत्र (स्वयंपूर्ण) असली पाहिजे. याचा अर्थ असा कीं प्रत्येक गांव अथवा नगर पूर्ण स्वराज्याच्या अधिकारांनीं युक्त असावें !

ज्याप्रमाणें मनुष्य स्वतःची उन्नति साधण्याचें कार्य करण्यास पूर्ण स्वतंत्र असतो, परंतु सार्वजनिक सर्व हितकारी कार्य करण्यास परतंत्र असतो, बरोबर तसेंच प्रत्येक गांव अथवा नगर स्वतःपुरती उन्नति साधण्यास स्वतंत्र आहे, परंतु सार्वदेशिक अथवा सार्वराष्ट्रीय उन्नतीच्या कार्यासाठीं प्रत्येक गांवास राष्ट्रीय नियमांचें बंधन आहेच.

राष्ट्रसभा

ज्याप्रमाणें प्रत्येक गांवासाठीं ग्रामसभा, नगरासाठीं नगरपालिका त्याचप्रमाणें प्रांतासाठीं प्रांतसभा आणि राष्ट्रासाठीं 'राष्ट्रसभा ' असते, नव्हे असलीच पाहिजे, आणि या सभेनें सर्व राष्ट्राचें शासन चालवावें. ग्रामसभेचा अधिकार गांवावर आणि राष्ट्रसभेचा अधिकार राष्ट्रावर असतो. या दोन सभांचा उल्लेख या सूक्तांत केला आहे. ग्रामसभा आणि राष्ट्रसमिति या दोन टोकांचे वर्णन झाल्यानें मधील पायऱ्या नगरपालिका अथवा प्रांतीक सभा वगैरे सभांचें वर्णन झालेंच असें समजणें योग्य होईल, प्रारंभाचें आणि अंताचें ज्ञान झालें म्हणजे मधल्या स्थितीचें ज्ञान आपोआप होतेंच. या सार्वत्रिक नियमानुसार या मंत्रांत ग्रामसभा आणि राष्ट्रसभेचें वर्णन केलेलें असल्यानें सर्व उपसभांचें वर्णन झालेंच आहे असें वाचकांनीं समजावें.

जनसभेचा अधिकार

या प्रजासभेचे (राष्ट्रसभेचे) अधिकार कोणते आहेत ? हा एक विचारणीय प्रश्न आहे. त्यांचें उत्तर या मंत्राचा विचार केल्यानेंच मिळूं शकतें. पहिल्या मंत्रांत म्हटलें आहे—

सभा च समितिः च प्रजापतेः दुहितरौ ॥ (मं. १)

' ग्रामसभा आणि राष्ट्रीयसमिति या दोन्ही प्रजेचें पालन करणाऱ्या राजाच्या दोन कन्या आहेत. ' म्हणजे या दोन्ही सभांचा पिता (उत्पादक) राजा आहे आणि त्याच्या या दोन सभा पुत्री आहेत. हेंच उत्तर त्यांचे अधिकार ठरविण्यास पुरेसें आहे.

पिता कन्येचा जनक आहे परंतु तिचा उपभोग घेणारा नाहीं. कन्या पित्याच्या अधिकारांत कायम रहाणें शक्य नाहीं. कन्येवर अधिकार दुसऱ्या कोणाचा आहे, पित्याचा नाहीं. अशाप्रकारें राजाज्ञेनें ग्रामसभा आणि राष्ट्रसमिति स्थापन होतात. राजाच्या अनुमतीनें या सभांचे सदस्य निवडण्याचे आणि सभा चालविण्याचे नियम तयार होतात. म्हणून राजा या सभांचा पिता, जनक अथवा उत्पादक समजला जातो. तरीसुद्धां उत्पत्ति आणि रक्षण करण्याचा अधिकारच फक्त राजाचा आहे. तो त्या सभांवर स्वामी म्हणून स्वतःचा अधिकार चालवूं शकणार नाहीं. राजा या सभांचा पिता अथवा जनक आहे, परंतु पति अथवा शासक नाहीं. लोकसभा राजाची भोग्य वस्तु नव्हे. राजाच्या अधिकारकक्षेबाहेर अशी लोकसभा स्वतंत्र आहे. या उद्देशानेंच या मंत्रांत म्हटलें आहे कीं—

सभा च समितिः च प्रजापतेः दुहितरौ । (मं. १)

' या दोन्ही सभा प्रजापालक राजाच्या दुहिता आहेत. ' येथें दुहिता शब्द विशेष महत्त्वाचा आहे, श्री यास्काचार्यांची या शब्दाची व्युत्पत्ति अशी आहे—

दुहिता दुरे हिता । (निरु. ३।१।४)

' जी दूर राहिली असतां हितकारक ती दुहिता आहे. ' धर्मपत्नी जवळ ठेवणें योग्य. दुहिता अथवा पुत्री किंवा कन्या दूर ठेवणें योग्य आहे. या व्युत्पत्तिवरून स्पष्ट होतें कीं लोकसभा ही राजाची कन्या असल्या कारणानेंच ती त्यापासून दूर म्हणजे त्याच्या अधिकार कक्षेबाहेर असली पाहिजे. म्हणजे या दोन्ही सभा स्वतंत्र झाल्या. राजाच्या नियंत्रणाबाहेर या दोन्ही सभा आहेत. असा लोकसभेचा अधिकार आहे. लोकसभेचे सभासद पूर्ण निर्भय असले पाहिजेत. सत्यमत प्रदर्शित करण्यांत त्यांनीं राजाची भीति बाळगूं नये. पूर्ण निर्भय होऊन सत्य प्रतिपादनच त्यांनीं करावे हें त्यांस योग्य होय.

या सभांनीं (**संविदाना-ऐक्यमत्यं प्राप्ता**) एक मतानेंच या सर्व राष्ट्राचें शासन अथवा व्यवहार चालविला पाहिजे. सर्व सदस्य एकमताचे न झाल्यास बहुमतानें कार्य करावें. पण ती सुद्धां (बहुमतानें कार्य करणें ही) आपत्तिच समजावी.

कारण वेदाची आज्ञा अशी आहे किं (संविदाना) एकमतानें म्हणजेच सर्वांच्या संमतीनें जो निर्णय होईल तोच राजास बंधन कारक होईल. इतकें महत्त्व लोकसभेच्या सर्व संमतीचें आहे. तसेंच असा निर्णय प्रजेसहि बंधनकारक आहे.

राजाचे पितर

राष्ट्रसमितीचे सभासद हे राजाचे पितर होत. या सूक्तांत राजानें त्यांस 'पितरः' म्हणून संबोधिलें आहे. पहा—

चारु वदानि पितरः संगतेषु । (मं. १)

हे पितर हो ! म्हणजे राष्ट्रसभेच्या सदस्यांनों ! सभेंत मीं योग्य भाषण करीन. म्हणजे सभ्यतापूर्वक भाषण मीं करीन. माझें भाषण कधींहि नियमबाह्य असणार नाहीं. सर्व सभासदांनीं सुद्धां या नियमानुसार भाषणें करावींत. या मंत्रखंडांत राजानें लोकसभेच्या सदस्यांस उद्देशून 'पितरः' शब्द वापरला आहे. हा शब्द येथें विशेष पहाण्यासारखा आहे. लोकसभा आणि राष्ट्रसमिति या राजाच्या कन्या होत असें वर म्हटलें आहे. आतां येथें असें म्हटलें आहे कीं, या सभांचे सदस्य राजाचे पितर आहेत. हें कसें शक्य आहे ? या प्रश्नाचें उत्तर इतकें सांगणें पुरें कीं शब्दांच्या फक्त बाह्यार्थाकडे बघूं नये. शब्दाचा गुह्यभाव अथवा त्याचा मूळ अर्थ घेतला पाहिजे. पितर शब्दाचा अर्थ उत्पादक आहे, तसा रक्षक असाहि आहे. दोन्ही अर्थ येथें लागू पडतात. राष्ट्रसभेचे सभासद राजा निवडून, त्यास राजगादीवर बसवितात म्हणून त्यांस राजाचे उत्पादक, जनक अथवा पित्यासमान असें समजलें पाहिजे. त्याचप्रमाणें राजाचें वर्तन आणि आचरण योग्य असेल तोपर्यंत त्यास ते राजगादीवर राहूं देतील, परंतु जर राजा अनुचित व्यवहार करील तर ते त्यास राज्यावरून पदच्युत करून त्याच्या जागीं दुसरा सुयोग्य राजा स्थापतील. याप्रमाणें राष्ट्रसभेचे सभासद राजाचे रक्षक आहेत म्हणजेच ते सर्व प्रकारें राजाचे पितर म्हटले गेले आहेत.

'पितृदेवो भव' पित्यास देवासमान मानून त्याचा सन्मान कर, ही आज्ञा वेदानुकूल आहे. एवढ्यासाठीं राष्ट्रीय महासभेच्या सभासदांचा राजानें सन्मान करावा हेंच उचित होय. त्यांचा गौरव करावा आणि त्यांचा अपमान होवूं देऊं नये. स्वतः करूं नये. राष्ट्रसभेचा असा अधिकार आहे.

राजाचे शिक्षक

राष्ट्रसभेचे सभासद राजाचे गुरुसुद्धां आहेत. याविषयीं प्रथम मंत्रचरण म्हणतो—

येन संगच्छै सः मा उपशिक्षात् । (मं. १)

'हे गुरुजन हो ! हे राष्ट्रसदस्य हो ! तुमच्यापैकीं ज्याला ज्याला मीं राज्यकारभारांत सल्ला विचारीन त्यानें त्या त्या विषयीं स्वतःचें मत देऊन उत्तम आणि योग्य शिक्षण मला द्यावें.' म्हणजे राजाला योग्य शिक्षण देणारे गुरु राष्ट्रसभेचे सदस्यच आहेत. हे सभासद राजास गुरुस्थानीं होत. '**आचार्य देवो भव**' म्हणजे गुरुजनांचा सन्मान केला पाहिजे. ही आज्ञा वैदिक धर्माची आहे. त्याचप्रमाणें राष्ट्रसभेच्या सदस्यांच्या गौरवाचें रक्षण करणें आणि त्यांशीं पूर्ण आदरयुक्त वर्तन ठेवणें हें राजास उचित होय. राष्ट्रसभेच्या सदस्यांचा तसा अधिकार आहे.

सभासद सत्यवादी असले पाहिजेत

राष्ट्रीयसभा काय किंवा अन्य कोणत्याहि सभेचे सदस्य (**सवाचसः**) योग्य भाषण करणारे म्हणजे वस्तुस्थिति जशी असेल अथवा त्यांचा वैयक्तिक जसा अनुभव असेल तसेंच स्पष्ट आणि सत्य, निर्भय आणि निर्भीडपणानें बोलणारे असले पाहिजेत. एकदां जी गोष्ट सांगितली तीच तसा प्रसंग उपस्थित झाला असतां सांगणारे पाहिजेत. सांगितलेली हकीकत फिरवून कोणाच्या 'हा' शीं 'हा' मिळविणारे अथवा 'जी हुजूर' करणारे तोंडपुजे असतां कामां नये. निर्भयपणें सत्य असेल तेंच राजास सांगणारे असावेत. राष्ट्राचें हित कशांत आहे याचा योग्य विचार करून आपलें तें मत निर्भयपणें सांगून टाकणें, तसें करतांना कोणास न भिणें हें त्यांचें (सभासदांचें) कर्तव्यच आहे. (मं. २)

तेज आणि विज्ञान देणारे

राजतेज राष्ट्रसदस्यांमुळें प्राप्त होतें. याविषयीं तृतीय मंत्र म्हणतो—

एषां समासीनानां वर्चः विज्ञानं अहं आददे (मं.३)

'राष्ट्रसभेच्या या सदस्यांपासून मीं (राजा) (**वर्चः**) तेज आणि (**विज्ञानं**) विशेष ज्ञान पण प्राप्त करतों.' अर्थात् हें विशेष ज्ञान (विज्ञान) राज्यशासनासंबंधींचें होय. प्रजेचें हित कशांत आहे, त्यासाठीं प्रस्तुत समयीं प्रथम कोणती गोष्ट केली पाहिजे, प्रजेस हल्लीं कोणतें दुःख आहे, तें दूर करण्यास काय केलें पाहिजे इत्यादि गोष्टींविषयीं प्रजेच्या प्रतिनिधींकडून योग्य माहिती वेळेवर मिळवून व त्यावर सल्ला मसलत करून राजा जर राज्यशासनाचें कार्य करील तर सर्वांचें हित जरूर होईलच. हें विशिष्ट ज्ञान राष्ट्रसभेच्या सदस्यांनीं राजास द्यावयाचें

आहे आणि राजानें त्यांच्या सल्ल्याप्रमाणें उचित शासन-प्रबंध करून सर्वांचें कल्याण केलें पाहिजे.

याप्रमाणें प्रजेच्या संमतीनें राज्यशासन चालविणारा राजा राज्यावर चिरकाल स्थिर राहूं शकतो आणि पुष्कळच तेजस्वी होतो. या उलट जो राजा स्वतःच्या मर्जीनुरूप लोक प्रतिनिधींच्या सल्ल्याविरुद्ध प्रजेवर जुलुमजबरदस्ती करतो, त्यास प्रजा राज्यावरून पदच्युत करते. राज्यशासनाविषयीं वेदाची आज्ञा अशी आहे.

राजाचें भाग्य

राजाचें संपूर्ण भाग्य, ऐश्वर्य, अधिकार, आणि वर्चस्व, राष्ट्रसभेच्या अनुमतीनेंच होतें, नाहीं तर इतर कोणत्याहि कारणानें राजा हा ' राजा ' म्हणून राहूं शकणार नाहीं. ही गोष्ट राजा स्वतःच कबूल करतो पहा—

अस्याः संसदः मां भगिनं कृणु ॥ (मं. ३)

' या सभेचा मला भागीदार कर. ' म्हणजे या सभेच्या अनुमतीनें वर्तण्यानेंच मीं भाग्यवान होईन. या सभेच्या अनुमतीचा मीं भागीदार होईन म्हणजे सभा जो कांहीं निश्चय (ठराव) करील तो मीं मान्य करीन आणि त्याचप्रमाणें कार्य करीन. त्यांच्याविरुद्ध कोणतेंहि आचरण मीं कधींहि करणार नाहीं. याप्रमाणें जो राजा आचरण करील तो खरोखर भाग्यशाली होईल. यांत कांहीं संशय नाहीं. म्हणजे राजाचें भाग्य प्रजानुरंजनानें वाढतें, एरवीं नाहीं, ही गोष्ट येथें सिद्ध होते.

स्थिरचित्त सभासद

' राष्ट्रसभा, नगर समिति, अथवा कोणत्याहि सभेचे सभासद स्वतःच्या सभेच्या कामांत स्थिरचित्त असले पाहिजेत. कोणाचें मन येथें, कोणाचें अन्य कोठें भटकतें आहे, असें होतां कामा नये. सर्वांनीं स्वतःचें मन सभेच्या कार्यांत स्थिर करून स्वतःची सर्वशक्ति खर्चूनसुद्धां यावच्छक्य तें कार्य निर्दोषपणें करावें. याविषयीं उपदेश पुढील मंत्रांत सांगितला आहे—

यद् वो मनः परागतं यद् बद्धमिह वेह वा।
तद्व आवर्तयामसि ॥ (मं. ४)

' हे सभासद हो ! जर तुमचें मन दूर कोठें गेलें असेल अथवा अन्य कांहीं गोष्टीकडे लागलें असेल तर त्यास मी परत आणतों. ' म्हणजे मन चंचल आहे, तें इतस्ततः धांवत असतें, परंतु दृढ निश्चय करून त्यास कर्तव्यकर्मांत स्थिर केलें पाहिजे. स्वतःची सर्वशक्ति खर्चून स्वतःचें कर्तव्य शक्य तों निर्दोष करण्याचा यत्न केला पाहिजे. प्रत्येक सभासद जर स्वतःचें मन दुसऱ्या कांहीं कार्यांत लावील तर ती सभा बोलावण्याचा हेतु कधींच तडीस जाणार नाहीं. म्हणजे सभेच्या कामांतच स्वतःचें मन एकाग्र करणें हें प्रत्येक सभासदाचें कर्तव्य ठरतें. स्वतःच्या संपूर्ण शक्तीनें सभेचें कार्य निर्दोषपणें करण्याची पराकाष्ठा केली पाहिजे. या मंत्रभागांत सभासदांचीं कर्तव्यें दाखवलीं आहेत. सभेच्या सभासदांनीं त्याचा अवश्य विचार करावा.

नरिष्टा सभा

या सूक्ताच्या द्वितीय मंत्रांत सभेचें नांव ' नरिष्टा ' सांगितलें आहे. ' नरिष्टा ' चे दोन अर्थ होतात. एक (**नरैः इष्टा**) नर अर्थात् नेता. मनुष्यांना जी इष्ट प्रिय आहे अथवा नेता जिला इच्छितो ती. सभेस सामान्य मनुष्यें चाहतात, कारण कीं सभेच्याद्वारेंच जनतेचीं दुःखें राजास विदित होतात. त्यानंतर राजा तीं दुःखें दूर करूं शकतो. याप्रमाणें सभा असल्यानें जनतेची सुखें वाढतात म्हणून सामान्य जनता सभा पसंत करते.

' नरिष्टा ' शब्दाचा दुसरा अर्थ आहे (**न-रिष्टा**) अहिंसक अर्थात् जी कोणाचा नाश करीत नाहीं अथवा जीचा कोणी नाश करीत नाहीं. सभेमुळें प्रजेचा नाश होत नाहीं आणि जनमतानुसार चालणाऱ्या राजाचेंही रक्षण होतें. त्यामुळें राजाचा नाश होत नाहीं. अशा प्रकारें जनता स्वतःच राष्ट्रसभेचा नाश करूं इच्छित नाहीं. तसेंच राष्ट्रसभेचा नाश करण्याइतका राजाचाहि अधिकार नाहीं. या सर्व प्रकारें सभा ' अविनाशक ' आहे.

या सूक्तांत या प्रकारें वैदिक राज्यशासनाचे कित्येक सिद्धांत सांगितले आहेत. त्यांचें वाचकांनीं उचित मनन करावें.

राजाचें कर्तव्य

कांड ७, सूक्त ९१

(ऋषिः - अथर्वा । देवता- चन्द्रमाः)

इन्द्रः सुत्रामा स्ववाँ अवोभिः सुमृडीको भवतु विश्ववेदाः ।
बाधतां द्वेषो अभयं नः कृणोतु सुवीर्यस्य पतयः स्याम ॥ १ ॥

अर्थ- (सुत्रामा स्ववान्) उत्तम रक्षक आत्मविश्वासानें युक्त (विश्ववेदाः इन्द्रः अवोभिः सुमृडीकः भवतु) सर्व धनांनीं युक्त प्रभु स्वतःच्या सर्व रक्षणांनीं उत्तम सुख देणारा होवो. (द्वेषः बाधतां) शत्रूंस प्रतिबंध कर, (नः अभयं कृणोतु) आम्हांसाठीं निर्भयता निर्माण कर, (सुवीर्यस्य पतयः स्याम) आम्हीं उत्तम धनाचे स्वामी व्हावें. (१)

भावार्थ— राजा उत्तम रक्षक, स्वसामर्थ्यावर विश्वास ठेवणारा, धनवान्, प्रजेचें रक्षण करणारा, तिला सुख देणारा होवो. तो शत्रूंस दूर करो आणि त्यांस प्रतिबंध करो. तो प्रजेस निर्भय आणि धनसंपन्न करो. (१)

येथें इन्द्र वर्णनानें राजाचे गुण वर्णिले आहेत. याप्रमाणें पुढील सूक्तहि याच विषयाचें आहे.

राजाचें कर्तव्य

कांड ७ सूक्त ९२

(ऋषिः-अथर्वा । देवता - चन्द्रमाः)

स सुत्रामा स्ववाँ इन्द्रो अस्मदाराच्चिद् द्वेषः सनुतर्युयोतु ।
तस्य वयं सुमतौ यज्ञियस्यापि भद्रे सौमनसे स्याम ॥ १ ॥

अर्थ— (सः सु-त्रामा स्ववान् इन्द्रः) तो उत्तम रक्षक आत्मशक्तीवर विश्वास ठेवणारा (द्वेषः) शत्रूंना (अस्मत् आरात् चित् सनुतः युयोत) निश्चयें करून आम्हांपासून दूर करो. (वयं तस्य यज्ञियस्य सुमतौ स्याम) आम्हीं त्या पूजनीयाच्या सुमतींत रहावें (अपि सौमनसे स्याम) आणि त्याच्या उत्तम मनोभावांत असावें (१)

भावार्थ— तो उत्तम रक्षक आत्मबलयुक्त राजा शत्रूंना प्रजेपासून दूर ठेवो. प्रजासुद्धां त्या पूजनीय राजाविषयीं उत्तमबुद्धि धारण करो आणि तोसुद्धां प्रजेविषयीं शुभमति धारण करो. (१)

राजानें प्रजेचें रक्षण करावें, प्रजेनें राजनिष्ठ रहावें आणि दोघांनीं परस्पर सद्बुद्धि धारण करावी. हें सूक्तसुद्धां प्रजेचें वर्णन करता करता राजाचे गुण दाखवीत आहे.

राजाचें कर्तव्य

कांड ७ सूक्त ९३

(ऋषिः- भृग्वङ्गिराः । देवता - इन्द्रः)

इन्द्रेण मन्युना वयमभि ष्याम पृतन्यतः । घ्नन्तो वृत्राण्यप्रति ॥ १ ॥

अर्थ— (मन्युना इन्द्रेण वयं) उत्साहयुक्त इंद्राबरोबर राहून आम्हीं सर्व (वृत्राणि अप्रति घ्नन्तः) शत्रूंस अनुपमेय रीतीनें मारून टाकीत (पृतन्यतः अभि स्याम) सैन्य घेऊन आमच्यावर चढाई करणाऱ्यांस आम्हीं जिंकून घेतों. (१)

भावार्थ— या सूक्तांत इन्द्राच्या वर्णनानें राजाचें वर्णन पूर्वीप्रमाणेंच केलें आहे. उत्साही वीर लोक, राजाच्या अधिकारांत रहाणारे प्रजाजन (वृत्र) घेरणाऱ्या शत्रूंचा नाश करून समर्थ होतात आणि सैन्यासह हल्ला करणाऱ्या शत्रूंचा पराजय करण्यास समर्थ होतात.

राजाचें कर्तव्य

कांड ७ सूक्त ८४

(ऋषिः- भृगुः । देवता — जातवेदा अग्निः, २-३ इन्द्रः)

अनाधृष्यो जातवेदा अमर्त्यो विराडग्ने क्षत्रभृद्दीदिहीह ।
विश्वा अमीवाः प्रमुञ्चन्मानुषीभिः शिवाभिरद्य परि पाहि नो गयम् ॥ १ ॥
इन्द्र क्षत्रमभि वाममोजोऽजायथा वृषभ चर्षणीनाम् ।
अपानुदो जनममित्रायन्तमुरुं देवेभ्यो अकृणोरु लोकम् ॥ २ ॥
मृगो न भीमः कुचरो गिरिष्ठाः परावत आ जगम्यात्परस्याः ।
सृकं संशाय पविमिन्द्र तिग्मं वि शत्रून्ताढि वि मृधो नुदस्व ॥ ३ ॥

अर्थ— हे अग्नि ! (जात-वेदाः अनाधृष्यः) जो ज्ञानवान आहे आणि जो अजेय (अमर्त्यः विराट्) अमर आणि विशेष प्रकारें सम्राट् व (क्षत्र भृत् इह दीदिहि) क्षत्रियांचें भरण पोषण करणारा आहे असा तू येथें प्रकाशित हो. आणि (विश्वा अमीवाः प्रमुञ्चन्) सर्व रोगांस दूर करीत (मानुषीभिः शिवाभिः) मनुष्यासाठीं कल्याण मिळावें यासाठी (अद्य नः गयं परिपाहि) आज आमच्या घरांचें रक्षण कर. (१)

हे इन्द्र (चर्षणीनां वृषभ) मनुष्यांत श्रेष्ठ ! तूं (वामं क्षत्रं ओजः अभि जायथाः) उत्तम क्षात्रबळानें प्रसिद्ध आहेस. तूं (अमित्रयन्तं जनं अपानुदः) शत्रुत्व करणाऱ्या मनुष्यांस दूर कर आणि (देवेभ्यः उरुं लोकं उ अकृणोः) दिव्यजनासाठीं विस्तृत स्थान निर्माण कर. (२)

(गिरिस्थाः भीमः मृगः नः) पर्वतावर रहाणारे भयंकर सिंह, व्याघ्र इत्यादि पशूप्रमाणें तूं शत्रूंवर (परस्याः परावतः आ जगम्यात्) दूरून तसेंच दूर ठिकाणाहून हल्ला करावास. हे इंद्रा ! तूं स्वतःच्या (सृकं पविं संशाय) बाण आणि वज्र यांस तीक्ष्ण करून (शत्रून् विताढि) शत्रूंवर आघात कर. आणि (मृधः विनुदस्व) हिंसक लोकांस दूर कर. (३)

भावार्थ— तूं, ज्ञानी, अजेय, दीर्घायु, क्षत्रियबलाचा पोषणकर्ता, विशेष श्रेष्ठ राजा होऊन येथें प्रकाशित हो. स्वतःच्या राज्यांतील सर्व रोग दूर कर आणि मनुष्यांसाठीं कल्याण करणाऱ्या गोष्टी करून आमच्या घरांचें उत्तम रक्षण कर. (१)

मनुष्यांत श्रेष्ठ हो, उत्तम क्षात्र बळाची वृद्धि कर, जे आमच्याशीं शत्रुत्व ठेवतात त्यांस दूर कर आणि जे श्रेष्ठ असतील त्यांच्यासाठीं विस्तृत कार्यक्षेत्र तयार कर. (२)

ज्याप्रमाणें डोंगरावर रहाणारे वाघ स्वतःच्या शत्रूवर हल्ला करतात, त्याप्रमाणें तूं तुझ्या दूरच्या शत्रूंवरसुद्धां स्वारी कर. तुझी शस्त्रें तीक्ष्ण कर. शत्रूंस ठार कर म्हणजे शिक्षा कर आणि हिंसकांस दूर पळवून लाव. (३)

राजाचें कर्तव्य

राजा काय कार्य करतो ?

या सूक्तांत अग्नि आणि इंद्राच्या वर्णनानें राजाचें कार्य सांगितलें आहे. राजा स्वतःच्या राज्यांत काय कार्य करतो तें पहा—

१. जातवेदाः— ज्ञान प्राप्त करावें आणि स्वतःच्या राष्ट्रांत ज्ञानाचा प्रचार करावा.

२. अनाधृष्यः— राजा असा सामर्थ्यशाली असला पाहिजे

शत्रूंचा कितीहि भयंकर हल्ला आला तरीसुद्धां तो पराजित होऊं नये.

३. **वि-राट्**-विशेष प्रकारें श्रेष्ठ राजा असावा.

४. **क्षत्र-भृत्**-क्षत्रियांचें आणि क्षात्रगुणांचे पोषण आणि संवर्धन करावें.

५. **अमर्त्यः अग्निः इह दीदिहि**-अमर अग्निप्रमाणें या राष्ट्रांत प्रकाशित होत असावें.

६. **विश्वाः अमीवाः प्रमुञ्चन्**- स्वतःच्या राष्ट्रांतील सर्व रोग दूर करावेत, राष्ट्रांतील सर्व लोकांनीं निरोगी असावें अशी व्यवस्था त्यानें करावी.

७. **मानुषीभिः शिवाभिः**- उत्तम कल्याण करणाऱ्या मनुष्यांसह त्यानें युक्त असावें.

८. **गयं परिपाहि**- राष्ट्रांतील प्रत्येक घराचें रक्षण करावें.

९. **चर्षणीनां वृषभः**- राजानें मनुष्यांत श्रेष्ठ व्हावें.

१०. **वामं क्षत्रं ओजः**- उत्तम क्षत्रिय बळानें राजानें युक्त व्हावें.

११. **अमित्रायन्तं जनं अपानुद**- शत्रुत्व करणाऱ्या मनुष्यांस स्वतःच्या देशांतून दूर करावें.

१२. **देवेभ्यः उरुं लोकं अकृणोः**- सज्जनासाठीं विस्तृत-स्थान करावें.

१३. **परस्याः परावतः आजगम्यात्**- दूरूनसुद्धां शत्रूंवर भयंकर हल्ला करावा.

१४. **सृकं पर्वि संशाय**- स्वतःचीं शास्त्रें उत्तम प्रकारें तीक्ष्ण करून तयार ठेवावींत.

१५. **शत्रून् विताढि**- शत्रूंस विशेषप्रकारें ताडन करावें.

१६. **मृधः विनुदस्व**- हिंसक लोकांस स्वतःच्या राष्ट्रांतून हद्दपार करावें.

याप्रमाणें या सूक्तावरून आपणांस राजाच्या कर्तव्यासंबंधीं बोध होतो. वाचकांनीं त्याचा नीट विचार करावा. या सूक्तांत ज्या-प्रमाणें राजाचीं कर्तव्यें सांगितलीं आहेत त्याचप्रमाणें प्रत्येक मनुष्यास सुद्धां आत्मरक्षणाचा उपदेश या सूक्तांतून मिळूं शकतो.

राजाचें कर्तव्य

कांड ७, सूक्त ८५

(ऋषिः- अथर्वा [स्वस्त्ययनकामः] । देवता – तार्क्ष्यः)

त्यमू षु वाजिनं देवजूतं सहोवानं तरुतारं रथानाम् ।
अरिष्टनेमिं पृतनाजिमाशुं स्वस्तये तार्क्ष्यमिहा हुवेम ॥ ॥ १ ॥

अर्थ— (त्यं वाजिनं) त्या बलवान् (देवजूतं सहोवानं) दिव्य पुरुषांकडून संसेवित, शक्तिशाली (रथानां तरुतारं) रथांस शीघ्रगतीनें चालविणारा, (अरिष्ट-नेमिं) सुदृढ शस्त्रास्त्रांनीं युक्त (पृतना-जिं) शत्रुसेनेस जिंकणार (आशुं तार्क्ष्यं) वेगवान् महारथींना (स्वस्तये आहुवेम) कल्याणासाठीं येथें बोलावतों. (१)

राजाचें कर्तव्य

या सूक्तांतसुद्धां तार्क्ष्य म्हणजे गरुडाच्या वर्णनानें राजाचीं कर्तव्यें सांगितलेलीं आहेत.

१. **वाजिनं**- राजा बलवान्, अन्नाचा संचय करणारा, धनधान्याचा संग्रह करणारा असावा.

२. **देवजूतं**- देव अर्थात् दिव्यजनांनीं सेवित म्हणजे ज्याचे अधिकारी शुद्ध, ज्ञानी आहेत.

३. **सहोवानं**- राजा शक्तिसंपन्न असावा.

४. **रथानां तरुतारं**- रथ शीघ्रगतीनें चालविणारा, म्हणजे राजाजवळ शीघ्रगति असलेले घोडे असावेत.

५. **अ-रिष्ट-नेमिः**- ज्याची शस्त्रें तुटलेलीं नाहींत, न

तुटलेल्या शस्त्रांनीं युक्त अथवा (अरिष्ट-नेमिं) संकटांना दूर करणारा राजा असावा.

६. पृतनाजिः- शत्रूसेनेस जिंकणारा.

७. आशुं- राजा वेगवान् असावा. हातीं घेतलेलें कोणतेंहि काम सत्वर हातावेगळें करणारा.

८. तार्क्ष्य- 'तार्क्ष्य' चा अर्थ 'रथ' असा आहे. ज्याच्या जवळ रथ आहे त्याचें हें नांव तार्क्ष्य आहे. राजा उत्तम रथ चालविणारा असावा.

९. स्वस्तये- प्रजाजनांच्या कल्याणासाठीं प्रयत्न करणारा राजा असावा.

याप्रमाणें हें सूक्त पूर्वीच्या सूक्तांसह वाचकांनीं वाचावें आणि राजाचीं कर्तव्यें जाणावींत. हे शब्दसुद्धां मनुष्यास आत्म-रक्षणाचा उपदेश करतात तें नीट समजून घेऊन मनुष्यानें उन्नत व्हावें.

राजाचें कर्तव्य

कांड ७, सूक्त ८६

(ऋषिः- अथर्वा [स्वस्त्ययनकामः] । देवता - इन्द्रः)

त्रातारमिन्द्रमवितारमिन्द्रं हवेहवे सुहवं शूरमिन्द्रम् ।
हुवे नु शक्रं पुरुहूतमिन्द्रं स्वस्ति न इन्द्रो मघवान्कृणोतु ॥ १ ॥

अर्थ— (त्रातारं इन्द्रं) रक्षक प्रभूस (अवितारं इन्द्रं) संरक्षक इंद्रास (हवेहवे सुहवं शूरं इन्द्रं) प्रत्येक कार्यांत बोलावण्यास योग्य, उत्तम प्रकारें बोलावण्यास योग्य, अशा शूर प्रभूस आणि (पुरुहूतं शक्रं इन्द्रं हुवे) पुष्कळांनीं प्रार्थना केलेल्या शक्तिशाली प्रभूस बोलावितों. (मघवान् इन्द्रः नः स्वस्ति कृणोतु) ऐश्वर्यवान् प्रभू आमचें कल्याण करो. (१)

राजाचें कर्तव्य

हा मंत्रसुद्धां परमेश्वराचें वर्णन करतां करतां राजाचीं कर्तव्यें सांगत आहे.

१. त्राता, अविता- राजा प्रजेचें उत्तम रक्षण करणारा असावा.

२. शूरः- राजा शूरवीर असावा. भित्रा नसावा.

३. शक्रः- शक्तिमान् असावा, अशक्त नसावा.

४. मघवान्- राजानें धनाचा संग्रह करावा. राजानें कधींहि धनहीन असूं नये.

५. स्वस्ति कृणोतु- राजानें प्रजेचें कल्याण करावें.

याप्रमाणें राजप्रकरणांत या मंत्रानें बोध मिळत आहे.

राजाची स्थिरता

कांड ६, सूक्त ८८

(ऋषिः- अथर्वा । देवता - ध्रुवः)

ध्रुवा द्यौर्ध्रुवा पृथिवी ध्रुवं विश्वमिदं जगत् । ध्रुवासः पर्वता इमे ध्रुवो राजा विशामयम् ॥ १ ॥

अर्थ— ज्या प्रकारें (द्यौः ध्रुवा) द्युलोक स्थिर आहे, (पृथिवी ध्रुवा) पृथ्वी स्थिर आहे, (इदं विश्वं जगत् ध्रुवं) हें सर्व जग स्थिर आहे, (इमे पर्वताः ध्रुवासः) हे पर्वतहि स्थिर आहेत त्याप्रमाणें (अयं विशां राजा ध्रुवः) या प्रजेचें रंजन करणारा राजा स्थिर होवो. (१)

ध्रुवं ते राजा वरुणो ध्रुवं देवो बृहस्पतिः। ध्रुवं त इन्द्रश्चाग्निश्च राष्ट्रं धारयतां ध्रुवम् ॥ २ ॥
ध्रुवोऽच्युतः प्र मृणीहि शत्रूञ्छत्रूयतोऽधरान्पादयस्व।
सर्वा दिशः संमनसः सध्रीचीर्ध्रुवाय ते समितिः कल्पतामिह ॥ ३ ॥

अर्थ—(राजा वरुणः ते ध्रुवं) राजा वरुण तुझ्यासाठीं स्थिर (देवः बृहस्पतिः ध्रुवं) बृहस्पति देव तुजसाठीं स्थिर, (इन्द्रः च अग्निः च ते ध्रुवं) इंद्र आणि अग्नि तुझ्यासाठीं स्थिर (राष्ट्रं धारयतां) राष्ट्र धारण करोत. (२)

(अच्युतः ध्रुवः शत्रून् प्रमृणीहि) खालीं न पडतां स्थिर राहून शत्रूंचा नाश कर. (शत्रूयतः अधरान् पादयस्व) शत्रुत्व ठेवणाऱ्या अथवा त्याप्रमाणें आचरण करणाऱ्या लोकांना खालीं पाड. (सर्वाः दिशः) सर्व दिशांना निवास करणाऱ्या प्रजा (सध्रीचीः संमनसः) एक कार्यांत रत आणि एक विचारानें युक्त होऊन त्या लोकांची (समितिः इह ते ध्रुवाय कल्पतां) सभा तुझ्या स्थिरतेसाठीं समर्थ होवो. (३)

भावार्थ— द्युलोक, भूलोक, पर्वत आणि हें सर्व जगत् ज्या प्रकारें स्थिर आहे त्याप्रकारें राजा स्थिर व्हावा. (१)
राजा वरुण, इन्द्र, अग्नि आणि देव बृहस्पति, हे सर्व या राजासाठीं राष्ट्रास स्थिरता आणोत. (२)
राजा स्थिर आणि सुदृढ होऊन शत्रूंचा नाश करो, शत्रूप्रमाणें आचरण करणारांस खालीं पाडो, सर्व प्रजाजन एक विचारानें युक्त होऊन स्वतःच्या राष्ट्रसभेच्या योगानें उत्तम राजास गादीवर स्थिर करोत. (३)

राजाची स्थिरता

स्थिरतेसाठीं

कोणते गुण असले तर राजा आपल्या गादीवर स्थिर राहूं शकतो त्याचा विचार या सूक्तांत केला आहे. हें सूक्त म्हणतें, ' द्यौ, पृथ्वी, पर्वत, जगत् ' कोणत्या गुणांनीं स्थिर झालेलीं आहेत त्याचा विचार राजानें करावा आणि ते गुण धारण करून स्वतः स्थिर व्हावें. ते गुण कोणते आहेत तें पहा—

१. **द्यौः**— आकाश आणि सूर्य, यांच्यांत तेज आहे. सूर्य तर स्वयं प्रकाशित आहे. याप्रमाणें उत्तम तेजस्वी राजा स्थिर होऊं शकतो.

२. **पृथ्वी**— पृथ्वी सर्वांचें उत्तम प्रकारें भरणपोषण आणि धारण करते. जो राजा सर्व प्रजाजनांस याप्रमाणें धारण करतो, त्यांचें पोषण करतो, तो स्थिर राहूं शकतो.

३. **पर्वतः**— स्वतःच्या जागीं अचल उभा रहातो. केव्हांहि जागा सोडीत नाहीं. त्याप्रमाणेंच युद्धांत जो स्वतःच्या स्थानीं स्थिर रहातो, माघार घेत नाहीं अथवा पळून जात नाहीं तो राजा राष्ट्रांत स्थिर होतो,

४. **जगत्**— फिरत असतें परंतु स्वतःच्या मर्यादेंत. मर्यादा सोडीत नाहीं. त्याप्रमाणें स्वमर्यादेंत राहून प्रगति करतो तो राजा स्थिर रहातो.

हे गुण असणारा राजा राजगादीवर स्थिर होतो. या गुणाव्यतिरिक्त आणखीहि एक गुण त्यास आवश्यक आहे.

५. **विशां राजा ध्रुवः**— प्रजेचें रंजन करणारा राजा राष्ट्रांत स्थिर होतो.

हा गुण सर्व गुणांत श्रेष्ठ आहे. आणि हा गुण असल्यानेंच अन्य गुणांस सफळता मिळते, ' राजा ' शब्दाचा अर्थच (**प्रजारंजकः**) प्रजेस प्रसन्न करणारा, प्रसन्न ठेवणारा असा आहे. अशा प्रकारें प्रजेची प्रसन्नता संपादन करणाऱ्या राजालाच राज्यावर स्थिर होण्यास इंद्रादि देव साहाय्य देतात. या देवतांपासून बोध मिळविणाऱ्या राजाची प्रजा त्यास साहाय्य करते. या देवता वाचक शब्दांनीं ओळखले जाणारे हे लोक आहेत—

१. **बृहस्पतिः अग्निः**— ज्ञानी, विद्वान् वगैरे ब्रह्मबलानें युक्त लोक.

२. **इन्द्रः**— शूरवीर सैनिकआदि क्षात्रबलानें युक्त लोक.

३. **वरुणः**—वरिष्ठ लोक (अधिकारी वगैरे)

या सर्वांनीं उत्तम राजाचें सहाय्य करावें आणि त्याच्या स्थैर्यासाठीं प्रयत्न करावा. यांचें सहाय्य मिळवून राजानें सर्व शत्रूंचा नाश करावा. सर्व प्रजाजनांत एकता स्थापन करावी आणि राष्ट्रीय महासभेच्या सहाय्यानें स्वतःची स्थिरता करावी. राष्ट्रसभेनेंसुद्धां योग्य राजाकडेच आपली सहानुभूति ठेवावी. राजा अयोग्य असल्यास त्यास लोकांनीं सहाय्य कदापि करूं नये.

याप्रमाणें प्रजा आणि राजा या दोघांसहि उत्तम बोध करणारें हें सूक्त आहे. प्रजेनें दोन्ही सूक्तांचें मनन करून योग्य लाभ करून घ्यावा.

राष्ट्राच्या ऐश्वर्याची वृद्धि

कांड ६, सूक्त ५४

(ऋषिः- ब्रह्मा । देवता - अग्नीषोमौ ।)

इदं तद्युज उत्तरमिन्द्रं शुम्भाम्यष्टये । अस्य क्षत्रं श्रियं महीं वृष्टिरिव वर्धया तृणम् ॥ १ ॥
अस्मै क्षत्रमग्नीषोमावस्मै धारयतं रयिम् । इमं राष्ट्रस्याभीवर्गे कृणुतं युज उत्तरम् ॥ २ ॥
सबन्धुश्चासबन्धुश्च यो अस्माँ अभिदासति । सर्वं तं रन्धयासि मे यजमानाय सुन्वते ॥ ३ ॥

अर्थ— (इदं तत् उत्तरं युजे) मीं त्याच्याशीं त्या श्रेष्ठास जोडतों, (अष्टये इन्द्रं शुंभामि) फल भोगासाठीं प्रभूची प्रार्थना करतो. हे देवा ! (अस्य क्षत्रं महीं श्रियं वर्धय) या राजाच्या राज्यास आणि महान् संपत्तीस वाढव. (वृष्टिः तृणं इव) ज्याप्रमाणें पाऊस गवतास वाढवितो. (१)

हे अग्नी सोम हो ! (अस्मै क्षत्रं धारयतं) त्यासाठीं शौर्य धारण करा. (अस्मै रयिं) त्याच्यासाठीं धन धारण करा. (इमं राष्ट्रस्य अभीवर्गे कृणुतं) त्यास राष्ट्राच्या मुख्य सभेंत स्थिर करा आणि (उत्तरं युजे) मीं त्यास उच्च अवस्थेंत नियुक्त करतो. (२)

(सबन्धुः च असबन्धुः च) बंधूंसह अथवा बंधूंशिवाय (यः अस्मान् अभिदासति) जो शत्रु आमचा विनाश करूं इच्छित असेल, (मे सुन्वते यजमानाय) माझ्यासारख्या याजक यजमानासाठीं (तं सर्वं रन्धयामसि) त्या शत्रूंचा नाश कर. (३)

भावार्थ— श्रेष्ठ लोकांशीं मीं संबंध ठेवतों, स्वतःच्या उन्नतीसाठीं परमेश्वराची प्रार्थना करतों. हे ईश्वरा ! आमच्या राजाचें राज्य वाढो आणि ज्याप्रमाणें पावसाळ्यात गवत वाढतें तसें त्याचें धन वाढो. (१)

आमच्या राजाचें राज्य स्थिर होवो. राष्ट्राचें हित करणाऱ्या लोकांत हा प्रमुख होवो, आणि श्रेष्ठांसह वृद्धि पावत राहो ! (२)

जो शत्रू एकटा अथवा आपल्या भ्रातृगणांसह आमचा नाश करूं इच्छीत असेल त्याचा तूं नाश कर. (३)

हें सूक्त स्पष्ट आहे. त्यांत राष्ट्रीय उन्नतीची प्रार्थना आहे. थोर लोकांशीं संबंध जोडून स्वतःचें (यजमान) जीवन यज्ञमय करावें हें मनुष्याचें कर्तव्य येथें सांगितलें आहे आणि त्याशिवाय परमेश्वराची प्रार्थना करण्यांत आली तर तें निःसंदेह सफळ होईल. स्वतःचें राज्य वाढावें, धन वाढावें, स्वराज्य-स्वातंत्र्य नसलें तर तें प्राप्त व्हावें, शत्रू दूर व्हावेत आणि सर्व प्रकारची उन्नति हि व्हावी असा या प्रार्थनेचा मथितार्थ आहे.

राजाचा राज्याभिषेक

कांड ४, सूक्त ८

(ऋषिः- अथर्वाङ्गिराः । देवता - चन्द्रमाः, आपः, राज्याभिषेकः)

भूतो भूतेषु पय आ दधाति स भूतानामधिपतिर्बभूव ।
तस्य मृत्युश्चरति राजसूयं स राजा राज्यमनु मन्यतामिदम् ॥ १ ॥

अर्थ— जो (भूतः) स्वतः प्रभावशाली होऊन (भूतेषु पय आदधाति) सर्व प्रजाजनांस दुग्धादि पदार्थ देतो, (सः भूतानां अधिपतिः बभूव) तोच सर्व प्रजाजनांचा अधिपति होतो. (तस्य राज-सूयं मृत्युः चरति) त्याचें राज्यशासन सुरू होतांच मृत्यु स्वतः दंड घेऊन त्यास सहाय करण्यास त्याच्या राज्यांत फिरतो. (सः राजा इदं राज्यं अनुमन्यताम्) त्या राजानें राज्याच्या अनुमतीनें वर्तावें. (१)

भावार्थ— जे विशेष प्रभावशाली आहेत, आणि जनतेसाठीं विशेष सुखोपभोग प्राप्त करून देण्याचें देवांचें कार्य करतात तेच लोकांचे अधिपति होऊं शकतात. जो मृत्यु सर्व प्राण्यांचा अंत करणारा आहे तोच त्या राजाचा शासक दंडधारी होऊन त्यास सहाय करतो. याप्रमाणें जे पराक्रमी पुरुष आहेत तेच प्रजेच्या अनुमतीनें राज्यशासन चालवितात. (१)

अभि प्रेहि मापं वेन उग्रश्चेत्ता सपत्नहा ।
आ तिष्ठ मित्रवर्धन तुभ्यं देवा अधि ब्रुवन् ॥ २ ॥
आतिष्ठन्तं परि विश्वे अभूषं छ्रियं वसानश्चरति स्वरोचिः ।
महत्तद्वृष्णो असुरस्य नामा विश्वरूपो अमृतानि तस्थौ ॥ ३ ॥
व्याघ्रो अधि वैयाघ्रे वि क्रमस्व दिशो महीः ।
विशस्त्वा सर्वा वाञ्छन्त्वापो दिव्याः पयस्वतीः ॥ ४ ॥
या आपो दिव्याः पयसा मदन्त्यन्तरिक्ष उत वा पृथिव्याम् ।
तासां त्वा सर्वासामपामभि षिञ्चामि वर्चसा ॥ ५ ॥
अभि त्वा वर्चसासिचन्नापो दिव्याः पयस्वतीः ।
यथासो मित्रवर्धनस्तथा त्वा सविता करत् ॥ ६ ॥

अर्थ—हे (मित्रवर्धन) मित्रांस वाढविणाऱ्या राजा ! तूं (उग्रः चेत्ता सपत्नहा अभिप्रेहि) प्रतापी चेतना देणारा शत्रूंचा विनाशक होऊन पुढें हो. (मा अपवेनः) मागें फिरूं नकोस. (आ तिष्ठ) तुझ्या स्वतःच्या स्थानीं स्थिर रहा. (तुभ्यं देवाः अधि ब्रुवन्) तुला विद्वान् माणसें योग्य सल्ला देवोत. (२)

(अतिष्ठन्तं विश्वे परिभूषम्) राजगादीवर बसलेल्या राजास सर्व प्रजा भालंकृत करो. हा राजा (श्रियं वसानः स्व-रोचिः चरति) लक्ष्मीस धारण करीत स्वतःच्या तेजानें युक्त होऊन राज्यांत फिरो. (वृष्णः-असु-रस्य तत् महत् नाम) जे प्रजेच्या प्राणांचें रक्षण करतात अशा बलवान् राजाचें हें महान् यश आहे. (विश्वरूपः अमृतानि आ तस्थौ) तो सर्व अनेकरूपांनीं विविध सुखें प्राप्त करतो. (३)

(वैयाघ्रे अधि व्याघ्रः) व्याघ्रस्वभावी मनुष्यांवर व्याघ्र होऊन (महीः दिशः विक्रमस्व) विशाल दिशांस पराक्रम कर. (पयस्वतीः आपः) दुग्धादि प्राप्त करणाऱ्या (सर्वा विशः) सर्व प्रजा (त्वा वाञ्छन्तु) तुला चाहोत. (४)

(अन्तरिक्षे उत् वा पृथिव्यां) अन्तरिक्षांत आणि या पृथ्वीवर (या दिव्याः आपः) जें दिव्यजल स्वतःच्या (पयसा मदन्ति) सत्वरसानें तृप्त करतें (तासां सर्वासां अपां) त्या सर्व जलांच्या (वर्चसा त्वा अभिषिञ्चामि) तेजानें मीं तुला अभिषेक करतों. (५)

(दिव्याः पयस्वतीः आपः) दिव्य रसयुक्त पाण्यानें (वर्चसा त्वा अभि असिचन्) स्वतःच्या तेजानें तुला अभिषेक केला आहे. (यथा मित्रवर्धनः असः) ज्याच्यामुळें तूं मित्रांची वृद्धि करणारा हो आणि (सविता त्वा तथा करत्) सर्वांचा प्रेरक देव तुला तसा योग्य करो. (६)

भावार्थ— राजानें स्वतःचे मित्र वाढवावेत. तो राजा प्रजेंत प्रताप आणि चैतन्य वाढविणारा, शत्रूंचा नाशक होऊन पुढें सरतो. स्वतःच्या स्थानीं स्थिर रहातो, आणि कधींहि मागें सरत नाहीं. अशा राजास विद्वान् लोक योग्यसमयीं सल्ला देतात. (२)

राज्यावर बसलेल्या राजास प्रजाजन शोभा देतात. राजा हें ऐश्वर्य स्वतःजवळ बाळगून तेजस्वी होऊन राज्यांत सर्वत्र फिरतो. प्रजाजनांच्या प्राणांचें रक्षण करणाऱ्या बलवान राजाचें हेंच महान् यश आहे. तो राजा विविध अधिकाऱ्यांच्या सहाय्यानें विविधसुखांची वृद्धि करून स्वतःच्या स्थानीं स्थिर होतो. (३)

दुष्ट लोकांचें दमन करण्यासाठीं प्रखर उपाय योजना करून राजानें सर्व दिशांस पराक्रम करून विजयी व्हावें. दूध, जल इत्यादि उपभोगांस प्राप्त करण्याची इच्छा करणाऱ्या प्रजाजनांनीं अशा राजावर स्वतःच्या शासनासाठीं चांगल्या राज्यकारभाराबद्दल प्रीति करावी. (४)

पृथ्वी आणि अंतरिक्षांत जें दिव्य जल आहे त्यासर्वांच्या तेजानें राजास हा राज्याभिषेक करण्यांत येत आहे. (५)

एना व्याघ्रं परिषस्वजानाः सिंहं हिन्वन्ति महते सौभगाय ।
समुद्रं न सुभुवस्तस्थिवांसं मर्मृज्यन्ते द्वीपिनमप्स्व१न्तः ॥ ७ ॥

अर्थ—(व्याघ्रं सिंहं परिषस्वजानाः एना) व्याघ्र आणि सिंहाप्रमाणें पराक्रमी राजाला सर्व बाजूंनीं अभिषेक करणाऱ्या या जलधारा तुला **(महते सौभगाय हिन्वन्ति)** महान् सौभाग्यासाठीं प्रेरित करीत आहेत. **(स-भुवः समुद्रं न)** ज्याप्रमाणें उत्तम भूमीभाग समुद्राला सुशोभित करतो त्याप्रमाणें **(अप्सु अन्तः तस्थिवांसं द्वीपिनं)** पाण्यांत रहाणाऱ्या द्वीपाधिपति राजाला सर्व प्रजा **(मर्मृज्यन्ते)** विभूषित करीत आहेत. (७)

भावार्थ-- या दिव्य जलानें अभिषेक केला गेलेला राजा स्वतःच्या मित्रांची संख्या वाढवो आणि परमेश्वर त्या राजास तशी प्रेरणा करो. (६)

हा राजा तर व्याघ्र अथवा नरसिंह म्हणजे नरश्रेष्ठ आहे. या राज्याभिषेकानें त्याच्या भाग्याची अभिवृद्धि होवो. ज्याप्रमाणें स्वतःच्या मर्यादेंत रहाणारा समुद्र सर्व बाजूंनीं भूभागांनीं सुशोभित होतो त्याच प्रकारें चारी बाजूंस जलांनीं वेष्टित अशा राष्ट्राचा हा राजा सर्व प्रजेकडून सुपूजित होवो. (७)

राजाचा राज्याभिषेक

राज्याभिषेक

राजाच्या राज्याभिषेकाच्या धार्मिक विधीच्यावेळीं म्हणण्याचें हें सूक्त आहे. या सूक्ताच्या मननानें राज्याभिषेक विधीचें ज्ञान होण्याचा संभव आहे. राजगादीवर राज्याभिषेक होतानां निरनिराळ्या तीर्थांचें पवित्र जल आणण्यांत येत असे. समुद्र, पवित्र महानद्या, अन्य पवित्र प्रवाह आणि आकाशातून प्राप्त होणारें पवित्र दिव्यजल हीं सर्व जलें आणण्यांत येत. मंत्रांनीं पवित्र करून या पाण्यानें राज्याभिषेक करण्यांत येत, त्याचें तात्पर्य फार गंभीर आहे. राजाचें राज्य समुद्र किनाऱ्यापर्यंत पसरलेलें असावें हा प्रथम बोध आपणांस येथें मिळतो. राज्यविस्तार समुद्रापर्यंत नसला तर व्यापार आणि व्यवहार बरोबर चालणार नाहींत. म्हणून समुद्र किनाऱ्यापर्यंत राज्यविस्तार असणें देशोन्नतीच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे. या विचारास उत्तेजन देण्यासाठींच ७ व्या मंत्रांत **(समुद्रं अप्सु अन्तः द्वीपिनं)** असे शब्द वापरले आहेत. पांचव्या मंत्रांत ' **तासां सर्वासां अपां वर्चसा अभिषिञ्चामि** ' असें म्हटलें आहे. त्याचा अर्थ सर्व जलांच्या तेजानें मीं तुम्हांस अभिषेक करतो. त्या तेजानें तुम्हीं युक्त व्हा.

समुद्रापर्यंत राज्यविस्तार

समुद्र अथवा महानद्यांचे पाणी दुसऱ्या राजांकडून मागून आणण्यांत आलें तर तें राज्याभिषेकाच्या कामीं येत नाहीं. महानद्या आणि समुद्रकिनारा स्वतःच्या राज्याच्या हद्दींत असला पाहिजे, आणि त्यांतून जल आणलें पाहिजे. या गोष्टीचा विचार केला तर संस्काराच्या गोष्टी राज्यविस्तारास कशा कारणीभुत होऊं शकत तें उत्तम रीतीनें ध्यानीं येईल.

राजा कोण होऊं शके ?

जो वीरपुरुष प्रभावशाली आणि पराक्रमी असतो आणि जो जनतेला **(पयः आदधाति)** दूध वगैरे उपभोग विपुल प्रमाणांत देतो, तसेंच जो बेकारी कमी करूं शकतो, तोच **(अधिपतिः बभूव)** राजा होऊं शकतो. अशा राजाचा सहायक मृत्यु स्वतः होतो. मृत्यु सर्व जगास शिक्षा देणारा आहे. असें समजावें कीं त्या मृत्यूचा अंशच राजापाशीं येऊन वास्तव्य करतो. त्याच्या सहाय्यानें राजा अपराध्यास दंड करतो. अशा प्रकारचा प्रभावशाली राजा प्रजेचें शासन करूं शकतो. (मं. १) हा राजा शत्रूंचा नाश करणारा, मित्र वाढविणारा असावा. तसेंच शूरवीर होऊन त्यानें स्वतःचें राज्य चालवावें आणि वाढवावें. (मं. २) राज्यशासन चालविणारे अनेक (राजानें नेमलेले) अधिकारी ही राजाचींच दुसरी रूपें होत. त्यामुळें राजा **(विश्वरूपः)** अनेक रूपें धारण करून राज्य चालवितो; आणि **(स्व-रोचिः)** स्वतःच्या तेजानें तेजस्वी होऊन तो राज्य चालवितो. असा राजाचा महिमा आहे. (मं. ३) या राजानें वाघ आणि सिंहासारखें तेजस्वी बनून शत्रूचें दमन करावें आणि सर्व प्रकारची राष्ट्रीय उन्नति साधून यशाचे भागीदार व्हावें.

राजा आणि राजाचे निर्माते

कांड ३, सूक्त ५

(ऋषिः— अथर्वा । देवता — सोमः)

आयमंगन्पर्णमणिर्बली बलेन प्रमृणन्त्सपत्नान् ।
ओजो देवानां पय ओषधीनां वर्चसा मा जिन्वत्वप्रयावन् ॥ १ ॥
मयि क्षत्रं पर्णमणे मयि धारयताद्रयिम् । अहं राष्ट्रस्याभीवर्गे निजो भूयासमुत्तमः ॥ २ ॥
यं निदधुर्वनस्पतौ गुह्यं देवाः प्रियं मणिम् । तमस्मभ्यं सहायुषा देवा ददतु भर्तवे ॥ ३ ॥
सोमस्य पर्णः सह उग्रमागन्निन्द्रेण दत्तो वरुणेन शिष्टः ।
तं प्रियासं बहु रोचमानो दीर्घायुत्वाय शतशारदाय ॥ ४ ॥
आ मारुक्षत्पर्णमणिर्मह्या अरिष्टतातये । यथाहमुत्तरोऽसान्यर्यम्ण उत संविदः ॥ ५ ॥
ये धीवानो रथकाराः कर्मारा ये मनीषिणः । उपस्तीन्पर्ण मह्यं त्वं सर्वान्कृण्वभितो जनान् ॥६॥

अर्थ— (अयं बली पर्णमणिः) हा बलवान् पर्णमणि (बलेन सपत्नान् प्रमृणन्) बलानें शत्रूंचा नाश करीत (आ अगन्) आला आहे. तो त्या (देवानां ओजः) देवांचें बल आणि (ओषधीनां पयः) औषधींचा रस आहे. (अप्रयावन् वर्चसा मा जिन्वतु) माझा विरोध न करतां तेजानें मला युक्त करतो.(१) हे पर्णमणे ! (मयि क्षत्रं) माझ्यांत क्षात्रबल आणि (मयि रयिं धारयतात्) माझ्यांत धन धारण कर. (अहं राष्ट्रस्य अभीवर्गे) राष्ट्राच्या आप्तपुरुषांत मीं (उत्तमः निजः भूयासं) उत्तम मनुष्य होऊन राहीन. (२) (यं गुह्यं प्रियं मणिं देवाः वनस्पतौ निदधुः) ज्या गुप्त आणि प्रिय मण्यास देवांनीं वनस्पतींत धारण केलें होतें,(तं देवाः अस्मभ्यं आयुषा सह भर्तवे ददतु) त्या मण्यास देव आमच्या आयुष्यासह आमच्या पोषणासाठीं देवोत. (३) (इन्द्रेण दत्तः) इन्द्रानें दिलेला (वरुणेन शिष्टः) वरुणानें ज्यास सुसंस्कृत केलें आहे. (सोमस्य पर्णः) सोमदेवतेचा पर्णमणि (उग्रं सह आ अगन्) उग्र बलानें युक्त होऊन आम्हांस प्राप्त झाला आहे. (तं) त्या मण्यावर (बहु रोचमानः) फार तेजस्वी असा मी (दीर्घायुत्वाय शतशारदाय) दीर्घायुष्यासाठीं, शतायु जीवनासाठीं (प्रियासं) प्रेम करतों. (४) (पर्णमणिः मह्यै अरिष्टतातये) हा पर्णमणि मला कल्याण देण्यासाठीं (मा आ अरुक्षत्) मजवर आरूढ झाला आहे. (यथा अहं अर्यम्णः) ज्याच्या योगानें मीं श्रेष्ठ मनाचा (उत संविदः) आणि ज्ञानानें सुद्धां (उत्तरः असानि) अधिक श्रेष्ठ होईन. (५) (ये धीवानः रथकाराः) जे बुद्धिवान् आणि रथ बनविणारे आहेत, तसेंच (ये मनीषिणः कर्माराः) जे बुद्धिमान् लोहार आहेत, हे (पर्ण) पर्ण मणे ! (त्वं सर्वान् जनान् अभितः मह्यं उपस्तीन् कृणु) तूं सर्व जनांस माझ्या चारी बाजूस उपस्थित कर. (६)

भावार्थ— हा पर्णमणि शक्ति वाढविणारा, स्वबलानें शत्रूचा नाश करणारा, देवांस शक्ति देणारा आणि औषधींच्या रसांनीयुक्त असा आहे, तो मला स्वतःच्या तेजानें युक्त करो. (१) त्यामुळें माझें क्षात्रतेज आणि ऐश्वर्य वाढेल आणि मीं राष्ट्राचें हित साधणारा म्हणजे राष्ट्राचा हितकर्ता होऊन राहीन. (२) ज्या मण्यास देवांनीं वनस्पतीपासून तयार करून धारण केला होता, तो मणी आम्हांस आयुष्य आणि पुष्टी यांच्या वृद्धीसाठीं ते देवोत. (३) वनस्पतीपासून तयार झालेला, वरुणानें सुसंस्कृत केलेला व इंद्रानें आम्हांस प्रथम दिलेला वीर्य आणि बलाची वृद्धि करणारा हा मणि आहे. त्या मण्यास मीं शंभर वर्षे दीर्घायुत्वासाठीं प्रेमपूर्वक धारण करतो. (४) या मण्यास मीं शरीरावर धारण केल्यानें माझें सुख वाढेल आणि त्या योगें मीं श्रेष्ठ मनाच्या ज्ञानी पुरुषांपेक्षांहि श्रेष्ठ होईन. (५) जे बुद्धिमान आणि कुशल रथ तयार करणारे लोहार असतील त्यांनीं मजजवळ यावें. (६)

ये राजानो राजकृतः सूता ग्रामण्यश्च ये । उपस्तीन्पर्ण मह्यं त्वं सर्वान्कृण्वभितो जनान् ॥ ७ ॥
पर्णोऽसि तनूपानः सयोनिर्वीरो वीरेण मया । संवत्सरस्य तेजसा तेन बध्नामि त्वा मणे ॥ ८ ॥

अर्थ— हे (मणे) पर्णमणि ! तूं (पर्णः तनूपानः असि) पर्णरूप आणि शरीराचा रक्षक आहेस. (मया वीरेण सयोनिः वीरः असि) माझ्यासारख्या वीरासह समान रीतीनें उत्पन्न झालेला तूं वीर आहेस, त्यामुळें मी (त्वा संवत्सरस्य तेन तेजसा बध्नामि) तुला संवत्सराच्या त्या तेजासह बांधतों. (८)

भावार्थ— जे सरदार अथवा राजाची निवड करणारे आहेत, राजा बनविणारे आहेत आणि जे सूत अथवा गांवाचे पुढारी आहेत त्या सर्वांनीं माझ्या जवळ यावें. (७) हा मणि उत्तम शरीररक्षक आहे आणि वीरत्वाचा उत्साह वाढविणारा आहे त्यास मीं एकवर्षपर्यंत स्थिर रहाणाऱ्या तेजासह धारण करतों. (८)

राजा आणि राजाचे निर्माते

पर्णमणि

या सूक्तात पर्णमणि धारण करण्याचा उल्लेख आहे. अथर्व. कां. २, सूक्त ४ मध्यें जंगिड मण्याचें वर्णन आहे. तेथें मणि धारण करण्याविषयीं जो लेख लिहिला आहे तो वाचकांनीं या संदर्भांत पहावा. ह्या मण्यास पर्णमणि एवढ्यासाठीं म्हटलें आहे कीं तो औषधींचा रस आणि पानांपासून तयार करतात पहा—

१. **पर्णमणिः ओषधीनां पयः** (मं. २)
२. **पर्णः (पर्णमणिः) सोमस्य उग्रं सहः** (मं. ४)
३. **देवाः (पर्ण-) मणिं वनस्पतौ निदधुः** । (मं. ३)

(१) ' पर्णमणि हें औषधींचें दूधच आहे. (२) हा पर्णमणि सोमवल्लीचें उग्र बल आहे. (३) देवांनीं पर्णमणीस मणि वनस्पतींत ठेविलें होतें ' त्याचें हें वर्णन स्पष्टच आहे कीं हा मणि वनस्पतींच्या (रसा) दुधापासून करण्यांत येतो. ' पर्ण-मणि ' हा शब्द ही स्वतःच हा अर्थ व्यक्त करीत आहे कीं (पर्ण) पानांचा मणि आहे म्हणजे वनस्पतींच्या पानाच्या रसानें हा बनविला आहे. त्यास धारण केल्यानें वनस्पतींच्या रसाचा वीर्यावर आणि तदनुषंगानें शरीरावर मोठा प्रभाव पडतो. याविषयीं पहा—

१. **अयं पर्णमणिः बली** । (मं. १)
२. **पर्णः तनूपानः** (मं. ८)
३. **बलेन सपत्नान् प्रमृणन्** (मं. १)
४. **देवाना ओज... मा वर्चसा जिन्वतु** (मं. १)
५. **मयि क्षत्रं मयि रयिं धारयतात्** (मं. २)
६. **आयुषे भर्तवे च तं अस्मभ्यं ददतु** (मं. ३)
७. **पर्णः उग्रं सह... दीर्घायुत्वाय शतशारदाय** (मं. ४)
८. **पर्णमणिः अरिष्टतातये मा आरुक्षत्** (मं. ५)

(१) ' हा पर्णमणि बळ वाढविणारा आहे. (२) हा (**तनूपानः**) शरीराचा रक्षक आहे. (३) हा स्वतःच्या बलानें रोगरूपी शत्रूंचा नाश करतो. (४) हा (**देवानां**) इंद्रियांचें तेज वाढविणारा आहे तो माझें तेज वाढवो. (५) तो माझ्यांत क्षात्रतेज आणि शरीराची कान्ति वाढवो. (६) यानें दीर्घायुष्य आणि शरीराची पुष्टि वाढते. (७) हा मणि बलाची पुष्कळ वृद्धि करतो, त्याच्यामुळें मला दीर्घायु प्राप्त होवो. (८) हा मणि शरीरावर धारण केल्यानें माझी शक्ति वाढो. '

या प्रकारच्या वर्णनावरून असें ध्यानीं येतें कीं हा ' पर्णमणि ' मोठा प्रभावयुक्त आहे. त्यास शरीरावर नित्य धारण केल्यानें शरीर उत्साही रहातें. जीं कार्यें करण्यास शक्तीची जरूरी पडते तीं कार्यें करण्याची शक्ति या मण्यानें प्राप्त होते. शरीराचें तेज वाढतें, मनुष्य फार तेजस्वी होण्यानें देखणा आणि प्रभावशाली होतो. हा वनस्पतींच्या रसाचा प्रभाव आहे. वैद्यांनीं हा मणि तयार करण्याच्या रीतिचा शोध करावा.

राष्ट्राचे स्वकीय होऊन रहाणें

' राष्ट्राचे स्वकीय ' होऊन रहाण्याचा या सूक्तांतील उपदेश मनन करण्यालायक आहे. जे लोक राष्ट्रांत रहातात ते जर राष्ट्राचेच होऊन रहातील, तरच राष्ट्राचें कल्याण होईल. या बाबतींत दुसरा मंत्र विशेष मनन करण्यासारखा आहे.

अहं राष्ट्रस्य अभीवर्गे निजो भूयासमुत्तमः ॥ (मं. २)

' मी या राष्ट्राच्या हितचिंतक वर्गापैकीं उत्तम आणि त्याचा स्वतःचा होऊन राहीन. ' येथें राजा राजपुरुष, अधिकारी वर्ग

वगैरे सर्वांनी राष्ट्राचे स्वकीय अथवा अंकीत (त्याचे अवयवरूप भाग) होऊन रहावें असा उपदेश स्पष्ट आहे. राष्ट्रांत रहाणारा कोणीहि मनुष्य राष्ट्रास परकीय नसावा. येथें राष्ट्राचा होऊन रहाणें आणि परकें नसणें याचा काय अर्थ आहे बरें ? तें अवश्यमेव पाहिलें पाहिजे. आपल्या देशावेंच उदाहरण घेऊं. या भारतांत, जपानी, चिनी, अमेरीकन आणि युरोपीयन येतात. मात्र येतात इतकेंच नव्हे तर कांहीं येथें कायम वास्तव्य करून रहातात. परंतु जे कोणी येतात व रहातात त्यांत कोणी भारताचे होऊन रहात नाहींत. जे येतात ते ' उपरी, निराळे ' होऊन येतात. त्याचप्रमाणें येथें रहातात. अधिकारीरूपानें येथील कारभार चालवितात आणि परत जातात. त्यांच्या या अधिकारी वृत्तीमुळें भारताचें नुकसानच होतें. त्यामुळें उपरी होऊन रहाणें हें राष्ट्राला घातकच आहे. यावरून ' स्वकीय ' होऊन रहाणें याचा अर्थ राष्ट्राचें हित–अहित तें तसेंच स्वतःचें हित आहे असें समजून वागणें होय. जनता जर असा दृष्टिबिंदु ठेऊन वागेल तर राष्ट्राचें अहित कधींच होणार नाहीं. ही तर सामान्य मनुष्याची गोष्ट झाली. पण जर राज्यशासनांतील कर्मचारी असेच परकेपणानें वागूं लागले तर राष्ट्राचें केवढें नुकसान होईल, त्याचा अंदाज करणें मोठें कठिण काम आहे. या दृष्टीनें वाचकांनीं विचार करावा की राज्याचे अथवा राष्ट्राचे स्वकीय होऊन रहाणें यांत केवढा उच्च भाव भरला आहे, आणि राष्ट्रहित दृष्टिनें तो किती आवश्यक आहे. ' स्वकीय ' होऊन रहाण्यामुळें परकीय लोक स्वदेशी लोकाप्रमाणें या देशाचें हित चिंतणारे होतील आणि ' स्वकीय ' भाव नसलेलें एतद्देशीय सुद्धां या राष्ट्राच्या शत्रूप्रमाणें घातक होतील. वाचकांनीं ' राष्ट्राचे स्वकीय, ' होऊन रहाण्याचें महत्त्व जाणावें आणि त्याप्रमाणें स्वतः राष्ट्राचे स्वकीय होऊन रहावें.

राजाचे निर्माते

या सूक्तांत ७ व्या मंत्रांत ' राज–कृतः ' शब्द आहे. त्याचा अर्थ, ' राजा निर्माण करणारे (King makers) ' असा आहे. राजा कसा निर्माण करतात हा एक येथें प्रश्न आहे. त्याचें उत्तर या पूर्वीच्या ४ थ्या सूक्तांत दिलें आहे. राजाची निवडणूक प्रजेमार्फत होते आणि मग तो राजगादीवर येतो. त्या विधीस प्रजेकडून निर्वाचन, राजाचा स्वीकार, राजाचें नियोजन अथवा राजाची निवडणूक असें म्हणतात. ज्यास प्रजा निवडते त्यास जणूं काय प्रजा ' निर्माण ' च करते. अशा प्रकारें राजाच्या मातृ–पितृस्थानीं प्रजाच असते. म्हणूनच राष्ट्रीय सभेच्या सदस्यांस राजाचे ' पितर ' असें वेदांत अन्यत्र संबोधिलें आहे. (पहा अथर्व. कां. ७, सूक्त १२, मं. ११२) प्रजेचा जो महान् नेता, नगरशेठ अथवा महाजन–प्रमुख असेल तो राजाची निवड करतो. म्हणजे त्यास निर्माण करतो. म्हणून प्रजेचें रक्षण करणें हें राजाचें कर्तव्य ठरतें. मातृरक्षणाप्रमाणेंच प्रजेचें रक्षण हें राजाचें महान् कर्तव्य–हा राजधर्म–आहे.

मंत्र ६ आणि ७ मध्यें म्हटलें आहे कीं रथकार, सुतार, लोहार, ज्ञानी पुरुष, मंत्री, सूत, ग्रामपुढारी, सरदार तसेंच राजाची निवडणूक करणाऱ्या सर्व लोकांनीं राजाजवळ हजर रहावें. राजाचे त्यांनीं अनुगामी व्हावें. राजाबरोबर राहून त्यास योग्य सल्ला द्यावी. अशा प्रकारें राज्यशासन प्रजाहितासाठीं प्रजेनें नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांकडून प्रजेच्या अनुमतीनेंच चालावें. यांतच राष्ट्राचें खरें हित होऊं शकेल.

खरें पाहिलें तर हें सूक्त पर्णमण्याच्या वर्णनाचें आहे. तरीसुद्धा प्रसंगोचित राष्ट्राचें स्वकीय होऊन रहाणें, राजाची निवडणूक प्रजाद्वारा होणें इत्यादि महत्त्वपूर्ण गोष्टींचा उपदेश येथें आहे. वैदिक राजनीतिशास्त्रदृष्ट्या या सूक्तावरून पुष्कळच माहिती मिळते. त्यासाठीं त्या दृष्टीनें वाचकांनीं याचें मनन करावें.

राजाची निवडणूक

कांड ६, सूक्त १२८

(ऋषिः– अथर्वाङ्गिराः । देवता – सोमः, शकधूमः)

शकधूमं नक्षत्राणि यद्राजानमकुर्वत । भद्राहमस्मै प्रायच्छन्निदं राष्ट्रमसादिति ॥ १ ॥

अर्थ— (यत् नक्षत्राणि शकधूमं राजानं अकुर्वत) ज्याप्रमाणें नक्षत्रांनीं शकधूमास राजा (निवडलें) नेमलें. (अस्मै भद्राहं प्रायच्छत्) त्यासाठीं शुभदिनाचें प्रदान केलें, अशासाठीं कीं (इदं राष्ट्रं असात्) हें राष्ट्र व्हावें. (१)

भावार्थ— सर्व नक्षत्रांनीं एकत्र येऊन एकराष्ट्र व्हावें या उद्देशानें एक राजा बनविला. (१)

भद्राहं नो मध्यंदिने भद्राहं सायमस्तु नः । भद्राहं नो अह्नां प्राता रात्री भद्राहमस्तु नः ॥ २ ॥
अहोरात्राभ्यां नक्षत्रेभ्यः सूर्याचन्द्रमसाभ्याम् । भद्राहमस्मभ्यं राजन्छकधूम त्वं कृधि ॥ ३ ॥
यो नो भद्राहमकरः सायं नक्तमथो दिवा । तस्मै ते नक्षत्रराज शकधूम सदा नमः ॥ ४ ॥

अर्थ— (नः मध्यंदिने भद्राहं) आमच्यासाठीं दिवसाचा मध्यभाग शुभ असो. (नः सायं भद्राहं अस्तु) आमच्यासाठीं सायंकाळ शुभकारक होवो, (नः अह्नां प्रातः भद्राहं) आम्हांस दिवसाचा प्रातःकाळसुद्धां शुभदायी होवो आणि (नः रात्री भद्राहं अस्तु) आम्हांस रात्रीचा समयसुद्धां कल्याणकारी होवो. (२)

हे (शकधूम) शकधूमा ! (त्वं अहोरात्राभ्याम्) तूं अहोरात्रीसह (नक्षत्रेभ्यः सूर्याचन्द्रमसाभ्यां) नक्षत्रें सूर्य आणि चंद्र यांसह (अस्मभ्यं भद्राहं कृधि) आमच्यासाठीं शुभकारक दिवस कर. (३)

हे (नक्षत्रराज शकधूम) नक्षत्रांच्या राजा शकधूमा ! (यः नः सायं, नक्तं अथो दिवा) जो आमच्यासाठीं सायंकाळ, रात्र अथवा दिवसाचा (भद्राहं अकरः) शुभ समय तूं केला आहेस, (तस्मै ते सदा नमः) त्यामुळें तुला आमचा नेहमीं नमस्कार असो. (४)

भावार्थ— राजास निर्माण केल्यानें प्रातःकाळी माध्याह्नीं, सायंकालीं आणि रात्रीं सर्वांस सुख मिळूं लागलें. (२)
राजा सूर्य, चंद्र, नक्षत्र आणि अहोरात्र या सर्वांच्या द्वारें मनुष्याचें कल्याण करतो. (३)
राजा सर्व प्रजाजनांचें हित करण्यांत रात्रदिवस तत्पर रहातो. त्यामुळें राजाचा नेहमीं सन्मान व्हावा. (४)

राजाची निवड

प्रजेनें स्वतः राजा निवडावा

प्रजेनें स्वतःच्या उन्नतीसाठीं स्वतः राजाची निवड करावी, त्यास राजगादीवर बसवावें, त्याचा सन्मान करावा आणि त्याच्या शासनांत सुखाचा उपभोग घ्यावा हा उपदेश या सूक्तांत रूपक अलंकारानें उत्तम प्रकारें सांगितला आहे. हें रूपक आहे-

' आकाशांत अनेक नक्षत्रें आहेत. त्यांचा एकमेकांशीं कांहीं संबंध नाहीं हें वेगळेंपण त्यांच्या ध्यानीं आलें म्हणून त्यांनीं सर्वांनीं एकत्रित होऊन संयुक्तराष्ट्र करण्यासाठीं एक राजा निवडला. त्याचें नांव चंद्रमा, हा राजा राजगादीवर आल्यावर सर्वांना उत्तम सुखाचा लाभ झाला आणि त्यांचीं संकटें दूर झाली. '

हा एक शब्दार्थ आहे. याचा वास्तविक अर्थ श्लेषालंकारानेंच समजतो आणि तोच या सूक्ताचा गुह्यार्थ आहे. त्यांत (न-क्षत्र) शब्द आहे त्याचा अर्थ क्षात्रधर्मरहित सामान्य प्रजा जी स्वतःचें रक्षण करूं शकत नाही अशी. ज्ञानी, व्यापारी आणि कारागीर वर्ग, ही प्रजा यांत क्षत्रिय वर्ग मिसळूं शकणार नाहीं. याप्रजेनें-

इदं राष्ट्रं असात् इति (मं. १)
स्वतःचें एक मोठें राष्ट्र निर्माण करण्यासाठीं

नक्षत्राणि राजानं अकुर्वत ॥ (मं. १)
' क्षत्रियांपासून भिन्न अशा प्रजेनें अथवा क्षात्रगुणरहित प्रजाजनांनीं स्वतःसाठीं एक राजा निवडला. ' पूर्वापर संबंधावरून हा राजा त्यांनीं क्षत्रियांतूनच निवडला असेल असें वाटतें. हाच आशय शकधूम शब्दानें व्यक्त होत आहे. स्वतः (शक) समर्थ असून जो शत्रूंस (धू) कांपवितो त्याचें हें नांव आहे. प्रजेनें पाहिलें कीं या तेजस्वी पुरुषास राजा निवडलें तर त्याच्या पराक्रमानें आमचे सर्व शत्रु पराजित होतील. आम्हांस सुख लाभ होईल आणि आमचें राष्ट्र महा तेजस्वी होईल.

याप्रमाणें राजाची निवड केल्यानें त्यांस '**भद्राहं**' (**भद्र-अहं**) कल्याण काल प्राप्त झाला. आणि ते सर्व आनंदानें राहूं लागले. कोणीहि शत्रू त्यांस त्रास देण्यास त्यांच्याजवळ येऊं शकत नसे. त्यामुळें सर्व प्रजा आनंदानें, सुखासमाधानानें नांदू लागली.

राजाचा हा प्रताप पाहून सर्व लोक त्या राजाचा सन्मान करूं लागले. या प्रकारें जीं मनुष्यें स्वतःच्या राष्ट्रासाठीं सुयोग्य राजा निवडतील आणि त्याचा योग्य आदर मानसन्मान करतील, ते सुखी होतील. याप्रमाणें विचार करून प्रजेनें स्वतःसाठीं उत्तम राजा निवडावा आणि सुखी व्हावें.

राजाची स्वराज्यावर पुनः स्थापना

कांड ३, सूक्त ३

(ऋषिः- अथर्वा । देवता – अग्निः, नानादेवताः)

अचिक्रदत्स्वपा इह भुवदग्ने व्यचस्व रोदसी उरूची ।
युञ्जन्तु त्वा मरुतो विश्ववेदस आमुं नय नमसा रातहव्यम् ॥ १ ॥
दूरे चित्सन्तमरुषास इन्द्रमा च्यावयन्तु सख्याय विप्रम् ।
यद्गायत्रीं बृहतीमर्कमस्मै सौत्रामण्या दधृषन्त देवाः ॥ २ ॥
अद्भ्यस्त्वा राजा वरुणो ह्वयतु सोमस्त्वा ह्वयतु पर्वतेभ्यः ।
इन्द्रस्त्वा ह्वयतु विड्भ्यः आभ्यः श्येनो भूत्वा विश आ पतेमाः ॥ ३ ॥
श्येनो हव्यं नयत्वा परस्मादन्यक्षेत्रे अपरुद्धं चरन्तम् ।
अश्विना पन्थां कृणुतां सुगं त इमं सजाता अभिसंविशध्वम् ॥ ४ ॥

अर्थ— (**इह स्व-पाः भुवत्**) येथें स्वतःचें रक्षण करणारा मनुष्य असावा असें (**अचिक्रदत्**) आक्रोश करून सांगण्यांत येत आहे. हे (**अग्ने**) अग्नि ! (**उरूची रोदसी व्यचस्व**) विस्तृत द्यावापृथ्वींत तुझें तेज पसरव. (**विश्व-वेदसः मरुतः त्वा युञ्जन्तु**) सर्व जाणणारे मरुत् तुला योग्य बनवोत. (**रात-हव्यं अमुं**) हवनास योग्य पदार्थ देणाऱ्या या पुरुषाला (**नमसा आनय**) नमस्कार पूर्वक येथें आण. (१) (**दूरे चित् सन्तं विप्रं इन्द्रं**) दूर रहाणाऱ्या ज्ञानी इन्द्रालासुद्धां (**अरुषासः सख्याय आच्यावयन्तु**) तेजस्वी लोक मित्रत्वासाठीं येथें घेऊन येवोत. (**यत् देवाः**) कारण कीं सर्व देव (**सौ-त्रामण्या**) सौत्रामणि यज्ञाच्या द्वारें (**गायत्रीं बृहतीं अर्क अस्मै दधृषत**) गायत्री, बृहती, रूप, पूजा त्याच्यासाठीं धारण करतात. (२) (**वरुणः राजा**) राजा वरुण (**अद्भ्यः त्वा ह्वयतु**) पाण्यांतून तुला बोलावो. (**सोमः त्वा पर्वतेभ्यः ह्वयतु**) सोम तुला पर्वतावरून बोलावो. (**इन्द्रः त्वा आभ्यः विड्भ्यः ह्वयतु**) इंद्र तुला त्या प्रजेसाठीं बोलावो. (**श्येनः भूत्वा इमाः विशः आपत**) तूं श्येन पक्ष्यासारखा वेग धारण करून या प्रजेमध्यें ये. (३) (**अन्य-क्षेत्रे अपरुद्धं चरन्तं हव्यम्**) अन्य क्षेत्रांत फिरणाऱ्या परत बोलाविण्यास योग्य अशा राजास (**श्येनः परस्मात् आनयतु**) श्येन पक्ष्याप्रमाणें वेगानें दुसऱ्या क्षेत्रांतून घेऊन येवो, (**अश्विनौ सुगं ते पन्थां कृणुतां**) दोघेहि अश्विदेव तुझा येण्याचा रस्ता प्रवासास सुखकारक करोत. (**सजाताः इमं अभि सं विशध्वं**) सजातीय लोक त्यास स्वतःमध्येंदाखल करून घेवोत. (४)

भावार्थ— या जगांत मनुष्यानें स्वतःचें रक्षण स्वतःच केलें पाहिजे. ही गोष्ट सर्व शास्त्रांनीं घोषणा करून सांगितली आहे. मनुष्यानें अग्निप्रमाणें तेजस्वी होऊन जगांत सर्वत्र स्वतःचा प्रकाश पसरवावा. असें जाणणाऱ्या राजाला सर्व वीर शक्तिशाली करोत आणि सन्मानपूर्वक त्यास त्याच्या गादीवर स्थापोत. (१) राजा कितिही दूर असला तरी स्वतःच्या राज्याच्या हितासाठीं तेजस्वी वीर पुरुषांनीं पुनः एकत्रित होऊन आणि संरक्षणाच्या उत्तम व्यवस्थेसह त्यास पुनः सत्कारपूर्वक त्याच्या राज्यावर घेऊन यावें. (२) जलस्थानाच्या रक्षणासाठीं जलाधिपति, पर्वताच्या रक्षणासाठीं पर्वतावरील अधिकारी, जनतेच्या रक्षणासाठीं जनेतेचे अधिकारी अथवा पुढारी सम्राटास बोलावतील तेव्हांच सम्राट स्वतःच्या प्रजेंत जाऊन सत्वर स्वस्थानीं विराजमान होईल. (३) संकटाचेवेळीं राजा अन्य देशांत जाऊन राहिला असला तरी त्यास पुनः स्वतःच्या गादीवर आणून बसविणें हेंच योग्य होय. ज्ञानी लोक त्याचा मार्ग सुगम आणि सरळ करोत आणि त्याच्या जातीचे लोक त्याचा स्वतःच्या राज्यांत प्रवेश करोत. (४)

ह्वयन्तु त्वा प्रतिजनाः प्रति मित्रा अवृषत । इन्द्राग्नी विश्वे देवास्ते विशि क्षेममदीधरन् ॥ ५ ॥
यस्ते हवं विवदत्सजातो यश्च निष्ट्यः । अपाञ्चमिन्द्र तं कृत्वाथेममिहाव गमय ॥ ६ ॥

अर्थ— सजातीय लोक त्यास स्वतःमध्यें दाखल करून घेवोत. (प्रतिजनाः त्वा ह्वयन्तु) सर्व प्रकारचे लोक तुला बोलावोत. (मित्राः प्रति अवृषत) मित्र तुझें बळ वाढवोत. (इन्द्राग्नी विश्वे देवाः) इन्द्र, अग्नि आणि इतर सर्व देव (विशि ते क्षेमं अदीधरन्) प्रजाजनांत तुझ्यासाठीं क्षेम धारण करोत. (५) हे (इन्द्र) नरेंद्रा ! (यः सजातः) जो सजातीय आहे (च यः निष्ट्यः) आणि जो विजातीय आहे, (ते हवं विवदत्) ते तुझ्या आदरणीयतेविषयीं विवाद करोत. (तं अपाञ्चं कृत्वा) त्याचा बहिष्कार करून (अथ इमं इह अव गमय) त्यानंतर त्यास येथें आण. (६)

भावार्थ— मित्र त्या राजास सहाय्य करोत, सर्व देव प्रजेसहित त्या राजाचें कल्याण करोत. (५) जर कोणी जातीय अथवा परका मनुष्य या योग्य राजाचा विरोध करणारा असेल तर त्यास राज्याबाहेर काढून लावावें आणि अत्यंत आदरपूर्वक सन्मानपूर्वक राजाचा प्रवेश स्वतःच्या राज्यांत करावा. (६)

येथें तिसऱ्या सूक्ताचा अर्थ आणि भावार्थ पूर्ण झाला, या तिसऱ्या सूक्ताशीं चौथ्या सूक्ताचा घनिष्ठ संबंध आहे, म्हणून त्याचाहि अर्थ आणि भावार्थ पाहून नंतरच या दोन्ही सूक्तांचा एकत्र विचार करूं.

राजाची निवड

कांड ३, सूक्त ४

(ऋषिः– अथर्वा । देवताः – इन्द्रः)

आ त्वा गन्राष्ट्रं सह वर्चसोदिहि प्राङ् विशां पतिरेकराट् त्वं वि राज ।
सर्वास्त्वा राजन्प्रदिशो ह्वयन्तूपसद्यो नमस्यो भवेह ॥ १ ॥
त्वां विशो वृणतां राज्याय त्वामिमाः प्रदिशः पञ्च देवीः ।
वर्ष्मन्राष्ट्रस्य ककुदि श्रयस्व ततो न उग्रो वि भजा वसूनि ॥ २ ॥

अर्थ— हे राजन् ! (राष्ट्रं त्वा आगन्) हें राष्ट्र तुला प्राप्त झालें आहे. आतां (वर्चसा सह उद् + इहि) तेजासह तूं उदयास प्राप्त हो. (विशांपतिः प्राङ् एकराट् त्वं विराज) प्रजेचा स्वामी प्रमुख एक सम्राट होऊन तूं विराजमान् हो ! (सर्वाः प्रदिशः ह्वयन्तु) सर्व दिशा आणि उपदिशा तुला बोलावोत. (इह उपसद्यः नमस्यः भव) आणि येथें जवळ पोहोंचण्यास आणि नमस्कारास योग्य हो. (१) (विशः त्वां राज्याय वृणतां) प्रजा तुझा राजा म्हणून स्वीकार करो. (इमाः देवीः पञ्च प्रदिशः) या दिव्य पांच दिशा (त्वां वृणतां) तुला राज्यासाठीं स्वीकारोत. (राष्ट्रस्य वर्ष्मन् ककुदि श्रयस्व) राष्ट्राच्या ऐश्वर्यमय उच्च स्थानचा आश्रय कर. (ततः उग्रः) त्यानंतर उग्रवीर होऊन (नः वसूनि वि भज) आम्हां सर्वांसाठीं धनाचे विभाग कर म्हणजे आम्हां सर्वांस धन वांटून दे. (२)

भावार्थ— हे राजन् ! हें राज्य आतां तुला प्राप्त झालें आहे आणि आतां तूं तुझ्या तेजास प्रकाशित कर, सर्व प्रजेचा एकमेव सम्राट् होऊन विराजमान् हो. सर्व दिशा उपदिशांस रहाणारे लोक तुला चाहोत आणि तूं सर्वांस प्राप्त होणारा होऊन सर्वांकडून पूजा प्राप्त कर. (१) सर्व प्रजा राज्य चालविण्यासाठीं तुझाच स्वीकार करो. सर्व दिशा उपदिशांस रहाणाऱ्या प्रजा तुलाच पसंत करोत. तूं राष्ट्राच्या परम उच्च ऐश्वर्यवान् राजपदावर आरूढ होऊन शूरवीर होऊन आम्हां सर्वांस योग्य प्रकारें धन विभागून दे. (२)

अच्छ त्वा यन्तु हविनः सजाता अग्निर्दूतो अजिरः सं चरातै ।
जायाः पुत्राः सुमनसो भवन्तु बहुं बलिं प्रति पश्यासा उग्रः ॥ ३ ॥
अश्विना त्वाग्रे मित्रावरुणोभा विश्वे देवा मरुतस्त्वा ह्वयन्तु ।
अधा मनो वसुदेयाय कृणुष्व ततो न उग्रो वि भजा वसूनि ॥ ४ ॥
आ प्र द्रव परमस्याः परावतः शिवे ते द्यावापृथिवी उभे स्ताम् ।
तदयं राजा वरुणस्तथाह स त्वायमह्वत्स उपेदमेहि ॥ ५ ॥
इन्द्रेन्द्र मनुष्याः परेहि सं ह्यज्ञास्था वरुणैः संविदानः ।
स त्वायमह्वत्स्वे सधस्थे स देवान्यक्षत्स उ कल्पयाद्विशः ॥ ६ ॥
पथ्या रेवतीर्बहुधा विरूपाः सर्वाः संगत्य वरीयस्ते अक्रन् ।
तास्त्वा सर्वाः संविदाना ह्वयन्तु दशमीमुग्रः सुमना वशेह ॥ ७ ॥

अर्थ-(हविनः सजाताः त्वा अच्छ यन्तु) तुला बोलावणारे तुझ्या जातीचे लोक सन्मानपूर्वक भेटोत. (अग्निः अजिरः दूतः सं चरातै) अग्नि वेगवान दूत होऊन संचार करो. (जायाः पुत्राः सुमनसः भवन्तु) स्त्री आणि पुत्र उत्तम मनाचे होवोत. (उग्रः बहुं बलिं प्रति पश्यासै) उग्र होऊन तूं पुष्कळ देणग्या पहा. (३) (अग्रे) नंतर (अश्विनौ मित्रावरुणौ विश्वेदेवाः मरुतः) अश्विनौ, मित्र आणि वरुण, सर्व देव आणि मरुत् (त्वा त्वा ह्वयन्तु) तुला बोलावोत. (अध वसु-देयाय मनः कृणुष्व) नंतर धनाचें दान करण्याची तूं इच्छा कर. (ततः उग्र नः वसुनि वि भज) त्यानंतर उग्र होऊन आम्हां सर्वांस धनाचे भाग करून दे. (४) (परमस्याः परावतः आ प्रद्रव) फार दूर देशाहून येथें ये. (उभे द्यावा पृथिवी ते शिवे स्तां) उभयतां द्यावा-पृथ्वी तुला कल्याणकारक होवोत. (तथा अयं राजा वरुणः) त्याचप्रमाणें हा राजा वरुण (तत् आह) असें सांगतो कीं (स अयं त्वा अह्वत्) तो तुला बोलावतो (सः इदं उप-आ-इहि) आणि तो तूं या राष्ट्रास प्राप्त कर. (५) हे (इन्द्र-इन्द्र) राजांच्या महाराजा (मनुष्याः परेहि) मनुष्यांप्रमाणें तूं दूर जा आणि (हि वरुणैः संविदानः) वरिष्ठांस भेटून तूं (सं अज्ञास्थाः) सर्व गोष्टी उत्तम प्रकारें जाणूं शकतोस. (सः अयं स्वे सधस्थे त्वा अह्वत्) तो हा स्वतःच्या घरीं तुला बोलावो. (सः देवान् यक्षत्) तो देवांचा यज्ञ करो आणि (सः उ विशः कल्पयतात्) तो निश्चयपूर्वक प्रजेला समर्थ करो. (६) (पथ्याः रेवतीः) सन्मार्गानें चालणारी धनवान् (बहुधा विरूपाः सर्वाः संगत्य) पुष्कळ प्रकारची विविध रूपाची सर्व प्रजा मिळून (ते वरीय अक्रन्) तुझ्यासाठीं श्रेष्ठ स्थान तयार करते. (ताः सर्वाः संविदानाः त्वा ह्वयन्तु) ते सर्व एकमताचे होऊन तुला बोलावोत. त्यानंतर तू (इह उग्रः सुमनाः दशमीं वश) येथें उग्र आणि उत्तम मनानें युक्त होऊन दहा दशकें पर्यंत राज्य तुझ्या ताब्यांत ठेव. (७)

भावार्थ—तुझी इच्छा करणारे जातीचे लोक सन्मानपूर्वक तुझ्या रक्षांत राहोत. अग्निप्रमाणें तुझे तेजस्वी दूत चारी दिशांस संचार करोत. तुझ्या राष्ट्रांत धर्मपत्न्या आणि बालकं उत्तम मनानें युक्त होवोत. तूं शूरवीर होऊन पुष्कळ देणग्या प्राप्त कर. (३) सर्व देवता तुला सहाय्य करोत. तू दान करण्यांत तुझें मन स्थिर कर आणि शूरवीर होऊन आम्हांस योग्य विभाग करून धन वांटून दे. (४) कदाचित् तूं दूर देशास गेला असलास तरी तुझ्या राष्ट्रांत तूं त्वरीत परत फिर. सर्व देव तुला सहाय्य करोत. तूं नेहमीं तुझ्या राष्ट्रांतच रहा. (५) तूं स्वतःस साधारण मनुष्य समजूनच स्वतःच्या देशांत भ्रमण कर आणि राष्ट्रांतील वरिष्ठ माणसांस भेटून सर्व गोष्टी उत्तम प्रकारें समजावून घे. असें करण्याने लोक तुला स्वतःचे घरीं आदरपूर्वक बोलावतील; आणि ते यज्ञयाग करतील. या प्रकारें प्रजेंत मिळून मिसळून प्रजेस सर्व प्रकारें समर्थ कर. (६) प्रजा सन्मार्गानें चालणारी होवो, आणि धनवान् होवो. अनेक प्रकारें रंगरूपानें भिन्न असूनसुद्धां ते सर्व एकत्र मिळून मिसळून एकच प्रजेप्रमाणें एक भावानें तुला श्रेष्ठ मानोत आणि सर्व तुझी एकमतानें प्रशंसा करोत. याप्रमाणें वीरत्वानें आणि शुभ मनोभावनेनें राज्य करतां करतां तूं शंभर वर्षेपर्यंत हें राज्य तुझ्या ताब्यांत ठेव. (७)

राजाची निवड

पूर्व संबंध

या तृतीय कांडाच्या प्रारंभीं दोन सूक्तांत युद्धाचा विषय आहे. शत्रुसेनेशीं युद्ध करून तिचा पूर्ण पराभव करण्याचा महत्त्व-पूर्ण उपदेश या दोन सूक्तांत आहे. याप्रमाणें विजय मिळविल्या-नंतर राजाचा स्वतःच्या राजधानींत प्रवेश होतो. त्यासमयींच्या उत्सवप्रसंगीं म्हणण्याचे हे मंत्र आहेत. अथवा विजय मिळवून राजा परत येतो त्यासमयीं त्यास देण्यायोग्य उपदेश या दोन सूक्तांत आहे. तृतीय आणि चतुर्थ सूक्त विशेष सूक्ष्म दृष्टीनें पहातां एक गोष्ट चटकन ध्यानीं येते ती अशी कीं, ' एखादवेळीं शत्रूसेनेकडून पराजित झालेला राजा दुसऱ्या देशांत अथवा जंग-लांत लपून राहिला आणि त्याच्या राज्यावर दुसऱ्या कोणा विदेशी राजानें राज्य झालें तर अशा प्रसंगीं राज्यांत रहाणाऱ्या लोकांनीं आणि जुन्या राजवटींतील अधिकारी आणि वीरपुरुषांनीं राज्य-क्रान्ति करण्याचा प्रयत्न करावा. पुरुषार्थानें आणि प्रयत्नानें शत्रूंस हरवून जुन्या राजास अत्यंत सन्मानपूर्वक त्याच्या राज्यावर पुनः स्थापित करावें. असा उपदेशसुद्धां येथें स्पष्ट दिसतो. पुराणांत इन्द्राविषयीं अशीच एक कथा रचलेली आहे. असुरांकडून इन्द्राचा पराभव झाला. तो पळून गेला आणि दुसऱ्या कोठल्या प्रदेशांत लपून राहिला. देवांनीं स्वतःच्या पुरुषार्थानें आणि प्रयत्नानें असुरांचा पराभव करून इन्द्रास शोधून काढलें आणि त्यास पुनः इन्द्रपदावर स्थापित केलें. ही कथा महाभारत उद्योगपर्व अ. १० पासून १५ पर्यंत दिलेली वाचकांस पहावयास मिळेल. या सर्व राजकीय घटना मनांत ठेवून या दोन सूक्तांचा अभ्यास आणि मनन करावें. असें केल्यानें या सूक्तांतील राजनीतीचा मोठा उपदेश मिळूं शकतो.

आत्मरक्षण

तिसऱ्या सूक्तांत प्रारंभींच आत्मरक्षणाचा मोठा महत्त्वपूर्ण संदेश सांगितला आहे. प्रत्येक वैदिक धर्मीयानें तो ध्यानीं बाळग-ण्यासारखा आहे—

इह स्व-पा भुवत् (इति) अचिक्रदत् ॥

(सू. ३, मं. १)

' येथें मनुष्यानें आत्मरक्षण करणारें व्हावें असें ओरडून ओरडून सांगितलें आहे. ' या जगांत मनुष्यास जर सन्मानानें जगावयाचें असेल तर त्यानें (**स्व-पाः**) आत्मरक्षण करणारें असणें आवश्यक आहे. ही गोष्ट जितकी व्यक्तीस लागू पडते तितकीच ती सत्य असून समाजास व राष्ट्रासमुद्धां लागू पडते. त्याचें संबंधींहि ती तितकीच सत्य आहे. जेव्हां एक समाज आत्म-रक्षणाविषयीं निष्काळजी असतो तेव्हां दुसरा समाज तितकाच त्याच्यावर आक्रमण करण्याची तयारी करीत असतो. त्याचप्रमाणें जेव्हां एखादें राष्ट्र आत्मसंरक्षणाविषयीं असमर्थ होतें तेव्हां दुसरें राष्ट्र त्याचेवर चढाई करतें, त्यास हरवितें, त्याच्यावर स्वतःचा अंमल बसवितें. आत्मरक्षणाविषयीं असमर्थता हा महान् अपराध आहे, आणि जीं राष्ट्रें परतंत्र झालीं आहेत त्यांस या वैदिक उपदेशाचें महत्त्व नीट पटलें आहे. आत्मरक्षणाचें महत्त्व किती आहे ही गोष्ट या मंत्रानें पुनः पुनः जाहीर घोषणेनें सांगितली आहे त्यावरून ध्यानीं येते. जी गोष्ट अत्यंत महत्त्वाची ती पुनः पुनः सांगितली जाते. म्हणूनच ती गोष्ट वेदांत पुनः पुनः (ओर-डून ओरडून) सांगितली आहे. ती मनुष्य मात्राच्या उन्नतीच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वपूर्ण आहे, यांत कांहीं शंकाच नाहीं. वाचकांनीं या दृष्टीनें आत्मरक्षणाचा हा वैदिक उपदेश ध्यानीं बाळगावा.

आत्मरक्षणाचें सामर्थ्य ज्या राष्ट्रांत अथवा राजांत असत नाहीं ते पराजय पावतात आणि आपत्तींत सांपडतात. आत्मरक्षण करणाराचें तेज वाढतें. याविषयीं पुढील मंत्रभाग पहा—

अग्ने ! उरूची रोदसी व्यचस्व ॥ (सू. ३, मं. १)

' अग्निप्रमाणें तेजस्वी होऊन तूं या द्यावापृथ्वीमध्यें चारी दिशांस पसर. ' आत्मरक्षण करणाराचा आदर्श अग्नि असला पाहिजे. अग्नि नेहमीं उर्ध्वगतीनें जळतो आणि प्रकाशतो. '**अग्नेः उर्ध्व-ज्वलनं**', अग्नीची ज्वलनगति ऊर्ध्वगति आहे. उच्च-गतीचे सदा सर्वकाळ उन्नतच होत जातात, आणि स्वतःचें तेज पसरवितात. सर्व जगास प्रकाशमान् करतात. आत्मरक्षण कर-णाराचें यश जगांत चारी दिशेस पसरतेंच. आत्मरक्षण करणाऱ्याची गति तर अग्नीच्या प्रचंड प्रकाशानेंच दाखविली आहे. ती नेहमीं पाहिली असतां वैदिकधर्मी आत्मरक्षण करण्याच्या स्वतःच्या कर्तव्यास कधींहि विसरूं शकणार नाहीं. आतां आत्मरक्षण न करणाऱ्याची काय दशा होते तें पहा—

अन्यक्षेत्रे अपरुद्धं चरन्तं ॥ (सू. ३, मं. ४)

' दुसऱ्याच्या देशांत प्रतिबंधी (कैदी) होऊन भटकतो. ' जो आत्मरक्षण करीत नाहीं तो दुसऱ्याच्या अधिकारांत सांपडतो, दुसऱ्या देशांत त्यास लपूनछपून दिवस काढावे लागतात, कोणत्यातरी प्रकारच्या कैदखान्यांत त्यास सडत पडावें लागतें हा

आत्मरक्षण न करण्याचा परिणाम आहे. आत्मरक्षण न करण्यामुळेंच ह्या परवशतेचा भयंकर परिणाम सहन करावा लागतो. म्हणून हें जाणून प्रत्येक मनुष्यानें, समाजानें, राष्ट्रानें अथवा राजानें आत्मरक्षण हें स्वतःचें परमश्रेष्ठ कर्तव्य कधींहि विसरूं नये. हा वेदाचा आदेश या सूक्तच्या योगानें वारंवार घोषित केला आहे की मनुष्यानें ही आत्मरक्षणाची गोष्ट विसरूं नये.

सौत्रामणि याग

' सौत्रामणि ' नांवाचा एक महान् यज्ञ आहे, त्यांत मुख्य ध्येय अथवा साध्य काय आहे तें तैत्तिरीय संहितेच्या वचनांनीं स्पष्ट होतें—

इन्द्रस्य सुषुवाणस्य दशधेन्द्रियं वीर्यं परापतत् ।
तद्देवाः सौत्रामण्या समभरन् ॥ (तै. सं. ५।६।३।४)

'इंद्राचें वीर्य दाही दिशांस विभिन्न मार्गांनीं विभक्त झालें होतें. तें देवानीं सौत्रामणी यागानें एकत्रित केलें ' 'म्हणजे सौत्रामणी यागाचें साध्य इतस्ततः देशोधडीस लागलेल्या शक्तींस एकत्रित करण्याचें आहे. ' **सु+त्रामन्** ' शब्दाचा अर्थ (**सु**) उत्तम (**त्रामन्**) रक्षण करण्याची बुद्धिपूर्वक शक्ति ही ज्याच्यामुळें प्राप्त होते त्यास '**सौत्रामणी याग**' म्हणतात. तै. संहितेच्या पूर्वोक्त वचनांत इतस्ततः पसरलेल्या इंद्रशक्तीस एकत्रित करण्यासाठीं हा सौत्रामणि यज्ञ करण्यांत आला आणि त्या यज्ञानें ही शक्ति केन्द्रीभूत झाली, वगैरे गोष्टी स्पष्ट शब्दांत सांगितल्या आहेत. म्हणजे सौत्रामणि यज्ञानें संगठन होतें आणि राष्ट्रीय शक्ति वाढते. त्यामुळें या तिसऱ्या सूक्ताच्या दुसऱ्या मंत्रांत सौत्रामणि यज्ञद्वारा राज्यभ्रष्ट राजास पुनः राजगादीवर आणावें असें सांगितलें आहे—

दूरे सन्तं विप्रं इंद्रं सख्याय अरुषासः आच्यावयन्तु।
(सू. ३, मं. २)

' राज्यापासून दूर झालेल्या ज्ञानी राजास दोस्तीसाठीं तेजस्वी लोक गुप्त स्थानांतून येथें घेऊन येवोत.' राज्यभ्रष्ट राजा जंगलांत अथवा (**अन्यक्षेत्रे अपरुद्धं चरन्तं** मं. ४) दुसऱ्या देशीं लपून राहिला असला तर त्यास पुनः राज्यावर स्थापित करण्यासाठीं ज्ञानी लोक त्यास स्वतःच्या राज्यांत घेऊन येवोत. त्याचें मित्रत्व पुनरपि स्वतःच्या प्रजेशीं पूर्ववत् व्हावें आणि इंद्र (राजा) च राजगादीवर बसावा एतदर्थं हे सर्व प्रयत्न आहेत. त्यासाठीं प्रयत्न करण्यासाठींच सौत्रामणि याग करण्यांत येतो. असें या दुसऱ्या मंत्राच्या उत्तरार्धांत सांगितलें आहे.

देवाः अस्मै गायत्रीं बृहतीं अर्कं सौत्रामण्या दधृषन्त । (सू. ३, मं. २)

देव या राजासाठीं गायत्री, बृहती आदि अर्चन सत्कार सौत्रमणी यागानें करतात. ' राजगादीवर राजास पुनः प्रस्थापित करण्यासाठींच सौत्रामणि याग करण्यात येतो. या यज्ञानें स्वतःची विखुरलेली शक्ति एकत्रित केली जाते, आणि त्याशक्तिनें त्या राजास स्वतःच्या राज्यांत आणून त्याचा मोठा सत्कार केला जातो. त्या सत्काराचें स्वरूप पहा.

वरुणो राजा त्वा अद्भ्यः ह्वयतु ।
सोमः त्वा पर्वतेभ्यः ह्वयतु ।
इन्द्रः त्वा आभ्यः विड्भ्यः ह्वयतु (सू. ३, मं. ३)
अश्विना ते सुगं पन्थां कृणुताम् ॥ (सू. ३, मं. ४)
प्रतिजनाः त्वा ह्वयन्तु, मित्राः प्रति अवृषत ॥
(सू. ३, मं. ५)

' वरुणराजा जलस्थानांच्या रक्षणासाठीं तुला बोलावो. सोम राजा पर्वतांच्या रक्षणासाठीं तुला बोलावो. इंद्र तुला या प्रजाजनांच्या व्यवस्थेसाठीं बोलावो. अश्विदेव तुला येथें येण्याचा मार्ग सुगम करोत. प्रत्येक प्रजाजन आदरानें तुला बोलावो आणि मित्र नेहमीं तुझें बल वाढवोत. '

राज्यव्यवस्थेंत समुद्र किनाऱ्याचा बंदोबस्त तसेंच दुर्गम वाटले तरी पर्वतस्थानाचा बंदोबस्त हे आंतर्राष्ट्रीय महत्त्वाचे आहेत आणि प्रजेच्या बंदोबस्ताचें कार्य अंतर्गत व्यवस्थेचें आहे. समुद्रांत जहाजें, जलदुर्ग इत्यादींच्या रक्षणाची व्यवस्था करावयाची असते. आणि पर्वतावरहि किल्ले वगैरेंची व्यवस्था आवश्यक असते. प्रजेची सुव्यवस्था हा तर राज्यशासनाचा एक प्रमुख भागच होय, त्याविषयीं तर जराहि शंका नाहीं. या सर्व व्यवस्था पार पाडण्यास राजास पुनः राज्यावर प्रस्थापित करणें आवश्यक हें तात्पर्य येथें आहे. राजाची कांहीं कर्तव्यें हि येथें सूचित केलीं आहेत. सर्व देवतांचें साहाय्य या राजास प्राप्त व्हावें आणि अशा देवांच्या सहाय्यानें बलवान् बनलेल्या राजानें शत्रूस, अजिंक्य ठरून त्यास पराजित करावें अशी इच्छा प्रजाजन आणि त्यांच्या पुढाऱ्यांनीं नेहमीं मनांत बाळगावी. या विषयीं पुढील मंत्रांत काय म्हटलें आहे तें पहा—

इन्द्राग्नी विश्वे देवाः विशि ते क्षेमं अदीधरन् ।
(सू. ३, मं. ५)

' इंद्र, अग्नि आणि इतर सर्व देव प्रजेंत तुझें कल्याण वाढवोत.' म्हणजे या देवांच्या कृपेनें तुझ्या प्रजेचेंसुद्धां कल्याण होवो आणि प्रजेच्या आनंदानें तुझें सुद्धां कल्याण होवो. येथें —

ते क्षेमं विशि (सू. ३, मं. ५)

' तुझें (राजाचें) कल्याण प्रजेमध्यें वातव्य करतें ' म्हणजे

प्रजाजनांचें कल्याण होण्यानेंच राजाचें कल्याण होण्याची शक्यता सांगितली आहे. एरवीं नाहीं. प्रजेचें कल्याण तेंच आपलें कल्याण असें जो राजा मानीत नाहीं तो राजाच नव्हे. यजुर्वेदांत पण म्हटलें आहे–

विशि राजा प्रतिष्ठितः। (यजु. २०।९)

' प्रजेच्या आश्रयानेंच राजा प्रतिष्ठित होतो, ' जर प्रजाच नसली तर राजाचें अस्तित्वच कोठलें ! या उलट राजा नसला तरी प्रजा राहूं शकते. म्हणून म्हटलें आहे कीं राजा प्रजेच्या आश्रयानें रहातो. परंतु प्रजा राजाच्या आश्रयाशिवायहि राहूं शकते. याप्रमाणें राजाचें कल्याण प्रजेच्या कल्याणांतच आहे. **' ते क्षेमं विशि '** या अथर्ववेदाच्या मंत्राचें वाचकांनीं या दृष्टीनें मनन करावें. अशा राजास स्वतः होऊन लोकांनीं स्वतःच्या राज्यांत पुनः स्थापन करावें. या विषयीं उक्त सूक्ताचा चौथा मंत्र पहा–

सजाताः इमं (राजानं) अभि-सं-विशध्वम्॥
(सू. ३, मं. ४)

' सजातीय लोकांनीं या राजाच्या (**अभि**) चारी बाजूंनीं (**सं**) चांगल्या प्रकारें (**विशध्वं**) प्रवेश करावा. ' राजा स्वदेशीं परत येणार, स्वजातीयांसहच येणार, तेच त्याच्या संरक्षणाची व्यवस्था करणार आणि ते सर्वत्र उत्तम व्यवस्था ठेवतील, राजाच्या संरक्षणासाठीं उत्तम यत्न करण्यांत यावेत. स्वजातीयच (**सजाताः**) राजाचे उत्तम रक्षक होऊं शकतील. विजातीय केव्हां कांहीं दगा फटका करतील सांगतां येणार नाहीं. त्यांचेवर विश्वास ठेवता येणार नाहीं. म्हणून राजानेंसुद्धां सजातीयांवर अधिक विश्वास ठेवावा, आणि त्यांचा योग्य मानसन्मान करावा. नाहींतर कित्येक राजे असे असतात कीं ते परदेशी आणि अन्य जातीयांवर अधिक विश्वास ठेवतात आणि स्वदेशीय आणि स्वजातिवाल्यांचा अविश्वास करतात. या आत्मघातकी वर्तनाचा परिणाम अंतीं त्यास अत्यंत वाईट रीतीनें भोगावा लागतोच. यासाठींच या मंत्रांत स्वजातीयांस विश्वासांत घेण्याची सूचना करण्यांत आली आहे. राजनीतींत ती विशेष महत्त्वाची आहे. जेथें स्वजातीय माणसें जरुर तितकी मदत करण्यास तयार असतात, तेथेंच राजानें शीघ्र जाऊन आपलें कार्य करावें, या विषयीं हा मंत्र पहा ..

श्येनः भूत्वा इमाः विशा आपत (सू. ३ मं. ३)

' श्येन पक्ष्याप्रमाणें वेगानें प्रजेंत येऊन रहावें ' म्हणजे ज्या प्रजेंतील भद्र पुरुष (पुढारी), (राजास) मदत करण्यास तयार असतील तेथें राजानें त्वरित जाऊन स्वतःचें प्रजा पालनाचें कार्य केलें पाहिजे.

विरोधी मनुष्य

सजातीय हे नेहमींच राजाच्या सहाय्यास तैयार रहातील कारण राजाचा (आणि राज्याचा) गौरव वाढल्यामुळें त्यांचें यशहि वाढणार आहेच. पण कित्येक लोक शत्रुपक्षास जाऊन मिळतात, आणि राजा उत्तम असला तरी त्यास पुनः राज्यावर स्थापित करण्यास विरोध करतात. ही शक्यता आहे. तर अशा माणसांचें काय करावें, अशी शंका येथें अवश्य उत्पन्न होते. या शंकेचें उत्तर या सूक्ताच्या सहाव्या मंत्रांत दिलें आहे–

यः स जातः, यः च निष्ट्यः, ते हवं विवदत् ।
तं अपाञ्चं कृत्वा, अथ इमं इह अवगमय।
(सू. ३ मं. ६)

' कोणी सजातीय अथवा विजातीय अथवा विदेशी मनुष्य तुझ्या राज्यारोहणाच्या शुभप्रसंगीं विरोध उभा करणारे असतील तर त्यांच्या बहिष्कार करून मगच या राजास येथें घेऊन या. '

सर्वानुमतीनें जर राजास गादीवर बसविण्यांत आलें असेल तर त्याच्याविरुद्ध छळ, कपट, कांहीं कुटिल डाव करणारा कोणी मनुष्य असल्यास (**अपाञ्चं तं कृत्वा**) त्यास दूर करून श्रेष्ठ लोकांनीं तें आपलें प्रशस्त कर्तव्य केलें पाहिजे. राज्याच्या अंतर्गत व्यवस्थेंत असें अनेक विवाद्य प्रश्न असतातच, म्हणून विरोधकांस दूर करण्याचा एकमात्र उपाय येथें सांगितला. या प्रमाणेंच वाचक अन्य उपद्रवहि दूर करूं शकतात.

चतुर्थ सूक्त

येथें तृतीय सूक्तासंबंधी विचार संपूर्ण झाला. आतां चतुर्थ सूक्ताचा विचार करूं. तृतीय सूक्ताचा संबंध राष्ट्राबाहेर असणाऱ्या राजास पुनः स्वराज्यांत आणून त्याच्या मूळस्थानीं स्थापन करण्याच्या महत्त्वपूर्ण कार्याशीं आहे. या चौथ्या सूक्ताचा संबंध सर्व साधारण राजा आणि प्रजेनें निवडलेल्या राजास राजगादिवर बसविण्याच्या कार्याशीं आहे. याप्रमाणें तृतीय सूक्तांशीं या सूक्ताचा एक प्रकारें संबंध आहे आणि एक प्रकारें तें स्वतंत्र हि आहे. राजाचा राज्याभिषेक हा चौथ्या सूक्ताचा मुख्य विषय आहे. या सूक्तांत प्रजेकडून राजाची निवड (**निवडणूक**) करण्यासंबंधीं विषय आहे. त्याचाच प्रथम विचार करूं —

राजाची निवडणूक

राजपुत्र असो अथवा इतर कोणी नवाच वीर असो त्याला प्रजेच्या संमतीनेंच राज्यप्राप्ति व्हावयाची. श्री. रामचंद्रासारख्या सर्व मान्य पुरुषाला सुद्धां राज्य प्राप्तीसाठीं प्रजेची अनुमति घ्यावी लागली. या गोष्टीचा विचार करतां प्रजेची अनुमति ही

फार महत्त्वाची आणि प्रबल अशी शक्ति होती असें स्पष्ट होतें. या सूक्तनें या वैदिक प्रथेवर उत्कृष्ट प्रकाश पडला आहे. पहा–

प्रदिशः देवीः इमाः पञ्च विशः त्वां राज्याय वृणताम्। (सू. ४ मं. २)

' दिशा आणि उपदिशांस रहाणाऱ्या पांच प्रकारच्या प्रजा तुला राज्याच्या आधिपत्यासाठी निवडोत. ' प्रजा राज्यशासन चालविण्यास तुम्हा स्वीकार करो असें म्हणण्यांत तुला राजा म्हणून नेमणें न नेमणें हा अधिकार प्रजेच्या आधीन आहे ही गोष्ट येथें आपोआप सिद्ध होतें. अथर्ववेदांत ही गोष्ट परिपक्वपणें ठसविणारीं अनेक सूक्तें आहेत. त्यांचा विचार यथावकाश त्यांच्या योग्य स्थानीं होईलच. वाचकांनीं सुद्धां जेथें जेथें असे उल्लेख येत असतील ते सर्व एकत्रित करून त्यांवर विचार करावा, म्हणजे त्यांस वैदिक राजनीति शास्त्राचें उत्तम ज्ञान होईल. असो. या प्रमाणें राजाची निवडणूक करून त्याची स्थापना राजगादीवर करण्याचा अधिकार प्रजेचा आहे, एवढें या मंत्रद्वारा सिद्ध झालें आहेच. आतां या सूक्तांतील या भावनेस पोषक असा अन्य मंत्र भाग येथें पाहूं–

हे राजन् ! सर्वाः प्रदिशः (प्रजाः) त्वा ह्वयन्तु। (मं. १)

हविनः सजाताः त्वा अच्छ यन्तु। (मं. ३)

बहुधा विरूपाः सर्वाः (प्रजाः) संगत्य ते वरीयः अक्रन्। (मं. ७)

ताः संविदानाः सर्वाः (प्रजाः) त्वा ह्वयन्तु (मं. ७)

' हे राजन सर्व दिशांस रहाणाऱ्या सर्व प्रजा तुला बोलावोत. भेट आणणारे सजातीय लोक तुझ्यासमोर येऊन राहो. विभिन्न रूपाची ही तुझी प्रजा एकत्र सभा रचून तुला सर्व प्रकारें श्रेष्ठ ठरवो. तें जाणणारी सर्व प्रजा तुलाच बोलावो. '

वरील मंत्र प्रजेची अनुमति राजासाठीं अत्यावश्यक होती ही गोष्ट स्पष्ट दर्शवितात. त्यामुळें या सूक्ताचा आशय असाच असावा कीं प्रजेनें निवडलेल्या राजासच राजगादी मिळावी. कोणाहि पुरुषास जन्मतः राज्याधिकार मिळूं शकत नसे, परंतु ज्याचा स्वीकार प्रजा राजा म्हणून करील तोच राजपदासाठीं योग्य ठरूं शके. या सूक्तांतील ही महत्त्वाची गोष्ट वाचकांनीं पहावी आणि वैदिक धर्माप्रमाणें प्रजेनें नियुक्त केलेला आणि प्रजेची संमति असलेलाच पुरुष राजा होऊं शके ही गोष्ट ध्यानांत ठेवावी.

प्रजेचें पालन

राज्याभिषेकाचे वेळीं म्हणजे प्रजेनें निवडलेल्या राजास राजगादीवर अभिषिक्त करते वेळीं त्यास सांगण्यांत येत असे कीं प्रजापालन हें आतां तुझें कर्तव्य आहे. पहा—

१ राष्ट्रं त्वा आगन्,
२ वर्चसा सह उदिहि,
३ विशां पतिः प्राङ् एकराट् त्वं विराज,
४ उपसद्यः नमस्यः च इह भव।। (मं. १)

' हे राजा ! (१) आतां तुला राज्य प्राप्त झालें आहे, (२) तुझ्या तेजानें तूं (उन्नति) प्राप्त कर, (३) प्रजेचा पालनकर्ता तूं एक मुख्य राजा होऊन विशेष प्रकाशमान हो, (४) तसेंच सर्व प्रजेजवळ जाण्यास आणि नमस्कार करण्यास योग्य असा तूं हो ! ' या पहिल्याच मंत्रांत तूं ' प्रजा–पति ' हो असें सांगण्यांत आलें आहे. ' पति ' शब्दाचा रूढ अर्थ स्वामी, धनी, मालक असा होतो परंतु हा शब्द ' पा ' धातूपासून झालेला असल्यानें (**पाति–रक्षति**) पालन करणारा अशाच अर्थानें खास करून वापरला आहे. जो पालन करतो तोच पति होण्यास योग्य होतो म्हणून प्रजा–पति (**विशां पतिः**) हा शब्द प्रजेचें पालन हेंच राजाचें कर्तव्य असलें पाहिजे, असें दर्शवितो. राजा शब्द सुद्धां वस्तुतः अनियंत्रित राजास उद्देशून वापरलेला नाहीं. पण (**रंजयति**) प्रजेचें रंजन करणारा असा उत्तम राजाचा वाचक आहे. याप्रमाणें जेथें प्रजापालन हें राजाचें मुख्य कर्तव्य सांगितलें आहे. असा राजालाच प्रजा प्रेमानें (**नमस्यः**) नमन करीत असे. म्हणजे त्याचा सत्कार करीत असे. राजा असा असावा कीं प्रसंगोपात् प्रजेस त्याची भेट (**उपसद्यः**) घेतां यावी. प्रजेस ज्याचें नित्यदर्शन व्हावें असा राजा असला पाहिजे. जो नित्य मंत्रीमंडळ आणि अधिकारी यांनीं घेरलेला रहातो आणि प्रजेस ज्याचें कधीं तोंडहि पहावयास मिळत नाहीं असा राजा या पदवीस योग्यच नाहीं. मग तो प्रजेकडून मान सन्मान, सत्कार–नमस्कार कसे मिळविणार ? यावरून हें स्पष्ट होतें कीं जर प्रजेचा आदर आणि नमस्कार मिळविणें असेल तर राजानें प्रजेंत अवश्य मिसळलें पाहिजे. प्रजेच्या अवश्य गांठीभेटी घेतल्या पाहिजेत.

या मंत्रांत (**राष्ट्रं त्वा आगन्**) राष्ट्र तुझ्याजवळ आलें आहे. या वाक्यावरून स्पष्ट समजेल कीं राष्ट्र स्वतःच्या इच्छेनें, संमतीनें तुझ्याजवळ आलें आहे. म्हणजे राष्ट्रांतील पांच प्रकारची प्रजा राजगादीसाठीं तुला पसंत करून नियुक्त करीत आहे. अशा प्रकारें स्वखुषीनें राष्ट्र तुला प्राप्त झालें असल्यानें अशीच प्रजेची अनुकूलता तुला राहील, प्रतिकूलता कधीं होणार नाहीं अशा प्रकारें तूं प्रजेचें पालन कर. वाचक जर या मंत्राचा विचार

करतील तर त्यांच्या ध्यानीं येईल कीं राजा होण्यास प्रजेचें आनुकूल्य कसें आवश्यक असे. प्रजेच्या अनुमति वांचून राजा राजगादीवर राहूंच शकत नसे ही गोष्ट येथें स्पष्टपणें समजते.

धनाचे विभाग

प्रजेमध्यें संपत्ति जर विषम प्रमाणांत वांटली गेली तर कांहीं लोक पुष्कळच धनवान् होतील आणि ते निर्धनांवर सत्ता गाजवतील, त्यामुळें गरीब निर्धन लोक भरडून निघतील. त्यासाठीं राजाच्या आवश्यक कर्तव्यांत हेंहि एक कर्तव्य वेदांनीं सांगितलें आहे कीं त्यानें प्रजेंत योग्य प्रमाणांत धन विभागून द्या. प्रजेंत धनाची विभागणी विषम नसावी. एतत्संबंधीं वेदांत ठिकठिकाणीं आदेश दिलेला आहे.

१ राष्ट्रस्य वर्ष्मन् ककुदि श्रयस्व
ततः उग्रः (भूत्वा) नः वसूनि विभज॥ (मं. २)
२ अध मनः वसुदेयाय कृणुष्व
ततः उग्रः (भूत्वा) नः वसूनि विभज ॥ (मं. ४)

' (१) राष्ट्राच्या ऐश्वर्यमय उच्च स्थानावर राहून उग्र होऊन आमच्यासाठीं धनाचे भाग कर. (२) त्यानंतर तुझें स्वतःचें मन धनाच्या दानासाठीं अनुकूल कर, उग्र होऊन आमच्यासाठीं धनाचे भाग करून वांटून दे. ' या दोन मंत्रखंडांत प्रथम असें म्हटलें आहे कीं ' हे राजा ! तूं सर्व प्रथम राष्ट्राच्या उच्च स्थानीं आरूढ हो म्हणजे राज्यारूढ हो. नंतर उग्र हो म्हणजे कोमल हृदयी होऊं नकोस आणि प्रजेंत धनाचे भाग कर. '

जरी राजा प्रजेच्या अनुमतीनें राज्यारूढ होत असला तरी राज्यपद प्राप्त झाल्यावर त्यानें उग्र व्हावयास हवें. नरम अथवा ढीलें राहून चालणार नाहीं. तो तसा झाला तर राजाचीं कर्तव्यें योग्य रीतीनें पार पडणार नाहींत. धर्माधर्मांचा निर्णय करून अधर्माचरण करणारांस कडक शासन करावयाचें तर तें उग्र झाल्यावांचून कसें होणार? म्हणून राजानें उग्र होणें आवश्यकच आहे. उग्र होऊन पक्षपात केल्यावांचून राजानें कर्तव्यें पार पाडली पाहिजेत.

धनाची विभागणी योग्य प्रकारें करतांना राजानें पक्षपात करूं नये. धनिकांचा अथवा निर्धनांचाहि पक्ष घेऊं नये. राष्ट्रांत धन विषम प्रमाणांत वांटलें जात नाहीं हें लक्ष ठेऊन स्वतःचें वसु विभाजनाचें कर्तव्य पार पाडलें पाहिजे. हें मोठें कठिण कार्य तर खरेंच पण तितकेंच तें राज्याच्या स्थितीस आवश्यकहि आहे. धनाची विषमता, ज्ञानाची विषमता, अधिकाराची विषमता, आणि जातींचा उच्च-नीच भाव इत्यादि अनेक विषमता आहेत. त्यांत धन आणि अधिकाराची विषमता फार घातक आहेत. या विषमतेखालीं दबलेल्या मनुष्यांची उन्नति होणें कठिण आहे. ज्या जाति दबलेल्या स्थितींत आहेत त्यांची स्थिति तर भयानकच आहे. ही हकीकत तर सर्वांस विदित आहेच. म्हणून राजाच्या वसुविभाग नांवाच्या कर्तव्यांत धनविषयक विषमता दूर करण्याचा उपदेश केलेला आहे त्याचें महत्त्व वाचकांनीं ध्यानीं घ्यावें आणि बरोबर समजून घ्यावें.

शुभसंकल्प

प्रजेस शुभसंकल्पयुक्त करणें हेंहि राजाचें मुख्य कर्तव्य आहे. त्याचा प्रारंभ राष्ट्राच्या माता आणि सुपुत्रांपासून होणें योग्य आहे. याविषयीं पहा—

जायाः पुत्राः सुमनसः भवन्तु । (मं. ३)

(हे राजा ! तुझ्या राज्यांत शिक्षणाची अशी व्यवस्था कर कीं), ' स्त्रिया आणि बालकें उत्तम विचारयुक्त होतील ' ज्या राष्ट्रांतील माता आणि बालकें सर्व उत्तम विचारांनीं युक्त झालेलीं असतात त्या राष्ट्राची गणना स्वर्गांतच केली पाहिजे. सुविचार युक्त कन्या आणि शुभसंकल्पयुक्त कुमार राष्ट्रांत वाढले तरच ब्रह्मचर्ययुक्त वायुमंडल निर्माण होईल. अन्यथा जें होणें शक्य आहे तें आज स्पष्ट दिसून राहिलेंच आहे. राष्ट्रांत विद्येचे अधिकारी शिक्षक तसेंच अन्य शासनाधिकारी जर उत्तम ब्रह्मचारी झाले तरच राष्ट्रांतील सर्व कुमार-कुमारी उत्तम संकल्पशाली होतील. वाचकांनीं या बाबतींत पुष्कळ विचार करावा. जो प्राचीन समयीं व्यवहारांत आलेला होता असाच हा उपदेश वेदानें येथें दिला आहे. परंतु आतां पुनः तो लवकर व्यवहारांत येईल असें वाटत नाहीं. कारण कीं अवैदिक वायुमंडल वाढत आहे. म्हणून वैदिक धर्मी आर्यांनीं कुमार-कुमारींच्या पवित्र विचारांचें वायुमंडल उत्पन्न करण्याचा प्रयत्न करणें हें त्यांस उचित आहे, आणि असा आदर्श स्वतःच्या मनांत नेहमीं जागृत ठेवावा.

राजाची रहाणी-करणी

राजाचा व्यवहार अगदीं सरळ आणि साधा असला पाहिजे, केव्हां तरी सामान्य मनुष्याप्रमाणें वेशांतर करून राजानें राज्यांत भ्रमण करावें आणि प्रजेचें सुखदुःख प्रत्यक्षपणें पहावें असा आदेश आहे. पहा...

इन्द्रेन्द्र ! मनुष्याः (वत्) परेहि,
वरुणैः संविदानाः सं अज्ञास्थाः ॥
स अयं त्वा स्वे सधस्थे अह्वत्,
स उ देवान् यक्षत् विशः कल्पयात् ॥ (मं. ६)

हे राजा ! सामान्य लोकांसारखा होऊन तूं प्रजेंत दूरदूर भ्रमण

कर, तेथील श्रेष्ठ, ज्ञानी, पुढारी अशा माणसांस भेटून तेथील खऱ्या परिस्थितीचें ज्ञान करून घे, ते तुला स्वतःच्या घरीं बोलावतील, यज्ञ करतील, याप्रमाणें सर्व प्रजेची उन्नति कर.'

या मंत्राचें मनन अनेक दृष्टिबिंदुनीं करण्यासारखें आहे. त्यांत सर्व प्रथम असें सांगितलें आहे कीं राजानें केव्हां केव्हां आपलें दरबारी (राज) वैभव दूर करून सामान्य मनुष्यासारखें व्हावें, त्यांच्यासारखा पोषाख करून राष्ट्रांत भ्रमण करावें आणि स्वतःच्या प्रजेची स्थिति कशी आहे ती स्वतःच्या नजरेनें पहावी, प्रजा कोणत्याहि प्रकारच्या दुःखाकष्टांत अथवा आपत्तींत तर नाहींना ! सुखांत आहेना ? स्वतः नेमलेले अधिकारी प्रजेशीं कसे वागतात ? स्थानिक लोकांचे (वरुणैः-वरैः) नेते पुढारी आणि जास्त बुद्धिशाली लोक असतील त्यांच्यांत मिळून मिसळून परिस्थिति योग्य प्रकारें जाणून घ्यावी. तसेंच कोणत्या सुधारणा केल्यानें प्रजेचें सुख वाढेल त्याची माहिती मिळवावी. तशा सुधारणा करून प्रजेचें सुख वाढविण्याचा प्रयत्न करावा. याप्रकारें स्वतः फिरून पाहिल्यानें राज्यशासनाचे गुण दोष राजास स्वतःसच कळून येतील.

दुसरी गोष्ट या मंत्रांत सांगितली आहे ती अशी कीं प्रजेनें उत्सवादिक, यज्ञ यागाच्या निमित्तानें राजास घरीं बोलवावें. राजानें हि त्याप्रमाणें जाऊन त्यांचेशीं मिळून मिसळून सुख दुःखाच्या खिलोळ्याच्या गोष्टी कराव्या. अशा प्रकारें राजानें प्रजेस समर्थ करून तिची उन्नति करावी. हा सर्व उपदेश राजास तसेंच राज पुरुषांस, अधिकारीवर्गास नेहमीं मनन करण्यालायक उत्तमच आहे.

दूतांचा संचार

राजानें वेष पालटून राज्यांत फिरून परिस्थिति स्वतः जाणून घ्यावी याविषयीं वर सांगण्यांत आलेंच, पण एकटा राजा राज्यांत कोठें कोठें फिरेल ? आणि किती पाहील ? यासाठीं राजाचे खरे डोळे त्याचे दूत होत. त्यामुळें दूतांच्या राज्य संचाराबद्दल ६ व्या मंत्रांत असें आहे–

अजिरः दूतः संचराते । (मं. ३)

' तरुण दूत (राज्यांत इतस्ततः) फिरोत-संचार-भ्रमण करोत.' राष्ट्रांत सर्वत्र दूतांस फिरण्यास पाठवून ठिकठिकाणची माहिती राजानें मिळवावी आणि त्यावरून राज्यशासनाचे गुणदोष जाणून त्याप्रमाणें फेरफार करावेत. म्हणजे राज्यांत दूतांचा संचार हें एक राज्य शासनाचें आवश्यक अंग आहे. कारण कीं त्याच्यायोगानें राजास त्याच्या प्रजेच्या वैयक्तिक व सामुदायिक सुखदुःखाची माहिति मिळते. अशा प्रकारें माहिती मिळवून त्याप्रमाणें सुधारणा करणारा राजा प्रजेस अत्यंत प्रिय होतो. म्हणून प्रजासुद्धां प्रसंगोपात् अशा राजास भेटी, नजरनजराणे देऊन त्याचा सन्मान करते– याविषयीं पहा–

(१) हविनः सजाताः त्वा अच्छ यन्तु ॥ (मं. ३)
(२) उग्रः बहु बलिं प्रति पश्यासै ॥ (मं. ३)

(१) ' हवि घेऊन स्वजातींतील लोक तुझे समक्ष (सामोरे) येवोत. (२) उग्र होऊन तूं पुष्कळ भेटी मिळवूं शकशील ' या प्रमाणें राजा प्रजेकडून महान् सत्कार प्राप्त करून घेऊं शकतो. तसेंच—

(१) ते द्यावा पृथिवी शिवे स्ताम् । (मं. ५)
(२) उग्रः सुमनाः इह दशमीं वश ॥ (मं. ७)

' (१) हे राजा ! तुझ्यासाठीं द्यावापृथ्वी कल्याणप्रद होवो आणि (२) उग्र तसेंच उत्तम मनानें युक्त होऊन तूं येथें शंभर वर्षें पर्यंत तुझें राज्य आपल्या ताब्यांत ठेव.' तसेंच ' सर्व देवांचें सहाय्य या राजास मिळावें. ' (मं. ४) अशा प्रकारची प्रजेचीं सुखें वाढवणारा राजा असला तरच प्रजा त्याची इच्छा करील. जो राजा प्रजेची काळजी करीत नाहीं त्या राजाच्या हिताहिताची पर्वा प्रजा करीत नाहीं. म्हणून राजानें हें ध्यानीं ठेवावें कीं मला जें हें राज्य प्रजेकडून प्राप्त झालें आहे, तें माझ्या वैयक्तिक सुखासाठीं नाहीं, तर प्रजेचें योग्य प्रकारें पालन-संरक्षण करण्यासाठीं आहे. असा भाव मनांत ठेऊन राजानें स्वतःचीं राज्यविषयक कर्तव्यें पार पाडावयास हवींत.

वरुण

वैदिक वर्णन शैलीची एक विशिष्टता येथें दिसून येते ती पहाण्यासारखी आहे. इंद्र, वरुण हे शब्द देवता वाचक आहेत. दुसऱ्या कोणास ते लागू पडणार नाहींत हें सर्वांस माहित आहेच. परंतु कित्येक प्रसंगीं हें शब्द विशेषण म्हणून वापरलेले आढळतात अशावेळीं ते दुसऱ्याचे गुण दाखवितात. कित्येक वेळां ते अन्य पदार्थ वाचकहि होतात. मं. ६ मध्यें वरुण शब्द बहुवचनीं वापरला असल्यामुळें तो वरुण देवतेबद्दल नक्की नाहीं. कारण वरुणास उद्देशून तो सर्वत्र एक वचनीच वापरलेला आढळतो. येथें तो बहुवचनी असल्यानें तो प्रजावाचक असावा. ' वरुण, वरण, वर्ण ' याप्रमाणें तो चारी वर्णांचा उद्बोधक असावा किंवा वर म्हणजे श्रेष्ठ यावरून समाजांतील श्रेष्ठ व्यक्ति, पुढारी, नेते यांचा वाचक असावा. आमच्या मतें येथें ' वर्ण ' अर्थ घेणें जास्त सयुक्तिक. तथापि वाचकांनीं अधिक विचार करावा.

विजयी राजा

कांड ६, सूक्त ९८

(ऋषिः- अथर्वा । देवता - इन्द्रः)

इन्द्रो॑ जयाति॒ न परा॑ जयाता अधिरा॒जो राज॑सु राजयातै ।
च॒र्कृत्य॒ ईड्यो॒ वन्द्य॑श्चोप॒सद्यो॑ नम॒स्यो॑ भवे॒ह ॥ १ ॥
त्वमि॑न्द्राधिरा॒जः श्र॑व॒स्युस्त्वं भू॑र॒भिभू॑ति॒र्जना॑नाम् ।
त्वं दैवी॒र्विश॑ इ॒मा वि रा॒जायु॑ष्मत्क्ष॒त्रम॒जरं॑ ते अस्तु ॥ २ ॥
प्राच्या॑ दि॒शस्त्वमि॑न्द्रा॒सि रा॒जोतोदी॑च्या दि॒शो वृ॑त्रहन्छत्रु॒हो॑ऽसि ।
यत्र॒ यन्ति॑ स्रो॒त्यास्तज्जि॒तं ते द॑क्षिण॒तो वृ॑ष॒भ ए॑षि॒ हव्यः॑ ॥ ३ ॥

अर्थ— (इन्द्रः जयाति) शूरवीर पुरुषाचा नेहमीं विजय होतो, (न परा जयाते) कधींहि पराजय होत नाहीं. (राजसु अधिराजः राजयातै) राजांमध्यें जो सर्वांहून श्रेष्ठ अधिराजा असेल त्याची शोभा वाढते. हे राजा ! तूं (इह) या राष्ट्रांत (चर्कृत्यः ईड्यः) शत्रूंचा नाश करणारा आणि स्तुतीस पात्र (वन्द्यः उपसद्यः नमस्यः भव) वन्दनीय, जवळ जाण्यास योग्य आणि नमस्कार करण्यास योग्य हो. (१)

हे इन्द्रा ! (त्वं अधिराजः) तूं राजाधिराज आणि (श्रवस्युः) कीर्तिवान् हो. (त्वं जनानां अभिभूतिः भूः) तूं प्रजाजनांची समृद्धि वाढविणारा हो. (त्वं इमाः दैवीः विशः विराज) तूं या दैवी प्रजांचें रंजन करणारा हो. (ते आयुष्मत् क्षत्रं अजरं अस्तु) तुझें दीर्घ आयुष्ययुक्त क्षात्रतेज जरा-रहित होवो. (२)

हे इन्द्रा ! (त्वं प्राच्याः दिशः राजा असि) तूं पूर्व दिशेचा राजा आहेस. हे (वृत्रहन्) शत्रुनाशक ! (उत उदीच्या दिशः शत्रुहा असि) आणि तूं उत्तरेकडील शत्रूंचा नाश करणारा आहेस. (यत्र स्रोत्याः यन्ति) जेथपर्यंत नद्या वहातात तेथपर्यंतचा प्रदेश (तत् ते जितं) तूं जिंकून घेतला आहेस. तसेंच (वृषभः हव्यः दक्षिणतः एषि) बलवान् आणि आदरानें बोलावण्यास योग्य असा होऊन तूं दक्षिणेस जातोस. (३)

भावार्थ— जे शूर पुरुष असतात. त्यांचा जय होतो, पराजय कधीं होत नाहीं. जो राजा सर्व राजांमध्यें श्रेष्ठ होतो, तोच अधिक प्रभावशाली, वंदनीय, प्रशंसनीय आणि उपास्य होतो. (१)

उत्तम राजा कीर्तियुक्त आणि प्रजेची समृद्धि वाढविणारा होवो. स्वतःच्या प्रजेस दैवी संपत्तीनें युक्त करो आणि तो स्वतःच्या राष्ट्राचें क्षात्रतेज वाढवून दीर्घायु व जरा-रहित होवो. (२)

चारी दिशांमध्यें दिग्विजयी होऊन आणि शत्रूंचा पराजय करून राजानें विजयी व्हावें, बलवान् व्हावें आणि सर्वांच्या आदरास पात्र व्हावें. (३)

राजा विजयी होऊन कीर्तिवंत कसा होतो तें येथें स्पष्ट शब्दांनीं सांगितलें आहे. या सूक्ताचा भावार्थ अत्यंत सरल, सुबोध आणि स्पष्ट आहे. ' शौर्य, बल आणि प्रजेची समृद्धि वाढविल्यानें राजा विजयी होतो. ' हा या सूक्ताचा मुख्य आशय आहे.

क्षात्र-धर्म

कांड २, सूक्त ५

(ऋषिः- भृगुः आथर्वणः । देवता - इन्द्रः)

इन्द्रं जुषस्व प्र वहा याहि शूर हरिभ्याम्। पिबा सुतस्य मतेरिह मधोश्चकानश्चारुर्मदाय ॥ १ ॥
इन्द्रं जठरं नव्यो न पृणस्व मधोर्दिवो न । अस्य सुतस्य स्व१र्णोप त्वा मदाः सुवाचो अगुः ॥२॥
इन्द्रस्तुराषाण्मित्रो वृत्रं यो जघान यतीर्न । बिभेद वलं भृगुर्न ससहे शत्रून्मदे सोमस्य ॥३॥
आ त्वा विशन्तु सुतास इन्द्र पृणस्व कुक्षी विड्ढि शक्र धियेह्या नः ।
श्रुधी हवं गिरो मे जुषस्वेन्द्र स्वयुग्भिर्मत्स्वेह महे रणाय ॥ ४ ॥
इन्द्रस्य नु प्रा वोचं वीर्याणि यानि चकार प्रथमानि वज्री ।
अहन्नहिमन्वपस्ततर्द प्र वक्षणा अभिनत्पर्वतानाम् ॥ ५ ॥

अर्थ— हे शूर इन्द्रा ! (जुषस्व) तूं प्रसन्न हो, (प्रवह) पुढें प्रगति कर. (हरिभ्यां आ याहि) घोड्यांसह तूं येथें ये. (चकानः) तृप्त होऊन तूं (मदाय) आनंदासाठीं (इह) येथें (मतेः) बुद्धिमान् पुरुषांनीं (सुतस्य मधोः चारुः) काढलेला मधुर सुंदर रस (पिब) पी. (१) हे इन्द्रा ! (नव्यः न) प्रशंसा करण्यास योग्य आणि (स्वः न) स्वतःच्या आनंदानें युक्त होऊन तूं (मधोः जठरं पृणस्व) या मधुर रसानें आपलें पोट भर. (अस्य सुतस्य) या काढलेल्या रसाचा (स्वः नः) स्वर्गीय आनंदासारखा हर्ष आणि (सुवाचः मदाः) उत्तम प्रशंसनीय भाषणांसह आनंद (त्वा उप अगुः) तुझ्याजवळ येतात. (२) (यतीः न) यत्न करणाऱ्या पुरुषाप्रमाणें (यः तुराषाट् मित्रः इन्द्रः) ज्या त्वरेनें शत्रुवर हल्ला करणाऱ्या मित्र इन्द्रानें (वृत्रं जघान) घेरा घालणाऱ्या शत्रूचा नाश केला, तसेंच (भृगुः न) भाजणाऱ्याप्रमाणें ज्यानें (वलं बिभेद) वलरूपी शत्रूचा भेद केला आणि (सोमस्य मदे) सोमरसाच्या आनंदांत (शत्रून् ससहे) शत्रूंचा पराभव केला. (३) हे (शक्र इन्द्र इन्द्र) शक्तिमान् प्रभू इन्द्रा ! (सुतासः त्वा आ विशन्तु) काढलेला हा रस तुझ्यांत प्रवेश करो. आपल्या (कुक्षी पृणस्व) दोन्ही कुशी पूर्णपणें भर आणि (विड्ढि) राज्य कर. (धिया नः आ-इहि) आपल्या बुद्धीनेंच तूं आमच्याजवळ ये. आमची (हवं श्रुधि) प्रार्थना ऐक. (मे गिरः जुषस्व) माझ्या भाषणाचा स्वीकार कर आणि (इह) येथें (महे रणाय) महायुद्धासाठीं (स्वयुग्भिः) स्वतःच्या योजनांसह (आ मत्स्व) आनंदित हो. (४) (इन्द्रस्य वीर्याणि नु प्रवोचं) इंद्राच्या पराक्रमाचें मीं उत्तम प्रकारें वर्णन करतों. (यानि प्रथमानि) जे पहिल्या प्रतीचे पराक्रम (वज्री चकार) वज्रधारी इन्द्रानें केले होते, त्यानें (अहिं अहन्) कमी न होणाऱ्या शत्रूंचा नाश केला, आणि (अपः अनु ततर्द) पाण्यांच्या प्रवाहांस खुले केलें आणि (पर्वतानां) पर्वतांचे (वक्षणाः प्र अभिनत्) भाग तोडून टाकले. (५)

भावार्थ— हे शूरवीरा ! तूं नेहमीं प्रसन्न आणि आनंदित राहून प्रगति कर. तुझ्या उत्तम घोडे जोडलेल्या रथांत बसून इकडे ये, नित्य प्रसन्न राहून आनंद वाढविण्यासाठीं बुद्धिवर्धक मधुर सोमरसाचें पान कर. (१) हे शूरवीरा ! प्रशंसापात्र आणि हर्ष वाढविणाऱ्या मधुर रसानें तुझें पोट भर. असें करण्यानेंच उत्तम स्तुतिपर वाणी सर्व बाजूंनीं तुझ्यापर्यंत येऊन पोहोंचेल. म्हणजे सर्व लोक तुझीच प्रशंसा करतील. (२) पुरुषार्थी, उद्योगी, प्रयत्नशील आणि तीव्र वेगानें शत्रूवर हल्ला करणारा शूरवीर स्वतःच्या शत्रूंचा नाश सत्वर करतो. ज्याप्रमाणें भडभूंजा अनेक धान्यें भाजतो त्याप्रमाणें हा वीर शत्रुसेनेस भाजून टाकतो आणि सोमरसाचें पान करीत करीत आनंदित आणि उत्साहित होऊन शत्रूंचा पराजय करतो. (३) हे शक्तिमान शूर वीरा ! सर्व मधुर रस तुला प्राप्त होवोत आणि त्यांनीं तूं आपलें पोट भरून टाक. त्यावेळीं तूं आपल्या मनानें सर्व जनतेच्या चांगुलपणाचा विचार कर, आणि तिच्या प्रार्थना ऐक. तसेंच या महान् जीवनकलहांत विजय प्राप्त करण्यासाठीं तुझ्या योजकशक्तींसह आनंदानें तयार रहा. (४) शूर पुरुषांनीं केलेल्या पराक्रमांचें मीं वर्णन करतों. पुढें चाल करून येणाऱ्या शत्रूंचा त्यानें नाश केला आणि पाण्याचे प्रवाह सर्वांस खुले करून दिले. तसेंच पर्वतांचे भाग तोडून जंगलें सुद्धां साफ केलीं. (५)

अहन्नहिं पर्वते शिश्रियाणं त्वष्टास्मै वज्रं स्वर्यं ततक्ष ।
वाश्रा इव धेनवः स्यन्दमाना अञ्जः समुद्रमव जग्मुरापः ॥ ६ ॥
वृषायमाणो अवृणीत सोमं त्रिकद्रुकेष्वपिबत्सुतस्य ।
आ सायकं मघवादत्त वज्रमहन्नेनं प्रथमजामहीनाम् ॥ ७ ॥

अर्थ— (पर्वते शिश्रियाणं अहिं) पर्वताच्या आश्रयानें राहणाऱ्या शत्रूचा (अहन्) वध केला. (अस्मै) त्यासाठीं (त्वष्टा स्वर्यं वज्रं ततक्ष) कारागीरानें अत्यंत धारदार आणि पाणी चढवून शस्त्र तयार करून दिलें. (वाश्राः धेनवः इव) हंबरणाऱ्या गाईप्रमाणें (स्यन्दमानाः आपः) वेगाने जाणारे जलप्रवाह (अञ्जः समुद्रं अवजग्मुः) सरळ समुद्रास जाऊन मिळाले. (६) (वृषायमाणः) बलवान् वीरानें (सोमं अवृणीत) सोमरस प्राप्त केला, (सुतस्य त्रिकद्रुकेषु अपिबत्) रसाचें तीन भांड्यांतून पान केलें. (मघवा सायकं वज्रं आ अदत्त) इन्द्रानें बाणासारखें वज्र घेतलें आणि (अहीनां प्रथमजां एनं अहन्) शत्रूंच्या पूर्वींच या अहींच्या वीरास मारून टाकलें. (७)

भावार्थ— पर्वतांच्या भागांतून लपून रहाणाऱ्या शत्रूचा त्यानें वध केला. अशा शूरवीरासाठीं कारागीरांनीं विशेषप्रकारचीं तीक्ष्णशस्त्रें तयार करून करून दिलीं. ज्याप्रमाणें हंबरणाऱ्या गायी स्वतःच्या वासरापाशीं जातात, त्याप्रमाणेंच त्या वीरानें मुक्त केलेले सर्व जलप्रवाह समुद्रास जाऊन मिळतात. (६) स्वतःचें बल वाढवूं इच्छिणारा शूरवीर तीन वेळ आणि तीन पात्रांनीं सोमरसपान करतो. धनवान् शूरवीर स्वतःचीं शस्त्रें नेहमीं तयार ठेवतो आणि पुढें चाल करून येणाऱ्या शत्रूच्या आघाडीच्या वीरांचा त्वरित नाश करतो. (आणि अशा प्रकारें स्वतः विजय प्राप्त करतो. (७)

क्षात्रधर्म

क्षात्रधर्म

बहुंशीं सर्वच इंद्र-सूक्तांतून क्षात्रधर्म वर्णिलेला असतो, कारण इंद्र शब्दच मुख्यत्वें शत्रूंचा नाश करणाऱ्या शूर वीराचा द्योतक आहे आणि त्याचें वर्णन शूर वीरांच्या क्षात्रधर्मास प्रकट करणारें आहे. या सूक्तांत सुद्धां वाचकांस नेमकी तीच गोष्ट पहावयास सांपडेल. या सूक्तांत ज्या शब्दाच्या योगानें शूरवीरांचें वर्णन करून क्षात्रधर्म प्रकट केला आहे त्या शब्दांचे अर्थ पहा—

क्षत्रियाचे गुण

१. **इन्द्रः (इन्+द्र)**– शत्रूंचा नाश करणारा, शत्रुसैन्याचा नाश करणारा. (मं. १)

२. **शूरः**– शूर, वीर. (मं. १)

३. **चकानः**– तृप्त. संतुष्ट, तेजस्वी, प्रकाशमान, शत्रूंचा प्रतिकार करण्यास समर्थ. (१)

४. **मित्रः**– जनतेचा मित्र, जनतेचें कल्याण करणारा, सूर्याप्रमाणें तेजस्वी. (मं. ३)

५. **ततीः**– प्रयत्नशील, पुरुषार्थी, यत्न करणारा. (मं. ३)

६. **भृगुः**– भडभुंजा, भाजणारा, शत्रूंचा थरकांप उडविणारा. (मं. ३)

७. **तुराषाट्**– त्वरेनें शत्रूवर हल्ला करणारा. (मं. ३)

८. **शक्रः**– समर्थ, शक्तिशाली, बलवान्. (मं. ४)

९. **वज्री**– वज्र आदि शस्त्रांनीं युक्त. (मं. ५)

१०. **वृषायमाणः**– स्वतःचें बल वाढविणारा, स्वतःची शक्ति सर्व प्रकारें वाढविणारा. (मं. ७)

११. **मघवा (मघ+वान्)**– धनवान्. (मं. ७)

या सूक्तांतील वरील अकरा शब्द वीरत्वानें युक्त क्षत्रियाचे वाचक आहेत. या शब्दांनीं क्षत्रियांच्या कर्तव्याचाहि बोध होतो. क्षत्रियांत, शौर्य, वीर्य, पराक्रमादि गुण जसे असले पाहिजेत त्याचप्रमाणें पुनः पुनः प्रयत्न करण्याचा गुण आणि त्वरेनें शत्रूवर हल्ला करण्याचा गुणही अवश्य असले पाहिजेत. शत्रुपेक्षां स्वतःचें बल अधिक वाढवण्याची तयारी सुद्धां क्षत्रियानें ठेवली

पाहिजे. या सर्वांसाठीं विपुल धन त्याच्याजवळ असलें पाहिजे, इत्यादि प्रकारचा क्षात्रधर्माचा उपदेश आपणांस येथें मिळतो. वाचकांनीं त्या दृष्टीनें वरील शब्दांचा विशेष विचार करावा. आतां वाक्यांनीं या मंत्रांत क्षत्रियांच्या ज्या कर्तव्यांचा विचार केला आहे तीं कर्तव्यें आतां पाहूं—

क्षत्रियांचीं कर्तव्यें

१. **शूर ! हरिभ्यां आयाहि**— हे वीरा ! घोड्यांसह येथें ये. घोड्यावरून फेरफटका करण्याची संवय क्षत्रियानें ठेवली पाहिजे. (मं. १)

२. **प्र वहः**— पुढें हो, (चाल कर,) क्षत्रियाची अशी तयारी असावी कीं तो त्वरीत पुढें आक्रमण करूं शकेल. हल्ला करण्यांत आळस अथवा शिथिलता नसावी. (मं. २)

३. **वृत्रं जघान**— वेढा घालणाऱ्या अथवा व्यूह रचून चढाई करणाऱ्या शत्रूंचा नाश करण्यास क्षत्रिय समर्थ असला पाहिजे. (मं. ३)

४. **वलं बिभेद**— शत्रूचें बल तोडून टाकणें, शत्रुसेनेंत भेद उत्पन्न करणें, शत्रुसेनेची संघशक्ति नष्ट करणें, शत्रुसेनेस पळवून देशोधडीस लावणें. वल नामक शत्रुचा नाश करणें. (मं. ३)

५. **शत्रून् ससहे**— शत्रूचा पराजय करावा. शत्रूंचे हल्ले सहन करावेत. म्हणजे शत्रुहल्ला आला तर मागें हटूं नये, माघार घेऊं नये, (मं. ३)

६. **विवृधि (आ विवृधिः)**— उत्तम प्रकारें राज्य चालीव. राज्य चालवणें हें स्वतःचें कर्तव्य आहे असें क्षत्रियांनीं मानलें पाहिजे. (मं. ४)

७. **महते रणाय स्वयुग्भिः मत्स्व**— पुढें चाल करावी. युद्धासाठीं स्वतःच्या योजक शक्तींसह आनंदानें तयार रहावें. शत्रु लढाई देत असला तर स्वतःच्या युक्तींनीं आणि योजनांनीं त्यास दूर करावें. (मं. ४)

८. **अहिं अहन्**— शत्रूंचा नाश करावा. (मं. ५)

९. **पर्वतानां वक्षणाः अभिनत्**— पर्वतांवर असलेलीं घन-दाट जंगलें कापून शत्रूच्या लपून रहाण्याच्या स्थळांचा नाश करावा. अथवा तेथून वहाणाऱ्या नद्यांचें अडविलेलें पाणी मोकळें करावें. (मं. ५)

१०. **अपः अनु ततर्द**— पाण्याचे प्रवाह शत्रूच्या ताब्यांत असले तर तें सोडवून सर्वांस खुले करावेत. (मं. ५)

११. **पर्वते शिश्रियाणं अहिं अहन्**— पर्वताच्या आश्रयानें लढणाऱ्या शत्रूचा नाश करावा. (मं. ६)

१२. **अस्मै त्वष्टा स्वर्यं वज्रं आ ततक्ष**— त्याच्यासाठीं लोहार (कारागीर) तीक्ष्ण शस्त्रास्त्रें तयार करून देवोत. अथवा राजानें स्वतः कुशल कारागीर शस्त्रास्त्रें तयार करण्याच्या कामावर नेमावेत आणि आवश्यक शस्त्रास्त्रें तयार करून घ्यावीत. (मं. ६)

१३. **सायकं वज्रं आ अदत्त**— बाण आणि वज्रासारखीं शस्त्रें स्वतःच्या जवळ ठेवावींत. (मं. ७)

१४. **अहिनां प्रथमजां एनं अहन्**— पुढें चाल करून येणाऱ्या शत्रूचे मुख्य मुख्य वीर (सेनानायक) मारावेत. (मं.७)

हीं वाक्यें क्षत्रियाचीं कर्तव्यें दर्शवितात. त्यांचें जास्त स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता नाहीं; कारण हीं वाक्यें मूळचींच स्पष्ट आहेत. थोड्या मननानें त्यांचा आशय ध्यानीं येणें शक्य आहे.

आतां राज्यकारभार सूचित करणारी वाक्यें पाहूं—

राज्यशासन (राज्यकारभार)

१. **मित्रः**— प्रजेचा मित्र होऊन राजानें राज्य करावें. कधीं प्रजेचा द्रोह करूं नये अथवा शत्रु होऊं नये. तसें केलें असतां राज्य चालविणें अशक्य होईल. (मं. ३)

२. **हवं श्रुधि, गिरः जुषस्व**— त्यांचें म्हणणें ऐक म्हणजे त्यांच्या मतांचा विचार कर. प्रजेचीं गाऱ्हाणीं ऐकावीं आणि प्रजामताचा आदर करावा. (मं. ४)

३. **आपः अञ्जः समुद्रं अवजग्मुः**— समुद्रापर्यंत वहाणारे कालवे खोदावेत आणि त्यांतून पाणी देऊन शेतीस मदत करावी. (मं. ५)

याप्रमाणें प्रजाहितासाठींच जो राजा राज्य करतो, प्रजा त्याची स्तुति करते. याविषयीं खालीं दिलेले मंत्र पहाण्यासारखें आहेत—

प्रजेकडून सन्मान

१. **त्वा मदाः सुवाचः उप अगुः**— आनंदाचा जयजयकार ध्वनि तुझ्यापर्यंत पोंहोचतो. म्हणजे आनंदी प्रजा तुझी स्तुति करते, जय जयकार करते, कृतज्ञतेनें तुझा सन्मान करते. तुला मानपत्र अर्पण करते. (मं. २)

आनंदित झालेलीच प्रजा अशा प्रकारची राजाची स्तुति करील, नाहीं तर त्रासलेली प्रजा राजद्रोही होईल, राजाची निंदा करील, याप्रमाणें राजाचीं अथवा क्षत्रियाचीं राष्ट्रीय कर्तव्यें काय आहेत याविषयीं या सूक्तांत उपदेश दिलेला आहे. येथें जीं वाक्यें उद्धृत केलीं आहेत, त्यांच्या अर्थाच्या सुबोधतेसाठीं शब्दांच्या अर्थाला पुरुषवाचक प्रत्यय जाणून बुजून लावले आहेत आणि त्यांत थोडा फेरफारहि केला आहे. हें संस्कृतज्ञ वाचकांच्या ध्यानीं येईलच. आतां क्षत्रियांचे व्यक्तिगत आचार कशाप्रकारचे असावे याविषयीं या सूक्तांत केलेला उपदेश पाहूं—

भोग

१. सुतस्य मधोः मदाय पिब- सोमादि वनस्पतींचा काढलेला रस आनंदासाठीं प्राशन कर. (मं. १)

या विधानांत मधुर रस प्राशनाचा उपदेश आहे. हेंच मधुपर्क प्राशन होय. वनस्पतीमध्यें सोम मुख्य आहे. त्याचें ग्रहण केल्यानें इतर आरोग्य आणि हर्षवर्धक वनस्पतींचा त्यांत अन्तर्भाव होतो असें समजावें. या सूक्ताच्या सातव्या मंत्रांत सोमाचें नांव आहे, आणि त्याचाच या मंत्राशी संबंध आहे. या सूक्तांत त्याचा उलेख खालीं दिल्याप्रमाणें आहे.

२. सुतस्य मधोः जठरं पृणस्व । (मं. २)

३. सुतासः त्वा कुक्षीः आविशन्तु । (मं. ४)

४. सुतस्य सोमं त्रिकद्रुकेषु अपिबत् । (मं. ७)

या मंत्रांच्या अर्थांमध्येंहि तोच भाव आहे, (२) सोमरसानें पोट भरून टाक. (३) सोमरसानें पोटाच्या दोनी कुशी भरूंदेत. (४) काढलेला सोमरस तीन भांड्यातून तीन स्थानीं बसून तीन वेळ पी. हा सोमरस मधूर रुचीचा, हर्ष आणि उत्साहवर्धक, श्रम दूर करणारा, दीर्घ आयुष्य देणारा, बुद्धिवर्धक आणि रोगजंतूंचा नाश करणारा, त्यांना शरीरांतून दूर करणारा आहे.

सोम आणि मद्य

वेदाच्या ज्ञानासंबंधानें अज्ञानी असलेले लोक सोमरस म्हणजे दारु समजतात. त्यांची ही एवढी मोठी चूक आहे कीं तेवढी मोठी दुसरी कोणतीच चूक असूं शकणार नाहीं. वेदांत अथवा इतर संस्कृत साहित्यांत येणारा, सोम, सुरा, वारुणी, आसव, अरिष्ट, मद्य आणि प्राकृत दारु हे शब्द समान अर्थक नाहीत. मद्य आणि दारु हे शब्द समान अर्थक रूढ झाले आहेत, आणि सुरा शब्दही जवळ जवळ त्याच अर्थाचा होऊन त्यांत मिसळला आहे, ही गोष्ट आम्हीं जाणतो. यासाठीं या प्रत्येक शब्दाचें स्पष्टीकरण आम्हीं पुढें देत आहोंत. तें वाचकांनीं अवश्य ध्यानांत आणावें.

१. सोम- सोमवल्लीचा रस, दूध, मधु (मध), साखर, भाजलेल्या धान्यांचें पीठ, दहीं इत्यादि अनेक पदार्थांच्या मिश्रणानें सुंदर, स्वादिष्ट पेय तयार करून पीण्यांत येत असे. गाय, घोडा इत्यादि पाळीव चतुष्पाद जनावरांनांही तें पौष्टिक असल्यानें पाजण्यांत येत असे. या वनस्पतीचा रसच घेण्यांत येई, त्याचे गुण वर सांगितले आहेत.

२. सुरा- कोणत्याहि रसाची वाफ करून, नंतर त्या वाफेस थंड करून पुनः रस करण्यांत येतो त्यास हें नांव दिलें आहे. (Distilled water) पाण्याची वाफ करून त्यास पुनः थंड करून पाणी केलेलें असतें त्याचें हें नांव आहे. पावसाच्या पाण्यासहि त्याच कारणानें हें नांव लागूं पडतें. कारण कीं भूमीवरील पाण्याची वाफ होऊन, ढग बनतात आणि त्या ढगांपासून पाऊस पडतो. कोणताहि रस या प्रकारेंच शुद्ध करतां येतो. सध्या या प्रकारेंच दारू तयार करतात. आणि त्यामुळेंच हें नांव दोषयुक्त मानलें गेलें आहे. पुष्कळ काल गेल्यानें तो अर्थ रूढ झाला आहे. वास्तविक संस्कृत 'सुरा' शब्दाचा अर्थ वर लिहिल्याप्रमाणें शुद्ध केलेला द्रवपदार्थ एवढाच त्याचा मूळ अर्थ आहे.

३. वारुणी, अमरवारुणी- हा शब्द सुद्धां वरच्याप्रमाणें रसाचा आणि जलाचा वाचक आहे. या पेयांत मादकता अथवा इतर कांहीं दोष मुळांतच नाहींत, परंतु हल्लीं या प्रकारेंच दारु तयार करण्यांत येत असल्यानें हे सर्व शब्द दूषित, त्याज्य निंद्य ठरले आहेत. प्राचीनकाळींही क्वचितच् वाईट अर्थानें ते वापरलेले आढळतात.

४-५. आसव आणि **अरिष्ट**- हीं नावें औषधि पेयांसाठीं वापरतात. याच औषधी थोड्या सडवल्या (आंबविल्या) म्हणजे आसव तयार होतें. औषध तयार करण्याच्या दृष्टीनें हें अपरिहार्य आहे. शिवाय अशा रीतिनें तयार झालेल्या औषधांत मद्याचें प्रमाण २ टक्केच काय तें असतें. म्हणूनच त्यांची गणना दारूंत करतां येत नाहीं.

इंग्रज राजवटींत त्याचें योग्य संशोधन होऊन तीं औषधेंच होत, मद्य नव्हेत असें निश्चित करण्यांत आलें; त्यामुळें देशी वैद्य, आसवें आणि अरिष्टें तयार करूं शकतात. नाहीं तर सरकारी निर्बंध त्यांसहि बंधनकारक झाला असता.

६-७. मद्य आणि **दारू**- हीं मात्र निःसंदेह मादक पेयें आहेत आणि त्यामुळें तीं शरीरास हानि करणारीं आहेत. या विवरणावरून वाचकांच्या हें ध्यानीं आलें असेलच कीं सोमांत दोषाची अथवा मद्याची कल्पना थोडी सुद्धां नाहीं. दिवसांतून तीनदां रस काढण्यांत येई. आणि हवनांत त्याच्या आहुति दिल्यानंतर तो पिण्यांत येत असे. सकाळीं दुपारी आणि सायंकाळीं याप्रमाणें दिवसांतून तीन वेळ हा रस काढण्यांत येई असा उल्लेख या सूक्ताच्या ७ व्या मंत्रांत आला आहे. म्हणून सोमरसास जर कोणी, दारू (सुरा) म्हणत अथवा समजत असतील तर ती त्यांची चूक आहे. सूक्तांत क्षत्रियांचे भोजन वनस्पतींच्या रसापासून केलेलें असल्याचें स्पष्ट वर्णन आहे यावरून हें विधान शाकाहारास पुष्टिकारक ठरतें.

जीवन-संग्राम

वेदांत '**महते रणाय**' असे शब्द वारंवार येतात. '**महान् युद्ध**' चालू आहे, आपलें कर्तव्य सावध राहून केलें पाहिजे, हा वेदाचा उपदेश जीवनसंग्रामांत सांपडलेल्या प्रत्येक

मानवास मार्गदर्शक आहे, जीवनांत आपण युद्धभूमीवरच उभे आहोंत असें प्रत्येकानें समजलें पाहिजे. कारण त्याची इच्छा असो, नसो, त्यास संग्रामांत पडावें लागतें, तर मग तो पळून जाणार तरी कोठें ? म्हणून स्वतःस कोणत्या युद्धांत भाग घ्यावयाचा आहे आणि त्यांत स्वतःचा संबंध किती अथवा कशा प्रकारचा आहे आणि त्यामुळें स्वतःचें या विषयींचें कर्तव्य काय आहे हें प्रत्येक मनुष्यास माहित असणें जरुरीचें आहे. तसें न झालें तर मानव-जन्म निरर्थक होईल. मग वाटल्यास त्यानें हिंसा अथवा अहिंसा वृत्तीनें युद्ध करावें, परंतु युद्धाशिवाय त्याची सुटका नाहीं. आणि या युद्धांत त्यानें जर विजय मिळवला नाहीं तर त्याची उन्नतिहि होणार नाहीं. ही तर सर्व साधारण माणसाची गोष्ट झाली, मग क्षत्रियाची तर विचारूं नका. त्यांचें जीवन युद्धरूपच असतें. त्यांस तर युद्ध अनिवार्यच आहे.

याप्रमाणें हें सूक्त क्षात्रधर्माचा उपदेश करतें.

प्रजा-पालक-सूक्त

कांड १, सूक्त २१

(ऋषिः- अथर्वा । देवता – इन्द्रः)

स्वस्तिदा विशां पतिर्वृत्रहा विमृधो वशी । वृषेन्द्रः पुर एतु नः सोमपा अभयंकरः ॥ १ ॥
वि न इन्द्र मृधो जहि नीचा यच्छ पृतन्यतः । अधमं गमया तमो यो अस्माँ अभिदासति ॥ २ ॥
वि रक्षो वि मृधो जहि वि वृत्रस्य हनू रुज । वि मन्युमिन्द्र वृत्रहन्नमित्रस्याभिदासतः ॥ ३ ॥
अपेन्द्र द्विषतो मनोऽप जिज्यासतो वधम् । वि महच्छर्म यच्छ वरीयो यावया वधम् ॥ ४ ॥

अर्थ— (स्वस्ति-दा) कल्याण करणारा (विशां पतिः) प्रजांचा पालक, (वृत्रहा) घेरणाऱ्या शत्रूचा नाश करणारा, (वि-मृधः वशी) विशेष हिंसकांना स्वतःच्या ताब्यांत ठेवणारा, (वृषा) बलवान् (सोम-पाः) सोमरसाचें पान करणारा (अभयंकरः) अभय देणारा (इन्द्रः) प्रभु राजा (नः) आमच्या (पुरः एतु) पुढें जावो. (आमचा नेता होवो. (१) हे इन्द्रा ! (नः मृधः) आमच्या शत्रूंना (विजहि) मारून टाक. (पृतन्यतः) सैन्याच्या योगानें आमच्या वर हल्ला करणाऱ्या शत्रूला (नीचा यच्छ) खालींच पाड (यः अस्मान् अभिदासति) जो आम्हांस दास करूं इच्छितो अथवा आमचा घात करूं इच्छितो त्याला (अधमं तमः गमय) हीन अंधःकारांत पोंहचव. (२) (रक्षः मृधः वि विजहि) राक्षसांस आणि हिंसकांस मारून टाक. (वृत्रस्य हनू विरुज) आम्हांस वेढा घालून हल्ला करणाऱ्या शत्रूंचे दोन्ही जबडे तोडून टाक. हे (वृत्रहन् इन्द्र) शत्रुनाशक प्रभो ! (अभिदासतः अमित्रस्य) आमचा नाश करणाऱ्या शत्रूचा (मन्युं विरुज) उत्साह नाहींसा कर. (३) हे (इन्द्र) प्रभो राजन् ! (द्विषतः मनः अप) द्वेष करणाऱ्याचें मन बदलून टाक (जिज्यासतः वधं अप) आमच्या आयुष्याचा नाश करणाऱ्यास दूर कर. (महत् शर्म वियच्छ) आम्हांस पुष्कळ सुख दे आणि (वधं वरीयः यावय) शस्त्रास आमच्यापासून दूर कर. (४)

भावार्थ— प्रजाजनाचें कल्याण करणारा, प्रजेचें पालनकरणारा, वेढा घालून नाश करणारा, शत्रूंस दूर करणारा, बलिष्ठ, अमृतपान करणारा, प्रजेस अभय देणारा राजाच आमचा पुढारी नेता होवो. (१) हे राजा ! प्रजेच्या शत्रूंचा नाश कर. सैन्यासह हल्ला करणाऱ्या शत्रूंस दाबून टाक. जे मारहाण अथवा नाश करूं इच्छितात त्यांस दूर घालवून दे. (२) हिंसक क्रूर शत्रूंस मारून टाक. घेरा घालून त्रासविणाऱ्या शत्रूंस कापून टाक, सर्व प्रकारच्या शत्रूंच्या उत्साहाचा नाश कर. (३) शत्रूंच्या मनांतील विचार बदलून टाक, म्हणजे त्यांनीं हल्ला करण्याचा विचार सोडून द्यावा. नाश करणाऱ्यांस दूर करावें. हाणामारी दूर करावी आणि प्रजेस सुखी करावें. (४)

क्षात्रधर्म

हें ' अभयगणां ' चें सूक्त आहे. या सूक्तांत क्षात्रधर्माचा उपदेश आणि राजाच्या कर्तव्याचें वर्णन आहे. त्याचें वाचकानीं मनन करावें. उत्तम राजाच्या गुणांचें वर्णन प्रथम मंत्रांत आहे. या मंत्राच्या प्रमाणानें राजा उत्तम आहे की नाहीं तें ठरविता येईल. बाकीच्या तीन मंत्रांत विविध प्रकारच्या शत्रूंचें वर्णन आहे आणि त्यांचा प्रतिकार करण्याचा उपदेश आहे. अंतर्बाह्य शत्रूंचा प्रतिकार करून प्रजेस जास्तींत जास्त सुखी करणें हें राजाचें मुख्य कर्तव्य आहे, हें येथें सांगितलें आहे. हें सूक्त अगदीं सरळ असल्यानें त्याच्या जास्त स्पष्टीकरणाची जरुरी नाहीं.

आशा-पालक-सूक्त

कांड १, सूक्त ३१

(ऋषिः- ब्रह्मा । देवता - आशापालाः (वास्तोष्पतिः) ।)

आशा॑नामाशापा॒लेभ्य॑श्च॒तुर्भ्यो॑ अ॒मृते॑भ्यः । इ॒दं भू॒तस्याध्य॑क्षेभ्यो वि॒धेम॑ ह॒विषा॑ व॒यम् ॥ १ ॥

य आशा॑नामाशापा॒लाश्च॒त्वार॒ स्थन॑ देवाः । ते नो॒ निर्ऋ॑त्याः॒ पाशे॑भ्यो मु॒ञ्चतांह॑सो अंहसः ॥ २ ॥

अस्रा॑मस्त्वा ह॒विषा॑ यजा॒म्यश्लो॑णस्त्वा घृ॒तेन॑ जुहोमि ।

य आशा॑नामाशापा॒लस्तु॒रीयो॑ दे॒वः स नः॑ सुभू॒तमेह व॑क्षत् ॥ ३ ॥

स्व॒स्ति मा॒त्र उ॒त पि॒त्रे नो॑ अस्तु स्व॒स्ति गोभ्यो॒ जग॑ते॒ पुरु॑षेभ्यः ।

विश्वं॑ सु॒भूतं॑ सुवि॒दत्रं॑ नो अस्तु ज्योगे॒व दृ॑शेम॒ सूर्य॑म् ॥ ४ ॥

अर्थ— (भूतस्य अध्यक्षेभ्यः) जगाचे अध्यक्ष (अमृतेभ्यः) अमर (आशानां चतुर्भ्यः आशापालेभ्यः) दिशांच्या चार दिशांपालकांसाठीं (वयं) आम्हीं सर्व (हविषा इदं विधेम) हविर्द्रव्यानें हें अर्पण करीत आहोंत.(१) हे (देवाः) देव हो ! (ये आशानां चत्वारः आशापालाः स्थन) तुम्ही ज्या दिशांचे चार दिशापालक आहांत (ते नः) ते तुम्हीं आम्हां सर्वांस (निर्ऋत्याः पाशेभ्यः) अवनतीच्या पाशांतून तसेंच (अंहसः अंहसः) प्रत्येक पापातून (मुञ्चतां) मुक्त करा. (२) (अ-स्रामः) न थकलेला मी (हविषा त्वा यजामि) हविर्द्रव्यानें तुझें यजन करतों. (अ-श्लोणः त्वा घृतेन जुहोमि) लंगडा न होतां मीं तुला तूप अर्पण करतों. हा (आशानां आशापालः तुरीयः देवः) जो दिशांचा दिक्पाल चतुर्थ देव आहे, (सः नः सुभूतं इह आवक्षत्) तो आम्हां सर्वांस उत्तम प्रकारें येथें पोहोचवो. (३) (नः मात्रे उत पित्रे स्वस्ति अस्तु) आम्हां सर्वांच्या मातांना तसेंच आमच्या सर्वांच्या पित्यानां आनंद प्राप्त होवो. (गोभ्यः जगते पुरुषेभ्यः स्वस्ति) गायींस, हिंडण्या फिरणाऱ्या जीवांस आणि पुरुषांस सुख होवो. (नः विश्वं सुभूतं सुविदत्रं अस्तु) आम्हां सर्वांसाठीं सर्व प्रकारचें ऐश्वर्य आणि उत्तम ज्ञान प्राप्त व्हावें आणि (सूर्यं ज्योक् एव दृशेम) सूर्यास दीर्घकाळपर्यंत आम्हीं पहात रहावें म्हणजे आम्हीं दीर्घायु व्हावें. (४)

भावार्थ— चारी दिशांचे चार अमर दिक्पाल आहेत, ते या जगाचे अध्यक्ष आहेत. त्यांची पूजा आम्हीं करतों. (१) ते चार दिशांचे चार दिक्पाल आहेत, त्यांनीं आम्हांस दरेक पापांतून मुक्त करावें आणि दुर्गतिपासून आमची सुटका करावी. (२) मी न थकतां त्यांचा सत्कार करतों. लंगडा पांगळा न होतां मीं त्यांस तूप अर्पण करतों. या चार दिक्पालामध्यें जो चतुर्थ देव आहे तो आम्हांस सुख पूर्ण उत्तम अवस्थेस पोंचवो. (११) आमचे माता-पिता, आमचे इतर इष्ट मित्र. आमच्या गायी, घोडे आदि पशु जे कोणी आमचे पाळलेले प्राणी आहेत, ते सर्व या प्रकारें सुखी होवोत. आमचा सर्व प्रकारें अभ्युदय व्हावा, आमचें ज्ञान सर्व प्रकारें वाढावें आणि आम्हीं दीर्घायु व्हावें. (४)

आशा-पालक सूक्त

दिक्पाल

पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण या चार दिशा आहेत. त्यांचें रक्षण करणारे चार दिक्पाल आहेत. ते आपआपल्या दिशांचे रक्षण करीत आहेत. या विश्वाचे रक्षक इतके हुषार आणि दक्ष आहेत कीं त्यांच्या नकळत कोणी मनुष्य कांहीं वाईट प्रकारचें कर्म (अथवा कोणतेंच कर्म) करूं शकत नाहीं. प्रत्येक

मनुष्यानें हें लक्षांत ठेऊन असें आचरण ठेवावें कीं जेणें करून तो या लोकपालांच्या शिक्षेस पात्र होणार नाहीं,

राजानें आपल्या राज्याची व्यवस्था आणि राज्यशासन सुरळितपणें चालविण्यास, राज्याचे चार भाग करून त्यावर एक एक शासक अधिकाऱ्याची नेमणूक करावी. त्या अधिकाऱ्यानें दक्षतापूर्वक आपल्या विभागाची व्यवस्था पहावी. दुष्ट लोकांस शिक्षा करावी आणि सज्जनांचें प्रतिपालन करावें. राज्यांत कोठेंहि अनाचार होऊं देऊं नये. हा राष्ट्रनीतीचा उपदेश या सूक्तावरून आपणांस मिळतो.

विश्वामध्यें राष्ट्र आणि राष्ट्रांमध्यें व्यक्ति असते. या तीनहि ठिकाणीं नियम एकच असतो. म्हणून राष्ट्रशासनाचा विचार केल्यानंतर ज्या व्यक्तींचें राष्ट्र बनलें आहे. त्या व्यक्तिमध्येंहि चार दिशा आणि त्यांचें चार दिक्पाल कोणत्या रूपांत आहेत आणि त्यांचें शासन या अध्यात्मिक भूमिकेंत कशा प्रकारें चालत आहे आणि त्यावरून वैयक्तिक सदाचाराविषयीं आपण काय बोध घेतला पाहिजे त्याचा विचार आतां केला पाहिजे.

देहांतील चार दिक्पाल

मनुष्य देहांतील तोंडास ' पूर्वद्वार ' म्हणतात आणि गुद-द्वारास पश्चिम द्वार म्हणतात. ही दोन्ही द्वारें एकमेकांशीं संबंधित आहेत. पूर्व द्वारानें म्हणजे तोंडानें, पेय आणि अन्न हीं शरीरांत दाखल होतात. आणि आपलें तेथील कार्य आटोपून, मलामध्यें परिवर्तित होऊन पश्चिम द्वारानें अर्थात् गुदद्वारानें शरीराबाहेर पडतात. म्हणजे पोषक अन्नाचा प्रवेश पूर्वद्वारानें होतो आणि शरीरांतील मळ दूर करण्याचें कार्य पश्चिमद्वारानें होतें अशा प्रकारें हीं दोन्ही द्वारें शरीर स्वास्थ्यास आवश्यक आहेत. पण हा झाला स्थूल शरीराचा संबंध. याशिवाय आणखी दोन द्वारें आहेत, त्यांचा संबंध मनुष्याच्या उन्नति–अधोगतीशीं अधिक आहे. हीं दोन द्वारें सुद्धां मनुष्य शरीरांतच आहेत. आणि त्यास ' दक्षिण द्वार ' आणि ' उत्तरद्वार ' असें म्हणतात.

' उत्तर द्वार ' मस्तकांत आहे, त्यास ' **विदृतिद्वार** ' असें हि म्हणतात. हें नांव उपनिषदांत सांगितलें आहे, या द्वारानें जीवात्म्याचा शरीरांत प्रवेश होतो. आणि जेव्हां स्व–प्रयत्नांनी या वाटेनेंच जीव शरीर सोडून जातो तेव्हां तो जन्ममरणाच्या दुःखांतून मुक्त होतो. पुनः या शरीराच्या बंधनांत पडत नाहीं. बालपणीं लहान मुलाच्या मस्तकांत या जागीं हाड नसतें. त्या जागेस उत्तर द्वार म्हणतात. या द्वारानें गेलें असतां उच्च तर अवस्था प्राप्त होते.

या द्वाराचा मज्जा केन्द्राशीं संबंध आहे. शरीरांतील खालील भागाचा संबंध जोडणारें 'शिश्नद्वार' हेंच 'दक्षिणद्वार' होय. यांतून वीर्यपात होतो. त्याचे योग्य नियम पाळल्यानें सुयोग्य संतति प्राप्त होते. परंतु जर नियमांचें पालन न केलें तर अधोगति होते. हीं (उत्तर–दक्षिण) दोन्हीं द्वारें मनुष्यास उच्च अथवा नीच बनविणारीं आहेत. ब्रह्मचर्य पालनाच्या योगानें उत्तर मार्गानें जाण्याचें जें उपनिषदांनीं वर्णन केलें आहे तो हाच उत्तर मार्ग होय. याचेंच नांव उत्तरायण (उत्तर+अयन) म्हणजे उत्तर मार्गानें जाणें असा आहे. याच्या विरुद्ध तो दक्षिणमार्ग (दक्षिणायन) म्हणजे दक्षिण मार्गानें जाणें. त्या इन्द्रियाच्या संयमामुळें उत्तम गृहस्थधर्म पालन करतां आला तर उन्नति शक्य आहे. परंतु असंयमामुळें मनुष्य इतका अधोगतीस जातो कीं त्याला धरबंद रहात नाहीं. हे दोन मार्ग मज्जातंतूशीं संबंध ठेवणारे आहेत.

याप्रमाणें पूर्व आणि पश्चिमद्वारांचा संबंध शरीरांतील अन्न नलिकेशीं आहे. त्याचप्रमाणें दक्षिण आणि उत्तर द्वारांचा संबंध मज्जातंतूशीं आहे. या चार द्वारांचे चार संरक्षक देव असतात, परंतु ते राक्षसांच्या हल्ल्यानें जेरीस आलेले असूं नयेत.

आशा आणि दिशा

या सूक्तांत ' आशा ' शब्द दिशा वाचक आहे आणि तिच्या पालकांचें नांव ' आशापाल ' असें मंत्रांत आलें आहे. ' आशा ' शब्दाचे दोन अर्थ आहेत. एक तर ' दिशा ' आणि दुसरा आशा, उमेद, इच्छा, महत्त्वाकांक्षा वगैरे. मनुष्याची इच्छा, आशा, उमेद वा महत्त्वाकांक्षा जशी असेल तशी त्याच्या कार्याची दिशा असते. जेव्हां मनुष्य आशाहीन होतो. हताश होतो, निराशा त्याला व्यापते, तेव्हां तो जगापासून दूर जाण्याची इच्छा करूं लागतो. हा विचार जर वाचकांच्या मनांत दृढमूल झाला तर या सूक्ताचा मनुष्याशीं किती घनिष्ठ संबंध आहे हें त्यांच्या ध्यानीं येईल.

ज्यावेळीं ' आशा ' शब्दाचा अर्थ ' आकांक्षा ' वगैरे करण्यांत येईल तेव्हां हेंच सूक्त मनुष्यास अभ्युदयाचा मार्ग दाखवितें. तसेंच जेव्हां या ' आशा ' शब्दाचा अर्थ ' दिशा ' करण्यांत येईल तेव्हां हेंच सूक्त बाह्य जगत् आणि राष्ट्रांतील शासनाचा भाव दर्शवील. सूक्तांतील शब्दांची ही रचना मोठी गंभीर आणि वेदाच्या अद्भूत वर्णनशैलीचें स्वरूप दाखवीत आहे.

सूक्ताचा मनुष्यवाचक भावार्थ

मनुष्याच्या चार आशा असतात, त्यांचे चार अमर, पालक देव असतात. या भूताध्यक्षांची आपण हवनाच्या योगानें पूजा

करावी. (१) मनुष्याच्या चार आशांचे चार पालक आहेत. त्यांनीं आम्हांस पापें आणि दुष्ट स्थिति यांपासून वांचवावें. (२) न थकतां आणि अंगांनीं निर्बल न होतां हवि आणि तुपानें मीं त्यांस तृप्त करतों. या चार आशांच्या पालकांपैकीं चौथा पालक आम्हांस उत्तम आनंद प्राप्त करण्यास सहायक होवो. (३) त्यांच्या सहाय्यानें आमचे माता-पिता, इष्ट-मित्र, गायी, घोडे इत्यादि सर्व सुखी होवोत. आमचा अभ्युदय होवो आणि आम्ही ज्ञानी होऊन दीर्घायु व्हावें.

केवळ एक आशा शब्दाचा अर्थ बरोबर ध्यानीं आल्यानें व्यक्तिविषयक उन्नतीच्या मार्गाविषयीं किती उत्तम उपदेश मिळतो तो वाचकांनीं येथें ध्यानीं आणावा. हा उपदेश इतका महत्त्वाचा आहे कीं त्याप्रमाणें चालण्यानें मनुष्य ऐहिक अभ्युदय आणि पारमार्थिक निश्रेयस् प्राप्त करूं शकतो. या सूक्ताविषयीं पुष्कळच लिहितां येण्यासारखें आहे, परंतु येथें त्याचें विवरण संक्षेपानेंच करीत आहोंत.

मनुष्याच्या चार द्वारांच्या चार आशा


मनुष्य शरीरांत चार द्वारें असतात हें या पूर्वीच दाखवलें आहे. या द्वारांमुळें चार प्रकारच्या आशा मनुष्याच्या मनांत निर्माण होतात. ज्याप्रमाणें घरांस जितकीं द्वारें असतात त्या दारांनीं बाहेर जाऊन त्या दिशेस कांहीं कार्य करण्याची इच्छा घरमालकास व्हावी, त्याप्रमाणें या शरीररूपी घराचा स्वामी जो आत्मदेव (आत्मा) त्यासहि या घराच्या चारी द्वारांतून बाहेर जाऊन तेथील कार्यक्षेत्रांत पुरुषार्थ करण्याची इच्छा होते. वास्तविक या शरिरास अनेक द्वारें आहेत त्यांत नऊ द्वारें मुख्य आहेत, असें वेदामध्यें सांगण्यांत आलें आहे. पहा—

अष्टा चक्रा नवद्वारा देवानां पूरयोध्या ।
तस्यां हिरण्ययः कोशः स्वर्गो ज्योतिषाऽऽवृतः ॥
(अथर्व. १०।२।३१)


' आठ चक्रें आणि नऊ द्वारें असलेली देवांची ही अयोध्या नांवाची नगरी आहे. त्यांत सुवर्णमय कोश आहे. तो च तेजस्वी स्वर्ग होय.'

या अथर्वश्रुतींत शरिराचें आणि हृदयगुहेचें वर्णन करतांना म्हटलें आहे कीं शरिरास नऊ द्वारें आहेत. हीं द्वारें आहेत यांत कांहीं शंका नाहीं. दोन नाकपुड्या, दोन डोळे, दोन कान, एक मुख पूर्वद्वार, गुदा पश्चिमद्वार, शिश्न दक्षिणद्वार या तीनीचा संबंध उक्त सूक्ताच्या प्रचलित मंत्रांत आहे. जें चौथें द्वार आहे तें आठ

विदतिद्वारानें प्रवेश



चक्राच्या पृष्ठवंशाच्या (पाठीच्या कण्या) वर मस्तकांत वरच्या भागांत (आकृति पहा) ' विद्दति ' नांवानें प्रसिद्ध आहे. त्याचें वर्णन अथर्ववेदांत असें आहे.



मस्तकांत विद्दति द्वार

मूर्धानमस्य संसीव्याथर्वा हृदयं च यत् ।
मस्तिष्कादूर्ध्वः प्रैरयत् पवमानोऽधि शीर्षतः ॥
(अ. १०।२।२६)

' मस्तक आणि हृदय शिवून मस्तकाच्या वरच्या भागांत प्राण फेंकला जावा. '


विद्दति द्वारानें प्रवेश

विद्दति-द्वारानें तेहतीस देवांसह आत्मा शरीरांत प्रवेश करतो. तो आंत येतांच हें दार बंद होतें.

त्यानंतर प्राण साधनाच्या द्वारें स्वेच्छेनें या द्वारानें परत गेला तर मुक्ति. सामान्य मनुष्य देहत्याग करतांना त्याचे प्राण अन्य कोणत्या तरी द्वारानें जातात, परंतु केवळ योगीच अथर्ववेदानें सांगितल्या मार्गानें मस्तकाच्यावरील भागांतील द्वारानें प्राण नेऊन मुक्त होतो.


या मंत्रांत ' **मस्तिष्कात् ऊर्ध्वः । अधिशीर्षतः ।** ' वगैरे शब्दांच्या द्वारें मस्तकाच्या वरील भागांतील उत्तरद्वाराचें वर्णन केलें आहे. म्हणजे ज्या चार द्वारांचें वर्णन वरील मंत्रावरील टिकेंत आम्हीं निश्चित केलें, तसेंच वर्णन वेदांत इतरत्रहि आलेलें आहे. नवद्वारांतील तीन आणि या मज्जातंतूचें चौथें अशा चार आशा अथवा दिशा आहेत. आतां या दिशा कशा प्रकारें निश्चित झाल्या त्या पहा—

द्वार		आशा
पश्चिमद्वार=	गुदा	= ची आशा विसर्जन करणें, शरीर धर्म.
पूर्वद्वार =	मुख	= ची आशा मधुर भोजन करणें, अर्थप्राप्ति.
दक्षिणद्वार=	शिश्न	= ची आशा भोगांचा उपभोग घेणें, काम.
उत्तरद्वार =	विद्दति	= ची आशा बंधमुक्त होणें, मोक्ष



पृष्ठवंश रज्जु

विद्दति द्वार



आरोग्याचा आधार

अशा प्रकारें पश्चिमद्वाराची आशा केवळ ' शरीरधर्म ' पालन करण्याची आहे. तरी सुद्धां या शौचक्रिया धर्मानें, पवित्र, शुद्ध होण्याच्या कृतीमुळें, शरीर शुद्ध होतें. आणि त्यापासून शरीरस्वास्थ्याची प्राप्ति होते. बाकी सर्व भोग शरिराच्या आश्रयानें आहेत, ही गोष्ट तर सर्वांस माहित आहेच. या द्वाराचें कार्य बिघडल्यानें शरीर रोगी होतें आणि अन्य द्वारांच्या आशा पूर्ण

होण्यास असमर्थता उत्पन्न होते. त्या पश्चिमद्वाराचें कार्य जर उत्तम प्रकारें चाललें तर इतर आशा सफल होण्याचा संभव पुष्कळ आहे. त्यामुळें असें म्हणतां येतें की, पश्चिम द्वाराची आशा मनुष्याच्या मनांत ' आरोग्यप्राप्ती ' च्या रूपानें राहिली आहे. या आशेचें कार्यक्षेत्र फार मोठें असतें. मनुष्य या बाबतींत जितकें कार्य करील तितकी स्वस्थता त्यास प्राप्त होईल. आणि जर तो असे व्यवहार करील कीं त्यामुळें पश्चिमद्वाराचे व्यवहार बरोबर चालूं शकणार नाहींत तर तो रोगी होईल यांत कांहींच शंका नाहीं.

खाणें-पिणें

आतां पूर्वद्वाराची आशा पहा. थोडक्यांत इतकें सांगितलें म्हणजे पुरे कीं या द्वारानें मनुष्य उत्तम अन्न आणि उत्तम पान करण्याची इच्छा करतो. मधुर रस मनुष्यास इतका प्रिय होतो आणि त्या प्रेमभरांत तो इतकें खातो कीं अजीर्ण नांवाचा रोग त्यास होतो. म्हणून या विषयीं संयम पाळला पाहिजे. चव आणि जिह्वेचा जो गुलाम किंवा दास होतो, त्याचें जीवन कष्टप्रद होतें. प्रत्येक इन्द्रियास हाच नियम लागू आहे. याप्रमाणें इन्द्रियभोगासाठीं धनाची आवश्यकता आहे. याप्रमाणें या द्वाराची आशा ' अर्थप्राप्तीच ' असणार, ही आशा अत्यधिक वाढविल्यानें कष्ट होतात, आणि संयमद्वारा अत्यावश्यकतेनुसार भोग भोगल्यानें सुखाची वृद्धि होईल, उन्नति होईल. मुख (पूर्व) द्वारानें शब्द बोलण्यानें ही एक कार्य होत असतें. उत्तम शब्दप्रयोगांनींच विश्वामध्यें शांति नांदते. आणि अपशब्द बोलण्यानें अशांति पसरते. यासाठीं सुद्धां जिह्वेवर संयम ठेवणें आवश्यक आहे. एरवीं अनर्थ होण्यास उशीर लागणार नाहीं. या प्रकारें या द्वितीय द्वाराचा संबंध मनुष्याच्या उन्नतीशीं आहे.

कामोपभोग

तिसरें दक्षिणद्वार. या शिश्नाच्या द्वारानें जगांत उत्तम प्रजनन म्हणजे सुप्रजा निर्माण करण्याची शक्यता आहे. परंतु जगांत त्याच्या असंयमामुळें अनर्थ घडून राहिले आहेत. त्यावर संयम मोठ्या प्रयत्नांनींच ठेवतां येतो. ऊर्ध्वरेता होणें हेंच वैदिक धर्माचें साध्य आहे. त्याच्या विचारानें या द्वाराच्या आशेचें ज्ञान होईल. हें केंद्र अत्यंत महत्त्वाचें आहे. परंतु जनतेचें लक्ष्य तें सुधारण्यापेक्षां बिघडवण्याकडेच जास्त असतें. सुधारण्याचे प्रयत्न फार अल्प प्रमाणांत होतात आणि प्रत्यक्ष सुधारणा करणारे तर त्याहिपेक्षां अल्प असतात.

बंधनाचा नाश

आतां चौथ्या म्हणजे विद्दतिद्वाराचा आपण विचार करूं. या द्वारानें जीवात्मा शरिरांत प्रवेश करतो. परंतु त्याच वाटेनें त्यास बाहेर जाण्यास मार्ग मिळत नाहीं. युद्धभूमींत प्रवेश करणें त्यास माहित आहे, परंतु सुरक्षित परत फिरण्याचें ज्ञान त्यास नाहीं. चक्रव्यूहांत शिरण्याची विद्या जाणणारा परंतु चक्रव्यूहांतून युद्धांत विजय प्राप्त करून सुखरूप परत येण्याचें ज्ञान नसणाऱ्या अभिनव कुमार अभिमन्यूप्रमाणेंच आत्म्याची स्थिति आहे. जर तो सुरक्षित परत येण्याची विद्या जाणील तर तो विजयी विजय-अर्जुनच होईल. मग त्यास कोणाची भीति रहाणार नाहीं. तो निर्भय होईल. विजयी होण्यासाठींच हे सर्व धर्ममार्ग आहेत. जेव्हां आलेल्या मार्गानेंच परत जाण्याची शक्ति जीवात्मा प्राप्त करून घेईल, तेव्हां त्यास कोणत्याहि बंधनाचे कष्ट उरणार नाहींत. प्रत्येक बंधनं दूर करण्याच्या इच्छेचें कारण हें द्वार आहे.

याप्रमाणें या चार द्वारांच्या अशा चार आशा आहेत आणि प्रत्येक मनुष्य या आशांच्या कार्यक्षेत्रांत सुकृत अथवा दुष्कृत करीत असतो, आणि त्यामुळें त्याची उन्नति वा अवनति होत असते. आतां या वर्णनावरून या आशांच्या कार्यक्षेत्रांची पूर्ण कल्पना वाचकांस आली असेल. त्यामुळें आतां सूक्तांतील मंत्राचें अर्थ समजण्यास त्याला जरा सुद्धां कठिण जाणार नाहीं. म्हणून प्रथम वाचकांनीं या चार द्वारांचा विचार मननपूर्वक करावा. व जें ठरेल तें उत्तम प्रकारें ध्यानांत ठेवावें व नंतर खालील स्पष्टीकरण वाचावें.

अमर दिक्पाल

या सूक्ताच्या प्रथम मंत्रांत तीन गोष्टी सांगितल्या आहेत— (१) चार आशांचे चार अमर पालक आहेत. (२) तेच चार भूताध्यक्ष आहेत. (३) त्यांची पूजा आपण हवनद्वारानें करतों.

मनुष्यामध्यें चार आशा कोणत्या, त्या आशांचें स्वरूप काय आहे, त्यांच्याशीं मनुष्याच्या उन्नति अथवा पतनाचा संबंध कसा आहे, इत्यादि सर्व विवरण वर आलें आहेच. या चार आशा मनुष्याच्या ठायीं सनातन आहेत. (१) शरीरधर्माकडे लक्ष ठेवणें, (२) भोग प्राप्त करणें, (३) कामाचा उपभोग घेणें, (४) बंधनांतून मुक्ति मिळविणें, या चार कामना मनुष्याच्या ठायीं सदैव जागृत असतात, मूढांमध्यें अथवा बुद्धिशाली मनुष्यांमध्यें त्या समानच असतात. पशुपक्ष्यांत सुद्धां त्या अल्पप्रमाणांत असतात. तात्पर्यार्थ त्या कामना भूतमात्रांत नेहमींच राहिलेल्या आहेत. त्यामुळें त्यांचा सनातन अधिकार प्राणिमात्रावर आहे. थोडक्यांत या भावनाच भूतमात्रांच्या अध्यक्ष आहेत. त्यांना अध्यक्ष एवढ्यासाठीं म्हणावयाचें कीं त्यांच्या प्रेरणेनें मनुष्य काय किंवा प्राणिमात्रें काय, सर्वजण स्वतःचे व्यवहार चाल-

वित असतात. जर या आशा प्राणिमात्रांत नसतील तर त्यांची हालचालच बंद होईल. मनुष्याचे सर्व प्रयत्न त्या कामनांच्या आधीन आहेत. त्यामुळें या चार आशांचे चार पालक मनुष्याचे चार अधिकारी आहेत. त्यांचे आधीन राहून मनुष्य स्वतःचे व्यवहार करतो आणि त्यांचे चांगले अथवा वाईट परिणाम भोगतो.

हवनद्वारानें पूजन

त्यांचें पूजन हवनानेंच होत आहे. पूर्वद्वार मुख आहे. त्यांत अन्न आणि पेयाचें हवन होतें. असा कोणी प्राणी असेल काय जो हें हवन करीत नसेल ! याचप्रमाणें दक्षिणद्वाराचे-शिश्नदेवाचे पूजक सर्व प्राणी आहेतच. इतकेंच नव्हे तर कामदेवाचे अतिपूजन करून लोक स्वतःचा घातही करीत आहेत. इतकें खरें कीं उत्तरद्वार, जें विदृतिद्वार, त्याचे पूजक अल्प प्रमाणांत आहेत, आणि पश्चिमद्वाराची पूजा करणें तर फारच थोड्यांस अवगत आहे. पश्चिमद्वाराच्या पूजायोगांत ' अपानायाम ' करावयाचा असतो. ज्याप्रमाणें नासिकाद्वारें प्राणायाम होतो त्याचप्रमाणें गुदद्वारानें अपानायाम करण्यांत येतो. परंतु त्याची क्रिया फारच थोड्यांस माहित असेल. ही क्रिया योगशास्त्रांत प्रसिद्ध आहे, आणि तिच्या द्वारें नाभीखालील भागाचें आरोग्य प्राप्त होतें. उत्तरद्वार-विदृतीचे उपासक विशेषेंकरून योगी असतात. ते या स्थानाची चालना करतात. आणि स्वतः मुक्ति प्राप्त करून घेतात. त्यांची हवनद्वारा पूजा अशी आहे—

१. पूर्वद्वार (मुख) अन्नपानादिकांच्या हवनानें पूजा,

२. दक्षिणद्वार (-शिश्न) भोगादि द्वारें कामदेवाची पूजा,

३. पश्चिमद्वार (गुदा) अपानायाम, अपानाचें प्राणांत हवन करून पूजा, त्याचा उल्लेख भगवद्गीतेंत सुद्धां आहे—


अपाने जुह्वति प्राणं प्राणेऽपानं तथा परे ।

(भ. गी. ४।२९)

४. उत्तरद्वार (विदृति) मस्तकांत मज्जाकेंद्राच्या सहस्रार चक्रांत ध्यानादिकांनीं पूजा.

येथें वाचकानीं हें ध्यानांत ठेवावें कीं पहिल्या दोन प्रकारच्या उपासना जगांत जास्त आहेत त्या मानानें दुसऱ्या दोन्ही अगदींच अल्प. परंतु बीजरूपानें तरी त्या आहेतच. प्रथम मंत्रांत ' आम्हीं चारहि अमर आशापालकांची हवनद्वारें पूजा करूं ' असें स्पष्ट म्हटलें आहे. तें अशासाठीं कीं मनुष्यानें चारी पालकांच्या उपासनेच्या द्वारानें स्वतःचा उद्धार करावा.

आतां नियमन कसें होतें तें वाचकानें नीट समजून घेतलें पाहिजे. हें नियमन खालीं दिल्याप्रमाणें आहे—



पूर्व आणि पश्चिमद्वार हीं आमच्या रोगाच्या दिशांची मुखें आहेत म्हणजे आमच्या आरोग्याचें अनारोग्य होण्यास कारणीभूत होणारीं आहेत. मुखक्रियेचा (खाण्याचा) अतिरेक झाला म्हणजे गुदाचें कार्य बिघडतें, आणि तें कार्य व्यवस्थित होत असलें तर तोंडास रुचि रहाते. याप्रमाणें हीं दोन्हीं द्वारें एकदुसऱ्याचें नियमन करतात. जर शिश्नदेवानें अतिरेक केला तर मस्तक हलकें होतें, आणि मनुष्य बुद्धीचीं कार्यें करण्यास असमर्थ होतो, वेडा होतो, निकामी होतो. त्याप्रमाणें मस्तकांत सुविचार स्थिर केल्यानें ते सुविचार शिश्नदेवास संयमांत ठेवण्यास सहाय्यरूप होतात. याप्रमाणें हीं दोन्हीं द्वारें परस्पर उपकारक आहेत आणि घातकहि आहेत. वाचकांनीं विचार करून हे देव कोणत्या प्रकारें उपकारक होतील व घातक होणार नाहींत तें ठरवावें, तसेंच त्यांची उपासना कशा प्रकारें करावी आणि त्यांच्या प्रकोपापासून स्वतःचें रक्षण कसें करावें तेंहि ठरवावें. आतां दुसऱ्या मंत्राचा विचार करूं—

द्वितीय मंत्राचा आशय असा आहे, ' चार आशांचे चार आशापालक देव आहेत, ते आम्हांस पापापासून आणि अधोगतिपासून वांचवोत. '

पूर्वोक्त्या वर्णनावरून, हे चार देव आम्हांस कशाप्रकारें वांचवितात अथवा कशाप्रकारें अधःपतित करतात हें वाचकांच्या ध्यानीं आलें असेलच पहा⋯

१. **पूर्वद्वार**-मुख-जिव्हेच्या आहारीं गेल्यामुळें, खाण्यापिण्यांत अतिरेक झाल्यानें, पोट बिघडतें आणि त्यामुळें स्वास्थ्य नाश पावतें. याच जिव्हेच्या संयमानें आरोग्यप्राप्ति होऊं शकते.

२. **पश्चिमद्वार**-गुदा-पूर्वोक्त संयम अथवा असंयमामुळेंच लाभ अथवा हानि होण्याचा जास्त संभव आहे.

३. **दक्षिणद्वार**-शिश्न- ब्रह्मचर्यानें म्हणजे संयमानें उन्नति, संयमपूर्वक गृहस्थधर्म पालनानें सुप्रजाप्राप्ति आणि असंयमानें क्षय.

४. **उत्तरद्वार**-विदृति- पूर्वोक्त संयम अथवा असंयमाशींच याच्या लाभ अथवा हानीचा संबंध आहे.

वरील गोष्टींचें मनन केल्यानें हे दिशापालक कोणत्या नियमानें पापापासून सोडवूं शकतात त्याचें ज्ञान होऊं शकतें. पापापासून मुक्त झाल्यानेंच मनुष्य निर्ऋतीच्या पाशापासून मुक्त होतो. निर्ऋ-

तीचा अर्थ आहे नाश. पाप करणारास निर्ऋति म्हणजे नाश बांधून ठेवतो. परंतु पुण्यशाली माणसास त्याच्यापासून कांहीं कष्ट होत नाहींत. चार आशा मनुष्यास पापापासून मुक्त करतात आणि बंधनापासून सोडवितात, हें या मंत्राचें सांगणें फारच बोधप्रद आहे. वाचकांनीं स्वतःच्या अवस्थेचा विचार करावा आणि स्व-शरीरांत काय चालत आहे तें जाणून घ्यावें. जर एखादा आशा-पालक योग्य कर्तव्याविरुद्ध कार्य करीत असला, अथवा शत्रूच्या आधीन झाला असला, तर सावधानतेनें स्वतःच्या बचावाचा प्रयत्न केला पाहिजे. अशा प्रकारें दुसऱ्या मंत्रापासून बोध मिळतो. आतां तिसरा मंत्र पाहूं...

चतुर्थ देव

तृतीय मंत्राचा आशय असा आहे कीं, मीं न थकतां तसेंच अंगानें दुर्बल न होतां हवनानें आणि तुपानें त्याची तृप्ति करतों. या चार आशापालकांत जो चौथा आशापालक आहे तो आम्हांस सुखानें या आनंदस्थानीं पोहोंचवो.'

या मंत्रांत वर्णिलेला '**तुरीयः देवः**' म्हणजे चतुर्थ देव विद्दतिद्वाराचा रक्षक व मोक्षाच्या आशेचा पालक आहे. या देवाच्या कृपेनेंच अन्य सर्व द्वारांचें नियमन होतें. या दृष्टीनेंच अन्य सर्व कार्यव्यवहारांचें नियमन व्हावयास हवें. वैदिक धर्माचा संपूर्ण कार्यव्यवहार या दृष्टिबिंदूतूनच रचलेला आहे. मोक्ष हेंच लक्ष्य ठेऊन जगाचा सर्व कार्यव्यवहार व्हावयास हवा. त्यासच धर्म म्हणतात. बंधनापासून मुक्ति मिळवणें हें मुख्य साध्य आहे, त्यामुळें त्यास सहाय्यकारी होतील असे अन्य व्यवहार असले पाहिजेत. जगाच्या इतर व्यवहारास महत्त्व देऊन मोक्षास जर कमी लेखलें गेलें, तर मनुष्यांत लोभवृत्ति वाढेल आणि त्यानें जगांत भारी अनर्थ होतील. त्या पूर्ण जीवनाचें रहस्य येथें स्पष्ट होतें.

मंत्रांत म्हटलें आहे कीं न थकतां आणि शरिरानें विकल न होतां मी या देवांची पूजा करीन. हें सांगणें स्पष्ट आहे. याचा अर्थ मनुष्यानें प्रयत्नानें स्वतःचें शरीर सुदृढ बनवावें आणि अनेक पुरुषार्थ करण्याचा उत्साह मनांत दृढ करावा.

या चार देवांची अन्नानें आणि तुपानें तृप्ति केली पाहिजे. ज्याचें जें हवन आहे त्याबरोबर तूपही असलेंच पाहिजे, हें तूप गाईचेंच असावें. तें त्याचें त्यास यथायोग्य रीतीनें देऊन त्या देवाची तृप्ति केली पाहिजे. त्यांत कमी करून चालणार नाहीं. न थकतां अथवा न कंटाळतां हे भोग प्राप्त केले पाहिजेत आणि योग्य प्रमाणांत त्यांचा स्वीकारहि केला पाहिजे. म्हणजे फार दक्षतापूर्वक जगांत व्यवहार चालवणें उचित आहे. परंतु हे सर्व लौकिक व्यवहार चालू असतांनाच चतुर्थ देवाची कृपा संपादन करण्याचा प्रयत्न अवश्य केला पाहिजे; कारण कीं त्याच्याच कृपेनें आनंद, उन्नति, यश इत्यादींची प्राप्ति होते आणि सद्गतीहि मिळूं शकते.

दीर्घ आयुष्य

पूर्वी सांगितल्या पद्धतीनें तीन मंत्रांचा विचार केल्यानंतर चौथा मंत्र अशा प्रकारें आपणांसमोर येतो.' या आशापालकांच्या सहाय्यानें आम्हीं तसेंच आमचे माता, पिता, इष्टमित्र, गायी, घोडे वगैरे सर्व सुखी राहोत. आमचा अभ्युदय होवो आणि आम्हीं ज्ञानी होऊन निःश्रेयसाचें अधिकारी व्हावें आणि दीर्घायु व्हावें.' या मंत्रांत चार गोष्टी सांगितल्या आहेत—

१. स्वस्ति (सु+अस्ति)– सर्वांचें उत्तम अस्तित्व व्हावें म्हणजे या लोकींचें जीवन सुखपूर्ण व्हावें.

२. सुभूतं (सु+भूति)– उत्तम ऐश्वर्य प्राप्त व्हावें. उत्तम अभ्युदयाचें हें सूचक विधान आहे.

३. सुविदत्रं (सु+विद्+त्रं) उत्तम ज्ञान मिळावें. आत्मज्ञानच सर्व ज्ञानांत उत्तम आणि निःश्रेयसाचाहि तोच हेतु आहे, तें आम्हांस प्राप्त व्हावें.

४. **ज्योक्**– दीर्घकालपर्यंत जीवन असावें. अर्थात् हें अभ्युदय आणि निःश्रेयसाच्या योगानें सहज प्राप्त होतें.

वेदमंत्रांत ठिकठिकाणीं '**ज्योक् च सूर्यं दृशेम**' म्हणजे 'दीर्घकालपर्यंत आम्हीं सूर्यास पहावें,' असें वाक्य आलें आहे. ही एक म्हण आहे. तिचा तात्पर्यार्थ 'आमचें आयुष्य अति दीर्घ असावें' असा आहे. परंतु येथें विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट हीच आहे कीं दीर्घ आयुष्यप्राप्तीचा संबंध सूर्याशीं आहे. वेदांत जेथें जेथें दीर्घ आयुष्य प्राप्त करण्याचा उपदेश करण्यांत आला आहे तेथें तेथें सूर्याचा संबंध अवश्य दर्शविण्यांत आला आहे. म्हणून जे दीर्घायुष्य प्राप्त करूं इच्छितात, त्यांनीं आयुष्य वर्धनाचा संबंध सूर्याशीं आहे हें विसरूं नये. ब्रह्मकृपेनें दीर्घायु प्राप्त होतें या विषयीं अथर्ववेदांत अन्यत्र असें म्हटलें आहे.

यो वै तां ब्रह्मणो वेदामृतेनावृतां पुरम्।
तस्मै ब्रह्म च ब्राह्माश्च चक्षुः प्राणं प्रजां ददुः॥ २९॥
न वै तं चक्षुर्जहाति न प्राणो जरसः पुरा।
पुरं यो ब्रह्मणो वेद यस्याः पुरुष उच्यते॥ ३०॥

(अथर्व. ११२)

जो निश्चयेंकरून ब्रह्माच्या अमृतानें परिपूर्ण नगरीस जाणतो त्याला स्वतः ब्रह्म आणि त्याचे साथीदार अन्यदेव चक्षु, प्राण आणि प्रजा देतात. (२९) अति वृद्धावस्थेपूर्वी त्याचे प्राण

आणि दृष्टि त्याला सोडीत नाहींत. जो ब्रह्मपुरीस जाणतो तो त्या पुरींत रहाण्यामुळें पुरुष म्हटला जातो.' (३०)

वरील मंत्रांचा भाव असा स्पष्ट आहे कीं ब्रह्माच्या कृपेनें, दीर्घायुष्य, सुसंतान, आणि आरोग्यपूर्ण इन्द्रियांनीं युक्त उत्तम शरीर प्राप्त होतें. हा भावच संक्षेपानें या सूक्तांतील चौथ्या मंत्रांत सांगितला आहे. याप्रमाणें ज्ञानी मनुष्य इह आणि परलोकीं यशस्वी होतो हा या सूक्ताचा उपदेश आहे.

विशेष दृष्टि

हें सूक्त फक्त बाह्य दिशा आणि त्यांच्या पालकांचेंच वर्णन करीत नाहीं. बाह्य दिशांचें वर्णन या सूक्तांत आहे. परंतु दिशा शब्दाचा प्रयोग न करतां आशा शब्दाचा प्रयोग त्यांत एवढ्यासाठीं केला आहे कीं, मनुष्यानें स्वतःच्या आशा आणि त्यांच्या पालक शक्तीचा अनुभव स्वतःच्या ठिकाणीं करावा आणि त्यांचा संयम, नियमन, आणि योग्य उपासना इत्यादिकांच्या योगानें स्वतःचा अभ्युदय आणि निःश्रेयस प्राप्त करून घ्यावा.

या सूक्तांतील श्लेषालंकार फार महत्त्वपूर्ण आहे आणि जे या सूक्तास केवळ बाह्य दिशांसाठींच समजतील ते त्यांतील महत्त्वपूर्ण उपदेशास पारखे होतील. वाचकांनीं या दृष्टीनें त्याचें अध्ययन करावें.

या सूक्ताचा संबंध आयुष्यगण, अपराजितगण, इत्यादि अनेक गणांशीं विषयाच्या अनुकूलतेप्रमाणें आहे. हें सूक्त स्वतःच वास्तोष्पतिगण अथवा वसुगणाचें आहे. त्यामुळें ' येथील निवासा ' शीं त्याचा अपूर्व संबंध आहे. या दृष्टीनें विचार करून वाचक त्यापासून पुष्कळ बोध प्राप्त करून घेऊं शकतात आणि तो आचरणांत उतरवून स्वतःचा अभ्युदय आणि निःश्रेयस प्राप्त करून घेऊं शकतात.

राष्ट्र-संवर्धन-सूक्त

कांड १, सूक्त २९

(ऋषिः- वसिष्ठः । देवता — ब्रह्मणस्पतिः, अभीवर्तो मणिः)

अभीवर्तेन मणिना येनेन्द्रो अभिवावृधे । तेनास्मान् ब्रह्मणस्पतेऽभि राष्ट्राय वर्धय ॥ १ ॥
अभिवृत्य सपत्नानभि या नो अरातयः । अभि पृतन्यन्तं तिष्ठाभि यो नो दुरस्यति ॥ २ ॥
अभि त्वा देवः सविताभि सोमो अवीवृधत् । अभि त्वा विश्वा भूतान्यभीवर्तो यथाससि ॥ ३ ॥

अर्थ— हे (ब्रह्मणस्पते) ज्ञानी पुरुषा ! (येन इन्द्रः अभिवावृधे) ज्याच्या योगानें इन्द्राची अभिवृद्धि झाली होती, (तेन अभिवर्तेन मणिना) त्या विजय मिळवून देणाऱ्या मण्यानें (अस्मान्) आमची (राष्ट्राय अभिवर्धय) राष्ट्रासाठीं अभिवृद्धि कर. (१) (याः नः अरातयः) जे आमचे शत्रु आहेत त्यांस तसेंच इतर (सपत्नान्) वैऱ्यांस (अभिवृत्य) पराभूत करून (यः नः दुरस्यति) तसेंच जे आमच्याशीं दुष्टतेचें आचरण ठेवतात, तसेंच जे (पृतन्यन्तं) सैन्यासह आमच्यावर चालून येतात त्यांच्यांशीं (अभि अभि तिष्ठ) युद्ध करण्यास स्थिर हो. (२) (सविता देवः) सूर्यदेवानें तसेंच (सोमः) चंद्रदेवानें सुद्धां (त्वा) तुला (अभि अभि-अवीवृधत्) सर्व प्रकारें वाढविलें आहे. (विश्वा भूतानि) सर्व भूतमात्र (त्वा अभि) तुला वाढवीत आहेत. ज्यामुळें तूं (अभिवर्तः अससि) शत्रूंस दाबून टाकणारा झाला आहेस. (३)

भावार्थ— हे राष्ट्रांतील ज्ञानी पुरुष हो ! ज्या राजचिन्हरूपी मण्यास धारण करून इंद्र विजयी झाला, त्या मण्यानें राष्ट्रासाठीं आमची अभिवृद्धि करा. (१) जे अनुदार शत्रु आहेत आणि जे प्रतिपक्षी आहेत त्यांचा पराजय करण्यासाठीं तसेंच जे आमच्याशीं दुष्ट रीतीनें वागतात आणि जे सैन्य पाठवून आमच्यावर हल्ला करतात. त्यांस खालीं पाडण्याची तयारी करून पुढें व्हा. (२) सूर्य चंद्र इत्यादि देव तसेंच सर्व भूतमात्र तुला सहाय करून पुढें नेत आहेत. त्यांच्या सर्वांच्या मदतीनें तूं शत्रूंना दाबून टाकणारा झाला आहेस. (३)

अभीवर्तो अभिभवः सपत्नक्षयणो मणिः । राष्ट्राय मह्यं बध्यतां सपत्नेभ्यः पराभुवे ॥ ४ ॥
उदसौ सूर्यो अगादुदिदं मामकं वचः । यथाहं शत्रुहोऽसान्यसपत्नः सपत्नहा ॥ ५ ॥
सपत्नक्षयणो वृषाभिराष्ट्रो विषासहिः । यथाहमेषां वीराणां विराजानि जनस्य च ॥ ६ ॥

अर्थ— (अभिवर्तः) शत्रुस घेरणारा (अभिभवः) शत्रूंस पराजित करणारा, (सपत्नक्षयणः) प्रतिपक्षीयांचा नाश करणारा हा (मणिः) मणि आहे. (सपत्नेभ्यः पराभुवे) प्रतिपक्षीयांचा पराभव करण्यासाठीं तसेंच (राष्ट्राय) राष्ट्राच्या अभ्युदयासाठीं (मह्यं बध्यतां) मला हा मणि बांधा. (४) (असौ सूर्यः उद्गात्) हा सूर्य उदय पावला आहे. (इदं मामकं वचः उत्) हें माझें बोलणें सुद्धां प्रकट होत आहे. (यथा) ज्यामुळें (अहं शत्रुहः) मीं शत्रूंचा नाश करणारा (सपत्नहा) प्रतिपक्षीयांचा नाश करणारा होऊन (असपत्नः असानि) शत्रुरहित व्हावें, (५) (यथा) ज्यामुळें (अहं) मीं (सपत्नक्षयणः) प्रतिपक्षीयांचा नाश करणारा (वृषा) बलवान् आणि (विषासहिः) विजयी होऊन (अभिराष्ट्रः) राष्ट्रास अनुकूल होऊन तसेंच राष्ट्राचें सहाय्य प्राप्त करून (एषां वीराणां) या वीरांचें आणि (जनस्य च) सर्व लोकांचें (वि राजानि) विशेष प्रकारें रंजन करणारा राजा व्हावें. (६)

भावार्थ— शत्रूंस घेरणारा, वैऱ्यांचा पराजय करणारा, प्रतिपक्षीयांस दूर करणारा हा राजचिन्हरूपी मणि आहे म्हणून प्रतिपक्षीयांचा पराजय करण्यासाठीं आणि माझ्या राष्ट्राच्या अभ्युदयासाठीं हा मणि मजवर बांधा. (४) ज्याप्रमाणें हा सूर्याचा उदय झाला आहे त्याप्रमाणें हें माझें वचन प्रकट झालें आहे. म्हणून आतां तुम्हीं मीं शत्रूंचा नाश करणारा आणि प्रतिपक्षीयांस दूर करणारा होऊन शत्रुरहित होईन असें करा. (५) प्रतिपक्षीयांचा नाश करून मीं बलवान् होऊन स्वतःच्या राष्ट्रास अनुकूल कार्य करतां करतां माझ्या वीरांचें तसेंच माझ्या राष्ट्रांतील सर्व लोकांचे हित मी करावें. (६)

राष्ट्र-संवर्धन-सूक्त

अनुसंधान

हें सूक्त राजप्रकरणाचें आहे. या कांडांतील अपराजित गणांच्या सर्व सूक्तांसह त्यांचा विचार करणें योग्य होईल. तसेंच पुढें येणाऱ्या राजप्रकरणाच्या सूक्तांशी त्यांचा संबंध पहाण्यासारखा आहे. त्याशिवाय अभयगण, सांग्रामिक गणांच्या सूक्तांबरोबरसुद्धां या सूक्ताचा विचार केला पाहिजे.

अभीवर्त मणि

ज्याप्रमाणें राजदंड, छत्र, चामरें इत्यादि राजचिन्हें आहेत. त्याच प्रकारचा हा ' अभीवर्त मणि ' सुद्धां एक राजचिन्हच आहे. तो धारण करतांना हें सूक्त म्हणण्यांत येत असतें.

देवांचा राजा इंद्र आहे, त्याचा पुरोहित बृहस्पति अथवा ब्रह्मणस्पति आहे. हा पुरोहित इंद्राच्या शरिरावर हा अभिवर्त मणि बांधतो. म्हणजे राजपुरोहितानेंच हें राजचिन्ह राजाच्या शरिरावर बांधावयाचें आहे. हा संबंध पाहिला म्हणजे ध्यानीं येईल की हें सूक्त संवादरूपाचें आहे. हा संवाद असा आहे—

सूक्तांतील संवाद

राजा— अहो पुरोहित हो ! जो अभिवर्त मणि इंद्राच्या शरिरावर देवगुरु बृहस्पति यांनीं बांधला होता आणि ज्याच्यामुळें इंद्र दिग्विजयी झाला होता तो राजचिन्हरूप मणि माझ्या शरिरावर तुम्ही बांधा, ज्याच्यामुळें मीं राष्ट्राचें संवर्धन करण्यास समर्थ होईन. (१)

पुरोहित— हे राजन ! जे अनुदार शत्रु आहेत आणि जे प्रतिपक्षी आहेत, तसेंच जे आपल्या राष्ट्राशीं वाईट रीतीनें वागतात, आणि आपणांवर सैन्यासह चढाई करतात त्यांस पराजित करण्याची तयारी करा. (२) सूर्य, चंद्र तसेंच सर्व भूतमात्र तुमच्या सहाय्यास तयार आहेत. त्यामुळें तुम्हीं शत्रूंस दाबून टाकूं शकाल. (३)

राजा— पुरोहित हो ! हा राजचिन्हरूपी मणि, शत्रूंस घेरा घालण्यास, वैऱ्यांचा पराजय करण्यास आणि प्रतिपक्षीयांस परत हटवण्यास सामर्थ्य देणारा आहे. त्यामुळें विरोधीयांचा पराभव

करण्यासाठीं तसेंच राष्ट्राचा अभ्युदय करण्याच्या कार्यांत मला समर्थ बनविण्यासाठीं माझ्या शरिरावर हा मणि बांधा. (४) ज्याप्रमाणें सूर्याचा उदय झाला आहे त्याचप्रमाणें माझे शब्द घोषणा करीत आहेत म्हणून तुम्हीं असें करा कीं जेणें करून माझ्या शत्रूंचा नाश मी करूं शकेन. (५) मीं बलवान् होऊन प्रतिपक्षीयांस दूर करीन आणि विजयी होईन. माझ्या राष्ट्रास अनुकूल असें कार्य करतां करतां माझ्या वीरांचें आणि माझ्या राष्ट्राचें मी हित करीन. (६)

वाचकांनीं हा संवाद लक्षपूर्वक वाचावा म्हणजे या सूक्ताचा सर्व आशय त्यांच्या ध्यानीं लवकर येईल. राजा राज्यचिन्हें धारण करतो, त्यावेळीं राजपुरोहित त्याला कित्येक राष्ट्रहिताच्या कामांच्या गोष्टी सांगतो. आणि राजासुद्धां त्याचवेळीं राष्ट्रहित करण्याची प्रतिज्ञा करतो. पुरोहित ब्राह्मशक्तीचा आणि राजा हा क्षात्रशक्तीचा प्रतिनिधि आहे. राष्ट्रांतील ब्राह्मशक्ति पुरोहित मुखानें राजकर्तव्याचा उपदेश राजाला करते. राजाला गादीवर चालू ठेवावयाचें कीं नाहीं तें राष्ट्रांतील ब्राह्मशक्तीच्या आधीन असलें पाहिजे. म्हणजे ब्राह्मशक्तीच्या आधीन क्षात्रशक्ति असे आणि असते. ही गोष्ट येथें स्पष्ट होते. ज्ञानी लोकांवर शूरवीरांचा अधिकार नसावा परंतु शूरवीर लोकांनीं ज्ञानी लोकांच्या आधीन राहून स्वतःचीं कार्यें करावींत. राष्ट्राची (Civil and Military) ब्राह्म आणि क्षात्रशक्ति यांनीं एकदुसऱ्यांशीं कसें वागावें तें या सूक्तांत स्पष्ट सांगितलें आहे. ब्राह्मशक्तीच्या योगानें नक्की झालेला राजाच राजगादीवर येऊं शकेल दुसरा नाहीं.

राजाचे गुण

या सूक्तांत राजाचे गुण खालील शब्दांनीं वर्णिले आहेत—

१. अस्मान् राष्ट्राय अभिवर्धय- आमच्या राष्ट्रासाठीं आमची शक्ति वाढव, म्हणजे राजाच्या अंतरीं जी शक्ति वाढते ती राष्ट्राच्या उन्नतीच्या सत्कारणीं लागावी. हा भावच राजाचे ठायीं असावा. आपली वृद्धि पावलेली तन, मन, धन, आदि सर्व शक्ति आपल्या वैयक्तिक सुखोपभोगासाठीं नाहींत, परंतु राष्ट्राच्या हितासाठीं आहेत, असा राजाचा निश्चय असावा. असा राजाच खरा राजा म्हटला जातो. (मं. १)

२. राष्ट्राय मह्यं बध्यतां सपत्नेभ्यः पराभुवे- राष्ट्राच्या उन्नतिसाठीं आणि शत्रुपराभवासाठीं हा राजचिन्हरूपी मणि माझ्या (राजाच्या) शरीरावर बांधला जावो. मणि इत्यादि जीं चिन्हें राजानें धारण करावयाचीं तीं स्वतःची शोभा वाढविण्यासाठीं नव्हे, तर त्याचे फक्त दोन उद्देश आहेत. (१) राष्ट्राची उन्नति व्हावी आणि जनतेचे शत्रू दूर करावेत. (२) राजास शक्ति प्राप्त होण्यासाठीं, शक्ति वाढण्यासाठीं राजचिन्हें वापरावयाचीं आहेत. (मं. ४)

३. अभिराष्ट्रः-- (अभितः राष्ट्रं यस्य)- ज्याच्या सर्व बाजूस राष्ट्र आहे असा राजा असावा. म्हणजे राजानें आपल्या राष्ट्रांत राष्ट्रासह, राष्ट्राचें होऊन रहावें. राजाचें हित राष्ट्रहितांत असावें आणि राष्ट्राचें हित झालें म्हणजे राजाचें हित होतेंच. थोडक्यांत दोघांच्या हितसंबंधांत फरक नाहीं व तसा तो नसावाच. राजाला राष्ट्रानें अनुकूल असावें आणि राष्ट्रासाठीं राजानें अनुकूल असावें. राष्ट्रहिताचें उच्च ध्येय स्वतः समोर ठेवणारा राजा कसा असतो तें या शब्दांनीं समजतें. ज्या राजासाठीं त्याची प्रजा आत्मार्पण करण्यास तयार होते तो खरा राजा. हा शब्द आदर्श राजाचा वाचक आहे. (मं, ६)

४. शत्रुहः- शत्रूंचा नाश करणारा. (मं. ५)

५. असपत्नः-- घरभेदी, अंतस्थ विद्रोही ज्याला नाहींत असा. (मं. ५)

६. सपत्नहा- प्रतिपक्षाचा नाश करणारा, म्हणजे प्रतिपक्षीयांचा पराजय करणारा. (मं. ५) '**सपत्नक्षयण**' हा शब्दसुद्धां याच अर्थाचा मं. ६ मध्यें आला आहे.

७. वृषा- बलवान्. सर्व प्रकारच्या बलांनीं युक्त राजा असावा. नाहीं तर त्याचा नाश होईल. (मं. ६)

८. विषासहिः- शत्रूंचा हल्ला झाला असतां तो सहन करून मागें न हटणारा, आपलें स्थान न सोडणारा. (मं. ६)

९. वीराणां जनस्य च विराजानि- राष्ट्राचे शूरवीर तसेंच राष्ट्रांतील संपूर्ण जनता या सर्वांस संतुष्ट करणारा.

१०. प्रतिपक्षीयांस दाबून टाकणारा, वैऱ्यांचा नाश करणारा, सेनेसह चढाई करणाऱ्यांचा प्रतिकार करणें आणि जे दुष्ट व्यवहार करतात त्यांस सरळ करणें इत्यादि राजाचीं कर्तव्यें मं. २ मध्यें सांगितलीं आहेत.

हीं दहा या सूक्तांत सांगितलेलीं राजाचीं कर्तव्यें सर्वच्या सर्व मनन करण्यासारखीं आहेत. हीं कर्तव्यें स्पष्टपणें दर्शवतात कीं राजा राजगादीवर स्वतःच्या ऐषआराम अथवा राज्योपभोगासाठीं बसत नाहीं, तर राष्ट्रहितासाठीं तो राज्य करीत असतो. राज्यकर्ते जर या सूक्तापासून योग्य बोध घेऊन वागतील तर फार उत्तम होईल.

राजचिन्हें

छत्र, चामर, राजदण्ड, मणि, रत्न, रत्नमाला, राजमुकुट, विशेष प्रकारचे कपडे, राजसभेचा थाट, हत्ती, घोडे, या सर्वांचा समावेश राजचिन्हांत होतो. हीं राजचिन्हें धारण केल्यानें राजाचा प्रभाव प्रजेवर विशेष प्रकारें पडतो आणि प्रजा त्याच्याभोवतीं

गोळा होते. राजाच्या प्रभावामुळें एकप्रकारची शक्ति केंद्रित होते. या राजचिन्हांमध्यें कांहीं विशेष शक्ति असते असें नाहीं, तथापि राजचिन्ह धारण करणाऱ्या सामान्य शिपायाच्या ठिकाणीं कांहीं विशेष शक्ति आहे असें प्रजेला वाटतें. त्याप्रमाणें या राजचिन्हांनीं युक्त राजाचा एक अमूर्त प्रभाव पडतो आणि त्या प्रभावामुळें राजाच्या भोंवती इतर शक्ति केंद्रित होतात. आणि राजा त्या शक्तींचें केंद्र होतो. ज्यावेळीं आपल्या चिन्हांनीं आणि संपूर्ण वैभवानें युक्त राजा रस्त्यानें जातो त्यावेळीं त्याचा प्रभाव सर्व जनतेवर पडतो. या सूक्ताच्या ४ थ्या मंत्रांत ' हा मणि शत्रुनाश करणारा, प्रभाव वाढविणारा, राष्ट्रहित साधन करणारा आहे ' इत्यादि म्हटलें आहे. त्याचा अर्थ वरील प्रकारें समजणें योग्य होईल. शिपायांत आपणांस या चिन्हामुळें शक्ति प्रतीत होते. ती शक्ति वास्तविक शक्ति नसून फक्त आपली भावना आहे. संपूर्ण राजचिन्हांची शक्ति सुद्धां अशीच भावनात्मक आहे. अस्तु. आतां शत्रुलक्षणें पाहूं—

शत्रूचीं लक्षणें

या सूक्तांत खालीं दिल्याप्रमाणें शत्रुलक्षणें सांगितलीं आहेत–

१. यः दुरस्यति– जो दुष्ट व्यवहार करतो. (मं. २)

२. सपत्नः– भिन्नपक्षाचा मनुष्य. राष्ट्रांत जितके पक्ष असतील तितके पक्षीय आपआपसांत अथवा एकमेकांशीं सपत्न होतील. सपत्न शब्द (Party politics) पक्षीय राजकारण दाखवितो.

३. अरातिः– अनुदार, जो मन उच्च ठेवीत नाहीं असा, क्षुद्र मनोवृत्तीचा.

४. पृतन्यत्– सैन्यासह चढाई करणारा.

या शब्दांच्या विचारानें शत्रु कोणता हा सहज बोध होतो. यांत कांहीं अंतस्थ व कांहीं बाहेरचे शत्रु आहेत.

सर्वांचें सहाय्य

तिसऱ्या मंत्रांत म्हटलें आहे कीं, ' सूर्य, चंद्र आणि सर्व भूतमात्रें ज्या राजास मदत करीत असतात, तो राजाच शत्रूचा पराजय करूं शकतो,' (मं. ३) यांतील सूर्य, चंद्र शब्द नैसर्गिक बाह्य सहाय्य (Nature's help) दर्शवितात. निसर्गाचें सहाय्य हें राज्याच्या शक्तीचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. राष्ट्राची रचनाच अशी असली पाहिजे कीं जेथें शत्रूस सुलभतेनें प्रवेश न मिळावा. ही सुद्धां एक शक्तीच आहे.

दुसरी शक्ति (**विश्वा भूतानि**) भूतमात्रांपासून प्राप्त होते. पंचमहाभूतांपासून शक्ति मिळवण्याची गोष्ट येथें सहज कळून येते. ' भूत ' शब्दाचा दुसरा अर्थ ' प्राणि, मनुष्य ' असाहि होतो. तो तर प्रसिद्धच आहे. ज्या राजास राष्ट्रांतील सर्व प्राणी आणि मनुष्यें सहायक होतात त्याची शक्ति विशेष असतें यांत शंकाच नाहीं. ही सर्व शक्ति जनतेच्या शुभेच्छेनेंच राजास प्राप्त होऊं शकते. म्हणून राजानें जनतेची शुभेच्छा प्राप्त करून घेतली पाहिजे. तिच्यावरच राजाचें ऐश्वर्य, यश, विजय फार काय राजाचें चिरस्थायित्व सुद्धां तिच्यावरच आधारित आहे.

वैदिक राज्यप्रकरणाचा या सूक्तांत चांगलाच उपदेश आहे, राजकारणाचा उत्तम निर्देश त्यांतून वाचकांस मिळूं शकतो.

केवळ राष्ट्रासाठीं

या सूक्तांत कित्येक सामान्य निर्देशसुद्धां आहेत त्यांचाहि विचार करणें आवश्यक आहे. त्यावरून विशिष्ट निर्देशाच्या आधारें सामान्य उपदेश सुद्धां कसे प्राप्त होतात तें कळतें.

अस्मान् राष्ट्राय अभिवर्धय (मं. १)

त्याचा अर्थ ' आम्हांस राष्ट्रासाठीं मोठें कर ' असा आहे. म्हणजे उन्नतीची मागणी वैयक्तिक, अथवा स्वार्थी नाहीं तर आमची उन्नति राष्ट्रहित साध्य करण्यासाठीं असावी, राष्ट्राच्या कामीं लागावी एवढ्यासाठीं उन्नति मागितली आहे. आमचें शरीर सुदृढ असावें. आम्हीं दीर्घायू व्हावें, आमचीं इन्द्रियें जास्त कार्यक्षम असावींत, आमचें मन मननशक्तीनें युक्त व्हावें, आमची बुद्धि ज्ञानपूर्ण व्हावी. आमचें आत्मिक बळ वाढावें, तसेंच आमच्या कौटुंबिक, सामाजिक आणि अन्य शक्ति वाढाव्यात. या सर्व शक्ति एवढ्यासाठीं वाढाव्यात की त्यांचा उपयोग आम्हांस राष्ट्राच्या अभ्युदयासाठीं व्हावा. शक्ति वाढवून वैयक्तिक सुख वाढावयास नको, किंवा अमुक एका विशिष्ट कुल अथवा जातीकडे सर्वाधिकार जावयास नकोत. तर या शक्तींच्या योगानें राष्ट्राची प्रगति साधून राष्ट्र वैभवास चढावें.

सामान्य अर्थ पहात असतां या मंत्राचा **' अस्मान् '** ' शब्द ' फार महत्त्वाचा आहे. त्याचा अर्थ ' आम्हां सर्वांस ' म्हणजे राष्ट्रहितासाठीं आम्हां सर्वांस एकत्रित आणून आमची वृद्धि करा. याचा स्पष्ट अर्थ असा आहे कीं कोणा एका व्यक्तीची वृद्धि अथवा विकास येथें अभिप्रेत नाहीं, परंतु सर्वांच्या शक्तीच्या विकासाची येथें आकांक्षा आहे. राष्ट्राच्या उन्नतीसाठीं प्रजाजनांच्या शक्तीचा विकास साधावा, तसेंच तो साधत असतां कोणत्याहि प्रकारें पक्षपात होऊं नये. म्हणजे कोणत्याहि विशेष जाती अथवा संघाच्या पक्षपाताला येथें जराहि अवसर नाहीं.

जे कांहीं मी करतों, तें राष्ट्रास समर्पित व्हावें हीच भावना प्रत्येकाची असावी.

राष्ट्राय मह्यं बध्यतां । सपत्नेभ्यः पराभुवे ॥
(मं. ४)

' मला राष्ट्रास बांधून टाका म्हणजे मी राष्ट्राच्या शत्रूंचा पराजय करीन. ' मी राष्ट्रांशी बद्ध असावें, माझा संबंध राष्ट्राशीं असा असावा कीं तो केव्हांहि तुटणार नाहीं. राष्ट्राचें आणि माझें हित एकच असावें. मीं राष्ट्रासाठींच जगावें. हा व्यापक अर्थ या मंत्रांत आहे. जो ज्याशीं बांधला जातो तो त्याच्या बरोबर रहातो. जर स्वराष्ट्राभिमानानें मनुष्य राष्ट्राशीं अशा प्रकारें निगडित झाला तर तो कधीं परत फिरणार नाहीं, अथवा त्या कर्तव्यांतून मुक्त होणार नाहीं. अशा प्रकारें मनुष्यें राष्ट्रहिताशीं निगडित व्हावींत आणि त्या परस्पर संबंधामुळें राष्ट्रांत अपूर्व शक्ति निर्माण व्हावी असा उपदेश वेदास अभीष्ट आहे.

प्रत्येक मनुष्य ' **अभिराष्ट्र** ' (मं. ६) व्हावा म्हणजे राष्ट्रहिताचें ध्येय प्रत्येकानें आपणांसमोर ठेवावें. तो मनुष्य कोठेंहि जावो, कांहींहि करो- त्याच्या नजरेसमोर निरंतर स्वराष्ट्राच्या अभ्युदयाचेच विचार असावेत. असे विचार ज्याच्या मनांत जागृत रहातात त्यासच वेदानें ' **अभिराष्ट्र** ' म्हटलें आहे. (**अभितः राष्ट्रं**) स्वतःच्या चारी बाजूस स्वतःचें राष्ट्र पसरलेलें आहे असें मानणारा, प्रत्येक अवस्थेंत स्वतःपुढें स्वतःचें राष्ट्र पहाणारा। जो असतो त्याचें हें नांव आहे.

' राष्ट्र ' चा अर्थ

वेदांतील राष्ट्र शब्द केवळ देश अथवा जनतावाचक नाहीं. जमिनीच्या एका विभागांत रहाणाऱ्या मनुष्यसमाजाचा बोध ' राष्ट्र ' शब्दानें वेदांत होत नाहीं. या प्रकारचीं राष्ट्रें पृथ्वीच्या पाठीवर अनेक असतील. परंतु वेद ज्याला राष्ट्र म्हणतात तशीं राष्ट्रें किती असतील तें पाहिलें पाहिजे. वेदांमध्यें राष्ट्र शब्द **(राजते तत् राष्ट्रं)** ' जें चमकतें तें राष्ट्र ' अशा अर्थानें वापरला आहे. जो मनुष्यसमुदाय स्वकर्मानीं मिळविलेल्या यशानें भूमंडळावर चमकत रहातो, अन्य सर्व लोकांच्या नजरा आपणाकडे आकर्षून घेतो, त्यासच वेदाच्या दृष्टीनें राष्ट्र संज्ञा आहे. अन्य मनुष्यसमुदाय राष्ट्र नव्हेत. असें राष्ट्र विस्तारानें लहान असो, अथवा मोठें असो. परंतु तें राष्ट्रच म्हटलें जातें. परंतु विस्तार महान् असून त्यांत यशाची चमक जराहि नसेल तर तें राष्ट्र नव्हे. वैदिकधर्मीयांनीं अशा प्रकारचें तेज स्वतःच्या परिश्रमानीं स्वतःच्या राष्ट्रांत उत्पन्न केलें पाहिजे. वाढविलें पाहिजे, तरच त्यांच्या राष्ट्रास वैदिकपद्धति अनुसार राष्ट्र म्हटलें जाईल. वेदांत राष्ट्र वर्धनाविषयीं अनेक सूक्तें आहेत आणि त्यांचा परस्पर निकट संबंधहि आहे. त्या सर्वांचा एकत्रित विचार आणि मनन व्हावें.

संरक्षक कर

कांड ३, सूक्त २९

(ऋषिः- उद्दालकः । देवता – शितिपाद् अविः, कामः, भूमिः)

यद्राजानो विभजन्त इष्टापूर्तस्य षोडशं यमस्यामी सभासदः ।
अविस्तस्मात्प्र मुञ्चति दत्तः शितिपात्स्वधा ॥ १ ॥

अर्थ— (यत्) ज्याप्रमाणें (**यमस्य अमी राजानः सभासदः**) नियमानें चालणाऱ्या राजाचें राज्य चालविणारे सभासद (**इष्टापूर्तस्य षोडशं विभजन्ते**) अन्नादिकांचा सोळावा भाग बाजूस ठेवतात तो (**दत्तः**) दिलेला भाग (**अविः**) रक्षक होऊन (**शिति-पात्**) हिंसकांस खालीं पाडणारा आणि (**स्व-धा**) स्वतःस धारण करणारा होऊन (**तस्मात् प्रमुञ्चति**) त्या भयातून सोडवतो. (१)

भावार्थ— नियमपूर्वक राज्य करणाऱ्या या राजाच्या राज्यसभेचे सभासद वस्तुतः खरे राजे आहेत. ते प्रजेपासून तिच्या अन्न वगैरे उत्पन्नाचा सोळावा भाग कर रूपानें घेतात. राजास दिलेल्या या सोळाव्या भागानें राज्याचें रक्षण होतें. प्रजेस त्रास देणारे जे दुष्ट असतात त्यांस दंड करून दाबून टाकण्यांत येतें. हा कर प्रजेची धारकशक्ति वाढवितो आणि तिला भयापासून मुक्त करतो.(१)

सर्वान्कामान्पूरयत्याभवन्प्रभवन्भवन् । आकूतिप्रोऽविर्दत्तः शितिपान्नोप दस्यति ॥ २ ॥
यो ददाति शितिपादमविं लोकेन संमितम् ।
स नाकमभ्यारोहति यत्र शुल्को न क्रियते अबलेन बलीयसे ॥ ३ ॥
पञ्चापूपं शितिपादमविं लोकेन संमितम् । प्रदातोप जीवति पितॄणां लोकेऽक्षितम् ॥ ४ ॥
पञ्चापूपं शितिपादमविं लोकेन संमितम् । प्रदातोप जीवति सूर्यामासयोरक्षितम् ॥ ५ ॥
इरेव नोप दस्यति समुद्र इव पयो महत् । देवौ सवासिनाविव शितिपान्नोप दस्यति ॥ ६ ॥

अर्थ— हा (दत्तः) दिलेला भाग (आकूति-प्रः) संकल्प पूर्ण करणारा (शिति-पात्) हिंसकांस खालीं पाडणारा आणि (अविः) संरक्षण करणारा, (आ-भवन्) पसरविणारा, (प्रभवन्) प्रभावशाली (भवन्) अस्तित्वाचें कारण असल्यानें (सर्वान् कामान् पूरयति) सर्व इच्छा पूर्ण करतो आणि (न उपदस्यति) विनाश करीत नाहीं. (२)

(यः लोकेन संमितं) जो सर्व लोकांकडून सन्मानित (शिति-पादं अविं ददाति) हिंसकांचा नाश करणारा संरक्षक भाग देतो. (सः नाकं अभ्येति) तो दुःखरहित स्थान प्राप्त करतो. (यत्र अबलेन बलीयसे शुल्कः न क्रियते) जेथें निर्बलांस बलवानाकरितां धन द्यावें लागत नाहीं. (३)

(पञ्च-अ-पूपं) पांच जणांस न सडविणारा त्यामुळें (लोकेन संमितं) जनतेनें संमति दिलेला (शिति-पादं अविं) हिंसकांचा नाश करणारा संरक्षक कर (प्रदाता) देणारा (पितॄणां लोके अक्षितं उपजीवति) पितृदेशांत-लोकांत-अक्षय्य जीवित रहातो. (४)

(पञ्च-अ-पूपं) पांच जणांस न सडविणारा त्यामुळें (लोकेन संमितं) लोकांनीं मान्य केलेला (शिति-पादं अविं) हिंसकांच्या नाशास सहाय्यभूत असा संरक्षक कर (प्रदाता) जो देतो तो (सूर्या- मासयो अक्षितं उपजीवति) सूर्य आणि चंद्राच्या सांनिध्यांत अक्षय जीवित राहतो. (५)

(इरा-इव) भूमिसमान तसेंच (महत् पयः समुद्र इव) महान् पाण्याच्या सांठ्या-महासागराप्रमाणें आणि (स-वासिनौ देवौ इव) एकत्र निवास करणाऱ्या प्राणरूप दोन देवांसमान (शिति-पात् न उपदस्यति) हिंसकांस दाबून टाकणारा हा कर-भाग विनाश करीत नाहीं. (६)

भावार्थ— हा दिलेला कर सर्व प्रजेच्या अभ्युदय संकल्पास पूर्ण करण्यास उपयोगी पडतो. तो दुष्टांचें दमन करतो, जे सज्जन आहेत त्यांचें पालन करतो, राष्ट्राचा विस्तार करतो, वीरांचा प्रभाव वाढवितो आणि जातींचें अस्तित्व स्थिर ठेवतो, पण कोणत्याहि प्रकारें प्रजेचा नाश करीत नाहीं. (२)

सर्व लोक राजास हा कर देणें पसंत करतात. जे लोक दुष्टांचा नाश करून सज्जनांचें रक्षण करण्यास मदत करणारा असा हा कर राजास देतात, ते सुखपूर्ण स्थान प्राप्त करतात, त्यानंतर त्यास्थानीं कोणी बलवान् निर्बलापासून जबरदस्तीनें धन घेणारा रहात नाहीं आणि कोणा निर्बल मनुष्यास केवळ स्वतःच्या निर्बलतेमुळें बलवानास धन अर्पण करावें लागत नाहीं. (३)

हा कर पंचजनांस (पांच प्रकारच्या लोकांस) डोईजड न होणारा, दुष्टांचें दमन करणारा, सत्पुरुषांचें पालन करणारा आहे, त्यामुळें सर्व जनता तो राजास खुषीनें अर्पण करते. जे लोक हा कर देतात ते नेहमीं संरक्षकांच्या रक्षणाखालीं सुखी रहातात. (४)

हा कर पंचजनांस त्रासदायक नाहीं, दुष्टांचें दमन करण्यास सहाय्य करणारा आणि सज्जनांचें रक्षण करणारा आहे. त्यामुळें जे हा कर देतात ते नेहमीं सूर्य-चंद्राच्या प्रकाशांत सुखानें रहातात. (५)

दुष्टांच्या दमनासाठीं दिलेला हा कर भूमीप्रमाणें आधार देणारा, समुद्रजलाप्रमाणें शांति देणारा आणि प्राणांप्रमाणें सर्वांचा रक्षक होतो आणि कोणाचा नाश करीत नाहीं. (६)

क इदं कस्मा अदात्कामः कामायादात् । कामो दाता कामः प्रतिग्रहीता कामः समुद्रमा विवेश ।
कामेन त्वा प्रति गृह्णामि कामैतत्ते ॥ ७ ॥
भूमिष्ट्वा प्रति गृह्णात्वन्तरिक्षमिदं महत् । माहं प्राणेन मात्मना मा प्रजया प्रतिगृह्य वि राधिषि ॥ ८ ॥

अर्थ—(कः इदं कस्मै अदात्) हा कोणी कोणास दिला ? (कामः कामाय अदात्) मनोरथानें मनोरथाला दिला. (कामः दाता) काम देणारा आणि (कामः प्रतिग्रहिता) कामच तो स्वीकारणारा, (कामः समुद्रं आविवेश) कामच समुद्रांत प्रवेश करतो, (कामेन त्वा प्रतिगृह्णामि) इच्छेनेंच तुझा स्वीकार करतो. हे काम ! (एतत् ते) हें सर्व तुझेंच आहे. (७)

(भूमिः) पृथ्वी आणि (इदं महत् अन्तरिक्षं) हें महान् अंतराळ, (त्वा प्रतिगृह्णातु) तुझा स्वीकार करो. (अहं प्रतिगृह्य) मीं तें प्राप्त करून (प्राणेन आत्मना प्रजया) प्राण, आत्मा आणि प्रजा यांपासून (मा मा मा विराधिषि) पृथक्-निराळें-न व्हावें. (८)

भावार्थ—हा कर कोण कोणास देतो ? काम कामास देतो. या जगांत मनाची इच्छा हीच देणारी आणि घेणारी आहे. ही कामना मनुष्यास जलपर्यटन करविते, या कामनेमुळें मनुष्य स्वतःच मोठमोठीं संकटें स्वतःवर ओढवून घेतो. जगाचा सर्व व्यवहार हा कामाचाच महिमा आहे. (७)

या पृथ्वीवर तसेंच अंतरिक्षांत कामनांचा संचार चालूच आहे. या कामाचा विस्तार करतां करतां मीं प्राण, आणि प्रजा यांपासून दूर न व्हावें. (८)

संरक्षक कर

राज्यशासन चालविण्यासाठीं कर

राजा राज्य चालवितो. या महत्त्वाच्या कार्यासाठीं प्रजा त्याला कर देते. करावें प्रमाण किती असलें पाहिजे ? म्हणजे प्रजेनें स्वतःच्या प्राप्तीचा केवढा भाग राजास द्यावयाचा आणि राजानें त्या कराच्या द्वारें प्राप्त धनाचा कोणत्या कामीं उपयोग करावयाचा त्यासंबंधीं हें सूक्त मोठें बोधप्रद आहे.

प्राप्तीचा सोळावा भाग

प्रजेच्या प्राप्तीचा सोळावा भाग राजास देण्यासाठीं राजसभेचे सभासद निराळा काढतात हें वर्णन पहिल्याच मंत्रांत आहे.

अमी सभासदः इष्टापूर्तस्य षोडशं विभजन्ते ॥ (मं. १)

राज्यसभेचे हे सभासद प्रजेच्या उत्पन्नाचा सोळावा भाग निराळा करतात ' आणि हा सोळावा भाग प्रजेपासून राजाला मिळतो. राजास राज्य चालविण्यासाठीं हा कर प्रजेनें द्यावा लागतो. शेतांत जें धान्य उत्पन्न होइ त्याचा सोळावा भाग ग्रामसभेचे अधिकारी घेत आणि त्याचा संग्रह करीत. जेवढें उत्पन्न होईल त्याचा फक्त सोळावा भागच घ्यावयाचा, कमी नाहीं जास्त नाहीं. म्हणजे सामान्य शेतकरीवर्गापासून हा कर धान्यरूपानें घ्यावयाचा. धान्य उत्पादन करणाराजवळून धनरूपानें कर घ्यावयाचा नाहीं, जी वस्तु उत्पादन होत असेल तिचा सोळावा भाग घ्यावयाचा. ज्या पदार्थाचे भाग होऊं शकणार नाहींत त्याच्या किंमतीचा सोळावा भाग आणि वैश्यादि व्यापाऱ्यांकडून, जे धन कमविणारे आहेत, त्यांच्याकडून त्यांच्या उत्पन्नाचा सोळावा हिस्सा धनरूपानें घेण्यांत येई. कर घेण्यासंबंधीं वेदाची आज्ञा अगदीं स्पष्ट आहे. हा कर कोणासही डोईजड होत नसे.

उत्पन्नाचा सोळावा भाग घेण्याची आज्ञा आहे. आणि स्मृतिग्रंथांत सहावा भाग घेण्यापर्यंत कर वाढविण्यांत आले, आणि आज तर किती तरी पटीनीं वाढले आहेत. या मंत्रांत '**विभजन्ते**' असा वर्तमानकाळीं प्रयोग आहे. राजसभेचे सभासद स्वतः हाजर राहून उत्पन्नाचा सोळावा भाग निराळा काढीत. म्हणजे शेतांत जाऊन धान्याच्या राशींतून सोळावा भाग काढून स्वतंत्र साठा करीत व त्यांतून राज्यशासन चाले. अंदाज करून घेत नसत तर प्रत्यक्ष प्राप्ति पाहून त्यांतून ठरल्याप्रमाणें सोळावा भाग घ्याव-

याचा. दुष्काळामुळें धान्य कमी पिकलें तर कर कमीच घ्यावयाचा सुबत्तेच्याकाळीं जास्त पिकलें तर जास्त घ्यावयाचा. आजच्या प्रमाणें सुबत्ता असो अथवा दुष्काळ असो, धान्य पिको न पिको, कर जितका घ्यावयाचा तितका घ्यावयाचाच. असें नव्हतें वैदिक काळच्या करांचें. हें वैशिष्ट्य ध्यानीं आणावें.

प्राप्तीचीं दोन साधनें

प्राप्तीचे दोन मार्ग आहेत. एक '**इष्ट**' आणि दुसरा '**पूर्त**' मनुष्य स्वतःच्या इच्छेनुसार अभीष्ट व्यवहार करतो आणि कमाई करतो तिला 'इष्ट' कमाई म्हणतात. त्यांत, उद्योग, धंदा, शिल्प वगैरेंचा समावेश होतो. त्यांत कर्त्याच्या इच्छेवर व्यवहार निर्भर आहे. दुसरा मार्ग आहे 'पूर्त' त्यांत धन्याची इच्छा असो, नसो, उत्पन्न येतच असावयाचें. ज्याप्रमाणें बागेंतून फुलें-फळें उत्पन्न होतात, शेतांतून धान्य मिळतें, पूर्वीच लावलेल्या झाडांतून फळें वगैरे मिळणें इ. पूर्वापर चालत असलेल्या व्यवस्थेमुळें जें उत्पन्न होतें त्यास पूर्त म्हटलें आहे. जमीनदार-जहागीरदारांचें उत्पन्न तें पूर्त, कारण जमीनदारानें स्वतः कांहीं प्रयत्न केले नाहींत तरी त्याचें भांडारगृह दरवर्षी भरतच असतें. इष्ट व्यवहाराचें तसें नाहीं. त्यांत इच्छापूर्वक कामधंदा, मेहनत मजुरी करावी लागते आणि सफळता मिळाली तर प्राप्ति व्हावयाची. ती प्राप्ति प्रयत्नसाध्य आहे. इष्ट आणि पूर्त या दोहोंत हा भेद आहे. मनुष्याच्या व्यवहाराचे हेच दोन मुख्य भेद आहेत.

हल्लीं 'इष्ट' चा अर्थ यज्ञयाग आणि 'पूर्त' चा अर्थ सार्वजनिक उपयोगासाठीं, विहीर, तलाव, कालवा, बांध, धर्मशाळा, दवाखाना करणें असें मानतात. वरील शब्दांचे हे अर्थ आहेत खरे पण तो अर्थाचा एक भाग झाला. त्या शब्दांचा संपूर्ण अर्थ केवळ तोच नाहीं. या सूक्तांत प्रजेच्या उत्पन्नाचा सोळावा भाग राजानें कररूपानें घ्यावा, असें सांगितलें आहे. तेथें यज्ञयागादिकांचा अथवा तलावविहिरींचा सोळावा भाग असा अर्थ करणें योग्य नाहीं. चारी वर्णांच्या व्यवहाराच्या दृष्टीनें होणारा आणि जेणें करून राजास सोळावा भाग कररूपानें मिळूं शकेल अशासाठीं आम्हीं वरप्रमाणें अर्थ केला आहे. जर यज्ञविषयक अर्थ घेतला तर प्रजेच्या सत्कृत्यांच्या पुण्याचा थोडा भाग राजाच्या यशसंवर्धनासाठीं त्याला मिळूं शकतो. पण त्यामुळें संपूर्ण राज्य चालविण्याचें कार्य होऊं शकणार नाहीं. म्हणून उत्पन्नाचा सोळावा भाग याचा आम्हीं केलेला अर्थच बरोबर आहे.

राजा कसा असावा ?

या सूक्तांत राजाचें नांव 'यम' असें आलें आहे. यमाचा अर्थ 'स्वतःवर ताबा ठेवणारा, नियमपूर्वक चालणारा, धर्माचें पालन करणारा,' असा होतो. 'यमधर्म' या शब्दांतसुद्धां यमाशीं धर्माचा संबंध स्पष्ट आहे. राज्य चालविण्याचे जे धर्मनियम आहेत त्याप्रमाणें राज्य करणारा राजा असा या शब्दांचा अर्थ येथें आहे. त्यामुळें हें स्पष्ट होतें कीं येथील राजा मनास येईल तसें वागणारा नाहीं. तर राज्यधर्माच्या नियमानुसार आणि जनतेच्या प्रतिनिधींच्या संमतीच्या अनुसार राज्य चालविणारा असा आहे. ह्या राजाचे अधिकार राजसभेच्या सभासदांच्या संमतीनें आणि धर्मनियमांनीं मर्यादित झालेले आहेत. त्यामुळें राजा स्वेच्छाचारी होऊं शकत नाहीं.

अमी सभासदः राजानः । (मं. १)

'राजसभेचे हे सभासदच राज्यशासन चालविणारे राजे आहेत' राजा तर नांवाचाच राजा अथवा राज्याचा अधिकारी. सभासदांच्या अनुमतीनें जी नीति निश्चित होईल त्याप्रमाणें राज्यशासन चालवणें हें त्याचें काम. वेदाची नियमबद्ध राजसत्ता ही अशी होती. या राजाच्या राज्यसभेचे सभासद प्रजेच्या उत्पन्नाचा सोळावा भाग राज्यशासनाच्या व्ययासाठीं प्रजेपासून कररूपानें घेतात. त्याचा उपयोग ते काय करीत तें आतां पाहूं. प्रजेपासून मिळणारा हा कर काय काय करतो त्याविषयीं या सूक्तांतील वर्णन मनोरंजक आहे. त्याचा विचार केल्यानें राजा या कराचा काय उपयोग करीत असे तें आपणांस समजेल. पहा-

कराचा उपयोग

राजा जनतेपासून जो कर घेत असे त्याचा व्यय कोणकोणत्या कार्यांत करीत असे त्याचें वर्णन खालीं लिहिलेल्या शब्दांच्या उपयोगानें या सूक्तांत केलें आहे. 'हा कर पुढें वर्णिलेलीं कार्ये करतो.' असें स्पष्ट वर्णन सूक्तांत आहे. या सूक्तांत, प्रजेकडून मिळालेला हा कर खालीं दिलेलीं कामें करतो असें म्हटलें आहे-

१. **अविः- (अवति इति अविः)**- रक्षण करतो. जनतेचें आणि राष्ट्राचें रक्षण करतो. प्रजेजवळून घेतलेला हा करच प्रजेचें रक्षण करतो. (मं. १,३,५)

२. **स्वधाः (स्वस्य धारणा)**- स्वतःचें म्हणजेच प्रजेचें धारण करतो. या करानें राष्ट्राची धारणाशक्ति वाढते. कर घेऊन राजा अशी व्यवस्था करी कीं त्यानें प्रजेचें सामर्थ्य वाढावें. (मं. १)

३. **पञ्चापूपः- (पञ्च+अ+पूपः-पूयते विशीयते इति पूपः, न पूपः अपूपः। पञ्चानां अपूपः पञ्चापूपः)**- जे वेगळे होतात, ज्यांचे भाग पडतात, किंवा पडूं शकतात त्यांना

' पूप ' म्हणतात. आणि ज्यांचे भाग एकदुसऱ्यांशीं असे संलग्न असतात कीं ते निराळे होऊं शकणार नाहींत, एकसंघटित असे त्यांस म्हणतात ते ' **अपूप** ' होय. पांच प्रकारच्या लोकांना संघटित–संघटनायुक्त हा कर करतो. म्हणजे परस्पर एकदुसऱ्याशी मिळून मिसळून ते लोक वागतात. त्यामुळें पांच प्रकारचे लोक ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि निषाद यांचा एक अभेद्य संघ निर्माण होतो. त्यांस पंचजन म्हटलें आहे. याप्रमाणें राजा कर घेतो आणि प्रजेची संघशक्ति वाढवितो. (मं. ४–५)

४. भवन्– होणें, अस्तित्व टिकविणें. प्रजेजवळून कर घेऊन त्याचा विनियोग राजानें अशाप्रकारें करावयाचा कीं त्यामुळें प्रजेचें अस्तित्व चिरकाल टिकून राहील. (मं. २)

५. आभवन्– धन, ऐश्वर्यसंपन्न होणें. राजानें कर-रूपानें मिळालेल्या संपत्तीचा असा उपयोग करावयाचा कीं ज्याच्यायोगें प्रजा प्रतिदिन अधिकाधिक संपत्तियुक्त होत जावी. (मं. २)

६. प्रभवन्– प्रजेपासून कर घेऊन त्याचा असा उपयोग करावयाचा कीं प्रजा प्रतिदिन, प्रभावशील, सत्वशील, पराक्रमी, व्हावी. (मं. २)

७. आकूतिप्रः– (आकूतिः) संकल्प (प्र) पूर्ण करणारा कर आहे. प्रजेपासून घेतलेला हा कर राजानें अशा कार्यांत वापरावा कीं त्याच्यायोगें प्रजेच्या मनःकामना परिपूर्ण व्हाव्यात त्यांस सिद्धि प्राप्त व्हावी. प्रजेची अखंड उन्नति होत रहावी. (मं. २)

८. सर्वान् कामन् पूरयाति– प्रजेच्या सर्व कामना सफल आणि सुफल होतात. कोणत्यांहि प्रकारें प्रजेच्या श्रेष्ठ आकांक्षा निष्फळ होत नाहींत. कर घेऊन राजा अशी व्यवस्था करतो कीं त्यामुळें प्रजेच्या श्रेष्ठ मनःकामना पूर्णपणें सिद्ध होतात अथवा सिद्धीस जातात. (मं. २)

९. यो......ददाति स नाकं अभ्येति–जे कर देतात ते (न+अ+क) सुखपूर्ण स्थान प्राप्त करतात म्हणजे राज्याचा कर देणारे लोक स्वतःच्या देशांत सुखी होतात. प्रजेपासून कर घेऊन राजा इतक्या सुव्यवस्थेनें राज्य चालवितो कीं त्यामुळें सर्व प्रजा सुखी होते. (मं. ३)

१०. प्रदाता पितृणां लोके अक्षितं उपजीवति– कर देणारे लोक संरक्षकांच्या योगानें सुरक्षित असलेल्या प्रदेशांत चिरकाल आनंदानें रहातात. राजानें प्रजेपासून कर घेऊन तिच्या संरक्षणाची व्यवस्था चांगल्या प्रकारें लावून द्यावी, आणि तिला सुरक्षित ठेवावें. सुराज्य झालें म्हणजे लोक सुरक्षित होऊन आनंदानें रहातात.

११. प्रदाता सूर्या-मासयोः अक्षितं उपजीवति– कर देणारे लोक, (सूर्य) दिवसा तसेंच (**मासः = चंद्रमाः**) रात्रींचें वेळींहि सुरक्षित होऊन आनंदानें रहातात. कर घेऊन राजानें राज्यांत अशी व्यवस्था लावून द्यावी कीं ज्यामुळें प्रजा दिवसा आणि रात्रीं सुद्धां सुरक्षित रहावी. (मं. ५)

१२. इरा इव न उपदस्यति– कर देणारी प्रजा पृथ्वी-प्रमाणें (ध्रुव) स्थिर होते म्हणजे त्या प्रजेचा कोणी नाश करूं शकत नाहींत. (मं. ६)

१३. महत् पयः समुद्रः इव न उपदस्यति– कर देणारी प्रजा खोल अशा महासागराप्रमाणें सदा गंभीर आणि प्रशांत रहाते. लहान ओढ्याप्रमाणें वाळून जाऊन नाश प्राप्त करून घेत नाहीं. (मं. ५)

१४. सवासिनौ देवौ इव न उपदस्यति– बरोबर (जोडीनें) रहाणाऱ्या श्वास आणि उच्छ्वास या दोन देवा-प्रमाणें हा कर प्रजेचें रक्षण करतो. म्हणजे ज्याप्रमाणें प्राण-वायूच्या गतीनें सर्व शरीर सुरक्षित रहातें त्याचप्रमाणें प्रजेपासून मिळणारा कर राष्ट्रास सुरक्षित करतो. (मं. ६)

१५. तस्मात् प्रमुञ्चाति– तो महाभयापासून मुक्त करतो. हा दिलेला कर प्रजेला महाभयांतून वांचवितो. (मं. १)

१६. शिति-पात् (शीयते इति शितिः हिंसनं शितिं पातयति)– ' शिति ' चा अर्थ आहे नाश. त्या नाशाचा जो पात म्हणजे पतन करतो. अर्थात् नाशापासून जो वांचवितो त्याला ' शिति–पात् ' म्हणतात. याप्रमाणें हा कर प्रजेचें विनाशा-पासून रक्षण करतो. (मं.१–६)

१७. अबलेन बलीयसे शुल्कः न क्रीयते– निर्बल मनुष्य स्वतःच्या निर्बलतेमुळें प्रबलास धन देत नाहीं म्हणजे हा कर निर्बल मनुष्याणें बलवान् लोकांच्या अत्याचारापासून पूर्ण-पणें रक्षण करतो. (मं. ३)

प्रजेपासून कर घेऊन राजानें एवढ्या गोष्टी केल्या पाहिजेत. येथें वर दिलेलीं सतरा वाक्यें या सूक्तांत फार महत्त्वाचीं आहेत. वाचकांनीं यावरून अधिक विचार करावा आणि राज्यशासनासंबंधी योग्य बोध घ्यावा. साधारण सूचना करण्यासाठीं पूर्वोक्त वाक्यांनीं होणारा बोध येथें पुनः संक्षेपतः देतों—

राजानें स्वतःच्या प्रजेपासून कर घ्यावा आणि त्याचा उपयोग (१) प्रजेचें योग्य रीतीनें रक्षण करण्यांत, (२) प्रजेच्या धारणा-शक्तीचें सामर्थ्य वाढविण्यांत, (३) ज्ञानी, शूर, व्यापारी, कारा-

गीर, आणि अन्य लोकांची संघशक्ति वाढविण्यांत आणि त्या सर्वांस सुसंघटित करण्यांत, (४) प्रजेस ऐश्वर्य संपन्न करण्याच्या कार्यांत, (५) प्रजेचें राष्ट्रीय तसेंच जातीय अस्तित्व सुरक्षित ठेवण्यांत, (६) प्रजेस प्रभावशाली करण्यांत, (७) सर्व राष्ट्रांत सर्व लोकांच्या सर्व आकांक्षा सफल होण्याचीं साधनें निर्माण करण्यांत, (८) सर्व लोकांच्या श्रेष्ठ कामनांची तृप्ति करणाऱ्या साधनांचा संग्रह करण्यांत, (९) राष्ट्रांतील दुःखें दूर करण्यांत, (१०) राष्ट्राच्या रक्षणासाठीं संरक्षक राजा नियुक्त करण्यास, (११) ज्या रीतीनें दिवसा माणसें सर्वत्र निर्भयपणें संचार करूं शकतात, तद्वत् रात्रीं सुद्धां निर्भयपणें त्यांनीं हिंडा-फिरावें अशी निर्भयता संपूर्ण राष्ट्रांत सदैव स्थिर राखण्याच्या कार्यांत, (१२-१४) जनतेस भूमीप्रमाणें स्थिर, जलनिधि महासागराप्रमाणें गंभीर आणि प्राणाप्रमाणें जीवनयुक्त करण्याच्या कार्यांत, (१५-१६) भय आणि विनाशापासून प्रजेस वांचविण्याच्या प्रयत्नांत, आणि (१७) बलवंतानें निर्बळावर अत्याचार करूं नये. अशी संपूर्ण व्यवस्था सर्व राज्यांत करण्यांत करावा.

प्रजेजवळून घेतलेल्या कराचा उपयोग वर सांगितलेल्या कार्यांत करावा, तें राजाचें कर्तव्य आहे. पूर्वीच्या वाक्यांनीं असाच अर्थ प्रकट होत आहे. वाचकांनीं विचार करून या वाक्यांनीं तसेंच या शब्दांनीं अधिक बोध प्राप्त करावा. जो राजा प्रजेपासून कर घेऊन त्याचा उपयोग अशा कामांत न करतां भिन्न प्रकारें स्वतः-च्या स्वार्थ साधण्याच्या कामीं करील, तो तें राज्य चालविण्यास अयोग्य गणला जाईल. या सूक्ताच्या द्वारें ही वेदाची घोषणा आहे असें समजावें.

स्वर्गासारखें राज्य

ज्या राज्यांत राजा प्रजेपासून कर घेऊन पूर्वोक्त रीतीनें प्रजेचें उत्तम रक्षण करतो तें राज्य स्वर्गासारखेंच समजावें आणि जेथें करापासून प्राप्त झालेल्या धनाचा उपयोग प्रजेचीं बंधनें वाढविण्यांत होतो, तें नरकासमान राज्य होय. स्वर्गराज्याचीं लक्षणें या सूक्तांत सांगितलीं आहेत तीं आतां पाहूं.

१. स नाकं अभ्येति ।

२. यत्र शुल्को न क्रियते अबलेन बलीयसे । (मं. ३)

(१) ' कर देणारीं माणसें स्वर्गधामास पोहोंचतात, (२) जेथें निर्बल माणसास बलवानास धन द्यावें लागत नाहीं. ' हीं स्वर्गासारख्या राज्याची लक्षणें आहेत. ज्या राज्यांत निर्बल मनुष्यास केवळ निर्बल असल्यामुळें बलवान् मनुष्यासमोर डोकें वाकवून स्वतःच्या जवळचें धन भेटरूपानें द्यावें लागत नाहीं तें स्वर्गधाम आहे. आणि ज्या राज्यांत बलवान् मनुष्य निर्बलावर पाहिजे तसे अत्याचार करतो आणि जेथें निर्बल मनुष्य केवळ तो निर्बल आहे, बलहीन आहे, म्हणून दबून जातो, आणि असा अत्याचार करणारास कोणी विचारत नाहीं तें राज्य नरक आहे. ' नरक ' (**नर-क**) या अर्थ ' हीन मनुष्य ' लहान मनुष्य, खालच्या श्रेणींतील मनुष्य असा आहे. ज्या राज्यांत हीन भावना असलेलीं मनुष्यें आहेत तें नरक राज्य आहे आणि जेथें श्रेष्ठ भावना असणारीं माणसें आहेत तें स्वर्गराज्य होय.

ब्राह्मणांचें ज्ञान, बल, क्षत्रियांची अधिकार शक्ति, वैश्यांची धनसंपत्ति, शूद्रांचें श्रम आणि कौशल्य बल आणि निषादांचें निव्वळ शारीरिक बल असतें. हे लोक जर स्वार्थी झाले तर या बलांनीं उत्पन्न होऊन इतरांवर ते अत्याचार करतील. असे अत्याचार कोणी कोणावर करूं नयेत, आणि सर्वांस धर्माच्या आश्रयानें मनुष्यत्व विषयक समान दर्जा प्राप्त व्हावा अशी राज्यव्यवस्था ठेवणें हें राजाचें परम, श्रेष्ठ कर्तव्य होय. ज्या राज्यांत अशी व्यवस्था आहे, आणि ज्या राज्यांत शासन-व्यवस्थेच्या आश्रयानें निर्बल मनुष्यहि बलवान् मनुष्याच्या अत्याचाराचा सामना करूं शकतो, स्वसंरक्षण करण्यासाठीं उभा राहूं शकतो आणि केवळ निर्बलतेमुळें दबून जात नाहीं, ती राज्य-शासनपद्धति वेदांच्या दृष्टीनें अत्यंत उत्तम आहे. त्यासच ' वैदिक सुराज्य ' म्हणतात.

कामनेचा प्रभाव

पूर्वी सांगितल्याप्रमाणें राज्यव्यवस्था करावी कीं नाहीं अथवा निरनिराळ्या वैदिक आज्ञाप्रमाणें मनुष्यांची सुधारणा करण्याचे प्रयत्न करावे कीं नाहींत, तो सर्व मनुष्याच्या, कामना, इच्छा, आकांक्षा, संकल्प इत्यादींचा खेळ आहे. मनुष्याच्या अंतःकरणांत जशी इच्छा होते तसा तो वागतो, तसेंच व्यवहार करतो, हें दर्शविण्यास ७ व्या आणि ८ व्या मंत्रांत उपदेश आहे. त्याचें सुरवातीचें प्रश्नोत्तर असें आहे तें पहा—

प्रश्न— **इदं कः कस्मै अदात् ?** — हें कोण कोणास देतो ?

उत्तर— **कामः कामाय अदात्**—कामच कामासाठीं देतो.

कामः दाता, कामः प्रतिग्रहीता— कामच देणारा आणि घेणारा आहे,

हा मंत्रभाग पुष्कळच महत्त्वपूर्ण उपदेश देणारा आहे. मनुष्याच्या मनांत ज्या इच्छा असतात, ज्या महत्त्वाकांक्षा, ज्या कामना असतात, त्याच मनुष्यास दाता बनवितात आणि त्याच दुसऱ्या माणसास त्याच्यापासून दान स्वीकारणारा बनवितात. राजा राज्य करतो, शिपाई युद्ध करतात, नोकर नोकरी करतो,

कोणी कोणांस कांहीं देतो, दुसरा तें स्वीकारतो, हे सर्व व्यवहार मनांतील इच्छेमुळें होतात. जणूं काय कामच हे सर्व व्यवहार लोकांकडून करवीत आहे-

कामः समुद्रं आविवेश । (मं. ७)

'कामानें समुद्रांत प्रवेश केला.' – म्हणजे समुद्रावर सुद्धां कामाचें राज्य आहे. भूमी सोडून जो मनुष्य जहाजांत बसून समुद्रपर्यटनास जातो तोसुद्धां कामाच्या प्रेरणेनेंच अथवा जर कोणी विमानानें आकाशांत उडून जात असेल तर तो सुद्धां कामाच्या प्रेरणेनेंच उडत आहे. याप्रमाणें या जगाचा सर्व व्यवहार कामनेच्या प्रेरणेनें चालत आहे. 'भूमि आणि अंतराळांत सुद्धां सर्वत्र काम म्हणजेच कामना, इच्छा, यांचें अधिराज्य आहे, (मं. ८) सर्व तिच्या आज्ञेनेंच फिरत आहेत. पहा-

काम ! एतत् ते । (म. ७)

'हे काम ! हें तुझेच महाराज्य आहे,' तुझाच अधिकार सर्वांवर चालत आहे. कामाचा स्वीकार करणारे कामी लोक ज्याप्रमाणें स्वतःच्या मनाच्या इच्छेनें प्रेरित होतात, त्याचप्रमाणें कामाचा त्याग करणारे विरक्त लोक सुद्धां त्या कामनेनेंच प्रवृत्त होतात. तात्पर्य कामाचें शासन सर्वांवर आहे.

कामाची मर्यादा

कामना ही वाईटच असें म्हटलें जातें. जर काम वर सांगितल्याप्रमाणें सर्वांवर अधिकार गाजवितो आणि भोगी तसेच त्यागी दोघेहि त्याच्या आधीन आहेत, तर कामाचा संयम कसा होऊं शकेल ? या प्रश्नाचें उत्तर ८ व्या मंत्रांत सांगितलें आहे. या मंत्रांत कामाचा स्वीकार कोठपावेतों करावा व त्याचा त्याग कोठून करावा या महत्त्वपूर्ण विषयाचें विवेचन केलें आहे. त्याविषयीं आतां पाहूं-

प्रति गृह्य अहं आत्मना मा विराधिषि ।
अहं प्राणेन मा विराधिषि ।
अहं प्रजया मा विराधिषि । (मं. ८)

'कामा ! तुझा स्वीकार करून मीं स्वतःची आत्मशक्ति गमवूं नये. मीं माझ्या प्राणशक्तीस क्षीण करूं नये आणि मी माझ्या प्राजाजनास सुद्धां हीन होऊं देऊं नये.' येथपर्यंत जितका काम स्वीकार्य आहे तितका तो मनुष्यांस लाभदायक होऊं शकतो. काम विषयाचा अत्याचार अथवा अविवेक प्रत्येक इंद्रियाच्या कार्यक्षेत्रांत होऊं शकतो. परंतु त्याचें विशेष कार्यक्षेत्र जननेंद्रियाशीं संबंधित आहे. या इंद्रियानें विशेष अतिरेक केल्यास आत्म्याचें बल कमी होतें. जीवनमर्यादा, तसेंच प्राणशक्ति क्षीण होते आणि संतान उत्पन्न करण्याची शक्ति सुद्धां न्यून होते. आणि असे कामी पुरुष जर संतानोत्पत्ति करतील (ती झालीच तर) ती क्षीण निर्बल, दीन अशी असेल. या प्रकारची उणीव अथवा हानि न व्हावी म्हणून कामनेचा संयम करणें आवश्यक आहे. संयमाची मर्यादा हा 'स्वतःच्या आत्म्याची, प्राणाची आणि प्रजननाची शक्ति क्षीण होणार नाहीं,' इतकी आहे. त्यापेक्षां जास्त कामाचा उपभोग करणें हानिकारक आहे.

या मंत्रांत सर्व इंद्रियांसंबंधीं कामाचा उपभोग करण्याची मर्यादा सांगितली आहे. जरी आम्हीं वर एकाच इंद्रियव्यवहारास ध्यानीं आणून लिहिलें तरी वाचकांनीं सर्व इंद्रियांच्या कार्यक्षेत्रांत ती मर्यादा स्वीकारावयाची आहे असें समजावें.

कामाचें हें साम्राज्य (आधिपत्य) सर्व विश्वांत आहे. आपणांस विशेषेंकरून मनुष्यप्राण्याविषयीं विचार करावयाचा आहे. या राज्यशासनविषयक सूक्तांत कामविषयक मंत्र देऊन त्यांत कामाची धर्ममर्यादा आणि अधर्म मर्यादाहि सांगितली आहे; त्याचा हेतु असा की राजानें स्वतःच्या राज्यांत असा बंदोबस्त करावा कीं प्रजाजन कामाविषयीं धर्माची मर्यादा ओलांडणार नाहींत आणि आत्मा, प्राण आणि प्रजननशक्तीनें युक्त होऊन सर्वच उत्तम शांतीनें स्वर्गतुल्य राज्याचा आनंद प्राप्त करून घेतील. प्रजेजवळून घेतलेला कर या कार्यासाठीं राजानें खर्चावयाचा आहे. तें राजाचें कर्तव्यच आहे. करानें हीं कार्यें होतात आणि प्रजा सुखी होते. त्यामुळेंच (**लोकेन संमितं** मं. ४-५) 'प्रजेनें स्वीकारलेला आणि सन्मानित कर' अशी विशेषणें त्याला लाविली आहेत.

जेथें प्रजेपासून घेतलेल्या कराचा उपयोग अशा कार्मी होतो तेथील प्रजा सुखी आणि अभ्युदय आणि निःश्रेयस् प्राप्त करून घेणारी असते. वैदिक धर्मीयांनीं अशी व्यवस्था करावी कीं ज्यामुळें स्वतःच्या देशांत आणि इतर देशांतहि या प्रकारच्या आदर्श पद्धतीनें चालणारें आणि चालविलें जाणारें राज्य होईल आणि कोणत्याहि राष्ट्रानें वैदिक आदर्शापासून दूर राहूं नये.

दुष्टांचा नाश

कांड ८, सूक्त ३

(ऋषिः– चातनः । देवता – अग्निः)

रक्षोहणं वाजिनमा जिघर्मि मित्रं प्रथिष्ठमुप यामि शर्म ।
शिशानो अग्निः क्रतुभिः समिद्धः स नो दिवा स रिषः पातु नक्तम् ॥ १ ॥
अयोदंष्ट्रो अर्चिषा यातुधानानुप स्पृश जातवेदः समिद्धः ।
आ जिह्वया मूरदेवान्रभस्व क्रव्यादो वृष्ट्वापि धत्स्वासन् ॥ २ ॥
उभोभयाविन्नुप धेहि दंष्ट्रौ हिंस्रः शिशानोऽवरं परं च ।
उतान्तरिक्षे परि याह्यग्ने जम्भैः सं धेह्यभि यातुधानान् ॥ ३ ॥
अग्ने त्वचं यातुधानस्य भिन्धि हिंस्राशनिर्हरसा हन्त्वेनम् ।
प्र पर्वाणि जातवेदः शृणीहि क्रव्यात्क्रविष्णुर्वि चिनोत्वेनम् ॥ ४ ॥

अर्थ— (रक्षो-हणं वाजिनं प्रथिष्ठं मित्रं आ जिघर्मि) राक्षसांचा नाश करणाऱ्या बलवान् प्रसिद्ध मित्रास मी प्रकाशित करतों. आणि त्यामुळें (शर्म उपयामि) सुख प्राप्त करून घेतों. (सः क्रतुभिः समिद्धः) तो यज्ञानीं प्रदीप्त झालेला, (शिशानः अग्निः) तीक्ष्ण अग्नि (सः नः दिवा नक्तं रिषः पातुः) आम्हांस रात्रंदिवस शत्रूपासून सुरक्षित ठेवो. (१)

हे (जातवेदाः) जातवेद अग्नि ! (समिद्धः अयोदंष्ट्रः) प्रदीप्त होऊन, लोखंडाच्या दाढांनीं युक्त होऊन (अर्चिषा यातु-धानान् उपस्पृश) स्वतःच्या प्रकाशानें यातना देणाऱ्यांस जाळ, तसेंच (मूरदेवान् जिह्वया आरभस्व) मूर्ख लोकांस तुझ्या ज्वालारूपी जिह्वांनीं सरळ करण्यास आरंभ कर. (वृष्ट्वा) बलयुक्त होऊन (क्रव्यादः आसनि अपिधत्स्व) मांस खाणाऱ्या हिंसकांस तूं स्वतःच्या तोंडांत ठेऊन दे. (२)

हे (उभयाविन् अग्ने) दोघांस जाणणाऱ्या अग्ने ! तूं (हिंस्रः शिशानः) शत्रूंची हिंसा करणारा तीक्ष्ण होऊन (अवरं परं च उभौ) आमच्यापेक्षां निकृष्ट आणि उत्कृष्ट अशा दोनहि प्रकारच्या शत्रूंस तुझ्या (दंष्ट्रौ उपधेहि) दाढांत ठेव. (उत अन्तरिक्षे परियाहि) आणि अंतरिक्षांत तूं संचार कर आणि तेथून (जम्भैः यातु-धानान् अभि-संधेहि) तुझ्या जबड्यांनीं यातना देणाऱ्या शत्रूंवर हल्ला कर. (३)

हे अग्ने ! (यातुधानस्य त्वचं भिन्धि) कष्ट देणाऱ्याच्या त्वचेला छिन्नभिन्न कर, (हिंस्र-अशनिः हरसा एनं हन्तु) हिंसक विद्युत्वेगानें त्याचा नाश करो. हे (जातवेदः) जातवेद ! शत्रूच्या (पर्वाणि शृणीहि) पेरांना कापून टाक, (क्रविष्णुः क्रव्यात् एनं विचिनोतु) मांसभक्षक क्रूर प्राणी या दुष्टांना पकडून खाऊन टाकोत. (४)

भावार्थ— दुष्टांचा नाश करणारा, बलवान्, प्रसिद्ध हितकर्ता सदा प्रशंसनीय आहे. त्याच्यापासून सुख प्राप्त होतें. तो उत्तम प्रशस्त कर्म करणारा, तीक्ष्ण अथवा उग्र प्रयत्नपूर्वक आम्हांस रात्रंदिवस शत्रूपासून वांचवो. (१)

ज्ञानी स्वतःच्या तेजानें शत्रूंना निर्बल करतो, मूर्खांस स्वतःच्या उपदेशानें सुधारतो, मांसभक्षक क्रूरांना स्वतःच्या तोंडानें आच्छादित करतो, म्हणजे त्यांस त्यांच्या क्रूरतेपासून सोडवितो. (२)

दोघांस जाणणारा देव बलवान् आणि निर्बल हिंसकांना स्वतःच्या आधीन करून ठेवतो. सर्व ठिकाणी, संचार करून कष्ट देणाऱ्या दुष्टांना तो दाबून टाको. (३)

दुष्टांस मारून त्यांच्या चामड्यांस छिन्नभिन्न कर. विजेच्या आघातानें दुष्टांचा नाश होवो. दुष्टांच्या पेरांस कापा. मांसभक्षक हिंसक आणि क्रूरांस धरून धरून त्यांचा नाश करा. (४)

यत्रेदानीं पश्यसि जातवेदस्तिष्ठन्तमग्न उत वा चरन्तम् ।
उतान्तरिक्षे पतन्तं यातुधानं तमस्ता विध्य शर्वा शिशानः ॥ ५ ॥
यज्ञैरिषूः संनममानो अग्ने वाचा शल्याँ अशनिभिर्दिहानः ।
ताभिर्विध्य हृदये यातुधानान्प्रतीचो बाहून्प्रति भङ्ग्ध्येषाम् ॥ ६ ॥
उतारब्धान्स्पृणुहि जातवेद उतारेभाणाँ ऋष्टिभिर्यातुधानान् ।
अग्ने पूर्वो नि जहि शोशुचान आमादः क्ष्विङ्कास्तमदन्त्वेनीः ॥ ७ ॥
इह प्र ब्रूहि यतमः सो अग्ने यातुधानो य इदं कृणोति ।
तमा रभस्व समिधा यविष्ठ नृचक्षसश्चक्षुषे रन्धयैनम् ॥ ८ ॥
तीक्ष्णेनाग्ने चक्षुषा रक्ष यज्ञं प्राञ्चं वसुभ्यः प्र णय प्रचेतः ।
हिंस्रं रक्षांस्यभि शोशुचानं मा त्वा दभन्यातुधाना नृचक्षः ॥ ९ ॥

अर्थ— हे (जातवेदः) ज्ञानी अग्नि ! तूं (यत्र इदानीं) आतां जेथें जेथें (तिष्ठन्तं चरन्तं उत अन्तरिक्षे पतन्तं यातुधानं पश्यसि) उभा राहिलेल्या, भ्रमण करणाऱ्या आणि अंतरिक्षांत संचार करणाऱ्या, यातना देणाऱ्या दुष्टाला पहाशील, तेथें (शिशानः अस्ता शर्वा) तीक्ष्ण शस्त्र फेंकणारा शत्रुहिंसक तूं (तं विध्य) त्या शत्रूचा वेध कर. (५)

हे अग्नि ! (यज्ञैः) सत्कर्मानें पुढें जाणारा तूं (इषूः संनममानः) स्वतःच्या बाणांस सज्ज करून (वाचा) वाणीनें उपदेश करीत (शल्यान् अशनीभिः दिहानः) बाणाग्रांस विजेनें तीक्ष्ण करीत, (ताभिः प्रतीचः यातुधानान् हृदये विध्य) त्यांनीं शत्रूंचा सामना करून त्या दुष्टांच्या हृदयावर प्रहार कर, (एषां बाहून् प्रति भङ्ग्धि) त्यांचे बाहू तोडून टाक. (६)

हे जातवेदा ! (उत आरब्धान् उत आरेभाणान्) सत्कार्याचा आरंभ करणाऱ्या आणि आरंभ केलेल्या लोकांस (ऋष्टिभिः स्पृणुहि) शस्त्रांनीं सुरक्षित कर. हे अग्नि ! (यातुधानान् पूर्वः शोशुचानः निजहि) सर्वप्रथम प्रकाशित होऊन दुष्टांचा नाश कर. (आमादः एनीः क्ष्विंकाः एनं अदन्तु) मांस खाणारे लाल पक्षी त्यांस खाऊन टाकोत. (७)

हे अग्नि ! (यः यातुधानः इदं कृणोति) जो दुष्ट हें दुष्ट कार्य करतो, (यतमः सः इह प्रब्रूहि) तो कोण आहे तें येथें सांग. (तं आरभस्व) त्यास शिक्षा करण्यास सुरवात कर, (तं समिधा आरभस्व) त्यास लांकडांनीं जाळून टाकण्यास सुरवात कर. (नृचक्षसः चक्षुषे एनं रन्धय) मनुष्यांच्या हिताच्या दृष्टीनें या दुष्टांचा नाश कर. (८)

हे अग्नि ! (तीक्ष्णेन चक्षुषा प्राञ्चं यज्ञं रक्ष) तूं तुझ्या तीक्ष्ण डोळ्यांनीं श्रेष्ठ यज्ञाचें रक्षण कर. हे (प्र-चेतः) ज्ञानी ! तूं (वसुभ्यः प्रणय) वसूंसाठीं त्यांना घेऊन जा ! (नृ-चक्षः) लोकांचे निरीक्षक (हिंस्रं रक्षांसि अभि-शोशुचानं) हिंसकांस आणि राक्षसांस त्रास देतां देतां (त्वा) तुला (यातुधाना मा दभन्) यातना देणारे दाबून न टाकोत. (९)

भावार्थ— जेथें यातना देणारे दुष्ट हिंसक असतील त्यांस तेथें दाबून टाकण्यांत यावें. (५)

सत्कर्मानें वृद्धि करण्यासाठीं स्वतःची शस्त्रास्त्रें सज्ज ठेवा. वाणीनें उत्तम उपदेश करा. तुमच्या शस्त्रांस विजेप्रमाणें तीक्ष्ण बनवा आणि त्यांनीं शत्रुहृदयाचा वेध करा, तसेंच त्यांच्या बाहूंचे छेदन करा. (६)

शुभ कर्में करणारांचें रक्षण स्वतःच्या शस्त्रांनीं करा. दुष्टांचा नाश करा. मांस खाणारे पक्षी दुष्टांचें मांस खावोत. (७)

जे दुष्ट आहेत त्यांचा दुष्टपणा येथें सांगा. त्यांस दंड करा. जनतेचें हित करण्याच्या दृष्टीनें त्यांचा नाश करा. (८)

तुझ्या दृष्टीनें-शक्तीनें-सत्कर्माचें संरक्षण कर आणि निवासकांकडे त्यांना घेऊन जा. हिंसकांस तुझ्या तेजानें दूर कर आणि अशा प्रकारें रहा कीं दुष्ट तुला दाबून न टाकोत. (९)

नृचक्षा रक्षः परि पश्य विक्षु तस्य त्रीणि प्रति शृणीह्यग्रा ।
तस्याग्ने पृष्टीर्हरसा शृणीहि त्रेधा मूलं यातुधानस्य वृश्च ॥ १० ॥
त्रिर्यातुधानः प्रसितिं त एत्वृतं यो अग्ने अनृतेन हन्ति ।
तमर्चिषा स्फूर्जयञ्जातवेदः समक्षमेनं गृणते नि युङ्ग्धि ॥ ११ ॥
यदग्ने अद्य मिथुना शपातो यद्वाचस्तृष्टं जनयन्त रेभाः ।
मन्योर्मनसः शरव्या३ जायते या तया विध्य हृदये यातुधानान् ॥ १२ ॥
परा शृणीहि तपसा यातुधानान्पराग्ने रक्षो हरसा शृणीहि ।
परार्चिषा मूरदेवाञ्छृणीहि परासुतृपः शोशुचतः शृणीहि ॥ १३ ॥
पराद्य देवा वृजिनं शृणन्तु प्रत्यगेनं शपथा यन्तु सृष्टाः ।
वाचास्तेनं शरव ऋच्छन्तु मर्मन्विश्वस्यैतु प्रसितिं यातुधानः ॥ १४ ॥

अर्थ— हे अग्नि ! तूं (नृ-चक्षाः विक्षु रक्षः परिपश्य) मनुष्यांचें रक्षण करता करता सर्व दिशांत राक्षसांना पहा. (तस्य त्रीणि अग्रा प्रति शृणीहि) त्यांच्या तीनहि अग्रभागांना बळानें तोड, (तस्य पृष्टी हरसा शृणीहि) त्याच्या पांठळ्या आपल्या बळानें तोड, (यातुधानस्य मूलं त्रेधा वृश्च) यातना देणाऱ्यांचीं मुळें तीन प्रकारें कापून टाक. (१०)

हे अग्नि ! (यः अनृतेन ऋतं हन्ति) जे असत्यानें सत्याचा नाश करतात, ते (यातुधानः ते प्रसितिं त्रिः एतु) दुष्ट तुझ्या बंधनांत तीन प्रकारें बांधले जावोत. हे जातवेदा ! (तं अर्चिषा स्फूर्जयन्) त्यास स्वतःच्या प्रकाशानें प्रभावित करीत तूं (एनं समक्षं गृणते नि युङ्ग्धि) त्यास तुझ्यासमक्ष ईश्वराची स्तुति करणाऱ्यांच्या हितासाठीं प्रतिबंधांत ठेव. (११)

हे अग्नि ! (यत् अद्य मिथुना शपातः) आज जे एकमेकांस शाप देतात, (यत् रेभाः वाचः तृष्टं जनयन्त) जे आक्रोश करून वाणीची कठोरता प्रकट करतात. (या मन्योः मनसः शरव्या जायते) जे क्रोधी मनानें बाणरूप होतात (तया यातुधानान् हृदये विध्य) त्या पीडा देणाऱ्यांस हृदयांत वेध. (१२)

(यातुधानान् तपसा परा शृणीहि) यातना देणाऱ्यांस तुझ्या तपानें दूर सारून त्यांचा नाश कर आणि हे अग्नि ! (हरसा रक्षः परा शृणीहि) तुझ्या बळानें त्यांस दूर करून त्यांचा नाश कर. (मूरदेवान् अर्चिषा परा शृणीहि) मूढ लोकांस तुझ्या तेजानें दूर करून त्यांचा नाश कर, तसेंच (असुतृपः शोशुचतः पराशृणीहि) दुसऱ्यांच्या प्राणांनीं तृप्त होणाऱ्या, शोक करणाऱ्या दुष्टांचा हि तूं नाश कर. (१३)

(देवाः अद्य वृजिनं परा शृणन्तु) देव आज पाप करणाऱ्या पाप्यांस दूर करोत. (सृष्टाः शपथाः एनं प्रत्यक् यन्तु) त्यानें दिलेल्या शिव्या त्याच्याकडेच परत जावोत. (वाचा स्तेनं शरवः मर्मन् ऋच्छन्तु) शस्त्र वाणीच्या चोरांस मर्मस्थानीं कापो. (यातुधानः विश्वस्य प्रसितिं एतु) यातना देणारे दुष्ट सर्वांच्या बंधनांत बांधले जावोत. (१४)

भावार्थ— जनतेचें रक्षण करण्यासाठीं तूं सर्व दिशांतून दुष्टांस शोधून काढ. आणि त्यांचें तीन प्रकारचे प्रयत्न अटकवून टाक. दुष्टांची पाठ मोडून टाक आणि त्यांस मुळांतून उखडून फेंकून दे. (१०)

जे असत्यानें सत्यास दबवितात त्या दुष्टांस बंधनांत टाक, तुझ्या तेजानें त्यांना निःसत्त्व कर आणि ईश्वरभक्तासमोर येण्यास त्यांस अडथळा कर. (११)

जे दुष्ट परस्परांस शाप देतात आणि आक्रोश करून कठोर बोलतात, त्यांच्या मनांत दुष्ट भावनांमुळें जे घातक परिणाम होतात त्यामुळें त्या दुष्टांची हृदयें जळून जावोत. (१२)

जे दुष्ट लोकांस कष्ट देतात त्यांस तुझ्या तप, बळ आणि तेजानें दूर कर आणि त्यांचा नाश कर. मूर्खांची उपासना करणाऱ्यांसहि दूर कर. जे दुसऱ्याचे प्राण घेऊन तृप्त होतात त्यांस रडवून दूर कर. (१३)

यः पौरुषेयेण क्रविषा समङ्क्ते यो अश्व्येन पशुना यातुधानः ।
यो अघ्न्याया भरति क्षीरमग्ने तेषां शीर्षाणि हरसापि वृश्च ॥ १५ ॥
विषं गवां यातुधाना भरन्तामा वृश्चन्तामदितये दुरेवाः ।
परैणान्देवः सविता ददातु परा भागमोषधीनां जयन्ताम् ॥ १६ ॥
संवत्सरीणं पय उस्रियायास्तस्य माशीद्यातुधानो नृचक्षः ।
पीयूषमग्ने यतमस्तितृप्सात्तं प्रत्यञ्चमर्चिषा विध्य मर्मणि ॥ १७ ॥
सनादग्ने मृणसि यातुधानान्न त्वा रक्षांसि पृतनासु जिग्युः ।
सहमूरानन्नु दह क्रव्यादो मा ते हेत्या मुक्षत दैव्यायाः ॥ १८ ॥

अर्थ— (यः पौरुषेयेण क्रविषा समंक्ते) जो मनुष्याच्या मांसानें स्वतःला पुष्ट करतो, (यः यातुधानः अश्व्येन पशुना) आणि जे दुष्ट अश्व इत्यादि पशूंच्या मांसानें स्वतःला पुष्ट करतात, हे अग्नि ! (यः अघ्न्यायाः क्षीरं भरति) जे गायींचें दूध चोरून घेऊन जातात. (तेषां शीर्षाणि हरसा अपि वृश्च) त्यांची डोकीं तुझ्या शक्तीनें तोडून टाक. (१५)

(यातुधानाः गवां विषं भरन्ताम्) जे दुष्ट गायींना विष देतात, आणि (दुरेवाः अदितये आवृश्चन्तां) जे दुष्ट गायींस कापतात (सविता देवः एनान् परा ददातु) सविता देव त्यांस दूर करो. (ओषधीनां भागं परा जयन्तां) त्यांस औषधींचा भाग सुद्धां देण्यांत येऊं नये. (१६)

हे (नृ-चक्षः) मनुष्यांच्या निरीक्षका ! (उस्रियायाः संवत्सरीणं पयः) गायींचें एका वर्षांत मिळणारें जें दूध आहे, (तस्य यातुधानः मा आशीत्) तें यातना देणारे दुष्ट न पिवोत, हे अग्नि ! (यतमः पीयूषं तितृप्सात्) त्यांच्यांतील जे दुष्ट तें दूधरूपी अमृत पिऊन जातील (तं प्रत्यञ्चं अर्चिषा मर्माणि विध्य) त्यांना सर्वांसमक्ष तुझ्या तेजानें मर्मस्थानीं वेधून टाक (१७)

हे अग्नि ! तूं (यातुधानान् सनात् मृणासि) यातना देणाऱ्या दुष्टांचा नेहमीं नाश करतोस. (रक्षांसि त्वा पृतनासु न जिग्युः) राक्षस तुला युद्धांत जिंकू शकत नाहींत. (सहमूरान् क्रव्यादः अनुदह) मूर्खांसह मांसभक्षकांना जाळून टाक (ते दैव्यायाः हेत्याः) ते तुझ्या दिव्य शस्त्रास्त्रांनीं (मा मुक्षत) मुक्त न व्हावेत. (१८)

भावार्थ— पापी मनुष्यांस आणि पापांस दूर करण्यांत यावें. शिव्या देणाऱ्या पाप्यांकडेच त्यांच्या शिव्या परत जावोत. वाणीची चोरी करणाराची मर्मस्थानें शस्त्रांनीं जखमी होवोत आणि जनतेस यातना देणाऱ्या दुष्टांस प्रतिबंधांत ठेवा. (१४)

मनुष्य, घोडे वगैरेंचें मांस खाऊन जे स्वतःचें शरीर पुष्ट करतात. आणि गायींचें दूध चोरून पितात त्यांचीं मस्तकें कापून टाका. (१५)

जो दुष्ट मनुष्य गायींस विष देतो, गायींस कापतो, त्यांस समाजांतून दूर करण्यांत यावें. आणि त्यास धान्यादिकांचे भागही देण्यांत येऊं नयेत. (१६)

हे मनुष्यांचें हित करणारे हो ! गायींचें दूध दुष्ट मनुष्य न पिवो. जो दुष्ट चोरी करून पिईल त्यास शारीरिक दंड देण्यांत यावा. (१७)

तूं नेहमीं दुष्टांचा नाश करतोस, तुला राक्षस हरवूं शकत नाहींत, तूं मांसभक्षक क्रूर लोकांस जाळून टाक. ते दुष्ट तुझ्या पाशांतून सुटून न जावोत. (१८)

त्वं नो अग्ने अधरादुदक्तस्त्वं पश्चादुत रक्षा पुरस्तात् ।
प्रति त्ये ते अजरासस्तपिष्ठा अघशंसं शोशुचतो दहन्तु ॥ १९ ॥
पश्चात्पुरस्तादधरादुतोत्तरात्कविः काव्येन परि पाह्यग्ने ।
सखा सखायमजरो जरिम्णे अग्ने मर्ताँ अमर्त्यस्त्वं नः ॥ २० ॥
तदग्ने चक्षुः प्रति धेहि रेभे शफारुजो येन पश्यसि यातुधानान् ।
अथर्ववज्ज्योतिषा दैव्येन सत्यं धूर्वन्तमचितं न्योष ॥ २१ ॥
परि त्वाग्ने पुरं वयं विप्रं सहस्य धीमहि । धृषद्वर्णं दिवेदिवे हन्तारं भङ्गुरावतः ॥ २२ ॥
विषेण भङ्गुरावतः प्रति ष्म रक्षसो जहि । अग्ने तिग्मेन शोचिषा तपुरग्राभिरर्चिभिः ॥ २३ ॥

अर्थ— हे अग्नि ! (त्वं नः अधरात् उदक्तः पश्चात् उत पुरस्तात् रक्ष) तूं आमचें वर, खालीं, पाठीमागें, पुढें असें सर्व बाजूंनीं रक्षण कर. (ते त्ये शोशुचतः अजरासः तपिष्ठाः) ते सर्व तेजस्वी अक्षीण होऊन तापदायक (अघशंसं प्रति दहन्तु) पाप्यांस जाळून टाकोत. (१९)

हे अग्नि ! तूं (कविः काव्येन) कवि आहेस म्हणून तुझ्या काव्यांनीं (पश्चात् पुरस्तात् अधरात् उत उत्तरात् परिपाहि) पाठीमागून पुढून, वरून, खालून सर्व बाजूनीं रक्षण कर. (त्वं सखा सखायं) तूं मित्र आहेस म्हणून माझ्यासारख्या मित्राचें (अजरः जरिम्णे) तूं जरारहित आहेस म्हणून माझ्या सारख्या जराग्रस्ताचें (अमरः मर्त्यान् नः परिपाहि) तूं अमर आहेस म्हणून आमच्या सारख्या मरणाऱ्यांचें रक्षण कर. (२०)

हे अग्नि ! (येन शफा-रुजः यातुधानान् पश्यसि) ज्यामुळें तूं लाथांनीं ठोकर मारणाऱ्या दुष्टांचें निरीक्षण करतोस, (तत् चक्षुः रेभे प्रतिधेहि) ती तुझी दृष्टि ओरडणाऱ्या आणि गडबड गोंधळ करणाऱ्यांवर ठेव. (अथर्व-वत् दैव्येन ज्योतिषा) अहिंसक दिव्य तेजानें (सत्यं अचितं धूर्वन्तं) सत्यनाश करणाऱ्यांस (नि ओष) जाळून टाक. (२१)

हे अग्नि ! हे (सहस्य) बलवान् ! (वयं) आम्हीं सर्व (विप्रं पुरं) ज्ञानी आणि पूर्णता करणाऱ्या (धृषद्वर्णं) धर्षण करणाऱ्या आणि (भंगुरावतः हन्तारं) विनाशकांचा नाश करणाऱ्या (त्वा दिवे दिवे परिधीमहि) तुझें प्रतिदिवशीं ध्यान करीत आहोंत. (२२)

हे अग्नि ! (तिग्मेन शोचिषा) तीक्ष्ण तेजानें युक्त (तपुः अग्राभिः अर्चिभिः) तापविणाऱ्या तेजाच्या प्रकाशानें (विषेण भंगुरावतः रक्षसः प्रति जहि स्म) विषानें नाश करणाऱ्या राक्षसांचा नाश कर. (२३)

भावार्थ— तूं सर्व बाजूंनीं आमचें रक्षण कर. तेजस्वी लोक पाप्यांस दंड करोत. (१९)

तूं कवि, मित्र, जरारहित आणि अमर आहेस म्हणून तूं आमचें रक्षण कर. आम्हीं तुझे मित्र होऊं इच्छितों, आम्हीं जराग्रस्त आणि मृत्यूनें त्रस्त आहोंत, तूं आमचें साहाय्य कर. (२०)

जे दुष्ट लाथा मारून आमचें शरीर चेंचून टाकतात आणि जे आमच्या विरुद्ध कोल्हाहल करतात, त्यांस तूं पहा. तूं तुझ्या तेजानें आमचा नाश करणाऱ्यांचा नाश कर. (२१)

ज्ञानी, मनःकामना पूर्ण करणाऱ्या शत्रूचें धर्षण करणाऱ्या, दुष्टांचा नाश करणाऱ्या तुझ्यासारख्या बलवान् देवाचें आम्हीं सर्व प्रतिदिवशीं ध्यान करीत आहोंत. (२२)

विष देऊन जगतात नाश करणाऱ्या दुष्टांना तूं आपल्या तीक्ष्ण आणि उग्र तेजानें नाश कर. (२३)

वि ज्योतिषा बृहता भात्यग्निराविर्विश्वानि कृणुते महित्वा ।
प्रादेवीर्मायाः सहते दुरेवाः शिशीते शृङ्गे रक्षोभ्यो विनिक्ष्वे ॥ २४ ॥
ये ते शृङ्गे अजरे जातवेदस्तिग्महेती ब्रह्मसंशिते ।
ताभ्यां दुर्हार्दमभिदासन्तं किमीदिनं प्रत्यञ्चमर्चिषा जातवेदो वि निक्ष्व ॥ २५ ॥
अग्नी रक्षांसि सेधति शुक्रशोचिरमर्त्यः । शुचिः पावक ईड्यः ॥ २६ ॥

अर्थ— (अग्निः बृहता ज्योतिषा विभाति) अग्नि विशेष तेजानें प्रकाशतो, (महित्वा विश्वानि आविः कृणुते) स्वतःच्या सामर्थ्यानें सर्व जगाला प्रकाशित करतो. (अदेवीः दुरेवाः मायाः प्रसहते) राक्षसांच्या दुःखदायक कपटजालास जिंकतो. (शृंगे रक्षोभ्यः विनिक्ष्वे शिशीते) स्वतःचीं दोन्ही शिंगें शत्रूचा नाश करण्यासाठीं तीक्ष्ण करीत आहे. (२४)

हे (जातवेदः) वेद जाणणाऱ्या ! (ये ते अजरे तिग्म-हेती) जीं तुझ्या तीक्ष्ण शस्त्राप्रमाणें (ब्रह्मसंशिते शृंगे) ज्ञानानें तीक्ष्ण केलेलीं शिंगें आहेत, हे जातवेदा ! (ताभ्यां) त्या दोन्हीं शिंगानीं आणि (अर्चिषा) स्वतःच्या तेजानें (दुर्हार्दं किमीदिनं अभिदासन्तं) दुष्ट हृदयी, भुकेल्या आणि दुसऱ्यांचा नाश करणाऱ्या दुष्टांचा (प्रत्यञ्चं वि निक्ष्व) समोरून नाश कर. (२५)

(शुक्र-शोचिः अमर्त्यः) शुद्ध प्रकाशयुक्त, अमर, (शुचिः पावकः ईड्यः) पवित्र, शुद्ध करणारा, स्तुत्य अग्नि (रक्षांसि सेधति) राक्षसांचा नाश करतो. (२६)

भावार्थ— अग्नि विशेष तेजानें प्रकाशतो आणि स्वतःच्या सामर्थ्यानें जगाला प्रकाशित करतो. राक्षसांचें कपटजाल दूर करून त्यांच्या नाशासाठीं आपलीं दोन शिंगें तीक्ष्ण करतो. (२४)

तुझीं शिंगें तीक्ष्ण शस्त्रांसारखीं आहेत आणि तीं ज्ञानानें तीक्ष्ण झालीं आहेत. त्यानीं आणि तुझ्या तेजानें दुष्टहृदयी घातकी शत्रूंचा नाश कर. (२५)

शुद्ध, तेजस्वी, अमर, पवित्र, शुद्धता करणारा प्रशंसनीय अग्नि राक्षसांचा नाश करणारा आहे. (२६)

दुष्टांचा नाश

दुष्टांचीं लक्षणें

या सूक्तांत दुष्ट मनुष्यांचा नाश करण्याचा विषय आहे. त्यामुळें प्रथमच दुष्ट कोण तें नक्की केलें पाहिजे. जर तसें न केलें तर दुष्ट रहातील बाजूला आणि सुष्टांचाच अज्ञानानें नाश होईल. म्हणून वेदानें या सूक्तांत दुष्टांचीं लक्षणें सांगितलीं आहेत, तीं पाहूं—

१. **दुर्हार्दः**-(दुः+हार्द)- दुष्ट हृदय असलेला, ज्याच्या अंतःकरणांत दुष्ट विचार रहातात, जो मनांत दुष्ट भावना ठेवतो, ज्याच्या हृदयांत निरंतर कापाकापी आणि हिंसेची कल्पना असते, (मं. २५)

२. **रक्षः, राक्षसः**- (रक्षति) जे रक्षण करण्याचें सोंग आणून घात करतात, जे बाह्यात्कारीं रक्षण करण्याचें ढोंग करून अंतरांत त्यांचा नाश करीत असतात, (मं. ४)

३. **असु-तृप्**- जे दुसऱ्यांच्या प्राणांचें बलिदान घेऊन तृप्त होतात. जे दुसऱ्याचा नाश करून स्वतःचा स्वार्थ साधतात, जे दुसऱ्याचा घात करून स्वतःची पुष्टि करतात. (मं. १३)

४. **धूर्वन्**- जे दुसऱ्यास मारफाड करून त्यांचा नाश करतात. (मं. २१)

५. **भंगुरावत्**- जे दुसऱ्याचा नाश करतात. (मं. २२)

६. **अभिदासन्**- जे दुसऱ्याचा वध करतात, दुसऱ्यास बंधनांत ठेवतात, दुसऱ्यास दास बनवितात, दुसऱ्यास पार-

तंत्र्यांत ठेऊन स्वतःचे सुखोपभोग वाढवितात, जे दुसऱ्यास दास करूं पहातात. (मं. २५)

७. हिंस्रः (मं. ३) शरुः (मं. १४)- जे हिंसा करतात घातपात करतात, दुसऱ्याचा नाश करतात.

८. शफा-रुज्- जे लाथेनें दुसऱ्यांस मारतात, दुसऱ्यांचे अवयव लाथेच्या मारानें तोडतात, तुडवतात. (मं. २१)

९. रिषः- हिंसक, मारफाड करणारे आहेत. जे दुसऱ्याचें उच्छेदन करतात, (मं. १)

१०. क्रव्यात् (मं. २). **क्रविष्णुः, आमादः** (मं. ४)- जे मांस खातात, जे कच्चे मांस खातात, जे रक्त पितात, जे दुसऱ्याच्या जीवनावर जिवंत रहातात.

११. यः पौरुषेयेण अश्व्येन क्रविषा, यः पशुना समंक्ते- जे मनुष्य, अश्व आणि इतर पशूंच्या मांसानें स्वतःच्या शरिरास पुष्ट करतात, जे पशुपक्ष्यांच्या मांसानें स्वतःला पुष्ट करतात. जे स्वतःच्या पोटासाठीं दुसऱ्याचा प्राण घेतात. (मं. १५)

१२. दुरेवाः अदितये आवृश्चन्तां- जे दुष्ट गायींस कापतात अथवा कापवितात. (**अ-दिति**) म्हणजे अहिंसनीय गायीचा सुद्धां जे वध करतात. (मं. १६)

१३. गवां विषं भरन्तां- गायींस जे विष देतात आणि विषानें गायींचा वध करतात.. (मं. १६)

१४. किमीदिन्- (किं-इदानीं) आज आतां काय खावें, काल त्याचा वध केला आणि पोट भरलें आज कोणाचा वध करून पोट भरावें ? याचाच नेहमीं विचार करणारे, खादाड, जे दुसऱ्याचा घात केल्यावांचून राहूं शकत नाहींत. (मं. २५)

१५. यातुधानः (यातु+धानः)- यातना देणारे, दुसऱ्यास सतविणारे, दुसऱ्यास पीडा करणारे (मं. २)

१६. दुरेवः (दुः+एव)- दुष्ट मार्गानें चालणारे, वाईट कृत्यांस प्रवृत्त होऊन, दुसऱ्यास कष्ट देऊन स्वतःचें सुख वाढविण्याचा प्रयत्न करणारे (मं. २४)

१७. अदेवीः मायाः- (अ-दिव्य मायाः) जे दुष्टपणा, कपट, लुच्चेगिरी करतात, त्यांस लुटताल, लुच्चेगिरीनें स्वतःचें ऐश्वर्य वाढवितात. (मं. २४)

१८. वृजिनः- जे पाप करतात, पापकर्मांत प्रवृत्त होतात. (मं. १४)

१९. वाचास्तेनः (वाचा+स्तेनः) जे वाणीचे चोर आहेत, ज्यांची भाषा सत्य नसते, बोलतात एक आणि करतात दुसरेंच, जे विश्वास ठेवण्यास योग्य नाहींत. (मं. १४)

२०. मूरदेवः (मं. २); **सहमूरः** (मं. १८)- घातपात करणारे मूर्ख, चोर लुटाऱ्यांसह रहाणारे महामूर्ख, महाघातकी, महाहिंसक.

२१. मिथुना शपातः- एक दुसऱ्यास शिव्या देणारे परस्पर एक दुसऱ्या विषयीं वाईट शब्दप्रयोग करणारे, अपशब्द बोलणारे.

हे सर्व दुष्ट होत. ही दुष्टांची लक्षणें आहेत. या लक्षणांचा विचार केला असतां आपल्या समाजांत सभोवती या लक्षणांनीं दुष्ट कोण कोण आहेत तें वाचकांस नक्की ठरवतां येईल आणि त्यांस दूर करतां येईल. या लक्षणांचा विचार करीत असतां सज्जनांची लक्षणें सुद्धां समजूं शकतात. उदाहरणार्थ ' जे दुसऱ्याचा घातपात करीत नाहींत, कोणाची हिंसा करीत नाहींत, जे अहिंसात्मक भावनेनें वागतात. जे नेहमीं सत्य बोलतात, कपट कधींहि करीत नाहींत, हृदयांत शुद्ध भाव धारण करतात, कधीं कोणाचा नाश करून स्वतःचें पोट भरूं इच्छित नाहींत. परंतु स्वप्रयत्नानें दुसऱ्यांचें हित करूं इच्छितात, जे दुष्टांबरोबर कधीं रहात नाहींत, तोंडानें खराब शब्द कधीं उच्चारत नाहींत, जे पापकर्मास, प्रवृत्त होत नाहींत, जे कधीं मांस खात नाहींत, जे दुसऱ्यास कधीं मार देत नाहींत, जे दुसऱ्यास दास्यभावांतून मुक्त करूं इच्छितात, जे नेहमीं दुसऱ्याचें रक्षण करतात. ' जे अशा प्रकारें शुद्ध सदाचारानें वागतात, ते सज्जन समजले जातात. अशा सज्जनांनाच वर सांगितलेले दुष्ट नेहमीं कष्ट देतात. म्हणून दुष्टांस दूर करणें हें कर्तव्य ठरतें, तो धर्म आहे. सज्जनांचें रक्षण करावें, दुष्ट दुर्जनांचा नाश करावा आणि धर्मव्यवस्था स्थापावी हें सर्व श्रेष्ठ पुरुषांचें कर्तव्य आहे. जे हें कर्तव्य आचरतात, तेच आदरास पात्र पुरुष आहेत. हाच मनुष्यांचा धर्म आहे. म्हणून या सूक्तानें सांगितलें आहे कीं, या दुष्टांचा नाश केला पाहिजे. नाश करावयाचा, त्यांचा दुष्ट भाव दूर करावयाचा, त्यांच्या स्वभावांत सुधारणा करावयाची, त्यांस दुष्ट व्यवहारापासून परावृत्त केलें पाहिजे. त्यांस समाजांतून अथवा राष्ट्रांतून बहिष्कृत केलें पाहिजे आणि एवढ्यानेंच जर कार्य न झालें तर त्यांचा नाश करावा. या सूक्ताचा हा उपदेश आहे. आतां या दुष्टांचा नाश करणारा कसा असावा त्याविषयीं पाहू—

दुष्टांचा नाश करणारा कसा असावा ?

पूर्वीच्या विवरणांत दुष्टांचीं लक्षणें सांगितलीं आहेत. या लक्षणांनीं दुष्टांची ओळख पटेल. या लक्षणांनीं युक्त अशा दुष्टास, ओळखल्यावर त्यांचा नाश करण्याचें कार्य कोणी करावें याचा विचार व्हावयास हवा. प्रत्येक मनुष्यास दुष्टांचा नाश करण्याचा

अधिकार नाहीं. हें जास्त जबाबदारीचें कार्य आहे, म्हणून तें विशेष सावधतेनें व्हावयास हवें आणि विशेष योग्यता असणाऱ्या मनुष्यांकडे तें सोंपलें जावें. याविषयीं निर्देश या सूक्तांत आहे, त्याविषयीं आतां विचार करूं—

१. **मित्रः** (मं. १), **सखा** (मं. २०)– जो सर्व मनुष्यांशीं मित्रत्वाचें वर्तन ठेवतो. जो सर्वांचा सखा म्हणजे हितकर्ता आहे, जनतेचें हित साधण्यांत जो नेहमीं तत्पर रहातो.

२. **विप्रः** (मं. २२), **कविः** (मं. २०)– जो विशेष प्राज्ञ म्हणजे ज्ञानी आहे, जो कवि आहे, क्रांतदर्शी आहे. जो दूरदृष्टि आहे, जो प्रत्येक गोष्टीचा खोलवर गंभीरपणें विचार करतो, जो पवित्र दृष्टीनें सर्व गोष्टींचा मागचा पुढचा विचार करतो.

३. **जातवेदः (ज्ञातवेदः)**– जो ज्ञानी आहे. अध्ययन ज्यानें पूर्ण केलें आहे, जो बहुश्रुत आहे, आणि वेदशास्त्रज्ञ आहे, ज्याच्यांत ज्ञानदृष्टि उत्पन्न झालेली आहे. (मं. ३)

४. **अथर्ववत् दिव्यज्योतिः** (मं. २१)– जो अ-**थर्व**) अचंचल, स्थितप्रज्ञ योग्याप्रमाणें दिव्य तेजानें युक्त आहे. ज्यानें योगसाधनाच्या योगानें स्वतःच्या मनास स्थिर केलें आहे. जो चंचल वृत्तीचा नाहीं, जो शांत आणि गंभीरपणें सर्व गोष्टींचा विचार करूं शकतो, आणि जो घाई करून आपलें कार्य बिघडवून घेत नाहीं.

५. **शुक्रशोचिः, शुचिः, पावकः** (मं. २६)– जो पवित्र तेजानें युक्त, स्वतःच्या आचारानें शुद्ध आणि पवित्रता ठेवणारा जो स्वतः पवित्र आचार, विचार आणि उच्चारानें युक्त आहे, ज्याचें मन, बुद्धि, चित्त इत्यादि अंतरिंद्रियें तसेंच त्याचीं बाह्य इंद्रियें पवित्र आणि शुद्ध व्यवहार करतात.

६. **ईड्यः** (मं. २६), **प्रतिष्ठः** (मं. १)– वर सांगितलेल्या कारणांनीं जो प्रशंसनीय, स्तुति करण्यास योग्य. सर्व लोक ज्याच्या पवित्र आचरणाची प्रशंसा करतात.

७. **वाजी** (मं. १), **सहस्यः** (मं. २२)– जो बलवान् आहे, कर्तव्य करण्याचा निश्चय केल्यानंतर जो निश्चयपूर्वक स्वतःच्या सर्व बलानें तो निश्चय टिकवून धरतो, जो प्रतिपक्षाचा पराजय करतो, जो स्वतःच्या बलानें स्वतःचें कर्तव्य करूं शकतो.

८. **ब्रह्म-संशितः** (मं. २५)– ज्ञानामुळें, तीक्ष्ण, तेजस्वी, सुसंस्कृत आणि प्रशंसेस पात्र झालेला आहे.

९. **अजरः**, **अमर्त्यः** (मं. २०)– जरारहित आणि मृत्युरहित आहे. क्षीण न होणारा आणि मृत्यूस न भिणारा, देवांप्रमाणें जरा आणि मृत्यूस आपणांपासून दूर ठेवणारा, दिव्य जीवनयुक्त.

१०. **क्रतुभिः समिद्धः**– (मं. १)– विविध सत्कर्मांनीं प्रदीप्त झालेला, श्रेष्ठ आणि प्रशस्ततम कर्मांनीं प्रकाशित, सत्यमय प्रशंसनीय, उत्तम कर्में करणारा. ज्याच्याकडून उत्तम कर्मेंच होतात.

११. **शिशानः** (मं. १)– तीक्ष्ण, तेजस्वी.

१२. **शर्वा** (मं. ५)– शत्रूंचा नाश करणारा.

१३. **प्रतीवः** (मं. ६)– दुष्टांचा प्रतिकार करणारा, शत्रूंस समोरासमोर तोंड देऊन त्यांचा प्रतिकार करणारा.

१४. **भंगुरावतः हन्ता**– (मं. २२) घातक्यांचा नाश करणारा.

१५. **रक्षोहा** (मं. १)– राक्षस, क्रूर कर्में करणाऱ्यांचा नाश करणारा.

१६. **क्रव्यादः अपिधत्स्व** (मं. २)– मांसभक्षक, दुसऱ्याच्या जीवनावर स्वतःचें पोषण करणाऱ्यांस दाबून टाकणारा.

१७. **अर्चिषा यातुधानान् उपस्पृश** (मं. २)– स्वतःच्या तेजानें दुसऱ्यांस यातना देणाऱ्यांचा नाश कर.

१८. **दिवा नक्तं रिषः पातु** (मं. १)– दिवस रात्रीं घातक्यांपासून सज्जनांचें रक्षण कर.

१९. **जम्भैः यातुधानान् संधेहि** (मं. ३)– शस्त्रांनीं दुष्टांस शिक्षा कर.

याप्रमाणें दुष्टांचा नाश कोणी करावा याविषयीं या सूक्तांत सांगितलें आहे. दुष्टांचा नाश करणारा ज्ञानी, शांत, समबुद्धीचा, गंभीर विचारवंत, जनतेचें हित करणारा, पवित्र विचारांचा असा सुयोग्य पुरुष असला पाहिजे. प्रत्येक मनुष्य हें पवित्र कार्य करूं शकणार नाहीं. ज्याच्या हातून केव्हांहि अन्याय होत नाहीं अशा सज्जनांकडे हा अधिकार असला पाहिजे. कोणी न्यायाधीश अथवा दंडविधानाच्या कार्यासाठीं कोणी मनुष्य नेमावयाचा असला तर त्या स्थानीं वरील गुणांनीं युक्त मनुष्य नेमण्यांत यावा, आणि अशा गुणांनीं युक्त मनुष्यच त्या स्थानीं चांगलें कार्य करूं शकेल. या दृष्टीनें या सूक्ताचे मंत्र फारच उत्तम आहेत. अशा सात्विक माणसाच्या हातून कधीं अन्याय व्हावयाचा नाहीं, जें योग्य असेल तेंच कार्य तो करील आणि सर्व मनुष्यांस त्याच्या कार्यानें संतोष होईल.

या दुष्टांस जो दंड देणें योग्य आहे त्याचे विविध प्रकारहि या सूक्तांत वर्णिले आहेत, ते स्पष्टच आहेत, तरीसुद्धां हा विषय समजावा यासाठीं येथें त्याचें वर्णन करीत आहों.

दंडविधान

आतांपर्यंतच्या वर्णनावरून दुष्टांची आणि त्या दुष्टांस योग्य शासन करणाऱ्याचीं लक्षणें आपण समजून घेतलीं. दुष्टांच्या लक्षणांत कांहीं अशीं आहेत कीं त्यावरून त्यांस देण्यायोग्य शिक्षेचा बोध व्हावा. आतां या दंडविधानाचेंच आणखी विवेचन करूं—

१. **रक्षो-हा**- या शब्दानें राक्षसांना ' वध ' दंड योग्य असें सिद्ध होतें. ' **हन्** ' धातूचा दुसरा अर्थ ' **गति** ' असा आहे. हा अर्थ जर येथें ग्राह्य धरला तर त्या राक्षसास स्वतःच्या स्थानांतून घालवून लावणें म्हणजे ' देशांतून हद्दपार करणें ' असा अर्थ होईल. ' **रक्षस्** ' (**रक्षन्ति यस्मात् इति रक्षः**) शब्दाचा अर्थ ज्यांपासून सुरक्षित रहाण्याची आवश्यकता आहे असा होतो. ज्यांच्यापासून जनतेचें रक्षण केलें पाहिजे अशा दुष्टांस अशा स्थानीं ठेऊन त्यांवर कडक पहारा ठेवावा कीं त्यामुळें हे दुष्ट दुसऱ्यांस त्रास देऊं शकणार नाहींत. असा अर्थ यावरून निघतो. (मं. १)

२. **अयोदंष्ट्रः**- लोखंडी दाढा. या मंत्रांत दुष्टांस ठेचून त्यांचा नाश करावा. वरून आणि खालून खिळे ठोकलेले असतात, अशा यंत्रांत दुष्टांस घालून त्यांस मारावें. (मं. २)

३. **क्रव्यादः अपिधत्स्व**- दुसऱ्याच्या मांसानें स्वतःचें शरीर पुष्ट करणाऱ्यांस बंद करून ठेव, बंदिवासांत ठेव. (मं. २)

४. **अवरं परं च दंष्ट्रौ उपधेहि**- (मं. ३) श्रेष्ठ आणि कनिष्ठ दोन्ही प्रकारच्या शत्रूंना स्वतःच्या दाढांत बंद ठेवणें म्हणजे त्यांच्या हालचालीस प्रतिबंध करणें. (मं. ३)

५. **यातुधानान् जंभैः संधेहि**- यातना देणाऱ्यांवर शस्त्रास्त्रांनी हल्ला कर. शस्त्रांनीं त्यांचा नाश कर. (मं ३)

६. **यातुधानस्य त्वचं भिन्धि**- यातना देणाऱ्या दुष्टांची कातडी छिन्नविच्छिन्न कर म्हणजे त्यांस असा मार दे कीं त्यांची चामडी फाटून जावी. (मं. ४)

७. **हिंस्र-अशनिः एनं हरसा हन्तु**- हिंसक वीज त्याचा वध वेगानें करो. म्हणजे विजेच्या प्रयोगानें या दुष्टांचा वध, करण्यांत यावा. (मं. ४)

८. **पर्वाणि प्र शृणीहि**- दुष्टांचीं पेरीं कापून काढा. (मं. ४)

९. **क्रविष्णुः क्रव्याद् एनं विचिनोतु**- मांसभक्षक सिंह व्याघ्र इत्यादि प्राण्यांच्या योगानें दुष्टांच्या शरीराचा वध करण्यांत यावा. (मं. ४)

१०. **यातुधानं विध्य**- यातना देणाऱ्यांस, दुष्टांस बाण वगैरेंनीं वेधून टाका. (मं. ५) **हृदये विध्य**- हृदयावर बाण मार. (मं. ६)

११. **एषां बाहून् प्रति भिंधि**- दुष्टांचे हात कापून टाका. (मं. ६)

१२. **यातुधानान् ऋष्टिभिः स्पृणुहि**- यातना देणाऱ्यांचा शस्त्रानें वध कर. (मं. ७)

१३. **यातुधानान् निजहि**- दुसऱ्यांस यातना देणाऱ्यांचा नाश कर (**आमादः एनीः अदन्तु**) दुसऱ्यांचें मांस खाऊन स्वतःस परिपुष्ट करणारांस गिधाडें खावोत. (मं. ७)

१४. **रक्षः प्रति शृणीहि**- राक्षसांचा नाश कर. (मं. १०)

१५. **पृष्टीः हरसा शृणीहि**- दुष्टांच्या फांसळया वेगानें तोडून टाका. (**यातुधानस्य मूलं वृश्च**) यातना देणाऱ्या दुष्टांस मुळापासून कापून काढा. (मं. १०)

१६. **यातुधानं वियुङ्ग्धि**- यातना देणाऱ्यांस कारागृहांत ठेवा. (मं. ११)

१७. **यातुधानान् हृदये विध्य**- यातना देणाऱ्या दुष्टांचे हृदय छेदून टाक. (मं. १२)

१८. **असुतृपः पराशृणीहि**- दुसऱ्यांचे प्राण घेऊन स्वतःची तृप्ति करणाऱ्या दुष्टांचा नाश कर. त्यांस दूर करून त्यांचा नाश कर. (मं. १३)

१९. **मर्मन् ऋच्छन्तु**- दुष्टांचीं मर्मस्थानें कापण्यांत यावींत (मं. १४)

२०. **यातुधानः प्रसितिं एतु**- दुष्टांस बंधन-कारागृह प्राप्त व्हावें म्हणजे दुष्टांस कारागृहांत ठेवावें. (मं. १४)

२१. **तेषां शीर्षाणि वृश्च**- दुष्टांचीं डोकीं उडविण्यांत यावींत. (मं. १५)

२२. **यातुधानः उस्रियायाः संवत्सरीणं पयः माशीत्**- दुष्टांस गायींचें दूध एक वर्ष पिण्यास देऊं नये. एक वर्ष गायींचें दूध न पिऊं देणें ही एक प्रकारची शिक्षाच होती. हल्लीं म्हशींचें दूध जे पितात त्यांस ही शिक्षा एकप्रकारें निसर्गतःच मिळत आहे. कारण पुष्कळांना गायींचें दूध मिळत नाहीं. हल्लीं जर बंदिवानास म्हशीचें दूध दिलें तर त्यांस जराहि वाईट वाटणार नाहीं. पण वैदिककाळीं गाईचें दूध पिण्यास न मिळणें ही शिक्षा समजली जात होती. यावरून असें वाटतें कीं त्याकाळीं कारागृहांतील कैद्यांसहि रोज गाईचें दूध देण्यांत येत असे, आणि विशेष प्रकारच्या कैद्यांना एक वर्षपर्यंत गायींचें दूध न देण्याची शिक्षा होती. म्हणूनच या मंत्रांत पुढें म्हटलें आहे-- (**यतमः पीयूषं तितृप्सात् तं मर्मणि विध्य**) त्या दुष्टांनां गायीचें दूध न देण्याची शिक्षा दिली असतां जे चोरून दूध पितील तर त्यांस मर्मस्थानीं वेधून टाका. यावरून स्पष्ट होतें कीं विशेष प्रकारच्या घोर अत्याचाऱ्यानांच गाईचें दूध न पिण्याची शिक्षा होत असे. आणि अशा बंदिवानानें नियमोल्लंघन केलें म्हणजे जर तो गायीचें दूध प्याला तर त्याला कडक शिक्षा करण्यांत येत असे. (मं. १७) या शिक्षेच्या दृष्टीनें या मंत्राचा विचार वाचकांनीं करावा.

२३ **अघशंसं दहन्तु**- पाप्यांस जाळण्यांत यावें. ही वधाची शिक्षा आहे. येथें जाळून वध करण्याचें सांगितलें आहे. (मं. १९) हाच भाव (**धूर्वन्तं न्योष**) विनाश करणाऱ्यांचा

वध करा, नाश करा अथवा जाळून नाश करा अशी आज्ञा आहे.

२४ रक्षसः प्रतिजहि– दुष्ट राक्षसांचा नाश कर. (मं. २३)

२५. दुर्हार्द अभिदासन्तं विनिक्ष्व– दुष्ट हृदयी आणि दुसऱ्यास दास करूं इच्छिणाऱ्या दुष्टांचा नाश कर. (मं. २५)

या प्रकारचें दंडविधान, विविध प्रकारच्या शिक्षा, या सूक्तांत सांगितल्या आहेत. निरनिराळ्या अपराधांच्या प्रमाणांत या विविध शिक्षा देणें योग्य आहे. जो ज्ञानी आणि काळ ओळखणारा न्यायाधीश असेल तोच अपराधाच्या न्यूनाधिक प्रमाणांत दंड देऊं शकेल. कोणत्या अपराधास कोणता दंड देणें योग्य आहे त्याचा विचार करण्यास न्यायाधीश शांत आणि गंभीर स्वभावाचा असला पाहिजे. या विषयीं विचार या विवरणांत सुरवातीसच केला आहे. आतां त्याचा उद्देश वाचकांच्या ध्यानीं येईल. एकंदर सूक्ताचा या दृष्टिकोनांतून विचार करून न्यायसभेचें कार्य करण्याची योजना राष्ट्रांत असावी.

दुष्ट-नाशन सूक्त

कांड १, सूक्त २८

(ऋषिः– चातनः । देवता – अग्निः, यातुधानीः)

उप प्रागाद्देवो अग्नी रक्षोहामीवचातनः । दहन्नप द्वयाविनो यातुधानान्किमीदिनः ॥ १ ॥

प्रति दह यातुधानान्प्रति देव किमीदिनः । प्रतीचीः कृष्णवर्तने सं दह यातुधान्यः ॥ २ ॥

या शशाप शपनेन याघं मूरमादधे । या रसस्य हरणाय जातमारेभे तोकमत्तु सा ॥ ३ ॥

पुत्रमत्तु यातुधानीः स्वसारमुत नप्त्यम् ।
अधा मिथो विकेश्योऽ वि घ्नतां यातुधान्योऽ वि तृह्यन्तामराय्यः ॥ ४ ॥

अर्थ— (अमीव-चातनः) रोगांस दूर करणारा आणि (रक्षोहा) राक्षसांचा नाश करणारा अग्निदेव (किमीदिनः) नेहमीं भुकेलेल्या (यातुधानान्) लुटारूंस तसेंच (द्वयाविनः) दोन्ही बाजूनें बोलणाऱ्या कपटी लोकांस (अपदहन्) जाळून तो (उप प्रगात्) जवळ येऊन पोंहोचला आहे. (१) हे अग्निदेवा ! (यातुधानान् प्रति दह) लुटारूंस जाळून टाक तसेंच (किमीदिनः प्रतिः) नेहमीं भुकेले रहाणाऱ्यांना जाळून टाक. हे (कृष्णवर्तने) काळा मार्ग असणाऱ्या अग्ने ! (प्रतीचीः यातुधान्यः) समोर येणाऱ्या लुटारू स्त्रियांना सुद्धां (संदह) असाच जाळून टाक. (२) या दुष्ट लुटारू स्त्रिया (शपनेन शशाप) शापानेंच शाप देतात. (या अघं मूरं आदधे) ज्या सुरवातीपासूनच पापाचा स्वीकार करतात. (या रसस्य हरणाय) ज्या रस पिण्यासाठीं (जातं तोकं आरेभे) जन्मलेल्या मुलास खाण्यास आरंभ करतात, आणि (सा अत्तु) त्या बालकास खाऊन टाकतात. (३) यातुधानीः) पापी स्त्री (पुत्रं अत्तु) मुलांस खाऊन टाकते. (स्वसारं उत नप्त्यं) बहिणीस तसेंच नातीस खाऊन टाकते. (अध) आणि (विकेश्यः) केंस धरून त्या (मिथः घ्नतां) आपापसांत भांडतात, (अराय्यः यातुधानीः) दान न करणारी घातकी स्त्री (वितृह्यन्तां) आपसांत मारहाण करते. (४)

भावार्थ— रोग दूर करण्यास समर्थ म्हणजे उत्तम वैद्य, आसुरी भावांस दूर करणारा, अग्निसारखा तेजस्वी, उपदेशक, स्वार्थी लुटारूंस आणि कपटी लोकांस दूर सारून पुढें जातो. (१) हे उपदेशका ! तूं लुटारू, स्वार्थी दुष्टांचा नाश कर. तसेंच समोर येणाऱ्या दुष्ट स्त्रियांची दुष्टता सुद्धां दूर कर. (२) या दुष्टांची लक्षणें अशीं आहेत कीं त्या आपापसांत शिविगाळ करीत असतात. त्या प्रत्येक काम पापी हेतूनेंच करितात. त्या इतक्या क्रूर असतात कीं नवीन जन्मलेल्या बालकाचें रक्त शोषण्यास प्रारंभ करतात. (३) त्या स्त्रिया स्वतःच्या मुलांस खाऊन टाकतात. बहिण, नात यांस सुद्धां खातात, तसेंच एक दुसरीचे केंस पकडून आपापसांत भांडत बसतात. (४)

दुष्टनाशन सूक्त

पूर्वापरसंबंध

धर्मप्रचार करणारा अग्निदेवच ब्राह्मण उपदेशक कसा आहे आणि तो कशा प्रकारें दुष्टांस सुधारतो हे सर्व विषय या सूक्तांत अति स्पष्टपणानें दिलेले आहेत.

संस्कृतांत '**विदग्ध**' (विशेष प्रकारें जळालेला) हा शब्द 'अति विद्वान्' या अर्थी योजितात. येथें अज्ञानाचें दहन समजणें योग्य आहे. ज्याप्रमाणें अग्नि लोखंडास तापवून शुद्ध करतो त्याप्रमाणें ज्ञानी उपदेशकानें प्रेरित केलेला ज्ञानाग्नि अज्ञानी मनुष्याच्या अज्ञानास जाळून त्या मनुष्यास शुद्ध करतो. यामुळें 'ब्राह्मण' या अर्थी वेदामध्यें 'अग्नि' शब्द येतो. ब्राह्मण आणि क्षत्रियवाचक '**अग्नि**' आणि '**इंद्र**' वेदांमध्यें प्रसिद्ध आहेत. अग्निदेवतेच्या मंत्रांत ब्राह्मणधर्म आणि इंद्रदेवतेच्या मंत्रांत क्षात्रियधर्म दाखवला आहे. तोच धर्मप्रचाराचा उपदेश या सूक्तांतहि आहे. म्हणून वाचकांनीं या दृष्टीनें या सूक्ताचा संबंध पहावा.

या सूक्तांत **अमीव-चातनः** (रोगांस दूर करणारा) हे शब्द विशेष अर्थानें आले आहेत. येथें ते चिकित्सेच्या योगानें रोगांस दूर करणाऱ्या वैद्याचा बोध करतात. उपदेशक ज्याप्रमाणें शास्त्रांत प्रवीण असावा तसा तो उत्तम वैद्यसुद्धां असला पाहिजे. वैद्य असल्यामुळें रोगांची चिकित्सा करतां करतां तो धर्माचा प्रचार करूं शकतो.

दुर्जनांचीं लक्षणें

या सूक्तांत पूर्वी सांगितलेल्या दुष्टांच्या लक्षणांपेक्षां थोडी अधिक सांगितलीं आहेत. हीं लक्षणेंसुद्धां दुष्टत्वाची ओळख करणारीं आहेत. अतएव त्यांचा विचार येथें करूं—

१. **द्वयाविनः**– आंत एक बाहेर एक अशा वृत्तीचे, कपटी. (मं. १) '**किमीदिन्, यातुधानः**' आज काय खावें, यातना देणारा, हे दुष्टांचे वाचक शब्द आहेत. या सूक्तांत दुर्जनांचे कांहीं व्यवहार सुद्धां सांगितले आहेत, तेसुद्धां येथें पहा—

२. **शपनेन शशाप**– शापानें शाप देणें, वाईट शब्द बोलणें, शिवीगाळ करणें. (मं. ३)

३. **अघं मूरं आदधे**= प्रारंभीच पापभाव राखणारे. प्रत्येक कार्य पापदृष्टीनें, पाप बुद्धीनें करणारे. (मं ३)

४. **रसस्य हरणाय जातं तोकं आरेभे**– रक्त पिण्यासाठीं नवजात शिशूंस खातात. (मं. ३)

५. **यातुधानी पुत्रं स्वसारं नप्त्यं अत्ति**– ही दुष्ट राक्षसी स्वतःच्या पुत्रास, बहिणीस, नातीस खाते. (मं. ४)

६. **विकेश्यः मिथः विघ्नतां वितृह्यन्तां**– परस्परांचे केंस धरून आपापसांत मारामारी करतात. (मं. ४)

हीं सर्व दुष्ट स्त्री पुरुषांचीं लक्षणें आहेत. लहान मुलांस खाणारे कितीतरी लोक आजहि आफ्रिकेंत आहेत. परंतु आपल्या देशांत आतां कोणी नाहींत. जेथें कोठें असे लोक असतील तेथें उपदेशकानें जावें आणि उपदेशाच्या द्वारें त्यांस उत्तम मनुष्य करावें, ज्ञानी करावें, त्यांची दुष्टता दूर करून त्यांस सज्जन बनवावें.

अशा मनुष्यभक्षक,दुष्ट, क्रूर, हिंसक मनुष्यांस सुद्धां धर्मोपदेश देऊन त्यांस सुधरण्याचा प्रयत्न करण्यास या मंत्रांत सांगितलें आहे, त्यावरून सुधारलेल्या वरिष्ठ श्रेणीच्या मनुष्यांत ही धर्मजागृति करावी हें आपोआपच उघड होतें.

दुष्टांस सुधारणें

दुष्ट मनुष्यांत दुष्टता असल्यामुळेंच त्यांस असभ्य गणण्यांत येतें. त्यांची दुष्टता उपदेश वगैरेनीं दूर करून, त्यांस सभ्य बनविण्याचा ब्राह्ममार्ग आहे आणि त्यांस शिक्षा करून भीति दाखवून त्यांची सुधारणा करणें हा क्षात्रमार्ग होय. वेदांत अग्निदेवतेच्या मंत्रांत ब्राह्ममार्ग आणि इंद्रदेवतेच्या मंत्रांत क्षात्रमार्ग दर्शविला आहे. दोघेहि तापवितात आणि जाळतातसुद्धां, पण एक उपदेशानें त्यांच्या अज्ञानांस जाळतो तर दुसरा शस्त्र, दंड इत्यादि यातनांनीं त्यांच्या शरीरांस पीडा देऊन त्यांस सुधरवितो.

सुधारणा दोन्ही प्रकारें होते. परंतु क्षत्रियांच्या शिक्षांनीं पीडा देण्याच्या उपायापेक्षां ब्राह्मणांच्या उपदेशाचा ज्ञानाग्निद्वारा तापविण्याचा मार्ग जास्त श्रेष्ठ आणि उत्तम आहे आणि त्यांत कष्टही कमी आहेत.

वाचकांनीं अग्नि शब्दाचा अर्थ विस्तव असा करून दुष्टांस जाळून टाकण्याचा मार्ग या सूक्तांत सांगितला आहे असेंच केवळ समजूं नये. कारण या सूक्ताचा पूर्वापरसूक्तांशीं संबंध असून त्यांत अग्नीच्या गुणांचें वर्णन करून अशा सूक्तांत अग्नि पद हें

ज्ञानी उपदेशकाचें वाचकच आहे हें त्या सूक्ताच्या स्पष्टीकरणांत स्पष्ट केलें आहे. त्यानंतर या सूक्तांत ' रोग दूर करणारा अग्नि, ' असें वर्णन आहे. जर दुष्ट लोकांस खरोखर जाळून टाकणें असेल तर त्यांस रोगमुक्त करण्याच्या गुणाचा काय उपयोग ? म्हणून अग्नीनें जाळणें याचा अर्थ, ' ज्ञानाग्नीनें अज्ञान जाळणें, ' हाच सयुक्तिक आहे. दुष्ट गुणधर्म दूर करणें, त्याजागीं श्रेष्ठ गुणधर्म स्थापित करणें हेंच येथें योग्य होय. म्हणूनच रोगमुक्त करणारा वैद्यच उत्तम उपदेशक होऊं शकतो, अशी सूचना या सूक्तांत आपणांस मिळते. कारण कीं वैद्याच्या उपदेशाचा परिणाम रोग्याच्या मनावर जेवढा होतो, तेवढा व्याख्यात्याच्या व्याख्यानाचा परिणाम श्रोत्यांच्या मनावर होत नाहीं. रोग्याचें मन आतुर असतें, त्यामुळें ऐकलेली गोष्ट त्याच्या मनावर चांगली ठसते आणि त्या कारणानें तो लवकर सुधरतो.

या सूक्ताच्या ३ ऱ्या आणि ४ थ्या मंत्रांत **' अत्तु '** शब्द आला आहे. त्याचा अर्थ ' खाऊन टाको ' असा आहे. परंतु, **' शशाप, आदधे '** या क्रियांच्या अनुसंधानांत ' अत्तु ' या पदाचे जागीं **' अत्ति '** असें असावें, असें मानणें जास्त सयुक्तिक आहे. कारण कीं येथें यातुधान्यांची रीत दाखविली आहे. ज्याप्रमाणें (**शशाप**) शाप देतच रहातात, (**अघं आदधे**) पाप स्वीकारतात, त्याप्रमाणें (**तोकं अत्ति**) बालकांस खातात, म्हणजे ही त्यांची रीत आहे. पूर्वापर संबंधानें हाच अर्थ येथें अभिप्रेत आहे असें आम्हांस वाटतें. पण जर वाचकांनीं कांहीं निराळा अर्थ शोधला तर या सूक्ताचा अर्थ करण्यास तो जास्त सहाय्यक होईल.

शत्रुदमन

कांड ८, सूक्त ४

(ऋषिः – चातनः । देवता इन्द्रासोमौ)

इन्द्रा॑सोमा॒ तप॑तं॒ रक्ष॑ उ॒ब्जतं॒ न्य॑र्पयतं वृषणा तमो॒वृधः॑ ।
परा॑ शृणीतम॒चितो॒ न्यो॑षतं ह॒तं नु॒देथां॒ नि शि॑शीतम॒त्रिणः॑ ॥ १ ॥
इन्द्रा॑सोमा॒ सम॒घशं॑सम॒भ्य१घं तपु॑र्ययस्तु च॒रुर॑ग्नि॒माँ इ॑व ।
ब्र॒ह्म॒द्विषे॑ क्र॒व्यादे॑ घो॒रच॑क्षसे॒ द्वेषो॑ धत्तमनवा॒यं कि॑मी॒दिने॑ ॥ २ ॥

अर्थ— हे (**वृषणा**) बलवान् इंद्र आणि सोम ! (**रक्षः तपतं**) राक्षसांस त्रास द्या. (**उब्जतं**) त्यांस मारा, (**तमो-वृधः नि अर्पयतं**) अंधःकार वाढविणाऱ्यांस खालीं ढकलून द्या. (**अ-चितः परा शृणीतं**) अंतःकरण नसलेल्या दुष्टांचा नाश करा. (**नि ओषतं, हतं,**) त्यांचा नाश करा, त्यांचा वध करा, त्यांस (**नुदेथां**) काढून लावा (**अत्रिणः निशिशीतं**) दुसऱ्यांस खाणाऱ्यांस निर्बल करा. (१)

हे इंद्र आणि सोम ! (**अग्निमान् चरुः इव**) विस्तवावर ठेवलेल्या भांड्याप्रमाणें (**अघशंसं अघं अभि**) पाप करणाऱ्या पाप्यासमोर (**तपुः सं ययस्तु**) ताप-दुःख देत राहोत. (**ब्रह्मद्विषे क्रव्यादे**) ज्ञानाचे शत्रु, मांसभक्षक, (**घोरचक्षसे किमीदिने**) क्रूर दृष्टीच्या दुष्टांशीं (**अनवायं द्वेषः धत्तं**) निरंतर द्वेष धारण करा. (२)

भावार्थ— दुष्टांस शिक्षा करा, त्यांस ताडन करा, अज्ञान फैलावणाऱ्यांस दूर सारा, दुष्ट हृदयी लोकांस समाजातून बहिष्कृत करा, अवश्य तर त्यांचा वधहि करा, अथवा त्यांस बाहेर काढून लावा. जे दुसऱ्यांस खाऊन टाकतात त्यांस निर्बल करा. (१)

जे नेहमीं पाप करतात त्यांस नेहमींच कडक शिक्षा करा. ज्ञानाचा नाश करणारे, मांसभक्षक, क्रूर आणि हिंसकांचा द्वेष करा. (२)

इन्द्रासोमा दुष्कृतो वव्रे अन्तरनारम्भणे तमसि प्र विध्यतम् ।
यतो नैषां पुनरेकश्चनोदयत्तद्वामस्तु सहसे मन्युमच्छवः ॥ ३ ॥
इन्द्रासोमा वर्तयतं दिवो वधं सं पृथिव्या अघशंसाय तर्हणम् ।
उत्तक्षतं स्वर्यं पर्वतेभ्यो येन रक्षो वावृधानं निजूर्वथः ॥ ४ ॥
इन्द्रासोमा वर्तयतं दिवस्पर्यग्नितप्तेभिर्युवमश्महन्माभिः ।
तपुर्वधेभिरजरेभिरत्त्रिणो नि पर्शाने विध्यतं यन्तु निस्वरम् ॥ ५ ॥
इन्द्रासोमा परि वां भूतु विश्वत इयं मतिः कक्ष्याश्वेव वाजिना ।
यां वां होत्रां परिहिनोमि मेधयेमा ब्रह्माणि नृपती इव जिन्वतम् ॥ ६ ॥

अर्थ— हे इंद्र आणि सोम ! (अनारम्भणे वव्रे तमसि अन्तः) अगाध आवरण घालणाऱ्या अंधारामध्यें, (दुष्कृतः प्रविध्यतं) दुष्कर्म करणारांस छेदून टाका, (यतः एषां एकः चन) ज्यामुळें त्यांच्यांतील एक सुद्धां (न उत् अयत्) शिल्लक राहूं शकणार नाहीं. याप्रकारें (वां मन्युमत् तत् शवः) तुमचें उत्साहयुक्त तें बल (सहसे अस्तु) शत्रुदमनासाठीं असो. (३)

हे इन्द्र आणि सोम ! तुम्ही दोघे (अघ-शंसाय) पाप करणाऱ्या दुष्ट मनुष्यासाठीं (दिवः पृथिव्याः) द्युलोक आणि पृथ्वी यांच्यामध्यें (तर्हणं वधं संवर्तयतं) विनाशक वध करणाऱ्या शस्त्रास फेंका, (पर्वतेभ्यः स्वर्यं उत् तक्षतं) पर्वतनिवासी शत्रूंसाठीं अतितीक्ष्ण शस्त्र तयार ठेवा (येन वावृधानं रक्षः निजूर्वथः) ज्यामुळें पुढें सरणाऱ्या राक्षसांचा तुम्हीं नाश करूं शकाल. (४)

हे इन्द्र आणि सोम हो ! (युवं) तुम्हीं दोघे, (अग्नितप्तेभिः अश्महन्मभिः) अग्नींत तापवून पोलादाच्या बनविलेल्या (अजरेभिः तपुर्वधेभिः) क्षीण न होणाऱ्या आणि त्रासदायक वध करणाऱ्या शस्त्रांनीं (दिवः अत्त्रिणः परिवर्तयतं) द्युलोकांतून भोगविलासी लोकांस हांकलून लावून (पर्शाने नि विध्यतं) कठीणस्थळीं त्यांना छेदा म्हणजे त्यामुळें ते (निस्वरं यन्तु) थोडासुद्धां आवाज केल्यावांचून पळून जातील. (५)

हे इन्द्र आणि सोम ! (कक्ष्या वाजिना अश्वा इव) ज्याप्रमाणें चामड्याच्या पट्ट्याचा बलवान् घोड्याशीं संबंध असतो त्याप्रमाणें (इयं मतिः) ही आमची बुद्धि (वां परिभूतु) तुम्हांस सर्व प्रकारें प्राप्त होवो. (यां होत्रां वां मेधया परिहिनोमि) या आह्वान करणाऱ्या वाणीनें माझ्या बुद्धीस तुम्हांकडे प्रेरित करतों. म्हणून तुम्ही दोघे (नृपती इव) राजांप्रमाणें (ब्रह्माणि आ जिन्वतं) या स्तुतिवाक्यांचा प्रेमानें स्वीकार करा. (६)

भावार्थ— गाढ अंधकारांत रहाणाऱ्या दुष्ट कर्म्यांस छेदून टाका, अशी व्यवस्था करा कीं त्यांच्यापैकीं एकहि पुनः कष्ट देण्यास वांचू नये. तुमचें उत्साहयुक्त बल आपल्या विजयासाठीं उपयोगी व्हावें. (३)

पाप करणाऱ्या दुष्टांची निंदा करा आणि त्यांचा वध करा, त्यांस दूर करण्यासाठीं तुमचीं शस्त्रें सिद्ध करा. त्यामुळें तुम्हीं त्यांचा नाश करूं शकाल. (४)

अग्नींत तापवून पोलादाच्या केलेल्या अति तीक्ष्ण आणि शत्रूंचा नाश करण्यास समर्थ शस्त्रांनीं तुमच्या दुष्ट शत्रूंस छेदून टाका, म्हणजे ते ओरडल्यावांचून नाश पावतील. (५)

तुमच्या ठिकाणीं हा शत्रूचा नाश करण्याचा विचार राहो. त्यामुळें ज्याप्रमाणें बंदीजन राजांची स्तुति करतात तशी तुमची प्रशंसा होईल. (६)

प्रतिं स्मरेथां तुजयंद्भिरेवैर्हतं द्रुहो रक्षसो भङ्गुरावंतः ।
इन्द्रासोमा दुष्कृते मा सुगं भूद्यो मा कदा चिंदभिदासंति द्रुहुः ॥ ७ ॥
यो मा पाकेन मनसा चरन्तमभिचष्टे अनृतेभिर्वचोभिः ।
आपं इव काशिना संगृभीता असंन्नस्त्वासंत इन्द्र वक्ता ॥ ८ ॥
ये पाकशंसं विहरन्त एवैर्ये वा भद्रं दूषयंन्ति स्वधाभिः ।
अहंये वा तान्प्रददातु सोम आ वा दधातु निर्ऋतेरुपस्थे ॥ ९ ॥
यो नो रसं दिप्सति पित्वो अंग्ने अश्वानां गवां यस्तनूनाम् ।
रिपु स्तेन स्तेयकृद्दभ्रमेतु नि ष हीयतां तन्वा३ तनां च ॥ १० ॥
परः सो अंस्तु तन्वा३ तनां च तिस्रः पृथिवीरधो अंस्तु विश्वाः ।
प्रतिं शुष्यतु यशो अस्य देवा यो मा दिवा दिप्संति यश्च नक्तम् ॥ ११ ॥

अर्थ— हे इन्द्र आणि सोम हो ! (तुजयद्भिः एवैः प्रति स्मरेथां) वेगवान् वाहनांनीं दुष्टांचा पाठलाग करा. (भंगुरावतः द्रुहः रक्षसः हतं) विनाशक आणि द्रोह करणाऱ्या राक्षसांचा नाश करा. (दुष्कृते सुगं मा भूत्) त्या दुष्कर्म करणाऱ्यांस सुखानें फिरण्यास सवड मिळूं नये. (यः द्रुहुः कदाचित् मा अभि दासति) तो दुष्ट मला कधींहि कष्ट न देवो. (७)

हे इंद्रा ! (पाकेन मनसा चरंतं मा) परिपक्व शुद्ध मनानें आचरण करणाऱ्या मला (यः अनृतेभिः वचोभिः अभिचष्टे) जे असत्य वचनांनीं धिक्कारतात, (काशिना संगृभीताः आपः इव) मुठींत धरलेल्या पाण्याप्रमाणें, (असतः वक्ता) असत्य वचन बोलणारे ते (अ-सन् अस्तु) न होण्यासमान होवो. (म्हणजे मेल्याप्रमाणें होवो.) (८)

(ये एवैः पाकशंसं विहरन्ते) जे विशेष गति आणि साधनांनीं परिपक्व बुद्धीच्यांस विशेष प्रकारें हरवितात, (ये वा भद्रं स्वधाभिः दूषयन्ति) जे चांगल्या माणसांस अन्नाच्या योगानें दूषित करतात. (सोमः वा तान् अहये प्रददातु) सोम त्या दुष्टांस सर्पांना देवो अथवा (निर्ऋते उपस्थे वा आदधातु) विनाशाजवळ त्यांस नेऊन पोंहोचवो. (९)

हे अग्नि ! (यः नः पित्वः रसं दिप्सति) जे आमच्या अन्नरसास बिघडवितात; (यः अश्वानां गवां तनूनां) जे घोडे, गायी, आणि अन्य शरीरांचा नाश करतात, (ते स्तेयकृत् रिपुः स्तेनः) चोरी करणारे शत्रुरूपी चोर (दभ्रं एतु) नाशास प्राप्त होवोत. (सः तन्वा तना च निहीयतां) ते शरीरानें आणि पुत्रादिकांनीं हीन बनोत. (१०)

हे देवा ! (यः मा दिवा) जो मला दिवसाचे समयीं (यः च नक्तम् दिप्सति) आणि जो रात्रीच्या वेळीं पीडाकारक आहे. (सः तन्वा तना च परः अस्तु) तो स्वतःच्या शरीरानें आणि पुत्रासह दूर राहो. (विश्वाः तिस्रः पृथिवीः अधः अस्तु) सर्व तीन भूमिभागांच्या खालीं राहो आणि (अस्य यशः प्रति शुष्यतु) त्याचें यश शुष्क होवो. (११)

भावार्थ— वेगवान् वाहनांत बसून शत्रूंचा पाठलाग करा, सर्व दुष्टांस पकडून त्यांचा नाश करा, दुष्ट कर्म करणारे तुमच्या समाजांत सुखानें फिरूं न शकोत आणि कोणांस त्रास न देवोत. (७)

शुद्ध मनानें कार्य न करणारे, जे कारणाशिवाय खोटें बोलतात, शिव्या देतात, ते असत्यवादी जिवंत न रहाण्यासारखे होवोत. (म्हणजे मेल्यासारखे होवोत.) (८)

जे दुष्ट स्वतःच्या अनेक साधनांनीं सज्जनांस लुटतात आणि चांगल्या माणसांच्या अन्नाचा बिघाड करतात, ते नाश होण्यास पात्र आहेत. (९)

जे अन्नरस बिघडवितात आणि पशुघात करतात, चोरी करतात, ते स्वतःच्या पुत्रपौत्रांसह नाश पावोत. (१०)

जे दुष्ट दिवसरात्र दुसऱ्यांस पीडा देतात, ते स्वतःच्या मुलाबाळांसह नाशास प्राप्त होतात आणि त्यांचें यश कमी होवो. (११)

सुविज्ञानं चिकितुषे जनाय सच्चासच्च वचसी पस्पृधाते ।
तयोर्यत्सत्यं यतरदृजीयस्तदित्सोमोऽवति हन्त्यासत् ॥ १२ ॥
न वा उ सोमो वृजिनं हिनोति न क्षत्रियं मिथुया धारयन्तम् ।
हन्ति रक्षो हन्त्यासद्वदन्तमुभाविन्द्रस्य प्रसितौ शयाते ॥ १३ ॥
यदि वाहमनृतदेवो अस्मि मोघं वा देवाँ अप्यूहे अग्ने ।
किमस्मभ्यं जातवेदो हृणीषे द्रोघवाचस्ते निर्ऋथं सचन्ताम् ॥ १४ ॥
अद्या मुरीय यदि यातुधानो अस्मि यदि वायुस्ततप पूरुषस्य ।
अधा स वीरैर्दशभिर्वि यूया यो मा मोघं यातुधानेत्याह ॥ १५ ॥

अर्थ— (चिकीतुषे जनाय सुविज्ञानं) ज्ञान प्राप्त करणाऱ्या मनुष्यासाठीं उत्तम ज्ञान सांगण्यांत आलें आहे कीं, (सत् च असत् च) सत्य आणि असत्य (वचसी पस्पृधाते) भाषणांत स्पर्धा असते. (तयोः यत् सत्यं) त्यांत जें सत्य आहे आणि (यतरत् ऋजीयः) जें सरल आहे (तत् इत् सोमः अवति) त्याचें सोम रक्षण करतो, आणि (असत् हन्ति) असत्याचा नाश करतो. (१२)

(सोमः वृजिनं न वा उ हिनोति) सोम कपटी लोकांस कधीं सहाय्य करीत नाहीं. (मिथुया धारयन्तं क्षत्रियं न) मिथ्या व्यवहार करणाऱ्या क्षत्रियांस तो कधीं सहाय्य करीत नाहीं. (रक्षः हन्ति) तो राक्षसांस मारतो. (असत् वदन्तं हन्ति) असत्य बोलणारास मारून टाकतो. ते दोघे (इन्द्रस्य प्रसितौ शयाते) इंद्राच्या बंधनांत रहातात. (१३)

(यदि वा अहं अनृत-देवः अस्मि) जर मीं असत्याचा उपासक असेन, (अपि वा देवान् मोघं ऊहे) अथवा देवांची व्यर्थ उपासना केली असेल, तरी सुद्धां (जातवेदः अग्ने) हे जातवेद अग्ने ! (अस्मभ्यं हृणीषे किं) आमच्यावर रागावशील काय ? (द्रोघवाचः ते निर्ऋथं सचन्ताम्) द्रोहयुक्त भाषण करणारे ते विनाशास प्राप्त होवोत. (१४)

(यदि यातुधानः अस्मि) जर मीं पीडा करणारा असेन (यदि वा पुरुषस्य आयुः ततप) आणि जर मी कोणा मनुष्याच्या आयुष्यास तापदायक होईन तर (अद्य मुरीय) आजच माझा मृत्यु व्हावा. (अधा) आणि (यः मा मोघं यातुधान इति आह) मला जो विनाकारण दुष्ट म्हणतो. (सः दशभिः वीरैः वि यूयाः) तो दहा वीरांनीं वियुक्त होऊन वेगळा होवो. (१५)

भावार्थ— सर्व लोकांस हें सत्यज्ञान सांगण्यांत येतें कीं, सत्य आणि असत्याची स्पर्धा या जगांत चालू आहे. जें सत्य आहे आणि सरळ आहे त्याचें रक्षण परमेश्वर करतो आणि असत्य आहे त्याचा नाश करतो. (१२)

जो पाप करतो, मिथ्या व्यवहार करतो, जो असत्य बोलतो आणि जो मारपीट करतो त्यास बंधनांत ठेवलें पाहिजे, अथवा त्याचा वध केला पाहिजे. (१३)

जर आम्हीं असत्य बोलूं अथवा कपटी हृदयानें ईश्वराची आराधना करूं. तर आम्हांस अधोगति (प्राप्त) होवो. द्रोहयुक्त भाषण करणारे सर्व नाशास प्राप्त होतात. (१४)

जर मीं कोणास पीडादायक झालों असेन अथवा कोणाच्या स्वास्थ्यांत बिघाड केला असेल, तर माझा मृत्यु होवो. परंतु मीं कधीं असें केलें नाहीं. तरी मला जे दुष्ट म्हणून म्हणतात त्यांचे दहाही प्राण दूर जावोत. (१५)

यो मायातुं यातुधानेत्याह यो वा रक्षाः शुचिरस्मीत्याह ।
इन्द्रस्तं हन्तु महता वधेन विश्वस्य जन्तोरधमस्पदीष्ट ॥ १६ ॥
प्र या जिगाति खर्गलेव नक्तमप द्रुहुस्तन्वं1 गूहमाना ।
वव्रमनन्तमव सा पदीष्ट ग्रावाणो घ्नन्तु रक्षस उपब्दैः ॥ १७ ॥
वि तिष्ठध्वं मरुतो विक्ष्वीऽच्छत गृभायत रक्षसः सं पिनष्टन ।
वयो ये भूत्वा पतयन्ति नक्तभिर्ये वा रिपो दधिरे देवे अध्वरे ॥ १८ ॥
प्र वर्तय दिवोऽश्मानमिन्द्र सोमशितं मघवन्त्सं शिशाधि ।
प्राक्तो अपाक्तो अधरादुदक्तोऽभि जहि रक्षसः पर्वतेन ॥ १९ ॥
एत उ त्ये पतयन्ति श्वयातव इन्द्रं दिप्सन्ति दिप्सवोऽदाभ्यम् ।
शिशीते शक्रः पिशुनेभ्यो वधं नूनं सृजदशनिं यातुमद्भ्यः ॥ २० ॥

अर्थ— (यः मां अ-यातुं यातुधानः इति आह) जो यातना न देणाऱ्या मला दुष्ट असें संबोधितो (यः वा) आणि जो (रक्षाः) स्वतः राक्षस असून सुद्धां (शुचिः अस्मि इति आह) मी शुद्ध आहे असें म्हणतो, (इंद्रः तं महता वधेन हन्तु) इन्द्र त्यास मोठ्यांत मोठ्या शस्त्रानें मारून टाको आणि तो (विश्वस्य जन्तोः अधमः पदीष्ट) सर्व प्राण्यांहून नीच होऊन जावो. (१६)

(या नक्तं खर्गला इव) जी रात्रीच्या वेळीं घुबडाप्रमाणें (तन्वं गूहमाना) स्वतःचें शरीर लपवीत (प्रजिगाति) जाते आणि (द्रुहुः अपाजिगाति) द्रोह करून भटकते. (सा अनन्तं वव्रं पदीष्ट) ती खोल खाड्यांत पडो आणि (ग्रावाणः रक्षसः उपब्दैः घ्नन्तु) त्या राक्षसांस आवाज करून दगड मारोत. (१७)

हे (मरुतः) मरुत् हो ! (विक्षु वि तिष्ठध्वं) प्रजेमध्यें विशेष प्रकारें वास्तव्य करा, (इच्छत) स्वतःचें कार्य करण्याची इच्छा करा. (रक्षसः गृभायत) राक्षसांस पकडा आणि त्यांचें (संपिनष्टन) चूर्ण करा. (ये वयः भूत्वा) जे पक्ष्यांप्रमाणें होऊन (नक्तभिः पतयन्ति) रात्रीं फिरतात, (ये वा) अथवा जे (देवे अध्वरे रिपः दधिरे) देवाविषयीं यज्ञाविषयीं विनाशक भाव धारण करतात. (१८)

हे (मघवन् इंद्र) धनवान् इंद्रा ! (दिवः अश्मानं प्रवर्तय) द्युलोकांतून अश्मास्त्र चालीव आणि (सोमशितं सं शिशाधि) सोमाच्या योगानें तीक्ष्ण बनलेल्या शस्त्रांना नियमपूर्वक प्रेरित कर. (पर्वतेन) पर्वतास्त्रानें (प्राक्तः अपाक्तः अधरात् उदक्तः रक्षसः) समोरून, मागून, पुढून, वरून, राक्षसांचा (अभिजहि) विनाश कर. (१९)

(एते उ-श्व त्ये यातवः) हे आणि ते कुत्र्याप्रमाणें वागणारे दुष्ट (पतयन्ति) हल्ला करतात. (दिप्सवः अदाभ्यं इन्द्रं दिप्सन्ति) हिंसक शत्रु न दबणाऱ्या इन्द्राला त्रास देतात. (शक्रः पिशुनेभ्यः वधं शिशीते) इन्द्र त्या नीच दुष्टांना वधाची शिक्षा करतो; (यातुमद्भ्यः अशनिं नूनं सृजत्) व तो दुःख आणि यातना देणाऱ्यास शिक्षा करण्यासाठीं विजेस पाठवितो. (२०)

भावार्थ— मीं शुद्धाचारी असतां मला दुष्ट म्हणून जे म्हणतात आणि जे स्वतःच दुराचारी आहेत आणि तरी स्वतःच पवित्र म्हणून म्हणवितात, त्यांचा वध होवो आणि ते सर्व प्रकारच्या अधोगतीस प्राप्त होवोत. (१६)

जे घुबडाप्रमाणें रात्रीच्यावेळीं लपूनछपून दुष्ट भावानें संचार करतात, ते खोल दरींत पडोत आणि दगडांनीं त्यांचा वध करण्यांत येवो. (१७)

प्रजेमध्यें फार काळजीपूर्वक चौकी पहारे बसवा, दुष्टांस शोधून काढून बाहेर काढून लावण्याची इच्छा करा. दुष्टांस पकडून त्यांचें चूर्ण करा. त्यांस (मारून टाका) जे दुष्ट रात्री संचार करतात आणि ईश्वर तसेंच यज्ञाच्या विषयीं मनांत दुष्ट बुद्धि बाळगतात त्यांचा नाश करण्यांत यावा. (१८)

तुमच्या तीक्ष्ण शस्त्रास्त्रांनीं दुष्टांचा सर्व बाजूंनीं नाश करा. (१९)

जे कुत्र्यासारखे दुष्ट दुसऱ्याची हिंसा करतात, त्यांचा वध करण्यांत यावा, अथवा नाश करण्यांत यावा. (२०)

इन्द्रो यातूनामभवत्पराशरो हविर्मथीनामभ्याऽविवासताम् ।
अभीदु शक्रः परशुर्यथा वनं पात्रेव भिन्दन्त्सत एतु रक्षसः ॥ २१ ॥
उलूकयातुं शुशुलूकयातुं जहि श्वयातुमुत कोकयातुम् ।
सुपर्णयातुमुत गृध्रयातुं दृषदेव प्र मृण रक्ष इन्द्र ॥ २२ ॥
मा नो रक्षो अभि नड्यातुमावदपोच्छन्तु मिथुना ये किमीदिनः ।
पृथिवी नः पार्थिवात्पात्वंहसोऽन्तरिक्षं दिव्यात्पात्वस्मान् ॥ २३ ॥
इन्द्र जहि पुमांसं यातुधानमुत स्त्रियं मायया शाशदानाम् ।
विग्रीवासो मूरदेवा ऋदन्तु मा ते दृशन्त्सूर्यमुच्चरन्तम ॥ २४ ॥
प्रति चक्ष्व वि चक्ष्वेन्द्रश्च सोम जागृतम् । रक्षोभ्यो वधमस्यतमशनिं यातुमद्भ्यः ॥ २५ ॥

अर्थ—(इन्द्रः) इन्द्र (हविर्मथीनां) हवींच्या विनाशक (अभि आविवासतां) जवळ राहिलेल्या (यातूनां) यातना देणाऱ्या दुष्टांना (परा-शरः अभवत्) दूर करून नाश करणारा होतो. (यथा वनं परशुः) ज्याप्रमाणें रानांत कुऱ्हाडी लांकडें तोडतात, ज्याप्रमाणें (पात्रा इव) मातीची भांडी फोडून टाकण्यांत येतात, त्याप्रमाणें (शक्रः) समर्थ इंद्र (सतः रक्षसः भिन्दन्) उपस्थित राक्षसांस कापीत कापीत (इत् उ अभि एतु) पुढें जावो. (२१)

हे इन्द्रा ! (कोकयातुं) चिमण्याप्रमाणें व्यवहार करणारा अतएव कामी पुरुष, (शुशुलूकयातुं) लांडग्या-प्रमाणें वर्तन करणारा म्हणजे क्रोधी, (गृध्रयातुं) गिधाडाप्रमाणें वर्तन करणारा अर्थात् लोभी, (उलूकयातुं) घुबडा-प्रमाणें वागणारा म्हणजे मोहित, (सुपर्णयातुं) गरुडाप्रमाणें वागणारा म्हणजे घमेंडी (उत श्वयातुं) आणि कुत्र्याप्रमाणें आपापसांत भांडणारे म्हणजे मत्सरी लोक या सर्वांस (जहि) मारून टाक. (दृषदा इव) ज्याप्रमाणें धोंड्यानें पक्षी मारावेत तसा, (रक्षः प्रमृण) राक्षसांचा नाश कर. (२२)

(यातुमावत् रक्षः नः मा अभिनद्) यातना देणारे राक्षस आमच्या जवळ न येवोत. (ये किमीदिनः) जे भुकेले आहेत (मिथुनाः अप उच्छन्तु) घातक आहेत ते दूर पळून जावोत. (पार्थिवात् अंहसः) पृथ्वीसंबंधीं जें पाप आहे त्यापासून (पृथिवी नः पातु) पृथ्वी आमचें रक्षण करो. तथा (दिव्यात् अंहसः) द्युलोकासंबंधीं जें पाप आहे त्यापासून (अन्तरिक्षं अस्मान् पातु) अंतरिक्ष आम्हास वांचवो. (२३)

हे इन्द्रा ! (यातुधानं पुमांसं) यातना देणाऱ्या पुरुषास तसेंच (मायया शाशदानां स्त्रियं) कपटानें व्यव-हार करणाऱ्या स्त्रीचा (जहि) नाश कर. (मूरदेवाः विग्रीवासः ऋदन्तु) मूर्खांचे उपासक गळ्या विरहित होऊन नाशास प्राप्त होवोत. (ते उच्चरन्तं सूर्यं मा दृशन्) ते उदय होऊन वर येणाऱ्या सूर्यास पाहूं न शकोत. (२४)

हे सोमा ! (इन्द्रः प्रतिचक्ष्व) इंद्र निरीक्षण करो (विचक्ष्व) विशेष प्रकारें पाहो. तुम्ही दोघे (जागृतं) जागृत रहा. (रक्षोभ्यः यातुमद्भ्यः) राक्षस आणि पीडा देणाऱ्या सर्वांस (वधं अशनिं) मृत्युदंड आणि वज्रदंड (अस्यतं) द्या. (२५)

भावार्थ— यज्ञाचा नाश करणारा, हवनसामग्री बिघडविणारा, (भ्रष्ट करणारा) दुसऱ्यांस त्रास देणारा या सर्व दुष्टांस दूर करा आणि ज्याप्रमाणें कुऱ्हाडीनें जंगल कापलें जातें त्याप्रमाणें त्यांचा नाश करण्यांत यावा. (२१)

कामी, क्रोधी, लोभी, अज्ञानी, घमेंडी आणि मत्सरी या सहा प्रकारच्या दुष्टांचा नाश करा. (२२)

यातना देणारा आम्हांपासून दूर जावो. नेहमीं भुकेलेल्याप्रमाणें व्यवहार करणारे दुष्ट पळून जावोत. पृथ्वी आणि स्वर्गामुळें घडणाऱ्या सर्व पापांपासून आम्ही सुरक्षित रहावें. (२३)

यातना देणारे मग त्या स्त्रिया असोत अथवा पुरुष असोत त्यांचा नाश करा. मूर्खांच्या अनुयायांचे गळे कांपून टाकण्यांत यावेत. ते दुष्ट सूर्योदय होईपर्यंतसुद्धां न वांचोत. (२४)

निरीक्षण करा आणि सर्वत्र सर्वांचे अवलोकन करा. जागृत रहा, जो राक्षस घातपात करणारा आणि दुसऱ्यांस त्रास देणारा असेल त्यास वधाची शिक्षा देण्यांत यावी. (२५)

शत्रुदमन

दुष्टांचें दमन

दुष्ट मनुष्यांचें पारिपत्य करण्याचा विषय या सूक्तांत आहे. हाच विषय यापूर्वीच्या सूक्तांतहि होता. ' चातन ' ऋषिगणांतील सूक्तांत बहुशः असेच शत्रुदमनाचे विषय येतात. 'चातन' शब्दाचा अर्थसुद्धां हटविणें, दूर करणें, बाहेर काढून लावणें, नाश करणें, वगैरे आहे. या ऋषीच्या नांवाचा अर्थ त्यानें रचलेल्या सूक्तांतील विषयांत सांपडतो. या गोष्टीचा विशेष विचार करण्यासारखा आहे. शत्रूंस दूर करणाऱ्या अर्थाच्या सूक्त निर्मात्या ऋषीच्या नांवाचा अर्थसुद्धां ' शत्रूस हटविणें ' असा व्हावा हें नवलाचें आहे. बरें, अशा अर्थाचें एकच सूक्त आहे असें नाहीं, अथवा एकत्र ऋषि आहे असें नाहीं. कित्येक अन्य सूक्तांतसुद्धां ही गोष्ट दिसून येते. ऋग्वेदांत (ऋ. मं. १० सू. १०६ चा) ' उलो वातायनः ' नांवाचा ऋषि आहे आणि त्या सूक्तांचा विषय ' शुद्ध जीवन देणारा वायु ' असा आहे. वातायन म्हणजे खिडकी आणि खिडकीचा संबंध शुद्ध हवा घरांत यावी याशीं आहे. याप्रमाणें कित्येक ऋषींचीं नांवें आणि त्यांचीं सूक्तें यांचा परस्पराशीं संबंध आहे. ही गोष्ट मनन करण्यासारखी आहे. असो. या सूक्तांत दुष्टांचे दमन करण्याचा विषय आहे. म्हणून प्रथम दुष्टांची कित्येक लक्षणें येथें पाहूं. पूर्वसूक्तांत ज्या लक्षणांचा विचार होऊन गेला त्याची द्विरुक्ति येथें करणार नाहीं. या सूक्तांत जीं नवीं लक्षणें सांगितली आहेत तींच फक्त पाहूं—

दुष्टांचीं लक्षणें

पूर्वीच्या सूक्तांत, **' रक्षः, राक्षसः, भंगुरावत्, क्रव्यात्, किमीदिन्, यातुधान, मूरदेव '** असे शब्द दुष्टतावाचक आले आहेत. म्हणून त्यांचा अर्थ वाचकांनीं तेथेंच पहावा. जीं लक्षणें पूर्व सूक्तांत नाहींत आणि या सूक्तांत विशेष प्रकारें सांगण्यांत आलीं आहेत त्यांचाच आतां येथें विचार करणें आहे—

१. **तमो वृध्**– अज्ञानांस वाढविणारे, अज्ञान फैलावणारे, ज्ञानप्रसारास प्रतिबंध करणारे, ज्ञान देणाऱ्यास कष्ट देणारे, त्यास अडथळा करणारे. (मं. १)

२. **अचित्**– ज्याच्याजवळ चित्त म्हणजे हृदय नाहीं. म्हणजे अंतःकरण नसलेले, श्रेष्ठ माणसांप्रमाणें ज्यांचें चित्त उत्तम नाहीं, अथवा ज्यांच्या मनांत दुष्टतेचे विचार भरलेले आहेत. (Heartless) (मं. १) पूर्व सूक्तांत अशाच अर्थाचा शब्द (**दुर्हार्द्**) असा आला आहे.

३. **अत्रिन्**– (**अत्ति-इति**) जो दुसऱ्याचा जीव घेऊन स्वतःचें पोषण करतो म्हणजे परोपजीवी, स्वतःच्या स्वार्थासाठीं जो दुसऱ्याच्या गळ्यावर सुरी फिरविण्यास माघार घेत नाहीं असा. (मं. १)

४. **अघशंस**– पापकर्माविषयीं ज्याची प्रख्याति झाली आहे. जो त्याच्या पापकर्मांमुळेंच लोकांत प्रसिद्ध आहे. (मं. २)

५, **ब्रह्मद्विष्**– ज्ञानाचा द्वेष करणारा, ज्ञानास प्रतिबंध करणारा, ज्ञानप्रचारास हरकती आणणारा (मं. २) **तमो वृध्** हा शब्द याच अर्थाचा वाचक आहे.

६. **दुष्कृत्**– दुष्कर्म करणारा, पापी (मं. ३)

७. **द्रुह्**– द्रोह करणारा, जो विश्वासघात करतो, जो कपटानें व्यवहार करतो, जो अत्याचारी आहे. (मं. ७)

८. **अनृतेभिः वचोभिः अभिचष्टे**– जो असत्य भाषण करतो. खोटी साक्ष देऊन दुसऱ्यास दुःखदायक होतो. कष्ट देतो. (मं. ८)

९. **असतः वक्ता**– (मं. ८), **असत् वदन्**, (मं. १३) – असत्य बोलणारा.

१०. **ये एवैः वि-हरन्ते**– जे निरनिराळ्या साधनांनीं आणि मार्गांनीं अन्य जनांचें धन हिरावून घेतात. (मं. ९)

११. **स्वधाभिः भद्रं दूषयन्ति**– जे स्वशक्तीनें दुसऱ्यांस दूषण लावतात, जे अन्नाच्या योगानें सज्जनांस दूषित करतात, वाईट अन्नानें सज्जनांस कष्ट देतात. (मं. ९)

१२. **स्तेनः, स्तेनकृत्**– चोर आणि चोरी करणारा अथवा चोरांचें संघटन करणारा–टोळी करून राहणारा डाकू (मं. १०)

१३. **रिपुः**– जे शत्रुत्व करणारे आहेत. छळ कपट करणारे आहेत. (१०)

१४. **मिथुया धारयन्**– मिथ्या व्यवहार करणारा, मिथ्या भाव धारण करणारा. (मं. १३)

१५. **अनृत देवः**– असत्याचा उपासक, नेहमीं असत्य

भाषण आणि असत्य आचरण करणारा. (मं. १४)

१६. देवानां मोघं ऊहे (वहति)- जो देवास व्यर्थ उचलून फिरवितो. जो कपटानें देवांचे उत्सवादि करतो, जो स्वतः अभक्त असून स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठीं भक्तीचें ढोंग करतो. देवतांचे महोत्सव करतो. (मं. १४)

१७. द्रोहवाक्- द्रोहयुक्त भाषण करणारा, कठोर भाषण करणारा, दुसऱ्यास दुःख देण्यासाठीं कठोर भाषण करणारा, (मं. १४)

१८. रक्षः शुचिः अस्मि इति आह- जो स्वतः राक्षस असतां स्वतः शुद्ध आणि पवित्र आहें असें ढोंग करतो. (मं. १६)

१९. अयातुं यातुधान इत्याह- जो भल्या सज्जनास दुष्ट आणि दुर्जन म्हणते. (मं. १७)

२०. तन्वं गूहमाना नक्तं प्रजिगाति- लपून रात्रीचे- वेळीं हल्ला करतो. (मं. १७)

२१. दिप्सुः- हिंसक, घातकी. (२०)

२२. पिशुनः- चहाडी-चुगली करणारा. (मं. २०)

२३. हविर्मथिन्- हवींचा नाश करणारा. (मं. २१)

२४. कोकयातुः- चिमण्याप्रमाणें कामव्यवहार करणारा म्हणजे स्त्रीलंपट, कामव्यवहारांत आसक्त. (मं. २२)

२५. शुशुलूकयातुः- लांडग्याप्रमाणें क्रूरता दाखविणारा, क्रूरतेनें दुसऱ्याचा नाश करणारा महाक्रूर. (मं. २२)

२६. गृध्रयातुः- गिधाडाप्रमाणें दुसऱ्याचा प्राण गेला असतां आनंदित होणारा लोभी. याला पूर्व सूक्तांत ' असु-तृप् ' शब्द वापरला आहे. (मं. २२)

२७. सुपर्णयातुः- गरुडाप्रमाणें घमेंडी, गर्विष्ठपणें वाग- णारा. (मं. २२)

२८. उलूकयातुः- घुबडाप्रमाणें दिवसाच्या प्रकाशानें भिऊन जाऊन व्यवहार करणारा, महामूर्ख. (मं. २२)

२९. श्वयातुः- कुत्र्याप्रमाणें आपापसांत भांडणारा, स्वजातीयांशीं भांडणारा, दुसऱ्यासमोर शेंपूट हलवून भीक माग- णाऱ्या दीन कुत्र्याप्रमाणें नीच स्वभावाचा. (मं. २२)

३०. मायया शाशदानः- कपटानें सर्व व्यवहार करणारा, कपटी, छळ करणारा. (मं. २४)

इतकी दुष्टांचीं लक्षणें या सूक्तांत सांगितलीं आहेत. पूर्व सूक्तांत २१ आणि या सूक्तांत ३० दुष्टांची लक्षणें सांगितलीं आहेत. दोन्हीं सूक्तें मिळून एकावन्न दुष्ट लक्षणें झालीं. या एकावन्न लक्ष- णांनीं दुष्टांस ओळखतां येईल. हीं दुष्टांचीं आणि राक्षसांचीं लक्षणें आहेत. हीं लक्षणें भगवद्गीतेच्या १६ व्या अध्यायांतील आसुरी संपत्तीच्या लक्षणांशीं ताडून पहावीं म्हणजे दुष्ट कोण तें नक्की कळण्यास मदत होईल. हे राक्षस म्हणजे कोणी भिन्न प्रकारचे प्राणी नव्हेत. ते मानवजातीचेच दुष्ट स्वभावाचे स्त्री-पुरुष आहेत ही गोष्ट येथें ध्यानीं ठेवावी; म्हणजे या राक्षसांपासून स्वतःचें रक्षण करण्याचें तात्पर्य, स्वतःच्या समाजाचें अथवा मानवजातीचें या दुष्ट जनांपासून रक्षण करणें असा अर्थ आहे. म्हणून या सूक्तांत म्हटलें आहे—

प्रति चक्ष्व, विचक्ष्व, जागृतम् । (मं. २५)

' प्रत्येक स्थानांत पहा, बारकाईनें विशेष प्रकारें पहा, आणि जागृत रहा. ' हे तीन आदेशाचे शब्द आत्मसंरक्षणाच्या दृष्टीनें फार महत्त्वाचे आहेत. जे जनतेचें रक्षण करण्याच्या कार्यासाठीं नेमले गेले आहेत, जे स्वतः सेवाभावानें जनतेचें रक्षण करूं इच्छितात, त्यांनीं प्रथम जागें राहिलें पाहिजे. झोंपू नये. जागें राहिल्यानें स्वसंरक्षण होऊं शकतें. जे झोंपी जातात, सुस्त अस- तात, आळशी असतात ते स्वतःचें रक्षण करूं शकत नाहींत. जागे राहिले (**प्रतिचक्ष्व**) तरच ते प्रत्येक मनुष्याचा व्यवहार पाहूं शकतील; स्वतःचे आणि परक्या मनुष्यांचे व्यवहार पारखले पाहिजेत आणि आपले सहाय्यक कोण आणि घातक कोण आहेत यांचें निरीक्षण केलें पाहिजे. हें निरीक्षण (**विचक्ष्व**) विशेष प्रकारें केलें पाहिजे. फार गंभीरतेनें निरीक्षण केलें पाहिजे. कारण कित्येक शत्रु असे असतात कीं ते मित्रत्वाच्या नात्यानें आपणां- जवळ येतात; आणि कपटानें वेळ पाहून आपला गळा कापावयास कमी करीत नाहींत. इतक्या कुशलतेनें ते हें कार्य करतात कीं आपणांस त्याची जाणीवहि होऊं नये. म्हणून प्रत्येक गोष्टीचा मोठ्या दक्षतेनें विचार करावा; आणि बारकाईनें निरीक्षण करावें. स्वसंरक्षण करूं इच्छिणाऱ्यानें या तीन आज्ञा उत्तम रीतीनें ध्यानांत ठेवाव्यात. याच अर्थाची आज्ञा अधिक स्पष्टपणें १८ व्या मंत्रांत आली आहे ती पहा—

विक्षु वि तिष्ठध्वं, विक्षु इच्छत, रक्षसः गृभायत, रक्षसः संपिनष्टन । (मं. १८)

' प्रजाजनांत विशेष प्रकारें हजर रहा, प्रजाजनांत शांति, सुख स्थापन करण्याची इच्छा करा आणि या कार्यासाठीं राक्षसांस शोधून काढा, त्यांस पकडा आणि त्यांचें चूर्ण करा म्हणजे त्यांचा नाश करा. ' येथें प्रजेमध्यें विशेष प्रकारें जागृत रहाण्याची आज्ञा आहे. सामान्य मनुष्यें जशीं रहातात तसें रहाण्याची आज्ञा नाहीं. येथें वेद स्पष्ट सांगतात कीं असाधारण मनुष्याप्रमाणें प्रजाजनांत सर्वत्र संचार करा, आणि राक्षस कोण आहे, देव कोण आहे हें जाणून घ्या. सज्जनांचें रक्षण आणि

दुष्टांचा विनाश करण्यापूर्वी हे सज्जन कोण आणि दुष्ट जन कोण याचा निर्णय करावयास हवा. हा निर्णय विशेष प्रकारच्या निरीक्षणाशिवाय होणें शक्य नाहीं म्हणून तशी आज्ञा करण्यांत आली आहे.

(**विष्णु इच्छत**) प्रजाजनांत शांति आणि सुख स्थापन करण्याची इच्छा धारण करा. या विचारानें प्रजाजनांत विविध प्रकारें जागें राहिलें पाहिजे, हें उघड होतें. जे राक्षस आहेत असें निश्चयें करून आपल्या ध्यानांत येईल त्यांस (**गृभायत**) पकडून ठेवा. त्यांस जनसमुदायांत फिरणें बंद करा. त्यांच्या हालचाली नियंत्रित करा, आणि त्यांस (**संपिनष्टन**) चूर्ण करून टाका, म्हणजे दाबून टाका. वर डोकें काढूं देऊं नका. त्यांस दळून त्यांचे चूर्ण (पीठ) करावयाचें असा अर्थ नाहीं तर त्यांचें संघटन तोडून टाका. त्यांचें ऐश्य नष्ट करा. तें दृढ होऊं देऊं नका. त्यांस निरनिराळे करून त्यांचा नाश करा. त्यांस अयशस्वी करा. याविषयीं पहा—

रक्षसः प्राक्तो अपाक्तो अधरात् उदक्तः जहि । (मं. १९)

' त्या दुष्टांना समोरून, पाठीमागून, खालून, वरून, सर्व बाजूनीं प्रतिबंधांत ठेऊन त्यांचा नाश करा. ' येथें त्यांच्या शरीराचे तुकडे करा असा अर्थ नाहीं. त्यांची शरीरें अवश्य जिवंत रहावींत, पण त्यांची गति (**प्राक्तः**) समोरून अडवावी. (**अपाक्तः**) ते मागें सुद्धां जाऊं शकणार नाहींत असें करावें. (**अधरात्**) ते खालीं जाणार नाहींत आणि (**उदक्तः**) वर हि जाऊं शकणार नाहींत. म्हणजे चारी बाजूंनी त्यांची हालचाल याप्रमाणें बंद करावयाची आणि त्यांस असे प्रतिबंधांत ठेवावयाचें की ते कोणत्याहि प्रकारें दुष्टता करूं शकणार नाहींत. याप्रमाणें त्यांचें दुष्टत्व जर फुकट गेलें म्हणजेच त्याचा अर्थ पूर्ण नाश झाला. म्हणजे त्यांस दुष्ट कर्म करण्यास अडथळा करावयाचा. असा त्यांचा वा त्यांच्या दुष्टतेचा नाश या मंत्रांत अभिप्रेत आहे. म्हणूनच म्हटलें आहे कीं—

उभौ प्रसितौ शयाते । (मं. १३)

'दोन्ही प्रकारचे दुष्ट बंधनांत रहावेत' म्हणजे बंदिवासांत ठेवावेत ज्यामुळें मागेंपुढें, वरखाली कोणत्याहि प्रकारची ते हालचाल करूं शकणार नाहींत. हे दुष्ट स्त्रिया असोत अथवा पुरुष असोत त्यांस सारखेंच प्रतिबंधांत ठेवलें पाहिजे. या विषयीं खालील मंत्र पहाण्यासारखा आहे—

पुमांसं यातुधानं जहि । मायया शाशदानां स्त्रियं जहि । (मं. २४)

' पुरुष दुष्ट असो अथवा स्त्री कपटाचारिणी असो दोघांस एकाच प्रकारें निष्फळ केलें पाहिजे ' स्त्री आहे म्हणून ती क्षमा करण्यास योग्य आहे असें मुळींच नाहीं. कारण की दुष्ट जरी एकच असला तरी अनेकांस कष्ट देणारा तो होतो. म्हणून कोणाहि दुष्टास क्षमा करूं नये. सर्व दुष्ट लोकांनीं स्वतःचें दुष्टत्व सोडावें आणि सज्जन व्हावें, अशी व्यवस्था होणें आवश्यक आहे. राष्ट्रांत अशी व्यवस्था होणें आवश्यक आहे.

दुष्कृते सुगं मा भूत् । (मं. ७)

' दुष्ट कर्म करणारी माणसें वाटेल तेथें सहज न फिरावींत, ' त्यांच्या हालचालीवर प्रतिबंध असला पाहिजे. जेव्हां ते स्वतःच्या दुष्टपणाचा त्याग करतील तेव्हांच त्यांस देशांत वाटेल तेथें हिंडण्याफिरण्याचें स्वातंत्र्य असावें. यावरून असा बोध होतो कीं राज्यकर्त्यांनीं राष्ट्रांतील अथवा ग्रामाधिकाऱ्यानें गांवातील दुष्ट मनुष्यांची एक पूर्ण सूचि तयार करावी आणि त्यांच्यावर पूर्ण नजर ठेवावी. ते रहातात कोठें ? करतात काय ? त्यावर अशी कडक नजर ठेवावी कीं जेणेंकरून त्यांस वाईट कृत्यें करण्यास संधि मिळणार नाहीं. सज्जनांच्या रक्षणासाठीं दुष्टांवर असें दडपण ठेवणें आवश्यक आहे. म्हणूनच म्हटलें आहे कीं—

इयं मतिः विश्वतः परिभूतु । (मं. ६)

ही आत्मरक्षणाची आणि सज्जनांच्या रक्षणाची बुद्धि मनुष्यांत सर्वत्र म्हणजे नगरच्या सर्व नागरिकांत स्थिर होवो ' कोणी मनुष्यानें ती विसरूं नये, आणि—

वां मन्युमत् शवः सहसे अस्तु । (मं. ३)

' तुमचें उत्साहयुक्त बल तुमच्या विजय आणि शत्रूंच्या पराजयासाठीं कामास येवो. ' शत्रु म्हणजे ते दुष्ट ज्यांची लक्षणें या आणि पूर्वोक्त सूक्तांत वर्णिलीं आहेत. या दुष्टास दूर करण्यास आणि सज्जनांचें रक्षण करण्याच्या कामीं सर्व बल एकत्रित करून योजलें पाहिजे. असें करण्याचा उद्देश या सूक्ताचें मनन केल्यानें ध्यानीं येतो. दुष्टांचे संचार करण्याचे मार्ग बंद होतात आणि सज्जनांचे मार्ग खुले होतात. ही गोष्ट अनेक प्रयत्नाअंतीं का होईना पण साध्य व्हावयास पाहिजे. प्रत्येक मनुष्यानें स्वतःच्या कार्यक्षेत्रांत ही गोष्ट साध्य करण्यासाठीं प्रयत्नांची पराकाष्ठा करावी. हे प्रयत्न अशा स्वरूपाचे असावेत—

असतः वक्ता अ-सन् अस्तु । (मं. ८)

' असत्य भाषण करणारा म्हणजे दुष्ट मनुष्य (**अ-सन्**) नाहींसा होवो. ' नाहींसा याचा भावार्थ इतकाच कीं त्या दुष्ट मनुष्यावर प्रतिबंध ठेवण्यांत यावा किंवा त्यास बंदिवासात ठेवावें, चौकीपहारें यांत ठेवावें, त्याच्या हालचालींवर नजर ठेवावी. त्याचे

दुष्टतेचे मार्ग मोकळे न रहावे अथवा अशी व्यवस्था करावी की तो स्वतःची दुष्कर्मे कोणत्याहि प्रकारें करूं शकणार नाही. येथपर्यंत जें मनन केलें त्याचा मंत्रभागांशीं केवढा संबंध आहे तें वाचकांनीं येथें पहावें आणि या दुष्टांचा बंदोबस्त कसा होईल तें पहावें–

सत्याचा रक्षक ईश्वर

या सूक्तांत दुसरी एक महत्त्वाची गोष्ट सांगितली आहे ती म्हणजे, ' सत्याचा रक्षक परमेश्वर असतो,' सत्यमार्गानें चालणाऱ्यावर अनंत आपत्ति येऊन कोसळल्या तरी त्यानें आतां भिण्याचें कारण नाहीं, तो भिणारहि नाहीं. कारण कीं तो या आदेशानें पक्कें समजून आहे कीं त्याचा रक्षक परमेश्वर आहे. जेव्हां सत्याचा रक्षक परमेश्वर असतो तेव्हां त्यास कोण भिववूं शकेल ? या विषयीं पहा–

सुविज्ञानं चिकितुषे जनाय सच्चासच्च वचसी पस्पृधाते । तयोर्यत्सत्यं यतरदृजीयस्त- दित्सोमोऽवति हन्त्यासत् ॥ (मं. १२)

' हें उत्तम ज्ञान ज्ञानी होऊं इच्छिणाऱ्या मनुष्याच्या कल्याणासाठीं सांगण्यांत आलें आहे. सत्य आणि असत्य भाषणाची जगांत स्पर्धा चालू आहे. त्यामध्यें जें सरळ आणि सत्य असतें त्याचें परमेश्वर रक्षण करतो आणि जें असत्य आणि कुटिल असतें त्याचा नाश करतो, ' म्हणजे सरळ मार्गानें चालणाऱ्या, सत्याचें पालन करणाऱ्याचें परमेश्वर स्वतःच रक्षण करतो. आणि जें असत्य आणि कुटिल असतें त्याचा अथवा त्या मार्गानें जागाऱ्याचा, तसले व्यवहार करणाऱ्याचा नाश करतो. प्रत्येक मनुष्यानें देवाच्या घरचा हा नियम ध्यानीं बाळगून स्वतःचें आचरण सत्य आणि सरळ मार्गाचें ठेवावें. जे आपलें आचरण तसें ठेवतील ते कधीं दोषी ठरणार नाहींत आणि परमेश्वरी कोप त्यांस कधीं सहन करावा लागणार नाहीं. परमेश्वरी रक्षण प्राप्त करण्याचा हा एक उपाय आहे. वाचकवृंदानें या मार्गाचें अनुकरण करून परमेश्वरी रक्षण कवच प्राप्त करून त्यांत सुरक्षित रहावें आणि स्वतः सरळ आणि सत्यमार्गी होऊन स्वतःस कृतार्थ करावें अशी अपेक्षा आहे.

जे असें आचरण करतील आणि सत्य पालनाविषयीं सावध रहातील ते कधीं दुष्ट होणार नाहींत परंतु जे कुटिल व्यवहार करतात , असत्य भाषण करतात ते दुष्ट होतील. अशा दुष्टांना शिक्षा देण्याचें कार्य परमेश्वराचें आहे. त्यांस निरनिराळ्या प्रकारच्या शिक्षा देण्यांत येतात त्या अशा—

वधदंड

अशा दुष्टांस वधदंड देण्याविषयीं पुढील मंत्रभाग आहे—

अत्रिणः हतं न्योषतं,
अघशंसं तर्हणं वधं वर्तयतम् । (मं. ४)
द्रुहः भंगुरावतः रक्षसः हतम् । (मं. ७)
रक्षः हन्ति । असत् वदन्तं हन्ति । (मं. १३)
तं महता वधेन हन्तु । (१६)
पिशुनेभ्यो वधं शिशीते । (मं. २०)
रक्षोभ्यो वधं । (मं. २५)

' भोगी, पापी, द्रोही, नाश करणारे, असत्य भाषण करणारे, चहाडी करणारे, जे राक्षसी वृत्तीचे आहेत त्यांस वधदंड देणें योग्य आहे. त्याप्रमाणेंच—

दुष्कृतः अन्तरनारंभणे तमसि वव्रे प्रविध्यतम् । (मं. ३)

सा अनन्तं वव्रं अव पदीष्ट । (मं. १७)
अग्नितप्तेभिः अश्महन्मभिः तपुर्वधेभिः अत्रिणः विध्यतम् (मं. ५)

' दुष्ट कर्में करणाऱ्यांस अंधःकाराच्या जागीं ठेवा; आणि त्याच्यावर शस्त्राचे घाव घाला, अग्नींत तापवलेल्या, पोलादाच्या तयार केलेल्या घातक शस्त्रांनीं भोगी लोकांचा वेध करा. ' वेध करणें म्हणजे शस्त्रानें त्यांच्या शरीरावर घाव घालून त्यांस जखमी करणें. बाणानें अथवा बंदुकीच्या गोळीनें वेधणें. असे वेध दुरूनच करण्यांत येतात. याप्रमाणें—

यातुमद्भ्यः अशनिं सृजत् । (मं. २०)
यातुमद्भ्यः अशनिं अस्यतम् । (मं. २५)
मूरदेवा विग्रीवासः ऋदन्तु । (मं. २४)
तान् निर्ऋतेः उपस्थे आदधातु । (मं. ९)
द्रोघवाचः निर्ऋथं सचन्ताम् । (मं. १४)

' त्रास देणाऱ्यांवर वीज टाकण्यांत यावी. मूर्खांच्या उपासकांचे गळे कापून टाकण्यांत यावेत. ते नाशाच्या द्वारीं पोंहोचोत. द्रोहयुक्त भाषण करणारे नाशास प्राप्त होवोत.' अशाप्रकारें बहुंशी या शिक्षा वधदंडाच्याच आहेत. परंतु अन्य प्रकारचा नाश सुद्धां संभवतो. दगडांनीं दुष्टांचा वध करावयासुद्धां सांगितलें आहे.

ग्रावाणः रक्षसः उपब्दैः घ्नन्तु । (मं. १७)
दृषदा इव रक्षः प्रमृण । (मं. २२)

' दगडांनीं राक्षसांचा वध करण्यांत यावा. ' जे राक्षस आहेत असा एकवार निर्णय झाल्यावर त्यांस कोण्या एका जागीं उभे करून अथवा झाडास दोरीनें बांधून दुरून त्यांस दगड मारल्यानें त्यांचा वध होईल. या प्रकारची वध करण्याची पद्धति अफगाणिस्थानांत आजहि चालू आहे. वाचकांनीं विचार करून ठरवावें कीं ती रीत आणि प्रस्तुत मंत्रांत सांगितलेली रीत एकच आहे कीं भिन्न आहे.

देशांतून हद्दपार करणें

यातूनां पराशरः अभवत् । रक्षसः भिन्दन् एतु ।

' दुःख आणि यातना देणाऱ्यांस परत हटवणारा वीर राक्षसांस मारीत मारीत पुढें जातो. ' हें वीराचें लक्षण आहे. हा वीर त्रास देणाऱ्या दुष्टांचीं दुष्ट कृत्यें सहन करूं शकत नाहीं. येथें '**परा+शरः**' शब्द किती विचित्रपणें वापरला आहे तें पहा. (**परा**) दूर घेऊन जाऊन (**शर**) नाश करणारा जो वीर आहे त्यास पराशर म्हणतात. राक्षसांस समाजांतून आणि गांवांतून बाहेर काढलें पाहिजे. त्यांनीं गांवांत येऊन ग्रामवासीयांस त्रास देऊं नये या विषयीं वेदाचीं आज्ञा काय आहे ती पहा...

अचितः परा शृणीतं नुदेथाम् । (मं. १)
यतः एषां पुनः एकश्चन न उदयत् । (मं. ३)
यातुमावत् रक्षः नः मा अभिनड् । (मं. २३)
किमीदिनः मिथुना अपोच्छन्तु । (मं. २३)

' ज्यांचें हृदय कारुण्यपूर्ण नाहीं त्यांस दूर काढून लावावें, त्यांतील एकहि परत न येवो. मिथ्याचारी सर्व दूर पळून जावोत.' या सर्व आज्ञा दुष्टांस राज्यांतून बाहेर काढून लावावयास सुचवित आहेत. याप्रमाणें देशांतून हांकलून लावलेले दुष्ट देशांत अथवा गावांत पुनः येऊं नयेत. असें केल्यानें प्रजा सुखी होईल.

दुष्टांस त्रास द्यावा

दुष्ट दुर्जनांस त्रास देण्याचीसुद्धां एक शिक्षा या सूक्तांत सांगितली आहे. या खालीं दिलेल्या मंत्रपंक्तींत तापविणें याचा काय अर्थ असावा त्याचा विचार व्हावयास हवा.

रक्षः तपतं, उब्जतं । (मं. २)
अघशंसं अघं तपुः ययस्तु । (मं. २)

' राक्षस, दुष्ट, पापवृत्तीचे आहेत त्यांस त्रास द्या, तापवा. ' त्यांस संतप्त करा. कोणत्या प्रकारें, कोणत्या साधनांनीं त्यांस त्रास द्यावयाचा त्याचा येथें उल्लेख नाहीं; परंतु सूक्ताचा एकंदर विचार करतां आपल्याला असें वाटतें कीं दुष्टांस सर्व बाजूनीं अडवून त्यांस त्यांच्या दुष्ट कार्यापासून परावृत्त केलें, अडथळा केला, म्हणजे त्यांचा संताप होईल. अशा प्रकारचा संताप त्यांस आणावा असा अर्थ येथें करतां येईल.

दुष्टांचा द्वेष

खरें पाहिलें तर कोणीहि मनुष्यानें दुसऱ्याचा द्वेष करूं नये, परस्पर सर्वांनीं मित्रदृष्टीनें एक दुसऱ्यास पहावें. हा निःसंदेह धर्म आहे परंतु दुष्ट मनुष्य आणि दुष्टता यांचा द्वेष करण्याची आज्ञा येथें वेद देत आहे. याचा अर्थ असा कीं जर द्वेष करावयाचाच असला तर दुष्ट मनुष्याचा अथवा त्यांच्या दुष्ट कृत्यांचा द्वेष करणें योग्य होईल. पहा—

ब्रह्मद्विषे क्रव्यादे घोरचक्षसे किमीदिने अनवायं द्वेषो धत्तम् । (मं. २)

' ज्ञानाचा द्वेष करणारे, मांस खाणारे, क्रूर दृष्टीचे, सदा भोगासंबंधीं विचार करणाऱ्या दुष्टांचा निरंतर द्वेष करा. ' जर द्वेष करावयाचाच असला तर या अशा दुष्टांचा करा नाहींतर (**मित्रस्य चक्षुषा समीक्षामहे** । यजु.) मित्रदृष्टीनें सर्वांकडे पहा आणि कधींहि कोणाचा द्वेष करूं नका, द्वेष करावयाचाच असला तर दुष्टांचाच द्वेष केला पाहिजे. परंतु स्वतः शुद्धाचरणी होऊन दुष्टांचा द्वेष करणें योग्य आहे. मनुष्यानें स्वतः पापापासून दूर रहावें म्हणून अशी प्रार्थना करावी—

पार्थिवात् दिव्यात् च अंहसः नः पातु । (मं. २३)

' भूमिसंबंधीं तसेंच स्वर्गाच्या प्रयत्नांत जें पाप होईल त्यापासून आम्हांस वांचवा. ' अशा प्रकारें मनुष्यानें ईश्वराची प्रार्थना करावी. स्वतःस पापापासून वाचवावें. अशाच मनुष्यास म्हणजे स्वतःस पापापासून वांचविणाऱ्या मनुष्यास दुष्टांचा द्वेष करण्याचा अधिकार आहे. जो स्वतःच पाप करतो त्यास द्वेष करण्याचा अधिकार नाहीं.

पाप्याची अधोगति

पापी, दुष्ट, मनुष्यांची अधोगति होते. त्यांची दुष्कीर्ति होते. ते बदनाम होतात. याविषयीं या सूक्तांत खालील मंत्रभाग आढळतात—

अस्य यशः प्रति शुष्यतु ।...
यः दिवानक्तं दिप्सति स अधः अस्तु । (मं. ११)
स्तेयकृत् स्तेन रिपुः दभ्रं एतु ।
स तन्वा तना च निहीयताम् । (मं. १०)
स दशभिः वीरैः वियूयाः । (मं. १५)
विश्वस्य जन्तोः अधमः पदीष्ट । (मं. १६)

' या दुष्टाचें यश नष्ट होवो. जो रात्रंदिवस दुष्टत्व करतो त्याचें अधःपतन होवो. चोर, लुटारू दुष्ट, शत्रु, तन आणि धनानें हीन होवो. ते पुत्रपौत्रादि हीन होवोत. त्याचे दहाहि प्राण त्यास सोडून जावोत. असे दुष्ट सर्व प्राण्यापेक्षांहि खालीं पडोत म्हणजे त्यांची अवनति होवो. ' म्हणजे जे असे दुष्ट असतील त्यांस परमेश्वरी नियमानें अधोगति प्राप्त होवो. जोपर्यंत ते दुष्टत्वाचा त्याग करणार नाहींत तोपर्यंत त्यास उन्नतीची कांहीं आशा नाहीं. उन्नतीची इच्छा असेल तर दुष्टत्व सोडलेंच पाहिजे, ही गोष्ट सिद्ध होते. सर्व दुष्ट मनुष्यांस उन्नतीचा मार्ग खुला

आहेच. म्हणजे उन्नति करून घेणें त्यांच्या स्वाधीन आहे. ते जर वर सांगितल्याप्रमाणें, 'पापांपासून सुरक्षित रहाण्यासाठीं' ईश्वराची प्रार्थना करतील तर त्यांना दुष्टता सोडण्याची शक्ति अवश्य प्राप्त होईल. त्याचे नियम असे आहेत —

आत्मदंड

यः अ-यातुं यातुधान इत्याह ।
यः रक्षः शुचिः अस्मि इत्याह । (मं. १६)

'चांगल्यास वाईट म्हणावें आणि अपवित्रास पवित्र समजावें' हें दुष्टाचें लक्षण आहे. जे स्वतःच्या उन्नतीची इच्छा करतात त्यानीं असें वागूं नये. त्यांनीं चांगल्यास चांगलें, वाईटास वाईट, राक्षसास राक्षस, पवित्रास पवित्र आणि अपवित्रास अपवित्र म्हणण्याची संवय करावी. कोणासहि न भीतां असें नक्की म्हणत जावें आणि आपल्या मतास अनुकूल असेंच बोलण्यानें आत्मिक बल वाढतें. याप्रमाणें प्रत्येक मनुष्यानें म्हणावें कीं —

यदि यातुधानोऽस्मि, यदि वा पुरुषस्य, आयुः ततप, अद्या मुरीय । (मं. १५)

'जर मीं कोणास दुःख देणारा झालों अथवा कोणा मनुष्यास त्रास दिला तर आजच मीं मरून जाईन' याप्रमाणें उन्नति साधूं इच्छिणाऱ्यानें म्हणावें. जर स्वतःच्या हातानें कांहीं पाप अथवा दोष झाले असतील तर त्याचें प्रायश्चित्त करण्यास मनुष्यानें नेहमीं तयार असावें. स्वतःच्या हातानें कांहीं महान् दोष झाला असल्यास प्रसंगीं मरण्यासहि तयार असावें. ज्याची अशा प्रकारें अशी तयारी असेल तशी त्याची उन्नति होईल. वाचकानें हा उन्नति प्राप्त करण्याचा मार्ग मनांत बाळगून त्यावर पुष्कळ विचार करावा आणि शक्य तितक्या स्वतःच्या जीवनांत तो उतरविण्याचा प्रयास करावा. या आत्मदंडाच्या मार्गानें मनुष्यास शीघ्र उन्नति प्राप्त होते.

शत्रु निवारण

कांड ७, सूक्त ११७

(ऋषिः— अथर्वाङ्गिराः । देवता — इन्द्रः)

आ मन्द्रैरिन्द्र हरिभिर्याहि मयूररोमभिः ।
मा त्वा के चिद्वि यमन्विं न पाशिनोऽति धन्वेव ताँ इहि ॥ १ ॥

अर्थ— हे इंद्रा ! (मन्द्रैः मयूररोमभिः हरिभिः आयाहि) सुंदर मोराच्या पिसांप्रमाणें सुंदर घोड्यांसह तूं येथें ये. (पाशिनः विं न) ज्याप्रमाणें पक्ष्यांस जाळ्यांत पकडतात त्याप्रमाणें (त्वा केचित् मा वि यमन्) तुला कोणीं पकडणार नाहीं. (धन्व इव तान् अति इहि) वाळवंटांतून ज्याप्रमाणें वेगानें निघून जावें त्याप्रमाणें त्याचें अतिक्रमण कर (१)

भावार्थ— (इन्द्रः=इन्+द्र)शत्रूंचा नाश करणाऱ्या वीराचें हें नांव आहे. अशा वीरांनीं सुंदर घोड्यावर अथवा असे घोडे जोडलेल्या रथावर आरूढ होऊन ठिकठिकाणीं जावें. त्यांस प्रतिबंध करणारें कोणी नसावें, याच वीरांनीं दुष्टांस दाबून टाकून त्यांस प्रतिबंधांत ठेवावें व त्यांच्या दुष्ट कृत्यास अशा प्रकारें आळा घालावा.

शत्रूंचा नाश

कांड ७, सूक्त ११०

(ऋषिः — भृगुः । देवता — इन्द्राग्नी)

अग्न इन्द्रश्च दाशुषे हतो वृत्राण्यप्रति । उभा हि वृत्रहन्तमा ॥ १ ॥

अर्थ— हे अग्नि तूं आणि (इन्द्रः च) इन्द्र दोघे मिळून (दाशुषे) दान देणाऱ्यासाठीं (वृत्राणि अप्रति हतः) थोडीही चूक न करतां शत्रूंस मारून टाका. कारण कीं (उभा) तुम्हीं दोघे (हि वृत्रहन्तमा) शत्रूंचा नाश करणारे आहांत. (१)

याभ्यामजयन्त्स्व१रग्रं एव यावातस्थतुर्भुवनानि विश्वा ।
प्रचर्षणी वृषणा वज्रबाहू अग्निमिन्द्रं वृत्रहणा हुवेऽहम् ॥ २ ॥
उप त्वा देवो अग्रभीच्चमसेन बृहस्पतिः । इन्द्र गीर्भिर्न आ विश यजमानाय सुन्वते ॥३॥

अर्थ-(याभ्यां अग्रे एव स्वः अजयन्) ज्या दोघांच्या सहाय्यानें स्वर्गलोक प्रथमच जिंकून घेतला होता. (यौ विश्वा भुवनानि आतस्थतुः) जे दोघे सर्व भुवनांत संपूर्ण व्यापलेले आहेत, (प्र-चर्षणी) मनुष्य श्रेष्ठ, (वृषणा) बलवान् (वृत्र-हणा वज्रबाहू) शत्रूंचा वध करणारे शस्त्रधारी (अग्निं इन्द्रं अहं हुवे) अग्नि आणि इंद्राला मीं बोलावितों. (२)

हे इंद्रा ! (बृहस्पतिः देवः त्वा चमसेन उप अग्रभीत्) दानपति देव तुला चमच्यानें दान करीत आहे. सुन्वते यजमानाय) सोमयाजी यजमानासाठीं (नः गीर्भिः आविश) आम्हीं केलेल्या स्तुतीसह येथें प्रवेश कर.(३)

शत्रूचा नाश

कांड ४, सूक्त ४०

(ऋषिः– शुक्रः । देवता – ब्रह्म, बहुदैवत्यं)

ये पुरस्ताज्जुह्वति जातवेदः प्राच्या दिशोऽभिदासन्त्यस्मान् ।
अग्निमृत्वा ते पराञ्चो व्यथन्तां प्रत्यगेनान्प्रतिसरेण हन्मि ॥ १ ॥
ये दक्षिणतो जुह्वति जातवेदो दक्षिणाया दिशोऽभिदासन्त्यस्मान् ।
यममृत्वा ते पराञ्चो व्यथन्तां प्रत्यगेनान्प्रतिसरेण हन्मि ॥ २ ॥
ये पश्चाज्जुह्वति जातवेदः प्रतीच्या दिशोऽभिदासन्त्यस्मान् ।
वरुणमृत्वा ते पराञ्चो व्यथन्तां प्रत्यगेनान्प्रतिसरेण हन्मि ॥ ३ ॥

अर्थ— हे (जातवेदः) सर्वज्ञ ! (ये पुरस्तात् जुह्वति) जे समोरून आहुति देतात आणि (प्राच्याः दिशः अस्मान् अभिदासन्ति) पूर्व दिशेकडून आम्हांस दास करण्याचा प्रयत्न करतात, (ते अग्निं ऋत्वा पराञ्चः व्यथंतां) ते अग्नीला वश होऊन पराभूत झाल्यामुळें दुःखी होवोत. (एनान्०) त्यांचा पाठलाग करून आणि त्यांच्यावर हल्ला करून मीं त्याचा नाश करतों. (१)

हे (जातवेदः) सर्वज्ञ ! (ये दक्षिणतः जुह्वति) जे दक्षिण दिशेकडून आहुति देतात आणि (दक्षिणाया दिशः अस्मान् अभिदासन्ति) दक्षिण दिशेकडून आम्हांस दास करण्याचा प्रयत्न करतात (ते यमं ऋत्वा पराञ्चः व्यथन्तां) ते यमास प्राप्त होऊन पराजित होऊन दुःख पावोत (एनान्०) त्यांचा पाठलाग करून आणि त्याच्यावर हल्ला करून त्यांचा मी नाश करतों. (२)

हे सर्वज्ञ ! (ये पश्चात् जुह्वति) जे पाठीमागून आहुति देतात आणि (प्रतिच्याः दिशः अस्मान् अभिदासन्ति) पश्चिमदिशेकडून आमचा घात करूं इच्छितात. (ते वरुणं ऋत्वा०) ते वरुणास प्राप्त होऊन पराभवामुळें दुःखी होतात मीं त्यांच्यावर हल्ला करून त्यांचा नाश करतों. (३)

य उत्तरतो जुह्वति जातवेद उदीच्या दिशोऽभिदासन्त्यस्मान् ।
सोममृत्वा ते पराञ्चो व्यथन्तां प्रत्यगेनान्प्रतिसरेण हन्मि ॥ ४ ॥
येऽधस्ताज्जुह्वति जातवेदो ध्रुवाया दिशोऽभिदासन्त्यस्मान् ।
भूमिमृत्वा ते पराञ्चो व्यथन्तां प्रत्यगेनान्प्रतिसरेण हन्मि ॥ ५ ॥
येऽन्तरिक्षाज्जुह्वति जातवेदो व्यध्वाया दिशोऽभिदासन्त्यस्मान् ।
वायुमृत्वा ते पराञ्चो व्यथन्तां प्रत्यगेनान्प्रतिसरेण हन्मि ॥ ६ ॥
य उपरिष्टाज्जुह्वति जातवेद ऊर्ध्वाया दिशोऽभिदासन्त्यस्मान् ।
सूर्यमृत्वा ते पराञ्चो व्यथन्तां प्रत्यगेनान्प्रतिसरेण हन्मि ॥ ७ ॥
ये दिशामन्तर्देशेभ्यो जुह्वति जातवेदः सर्वाभ्यो दिग्भ्योऽभिदासन्त्यस्मान् ।
ब्रह्मर्त्वा ते पराञ्चो व्यथन्तां प्रत्यगेनान्प्रतिसरेण हन्मि ॥ ८ ॥

अर्थ—हे सर्वज्ञ ! (ये उत्तरतः जुह्वति) जे उत्तरदिशेकडून हवन करतात आणि (उदीच्याः दिशः०) उत्तर दिशेकडून आमचा नाश करूं इच्छितात, ते (सोमं ऋत्वा०) सोमास प्राप्त होऊन पराभवाचें दुःख भोगतात. मीं त्यांच्यावर हल्ला करून त्यांचा नाश करतों. (४)

हे सर्वज्ञ ! (ये अधस्तात् जुह्वति) जे खालून आहुति देतात आणि (ध्रुवायां दिशः०) ध्रुवदिशेकडून आमचा नाश करूं इच्छितात, ते (भूमिं ऋत्वा०) भूमीस प्राप्त होऊन पराभव झाल्यामुळें दुःखी होतात. त्यांच्यावर हल्ला करून मीं त्यांचा नाश करतों. (५)

हे सर्वज्ञ ! (ये अन्तरिक्षात् जुह्वति) जे अन्तरिक्षांतून आहुति देतात आणि (व्यध्वाया दिशः०) विशेष मार्ग असणाऱ्या दिशेनें आमचा नाश करूं इच्छितात ते (वायुं ऋत्वा०) वायूस प्राप्त होऊन पराभव पाऊन कष्ट भोगतात. मीं त्यांच्यावर हल्ला करून त्यांचा नाश करतों. (६)

हे सर्वज्ञ ! (ये उपरिष्टात् जुह्वति) जे वरील मार्गांतून आहुति देतात आणि (ऊर्ध्वाया दिशः०) ऊर्ध्व दिशेकडून आमचा नाश करूं इच्छितात, ते (सूर्यं ऋत्वा०) सूर्यास प्राप्त होऊन पराभव पावून कष्ट भोगतात. त्यांच्यावर हल्ला करून मी त्यांचा नाश करतों. (७)

हे सर्वज्ञ ! (ये दिशां अन्तर्देशेभ्यः जुह्वति) जे दिशा आणि उपदिशांच्या मधून आहुति देतात आणि जे (सर्वाभ्यः दिग्भ्यः०) सर्वदिशांनीं आमचा नाश करण्याचा प्रयत्न करतात, (ते ब्रह्म ऋत्वा०) ते ब्रह्मास प्राप्त होऊन पराभूत होऊन कष्ट भोगतात. त्यांच्यावर हल्ला करून मीं त्यांचा नाश करतों. (८)

शत्रूंचा नाश

शत्रूंचा नाश

जे लोक आमचा नाश करूं इच्छितात, आम्हांस दास करूं इच्छितात आणि अन्य मार्गांनें आम्हांस त्रास देतात ते सर्व आमचे वैरी आहेत. त्यांचा अवश्य प्रतिकार केला पाहिजे. जे आमचे शत्रु आहेत ते मागून-पुढून, खालून-वरून, डाव्या-उजव्या बाजूंनीं आमच्यावर हल्ला करतात व अशा प्रकारें आमचा

नाश करूं इच्छितात. कित्येक वेळां शत्रु अशा गुप्त प्रयत्नांनीं नाश करण्याचा मार्ग अनुसरतात कीं सामान्य माणसास हे त्यांचे प्रयत्न कळतहि नाहींत. अशा गुप्त शत्रूंचा नाश करणें मोठें कठिण काम आहे. या सूक्तांत ज्या शत्रूंचें वर्णन केलें आहे ते तर महान् धर्मभावनेचें ढोंग करणारे, आणि तसें करून विश्वास उत्पन्न करणारे आणि मग गुप्तपणें घात करणारे आहेत. हे शत्रु (**जुह्वति**) हवन करण्याचा प्रयत्न करतात, यज्ञयागादिक करून जनतेचें भलें करण्याचा स्वतःचा प्रयत्न आहे, असें लोकांस दर्शवून त्यांच्या मनांत विश्वास उत्पन्न करतात, आणि मग आंतून त्यांचा नाश करण्याची तयारी करतात. हवनांत असे अविधियुक्त पदार्थ म्हणजे मांसादि प्रयुक्त करतात, कीं त्यामुळें देशांत रोगराई फैलावी आणि त्यामुळें प्रजेचा नाश व्हावा. यज्ञ आणि हवनाच्य ढोंगामुळें अशीं अनर्थकारक कार्यें करणाऱ्यांचें जे प्रयत्न झाले त्यामुळें जनतेचें फार नुकसान झालें आहे, नाश झाला आहे. विधिपूर्वक केलेले यज्ञयाग तर आरोग्याची वृद्धि करणारे असतात, परंतु वर सांगितल्याप्रमाणें विधिहीन आहुति दिल्यानें जनतेचा घात होतो. ढोंगाच्या योगानें नाश करण्याचे याशिवाय दुसरे अनेक मार्ग आहेत. कित्येक शत्रु असे असतात कीं जे उपकार करण्याचा आव आणतात पण खरोखर ते अनर्थ आणि अहित करणारेच असतात. त्यांचा येथें विचार केला पाहिजे. अश शत्रूंचा नाश करणें फार कठिण काम असतें, परंतु त्यांचा नाश करणें तर आवश्यकच आहे; कारण उघड शत्रूपेक्षां असे लपून-छपून नाश करणारे शत्रु जास्त भयंकर आणि घातक होत. त्यांचा नाश करण्याचे कित्येक उपाय या सूक्तांत सांगितले आहेत. त्यासाठीं खालील कोष्टक पहा—

दिशा	देवता	गुण	कर्म
प्राचीन (पूर्व)	अग्नि	ज्ञान, तेज	अज्ञाननाश
दक्षिण	यम	नियमन	दुष्टास दंड देणें
प्रतीची (पश्चिम)	वरुण	निवारण	शत्रूंचें निवारण
उदीची (उत्तर)	सोम	शांति	शांतीचा उपाय
ध्रुवा	पृथ्वी	आधार	सज्जनांस आधार देणें
अन्तरिक्ष	वायु	बल, जीवन	बलाचा उपयोग
ऊर्ध्वा	सूर्य	प्रकाश	प्रेरणा करणें.

दिशांचे हे अनेक गुणधर्म पाहिले असतां मनुष्यास कळून येईल कीं शत्रूंस दूर करण्यास त्यानें काय करावें. प्रथम आपल्या लोकांचें अज्ञान दूर केलें पाहिजे, आणि त्यांस उत्तम प्रकारचें ज्ञान दिलें पाहिजे. ज्ञानसंवर्धनाच्या कार्यांत जे विघ्न करीत असतील त्यांस शिक्षा केली पाहिजे आणि पुनः केव्हांहि विरोध करणार नाहींत असा त्यांचा बंदोबस्त केला पाहिजे. इतकें केलें असतांहि जे प्रतिबंध करतील तर जरा कडक उपाय योजून सुद्धां त्यांचा विरोध मोडून काढला पाहिजे. प्रथम शांतीच्या मार्गानें वर सांगितलेला विरोध मोडून काढावा. आणि शांतिमार्ग जर अयशस्वी ठरतात असें दिसलें तर शक्तीचा उपयोग करावा, दुष्टांचें पारिपत्य करावें आणि सज्जनांचें रक्षण करावें. दुर्जनांचा नाश झाल्यानेंच जनतेस अभ्युदयाचा मार्ग मोकळा होईल. अशी व्यवस्था केल्यानें जनतेंत एवढी महान् शक्ति प्रगट होईल कीं शत्रु आपण होऊनच दूर होतील. आणि अडथळे आणणारे दुष्ट शत्रु तसें करण्यास असमर्थ ठरतील. शत्रु कोणत्याहि दिशेनें हल्ला करो, आपली संरक्षणाची योजना त्या दिशेस तयार पाहिजे. शत्रु बळानें हल्ला करील तर त्याचा बळानेंच प्रतिकार करावा. त्याचप्रमाणें शत्रु जीं जीं शस्त्रास्त्रें वापरील त्यांचा प्रतिकार करण्याची सर्व तयारी आपणांपाशीं उद्यत असावी. याप्रमाणें शत्रूस तोंड देण्याचें कार्य होत राहील तर जनतेंत शक्ति, प्रगति, आणि उन्नति होत राहील. देश शत्रुरहित होण्यानेंच मनुष्यांचा अभ्युदय होईल आणि त्यांस निःसंशय निःश्रेयस प्राप्त होण्याचा जास्त संभव आहे. शत्रूंचे हल्ले जर वारंवार होत राहतील तर उन्नतीची साधना अगदींच अशक्य !

त्यासाठीं कायावाचामनें करून आपणांजवळच्या सर्व साधनांचा उपयोग शत्रूंस दूर करण्यासाठीं केला जावा आणि आपलें आत्मिक बौद्धिक, मानसिक, शारीरिक आणि अन्य सर्व प्रकारचें बळ इतकें वाढविलें पाहिजे कीं त्यामुळें शत्रु आपणांसमोर उभा राहूं शकणारच नाहीं.

शत्रु-नाशन-सूक्त

कांड १, सूक्त १९

(ऋषिः- ब्रह्मा । देवता - ईश्वरः, ब्रह्म)

मा नो॑ विदन् विव्याधिनो॒ मो अ॑भिव्याधिनो॑ विदन् । आराच्छ॑रव्या॒३ अस्मद्विषू॑चीरिन्द्र पातय ॥१॥
विष्व॑ञ्चो अ॒स्मच्छर॑वः पतन्तु ये अ॒स्ता ये चा॒स्याः॑ । दैवी॑र्मनुष्येषवो॒ ममा॒मित्रा॒न् वि वि॑ध्यत ॥२॥
यो नः॒ स्वो यो अर॑णः सजा॒त उ॒त निष्ट्यो॒ यो अ॒स्माँ अ॑भि॒दास॑ति ।
रुद्रः॒ शर॒व्य॑यैतान् ममा॒मित्रा॒न् वि वि॑ध्यतु ॥३॥
यः स॒पत्नो॒ योऽस॑पत्नो॒ यश्च॑ द्वि॒षन् छपा॑ति नः । दे॒वास्तं सर्वे॑ धूर्वन्तु॒ ब्रह्म॒ वर्म॒ ममान्त॑रम् ॥४॥

अर्थ— (वि-व्याधिनः) विशेष प्रकार वेधणारा शत्रु (नः मा विदन्) आमच्यापर्यंत न पोंहोचो. (अभि-व्याधिनः) चारीबाजूनीं मारणारा आणि कापणारा शत्रु (नः मो विदन्) आमच्यापर्यंत कधींहि न पोंहोचो. हे (इन्द्र) परमेश्वरा ! (विषूचीः शरव्याः) सर्व बाजूनीं पसरणारे बाणसमुदाय (अस्मन् आरात् पातय) आम्हांपासून दूर पाड. (१) (ये अस्ताः) जीं फेंकली आहेत आणि (ये च अस्याः) जीं फेंकलीं जाणार आहेत, तीं सर्व (विष्वञ्चः शरवः) चारी बाजूस पसरलेलीं शस्त्रें (अस्मत् पतन्तु) आम्हांपासून दूर जाऊन पडोत. (दैवीः मनुष्येषवः) हे मनुष्याच्या दिव्य बाणानों ! (मम अमित्रान्) माझ्या शत्रूंना (विविध्यत) वेधून टाका. (२) (यः न स्वः) जे आमचे स्वतःचे अथवा (यः अरणः) जे दुसऱ्या जातीचे आहेत अथवा जे (स-जातः) समान उच्च जातीचे कुलीन (उत) अथवा जे (निष्ट्यः) भिन्न जातीचे अथवा वर्णसंकराचे, जातिहीन, (अस्मान् अभिदासति) आम्हांवर हल्ला करतात अथवा आम्हांस दास करण्याचे प्रयत्न करतात, (एतान् मम अमित्रान्) या माझ्या शत्रूंना (रुद्रः) रड-विणारा वीर (शरव्या विविध्यतु) बाणानें वेधून टाको. (३) (यः) जो (सपत्नः) विरोधी आणि (यः अस-पत्नः) जो उघडपणें विरोधी नाहीं (च यः द्विषन्) आणि जो द्वेष करून (नः शपाति) आम्हांस शाप देतो. (तं) त्याचा (सर्वे देवाः) सर्व देव (धूर्वन्तु) नाश करोत (मम अन्तरं वर्म) माझें आंतरिक कवच (ब्रह्म) ब्रह्मज्ञान आहे. (४)

भावार्थ— आमच्या वीर पुरुषांचें शौर्य असें असावें कीं आमचा नाश करण्याची इच्छा करणारे सर्व शत्रु आम्हांपासून नेहमीं दूर रहावेत. ते आम्हांपर्यंत कधीं न पोहोंचावेत. त्यांची शस्त्रेंसुद्धां आम्हांपासून दूर रहावीत. सर्व शस्त्रें आम्हांपासून दूर जाऊन पडावींत आणि आमच्या शत्रूंवरच सर्व शस्त्रें पडत रहावींत. (२) आमचा कोणीहि मित्र अथवा शत्रु, आमच्या जातीचा अथवा परजातीचा, कुलीन अथवा हीन कोणीहि असो, जर तो आम्हांस दास करूं इच्छील अथवा आमचा नाश करण्याचा प्रयत्न करीत असेल, तर शस्त्रानीं त्याचा नाश करावा हें योग्य होय. (३) जो प्रकट अथवा गुप्त रीतीनें आमचा नाश करूं इच्छील अथवा आम्हांस उद्देशून शापवचन अथवा अमंगल शब्द वापरीत असेल तर, सर्व सज्जनांनीं त्यास आमच्यापासून दूर करावें. सत्यज्ञान हेंच माझें आंतरिक कवच आहे. (४)

शत्रु-नाशन-सूक्त

हें ' सांग्रामिकगणां'तील सूक्त आहे त्यामुळें त्याचा संबंध ' अपराजितगणां'तील सूक्तांशीं सुद्धां आहे. म्हणून वाचकांनीं या गणांतील सूक्तांबरोबर त्याचाहि विचार करावा.

आन्तरिक कवच

या सूक्तांत जी सर्वांत महत्त्वाची गोष्ट सांगण्यांत आली आहे ती आंतरिक कवचाची आहे. देशाचें कवच, पर्वत, किल्ले आणि

समुद्र होय. त्याच्यामुळें बाहेरचे शत्रु देशात घूसूं शकत नाहींत. गावाचें कवच गली अथवा कोट, भुईकोट वगैरे होत ! त्यामुळें शत्रु गांवांत शिरूं शकत नाहीं. शरिरावर घालण्याचें कवच लोखंडी अथवा तारेचें असतें, त्यामुळें शत्रूंचीं शस्त्रें शरिरास लागत नाहींत. आणि शरिराचें रक्षण होतें, शरिराच्या आंत आत्मा आणि अंतःकरण आहे. मन, बुद्धि, चित्त आणि अहंकार मिळून अंतःकरण होतें. त्याच्या बरोबरच आत्म्याचेंहि वास्तव्य असतें. या ' अंतःकरणा ' साठीं ' अंतःकवच अवश्य असलें ' पाहिजे. तें या शत्रुनाशन सूक्तांत ' **ब्रह्म वर्म ममान्तरम्** ' या शब्दांनीं दर्शविलें आहे. ज्ञानरूपी कवचच माझें आंतरिक ' कवच ' आहे. ज्याचें मन आणि आत्मा ज्ञानरूपी कवचानें संरक्षित आहेत त्यास कोणत्याहि शत्रूची भीति बाळगण्याचें कारण नाहीं. ते अजातशत्रूच बनतात. हें ज्ञानरूपी कवच दर्शविण्यास ज्ञानवाचक ' ब्रह्म ' शब्द सूक्तांत वापरला आहे. तोच परमेश्वर अथवा ब्रह्मवाचक आहे आणि त्यामुळें या ब्रह्म शब्दाच्या योगानें ' परमात्म्याविषयीं आस्तिक्यबुद्धियुक्त ज्ञान एवढा अर्थ या शब्दानें समजणें योग्य होईल.

या सूक्ताचे दोन विभाग

या सूक्ताचे दोन विभाग होतात. प्रथम विभागांत प्रारंभापासून चतुर्थ मंत्राच्या तृतीय चरणापर्यंत सर्व सूक्त येतें आणि दुसऱ्या विभागांत फक्त चौथ्या मंत्राचा चौथा चरणच येतो. असे विभाग पाडून अर्थ समजून घेतल्यानें योग्य आणि पुष्कळ बोध मिळतो.

वैदिकधर्मांचें साध्य, ब्रह्मकवच

' परमात्म्याच्या भक्तीनें परिपूर्ण सत्य, सनातन ज्ञानच माझें कवच आहे. ' ब्राह्म कवचानें सुरक्षित होण्यामुळें मला कोणत्याहि शत्रूचें भय रहाणार नाहीं, असा आत्मविश्वास मनुष्यांत उत्पन्न करणें हें वैदिकधर्माचें साध्य आहे. असा भाव मनुष्यांत स्थापित करण्यासाठीं वैदिक धर्माचें शिक्षण आहे. पण हें ज्ञान क्वचित् काळीं थोड्याच अत्यंत पवित्र अशा महान् पुरुषांत उत्पन्न होतें आणि त्यापेक्षाहि थोड्या संतांना त्याचा साक्षात्कार होतो, ही गोष्ट आपणास इतिहासावरून दिसते. तरी हें ज्ञान जरी वेदांचे साध्य असलें, तरीसुद्धा तें सर्व मनुष्यांत साक्षात्कारानें सिद्ध होणें कठिणच आहे यांत कांहीं शंका नाहीं. त्यामुळें सामान्य मनुष्य आत्मिक दिव्यशक्तीला शरण जाण्याऐवजीं शारीरिक अतएव पाशवी शक्तीचाच आश्रय घेतो. म्हणून आमचें असें मत आहे कीं प्रथम विभागांतील मंत्रांतील मार्गदर्शन पाशवी शक्तीचा विचार करतांना सामान्य माणसास उपयुक्त होईल, आणि द्वितीय विभागांतील मंत्रभाग आत्मिक दिव्यशक्तीच्या मानवाचें अंतिम ध्येय दाखवील.

' आत्मिकशक्ति अथवा आत्मिक ज्ञानच माझें सर्वांहून श्रेष्ठ महान् कवच आहे. त्यामुळें मीं सर्व प्रकारच्या शत्रूंपासून सुरक्षित असतों. माझ्यांत जर संपूर्ण अहिंसेचा भाव स्थिर होईल तर माझ्या संपर्कांत जे जे कोणी येतील त्यांच्या मनांतीलहि शत्रुभाव दूर होईल. '

असें वैदिकधर्माच्या शिक्षणाचें अंतिम साध्य आहे. हीच गोष्ट मनुष्यानें शेवटीं स्वीकारण्याची आहे. पण हें बाह्य दाबामुळें स्वीकारावयाचें वा अंगिकारावयाचें नाहीं, तर अंतःस्फूर्तीनें तें व्हावयास हवें. असा आपला स्वभाव बनविला पाहिजे. या भावनेनें मनुष्याचें सर्वांहून अधिक कल्याण होईल.

अन्य कवच, क्षात्रकवच

शरिराचें, नगराचें, तसेंच देशाचें दुसरें कवच वर सांगितलेल्या विश्वासाच्या अभावामुळें आवश्यकच आहे. स्वसंरक्षणाचीं सर्व शस्त्रास्त्रें वगैरे या अवस्थेंतच सहाय्यरूप होतात. म्हणून जोंपावेतों जनता वर सांगितलेल्या अधिकारासाठीं योग्य होणार नाहीं, तोपावेतों शूरवीर क्षत्रियगणांनीं राष्ट्राचें संरक्षण या शस्त्रास्त्रांनीं करावें. हें क्षात्रसाधन आहे. ज्ञानकवचानें सुरक्षित होणें हें ब्रह्मसाधन आहे, आणि लोखंडी चिलखतानें आणि शस्त्रास्त्रानें सुरक्षित होणें हें क्षात्रसाधन आहे. ब्राह्मसाधन स्वीकारण्यायोग्य लोकांची तयारी अथवा उन्नति धर्मसाधनाच्या योगानें करावी. आणि जोपर्यंत तितकी उन्नति होणार नाहीं तोपर्यंत क्षात्रसाधनांनीं शत्रूंचा प्रतिकार करणें योग्य आहे. क्षात्रसाधनांनीं अनेक युद्धें झाल्यामुळेंच मनुष्य त्या साधनांच्या क्रूरतेचा अनुभव घेऊं शकतो आणि मग ब्राह्मसाधनांचा स्वीकार करण्याचा प्रयत्न करतो.

अशाप्रकारें युद्ध सुद्धां मनुष्यास ब्राह्मसाधनेकडे नेणारें एक साधन आहे.

दास्यभावनेचा नाश

तिसऱ्या मंत्रांत म्हटलें आहे कीं ' जे स्वतः अथवा इतरामार्फत आम्हांस दास करण्याचा प्रयत्न करतात त्यांचा नाश केला पाहिजे.' राष्ट्रीय पारतंत्र्य शारीरिक दास्यभावनेचें द्योतक आहे. याशिवाय मानसिक, बौद्धिक तसेंच वाचिक पारतंत्र्यहि आहे. आणि तेंच सर्वांत घातक आहे. आपणांस विघातक अशा कोणत्याहि पारतंत्र्याचा स्वीकार करतां कामां नये. पण त्या पारतंत्र्याचीं कारणें दूर केलीं पाहिजेत. आर्य कधीं दास झाले नाहींत. स्वाधीनता हेंच मनुष्याचें साध्य आहे. ज्ञान आणि पुरुषार्थाच्या योगानें

स्वाधीनता बंधनमुक्ति प्राप्त होऊं शकते, त्याचा अर्थहि हाच आहे. मनुष्याचीं सर्व दुःखें दास्यामुळेंच आहेत. म्हणून कोणी व्यक्तीनें अथवा राष्ट्रानें दुसऱ्या माणसास अथवा राष्ट्रांस दास्यांत जखडून ठेवण्याचा प्रयत्न करूं नये. आणि जर कदाचित् कोणी तसें करील तर अथवा कोणांकडून तसें घडलें तर इतर सर्व मनुष्यांनी त्याचा सक्त विरोध करावा.

दास्यभाव दूर करण्याच्या या सूक्तांतील उपदेशाचें मनन विशेष प्रकारें करून तें स्वतःच्या जीवनांत आणण्याचा प्रयत्न वाचकानीं करावा. या सूक्ताच्या अशाप्रकारें केलेल्या विचारानें पुष्कळ बोध प्राप्त होईल.

शत्रुदमन

कांड ७, सूक्त ७०

(ऋषिः- अथर्वा । देवता - श्येनः, देवाः)

यत्किं चासौ मनसा यच्च वाचा यज्ञैर्जुहोति हविषा यजुषा ।
तन्मृत्युना निर्ऋतिः संविदाना पुरा सत्यादाहुतिं हन्त्वस्य ॥ १ ॥
यातुधाना निर्ऋतिरादु रक्षस्ते अस्य घ्नन्त्वनृतेन सत्यम् ।
इन्द्रेषिता देवा आज्यमस्य मथ्नन्तु मा तत्सं पादि यदसौ जुहोति ॥ २ ॥
अजिराधिराजौ श्येनौ संपातिनाविव । आज्यं पृतन्यतो हतां यो नः कश्चाभ्यघायति ॥ ३ ॥
अपाञ्चौ त उभौ बाहू अपि नह्याम्यास्यम् । अग्नेर्देवस्य मन्युना तेन तेऽवधिषं हविः ॥ ४ ॥
अपि नह्यामि ते बाहू अपि नह्याम्यास्यम् । अग्नेर्घोरस्य मन्युना तेन तेऽवधिषं हविः ॥ ५ ॥

अर्थ— (असौ यत् किंच मनसा) हे शत्रु जे कांहीं मनानें आणि (यत् च वाचा) जे कांहीं वाणीनें करतात तसेंच जे कांहीं (यजुषा हविषा यज्ञैः जुहोति) यजु, हवि आणि यज्ञाच्या योगानें हवन करतात, (अस्य यत् संविदाना निर्ऋतिः) त्यांचा तो उद्देश जाणणारी संहारशक्ति (सत्यात् पुरा मृत्युना आहुतिं हन्तु) यज्ञ पूर्ण होण्यापूर्वीच मृत्यूनें त्यांची आहुति नष्ट करो. (१)

(यातुधाना रक्षः निर्ऋतिः) यातना देणारे, राक्षस आणि विनाशशक्ति हे सर्व (आत् उ अस्य सत्यं अनृतेन घ्नन्तु) निश्चयपूर्वक या दुष्ट शत्रूचा, सत्याचा सुद्धां असत्यानें घात करो,(इन्द्रः इषिताः देवाः) इन्द्रद्वारा प्रेरित देव (अस्य आज्यं मथ्नन्तु) या दुष्ट शत्रूच्या तुपाचें मन्थन करोत आणि (यत् असौ जुहोति तत् मा संपादि) ज्या उद्देशानें हें हवन होत आहे तो सिद्धीस न जावो. (२)

(अजिर-अधिराजौ संपातिनौ श्येनौ इव) शीघ्रगति पक्ष्यांच्या राजाप्रमाणें जेव्हां ससाणे एक दुसऱ्यावर तुटून पडतात, त्याच प्रकारें (यः कः च नः अभि अघायति) जो कोणी आम्हांस पापानें कष्ट देतो, तो (पृतन्यतः आज्यं हतां) सेनायुक्त शत्रूच्या तुपाचा नाश करतो. (३)

(ते उभौ बाहू अपाञ्चौ) तुझे (शत्रूचे) दोन्ही हात मागें वळवून बांधतों, (आस्यं अपि नह्यामि) तुझें तोंडहि बंद करतों, बांधतों (अग्नेः देवस्य तेन मन्युना) अग्निदेवाच्या त्या क्रोधानें (ते हविः अवधिषं) तुझ्या हवीचा नाश करतो. (४)

(ते बाहू अपि नह्यामि) हे शत्रु ! तुझे दोन्ही हात बांधतो (आस्यं अपि नह्यामि) तोंड सुद्धां बांधतों. (घोरस्य अग्नेः तेन मन्युना) भयानक अग्नीच्या त्या क्रोधानें (ते हविः अवधिषं) तुझ्या हवीचा मीं नाश करतों.(५)

शत्रुदमन

जो शत्रु स्वतःच्या (**पृतन्यतः**) सैन्याकडून आम्हांस त्रास देतो आणि (**नः अघायति**) आम्हांस पापी युक्त्यांनीं निरनिराळे कष्ट देतो, त्या दुष्ट शत्रूचे अन्य सर्व यज्ञादि प्रयत्न सफल न होवोत. असे दुष्ट शत्रु जें कांहीं सत्य कर्म करतात त्यांचा उद्देश एवढाच असतो कीं त्यांची शक्ति वाढावी आणि अशा वाढलेल्या शक्तीचा उपयोग आम्हांस दबविण्यास त्यांनीं करावा. दुष्ट लोक जें कांहीं सत्कर्म करतात तें सत्याच्या आवडीमुळें नव्हे, परंतु स्वतःची शक्ति वाढविण्यासाठीं करतात. त्यांची मनांतील इच्छा अशीच असते कीं ' या शक्तीनें आम्हीं निर्बळांस लुटूं, आणि स्वतःचे ऐषआराम वाढवूं.' म्हणून या सूक्तांत अशी प्रार्थना केली आहे कीं, अशा दुष्टांचीं सत्कर्में सुद्धां सफळ न होवोत, आणि त्यांची शक्ति न वाढो. दुष्टांची शक्ति कमी झाली तर जगांत शांति नांदू शकेल.

शत्रूचा नाश

कांड ६, सूक्त १३४

(ऋषिः– शुक्रः । देवता – वज्रः)

अयं वज्रस्तर्पयतामृतस्यावास्य राष्ट्रमप हन्तु जीवितम् ।
शृणातु ग्रीवाः प्र शृणातूष्णिहा वृत्रस्येव शचीपतिः ॥ १ ॥
अधरोऽधर उत्तरेभ्यो गूढः पृथिव्या मोत्सृपत् । वज्रेणावहतः शयाम् ॥ २ ॥
यो जिनाति तमन्विच्छ यो जिनाति तमिज्जहि । जिनतो वज्र त्वं सीमन्तमन्वञ्चमनु पातय ॥ ३ ॥

अर्थ— (**अयं ऋतस्य वज्रः तर्पयतां**) हें सत्याचें शस्त्र तृप्ति करो. हें (**अस्य राष्ट्रं अप हन्तु**) त्याच्या शत्रूनें वसविलेल्या राष्ट्राचा नाश करो आणि (**जीवितं अपहन्तु**) शत्रूच्या जीविताचा सुद्धां नाश करो. (**शचीपतिः वृत्रस्य इव**) इंद्रानें ज्याप्रमाणें वृत्राचा पराभव केला, त्याप्रमाणें या शत्रूची (**ग्रीवाः शृणातु**) मान कापून टाको, आणि (**उष्णिहा प्र शृणातु**) त्यांच्या नाड्या–रक्तवाहिन्या–कापून टाको. (१)

(**उत्तरेभ्यः अधरः अधरः**) उत्कृष्टांऐवजीं जास्त जास्त अवनतीस जाऊन (**पृथिव्या गूढः**) पृथ्वीच्या पोटांत तो लपून राहो, (**मा उत्सृपत्**) केव्हां हि वर न येवो. तसेंच (**वज्रेण अवहतः शयाम्**) वज्रानें हाणला जाऊन एक बाजूस पडून राहो. (२)

हे वज्रा ! (**यः जिनाति तं अन्विच्छ**) जे हानिकारक आहेत त्यांस शोधून काढ. (**यः जिनाति इत् तं जहि**) जो कष्ट देतो त्यास मारून टाक. (**त्वं जिनतः सीमन्तं अन्वञ्चम् अनुपातय**) दुःख देणाऱ्याचें मस्तक तूं सरळ खालीं पाड. (३)

भावार्थ— हें वज्र सत्याचें संरक्षण करतें, आणि असत्याचा नाश करतें. जे राष्ट्राचा नाश करूं इच्छितात त्या शत्रूंचा नाश या वज्रानें होईल. जे इतरांस त्रास देतात त्यांचा हें वज्र नाश करो. (१)

शत्रूंचें अधःपतन होवो. त्यांनीं पुनः कधींच वर डोकें काढूं नये आणि अंतीं वज्रानें हाणले जाऊन जमिनीवर पडावें. (२)

जे विनाकारण दुसऱ्याचा नाश करतात, त्यांचा नाश करणें योग्य आहे. त्या दुष्टाचें डोकें कापण्यांत यावें. (३)

वज्रादि शस्त्रांचा उपयोग

वज्रादि शस्त्रास्त्रांचा उपयोग जनतेची हानि करणाऱ्या दुष्टांचा नाश करण्याच्या कार्यासाठीं करावा; सत्यपक्षास सहाय्य करण्यास आणि असत्यपक्षाचा विरोध करण्याच्या कार्यांत या अशा शस्त्रांचा उपयोग करण्यांत यावा. असत्यपक्षाचे लोक वेळोवेळीं प्रबल होत गेले तरी ते नेहमीं खालींच पडतात. त्यांचा पक्ष असाच असतो कीं ते लोकांस वर येऊं देत नाहींत, त्यामुळें जनतेची हानि होते, म्हणून सर्वांनीं मिळून त्यांचा नाश करावा.

शत्रूचा नाश

कांड ६, सूक्त १३५

(ऋषिः-शुक्रः । देवता - वज्रः)

यदश्नामि बलं कुर्व इत्थं वज्रमा ददे । स्कन्धानमुष्य शातयन्वृत्रस्येव शचीपतिः ॥ १ ॥
यत्पिबामि सं पिबामि समुद्र इव संपिबः । प्राणानमुष्य संपाय सं पिबामो अमुं वयम् ॥ २ ॥
यद्गिरामि सं गिरामि समुद्र इव संगिरः । प्राणानमुष्य संगीर्य सं गिरामो अमुं वयम् ॥ ३ ॥

अर्थ - (यत् अश्नामि बलं कुर्वे) जें मीं खातों त्यानें मीं आपली शक्ति वाढवितों. (इत्थं वज्रं आददे) अशा प्रकारें मीं वज्र हातांत घेतों आणि (अमुष्य स्कन्धान् शातयन्) त्या शत्रूचे खांदे कापतो. (शचीपतिः वृत्रस्य इव) इंद्र ज्याप्रमाणें वृत्राला कापतो.

(यत् पिबामि संपिबामि) जें मी पितों तें नीट पितों. (समुद्रः इव संपिबः) समुद्राप्रमाणें पितों. (अमुष्य प्राणान् संपाय) त्या शत्रूच्या प्राणांस पिवून (वयं अमुं सं पिबामः) आम्हीं त्याला पिवून टाकतों. (२)

(यत् गिरामि संगिरामि) जें मीं गिळतों तें नीट गळयाखालीं उतरवितों. (समुद्रः इव संगिरः) समुद्राप्रमाणें गिळतों. (अमुष्य प्राणान् संगीर्य), त्याच्या प्राणांस संपूर्णपणें गिळून (वयं अमुं संगिरामः) आम्ही त्यास गळयाखालीं उतरवून टाकतों.

भावार्थ— जें मी खातों आणि गळयाखालीं उतरवितों, त्यानें मीं आपल्यामध्यें बळ उत्पन्न करतों. ज्याप्रमाणें समुद्र नद्या आणि पावसाचें पाणी पितो आणि स्वतःशीं समरस करून टाकतो, त्याप्रमाणें मी सुद्धां खाऊन पिऊन त्याचा रस पचवून टाकतों आणि त्याच्यायोगें माझी स्वतःची शक्ति मी वाढवितों· आणि त्या बळानें युक्त होऊन हातांत सत्यपक्षाच्या रक्षणासाठीं शस्त्र घेतों आणि दुष्टांचा नाश करतों. (१-३)

आपली शक्ति वाढवून तिचा उपयोग दुष्टांचें दमन करण्याच्या कार्यांत केला पाहिजे.

शत्रूचा नाश

कांड ६, सूक्त १०३

(ऋषिः- उच्छोचनः । देवता - इन्द्राग्नी, बहुदेवतम्)

संदानं वो बृहस्पतिः संदानं सविता करत् । संदानं मित्रो अर्यमा संदानं भगो अश्विना ॥ १ ॥

अर्थ— हे शत्रूंनों ! (बृहस्पतिः वः संदानं करत्) बृहस्पति तुमचें हनन करो, (सविता संदानं) सविता नाश करो, (मित्रः संदानं अर्यमा संदानं) मित्र आणि अर्यमा तुकडे करो. (भगः अश्विना संदानं) भग आणि अश्वीदेव तुमचा नाश करोत. (१)

भावार्थ— ज्ञानी, शूर, मित्र, न्याय करणारे, धनवान्, घोडेस्वार हे सर्व राष्ट्राच्या रक्षणासाठीं आपापल्या शक्तीनें शत्रूचा संहार करोत, कोणीहि भिवून मागें राहूं नये. (१)

सं परमान्त्समवमानथो सं द्यामि मध्यमान् । इन्द्रस्तान्पर्यहार्दाम्ना तानग्ने सं द्या त्वम् ॥ २ ॥
अमी ये युधमायन्ति केतून्कृत्वानीकशः । इन्द्रस्तान्पर्यहार्दाम्ना तानग्ने सं द्या त्वम् ॥ ३ ॥

अर्थ— शत्रूंच्या (परमान् अवमान् अथो मध्यमान् सं सं सं द्यामि) दूरच्या, जवळच्या आणि मधल्या सैनिकांस मी कापतों, (इन्द्रः तान् परि अहाः) इन्द्र त्या सर्वांचें निवारण करो, हे अग्ने ! (त्वं तान् दाम्ना सं द्य) तूं त्यांना पाशांनीं बांधून ठेव. (२)

(केतून् कृत्वा) ध्वज घेऊन (अमी ये अनीकशः युद्धं आयन्ति) हे जे आपापल्या तुकडीसह युद्धासाठीं येत आहेत, (तान् इन्द्रः परि अहाः) इन्द्र त्या सर्वांचें निवारण करो, हे अग्ने ! (त्वं तान् दाम्ना सं द्या) तूं त्यांना पाशांनीं बांधून ठेव. (३)

भावार्थ— शत्रुसेनेंत जे जवळचे, मधले आणि दूरचे सैनिक आहेत. त्यांचें निवारण केलें जावें आणि जे जवळ सांपडतील त्यांस आपल्या आधीन करून ठेवावें. (२)

जे सैनिक ध्वज उचलून लहान लहान विभागांनीं मिळून हल्ला करतात, त्यांचासुद्धां याप्रमाणें नाश करावा. (३)

शत्रूचें दमन

ज्यावेळीं राष्ट्ररक्षणाचा प्रश्न उपस्थित होतो, त्यावेळीं (**बृहस्पति**) ज्ञानी जन, (**सविता**) शूरवीर, (**मित्र**) मित्रदलाचे लोक, (**अर्य-मा**) न्याय करणारे. श्रेष्ठ कोण आहे आणि कोण नाहीं याचा निश्चय करणारे, (**भगः**) ऐश्वर्यवान्, (**अश्विनौ**) घोडेवाले म्हणजे घोड्यावर स्वार होणारे वीर, (**इन्द्र**) नरेंद्रमंडळ, शूर, वीर, (**अग्निः**) प्रकाशक वगैरे सर्व प्रकारचे लोक, आपल्या राष्ट्राच्या रक्षणासाठीं कटिबद्ध होऊन त्यांनीं हरएक प्रकारानें शत्रूचा नाश करावा, आणि आपल्या राष्ट्राचा बचाव करावा. त्यांच्यापैकीं कोणीं मागें राहूं नये. आपापल्या शक्तीप्रमाणें जें होऊं शकेल तें प्रत्येक मनुष्यानें करावें, आणि आपल्या राष्ट्राचें रक्षण करावें.

या सूक्तांत जीं देवतावाचक नांवें आलीं आहेत, ते देवांच्या दिव्यराष्ट्रांतील अधिकारी आहेत, देवराष्ट्रांत त्यांचीं कार्यें निश्चित आहेत. तींच कार्यें करणाऱ्या मानवराष्ट्रांतील अधिकाऱ्यांनीं त्याचप्रमाणें आपापलीं कामें करावींत, आणि आपल्या राष्ट्राचें रक्षण करावें, हा या सूक्ताचा आशय आहे. जसें देव करतात तसें मनुष्यांनीं येथें करावें आणि देव व्हावें.

शत्रूचा पराजय

कांड ६, सूक्त १०४

(ऋषिः- प्रशोचनः । देवता - इन्द्राग्नी बहवोदेवताः)

आदानेन संदानेनामित्राना द्यामसि । अपाना ये चैषां प्राणा असुनासून्त्समच्छिदन् ॥ १ ॥

अर्थ— (आदानेन संदानेन) पकडून आणि घेरून (अमित्रान् आ द्यामसि) शत्रूंचा नाश करतात. (एषां ये च प्राणाः अपानाः) त्यांचे जे प्राण आणि अपान आहेत, त्या (असून् असुना सं अच्छिदन्) प्राणांस प्राणांनींच कापून टाकावें. (१)

भावार्थ— शत्रूंस पकडून त्यांस प्रतिबंधांत ठेवण्याच्या योगानें आम्हीं त्यांचा नाश करतों. त्यांच्या प्राणांचें बलसुद्धां आम्हीं कमी करतों. (१)

इदमादानमकरं तपसेन्द्रेण संशितम् । अमित्रा येऽत्र नः सन्ति तानग्न आ द्या त्वम् ॥ २ ॥
ऐनान्द्यतामिन्द्राग्नी सोमो राजा च मेदिनौ । इन्द्रो मरुत्वानादानममित्रेभ्यः कृणोतु नः ॥ ३ ॥

अर्थ—(**इन्द्रेण तपसा संशितं**) इन्द्रानें तपाच्या योगानें तीक्ष्ण केलेला (**इदं आदानं अकरं**) हा पाश मीं बनविला आहे, (**ये अत्र नः अमित्राः सन्ति**) जे येथें आमचे शत्रु आहेत, हे अग्ने ! (**तान् त्वं आद्य**) त्यांचा तूं नाश कर. (२)

(**इन्द्राग्नी एनान् आ द्यतां**) इन्द्र आणि अग्नि यांचा नाश करोत. (**सोमः राजा च मेदिनौ**) सोम आणि राजा सुद्धां आनंदानें हें कार्य करोत. (**मरुत्वान् इन्द्रः**) मरुतांसह इन्द्र (**नः अमित्रेभ्यः आदानं कृणोतु**) आमच्या शत्रूंस पकडून ठेवो. (३)

भावार्थ—तपाच्या योगानें बनविलेला हा पाश आहे, त्यानें शत्रूस बांध आणि त्यांचा नाश कर. (२)
सर्व देव शत्रूंचा नाश करण्याच्या कामीं आम्हांस साहाय्य करोत. (३)

शत्रूंस पकडणें

शत्रूंस पकडून त्यांस प्रतिबंध केला पाहिजे. त्यांच्या शत्रुत्वाचा प्रतिबंध झाला तर तो शत्रु नष्ट झाला, हें उघड आहे. आपल्या तपाच्या प्रभावानें शत्रूंस प्रतिबंध होतो आणि आपलें तप न झालें तर शत्रु प्रबळ होतो. याचा अनुभव प्रत्येक मनुष्य घेऊं शकतो, म्हणून याविषयीं अधिक लिहिण्याची आवश्यकता नाहीं.

शत्रूच्या तेजाचा नाश

कांड ७, सूक्त १३

(ऋषिः- अथर्वा [द्विषोवर्चोहर्तुकामः] । देवता - सूर्यः)

यथा सूर्यो नक्षत्राणामुद्यंस्तेजांस्याददे । एवा स्त्रीणां च पुंसां च द्विषतां वर्च आ ददे ॥ १ ॥
यावन्तो मा सपत्नानामायन्तं प्रतिपश्यथ । उद्यन्त्सूर्य इव सुप्तानां द्विषतां वर्च आ ददे ॥ २ ॥

अर्थ— (**यथा उद्यन् सूर्यः**) ज्याप्रमाणें उदय पावणारा सूर्य (**नक्षत्राणां तेजांसि आददे**) नक्षत्रांचे प्रकाश काढून घेतो, (**एवा द्विषतां स्त्रीणां च पुंसां च**) त्याप्रमाणें द्वेष करणाऱ्या स्त्रियांचें आणि पुरुषांचें (**वर्चः आददे**) तेज मी घेतों. (२)

(**सपत्नानां यावन्तः**) शत्रूंपैकीं जितके (**मा आयन्तं प्रतिपश्यत**) मला येतांना पहातात, त्या (**सुप्तानां द्विषतां वर्चः आददे**) झोंपलेल्या शत्रूंचें तेज मीं खेंचून घेतों, (**सूर्यः इव**) ज्याप्रमाणें सूर्य घेतो. (२)

भावार्थ— शत्रु स्त्री असो अथवा पुरुष असो, तो झोंपलेला असो अथवा जागृत असो, जो कोणी शत्रुत्व करणारा आहे त्याचें तेज कमी केलें पाहिजे; म्हणजे त्याच्यापेक्षां आपलें तेज वाढवावें. (१-२)

शत्रूच्या तेजाचा नाश

या सूक्तांत शत्रूचें तेज कमी करण्याचा उपाय सांगितला आहे. वाचकांनीं तो उत्तम प्रकारें मनन करावा. नक्षत्र आणि सूर्याच्या उपमेनें हा विषय सांगितला आहे. ज्याप्रमाणें सूर्योदयापूर्वी नक्षत्रें चमकत असतात, परंतु सूर्याचा उदय होतांच त्या नक्षत्रांचें तेज कमी होतें. यामध्यें नक्षत्रांचें तेज कमी करण्यासाठीं सूर्य कांहीं प्रयत्न करीत नाहीं, परंतु सूर्य आपलें तेज वाढवीत असल्यामुळें आपोआप नक्षत्रांचें तेज कमी होतें, त्याचप्रमाणें द्वेष करणाऱ्यांचा विचार न करतां आपलें तेज वाढविण्याचा यत्न केला पाहिजे. जे शत्रूचें तेज कमी करण्याचा प्रयत्न करतील ते फसतील, परंतु जे सूर्याप्रमाणें आपलें तेज वाढविण्याचा प्रयत्न करतील त्यांचा अभ्युदय होईल. शत्रूचा विचार करतांना वाचकांनीं 'सूर्य आणि नक्षत्रें' यांची आठवण ठेवावी. त्यामुळें वाचकांस कळून येईल कीं शत्रूचें तेज कमी करण्यासाठीं काय केलें पाहिजे. शत्रूच्या शक्तीपेक्षां कितीतरी पट शक्ति आम्हीं प्राप्त केली पाहिजे. त्यामुळें शत्रूची शक्ति आपोआप कमी होईल आणि तो स्वतः खालीं दबून जाईल.

शत्रूला दूर करणें

कांड ६, सूक्त ९७

(ऋषिः- अथर्वा । देवता - देवः, मित्रावरुणौ)

अभिभूर्यज्ञो अभिभूरग्निरभिभूः सोमो अभिभूरिन्द्रः ।
अभ्य१हं विश्वाः पृतना यथासान्येवा विधेमाग्निहोत्रा इदं हविः ॥ १ ॥
स्वधास्तु मित्रावरुणा विपश्चिता प्रजावत्क्षत्रं मधुनेह पिन्वतम् ।
बाधेथां दूरं निर्ऋतिं पराचैः कृतं चिदेनः प्र मुमुक्तमस्मत् ॥ २ ॥
इमं वीरमनु हर्षध्वमुग्रमिन्द्रं सखायो अनु सं रभध्वम् ।
ग्रामजितं गोजितं वज्रबाहुं जयन्तमज्म प्रमृणन्तमोजसा ॥ ३ ॥

अर्थ— (**यज्ञः अभिभूः**) यज्ञ शत्रूचा पराभव करतो, (**अग्निः अभिभूः**) अग्नि शत्रूचा पराभव करतो, (**सोमः अभिभूः**) सोम शत्रूचा पराभव करतो, (**इन्द्रः अभिभूः**) इन्द्र शत्रूचा पराभव करतो. (**यथा अहं विश्वाः पृतनाः अभि असानि**) ज्याप्रमाणें मीं सर्व सेनांचा पराभव करतों. (**एवा**) त्याचप्रमाणें आम्हीं सुद्धां (**अग्निहोत्राः इदं हविः विधेम**) अग्निहोत्र करणारे होऊन या हवीला समर्पण करूं या. (१)

हे (**विपश्चिता मित्रावरुणा**) ज्ञानी मित्र आणि वरुण हो ! तुम्हांसाठीं (**स्वधा अस्तु**) हा अन्नभाग असो. (**प्रजावत् क्षत्रं इह मधुना पिन्वतं**) प्रजायुक्त क्षत्रिय बल येथें मधुरतेनें वाढो. (**निर्ऋतिं पराचैः दूरे बाधेथां**) दुर्गतीस दूर करून तिचा दूरच नाश करा, आणि (**कृतं चित् एनः**) केलेल्या पापाला सुद्धां (**अस्मत् प्रमुमुक्तं**) आम्हांपासून दूर करा. (२)

हे (**सखायः**) मित्र हो ! (**उग्रं ग्रामजितं गोजितं वज्रबाहुं वीरं**) उग्र स्वभावयुक्त, गांवांस जिंकणाऱ्या, गायींस जिंकणाऱ्या अथवा इंद्रियांस वश करणाऱ्या, वज्रधारण करणाऱ्या वीरा ! (**ओजसा अज्म प्रमृणन्तं**) बळानें शत्रु-बळाचा नाश करणाऱ्या आणि (**जयन्तं**) विजय करणाऱ्या (**इन्द्रं अनु सं रभध्वं**) इन्द्राला अनुकूळ आपले सर्व व्यवहार करावे. (३)

भावार्थ— यज्ञ म्हणजे परोपकार, अग्नि, सोमादि औषधी, शूर वीर हे सर्व आपापल्या शत्रूंना दूर करतात. त्याचप्रकारें मींसुद्धां सेनांसह आक्रमण करणाऱ्या शत्रूंवर विजय प्राप्त करीन. मी या विजयासाठीं असें आत्मसमर्पण करीन कीं जसें अग्निहोत्रांत हविर्द्रव्य आपलें आत्मसमर्पण करतें. (१)

या राज्यांत सर्व क्षत्रियांना उत्तम शूर वीर मुलेंबाळें असोत आणि त्यांनीं राष्ट्रांत अशी व्यवस्था करावी कीं त्यामुळें सर्व दुर्गति नष्ट होईल आणि सर्व पापें दूर होतील. (२)

जो शत्रूंचीं गांवें जिंकणारा, शूर, वीर शस्त्र धारण करणारा आपल्या बळानें शत्रुसेनेचा नाश करतो, त्या विजय संपादन करणाऱ्या वीराला अनुकूल असें आपलें आचरण करा. (३)

शत्रूला दूर करणें

विजयाचीं साधनें

या सूक्तांत विजयाच्या कित्येक साधनांचें वर्णन केलें आहे. पहिल्या मंत्रांत या साधनांची गणना केली आहे, पहा-

१. **यज्ञः-** यज्ञानें विजय होतो. हें सर्वांत मुख्य साधन आहे. यज्ञ म्हणजे ' सत्कार, संघटन आणि उपकार. ' सत्कार करण्यास योग्य जे आहेत त्यांचा सत्कार करावा, आपलें अंतर्गत बळ

संघटनानें वाढवावें, आणि दुर्बलांवर उपकार करावें, हा आहे यज्ञ. या यज्ञानें वैयक्तिक, सामाजिक आणि राष्ट्रीय सर्व शत्रु दूर होतात. हे यज्ञ अनेक प्रकारचे आहेत. त्या सर्वांचें येथें वर्णन करण्याची आवश्यकता नाहीं. यज्ञ मातृभूमीचें रक्षण करतो हें अथर्व. कां. १२।१।१ यामध्यें सुद्धां सांगितलें आहे. तो मंत्र वाचकांनीं येथें पाहून त्याच्याशीं याची तुलना करावी.

२. अग्निः— अग्नि शब्दाचा अर्थ ज्ञान, प्रकाश आणि उष्णता असा येथें घेणें योग्य आहे. ज्ञानानें सर्वत्र विजय मिळतो. प्रकाशसुद्धां विजय देणारा आहे, आणि उष्णता जर मनुष्यांत असली तरच तो कांहींना कांहीं पराक्रम करण्यास समर्थ होऊं शकेल.

३. सोमः— सोम वगैरे औषधि रोगादि शत्रूंचा पराभव करतात.

४. इन्द्रः— शूर वीर शत्रुसेनेचा पराजय करतात.

यज्ञ कसा असला पाहिजे

विजयप्राप्तीसाठीं यज्ञ कसा असला पाहिजे? या प्रश्नाचें उत्तर प्रथम मंत्रांत असें सांगितलें आहे कीं ज्याप्रमाणें अग्निहोत्रांत हवि स्वतःचें आत्मसमर्पण करतो, अग्निहोत्र ठेवणारासुद्धां आहुति समर्पण करतो, ज्याप्रमाणें (**न मम**) आतां यावर माझा अधिकार नाहीं असें म्हणत म्हणत तो समर्पण करतो त्याप्रमाणें जेव्हां आत्मसमर्पण होईल तेव्हां शत्रूवर विजय मिळेल. विजय प्राप्त करूं इच्छिणाऱ्यानें स्वतःचें समर्पण पूर्णरीतीनें करावें. हा यज्ञ आहे आणि हाच विजय देणारा आहे.

विजयासाठीं (**स्वधा अस्तु**) स्वतःमध्यें धारणाशक्ति असली पाहिजे. स्वतःमध्यें जितकी धारणाशक्ति अधिक तितकी विजयप्राप्तीची खात्री अधिक दृढ होईल.

क्षत्रियांमध्यें वीरपुरुषसुद्धां उत्तम प्रकारचे निर्माण व्हावयास हवेत. त्यांच्यामुळेंच विजय प्राप्त होतो, आणि या कार्यासाठींच सर्व लोकांचे प्रयत्न झाले पाहिजेत. स्वतःच्या राष्ट्रांत ज्या विपत्ति आहेत त्या पूर्णरूपानें दूर व्हाव्यात आणि सर्व लोक विपत्ति आणि कष्ट यांतून मुक्त व्हावेत आणि त्यांनीं समृद्धि आणि सुख प्राप्त करावें.

सर्व लोकांनीं आपलें आचरण शूरवीर प्रतापी आणि पुरुषार्थी मनुष्यास अनुकूल ठेवावें आणि कधींहि प्रतिकूल आचरण करूं नये; कारण जर नेत्यानेंच प्रतिकूल आचरण केलें तर नाशच होईल, आणि लाभ होण्याची जरासुद्धां आशा रहाणार नाहीं.

याप्रमाणें या सूक्ताचा विचार करून वाचक बोध प्राप्त करूं शकतील.

शत्रूंना दूर करणें

कांड ६, सूक्त ७५

(ऋषिः— कबन्धः । देवता — इन्द्रः,)

नि॒र॒मुं नु॑द॒ ओक॑सः स॒पत्नो॒ यः पृ॑त॒न्यति॑ । नै॒र्बा॒ध्ये॑न ह॒विषेन्द्र॑ ए॒नं प॑राश॒रीत् ॥ १ ॥
प॒र॒मां तं प॑रा॒वत॒मिन्द्रो॑ नुदतु वृत्र॒हा । यतो॒ न पु॒नराय॑ति शश्व॒तीभ्यः॒ समा॑भ्यः ॥ २ ॥

अर्थ— (**यः सपत्नः पृतन्यति**) जो शत्रु स्वतःच्या सैन्यासह आक्रमण करतो, (**अमुं ओकसः निः नुद**) त्या शत्रूस घरांतून बाहेर काढून लाव. (**एनं नैर्बाध्येन हविषा**) या शत्रूला अबाधित समर्पणानें (**इन्द्रः पराशरीत्**) प्रभु अथवा राजा मारून टाको. (१)

(**वृत्रहा इन्द्रः**) शत्रूंचा नाश करणारा इंद्र (**तं परमां परावतं नुदतु**) त्या शत्रूस अति दूरच्या प्रदेशांत हांकून लावो (**यतः शश्वतीभ्यः समाभ्यः पुनः न आयति**) जेथून तो कधींच परत येणार नाहीं. (२)

भावार्थ— जे शत्रु आमच्यावर सैन्यासह हल्ला करतात अथवा अन्य प्रकारें शत्रुत्व करतात, त्यांना त्यांच्या स्थानांतून अशा प्रकारें पळवून लावा कीं, ते पुन्हां त्रास देण्यास कधींहि परत येणार नाहींत. (१)

शूरांनीं आपापसांत संघटन करून शत्रूंस दूर दूरच्या स्थळीं अशा प्रकारें पळवून लावावें कीं तेथून ते पुनः कधीं परत येणार नाहींत. (२)

एतुं तिस्रः परावत एतु पञ्च जनाँ अति ।
एतुं तिस्रोऽति रोचना यतो न पुनरायति शश्वतीभ्यः समाभ्यो यावत्सूर्यो असद्दिवि ॥ ३ ॥

अर्थ— तो शत्रु (तिस्रः परावतः एतु) तीनही दूरच्या स्थानापासून सुद्धां दूर जावो. (पंच जनान् अति एतु) पांच प्रकारच्या मनुष्यांपासून दूर जावो. (तिस्रः रोचना अति एतु) तीन ज्योतींपासून सुद्धां दूर पळून जावो. (यतः पुनः न आयति) जेथून तो शत्रु पुनः परत येऊं शकणार नाहीं. (शश्वतीभ्यः समाभ्यः) शाश्वतकाळपर्यंत म्हणजे कधींच तो परत न येवो. (यावत् सूर्यः दिवि असत्) जोंपर्यंत सूर्य आकाशांत असेल तोंपावेतों शत्रु परत न येवो. (३)

भावार्थ— सर्व शत्रु सर्व स्थळांपासून सर्व प्रजेपासून सर्व ऐश्वर्यापासून सर्वकाळीं असे दूर ठेवावेत कीं त्यांनीं उपद्रव देण्यास कधींहि पुनः परत येऊं नये. (३)

शत्रूंस पळवून लावावें

व्यक्ति, गांव आणि राष्ट्र यांच्या शत्रूंस अशा प्रकारें दूर करावें कीं ते त्रास देण्यास पुनः परत येऊं शकणार नाहींत. प्रत्येक मनुष्याचें हें कार्य आहे. शत्रूंस आपल्यामध्यें राहूं देणें योग्य नाहींच. शत्रूला आपल्या देहांत, आपल्या घरांत, आपल्या जागेंत अथवा आपल्या राष्ट्रांत टिकूं देणें केव्हांहि योग्य नाहीं. जेव्हां शत्रु येईल तेव्हां त्यास असा पळवून लावावा कीं तो पुनः परत येऊं शकणार नाहीं.

शत्रूवर विजय

कांड ६, सूक्त ६५

(ऋषिः - अथर्वा । देवता - चंद्रः, इंद्रः, पराशरः)

अव मन्युरवायतावं बाहू मनोयुजा । पराशर त्वं तेषां पराञ्चं शुष्ममर्दयाधा नो रयिमा कृधि ॥१॥
निर्हस्तेभ्यो नैर्हस्तं यं देवाः शरुमस्यथ । वृश्चामि शत्रूणां बाहूननेन हविषाहम् ॥ २ ॥
इन्द्रश्चकार प्रथमं नैर्हस्तमसुरेभ्यः । जयन्तु सत्वानो मम स्थिरेणेन्द्रेण मेदिना ॥ ३ ॥

अर्थ— (मन्युः अव) क्रोधापासून रक्षण कर, (आयता अव) शस्त्रापासून रक्षण कर, (मनायुजा बाहू अव) मनानें प्रेरित होणाऱ्यांचें रक्षण कर. हे (पराशर) दुरून शरसंधान करणाऱ्या वीरा ! (त्वं तेषां शुष्म पराञ्चं मर्दय) तूं त्या शत्रूंचें बळ दूर करून त्यांचा नाश कर. (अध नः रयिं आकृधि) आणि आम्हांस धन प्राप्त करून दे. (१)

हे (देवाः) देव हो ! (निर्हस्तेभ्यः यं नैर्हस्तं शरुं अस्यथ) हस्तरहित म्हणजे निर्बल शत्रूवर जे तुम्हीं हस्त रहित करणारें शस्त्र फेंकतां, (अनेन हविषा अहं) या हवीनें मीं (शत्रूणां बाहून् वृश्चामि) शत्रूंचे बाहू तोडून टाकतों. (२)

(इंद्रः प्रथमं असुरेभ्यः नैर्हस्तं चकार) इंद्रानें प्रथम असुरांना निर्हस्त म्हणजे निर्बल केलें, म्हणून (स्थिरेण मेदिना इन्द्रेण) स्थिरमित्र इन्द्राच्या सहाय्यानें (मम सत्वानः जयन्तु) माझे सत्वशाली वीर लोक विजय प्राप्त करोत. (३)

आपलें बळ असें वाढवावें कीं त्यांच्यापुढें शत्रु निर्बळ ठरावा. या प्रकारें आपलें बळ वाढविल्यानें आणि योजनापूर्वक शत्रूंस निर्बल केल्यानें विजय प्राप्त होईल.

शत्रूंकर विजय

कांड ६, सूक्त ६६

(ऋषिः – अथर्वा । देवता चन्द्रः, इन्द्रः)

निर्हस्तः शत्रुरभिदासन्नस्तु ये सेनाभिर्युधमायन्त्यस्मान् ।
समर्पयेन्द्र महता वधेन द्रात्वेषामघहारो विविद्धः ॥ १ ॥
आतन्वाना आयच्छन्तोऽस्यन्तो ये च धावथ । निर्हस्ताः शत्रवः स्थनेन्द्रो वोऽद्य पराशरीत् ॥२॥
निर्हस्ताः सन्तु शत्रवोऽङ्गैषां म्लापयामसि । अथैषामिन्द्र वेदांसि शतशो वि भजामहै ॥ ३ ॥

अर्थ— (नः अभिदासन् शत्रुः निर्हस्तः अस्तु) आमच्यावर हल्ला करणारा शत्रु निर्हस्त म्हणजे निर्बळ होवो. (ये सेनाभिः अस्मान् युधं आयन्ति) जे सैन्यासह आम्हांशीं युद्ध करण्यास येतात, हे इंद्रा ! (महता वधेन समर्पय) त्यांस महान् वध शस्त्रानें मारून टाक. (एषां अघहारः विविद्धः द्रातु) त्यांचा विशेष घात करणारा वीर विद्ध होऊन पळून जावो. (१)

हे (शत्रवः) शत्रु हो ! (ये आतन्वानाः) जे तुम्हीं धनुष्य खेंचीत, (आयच्छन्तः अस्यन्तः च धावथ) बाण सोडीत धांवत येत आहां ते तुम्हीं (निर्हस्ताः स्थन) हस्तहीन व्हा. (इंद्रः अद्य वः पराशरीत्) इंद्र आज तुम्हांस मारून टाकील. (२)

(शत्रवः निर्हस्ताः सन्तु) सर्व शत्रु हस्तहीन होवोत, (एषां अंगा म्लापयामसि) यांच्या अंगांस आम्हीं निर्बल करून टाकतों, आणि (एषां वेदांसि शतशः वि भजामहै) त्यांच्या धनांस आम्हीं शेंकडों प्रकारें आपसांत वाटून टाकतों. (३)

शत्रूंकर विजय

कांड. ६, सूक्त. ६७

(ऋषिः – अथर्वा । देवता – इंद्रः)

परि वर्त्मानि सर्वत इन्द्रः पूषा च सस्रतुः । मुह्यन्त्वद्यामूः सेना अमित्राणां परस्तराम् ॥ १ ॥
मूढा अमित्राश्चरताशीर्षाण इवाहयः । तेषां वो अग्निमूढानामिन्द्रो हन्तु वरंवरम् ॥ २ ॥
ऐषु नह्य वृषाजिनं हरिणस्या भियं कृधि । पराङमित्र एषत्वर्वाची गौरुपेषतु ॥ ३ ॥

अर्थ— (इंद्रः पूषा च) इन्द्र आणि पूषा (सर्वतः वर्त्मानि परि सस्रुतः) सर्व बाजूंनीं भ्रमण करीत आहेत, त्यामुळें (अमित्राणां सेनाः परस्तरां मुह्यन्तु) शत्रुसेना दूरपर्यंत घाबरून जावोत. (१)

हे (अमित्राः) शत्रु हो ! तुम्हीं (मूढाः) भ्रान्त होऊन (अशीर्षाणः अहयः इव चरत) डोकीं तुटलेल्या सापांप्रमाणें फिरत रहा. (अग्नि-मूढानां तेषां वः) आमच्या अग्न्यस्त्रानें मोहित झालेल्या तुम्हां सर्वांच्या (वरंवरं इन्द्रः हन्तु) वरिष्ठ वीरांस इन्द्र मारून टाको. (२)

(एषु वृषा हरिणस्य अजिनं आनह्य) या आमच्या वीरांस बळानें हरिणाचें कातडें पांघरवा. आमच्या सैन्यानें शत्रुसैन्यांत (भियं कृधि) भय उत्पन्न करावें. (अमित्रः पराङ् एषतु) शत्रु दूर पळून जावोत आणि (गौः अर्वाची उप एषतु) त्याची जमीन अथवा गायी आम्हांपाशीं येवोत. (३)

हीं वरील तीन सूक्तें शत्रूचा पराजय करण्याविषयींचीं आहेत. शत्रूंस मोहित करून आणि घाबरवून असा पळवून लावला पाहिजे कीं त्याच्यापैकीं कोणीहि शिल्लक रहाणार नाहीं. त्याच्यांत जे शूर असतील त्यांस मारून टाकलें पाहिजे, आणि असा पराक्रम केला पाहिजे कीं ज्यामुळें शत्रूच्या मनांत भय उत्पन्न व्हावें. हीं तीनहि सूक्तें सरळ आहेत यास्तव त्यांचें अधिक विवरण करण्याची आवश्यकता नाहीं.

शत्रूस जखडून टाकणें

कांड ५, सूक्त ८

(ऋषिः- अथर्वा । देवा - नानादैवत्यं, अग्निः, विश्वेदेवाः, इन्द्रः)

वैकङ्कतेनेध्मेन देवेभ्य आज्यं वह । अग्ने ताँ इह मादय सर्व आ यन्तु मे हवम् ॥ १ ॥
इन्द्रा याहि मे हवमिदं करिष्यामि तच्छृणु । इम ऐन्द्रा अतिसरा आकूतिं सं नमन्तु मे ।
तेभिः शकेम वीर्यं१ जातवेदस्तनूवशिन् ॥ २ ॥
यदसावमुतो देवा अदेवः संश्चिकीर्षति ।
मा तस्याग्निर्हव्यं वाक्षीद्धवं देवा अस्य मोप गुर्ममैव हवमेतन ॥ ३ ॥
अति धावतातिसरा इन्द्रस्य वचसा हत ।
अविं वृक इव मथ्नीत स वो जीवन्मा मोचि प्राणमस्यापि नह्यत ॥ ४ ॥

अर्थ— हे अग्ने ! (वैकङ्कतेन इध्मेन) सुवा वृक्षाच्या इंधनानें (देवेभ्यः आज्यं वह) देवांसाठीं तूप पोंहोचव, आणि (तान् इह मादय) त्यांना येथें प्रसन्न कर, ते (सर्वे) सर्व (मे हवं आयन्तु) माझ्या यज्ञांत येवोत. (१)

हे इंद्रा ! (मे हवं आयाहि) माझ्या यज्ञांत ये. जी (इदं करिष्यामि तत् शृणु) प्रार्थना मीं करतों ती ऐक. (इमे ऐन्द्राः अतिसराः) या इन्द्रासंबंधीं अग्रगामी पुरुष (मे आकूतिं सं नमन्तु) माझ्या संकल्पास अनुकूल होवो हे (तनू-वशिन् जातवेदः) शरीरास वश करणाऱ्या ज्ञानी देवा ! (तेभिः वीर्यं शकेम) त्या प्रयत्नांनीं वीर्याची प्राप्ति आम्हीं करूं शकूं. (२)

हे (देवाः) देव हो ! (असौ अ-देवः सन्) तो देवतारहित होऊन, (अमुतः यत् चिकीर्षति) तेथून जो कांहीं घात करूं इच्छितो (तस्य हव्यं अग्निः मा वाक्षीत्) त्याचा हवि अग्नि न पोहोंचवो. (देवा अस्य हवं मा उपगुः) देवसुद्धां त्याच्या यज्ञांत न जावोत; पण (मम एव हवं एतन) माझ्याच यज्ञांत येवोत. (३)

हे (अतिसराः) अग्रगामी पुरुष हो ! (अतिधावत) वेगानें धांवत या. (इन्द्रस्य वचसा हत) इंद्राच्या वचनानें मारा. (अविं वृक इव मथ्नीत) ज्याप्रमाणें लांडगा मेंढरास मारतो त्याप्रमाणें शत्रूला मारून टाका. (सः जीवन्) तो शत्रु जिवंत (वः मा मोचि) तुम्हांपासून निसटून न जावो. (अस्य प्राणं अपि नह्यत) त्याच्या प्राणांस सुद्धां बांधून टाका. (४)

भावार्थ— अग्नि या यज्ञांत देवांसाठीं घृताच्या आहुति पोंहोचवो आणि येथें देवांना आनंदित करो, ज्यामुळें सर्व देव संतोषानें माझ्या यज्ञांत येत रहावेत. (१)

हे इंद्रा ! तूं माझ्या यज्ञांत ये आणि जी मीं प्रार्थना करतों ती ऐक. हे जे इंद्राविषयीं कार्य करणारे आहेत ते सर्व मला अनुकूल कार्य करोत. हे शरीरास वश करणाऱ्या ज्ञान्या ! त्यांच्यापासून आम्हांस वीर्य प्राप्त होवो. (२)

हे देव हो ! जो खरोखर प्रभुभक्ति न करतां जें कांहीं दुसरें कर्म करूं इच्छितो त्याच्या आहुति अग्नीनें सुद्धां देवांना पोहोंचवूं नयेत आणि देवांनीं त्याच्या यज्ञांत न जातां त्यांनीं माझ्या यज्ञांत यावें. (३)

यममी पुरोदधिरे ब्रह्माणमपभूतये । इन्द्र स ते अधस्पदं तं प्रत्यस्यामि मृत्यवे ॥ ५ ॥
यदि प्रेयुर्देवपुरा ब्रह्म वर्माणि चक्रिरे ।
तनूपानं परिपाणं कृण्वाना यदुपोचिरे सर्वं तदरसं कृधि ॥ ६ ॥
यानसावतिसरांश्चकार कृणवच्च यान् ।
त्वं तानिन्द्र वृत्रहन्प्रतीचः पुनरा कृधि यथामुं तृणहां जनम् ॥ ७ ॥
यथेन्द्र उद्वाचनं लब्ध्वा चक्रे अधस्पदम् । कृण्वेऽहमधरांस्तथामूंछश्वतीभ्यः समाभ्यः ॥ ८ ॥
अत्रैनानिन्द्र वृत्रहन्नुग्रो मर्माणि विध्य । अत्रैवैनानभि तिष्ठेन्द्र मेद्य१हं तव ।
अनु त्वेन्द्रा रभामहे स्याम सुमतौ तव ॥ ९ ॥

अर्थ--(अमी यं ब्रह्माणं) हे ज्या ज्ञान्याला, (अप भूतये पुरः दधिरे) अवनतीसाठीं पुढें करतात, हे इंद्रा ! (सः ते अधस्पदं) ते तुझ्या पायाखालीं पडोत, (तं मृत्यवे प्रत्यस्यामि) त्याला मृत्यु यावा यासाठीं फेंकतो. (५)

(यदि देवपुराः प्रेयुः) जर शत्रूंनीं देवांच्या नगरीवर चढाई केली असेल आणि त्यांनीं (ब्रह्म वर्माणि चक्रिरे) ज्ञानासच आपलें कवच बनविलें असेल आणि (तनूपानं परिपाणं कृण्वानाः) शरीर रक्षणाचें साधन तयार करीत जें कांहीं (यत् उपऊचिरे) म्हटकें असेल (सर्वं तत् अरसं कृधि) तें सर्व नीरस कर. (६)

(असौ यान् अतिसरान् चकार) यानें ज्यांना अग्रगामी केलें होतें आणि (च यान् कृणवत्) ज्यांस जालां केलें आहे, हे (वृत्रहन् इन्द्र) शत्रुनाशक इंद्रा ! (त्वं तान् पुनः प्रतीचः आकृधि) तूं त्यांना पुनः प्रतिगामी कर, (यथा अमुं जनं तृणहान्) ज्यामुळें त्या जनसमूहाला आम्हीं मारून टाकूं. (७)

(यथा इन्द्रः उद्वाचनं लब्ध्वा) ज्याप्रमाणें इंद्रानें बडबडणाऱ्या शत्रूला प्राप्त करून त्याला (अधस्पदं चक्रे) पायाखालीं घातला (तथा अहं) त्याप्रमाणें मीं (शश्वतीभ्यः समाभ्यः) नेहमींच (अमून् अधरान् कृण्वे) हे शत्रु खालीं पडतील असें करतों. (८)

हे (वृत्रहन् इन्द्र) शत्रुनाशक इंद्रा ! (अत्र उग्रः एनान् मर्माणि विध्य) येथें शूर होऊन त्यांना मर्मस्थानीं वेध. हे इन्द्रा ! (अत्र एव एनान् अभि तिष्ठ) येथेंच त्यांच्यावर चढाई कर. (अहं तव मेदी) मीं तुझा मित्र होऊन रहातों. हे इंद्रा ! (त्वा अनु आरभामहे) तुला अनुकूल असा कार्यारंभ आम्हीं करतों. (तव सुमतौ स्याम) आमच्याविषयीं तुझें चांगलें मत असो. (९)

भावार्थ— हे अग्रगामी पुरुष हो ! वेगानें शत्रूवर हल्ला करा. इंद्राच्या आज्ञेनें शत्रूचा वध करा. जसा लांडगा मेंढरास मारतो त्याप्रमाणें शत्रूला मारा आणि शत्रूचे प्राण घ्या. कोणी शत्रु तुमच्या हातून न वांचो. (४)

जो शत्रु आपल्यांतील विद्वान् मंडळींस सुद्धां अवनतीच्या कार्यास लावतो, त्यांची अधोगति होवो. मी तर त्यास मृत्यूला समर्पित करतों. (५)

जर शत्रूनें देवांच्या नगरीवर चढाई केली असेल आणि आपल्या शरीररक्षणासाठीं कवचादिकांच्या योगानें उत्तम तयारी केली असेल, तसेंच आपलें सर्व ज्ञानहि या युद्धकर्मांत वापरलें असेल, अशा शत्रूचे ते सर्व प्रयत्न निष्फल होवोत. (६)

जो शत्रु आपल्या वीरांस अग्रगामी करून हल्ला करतो ते त्या शत्रूचे प्रयत्न विफल होवोत, ज्यामुळें सर्व शत्रूंना आम्हीं मारून टाकूं. (७)

ज्याप्रमाणें इन्द्र गर्विष्ठ शत्रूला खालीं दाबून टाकतो त्याप्रमाणें मीं नेहमीं आपल्या शत्रूला जखडून ठेवतों. (८)

हे प्रभो ! तूं उग्र होऊन येथें शत्रूंच्या मर्मस्थानाचा वेध कर. या शत्रूवर चढाई कर. मीं तुझा मित्र होऊन तुला अनुकूल असें कार्य करतों आणि तुझी आमच्याविषयीं चांगली मति असो. (९)

शत्रूस जखडून टाकणें

शत्रूचा नाश

हें सूक्त शत्रूचा नाश करण्याचा उपदेश करणारें आहे. याच्या पहिल्या दोन मंत्रांत परमेश्वराची प्रार्थना करून बल प्राप्त करण्याचा उपदेश आहे.

ईशप्रार्थना

अग्नींत तुपाच्या आहुति टाकून यजमान प्रार्थना करतो कीं, ' मीं देवतांना उद्देशून या आहुति या यज्ञांत देत आहे. या आहुती देवतांना प्राप्त होवोत आणि त्यायोगें देवता संतुष्ट होऊन माझी प्रार्थना ऐकोत. प्रभूचीसुद्धां मीं प्रार्थना करतों कीं त्यानें माझी प्रार्थना ऐकावी आणि त्याच्या सर्व शक्ति मला अनुकूल होवोत आणि आम्हांस पुष्कळ बळ प्राप्त होवो. ' (मं. १-२)

नास्तिकांची असफलता

ज्या मनुष्याच्या अंतःकरणांत परमेश्वराची भक्ति नसते त्यास भक्तिहीन अथवा नास्तिक म्हणतात. युद्ध सुरू झालें असतां दोन्ही पक्षाचे लोक प्रभूची प्रार्थना करतात. सत्पक्षाचे लोक ज्याप्रमाणें यश मिळावें म्हणून प्रभूची प्रार्थना करतात तद्वत् दुष्ट असत्पक्षाचे लोकसुद्धां विजयासाठीं परमेश्वराची स्तुति करतात.

अशा प्रकारें दोनहि पक्षाचे लोक प्रभुप्रार्थना व यज्ञयाग करूं लागले तर प्रभूनें कोणत्या पक्षास सहाय करावें आणि कोणास करूं नये याविषयीं तिसऱ्या मंत्रांतील उपदेश लक्षपूर्वक पहाण्यासारखा आहे–

' ज्यावेळीं नास्तिक, भक्तिहीन, दुष्ट मनुष्य आपल्या विजयासाठीं यज्ञयाग, ईशप्रार्थना इत्यादि करतो, त्यावेळीं अग्नि त्याच्या आहुति देवतांस पोहोंचवीत नाहीं, आणि देवता त्याच्या यज्ञांत जात नाहींत, कारण देवता फक्त आस्तिक भक्ताच्या यज्ञांतच जातात. ' (मं. ३)

वरील मंत्रावरून हें स्पष्ट होतें कीं, जरी उभयपक्षाचे लोक प्रार्थना करूं लागले, तरी परमेश्वर धार्मिक लोकांची प्रार्थना ऐकतो, दुष्टांची प्रार्थना कधीं ऐकत नाहीं, म्हणून सत्पक्षीय लोकच प्रार्थनेनें ईश्वरीय बल प्राप्त करतात; आणि तसें बल असत्पक्षाच्या लोकांना प्राप्त होत नाहीं; त्यामुळें अंतीं नेहमीं सत्पक्षाचा जय होतो. यासाठीं चवथ्या मंत्रांत म्हटलें आहे, कीं- ' प्रभूच्या आज्ञेनुसार शत्रूवर हल्ला करा, शत्रूस मारून टाका, तुमच्या हल्ल्यांतून कोणी शत्रु जिवंत सुटून न जावो. ' (मं. ४) असें बळ सत्पक्षालाच प्राप्त होतें यामुळें सत्पक्ष व्यवहारीदृष्टीनें अशक्त वाटला तरी आत्मिकदृष्टीनें शक्तिसंपन्न असल्यानें अंतीं विजयी होतो. असत्पक्षाला परमेश्वरभक्तीचा लाभ मिळत नाहीं. हेंच दाखविण्यासाठीं पांचव्या आणि सहाव्या मंत्रांचा उपदेश आहे–

' जे असत्पक्षाचा आश्रय करणारे लोक आहेत, ते आपल्या विजयासाठीं ब्राह्मणांनासुद्धां अवनतिकारक कर्मांत उपासनादि कार्य करण्यास योजितात, त्यांस परमेश्वर अवनत करतो आणि मृत्यूस पोहोंचवितो. जो दुष्ट देवजनांच्या नगरीवर हल्ला करून आपल्या विजयासाठीं उपासनादि कर्में करीत रहातो आणि यामुळें आपलें रक्षण होईल असें मानतो, तो भ्रमांत असतो, कारण त्याचे ते सर्व प्रयत्न विफल होतात. (मं. ५।६)

म्हणजे असत्पक्षाचा विजय कधीं होत नाहीं. नेहमीं सत्पक्षाचाच जय होतो. हा वैदिक धर्माचा त्रिकालाबाधित सिद्धांत आहे. तो कोणीहि बदलूं शकत नाहीं.

शेवटच्या तीन मंत्रांत हेंच तत्त्व निराळ्या प्रकारें सांगितलें आहे. ' जो दुष्ट शत्रु आपल्या सैनिकांना पुढें करून वेगानें हल्ला करतो, त्यांचें तें कार्य अंतीं त्याच्या विरुद्धच जातें. ' (मं. ७) म्हणजे शक्तीच्या घमेंडीमुळें शत्रु सत्पक्षाचा नाश करण्याची जसजशी तयारी करतो, तसतसा तो अधिकांत अधिक खालीं पडतो. अशा दुष्ट भावानें मोठीं मोठीं साम्राज्यें नाश पावलीं आहेत, आणि पुनः तीं कधीं ऊर्जितावस्थेस आलीं नाहींत. हें जाणून लोकांनीं कधीं अधर्माचरण करूं नये. तसेंच दुसऱ्याच्या नाशानें स्वतःची उन्नति करण्याचा प्रयत्न करूं नये.

' असे घमेंडी, बडबड करणारे शत्रु आले असतां त्यांस जखडून टाकावें. ' हा नियम नित्य पालन करण्यासारखा आहे. (मं. ८)

म्हणजे सज्जनांनीं सुद्धां शत्रूची उपेक्षा करणें योग्य नाहीं.

शत्रुनाशाचा उपाय

नवव्या मंत्रांत शत्रूचा नाश करण्याचा उपाय सांगितला आहे. तो आतां पहा—

१. **उग्रः अत्र मर्माणि विध्य–** शूर होऊन येथें शत्रूंच्या मर्मस्थानावर आघात कर. (मं. ९)

२. **अत्रैव एनान् अभितिष्ठ–** येथेंच त्या शत्रूंशीं सामना कर, म्हणजे या शत्रूंवर वेगानें हल्ला कर. (मं. ९)

३. अहं तव मेदो । तव सुमतौ स्याम । त्वा अन्वारभामहे- मी तुझा मित्र होऊन राहीन, तुझ्या सुमतींत मीं राहीन आणि तुला अनुकूल असें कार्य करीन. (मं. ९)

परमात्म्यास अनुकूल कार्य करण्याचा अर्थ धर्मानुकूल व्यवहार करणें. याप्रकारें धार्मिक व्यवहार करीत, आत्मिक बळ वाढवून, परमात्म्याचें प्रियजन होऊन राहावें आणि शत्रूचा हल्ला परतवून टाकण्याचें सामर्थ्यहि आपणांजवळ वाढवावें. म्हणजे आपला पक्ष दुर्बल नसावा. या प्रकारें आत्मिक आणि शारीरिक बळानें युक्त झालें म्हणजे सर्व युद्धांत विजय अवश्य प्राप्त होतो.

शत्रूस दूर करणें

कांड ४, सूक्त ३

(ऋषि- अथर्वा । देवता- रुद्रः, व्याघ्रः)

उदि॒तस्त्रयो॑ अक्रम॒न्व्या॒घ्रः पुरु॑षो॒ वृकः॑ ।
हिरु॒ग्घि यन्ति॒ सिन्ध॑वो॒ हिरु॑ग्दे॒वो वन॒स्पति॒र्हिरु॑ङ्नमन्तु॒ शत्र॑वः ॥ १ ॥
परे॑णैतु प॒था वृकः॑ पर॒मेणो॒त तस्क॑रः । परे॑ण द॒त्वती॒ रज्जुः॒ परे॑णाघा॒युर॑र्षतु ॥ २ ॥
अ॒क्ष्यौ॑ च ते॒ मुखं॑ च ते व्याघ्र ज॒म्भया॑मसि । आत्सर्वा॑न्विंश॒तिं न॒खान् ॥ ३ ॥
व्या॒घ्रं द॒त्वतां॑ व॒यं प्र॑थ॒मं ज॑म्भयामसि । आदु॑ ष्टे॒नमथो॒ अहिं॑ यातु॒धान॒मथो॒ वृक॑म् ॥ ४ ॥

अर्थ— (व्याघ्रः, वृकः, पुरुषः त्रयः) वाघ, लांडगा आणि चोर हे तिघे (इतः उदक्रमन्) येथून पळून जावोत, (सिन्धवः हिरुक् यन्ति) नद्या खालीं वाहात जातात, (देवः वनस्पतिः हिरुक्) दिव्य वनस्पतीसुद्धां रोगांना अधोगतीस लावतात, त्याचप्रमाणें (शत्रवः हिरुक् नमन्तु) शत्रु खालीं नम्र होऊन रहावेत. (१)

(परेण पथा वृकः एतु) दूरच्या मार्गानें लांडगा निघून जावो. (उत परमेण तस्करः) आणि त्यापेक्षांहि दूरून चोर निघून जावो. (परेण दत्वती रज्जुः) दांत असणारी दोरी म्हणजे नागीण दूर निघून जावो आणि (अघायुः परेण अर्षतु) पापी दूरूनच पळून जावो. (२)

हे व्याघ्र ! (ते अक्ष्यौ) तुझ्या दोनहि डोळ्यांना (च ते मुखं) तुझ्या तोंडाला, (आत् च सर्वान् विंशतिं नखान्) आणि तुझ्या सर्व वीस नखांना (जम्भयामसि) नष्ट करून टाकतों. (३)

(दत्वतां प्रथमं व्याघ्रं) दांत असणाऱ्यांत प्रथम वाघाचा, (आत् उ अहिं) आणि सापाचा, (अथो वृकं) आणि लांडग्याचा, (स्तेनं अथो यातुधानं) चोर आणि लुटारूंचा (वयं जम्भयामसि) आम्हीं नाश करतों. (४)

भावार्थ— वाघ, लांडगा आणि चोर येथून पळून जावोत. ज्याप्रमाणें नदीचा प्रवाह खालीं वहात जातो, आणि दिव्य. वनस्पतींनीं रोग दूर होतात, त्या प्रकारें शत्रु आम्हांपासून दूर होवोत. (१)

लांडगा, चोर, साप, पापी दुष्ट सर्व दूर पळून जावोत. (२)

वाघाचे डोळे, तोंडांतील दांत आणि त्याची वीस नखें आम्हीं नष्ट करतों. (३)

तीक्ष्ण दांत असणाऱ्यामध्यें वाघ, लांडगा आणि साप यांना आणि दुष्टांपैकीं चोर आणि लुटारूंस आम्हीं नष्ट करतो. (४)

यो अद्य स्तेन आयति स संपिष्टो अपायति । पथामपध्वंसेनैत्विन्द्रो वज्रेण हन्तु तम् ॥ ५ ॥
मूर्णा मृगस्य दन्ता अपिशीर्णा उ पृष्टयः । निम्रुक् ते गोधा भवतु नीचायच्छशयुर्मृगः ॥ ६ ॥
यत्संयमो न वि यमो वि यमो यन्न संयमः । इन्द्रजाः सोमजा आथर्वणमसि व्याघ्रजम्भनम् ॥ ७ ॥

अर्थ—(अद्य यः स्तेनः आयति) आज जो चोर येईल, (संपिष्टः सः अप आयाति) चूर्ण होऊन त्यानें निघून जावें आणि त्यानें (पथा अपध्वंसेन एतु) आड मार्गानें रस्ता चूकून निघून जावें आणि (इन्द्रः वज्रेण हन्तु) इन्द्र वज्रानें त्यास मारून टाको. (५)

(मृगस्य दन्ताः मूर्णाः) हिंस्र पशूंचे दांत तोडले गेले, (अपि पृष्टयः शीर्णानि उ) आणि त्यांच्या फासळ्या तुटून गेल्या आहेत, (ते गोधाः निम्रुक् भवन्तु) तुमच्या घोरपडी खालीं पडोत आणि (मृगः शशयुः नीचा अयत्) हिंस्र पशु लपडत-लोळत, पळून जावो, (६)

(यत् संयमः न वियमः) ज्याचा संयम केला असेल त्यास विशेष दाबांत ठेऊं नका. परंतु (यत् न वियमः संयमः) ज्यास विशेष दाबांत ठेवलें नाहीं त्यास योग्य प्रकारें संयमांत ठेवा' हा (इंद्रजाः सोमजाः) इंद्र आणि सोमापासून उत्पन्न झालेला (आथर्वणं व्याघ्र जंभनं असि) अथर्वविद्येनें व्याघ्रादिकांस दाबांत ठेवण्याचा उपाय आहे. (७)

भावार्थ—आज जो चोर आमच्यावर हल्ला करील त्याचा पूर्ण नाश होईल आणि जर तो वांचलाच तर घाबरून आपला मार्ग चूकेल नंतर शूर पुरुष आपल्या शस्त्रानें त्यास मारील. (५)

हिंस्र पशूंचे दांत तोडले गेले आणि त्यांच्या फासळ्या कापून टाकण्यांत आल्या, सर्व हिंस्र पशु खालीं तोंड करून भीतीनें पळून जावोत. (६)

ज्याचें दमन केले आहे त्यास फार दाबांत ठेऊ नका परंतु ज्याला दाबांत ठेवलेलें नाहीं त्याचें चांगल्या प्रकारें दमन करा. हाच इंद्र, सोम आणि अथर्व्यांचा दुष्टांचें दमन करण्याचा उपाय आहे. (७)

शत्रूस दूर करणें

दुष्टांचें दमन करण्याचा उपाय

या सूक्तांत दुष्टांचें दमन करण्याचा उपाय सांगितला आहे. हें सूक्त फार व्यापक अर्थाचें आहे म्हणून तें वाचित असतां आपला दृष्टिकोन आध्यात्मिक ठेवला पाहिजे, तरच त्यापासून योग्य लाभ होईल. आतां दुष्टांच्या दमनाचा उपाय पाहूं—

अथर्वविद्येचा नियम

१ यत् सं-यमः, न वि यमः
२ यत् न वि-यमः, सं-यमः ॥ (मं. ७)

' ज्याचा संयम केला, आहे त्यास जास्त दाबांत ठेऊं नये. परंतु ज्याचें मुळींच दमन केलें नाहीं त्यास (त्याचा) अवश्य संयम केला जावा. ' हा अथर्वविद्येचा नियम आहे—

आथर्वणं व्याघ्रजम्भनम् । (मं. ७)

' हा अथर्वविद्याप्रणीत व्याघ्रादिकांच्या दमनाचा नियम आहे. ' हा दोन प्रकारें केला जातो—

इंद्रजाः, सोमजाः । (मं. ७)

' इंद्र अर्थात् इंद्रियांचे अधिष्ठान जें मन अथवा अंतःकरण चतुष्टय आहे (मन, बुद्धि, चित्त आणि अंतरंग अथवा हृदय) त्यांपासून उत्पन्न होणाऱ्या (इन्द्र-जाः) अंतः शक्तीनें एक दमन होतें आणि (सोमजाः) सोम आदि औषधि शक्तीनें एक प्रकारें दमन होतें. ' दुष्टांच्या दमनाचे असे दोन प्रकार आहेत.

या संपूर्ण सूक्तांत (१) व्याघ्रः (वाघ), (२) वृकः (लांडगा), (३) अहिः (साप), (४) दत्वती रज्जुः (दांत असणारी चावणारी दोरी म्हणजे नागीण) तसेंच अन्य दांत, नखें असणारे हिंस्र पशु आणि गोधा (घोरपड) या दुष्ट प्राण्यांचीही नांवें दिलीं आहेत. तसेंच, तस्करः, स्तेनः पुरुषः

(चोर मनुष्य), अघायुः (पापी), यातुधानः (लुटारू) शत्रुः (वैरी) हीं दुष्ट मनुष्यांचीं नांवेंसुद्धां दिलीं आहेत. यावरून हें स्पष्ट होतें कीं ज्याप्रमाणें हिंस्र पशूंना दूर करून समाजास सुखी केलें पाहिजे. तद्वतच दुष्ट मनुष्यांस समाजांतून दूर करणें आवश्यक आहे. येथें ज्यांचीं नांवें दिली नाहींत अशा अन्य दुष्टांससुद्धां याच मार्गानें काबूंत आणलें पाहिजे आणि समाजांतून दूर केलें पाहिजे आणि समाजास सुखी केलें पाहिजे. हा या सूक्ताचा आशय आहे.

वाघ, सांप अथवा नागिणीचे दांत उपटून त्यांस सौम्य करण्याचा उपाय तिसऱ्या मंत्रांत सांगितला आहे. हा उपाय सर्व पशु, जे दांत आणि नखांनीं हिंसा करतात त्यांच्या शमनासाठीं करून पहाण्या योग्य आहे.

सांप, वाघ, लांडग्यासारखे हिंसक प्राणी आले तर त्यांस मारलें पाहिजे, त्यांच्या फांसळ्या तोडाव्यात, त्यांस मरेपर्यंत मारावे, ही गोष्ट मंत्र ३ ते ६ पर्यंत सांगितली आहे. तसेंच याच मंत्रांत चोर, लुटारू, डाकु इत्यादि दुष्ट समाजघातक लोक समाजांत येऊन उपद्रव देऊं लागले तर त्यांच्याविषयींसुद्धां याच उपायांनीं योजना करून त्यांस शांत केलें पाहिजे, असें म्हटलें आहे.

या दण्डाच्या मारानें या सर्व दुष्ट, हिंसक आणि शत्रूंस शांत अथवा दूर केलें पाहिजे, असा उपदेश या सूक्तद्वारा दिला आहे. परंतु सिंह, वाघ, चोर, लुटारू हे समाजाबाहेर रहातात, असें समजणें मोठी चूक आहे. ते जसे बाहेर तसेच समाजांतहि असतात आणि या सूक्तांत वाघ, लांडगे, चोर आणि बाहेरच्या शत्रूंच्यामिषानें वस्तुतः आंतरिक शत्रूंचेंच शमन करण्याचा उपदेश केला आहे. ७ व्या मंत्रांतील ' संयम ' शब्दानें ही गोष्ट स्पष्ट होत आहे.

मनुष्याच्या अंतरांत काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे सहा शत्रु आहेत आणि वेदांत त्यांची गणना पशु म्हणून केली आहे.

उलूकयातुं शुशुलूकयातुं जहि श्वयातुमुत कोकयातुम् । सुपर्णयातुमुत गृध्रयातुं दृषदेव प्रमृण रक्ष इन्द्र ॥ (ऋ. ७।१०४।२२)

(सुपर्ण-यातुं) गरुडाप्रमाणें वागणूक म्हणजे घमंड **(गृध्रयातुं)** गिधाडाप्रमाणें व्यवहार म्हणजे लोभ, **(कोकयातुम्)** चिमणीप्रमाणें व्यवहार म्हणजे काम, **(श्वयातुं)** कुत्र्याप्रमाणें स्वजनांचा मत्सर अथवा द्वेष, **(उलूकयातुं)** घुबडाप्रमाणें वागणूक म्हणजे मूढता, **(शुशुलूकयातुं)** लांडग्याप्रमाणें क्रूरता असे सहा पशु मनुष्याच्या अंतःकरणांत रहातात. त्यांचा नाश दगडानें पक्ष्यांचा नाश करतात, अशा रीतीनें करावा, ज्याप्रमाणें काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे सहा शत्रु सहा पशु आहेत. त्यांस दूर केलें पाहिजे. त्यांचा संयम करण्याचा उपाय या सातव्या मंत्रात सांगितला आहे—

१ ज्यांस संयमात ठेवलें आहे त्यांचेवर जास्त दबाण करूं नये.

२ आणि ज्यांचा संयम झाला नाहीं त्यांचा संयम केला पाहिजे.

ही गोष्ट नीट समजण्यास एक उदाहरण घेऊं. घोडे प्रथम सामान्य पशु असतात, नंतर त्यांस शिकवून तयार करण्यांत येतें. शिकवल्यानंतर त्यांस गाडीस जोडतात. जे घोडे चांगले, नियमित चालणारे नम्र आणि सुशील आहेत. त्यांस निष्कारण मार मारला किंवा दाबांत ठेवण्यांत आले, पीडा देण्यांत आली तर ते चिडतात त्यामुळें जास्त शिक्षा करणें, कष्ट देणें हें एक प्रकारें घातकच होय. इंद्रियांविषयीं हीच गोष्ट लागू पडते. जी इंद्रियें संयमांत आहेत त्यांना जास्त कडक बंधनांत ठेवण्यांत आलें तर त्यांच्यांत प्रतिक्रिया सुरू होते आणि त्यामुळें तीं बिघडून जाण्याचा संभव जास्त असतो. त्यामुळें संयमांत राहून योग्य कार्य करणाऱ्या इंद्रियांना योग्य ती स्वतंत्रता दिली पाहिजे. तसेंच त्यांचें वर्तन, त्यांचेवर बारीक नजर ठेऊन पाहिलें पाहिजे. म्हणजे तीं संयमांत रहातील. कुमार्गगामी होणार नाहींत. याप्रमाणें संयमित वृत्ति आणि इंद्रियें असलीं पाहिजेत. परंतु जी संयमांत नाहींत, स्थिर नाहींत, त्यांना नियमबद्ध करून प्रयत्नपूर्वक त्यांना ताब्यांत आणलें पाहिजे आणि एकदां तीं वश झालीं म्हणजे पूर्वोक्त प्रकारें त्यांना योग्य संयमांत ठेऊन सुरक्षित प्रकारें चालवावें.

सर्कशींत जे सिंह, वाघ इत्यादि प्राण्यांना वश करतात ताब्यांत ठेवतात ते याच प्रकारें. प्रथम त्यांच्याशी प्रेमपूर्वक वागतां वागतां त्यांच्या मनांत विश्वास उत्पन्न करावयाचा आणि मग योग्य रीतीनें त्यांना शिक्षण द्यावयाचें. शिकवून तयार, झाल्यानंतर त्यांच्यावर इतर बाहेरील दबाण न करतां तसेंच कोणतीहि मर्यादा ते उल्लंघन करूं शकणार नाहींत, अशा व्यवस्थेनें त्यांचे पालन, रक्षण, पोषण, करतात. संयमपूर्व आणि संयमानंतर व्यवहार करण्याची जी सूचना या सूक्तांत दिली आहे ती फार उपयोगी आहे.

मनुष्याच्या अंतःकरणांत ज्याप्रमाणें पशु (शत्रुरूप) आहेत, तसेंच दुसरे शत्रु, लुटारू, चोर, दुष्मन, वैरी इत्यादि अनेक भावहि त्यांच्यांत असतात. एक तर या सर्व भावना दाबांत

ठेवण्यास शिकलें पाहिजे अथवा त्या सर्व आपणापासून दूर तरी केल्या पाहिजेत.

याविषयीं योग्य बोध वाचकांनीं ग्रहण करावा. हा संयम आपल्या वैयक्तिक शक्तीनें संभाळावयाचा. त्याबरोबर औषधि शक्तीचेंहि सहाय्य कित्येक अंशीं सहाय्यक होतें. ज्याप्रमाणें सत्त्वगुण युक्त अन्न सेवन केल्यानें काम, क्रोध वगैरे शत्रु अंशतः कमी होतात, आणि रजोगुण अथवा तमोगुणयुक्त अन्नसेवन केल्यानें कामक्रोध वाढतात, मद्यमांस सेवनानें कामक्रोध वाढतात. आणि उक्त पदार्थांपासून दूर राहिल्यानें, त्यांचेंपासून सुरक्षित रहाण्याचा संभव जास्त आहे. त्याचप्रमाणें सोमादि औषधिरस सेवनानींसुद्धां मोठा लाभ होण्याची शक्यता आहे.

असें असूनसुद्धां आपल्या अंतःशक्तींच्या योगानें कामक्रोधादिकांचा संयम करण्याचें अनुष्ठान आचरणें श्रेष्ठ होय.

वाचकांनीं या गोष्टीचा अधिक विचार करावा व योग्य बोध ग्रहण करावा.

दुष्टांचा संहार

कांड, ७ सूक्त १०८

(ऋषिः– भृगुः देवता– अग्निः)

यो नस्तायद्दिप्सति यो न आविः स्वो विद्वानरणो वा नो अग्ने ।
प्रतीच्येत्वरणी दत्वती तान्मैषामग्ने वास्तु भून्मो अपत्यम् ॥ १ ॥
यो नः सुप्ताञ्जाग्रतो वाभिदासात्तिष्ठतो वा चरतो जातवेदः ।
वैश्वानरेण सयुजा सजोषास्तान्प्रतीचो निर्दह जातवेदः ॥ २ ॥

अर्थ— हे अग्नि ! (यः नः तायत् दिप्सति) जे लपून राहून आम्हांस त्रास देतात, (यः नः आविः) जे आम्हांस प्रगटपणें दुःख देतात ते, (नः स्वः विद्वान् अरणः) आम्हां स्वतःविषयीं ते विद्वान् अथवा परके कसेहि असोत, (तान् दत्वती अरणी प्रतीची एतु) त्यांचेवर दांत असलेली काठी उलटी फिरो. हे अग्नि ! (एषां वास्तु मा भूत) त्यांचें कोणतेंहि घर शिल्लक न राहो अथवा (मा अपत्यं उ) त्यांस कांहीं संतान न होवो. (१)

हे (जातवेदः) अग्नि ! (यः नः सुप्तान् जाग्रतः वा अभिदासात्) जे आम्हांस झोंपलों असलों किंवा जागे असतों तेव्हां आमचा नाश करतात (यः तिष्ठतः वा चरतः) जे स्थिर असता अथवा चालता चालता नाश करतात, हे (जातवेदः) अग्नि ! (वैश्वानरेण सयुजा सजोषाः) विश्वाचा नेता तुझ्या मित्रासह तुला अनुकूल होऊन (तान् प्रतीचः निः दह) त्या प्रतिकूल असणाऱ्यांस भस्म कर. (२)

भावार्थ— जे लपून छपून आमचा नाश करतात अथवा प्रगटपणें आम्हांस त्रास देतात, ते आमचे संबंधीं असले, मित्र असले, अथवा परकीं मनुष्यें असलीं, तरी त्या त्रास देणाऱ्यांचा नाश होवो. (१)

आम्हीं झोंपलों असता, जागृत असतां अथवा चालत असतां, कोणत्याहि स्थितींत जे आमचा घात करतात त्यांचा सुद्धां नाश होवो. (२)

आम्हांस त्रासविणाऱ्या शत्रूंची उपेक्षा करण्यांत येऊं नये असें या सूक्ताचें तात्पर्य आहे.

दुष्टांचें निवारण

कांड ७, सूक्त ९०

(ऋषिः– अंगिराः । देवता – मन्त्रोक्ताः)

अपि वृश्च पुराणवद्व्रततेरिव गुष्पितम् । ओजो दासस्य दम्भय ॥ १ ॥
वयं तदस्य संभृतं वस्विन्द्रेण वि भजामहै । म्लापयामि भ्रजः शिभ्रं वरुणस्य व्रतेन ते ॥ २ ॥
यथा शेपो अपायातै स्त्रीषु चासदनावयाः ।
अवस्थस्य क्नदीवतः शाङ्कुरस्य नितोदिनः यदाततमव तत्तनु यदुत्ततं नि तत्तनु ॥ ३ ॥

अर्थ-- (व्रततेः पुराणवत् गुष्पितं इव) वेलींच्या जुन्या वाळलेल्या डहाळ्यांप्रमाणें (दासस्य ओजः अपि-वृश्च दम्भय) हिंसकाच्या बळास कापून टाका, दाबून टाका. (१)

(वयं अस्य तत् संभृतं वसु) आम्हीं त्याच्या त्या एकत्रित धनाला (इन्द्रेण विभजामहै) प्रभूसह वांटून देतो; तसेंच (वरुणस्य व्रतेन) वरुणदेवाच्या व्रतासह (ते भ्रजः शिभ्रं म्लापयामि) तुझ्या तेजाची घमेंड उतरवितों. (२)

(अवस्थस्य क्नदीवतः) खराब शिव्या देणाऱ्या, (शांकुरस्य नितोदिनः) कांट्याप्रमाणें व्यवहार करणाऱ्या आणि पीडा देणाऱ्या दुष्ट मनुष्याचें (यत् आततं) जें पसरलेलें दुष्कृत्य आहे (तत् अव तनु) त्याचा नाश होवो, (तत् उत्ततं तत् नितनु) जे वर चढलेलें आहे तें खालीं पडो. (यथा शेपः स्त्रीषु अपायातै) त्यांचे दुष्ट कर्म स्त्रियांचे बाबतींत न व्हावें, त्यांचेपर्यंत ते दुष्ट (अनावयाः असत्) पोहोंचूं शकूं नयेत. (३)

भावार्थ-- हे ईश्वरा ! दुष्ट आणि उपद्रव देणाऱ्या मनुष्यांचें बळ नाहीसें कर. (१)

दुष्ट मनुष्याचें द्रव्य घेऊन ईश्वराच्या शुभ कार्यांत खर्चून टाका. (२)

पीडा देणारे दुष्ट मनुष्य स्त्रियांस कधीं कष्ट न देतील अशी व्यवस्था करावी. (३)

हें सूक्त स्पष्ट आहे त्यामुळें त्याचें जास्त विवेचन करण्याची आवश्यकता नाहीं. दुष्टांच्या आक्रमणापासून स्त्रियांना वाचविलें पाहिजे. कोणी दुष्ट मनुष्य स्त्रियांपर्यंत न पोंहोचावा.

यातुधान--नाशनं

कांड १, सूक्त ७

(ऋषिः– चातनः । देवता – अग्निः, [जातवेदाः] ३ अग्नीन्द्रौ)

स्तुवानमग्न आ वह यातुधानं किमीदिनम् । त्वं हि देव वन्दितो हन्ता दस्योर्बभूविथ ॥ १ ॥
आज्यस्य परमेष्ठिन् जातवेदस्तनूवशिन् । अग्ने तौलस्य प्राशान यातुधानान् वि लापय ॥ २ ॥

अर्थ— हे अग्नि ! (स्तुवानं) स्तुति करणाऱ्या (यातुधानं किमीदिनं) घातक शत्रूंनासुद्धां (आ वह) येथें घेऊन ये. (हि) कारण हे देवा ! (वन्दितः त्वम्) नमनास पात्र झालेला तूं (दस्योः) लुटारूंचा (हन्ता) मारून टाकणारा अथवा पकडणारा (बभूविथ) झाला आहेस. (१) हे (परमेष्ठिन्) श्रेष्ठ स्थानीं रहाणाऱ्या (जातवेदः) ज्ञानास प्राप्त करणाऱ्या आणि (तनू-वशिन्) शरीरास संयमांत ठेवणाऱ्या अग्ने ! तूं (तौलस्य आज्यस्य) तोललेल्या तूप इत्यादींचें (प्राशान) भोजन कर आणि (यातुधानान्) दुष्टांना (वि लापय) विलाप करीव. (२)

वि लपन्तु यातुधाना अत्रिणो ये किमीदिनः । अथेदमग्ने नो हविरिन्द्रश्च प्रति हर्यतम् ॥ ३ ॥
अग्निः पूर्व आ रभतां प्रेन्द्रो नुदतु बाहुमान् । ब्रवीतु सर्वो यातुमानयमस्मीत्येत्य ॥ ४ ॥
पश्याम ते वीर्यं जातवेदः प्र णो ब्रूहि यातुधानान्नृचक्षः ।
त्वया सर्वे परितप्ताः पुरस्तात्त आ यन्तु प्रब्रुवाणा उपेदम् ॥ ५ ॥
आ रभस्व जातवेदोऽस्माकर्थाय जज्ञिषे । दूतो नो अग्ने भूत्वा यातुधानान् वि लापय ॥ ६ ॥
त्वमग्ने यातुधानानुपबद्धाँ इहा वह । अथैषामिन्द्रो वज्रेणापि शीर्षाणि वृश्चतु ॥ ७ ॥

अर्थ— (ये) जे (यातुधानाः) दुष्ट (अत्रिणः) भटकणारे आणि (किमीदिनः) घातक आहेत ते (विलपन्तु) विलाप करोत. (अथ) आणि आतां हे अग्ने ! (इदं हविः) हा हवि तूं आणि (इंद्रः च) इंद्र (प्रति हर्यतम्) स्वीकार करा. (३) (पूर्वः अग्निः आरभतां) प्रथम अग्नि आरंभ करो नंतर (बाहुमान् इन्द्रः प्र नुदतु) बाहुशाली इंद्र विशेष प्रेरणा करो, ज्यामुळें (सर्वः यातुमान्) सर्व दुष्ट लोक (एत्य) येवून (ब्रवीतु) म्हणोत कीं, (अयं अस्मि इति) हा मी आहें. (४) हे (जातवेदः) ज्ञानी ! (ते वीर्यं पश्याम) तुझा पराक्रम पाहूं. हे (नृ-चक्षः) मनुष्यांना मार्गदर्शन करणाऱ्या ! (यातुधानान्) दुष्टांना (नः) आमची आज्ञा (प्रब्रूहि) विशेष प्रकारें ऐकव. (त्वया) तुझ्याकडून (पुरस्तात्) पूर्वी (परितप्ताः) तापलेले, त्रस्त झालेले (ते सर्वे) ते सर्व (इदं ब्रुवाणाः) असें म्हणत म्हणत (उप आयन्तु) आमच्याजवळ येवोत. (५) हे (जातवेदः) ज्ञानी ! (आरभस्व) आरंभ कर (अस्माक+अर्थाय) आमच्या प्रयोजनासाठीं तूं (जज्ञिषे) उत्पन्न झाला आहेस. हे अग्नि ! तूं आमचा दूत होऊन लुटारू आणि दुष्टांस विलाप करण्यास लाव. (६) हे अग्नि ! तूं (यातुधानान्) दुष्टांना (उपबद्धान्) बांधून (इह आ वह) येथें घेऊन ये. (अथ) आणि इन्द्र स्वतःच्या वज्रानें (एषां शीर्षाणि) त्यांची मस्तकें (वृश्चतु) कापून टाको. (७)

यातुधानांचा नाश

या सूक्ताचा भावार्थ मागाहून लिहूं; कारण तसें करण्यापूर्वी या सूक्तांतील कित्येक शब्दांच्या अर्थांचा प्रथम विचार केला पाहिजे. या सूक्तांतील शब्द भ्रम उत्पन्न करणारे आहेत. आणि जोपर्यंत त्यांचा निश्चित अर्थ बरोबर ध्यानीं येणार नाहीं तोपर्यंत सूक्तांतील उपदेश बरोबर ध्यानीं येणार नाहीं. सर्वप्रथम अग्नि कोण आहे तें निश्चित केलें पाहिजे.

अग्नि कोण आहे ?

या सूक्तांत अग्नि पदाचा अर्थ करावयाचा त्याचा निश्चय करण्यास शब्द असे आहेत- ' जातवेदः, परमेष्ठिन्, तनूवशिन्, नृचक्षः, वन्दितः, दूतः देवः, अग्निः ' या शब्दांचा अर्थ पाहूं आणि नंतर अग्निस्वरूप आपण पाहूं-

(१) जातवेदः- [जातं वेत्ति] जो उत्पन्न झालेल्या सर्व सृष्टीस उत्तम प्रकारें जाणतो, (ज्ञात-वेदः) ज्यानें ज्ञान प्राप्त केलें आहे अर्थात् ज्ञानी, सृष्टिविद्या आणि आत्मविद्येला यथावत् जाणणारा.

(२) परमेष्ठिन् (परमे पदे स्थाता) परमपदांत स्थिर राहिलेला, अर्थात् समाधीच्या अंतिम अवस्थेस जो प्राप्त झाला, ज्यानें आत्मानुभव प्राप्त केला आहे, तुर्या-चतुर्थ अवस्थेचा अनुभव करणारा.

(३) तनूवशिन्- (तनू-वशिन्) स्वतःचें शरीर आणि इंद्रियें स्वतःच्या स्वाधीन ठेवणारा, इंद्रियांचा संयम आणि मनोनिग्रह करणारा, आसनादि योगासनानीं ज्यानें स्वतःची कायासिद्धि केली आहे, असाच मनुष्य, ' परमे-ष्ठिन् ' होण्याचा संभव आहे.

(४) नृ-चक्षः- ' चक्षस् ' शब्द स्पष्ट वाणीनें उपदेश करण्याचा भाव दर्शवितो. मनुष्यास जो योग्य धर्ममार्गाचा उपदेश करतो.

ज्ञानी उपदेशक

हे चार शब्द अग्नीचे गुणधर्म दाखवितात, हे शब्द पहातां असें स्पष्ट दिसतें कीं येथील ' अग्नि ' पद म्हणजे धर्मोपदेशक पंडितच आहे. सृष्टिविद्या जाणणारा, अध्यात्मशास्त्रांत प्रवीण, योगाभ्यासानें शरीर मन आणि इंद्रियें यांस काबूंत ठेवणारा, समाधीची सिद्धि ज्यास प्राप्त झाली आहे, तोच हा पंडित ' नृचक्षः ' म्हणजे लोकांस उपदेश करण्यास योग्य आहे. उपदेशक होण्यापूर्वी उपदेशकाची तयारी कशी असली पाहिजे त्याचा बोध येथें होतो. असे उपदेशक जर असले तरच धर्माचा योग्य प्रचार होणें शक्य आहे.

(५) वन्दितः– अशा प्रकारच्या उपदेशकांना सर्व लोक वंदन करतात.

(६) दूतः– जो संदेश पोहोंचवितो त्यास दूत म्हणतात. हा उपदेशक पंडित धर्माचा उपदेश आम जनतेस पोहोंचवितो म्हणून तो ' धर्माचा दूत ' आहे. दूत शब्दाचा दुसरा अर्थ ' नोकर, भृत्य ' असा आहे. तो अर्थ येथें निरुपयोगी आहे. धर्माचा संदेश ठिकठिकाणीं पोहोंचविणारा हा दूत धर्माचा उपदेशकच आहे.

७ देवः— प्रकाशमान्, तेजस्वी.

८ अग्निः– प्रकाश देऊन अंधकाराचा नाश करणारा, ज्ञानाचा प्रकाश वाढवून अज्ञानरूपी अंधःकाराचा नाश करणारा, उष्णता गरमी उत्पन्न करून हालचाल करणारा.

हे सर्व शब्द उपदेशकाचें वर्णन करतात. या प्रकारें वेदांत ' अग्नि ' शब्द ज्ञानी, उपदेशक ब्राह्मणवाचक आहे. आणि ' इंद्र , शब्द क्षत्रियवाचक आहे.

ब्रह्मक्षत्रिय

' ब्रह्मक्षत्रिय ' शब्द ब्राह्मण आणि क्षत्रियांचा बोध करतो. वेदांत हे दोन शब्द पुष्कळ ठिकाणीं एकत्रित आले आहेत. हाच भाव ' अग्नि-इंद्र ' या दोन शब्दांनीं वेदांत अनेक ठिकाणीं दाखविला आहे. अग्नि शब्द ब्राह्मणांचा आणि इंद्र शब्द क्षत्रियांचा वाचक आहे. अग्नि शब्दाचा ब्राह्मण अर्थ कसा होतो तें आपण पाहिलें. आतां इन्द्र शब्दांचा अर्थ पाहूं—

इंद्र कोण आहे ?

इंद्र शब्द स्वतःच क्षत्रियवाचक आहे. कारण त्याचा अर्थ शत्रुनाशक असा होतो.

१ इंद्रः–(इन्+द्रः) शत्रूंस छिन्नभिन्न करणारा.

२ बाहुमान–बाहु असणारा, भुजा असणारा म्हणजे बाहु बलासाठीं सुप्रसिद्ध. प्रत्येक मनुष्य बाहु असणारा तर असतोच. परंतु क्षत्रियालाच ' बाहुमान् ' अशासाठीं म्हणतात कीं त्याची कार्यें बाहुबळाची असतात.

३. इन्द्रः वज्रेण शीर्षाणि वृश्चतु–क्षत्रिय तरवारीनें शत्रूंची डोकीं उडवोत. क्षत्रियाच्या या कार्याचें वर्णन या सूक्ताच्या अंतिम मंत्रांत केलें आहे. युद्धांत शत्रूंची डोकीं उडविण्याचें तसेंच दुष्टांचें पारिपत्य करण्याचें कार्य क्षत्रियांचें असतें ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे.

यावरून हें सिद्ध होतें कीं, या सूक्तांत ' इन्द्र ' शब्द क्षत्रियभाव सुचवितो. याप्रमाणें अग्नि शब्दानें ब्राह्मण आणि इंद्र शब्दानें क्षत्रियभाव ग्रहण केल्यावर सूक्ताचा अर्थ काय होतो तें पाहूं–

धर्मोपदेशाचें क्षेत्र

वाचकांनीं असें समजूं नये कीं, वार्षिक उत्सवांत व्याख्यान दिलें कीं धर्मोपदेशकाचें काम संपलें. तेथें फक्त धार्मिक लोक येतात. पूर्वीपासून ज्यांची वृत्ति आणि प्रवृत्ति धर्मांत राहिलेली आहे तेवढेच धार्मिक लोक अशा उत्सवांत येतात. अशांना धर्मोपदेश करणें याचा अर्थ तर धुतलेले कपडेच पुनः धुणें असा होतो. वास्तविक मळलेल्या कपड्यांना धुवून स्वच्छ केलें पाहिजे. त्याचप्रमाणें अधार्मिक वृत्तीच्या लोकांनाच उपदेशद्वारां सुधारलें पाहिजे. हाच खऱ्या धर्माचा प्रचार आहे. हें दर्शविण्यासाठींच या सूक्तांत धर्मप्रचार करण्यायोग्य लोकांचे वर्णन पुढील शब्दांनीं केलें आहे– **' यातुधान, किमीदिन्, दस्यु, अत्रिन् '**, आतां त्यांचा आशय पाहूं–

१. यातु– ' यातु ' भटकणाऱ्यांचें नांव आहे. ज्यांच्या घरादाराचा ठिकाण नाहीं, परंतु जे वन्य पशूंप्रमाणें इकडे तिकडे भटकत असतात त्यांना **' यातु '** म्हणतात, भटकण्याची क्रिया दर्शविणारा ' या ' धातु यांत आहे.

२. यातुमान्– यातुमान् , यातुवान् शब्दांचा अर्थ (भाव) ज्याचेजवळ पुष्कळ भटके लोक आहेत म्हणजे भटकणाऱ्या संघाचा प्रमुख.

३. यातुमानान्– पुष्कळ यातुमानानां स्वतःच्या ताब्यांत ठेवणारा.

४. यातुधानः– यातूंना आश्रय देणारा, भरणपोषण करणारा म्हणजे भटकणाऱ्यांना स्वतःच्या जवळ बाळगून त्यांचें पोषण करणारा. **' यातुधान्य '** शब्द सुद्धां हाच भाव दाखवितो.

वाचकांच्या हें ध्यानीं आलें असेल कीं, हे शब्द विशेष गोष्ट व्यक्त करतात. ज्यांना घरदार, स्त्रीपुत्र वगैरे असतात आणि जे कुटुंबांत रहातात ते इतके उपद्रवकारक नसतात, जितके घरदाररहित भटके उपद्रवकारक असतात. ते नेहमीं खाण्यासाठीं वख-

वखलेले असतात. कोणत्याहि प्रकारचें मानसिक समाधान त्यांस प्राप्त होत नाहीं. म्हणून सर्व प्रकारें उपद्रव देण्यास ते तयार असतात. त्यामुळें ' **यातु** ' शब्द वाईट प्रवृत्तींचा या अर्थी रूढ झाला आहे, दुष्ट, डाकु, चोर, लुटारु खुनी इत्यादि शब्दांचे अर्थी ' **यातु** ' शब्द पूर्वी येऊन गेला. हे चोर अथवा डाकू जोपर्यंत एकटे असतात तो पावेतों त्यांस ' **यातु** ' असें म्हणतात. परंतु कोणीं असे दोन चार डाकू एकत्र करून त्यांस स्वतः-च्या ताब्यांत ठेऊन लूट करूं लागला म्हणजे त्यास, '**यातुमान्, यातुवान्** ' (म्हणजे यातु ज्याचे जवळ आहेत असा,) असें म्हणतात. पहिल्यापेक्षां दुसरा समाजाची जास्ती हानि करतो. त्याचें नांव ' **यातुधान, यातुधान्य** ' असें आहे. यावरून वाचकांनीं समजावें कीं हे शब्द जेथें कोठें आले असतील तेथें त्यांचा अर्थ हीन आणि दुष्ट लोक असा आहे. आतां आणखी पहा—

५. अत्रिन्– अत्री (**अतति**) नेहमीं भटकणारा. हा शब्दसुद्धां पहिल्या शब्दासारखाच अर्थदर्शक आहे. त्याचा दुसरा अर्थ (**अत्ति**) खाणारा, नेहमीं स्वतःच्या सुखासाठीं– स्वार्थासाठीं दुसऱ्याचा गळा कापणारा, जे थोड्याश्या धनासाठीं खून करतात अशा प्रकारच्या दुष्ट लोकांचा वाचक हा शब्द आहे.

६. किमीदिन्– (**किं इदानीं**) आतां काय खावें, अशा प्रकारचे नेहमीं भुकेलेले खादाड अथवा पोटासाठीं म्हणजे निव्वळ खाण्यासाठीं सुद्धां दुसऱ्यांचा घातपात करणारे दुष्ट लोक.

७. दस्यु– (**दस्–उपक्षये**) घातपात करणारा, दुसऱ्याचा नाश करणारा, सर्व प्रकारचा दुष्ट मनुष्य.

हे सर्व लोक समाजाच्या सुखाचा नाश करतात. या कारणानें समाजांतील लोकांना कष्ट होतात. जर हे लोक गांवांत आले तर ते गांवांत चोरी, डाकुगिरी, खून, लूट वगैरे करतात. स्त्रियांवर अत्याचार करतात. सज्जनांस अनेक प्रकारें कष्ट देतात. एवढ्या-साठींच धर्मोपदेशानें त्यांना सुधारलें पाहिजे, असा या सूक्ताचा आदेश आहे. जे घरदाररहित आहेत, जे जंगलांत, अरण्यांत रहातात, जे चोरी, धाड घालणें, लुटणें इत्यादि दुष्ट कर्मे करतात त्यांना धर्मोपदेशानें सुधारलें पाहिजे. म्हणजे जे धार्मिक आहेत, नागरिक आहेत, प्रथमपासुन धर्मप्रेमी आहेत त्यांच्यांत धर्म-जागृति करणें योग्य, परंतु जें अधार्मिक आहेत, ज्यांच्यापर्यंत धर्माचा आवाज पोहोंचला नाहीं आणि ज्यांचा जीवनक्रम नेहमीं धर्मबाह्य मार्गानें चालतो त्यांस सुधारून उत्तम नागरिक बनविलें पाहिजे. धर्मोपदेशकानें हें स्वतःचें कार्यक्षेत्र नीट समजून घ्यावें.

धर्मोपदेशकाचे गुण, शासनकार्यासाठीं नियुक्त केलेल्या क्षत्रियाचे गुण, आणि ज्या लोकांत धर्मप्रचाराची अत्यंत आवश्यकता आहे त्यांचे गुण आणि कर्मे या सूक्ताच्या आधारें आपण पाहिलीं. आतां या शब्दार्थांच्या आधारें हें सूक्त पाहिलें पाहिजे.

दुष्टांची सुधारणा

प्रथम मंत्र– ' हे धर्मोपदेशका ! तुझी प्रशंसा करणाऱ्या दुष्ट डाकूंना येथें घेऊन ये कारण कीं तुला वंदन केल्यावर तूं दस्यूचा नाशक होतोस. ' (१)

या पहिल्या मंत्रांत दोन विधानें आहेत—

(१) स्तुति करणाऱ्या डाकूंस येथें घेऊन ये, आणि

(२) त्यांचें वंदन स्वीकारून त्यांचा नाशक हो.

त्याचें तात्पर्य असें आहे– धर्मोपदेशकानें अशा दुष्ट डाकू, खिसेकापू लोकांत धर्मोपदेश करण्यासाठीं जावें आणि त्यांस सत्यधर्माचा उपदेश करावा. चोरी करणें, मार्गांत लुटणें ही पाप-कर्मे आहेत ही गोष्ट त्यांस चांगल्या प्रकारें समजून द्यावी. त्यांना त्यांच्या दुष्ट कर्मांतून परावृत्त करावें. जेव्हां त्यांस उत्तम रीतीनें कळून येईल कीं चोरी करणें वगैरे उपद्रव–व्यवसाय पाप कर्मे आहेत, आणि मानवांचें रक्षण करणें हा सत्यधर्म अगदीं निराळा आहे, हा सत्य धर्म धर्मोपदेशकापासूनच मिळेल, तेव्हां ते भक्ति, श्रद्धायुक्त अंतःकरणानें त्याचे जवळ येतील, त्याची प्रशंसा करतील आणि त्याचेसमोर स्वतःचें मस्तक नमवतील म्हणजे त्यांना नमस्कार करतील, जेव्हां त्यांच्यांत एवढी श्रद्धा भक्ति वाढेल. तेव्हां त्यांच्या दुष्ट भावनांचा नाश म्हणजे हनन आपो-आपच होईल. म्हणून या मंत्रांत म्हटलें आहे कीं, धर्मोपदेशक दुष्ट मनुष्यांना स्वतःच्या उपदेशद्वारा स्वतःची प्रशंसा करणारा बनवील म्हणजे त्यांस स्वतःचे अनुयायी करील, स्वतःच्या समा-जांत मिळवील, आणि त्यांचेजवळून नमस्कार मिळवून (त्यांच्या दुष्ट भावनांचा) घातक होईल. '

' ज्यांचे जवळून नमस्कार प्राप्त करावयाचा त्यांचाच घात करावयाचा ' हें विधान प्रथम दृष्टीला चमत्कारिक, विचित्र वाटेल परंतु अधार्मिक, दुष्ट मनुष्यांस सुधारणाऱ्यांचें असेंच होतें. जेव्हां दुष्ट मनुष्य धार्मिक होतो तेव्हां तो आपलें मस्तक धर्मोप-देशकापुढें नत करतो आणि मस्तक नम्र होतांच त्या दुष्ट मनुष्यांत बदल होऊन (वास्तविक रीत्या त्याच्या दुष्ट भावनांचा नाश होऊन) एक नवीनच मनुष्य जन्मास येतो, म्हणजे त्यास धार्मिक नवजीवन प्राप्त होण्यामुळें तो (जुना मरून) नवा जन्मला, नवा बनला जातो. जर एक लुटारु धर्मोपदेश ऐकून धार्मिक होईल तर सामाजिक दृष्टीनें त्याचा सत्य अर्थ हाच कीं एक डाकु मरून गेला आणि एक खरा धार्मिक विचारसंपन्न नवीन जन्मास आला. आतां दुसरा मंत्र पहा—

मिताहारी व्हा

दुसरा मंत्र– ' हे परमश्रेष्ठ अवस्थेंत रहाणाऱ्या, शरीरास वश ठेवणाऱ्या, ज्ञानी धर्मोपदेशका ! तूप इत्यादि पदार्थ तोलून म्हणजे प्रमाणशीर भक्षण कर आणि दुष्टांना रडव. (२)

या मंत्रांतसुद्धां दोन विधानें आहेत.

(१) तोलून मापून तूप वगैरे भक्षण कर, आणि

(२) दुष्टांस रडव.

धर्मोपदेशकानें या दोन्ही गोष्टी ध्यानीं घेतल्या पाहिजेत. धर्मोपदेशक जेव्हां बाहेर धर्मप्रचारासाठीं जाईल तेव्हां भक्त लोक त्याच्यासाठीं, मेवा–मिठाई, दूध–तूप इत्यादि पदार्थ आवश्यकतेपेक्षां जास्त आणून देतील. तसेंच जे नव्या धर्मांत नवीनच आलेले आहेत त्यांची भक्ति तीव्र स्वरूपाची अत्यधिक असते, असे लोक धर्मोपदेशकाचा आवश्यकतेपेक्षां जास्त आदर करतात. अशावेळीं जिव्हालौल्यामुळें धर्मोपदेशक जास्त खाणें शक्य आहे, त्यामुळें प्रकृति बिघडून आजारी पडेल, म्हणून वेदानें धर्मोपदेशकास तोलून-मापून आहार घेण्यास सांगितलें आहे. या धर्मोपदेशकास नित्य भ्रमण करावयाचें असतें. त्यामुळें नित्य हवापाणी बदलत रहातें, त्यामुळें सुद्धां पचनशक्ति बिघडण्याचा संभव आहे. यासाठीं ज्याची जेवढी पचनशक्ति असेल त्यापेक्षां सुद्धां दोन घांसानीं कमी त्यांनीं जेवणें योग्य आहे. त्यासाठीं वेदानें म्हटलें कीं ' धर्मोपदेशकानें तूप इत्यादि पदार्थ तोलून मापून खावे, अधिक खाऊं नयेत. '

मंत्रांत दुसरी गोष्ट ' दुष्टांस रडविण्याची ' आहे. जर उपदेशक प्रभावशाली असेल, आणि जर त्याच्या उपदेशानें दुराचाऱ्यांस स्वतःच्या दुष्ट कृत्यांची जाणीव होईल आणि त्यांच्या अंतःकरणांत भ्रातृभावना जागृत होईल तर त्यांस रडूं येण्यास जराहि वेळ लागणार नाहीं. तसेंच त्यांच्या पूर्वीच्या दुराचारी जीवनाविषयीं पूर्ण पश्चात्ताप होण्याससुद्धां वेळ लागणार नाहीं. याप्रमाणें दुसऱ्या मंत्राचा भावार्थ पाहिल्यावर तिसरा मंत्र पाहूं–

दुष्ट जीवनाविषयीं पश्चात्ताप

तिसरा मंत्र– ' दुष्ट लोक रडतील आणि हे धर्मोपदेशका ! आमचें धन तुझ्यासाठीं आहे. क्षत्रियसुद्धां त्याचा स्वीकार करोत ! (३)

खऱ्या धर्मोपदेशकाचा धर्मोपदेश ऐकून दुष्टलोकांना स्वतःच्या दुष्कृत्यांबद्दल पश्चात्ताप होईल आणि ते रडतील. तसेंच जनतासुद्धां अशा धर्मोपदेशकांस आणि रक्षण करणाऱ्या क्षत्रियांस यथाशक्ति धन देत राहील, जनतेच्या द्रव्यसहाय्यानेंच धर्मोपदेशाचें कार्य सतत चालू राहतें. आतां चौथा मंत्र पहा—

धर्मोपदेशकानें आपलें कार्य चालू ठेवावें

चौथा मंत्र– ' प्रथम धर्मोपदेशकानें स्वतःच्या कार्याचा आरंभ करावा, मागाहून क्षत्रियानें त्यास मदत करावी, त्याचा परिणाम असा होईल कीं सर्व दुष्ट येऊन जाहिर करतील कीं ' हा मीं येथें आहें ' (४)

धर्मोपदेशकानें निर्भयपणें देशांत जेथें तो जाऊं शकेल तेथें तेथें जावें आणि स्वतःचें धर्मप्रसाराचें कार्य जोरांत चालू ठेवावें. कठिण परिस्थिति आली तरी भिवूं नये. मागाहून क्षत्रियांनीं त्याला अवश्य तें सहाय्य करावें. म्हणजे धर्मप्रचार स्वतःचें आवश्यक कर्तव्य मानून करीत रहावा. या धर्मप्रचाराचा परिणाम असा व्हावा कीं सर्व दुष्ट दुराचारी मनुष्यें स्वतःचें आचरण सुधारून आणि मोकळ्या मनानें उपदेशकापाशीं यावींत आणि त्यांनीं म्हणावें कीं,' आम्हीं आतां आपणांस शरण आलों आहोंत.' हेंच धर्मप्रचाराचें साध्य आहे. धर्मप्रचारानें दुराचारी लुटारू सुधारावेत आणि ते उत्तम धार्मिक व्हावेत, त्यांनीं आपल्या पूर्व दुष्कृत्यांविषयीं पश्चात्ताप करावा, तसेंच स्वतःच्या दुराचाराचें स्मरण होतांच त्यास रडूं यावें. क्षत्रियांच्या सहाय्याची इच्छा केल्याशिवाय केवळ स्वतःच्या कर्तव्यबुद्धीनें, आत्मिक बळाच्या जोरावर धर्मोपदेशकानें हें कार्य करावें. मागून अवश्य तर क्षत्रिय त्यास पाहिजे तें सहाय्य देईल. परंतु ब्राह्मण स्वतःच्या सात्त्विक वृत्तीनें जो हृदयपालट घडवून आणील तेंच खरें धर्मपरिवर्तन होय. याप्रकारें चतुर्थ मंत्राचा आशय पाहिला. आतां पांचवा मंत्र पाहूं या—

पश्चात्तापानें दुष्टांची शुद्धि

पांचवा मंत्र– ' हे ज्ञानी उपदेशका ! आम्ही तुमचा पराक्रम पाहूं. मनुष्यास सन्मार्ग दाखविणाऱ्या ! दुष्टांस तुम्हीं आपल्या धर्माचा उपदेश करा. तुमच्या प्रयत्नांनीं पश्चात्ताप पावून सर्व दुष्ट लोक आमच्याजवळ येवोत आणि नेत्याप्रमाणें बोलोत. '

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें खरा धर्मोपदेशक जेव्हां धर्मोपदेशासाठीं बाहेर गांवीं जाण्यास निघेल, तेव्हां त्याचा गौरव करणारे लोक म्हणतील, ' हे उपदेशका ! आतां तूं उपदेश देण्यास जात आहेस तर आम्हीसुद्धां पाहूं कीं तुझ्या परिशुद्ध उपदेशानें तूं किती लोकांचें हृदयपरिवर्तन करूं शकतोस, आणि किती जणांस सत्यधर्माची दीक्षा तूं देतोस. त्यामुळें तुझा पराक्रम आम्हांस बरोबर कळेल. तुम्हीं सुखानें जा, आम्हीं तुमचा सन्मान करतों, सत्यधर्माचा संदेश सर्व जनतेपर्यंत पोंहोचवा. तुमच्या उपदेशरूपी ज्ञानाग्नीनें तप्त झालेले आणि पश्चात्ताप झालेले लोक आमच्या समाजांत दाखल व्हावेत आणि त्यांनीं म्हणावें कीं, ' आम्हीं

आतां धर्मामृत प्यालों आहोत आणि त्यामुळें आतां आम्ही सर्वस्वी तुमचे झालों आहोंत. '

' तप्त, संतप्त, परितप्त ' हे शब्द पश्चात्तापसूचक आहेत. तप शब्द तप्त होऊन म्हणजे ताप सहन करून शुद्ध होणें हें सुचविता. अग्नि सोनें, चांदी, तांबें वगैरे धातूंस तापवून शुद्ध करतो म्हणजे त्यांची मलिनता दूर करतो. याप्रकारें येथील अग्नि जे ज्ञानी धर्मोपदेशक आहेत ते स्वतःच्या ज्ञानाग्नीमध्यें सर्व दुष्टांस तापवितात आणि त्यांची मलिनता उत्तम प्रकारें दूर करतात. शुद्धीचा खरा विधि हाच आहे. भोगी जीवनाचा त्याग करून तपस्वी जीवनाचा प्रारंभ करणें याचेंच नांव धार्मिक होणें. या दृष्टीनें मंत्रांतील ' **परि-तप्ताः** ' हा शब्द फार महत्त्वाचा आहे आणि मोठा भावसूचक आहे. आतां सहाव्या मंत्राचा भावार्थ पाहूं.

धर्माचा दूत

सहावा मंत्र– ' हे ज्ञानी पुरुषा ! तुझ्या कार्याचा आरंभ कर. आमच्या कार्यासाठींच तुला पुढें केलें आहे. हे उपदेशका ! तूं आमचा धार्मिक संदेश पोंहोंचविणारा दूत होऊन दुष्टांना पश्चात्तापानें रडव. ' (६)

धर्म प्रचारासाठीं बाहेर जाणाऱ्या धर्मोपदेशकास लोक म्हणतात, ' आतां तुम्ही तुमच्या धर्मप्रचारकार्याचा आरंभ करा, जराहि न भितां, भीतिविना तुम्ही देशदेशांतरास जा आणि तेथें सत्य-धर्माचा प्रचार करा. आमचें हें कार्य करण्यासाठींच तुम्हांस पुढें पाठविलें आहे. तरी पुढें व्हा. आमचा धार्मिक संदेश जगांत पसरावयाचा आहे. हा संदेश प्रत्येक स्थळीं पोंहोंचविणारे तुम्हींच आमचे दूत आहांत. आतां पुढें व्हा आणि धार्मिक संदेश चारी दिशांस पसरवा आणि आतापावेतों जे लोक अधार्मिक वृत्तीनें रहात होते त्यांना तुमच्या सदुपदेशानें शुद्ध करा. त्यांना त्यांच्या पूर्व दुराचरणाचा पूर्ण पश्चात्ताप होऊं द्या. त्यांच्या हृदयाचें असें परिवर्तन करा कीं त्यांस पूर्व दुष्कृत्याचें स्मरण होतांच रडूं यावें. ' याप्रमाणें जगांत सुधारणा करण्यासाठीं धर्मोपदेशक पाठविण्यांत येतात.

लुटारूंस दंड

इतक्या धर्मोपदेशानंतर सुद्धां जे लोक सुधारणार नाहींत आणि स्वतःचें दुराचरण सोडणार नाहींत, चालू ठेवतील अथवा पूर्वी सांगितल्या प्रकारें श्रेष्ठ धर्मोपदेशकानें पराकाष्ठा केली असतांहि जे स्वतःचें दुष्ट आचरण सोडीत नाहींत आणि जनतेस चोरी, वाटमारी, वगैरेनीं अत्यंत त्रास देतात, त्यांस दंड देण्याचें कार्य ब्राह्मणांचेंही नाहीं. तें कार्य क्षत्रियांचें आहे. हा भाव पुढील मंत्रांत सांगितला आहे—

सप्तम मंत्र– ' हे धर्मोपदेशका ! तुमचे प्रयत्न झाल्यावर सुद्धां जे दुष्ट लोक, चोरी, लूटमार व वाटमारी सोडीत नाहींत त्यांस बांधून येथें घेऊन या आणि त्यानंतर क्षत्रिय तरवारीनें त्यांचीं मस्तकें तोडोत. ' (७)

श्रेष्ठ धर्मोपदेशकानें स्वतःच्या धर्मोपदेशानें प्रयत्न करावा आणि दुष्टांस धार्मिक आणि पवित्र बनविण्याचा यत्न करावा. जे सदाचारी होतील ते आपणांत मिसळतील, परंतु जे वारंवार प्रयत्न करून सुद्धां सुधारणार नाहींत, उलट स्वतःचें दुष्ट आचरण चालूच ठेवतील, त्यांना शिक्षा करणें अवश्यक आहे. कारण कीं सर्वशासन संस्था समाजाच्या शांततेसाठींच आहे, परंतु दुष्टांसहि सुधरण्याची पुरेपूर संधि देण्यांत यावी. जेव्हां वारंवार प्रयत्न करूनहि ते सुधरत नाहींत असें दिसलें, म्हणजे मग क्षत्रियांनीं पुढें सरसावून स्वतःच्या कठोर शासनाचा त्यांच्यावर अंमल गाजवावा. क्षत्रियांनीं त्या अत्याचारी दुष्टांस बांधून त्यांचीं मस्तकें तोडून टाकावींत. त्यावरून दुसऱ्यासुद्धां उपदेश मिळेल कीं आम्हीं धार्मिक झालें पाहिजे तरच वांचू, नाहून आमचीहि अशीच अवस्था होईल.

ब्राह्मण आणि क्षत्रियांच्या प्रयत्नांचें प्रमाण

या सूक्तांत ब्राह्मणांच्या प्रयत्ना विषयीं सहा मंत्र आहेत आणि क्षत्रियांच्या कठोर शासनाचें वर्णन करणारा एकच मंत्र आहे. यावरून स्पष्ट होतें कीं ब्राह्मणानें कमींत कमी सहा वेळ प्रयत्न स्वतःच्या सदुपदेशानें करावे, इतक्या प्रयत्नांनीं जर दुष्ट सुधरले नाहींत तर, सहावेळ संधि मिळाली असतांहि जे सुधारत नाहींत, आपली दुष्टता सोडीत नाहींत, त्यांच्यावरच क्षत्रियानें वज्रप्रहार करावे, करणें योग्य आहे, कारण ज्यांस जन्मजात दुष्टत्वानें वागण्याची संवय झाली ते एकादवेळच्या उपदेशानें सुधरतील, त्यांचा हृदयपालट होईल असें अपेक्षिणें कठिणच आहे जवळ जवळ तें अशक्यच आहे. म्हणून निरनिराळ्या प्रसंगानुरूप त्यांस संधि देण्यांत यावी, इतके प्रयत्न केले असतांहि जे लोक सुधरणार नाहींत तर त्यांचा शिरच्छेद केला पाहिजे.

ब्राह्मण मारून टाकतात आणि क्षत्रियहि मारून टाकतात परंतु त्या दोघांचीहि मारण्याची पद्धत वेगळी आहे. त्यांत फार मोठा फरक आहे. पहिल्या मंत्रांत ब्राह्मणाची पद्धत दाखविली आहे, सातव्या मंत्रांत क्षत्रियांची पद्धत दर्शाविली आहे. क्षत्रियाची रीत तर एकच आहे. तरवारीनें डोकें कापून टाकणें, अथवा दुष्टांना कारागृहांत बन्धनांत ठेवणें; यापासून ब्राह्मणाची पद्धत अगदीं भिन्न आहे, ब्राह्मण उपदेश करतो. उपदेशानें तो श्रोत्यांचा हृदयपालट घडवितो, त्यांस स्वतःचे अनुयायी करतो, त्यांच्या मनांतील सर्व दुष्टता नाश पावते. दोघांचाहि उद्देश दुष्टांची संख्या कमी

करण्याचा आहे. परंतु ब्राह्मण दुष्टांस सुधरण्याचे प्रयत्न करतो, त्या दुष्टांचीं हृदयें शुद्ध होऊन दुष्टांची संख्या कमी होते, तितकी चांगल्या माणसांची संख्या वाढते. परंतु क्षत्रिय त्यांची कत्तल करतो त्यामुळें दुष्ट जरी कमी झाले तरी त्यांची तेवढी संख्याहि जगांतून कमी होते. म्हणून ब्राह्मणाचे प्रयत्न श्रेष्ठ आणि क्षत्रियाचे त्याहून कमी होत.

वेदांत जेथें जेथें ' हनन, दहन, परिताप, विलाप ' असे शब्द आले आहेत त्या त्या स्थळीं त्यांचा एकच अर्थ घ्यावयाचा नाहीं. ते शब्द ब्राह्मणासाठीं वापरले आहेत कीं क्षत्रियासाठीं तें प्रथम पाहिलें पाहिजे. हननानें शत्रुसेना कमी होते. ब्राह्मण आणि क्षत्रिय दोघेहि आपल्या शस्त्रानें हनन करतात हें वर दर्शविलेंच आहे. परंतु हेंहि स्पष्ट केलें आहे कीं ब्राह्मण विचारपरिवर्तनद्वारा शत्रूचा नाश करतात आणि क्षत्रिय शिरच्छेदानें शत्रूची संख्या कमी करतात. तसेंच ' विलाप ' सुद्धां दोन प्रकारचा आहे. क्षत्रिय शत्रूंची कत्तल करतात तेव्हां शत्रूंचे साथीदार विलाप करतात, रडतात, हायहाय करतात. त्याच प्रकारें ब्राह्मण धर्मोपदेशाच्या योगानें ज्यावेळीं शत्रूच्या हृदयांत भक्तिभाव आणि धर्मप्रेम उत्पन्न करतात त्यावेळीं त्यांस आपल्या पूर्वीच्या दुष्ट कृत्यांचा पश्चात्ताप होऊन ते रडूं लागतात आणि अश्रू गाळतात. याप्रमाणें या अश्रू गाळण्याच्या दोन्हीं प्रकारांत फार मोठा भेद आहे. जें इष्ट परिवर्तन ब्राह्मण घडवून आणतो तें क्षत्रियास साधणार नाहीं. याचप्रमाणें ' परिताप, संताप ' वगैरे शब्दांच्या अर्थाविषयीं समजावें.

या सूक्तांचा अर्थ करणाऱ्या विद्वानांनीं ही ब्राह्मण-क्षत्रिय प्रणालिका ध्यानीं न घेतल्यानें, त्यांच्या मार्गांतील भेद नीट समजून न घेतल्यानें या शब्दांच्या अर्थाचा फार मोठा अनर्थ केला आहे. म्हणून वाचकांनीं हा भेद प्रथम नीट समजून घ्यावा आणि नंतर मंत्रांतील उपदेश समजण्याचा प्रयत्न करावा. ही गोष्ट जर एकदां नीट समजली तर मंत्रांतील आशय समजणें कांहींच कठीण नाहीं. परंतु ब्राह्मण आणि क्षत्रिय यांचा अनुक्रमें मृदु आणि तीक्ष्ण मार्गांतील भेद जर योग्य प्रकारें समजला नाहीं तर अर्थाच्या ठिकाणीं अनर्थ होईल. म्हणून दुष्टांची संख्या ब्राह्मण कशी कमी करतात आणि क्षत्रिय ती कशी कमी करतात, त्याचप्रमाणें दोघेहि शत्रूंस कशा प्रकारें रडवितात, तापवितात आणि जाळतात या विषयीं वाचकांनीं स्वतःचे विचार आणि येथें दर्शविलेले मार्ग नीट समजून घ्यावे आणि या सूक्तांचें तात्पर्य यथायोग्य जाणावें.

यातुधान-नाशनम्

कांड १, सूक्त ८

(ऋषिः- चातनः । देवता - अग्निः, बृहस्पतिः)

इदं हविर्यातुधानान् नदी फेनमिवा वहत् । य इदं स्त्री पुमानकरिह स स्तुवतां स जनः ॥ १ ॥

अयं स्तुवान आगमदिमं स्म प्रति हर्यत । बृहस्पते वशे लब्ध्वाग्नीषोमा वि विध्यतम् ॥ २ ॥

यातुधानस्य सोमप जहि प्रजां नयस्व च । नि स्तुवानस्य पातय परमक्ष्युतावरम् ॥ ३ ॥

अर्थ— (नदीफेनं इव) नदी ज्याप्रमाणें फेंस घेऊन येते त्याप्रमाणें (इदं हविः) हें दान (यातुधानान् आवहत्) दुष्ट लोकांस येथें घेऊन येवो. (यः पुमान्) जो स्त्री अथवा पुरुष (इदं अकः) हें पाप करीत रहातो, (सः जनः) तो मनुष्य तुझी (स्तुवतां) प्रशंसा करो. (१) (स्तुवानः अयं) प्रशंसा करणारे हे डाकू (आगमत्) आले आहेत, (इमं) त्यांचें (स्म प्रति हर्यत) अवश्य स्वागत करा. हे (बृहस्पते) ज्ञानी उपदेशका ! त्यांना (वशे लब्ध्वा) ताब्यांत घेऊन (अग्निषोमौ) अग्नि आणि सोम ! (वि विध्यतं) त्यांचें तुम्हीं विशेष निरीक्षण करा. (२) हे (सोमप) सोमपान करणारे हो ! (यातुधानस्य प्रजां) दुष्टांच्या संतानांपर्यंत जाऊन (जहि) पोहोंचा आणि (च नयस्व) त्यांना घेऊन जा म्हणजे सन्मार्गानें चालवा, तसेंच (स्तुवानस्य) प्रशंसा करणारांचीं (परं उत अवरं) श्रेष्ठ आणि कनिष्ठ (अक्षि) दृष्टि (निपातय) खालीं नमवा. (३)

यत्रैषामग्ने जनिमानि वेत्थ गुहा सतामत्त्रिणां जातवेदः ।
तांस्त्वं ब्रह्मणा वावृधानो जह्येषां शततर्हमग्ने ॥ ४ ॥

अर्थ— हे (अग्ने जातवेदः) तेजस्वी आणि ज्ञानी पुरुषा ! (यत्र गुहा) जेथें कोठें एका गुहेंत (एषां) या (अत्रिणां सतां) भटकणाऱ्या सज्जनांच्या (जनिमानि) कुटुंब आणि संततीला (वेत्थ) तूं जाणतोस, (तान् ब्रह्मणा वावृधानः) त्यांना ज्ञानानें वाढवून (एषां शततर्हं जहि) त्यांच्या शेंकडो कष्टांचा नाश कर. (४)

यातुधान-नाशन

हें सूक्त सुद्धां या पूर्वीच्या सूक्तांतील उपदेशच, पण जरा विशेष प्रकारें सांगत आहे. दुष्ट माणसास कशा प्रकारें सुधरावें या विषयींचा उपदेश या सूक्तांत पहाण्यासारखा आहे. या सूक्तात ब्राह्मण उपदेशकाचें आणखी एक विशेषण आलें आहे. तें ' बृहस्पतिः ' असें आहे. त्याचा अर्थ ज्ञानाचा स्वामी हा प्रसिद्ध आहे. बृहस्पति हा देवांचा गुरु आणि तो ब्राह्मण होता हें प्रसिद्धच आहे. त्या विषयीं शंकेला स्थानच नाहीं. ' सोम ' शब्द त्याचाच वाचक या सूक्तांत वापरला आहे. ' **सोमोऽस्माकं ब्राह्मणानां राजा** ' ब्राह्मणांचा पुढारी सोम आहे, त्याचप्रमाणें बृहस्पति सुद्धां श्रेष्ठ ब्राह्मणच आहे. वाचक जर हा शब्द पूर्वी आलेल्या सूक्तांतील ब्राह्मणवाचक शब्दांशी ताडून पहातील तर ब्राह्मण धर्मोपदेशकामध्यें कोणत्या गुणांची आवश्यकता असते, तें त्यांच्या ध्यानीं येईल. आतां क्रमानें मंत्रांचा भावार्थ पहा—

धर्मोपदेशाचा परिणाम

प्रथम मंत्र-- ' ज्याप्रमाणें नदी फेंस घेऊन येते त्याप्रमाणें हें दान दुष्ट लोकांस येथें घेऊन येवो. त्यांच्यामध्यें स्त्री अथवा पुरुष जे कोणी अशा प्रकारचें पाप करणारे असतील तेच स्तुति करणारे होवोत. ' (१)

पावसाच्या पाण्यानें नदी दुथडी वहातांना ज्याप्रमाणें प्रवाहा बरोबर फेंस वाहून आणते, त्याप्रमाणें धर्मप्रचारासाठीं अर्पण केलेलें हें आमचें दान दुष्टांना त्वरित येथें खेंचून आणो. म्हणजे या दानाचा विनियोग धर्मप्रचारासाठीं व्हावा आणि तें प्रचारकार्य असें व्हावें कीं त्याच्या योगानें सर्व दुष्ट मनुष्यें दुष्टता सोडून धार्मिक होण्यास आकर्षिलीं जावींत, आणि उत्तम नागरिक होण्यास त्यांनीं आमच्याजवळ यावें. त्यांच्यापैकीं सर्वच मग ते स्त्री असोत कीं पुरुष असोत-- पापाचरण करणारे तो उपदेश ऐकतांच धर्मभावनेनें प्रेरित होऊन तसेंच धर्मांत मिसळून जाण्याच्या उत्सुकतेनें धर्माची प्रशंसा करोत आणि अधर्माचरणाची निंदा करोत. वाचकांनीं लक्षांत ठेवावें कीं हृदय परिवर्तनाचें हें पहिलें लक्षण आहे. धर्मांत प्रवेश केल्यावर धर्मसंघांतील लोकांनीं त्यांच्याशीं कसें वागावें त्याविषयीं उपदेश दुसऱ्या मंत्रांत आहे. तो पहा—

नूतन प्रविष्टकांचा आदर

दुसरा मंत्र-- ' हा स्तुति करीत आला आहे. त्याचें स्वागत करा. हे ज्ञानी पुरुष हो ! त्याला तुमच्या ताब्यांत ठेऊन ब्राह्मण आणि त्याचें नेते त्याच्यावर लक्ष ठेवोत. ' (२)

उपदेश श्रवण करून धर्माकडे आकर्षित होऊन धर्माची प्रशंसा करीत करीत हा पुरुष आला आहे, म्हणजे पूर्वी जो दुराचारी पापी होता त्याचें हृदयपरिवर्तन होऊन तो धर्माकडे वळला आहे आणि तो खुल्या हृदयानें म्हणत आहे कीं धर्ममार्गानें चालणेंच श्रेयस्कर आहे. धर्माची श्रेष्ठता तो आतां जाणत आहे. तसेंच अधर्माचरणानें मनुष्याचें जें पतन होतें तेंहि त्याच्या अंतरांत चांगलें ठसविलें आहे. त्या पतनांतून वाचण्यासाठीं आतां तो धर्मसंघात प्रवेश करूं इच्छित आहे आणि त्याच उद्देशानें तो धार्मिक लोकांच्या जवळ आला आहे. अशा वेळीं धार्मिक लोकांनीं त्याचें स्वागत करणें उचित आहे. त्याचा आदरपूर्वक स्वीकार करावा म्हणजे त्याला आपल्यापैकींच एक समजावा. बृहस्पति म्हणजे जो ज्ञानी ब्राह्मण असेल त्याच्याजवळ त्यानें रहावें. त्या ज्ञानी ब्राह्मणानें नेमून दिलेल्या नियमानुसार त्यानें वागावें आणि अन्यसमयीं त्याच्यावर उपदेशकानें अथवा ब्राह्मणांच्या नेत्यानें देखरेख करावी आणि वारंवार त्यास धर्ममार्गाचा बोध करावा.

याप्रमाणें त्याची योग्यता वाढविण्यांत यावी आणि त्याच्या धर्मभावनांचा परिपोष होऊं द्यावा. नाहींतर नवीनच धर्मसंघांत

प्रवेश केलेल्या इतर संघीयांची उदासीनता पाहून स्वतःहि उदास होऊन तो निघून जाईल. आणि अधिक विरोधी होईल. म्हणून नवीन प्रवेश केलेल्या संबंधी धर्मसंघीयावर ही एक मोठी जबाबदारी आहे. याविषयीं वेदाच्या चार आज्ञा लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत.

१ हा नवीन प्रविष्ट झाला आहे.
२ त्याचा गौरव करा.
३ प्रविष्ट होतांच ज्ञान्यानें त्यास नियमयुक्त आचरण करण्याचें शिक्षण द्यावें.
४ अन्य विद्वानांनीं त्याचें निरीक्षण करावें.

या मंत्रांत '**विध्यत**' शब्द आहे त्याचा प्रसिद्ध अर्थ, निशाण मारणें, लक्ष्य वेधणें, लक्ष्य साधणें, पाडणें वगैरे आहे. निशाण (लक्ष्य) वेधणें म्हणजे त्यावर काळजीपूर्वक बारीक नजर लावणें, त्याच्यावर काळजीपूर्वक देखरेख ठेवणें असा अर्थ होतो. त्याची विशेष प्रकारें काळजी घ्यावी. त्याच्या कल्याणाचा नेहमीं प्रयत्न करावा. असो. आतां तिसरा मंत्र पाहूं—

दुष्टांच्या संततीची सुधारणा

तिसरा मंत्र- 'हे सोमपान करणारे हो! दुष्ट लोकांच्या प्रजेला अर्थात् त्यांच्या बालकांना प्राप्त करा आणि त्यांना उत्तम मार्गानें चालवा. जे तुमची प्रशंसा करतात त्यांची नजर नेहमीं तुमच्याकडे विनयानें नम्र होवो.'

सोमपान करणारा अर्थात् यज्ञकर्ता ब्राह्मण यज्ञद्वारा धर्मप्रचाराचें महान् कार्य करतो. दुष्टांस सुधरवण्याच्या महत्त्वपूर्ण कार्यांत महत्त्वाची गोष्ट अशी कीं उपदेशकानें जास्त वय असलेल्या वृद्धांस सुधारण्यापेक्षां नवयुवकांकडे जास्त लक्ष द्यावें व त्यांस सुधारण्याचा जास्त प्रयत्न करावा. नवयुवकांचा संघ करावा, त्यांचा आचार सुधरावा, सदाचाराकडे त्यांची रुचि वाढवावी, म्हणजे प्रत्येक रीतीनें त्यांना धार्मिक बनविण्याचा सर्वांत पहिल्यानें उद्योग करावा. कारण कीं वय जास्त असलेले लोक दुराचारांत मुरून गेलेले असतात. म्हणजे संवयीनें त्यांना दुराचार जास्त प्रिय आणि लाभदायक वाटत असतो. त्यामुळें त्यांचे हृदयपरिवर्तन करणें मोठें कठिण काम असतें, परंतु नवयुवकांचें मन कोमल असतें. त्यांच्यांत कुसंस्कार अजून बद्धमूल झालेले नसतात, त्यामुळें नवयुवकांची सुधारणा लवकर होते. त्यानंतर जर नवयुवक सुधरले तर त्यांची पुढील पिढी फार लवकर सुधरेल यासाठीं नवयुवकांना सुधारण्याचा प्रयत्न विशेष केला पाहिजे. दुष्टांच्या बालकांस एकत्रित करून त्यांस धर्मनीति म्हणजे धार्मिक आचरणाचें शिक्षण दिलें जावें, त्यांच्यात तुमच्या धर्माची जे प्रथम प्रशंसा करतील त्यांची दृष्टि नम्र करा म्हणजे गर्वानें जी उद्धत असते ती नम्र बनवा. अधार्मिक दुष्टांचे डोळे नेहमीं लाल आणि उन्मत्त असतात. भुंवया वांकड्या वळलेल्या आणि चढलेल्या असतात. दुसऱ्या मनुष्यांस जाणण्याची कला त्यांच्यांत असतेच. हा वांकड्या दृष्टीचा आशय आहे. खालीं पाहून चालणाऱ्या दृष्टीचा अर्थ वागणुकीतील नम्रता, श्रद्धा, भक्ति, आत्मपरीक्षण, आत्मसुधारणा इत्यादि आहे. (**अक्षि निपातय**) दृष्टि खाली करविणें याचा अर्थ असा आहे. सामान्य मनुष्यांची दृष्टि निराळ्या प्रकारची असते. साधूची दृष्टि विशिष्ट प्रकारची असते, तसेंच तरुण आणि वृद्धाच्या दृष्टींतसुद्धां भेद असतो. चोराची नजर निराळी, साधूची निराळी, म्हणून वेदानें म्हटलें आहे कीं 'त्यांची नजर खाली करा' धार्मिक आचार जीवनांत उतरला म्हणजे दृष्टि नम्र होते, अन्यथा नाहीं. असो. याप्रमाणें तिसऱ्या मंत्राचा आशय समजल्यावर चौथ्या मंत्राचा भावार्थ पाहूं—

घरांतून प्रचार

चौथा मंत्र- हे 'ज्ञानी उपदेशका! जेथें जेथें गुप्तस्थानीं या भटक्यांतील थोड्या भल्या पुरुषांचीं कुटुंबें असतील, तेथें जाऊन त्यांच्यांत ज्ञानाची वृद्धि करा आणि त्यांना पडणारे शेंकडों कष्ट दूर करा.' (४)

चोर, डाकू, वाटमारे इत्यादींना सुधरविण्याचा विचार करतांना त्यांच्या संघास उपदेश करावा ही सामान्य गोष्ट आहे. त्यापेक्षां जास्त परिणामकारक गोष्ट तर अशी कीं त्यांच्या परिवारांत जाऊन त्यास धर्मोपदेश केला पाहिजे. असें करण्यानें त्यांच्यांत थोडी भली माणसें (**सतां अत्रिणां**) असतील त्यांच्या घरीं प्रथम गेलें पाहिजे. कारण कीं त्यांचीं हृदयें थोडीं मृदु असल्याकारणानें त्यांच्यावर धर्मोपदेशाचा परिणाम त्वरित होईल. त्यांच्या घरीं जाऊन त्यांना, त्यांच्या स्त्रियांना, मुलाबाळांना प्रथम धर्मोपदेश करावा. त्यांची उन्नति (**ब्रह्मणा वावृधानाः**) ज्ञानद्वारा करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, म्हणजे त्यांना ज्ञान दिलें पाहिजे. खरें धर्मज्ञान देण्यानेंच त्यांचा उद्धार होऊं शकेल. एकवेळ धर्मज्ञानाविषयीं त्यांची आवड वाढली म्हणजे अधर्मामुळें होणारे शेंकडो त्रास आपोआप दूर होतील, आणि त्यांचें कल्याण होईल.

याप्रकारें या दोन सूक्तांचा उपदेश विशेष मनन करण्यासारखा आहे. धर्मप्रचार करणारा उपदेशक तसेंच उपदेशकांस नियुक्त करणाऱ्या सज्जनांनीं या वैदिक आदेशाचें मनन करावें आणि योग्य बोध घेऊन तो स्वतःच्या आचरणांत उतरविण्याचा प्रयत्न करावा.

शत्रुसेनेचें संमोहन

कांड ३, सूक्त १

(ऋषिः – अथर्वा । देवता – सेनामोहनं, बहुदैवत्यम्)

अग्निर्नः शत्रून्प्रत्येतु विद्वान्प्रतिदहन्नभिशस्तिमरातिम् ।
स सेनां मोहयतु परेषां निर्हस्तांश्च कृणवज्जातवेदाः ॥ १ ॥
यूयमुग्रा मरुत ईदृशे स्थाभि प्रेत मृणत सहध्वम् ।
अमीमृणन्वसवो नाथिता इमे अग्निर्ह्येषां दूतः प्रत्येतु विद्वान् ॥ २ ॥
अमित्रसेनां मघवन्नस्मान् छत्रूयतीमभि । युवं तानिन्द्र वृत्रहन्नग्निश्च दहतं प्रति ॥ ३ ॥
प्रसूत इन्द्र प्रवता हरिभ्यां प्र ते वज्रः प्रमृणन्नेतु शत्रून् ।
जहि प्रतीचो अनूचः पराचो विष्वक्सत्यं कृणुहि चित्तमेषाम् ॥ ४ ॥
इन्द्र सेनां मोहयामित्राणाम् । अग्नेर्वातस्य ध्राज्या तान्विषूचो वि नाशय ॥ ५ ॥

अर्थ— (विद्वान् अग्निः) विद्वान् अग्नीसमान तेजस्वी वीर (अभिशस्तिं अरातिं) घातपात करणाऱ्या शत्रूला (प्रति दहन्) जाळीत (नः शत्रून् प्रत्येतु) आमच्या शत्रूवर चढाई करो. (सः जातवेदाः) तो ज्ञानी (परेषां सेनां) शत्रूंच्या सेनेला (मोहयतु) मोहित करो. (च निर्हस्तान् कृणवत्) आणि त्यांना हस्तहीन करो. (१) हे (मर्+उतः) मरण्यास तयार असणाऱ्या वीरांनों ! (ईदृशे यूयं उग्राः स्थ) अशाप्रसंगीं तुम्हीं मोठे उग्र वीर आहांत, म्हणून (अभि-प्र-इत, मृणत, सहध्वम्) पुढें व्हा, कापा-तोडा-आणि जिंका, (इमे नाथिताः वसवः) हे बळवान् देशनिवासी वीर (अमीमृणन्) कापीत आहेत, (एषां दूतः विद्वान् अग्निः) त्यांचा दाहकर्ता-ज्ञानी अग्निसमान तेजस्वी वीर (प्रत्येतु) विशेष चढाई करो. (२) हे (मघवन् वृत्रहन् इन्द्र) धनवान् शत्रुनाशक सम्राट् तसेंच (च अग्निः) हे ज्ञानी ! (युवं) तुम्हीं दोघे मिळून (अस्मान् शत्रूयतीं अमित्र-सेनां) आमचें शत्रुत्व करणाऱ्या शत्रुसेनेला, (अभि) पराभूत करून (तान् प्रति दहतं) त्यांस जाळून टाका. (३) (इन्द्र) नरेंद्रा (प्रवता ते हरिभ्यां) तुझ्या घोड्याप्रमाणें वेगानें (प्रसूतः वज्रः) चालविलेलें वज्र (शत्रुन् प्रमृणन् प्र+एतु) शत्रूंना कापीत पुढें जाओ. (प्रतीचः, अनूचः, पराचः) समोर, पाठीमागें आणि सर्वत्र पळून जाणाऱ्या (जहि) शत्रूस मारून टाको आणि (एषां चित्तं) त्या शत्रूंच्या चित्तांस (सत्यं विष्वक् कृणुहि) उत्तम प्रकारें सर्व बाजूस भटकण्यास लावो. (४) हे (इन्द्र) नरेश ! (अमित्राणां सेनां मोहय) शत्रूंच्या सेनेस घाबरून सोड, (अग्नेः वातस्य ध्राज्या) अग्नीच्या आणि वायूच्या प्रचंड वेगानें (तान्) त्या शत्रुसैनिकांना (विषूचः विनाशय) चारी दिशांस भटकण्यास लावून त्यांचा नाश कर. (५)

भावार्थ— राजनीति जाणणारे विद्वान् आणि तेजस्वी पुरुष घातपात करणाऱ्या शत्रुसेनेला जाळीत शत्रूवर हल्ला करोत. सेनासंमोहन विद्या जाणारे ज्ञानी शत्रुसेनेला मोहित करोत आणि त्यांस हस्तहीन करोत. (१) हे मरण्यास सिद्ध असणाऱ्या शूर-वीरांनों ! अशा युद्धप्रसंगीं तुम्ही मोठे वीर आहात म्हणून पुढें व्हा, शत्रूस कापून काढा आणि विजय मिळवा. हे बळवान् आपल्या देशनिवासी वीर शत्रूंस कापीत आहेत. त्यांचा साथीदार, ज्ञानी तेजस्वी वीरसुद्धां शत्रूंस जाळीत शत्रूवर हल्ला करीत आहे. (२) हे धनवान् शत्रुनाशक नरेश ! तसेंच हे ज्ञानी तेजस्वी वीरा, तुम्ही दोघे मिळून आमचें शत्रुत्व करणाऱ्या शत्रुसेनेला पराभूत करा, आणि त्यांस जाळून टाका. (३) हे नरेश ! वेगानें चालविलेला तुमच्या शस्त्रांचा समुदाय शत्रूंस कापीत पुढें सरो. समोरून, मागून चारी बाजूंनीं पळणाऱ्या, शत्रुसेनेचें हनन करून त्यांच्या चित्तांत भीति निर्माण करा, ज्याच्यामुळें ते चारीदिशांस पळून जातील. (४) हे नरेश ! अग्न्यस्त्राच्या दाहानें आणि वायव्यास्त्राच्या वेगानें शत्रुसेनेस अशी घाबरून टाका की ती चारी दिशांस पळून जाईल आणि अशा रीतीनें तिचा नाश करा. (५)

इन्द्रः सेनां मोहयतु मरुतो घ्नन्त्वोजसा । चक्षूंष्यग्निरा दत्तां पुनरेतु पराजिता ॥ ६ ॥

अर्थ— (**इन्द्रः सेनां मोहयतु**) नरेश शत्रुसेनेस मोहित करो, (मर्+उतः) मरण्यास सिद्ध असणारे वीर (**ओजसा घ्नन्तु**) वेगानें हनन करोत. (**अग्निः चक्षुंषि आदत्तां**) अग्नि म्हणजे प्रकाश त्यांची दृष्टि मन्द करो. (त्यांस आंधळे करो), अशा प्रकारें शत्रूची (**पराजिता**) पराभव पावलेली सेना (**पुनः एतु**) आणखी मागें सरो. (६)

भावार्थ— नरेशानें शत्रुसेनेस घाबरवावें, शूर वीरानें वेगानें शत्रुसेनेचें हनन करावें आणि शत्रुसेनेस अशी घाबरवून सोडावी की ज्यामुळें तिला कांहीं दिसूं नये आणि अशा प्रकारें शत्रूचा पूर्ण पराजय होऊन त्यांचा पूर्ण नाश होईल. (६)

याचविषयीं दुसरेंहि सूक्त आहे म्हणून त्या सूक्ताचा अर्थ प्रथम करून मग दोन्हीं सूक्तांचा एकत्रित विचार करूं. द्वितीय सूक्त असें आहे.

शत्रूसेनेचें संमोहन

कांड ३, सूक्त २

(ऋषिः- अथर्वा । देवता – सेनामोहनं, बहुदैवत्यम्)

अग्निर्नो दूतः प्रत्येतु विद्वान्प्रतिदहन्नभिशस्तिमरातिम् ।
स चित्तानि मोहयतु परेषां निर्हस्तांश्च कृणवज्जातवेदाः ॥ १ ॥
अयमग्निरमूमुहद्यानि चित्तानि वो हृदि । वि वो धमत्वोकसः प्र वो धमतु सर्वतः ॥ २ ॥
इन्द्र चित्तानि मोहयन्नर्वाङाकूत्या चर । अग्नेर्वातस्य ध्राज्या तान्विषूचो वि नाशय ॥ ३ ॥
व्याकूतय एषामिताथो चित्तानि मुह्यत । अथो यदद्यैषां हृदि तदेषां परि निर्जहि ॥ ४ ॥

अर्थ— (**नः दूतः विद्वान् अग्निः**) आमचा दूत ज्ञानी तेजस्वी वीर (**अभिशस्तिं अरातिं प्रतिदहन्**) घातपात करणाऱ्या शत्रूंला जाळीत (**प्रत्येतु**) हल्ला करो, (**सः जातवेदाः परेषां चित्तानि मोहयतु**) तो ज्ञानी शत्रूंच्या चित्तांना मोहित करो आणि त्यांना (**निर्हस्तान् च कृणवत्**) हस्तहीन असल्यासारखे करो. (१) (**यानि वः हृदि**) जें तुमच्या हृदयाशीं संबंधित आहे तें (**चित्तानि**) चित्त (**अयं अग्निः अमूमुहत्**) हा तेजस्वी वीर घाबरवून सोडतो. तो (**वः ओकसः विधमतु**) तुम्हांस-शत्रूंस घरांतून काढून लावो आणि (**वः सर्वतः प्रधमतु**) तुम्हांस-शत्रूंस सर्व प्रदेशांतून हटवो. (२) हे (**इन्द्र**) नरेश ! शत्रूंच्या (**चित्तानि मोहयन्**) चित्तांस मोहयुक्त करीत तूं (**आकूत्या अर्वाङ् चर**) शुभ संकल्पानें आमच्याजवळ ये. (**अग्नेः वातस्य ध्राज्या**) अग्नि आणि वायूच्या वेगानें (**तान् विषूचः विनाशय**) त्यांस सर्व बाजूंनीं नष्ट-भ्रष्ट कर. (३) हे (**एषां**) या शत्रूंच्या (**आकूतयः**) संकल्पांनो ! (**वि**) तुम्हीं परस्पर विरुद्ध व्हा; नंतर तुम्हीं (**इत**) दूर व्हा. (**अथो चित्तानि**) आणि त्यांच्या चित्तांनो ! (**मुह्यत**) मोहित व्हा. (**अथो अद्य**) आणि आज (**यत् एषां हृदि**) जो त्यांच्या हृदयांत संकल्प आहे. (**एषां यत् परि निर्जहि**) त्यांच्या त्या संकल्पाचा पूर्णपणें नाश करा. (४)

भावार्थ— आमचे ज्ञानी स्वयंसेवक घातपात करणाऱ्या शत्रूंवर हल्ला करोत. शत्रूमध्यें घाबरेपणा निर्माण करोत आणि त्यांना हस्तहीन होण्यासारखे करोत. (१) शत्रूच्या चित्तांस मोहित करोत, त्यांस घर सोडावयास लावोत आणि सर्व देशांतून त्यांस दूर करोत. (२) हे राजा ! तूं शत्रुसेनेच्या चित्तांस मोहित कर, अग्न्यस्त्र आणि वायव्यास्त्राच्या वेगानें त्यांस दूर पळवून लाव आणि नंतर विजयपूर्ण शुभसंकल्पानें आमच्या जवळ ये. (३) शत्रूचे संकल्प आपापसांत एकदुसऱ्यास विरोधी होवोत. त्यांच्या अंतरांत भीति निर्माण होवो, त्यांच्या मनांत जे संकल्प आज आहेत ते उद्यालाहि स्थिर न होवोत. (४)

अमीषां चित्तानि प्रतिमोहयन्ती गृहाणाङ्गान्यप्वे परेहि ।
अभि प्रेहि निर्दह हृत्सु शोकैर्ग्राह्यामित्रांस्तमसा विध्य शत्रून् ॥ ५ ॥
असौ या सेना मरुतः परेषामस्मानैत्यभ्योजसा स्पर्धमाना ।
तां विध्यत तमसापव्रतेन यथैषामन्यो अन्यं न जानात् ॥ ६ ॥

अर्थ— हे (अप्वे) व्याधि ! (अमीषां चित्तं प्रति मोहयन्ति) यांच्या चित्तास मोहांत टाकणाऱ्या शत्रुसेने-च्या (अंगानि गृहाण) अवयवांना पकडून ठेव आणि (परा इहि) दूर निघून जा. (अभि प्र इहि) सर्व प्रकारें पुढें हो. (हृत्सु शोकैः निर्दह) हृदयांत शोक निर्माण करून त्यास जाळून टाक. तसेंच (ग्राह्या तमसा) दृढ धरून ठेवणाऱ्या रोगानें आणि मूर्च्छा रोगानें (अमित्रान् शत्रून् विध्य) दुष्ट शत्रूंना त्रास दे. (५) हे (मर्+ उतः) मरण्यास सिद्ध असणाऱ्या वीरांनो ! (परेषां असौ या सेना) शत्रूची ही जी सेना आहे, (स्पर्धमाना अस्मान् ओजसा अभि-आ एति) स्पर्धा करीत आम्हांवर जोरानें हल्ला करीत येत आहे, (तां अपव्रतेन तमसा विध्यत) तिला कर्महीन करणाऱ्या अंधारानें मोहित करा, (यथा) म्हणजे (एषां अन्यः अन्यं न जानात्) त्यांच्यांतील एक जण दुसऱ्यास ओळखूं सुद्धां शकणार नाहीं. (६)

भावार्थ— व्याधि आणि इतर भीति सुद्धां शत्रूच्या मनास भयभीत करो. शत्रुसेनेचीं अंगप्रत्यंगें रोगांनीं ग्रासिलीं जावोत. शत्रुसैन्य रोगानें आणि नानाप्रकारच्या भयांनीं त्रस्त होऊन जावो. संधिवात आणि मूर्च्छा रोग शत्रूस घाबरवून टाकोत आणि अश कठिण समयीं त्यांजवर हल्ला कर आणि शत्रूच्या हृदयांस शोकानें जाळून टाक. (५) हे वीर पुरुष हो ! जी सेना आम्हांशी स्पर्धा करीत आम्हांवर हल्ला करावयास येत आहे तिला अशी मोहित करा कीं, ती पुरुषार्थहीन होऊन मूर्च्छित होऊन जावी आणि त्यांतील एकहि मनुष्य दुसऱ्यास ओळखतां सुद्धां येऊं नये. (६)

शत्रूसेनेचें संमोहन

सेनेचें संमोहन

हीं दोन सूक्तें शत्रुसेनेचें संमोहन वर्णन करीत आहेत. जी शत्रुसेना मारीत अथवा कापीत आपल्या राष्ट्रावर अथवा आपल्या सैनिकांवर हल्ला करण्यास येत आहे, तिला मोहित करून घाबरवून पराजित केली पाहिजे आणि तिला पळवून लाविली पाहिजे. याचें नांव आहे, ' सेनासंमोहन. '

कांहीं लोक असा विचार करीत असतील कीं हें सेना--संमोहन मंत्रसामर्थ्यानें होत असेल. परंतु वास्तविक गोष्ट तशी नाहीं. हें संमोहन केवळ घाबरविणें एवढेंच आहे. म्हणजे शत्रुसेनेवर असे हल्ले करावयाचे कीं शत्रुसेनेंतील सैनिकांस किंकर्तव्यमूढ होऊन जीव वांचविण्यास पळून जाणें हा एवढा एकच मार्ग शिल्लक असावा.

हीं दोन्हीं सूक्तें स्पष्ट आहेत. आणि एवढ्याच विषयाचें येथें जास्त विवरण करण्याची आवश्यकताहि नाहीं. तथापि या सूक्तांत कांहीं शब्दप्रयोग असे केले गेले आहेत कीं त्याचें विशेष स्पष्टीकरण करणें आवश्यक आहे. नाहींतर शंका उत्पन्न होईल. या सूक्तांत, अग्नि, इन्द्र, मरुत् ' आदि शब्द आहेत, त्यांचे अर्थ देवता प्रसंगीं अग्नि, विद्युत्, वायु असे घेतले जातात तसेंच अध्यात्मप्रसंगीं वाणी, मन, आणि प्राण असे केले जातात. या विषयाचें स्पष्टीकरण पूर्वी होऊन गेलेलें आहे. हे दोन्ही प्रसंग या दोन्हीं सूक्तांत नाहींत. या सूक्तांचा विषय युद्ध आहे. शत्रुसेनेस मोहांत पाडण्याचा, आपली आणि शत्रुसेनेची लढाई जुंपण्याचा प्रसंग आहे म्हणजे हा कांहीं आध्यात्मिक किंवा आधिदैविक विषय नाहीं. प्राण्यांचे परस्पर संबंध आधिभौतिक प्रकरणांत असतात. म्हणून आधिभौतिक प्रकरणाला समष्टिविषयक प्रकरण मानलें जातें आणि या प्रकरणांतील उक्त शब्दांचें अर्थ प्राणिविषयक होत आहेत. अर्थात् येथें मनुष्यप्राणिविषयक भाव समजणें उचित होईल. आतां त्या शब्दांचा अर्थ पाहूं—

१ इन्द्र

(इन्+द्र) शत्रुसेनेचा भेद करणारा, हा याचा धात्वर्थ आहे. परंतु गांवांचा प्रमुख, (पाटिल, या अर्थी या शब्दाचा प्रयोग होतो. ज्याप्रमाणें मृगेंद्र=मृगांचा मुख्य (सिंह), खगेंद्र=पक्ष्यांचा मुख्य (गरुड), नरेंद्र=मनुष्यांत प्रमुख, राजा अथवा सम्राट् इ. इन्द्र शब्दाचे हे अर्थ प्रसिद्ध आहेत. परंतु प्रायः लोक इन्द्र शब्दाचा अर्थ राजा असा करण्यास भितात. त्यांनीं या दोन सूक्तांचें उत्तम मनन करावें, अशा मननानें त्यांना कळून येईल कीं अशाप्रसंगीं मनुष्यविषयक अर्थच इन्द्रादि शब्दांचा करणें युक्त आहे. हें विवरण नीट समजण्यासाठीं या दोन सूक्तांतील कांहीं वाक्यें उदाहरणादाखल घेऊं—

१ इन्द्र ! ते प्रसूतः वज्रः शत्रून् प्रमृणन् एतु ।
प्रतीचः अनूचः जहि । एषां चित्तं विष्वक्
कृणुहि ॥ (सू. १ मं. ४)
२ इन्द्र ! अमित्राणां सेनां मोहय ।
अग्नेः वातस्य ध्राज्या विषूचः तान् विनाशय ।
(सू. १, मं. ५)

३ इन्द्रः सेनां मोहयतु ॥ (सू. १, मं. ६)
४ इन्द्र ! चित्तानि मोहयन् आकूत्या अर्वाङ् चर ॥
(सू. २, मं. ३)

' (१) हे राजा ! तुझ्याकडून चालविलें जाणारें शस्त्र शत्रूंस कापीत पुढें जाओ आणि सर्व बाजूंच्या शत्रूंचें हनन करो. या शत्रूंच्या चित्तास चारी बाजूस भटकणारें कर. (२) हे राजा ! शत्रुसेनेस मोहित कर. (३) हे राजा ! शत्रुसेनेस घाबरवून टाक, अग्नि आणि वायूच्या प्रवाहानें शत्रुसेनेला चारी दिशांस पळवून लाव. (४) हे राजा ! शत्रुसेनेला मोहित करून आपल्या शुभसंकल्पानें आम्हांपाशीं ये. '

या प्रकारें या मंत्रानें राजाचें कर्तव्य दाखविलें आहे. येथें ' राजा, नरेंद्र, सम्राट् ' या प्रकारेंच या शब्दाचा अर्थ होत आहे. येथें इन्द्र शब्द क्षात्रशिरोमणी वीर राजाचें वर्णन करीत आहे, जो स्वतः युद्धभूमीवर हजर राहून आपल्या सेनेच्या हालचाली करतो, आणि निव्वळ सेनापतीवर अवलंबून रहात नाहीं. याच इन्द्राचे इतर पर्याय याच सूक्तांत पुढें आहेत ते पहा—

२ मघवन्

' (मघ) ' धन (वन्) असणारा. ज्याच्याजवळ धन आहे असा. जो राजा स्वतःजवळ पुष्कळ धनसंग्रह ठेवतो तोच युद्धांत विजय मिळवितो. युद्धांत विजय प्राप्त करण्यासाठीं हें एक मोठें साधन आहे. धनहीन राजा जरी युद्धास प्रारंभ करील तरी त्यास धनाच्या अभावीं योग्य साधनसामुग्री वेळेवर न मिळाल्यानें पराभूत व्हावें लागेल हें उघड आहे. या शब्दाचा हा असा अर्थ वाचकांनीं जाणून समजावें कीं राजाचें बल त्याच्या कोशसंपत्तींत आहे.

३ वृत्रहन्

' (वृत्र) ' घेरणाऱ्या शत्रूचें (हन्) हनन करणारा. म्हणजे जो शत्रु घेरून हल्ला करतो अथवा मार्ग अडवितो, त्यास आपल्या शस्त्रांच्या प्रभावानें मारतो, त्याचें हें नांव आहे.

याप्रकारें इंद्रवाचक शब्द आणि त्याचें वर्णनपर मंत्र वीर राजाचें कर्तव्य दाखवितात. वाचकानें ही वैदिक शैली जाणून घेतली तर कित्येक मंत्रांच्या गूढ अर्थांचा आशय त्यांच्या स्पष्टपणें ध्यानीं येईल. इन्द्रासह मरुत् रहातात त्यांच्याविषयीं आतां पाहूं—

४ मरुतः

(मर्+उत्) मरण्यासाठीं जे उठून तयार आहेत, शत्रूचा पराजय करण्यास प्रसंगीं स्वतःच्या प्राणांची आहुति देण्यास जे कटिबद्ध आहेत, त्या वीरांचें हें नांव आहे. इन्द्राच्या सेनेंतील मरुत् नावांचे जे वीर आहेत त्यांचें वर्णन सुद्धां या अर्थाची सार्थकता दाखवितें. हे शब्द सैनिकांचा उत्साह दाखवितात. या प्रकारें उत्साही वीर ज्या सेनेंत असतील त्या सेनेचा निश्चित विजय होईल यांत काय शंका ? या शब्दाचा प्रयोग ज्या मंत्रांत आहे त्यांचीं उदाहरणें पहा—

१ हे मरुतः । ईदृशे यूयं उग्राः स्थ । अभिप्रेत, मृणत, सहध्वम् । (सू. १, मं. २)
२ मरुतः ओजसा घ्नन्तु । (सू. १ मं. ६)
३ हे मरुतः ! या असौ परेषां सेना स्पर्धमाना अस्मान् अभ्येति, तां अपव्रतेन तमसा विध्यत, यथा एषां अन्यः अन्यं न जानात् ॥ (सू. २, मं. ६)

' (१) हे मरण्यास तयार असणाऱ्या वीरांनों ! अशा प्रसंगीं तुम्हीं मोठे उग्र आहांत. म्हणून पुढें सरा, कापा आणि वैऱ्यांस पराभूत करा. (२) वीर लोक मोठे बलवान् आहेत ते वैऱ्यांस कापून काढोत. (३) हे वीर हो ! ही जी वैऱ्यांची सेना आम्हांशीं स्पर्धा करीत आम्हांवर हल्ला करण्यास येत आहे, त्यांना मोहमय अंधकारानें विद्ध करा म्हणजे त्यांच्यांतील एकहि मनुष्य दुसऱ्यास ओळखूं शकणार नाहीं. '

हे मरुतासंबंधीचे मंत्र स्पष्टपणें वीरांचीं कर्तव्यें दर्शवीत आहेत, युद्धांत सेनेंतील वीरांनीं कसें उग्र कर्म करावें त्याचा उपदेश यावरून मिळत आहे. त्याच्या मननानें क्षात्रतेजयुक्त वीर पुरुषांस मोठा उत्साह प्राप्त होतो. यानंतर ' वसवः ' शब्द पाहूं—

५ वसवः

वसाहत करून रहाणाऱ्यांस 'वसु' म्हणतात. जे आपल्या राष्ट्रांत स्वतःच्या अधिकारानें राहूं इच्छितात, शत्रूचा हल्ला झाला असतांहि जे जागा सोडून जाऊं इच्छित नाहींत. त्यांस 'वसु' म्हणतात. या वसूंविषयीं अथर्ववेदांतच इतरत्र असें म्हटलें आहे—

संवसवः इति वो नामधेयं उग्रंपश्या राष्ट्रभृतो ह्यक्षाः । अथर्व. ७।१०९।६

'तुमचें नांव संवसु (**संवसवः**) आहे, तुम्हीं दिसण्यांत अति उग्र असून राष्ट्राचें भरणपोषण करणारे आणि राष्ट्राचे (**अक्षाः**) आंस (केन्द्र) आहांत, या मंत्रांत वसु उग्र राष्ट्रभृत्य आहेत असें म्हटलें आहे. म्हणून आम्हीं या सूक्तांत '**वसु**' शब्दाचा अर्थ '**उग्र राष्ट्रभृत्य**' म्हणजे 'शूर वीर राष्ट्रीय स्वयं सेवक' असा केला आहे. असा अर्थ घेण्यानें या सूक्तांतील प्रस्तुत मंत्राचा अर्थ खालीं दिल्याप्रमाणें होईल—

इमे नाथिता वसवः अमीमृणन् ।
एषां दूतः अग्निः विद्वान् प्रत्येतु (सू. १, मं. २)

"हे प्रभावशाली राष्ट्रभृत्य वैऱ्यांचे सेनेस कापतात. त्यांचा विद्वान् दूत 'अग्नि' वैऱ्यांवर हल्ला करो." या मंत्रावरून आम्हांस कळतें कीं या वसूंपैकीं एकाचें नांव अग्नि आहे. म्हणजे जर हे वसु राष्ट्रभृत्य आहेत तर 'अग्नि' सुद्धां वसूंपैकीं एक असल्यानें राष्ट्रभृत्य आहे अथवा राष्ट्राचा दूत आहे. तो मोठा समयज्ञ आणि महाचतुर आहे. इन्द्र आणि अग्नींत हा भेद आहे. इंद्र स्वतः सम्राट् अथवा राजा आहे. तो राष्ट्रभृत्य अथवा स्वयंसेवक नाहीं आणि अग्नि राजा नाहीं परंतु राष्ट्रभृत्य आहे. अग्नि विद्वान् आहे आणि इंद्र धनवान् आहे. हा दोघांतील फरक सुद्धां वैदिकराज्य पद्धतीचें स्वरूप स्पष्ट करीत आहे. याप्रकारें वसु शब्दाचा अर्थ पाहिल्यावर आतां अग्नीचा अर्थ पाहूं—

अग्निः

वसुशब्दाचीं जीं लक्षणें पूर्वी वर्णनप्रसंगानें सांगितलीं तीं सर्व अग्नीला सुद्धां लागू पडतात. हा प्रकाशक देव आहे, शत्रूंस जाळतो आणि उपासकास तेज देतो. हा (विद्वान्) ज्ञानी आहे, समयज्ञ आहे, कर्तव्य अकर्तव्य चांगल्याप्रकारें जाणतो. हा (**जात-वेदाः, जातं-वेत्ति**) सृष्ट वस्तूचें यथावत् ज्ञान असलेला आहे. येथें वाचकांनीं विचार करावा कीं अशा प्रकारचा राष्ट्रभृत्य दूतकर्म करण्यास मिळावा हें केवढें भाग्य! तो किती उपयोगी ठरेल, आणि युद्धप्रसंगीं अशा प्रकारच्या राष्ट्रदूताची सेवा राष्ट्रास किती लाभदायक ठरेल.

अग्नि ब्राह्मतेज आणि इंद्र क्षात्रतेज व्यक्त करणारा आहे. जेव्हां राष्ट्रावर आपत्ति येते त्यावेळीं दोघेहि मिळून राष्ट्रकार्य करतात, तसें व्यवहारांत ब्राह्मण–क्षत्रियांनीं वागावें अशी सूचना या सूक्तांतून मिळते. याविषयीं मंत्र पहा—

हे वृत्रहन् इन्द्र ! अग्निः च यूयं तान् प्रति दहतम् । (सू. १, मं. ३)

'हे वीर राजा! तूं आणि ज्ञानी राष्ट्रभृत्य दोघे मिळून शत्रूस जाळून टाका' येथें दोघांनीं एकत्र होऊन कार्य करण्याचा उपदेश आहे. दोघांनीं एकत्र होऊन शत्रूंचा नाश करावा. असें कधीं न व्हावें कीं वैरी राष्ट्राच्या द्वारीं येऊन उभा आहे आणि हे दोघे आपसांत भांडत आहेत. तसें झालें तर राष्ट्राची मोठी भयंकर हानि होईल. केवढा घात होईल बरें? म्हणून ब्राह्मण क्षत्रियांनीं आपलें ऐक्य अभेद्य राखावें आणि आपल्या राष्ट्राची सेवा अशी करावी कीं त्यामुळें शत्रूंचा नाश होईल व राष्ट्राची उन्नति होईल. हीच गोष्ट त्यांनीं प्रथम पाहिली पाहिजे.

शत्रूस घाबरवण्याची रीत

शत्रूस घाबरविणें, मोहित करणें, भ्रमांत पाडणें आणि त्रासवून सोडणें इत्यादि उपाय या दोन सूक्तांत सांगितले आहेत. यांतील हल्ला करण्याच्या कांहीं मार्गांचें स्पष्टीकरण पूर्वी येऊन गेलें आहे. आतां या सूक्तांतील कित्येक साधनांचा विचार करूं.

१ अग्न्यस्त्र आणि वायव्यास्त्राच्या प्रयोगानें वैऱ्याचा नाश करण्याची पहिली रीत या सूक्तांत सांगितली आहे—

अग्नेः वातस्य ध्राज्या तान् विनाशय ।
(सू. १, मं. ५; सू. २, मं. ३)

'अग्नीच्या वेगानें आणि वायूच्या वेगानें त्या शत्रूंचा नाश कर.' येथें ध्राजी या शब्दानें अग्नीचा महावेग आणि वायूचा महावेग, या दोन्हींच्या धक्क्यानें शत्रूंचा नाश करण्यास सांगितलें आहे. ध्राजी शब्दाचा अर्थ केवळ वेग, गति, इतकाच नाहीं. ज्या वेगाच्या धक्क्यानें मनुष्य भ्रांत होऊन जातो, मनुष्य स्वतःच्या स्थानीं स्थिर राहूं शकत नाहीं, त्या महावेगाच्या प्रचंड धक्क्याचा आशय या '**ध्राजी**' शब्दांत भरलेला आहे. त्यामुळें असें वाटतें कीं येथें, '**अग्नेः ध्राजी, वातस्य ध्राजी,**' या दोन्ही शब्दांचा क्रमशः अर्थ अग्न्यस्त्र आणि वायव्यास्त्र अथवा तशाच प्रकारच्या शस्त्रास्त्रांचा वाचक असला पाहिजे. यापूर्वीच्या स्पष्टीकरणांत अग्नि शब्द मनुष्यवाचकसुद्धां मानलेला आहे परंतु तो अर्थ येथें योग्य दिसत नाहीं, एकाच सूक्तांत अग्नि शब्दाचे दोन परस्पर भिन्न अर्थ आहेत ही गोष्ट येथें ध्यानांत ठेवली

पाहिजे. नाहींतर अर्थाचा अनर्थ होण्यास वेळ लागणार नाहीं.

२ **तमसास्त्र**- तमसास्त्राचा प्रयोग याच्यांत आहे असें स्पष्ट दिसतें —

तां विध्यत तमसापव्रतेन यथैषामन्यो अन्यं न जानात् । (सू. २ मं. ५)

' त्या शत्रुसेनेस पुरुषार्थहीन करणाऱ्या तमसास्त्राच्या प्रयोगानें विद्ध करा म्हणजे त्यांतील एक सैनिक दुसऱ्या सैनिकास ओळखूं सुद्धां शकणार नाहीं. ' या मंत्रात ' **अपव्रतं तमः** ' शब्दाचा प्रयोग आहे. तम शब्दाचा अर्थ आहे अंधःकार. अपव्रत शब्दाचा अर्थ आहे ' कर्महीन. ' दोन्ही शब्दांचा एकत्रित अर्थ होतो ' कर्महीन करणारा अंधार.' त्याच्या योगानें शत्रुसेनेचा वेध करावयाचा. वेध करण्यासाठीं शस्त्रास्त्रांची आवश्यकता आहेच, नाहींतर वेध होणार नाहीं. म्हणून या मंत्रांत तमसास्त्राचा उल्लेख स्पष्टपणें आहे असें आम्हांस वाटतें. अंधःकाररूपी अस्त्राच्या प्रयोगानें सैनिक एक दुसऱ्यास ओळखण्यास असमर्थ ठरतील, या अर्थाचा मंत्रभाग प्रथम सूक्तांत सुद्धां आहे.

अग्निः चक्षूंषि आदत्ताम् । (सू. १, मं. ६)

अग्नि शत्रूची दृष्टि नष्ट करो' या वाक्याचा आशयसुद्धां तमसास्त्राच्या प्रयोगाचाच आहे. कारण येथें प्रत्येकाचे डोळे काढून घेण्याचा आशय नाहींच. परंतु त्यांना कांहीं हि दिसूं नये असें करण्याचा आशय आहे. तसेंच पुढें आणखी पहा—

अमित्रान् शत्रून् तमसा विध्य । (सू. २, मं. ५)

' शत्रूंना अंधारानें वेधून टाक, ' येथें विध्य शब्दसुद्धां अस्त्ररूप तम (अंधार) सूचित करीत आहे. हा मंत्र दुसरीकडेहि आला आहे. तो सुद्धां पहा—

अन्धेन तमसा अमित्रान् सचन्ताम् ॥
(ऋ. १०।१०३।१२; यजु. १७।४४; साम. उ. ९।३।५; निरु. ९।३३)

तां गूहत तमसापव्रतेन यथामी अन्यो अन्यं न जानात् । (यजु. १७।४७)

' शत्रूंना अंधारानें वेधून टाका. ' इत्यादि मंत्रभागांत सुद्धां कोणत्याना कोणत्या अस्त्राचाच उल्लेख आहे. नहून वेध करणें अशक्यच.

३ **अप्वा, ग्राही**- सूक्त २, मं. ६ मध्यें ' अप्वा आणि ग्राही ' अशीं दोन रोगांचीं नांवें आलीं आहेत. या दोन रोगांच्या योगानें शत्रूंच्या चित्तास मोहित करावयाचें अथवा त्यांना त्रास द्यावयाचा उल्लेख आहे. ग्राही शब्दाचा अर्थ संधिवात असा आहे. हा शब्द अथर्ववेदांत पूर्वी अनेकवार येऊन गेला आहे. तो अर्थ जर येथें घेतला तर संधिवातासारख्या रोगानें शत्रूंला जर्जर करण्याचा अर्थ येथें व्यक्त होईल. अप्वा शब्दाचा अर्थ रोग, व्याधि अथवा भय असा आहे. परंतु हा युद्धप्रसंग आहे म्हणून या शब्दाचा दुसरा कांहीं अर्थ असणें संभवनीय आहे. जरी नक्की समजला नसला तरी ' ग्राही ' शब्दाचा अर्थ पाश असा होणें शक्य आहे. त्यानें शत्रूस पकडून जखडून बांधून टाकतां येतें. ' **अप-वे** ' धातूपासून जर अप्वा शब्द झाला असला तर ' वे ' धातूचा अर्थ ' **तन्तुसंतान** ' असल्यामुळें अप्वा शब्दाचा अर्थ ' **जाळें** असा होणें शक्य आहे. मंत्रांत —

अप्वे ! परेहि अमीषां चित्तानि प्रतिमोहयन्ती अङ्गानि गृहाण ॥ (सू. २, म. ५)

' हे अप्वे (जाळ्या) ! पुढें हो आणि त्यांच्या चित्तास मोहित करून त्यांच्या अंगांस पकडून (जखडून) ठेव. ' हें अप्वा अस्त्राचें वर्णन स्पष्ट दर्शवितें कीं या नांवाचें कांहीं जाळ्यासारखें अस्त्र असावें. तें शत्रूवर फेंकलें असतां त्यांत पकडला जाऊन शत्रू मोहित होतो आणि नंतर त्यास पकडून त्याचें शरीर जखडून बांधण्यांत येतें. या मंत्रांत ' **परेहि, अंगानि गृहाण** ' इत्यादि वर्णन या अप्वा म्हणजे जाळें या अर्थास पोषक आहे. म्हणजे ' **ग्राही** आणि **अप्वा** ' हीं दोन्हीं जाळ्यासारखीं शत्रूंस पकडण्याचीं व बांधण्याचीं विशेष साधनें असावींत, असा आमचा तर्क आहे. मात्र अशा प्रकारच्या अर्थास दुसरा कांहीं विशेष मोठा आधार मिळालेला नाहीं. शोधक वाचकांनीं या विषयीं विशेष शोध करून अर्थ निश्चय करण्यास मदत करावी.

मंत्रांची समानता

या दोन्ही सूक्तांत मंत्रांची समानता आहे. दोन्ही सूक्तांचा पहिला मंत्र थोड्याशा पाठभेदानें जवळ जवळ एकच आहे. प्रथम सूक्ताचा ५ वा मंत्र आणि २ ऱ्या सूक्ताचा तिसरा मंत्र जवळ जवळ एकसारखे आहेत. प्रथमार्धांत थोडा पाठभेद आहे. वाचकांनीं या पाठभेदाकडे आणि समानतेकडे अवश्य लक्ष द्यावें.

या दोन्हीं सूक्तांच्या मननानें युद्धविषयक बोध प्राप्त होतो. वाचकांनीं त्या दृष्टीनें या सूक्तांचें अध्ययन करून लाभ मिळवावा.

असत्य भाषणाच्या पापापासून मुक्ति

कांड १, सूक्त १०

(ऋषिः– अथर्वा । देवता – असुरः, वरुणः)

अयं देवानामसुरो वि राजति वशा हि सत्या वरुणस्य राज्ञः ।
ततस्परि ब्रह्मणा शाशदान उग्रस्य मन्योरुदिमं नयामि ॥ १ ॥
नमस्ते राजन्वरुणास्तु मन्यवे विश्वं ह्युग्र निचिकेषि द्रुग्धम् ।
सहस्रमन्यान्प्र सुवामि साकं शतं जीवाति शरदस्तवायम् ॥ २ ॥
यदुवक्थानृतं जिह्वया वृजिनं बहु । राज्ञस्त्वा सत्यधर्मणो मुञ्चामि वरुणादहम् ॥ ३ ॥
मुञ्चामि त्वा वैश्वानरादर्णवान्महतस्परि । सजातानुग्रेहा वद ब्रह्म चापं चिकीहि नः ॥ ४ ॥

अर्थ— (अयं) हा (देवानां असुरः) देवांस सुद्धां जीवन देणारा ईश्वर (विराजति) प्रकाशत आहे, (हि) कारण कीं (राज्ञः वरुणस्य) राजा वरुणदेव म्हणजे ईश्वराची (वशा) इच्छा (सत्या) सत्य आहे. (ततः परि) असें असूनसुद्धां (ब्रह्मणा) ज्ञानानें (शाशदानः) तीक्ष्ण झालेला मीं (उग्रस्य मन्योः) प्रचंड ईश्वराच्या क्रोधानें (इमं) या मनुष्याला (उत् नयामि) वर उठावितों–त्याची उन्नति करतों. (१) हे (वरुण राजन्) ईश्वरा ! (ते मन्यवे) तुझ्या क्रोधाला (नमः अस्तु) नमस्कार असो ! हे (उग्र) प्रचंड ईश्वरा ! तूं (विश्वं द्रुग्धं) सर्व द्रोहादि पातकें (निचिकेषि) उत्तम प्रकारें जाणतोस, (सहस्रं अन्यान्) हजारों अन्यांच्या (साकं) सह मीं (प्रसुवामि) प्रेरणा करतों. (अयं) हा मनुष्य (तव) तुझा होऊन (शतं शरदः) शंभर वर्षें (जीवाति) पर्यंत जिवंत राहो. (२) हे मनुष्या ! (यत्) जें (अनृतं वृजिनं) असत्य आणि पापयुक्त वचन (जिह्वया) जिभेनें (बहु उवक्थ) तूं फार करून बोलतोस त्यामुळें तसेंच (सत्यधर्मा) खरा न्यायी (राज्ञः वरु-णात्) राजा वरुणदेव ईश्वरापासून (अहं) मी (त्वा) त्यांना (मुञ्चामि) सोडवितो. (३) हे मनुष्या ! (त्वा) तुला (महतः वैश्वानरात् अर्णवात्) महासागरासारख्या गंभीर विश्वनायक देवापासून (परि मुञ्चामि) सोड-वितों. हे (उग्र) वीरा ! (इह) येथें (सजातान्) स्वतःच्या जातवाल्यांना (आ वद) सर्व सांगून टाक आणि (नः) आमचें (ब्रह्म) ज्ञान (अप चिकीहि) तूं जाण. (४)

भावार्थ— या सूर्यादि देवतांना शक्ति देणारा प्रभु ईश्वर सर्व जगतांत विराजत आहे. तो सर्वांचा शासक आहे. म्हणून त्याची इच्छाच सर्वदा सत्य होते. म्हणजे त्याच्या इच्छेविरुद्ध कोणीहि कांहीं करूं शकत नाहीं. तरीसुद्धां ज्ञानानें सत्य मार्ग जाणणारा मीं या पापी मनुष्यास (स्वतःला) खालीं लिहिलेल्या मार्गानें ईश्वराच्या क्रोधांतून सोडवितों. (१) हे ईश्वरा ! तुझ्या क्रोधासमोर आम्हीं नम्र होतों. तुझ्यासमोर आम्हीं नतमस्तक होतों. कारण तूं आम्हां सर्वांच्या पापांस यथावत् जाणतोस. त्यामुळें आम्हीं आमचीं पापें तुझ्यापासून लपवूं शकत नाहीं. हे प्रभो ! ही गोष्ट मीं हजारों मनुष्यांच्या सभेंत प्रगट केली आहे, आणि ती संशयातीत गोष्ट आहे कीं, जो मनुष्य तुझा भक्त होतो तोच शंभर वर्षें जिवंत राहूं शकतो, एरवीं त्यास कोण वांचवितो बरें ? (२) हे पापी मनु-ष्या ! तूं तुझ्या जिभेनें फार असत्य आणि पापी वचनें बोलतोस. या पापांतून दुसरा कोणी तुला वाचवूं शकणार नाहीं. मीं तुला त्याला शरण नेतों आणि त्याच्या कृपेनें मी तुझें रक्षण करूं शकतों. (३) हे पापी मनुष्या ! तुला विश्वंभराच्या कोपांतून अशा प्रकारें सोडवितों. हे वीरा ! तूं तुझ्या सर्व ज्ञातीबंधूंस ही गोष्ट सांग आणि आमच्या ज्ञानास तूं आत्मसात् कर. (४)

असत्य भाषणाच्या पापापासून सुटका

पापापासून मुक्ति मिळविण्याचा मार्ग

तसें पाहिलें तर हें सूक्त अत्यंत सरळ आणि सुबोध आहे, परंतु वाचकांच्या सोयीसाठीं थोडेसें स्पष्टीकरण करतों.

या सूक्तांत पापांपासून सुटण्याचे जे मार्ग सांगितले आहेत ते असे—

एक शासक ईश्वर

(१) '**देवानां असुरो विराजति**' सूर्य चंद्रादि देवानां विविध शक्ति देणारा एक प्रभूच सर्व जगाचा परम शासक आहे. त्याच्यापेक्षां जास्त शक्तिशाली दुसरा कोणी नाहीं.(मं.१)

(२) '**राज्ञो वरुणस्य वशा हि सत्या**' त्या प्रभु ईश्वराचें शासन हेंच सत्य आहे. त्याच्या इच्छेनेंच जगांतील यच्चयावत् कार्यें होत आहेत. त्याच्या अपूर्व शासनाचें उल्लंघन कोणी करूं शकत नाहीं. (मं. २)

(३) **विश्वं ह्युग्र निचिकेषि द्रुग्धम्**' हे प्रभु ईश्वरा ! तूं आम्हां सर्वांच्या पापांना यथावत् जाणतोस म्हणजे कोणी मनुष्य तुझ्यापासून स्वतःचें कोणतेंहि पाप लपवून ठेवूं शकत नाहीं. कारण तूं सर्वज्ञ आहेस. त्यामुळें आमचीं सर्व कर्में (चांगली आणि वाईट) तूं पूर्णपणें त्याचवेळीं जाणतोस.' (मं. २)

ईश्वरास सर्वश्रेष्ठ मानावें, तो सर्वांपेक्षां बलशाली आहे याचें स्मरण ठेवावें, आणि त्याला न समजतां असें कांहीं कृत्य मनुष्य करूं शकत नाहीं. ही गोष्ट निश्चित समजावी. हें ज्ञान पापापासून दूर रहाण्यास आवश्यक आहे. पापापासून मुक्त होण्यास या तीन महत्त्वाच्या श्रद्धा या सूक्तांत सांगितल्या आहेत. वाचकानें त्यांचें मनन करावें आणि त्या स्वतःच्या हृदयांत स्थिर कराव्यात. या तीन दृढ श्रद्धाच त्याला पापापासून वांचवूं शकतील अथवा मुक्त करूं शकतील.

ज्ञान आणि भक्ति

मनुष्यास पापापासून वाचण्यास ज्ञान आणि भक्ति हे दोन मार्ग आहेत. त्यांचें वर्णन या सूक्तांत याप्रमाणें केलें आहे—

(१) '**ब्रह्मणा शाशदानः**' ज्ञानानें तीक्ष्ण झालेला मनुष्य पापापासून मुक्त होतो, आणि तो दुसऱ्यास सुद्धां वाचवूं शकतो. सृष्टि आणि आत्म्याच्या ज्ञानाला 'ब्रह्म' म्हणतात. हें ब्रह्म म्हणजे सृष्टिविद्या आणि आत्मविद्येचें उत्तम ज्ञान मनुष्यास तेजस्वी बनवितें म्हणजे मनुष्य त्या ज्ञानामुळें कुशाग्र होतो, ज्या प्रमाणें धारदार शस्त्र शत्रूचा नाश करतें. त्याचप्रकारें ज्ञानरूपी शस्त्रसुद्धां अज्ञानाचा, पापरूपी शत्रूचा नाश करतें. मनुष्याच्या उन्नतीचें हेंच खरें साधन आहे. (मं. १)

(२) '**नमस्ते राजन् वरुण अस्तु मन्यवे**' हे ईश्वरा ! तुझ्या क्रोधापुढें आम्हीं नतमस्तक होतों. तुझी आज्ञा आम्हांस शिरसावंद्य आहे, म्हणजे आम्हीं तुला शरण आलों आहोंत. आम्हीं सर्वस्वी तुझ्या इच्छेच्या आधीन आहोंत, तूंच आमचा उद्धारक आहेस. तुझ्याशिवाय अन्य कोणास शरण जाणें आम्हीं योग्य समजत नाहीं. (मं. २)

(३) '**शतं जीवाति शरदस्तवायम्**- ' जो अशा प्रकारें तुला सर्वस्वीं शरण येईल, तुझा होऊन राहील तो शंभर वर्षें वांचेल, जो परमेश्वराचा दास, भक्त अथवा सेवक होऊन राहील, त्याचा नाश कोण करूं शकेल ? ' (मं. २)

वाचकांनीं या तीनहि मंत्रभागांतील ज्ञान आणि ईश्वरभक्तीनें पापापासून मुक्ति मिळविण्याची शक्यता पहावी. सृष्टिविद्या जाणून तदनुकूल आचरण करावें. आत्मविद्या जाणून परमात्म्याची सार्वभौमसत्ता मान्य करावी, अहंकार सोडून भक्तानें नम्र बनावें, आणि ईश्वरभक्त होऊन आनंदानें त्याला शरण जावें. हाच पापमोचनाचा सरळ आणि निश्चित मार्ग आहे. वाचकानीं या सूक्तांतील हा मार्ग नीट पहावा. या सूक्तांत जो मार्ग पापमोचनासाठीं शक्य म्हणून सांगितला आहे तो हाच-परमेश्वरास शरण जाण्याचा- तोच सोपा आणि सरळ मार्ग आहे.

प्रायश्चित्त

पापापासून वाचण्यासाठीं या सूक्तांत प्रायश्चित्तसुद्धां सांगितलें आहे, तें पहाण्यासारखें आहे-

(१) '**ब्रह्म अप चिकीहि**' पूर्वोक्त ब्रह्मज्ञान मिळवून उत्तम ज्ञान प्राप्त करावें, तसेंच संक्षेपानें जे नियम वर सांगितले ते जाणून ते नित्याच्या आचरणांत पाळावे. तेंच उन्नतीचें निश्चित साधन आहे. जेव्हां या ज्ञानानें स्वतःच्या अवगुणांची जाणीव होईल, आपण कसा आचार करावा याचें ज्ञान होईल तेव्हां पश्चात्तापानें शुद्ध होण्याचा मार्ग आहे तो असा- (मं. ४)

(२) '**सजातानुग्रेहा वद**' हे वीरा ! तूं तुझ्या जातीच्या सर्व मनुष्यांसमक्ष तुझे अपराध सांग, हेंच प्रायश्चित्त आहे. आपल्या जातीच्या स्त्रीपुरुषांसमोर अपराध न लपवतां सांगणें हें महान् प्रायश्चित्त आहे. आणि त्यामुळें मनुष्याच्या मनाची शुद्धि होते. (मं. ४)

ज्ञान मिळविल्यानंतर ज्यावेळीं पश्चात्ताप होतो तेव्हां स्वतःचीं सर्व दुष्कृत्यें स्वजातीयांसमोर सांगण्यास मोठें धैर्य, मनोबळ लागतें. तें मनाच्या पवित्रतेचें द्योतक आहे. प्रत्येक मनुष्य कांहीं याप्रकारें प्रायश्चित्त करूं शकत नाहीं. बहुतकरून मनुष्य स्वतःचे अपराध लपविण्याचा प्रयत्न करीत असतो. परंतु जे लोक स्वतःचे दोष जनतेसमोर मांडतात, तेच शुद्ध होऊन मोठे महात्मे होऊं शकतात.

या सूक्तात ‘ **वरुण** ’ आदि शब्दांनीं परमात्म्याचें वर्णन केलें आहे. ‘ **मुञ्चामि** ’ शब्दानें पाप्यांस पापांतून मुक्त करण्याच्या महोपदेशकाचें वर्णन आहे आणि ‘ **इमं** ’ वगैरे शब्दांनीं पापी मनुष्याचें वर्णन केलें आहे. धर्मोपदेशक पापी मनुष्याला पापापासून मुक्त होण्याचा उपदेश परमेश्वरीभक्तीचा मार्ग दाखवून करीत आहे. ही गोष्ट या सूक्तातील शब्दांनीं स्पष्ट होते. म्हणजे धर्मोपदेशकानें याच मार्गानें जाऊन स्वतः पापांपासून मुक्ति मिळवून इतरांस (पापीजनांस) पापांपासून मुक्त करावें.

पापी मनुष्य

पापी मनुष्य हजारों प्रकारचीं पापें करतो. परंतु या सूक्तात थोड्या मुख्य पापांचाच उल्लेख केला आहे. तींसुद्धां पहाण्यासारखीं आहेत–

(१) ‘ **विश्वं द्रुग्धं** ’ सर्व द्रोह म्हणजे सर्व प्रकारची लबाडी, कपट, दुसऱ्याचा विश्वासघात करणें हीं महान् पापें आहेत. यांत दुसरी अनेक छोटीं पापें येतात. (मं. २)

(२) ‘ **यदुवक्थानृतं जिह्वया वृजिनं बहु** ’ जिव्हेनें असत्य आणि पापयुक्त भाषण करणें, हेंसुद्धां एक मोठें पाप आहे. (मं. ३)

द्रोह करणें आणि असत्य बोलणें, या दोन्हीं पापांत प्रायः सर्व पापांचा समावेश होतो. अशा पापी मनुष्यांची सुधारणा वर सांगितलेल्या मार्गांनीच होणें शक्य आहे. धर्मोपदेशकानें सामान्य जनतेनें आणि वाचकांनीं या सूक्ताचा विचार केला तर त्यांना पापविमोचनाविषयीं पुष्कळच बोध मिळेल.

पापमुक्ततेसाठीं प्रार्थना

कांड ११, सूक्त ६

(ऋषिः– शंतातिः । देवता – चन्द्रमाः मन्त्रोक्ताः)

अ॒ग्निं ब्रू॑मो॒ वन॒स्पती॒नोष॑धीरु॒त वी॒रुधः॑ । इन्द्रं॒ बृह॒स्पतिं॒ सूर्यं॒ ते नो॑ मुञ्च॒न्त्वंह॑सः ॥ १ ॥
ब्रूमो राजा॑नं॒ वरु॑णं मि॒त्रं विष्णु॒मथो॒ भग॑म् । अंशं॒ विव॑स्वन्तं ब्रूम॒स्ते नो॑ मुञ्च॒न्त्वंह॑सः ॥ २ ॥
ब्रूमो दे॒वं स॑वि॒तारं॑ धा॒तार॑मु॒त पू॒षण॑म् । त्वष्टा॑रमग्रि॒यं ब्रू॑म॒स्ते नो॑ मुञ्च॒न्त्वंह॑सः ॥ ३ ॥
ग॒न्ध॒र्वा॒प्स॒रसो॑ ब्रूमो अ॒श्विना॒ ब्रह्म॑ण॒स्पति॑म् । अ॒र्य॒मा नाम॒ यो दे॒वस्ते नो॑ मुञ्च॒न्त्वंह॑सः ॥ ४ ॥
अ॒हो॒रा॒त्रे इ॒दं ब्रू॑मः सूर्याचन्द्र॒मसा॑वु॒भा । विश्वा॑नादि॒त्यान्ब्रू॑म॒स्ते नो॑ मुञ्च॒न्त्वंह॑सः ॥ ५ ॥
वातं॑ ब्रूमः प॒र्जन्य॑म॒न्तरि॑क्ष॒मथो॒ दिशः॑ । आशा॑श्च॒ सर्वा॑ ब्रूम॒स्ते नो॑ मुञ्च॒न्त्वंह॑सः ॥ ६ ॥

अर्थ—– अग्नि, वनस्पति, औषधि (**वीरुधः**) लता, इन्द्र, बृहस्पति आणि सूर्य या सर्वांची (**ब्रूमः**) आम्ही प्रार्थना करतों कीं (**ते**) ते (**नः अंहसः**) आम्हां सर्वांस पापांपासून (**मुञ्चन्तु**) मुक्त करोत. (१) राजा वरुण, मित्र, (**अथो**) आणि भग, अंश, विवस्वान्० (२) सविता देव, धाता, पूषा, (**अग्रियं त्वष्टारं**) मुख्य त्वष्टा० (३) गंधर्व आणि अप्सरागण, अश्विनौ देव, ब्रह्मणस्पति, (**यः अर्यमा नाम देवः**) आणि जो अर्यमा नांवाचा देव आहे० (४) अहोरात्र, सूर्य आणि चंद्र हे (**उभौ**) दोघेहि (**विश्वान् आदित्यान्**) सर्व आदित्य० (५) (**वातः**) वायु, पर्जन्य, अन्तरिक्ष (**अथो**) आणि दिशा, (**आशाः**) उपदिशा या सर्वांची आम्ही सर्व (**ब्रूमः**) प्रार्थना करतों कीं (**ते नः अंहसः मुञ्चन्तु**) ते सर्व आम्हांस सर्व पापांतून मुक्त करोत. (६)

मुञ्चन्तु मा शपथ्या॒दहोरा॒त्रे अथो॑ उ॒षाः । सोमो॑ मा दे॒वो मु॑ञ्चतु यम॒ाहुश्च॒न्द्रमा॒ इति॑ ॥ ७ ॥
पार्थिवा दि॒व्याः प॒शव॑ आर॒ण्या उ॒त ये मृ॒गाः । श॒कुन्ता॑न्प॒क्षिणो॑ ब्रूमस्ते नो॑ मुञ्चन्त्वंह॑सः ॥ ८ ॥
भ॒वाश॒र्वावि॒दं ब्रू॑मो रु॒द्रं प॑शु॒पति॑श्च॒ यः । इष॒र्या ए॑षां संवि॒द्म ता नः॑ सन्तु॒ सदा॑ शि॒वाः ॥ ९ ॥
दिवं॑ ब्रू॒मो नक्ष॑त्रा॒णि भूमिं॑ य॒क्षाणि॒ पर्व॑तान् । स॒मु॒द्रा न॒द्यो॒ वेश॒न्तास्ते नो॑ मुञ्चन्त्वंह॑सः ॥ १० ॥
स॒प्तर्षी॑न्वा इ॒दं ब्रू॒मोऽपो॑ दे॒वीः प्र॒जाप॑तिम् । पि॒तॄन्य॒मश्रे॑ष्ठान्ब्रू॒मस्ते नो॑ मुञ्चन्त्वंह॑सः ॥ ११ ॥
ये दे॒वा दि॑वि॒षदो॑ अन्तरिक्ष॒सद॑श्च॒ ये । पृ॒थि॒व्यां श॒क्रा श्रि॒तास्ते नो॑ मुञ्चन्त्वंह॑सः ॥ १२ ॥
आ॒दि॒त्या रु॒द्रा वस॑वो दि॒वि दे॒वा अथ॒र्वाणः । अङ्गि॑रसो मनी॒षिण॒स्ते नो॑ मुञ्चन्त्वंह॑सः ॥ १३ ॥
य॒ज्ञं ब्रू॒मो यज॑मानमृ॒चः सामा॑नि भेष॒जा । यजूं॑षि॒ होत्रा॑ ब्रू॒मस्ते नो॑ मुञ्चन्त्वंह॑सः ॥ १४ ॥
पञ्च॑ रा॒ज्यानि॑ वी॒रुधां॒ सोम॑श्रेष्ठानि ब्रूमः । द॒र्भो भ॒ङ्गो यवः॑ सह॒स्ते नो॑ मुञ्चन्त्वंह॑सः ॥ १५ ॥
अ॒राया॑न्ब्रू॒मो रक्षां॑सि स॒र्पान्पु॑ण्यज॒नान्पि॒तॄन् । मृ॒त्यूनेक॑शतं ब्रू॒मस्ते नो॑ मुञ्चन्त्वंह॑सः ॥ १६ ॥
ऋ॒तून्ब्रू॑म ऋतु॒पती॑नार्त॒वानु॒त हा॑य॒नान् । समाः॑ संवत्स॒रान्मासां॒स्ते नो॑ मुञ्चन्त्वंह॑सः ॥ १७ ॥

अहोरात्र आणि उषा (मा शपथ्यात् मुञ्चन्तु) मला शपथेपासून मुक्त करोत. (यं चन्द्रमाः इति आहुः) ज्याला चंद्रमा म्हणतात तो सोमदेव (मा मुञ्चतु) माझें पापापासून रक्षण करो. (७)

(पार्थिवाः दिव्याः पशवः) पृथ्वीवर रहाणारे पशु आणि आकाशांत उडणारे पक्षी (उत ये आरण्या मृगाः) आणि अरण्यांत रहाणारे मृग. शकुन्त पक्षी वगैरे या सर्वांस आमची प्रार्थना आहे कीं त्या सर्वांनीं आम्हांस पापांपासून वाचवावें. (८)

भव आणि शर्व (यः पशुपतिः रुद्रः) जो पशुपालक रुद्र आहे, (या एषां इषूः) जे त्यांचे बाण (सं विद्मः) आम्हांस माहित आहेत (ताः) ते (नः सदा शिवाः सन्तु) आम्हांस सर्वदा कल्याणकारी होवोत. (९)

(दिवं०) द्युलोक, नक्षत्र, भूमि, (यक्षाणि०) यक्ष, पर्वत, समुद्र, नद्या, (वेशन्ताः०) जलाशय. (१०) सप्तर्षिगण (आपः देवी०) जलदेवता, प्रजापति (यमश्रेष्ठान् पितॄन्०) पितर आणि त्यांचा अधिपति यम. (११) (ये दिविषदः देवा) जे द्युलोकांत रहाणारे देव आहेत (च ये अन्तरिक्षसदः) आणि अंतरिक्षांत रहाणारे आहेत, (ये शक्राः) समर्थ देव (पृथिवीं श्रिताः) पृथ्वीचा आश्रय करणारे (ते नः अंहसः मुञ्चन्तु) आम्हांस सर्व पापांतून मुक्त करोत. (१२)

आदित्य, रुद्र, वसु, (दिवि अथर्वाणः देवाः) द्युलोकांत जे निश्चल देव आहेत, तसेंच (मनीषिणः अंगिरः) मननशील अंगिरस आहेत, (ते नः अंहसः मुञ्चन्तु) ते सर्व आम्हांस पापांपासून मुक्त करोत. (१३)

यज्ञ, यजमान, (ऋचः०) ऋग्वेद, सामवेद, (भेषजा) वैद्यासह (यजूंषि) यजुर्वेद (होत्राः) होमहवन कर्म० (१४) (वीरुधां सोमश्रेष्ठाणि पञ्चराज्याणि) ज्यामध्यें सोमश्रेष्ठ अशी औषधींचीं पंचराज्यें–पंच अंगें, दर्भ, (भङ्ग) भांग, (यवः) सातु आणि (सहः) बलशाली धान्य या सर्वांना (ब्रूमः) आम्हीं प्रार्थना करतो कीं (ते०) ते सर्व आम्हांस पापापासून मुक्त करोत. (१५)

(अरायान् रक्षांसि) अराजक राक्षस, सर्प, पुण्यजन, आणि पितर (एकशतं मृत्यून्) एकशें मृत्यूंना० (१६) ऋतु, ऋतूंचे पति (आर्तवान् हायनान्) ऋतूमुळें होणारीं अयनें, (समाः संवत्सरान् मासान्) सम, वर्ष आणि महिने या सर्वांस आम्हीं प्रार्थना करतों कीं त्यांनीं आम्हांस सर्व पापांपासून मुक्त करावें (१७)

एतं देवा दक्षिणतः पश्चात्प्राञ्च उदेत । पुरस्तादुत्तराच्छक्रा विश्वे देवाः समेत्य ते नो मुञ्चन्त्वंहसः ॥१८॥
विश्वान्देवानिदं ब्रूमः सत्यसंधानृतावृधः । विश्वाभिः पत्नीभिः सह ते नो मुञ्चन्त्वंहसः ॥ १९ ॥
सर्वान्देवानिदं ब्रूमः सत्यसंधानृतावृधः । सर्वाभिः पत्नीभिः सह ते नो मुञ्चन्त्वंहसः ॥ २० ॥
भूतं ब्रूमो भूतपतिं भूतानामुत यो वशी । भूतानि सर्वा संगत्य ते नो मुञ्चन्त्वंहसः ॥ २१ ॥
या देवीः पञ्च प्रदिशो ये देवा द्वादशर्तवः । संवत्सरस्य दंष्ट्रास्ते नः सन्तु सदा शिवाः ॥ २२ ॥
यन्मातली रथक्रीतममृतं वेद भेषजम् । तदिन्द्रो अप्सु प्रावेशयत्तदापो दत्त भेषजम् ॥ २३ ॥

हे (देवाः) देव हो ! (दक्षिणतः एत) दक्षिणेकडून या, नंतर (प्राञ्चः उदेत) पूर्वदिशेकडून उदय करा, (विश्वे शक्राः देवाः) सर्व समर्थ देव (पुरस्तात् उत्तरात् समेत्य) समोर उत्तर दिशेस एकत्र होऊन (ते नः०) आम्हां सर्वांस पापांपासून मुक्त करोत. (१८)

(सत्यसंधान्) सत्य प्रतिज्ञ (ऋतावृधः) सत्यास वाढविणारे, (विश्वान् देवान्) सर्व देवांस (इदं ब्रूमः) असें म्हणतों कीं (विश्वाभिः पत्नीभिः सह) आपापल्या पत्न्यांसह येऊन (नः०) आम्हांस सर्व पापांतून त्यांनीं वाचवावें. (१९-२०)

(यः वशी) जो सर्वांस वश करणारा आहे त्या (भूतानां भूतपतिं) भूतांच्या अधिपतीला तसेंच (भूतं) भूतांना आम्हीं (ब्रूमः) प्रार्थितों कीं (सर्वा भूतानि संगत्य०) सर्वभूतें एकत्र मिळून आमच्या पापांचा नाश करून आम्हांस त्यांतून मुक्त करावें. (२१)

(याः पञ्चदेवीः प्रदिशः) ज्या दिव्य पांच दिशा आहेत. (ये द्वादश ऋतवः देवाः) जे बारा ऋतुदेव आहेत, (ये संवत्सरस्य दंष्ट्राः) जे वर्षाच्या दाढेसारखे आहेत, (ते नः सदा शिवाः सन्तु) ते आम्हां सर्वांस सर्वदा शुभ होवोत. (२२)

(मातलि) मातली (यत् रथक्रीतं अमृतं भेषजं वेद) ज्या रथाच्या योगानें प्राप्त अमर पदास देणाऱ्या औषधास जाणतो, (इंद्रः तत् अप्सु प्रावेशयत्) इन्द्रानें तें औषध जलांत प्रविष्ट केलें आहे. हे (आपः) जलां ! (तत् दत्त) तें औषध तुम्हीं आम्हांस द्या. (२३)

भावार्थ— मंत्रोक्त सर्व देवतांच्या मदतीनें मनुष्यानें पापापासून मुक्त व्हावें. (१-२३)

पापांपासून मुक्तता

या सूक्ताचा विचार

या सूक्तांत मनुष्यास पापांपासून दूर करण्यासाठीं म्हणजे त्यांस निष्पाप करण्यासाठीं सर्व देवतांची प्रार्थना केली आहे.

या प्रार्थनेचें वैशिष्ट्य असें आहे कीं, ही प्रार्थना सार्वजनिक आहे. म्हणजे सांघिक आहे. सर्व लोकांनी एकत्र येऊन करण्याची ही प्रार्थना आहे. म्हणून यांत, '**ते नो मुंचन्तु अंहसः**' ते आम्हां सर्व प्रार्थना करणाऱ्यांस पापांपासून मुक्त करोत. असा बहुवचनी प्रयोग आहे. सांघिक प्रार्थनेचें महत्त्व वेदवाङ्मयांत विशेष आहे. कारण त्याच्यायोगें संघशक्ति वाढते.

आतां या सूक्तांत ज्या देवतांची नावें आलीं आहेत त्यांचे वर्गीकरण असें आहे.

पृथ्वीस्थानीय देवता

१ अग्निः १
२ वनस्पतिः १
३ औषधिः १
४ वीरुधः ३
५ अहोरात्रे ७
६ शपथ्यं ७
७ उषाः ७
८ पार्थिवाः पशवः ८
९ आरण्याः मृगाः ८
१० भूमिः १०
११ यक्षः १०
१२ पर्वतः १०
१३ समुद्रः १०
१४ नदी १०
१५ वैशन्ताः १०
१६ पृथिव्यां शक्राः श्रिताः १२
१७ वसवः (अष्टौ) १३
१८ अथर्वाणः १३
१९ अङ्गिरसः १३
२० यज्ञः १४
२१ यजमानः १४
२२ ऋचः १४
२३ सामानि १४
२४ भेषजानि १४
२५ यजुः १४
२६ होत्राः १४
२७ वीरुधाः पञ्च राज्यानि १५
२८ सोमः (वनस्पतिः) १५
२९ दर्भः १५
३० भंगः १५
३१ यवः १५
३२ सहः १५
३३ अरायः १६
३४ रक्षांसि १६
३५ सर्पः १६
३६ पुण्यजनः १६
३७ मृत्युः (एकशतं मृत्यवः) १४
३८ ऋतुः (द्वादश) १७,२२
३९ ऋतुपतिः १७
४० आर्तवः १७
४१ हायनः १७
४२ समाः १७
४३ संवत्सरः
४४ मासाः १७
४५ विश्वेदेवाः १८,१९
४६ देवपत्न्यः १९
४७ भूतः २१
४८ भूतानां भूतपतिः २१
४९ भेषजं २३

अन्तरिक्षस्थानीय देवता

१ गंधर्वः ४
२ अप्सराः
३ चंद्रमाः ५
४ वायुः ६
५ पर्जन्यः ६
६ अन्तरिक्षं ६
७ दिशः ६
८ सर्वाः आशाः ७
९ सोमः ७
१० पक्षिणः ८
११ शकुन्तः ८
१२ भवः ९
१३ शर्वः ९
१४ रुद्रः ९
१५ पशुपतिः ९
१६ इषुः ९
१७ यमः ११
१८ पितरः ११,१६
१९ अन्तरिक्षसदः देवाः १२
२० रुद्राः (एकदश) १३

द्युस्थानीय देवता

१ इन्द्रः १
२ बृहस्पतिः १
३ सूर्यः १,५
४ राजा वरुणः २
५ मित्रः २
६ विष्णुः २
७ भगः २
८ अंशः २
९ विवस्वान् २
१० सविता देवः ३
११ धाता ३
१२ पूषा ३
१३ त्वष्टा ३
१४ अश्विनौ ४
१५ ब्रह्मणस्पतिः ४
१६ अर्यमा ४
१७ विश्वे आदित्याः (द्वादश) ५,२१
१८ दिव्याः पशवः (पक्षिणः) ८
१९ द्युः १०
२० नक्षत्राणि १०
२१ सप्तर्षयः ११
२२ देवीः आपः ११
२३ प्रजापतिः ११
२४ दिविषदः देवाः १२,१३

येथें याप्रकारें देवतांचे तीन विभाग पाडले आहेत. देवता नामापुढें ज्या मंत्रांत त्या देवतेचें नांव आलें आहे तो आंकडा घातला आहे. कित्येक देवता अंन्तरिक्ष अथवा द्युस्थानीय असून त्यांचा संबंध पृथ्वीवरील माणसाशीं विशेष येत असल्यानें त्यांस पृथ्वीस्थानांत ठेवलें आहे. इतका भेद, विचार सुबोधतेसाठीं केला आहे, एवढें वाचकांनीं ध्यानीं ठेवावें.

पृथ्वीस्थानांत	४९
अन्तरिक्षांत	२०
द्युस्थानांत	२४

मिळून एकंदर ९३ देवता होतात.

त्यांत ८ वसु, ११ रुद्र, १२ आदित्य, ७ ऋषिगण, १०० मृत्यु. १२ मास, १२ आर्तव ६ ऋतु, २ अयनें, ६ ऋतुपति, ४ दिशा, ४ उपदिशा, या १८४ देवता अधिक होतात. यांतून १२ पुनरुक्त म्हणून काढून टाकल्या म्हणजे बाकी १७२ आणि त्यांत पूर्वींच्या ९३ मिळविल्या म्हणजे २९५ देवता होतात.

या देवतांचा मानवाशीं काय आणि कसा संबंध आहे हें पाहून साधकानें पापापासून दूर रहाण्याचा प्रयत्न करावयाचा आहे.

यांतील कित्येक देवता पापकर्मास साधक सुद्धां आहेत. उदाहरणार्थ भूमि, जल, वनस्पति, पशु, पक्षी, यांच्यासाठींच मनुष्य भांडण, तंटे, लढाया, युद्धें करीत आला आहे. केवळ भूमीसाठींच किती युद्धें झालीं व किती मनुष्यें मारली गेली ? हें इतिहासावरून कळतें, यांच्यामुळेंच मनुष्यांत राक्षसभाव निर्माण होतो. म्हणून

या राक्षसभावापासून दूर राहिलें पाहिजे, आत्मरक्षण केलें पाहिजे, व्यवहार असा ठेवला पाहिजे की ज्याच्या योगानें राक्षसभाव दूर होईल, आणि आपणांत दैवीभाव स्थिर होईल. म्हणून म्हटलें आहे.

ते नः सन्तु सदा शिवाः (६।२२)

' हे सर्व देव आम्हांस नेहमीं शुभमार्ग दाखविणारे होवोत, ' या प्रार्थनेंत अशुभ वृत्ति असण्याचा संभव दाखविला आहेच. मन वश करून कोणतीहि अशुभ वृत्ति मनांत बंड करून उठणार नाहीं. अशी व्यवस्था केली पाहिजे.

याप्रकारें मनुष्य पापापासून मुक्त होऊं शकतो. मन ज्याचें ढिलें राहील त्याच्या हातून पाप घडेल. मन जर सबळ बनविलें तर तो मनुष्य पापवासना दाबून टाकून पापापासून मुक्त राहील.

असा विचार करून मानवानें पापापासून मुक्त रहाण्याचा प्रयत्न करावा आणि पवित्रात्मा होऊन यशस्वी व्हावें.

दुष्ट लक्षणें दूर करणें

कांड ७, सूक्त ११५

(ऋषिः- अथर्वाङ्गिराः । देवता – सविता, जातवेदाः)

प्र पतेतः पापि लक्ष्मि नश्येतः प्रामुतः पत । अयस्मयेनाङ्केन द्विषते त्वा सजामसि ॥ १ ॥
या मा लक्ष्मीः पतयालूरजुष्टाभिचस्कन्द वन्दनेव वृक्षम् ।
अन्यत्रास्मत्सवितस्तामितो धा हिरण्यहस्तो वसु नो रराणः ॥ २ ॥
एकशतं लक्ष्म्यो३ मर्त्यस्य साकं तन्वा जनुषोऽधि जाताः ।
तासां पापिष्ठा निरितः प्र हिण्मः शिवा अस्मभ्यं जातवेदो नि यच्छ ॥ ३ ॥

अर्थ— हे (पापि लक्ष्मि) पापमय लक्ष्मी ! (इतः प्र पत) येथून दूर जा. (इतः नश्य) येथून चालती हो. (अमुतः प्रपत) तेथूनहि निघून जा. (अयस्मयेन अंकेन)'लोखंडाच्या खिळ्याला (त्वा द्विषते आ सजामसि) तुला द्वेष करणाऱ्यांसाठीं (बांधून) ठेवतों. (१)

(या पतयालूः अजुष्टा लक्ष्मीः) जी पतन घडवणारी, सेवन करण्यास अयोग्य लक्ष्मी (मा अभिचस्कन्द) मजवर येऊन पडली आहे, मला प्राप्त झाली आहे. (वन्दना वृक्षं इव) जशी वेल झाडावर चढते त्याप्रमाणें, हे (सवितः) सविता देवा ! (तां इतः अन्यत्र अस्मत् धाः) तिला येथून आमच्यापासून दुसऱ्या स्थानीं ठेव. (हिरण्यहस्तः नः वसु रराणः) सुवर्णाचीं आभूषणें धारण करणारा तूं आम्हांस धन दे. (२)

(मर्त्यस्य तन्वा साकं) मनुष्याच्या शरीरासह (जनुषः अधि) जन्मतांच (एकशतं लक्ष्म्यः जाताः) एकशें एक लक्ष्म्या उत्पन्न झाल्या आहेत. (तासां पापिष्ठाः इतः नि प्रहिण्मः) त्यांतील पापी लक्ष्मीला येथून आम्हांपासून दूर करतों. हे (जातवेद :) ज्ञानी देवा ! (शिवाः अस्मभ्यं नि यच्छ) आणि जी कल्याणमय लक्ष्मी आहे ती आम्हांस प्रदान कर. (३)

भावार्थ— ज्या प्रकारच्या ऐश्वर्यानें पाप होतें, अशा प्रकारचें ऐश्वर्य माझ्याजवळ न राहो. तें फार वाईट आहे. म्हणून तें आमच्या शत्रूच्या जवळ जाऊन स्थिर होवो. (१)

जें पतन करणारें ऐश्वर्य मजजवळ आलें आहे तें माझ्यापासून दूर जावो आणि मला शुभकारक ऐश्वर्य प्राप्त होवो. (२)

मनुष्याच्या जन्माबरोबर एकशेंएक शक्ति प्राप्त होतात, त्यांतील कित्येक पापमय व कित्येक पुण्ययुक्त असतात. पापी आम्हांपासून दूर होवोत आणि शुभ वृत्ति आम्हांपाशीं येवोत. (३)

एता एना व्याकरं खिले गा विष्ठिता इव। रमन्तां पुण्या लक्ष्मीर्याः पापीस्ता अनीनशम् ॥ ४ ॥

अर्थ— (खिले विष्ठिताः गाः इव) गायरानांत जमिनीवर बसलेल्या गाईंसमान (एताः एनाः वि-आकरं) या वृत्तींना मीं वेगवेगळ्या करतों. (याः पुण्याः लक्ष्मीः रमन्तां) ज्या पुण्यकारक लक्ष्मी आहेत, त्या येथें आनंदानें राहोत. (याः पापीः ताः अनीनशं) आणि ज्या पापी वृत्ति आहेत त्यांचा नाश करतों. (४)

भावार्थ- मीं त्या वृत्तींनां पृथक् पृथक् करतों, ज्या पुण्यकारक आहेत त्या मजजवळ राहोत, पापी आहेत त्या माझ्यापासून दूर जावोत. (४)

पापी लक्षणांचा त्याग

मनुष्य उत्पन्न होतांच त्याच्या शरीरांत शेंकडों शक्ति स्वाभाविक रीत्या असतात. त्यांत कांहीं चांगल्या, कांहीं वाईट असतात. चांगल्या शक्ति अथवा वृत्ति ज्या आहेत त्या आपण धारण करून वाढविल्या पाहिजेत. तसेंच ज्या वाईट आहेत त्यांना दूर केलें पाहिजे. (मं. ३)

गायरानांत अनेक गाई बसतात. त्यामध्यें कित्येक पांढऱ्या रंगाच्या तर कित्येक काळ्या रंगाच्या असतात. त्या जशा ओळखूं येतात तशा आपल्या शक्ति आणि वृत्ति यांनाहि ओळखण्यास शिकलें पाहिजे. शुभवृत्ति वाढविल्या पाहिजेत आणि अशुभ वृत्तींचा नाश केला पाहिजे. (४)

लक्ष्मीचा अर्थ आहे ' **चिन्ह** ' आपल्या ठिकाणीं कोणतीं चिन्हें वाईट आहेत कोणती चांगली आहेत, त्यांची परीक्षा करणें प्रत्येक मनुष्याचें आवश्यक कर्तव्य आहे. मनुष्याच्या वागणुकींत हीं चिन्हें दिसून येतात. तीं पाहून असा व्यवहार करावा कीं ज्यामुळें शुभ लक्षणांची वृद्धि होईल आणि अशुभ लक्षणें नाश होत जातील. याप्रकारें करण्यानें मनुष्याची उन्नति होते.

पापांपासून सुटणें

कांड ६, सूक्त ११५

(ऋषिः- ब्रह्मा । देवता - विश्वेदेवाः)

यद्विद्वांसो यदविद्वांस एनांसि चकृमा वयम् । यूयं नस्तस्मान्मुञ्चत विश्वे देवाः सजोषसः ॥ १ ॥
यदि जाग्रद्यदि स्वपन्नेन एनस्योऽकरम् । भूतं मा तस्माद्भव्यं च द्रुपदादिव मुञ्चताम् ॥ २ ॥

अर्थ— (यत् विद्वांसः यद् अविद्वांसः) जर जाणून अथवा न जाणतां (वयं एनांसि चकृम) आम्हीं पापें केलीं, तर हे (विश्वेदेवाः) सर्व देव हो ! (यूयं सजोषसः तस्मात् नः मुञ्चत) तुम्ही सर्व एकमतानें त्या पापांपासून आम्हांला मुक्त करा. (१)

(यदि जाग्रत् यदि स्वपन्) जागेपणीं अथवा झोंपेंत (एनस्य एनः अकरं) मीं पापी होऊन पापें केलीं तर (द्रुपदात् इव) खुंट्याला बांधलेल्या पशूला ज्याप्रमाणें मुक्त करतात त्याचप्रमाणें (भूतं भव्यं च तस्मात् मा मुञ्चतां) भूत अथवा भविष्यकाळच्या पापापासून मला सोडवा. (२)

भावार्थ— जाणून अथवा अजाणतेपणीं जी पापें आमच्याकडून झालीं असतील त्यांपासून सोडवणूक करून घेतली पाहिजे. (१)
जागेपणीं अथवा झोंपेंत जी पापें माझ्याकडून होतील मग तीं भूतकाळचीं असोत, वर्तमानकाळचीं असोत अथवा भविष्यकाळचीं असोत, त्यांपासून स्वतःची सोडवणूक करून घेतली पाहिजे. (२)

द्रुपदादिव मुमुचानः स्विन्नः स्नात्वा मलादिव। पूतं पवित्रेणेवाज्यं विश्वे शुम्भन्तु मैनसः ॥ ३ ॥

अर्थ— (द्रुपदाद् इव मुमुचानः) ज्याप्रमाणें जनावर बंधनस्तंभापासून मोकळें होतें अथवा (मलात् स्विन्नः स्नात्वा इव) ज्याप्रमाणें स्नानामुळें मळापासून मुक्त होतो, (पवित्रेण पूतं आज्यं इव) अथवा ज्याप्रमाणें कढवून, गाळून तूप पवित्र होतें, त्याप्रमाणें (विश्वे मा एनसः शुम्भन्तु) सर्व देव मला पापांपासून पवित्र करोत. (३)

भावार्थ— ज्याप्रमाणें खांबापासून पशु सुटतो, शरीरावरील मळ स्नानानें दूर होतो, ज्याप्रमाणें कढवून गाळल्यानें तूप शुद्ध होतें, त्याप्रकारें मीं निर्दोष व्हावें. (३)

पापांपासून सुटणें

निष्पाप होण्याचे तीन प्रकार

पापांपासून मुक्त होऊन पवित्र, शुद्ध होण्याचे तीन उपाय या सूक्तांत सांगितले आहेत. अंतःशुद्धि, बहिःशुद्धि आणि संबंध-शुद्धि. त्याची तीन उदाहरणें तिसऱ्या मंत्रांत दिली आहेत तीं पहा—

१. **अंतःशुद्धि**- (पवित्रेण घृतं आज्यं इव) ' गाळण्यामुळें ज्याप्रमाणें तूप स्वच्छ होतें. ' तूप तापवितात, कढवितात आणि गाळतात त्यामुळें तुपांतील मळ दूर होतो, याप्रकारें आपल्या अंतःकरणांतील मळ दूर केला पाहिजे. यास अंतःशुद्धि म्हणतात.

२. **बहिःशुद्धि**- (मलात् स्नात्वा स्विन्नः इव) ' ज्याप्रमाणें शरीरावर लागलेला मळ स्नान करून धुवून टाकता येतो. ' ही बहिःशुद्धि होय. मळ शरीरावर बाहेर लागतो त्याप्रमाणें बाह्य दोषापासून शुद्धता करावयास हवी.

३. **संबंधशुद्धि**- (द्रुपदात् मुमुचानः इव) खांबाला बांधलेला पशु ज्याप्रमाणें मोकळा होतो अथवा परिपक्व फळ ज्याप्रमाणें वृक्षावरून खालीं पडतें, त्याप्रकारें संबंधित दोषांपासून मुक्त होणें. ही संबंधशुद्धि आहे.

अशा प्रकारें शुद्ध होण्याचे तीन प्रकार अथवा मार्ग आहेत. मनुष्यास सुद्धा जर निर्दोषत्व प्राप्त करावयाचें असेल तर तें उक्त तीन प्रकारचें असलें पाहिजे. मनुष्यानें आपले इतर जनांशीं असणारे संबंध शुद्ध ठेवावे; आणि पाप्यांशी संबंध असले तर ते तोडून टाकावेत. आपली बाह्यशुद्धता करावी, त्यासाठीं आपली रहाणी करणी शुद्ध आणि पवित्र राखावी. तसेंच आपली अंतःशुद्धिसुद्धा करावी. त्यासाठीं आपले विचार पवित्र असावेत. याप्रकारें मनुष्य पापापासून मुक्त होऊन परिशुद्ध होतो.

मनुष्य जाणून अथवा न जाणतां म्हणजे अजाणतेपणीं, जागृत अवस्थेंत अथवा झोपेंत पाप करतो. या सर्वांपासून मुक्त व्हावयास हवें. परमेश्वराची कृपा, ज्ञान्यांचा सहवास आणि आत्मशुद्धीचे प्रयत्न करण्यानें पापापासून मनुष्य मुक्त होतो.

हें सूक्त विशेष महत्त्वाचें आहे. वाचकांनीं त्याचा विशेष विचार करावा आणि सर्व प्रकारची शुद्धता प्राप्त करण्याचा प्रयत्न करावा.

पापनाशन

कांड ४, सूक्त ३३

(ऋषिः- ब्रह्मा । देवता — पाप्मनाशनः अग्निः)

अप॑ नः॒ शोशु॑चद॒घमग्ने॑ शुशु॒ग्ध्या र॒यिम् । अप॑ नः॒ शोशु॑चद॒घम् ॥ १ ॥

अर्थ— हे (अग्ने) प्रकाशक देवा ! (नः अघं अपशोशुचत्) आमचें पाप निःशेष दूर व्हावें आणि आमच्या जवळ (रयिं शुशुग्धि) धन शुद्ध होऊन यावें. (नः अघं अप शोशुचत्) आमचें पाप दूर होवो. (१)

सुक्षेत्रिया सुगातुया वसूया च यजामहे । अप नः शोशुचदघम् ॥ २ ॥
प्र यद्भन्दिष्ठ एषां प्रास्माकासश्च सूरयः । अप नः शोशुचदघम् ॥ ३ ॥
प्र यत्ते अग्ने सूरयो जायेमहि प्र ते वयम् । अप नः शोशुचदघम् ॥ ४ ॥
प्र यदग्नेः सहस्वतो विश्वतो यन्ति भानवः । अप नः शोशुचदघम् ॥ ५ ॥
त्वं हि विश्वतोमुख विश्वतः परिभूरसि । अप नः शोशुचदघम् ॥ ६ ॥
द्विषो नो विश्वतोमुखाति नावेव पारय । अप नः शोशुचदघम् ॥ ७ ॥
स नः सिन्धुमिव नावाति पर्षा स्वस्तये । अप नः शोशुचदघम् ॥ ८ ॥

अर्थ— (सुक्षेत्रिया सुगातिया) उत्तम क्षेत्रासाठीं, उत्तम भूमीसाठीं (च वसुया यजामहे) आणि धनासाठीं आम्हीं यज्ञ करतों. आमचें पाप दूर होवो. (२)

(एषां यत् भन्दिष्ठः प्र) यांच्यामध्यें ज्या प्रकारें मी अत्यंत कल्याणयुक्त होईन, (अस्माकासः सूरयः च) आणि आमचे ज्ञानीजनहि उत्तम अवस्था प्राप्त करतील. यासाठीं कोणत्याहि मार्गानें आमचें पाप दूर व्हावें. (३)

हे (अग्ने) तेजस्वी देवा ! (यत् ते सूरयः) जसे तुला विद्वान् आहेत तसेच (ते वयं प्रजायेमहि) तुझे होऊन आम्हीं श्रेष्ठ होऊं. यासाठीं आमचें पाप दूर व्हावें. (४)

(यत्) ज्याप्रमाणें (सहस्वतः अग्नेः) बलवान् अग्नीचीं (भानवः विश्वतः प्रयन्ति) किरणें सर्वत्र फैलावतात, त्याप्रकारें माझीं पसरोत. त्यासाठीं आमचें पाप दूर होवो. (५)

हे (विश्वतो मुख) सर्वत्र मुख असणाऱ्या देवा ! (त्वं हि विश्वतः परिभूः असि) तूंच सर्वांपेक्षां श्रेष्ठ आहेस. तसें आम्हीं व्हावें म्हणून आमची पापें दूर होवोत. (६)

हे (विश्वतो-मुख) सर्वत्र मुख असणाऱ्या देवा ! (नावा इव) नौकेसमान (नः द्विषः अतिपारय) आम्हांस शत्रुसमुद्रातून पार कर. तसें होण्यासाठीं आमचीं पापें दूर होवोत (७)

(सः) असा तूं (नः अति पर्ष) आम्हांस पार कर (नावा सिंधुं इव) ज्याप्रमाणें नौकेच्या सहाय्यानें समुद्र पार करावा आणि (स्वस्तये) कल्याणासाठीं (नः अघं अप शोशुचत्) आमची सर्व पापें दूर होवोत. (८)

पापांस दूर करणें

या सूक्तांत पापांस दूर केलें असतां जे अनेक लाभ होतात ते वर्णन केले आहेत. पापांस दूर करून शुद्ध होण्यानें (रयिं) धन मिळतें, (सुक्षेत्र) उत्तम क्षेत्र प्राप्त होतें, (सुगातु) उन्नतीसाठीं चांगला मार्ग खुला होतो. (भन्दिष्ठः) कल्याण प्राप्त होतें, (सूरयः) विद्वानांची संगति लाभते, (सूरयः जायेमहि) ज्ञानसंपन्नता प्राप्त होते, (भानवः विश्वतः यन्ति) प्रकाश सर्व बाजूंस पसरतो, (परिभूः) इतरांपेक्षां आपला प्रभाव श्रेष्ठ होतो, (अति पारयति) दुःख दूर होतें आणि (स्वस्ति) कल्याण प्राप्त होतें, इतके लाभ पापास दूर करण्यानें होतात. ज्या प्रमाणांत पाप दूर होतें तसतशी पवित्रता वाढते. आणि तसतसे उक्त लाभ पायरी पायरीनें होऊं लागतात. वाचकांनीं ही गोष्ट ध्यानांत बाळगावी आणि शक्य त्या प्रयत्नांनीं स्वतः निष्पाप व्हावें म्हणजे उक्त लाभ आपण होऊन त्याच्याकडे येतील.

पापी विचारांचा त्याग करा

कांड. ६, सूक्त. २६

(ऋषिः- ब्रह्मा । देवता – पाप्मा)

अव॑ मा पाप्मन्सृज व॒शी सन्मृ॑डयासि नः । आ मा॑ भ॒द्रस्य॑ लो॒के पा॑प्मन्धे॒ह्यवि॑ह्रुतम् ॥ १ ॥

यो न॒ः पाप्म॒न्न जहा॑सि॒ तमु॑ त्वा जहिमो व॒यम् । प॒थाम॒नु॑ व्या॒वर्त॑ने॒ऽन्यं पा॒प्मानु॑ पद्यताम् ॥ २ ॥

अ॒न्यत्रा॒स्मन्न्यु॑च्यतु सहस्रा॒क्षो अम॑र्त्यः । यं द्वे॒षाम॒ तमृ॑च्छतु॒ यमु॑ द्वि॒ष्मस्तमिज्ज॑हि ॥ ३ ॥

अर्थ— हे (**पाप्मन्**) पापी विचारा ! (**मा अवसृज**) मला सोडून दे. (**वशी सन् नः मृडयासि**) वश करून तूं आम्हांस सुख देतोस असें वाटतें. हे (**पाप्मन्**) पापी विचारा (**भद्रस्य लोके**) कल्याणाच्या स्थानांत (**मा अविन्हुतं आधेहि**) मला अकुटिल अवस्थेंत ठेव. (१)

हे (**पाप्मन्**) पापी विचारा ! (**यः नः न जहासि**) जो तूं आम्हांस सोडीत नाहींस, (**तं त्वा उ वयं जहिमः**) त्या तुला आम्हीं सोडून देतों. (**पथां अनु व्यावर्तने**) मार्गांतील अनुकूल वळणावर (**पाप्मा अन्यं अनुपद्यतां**) पापी विचार दुसऱ्याजवळ निघून जावो. (२)

(**सहस्र-अक्षः अमर्त्यः**) हजारों डोळे असणारा आणि न मरणारा हा पापी विचार (**अस्मत् अन्यत्र नि उच्यतु**) आम्हापासून दूर दुसऱ्या स्थानीं निघून जावो. (**यं द्वेषाम तं ऋच्छतु**) ज्याचा आम्हीं द्वेष करतों त्याच्या जवळ जावो. (**यं उ द्विष्मः तं इत् जहि**) ज्याचा आम्हीं द्वेष करतों त्याचा नाश कर. (३)

पापी मन

मन पापी असलें म्हणजे शारीरिक, मानसिक वगैरे सर्व प्रकारचे कष्ट होतात. यासाठीं मनांतून पापी संकल्प सर्वांत आधीं दूर केले पाहिजेत. कारण मन शुद्ध झालें म्हणजे सर्व दुःखें दूर होतात.

पापी विचार मनांत उत्पन्न होतात, मनुष्यास वश करतात आणि थोड्या प्रयत्नांनीं अधिक सुख प्राप्त करून देण्याची लालूच दाखवितात आणि सुखाच्या प्रलोभनानें मनुष्य फसतो. म्हणून अशा पापी विचारांपासून दूर राहिलें पाहिजे.

जर पापी विचार मनांतून आपोआप दूर न झाला तर प्रयत्नानें त्यास दूर केलें पाहिजे. अशा प्रयत्नानेंच प्रगतीचा मार्ग खुला होतो. तात्पर्य असें कीं पापी विचार दूर करून चित्ताची शुद्धि केली असतां प्रगतीचा खराखुरा मार्ग दिसतो.

पापी विचारास हजारों डोळे आहेत. त्यामुळें त्याला आमची उणीव आणि कमकुवतपणा लागलीच कळतो आणि नेमका त्याच ठिकाणीं हल्ला करून तो मनांत प्रवेश करतो. शरीर क्षीण झालें तरी पापी विचार क्षीण होत नाहीं. म्हणून त्यास प्रयत्नपूर्वक दूर केलें पाहिजे. पापी विचारास दूर करण्यानें आंतरिक पवित्रता होईल आणि अशी पवित्रता प्राप्त झाली म्हणजे सर्व कष्ट दूर होतील. असा हा आत्मशुद्धीच्या योगानें उन्नति करून घेण्याचा मार्ग आहे.

पापमोचन

कांड ४, सूक्त २६

(ऋषिः- मृगारः । देवता- द्यावापृथिवी)

मन्वे॑ वां द्यावापृथिवी सुभोजसौ॒ सचे॑तसौ॒ ये अप्र॑थेथा॒ममि॑ता॒ योज॑नानि ।
प्र॒ति॒ष्ठे ह्यभ॑वतं॒ वसू॑नां॒ ते नो॑ मुञ्चत॒मंह॑सः ॥ १ ॥

अर्थ— हे द्यावा पृथिवी ! (**सुभोजसौ सचेतसौ**) तुम्हीं दोघी उत्तम भोग देणाऱ्या आणि उत्तम ज्ञानसंपन्न आहांत. (**वां मन्वे**) तुम्हां दोघींचें मीं मनन करतों. (**ये अमिता योजनानि अप्रथेथां**) तुम्हीं दोघी अपरिमित योजनेंपर्यंत पसरलेल्या आहांत. (**हि वसूनां प्रतिष्ठे अभवतं**) कारण कीं तुम्हीं दोघी निवास करणाऱ्या प्राणी वगैरेंना आधार देतां, (**ते नः अंहसः मुञ्चतं**) अशा तुम्हीं (दोघी) आम्हां सर्वांस पापापासून वांचवा-मुक्त करा. (१)

प्रतिष्ठे ह्यभवतं वसूनां प्रवृद्धे देवी सुभगे उरूची ।
द्यावापृथिवी भवतं मे स्योने ते नो मुञ्चतमंहसः ॥ २ ॥
असंतापे सुतपसौ हुवेऽहमुर्वी गम्भीरे कविभिर्नमस्ये ।
द्यावापृथिवी भवतं मे स्योने ते नो मुञ्चतमंहसः ॥ ३ ॥
ये अमृतं बिभृथो ये हवींषि ये स्रोत्या बिभृथो ये मनुष्यान् ।
द्यावापृथिवी भवतं मे स्योने ते नो मुञ्चतमंहसः ॥ ४ ॥
ये उस्रिया बिभृथो ये वनस्पतीन्ययोर्वां विश्वा भुवनान्यन्तः ।
द्यावापृथिवी भवतं मे स्योने ते नो मुञ्चतमंहसः ॥ ५ ॥
ये कीलालेन तर्पयथो ये घृतेन याभ्यामृते न किं चन शक्नुवन्ति ।
द्यावापृथिवी भवतं मे स्योने ते नो मुञ्चतमंहसः ॥ ६ ॥
यन्मेदमभिशोचति येनयेन वा कृतं पौरुषेयान्न दैवात् ।
स्तौमि द्यावापृथिवी नाथितो जोहवीमि ते नो मुञ्चतमंहसः ॥ ७ ॥

अर्थ— तुम्ही दोघी (प्रवृद्धे सुभगेः उरूची देवी) फार विशाल, उत्तम ऐश्वर्यानें युक्त विस्तृत देवी (वसूनां प्रतिष्ठे हि अभवतं) निवास करणाऱ्यास आश्रय देणाऱ्या आहांत. या (द्यावा पृथिवी मे स्योने भवतं) द्यावापृथिवी मला सुखदायी होवोत, आणि (ते नः अंहसः मुञ्चतं) त्या दोघी आम्हां सर्वांस सर्व पापांपासून मुक्त करोत. (२)

(अहं) मीं (सुतपसौ असन्तापे) उत्तम तेजस्वी परंतु संताप न देणाऱ्या (कविभिः नमस्ये उर्वी गंभीरे) कवींनीं नमन करण्यास योग्य पुष्कळच लांब रुंद आणि पुष्कळ गंभीर-खोल-अशा द्यावापृथिवींची (हुवे) मीं प्रार्थना करतों कीं (द्यावा०) त्या दोघी मला सुखदायी होवोत आणि आम्हां सर्वांस पापापासून दूर ठेवोत. (३)

(ये अमृतं ये हवींषि बिभृथः) तुम्ही दोघी अमृतरूपी जल धारण करिता (ये स्रोत्याः ये मनुष्यान् बिभृथः) नदी वगैरे प्रवाहांस आणि मनुष्यांस तुम्हीं धारण करतां, अशा तुम्ही दोघी (द्यावा०) द्यावापृथिवी मला शुभदायी व्हा आणि आम्हां सर्वांस सर्व पापांपासून वांचवा. (४)

(ये उस्त्रियाः ये वनस्पतीन् बिभृथः) तुम्हीं दोघी गायी आणि वनस्पतींस धारण करितां, आणि त्यांचे पोषण करितां. (ययोः वां अन्तः विश्वा भुवनानि) तुम्हां दोघींमध्यें जीं सर्व भुवनें आहेत, त्या तुम्ही दोघी (द्यावा०) द्यावापृथिवी मला सुखकारक व्हा आणि आम्हां सर्वांस पापांपासून मुक्त करा. (५)

(ये कीलालेन ये घृतेन तर्पयथः) तुम्हीं दोघी अन्न आणि पेयानें सर्वांना तृप्त करतां, (याभ्यां ऋते किंचन न शक्नुवन्ति) तुम्हां दोघींशिवाय कोणी कांहीं करूं शकत नाहीं. अशा तुम्ही दोघी (द्यावा०) द्यावापृथिवी मला शुभकारक व्हा आणि आम्हां सर्वांचे पापापासून रक्षण करा. (६)

(येन येन वा पौरुषेण कृतं) जे कांहीं कोणी पुरुष प्रयत्नानें केलें आहे, तें (न दैवात्) दैवाच्या प्रेरणेनें केलेलें नाहीं. (यत् इदं मे अभिशोचति) जें हें मला शोकांत बुडवितें त्या कष्टांतून मुक्त होण्यासाठीं (द्यावापृथिवी स्तौमि) द्यावा पृथिवीची स्तुति करतों, आणि (नाथितः जोहवीमि) मीं त्यामुळें सनाथ होऊन उद्घोषितो कीं (ते नः अंहसः मुञ्चन्तु) त्या दोघीं आम्हा सर्वांस सर्व पापांपासून मुक्त करोत. (७)

पापमोचन

द्यावापृथिवी

हें सूक्त मृगार ऋषिप्रणीत सूक्तांत पापमोचन विषयक ४ थें सूक्त आहे. आणि त्यांत पृथ्वी आणि द्युलोकांच्या योगानें मुक्त होण्याची आकांक्षा प्रदर्शित केली आहे. आपण जेथें (ज्यावर) रहातो तो पृथ्वीलोक आणि ताऱ्यांनीं युक्त आकाश तो द्युलोक म्हणजे सर्व ब्रह्मांड त्यां दोघांमध्यें सामावलें आहे. कोणतीहि वस्तु त्यांच्या बाहेर नाहीं. ज्या कांहीं शक्ति या विश्वांत अस्तित्वांत आहेत त्या सर्व या अंतराळांत आल्याच. या सर्व शक्तींच्या सहाय्यानें आपण आपली सुधारणा करून पापमुक्त व्हावयाचें आहे,

या द्यावापृथिवी देवता (**अमिता योजना**) मं. १ अगणित योजनें विस्तृत आहेत. त्या किती विस्तृत आहेत त्यांचें माप काढतां येणार नाहीं. अजून आकाशाचा संपूर्ण विस्तार मानवाच्या कक्षेंत आलेला नाहीं, आणि मोजला-मापलाहि गेला नाहीं. थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं (**प्रवृद्धे ऊरुची** मं. २); (**ऊर्वी गभीरे** मं. ३) फार विस्तृत आणि फार गंभीर (खोल) आहे म्हणजे माप समजणें महान् गहन आहे. आणि त्यांच्या गहनतेचा अंत कोणी लावूं शकत नाहीं, शकलें नाहीं.

या दोघी पदार्थमात्रास (**प्रतिष्ठे**) आधारभूत आहेत. त्यांच्या शक्तींचा विचार केला असतां (**स-चेतसौ**) मनांत एक प्रकारची स्फूर्ति निर्माण होते. त्यामुळें (**कविभिः तपस्ये**) कवि त्यांच्याविषयीं फार आदरभाव बाळगतात. त्यांच्यांत सूर्यादि तेजस्वी गोल, (**सु-तपसौ**) उत्तम प्रकारें प्रकाशित होत आहेत, तरीसुद्धां कोणास (**अ-सन्तापे**) ताप देत नाहींत उलट संतप्त हृदयाला त्या दृष्टिक्षेपानें शांत करतात. त्यांतील दुःख दूर करतात, आणि तेथें शांतीचें अधिराज्य स्थापन करतात.

हे दोन्ही लोक (**सु-भोजसौ**) उत्तम भोग (भोजन) देतात. (**कोलालेन तर्पयतः**) अन्नानें संतुष्ट करतात आणि जेव्हां तहान लागते तेव्हां (**घृतेन**) पाण्यानें शांति देतात. कारण त्यांच्यांत (**अमृतं हवींषि बिभ्रतः**) पाणी आणि अन्न राहिलें आहे. त्यांच्यामध्यें (**ऊस्रियाः**) गायी आहेत. त्या उत्तम दूध देतात, उत्तम रस देणाऱ्या वनस्पति आहेत. त्यामुळेंच या दोघींमुळें (या दोन लोकांमुळें) सर्वांचें पालनपोषण उत्तम प्रकारें होतें. मनुष्यांस ज्यावेळीं शोक होतो, त्यावेळीं पृथ्वीवरील आणि आकाशांतील उत्तम दृश्यें त्यानें पहावींत म्हणजे त्यास दिव्यत्वाचा अनुभव येतो. आणि त्यामुळें त्याचा शोक पूर्णपणें दूर होतो. द्युलोक पिता आणि पृथ्वी माता आहे. जणूं काय हे दोघे मिळून एक कुटुंबविस्तारच आहे. पहा ते दोघेहि आपल्या सर्व शक्तीनें परोपकार करीत आहेत. ते स्वतःच्या तेजानें आम्हांस मार्ग दाखवितात. अन्नानें आमची तृप्ति होते. जलानें आमची शांति वाढते, आणि दुसऱ्या अनेक प्रकारें आम्हांस सहाय्य करतात. याप्रमाणें आपणसुद्धां आपल्या शक्तींचा विनियोग परोपकारासाठीं करावयास हवा. आपण आपलें अंतःकरण त्यांच्यासारखेंच उदार आणि विस्तृत केलें पाहिजे. आपलें जीवन जनतेच्या कल्याणासाठीं खर्चीं घातलें पाहिजे. आणि सर्व जग एक विस्तृत कुटुंब आहे असें समजून सर्वांशी त्यांच्याप्रमाणें समान व्यवहार करण्यास शिकलें पाहिजे. हा आहे पापांतून मुक्त होण्याचा मार्ग. वाचकांनीं तो अनुसरून पापांपासून मुक्त व्हावें.

पापमोचन

कांड ४, सूक्त २३

(ऋषिः- मृगारः । देवता - प्रचेताग्निः)

अग्नेर्मन्वे प्रथमस्य प्रचेतसः पाञ्चजन्यस्य बहुधा यमिन्धते ।
विशोविशः प्रविशिवांसमीमहे स नो मुञ्चत्वंहसः ॥ १ ॥

अर्थ— (**यं बहुधा इन्धते**) ज्याला पुष्कळ प्रकारें प्रकाशित करतो, त्या (**पाञ्च-जन्यस्य प्रचेतसः प्रथमस्य अग्नेः**) पांच प्रकारच्या लोकांत रहाणाऱ्या विशेष ज्ञानी आणि सर्वांत प्रथम असणाऱ्या प्रकाशक देवतेचें (**मन्वे**) मीं मनन करतों. (**विशः विशः प्रविशिवांसम् ईमहे**) प्रत्येक प्रजाजनांत प्रविष्ट झालेल्यास आम्हीं प्राप्त करतों. (**सः नः अंहसः मुञ्चतु**) तो आम्हांस पापापासून मुक्त करो. (१)

यथा हव्यं वहसि जातवेदो यथा यज्ञं कल्पयसि प्रजानन् ।
एवा देवेभ्यः सुमतिं न आ वह स नो मुञ्चत्वंहसः ॥ २ ॥
यामन्यामन्नुपयुक्तं वहिष्ठं कर्मन्कर्मन्नाभगम् ।
अग्निमीडे रक्षोहणं यज्ञवृधं घृताहुतं स नो मुञ्चत्वंहसः ॥ ३ ॥
सुजातं जातवेदसमग्निं वैश्वानरं विभुम् । हव्यवाहं हवामहे स नो मुञ्चत्वंहसः ॥ ४ ॥
येन ऋषयो बलमद्योतयन्युजा येनासुराणामयुवन्त मायाः ।
येनाग्निना पणीनिन्द्रो जिगाय स नो मुञ्चत्वंहसः ॥ ५ ॥

अर्थ-- हे (जातवेदः) उत्पन्न झालेल्या पदार्थमात्रांस जाणणाऱ्या ! (यथा हव्यम् वहसि) ज्याप्रमाणें तूं हवीस पोहोंचवितोस आणि (प्रजानन् यथा यज्ञं कल्पयसि) जाणून तूं ज्याप्रमाणें यज्ञास बनवितोस, (एव देवेभ्यः सुमतिं नः आ वह) त्याचप्रमाणें देवांजवळून उत्तम बुद्धि आम्हांस आणून दे आणि (सः नः अंहसः मुञ्चतु) तो आम्हांस पापापासून मुक्त करो. (२)

(यामन् यामन् उपयुक्तं) प्रत्येक प्रसंगीं उपयुक्त, (कर्मन् कर्मन् आभगं) प्रत्येक कर्मांत भजनीय आणि (वहिष्ठं) अत्यंत बलवान् (अग्निं ईडे) सर्वप्रकाशक देवाची मीं स्तुति करतों. (रक्षोहणं यज्ञ-वृधं घृता-हुतं) राक्षसांचा नाशक, यज्ञांस वाढविणारा, यज्ञांत तुपाच्या आहुति ज्याच्यासाठीं दिल्या जातात, (सः नः अंहसः मुञ्चतु) तो आम्हांस पापापासून मुक्त करो. (३)

(सुजातं जातवेदसं) उत्तम, प्रसिद्ध, उत्पन्न झालेल्या सर्वांस जाणणाऱ्या (विभुं वैश्वानरं) सर्वव्यापक, विश्वाचा नेता आणि (हव्यवाहं हवामहे) अन्न नेणाऱ्या प्रभूस आम्हीं प्रार्थितों कीं, (सः नः अंहस मुञ्चतु) तो आम्हांस पापांपासून मुक्त करो. (४)

(येन युजा ऋषयः बलं अद्योतयन्) ज्याच्या सहाय्यानें ऋषिमुनि बळास प्रकाशित करीत आले आहेत. (येन असुराणां मायाः अयुवन्त) ज्याच्या सहाय्यानें राक्षसांच्या कपटयुक्तींना दूर करून (येन अग्निना इन्द्रः पणीन् जिगाय) ज्या तेजस्वी देवतेच्या सहाय्यानें इन्द्रानें असुर व्यवहार करणाऱ्यांस जिंकलें, (सः नः अंहसः मुञ्चतु) तो आम्हांस पापापासून मुक्त करो. (५)

भावार्थ— पांच प्रकारच्या मनुष्यांत जो चेतना प्रगटवितो, आणि विविध प्रकारें जो प्रगट होतो, तो प्रत्येकाच्या हृदयांत राहून प्रकाश देणारा परमात्मा आम्हीं प्राप्त करतों, तो आम्हांस पापापासून वाचवो. (१)

ज्याप्रमाणें हवनांत टाकलेल्या हविर्द्रव्यांना अग्नि देवांजवळ पोहोंचवितो, त्याचप्रमाणें हा महान् देव दिव्य भावयुक्तांच्या जवळ असणारी सुमति आम्हांत स्थिर करो, आणि तो आम्हांस पापापासून वांचवो. (२)

प्रत्येक प्रसंगीं सहाय्य देणारा, हरेक कर्मांत सेवा करण्यास योग्य, बलवान् प्रकाशक, दुष्टांस दूर करणारा, यज्ञाची वृद्धि करणारा, आणि ज्याच्यासाठीं यज्ञांत आहुति देण्यांत येतात तो ईश्वर आम्हांस पापापासून मुक्त करो. (३)

उत्तम, प्रसिद्ध, सर्वज्ञ, सर्वव्यापक, सर्वांस चालविणारा, हविष्यान्न पोचवणारा जो एक ईश्वर आहे त्याची आम्हीं प्रार्थना करतों कीं आम्हांस तो पापापासून मुक्त करो. (४)

ऋषि-मुनि ज्याच्यापासून बळ प्राप्त करतात, तसेंच ज्याच्या आधारानें कुटिल व्यवहार करणारे जे आहेत त्यांचा पराजय करण्यांत येतो, तो ईश्वर आम्हांस पापापासून मुक्त करो. (५)

येन॑ दे॒वा अ॒मृत॑म॒न्ववि॑न्द॒न्येनौष॑धी॒र्मधु॑मती॒रकृ॑ण्वन् ।
येन॑ दे॒वाः स्व॑१॒राभ॑र॒न्त्स नो॑ मुञ्च॒त्वंह॑सः ॥ ६ ॥
यस्ये॒दं प्र॒दिशि॒ यद्वि॒रोच॑ते॒ यज्जा॒तं ज॑नित॒व्यं॑१ च॒ केव॑लम् ।
स्तौम्य॒ग्निं ना॑थि॒तो जो॑हवीमि॒ स नो॑ मुञ्च॒त्वंह॑सः ॥ ७ ॥

अर्थ— (येन देवाः अमृतं अन्वविन्दन्) ज्याच्या सहाय्यानें देवांनीं अमृत प्राप्त केलें, (येन औषधीः मधुमतीः अकृण्वन्) ज्याच्या योगें औषधी मधुर रसयुक्त केल्या गेल्या, (येन देवाः स्वः आभरन्त) ज्याच्या आश्रयानें देवता आत्मिक बळ प्राप्त करतात, (सः नः अंहसः मुञ्चतु) तो आम्हांस पापापासून मुक्त करो. (६)

(यस्य प्रदिशि इदं केवलं) दुसऱ्या कोणाच्या सहाय्याच्या अपेक्षेशिवाय हें विश्व ज्याच्या शासनांत राहिलें आहे, (यत् विरोचते) जो प्रकाशित होत आहे, (यत् जातं जनितव्यं च केवलं) जो प्रथम उत्पन्न झालेलें आणि भविष्यकाळींहि उत्पन्न होणार तें आहे, (नाथितः अग्निं स्तौमि जोहवीमि) सनाथ होऊन मीं त्या तेजस्वी देवाची स्तुति करतो आणि स्मरतों कीं (सः नः अंहसः मुञ्चतु) तो आम्हांस पापापासून मुक्त करो. (७)

भावार्थ- ज्याच्या सहाय्यानें देवतांनीं अमरत्व प्राप्त करून घेतलें, ज्यानें औषधि मधुररसयुक्त केल्या आहेत, ज्यानें देवतांमध्यें आत्मिक बळ भरलें आहे तो देव आम्हांस पापापासून मुक्त करो. (६)

भूत, भविष्य आणि वर्तमानकाळीं प्रकाशित होणारें हें समग्र विश्व ज्याच्या शासनांत रहातें, त्याची स्तुति, प्रार्थना आणि उपासना करून मीं याचना करतों कीं तो परमेश्वर आम्हांस पापापासून मुक्त करो. (७)

पापमोचन

पापापासून मुक्ति

मनुष्याच्या ठिकाणीं जी पापवासना वास्तव्य करते ती त्याच्या उन्नतीच्या मार्गांत अडथळा करते. म्हणून या पापवासनेपासून दूर रहाण्याचा उपाय प्रत्येकानें केला पाहिजे. येथें २३ ते २९ सूक्तें सर्व याच उद्देश्याचीं आलीं आहेत. या सातहि सूक्तांचा ऋषि ' मृगार ' आहे. या ऋषीच्या नांवाचा अर्थ, ' आत्मशुद्धि करणारा असा होतो. या २३ व्या सूक्तांत अग्नि नांवानें संबोधिलेल्या देवाच्या सहाय्यानें पापमुक्त होण्याचा उपदेश आहे. या पृथ्वीवर प्रथम नजरेस पडणारी शक्ति ' अग्नि ' आहे. अग्नीमध्यें प्रकाश आणि इतर जे गुण विद्यमान् आहेत, ते ज्या परमेश्वरानें अग्नींत निर्माण केले तोच खरा अग्नीचाहि अग्नि आहे. या दृष्टीनेंच येथें अग्नि पदाचा उपयोग केला आहे. जो देव सर्व प्रथम आहे म्हणजे ज्याच्या पूर्वी दुसरा कोणी देव झाला नाहीं, जो ज्ञानी आहे, जो पंचजनांच्या हृदयांत वास करतो, ज्यानें प्रत्येकाच्या अंतःकरणांत प्रवेश केला आहे, जो यज्ञास वाढवतो, प्रत्येक प्रसंगीं ज्याच्या सहाय्यानें आम्हांस स्थिरत्व प्राप्त होतें, जो दुष्टांस दूर करतो, आणि यज्ञाच्या योगानें जो सज्जनांची संघटना करतो. तो दुष्टांची शक्ति कमी करून सज्जनाचें रक्षण करतो. असा तो सर्वत्र प्रसिद्ध आहे. सर्वत्र व्यापक असल्यानेंच तो सर्व जगताचा सूत्रधार चालक आहे. ज्याला जसें अन्न पाहिजे तसें त्याच्यासाठीं उत्पन्न करतो. ज्याच्यापासून ज्ञानी लोक शक्ति संपादन करतात, क्षात्रिय वीर ज्याच्यामुळें शत्रूवर विजय मिळवितात. त्याच्या व्यवस्थेनें दुष्ट व्यवहार करणाऱ्यांचा नेहमीं पराभव होतो. तो सर्वांस अमरत्व देतो, त्यानें औषधींत विविध अमृतरस निर्माण केले आहेत. त्याच्यापासून आत्मिक बळ प्राप्त होतें आणि त्याचें शासन भूत, भविष्य, वर्तमान जगतावर अबाधित चालत आहे, म्हणजे ज्याच्या सत्तेला कोणींच अडथळा करूं शकत नाहीं असा एकच ईश्वर या जगाचा शासक आहे. त्याची उपासना आम्हीं करतों, तो आम्हांस निश्चयपूर्वक पापांपासून वांचवो. त्याच्या गुणांचें मनन केल्यानें आणि ते गुण आपणांत धारण करण्याचा प्रयत्न केल्यानें ज्या शुभ भावना मनांत स्थिर होतात त्यांमुळें पापप्रवृत्ति दूर होते. म्हणून परमेश्वराची प्रार्थना अंतः

शुद्धि करते असें म्हणतात तें सत्य आहे.

ही अग्नीची विभूति मनुष्यामध्यें वाणीचें रूप धारण करते. 'अग्निर्वाग्भूत्वा मुखं प्राविशत्' असें ऐतरेय उपनिषदांत म्हटलें आहे. म्हणून वाणीनें पाप न करण्याचा निश्चय करावा. विचार उच्चार आणि आचार असा क्रम आहे. मनानें प्रथम विचार होतो नंतर वाणीनें उच्चार आणि मग शरीर कर्म करतें. यावरून स्पष्ट होतें की विचारानंतर उच्चाराचें पाप होतें. वाचक जीवनांत आपल्या चारहि बाजूंस पाहील तर त्याच्या ध्यानीं येईल की वाणीचा उपयोग बरोबर न झाल्यामुळें जगांत भांडण, तंटे, लढाया युद्धें आणि पापें होत असतात. ही गोष्ट तर सुप्रसिद्धच आहे की वाणीचा चांगला उपयोग केल्यानें प्रचंड अनर्थ टाळतां येतात. म्हणून ज्यांनां पापांपासून मुक्त व्हावयाचें आहे, दूर रहावयाचें आहे त्यांनीं स्वतःची वाणी प्रथम शुद्ध ठेवावी. आणि पापांपासून मुक्त व्हावें.

पापाची निवृत्ति

कांड ३, सूक्त ३१

(ऋषिः– ब्रह्मा । देवता – पाप्महा)

वि देवा जरसावृतन्वि त्वमग्ने अरात्या । व्य१हं सर्वेण पाप्मना वि यक्ष्मेण समायुषा ॥ १ ॥
व्यार्त्या पवमानो वि शक्रः पापकृत्यया । व्य१हं सर्वेण पाप्मना वि यक्ष्मेण समायुषा ॥ २ ॥
वि ग्राम्याः पशव आरण्यैर्व्यापस्तृष्णयासरन् । व्य१हं सर्वेण पाप्मना वि यक्ष्मेण समायुषा ॥३॥
वी३मे द्यावापृथिवी इतो वि पन्थानो दिशंदिशम्॥ व्य१हं सर्वेण पाप्मना वि यक्ष्मेण समायुषा ॥४॥

अर्थ— (देवाः जरसा वि अवृतन्) देव वृद्धावस्थेपासून दूर रहातात, (अग्ने ! त्वं अरात्या वि) हे अग्ने ! तूं कंजूषपणापासून आणि शत्रूपासून दूर रहा. (अहं सर्वेण पाप्मना वि) मीं सर्व पापापासून दूर राहीन. (तथा यक्ष्मेण वि) तसेंच रोगांपासूनहि दूर राहीन आणि (आयुषा सं) दीर्घ आयुष्यानें संपन्न होईन. (१)

(पवमानः आर्त्या वि) शुद्धता करणारा पुरुष पीडेपासून दूर राहतो, (शक्रः पापकृत्यया वि) समर्थ मनुष्य पापकर्मांपासून दूर रहातो. त्याचप्रमाणें सर्व पापकृत्यें आणि सर्व रोगांपासून मीं दूर राहीन आणि दीर्घायुष्यसंपन्न होईन.(१)

ज्याप्रमाणें (ग्राम्याः पशवः आरण्यैः वि) ग्रामपशु जंगली पशूंपासून दूर रहातात, (आपः तृष्णया वि असरन्) पाणी तृषेपासून दूर रहातें, त्याप्रकारें मीं सर्व पापांपासून दूर राहीन आणि दीर्घायु होईन. (३)

ज्याप्रकारें (इमे द्यावापृथिवी वि इतः) हे द्युलोक आणि पृथ्वी एकमेकांपासून दूर आहेत, (पन्थानः दिशं दिशं वि) आणि हे सर्व मार्ग प्रत्येक दिशेस वेगवेगळे होऊन जात आहेत, त्याप्रकारें मीं सर्व पापांपासून दूर राहीन आणि दीर्घायु होईन. (४)

भावार्थ— देव वृद्धावस्थेस दूर करून सदा तरुण रहातात, अग्निदेव दान न करणाऱ्यांस दूर करून दानें देणाऱ्यांस आश्रय देतो. त्याप्रकारें मीं सर्व पापांस आणि रोगांस दूर करून पुरुषार्थानें दीर्घजीवन प्राप्त करून घेईन. (१)

स्वतः शुद्ध रहाणारा मनुष्य रोगादि पीडांपासून दूर असतो आणि पुरुषार्थी समर्थ मनुष्य पापांपासून दूर रहातो त्याप्रमाणें मी पापकृत्यें आणि रोग यांपासून दूर राहून दीर्घायुत्व मिळवीन. (२)

ज्याप्रमाणें गायी इत्यादि पाळीव जनावरें सिंहादि जंगली पशूंपासून दूर रहातात, आणि ज्याप्रमाणें तहान पाण्याजवळ येत नाहीं त्याप्रमाणें पापकृत्यें आणि रोग यांपासून मीं दूर राहीन आणि दीर्घायु प्राप्त करीन. (३)

ज्याप्रमाणें आकाश भूमीपासून दूर आहे आणि प्रत्येक दिशेला जाणारा मार्ग दुसऱ्यापासून भिन्न आहे, त्याप्रमाणें मी पापकृत्यें आणि रोग यांपासून दूर राहीन आणि दीर्घायु होईन. (४)

त्वष्टा दुहित्रे वहतुं युनक्तीतीदं विश्वं भुवनं वि याति। व्य१हं सर्वेण पाप्मना वि यक्ष्मेण समायुषा ॥५॥
अग्निः प्राणान्त्सं दधाति चन्द्रः प्राणेन संहितः। व्य१हं सर्वेण पाप्मना वि यक्ष्मेण समायुषा ॥६॥
प्राणेन विश्वतोवीर्यं देवाः सूर्यं समैरयन्। व्य१हं सर्वेण पाप्मना वि यक्ष्मेण समायुषा ॥ ७ ॥
आयुष्मतामायुष्कृतां प्राणेन जीव मा मृथाः। व्य१हं सर्वेण पाप्मना वि यक्ष्मेण समायुषा ॥ ८ ॥
प्राणेन प्राणतां प्राणेहैव भव मा मृथाः। व्य१हं सर्वेण पाप्मना वि यक्ष्मेण समायुषा ॥ ९ ॥
उदायुषा समायुषोदोषधीनां रसेन। व्य१हं सर्वेण पाप्मना वि यक्ष्मेण समायुषा ॥ १० ॥
आ पर्जन्यस्य वृष्ट्योदस्थामामृता वयम्। व्य१हं सर्वेण पाप्मना वि यक्ष्मेण समायुषा ॥ ११ ॥

अर्थ— ज्याप्रमाणें (त्वष्टा दुहित्रे वहतुं युनक्ति) पिता आपल्या कन्येस हुंडा -स्त्री-धन-देण्यासाठीं निराळें करतो, आणि जसें (इदं विश्वं भुवनं वि याति) ग्रह नक्षत्रादि गोल आपापल्या गतीनें जात असूनही ते वेगवेगळे राहतात त्याप्रमाणें मीं पापांपासून आणि रोगांपासून मुक्त होऊन दीर्घायु व्हावें. (५)

ज्याप्रमाणें (अग्निः प्राणान् सन्दधाति) जठरस्थ अग्नि प्राणांस धारण करतो आणि (चन्द्रः प्राणेन संहितः) चंद्रमा-मन-प्राणांसह रहातो त्याप्रमाणें मीं सर्व पाप आणि रोगांपासून मुक्त होऊन दीर्घायु व्हावें. (६)

ज्याप्रमाणें (देवाः विश्वतो- वीर्यं सूर्यं) देव सर्व सामर्थ्यानें युक्त सूर्यास (प्राणेन समैरयन्) आपल्या प्राणाशीं संयुक्त करतात, त्याचप्रमाणें मीं पापांपासून आणि रोगांपासून मुक्त होऊन दीर्घायु व्हावें. (७)

(आयुष्मतां आयुष्कृतां प्राणेन जीव) दीर्घायु आणि आयुष्य वृद्धीस नेणारे जे असतात त्यांच्या प्राणशक्तीनें तूं जिवंत रहा. (मा मृथाः) मरूं नकोस त्याप्रमाणें मी सुद्धां पाप आणि रोगांपासून मुक्त होऊन दीर्घायु व्हावें. (८)

(प्राणतां प्राणेन प्राण) जिवंत रहाणाऱ्यांच्या प्राणशक्तीनें तूं जिवंत रहा. (इह एव भव) येथेंच प्रभावशाली हो (मा मृथाः) मरूं नकोस. मीसुद्धां त्याचप्रमाण पाप आणि रोगांपासून मुक्त होऊन दीर्घ जीवन जगेन. (९)

(आयुषा उत्) जीवनापासून उत्कर्ष प्राप्त कर, आणि त्यामुळें (आयुषा सं) दीर्घायु हो. (ओषधीनां रसेन उत्) औषधींचा रस पिऊन निरोगी, पुष्ट आणि बलवान् हो, मीं सुद्धां त्याप्रमाणें पाप आणि रोगांपासून मुक्त होऊन दीर्घायु व्हावें. (१०)

(वयं पर्जन्यस्य वृष्ट्या) आम्हीं पर्जन्याच्या वृष्टीनें (आ उत् अस्थाम) उन्नति प्राप्त करूं आणि (अमृताः) अमर होऊन जाऊं, त्यासाठीं मीं सर्व पापांपासून आणि रोगांपासून मुक्त होऊन दीर्घायु व्हावें. (११)

भावार्थ— कन्येचा पिता ज्याप्रमाणें तिच्या विवाहाच्या वेळीं जांवयास देण्यासाठीं (हुंडा म्हणून) धन वेगळें काढून ठेवतो आणि ज्या प्रकारें ग्रहनक्षत्रादि आपापल्या गतीनें चालतात पण तीं परस्परांपासून वेगळीं असतात त्या प्रकारें मीं पापांपासून आणि रोगांपासून वेगळें होऊन दीर्घायु प्राप्त करीन. (५)

ज्याप्रमाणें शरीरांतील जठराग्नि अन्नादिकांचे पचन करतो, आणि प्राणांस बलवान् करतो, तसेंच मन आपल्या शक्तीनें प्राणासह राहून शरीरास चालवितें, त्याप्रकारें मीं पापांना आणि रोगांना दूर करून दीर्घायु व्हावें. (६)

ज्याप्रमाणें सर्वांस बल देणाऱ्या सूर्याला अन्य सर्व देव प्राणशक्ति देऊन बलवान् करतात त्याप्रमाणें मीं सर्व पापकृत्यें आणि रोग यांस दूर करून दीर्घायु व्हावें. (७)

स्वाभाविक दीर्घायूंची जशी प्राणशक्ति असते आणि अनेक साधनांनीं स्वतःचें जीवन दीर्घ करणाऱ्यांची ज्याप्रमाणें प्राणशक्ति असते त्याप्रमाणें आपली प्राणशक्ति सबळ करावी आणि मनुष्यानें जीवन व्यतीत करावें, शीघ्र मरूं नये. त्याप्रमाणें मीं पाप आणि रोग यांस दूर करून दीर्घायु व्हावें. (८)

प्राण धारण करणाऱ्या लोकांत जी प्राणशक्ति असते ती वाढवून तूं येथें जीवन व्यतीत कर, अल्पायु होऊन मरूं नकोस. मीं सुद्धा पापें आणि रोग यांपासून मुक्त होऊन दीर्घजीवन जगेन. (९)

आपल्या जीवनांत उत्कर्षाचें साधन निर्माण कर आणि त्यापेक्षांही दीर्घायू हो. औषधींचा रस पिऊन निरोगी, पुष्ट आणि बलवान् हो. याप्रकारें मीं पापी कृत्यें आणि रोग यांपासून मुक्त होऊन दीर्घायू व्हावें.

पर्जन्य वृष्टीनें ज्याप्रमाणें झाडें वाढतात, त्याप्रकारें आम्हीं उन्नति प्राप्त करूं आणि अमरत्व सुद्धां प्राप्त करूं. मीं सुद्धां पापें आणि रोग यांस दूर करून दीर्घायू होईन. (११)

पापनिवृत्तीनें आरोग्य आणि दीर्घायुत्व

या सूक्तांत पापें दूर केल्यानें आरोग्य आणि दीर्घायुत्व प्राप्त होतें आणि त्याचें अनुष्ठान कसें करावें त्याचा उपायहि सांगितला आहे.

पाप आणि पुण्य

पाप आणि पुण्य म्हणजे काय त्याचा येथें विचार करणें आवश्यक आहे. पाप आणि पुण्य या धर्मशास्त्रांतील संज्ञा आहेत. आणि धर्मशास्त्र इतर सर्व शास्त्रांचें साररूप शास्त्र आहे. म्हणजे धर्मशास्त्र इतर शास्त्रांपासून वेगळें नाहीं. इतर शास्त्रें एकाच विषयाचें ज्ञान देतात. परंतु धर्मशास्त्र सर्व शास्त्रांचा अर्क काढून मानवी उन्नतीचे सिद्धांत तयार करीत असल्यानें धर्मशास्त्राचे विधिनिषेध सर्व सामान्य असतात. आणि इतर शास्त्रांचे विधिनिषेध त्या शास्त्रविषयांशीं संबंधित असतात. त्यामुळें ते विशेष असतात.

पापपुण्याचा विषय अशा प्रकारचा आहे. पुण्य शब्दाचा अर्थ आहे ' पवित्र होणें, ' आणि पापाचा अर्थ आहे ' पतनाचा हेतु ' इतर शास्त्रांत ज्या गोष्टीमुळें हानि होते असें सांगितलेलें असतें त्या सर्व गोष्टी धर्मशास्त्रांत पाप या सदरांत मोडतात. आणि ज्या गोष्टी उन्नतीस पोहोंचविणाऱ्या आहेत त्यांना धर्मशास्त्रांत पुण्यकारक म्हटलें आहे. ही गोष्ट स्पष्टपणें समजण्यास एकदोन उदाहरणें घेऊन हा विषय विशद करूं—

वैद्यकशास्त्र	धर्मशास्त्र
१. मद्य प्राशनानें यकृत आणि पोट बिघडतें, रक्त कमी झाल्यानें अशक्तता येते, या कारणानें अनेक रोग होतात इ.	१. मद्य पिणें पाप आहे.
२. व्यभिचारानें वीर्यनाश होतो, मेंदूची शक्ति कमी होते आणि त्यापासून दुसरे अनेक रोग उद्भवतात.	२. व्यभिचार हें पाप आहे.
आरोग्यशास्त्र	
३. स्नान करण्यानें स्वच्छता होते. घरांत तसेंच घराबाहेर स्वच्छता असली म्हणजे रोग होत नाहींत आणि आरोग्य वाढतें इ.	३. स्नान करणें पुण्यकारक आहे; स्वच्छता राखणें पुण्यकारक आहे.
४. पाणी गाळून घेण्यानें त्यांतील रोगजंतू अथवा इतर रोगबीजें नष्ट होतात. आणि म्हणून याच कारणानें पाणी उकळून गाळून पिणें आरोग्यकारक आहे.	४. पाणी गाळून उकळून पिणें पुण्यकारक आहे.
समाजशास्त्र	
५. सत्य बोलण्यानें मनुष्याचे व्यवहार चांगले चालतात इ.	५. सत्य बोलणें पुण्य आहे, असत्य बोलणें पाप आहे.
राज्यशासनशास्त्र	
६. चोरी, खून इत्यादि केल्यानें राज्यशासनाच्या नियमानुसार नियुक्त दंड होतो.	६. चोरी, खून, करणें पाप आहे.

याप्रकारें सर्व शास्त्रांच्या विषयीं वाचकांनीं समजावें. इतरशास्त्रांत प्रत्येक कृत्याचे भले-वाईट परिणाम कारणांसह सांगितलें असतात. परंतु त्या सर्वांचें समीकरण करून धर्मशास्त्रांत ' पाप आणि पुण्य ' या दोन शब्दांच्या योगें तेच भाव, पण कारणें किंवा परिणाम न देतां, सांगितलेले असतात. यामुळें धर्मशास्त्रांतील पाप आणि पुण्य कशाप्रकारें शास्त्रावर आधारित आहे तें वाचकास कळूं शकेल. तीं सर्व पापेंच रोग आणि अल्पायुष्याचीं कारणें आहेत. आणि पुण्य कर्म केल्यानें आरोग्य आणि दीर्घायुत्व मिळतें. हीच गोष्ट मुख्यत्वें या सूक्तांत सांगितली आहे. या सूक्तांतील प्रत्येक मंत्राचा उत्तरार्ध असा आहे—

व्यहं सर्वेण पाप्मना, वि यक्ष्मेण, समायुषा ॥

' मीं सर्व पापें आणि रोग यांपासून दूर होऊन दीर्घायु होईन ' या मंत्राचा अर्थापत्तीनें भाव असा कीं, ' मी पुण्य कर्म करीत असल्यानें आरोग्यसंपन्न होऊन दीर्घायु होतों, ' म्हणजे दीर्घायु प्राप्तीचा मूळ उपाय पापांपासून दूर होणें, पापांस आपणांपासून दूर सारणें आणि पुण्य कर्में करणें. त्यामुळें रोग आपोआप दूर होतील, आरोग्य प्राप्त होईल आणि दीर्घजीवन मिळेल. या सूक्तानें हाच संदेश वाचकांना द्यावयाचा आहे. हा अर्धा मंत्र अकरा वेळां सांगून हाच संदेश वाचकांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न या सूक्तांत केला आहे.

पापांस दूर करणें

सर्वांत प्रथम सुरवातीसच सर्व पापांस दूर करण्याचा उपदेश दिला आहे. (**अहं सर्वेण पाप्मना वि** । १-११) सर्व पापें यांचा अर्थ कायिक, वाचिक, मानसिक, सामाजिक आणि राष्ट्रीय, पापें असा आहे. हीं सर्व दूर केलीं पाहिजेत. आपल्या मनांतील पापविचार दूर केले पाहिजेत. वाणी शुद्ध आणि पवित्र ठेविली पाहिजे. शरीरानें कोणतेंहि पापकर्म करतां कामा नये. इंद्रियांस पापांपासून परावृत्त करावें आणि त्यांस असें शिक्षण दिलें पाहिजे कीं पुनः त्यांची प्रवृत्ति पापाकडे कधीं न व्हावी. याचप्रकारें कुटुंब, जाति, समाज, आणि राष्ट्राच्या व्यवहारांत अनेक पापें असतात. त्यांनासुद्धां दूर सारलें पाहिजे. जर कोणी असें म्हणेल कीं जाति अथवा राष्ट्रांतील पापें आम्हीं कशीं दूर करणार ? तर त्यांनीं आपणां स्वतःस तर सुधारावें, पापापासून मोकळें करावें. स्वतःचा निष्पापपणा सिद्ध झाला तर त्याचा योग्य परिणाम कुटुंबावर आणि जातीवर झाल्याशिवाय रहाणार नाहीं. आणि कदाचित् तसा परिणाम नाहीं झाला, तरी स्वतः सुधारल्याचा फायदा त्या व्यक्तीला अवश्य मिळेलच आणि उन्नतीचा मार्ग तितकाच सुकर होईल. जितकें पुण्य कर्म होईल तितकें फळ अवश्य मिळेल, यांत कांहीं शंका नाहीं. प्रत्येक शास्त्राधारें पतनाचीं जीं कारणें सांगितलीं आहेत तीं दूर करावींत आणि अभ्युदयांचीं जीं साधनें सांगितलीं असतील तीं जवळ करावीत. असें करण्यानें पाप आणि रोग दूर होऊन दीर्घायुत्व आपोआप प्राप्त होईल. आतां पापें आणि रोग यांस दूर कसें करावयाचें तें पहा—

देवांचें उदाहरण

देवांचें नांव ' **निर्जराः** ' आहे. त्याचा अर्थ, ' जरा ' वृद्धावस्था, म्हातारपण यांस दूर ठेवणारे ' असा आहे. देवांनीं याप्रकारें अनुष्ठान करून म्हातारपणास दूर सारलें आणि त्यांचें वय कितीहि वाढलें तरी ते तरुणासारखे दिसतात. ' चिरयुवा ' हाच आदर्श मनुष्यांनीं आपल्या समोर ठेवावा, आणि ज्या अनुष्ठानानें देवांना हीं सिद्धि प्राप्त झाली तेंच अनुष्ठान मानवानें आचरावें, म्हणजे मनुष्यास तशीच सिद्धि प्राप्त होईल. हें सांगण्यासाठीं प्रथम मंत्रांत म्हटलें की—

देवाः जरसा वि अवृतन् । (मं. १)

' देवांनीं वृद्धावस्थेस दूर ठेवलें होतें ' आतां पुढें पहा—

अग्नीचा आदर्श

अग्नीसुद्धां (**अग्ने ! त्वं अरात्या वि** । मं. १) कंजुषांना दूर करतो. उदार मनुष्यच– जे आपल्या जवळच्या धनाचा व्यय करून यज्ञ करूं इच्छितात तेच– अग्निहोत्रादि करण्यासाठीं आणि इतरही मोठे यज्ञ करण्यासाठीं अग्नीपाशीं गोळा होतात. परंतु जे कंजुष असतात ते अग्नीपासून दूर जातात. कारण ते आपलें धन अग्निप्रीत्यर्थ खर्चूं इच्छित नाहींत. याचाच अर्थ अग्नि कंजूष मनुष्यास दूर राखतो. तद्वत् पाप आणि रोग यांना दूर करणें मनुष्याला उचित आहे. अग्नि उदार मनुष्यास एकत्रित करून त्यांचा संघ बनवितो, त्यांचा अभ्युदय करून त्यांस उन्नतीस पोंहोचवितो. ज्याप्रमाणें हा अग्नि कंजूष मनुष्यास दूर करतो, त्याचप्रमाणें पाप आणि रोग यांस दूर करून त्यांपासून मुक्त होण्यानें मनुष्य पुण्यात्मा, आरोग्यसंपन्न आणि दीर्घायु होतो. मनुष्यास सुद्धां संघटित होऊन हें साध्य करतां येईल.

जो पापी मनुष्य असतो त्याच्या संगतींत जीं माणसें येतात तीं सुद्धां पापी होतात, म्हणून अशा पापी जनांस समाजाबाहेर घालवून दिलें पाहिजे; तसेंच जो रोगी मनुष्य असतो त्याच्या संसर्गानें अन्य मनुष्यें रोगी होण्याचा संभव असतो म्हणून रोग्यांच्या विषयीं स्वतंत्र व्यवस्था करून त्यांसहि निराळें ठेवलें पाहिजे. म्हणजे रोग जास्त फैलावणार नाहींत, अशा प्रकारच्या युक्तीनें पाप आणि रोग यांस दूर ठेवतां येतें. तसें केल्यानें शेष समाज निष्पाप आणि निरोगी रहाण्याचा संभव असतो आणि अशी व्यवस्था जितकी पूर्णतेनें करतां येईल तितका लाभ जास्त मिळेल.

पवित्रतेचें महत्त्व

दुसऱ्या मंत्रांत पवित्रतेचें आणि शुद्धतेचें महत्त्व वर्णन केलें आहे. पवित्रतेनें पाप आणि रोग दूर होतात...

(१) पवमानः आर्त्या वि ।

(२) शक्रः पापकृत्या वि । (मं. २)

' पवित्रता करणारा (पवित्र होणारा) रोगादि कष्टांपासून मुक्त होतो. आणि (२) मनोबळानें समर्थ मनुष्य पापांपासून दूर राहतो. '

हे दोन्ही मंत्रभाग अर्थपूर्ण आहेत. स्वच्छता, पवित्रता, निर्मलता, करणारे जे असतात, प्रायः रोग त्यांच्याजवळ येत नाहींत; अथवा ते आपल्या शुद्धतेनें रोगांस दूर ठेवतात. शुद्धतेचा अर्थ असा आहे कीं जलादिकांनीं शरीर स्वच्छ करणें, सत्यानें मन पवित्र करणें, विद्या आणि तपानें अन्य शुद्धि करणें, शुद्ध विचार आणि प्रेमपूर्ण आचरण यानें परिवाराची शुद्धता करणें, घराची शुद्धि सडा-संमार्जन, सारवणें, रंग करणें वगैरेंनीं होते. अग्नींत हवन करून हवा शुद्ध होते. गाळून-उकळून पाणी स्वच्छ होतें. मलस्थानें (संडास-गटारें) स्वच्छ करून नगर-शुद्धि होते, याप्रकारें इतर-क्षेत्रेंसुद्धां शुद्ध करण्यानें रोगबीजें नाहींशीं होतात, आणि रोग मनुष्यांस पीडा देत नाहींत.

याचप्रमाणें सत्य, परमेश्वरनिष्ठा, तप, धर्माचरण, इत्यादिच्या योगानें मनाचें बळ वाढल्यानें जें सामर्थ्य मनुष्यांत उत्पन्न होतें तें मनुष्यांस पापांपासून वांचवितें. असा समर्थ मनुष्य पापाचरण करीत नाहीं आणि तो पवित्रात्मा होऊन जनतेस आदर्श होतो. असा मनुष्य स्वतः तर पाप आणि रोग यांपासून दूर रहातोच, परंतु इतरांसहि दूर ठेवतो.

ग्राम, नगर आणि राष्ट्र यांच्या पंचायतींनीं ग्राम, नगर अथवा राष्ट्र यांत वर सांगितल्याप्रमाणें स्वच्छता वाढविली, पवित्रता पसरविली तर त्या त्या क्षेत्रांतील जनता पाप आणि रोगांपासून मुक्त होईल. याप्रकारें द्वितीय मंत्राचें फल प्रत्यक्ष प्राप्त होणारें आहे, यासाठीं त्याचें अनुष्ठान सर्वत्र होणें अगत्याचें आहे.

स्थानत्यागानें बचाव

पापी मनुष्याला आणि रोग्याला स्थान सोडावयास लावणें यास 'स्थानत्यागानें बचाव करणें' असें म्हणतात. त्याचें वर्णन तृतीय आणि चतुर्थ मंत्रांत असें केलें आहे—

ग्राम्याः पशवः आरण्यैः वि। (मं. ३)

इमे द्यावापृथिवी वि इतः। (मं. ४)

'(१) गांवातील गाई वगैरे पशु व्याघ्रादि जंगली पशूंपासून दूर राहून स्वतःचें रक्षण करतात. (२) तसेंच द्युलोक ज्याप्रमाणें पृथ्वीपासून दूर रहातो,' हीं स्थानत्यागानें आत्मरक्षणाचीं उदाहरणें आहेत. वाघ, सिंह, लांडगे हे ज्या स्थानांत रहातात, त्या स्थानाचा त्याग करून गाय वगैरे ग्रामपशु आपलें रक्षण करतात. भूलोकांतील अशुद्धतेपासून रक्षण व्हावें म्हणून आणि आपली प्रकाशमयता स्थिर रहाण्यासाठीं द्युलोक भूलोकापासून दूर रहातो. अशाप्रकारें पापी लोकांपासून दूर रहाण्यानें पापांपासून मुक्त होण्याचा आणि रोगस्थानांपासून दूर जाऊन रोगांपासून रक्षण प्राप्त करण्याचा मार्ग आहे.

स्वाभाविक रक्षण

ज्यांची स्वभावतःच पापांपासून रक्षण करण्याची प्रवृत्ति आहे आणि ज्यांच्यामध्यें स्वाभाविक रोगप्रतिबंधक शक्ति आहे ते पापें आणि रोगांपासून दूर रहातातच. याविषयीं या सूक्ताचें म्हणणें काय आहे पहा—

१. अपः तृष्णया वि असरन्। (मं. ३)

२. पन्थानः दिशं दिशं वि। (मं. ४)

'(१) पाणी आपल्या स्वभावधर्मानें तृष्णेपासून दूर रहातें. (२) विविध दिशांकडे जाणारे मार्ग स्वभावतःच एकमेकांपासून दूर असतात.' पाण्याला स्वभावतःच तहान लागत नाहीं. त्याप्रमाणें जीं माणसें स्वाभाविकपणें पापास प्रवृत्त होत नाहींत, तीं पापरहित होऊन, पापाच्या परिणामापासून अलिप्त रहातात. त्याचप्रमाणें ज्यांच्या शरीरांत रोगप्रतिबंधक शक्ति आहे, ते रोगस्थानांत रहात असूनही रोगांपासून वांचतात. हा नैसर्गिक नियम पाहून प्रत्येकानें आपला स्वभाव उक्त प्रकारचा बनवावा, हें त्यास उचित होय आणि त्यामुळें पापांपासून आणि रोगांपासून स्वतःस मुक्त करून दीर्घायु, निरोगी, आणि बलवान् तसेंच सच्छील व्हावें.

दान

जनतेस निष्पाप आणि निरोगी करण्यासाठीं धनवान् मनुष्यांनीं आपल्या धनाचा कांहीं भाग वेगळा काढून दान करावा. ज्याप्रमाणें—

त्वष्टा दुहित्रे वहतुं युनक्ति। (मं. ५)

'पिता कन्येसाठीं हुंडारूपानें धन योजनापूर्वक देतो' हें धन जांवयाच्या घरांत स्त्रीधनरूपानें राहून इष्टकार्य करतें, त्याप्रमाणें धनवान् मनुष्यानें आपल्या धनाचा कांहीं हिस्सा जनतेस रोगयुक्त आणि पापमुक्त करण्यासाठीं अर्पण करावा आणि या एकत्रित झालेल्या धनानें अशा संस्था योजनाबद्ध रीतीनें चालविल्या जाव्यात, कीं जनता पापप्रवृत्तींपासून आणि रोगांपासून आत्मरक्षण करील. अशा प्रयत्नांनीं संपूर्ण राष्ट्र दररोज अधिकाधिक निष्पाप, निरोगी, दीर्घायू, संपन्न, स्वस्थ, आणि सुखी होईल.

आपापल्या परिस्थितिप्रमाणें रहावें

लोक एक दुसऱ्याशीं स्पर्धा करतात; आणि त्यामुळें आपलें दुःख वाढवितात. जर ते 'दिली स्थिति देवानें' त्यांत सुख मानून रहातील आणि इतरांच्या स्थितीबद्दल त्यांच्याशीं स्पर्धा करणार नाहींत, तर ते पापांपासून व रोगांपासून मुक्त रहातील. या विषयीं एक उदाहरण आहे—

इदं विश्वं भुवनं वि याति । (मं. ५)

' हे सर्व पृथ्वी, चंद्र, सूर्य, ग्रहनक्षत्रादि आपापल्या गतिनुरूप फिरत आहेत ' सूर्याच्या उष्णतेशीं स्पर्धा करून चंद्रमा स्वतः उष्ण बनूं इच्छित नाहीं. आणि चंद्राशी स्पर्धा करून सूर्य शीत बनूं इच्छित नाहीं.अशा प्रकारें हे सर्व ग्रह आपापल्या गतीनें आपलें कार्य करीत आहेत. विविध भुवनांची विविधता आपणांस असा उपदेश देत आहे कीं ज्याप्रमाणें भुवनें वेग वेगळीं असतां, एकमेकांपासून भिन्न असतां एकाच विश्वाचे अंश होऊन तीं अविरोधानें रहातात त्याप्रमाणें मानवानें विविध गुणधर्मांनीं युक्त होऊन संपूर्ण राष्ट्राचा अवयव होऊन रहावें. तसेंच राष्ट्रहित आणि संपूर्ण जनतेचें हित करण्याची बुद्धि मनांत अविरोधभावानें ठेवावी. याप्रकारें राहून आणि पूर्वी सांगितल्याप्रमाणें उपाय योजून आपले आपणच पाप आणि रोगयांपासून मुक्त होऊं शकाल. नाहीं तर आपसांत लढत, रोगानें मरण्यापूर्वीच एकदुसऱ्याची डोकीं फोडून आपणच मरून जाल. असा नाश न व्हावा म्हणून वेद म्हणतो कीं आपापल्या परीनें रहावें आणि परस्पर सहाय्यक होऊन उन्नतीचें साधन करावें.

पोटाची पचनशक्ति

मनुष्याच्या शरीरांत रोज बीजें, त्याची पचनशक्ति बिघडते तेव्हां शिरतात. ही सूचना देण्यास सहाव्या मंत्रांत म्हटलें आहे —

अग्निः प्राणान् सं दधाति । (मं. ६)

' जठराग्नि–पचन करणारा उदरस्थानांतील अग्निच–प्राणांची सम्यक् धारणा करतो, ' दुसरें कांहीं असें साधन नाहींच कीं ज्यानें प्राणधारणा उत्तम प्रकारें होईल. याशाठीं जे दीर्घजीवनाची इच्छा करतात त्यांनी व्यायाम आणि इतर योगसाधनादिकांनीं स्वतःची पचनशक्ति वाढवावी, उत्तम प्रदीप्त करावी असें करण्यानें शरीरांत जें सामर्थ्य निर्माण होईल तेंच रोगांस दूर ठेवण्यास उपयोगी पडेल आणि तें रोगांस जवळ येऊं देणार नाहीं.

दुसरी गोष्ट अशी कीं जठराग्नी मंद झाल्यानें यकृत, हृदय आणि मेंदु या तीन्हींच्या क्रियांत बिघाड निर्माण होतो. मेंदुत बिघड निर्माण झाल्यानें विचाराचें परिवर्तन होतें म्हणजे मनुष्य पापकर्मास प्रवृत्त होतो. जर पचनशक्ति व्यवस्थित राहिली तर रोग वगैरे प्रबल होऊं शकत नाहींत. म्हणून पाप आणि रोग यांपासून मुक्त रहाण्यासाठीं, तसेंच दीर्घायुत्व जर पाहिजे तर मनुष्यानें आपली पचनशक्ति उत्तम प्रकारें प्रदीप्त ठेवली पाहिजे. या मंत्रांत पुढें म्हटलें आहे—

चंद्रः प्राणेन संहितः । (मं. ६)

' चंद्र प्राणाशीं मिळालेला आहे ' येथें ' चंद्र ' शब्दाचे तीन अर्थ आहेत. (१) वनस्पतीपासून उत्पन्न झालेलें अन्न, (२) वनस्पतीच्या फळादिकांचा रस, (३) मन. या तीन्हींचाहि प्राणांशी घनिष्ठ संबंध आहे. येथें वनस्पतीपासून प्राप्त होणारे निरामिष भोजन प्राणाच्या स्थिरीकरणास आवश्यक आहे असें दाखविल्यानें, मांसादि सेवन दीर्घजीवनास अनिष्ट असल्याचा आपोआपच उपदेश मिळतो. वाचकांनीं या गोष्टीचा अवश्य विचार करावा.

सूर्याचें वीर्य

सूर्यांत महान्‌जीवन विद्युत आहे. ती आपणांमध्यें संग्रहीत करण्यानें आरोग्य आणि दीर्घजीवन प्राप्त होऊं शकतें. याविषयीं सातव्या मंत्राचें कथन पहा—

देवाः विश्वतो वीर्यं प्राणेन समैरयन् (मं. ७)

' देव सर्व प्रकारच्या वीर्यानें युक्त सूर्याला प्राणांशी संबंधित करतात. ' या अनुष्ठानानें देव (**निर्जराः**) जरारहित आणि (**अ–मराः**) मरणरहित झाले आहेत. म्हणून जे लोक स्वतः-मध्यें (स्वतःच्या प्राणांत) सूर्याची जीवनविद्युत् धारण करतात, ते हि वर सांगितल्याप्रमाणें सिद्धि प्राप्त करूं शकतात. सूर्य प्रकाशांत उभें राहून अथवा बसून दीर्घश्वसन करण्यानें, सूर्याची जीवन विद्युत स्वतःच्या प्राणांत घेतली असतां सूर्याचें वीर्य आपणांत येतें. याच प्रकारें उघड्या अंगानें सूर्यप्रकाश सर्वांगावर घेतला असता (यास आतपस्नान म्हणतात) शरीराच्या कातडीतून सौर विद्युत् आपल्या शरिरांत प्रवेश करते. अशा विविध योजनांच्या योगें सौर विद्युत्पासून फायदा करून घेतां येतो. वाचकांनीं याचा विचार करून स्वतः लाभ प्राप्त करून घ्यावा.

दीर्घायु प्राप्त करून घेणारे

जे (**आयुष्मन्**) दीर्घायुषी आहेत म्हणजे विनासायास ज्यांना दीर्घायुष्य प्राप्त झालें आहे तसेंच (**आयुष्कृत**) प्रयत्नानें दीर्घायुष्य प्राप्त करून घेतलेले आहे, योगादि अनुष्ठानाच्या योगें ज्यांनीं दीर्घजीवन प्राप्त करून घेतलें आहे (**प्राणतां प्राणेन**) प्राणाच्या प्रबल शक्तीनें युक्त पुरुष इत्यादिकांचे प्राण कसे चालतात या सर्वांचा विचार करून मनुष्य दीर्घ आयुष्य प्राप्त करण्याचे मार्ग जाणूं शकतो. हे वर सांगितलेले मनुष्य आपले दैनिक व्यवहार कसे करतात, कोणत्या प्रकारच्या व्यवहारांनीं त्यांनीं दीर्घ आयु मिळविलें, याचें ज्ञान प्राप्त करून आणि त्यांचें उदाहरण आपणांसमोर ठेऊन तदनुसार आपले व्यवहार केले पाहिजेत.

(**इह एव भव**) याप्रकारें दीर्घकालपर्यंत या भूलोकीं रहावें आणि (**मा मृथाः**) शीघ्र मरणें योग्य नाहीं. असा उपदेश मं. ८ आणि ९ मध्यें आहे.

आपल्या राष्ट्रांत आणि अन्य देशांत जेथें जेथें, दीर्घायु, निरोगी बलवान्, निष्पाप, आणि सच्छील लोक असतील त्यांची जीवनचरित्रें पाहून आणि अभ्यासून त्यांतून उचित बोध प्राप्त करावा आणि त्यापासून लाभ करून घ्यावा.

औषधिरस

दहाव्या मंत्रांत औषधिरस सेवन करून दीर्घायु होण्याचा उपदेश केला आहे.

ओषधीनां रसेन आयुषा सं उत् ! (मं. १०)

' औषधींच्या रसानें आम्हीं दीर्घायुष्यानें संयुक्त होऊं. ' यामध्यें दीर्घायुष्यप्राप्तीचा संबंध औषधींच्या रसप्राशनाशीं सांगितला आहे. याच सूक्तांतील सहाव्या मंत्रांतील विधानाशीं त्याची तुलना करावी.

अंतिम मंत्रांत म्हटलें आहे कीं, ' ज्याप्रकारें वृष्टीमुळें वृक्ष, वनस्पति आदि उगवतात आणि उन्नतीस पोंहोचतात, त्याच प्रकारें आम्हीं पूर्वोक्त साधनांनी (**वयं अमृताः उदस्थाम**) अमर होऊन सर्व प्रकारची उन्नति प्राप्त करूं. '

या सूक्तांत सांगितलेलें अनुष्ठान जो करील त्यास त्या प्रकारची सिद्धि प्राप्त होईल ही गोष्ट सत्य आहे. त्यांत कांहीं शंका नाहीं. वेदांमध्यें क्रमपूर्ण अनुष्ठान सांगणारीं जीं सूक्तें आहेत, त्यापैकीं हें एक आहे. याच्या मननानें वेदाची उपदेश करण्याची शैली ध्यानीं येते. वाचकांनीं याचें मनन करावें आणि तसें अनुष्ठान करून लाभ प्राप्त करून घ्यावा.

पापापासून रक्षण

कांड ७, सूक्त ६४

(ऋषिः- यमः । देवता – मन्त्रोक्ता, निर्ऋतिः)

इदं यत्कृष्णः शकुनिरभिनिष्पतन्नपीपतत् । आपो मा तस्मात्सर्वस्माद्दुरितात्पान्त्वंहसः ॥ १ ॥
इदं यत्कृष्णः शकुनिरवामृक्षन्निर्ऋते ते मुखेन । अग्निर्मा तस्मादेनसो गार्हपत्यः प्र मुञ्चतु ॥ २ ॥

अर्थ— (**इदं यः कृष्णः शकुनिः**) हा जो काळा शकुनि पक्षी (**अभिनिष्पतन् अपीपतत्**) फिरत्या खालीत, खालीं पडतो (**तस्मात् सर्वस्मात् दुरितात् अंहसः**) त्या सर्व पतनाच्या पापापासून (**आपः मा पान्तु**) पाणी माझें रक्षण करो. (१)

हे (**निर्ऋते**) दुर्गते ! (**इदं यः कृष्णः शकुनिः**) हा जो काळा शकुनि पक्षी (**ते मुखेन अवामृक्षत्**) तुझ्या तोंडाजवळ पडत आहे. (**गार्हपत्यः अग्निः**) गार्हपत्य अग्नि (**तस्मात् एनसः**) त्या पापापासून (**मा प्रमुञ्चतु**) मला सोडवो. (२)

या दोन मंत्रांत प्रथम चरण दुर्बोध आहे. दुसऱ्या चरणांत जलादिकांची आणि अग्नीची दोषमुक्त करण्यास, पापापासून वांचण्यास प्रार्थना केली आहे. पहिल्या चरणावरून असें वाटतें की शकुनि पक्ष्याचें पडणें शुभ वा अशुभसूचक असावें. परंतु या मंत्राचे अधिक संशोधन होणें अवश्य आहे.

पापापासून मुक्ति

कांड ७, सूक्त ४२

(ऋषिः– प्रस्कण्वः । देवता – सोमारुद्रौ)

सोमारुद्रा वि वृहतं विषूचीममीवा या नो गयमाविवेश ।
बाधेथां दूरं निर्ऋतिं पराचैः कृतं चिदेनः प्र मुमुक्तमस्मत् ॥ १ ॥
सोमारुद्रा युवमेतान्यस्मद्विश्वा तनूषु भेषजानि धत्तम् ।
अव स्यतं मुञ्चतं यन्नो असत्तनूषु बद्धं कृतमेनो अस्मत् ॥ २ ॥

अर्थ — हे सोम आणि रुद्र हो ! (या अमीवा) जे रोग (नः गयं अविवेश) आमच्या घरांत प्रविष्ट झाले आहेत, त्या (विषूचीं विवृहतम्) पसरणाऱ्या रोगांस दूर करा. (निर्ऋतिं पराचैः दूरं बाधेथां) दुर्गतीस विशेष प्रकारें दूरच अटकवून टाका. (कृतं चित् एनः) आम्हीं केलेलें जें कांहीं पाप असेल त्यापासून (अस्मत् प्रमुमुक्तं) आम्हांस मुक्त करा. (१)

हे सोम आणि रुद्र हो ! (युवं अस्मत् तनुषु) तुम्हीं दोघे आमच्या शरीरांत (एतानि विश्वा भेषजानि धत्तं) या सर्व औषधींस धारण करा. (यत् नः तनुषु बद्ध एनः असत्) जें आमचें शारीरिक पाप असेल त्यापासून (अवस्यतं) आमचें रक्षण करा. (अस्मत् कृतं एनः मुमुक्तं) आम्हीं केलेल्या पापापासून आम्हांस मुक्त करा. (२)

जे रोग आम म्हणजे पचन न झालेल्या अन्नामुळें होतात, त्या रोगांचें नांव ' अमीव ' आहे. पोटांत गेलेलें अन्न पचन न झालें तर त्याचा आम होतो, आणि त्यापासून रोग उद्भवतात. या रोगांस दूर करण्यास सोम आणि रुद्र हे दोन देव समर्थ आहेत. ' सोम ' शब्द औषधी आणि वनस्पतींचा वाचक आहे. म्हणजे योग्य औषधिसेवनानें आमाचे दोष दूर होतात. असा उपदेश हा मंत्र देत आहे.

' रुद्र ' नांव प्राणाचें आहे. जीवनशक्ति, जी शरीरांत आहे ती आपले दोष दूर करण्यास समर्थ आहे. प्राणायामानें एक तर रक्ताची शुद्धि होते. आणि आंतड्यांतील अन्नरसाला योग्य गति मिळाल्यानें शौचशुद्धि होते आणि आम दोष दूर होतो.

शरीराची सर्व दुर्गति आम विकारानें होते, म्हणून योग्य औषधिसेवनानें तसेंच प्राणायामानें ते दोष दूर करणें योग्य आहे. शरीराकडून कांहीं नियमविरोधी आचरण घडल्यानें पाप झालें असेल तर या दोन देवतांच्या सहाय्यानें तें दूर होईल आणि पापामुळें येणाऱ्या आपत्तींचा नाश होईल.

दुसऱ्या मंत्रांत (विश्वानि भेषजानि) सर्व औषधि सोम आणि रुद्र यांपासून प्राप्त होतात असें म्हटलें आहे. सोम हा तर औषधींचा राजाच आहे. रुद्र हा सुद्धां जीवनशक्तिमय आहे म्हणून जेथें जीवनशक्ति असेल तेथें रोग कसे येतील ? या प्राणशक्तीनें सर्व औषधि मनुष्यास प्राप्त होतात. त्यांच्यामुळें शरीराचे दोष आणि सर्व पापें दूर होतात. म्हणून मनुष्यानें प्राणायामानें आपणांस आरोग्य प्राप्त करून घेऊन रोगमुक्त व्हावें.

ज्ञानानें पाप दूर करणें

कांड ६, सूक्त ११३

(ऋषिः - अथर्वा । देवता - पूषा)

त्रिते देवा अमृजतैतदेनस्त्रित एनन्मनुष्येषु ममृजे ।
ततो यदि त्वा ग्राहिरानशे तां ते देवा ब्रह्मणा नाशयन्तु ॥ १ ॥
मरीचीर्धूमान्प्र विशानु पाप्मन्नुदारान्गच्छोत वा नीहारान् ।
नदीनां फेनाँ अनु तान्वि नश्य भ्रूणघ्नि पूषन्दुरितानि मृक्ष्व ॥ २ ॥
द्वादशधा निहितं त्रितस्यापमृष्टं मनुष्यैनसानि ।
ततो यदि त्वा ग्राहिरानशे तां ते देवा ब्रह्मणा नाशयन्तु ॥ ३ ॥

अर्थ— (देवाः एतत् एनः त्रिते अमृजत) देवांनीं-इंद्रियांनीं हें पाप त्रिता-मनामध्यें ठेवलें आणि त्यानें (एनत् मनुष्येषु ममृजे) तें मनुष्यांत ठेवलें आहे. (ततः यदि त्वा ग्राहिः आनशे) म्हणून जर तुला पकडणाऱ्या रोगादींनीं पकडून ठेवलें असेल तर (देवाः ते तां ब्रह्मणा नाशयन्तु) देव तुझ्या त्या रोगास-पीडेस, दुःखास-ज्ञानाच्यायोगें दूर करो. (१)

हे (पाप्मन्) पाप्या ! (मरीचीः धूमान् प्रविश) सूर्यकिरणांत अथवा धुरांत प्रवेश कर. (उदारान् अनुगच्छ) वर आलेल्या वाफेंत-ढगांत-अनुकूलतेप्रमाणें जा, (उत वा नीहारान्) अथवा धुक्यांत लीन हो. (नदीनां तान् फेनान् अनुविनश्य) नदीच्या त्या फेसांत लपून बैस. हे पूषा ! (भ्रूणघ्नि दुरितानि मृक्ष्व) गर्भघातक्यामध्यें पापांस नेऊन ठेव. (२)

(त्रितस्य अपमृष्टं द्वादशधा निहितं) त्रिताचें धुतलेलें पाप बारा प्रकारांनीं ठेविलें आहे. तें (मनुष्य-एनसानि) मनुष्याचें पाप आहे. (ततः यदि त्वा ग्राहिः आनशे) त्यामुळें तुला जर न बऱ्या होणाऱ्या रोगानें पछाडलें असेल तर (देवाः ते तां ब्रह्मणा नाशयन्तु) देव तुझ्या त्या रोगाचा ज्ञानानें नाश करोत. (३)

भावार्थ— इंद्रियांनीं केलेलें पाप मनांत एकत्रित होतें आणि मनांत एकत्रित झालेलीं पापें शरीरांत प्रकट होतात. जर त्यामुळें निरनिराळे रोग निर्माण झाले तर ज्ञानानें ते दूर करता येतात. (१)

सूर्यकिरण, अंधार, धुकें, इत्यादि कोणत्याहि स्थानीं पापी गेला तरी त्याचें पाप दूर होत नाहीं. त्याचें जें सर्व पाप असतें तें गर्भघातक्यामध्यें रहातें. (२)

मनाचें पाप बारा प्रकारचें असतें आणि तें मनुष्यामध्यें रहातें, त्यानें विविध रोग होतात ते ज्ञानपूर्वक उपायांनीं नाहींसे होतात. (३)

इंद्रियांकडून जीं पापें होतात तीं सर्व संस्काररूपानें मनांत जमा होतात. त्या पापांचा परिणाम मनुष्याच्या शरीरांत रोगरूपानें उमटतो. हीं पापें कधीं लपवितां येत नाहीत. सर्वांत महान् पाप गर्भघात करण्यानें होतें. म्हणून पापांस दूर करणें असेल तर ज्ञान वाढविलें पाहिजे. कारण की ज्ञानानेंच सर्व पापें दूर होतात.

शापानें नाश

कांड ६, सूक्त ३७

(ऋषिः- अथर्वा स्वस्त्ययनकामः । देवता — चन्द्रमाः)

उप प्रागात्सहस्राक्षो युक्त्वा शपथो रथम् । शप्तारमन्विच्छन्मम वृक इवाविमतो गृहम् ॥ १ ॥
परि णो वृङ्धि शपथ ह्रदमग्निरिवा दहन् । शप्तारमत्र नो जहि दिवो वृक्षमिवाशनिः ॥ २ ॥
यो नः शपादशपतः शपतो यश्च नः शपात् । शुने पेष्ट्रमिवावक्षामं तं प्रत्यस्यामि मृत्यवे ॥ ३ ॥

अर्थ— (सहस्राक्षः शपथः) हजार डोळ्यांचा शाप (रथं युक्त्वा) स्वतःचा रथ जोडून, (मम शप्तारं अन्विच्छन्) मला शाप देणाऱ्याला शोधीत (उप प्र अगात्) त्याच्याजवळ येत आहे. (वृकः अविमतः गृहं इव) ज्याप्रमाणें लांडगा मेंढ्या असणाऱ्याच्या घरीं यावा तसा. (१)

हे (शपथ) दुष्ट भाषणा ! (नः परि वृङ्धि) आम्हांस सोडून दे, (दहन् अग्निः ह्रदं इव) ज्याप्रमाणें जाळणारा अग्नि जलस्थानास सोडतो, (अत्र नः शप्तारं जहि) येथें आम्हांस शाप देणाऱ्यांचा नाश कर. (दिवः अशनिः वृक्षं इव) आकाशांतील वीज ज्याप्रमाणें वृक्षांचा नाश करते. (२)

(अशपतः नः यः शपात्) शाप न देणाऱ्या आम्हांस जो शाप देईल, (यः च शपतः नः शपात्) आणि शाप देणाऱ्यांस जो शाप देईल (अवक्षामं तं मृत्यवे प्रति अस्यामि) त्या हीनास मीं मृत्यूच्या स्वाधीन करतों (पेष्ट्रं शुने इव) ज्याप्रमाणें कुत्र्याकडे तुकडा फेंकावा. (३)

शापानें हानि

शापानें हानि

शाप देण्यानें, दुसऱ्यास लागेल असें कडू बोलण्यानें जी हानि होते, त्याचें वर्णन या सूक्तांत केलें आहे. शाप हजार डोळ्यांचा म्हणजे महा क्रोधी, मोठ्या रागापासून उत्पन्न होतो. जो शाप देतो, क्रोधवचन बोलतो, रागानें दुसऱ्यास अपशब्द बोलतो त्याचा शाप त्याला स्वतःलाच हजार पटीनें नाशक होऊन त्याला शोधीत त्याच्याकडेच परत येतो.

सहस्राक्षः शपथः शप्तारं अन्विच्छन् उपप्रागात् ।
(मं. १)

' हजारपट होऊन शाप देणाऱ्याला शोधीत त्याच्या जवळ जातो. ' म्हणजे शाप देणाऱ्याचें नुकसान हजारपट होतें. म्हणून कोणी कोणास शाप देऊं नये.

शपथ ! नः परि वृङ्धि (मं. २)

' शापा ! आमच्या जवळ येऊं नकोस, म्हणजे आमच्या मुखांतून वाईट वचन कधीं न निघो आणि दुसऱ्या कोणीहि आम्हांस उद्देशून वाईट वचन वापरूं नये, म्हणजे आम्हीं कोणास वाईट अपशब्द बोलणार नाहीं आणि कोणी बोललेलें सहन करणार नाहीं.

शपथ ! शप्तारं जहि । (मं. २)

' शापा ! शाप देणाराचा नाश कर. ' म्हणजे वाईट शब्द वापरतो ते त्याचे त्यालाच लागतात. कोणीहि कडु शब्द, वाईटें वचन, अपशब्द बोलूं नयेत. कडु बोलण्यानें आपलाच नाश होतो. म्हणून रागीट मनुष्यानें फार सावध रहावें व स्वतःला कडु बोलणयापासून परावृत्त करावें. '

अवक्षामं मृत्यवे अस्यामि । (मं. ३)

' शाप देणाऱ्या नीच मनुष्यास मृत्यूकडे पाठविलें जातें. ' म्हणजे शाप देण्यानें आयुष्याचा क्षय होतो. म्हणून कोणी कोणास शाप देऊं नये अथवा वाईट अपशब्द बोलूं नयेत.

' **स्वस्त्ययन** ' म्हणजे (**स्वस्ति-अयनं**) ' उत्तम कल्याण प्राप्त करीत जीवन घालविणें. ' असा या सूक्ताचा उद्देश आहे. या उद्देशसिद्धीसाठीं मनुष्यानें कडु कधीं बोलूं नये हें उचित होय. ' या नियमाचें पालन करण्यानें मनुष्य उन्नत होतो आणि आपलें जीवन कल्याणयुक्त करतो.

पापमोचन

कांड ४, सूक्त २७

(ऋषिः- मृगारः । देवता- मरुतः)

मरुतां मन्वे अधि मे ब्रुवन्तु प्रेमं वाजं वाजसाते अवन्तु ।
आशूनिव सुयमानह्व ऊतये ते नो मुञ्चन्त्वंहसः ॥ १ ॥
उत्समक्षितं व्यचन्ति ये सदा य आसिञ्चन्ति रसमोषधीषु ।
पुरो दधे मरुतः पृश्निमातॄंस्ते नो मुञ्चन्त्वंहसः ॥ २ ॥
पयो धेनूनां रसमोषधीनां जवमर्वतां कवयो य इन्वथ ।
शग्मा भवन्तु मरुतो नः स्योनास्ते नो मुञ्चन्त्वंहसः ॥ ३ ॥
अपः समुद्राद्दिवमुद्वहन्ति दिवस्पृथिवीमभि ये सृजन्ति ।
ये अद्भिरीशाना मरुतश्चरन्ति ते नो मुञ्चन्त्वंहसः ॥ ४ ॥
ये कीलालेन तर्पयन्ति ये घृतेन ये वा वयो मेदसा संसृजन्ति ।
ये अद्भिरीशाना मरुतो वर्षयन्ति ते नो मुञ्चन्त्वंहसः ॥ ५ ॥
यदीदिदं मरुतो मारुतेन यदि देवा दैव्येनेदृगार ।
यूयमीशिध्वे वसवस्तस्य निष्कृतेस्ते नो मुञ्चन्त्वंहसः ॥ ६ ॥

अर्थ - (मरुतां मन्वे) मरुतांचें मीं मनन करतों की ते (मे अधि ब्रुवन्तु) मला उपदेश देवोत आणि ते (इमं वाजं वाजसाते अवन्तु) या अन्नाचें अन्नदान प्रसंगीं रक्षण करोत. (सुयमान् आशून् इव) उत्तम नियमयुक्त चालणाऱ्या घोड्यांप्रमाणें यांना (ऊतये अह्वे) रक्षणासाठीं बोलावितों, (ते नः अंहसः मुञ्चन्तु) ते आम्हांस पापापासून वांचवोत. (१)

(ये सदा अक्षितं उत्सं व्यचन्ति) जे नेहमीं अक्षय जलप्रवाहास पसरवितात, (ये औषधीषु रसं आसिञ्चन्ति) जे औषधीमध्यें रस सिंचतात, भरतात, उत्पन्न करतात त्याचप्रमाणें (पृश्निमातॄः मरुतः पुरः दधे) अन्तरिक्षरूपी मातेपासून उत्पन्न झालेल्या मरुतांना मीं समोर ठेवतों, ते आम्हांस पापापासून मुक्त करोत. (२)

(धेनूनां पयः) गाईचें दूध (ओषधीनां रसं) औषधी रस, (अर्वतां जवं) आणि घोड्यांचा वेग (ये कवयः इन्वथ) जे तुम्हीं कवि असलेले प्राप्त करतां, ते (मरुतः नः शग्माः स्योनाः भवन्तु) मरुद्गण आम्हांस शक्ति आणि सुख देणारे होवोत, आणि आम्हांस पापापासून मुक्त करोत. (३)

(ये समुद्रात् आपः दिवं उद्वहन्ति) जे समुद्रांतील जलास द्युलोकांपर्यंत पोहोंचवितात आणि जे (दिवः पृथिवीं अभिसृजन्ति) द्युलोकांतून पुनः पृथ्वीवर पोहोंचवितात, (ये ईशानाः मरुतः अद्भिः चरन्ति) जे समर्थ मरुत् जलासह विहरतात, ते आम्हांस पापापासून मुक्त करोत. (४)

(ये कीलालेन ये घृतेन तर्पयन्ति) जे अन्नानें आणि पेयानें सर्वांस तृप्त करतात, (ये वा वयः मेदसा संसृजन्ति) आणि जे अन्नाला पुष्टिकारक पदार्थासह उत्पन्न करतात, (ये ईशानाः मरुतः अद्भिः वर्षयन्ति) जे समर्थ मरुत् पाण्याची वृष्टि करतात ते आम्हांस पापापासून मुक्त करोत. (५)

हे (देवाः मरुतः) दिव्य मरुत् हो ! (यदि इदं मारुतेन) जर हें जग वायूनें युक्त झालें, (यदि दैव्येन ईदृक् आर) आणि जर दिव्यशक्तीनें युक्त झालें, तर हे (वसवः) निवासक हो ! (तस्य निष्कृतेः यूयं ईशिध्वे) त्याच्या उद्धारासाठीं तुम्हींच समर्थ आहांत, ते तुम्हीं आम्हांस पापापासून मुक्त करा. (६)

तिग्ममनीकं विदितं सहस्वन्मारुतं शर्धः पृतनासूग्रम् ।
स्तौमि मरुतो नाथितो जोहवीमि ते नो मुञ्चन्त्वंहसः ॥ ७ ॥

(मारुतं अनीकं शर्धः) मरुतांचें सैनिक बल, (पृतनासु तिग्मं) सेनेमध्यें तीक्ष्ण आणि (सहस्वत् उग्रं विदितं) बलयुक्त प्रचंड शक्तीचें आहे हें सर्वांस विदित आहे. म्हणून मीं (मरुतः स्तौमि) मरुतांची प्रशंसा करतों आणि (नाथितः जोहवीमि) त्यांनीं सनाथ होऊन मीं त्यांस बोलावितों कीं त्यांनीं आम्हांस पापांपासून वांचवावें. (७)

पापमोचन

मरुत् देवता

मरुत् नांव विश्वामध्यें वायूचें आहे. देहांतील प्राणालाहि मरुत् म्हणतात. त्याचें नांव मरुत् एवढ्यासाठीं आहे की (मर्+उत्) मरणान्यास सजीवन करून वर उठवितो. शरीर मरणारें आहे. त्यास उठवून उभें करणारा प्राणवायु आहे. मरणान्यास उठविण्याचा चमत्कार प्राणच करतो. दुसऱ्या इतर कोणास ही शक्ति नाहीं. ज्याप्रमाणें पशूमध्यें घोडे वेगवान् आहेत, त्याच-प्रकारें देवांमध्यें वायु वेगवान् आहे. त्यामुळेंच सर्व प्रकारचें (वाजं) बल, अन्न, जीवन इत्यादि यथायोग्य रीतीनें आपापल्या स्थानीं रहातें. वायु कांहीं केवळ मनुष्यांचाच प्राण आहे असें नव्हे, परंतु औषधि, वनस्पतीमध्यें सुद्धां तोच जीवनाचा संचार करतो, आणि वनस्पतींमध्यें उत्तमोत्तम रस निर्माण करतो. हें सर्व त्या प्राणाचेंच कार्य आहे. वनस्पतींत पौष्टिक रस, गायींना अमृतासमान दूध, आकाशांतील मेघांत निर्दोष जल ठेवणारा हाच विश्वव्यापी प्राण आहे.

हा विश्वव्यापी प्राणच समुद्राच्या जलास वर घेऊन जातो, तेथें त्याचे मेघ होतात आणि वृष्टि होऊन पुनः तेंच शुद्ध जल आम्हांस प्राप्त होतें हा त्याचाच चमत्कार आहे. पृथ्वीवरील सर्व अन्न आणि पेयें याच्यामुळेंच मिळतात. प्रत्येक खाद्य-पेय वस्तूंत जो पौष्टिक सत्त्वांश आहे तो याच्यामुळेंच. ही जीवन देणारी प्राणशक्ति वायूमध्यें आहे म्हणून वायूला सर्वांचा निवासक म्हटलें आहे.

वीरांमध्यें जें तेज, बल, सामर्थ्य आणि वीर्य आहे तें सर्व याच्यामुळेंच आहे. हें मरुतांचें आणि प्राणाचें कार्य सर्वांनीं पहाण्यासारखें आहे. नीट पाहिलें तर पापापासून वाचण्याचा (मुक्त होण्याचा) उपदेश मरुत् कशा प्रकारें देत आहेत. तें कळेल.

जगांत पहा, इतर सर्व देव अस्तास जातात परंतु वायुरूपी प्राण सदा समरस (कार्यव्यापृत) राहून सर्वांस जीवन देत असतो. याप्रकारें शरीरांत सर्व अन्य इंद्रियें आणि अवयव अन्नाचा भोग घेतात आणि कार्य करून थकून जातात व विश्रांति घेतात. परंतु प्राण हाच असा एक आहे जो स्वतः कांहीं भोग न घेतां, विश्रांति न घेतां न थकतां रात्रंदिवस कार्यव्यापृत आहे. निःस्वार्थ सेवा करण्याचा उपदेश याच्यापासून आपणांस मिळतो. जे त्याप्रमाणें जनतेची निःस्पृह सेवा करतील ते निष्पाप होऊन जातील.

वेदामध्यें ' मरुत ' देवतेच्या वर्णनानें वीरांचे वर्णन केलें आहे. हे वीर मरतात आणि पुनः उठतात असा अर्थ या (मर्+उत्) शब्दामध्यें ऋषींनीं पाहिला, अनुभविला. शरीरांत पहा, प्राण शरीरांत जातो तेथील कार्य करतो म्हणजे मरतो, शरीरासाठीं स्वतः मरतो, आणि पुनः सजीवन होऊन परत कार्यास लागतो हा भाव येथें आहे. प्रतिक्षणीं प्राण शरीरासाठीं मरत आहे, म्हणून शरीर जिवंत रहातें. प्राणाचे उपकार शरीरावर होतात म्हणून शरीर जिवंत आहे. म्हणजे या प्राणाच्या यज्ञानें शरीराची स्थिति आहे. आपल्या सर्व समाजांत म्हणजे राष्ट्रांतहि असेंच व्हावयास हवें, राष्ट्राच्या कल्याणासाठीं जेव्हां सर्व वीर प्राणार्पण करण्यास तयार होतील, नव्हे प्राणार्पण करतील तेव्हांच तें राष्ट्र यशस्वी होतें. जेव्हां स्वार्थलंपट मनुष्य राष्ट्रांत अधिक संख्येनें निर्माण होतात तेव्हां त्या राष्ट्राची अवनति होते, नाश होतो. मनुष्य अशा आत्मार्पणानेंच निष्पाप होतो असा बोध या सूक्तावरून मिळतो.

पापमोचन

कांड ४, सूक्त २८

(ऋषि- मृगारः । देवता- भवाशर्वौ)

भवाशर्वौ मन्वे वां तस्य वित्तं ययोर्वामिदं प्रदिशि यद्विरोचते ।
यावस्येशाथे द्विपदो यौ चतुष्पदस्तौ नो मुञ्चतमंहसः ॥ १ ॥
ययोरभ्यध्व उत यद्दूरे चिद्यौ विदिताविषुभृतामसिष्ठौ ।
यावस्येशाथे द्विपदो यौ चतुष्पदस्तौ नो मुञ्चतमंहसः ॥ २ ॥
सहस्राक्षौ वृत्रहणा हुवेऽहं दूरेगव्यूती स्तुवन्नेम्युग्रौ ।
यावस्येशाथे द्विपदो यौ चतुष्पदस्तौ नो मुञ्चतमंहसः ॥ ३ ॥
यावारेभाथे बहु साकमग्रे प्र चेदस्राष्ट्रमभिभां जनेषु ।
यावस्येशाथे द्विपदो यौ चतुष्पदस्तौ नो मुञ्चतमंहसः ॥ ४ ॥
ययोर्वधान्नापपद्यते कश्चनान्तर्देवेषूत मानुषेषु ।
यावस्येशाथे द्विपदो यौ चतुष्पदस्तौ नो मुञ्चतमंहसः ॥ ५ ॥
यः कृत्याकृन्मूलकृद्यातुधानो नि तस्मिन्धत्तं वज्रमुग्रौ ।
यावस्येशाथे द्विपदो यौ चतुष्पदस्तौ नो मुञ्चतमंहसः ॥ ६ ॥

अर्थ— (भव-शर्वौ) जगत् उत्पन्न करणारे आणि त्याचा लय करणारे ! (वां मन्ये) तुम्हां दोघांचें मी मनन करतों. (तस्य वित्तं) त्याला तुम्हीं दोघे जाणतां (यत् इदं प्रदिशि विरोचते) जो या दिशांमधून चमकतो तो सर्व (ययोः वां) ज्या तुम्हां दोघांचाहि (अस्य द्विपदः यौ ईशाथे) या द्विपाद जगताचे जे तुम्हीं दोघे स्वामी आहांत (यौ चतुष्पादः) जे चतष्पादांचेहि स्वामी आहांत (तौ नः अंहसः मुञ्चतं) ते तुम्हीं दोघे आम्हांस पापापासून वांचवा. (१)

(ययोः अभ्यध्वे उत यत् दूरे) ज्या तुम्हां दोघांच्या समीप हें सर्व आहे, आणि जें दूरही आहे, आणि (यौ चित् इषुभृतां असिष्ठौ विदितौ) जे निश्चयानें बाण धारण करणाऱ्यांना बाण फेंकण्याच्या वेळीं तुम्हीं दोघेहि जाणतां, जे तुम्हीं दोघे द्विपाद आणि चतुष्पादांचे स्वामी आहांत ते तुम्हीं दोघे आम्हांस पापांपासून मुक्त करा. (२)

(सहस्राक्षौ शत्रुहणौ) तुम्हीं दोघे हजार डोळ्यांचे आणि शत्रुविनाशक आहांत (दूरे-गव्यूती उग्रौ) तसेंच दूरवर जाणारे उग्र आहांत, तुम्हां दोघांना (अहं हुवे स्तुवन् एमि) मी बोलावतों आणि स्तुति करीत प्राप्त होतों. जे द्विपाद आणि चतुष्पादांचे स्वामी आहां ते तुम्हीं दोघे आम्हांस सर्व पापांपासून सोडवा. (३)

(अग्रे यौ साकं बहु आरेभाथे) प्रथम तुम्हीं दोघांनीं मिळून मिसळून पुष्कळ कार्यें आरंभिलीत, (जनेषु च अभिभां इत् प्र अस्ताष्ट्रम्) लोकांत तेज उत्पन्न केलें, जे द्विपाद आणि चतुष्पादांचे स्वामी आहांत ते तुम्हीं दोघे आम्हांला सर्व पापांतून मुक्त करा. (४)

(ययोः वधात्) ज्यांच्या वध करण्याच्या सामर्थ्यानें (देवेषु उत मानुषेषु अंतः) देव आणि मनुष्यांत (कश्चन न अप-पद्यते) कोणी वांचू शकत नाहीं, आणि जे द्विपाद आणि चतुष्पादांचे स्वामी आहांत ते तुम्हीं दोघे आम्हांस सर्व पापांपासून मुक्त करा. (५)

(यः कृत्याकृत्) जो हिंसा करणारा (यः यातुधानः मूल-कृत्) जो यातना वाढविणारा, मूळांपासून तोडणारा, (तस्मिन् उग्रौ, वज्रं निधत्तं) त्याच्यावर हे (दोघे) उग्रवीर हो ! आपलें वज्र टाका. जे चतुष्पाद आणि द्विपादांचे स्वामी असे तुम्हीं दोघे आम्हांस सर्व पापांतून मुक्त करा. (६)

अधि नो ब्रूतं पृतनासूग्रौ सं वज्रेण सृजतं यः किमीदी ।
स्तौमि भवाशर्वौ नाथितो जोहवीमि तौ नो मुञ्चतमंहसः ॥ ७ ॥

हे (उग्रौ) उग्र स्वभावी ! (नः पृतनासु अधि ब्रूतं) आम्हांस समुदायांत, सेनेंत योग्य उपदेश करा. (यः किमीदी) जो स्वार्थी आहेत, त्याच्यावर (वज्रेण संसृजतं) वज्रप्रहार करा. याकरितां मीं (भवाशर्वौ) भव आणि शर्वाची स्तुति करतों. आणि (नाथितः जोहवीमि) त्यांच्या योगें सनाथ होऊन म्हणतों कीं (तौ नः अंहसः मुञ्चतं) ते तुम्हीं दोघे आम्हांस सर्व पापांपासून मुक्त करा. (७)

भव आणि शर्व

या दोन शक्ति आहेत. एक 'भव' ही वाढविणारी म्हणजे वर्धकशक्ति आहे आणि दुसरी 'शर्व' म्हणजे घातक शक्ति आहे. या सर्व जगांत या दोन शक्ति कार्य करीत आहेत. लहान मुलांत विनाशक शक्तीचा जोर कमी असतो आणि वर्धक शक्तीचा जोर अधिक असतो. त्यामुळें बालक वाढतें. वृद्धामध्येंही गोष्ट उलट असते. म्हणून वृद्ध दिवसेंदिवस क्षीण होतात. जगतांत या दोन ही परमात्म्याच्या शक्तींचीं कार्यें कोणत्या प्रकारें चालत आहेत ही गोष्ट या सूक्तांत उत्तम प्रकारें दाखविली आहे. मनुष्यांतहि या दोन शक्ति असतात. जो मनुष्य पापापासून वांचू इच्छितो त्यानें या शक्तींचा असा उपयोग करावा कीं त्यायोगें घातपात होणार नाहींत. परंतु शांति आणि सुखकारक कार्यें वाढावींत असें करण्यानें मनुष्य पापापासून वांचू शकतो.

मनुष्यांत 'भव' शक्ति आहे तिच्या सहाय्यानें तो सुखोपभोगाचे नाना पदार्थ उत्पन्न करतो. दुसरी 'शर्व' शक्ति सुद्धां त्याच्यांत आहे. तिच्या मदतीनें तो मोड-तोड, उत्पात, नाश सुद्धां करूं शकतो. म्हणून जो मनुष्य पापापासून दूर होऊं इच्छितो त्यानें स्वतःची भवशक्ति जन कल्याणासारख्या सत्कार्यांत उपयोजावी म्हणजे ज्यापासून जास्त लोकांचें हित होईल अशा शुभ कार्यांत स्वतःच्या उक्त शक्तीचा उपयोग करावा. त्याच्याजवळ दुसरी शर्व शक्ति आहे ती जरी मोड-तोड, संहार करणारी असली तर तिचा सुद्धां उपयोग जनकल्याणासाठीं होऊं शकेल ही गोष्ट तितकीच सत्य आहे. या सर्व शक्तीच्या सहाय्यानें पापाचों, रोगाचीं पाळेंमुळें खणून काढावी. शिवाय जीं माणसें उन्नतीस विघातक आहेत, समाजास त्रास देणारीं आहेत, त्यांच्या विघातासाठीं ही शक्ति वापरली तर तीच शक्ति परोपकार करणारी अतएव लाभदायक होते. याप्रमाणें या विघातक शक्तीचा उपयोगहि परोपकारासाठीं केला असतां, मनुष्याच्या दोन्ही शक्ति परोपकारी होण्यानें समग्र जीवन यज्ञमय होऊन जाईल आणि त्याच्या पापाचा नाश होईल. तो पुण्यात्मा होऊन जाईल. हा मार्ग आत्मशुद्धीसाठीं आवश्यक आहे, हें या सूक्तानें सुचविलें आहे. म्हणून वाचकांनीं या शक्ति स्वतःच्या ठिकाणीं कितपत सहाय्यक आहेत हें पहावें आणि त्यांच्या उक्त प्रकारच्या व्यवहारानें स्वतःच पापांतून मुक्त व्हावें.

पापमोचन

कांड ४, सूक्त २९

(ऋषिः- मृगारः । देवता - मित्रावरुणौ)

मन्वे वां मित्रावरुणावृतावृधौ सचेतसौ द्रुह्वणो यौ नुदेथे ।
प्र सत्यावानमवथो भरेषु तौ नो मुञ्चतमंहसः ॥ १ ॥

अर्थ— हे (मित्रावरुणौ) मित्र आणि वरुण हो ! (वां मन्वे) मीं तुम्हां दोघांचें मनन करतों. तुम्हीं, दोघे (ऋतावृधौ सचेतसौ) सत्यास वाढविणारे आणि स्फूर्ति देणारे आहांत. (यौ द्रुह्वणः नुदेथे) तुम्हीं दोघे द्रोह करणारांस हटवितां. (भरेषु सत्यावानं प्र अवथः) स्पर्धेमध्यें सत्य पालन करणाऱ्यांचें रक्षण करतां (तौ नः अंहसः मुञ्चतं) ते तुम्ही दोघे आम्हांस पापांपासून वाचवा. (१)

सचेतसौ द्रुह्वणो यौ नुदेथे प्र सत्यावानमवथो भरेषु ।
यौ गच्छथो नृचक्षसौ बभ्रुणा सुतं तौ नो मुञ्चतमंहसः ॥ २ ॥
यावङ्गिरसमवथो यावगस्तिं मित्रावरुणा जमदग्निमत्रिम् ।
यौ कश्यपमवथो यौ वसिष्ठं तौ नो मुञ्चतमंहसः । ॥ ३ ॥
यौ श्यावाश्वमवथो वध्र्यश्वं मित्रावरुणा पुरुमीढमत्रिम् ।
यौ विमदमवथः सप्तवध्रिं तौ नो मुञ्चतमंहसः ॥ ४ ॥
यौ भरद्वाजमवथो यौ गविष्ठिरं विश्वामित्रं वरुण मित्र कुत्सम् ।
यौ कक्षीवन्तमवथः प्रोत कण्वं तौ नो मुञ्चतमंहसः ॥ ५ ॥
यौ मेधातिथिमवथो यौ त्रिशोकं मित्रावरुणावुशनां काव्यं यौ ।
यौ गोतममवथः प्रोत मुद्गलं तौ नो मुञ्चतमंहसः ॥ ६ ॥
ययो रथः सत्यवर्त्मर्जुरश्मिर्मिथुया चरन्तमभियाति दूषयन् ।
स्तौमि मित्रावरुणौ नाथितो जोहवीमि तौ नो मुञ्चतमंहसः ॥ ७ ॥

अर्थ— (यौ भरेषु सत्यावानं अवथः) जे तुम्हीं दोघे स्पर्धेमध्यें सत्यपालकांस वांचवितां, (यौ सचेतसौ द्रुह्वणःनुदेथे) तुम्हीं दोघे सावध राहून द्रोह करणारांस दूर हटवितां, (यौ नृचक्षसौ) तुम्हीं दोघे मनुष्यांचें निरीक्षण करणारे आहांत. (बभ्रुणा सुतं गच्छथः) पोषक शक्तीसह यज्ञाप्रत पोहोंचतां, असे तुम्हीं दोघे आम्हांस पापापासून मुक्त करा. (२)

(यौ मित्रावरुणौ) जे दोघे मित्र आणि वरुण (अंगिरसं, अगस्ति जमदग्नि अत्रि अवथः) अंगिरा, अगस्ति, जमदग्नि, अत्रि यांचे रक्षण करतां, (यौ कश्यपं अवथः यौ वसिष्ठं) कश्यप आणि वसिष्ठाचें रक्षण करतां ते तुम्हीं दोघे आम्हांस पापापासून मुक्त करा. (३)

(यौ मित्रावरुणौ) जे दोघे मित्र आणि वरुण (श्यावाश्वं, वध्र्यश्वं, पुरुमीढं, अत्रिं अवथः) श्यावाश्व, वध्र्यश्व पुरुमीढ, अत्रि वगैरेंचे रक्षण करतां (यौ विमदं सप्तवध्रिं अवथः) सप्तवध्रि आणि विमदाचें रक्षण करतां ते तुम्हीं दोघे आम्हांस पापापासून दूर ठेवा. (वांचवा) (४)

(यौ मित्र वरुण) जे मित्र आणि वरुण (विश्वामित्रं गविष्ठिरं भरद्वाजं कुत्सं अवथः) भरद्वाज, गविष्ठिर, विश्वामित्र, कुत्स वगैरेंचे रक्षण करतां आणि (यौ कक्षीवन्तं कण्वं प्र अवथ) कक्षीवान् आणि कण्वाचें रक्षण करतां ते तुम्हीं दोघे आम्हांस पापापासून मुक्त करा. (५)

(यौ मित्रावरुणौ) जे मित्र आणि वरुण (मेधातिथिं, त्रिशोकं, काव्यं उशनां अवथः) मेधातिथि, त्रिशोक, काव्य, उशनांचें रक्षण करतां आणि (यौ गौतमं उत मुद्गलं अवथः) गौतम आणि मुद्गलाचें रक्षण करतां ते तुम्हीं दोघे आम्हांस पापापासून मुक्त करा. (६)

(ययोः सत्यवर्त्मा ऋजुरश्मिः रथः) ज्यांचा सत्य मार्गाचा, सरळ किरणांचा रथ (मिथुया चरन्तं दूषयन् अभियाति) मिथ्याचाऱ्यास त्रास देऊन चालतो. त्या (मित्रावरुणौ स्तौमि) मित्र आणि वरुणाची मी स्तुति करतों आणि त्यांच्यामुळें (नाथितः जोहवीमि) सनाथ होऊन त्यांना बोलावितों आणि त्यांना दोघांना प्रार्थितो कीं आम्हांस पापापासून मुक्त करावें. (७)

पापमोचन

मित्र आणि वरुण

मृगार सूक्तांतील हें सातवें व अखेरचें सूक्त आहे. २३ ते २९ ही सात सूक्तें पापमोचनाविषयीं आहेत. आणि या सात सूक्तांचा ऋषि मृगार आहे. हीं सूक्तें भाषेच्या दृष्टीनें अगदी सरळ आहेत, परंतु पापमोचनासाठीं अनुष्ठानाच्या दृष्टीनें फार गंभीर आहेत. त्यांतील विषय चांगल्या प्रकारें समजावें एवढ्यासाठीं खालील कोष्टक पहा—

सूक्त	देवता	आपल्या शरीरांत शक्ति	अनुष्ठानविधि
२३	अग्नि	वाणी शक्ति	वाणीचा संयम
२४	इन्द्र	बळ	बळाचा सदुपयोग
२५	वायु, सविता	प्राण, नेत्र	प्राणायाम आणि दृष्टीची पवित्रता.
२६	द्यावापृथिवी	स्थूल आणि सूक्ष्मशक्ति	सत्कर्मासाठीं स्वतःच्या सर्व शक्तींचें समर्पण
२७	मरुत	प्राण	प्राणायाम
२८	भव, शव, रुद्र	वर्धक आणि घातक शक्ति	शक्तीचा सदुपयोग
२९	मित्र. वरुण	मित्र भाव आणि श्रेष्ठ भाव	दोन्हीचा सदुपयोग

या कोष्टकाचें निरीक्षण केलें असतां पापमोचनासाठीं अनुष्ठान कसें पायरीपायरीनें करावयाचें तें ध्यानीं येईल. अनुष्ठानाचें तात्पर्य समजण्यासाठीं एक उदाहरण घेऊं. एक मनुष्य म्हणतो कीं, 'सूर्य देवा ! मला मार्ग दाखवा.' या वाक्यावरून सूर्यामध्यें मार्ग दाखविण्याची शक्ति आहे हें स्पष्ट झालें. परंतु तोच मनुष्य जर डोळे बंद ठेवील व स्वतःच्या आजुबाजूस पहाणारा नाहीं तर सूर्य भगवान हजारों डोळ्यांनीं प्रकाशला तरी त्याला मार्ग दिसणार नाहीं. यावरून अनुष्ठानाचा मार्ग निश्चित होतो. तो असा कीं, 'मनुष्यानें स्वतःच्या शक्ति सन्मार्गाचा बोध होईल अशा सरळ मार्गावर ठेवण्याचा प्रयत्न करावा. आणि बाह्य शक्तींचें सहाय्य मिळविण्याची प्रार्थना करावी.' असें केल्यानें त्याच्या इच्छा सफल, परिपूर्ण होतील—

एका माणसाला एका शहरांत जावयाचें आहे. त्याला रस्ता माहित नाहीं अशावेळीं जर तो आपले डोळे उघडे ठेवून, आपली सर्व शक्ति वापरून मार्ग पहाण्याचा प्रयत्न करील तरच सूर्यदेवतेच्या प्रकाशाचा अधिकांत अधिक लाभ त्यास मिळेल. याचप्रकारें इतर विषयांसंबंधीं समजलें पाहिजे. पापमोचन हा मुख्य विषय आहे. भक्त स्वतः स्वतःलां पापापासून वाचवूं इच्छितो. म्हणून पूर्वोक्त उदाहरणाच्या न्यायानेंच, त्यानें स्वतःच्या सर्वशक्तींचा संयम करून त्या संयमानें स्वतःस पापापासून वाचविण्याचा गंभीर प्रयत्न केला पाहिजे. आणि असा प्रयत्न करतेवेळीं बाह्यशक्तींचे सहाय्य मिळावें अशी इच्छा करावी. बाह्यशक्ति असें सहाय्य देण्यास तयारच असतात, हें साधकानें ध्यानीं बाळगावें. न्यूनता असली तर ती आपल्या प्रयत्नाची आहे. डोळे बंद ठेवणारास ज्याप्रमाणें सूर्यप्रकाशाचा लाभ मिळत नाहीं, त्याच्या उलट डोळे उघडे ठेवणारासच त्याच्या प्रकाशाचा पूर्ण लाभ मिळतो. त्याप्रमाणें प्रयत्नशील माणसासच बाह्यशक्तींचा लाभ मिळूं शकतो. हीच गोष्ट विशेष स्मरणांत ठेवण्यासारखी आहे. वर सांगितल्या सात सूक्तांतील सात बाह्यदेवता अथवा शक्ति सांगितलेल्या आहेत त्यांची प्रार्थना केली आहे, आणि त्यांच्या सहाय्याची याचना केली आहे. ती स्वतःची अनुष्ठानाची तयारी झाल्यावरच हें वाचकांनीं अवश्य स्मरणांत ठेवावें. कारण कीं अनुष्ठानाशिवाय हीं सूक्तें कोणताहि लाभ देणार नाहींत.

'सूर्य आम्हांस मार्ग दाखवो,' असें म्हणणाऱ्यांनीं स्वतःचे डोळे उघडे ठेवून मार्ग पहाण्याचा प्रयत्न करावा.' पाणी आमची शांति करो,' असें म्हणणाऱ्यांनीं पाणी प्रथम हातांत घेऊन पिण्याचा प्रयत्न केला पाहिजे. 'अन्न आमच्या शरीराची शक्ति वाढवो,' अशी प्रार्थना करणारानें प्रथम उत्तम अन्न तयार करावें आणि त्याचें सेवन विधिपूर्वक करावें आणि मग म्हणावें कीं हें अन्न माझ्या शरीरास पुष्ट करो. प्रत्येक प्रार्थना करण्यापूर्वी योग्य

अनुष्ठान केलें पाहिजे ही गोष्ट ध्यानांत ठेवावी. प्रत्येक प्रार्थनेचा उच्चार अनुष्ठानपूर्वक व्हावयास हवा. कारण अनुष्ठानपूर्वक केलेली प्रार्थनाच सफळ होते. म्हणजे अनुष्ठानरहित प्रार्थना निष्फळ होते. वैदिक प्रार्थनानीं जो उन्नतीचा मार्ग मनुष्यास दिसतो तो या प्रकारें अनुष्ठानपूर्वक प्रार्थना केल्यानेंच दिसतो. एरवीं नाहीं.

अनुष्ठान जें करावयाचें तें आपल्या अंतरांत असलेल्या देवतां-कडून म्हणजे आपल्या अवयव आणि इंद्रियांकडून करण्यांत येतें. त्यांचा ज्या ज्या बाह्यदेवतांशी संबंध आहे त्या त्या देवतांची प्रार्थना करण्यांत येते. म्हणजे कोणतीहि प्रार्थना अनुष्ठानाशिवाय करण्यांत येत नाहीं. आपल्यानें होईल तितकें अनुष्ठान केल्यावर जेव्हां आपली शक्ति अल्प आहे असें कळून येते तेव्हांच अधिक प्रबळ शक्तीचें सहाय्य मागण्याची इच्छा होते. तेव्हांच प्रार्थनेची वेळ येते. याप्रमाणें या सात सूक्तांचें मनन केल्यानें पापमोचना-च्या अनुष्ठानाची रीत आपोआप समजते. सारांशरूपानें सांगाव-याचें तर या सूक्तांनीं हेंच अनुष्ठान सांगितलेलें आहे.

' वाणीस पवित्र करण्याचा उपदेश अर्थात् मुखानें अपवित्र गोष्टी उच्चारणें, स्वतःच्या शक्तीचा उपयोग दुर्बलास सहाय्य-भूत होण्यासारख्या परोपकारांत करणें आणि निष्कारण दुसऱ्यांस पीडा देण्यांत न करणें, स्वतःच्या प्राणाचा कुंभकादिद्वारां आयाम करून मन शांत, दृढ आणि गंभीर करणें, नेत्रादि इंद्रियें शुभ कर्मांत नियुक्त करणें आणि त्यांस दुष्कर्मांतून आणि अशुभ प्रवृत्तींपासून मागें फिरविणें अशा प्रकारें आपली सर्व शक्ति सत्कर्मांसाठीं वेंचावी. अशुभ म्हणजे पापप्रवृत्तीपासून दूर रहावें दहाही प्राणांचा व्यवहार उत्तम चालविण्याचा प्रयत्न करावा.. आपणांत वर्धक आणि घातक दोनहि प्रकारच्या शक्ति आहेत त्यांनीं कोणाचा घात करूं नये पण त्यांस सन्मार्गांत प्रवृत्त करावयाचें. आपणांतील मंगल आणि समर्थ मित्रभाव वरिष्ठभाव आहे तो मंगल कार्यांस लावावयाचा, अमंगल कार्यांपासून दूर ठेवावयाचा, असा या अनुष्ठानविधीचा सारांश आहे. त्यामध्यें आपल्या शक्तीनें जें अनुष्ठान करण्यांत येतें त्याच्याशीं संबद्ध बाह्यदेवतांची प्रार्थना अधिक शक्ति प्राप्त करण्याच्या इच्छेनें करावयाची. म्हणजे स्वतःचें अनुष्ठान आणि प्रार्थना एकाच क्षेत्रा-च्या असल्या पाहिजेत म्हणजे पाणी पितांना अन्नाची प्रार्थना अथवा भोजनाचे वेळीं अन्य कोणा देवाची प्रार्थना होतां कामा नये. प्रार्थनेच्यावेळीं आपला संबंध विश्वाच्या विशाल शक्तीशीं येत असतो. अशा एकताननेतें मोठा लाभ होतो.

२९ व्या सूक्तांत सांगितलें आहे कीं (सत्यवान्) सत्याचें पालन करणारा असतो त्यास परमात्मशक्तीचें सहाय्य मिळतें. (मं. १-२) या मंत्रांत इतकें सांगून सत्यपालन करणाऱ्या महात्म्यांना पूर्वी अनुष्ठानाच्या योगानें सहाय्य मिळालें त्यांची नामविली दिली आहे. हीं नांवे एक एक गुणाचीं उदाहरणें आहेत. त्यामुळें या नांवाचा विचार करण्यामुळें कोणत्या अनु-ष्ठानी मनुष्याला ईश्वरी सहाय्य मिळूं शकते त्याचा बोध होतो. म्हणून त्यांचा श्लेषार्थ पाहूं.

१. **सत्यवान्**- सत्यप्रतिज्ञ, सत्याचें पालन करणारा.
२. **अंगिरस्**- अंगांत जो जीवनरस आहे त्याचें ध्यान करणारा.
३. **अगस्ति- (अग+स्ति)** पापें दूर करण्यांत जो दत्तचित्त असतो तो.
४. **जमदग्नि- (जमत्+अग्नि)** प्राणादि अग्नींस प्रज्वलित करणारा.
५. **अत्रि- (अतति)** भ्रमण करून उद्धारासाठीं प्रयत्न करणारा.
६. **कश्यप- (पश्यकः)** सूक्ष्मदर्शी.
७. **वसिष्ठ**- सर्वस्थानीं सुखानें निवास करविणारा.
८. **श्यावाश्वः- (श्यै गतौ)**- गतिशील, प्रयत्नशील.
९. **वध्र्यश्व- (वध्रि)** स्तब्ध **(अश्वः)** घोडे अस-णारा. ज्याचे इंद्रियरूपी घोडे चंचल होत नाहींत.
१०. **पुरुमीढ- (पुरु)** पुष्कळ **(मीढ)** धनादि साधन-संपन्न.
११. **विमदः-(विगतः मदः)** ज्याच्यामधून मद म्हणजे गर्व निघून गेला आहे असा.
१२. **सप्तवध्रि**- ज्यानें स्वतःप्रमाणेंच साती इंद्रियें वश केली आहेत असा.
१३. **भरद्वाज- (भरत्+वाजः)** जो अन्नाचें दान करतो.
१४. **गविष्ठिर- (गवि)** वाणी. वाणी ज्याची स्थिर आहे म्हणजे जो स्वतःचें वचन पाळतो.
१५. **विश्वा-मित्रः- (विश्वस्य मित्रः)** सर्वांचा मित्र कोणाचाहि द्वेष न करणारा.
१६. **कुत्स**- दोषांची निंदा करणारा.
१७. **कक्षीवान्- (कक्षी)** गतिशील, प्रयत्नशील.
१८. **कण्व**- शब्दविद्येंत प्रवीण.
१९. **मेधातिथि- (मेधा)** बुद्धीस प्राप्त करणारा.
२०. **त्रिशोक**- स्थूल, सूक्ष्म, आणि कारण या तीन विषयां-च्या अज्ञानाचा ज्याला शोक होतो असा.
२१. **उशना काव्य**- संयमी कवि.
२२. **गोतम- (गो)** गतिशील, प्रयत्नशील.

१३. मुद्गल- (मुद्) आनंदास धारण करणारा, आनंदी-वृत्तीनें रहाणारा.

ऋषींच्या नांवांचे श्लेषार्थ,- हे असे आहेत. वाचकांनी या नांवाचा अधिक अभ्यास केला तर अधिक बोध प्राप्त होईल. या अर्थावरून असें समजून येते की त्यांनीं आत्मसुधारणेसाठीं कसे प्रयत्न केले. अशा प्रकारचे प्रयत्न करणारास पूर्वीं सांगितलेल्या सर्व देवता सर्व प्रकारें सहाय्य करतात आणि त्याची उन्नति करण्यांत सहायरूप होतात. जे लोक त्यांच्याप्रमाणें प्रयत्न करतील त्यांना सुद्धां त्याचप्रकारें देवता मदत करतील. परंतु जे लोक स्वतः च्या उन्नतीविषयीं दक्ष नसतात त्यांस कोणत्याहि प्रकारची मदत मिळत नाहीं. याविषयीं हे दोन शब्द पहा—

१. द्रुह्यन्- द्रोह करणारा, घातपात करणारा. (मं. १-२)
२. मिथुया चरन्- मिथ्या व्यवहार करणारा. (मं. ७)

वाचकांनीं येथें हें लक्षांत ठेवावें की अग्नि, वायु, सूर्य इत्यादि देवता नेहमीं सहाय करण्यास तयार असतात. परंतु त्यांच्यापासून सहाय्य मिळविण्यासाठीं मनुष्यानें प्रयत्न केला पाहिजे. जर मनुष्य प्रयत्नच करणार नाहीं तर लाभ होणें असंभवनीय आहे. जो मनुष्य आत्मसुधारणेचे प्रयत्न करतो त्याला पूर्वीं सांगितलेल्या ऋषींप्रमाणें उन्नति प्राप्त होते. इतर लोक प्रयत्न न करण्यामुळें मागें रहातात. उन्नतीचा हा नियम वाचकांनीं ध्यानीं ठेवावा.

अशा प्रकारचे जे लोक असतात त्यांची उन्नति होतच असते. म्हणून स्वतःच्या उन्नतीसाठीं अनुष्ठान करणें, सन्मार्गानें चालणें हें वाचकांस उचित आहे. पूर्वीं सांगितलेल्या ऋषींच्या जीवनाचा आदर्श स्वतःसमोर ठेऊन उन्नतीच्या मार्गावर सरळ एक एक पावलानें प्रगति करित रहावें. कधींहि अवनतीच्या मार्गानें जाऊं नये.

दुःखमोचन आणि विजयप्राप्ति

कांड. १६, सूक्त. १

(ऋषिः- अथर्वा । देवता - प्रजापतिः)

अतिसृष्टो अपां वृषभोऽतिसृष्टा अग्नयो दिव्याः ॥ १ ॥
रुजन्परिरुजन्मृणन्प्रमृणन् ॥ २ ॥
म्रोको मनोहा खनो निर्दाह आत्मदूषिस्तनूदूषिः ॥ ३ ॥
इदं तमति सृजामि तं माभ्यवनिक्षि ॥ ४ ॥
तेन तमभ्यतिसृजामो योऽस्मान्द्वेष्टि यं वयं द्विष्मः ॥ ५ ॥
अपामग्रमसि समुद्रं वोऽभ्यवसृजामि ॥ ६ ॥

अर्थ—[१] (अपां वृषभः अतिसृष्टः) पाण्याची वृष्टि करणारा मुक्त झाला. (दिव्याः अग्नयः अतिसृष्टाः) दिव्य अग्नि मुक्त करण्यांत आले. (१) (रुजन् परिरुजन्) तोडीत, तोडीत सर्व प्रकारें फाडून टाकीत (मृणन् परिमृणन्) मारून टाकीत, नाश करीत. (२) (म्रोकः खनः) घातक आणि खोदणारे (निर्दाहः) दाह करणारे (मनो-हा) मनाचा नाश करणारे आणि (आत्म-दूषिः) आत्म्याला दूषण देणारे, आणि (तनू-दूषिः) शरीराला दूषित करणारे. (३) (इदं तं अति सृजामि) या आणि त्या शत्रूस मीं दूर करतों. (तं मा अभ्यवनक्षि) मीं त्याला पुनः कदापि प्राप्त होणार नाहीं. (४) (यः अस्मान् द्वेष्टि) जे आमचा द्वेष करतात (यं वयं द्विष्मः) ज्याचा आम्हीं द्वेष करतों (तं तेन अभि अति सृजामः) त्याला त्याच्याकडून आम्हीं दूर करतो. (५) (अपां अग्रं असि) तूं जलाचा अग्रभाग आहेस. (वः समुद्रं अभिअव सृजामि) तुम्हाला मीं समुद्राकडे सोडून देतों. (६)

योऽप्स्व१ग्निरति तं सृजामि म्रोकं खनिं तनूदूषिम् ॥ ७ ॥
यो वं आपोऽग्निराविवेश स एष यद्वो घोरं तदेतत् ॥ ८ ॥
इन्द्रस्य व इन्द्रियेणाभि षिञ्चेत् ॥ ९ ॥
अरिप्रा आपो अप रिप्रमस्मत् ॥ १० ॥
प्रास्मदेनो वहन्तु प्र दुष्वप्न्यं वहन्तु ॥ ११ ॥
शिवेन मा चक्षुषा पश्यतापः शिवया तन्वोप स्पृशत त्वचं मे ॥ १२ ॥
शिवानग्नीनप्सुषदो हवामहे मयि क्षत्रं वर्च आ धत्त देवीः ॥ १३ ॥

[२]

निर्दुरर्मण्य ऊर्जा मधुमती वाक् ॥ १ ॥
मधुमती स्थ मधुमतीं वाचमुदेयम् ॥ २ ॥
उपहूतो मे गोपा उपहूतो गोपीथः ॥ ३ ॥
सुश्रुतौ कर्णौ भद्रश्रुतौ कर्णौ भद्रं श्लोकं श्रूयासम् ॥ ४ ॥
सुश्रुतिश्च मोपश्रुतिश्च मा हासिष्टां सौपर्णं चक्षुरजस्रं ज्योतिः ॥ ५ ॥
ऋषीणां प्रस्तरोऽसि नमोऽस्तु दैवाय प्रस्तराय ॥ ६ ॥

अर्थ— (यः अप्सु अग्निः) जो पाण्यांतसुद्धां अग्निरूपानें आहे, (तं अति सृजामि) त्याला मीं मुक्त करतों. (म्रोकं खनिं तनू-दूषिं) घातक, खाऊन टाकणाऱ्या, शरीरास दूषित करणाऱ्यास मीं दूर करतों. (७) (यः अग्निः आपः वः आविवेश) जो अग्नि आप म्हणजे जळांत प्रवेशला आहे. (सः एषः) तो हा आहे. (यत् वः घोरं तत् एतत्) जें आपणांसाठीं महाभयंकर तें हें आहे. (८) (इंद्रस्य इंद्रियेण वः अभिषिञ्चेत्) इन्द्राच्या इंद्रियांनीं आपणांस अभिषेक करण्यांत येवो. (९) (अरिप्राः आपः) निर्दोष पाणी आहे तें (अस्मत् रिप्रं अप) आमच्यांतील मळ दूर करो. (१०) (अस्मत् एनः प्रवहन्तु) आमच्यापासून पापास दूर करो. तसेंच (दुष्वप्नं प्र वहन्तु) दुष्ट स्वप्नाचीं कारणें दूर करो. (११) (आपः) पाण्यांनों ! (मा शिवेन चक्षुषा पश्यत) माझ्याकडे कल्याणकारी दृष्टीनें पहा. (मे त्वचं शिवया तन्वा अपस्पृशत) माझ्या त्वचेला स्वतःच्या शुभ शरीरानें स्पर्श करा. (१२) (अप्सुषदः शिवान् अग्नीन् हवामहे) पाण्यांत रहाणाऱ्या शुभकारक अग्नीला आम्हीं बोलावितों. (देवीः) हे दिव्य जळ हो ! (मयि क्षत्रं वर्चः आधत्त) माझ्यांत क्षात्रबळ आणि तेज धारण करा. (१३)

[२] (दुः अर्मण्यः निः) दुर्गति दूर होवो. (ऊर्जा मधुमती वाक्) बलशाली मधुर वाणी असो. (१) वाणी (मधुमती स्थ) मधुर असो. (मधुमतीं वाचं उदेयं) मिष्ट भाषा मीं बोलावें. (२) (मे गोपाः उपहूतः) माझ्या गोपाल-इंद्रियपालकास बोलाविण्यांत आलें (गोपीथः उपहूतः) वाणीचा रक्षक-गोरक्षक अथवा इंद्रियरक्षक बोलवण्यांत आला आहे. (३) (सु-श्रुतौ कर्णौ) माझे दोन्ही कान उत्तम ज्ञान ऐकणारे होवोत. (भद्रं श्रुतौ कर्णौ) माझे कान कल्याण वचन ऐकणारे होवोत, (भद्रं श्लोकं श्रूयासं) कल्याणमय प्रशंसा मीं ऐकतच रहावी. (४) (सुश्रुतिः च उपश्रुतिः च) उत्तम श्रवणशक्ति अथवा दुरून ऐकण्याची शक्ति (मा मा हासिष्टां) मला कधी न सोडो. (सौपर्णं ज्योतिः चक्षुः) गरुडासारखी तेजस्वी दृष्टि माझ्याजवळ (अजस्रं) सदा सर्वकाळ राहो. (५) (ऋषीणां प्रस्तरः असि) तूं ऋषींचें झांकण आहेस. (दैवाय प्रस्तराय नमः अस्तु) देवरूप प्रस्तराला (झांकणाला) नमस्कार असो. (६)

[३]

मूर्धाहं रयीणां मूर्धा समानानां भूयासम् ॥ १ ॥
रुजश्च मा वेनश्च मा हासिष्टां मूर्धा च मा विधर्मा च मा हासिष्टाम् ॥ २ ॥
उर्वश्च मा चमसश्च मा हासिष्टां धर्ता च मा धरुणश्च मा हासिष्टाम् ॥ ३ ॥
विमोकश्च मार्द्रपविश्च मा हासिष्टामार्द्रदानुश्च मा मातरिश्वा च मा हासिष्टाम् ॥ ४ ॥
बृहस्पतिर्म आत्मा नृमणा नाम हृद्यः ॥ ५ ॥
असंतापं मे हृदयमुर्वी गव्यूति समुद्रो अस्मि विधर्मणा ॥ ६ ॥

[४]

नाभिरहं रयीणां नाभिः समानानां भूयासम् ॥ १ ॥
स्वासदसि सूषा अमृतो मर्त्येष्वा ॥ २ ॥
मा मां प्राणो हासीन्मो अपानोऽवहाय परा गात् ॥ ३ ॥
सूर्यो माह्नः पात्वग्निः पृथिव्या वायुरन्तरिक्षाद्यमो मनुष्येभ्यः सरस्वती पार्थिवेभ्यः ॥ ४ ॥
प्राणापानौ मा मां हासिष्टं मा जने प्र मेषि ॥ ५ ॥
स्वस्त्यद्योषसो दोषसश्च सर्व आपः सर्वगणो अशीय ॥ ६ ॥
शक्वरी स्थ पशवो मोप स्थेषुर्मित्रावरुणौ मे प्राणापानावग्निर्मे दक्षं दधातु ॥ ७ ॥

अर्थ—[३] (रयीणां अहं मूर्धा भूयासं) धनाचा मीं मस्तकाप्रमाणें उंच स्वामी व्हावें तसेंच (समानानां मूर्धा भूयासं) समान मनुष्यांत मीं मुख्य व्हावें. (१) (रुजः च वेनः च मां मा हासिष्टां) तेज आणि कांति मला न सोडोत. (मूर्धा च विधर्मा च मा मा हासिष्टां) मस्तक आणि विशेष धर्म मला न सोडोत. (२) (उर्वः च चमसः च मा मा हासिष्टां) स्वयंपाकाची मांडी आणि चमचा मला न सोडोत. (धर्ता च धरुणः च मा मा हासिष्टां) धारक आणि आधार देणारा हे मला न सोडोत. (३) (विमोकः च आर्द्रपविः च मा मा हासिष्टां) मुक्त करणार आणि ओलें शस्त्र मला न सोडो. (आर्द्रदानुः च मातरिश्वा च मा मा हासिष्टां) पाणी देणारा आणि वायु मला न सोडोत. (४) (बृहस्पतिः मे आत्मा) माझा आत्मा ज्ञानी आणि (नृमणाः नाम हृद्यः) मनुष्यांत मनन करणाऱ्या हृदयांत रहाणारा आहे. (५)(मे हृदयं अ-संतापं) माझें हृदय संतापरहित होवो. (गव्यूतिः उर्वी) माझ्या गायीचा कळप मोठा होवो. (विधर्मणा समुद्र अस्मि) विशेष धर्मानें मीं समुद्रासारखा आहे. (६)

[४] (अहं रयीणां नाभिः) मीं धनाचें केंद्र आणि (समानानां नाभिः भूयासं) समान मनुष्यांचेंहि केंद्र व्हावें. (१) (मर्त्येषु अमृतः) मर्त्यांत अमर (सु-आसत्) उत्तम रीतीनें बसणारा आणि (सु-उषा) उत्तम तेजयुक्त तूं आत्मा (असि) आहेस (प्राणः मां मा हासित्) प्राण मला सोडून न जावो. (अपानः अवहाय मा परागात्) अपान मला सोडून दूर वर न जावो. (३) (सूर्यः अह्नः मा पातु) सूर्य दिवसा माझें रक्षण करो. (अग्निः पृथिव्याः) अग्नि पृथ्वीवरून (वायुः अंतरिक्षात्) वारा अंतरिक्षांतून (यमः मनुष्येभ्यः) यम मनुष्यांपासून आणि (सरस्वती पार्थिवेभ्यः) सरस्वती पृथ्वीपासून निर्माण होणाऱ्या पदार्थांपासून माझें रक्षण करो. (४) (प्राणापानौ मा मां हासिष्ट) प्राण आणि अपान मला न सोडोत (जने मा प्रमेषि) मनुष्यांत घातक न व्हावें. (५) हे (आपः) जळ ! (अद्य स्वस्ति) आज कल्याण असो. (उषसः दोषसः च) दिवस आणि रात्रीं (सर्वः सर्वगणः) सर्व आणि सर्व गणांनीं युक्त होऊन (अशीय) सुखास प्राप्त करावें. (शक्वरीः स्थ) आपण सामर्थ्यवान् आहांत. (पशवः मा उपस्थेषु) पशु माझेजवळ राहोत. (मित्रावरुणौ मे प्राणापानौ) मित्र आणि वरुण माझे प्राण आणि अपान आहेत. (अग्निः मे दक्षं दधातु) अग्नि मला बळ अर्पण करो. (७)

[५]

विद्म ते स्वप्न जनित्रं ग्राह्याः पुत्रोऽसि यमस्य करणः ॥ १ ॥
अन्तकोऽसि मृत्युरसि ॥ २ ॥
तं त्वा स्वप्न तथा सं विद्म स नः स्वप्न दुष्वप्न्यात्पाहि ॥ ३ ॥
विद्म ते स्वप्न जनित्रं निर्ऋत्याः पुत्रोऽसि यमस्य करणः । अन्तको० । तं त्वा० ॥ ४ ॥
विद्म ते स्वप्न जनित्रमभूत्याः पुत्रोऽसि यमस्य करणः । अन्तको० । तं त्वा० ॥ ५ ॥
विद्म ते स्वप्न जनित्रं निर्भूत्याः पुत्रोऽसि यमस्य करणः । अन्तको० । तं त्वा० ॥ ६ ॥
विद्म ते स्वप्न जनित्रं पराभूत्याः पुत्रोऽसि यमस्य करणः । अन्तको० । तं त्वा० ॥ ७ ॥
विद्म ते स्वप्न जनित्रं देवजामीनां पुत्रोऽसि यमस्य करणः । अन्तको० । तं त्वा० ॥ ८ ॥
अन्तकोऽसि मृत्युरसि ॥ ९ ॥
तं त्वा स्वप्न तथा सं विद्म स नः स्वप्न दुष्वप्न दुष्वप्न्यात्पाहि ॥ १० ॥

[६]

अजैष्माद्यासनामाद्याभूमानागसो वयम् ॥ १ ॥
उषो यस्माद्दुष्वप्न्यादभैष्माप तदुच्छतु ॥ २ ॥
द्विषते तत्परा वह शपते तत्परा वह ॥ ३ ॥
यं द्विष्मो यश्च नो द्वेष्टि तस्मा एनद्गमयामः ॥ ४ ॥

अर्थ— [५] (स्वप्न ! ते जनित्रं विद्मः) हे स्वप्ना ! तुझ्या उत्पत्तीचें कारण आम्हीं जाणतों. तूं (ग्राह्याः पुत्रः असि) व्याधींचा पुत्र आहेस. आणि (यमस्य करणः) यमाचें साधन आहेस. (१) (अन्तकः असि) अन्त करणारा आहेस (मृत्युः असि) तूं मृत्यु आहेस. (२) हे स्वप्ना ! (तं त्वा तथा सं विद्म) अशा तुला मीं जाणतों, हे स्वप्ना (स नः दुष्वप्न्यात् पाहि) असा तूं आम्हांस दुष्ट स्वप्नापासून वांचव. (३) (स्वप्न ते जनित्रं विद्म) हे स्वप्ना ! तुझ्या उत्पत्तीचा हेतु आम्हीं जाणतो. (निर्ऋत्याः पुत्रः असि) तूं दुर्गतीचा पुत्र आहेस आणि (यमस्य) यमाचें साधन आहेस. (४) स्वप्नाचा हेतु आम्हीं जाणतों. तूं (अभूत्याः पुत्रः) अभूतीचा पुत्र आहेस. (५) तूं (निर्भूत्याः पुत्रः) निर्भूतीचा पुत्र आहेस. निर्धनतेचा पुत्र आहेस. (६) तूं (पराभूत्याः पुत्रः) पराभवाचा पुत्र आहेस. (७) तूं (देव जामीनां पुत्रः) इंद्रियविकृतींचा पुत्र आहेस. (८) (अन्तकः असि मृत्युः असि) तूं अन्तक आणि मृत्यु आहेस. (९) (स्वप्न तं त्वा तथा संविद्म) हे स्वप्ना अशा तुला आम्हीं जाणतों. (सः नः दुष्वप्न्यात् पाहि) असा तूं आम्हांस दुष्ट स्वप्नापासून वांचीव. (१०)

[६] (अद्य अजैष्म) आज आम्ही विजय प्राप्त केला आहे (अद्य असनाम्) आम्हीं मिळवावयाचें मिळविलें आहे, (वयं अनागसः अभूम) आम्ही निष्पाप झालों आहोंत. (१) हे (उषः) उषःकाल ! आम्हीं (यस्मात् दुष्वप्न्यात् अभैष्म) ज्या दुष्ट स्वप्नाची आम्हांस भीति वाटते (तत् अप उच्छतु) तें आम्हांपासून दूर जावो. (२) (तत् द्विषते परावह) त्या द्वेष करणाऱ्यास दूर घेऊन जा. (तत् शपते परावह) त्या शाप देणाऱ्यास दूर घेऊन जा. (३) (यं द्विष्मः) ज्याचा आम्हीं द्वेष करतों, (यत् च नः द्वेष्टि) आणि जो आमचा द्वेष करतो (तस्मै एनत् गमयामः) त्याच्याजवळ आम्हीं त्यांना घेऊन जातों. (४)

उषा देवी वाचा संविदानो वाग्देव्युषसा संविदाना ॥ ५ ॥
उषस्पतिर्वाचस्पतिना संविदानो वाचस्पतिरुषस्पतिना संविदानः ॥ ६ ॥
तेऽमुष्मै परा वहन्त्वरायान्दुर्णाम्नः सदान्वाः ॥ ७ ॥
कुम्भीका दूषीकाः पीयकान् ॥ ८ ॥
जाग्रदुष्वप्न्यं स्वप्नेदुष्वप्न्यम् ॥ ९ ॥
अनागमिष्यतो वरानवित्तेः संकल्पानमुच्या द्रुहः पाशान् ॥ १० ॥
तदमुष्मा अग्ने देवाः परा वहन्तु वध्रिर्यथासद्विथुरो न साधुः ॥ ११ ॥

[७]

तेनैनं विध्याम्यभूत्यैनं विध्यामि निर्भूत्यैनं विध्यामि
पराभूत्यैनं विध्यामि ग्राह्यैनं विध्यामि तमसैनं विध्यामि ॥ १ ॥
देवानामेनं घोरैः क्रूरैः प्रैषैरभिप्रेष्यामि ॥ २ ॥
वैश्वानरस्यैनं दंष्ट्रयोरपि दधामि ॥ ३ ॥
एवानेवाव सा गरत् ॥ ४ ॥
योऽस्मान्द्वेष्टि तमात्मा द्वेष्टु यं वयं द्विष्मः स आत्मानं द्वेष्टु ॥ ५ ॥

अर्थ—(उषा देवी वाचा संविदाना) उषादेवी वाणीनें संमीलित होवो आणि (वाक्‌देवी उषसा संविदानाः) वाचा देवी उषादेवीशीं संमीलित होवो. (५) (उषस्पतिः वाचस्पतिना संविदानः) उषेचे पति वाणीच्या पतीशीं संमीलित होवो, आणि (वाचस्पतिः उषस्पतिना संविदानः) वाणीचा पति उषेच्या पतीला मिळो. (६) (ते अरायान् दुर्णाम्नः सदान्वाः) त्या निर्धनता, दुष्ट नांवाच्या पीडा अन्य संकटें (अमुष्मै परा वहन्तु) त्या शत्रूजवळ जावोत. (७) (कुम्भीकाः दूषिकाः पीयकान्) घड्याप्रमाणें वाढणारे उदररोग, शरीरांत दोष उत्पन्न करणारे रोग, प्राणघातक रोगांचें. (८) तसेंच (जाग्रत् दुष्वप्न्यं) जागे होतांना पडणारें दुष्ट स्वप्न आणि (स्वप्ने दुष्वप्न्यं) स्वप्नाचे वेळीं पडलेलें दुष्ट स्वप्न. (९) अनागमिष्यतः वरान्) न प्राप्त होणारा श्रेष्ठ पदार्थ, (अवित्तेः संकल्पान्) दरिद्रतेचा संकल्प (अमुच्याः द्रुहः पाशान्) न सुटणाऱ्या द्रोहाच्या पाशानां (१०) हे अग्ने ! त्या सर्व विपत्तींना (तत् अमुष्मै) शत्रुजवळ (देवाः परा वहन्तु) सर्व देव घेऊन जावोत. (यथा) याप्रमाणें ते शत्रु (वध्रिः) निर्बळ (विथुरः) व्यथायुक्त आणि (साधुः न असत्) खराब होवोत. (११)

[७] (तेन एनं विध्यामि) त्यानें मीं याचा वेध करतों (अभूत्या निर्भूत्या ग्राह्या एनं विध्यामि) दुर्गति, दारिद्र्य आणि रोगानें त्याचा वेध करतों (पराभूत्या०) पराभवानें त्याला पीडित करतों. (तमसा एनं विध्यामि) अज्ञानानें मीं त्याचा वेध करतों. (१) (देवानां घोरैः क्रूरैः प्रैषैः) देवांच्या घोर, क्रूर, दुःखानें (एनं अभिप्रेष्यामि) त्याला मीं दुःखी करतों. (२) (वैश्वानरस्य दंष्ट्रयोः एनं अपि दधामि) वैश्वानराच्या दाढेंत मीं त्याला सोंपून देतो. (३) (सा एव अनेव) ती आपत्ति याप्रमाणें अथवा अन्य तऱ्हेनें शत्रूला (अव गरत्) गिळून जावो. (४) (यः अस्मान् द्वेष्टि) जो आमचा द्वेष करतो, (तं आत्मा द्वेष्टु) त्याचा आत्मा द्वेष करो. (यं वयं द्विष्मः) ज्याचा आम्हीं द्वेष करतों, (सः आत्मानं द्वेष्टु) तो स्वतःच्या आत्म्याचा द्वेष करो. (५)

निर्द्विषन्तं दिवो निः पृथिव्या निरन्तरिक्षाद्भजाम ॥ ६ ॥
सुयामंश्चाक्षुष ॥ ७ ॥
इदमहमामुष्यायणेऽमुष्याः पुत्रे दुष्वप्न्यं मृजे ॥ ८ ॥
यदुदोअदो अभ्यगच्छन्यद्दोषा यत्पूर्वां रात्रिम् ॥ ९ ॥
यज्जाग्रद्यत्सुप्तो यद्दिवा यन्नक्तम् ॥ १० ॥
यदहरहरभिगच्छामि तस्मादेनमव दये ॥ ११ ॥
तं जहि तेन मन्दस्व तस्य पृष्टीरपि शृणीहि ॥ १२ ॥
स मा जीवीत्तं प्राणो जहातु ॥ १३ ॥

[८]

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् । ॥ १ ॥
तस्मादमुं निर्भजामोऽमुमामुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ॥ २ ॥
स ग्राह्याः पाशान्मा मोचि ॥ ३ ॥
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ ४ ॥

अर्थ— (द्विषन्तं) द्वेष करणाऱ्याचा (दिवः अन्तरिक्षात् पृथिव्याः) द्युलोक, अन्तरिक्ष आणि पृथ्वीवरून (निः भजामः) आम्हीं सामना करतों. (६) हे (सुयामन् चाक्षुष) उत्तम नियामक निरीक्षका ! (इदं अहं) हामीं (अमुष्यायणे अमुष्याः पुत्रे) या गोत्राच्या त्या पुत्राकडे (दुष्वप्न्यं मृजे) दुष्ट स्वप्नास पाठवितों, (८) (यत् अदः अदः) जो हा दोष (अभिगच्छन्) मीं त्यांत प्राप्त करतो. (यत् दोषा यत् पूर्वां रात्रिं) जो पूर्व रात्रीं अथवा रात्रीं, (९) (यत् जाग्रत्) जो जागतां जागतां (यत् सुप्तः) जो झोंपतां झोंपतां (यत् दिवा यत् नक्तं) जो दिवसां तसाच जो रात्रीं, (१०) (यत् अहः अहः अभिगच्छामि) जो प्रतिदिवशीं मीं पहातों. (तस्मात् एनं अव दये) त्या दोषाच्यामुळें मीं त्याला मारतों. (११) (तं जहि) त्याला मारून टाक, (तेन मन्दस्व) त्याच्यासह चल, (तस्य पृष्टीः अपि शृणीहि) त्याच्या फांसळ्या तोडून टाक. (१२) (स मा जीवीत्) तो जिवंत राहूं नये (तं प्राणः जहातु) प्राण त्याला सोडून देवो. (१३)

[८] (अस्माकं जितं) आमचा विजय होवो (अस्माकं उद्भिन्नं) आमचा उदय होवो (अस्माकं ऋतं) आमचें सत्य आहे (अस्माकं तेजः) आमचें तेज वाढो (अस्माकं ब्रह्म) आमचें ज्ञान वाढो (अस्माकं स्वः) आमचा आत्मप्रकाश वाढो (अस्माकं यज्ञः) आमचा यज्ञ सफल होवो. (अस्माकं पशवाः) आमचे जवळ पशु असोत, (अस्माकं प्रजाः) आमची प्रजा वाढो (अस्माकं वीराः) आमच्यांत वीर पुरुष होवोत. (१) (तस्मात् अमुं निर्भजामः) या अपराधामुळें आम्हीं त्या शत्रूंवर हल्ला करतों. (अमुं अमुष्यायणं अमुष्याः पुत्रं असौ यः) जो या गोत्रांतील पुत्र तो आमचा शत्रु आहे. (२) (सः ग्राह्याः पाशात् मा मोचि) तो रोगाच्या पाशांतून न सुटो. (तस्य इदं वर्चः तेजः प्राणं आयुः निवेष्टयामि) त्याच्या त्या तेज, बल, प्राण, आणि दीर्घायुष्यास मीं घेरून टाकतों. (इदं एनं अधराञ्चं पादयामि) आणि त्याला हा मीं खालीं पाडतों. (४)

जितम्० ।०। स निर्ऋत्याः पाशान्मा मोचि ।० ॥ ५ ॥
जितम्० ।०। सोऽभूत्याः पाशान्मा मोचि ।० ॥ ६ ॥
जितम्० ।०। स निर्भूत्याः पाशान्मा मोचि ।० ॥ ७ ॥
जितम्० ।०। स पराभूत्याः पाशान्मा मोचि ।० ॥ ८ ॥
जितम्० ।०। स देवजामीनां पाशान्मा मोचि ।० ॥ ९ ॥
जितम्० ।०। स बृहस्पतेः पाशान्मा मोचि ।० ॥ १० ॥
जितम्० ।०। स प्रजापतेः पाशान्मा मोचि ।० ॥ ११ ॥
जितम्० ।०। स ऋषीणां पाशान्मा मोचि ।० ॥ १२ ॥
जितम्० ।०। स आर्षेयाणां पाशान्मा मोचि ।० ॥ १३ ॥
जितम्० ।०। सोऽङ्गिरसां पाशान्मा मोचि ।० ॥ १४ ॥
जितम्० ।०। स आङ्गिरसानां पाशान्मा मोचि ।० ॥ १५ ॥
जितम्० ।०। सोऽथर्वणां पाशान्मा मोचि ।० ॥ १६ ॥
जितम्० ।०। स आथर्वणानां पाशान्मा मोचि ।० ॥ १७ ॥
जितम्० ।०। स वनस्पतीनां पाशान्मा मोचि ।० ॥ १८ ॥
जितम्० ।०। स वानस्पत्यानां पाशान्मा मोचि ।० ॥ १९ ॥
जितम्० ।०। स ऋतूनां पाशान्मा मोचि ।० ॥ २० ॥
जितम्० ।०। स आर्तवानां पाशान्मा मोचि । ॥ २१ ॥
जितम्० ।०। स मासानां पाशान्मा मोचि । ॥ २२ ॥
जितम्० ।०। सोऽर्धमासानां पाशान्मा मोचि । ॥ २३ ॥
जितम्० ।०। सोऽहोरात्रयोः पाशान्मा मोचि । ॥ २४ ॥
जितम्० ।०। सोऽह्नोः संयतोः पाशान्मा मोचि । ॥ २५ ॥
जितम्० ।०। द्यावापृथिव्योः पाशान्मा मोचि ।० ॥ २६ ॥
जितम्० ।०। स इन्द्राग्न्योः पाशान्मा मोचि ।० ॥ २७ ॥
जितम्० ।०। स मित्रावरुणयोः पाशान्मा मोचि ।० ॥ २८ ॥

अर्थ (सः निर्ऋत्याः पाशान्मा मोचि) तो दुर्गतीच्या पाशांतून सुटून न जावो. (५) (सः अभूत्याः पाशान् मा मोचि) तो दारिद्र्याच्या पाशांतून न सुटो. (६) (सः निर्भूत्याः पाशान् मा मोचि) तो खराब अवस्थेच्या पाशांतून न सुटो (७) (सः पराभूत्याः पाशान् मा मोचि) तो पराजयाच्या पाशांतून मुक्त न होवो. (८) (सः देवजामीनां पाशात् मा मोचि) तो इन्द्रियदोषांच्या पापांतून न सुटो. (९)

जितम्० ।०। स राज्ञो वरुणस्य पाशान्मा मोचि ।० ॥ २९ ॥

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं

यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् ।

तस्मादमुं निर्भजामोऽमुमामुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः

स मृत्योः पड्वींशत्पाशान्मा मोचि ।

तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ ३०–३३ ॥

[९]

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमभ्यष्ठां विश्वाः पृतना अरातीः ॥ १ ॥

तदग्निराह तदु सोम आह पूषा मा धात्सुकृतस्य लोके ॥ २ ॥

अगन्म स्वः स्वरगन्म सं सूर्यस्य ज्योतिषागन्म ॥ ३ ॥

वस्योभूयाय वसुमान्यज्ञो वसु वंशिषीय वसुमान्भूयासं वसु मयि धेहि ॥ ४ ॥

अर्थ-- (सः बृहस्पतेः... प्रजापते...ऋषीणां...आर्षेयाणां... अंगिरसां... आंगिरसानां... अथर्वणां .. आथर्वणानां... वनस्पतीनां...वानस्पत्यानां...ऋतूनां... आर्तवानां... मासानां... अर्धमासानां...अहोरात्रयोः...अह्नः... संयतः... द्यावापृथिव्योः... इन्द्राग्न्योः ...मित्रावरुणयो... वारुणस्य राज्ञ...मृत्योः पडशीशात् मा मोचि (१०–३२) तो बृहस्पति, प्रजापति ऋषि, ऋषीपासून उत्पन्न झालेले, अंगिरस, अंगिरसांपासून उत्पन्न झालेले, अथर्व, अथर्वापासून उत्पन्न झालेले वनस्पति, वनस्पतीपासूण उत्पन्न झालेले, ऋतु, ऋतूंपासून उत्पन्न झालेले, महिने, अर्ध महिने अहोरात्र, दिवस, द्यु, पृथिवी, इन्द्र, अग्नि, मित्र, वरुण, राजा वरुण आणि मृत्यु यांच्या पाशांतून न वाचो, (१०–३२) (तस्य इदं) त्याचें हें तेज, कांति, प्राण, आयु, इत्यादींना मीं घेरतों आणि खालीं पाडतों. (३३)

[९] (अस्माकं जितं) आमचा विजय होवो (अस्माकं उद्भिन्नं) आमचा उदय होवो (विश्वाः पृतनाः अरातीः) सर्व शत्रूसेनांचा निरोध केला आहे. (१) (अग्निः तत् आह) अग्नीनें हें सांगितलें आहे (सोमः उ तत् आह) सोमानें हें सांगितलें आहे. (पूषा सुकृतस्व लोके मा धात्) पूषा मला पुरुष लोकांत धारण करो. (२) आम्हीं (स्वः अगन्म) आत्म्याच्या ज्योतीस प्राप्त करतों. (स्वः अगन्म) आम्हीं आमच्या तेजास प्राप्त करतों. (सूर्यस्य ज्योतिषा स्वं अगन्म) सूर्याच्या ज्योतीशीं आम्हीं संयुक्त होतो. (३) (वस्यः भूयाय) ऐश्वर्याच्या वृद्धीसाठीं (वसुमान् भूयासं) धनयुक्त व्हावें (वसुमान् यज्ञः) ऐश्वर्य यज्ञच आहे. (वसुवं शिषीय) ऐश्वर्य प्राप्त करूं मयि वसु धेहि) माझ्यांत धनाची धारणा कर. (४)

दुःखमोचन आणि विजयप्राप्ति

विजयाची प्राप्ति

प्रत्येक मनुष्यानें विजयासाठीं प्रयत्न केला पाहिजे. लहानांत लहान मूल सुद्धां स्वतःचा पराभव सहन करूं शकत नाहीं. पराभवाची थोडी जरी शंका आली तर तें मूल रडूं लागतें. हातपाय झाडूं लागतें, आणि पराभवापासून दूर पळण्याचा यत्न करतें, त्याचप्रमाणें मोठ्या मनुष्यांत सुद्धां पराभव स्वीकारण्याची वृत्ति असत नाहीं. नेहमीं स्वतःचा विजय व्हावा, स्वतःचें यश वाढावें, स्वतःची कीर्ति चारी दिशांस पसरावी हीच एक इच्छा मनुष्य नेहमीं बाळगीत असतो.

तेव्हां असा विजय मनुष्यास कसा प्राप्त होईल याचा विचार केला पाहिजे. या सूक्तांतील पर्यायांत विजयप्राप्तीसाठीं आवश्यक तत्त्वांचा विचार केला आहे. म्हणून स्वतःस विजय प्राप्त व्हावा असें इच्छिणाऱ्या मनुष्यानें त्याचें मनन करावें आणि त्यापासून लाभ करून घ्यावा.

विजयाचे प्रकार

विजयाचे पुष्कळ प्रकार आहेत. पहिला आध्यात्मिक विजय, दुसरा आधिभौतिक क्षेत्रांतील विजय, तिसरा आधिदैविक क्षेत्र-संबंधीं विजय. हे तीन मुख्य प्रकारचे विजय आहेत. या प्रत्येक क्षेत्रांतील विजयांचे सुद्धां दुसरे अनेक पोट प्रकार आहेत. त्या सर्वांचा येथें विचार करणें शक्य नाहीं. तरीसुद्धां त्यांचे थोडेसें स्वरूप सुबोधतेसाठीं येथें स्पष्ट करूं.

आध्यात्मिक विजय

आध्यात्मिक क्षेत्रांत शरीर, इंद्रिय, मन, प्राण, बुद्धि, अहंकार, चित्त, काम, आत्मा, प्रकृति आणि इतर सर्व प्रकारच्या विकृतींचा समावेश होतो. त्यांना निर्दोष ठेवणें, त्यांना स्वतःच्या शक्तीनें परिपूर्ण करणें आणि त्या सर्वांना आत्मोन्नतीच्या कामीं निर्विघ्न-पणें जोडणें, यामुळें अध्यात्मिक क्षेत्रांत विजय प्राप्त होतो. येथें प्रत्येक इंद्रियाची प्रकृति, त्याची विकृति, त्यांच्यांत उत्पन्न होणारे दोष आणि रोग, त्यांचे गुण वगैरे सर्वांचा विचार करावयास हवा. असेंच समजाना कीं संपूर्ण वैद्यशास्त्र, आरोग्यशास्त्र, मानसशास्त्र इत्यादि शास्त्रें आध्यात्मिक विजयाची सिद्धता करण्यास जणूं कार्य मनुष्यास प्राप्त झालीं आहेत. त्याची सूचना प्रथम पर्यायसूक्तांत अशी दिली आहे.

निर्दाहः तनूदूषिः मनोहा आत्मदूषिः इदं-तं अतिसृजामि।

' शरीराची आग, शरीरांतील सर्व दोष, मनाचे विनाशक भाव आणि आत्म्याचे घात करणारे सर्व विचार हे सर्व मीं दूर करितों ' या चारींमध्यें आत्म्याचा पराजय होण्याची कारणें येऊन गेलीं आहेत. विविध रोगांच्यामुळें आपल्या शरीरांत दाह, पीडा, कष्ट आणि दुःख हे उत्पन्न होतात, तेव्हांच विविध रोग होतात. मनांतील खराब विचारांच्या कारणांनीं मन निर्बळ होत जातें. आणि या सर्वांमुळें आत्म्याचें पतन होतें. वाचकांनीं या चार शब्दांचा विचार करावा आणि या चारांच्यामुळें आत्म्याला क्लेश कसे होतात, हें नीट समजून घ्यावें. नीट विचार केला तर वाचकांच्या हें ध्यानीं यावें कीं मनुष्याच्या वैयक्तिक क्लेशांचीं हीं चार मुळें आहेत. जर त्यांच्या बाबतींत योग्य निर्बंध घातले गेले तर आध्यात्मिक क्षेत्रांत निश्चयपूर्वक विजय प्राप्त होईल. पूर्वोक्त चार शब्दांचे प्रतिशब्द जाणले असतां विजयाचीं साधनें ध्यानीं येतील.

शमः तनूशुद्धिः मनःशुद्धिः आत्मशुद्धिः ।

हे चार शब्द असे आहेत कीं त्यांनीं पूर्वोक्त चार दोष दूर होऊं शकतात. इंद्रियदमन, इंद्रियशमन इत्यादिमुळें शरीराचा दाह दूर होतो. आणि शरीरांत सर्वत्र शांति होते. तनुशुद्धीनें शरीरांतील सर्व दोष दूर होतात. मनाच्या पवित्रतेनें मानसिक बळ वाढतें आणि आत्मशुद्धीनें आत्मोद्धार अथवा आत्मोन्नति होते. असा विचार केला तर कळून येतें कीं अध्यात्मोन्नतीचीं हीं चार साधनें आहेत. यासाठींच पूर्वोक्त चार दोषांना दूर करण्याची सूचना प्रथम मंत्रांत केलेली आहे. श्रीमद्भगवद्गीतेंत या उद्देशानें म्हटलें आहे कीं—

ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते।
संगात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ॥६२॥
क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥६३॥
रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्चरन् ।
आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ॥ ६४ ॥
प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते ।
प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते ॥ ६५ ॥

(भ. गी. २)

' विषयांच्या चिंतनानें आसक्ति, आसक्तीमुळें कामना, कामनेमुळें क्रोध, क्रोधानें मूर्खपणा, मूर्खपणानें बुद्धिनाश, आणि बुद्धिनाशानें मनुष्याचा सर्वनाश होतो, परंतु ' ज्याचें मन त्याच्या ताब्यांत असते आणि ज्याचीं इंद्रियें रागद्वेषरहित आहेत ते इंद्रियांकडून कार्य करवून घेऊन सुद्धां प्रसन्न रहातात, चित्त प्रसन्न राहिलें म्हणजे सर्व दुःखें दूर होतात आणि त्याची बुद्धि स्थिर रहाते. या श्लोकांत आध्यात्मिक दुःखाचीं कारणें सांगितलीं आहेत आणि तीं दूर करण्याचे उपायसुद्धां सांगितले आहेत म्हणून हे श्लोक आत्मविजयाचा विचार करण्याच्या समयीं पुष्क-ळच बोधप्रद होऊं शकतात. असो. याप्रकारें जे जे दोष शरीर, इंद्रियें, मन, बुद्धि आणि आत्म्यामध्यें असतात ते काय करितात तें पाहूं—

रुजन् प्रमृणन्, प्रोकः खनः। (पर्याय सू. १।२-३)

जेथें दोष असतात तेथें ते ' तोडतात, मुरगाळून टाकतात, चिरडतात, फोडतात, कापतात, खोदतात, खाडा करतात, ' अशा प्रकारें अनेक रीतीनें नाश करतात. वाचक जर काम आणि क्रोधाच्या वेळीं आत्मनिरीक्षण करतील तर त्यांना स्पष्ट कळून येईल कीं, हा काम आणि क्रोध मनुष्याच्या शरीरांत कोणत्या प्रकारें तोडण्याचें, फोडण्याचें, मुरगळण्याचें, खोदण्याचें आणि नाश करण्याचें कार्य करतात. कामानें तर शरीराचा आधार जें वीर्य त्याचाच नाश होतो. क्रोधानें रक्तांत असलेले जीवनबिंदु नष्ट होतात. याप्रमाणें सर्व विकार तोडण्या-फोडण्याचें, नाश करण्याचें काम करतात. यासाठीं अध्यात्मिकतेच्या या सर्व शत्रूंना दूर केलें पाहिजेः म्हणून म्हटलें आहे—

यं वयं द्विष्मः तं अभि अतिसृजाम। (मं. १।५)
प्रोकं खनिं तनूदूर्षिं अतिसृजामि। (१।७)

' ज्या रोगादिकांचा आणि विविध दोषांचा आम्हीं द्वेष करतों अर्थात् त्यांना आम्हीं आमच्याजवळ ठेवूं इच्छित नाहीं त्यांना आम्हीं दूर करतों. घातक, खोदणारे, शरीरांत दोष वाढविणारे अशा सर्व दोषांना आम्हीं दूर करतों. या दोषांना एवढ्यासाठीं दूर करावयाचें कीं, अध्यात्मक्षेत्रांतील सर्व दोष दूर होऊन प्रसन्नता व्हावी. या विषयीं आणखी पहा—

यत् वः घोरं तत् (अतिसृजामि)। (मं. १।८)
अरिप्राः आपः अस्मत् एनः प्रवहन्तु। (मं. १।१९-१०)
आपः शिवया तन्वा मा उपस्पृशत्। (मं. १।१२)
इन्द्रस्य इन्द्रियेण अभिशिञ्चत्। (मं. (१।९)

' आपणांमध्यें जे भयंकर आणि हानिकारक दोष असतील त्यास मीं सर्व प्रथम दूर करतो. दोष दूर करण्यास जलचिकित्सा करणें आवश्यक आहे. शुद्ध जल आमच्या शरीरांतील सर्व दोषांस आणि सर्व पापांस दूर करो. जल स्वतःच्या शुद्ध गुणानें माझ्या शरीरास स्पर्श करो. इन्द्र म्हणजे आत्म्याच्या शक्तीनें अभिषेक करण्यांत यावा. येथें जलचिकित्सेनें शरीरांतील सर्व दोष दूर करण्याचा उपदेश आहे. तो अत्यंत महत्वाचा आहे. शरीरांत जे कांहीं दोष असतील ते पाण्याच्या विविध प्रकारांनीं दूर करावयाचे याला जलचिकित्सा म्हणतात. शरीरास थंड पाण्याचा स्पर्श सुखदायक झाला कीं समजावें शरीर स्वस्थ आहे. जेव्हां थंड पाण्याचा स्पर्श दुःखदायक वाटेल तेव्हां समजावें कीं शरीरांत कांहीं रोग शिरला आहे. असे सर्व रोग जलचिकित्सेनें दूर केले पाहिजेत. आणि इन्द्रशक्तीच्या जलानें स्नान केलें पाहिजे. ज्याप्रमाणें पाण्याच्या स्नानानें सर्व शरीर भिजतें त्याप्रमाणें आत्म्याच्या शक्तीनें सर्व शरीर संचारित व्हावयास हवें. सर्व शरीरांत आत्मशक्तीचा सुखानें संचार व्हावयास हवा म्हणून—

मयि क्षत्रं वर्चः आधत्त। (१।१३)

' मनुष्यांत क्षात्रबळ आणि तेजस्विता वाढेल. ' पाणीच हें सर्व कार्य करील. जलचिकित्सेनें वीर्य वाढते, दोष दूर होतात आणि शरीराची कांति सुद्धां वाढते. या प्रकारें शरीराचें उत्तम स्वास्थ्य प्राप्त होईल, हे स्वास्थ्य मनुष्याला प्राप्त व्हावें म्हणून—

अपां वृषभः अतिसृष्टः
दिव्याः अग्नयः अतिसृष्टाः। (मं. १।१)

पाण्याची वृष्टि करणारे मेघ स्वतःच्या स्थानापासून मुक्त झाले म्हणजे त्यांच्यापासून वृष्टि झाली, दिव्य अग्नि म्हणजे जी वीज आहे ती मोकळेपणानें प्रगट होत आहे. ' म्हणजे विशेष प्रमाणांत वृष्टि होऊन गेली आहे. परमेश्वरी नियमांनीच वृष्टि होते. तिचा उपयोग असा कीं मनुष्यानें त्या जळाच्या योगें स्वास्थ्य प्राप्त करून घ्यावें आणि स्वतःची आत्मिक उन्नति साधावी. येथें आत्मिक उन्नतीचा उपदेश करीत असतां मेघाच्या दृष्टांतानें सर्व लोकांस असें जाणविलें आहे कीं ज्याप्रमाणें मेघ जगाच्या कल्याणासाठीं आत्मसमर्पण पूर्णपणें करतो, तसा आपणहि लोककल्याणासाठीं आत्मयज्ञ केला पाहिजे. इतका विचार या कांडाच्या पहिल्या पर्यायसूक्तांत मुख्यतः केला आहे. स्वतःच्या उन्नतीची इच्छा करणाऱ्या वाचकांनीं त्याच्या मननानें पर्याप्त बोध प्राप्त करावा.

इन्द्रियशुद्धि

आत्मोन्नतीसाठीं इंद्रियांची पवित्रता अत्यंत आवश्यक आहे. पवित्रतेवांचून कोणाची कधींहि उन्नति होणें शक्यच नाहीं, म्हणून द्वितीय पर्यायसूक्तांत पवित्रतेचा विषय संक्षेपानें सांगण्यांत आला आहे. सुरवातीसच जो उपदेश केला तो वाचकानें नीट वाचावा आणि लक्षांत ठेवावा.

दुः+ अमण्यः निः। (मं २।१)

' दुष्ट रीतीची गति अर्थात् दुष्ट कृत्यें, दुष्ट विचार, दुष्ट वागणूक दूर होवोत. दुष्ट व्यवहार आमच्यापासून अगदीं दूर राहोत. ' दुष्ट गति करणारे भाव आमचे ठिकाणीं न रहावेत

आणि आमच्या समाजांत दुराचारी माणुस पण असूं नये. अशा प्रकारें एक मनुष्य सुधरल्यानें सर्व समाज सुधरून जाईल. जो सुधारण्यासाठीं एका मनुष्यासाठीं नियम आहे तोच सर्व समाज सुधारण्यासाठीं लागू आहेत. व्यक्तीची सुधारणा करण्यासाठीं दुष्ट गुण दूर करावयाचे तसेंच सर्व समाज सुधारण्यासाठीं दुष्ट मनुष्यें दूर करावयास हवींत. दुष्ट गुणयुक्त मनुष्यें दूर करावयाची याचा अर्थ असा कीं समाजांतून दुष्ट गुणांचें स्थानच नष्ट करावयाचें. म्हणजे असें कीं सार्वत्रिक उन्नतीचा नियम दुष्टता दूर करणें, हटविणें हाच आहे, याप्रमाणें सर्व साधारण उन्नतीचा उपदेश केल्यानंतर विशेष स्पष्टीकरण करण्यासाठीं कित्येक इंद्रियांचा निर्देश करून आत्मसुधारणेचा मार्ग दाखविला आहे—

ऊर्जा मधुमती वाक् । मधुमतीं वाचं उदेयम् ॥

(मं. २। १–२)

वाणी मधुर होवो तशीच बलशाली होवो. मनुष्यानें मधुर आणि बलयुक्त वाणीनें एक दुसऱ्याशीं भाषण करावें.' मनुष्यांची आपापसांत भांडणें होतात त्याचें कारण कडु शब्दच आहेत. मनुष्याच्या मनांत विष भरलेलें असतें, तें कडु शब्दांच्या रूपानें बाहेर येतें. आणि त्यांच्या आजुबाजुस विषयुक्त वायुमंडळ निर्माण करतें. म्हणून मनुष्य जर स्वतःची अंतःशुद्धि करील तर त्याच्याकडून केव्हांही कडु शब्दांचा प्रयोग होणार नाहीं.

मनुष्यानें असें बोलावें कीं तें मधुर असावें, त्यामुळें शत्रूंमध्यें सुद्धां आपणांविषयीं मित्रता उत्पन्न व्हावी, सद्भावना निर्माण व्हावी, निर्माण झालेली मित्रता सुदृढ व्हावी. केवळ शब्दांतील मधुरता त्या कामीं पुरेशी होत नाहीं. परंतु शब्दांत (**ऊर्जः**) बळ असलें पाहिजे. नाहींतर कित्येक मनुष्यें स्वतःच्याच मुलाला 'गुलाम' म्हणून हाक मारतात. दुसऱ्या मनुष्याला 'तूं मरशील' असें म्हणतात. 'तूं अगदीं हरामखोर आहेस,' असेंहि म्हणतात. अशा शब्दांनीं आपली वाणी तर मलिन होते परंतु ऐकणाऱ्याच्या मनांत निर्बलतेचें वायुमंडळ उत्पन्न होतें एवढ्यासाठीं प्रत्येक मनुष्यास हें योग्य आहे कीं त्यानें बलशाली आणि प्रभावपूर्ण शब्दाचा प्रयोग करावा. स्वतःच्या पुत्राला 'तूं इंद्र आहेस' 'तूं अमर होशील,' असें म्हणावें. 'तूं सत्यस्वरूप आहेस, तूं स्वयं आनंदघन आहेस. असें म्हणावें, असें बोलण्यानें ऐकणाराच्या मनांत उत्साहाचे वायुमंडळ निर्माण होतें मनुष्याचीं नांवें धोंडोपंत, गोट्या अथवा गबाजी असलीं ठेवण्यापेक्षां, अभय, निर्भय, हिंमतसिंह, पराक्रमसिंह, संग्राम अशी तोंडभर ठेवावी, कीं ज्यांच्या उच्चारानें आपल्या मनांत शुभ विचार उत्पन्न व्हावेत. प्रत्येक वाचकानें निश्चयपूर्वक असा प्रयत्न करावा कीं स्वतःची वाणी कधींहि अशुभ विचार प्रगट करण्यासाठीं मीं वापरणार नाहीं. आणि नेहमीं उत्साहमय विचारच प्रगट करीत राहीन. यासाठीं मनुष्यानें काय केलें पाहिजे ? या प्रश्नाचें उत्तर येथें केवळ दोन शब्दांनीच दिलें आहे. '**गो-प**' आणि **गोपी-थः** हे दोन्ही शब्द अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. मनुष्याचा संपूर्ण सत्यधर्म यांत आलेला आहे. **गो-प** शब्दाचा अर्थ इंद्रियांचें रक्षण आणि गोपी याचा अर्थ इंद्रियांचें पालन असा आहे. एकानें शक्तिवर्धनाचा बोध मिळतो, दुसऱ्यानें इंद्रियसंयमाचा. ज्याप्रमाणें गायी राखणार गायींना उत्तम गवत वगैरे खाण्यास देतात आणि त्यायोगें त्यांस परिपुष्ट करतात. तसेंच त्यांना इकडे तिकडे रखडूं न देता स्वतःच्या ताब्यांत ठेवतात तद्वत् मनुष्यानें स्वतःच्या इंद्रियशक्ति स्वतःच्या ताब्यांत ठेवाव्यात, मनोनिग्रहानें तें साध्य होतें. मनुष्यास उन्नतीसाठीं इंद्रियसंयम आणि मनोनिग्रह हे अत्यंत आवश्यक आहेत. वाचकांनीं या दोन शब्दांचा नीट विचार करावा आणि योग्य बोध घ्यावा. जे असा संयम पाळणारे असतात त्यांना (**उपहूतः**) आपणांजवळ बोलाविलें पाहिजे. जीं मनुष्यें स्वतःच्या इंद्रियांस स्वेच्छाचारी होऊं देतात, तीं समाजांत आदरपूर्वक बोलावण्यास पात्र नाहींत. वाचकांनींच याचा विचार करावा आणि या वेदोपदेशानें स्वतःचें वैयक्तिक आणि सामाजिक आचरण सुधरावें. पुढें वाचकानां या विषयीं सुद्धां सुंदर उपदेश केला आहे.

भद्रश्रुतौ कर्णौ । सुश्रुतौ कर्णौ । भद्रं श्लोकं श्रूयासम् ।
सुश्रुतिः च उपश्रुतिः च मा मा हासिष्टाम् ।

(मं. २।४–५)

' माझे कान चांगला उपदेश ऐकोत, माझे कान चांगला उपदेश ऐकून पवित्र होवोत. ' कल्याणकारक वाणीच मीं ऐकावी, उत्तम उपदेश ऐकण्याची आणि चांगले शब्द दुरूनसुद्धां ऐकण्याची माझी शक्ति कधींहि क्षीण न होवो. ' येथें कानांच्या सार्थकतेचें साधन दर्शविलें आहे. ईश्वरानें मनुष्यास कान एवढ्यासाठीं दिले आहेत कीं त्यानें नेहमीं चांगला उपदेश ऐकावा, खराब शब्द कधींहि ऐकूं नयेत. ऋग्वेदांत सुद्धां सांगितलें आहे कीं—

भद्रं कर्णेभिः श्रृणुयामदेवा भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः।

(ऋ. १।८९।८)

'आम्हीं कानांनीं कल्याणकारक गोष्टी ऐकाव्या आणि डोळ्यांनीं शुभ गोष्टी पहाव्यात.' हा सर्व उपदेश एवढ्यासाठीं आहे कीं त्यायोगें मनुष्याची सुधारणा व्हावी, मनुष्य पवित्र व्हावा, मनुष्याची उन्नति व्हावी. याप्रमाणें कानांच्याविषयीं सांगितल्यानंतर डोळ्यासंबंधीं सांगितलें आहे कीं—

सौपर्णं चक्षुः अजस्रम्। (मं. २१५)

'गरुडाप्रमाणें माझी दृष्टि तीक्ष्ण होवो.' आणि ती उत्तम कल्याणकारी वस्तूच पाहो. याप्रकारें इंद्रियशुद्धीविषयीं या पर्यायसूक्तांत सांगितलें आहे. तसेंच—

ऋषीणां प्रस्तरः असि। दैव्याय प्रस्तराय नमः (मं. २१६)

'तूं ऋषींचें आवरण आहेस. या दिव्य प्रस्तराला (आच्छादनाला) माझा नमस्कार असो.' ऋषींचें शरीर आत्म्याचें मंदिर आहे, तें दिव्य मंदिर आहे. त्याच्याविषयीं प्रत्येक मनुष्यानें अंतःकरणांत पूज्यभाव धारण केला पाहिजे. या आत्म्याच्या उपासनेनें सर्वांचें हित होणार आहे. या प्रकारें द्वितीय सूक्तांत सांगण्यांत आलें आहे.

आधिभौतिक विजय

पूर्वोक्त प्रकारें मनुष्याची आध्यात्मिक आणि वैयक्तिक उन्नति झाल्यानंतर त्यानें स्वतःचा आधिभौतिक विजय संपादन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याचा विचार या १६ व्या कांडाच्या तिसऱ्या सूक्तांत केला आहे. त्या बोधप्रद उपदेशाचें आतां वाचकांनीं मनन करावें.

अहं रयीणां मूर्धा भूयासं। समानानां मूर्धा भूयासम्। (मं. ३।१२)
अहं रयीणां नाभिः भूयासं। समानानां नाभिः भूयासम्। (मं. ४।१-२)

'मी धनाचा स्वामी आणि केंद्र बनावें. मी समानधर्मांच्या (योग्यतेच्या) लोकांचा मुख्य व्हावें. त्यांच्या केंद्रस्थानीं असावें.' स्वतःची योग्यता पुढारी होण्यायोग्य असावी, असली पाहिजे. प्रत्येक मनुष्य नेता होऊं शकत नाहीं, तरी सुद्धां बहुगुणसंपन्न होण्याचा प्रयत्न प्रत्येक मनुष्य जर करील तर त्याची सुधारणा निःसंशय होईलच. या दृष्टीनें अशी इच्छा मनुष्यानें स्वतःच्या मनांत धारण करावी आणि धर्मानुकूल उन्नतीसाठीं प्रयत्न करावा. असे नेता होण्यास जे योग्य गुण मनुष्यांत वृद्धिंगत झाले पाहिजेत त्यांची सूचना या सूक्तांत पुढील मंत्रांत दिली आहे, ती पहा—

रुजः, वेनः, मूर्धा, विधर्मा, उरवः, चमसः, धर्ता, धरुणः, विमोकः, आर्द्रपविः, आर्द्रदानुः, मातरिश्वा च मा मा हासिषाम् (मं. ३।२-४)

'तेजस्विता, महत्त्वाकांक्षा, मस्तकाची शक्ति, विशेष गुणधर्म, यज्ञसाधन, धारकशक्ति, बंधमुक्त होण्याची इच्छा, शास्त्रसिद्धि, दान करण्याची इच्छा आणि प्राण हे माझा त्याग न करोत.' हे गुण मनुष्यांत स्थिर रहावेत आणि वृद्धि पावावेत तरच तो मनुष्यजातीचें केंद्र अथवा पुढारी होऊं शकेल. हे गुण विशेष महत्त्वाचे आहेत, म्हणून त्यांचा अधिक विचार केला पाहिजे, (**रुजः**) तेजस्विता– त्यांत शरीर, इन्द्रियें, मन, बुद्धि आणि परमात्म्याच्या तेजस्वितेचा समावेश होतो. मनुष्यानें सर्व प्रकारें तेजस्वी झालें पाहिजे. (**वेनः**) इच्छा– स्वतःची वैयक्तिक, सामाजिक आणि राष्ट्रीय इच्छा. या इच्छांनीच मनुष्य पुरुषार्थी होतो, आणि विशेष श्रेष्ठ कर्में करून स्वतःचा आणि समाजांचा उद्धार करतो. (**मूर्धा**) मस्तक- मनुष्याची उच्चता अथवा नीचता ही त्याच्या मस्तकाच्या शक्तीवर आधारित असते; म्हणून मनुष्यानें मस्तकशक्ति वाढविणें अगत्याचें आहे. (**विधर्मा**) विशेष धर्मानें युक्त होणें. साधारण गुणकर्म आणि धर्मानें युक्त मनुष्य साधारण राहील, परंतु जर त्यास विशिष्ट योग्यता प्राप्त करून घ्यावयाची असेल, तर तो समाज आणि राष्ट्राचा नेता किंवा पुढारी होऊं इच्छित असेल, तर त्यानें स्वतःच्या ठिकाणीं विशेष धर्मांची वृद्धि करणें उचित आहे. सामान्य माणसांत जे धर्म असत नाहींत ते त्यानें तपश्चर्यादिकांनीं स्वतःच्या ठिकाणीं वाढविले पाहिजेत. (**उरवः, चमसः**) हीं यज्ञपात्रें आहेत. हीं यज्ञाच्या सर्व साधनांचीं उपलक्षणें आहेत. सर्व प्रकारचे यज्ञ केल्यानें आणि यज्ञमय जीवन असल्यामुळें मनुष्याची योग्यता वाढते. मनुष्यानें क्रतु (**यज्ञ**) रूप असलें पाहिजे. शतक्रतु बनणें हें मनुष्याचें ध्येय असलें पाहिजे. (**धर्ता**) धारण करणारा. समाजाची धारणा, राष्ट्राची धारणा, धर्माची धारणा करणें हें मनुष्याचें कर्तव्य आहे. दुसऱ्या प्राण्यास स्वतःच्या शक्तीचा आधार देणें, यास धारणा करणें असें समजावें. (**धरुणः**) याचा अर्थ धारक असा होतो. बल त्यांत अधिक आहे. स्वतः स्थिर राहून दुसऱ्यास दुःखसमुद्रांतून पार करण्यासाठीं स्वतःचा आधार देण्याचें कार्य करणें मनुष्यास योग्य आहे. मनुष्यानें स्वतःमध्यें एवढी शक्ति प्राप्त करून घेतली पाहिजे.

(**वि-मोकः**) विमोचन करणारा, मनुष्यांना मुक्त करणारा

मनुष्यांस बंधनांतून सोडविणारा. मनुष्यास स्वतंत्रता देणारा जो पुढारी असेल तोच सर्वश्रेष्ठ समजला पाहिजे. यानें लोकांचें परित्राण (रक्षण), सज्जनांचें रक्षण, दुर्जनांचें निर्दालन आणि धर्माची स्थापना करणें असा अर्थ होतो. **(आर्द्र-पविः)** पवीचा अर्थ आहे तलवार, खड्ग अथवा शस्त्र. शत्रूच्या रक्तानें ज्याचें शस्त्र ओलें झालें आहे अथवा शत्रूंचा नाश करून ज्याचें शस्त्र ओलें होण्यासाठीं तत्पर आहे त्याचें हें नांव आहे. धर्मयुद्ध करण्यासाठीं जो तयार असतो त्याचें हें नांव आहे. **(आर्द्र-दानुः)** आर्द्रता, स्नेहामुळें दुसऱ्यासाठीं जो दान करतो. म्हणजे ज्याचें मन नेहमीं स्नेहानें ओलें असतें. प्रेमानें आर्द्र असतें, जो स्नेहानें आर्द्र आहे त्याचें हें नांव आहे. **(मातरि-श्वा)** स्वतःच्या आईचा आश्रय घेणारा, जो मातृभक्त आहे, मातृभूमींत जो एवढ्यासाठीं रहातो कीं स्वतःच्या जीवनसमर्पणानें मातृभूमीची सेवा होईल. एवढ्यासाठींच जो मातृभूमींत परिभ्रमण किंवा संचार करीत असतो.

हे बारा शब्द मनुष्याचीं विशेष कर्तव्यें दर्शवितात. मनुष्यानें हीं कर्तव्यें करावींत. हीं कर्तव्यें मनुष्यापासून कधीं दूर न जावोत. या कर्तव्यांस मनुष्य कधीं विन्मुख न होवो. या धर्मानें अथवा त्यांत उपदेशिलेल्या कर्तव्यांनीं जो मनुष्य युक्त असेल तोच श्रेष्ठ आणि उच्च होय. येथें कदाचित् कांहीं निर्बल मनुष्यें म्हणतील, ' आम्हीं निर्बल आहोंत, आम्हीं हे गुणधर्म धारण करूं शकणार नाहीं. ' त्यांच्यासाठीं आत्म्याचा स्वभाव कसा असतो तें या सूक्ताचे मंत्र स्वतःच सांगत आहेत –

आत्मा बृहस्पतिः नृमणाः हृद्यः । (मं. ३१५)
विधर्मणा समुद्रः असि । (मं. ३१६)
मर्त्येषु अमृतः सुषा । (मं. ४१२)

' आत्मा ज्ञानयुक्त आहे, तो मनुष्याच्या हृदयांत निवास करतो, तो मनुष्याच्या अंतरांत मनन करणारा आहे. स्वतःच्या विशेष धर्मानें समुद्रासारखा पसरलेला आणि गंभीर आहे. मरणधर्म असणाऱ्या शरीरांत रहात असून सुद्धां तो अमर आहे. तो उत्तम तेजानें युक्त आहे. ' स्वतःच्या आत्म्याचे हे गुणधर्म आहेत हें जाणून विचारानें आणि मननानें मनुष्यानें या गुणांचा साक्षात्कार केला पाहिजे. या ज्ञानानें मनुष्याची निर्बलता दूर होईल, आणि तो पूर्वोक्त गुण स्वतःमध्यें वाढविण्यास समर्थ होईल. याप्रमाणें आत्मिक बळ प्राप्त झाल्यानें–

असंतापं हृदयं । उर्वी गव्यूतिः । (मं. ३१६)

' हृदय संतापरहित म्हणजे शांत असतें आणि गो नाम इंद्रियांची शक्ति पुष्कळ विस्तृत असते. ' स्वतःची सर्व शक्ति वाढते, जीवन प्रभावशाली होतें. आत्म्याची शांति त्याच्या सर्व व्यवहारांत दिसून येते, आणि तो वाटेल तशा भयंकर प्रसंगांत सुद्धां गंभीर आणि शांत राहून कार्य करूं शकतो, कधींहि अशांत होत नाहीं. शरीराचा नाश झाला तरी मीं अमर आहें असा विश्वास त्याला निर्भय बनवितो आणि त्याच्याकडून मोठमोठीं सत्कार्यें करवितो. अशा स्थितींत सर्व देव त्याचे रक्षक होतात.

सूर्यः वायुः अग्निः यमः सरस्वती–पातु । (मं. ४१३)

' सूर्य, वायु, अग्नि, यम आणि सरस्वती त्याचें रक्षण करतात. ' सूर्य नेत्रस्थानांत, वायु प्राणस्थानांत, अग्नि वाणीस्थानांत, यम शिरस्थानांत, सरस्वती बुद्धिस्थानांत, राहून प्रत्येक प्रकारची मदत देतात, आणि त्यास स्वतःच्या दिव्यशक्तीनें पवित्र करतात. आत्मशक्तीनें युक्त अशा पुरुषास याप्रमाणें सर्व देव सहाय्यभूत होतात. हा विषय यापूर्वी चर्चिला गेला आहे, आणि वेदामध्यें सुद्धां त्याबद्दल वारंवार सांगण्यांत आलें आहे; म्हणून जो मनुष्य आत्मज्ञान करून घेतो आणि स्वतःच्या जीवनास यज्ञरूप बनवितो त्यास सर्व देवतांचें सहाय्य असतें, असा विश्वास साधकानें स्वतःच्या मनांत दृढ बाळगावा. असा मनुष्य निर्भय होऊन व्यवहार करतो, आणि त्यामुळें तो सर्व मनुष्यांचा नेता होण्यास योग्य ठरतो. तो म्हणतो कीं—

प्राणः मां मा हासीत् अपानः अवहाय मा परागात् । (मं. ४१३)

' माझा प्राण आणि माझा अपान मला सोडून कोठें दूर न जावोत. ' तो एवढ्यासाठीं असें म्हणतो कीं त्यानें स्वतःचें सर्व जीवन ईश्वराच्या भक्तींत आणि सेवेसाठीं समर्पित केलेलें असतें. तो स्वतःच्या जीवनद्वारा जनतेची सेवा करूं इच्छितो. स्वतःचे प्राण ईश्वरासाठींच तो समर्पित करूं इच्छितो. दुसऱ्या कोणत्याहि कार्याचें त्यास स्मरण रहात नाहीं. त्यास माहित असतें कीं—

मित्रावरुणौ मे प्राणपानौ । शक्करीः आपः स्वस्ति । (मं. ४१७)

' स्वतःचे प्राण आणि अपान हे आतां प्रत्यक्ष मित्र आणि वरुण देवता आहेत, आणि जलांतील सामर्थ्य माझें कल्याण करीत आहे. ' याप्रमाणें तो पहातो आणि त्यास अनुभव येतो कीं, स्वतःचा सर्व देह आणि जीवन देवतामय झालें आहे. यावेळीं

तो दुष्ट कल्पनांपासून पूर्णपणें अगदीं दूर असतो. तो सहजीं देवतास्वरूप बनतो आणि सहजगतीनें प्रशस्त कार्य करतो. असें कार्य करण्यास त्यास कांहीं प्रयास पडत नाहींत, कारण आतां तो विश्वरूप झालेला असतो. यावेळीं त्यास अनुभव येतो कीं—

अग्निः मे दक्षं । (मं. ४१७)

'अग्नि माझ्यांत बल धारण करीत आहे.' दुसऱ्या देवता विभिन्न सामर्थ्य धारण करतात. त्याचा आत्मा प्रत्यक्ष ईश्वरी गुणांनीं प्रभावशाली झालेला असतो. असे महात्मे धन्य होत ! असाच मनुष्य प्रभावशाली नेता होऊं शकतो, तोच लोकसंग्रह करण्यास समर्थ होऊं शकतो, आणि तोच जगतांतील मनुष्यमात्रांस सत्य-मार्ग दाखवूं शकतो. युगानुयुगीं असे सत्पुरुष निर्माण होत असतात, आणि जनतेंत कार्य करीत असतात. स्वतः बंधनांत पडून सुद्धां बंधनांत सडत पडलेल्या मनुष्यांस बंधनांतून निवृत्तीचा मार्ग दाखवितात.

स्वप्न

पुढें पांचव्या आणि सहाव्या पर्यायसूक्तांत स्वप्नविषय सांगितला आहे. या सूक्तांत दुष्ट स्वप्नांचीं जीं कारणें दिलीं आहेत तीं हीं—

ग्राह्याः... निर्ऋत्याः... अभूत्याः... अनिर्भूत्याः... पराभूत्याः देवजामीनां पुत्रः स्वप्नः । (मं. ५।१-८)

'रोग, दुरवस्था, दारिद्य, दुर्गति, पराभव आणि इंद्रियदोषांच्या कारणांनीं दुष्ट स्वप्नें पडतात.' हीं दुष्ट स्वप्नें जणूं काय मृत्यूचा संदेशच होय; म्हणून दुष्ट स्वप्नें पडतांच मनुष्यानें स्वतःच्या शरीरांतील रोगबीजें दूर करण्याचा प्रयत्न करावा हें त्यास उचित होय. दुष्ट स्वप्नांचीं जीं कारणें येथें सांगितलीं आहेत त्याचा थोडा जास्त विचार येथें करणें अवश्य आहे. (**ग्राही**) भयानक रोग जे शरीरांत एकदां शिरल्यावर सहसा शरीरास सोडत नाहींत, दुःख देतात आणि अंतीं प्राणहरण करतात. असे रोग शरीरांत असले तर वारंवार दुष्ट स्वप्नें पडतात. अशा रोगामुळें जर दुष्ट स्वप्नें पडत असतील तर त्यांची योग्य चिकित्सा करवून रोगबीजांचा नाश करविला पाहिजे आणि शरीर निरोगी बनविलें पाहिजे. या कार्यासाठीं या कांडाच्या सुरवातीच्या सूक्तांतच जलचिकित्सेचा उपाय सांगितला आहे. (**निर्ऋति**) ऋतीचा अर्थ आहे उन्नति, अभ्युदय, सामर्थ्य म्हणजे निर्ऋतीचा अर्थ त्याच्या विरुद्ध आहे. अवनति, अधःपात, क्षीणता आणि निर्बलता. यांच्या योगेंसुद्धां दुष्ट स्वप्नें पडतात, त्यांस दूर करण्यास जे उपाय आहेत ते योजिले पाहिजेत. (**अभूति**) ऐश्वर्यापासून च्युत होणें. आणि (**निर्भूति**) म्हणजे महासंकटांत सांपडणें. तसेंच (**पराभूति**) पराजय होणें, परतंत्र, पराधीन अथवा परवश होणें. या कारणांनीं दुष्ट स्वप्नें पडतात. हीं कारणें दूर करण्यास अनेक उपाय आहेत. प्रत्येकासाठीं निरनिराळे उपाय आहेत, म्हणून त्यांचें अवलंबन योग्यरीतीनें केलें पाहिजे. मुख्य उपाय स्वावलंबनानें स्वाधीनता प्राप्त करून घेतली पाहिजे (**देव-जामी**) आपल्या शरीरांत देव नांव इंद्रियांसाठीं योजिलें आहे त्यांच्या शक्ति विविध आहेत. त्यांच्या कमीजास्त होण्यामुळें सुद्धां दुष्ट स्वप्नें पडतात; म्हणून संयमानें स्वतःच्या इंद्रियांस निर्दोष आणि निरोगी ठेवणें अत्यंत आवश्यक आहे. अर्थात् अशा प्रकारें आपल्या शरीरांत आणि राष्ट्रांत दुष्ट स्वप्नें पडण्याची जीं कारणें उत्पन्न झालीं असतील त्यांस दूर करणें मनुष्याचें कर्तव्य आहे.

मनुष्याची परीक्षा स्वप्नांनीं होते. मनुष्यास स्वप्नें कसलीं पडतात, त्यावर तो रोगी आहे कीं निरामय आहे, सदाचारी आहे कीं दुराचारी आहे, शुभ विचारी आहे कीं अशुभ विचारी आहे याचा निश्चय होऊं शकतो. मीं ईश्वरउपासना करीत आहें, ऋषींच्या आश्रमांत ऋषींशीं संवाद करीत अथवा त्यांच्याकडून धर्मज्ञानविषयक गोष्टी ऐकत आहें, सत्पुरुषांच्या समागमांत आहे इत्यादि स्वप्नें उत्तम अथवा चांगलीं समजलीं जातात. अशीं शुभ स्वप्नें पडणें अथवा अजिबात स्वप्नें न पडणें या दोन्ही अवस्था शरीराचें स्वास्थ्य सुचवितात; पण जर या व्यतिरिक्त दुष्ट स्वप्नें पडूं लागलीं तर आरोग्यांत कांहीं बिघाड झाला असें समजावें, आणि नंतर तात्काल त्यास सुधारण्याचा यत्न केला पाहिजे. म्हणून म्हटलें आहे कीं—

यस्मात् दुष्वप्नात् अभैष्म तत् अप उच्छतु । (मं. ६।२)

'ज्या दुष्ट स्वप्नानें आम्हांस भय वाटतें अशा दुष्ट स्वप्नांचीं कारणें आमच्यापासून दूर राहोत.' तें कारण कोठें इतरत्र जावो. आमच्याजवळ नको. अशा प्रकारें आपण स्वतःची निर्दोषता सिद्ध केल्यावर तो निर्दोष मनुष्य म्हणूं शकतो कीं—

अद्य अजैष्म, अद्य असनाम, वयं अनागसः अभूम । (मं. ६।१)

'आज आम्हीं विजय प्राप्त केला, आज आम्हीं प्राप्तव्य तें प्राप्त केलें, कारण आज आम्हीं निष्पाप झालों आहोंत.' निष्पाप होण्यानेंच सर्व प्राप्तव्य प्राप्त करतां येतें. विजय प्राप्त करण्याची ही गुरुकिल्ली आहे. पापामुळें उन्नति होते असें जें वाटतें तो फक्त भास असतो. त्यांत खोल अवनतीचीं बीजें दडून राहिलेलीं

असतात, म्हणून उपासकांनीं ध्यानांत ठेवावें कीं वेदांच्या आज्ञानुसार निष्पाप, धर्माचरणानें जी उन्नति प्राप्त होते तीच प्राप्त केली पाहिजे, आणि तीच चिरस्थायी होईल.

पुढें सातव्या सूक्तांत द्वेष्यास दूर करणें आणि त्याचा नाश करणें हा विषय आहे. तें सूक्त स्वतः स्पष्ट असल्यानें त्यास जास्त स्पष्ट करण्याचें कारण नाहीं. अध्यात्मभूमिकेंत कुविचार, रोग, इत्यादि शत्रु आहेत. आधिभौतिक भूमिकेंत दोन्हीं स्थळीं जे जे शत्रु निवास करीत असतील त्यांस दूर केलें पाहिजे, तेव्हांच विजय प्राप्त होऊं शकतो.

विजय

आठव्या सूक्तांत स्वतःस विजय प्राप्त करण्यासंबंधीं एक मंत्र आहे. तो प्रत्येक वैदिकधर्मीयानें पाठ करण्याजोगा आहे. आतां तो मंत्र पहा—

अस्माकं जितं, उद्भिन्नं, ऋतं, तेजः, ब्रह्म, स्वः, यज्ञः, पशवः, प्रजाः, वीराः। (मं. ८।१)

या मंत्राचा प्रत्येक शब्द अत्यंत महत्त्वपूर्ण भावांनीं युक्त असल्यामुळें येथें प्रत्येक शब्दाचा विचार विशेषरीतीनें करूं या. (**जितं**) या सर्व प्रकारच्या शत्रूंवर विजय प्राप्त झाला आहे. आधिभौतिक आधिदैविक आणि आध्यात्मिक शत्रूंवर विजय प्राप्त करण्यासाठीं आपली शक्ति वाढविलीच पाहिजे. (**उद्भिन्नं**) ही आपल्या सर्व प्रकारच्या अभ्युदयानें साध्य होणारी गोष्ट आहे. आपली संघटना आपला शक्तिविकास, आपली आंतरिक शक्ति, आपली तेजोवृद्धि वगैरे केल्यानें हें सर्व सिद्ध होऊं शकतें. पहिला विजय आपल्या शत्रूंवर मिळविला पाहिजे. यज्ञ आपल्या आंतरिक स्थितीवर अवलंबून असतो. (**ऋतं**) ऋतचा अर्थ खरा मार्ग, सरलता, योग्य व्यवहार, ज्यांत वांकडी वाट जराहि असत नाहीं. प्रत्येक व्यवहारांत जर अशी सरलता राहील तरच पूर्वोक्त विजय मिळूं शकेल. (**तेजः**) तेजस्विता, प्रभाव, उग्रता, इत्यादि गुण विजयाचे सहचर आहेत. (**ब्रह्म**) सत्य ज्ञान, आत्मसामर्थ्य, विज्ञान, वेदज्ञान हीं सर्व निःसंशय ऋता सहच राहिलीं पाहिजेत. अनृत-असत्याबरोबर त्यांचें वास्तव्य अगदींच असंभाव्य. (**स्वः, सु-वरः**) आत्म्याचा प्रकाश, आपलें यश अथवा आपल्या पुण्यकर्मद्वारें प्राप्त होणारा पुण्यलोक. (**यज्ञः**) देवपूजा, संगतीकरण आणि दानरूप श्रेष्ठ कर्म. या सर्वांचा स्थिति आणि उन्नति यज्ञानेंच होऊं शकते. (**पशवः**) गायी, बैल, घोडे वगैरे पशु मनुष्याचें वैभव वृद्धिंगत करतात. (**प्रजाः**) संतति, पुत्र, पुत्री वगैरे अथवा प्रजाजन. (**वीराः**) वीर पुत्र अथवा वीर्यवान् लोक, शूर वीर. साधक जर नीट विचार करील तर त्याच्या ध्यानीं येईल कीं वरील सर्व गोष्टी या विजयमार्गे आपोआप येणाऱ्या आहेत. वाचकांस अतएव सानुरोध प्रार्थना कीं, त्यांनीं हा मंत्र मुखोद्गत करावा. सांजसकाळ त्यांनीं या मंत्रानें ईश्वराची प्रार्थना करावी, आणि स्वतःस वैयक्तिक तसाच सामुदायिक विजय प्राप्त होईल अशी परिस्थिति त्वरित प्राप्त होईल असें वागावें आणि अशी प्रार्थना त्या प्रभूपाशीं मनोभावें करावी.

या आठव्या पर्यायसूक्तांत पुढें जे मंत्र आहेत ते शत्रूंचा नायनाट करण्यास प्रोत्साहन देणारे आहेत. ते केवळ अर्थवादाचे मंत्र आहेत. त्यामुळें त्यांच्याविषयीं जास्त कांहीं लिहिण्याची आवश्यकता नाहीं. वाचकांनीं स्वतःच ते वाचून त्यांचा आशय समजून घ्यावा. त्यानंतर शेवटच्या नवव्या पर्यायसूक्तांत चारच वचनें आहेत, परंतु तीं नित्यस्मरणांत ठेवावी अशीं महत्त्वाचीं आहेत—

जितं अस्माकं, उद्भिन्नं अस्माकं, विश्वा अरातीः पृतनाः (मं. ९।१)

' आमचा विजय, आमचा उदय आणि आम्हीं सर्व शत्रुसेनेचा पराभव करण्याइतकें सामर्थ्य आमच्यांत वाढविलें.' तसेंच—

पूषा सुकृतस्य लोके मा धात्। (मं. ९।२)

' ईश्वरानें मला पुण्यलोकांत धारण करावें ' असा मीं सदा चारी शुद्ध, पूत आणि पवित्र होईन. ' तसेंच—

स्वः अगन्म, सूर्यस्य ज्योतिषा अगन्म। (मं. ९।३)

' आत्म्याचें तेज प्राप्त करूं. सूर्याच्या ज्योतीस मिळूं. ' तसेंच—

वस्योभूयाय वसुमान् भूयासम्। वसुमान् यज्ञः। वसु वंशिषीय। (मं. ९।४)

' पुष्कळ धन प्राप्त केलें पाहिजे, मीं धनवान् व्हावें; कारण कीं धनानें यज्ञ होतात. व्ययासाठीं मला धन पाहिजे. '

हे चारी मंत्र इतक्या उत्तम भावानें परिपूर्ण आहेत, इतके सुबोध आहेत, इतके सरळ आहेत कीं जणूं काय हे चार मंत्र म्हणजे या सर्व कांडाचें सारच काढलें आहे. साधक त्याचें मनन करील तर त्यास सुद्धां पुष्कळ आनंद होईल, आणि त्यांच्या मननानें त्याचा आत्मासुद्धां उल्हसित होईल.

या कांडाचें मनन करून या कांडाचा जो उच्च भाव आहे तो उपासक स्वतःच्या मनांत स्थिर करील अशी आशा आहे. या विजयमार्गानें चालून स्वतःचा, स्वतःच्या समाजाचा, स्वतःच्या जातीचा आणि स्वतःच्या राष्ट्राचा विजय संपादण्याचें कार्य करून कृतकृत्य व्हावें.

स्वतःच्या अभ्युदयासाठीं प्रार्थना

कांड १७, सूक्त १

(ऋषिः– ब्रह्मा । देवता – आदित्यः)

विषासहिं सहमानं सासहानं सहीयांसम् । सहमानं सहोजितं स्वर्जितं गोजितं संधनाजितम् ।
ईड्यं नाम ह्व इन्द्रमायुष्मान्भूयासम् ॥ १ ॥

विषासहिं सहमानं सासहानं सहीयांसम् । सहमानं सहोजितं स्वर्जितं गोजितं संधनाजितम् ।
ईड्यं नाम ह्व इन्द्रं प्रियो देवानां भूयासम् ॥ २ ॥

विषासहिं सहमानं सासहानं सहीयांसम् । सहमानं सहोजितं स्वर्जितं गोजितं संधनाजितम् ।
ईड्यं नाम ह्व इन्द्रं प्रियः प्रजानां भूयासम् ॥ ३ ॥

विषासहिं सहमानं सासहानं सहीयांसम् । सहमानं सहोजितं स्वर्जितं गोजितं संधनाजितम् ।
ईड्यं नाम ह्व इन्द्रं प्रियः पशूनां भूयासम् ॥ ४ ॥

विषासहिं सहमानं सासहानं सहीयांसम् । सहमानं सहोजितं स्वर्जितं गोजितं संधनाजितम् ।
ईड्यं नाम ह्व इन्द्रं प्रियः समानानां भूयासम् ॥ ५ ॥

उदिह्युदिहि सूर्य वर्चसा माभ्युदिहि ।
द्विषंश्च मह्यं रध्यतु मा चाहं द्विषते रधं तवेद्विष्णो बहुधा वीर्याणि ।
त्वं नः पृणीहि पशुभिर्विश्वरूपैः सुधायां मा धेहि परमे व्योमन् ॥ ६ ॥

अर्थ— (विषासहिं) अत्यंत समर्थ (सहमानं) अत्यंत बलवान् (सासहानं) नित्य विजयी (सहियांसं) शत्रूंना दाबून टाकणारा, (सहमानं) महाबलिष्ठ (सहोजितं) बलानें दिग्विजय करणारा (स्वः जितं) स्वतःच्या सामर्थ्यानें जिंकणारा, (गो–जितं) भूमि, इंद्रियें आणि गाईंना जिंकणारा, (संधनाजितं) धनास जिंकून प्राप्त करणारा (ईड्यं नाम इन्द्रं) प्रशंसनीय यश असणाऱ्या प्रभूची मीं (ह्वे) प्रशंसा करतों ज्यामुळें मीं (आयुष्मान् भूयासं) दीर्घायु व्हावें. (१) ०।०।० (देवानां प्रियः भूयासं) मीं देवांचा प्रिय व्हावें. (२) ०।०।० (प्रजानां प्रियः०) प्रजाजनांना प्रिय व्हावें. (३) ०।० ० (पशूनां प्रियः०) पशूनां प्रिय व्हावें. (४) ०।०।० (समानानां प्रियं भूयासं) समान योग्यतेच्या पुरुषानां प्रिय व्हावें. (५)

हे (सूर्य) सूर्या ! (उदिहि उदिहि) तुझा उदय होवो, तूं उदयास प्राप्त कर (वर्चसा मा अभ्युदिहि) तुझ्या तेजानें उदित होऊन तुझा प्रकाश माझ्या चारी बाजूस पसरव. (द्विषन् च मह्यं रध्यतु) माझा द्वेष करणारे माझ्या सत्तेखालीं येवोत, मला वश होवोत, परंतु (अहं च द्विषते मा रधम्) माझा द्वेष करणाऱ्या शत्रूंच्या मीं कधींहि ताब्यांत जाऊं नये. हे (विष्णो) व्यापक ईश्वरा (तव इत् बहुधा वीर्याणि) तुझें वीर्य अनेक प्रकारचें आहे. (त्वं नः विश्वरूपैः पशुभिः पृणीहि) तूं आम्हांस अनेक रूपांच्या पशूंनीं परिपूर्ण कर. आणि (परमे व्योमन्) परम आकाशांत (मा सुधायां धेहि) मला अमृत प्राप्त होवो. (६)

उदिह्युदिहि सूर्य वर्चसा माभ्युदिहि ।
यांश्च पश्यामि यांश्च न तेषु मा सुमतिं कृधि तवेद्विष्णो बहुधा वीर्याणि ।
त्वं नः पृणीहि पशुभिर्विश्वरूपैः सुधायां मा धेहि परमे व्योमन् ॥ ७ ॥
मा त्वा दभन्त्सलिले अप्स्वन्तर्ये पाशिन उपतिष्ठन्त्यत्र ।
हित्वाशस्तिं दिवमारुक्ष एतां स नो मृड सुमतौ ते स्याम तवेद्विष्णो बहुधा वीर्याणि ।
त्वं नः पृणीहि पशुभिर्विश्वरूपैः सुधायां मा धेहि परमे व्योमन् ॥ ८ ॥
त्वं न इन्द्र महते सौभगायादब्धेभिः परि पाह्यक्तुभिस्तवेद्विष्णो बहुधा वीर्याणि ।
त्वं नः पृणीहि पशुभिर्विश्वरूपैः सुधायां मा धेहि परमे व्योमन् ॥ ९ ॥
त्वं न इन्द्रोतिभिः शिवाभिः शंतमो भव ।
आरोहंस्त्रिदिवं दिवो गृणानः सोमपीतये प्रियधामा स्वस्तये तवेद्विष्णो बहुधा वीर्याणि
त्वं नः पृणीहि पशुभिर्विश्वरूपैः सुधायां मा धेहि परमे व्योमन् ॥ १० ॥
त्वमिन्द्रासि विश्वजित्सर्ववित्पुरुहूतस्त्वमिन्द्र ।
त्वमिन्द्रेमं सुहवं स्तोममेरयस्व स नो मृड सुमतौ ते स्याम तवेद्विष्णो बहुधा वीर्याणि
त्वं नः पृणीहि पशुभिर्विश्वरूपैः सुधायां मा धेहि परमे व्योमन् ॥ ११ ॥
अदब्धो दिवि पृथिव्यामुतासि न त आपुर्महिमानमन्तरिक्षे ।
अदब्धेन ब्रह्मणा वावृधानः स त्वं न इन्द्र दिवि षंछर्म यच्छ तवेद्विष्णो बहुधा वीर्याणि
त्वं नः पृणीहि पशुभिर्विश्वरूपैः सुधायां मा धेहि परमे व्योमन् ॥ १२ ॥

अर्थ— (उदिहि०) हे सूर्या ! उदयास प्राप्त हो ! उदयास प्राप्त हो आणि (वर्चसा०) तुझ्या तेजानें मला प्रकाशित कर. (यान् च पश्यामि यान् च न) ज्या प्राण्यांना मीं पाहूं शकतों आणि जे प्राणी मला अदृश्य आहेत, (तेषु मा सुमतिं कृधि) त्यांच्याविषयीं मला सुबुद्धि दे. (तव इत् ०।० इत्यादि वर प्रमाणें) (७) (सलिले अप्सु अन्तः ये पाशिनः) पाण्यांत जे पाश धारण करणारे (अत्र उपतिष्ठन्ति) येथें येऊन उपस्थित होतात ते (त्वा मा दभन्) तुला दाबून न टाकोत. (अशस्तिं हित्वा एतां दिवं आरुरुक्षः) निंदेचा त्याग करून द्युलोकावर आरूढ हो आणि (सः नः मृडः) तो तूं आम्हांला सुखी कर. (ते सुमतौ स्याम) आम्हीं तुझ्या सन्मतींत स्थिर व्हावें. (तव इत् ०।० वगैरे वर प्रमाणें) (८) हे इंद्रा ! (त्वं नः महते सौभगाय) तूं आम्हां सर्वांना महान् सौभाग्यासाठीं (अदब्धेनः अक्तुभिः परिपाहि) दबून न जाणाऱ्या प्रकाशानें सर्व बाजूंनीं सुरक्षित ठेव. (तव इत् ०।०) (९) हे इंद्रा ! (त्वं नः शिवाभिः ऊतिभिः शंतमः भव) तूं कल्याणपूर्ण रक्षणानें आम्हांस उत्तम कल्याणकारक हो, (त्रिदिवं आरोहन्) द्युलोकावर आरूढ होऊन (दिवः गृणानः) प्रकाश देत देत (सोमपीतये स्वस्तये प्रियधामा) सोमपान आणि कल्याणासाठी प्रिय स्थान हो (तव इत् ०।० वगैरे वर प्रमाणें) (१०)

[१] हे इंद्रा ! तूं (विश्वजित् सर्वजित्) जगतास जिंकणारा सर्वज्ञ आहेस आणि हे इंद्रा ! तूं (पुरुहूतः) फारच प्रशंसित आहेस. हे इंद्रा ! (त्वं इमं सुहवं स्तोमं एरयस्व) तूं या उत्तम प्रार्थनास्तोत्राला प्रेरित कर (सः नः० तव इत् ०।० वर प्रमाणें) हे इंद्रा ! (दिवि ऊत पृथिव्यां अदब्धः असि) द्युलोक आणि पृथ्वीवर दबलेला नाहींस, (अन्तरिक्षे ते महिमानं न आपुः) अन्तरिक्षांत तुझा महिमा कोणी प्राप्त करूं शकत नाहीं. (अदब्धेन ब्रह्मणा वावृधानः सन्) न दबणाऱ्या ज्ञानानें प्रगत होत, (दिवि नः त्वं शर्म यच्छ) द्युलोकांत तूं आम्हांस सुख प्राप्त करून दे. (तव इत्० वर प्रमाणें) (१२)

या ते इन्द्र तनूरप्सु या पृथिव्यां यान्तरग्नौ या त इन्द्र पवमाने स्वर्विदि ।
ययेन्द्र तन्वाऽन्तरिक्षं व्यापिथ तया न इन्द्र तन्वाऽ शर्म यच्छ तवेद्विष्णो बहुधा वीर्याणि
त्वं नः पृणीहि पशुभिर्विश्वरूपैः सुधायां मा धेहि परमे व्योमन् ॥ १३ ॥
त्वामिन्द्र ब्रह्मणा वर्धयन्तः सत्रं नि षेदुरृषयो नाधमानास्तवेद्विष्णो बहुधा वीर्याणि ।
त्वं नः पृणीहि पशुभिर्विश्वरूपैः सुधायां मा धेहि परमे व्योमन् ॥ १४ ॥
त्वं तृतं त्वं पर्येष्युत्सं सहस्रधारं विदथं स्वर्विदं तवेद्विष्णो बहुधा वीर्याणि ।
त्वं नः पृणीहि पशुभिर्विश्वरूपैः सुधायां मा धेहि परमे व्योमन् ॥ १५ ॥
त्वं रक्षसे प्रदिशश्चतस्रस्त्वं शोचिषा नभसी वि भासि ।
त्वमिमा विश्वा भुवनानु तिष्ठस ऋतस्य पन्थामन्वेषि विद्वांस्तवेद्विष्णो बहुधा वीर्याणि ।
त्वं नः पृणीहि पशुभिर्विश्वरूपैः सुधायां मा धेहि परमे व्योमन् ॥ १६ ॥
पञ्चभिः पराङ् तपस्येकयार्वाङशस्तिमेषि सुदिने बाधमानस्तवेद्विष्णो बहुधा वीर्याणि ।
त्वं नः पृणीहि पशुभिर्विश्वरूपैः सुधायां मा धेहि परमे व्योमन् ॥ १७ ॥
त्वमिन्द्रस्त्वं महेन्द्रस्त्वं लोकस्त्वं प्रजापतिः ।
तुभ्यं यज्ञो वि तायते तुभ्यं जुह्वति जुह्वतस्तवेद्विष्णो बहुधा वीर्याणि ।
त्वं नः पृणीहि पशुभिर्विश्वरूपैः सुधायां मा धेहि परमे व्योमन् ॥ १८ ॥

अर्थ— हे इंद्र (या ते अप्सु तनूः) तुझा जो अंश पाण्यांत आहे, (या पृथिव्यां या अग्नौ अन्तः) जो पृथ्वीवर तसेंच जो अग्नींत आहे. हे इंद्रा ! (या ते पवमाने स्वः-विदि) आणि पवित्र करणाऱ्या प्रकाशपूर्ण द्युलोकांत जो तुझा अंश आहे. हे इंद्रा ! (यया तन्वा अन्तरिक्षं व्यापिथ , ज्या शरीरानें अन्तरिक्ष व्यापून आहेस. (तया तन्वा नः शर्म यच्छ) त्या शरीरानें, आम्हां सर्वांस सुख दे (तव इत् ०।० वरप्रमाणें (१३) हे इंद्रा ! (त्वां ब्रह्मणा वर्धयन्तः) (तुझी मंत्रांनी स्तुति करतो) (नाधमानाः ऋषयः सत्रं निषेदुः) प्रार्थना करणारे ऋषि सत्र नांवाच्या यज्ञासाठीं बसतात (तव इत् ०।०) (१४) हे व्यापक देवा ! (त्वं तृतं=त्रितं) तूं तीन स्थानांत प्राप्त (सहस्र-धारं विदथं स्वर्विदं उत्सं) सहस्रधारांनीं युक्त ज्ञानमय प्रकाशपूर्ण स्रोतांना (पर्येषि) व्यापून राहिला आहेस. (तव इत् ०।०) (१५)

हे देवा ! (त्वं चतस्रः प्रदिशः रक्षसे) तूं चारी दिशांचें रक्षण करतोस. (शोचिषा नभसी विभासि) तुझ्या तेजानें आकाशाला प्रकाशित करतोस. (त्वं इमाः भुवना अनुतिष्ठसे) तूं या सर्व भुवनांना अनुकूल होऊन राहतोस आणि (विद्वान् ऋतस्य पन्थां अन्वेषि) असें जाणून सत्य मार्ग अनुसरतोस. (तव इत् ०।० वर प्रमाणें) (१६)

(पञ्चभिः पराङ् तपसि) तूं तुझ्या पांची शक्तीच्या मर्यादेबाहेर तप करतोस. (एकया अर्वाङ्) आणि एकीच्या जवळ तपतोस आणि (सुदिने अशस्तिं बाधमानः एषि) चांगल्या दिवशीं अप्रशस्ततेस दूर करून पुढें जातोस. (तव इत्०।०) (१७) हे देवा ! (त्वं इन्द्रः) तूं इंद्र आहेस, (त्वं महेन्द्रः) तूं महान् इंद्र आहेस. (त्वं लोकः) तूं लोक- प्रकाशपूर्ण आहेस, (त्वं प्रजापतिः) तूं प्रजापालक आहेस, (यज्ञः तुभ्यं वितायते) यज्ञ तुझ्यासाठीं पसरवण्यांत येतो. आणि (जुह्वतः तुभ्यं जुह्वति) हवन करणारे तुझ्यासाठीं आहुति देतात. (तव इत्०।०)(१८)

असंति सत्प्रतिष्ठितं सति भूतं प्रतिष्ठितम् ।
भूतं ह भव्य आहितं भव्यं भूते प्रतिष्ठितं तवेद्विष्णो बहुधा वीर्याणि
त्वं नः पृणीहि पशुभिर्विश्वरूपैः सुधायां मा धेहि परमे व्योमन् ॥ १९ ॥
शुक्रोऽसि भ्राजोऽसि । स यथा त्वं भ्राजता भ्राजोऽस्येवाहं भ्राजता भ्राज्यासम् ॥ २० ॥

[२]

रुचिरसि रोचोऽसि । स यथा त्वं रुच्या रोचोऽस्येवाहं
पशुभिश्च ब्राह्मणवर्चसेन च रुचिषीय ॥ २१ ॥
उद्यते नम उदायते नम उदिताय नमः । विराजे नमः स्वराजे नमः सम्राजे नमः ॥ २२ ॥
अस्तंयते नमोऽस्तमेष्यते नमोऽस्तमिताय नमः । विराजे नमः स्वराजे नमः सम्राजे नमः ॥ २३ ॥
उदगादयमादित्यो विश्वेन तपसा सह ।
सपत्नान्मह्यं रन्धयन्मा चाहं द्विषते रधं तवेद्विष्णो बहुधा वीर्याणि ।
त्वं नः पृणीहि पशुभिर्विश्वरूपैः सुधायां मा धेहि परमे व्योमन् ॥ २४ ॥
आदित्य नावमारुक्षः शतारित्रां स्वस्तये । अहर्मात्यपीपरो रात्रिं सत्राति पारय ॥ २५ ॥
सूर्य नावमारुक्षः शतारित्रां स्वस्तये । रात्रिं मात्यपीपरोऽहः सत्राति पारय ॥ २६ ॥

अर्थ—(असति सत् प्रतिष्ठितं) असत् मध्यें म्हणजे प्राकृतिक सृष्टींत सत् म्हणजे आत्मा राहिला आहे. (सति भूतं प्रतिष्ठितम्) सत् मध्यें आत्म्यांत उत्पन्न झालेलें जग राहिलें आहे. (भूतं ह भव्ये आहितं) उत्पन्न झालेल्या प्राणिमात्रांत जे आश्रित आहे, (भव्यं भूते प्रतिष्ठितं) उत्पन्न होणाऱ्या प्राणिमात्रांत जे आश्रित आहे, (तव इत् ०।०) (१९) (शुक्रः असि) तूं तेजस्वी आहेस. (भ्राजः असि) तूं प्रकाशमय आहेस. (स त्वं) असा तूं, (यथा भ्राजता भ्राजः असि) जसा तेजस्वी आहेस (एव अहं भ्राजता भ्राज्यासं) तसाच मीं तेजानें प्रकाशित व्हावें. (२०)

[२] (रुचः असि) तूं प्रकाशमान् आहेस, (रोचः असि) तूं दैदीप्यमान् आहेस. (सः त्वं यथा रुच्या रोचः असि) तो तूं असा तेजानें तेजस्वी आहेस. (एव अहं पशुभिः च ब्रह्मवर्चसेन च रुचिषीय) त्याचप्रमाणें मीं पशूनीं आणि ज्ञानानें प्रकाशित व्हावें, (२१) (उद्यते नमः) उदयास येणाऱ्यास माझा नमस्कार (उदायते नमः) वर येणाऱ्यास नमस्कार असो. (उदिताय नम) जो उदित झाला आहे त्याला नमस्कार, (विराजे नमः) विशेष प्रकाशानें युक्त आहे त्यास नमस्कार, (स्वराजे नमः) स्वतःच्या तेजानें चमकणाऱ्यास नमस्कार. (सम्राज नमः) उत्तम प्रकाशयुक्तास नमस्कार. (२२) (अस्तंयते नमः) अस्तास जाणार आहे त्याला नमस्कार, (अस्तं एष्यते नमः) अस्त पावणाऱ्यास नमस्कार (अस्तमिताय नमः) जो अस्त पावणार आहे त्यास नमस्कार, (विराजे, स्वराजे, सम्राजे नमः) विशेष तेजयुक्त, उत्तम प्रकाशमान् आणि स्वतःच्या तेजानें प्रकाशणाऱ्यास नमस्कार असो. (२३) (अयं आदित्यः विश्वेन तपसा सह उद्गात्) हा सूर्य संपूर्ण तेजानें उदित झाला आहे. (मह्यं सपत्नान् रंधयन्) माझ्यासाठीं शत्रूंना वश करीत आहे. (अहं च द्विषते मा रधं) पण मीं कधींहि त्यांच्या अधीन होणार नाहीं (तव इत् विष्णो बहुधा वीर्याणि) हे व्यापक देवा ! तुझेच हे सर्व पराक्रम आहेत. (त्वं नः विश्वरूपैः पशुभिः पृणीहि) तूं आम्हां सर्वांस अनंतरूपांच्या पशूंनीं युक्त परिपूर्ण कर. आणि (परमे व्योमन् सुधायां मा धेहि) परमाकाशांत असणाऱ्या अमृतांत तूं आम्हांस धारण कर. (२४) हे आदित्या ! (स्वस्तये शतारित्रां नावं आरुक्षः) आमच्या कल्याणासाठीं शेंकडो वल्हीं असणाऱ्या होडीवर आरूढ हो. (मा अहः अति अपीपरः) मला दिवसाचे वेळीं पार ने आणि (रात्रिं सत्रा अतिपारय) रात्रीच्या वेळीं सुद्धां बरोबर राहून पैलथडी ने. (२५) हे सूर्या तुं आमच्यासाठीं (स्वस्तये) आमच्या कल्याणासाठीं नौकेवर चढ आणि दिवसा आणि रात्रींचे वेळीं मला पैलथडी ने. (२६)

प्रजापतेरावृतो ब्रह्मणा वर्मणाहं कश्यपस्य ज्योतिषा वर्चसा च ।
जरदष्टिः कृतवीर्यो विहायाः सहस्रायुः सुकृतश्चरेयम् ॥ २७ ॥
परीवृतो ब्रह्मणा वर्मणाहं कश्यपस्य ज्योतिषा वर्चसा च ।
मा मा प्रापन्निषवो दैव्या या मा मानुषीरवसृष्टा वधाय ॥ २८ ॥
ऋतेन गुप्त ऋतुभिश्च सर्वैर्भूतेन गुप्तो भव्येन चाहम् ।
मा मा प्रापत्पाप्मा मोत मृत्युरन्तर्दधेऽहं सलिलेन वाचः ॥ २९ ॥
अग्निर्मा गोप्ता परि पातु विश्वत उद्यन्त्सूर्यो नुदतां मृत्युपाशान् ।
व्युच्छन्तीरुषसः पर्वता ध्रुवाः सहस्रं प्राणा मय्या यतन्ताम् ॥ ३० ॥

अर्थ— (अहं प्रजापतेः ब्रह्मणा वर्मणा आवृतः) मीं प्रजापतीचें ज्ञानरूपी कवच धारण करून (कश्यपस्य ज्योतिषा वर्चसा च) आणि सर्वदर्शक देवाच्या तेज आणि बलानें युक्त होऊन (जरदष्टिः कृतवीर्यः) वृद्धावस्थेपर्यंत वीरवान् होऊन (विहायाः सहस्रायुः) विविध कर्मांनीं युक्त सहस्रायु-पूर्णायु होऊन (कश्यपस्य ज्योतिषा वर्चसा) आणि सर्वदर्शक देवाच्या तेजानें आणि बलानें युक्त होऊन; (याः दैवीः मानुषीः इषवः वधाय अवसृष्टाः) जे दिव्य आणि मानवी बाण वेधासाठीं सोडण्यांत आले आहेत ते (मा मा प्रापन्) मला प्राप्त न होवोत, त्यांनीं माझा वध न व्हावा. (२८) (ऋतेन गुप्तः) सत्याच्या योगें रक्षिलेला, (सर्वैः ऋतुभिः च) सर्व ऋतूंनीं रक्षिला गेलेलों मीं (भूतेन च भव्येन च गुप्तः अहं) भूत आणि भविष्यांनीं सुरक्षित झालेलों मीं येथें विचरावें. (पाप्मा मा उत मृत्युः मा मा प्रापत्) पाप अथवा मृत्यु मला प्राप्त न होवोत. (अहं वाचः सलिलेन अंतर्दधे) मीं माझ्या वाणीला, माझ्या शब्दांना पवित्र जीवनांत धारण करतों. वाणीची पवित्रता पवित्र जीवनानें करतो. (२९) (गोप्ता अग्निः विश्वतः प्राः परिपातु) रक्षक अग्नि सर्व बाजूंनीं माझें रक्षण करो (उद्यन् सूर्यः मृत्युपाशान् नुदतां) उदयास येणारा सूर्य मृत्युपाशास दूर करो. (व्युच्छन्तीः उषसः) प्रकाशयुक्त उषा आणि (ध्रुवाः पर्वताः) स्थिर पर्वत (सहस्रं प्राणाः मयि आयतन्तां) हजारो बळांनीं युक्त प्राण माझ्यांत पसरून ठेवोत. (३०)

स्वतःच्या अभ्युदयार्थ प्रार्थना

सतराव्या कांडाचें मनन

जे वाचक स्वतःचा अभ्युदय इच्छितात त्यांनीं या कांडाचें नीट मनन करावें. विशेषतः प्रथम पांच मंत्रांचा एक गण आहे त्याचें अत्यंत मनन करावें. जो मनुष्य विजय इच्छितो त्याच्यांत कसे गुण असावेत आणि कोणत्या गुणांची त्यानें स्वतःमध्यें वृद्धि करावी तें या पांच मंत्रांत दर्शविलें आहे. उन्नति इच्छिणाऱ्या मनुष्यानें स्वतःची इच्छा अशी ठेवली पाहिजे—

लोकप्रिय होणें

(अहं) देवानां, प्रजानां, समानानां, पशूनां,
प्रियः भूयासं आयुष्मान् भूयासम् ॥ (मं. १-५)

' मीं देवानां प्रजेला, समान योग्यतेच्या मनुष्यांना आणि पशूंना प्रिय व्हावें आणि दीर्घायु व्हावें,' सर्वांत महत्त्वाची गोष्ट दीर्घायु होण्याची आहे. कारण कीं आयुष्य, आरोग्य, बल वगैरे असलें तरच सर्व कांहीं, धर्म, अर्थ, कर्म घडणें संभवतें. म्हणून उन्नति साधूं इच्छिणाऱ्यास तेंच योग्य आहे. त्यांनीं धर्मानुसार आचरण करून स्वतःचें आयुष्य दीर्घ करावे, निरोगी होण्याचा प्रयत्न करावा, आणि बळास स्वतःमध्यें स्थिर करून त्याचा संचय करावा.

इतकें झाल्यानंतर, देव, प्रजा, समान योग्यतेचे लोक, आणि पशु यांस प्रिय होण्याची महत्त्वाकांक्षा धारण केली पाहिजे. आणि तिच्या सिद्धीसाठीं मनुष्यानें प्रयत्न केला पाहिजे. ' देव ' या शब्दाचा अर्थ ज्याप्रमाणें देवता असा होतो त्याप्रमाणेंच, भूदेव,

क्षत्रदेव, धनदेव आणि कर्मदेव असा चातुर्वर्णाच्या चार प्रकारचे श्रेष्ठ पुरुष असाहि होतो. या श्रेष्ठ पुरुषांसहि देव म्हणतात. या चारी वर्णांना त्या मनुष्याबद्दल प्रेम वाटावें. त्या सर्व श्रेष्ठ पुरुषांनी म्हणावें कीं अमुक मनुष्यना ? फारच उत्तम आहे. त्याचें भलें होवो. प्रजाजनांनीं त्याचेवर प्रेम करावें. अर्थात् तो लोकप्रिय होईल, लोकमान्य होईल, समान योग्यतेच्या लोकांत प्रिय होईल. कारण ज्ञानी मनुष्याचें प्रेम ज्ञानी मनुष्यावरच असतें. जे स्वतः वीर असतात त्यांचा ओढा आपोआप वीरांकडेच असतो. समान लोकांत प्रिय होण्यास त्यांच्याकरतां विशेष उत्तम गुण स्वतःमध्यें असले पाहिजे. असे गुण त्या मनुष्यानें मिळवावे, आणि स्वतः-च्या मित्रमंडळी-समवयस्करांचें प्रियपात्र व्हावें. जेव्हां हा मनुष्य पशूंचे पालन करील आणि त्यांचेवर प्रेम करील तेव्हां पशु स्वतःच त्यांचेवर प्रेम करूं लागतील. यासाठीं त्याचे ठायीं भूतदया विशेष असली पाहिजे. या विवेचनावरून वाचकाच्या ध्यानीं येईल, कीं देव, प्रजा, पशु आणि समानांचा प्रिय होण्याचा भावार्थ काय आहे. यावरून असा नियम बसवितां येईल कीं ज्या मनुष्याचें प्रिय आपणांस व्हावयाचें असेल त्याच्यावर आपणच प्रेम करावें. जर तो त्यांचेवर प्रेम करूं लागेल तर ते निःसंदेह त्याच्यावर प्रेम करूं लागतील.

वीराचे गुण

या सूक्ताच्या प्रथम मंत्रांत दहा शब्दांनीं वीराचे गुण सांगितले आहेत. उन्नति इच्छिणाऱ्या मनुष्यानें ते स्वतःच्या अंगीं बाणवून त्यांचा विकास साधला पाहिजे. जर वाचक या दहा शब्दांचें नीट मनन करतील तर वीरतेस आवश्यक दहा गुण कोणते तें त्यांच्या ध्यानीं येईल—

१. **गो-जित्**- '**गो**' शब्दाचा अर्थ ' इन्द्रियें अथवा भूमि ' असा होतो. हा अर्थ घेऊन विचार केला पाहिजे. पहिला अर्थ आहे (**गो-जित्**) इंद्रियांस जिंकणारा असा. स्वतःच्या इंद्रियांचा संयम करणारा, मनोनिग्रह करणारा, आत्मसंयम करणारा. सर्व उन्नतीचा आरंभ ' आत्मविजया ' पासून होतो. आत्मविजय अन्य सर्व विजयांपेक्षां कठिण आहे. तरीसुद्धां जो मनुष्य आत्मविजयाचीं साधनें प्राप्त करतो आणि अंतीं तें साध्य करतो त्याला इतर विजय सहज प्राप्त होतात. भूमीस विजयी करणें याचा दुसरा अर्थ आहे, स्वतःच्या शौर्यानें मातृभूमीस विजयी करणें. येथें मुख्यतः आत्मविजयच अर्थ ग्राह्य आहे कारण कीं, सर्व विजयांचा प्रारंभ आत्मविजयानें होतो.

२. **स्वः-जितं (स्वर्-जितं)** आत्मप्रकाश प्राप्त करणें. स्वतःच्या तेजाचा विजय प्राप्त करावयाचा. स्वतःच्या आध्यात्मिक तेजाचा विजय होईल अशीं योग्य कार्यें करावयाचीं. हा सुद्धां एक महान् विजय आणि वीरत्व आहे.

३. **संधना-जित्**- उत्तम धनास जिंकून तीं प्राप्त करणें. हीं सुद्धां एक महान् वीरता आहे. ज्याच्या सहवासांत असल्यामुळें मनुष्य स्वतःस धन्य म्हणून घेतो त्याला धन म्हणतात. धन म्हणजे कांहीं फक्त रुपये आणे पैच नाहीं. तसें समजणें एक भ्रम आहे. गाई सुद्धां धन आहे. राज्य अथवा स्वराज्य हें सुद्धां धन आहे. बळ हें सुद्धां धन आहे. विद्या धन आहे, प्रतिष्ठा धन आहे. सदाचार धन आहे. याप्रमाणें अनेक प्रकारचीं धनें आहेत. त्यांस प्राप्त करणें हें मनुष्याचें आवश्यक कर्तव्य ठरतें.

४. **सहमान**- आत्मिक बळ, तेज आणि जीवनानें युक्त असा.

५. **सहमान**- शारीरिक बळ आणि शक्तीनें युक्त होणें. हे दोनहि शब्द एकाच मंत्रांत वापरले आहेत. म्हणून त्या दोनही शब्दाचा अर्थ भिन्न होतो. ' **सहस्** ' शब्दाचा अर्थ बळ आहे. आणि त्याचे दुसरे अर्थ, शक्ति, विजय, तेज आणि जीवन असे आहेत. त्यांतील कांहीं अर्थ एकाचे आणि कांहीं दुसऱ्याचे आहेत. असें मानणें येथें योग्य होईल. अशा प्रकारें अर्थ केल्यानें दोन्ही शब्द अन्वर्थक पुनरुक्ति दोषरहित, असे होतील. म्हणजे या दोन्हीं प्रकारचीं बळें मनुष्यानें मिळविलीं पाहिजेत. या बळांत सैन्यबळसुद्धां अंतर्भूत होतें.

६. **सहो-जित्**- स्वतःच्या बलानें शत्रूंस जिंकणें. मनुष्यानें तसेंच राष्ट्रानेंसुद्धां स्वतःमध्यें असें बळ प्राप्त करून घ्यावें कीं, त्यामुळें तो किंवा तें सहज शत्रूंचा पराजय करूं शकेल.

७. **सहीयान्**- शत्रूचा हल्ला कितीही वेगवान् आणि जोरानें झाला तरी त्यामुळें जराहि घाबरून न जातां त्यास तोंड देणारा. शत्रूंच्या आक्रमणामुळें जराही खचून न जातां, अथवा पीछेहाट न होतां स्वस्थानीं स्थिर राहून विजय प्राप्त करणारा. शत्रूच्या आक्रमणास तोंड देऊन शत्रूसच जेरीस आणणारा.

८. **सासहान**- शत्रूंच्या वारंवार होणाऱ्या आक्रमणांनी घाबरून न जातां स्वस्थानीं स्थिर राहून त्यास तोंड देणारा, विजय प्राप्त करणारा, आणि स्वतःच्या स्थानांतूनच शत्रूस मार मारून पिटाळून लावणारा.

९, **विषासहि**- ज्याचा हल्ला शत्रूंवर झाला असतां शत्रूस पळून जावें लागतें, ज्याचें आक्रमण शत्रु सहन करूं शकत नाहीं.

१०. **ईड्यं नाम इंद्रः**- प्रशंसनीय यशस्वी (**इन्+द्रः**) शत्रूंचा पूर्ण नाश करणारा वीर पुरुष.

उपास्याचे गुण उपासकांत

हे दहा शब्द येथें इष्टदेवतेचे वाचक आहेत. या देवता

मनुष्याच्या उपास्य देवता आहेत. उपास्य दैवताचे गुण उपासकानें स्वतःमध्यें धारण केले पाहिजेत, असा उपासनेचा नियम आहे. या नियमानुसार उपासना करणाऱ्या वाचकांनीं स्वतःमध्यें वीरत्व गुणाची वृद्धि करावी आणि उन्नति मार्गानें पुढें जाऊन सर्व प्रकारचा अभ्युदय प्राप्त करावा. पूर्वोक्त गुण जर मनुष्यांत विकसले आणि वृद्धि पावले तर मनुष्याची आणि राष्ट्राची उन्नति नक्कीच होईल. उपासनेचे मंत्र फक्त तोंडानें म्हणण्यानें कांहीं मनुष्याची उन्नति होत नाहीं. परंतु त्यांत वर्णिलेले उपास्य देवतेचे गुण स्वतःमध्यें धारण करण्यानेंच मनुष्याची उन्नति होण्याचा संभव आहे. जो मनुष्य अथवा मनुष्यांचा संघ या प्रकारें वैयक्तिक अथवा सामुदायिक उपासना करतात तेच स्वतःचा अभ्युदय सर्व प्रकारें सिद्ध करूं शकतात. त्याविषयीं म्हटलें आहे—

अभ्युदय

उदिहि, उदिहि वर्चसा अभ्युदिहि । (मं. २)

' उदयास प्राप्त व्हा, उदय प्राप्त करा, तेजानें सर्व प्रकारचा अभ्युदय प्राप्त करा. ' हा मंत्र जरी उपास्य देव सूर्यासंबंधीं सांगितलेला असला तरी उपासकानें उपास्याचे गुण धारण करावयाचे असतात. या नियमानुसार प्रायः बहुतेक मंत्र उपासकाला आदेश देणारेच असतात त्याप्रमाणें हा मंत्र सुद्धां उपासकालाच अभ्युदयाचा आदेश देत आहे, ही गोष्ट वाचकांनीं विसरूं नये. अभ्युदय कोणत्या मार्गानें करून घ्यावयाचा तें या दोन मंत्रांत सांगितलें आहे.

द्विषन् मह्यं रध्यतु । अहं द्विषते मा रधम् । (मं. ६)

' माझा शत्रु माझ्या ताब्यांत येवो. परंतु मीं माझ्या शत्रूच्या काबूंत कधीं जाणार नाहीं, ' शत्रु अनेक प्रकारचे असतात आणि रणक्षेत्रें सुद्धां विविध असतात. या सर्व रणक्षेत्रांत एकच नियम आहे कीं स्वतः (स्वयं) शत्रूचा पराजय करावयाचा परंतु शत्रूकडून पराभूत व्हावयाचें नाहीं. विजय, उदय, अभ्युदय वगैरे प्राप्त करण्याची ही गुरुकिल्ली आहे. जे लोक अथवा जें राष्ट्र या प्रकारें स्वतःची तयारी करील त्याला विजय प्राप्त होईल.

पराक्रम

तव बहुधा वीर्याणि (मं. ६)

' तुझे पुष्कळ पराक्रम व्हावयास हवेत. ' तरच विजयाची शक्यता आहे. भगवान् विष्णु व्यापक देव आहे. त्यामुळें त्याचा सर्वत्र विजय होतो, कारण त्याचे पराक्रम अनंत आहेत. अनंत पराक्रम नसते तर विजय होणें अशक्य आहे. विजय प्राप्त करण्यास अनेक रणक्षेत्रांत उतरावें लागतें आणि तेथें महान् पराक्रम करावे लागतात. म्हणून—

सुमतिं कृधि । सुधायां देहि (मं. ६।७)

' तुझ्यांत तूं सुमति धारण कर. उत्तम धारणेंत तूं स्वतःला आणि इतरांनाहि धारण कर. ' सुमतिशिवाय अध्यात्मक्षेत्रांत विजय मिळवितां येणार नाहीं. (सु–धा.) उत्तम धारणेशिवाय समाजाचा अथवा संघाचा विजय होणें शक्य नाहीं. हा नियम नेहमीं ध्यानांत ठेवावा. या कार्यासाठीं पुष्कळ दिवस प्रयत्न करावे लागतात, असें सूचित करण्यासाठीं म्हटलें आहे कीं—

महत् सौभाग्य

त्वं महते सौभगाय अदब्धेभिः अक्तुभिः परिपाहि । (मं. ९)

' तुला तुझ्या सौभाग्याच्या वृद्धीसाठीं, जराहि न थकतां अथवा कोणाच्याहि धाकदपटशानें दबून न जातां दिवसानुदिवस सुरक्षितता राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हा आदेश फारच उत्साहवर्धक आहे. वाटेल तितका शक्तिसंपन्न मनुष्य दबविण्याचा प्रयत्न करील तरी त्यानें दबून न जातां मुक्त रहाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पाशवी शक्तीनें न दबून जाण्याचा निश्चय करणें हीच अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. आत्म्याची शक्ति इतकी प्रचंड आहे कीं, समग्र जगताच्या शक्तीशीं विरोध आला तरी ती दबून जाणार नाहीं, परंतु त्यासाठीं मनाचा निश्चय असावयास हवा. ' महान सौभाग्य ' जें वरील मंत्रांत सांगितलें आहे तें तेव्हांच प्राप्त होईल. उत्साह वाढविण्यासाठीं पुढें म्हटलें आहे,कीं—

दबून जाऊं नये

पृथिव्यां अदब्धः असि । ते महिमानं न आपुः । (मं. १२)

' पृथ्वीवरील न दबून जाणारा तूं महान आत्मा आहेस, तुझें महत्त्व, महिमा, अन्य भौतिक जड पदार्थ प्राप्त करूं शकत नाहींत. ' जड पदार्थ वाटेल तितकें सामर्थ्यवान् असोत परंतु त्यांची शक्ति आत्म्याच्या बरोबरींत येऊं शकत नाहीं. आपल्या आत्म्याची एवढी प्रचंड शक्ति जाणण्यासाठींच हें सर्व धर्मानुष्ठान आहे. आपल्या परमपित्याच्या प्रचंड पराक्रमाचें वर्णन एवढ्यासाठींच म्हणजे उपासनेसाठीं उपासकांसमोर वेदमंत्रांच्या सहाय्यानें ठेवण्यांत आलें आहे. एक दिवस त्यांना हें कळून येईल कीं स्वतःमध्यें त्या परमपित्याचाच अंश आहे. या सत्याचा त्यांनीं अनुभव घ्यावा आणि त्याचे गुण स्वतःच्या ठायीं बाणविण्याचा प्रयत्न करावा. ईश्वराचे गुण कसे धारण करतां येतात त्याविषयीं आणखी सुद्धां पुढें सांगितलें आहे—

अदब्धेन ब्रह्मणा वावृधानः । (मं. १२)

' न दबणाऱ्या ज्ञानानें पुढें जाणारा, ' प्रगति साधणारा, तूं

तुम्ही (बहुधा वीर्याणि) पुष्कळ पराक्रम कर. येथें जें सांगितलें आहे तें प्रत्येक वैदिकधर्मीयानें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. मनुष्याची उन्नति ज्ञानानेंच होणें शक्य आहे हे येथें सांगितलें आहे म्हणून त्यासाठीं उन्नति इच्छिणाऱ्या साधकांनीं ज्ञानप्राप्तीच्या यत्नांत कटिबद्ध व्हावें. येथें ज्ञानाचें महत्त्व वर्णिलें आहे तें प्राप्त केल्यानंतर—

सत्याचा मार्ग

विद्वान् ऋतस्य पन्थां अनु एषि । (मं. १६)

' विद्वान् होऊन सत्यमार्गानें अनुकूल होऊन चालतो. ' सत्याचें आग्रहपूर्वक पालन केलें पाहिजे. सत्यच मनुष्यास मार्गदर्शक आणि सर्व बन्धनांना दूर करणारें आहे. सत्यपालनानें सर्व प्रकारची उन्नति होते. त्याचप्रमाणें—

अशस्ति बाधमानः सुदिने एषि । (मं. १०)

' अप्रशस्त, निंदनीय वस्तु दूर करण्यानें तूं उत्तम दिवसाच्या प्रकाशपूर्ण जीवनांत वर्तन करणारा होशील. मनुष्यास ज्याप्रमाणें जीवनांत सत्याचें पालन करणें अभीष्ट आहे त्याचप्रमाणें अप्रशस्त, निंदनीय, दुष्ट व्यवहार सर्वस्वी त्यागणें हें अत्यंत इष्ट आहे. एरवीं मनुष्यास उच्च स्थिति कधीं प्राप्त होणार नाहींच उत्तम गुणाची स्वतःमध्यें वृद्धि करणें आणि हीन दुर्गुणांस स्वतःचे अंतःकरणांतून काढून लावणें हेंच अभ्युदयाचें अनुष्ठान आहे. मनुष्य स्वतःच्या अभ्युदयाच्या मार्गांत किती पुढें गेला किंवा किती मागें सरला हें त्याच्या भूतकाल तसेंच भविष्यकाळच्या होणाऱ्या व्यवहारावरून समजूं शकतें. म्हणून म्हटलें आहे कीं—

आत्मा आणि संसार

असति सत् प्रतिष्ठितम् । सति भूतं प्रतिष्ठितम् ।
भूतं भव्ये भव्यं भूते च प्रतिष्ठितम् । (मं. १९)

' असतामध्यें सत् आणि सतामध्यें भूत सामावलेलें आहे, हें प्रथम कथन आहे. हा संसार नाशवंत असल्यानें असत् आहे. परंतु आत्मा हा त्रिकालाबाधित असल्यानें सत् आहे. आणि हे दोन्ही एकमेकांत गुंतलेले असल्यानें, ते एकमेकांच्या आधारें असतात असें म्हटलें आहे. हाच विषय अन्य शब्दांनीं असाहि सांगता येईल ' शरीरांत आत्मा आणि आत्म्यांत शरीर स्थिरावलें आहे. ईशावास्योपनिषदांत याच अर्थाचा खालील मंत्र आहे—

यस्तु सर्वाणि भूतान्यात्मन्येवानुपश्यति ।
सर्वभूतेषु चात्मानं ततो न विजुगुप्सते ॥
(वा० य० ४०।६)

यस्तु सर्वाणि भूतान्यात्मन्येवानुपश्यति ।
सर्वभूतेषु चात्मानं ततो न विचिकित्सति ॥
(ईश. उप. काण्व. यजु ४०।६)

त्याचप्रमाणें भागवतांतहि—

आत्मानं सर्वभूतेषु भगवन्तमवस्थितम् ।
अपश्यत् सर्वभूतानि भगवत्यपि चात्मनि ॥
(श्री. भागवत ३।२४।४६)

सर्व भूतेषु यः पश्येद्भगवद्भावमात्मनः ।
भूतानि भगवत्यात्मन्येष भागवतोत्तमः ॥
(श्री. भाग. ११।२।४५)

वरील सर्व श्लोकांचा भावार्थ एकच आहे तो असा— 'आत्मा (सत्) सर्व भूतांत (असतांत) आहे आणि सर्व भूतें (असत्) आत्म्यामध्यें आहेत. हें जो जाणतो आणि अनुभवितो त्याला महान् भक्त म्हणतात. तोच श्रेष्ठ पुरुष होय. तोच शोक आणि मोह यांपासून दूर आणि अलिप्त राहून परम सिद्धि प्राप्त करतो. या सर्वांत प्रथम परीक्षा परमेश्वर सर्वत्र उपस्थित असल्याचा अनुभव येणें ही आहे. असा अनुभव येऊं लागला कीं समजावें उन्नति झाली आहे. आणि जर केवळ शब्दांनीच ' परमेश्वर सर्वव्यापक आहे ' असें शाब्दिक ज्ञान झालेलें असले तर समजावें कीं अजून श्रवण, मनन निदिध्यासाच्या अनुष्ठानाची आवश्यकता आहे.

वरील मंत्रांत दुसरी परीक्षा अशी सांगण्यांत आली आहे कीं (**भूतं भव्ये, भव्यं भूते आहितं**) भूतभविष्यांत आणि भविष्य भूतांत सामावलेलें आहे. त्याचा अनुभव घेण्यासाठीं मनुष्यानें स्वतःचा विचार प्रथम करावा. मनुष्याचें वर्तमान आणि भविष्य त्याच्या भूतकालीन कर्मांत असतें. आणि त्याच्या भूतकाळाशी भविष्यकाळ जोडलेला असतो. उदाहरणार्थ पहा. एक मनुष्य प्रथम आयुष्यांत उत्तम ब्रह्मचर्याचें पालन करून धर्मानुष्ठानानें स्वतःचें आयुष्य व्यतीत करतो. तर त्यावरून समजावें कीं त्याचें यौवन आणि वार्धक्य सुखानें व्यतीत होईल. कारण त्याच्या भूतकाळाचा संबंध भविष्यकाळांशी आहे. त्याचप्रमाणें राष्ट्राच्या बाबतींतहि पहा. ज्या राष्ट्राच्या भूतकाळांत लोकांनीं उत्तम पुरुषार्थ केला असेल त्या राष्ट्राचा वर्तमान आणि भविष्यकाळ सुद्धां आनंदांत व्यतीत होतील. आणि ज्या राष्ट्रांतील लोकांनीं भूतकाळीं पारतंत्र्यांत दिवस काढले असतील, पारतंत्र्य अनुभविलें असेल, त्यांचा भविष्यकाळ कष्टमय जाईल. कारण कीं (**भूतं भव्ये, भव्यं भूते आहितं**) भूत भविष्यांत फल देतें आणि भविष्यकाळाचा उगम भूतकाळांत होतो. याप्रमाणें वेदाचा उपदेश जितका व्यक्तीस उपयुक्त तितकाच राष्ट्रासाठीं सुद्धां प्रत्यक्ष पहावयास सांपडतो. या सत्याचा अनुभव घेऊन मनुष्यानें स्वतःच्या भविष्यकाळांत दुःख प्राप्त होईल असें बीं सांप्रतकाळीं पेरूं नये. परंतु त्यानें वर्तमानकाळीं अशीं शुभकार्यें करावी कीं ज्याचीं शुभ फळें त्यास भविष्यकाळी प्राप्त व्हावींत हेंच त्यास उचित

होईल. आजची आपली वर्तमानकालीन स्थिति आपणास आपल्या भूतकालीन कर्मांचा परिपाक आहे आणि इल्लींच्या आपल्या वर्तमान कृत्यांनीं आमचा भविष्यकाळ सिद्ध होत आहे. म्हणून वेदांत म्हटलें आहे कीं—

भूत, भविष्य, वर्तमान

पुरुष एवेदं सर्वं यद्भूतं यच्च भाव्यम् ।
(ऋ. १०।९०।२)
उतामृतत्वस्येशानः ०। (वा. यजु. ३०।२; ११२)
पुरुष एवेदं सर्वं यद्भूतं यच्च भाव्यम् ।
उतामृतत्वस्येश्वरः ०॥ (अथर्व. १९।६।४)

'वर्तमानकाळीं जो पुरुष आहे तोच त्याचें भूत आणि भविष्यकाळचें रूप आहे. आणि तो अमृतत्वाचा स्वामी आहे. म्हणजे कोणा पुरुषाचा वर्तमानकाळ हें त्याच्या भविष्याचें बीज आहे आणि वर्तमान जीवन त्यांच्या भूतकाळच्या कृत्यांचा परिणाम आहे.' मनुष्याच्या तारुण्यावरून त्याचें बाळपण कसें गेलें असेल त्याचा अंदाज बांधता येतो. आणि त्यावरूनच त्याचा भविष्यकाळ कसा जाईल त्याचें अनुमान करतां येतें. राष्ट्रपुरुषांविषयीं सुद्धां हीच गोष्ट आहे. राष्ट्राच्या वर्तमानकाळ परिस्थितीवरून त्याचा भूतकाळचा पुरुषार्थ अथवा पुरुषार्थहीनता परिणाम रूपानें दिसते. आणि वर्तमानकाळीं तो जें कांहीं करतों तें भविष्यकाळासाठीं बीं पेरून राहिलेला असतो. कारण प्रत्येक पुरुष भूतकालाचा परिणाम आणि भविष्यकाळाचें बीज धारण करून असतो. वाचकांनीं याप्रकारें आत्मपरीक्षण करावें आणि नंतर स्वतःचा मार्ग उन्नतीचा आहे कीं अवनतीचा तें ठरवावें. जर अवनतीचा मार्ग असेल तर त्याचा तात्काळ त्याग करावा आणि उन्नतीचा मार्गच नेहमीं राखावा, अनुसरावा. तसेंच मनांत अशी महत्वाकांक्षा धारण करावी, कीं—

आत्मतेज

अहं भ्राजता भ्राज्यासम् । (मं. २०)

'मीं माझ्या तेजानें तेजस्वी होईन' दुसऱ्याच्या तेजानें तेजस्वी होण्यांत पराधीनत्व आहे. प्रत्येकानें स्वतःच्या तेजानें तेजस्वी झालें पाहिजे. प्रत्येकानें स्वसामर्थ्यानें आत्मरक्षण करण्यास शिकलें पाहिजे. प्रत्येकानें स्वतःच्या ज्ञानानें बळवान व्हावें. प्रत्येकानें स्वतःच्या धनव्ययानें भोगलालसा भोगाव्यात याचप्रमाणें इतर बाबतीं जाणाव्यांत. ज्याचें रक्षण स्वतःच्या शक्तीनें होत नाहीं म्हणजे जो स्वतःचें रक्षण स्वतः करूं शकत नाहीं, जो स्वतःच्या ज्ञानानें विचार करूं शकत नाहीं, ज्याचे जवळ स्वतःच्या उदरनिर्वाहास पुरेसे अन्नधान्यादि खाद्य पदार्थ नाहींत, त्याची स्थिति शोचनीय होते. याविषयीं वाचकांनींच विचार करावा आणि सामर्थ्यानें समर्थ होऊन येथें तेजस्वी, यशस्वी, कीर्तिमान् आणि स्वतंत्र म्हणजे शुद्ध आणि मुक्त होण्याचा प्रयत्न करावा. त्याचप्रमाणें पुढेंहि आणखी सांगितलें आहे कीं—

अहं ब्रह्मवर्चसेन रुच्या रोचः (भूत्वा) रुचिषीय ।
(मं. २१)

'मीं ज्ञानाच्या प्रभावानें प्रभावित होऊन आणि स्वतःच्या तेजानें तेजस्वी होऊन प्रकाशित होईन.' या मंत्रांत सुद्धां तेजभावाविषयीं द्विवार सांगितलें आहे. आणि उन्नतीसाठीं ज्ञानाची आवश्यकता असते हें पुनः एकदां स्पष्ट सांगितलें आहे.

त्यापुढें उदयास प्राप्त होणारे, प्रकाशित होणारे अशानां नमस्कार सांगितला आहे. आणि जे अशाप्रकारें प्रकाशित होऊन गेले आणि ज्यांनीं आपला जीवनक्रम आचरून जे अस्त पावले त्यांना सुद्धां नमस्कार करण्यास सांगितलें आहे. येथें सूर्याचा आदर्श ठेवण्यास सांगितलें आहे. मनुष्याचा आदर्श सूर्य आहे. सूर्याप्रमाणें मनुष्यानें स्वतःचा अभ्युदय साधावा. सूर्याप्रमाणें स्वतेजानें या जगांत प्रकाशित होऊन प्रदीप्त होऊन आणि सर्वांस मार्गदर्शन करून अंतीं कृतकृत्य होऊन अस्त पावावें. याप्रमाणें अस्त पावणें हें सुद्धां आदर्शरूपच आहे. एवं मनुष्यांनीं सूर्यास आदर्श मानावें आणि त्याच्यापासून हा बोध प्राप्त करावा. या दृष्टीनें विचार करून सूर्यास स्वतःचा आदर्श मानून २६ मंत्रापर्यंतचा उपदेश केलेला आहे. मनुष्यानें मननानें त्याचा विचार करावा. त्यानंतर एक अत्यंत महत्वपूर्ण मंत्रभाग आहे. तो प्रत्येक मनुष्यानें नित्य स्मरण करण्यासारखा आहे. तो पहा—

स्वतःचें यश

अहं ब्रह्मणा वर्मणा ज्योतिषा वर्चसा च आवृतः
कृतवीर्यः विहायाः जरदष्टिः सहस्रायुः सुकृतः
चरेयम् ॥ (मं. २७)
अहं ब्रह्मणा वर्मणा ज्योतिषा वर्चसा च परिवृतः
ऋतेन गुप्तः... भूतेन भव्येन च गुप्तः (चरेयम्)॥
(मं. २८-२९)

पाप्मा मा मा प्रापत् मृत्युः मा मा प्रापत् ।
अहं वाचः सलिलेन अन्तर्दधे । (मं. २९)

'ज्ञान, आत्मरक्षणाचें सामर्थ्य, तेज आणि जलानें युक्त होऊन पराक्रम करतां करतां विविध पुरुषार्थांचें साधन प्राप्त करीत, दीर्घआयु प्राप्त करून सदाचारानें व्यवहार करीन. ज्ञान, आत्म-

रक्षणाचें सामर्थ्य, तेज आणि बळानें युक्त होऊन सत्यानें नेहमीं सुरक्षित होऊन, भूतभविष्य आणि वर्तमानकाळीं होणाऱ्या कर्मांपासून सुरक्षित होऊन मीं सदाचारानें व्यवहार करीन. पाप माझ्याजवळ न येवो. मृत्यूचें भय मला न शिवो. मी माझ्या वाणीला शुद्ध जीवनयुक्त करतो. '

यांतील प्रत्येक वाक्य इतकें स्पष्ट आहे, इतकें तेजस्वी आहे, इतकें बोधमय आहे आणि इतकें मार्गदर्शक आहे कीं त्यांचें अधिक स्पष्टीकरण येथें करण्याची आवश्यकता नाहीं. वाचकांनीं त्यांचा नित्य पाठ करावा, वारंवार मनन करावें, आणि स्वतःच्या आत्म्यामध्यें हे तेजस्वी विचार स्थिर करावेत. या विचारांच्या स्थिरतेनें मनुष्य विजयी होईल आणि अभ्युदय प्राप्त करील. आणि धन्य सुद्धां होईलच. जे वाचक याप्रमाणें या कांडाचें मनन करतील त्यांस स्वतःच्या उन्नतीविषयीं पर्याप्त ज्ञान प्राप्त होईल. या कांडाच्या प्रत्येक मंत्रांत गुप्त ज्ञान भरपूर भरलेलें आहे. फक्त बाह्य अर्थ जाणून वाचकांनीं असें समजूं नये कीं, आम्हांस मंत्राचा आशय समजला. मंत्राचा आशय तर मागल्यापुढल्या शब्दांसह प्रत्येक विधानाची संगति लाऊन मनन केल्यानेंच ध्यानीं येईल. वाचक या कांडाच्या महत्त्वपूर्ण उपदेशानें जास्तींतजास्त बोध प्राप्त करून घेऊन धन्य आणि कृतकृत्य होतील.

पराक्रमानें विजय

कांड ८, सूक्त ८

(ऋषिः- भृग्वङ्गिराः । देवता- इन्द्रः, वनस्पतिः, परसेना-हननं च)

इन्द्रो मन्थतु मन्थिता शक्रः शूरः पुरंदरः । यथा हनाम सेना अमित्राणां सहस्रशः ॥ १ ॥
पूतिरज्जुरुपध्मानी पूतिं सेनां कृणोत्वमूम् । धूममग्निं परादृश्यामित्रा हृत्स्वा दधतां भयम् ॥ २ ॥
अमूनश्वत्थ निः शृणीहि खादामून्खदिराजिरम् । ताजद्भङ्ग इव भज्यन्तां हन्त्वेनान्वधको वधैः ॥३॥

अर्थ — (**पुरंदरः शूरः शक्रः मंथिता इंद्रः**) शत्रूंच्या नगरास तोडणारा शूर समर्थ, शत्रुसैन्याचें मंथन करणारा इंद्र (**मन्थतु**) शत्रुसेनेचें मंथन करो. (**यथा**) ज्याच्या शक्तीनें (**अमित्राणां सहस्रशः सेनाः**) शत्रूंच्या हजारों सैनिकांस (**हनाम**) आम्ही मारूं. (१)

(**उपध्मानी पूति-रज्जुः**) पेटविलेली दुर्गंधयुक्त दोरी, (**अमूं सेनां पूतिं कृणोतु**) या सेनेस दुर्गंधयुक्त करो. (**धूमं अग्निं परादृश्य**) धूर आणि अग्नीला दुरूनच पाहून (**अमित्राः हृत्सु भयं आदधतां**) शत्रु हृदयांत भय धारण करोत. (२)

हे (**अश्व-त्थ**) घोड्यावर बसलेल्या वीरा ! (**अमून् निःशृणीहि**) त्यांना कापून टाका. हे (**खदि-र**) शत्रूंना खाऊन टाकणाऱ्या वीरांनों ! (**अमून् अजिरं खाद**) त्यांस लवकर खाऊन टाका. (**ताजद् भङ्ग इव**) शीघ्रभंजन करणाऱ्याप्रमाणें, (**भज्यन्तां**) भग्न करण्यांत यावे. आणि (**वधः वधैः एनान् हन्तु**) वध करणारा शस्त्रांनीं त्यांना मारो. (३)

भावार्थ— शूरवीर शत्रूंचे किल्ले तोडून टाकोत, शत्रूसेनेला देशोधडीस उधळून लावोत. आम्हीं सुद्धां हजारों शत्रूंना मारून टाकावें. (१)

शत्रुसेनेवर हल्ला करण्यासाठीं पेटवलेली दारूची वात शत्रुसैन्यांत दुर्गंधी वास निर्माण करो. त्या धुरास आणि ज्वाळांस पाहून शत्रु भयभीत व्हावा. (२)

घोडेस्वार शत्रूस मारोत. आमचे वीर शत्रूस खाऊन टाकोत. म्हणजे त्यांचा नाश करोत. आमचे वीर स्वतःच्या शस्त्रांनीं शत्रूंचा नाश करोत. (३)

परुषानमून्परुषाह्वः कृणोतु हन्त्वेनान्वधको वधैः। क्षिप्रं शर इव भज्यन्तां बृहज्जालेन संदिताः॥ ४ ॥
अन्तरिक्षं जालमासीज्जालदण्डा दिशो महीः। तेनाभिधाय दस्यूनां शक्रः सेनामपावपत् ॥ ५ ॥
बृहद्धि जालं बृहतः शक्रस्य वाजिनीवतः।
तेन शत्रूनभि सर्वान्न्युब्ज यथा न मुच्यातै कतमश्चनैषाम् ॥ ६ ॥
बृहत्ते जालं बृहत इन्द्र शूर सहस्रार्घस्य शतवीर्यस्य।
तेन शतं सहस्रमयुतं न्यऽर्बुदं जघान शक्रो दस्यूनामभिधाय सेनया ॥ ७ ॥
अयं लोको जालमासीच्छक्रस्य महतो महान्। तेनाहमिन्द्रजालेनामूंस्तमसाभि दधामि सर्वान् ॥८॥
सेदिरुग्रा व्यृद्धिरार्तिश्चानपवाचना। श्रमस्तन्द्रीश्च मोहश्च तैरमूनभि दधामि सर्वान् ॥ ९ ॥

अर्थ— (परुष-आह्वः) कठोर आह्वान करणाऱ्या वीरा (अमून् परुषान् कृणोतु) त्यांना कठोर कर. (वधकः वधैः एनान् हन्तु) वधकर्ता शस्त्रांनीं त्यांचा वध करो. (बृहत् जालेन संदिताः) फार मोठ्या जाळ्यानें बांधलेला शत्रु (शर इव क्षिप्रं भज्यन्तां) बाणाप्रमाणें त्वरित तुटून जावो. (४)

(अंतरिक्षं जालं आसीत्) अन्तरिक्ष जाळें आहे. आणि (महीः दिशः जालदण्डाः) विस्तृत दिशा जाळ्यांचे दांडे आहेत, (तेन दस्यूनां सेनां अभिधाय) त्यांनीं शत्रूच्या सेनेस पकडून (शक्रः अप अवपत्) शूरवीर त्यांना पळवून लावतो. (५)

(वाजिनीवतः बृहतः शक्रस्य) सेनेसह रहाणाऱ्या महान् इन्द्राचें (बृहत् हि जालं) मोठें जाळें आहे. (तेन सर्वान् शत्रून् अभिन्युब्ज) त्यानें सर्व शत्रूंना चारी बाजूंनीं आधीन कर (यथा एषां कतमः चन न मुच्यातै) ज्यापुढें त्यांच्यांतील एकहि सुटून जाऊं न शकावा. (६)

हे (शूर इन्द्र) शूर इन्द्रा ! (सहस्रार्घस्य शतवीर्यस्य बृहतः ते) हजारों ज्याची पूजा करतात आणि शेंकडों प्रकारच्या सामर्थ्यसंपन्न इंद्रा (बृहत जालं) हें तुझें जाळें महान् आहे. (तेन अभिधाय) त्या जाळ्यानें घेरून टाकून तसेंच (सेनया) स्वतःच्या सेनेनें (शक्रः) इंद्र (दस्यूनां शतं सहस्रं अयुतं न्यर्बुदं अभिधाय जघान) शत्रूंच्या शेंकडों, हजारों, लाखो कोट्यावधी सैनिकांना मारून टाकतो. (७)

(महतः शक्रस्य) महान् इंद्राचा (अयं महान् लोकः) हा मोठा लोक (जालं आसीत्) जाळेंच होता. (तेन इन्द्रजालेन) त्या इंद्राच्या जाळ्यानें (सर्वान् अमून् तमसा अहं अभिदधामि) या सर्व शत्रूंच्या वीरांना अंधःकारानें मीं घेरतों, (८)

(उग्रा सेदिः) पुष्कळ थकणें, (व्यृद्धिः) निर्धनता (अनपवाचना आर्तिः च) वर्णन करतां येणार नाहींत असे कष्ट (श्रमः) मेहनत, परिश्रम (तन्द्रीः मोहः चः) आळस आणि मोह (तैः अमून सर्वान् अभिदधामि) यांनीं सर्व शत्रूंस मी घेरून टाकतों (९)

भावार्थ—आमच्या सेनापतींनीं धैर्याच्या भाषणांनीं सैनिकांस कठोर बनवावें. आमच्या वीरांनीं शत्रुसेनेचा नाश करावा. मोठ्या जाळ्यांत शत्रुसेनेस घेरून पकडून नाश करावा. (४)

हें अंतरिक्ष मोठें जाळें आहे. या दिशा हे त्याचे खांब आहेत. या जाळ्यानें शत्रूंना पकडून शूरवीर त्यांचा नाश करोत. (५)

सैन्यासह हल्ला करणाऱ्या इंद्राजवळ मोठें जाळें आहे. त्यानें शत्रुसेनेला बांधण्यांत येतें. आणि त्यांतून कोणीहि वांचू शकत नाहीं.(६)

अनेक पराक्रम करणाऱ्या पूजनीय इंद्रदेवाचें एक मोठें जाळें आहे. त्या जाळ्यांत शत्रुसैनिकांस बांधण्यांत येतें. आणि त्याचे शेंकडो हजारों लाखों सैनिक मारले जातात. (७)

महान् इंद्राचा हा विस्तृत लोक हेंच मोठें जाळें आहे, या जाळ्यांत सर्व शत्रु अंधारानें बांधले जावोत. (८)

थकणें, निर्धनता, कष्ट, परिश्रम, आळस, अज्ञान इत्यादींनी शत्रूला घेरून टाकतों. (९)

मृत्यवेऽमून्प्र यच्छामि मृत्युपाशैरमी सिताः । मृत्योर्ये अघला दूतास्तेभ्य एनान्प्रति नयामि बद्ध्वा ॥ १० ॥
नयतामून्मृत्युदूता यमदूता अपोम्भत । परः सहस्रा हन्यन्तां तृणेद्वेनान्मत्यं भवस्य ॥ ११ ॥
साध्या एकं जालदण्डमुद्यत्य यन्त्योजसा । रुद्रा एकं वसव एकमादित्यैरेक उद्यतः ॥ १२ ॥
विश्वे देवा उपरिष्टादुब्जन्तो यन्त्वोजसा । मध्येन घ्नन्तो यन्तु सेनामाङ्गिरसो महीम् ॥ १३ ॥
वनस्पतीन्वानस्पत्यानोषधीरुत वीरुधः । द्विपाच्चतुष्पादिष्णामि यथा सेनाममूं हनन् ॥ १४ ॥
गन्धर्वाप्सरसः सर्पान्देवान्पुण्यजनान्पितॄन् । दृष्टानदृष्टानिष्णामि यथा सेनाममूं हनन् ॥ १५ ॥
इम उप्ता मृत्युपाशा यानाक्रम्य न मुच्यसे । अमुष्या हन्तु सेनाया इदं कूटं सहस्रशः ॥ १६ ॥

अर्थ— (अमून् मृत्यवे प्रयच्छामि) त्या शत्रूंना मीं मृत्यूकडे पाठवून देतो (मृत्युपाशैः अमी सिताः) मृत्यूच्या पाशानें त्यांना बांधलें आहे. (मृत्योः ये अघलाः दूताः) मृत्यूच्या पाशानें जे मारून टाकणारे दूत आहेत, (तेभ्यः एनान् बद्ध्वा प्रति नयामि) त्यांनीं त्यांस बांधून घेऊन जातो. (१०)

हे (मृत्युदूताः) मृत्युदूत हो ! (अमून् नयत) त्यांना घेऊन जा. हे (यमदूताः) यमाचे दूत हो ! (अपोम्भत) त्यांना समाप्त करा. (परः सहस्राः हन्यन्तां) हजारांवर मारून टाकण्यांत यावेत (एनान् भवस्य मत्यं तृणेद्‌) त्यांचा ईश्वराच्या अभिप्रायाप्रमाणें नाश करा. (११)

(साध्याः एकं जालदण्डं उद्यत्य) साध्यदेव जाळयाचा एक दांडा उचलून (ओजसा यन्ति) बळासह जातो. (रुद्राः एकं) रुद्रदेव एकाला (वसवः एकं) वसुदेव एकाला पकडतो आणि (आदित्यैः एकः उद्यतः) आदित्य देवांनीं एकाला उचलून घेतलें (१२)

(विश्वे देवाः उपरिष्टात् उब्जन्तः) विश्वेदेव वरूनच दुष्टांना दबवून (ओजसा यन्ति) बलपूर्वक चालतात. (अंगिरसः मध्येन महीं सेनां घ्नन्तः) अंगीरस मधूनच मोठ्या सेनेचा नाश करून (यन्तु) जावो. (१३)

(वनस्पतीन् वानस्पत्यान्) वनस्पति आणि त्यांपासून तयार केलेले पदार्थ (ओषधीः उत वीरुधः) औषधि आणि वेली (चतुष्पाद् द्विपात्) चतुष्पाद आणि द्विपादांना (इष्णामि) मीं प्रेरित करतों. (यथा अमूं सेनां हनन्) ज्यांच्या सहाय्यानें या सेनांचा नाश करतों. (१४)

(गंधर्वाप्सरसः सर्पान्) गंधर्व, अप्सरा आणि सर्प (देवान् पुण्यजनान् पितॄन्) देव, पुण्यजन आणि पितर हे (दृष्टान् अदृष्टान् इष्णामि) पाहिलेल्या आणि न पाहिलेल्या सर्वांना मीं प्रेरित करतों, (यथा अमूं सेनां हनन्) ज्यामुळें या सेनेचा नाश होतो. (१५)

(इमे मृत्युपाशाः उप्ताः) हे मृत्युपाश ठेवलेले आहेत. (यान् आक्रम्य न मुच्यसे) ज्यांचें आक्रमण करून तूं सुटणार नाहींस. (अमुष्याः सेनायाः) या सेनेच्या (इदं कूटं) या केन्द्राला (सहस्रशः हन्तु) हजारो प्रकारांनीं मारून टाकावें. (१६)

भावार्थ—त्या शत्रूला मृत्युजवळ पाठवितों. मृत्युपाशानें त्यांस बांधण्यांत आलें आहे. ते मृत्यूचे मारक दूत आहेत. शत्रूंना त्यांचेजवळ घेऊन जातो. (१०)

मृत्यूचे दूत आमच्या शत्रूंस पकडोत. यमदूत त्यांचा अंत आणोत. याप्रमाणें हजारों शत्रु मारले जावोत. (११)

साध्य, रुद्र, वसु आणि आदित्य या जाळयाचे चारी खांब धरून जोरानें वेगानें धांवतात (१२)

विश्वेदेव वरून हल्ला करतात आणि आंगिरस शत्रुसेनेच्या मध्यावर हल्ला करतात. (१३)

वनस्पती, वनस्पतीपासून तयार केलेले पदार्थ, औषधी, वेली, द्विपाद आणि चतुष्पाद इत्यादि सर्व माझे सहाय्यक होवोत. आणि त्यांच्या सहाय्यानें मीं शत्रूंचा नाश करीन (१४)

गंधर्व, अप्सरा सर्प, देव, पुण्यजन, पितर, परिचित आणि अपरिचित मला सहाय्य करोत. त्यांच्या सहाय्यानें मीं शत्रूंचा नाश करीन. (१५)

हा मृत्यु पाश लावलेला आहे. त्यांतून कोणी सुटणार नाहीं. या शत्रूसेनेच्या या केंद्राचा मीं सर्व प्रकारें नाश करीन. (१६)

घर्मः समिद्धो अग्निनायं होमः सहस्रहः । भवश्च पृश्निबाहुश्च शर्व सेनाममूं हतम् ॥ १७ ॥
मृत्योराषमा पद्यन्तां क्षुधं सेदिं वधं भयम् । इन्द्रश्चाक्षुजालाभ्यां शर्व सेनाममूं हतम् ॥ १८ ॥
पराजिताः प्र त्रसतामित्रा नुत्ता धावत ब्रह्मणा । बृहस्पतिप्रणुत्तानां मामीषां मोचि कश्चन ॥१९॥
अवं पद्यन्तामेषामायुधानि मा शकन्प्रतिधामिषुम् । अथैषां बहु बिभ्यतामिषवो घ्नन्तु मर्मणि॥२०॥
सं क्रोशतामेनान्द्यावापृथिवी समन्तरिक्षं सह देवताभिः ।
मा ज्ञातारं मा प्रतिष्ठां विदन्त मिथो विघ्नाना उप यन्तु मृत्युम् ॥ २१ ॥
दिशश्चतस्रोऽश्वतर्यो देवरथस्य पुरोडाशाः शफा अन्तरिक्षमुद्धिः ।
द्यावापृथिवी पक्षसी ऋतवोऽभीशवोऽन्तर्देशाः किंकरा वाक्परिरथ्यम् ॥ २२ ॥

अर्थ—(अयं घर्मः होमः) हा प्रदीप्त होम (अग्निना सहस्रहः समिद्धः) अग्नीनें हजारों रीतीनें प्रज्वलित झालेला आहे. (भवः पृश्नि बाहुः शर्वः) भव आणि विचित्र बाहूंचा शर्व तुम्हीं दोघे (अमूं सेनां हतं) या सेनेला मारा. (१७) (मृत्योः आर्षं क्षुद्रं सेदिं वधं भयं) मृत्यूपासून कष्ट, भूक, बंधनें, वध आणि भय यांना (आपद्यन्ताम्) प्राप्त व्हा. हे शर्वा ! (इन्द्रः च) आणि इन्द्र असे तुम्हीं दोघे (अमूं सेनां हतं) या सेनेला मारा. (१८)

हे (अमित्राः) शत्रू हो ! (पराजिताः प्र त्रसत) पराजित होऊन त्रास पावा. (ब्रह्मणा नुत्ताः धावत) ज्ञानानें प्रेरित होऊन पळून जा. (बृहस्पति-प्रणुत्तानां अमीषां) ज्ञान्यांकडून प्रेरित होऊन त्यांच्यांतून (कश्चन मा मोचि) कोणी एकहि न वांचो. (१९)

(एषां आयुधानि अवपद्यन्ताम्) त्यांचीं शस्त्रास्त्रें खालीं पडून जावोत. (प्रतिधां इषुं मा शकन्) प्रतिपक्षाकडून आलेले बाण ते सहन न करूं शकोत. (अथ एषां बहु बिभ्यतां) आतां त्यांला फार भीति वाटो. त्यांच्या (मर्मणि इषवः घ्नन्तु) मर्मस्थानीं बाण लागोत. (२०)

(द्यावापृथिवी एनान् संक्रोशन्तां) द्युलोक आणि पृथ्वी त्यांची निंदा करो. (अन्तरिक्षं देवताभिः सह सं) अंतरिक्षांतील देवांसह त्यांची निंदा करोत. (ज्ञातारं मा) ते ज्ञानी लोकांस प्राप्त न करूं शकोत. (मा प्रतिष्ठां विदन्त) ते प्रतिष्ठा सुद्धां प्राप्त न करोत (मिथः विघ्नानाः मृत्युं उपयन्तु) परस्परांस मारून टाकून सर्व मृत्यु पावोत. (२१)

(चतस्रः दिशः) चार दिशा (देवरथस्य अश्वतर्यः) देवरथास घोड्या जोडलेल्या आहेत. (पुरोडाशाः शफाः) पुरोडाश त्याचे खूर आहेत. (अन्तरिक्षं उद्धिः) अंतरिक्ष वरील भाग आहे. (द्यावापृथिवी पक्षसी) द्युलोक आणि पृथ्वी त्याच्या दोन कुशी आहेत, (ऋतवः अभीशवः) ऋतु त्याचे दोर आहेत (अन्तर्देशाः किंकराः) मधील प्रदेश रथरक्षक आहेत (वाक् परिरथ्यं) वाणी रथाचा इतर भाग आहे. (२२)

भावार्थ — हा यज्ञ अग्नीनें प्रदीप्त झाला आहे. या यज्ञामुळें शत्रुसेना नाश पावो. (१७)

मृत्यूचे कष्ट, क्षुधा, बंधन, वध आणि भय शत्रूंना प्राप्त होवो. आणि याप्रमाणें भयभीत झालेल्या शत्रूंचा नाश होवो. (१८)

शत्रु पराजित होवो, ते पळून जावोत आमच्या ज्ञानी वीरांकडून प्रेरित झालेले शत्रु कोणत्याहि रीतीनें न वांचोत. (१९)

शत्रूंचीं शस्त्रें खालीं पडून जावोत. ते आमचीं शस्त्रास्त्रें सहन न करूं शकोत. ते भिवून जावोत आणि त्यांची मर्मस्थानें वेधली जावोत. (२०)

सर्व लोकांनीं या शत्रूची निंदा करावी. कोणाहि ज्ञानी मनुष्याचें सहाय्य आमच्या शत्रूस न मिळो. ते कोणत्याहि स्थानीं स्थिर न होवोत. ते आपापसांत भांडून मरून जावोत. (२१)

देवरथाच्या चार दिशा घोड्या आहेत, त्या रथाचे विविध भाग पुरोडाश, अन्तरिक्ष, द्युलोक पृथ्वी हे आहेत. सहा ऋतु घोड्यांचे लगाम आहेत. मधले स्थान संरक्षक नोकर आहेत आणि वाणी मध्यस्थान आहे. (२२)

संवत्सरो रथः परिवत्सरो रथोपस्थो विराडीषाग्नी रथमुखम्। इन्द्रः सव्यष्ठाश्चन्द्रमाः सारथिः॥२३॥
इतो जयेतो वि जय सं जय जय स्वाहा। इमे जयन्तु परामी जयन्तां स्वाहैभ्यो दुराहामीभ्यः।
नीललोहितेनामूनभ्यवतनोमि ॥ २४ ॥

अर्थ— (संवत्सरः रथः) वर्ष रथ आहे. (परिवत्सरः रथोपस्थः) परिवत्सर रथांत बसण्याची बैठक आहे. (विराड् ईषा) विराट् मधला जो दांडा आहे, (अग्निः रथ-मुखं) अग्नि रथाचें मुख आहे. (इन्द्रः सव्यष्ठाः) इंद्र डावीकडे बसणारा आहे. (चंद्रमाः सारथिः) चंद्रमा सारथी आहे. (२३)

(इतः जयः) येथून जय प्राप्त कर, (इतः विजयः) तेथून विजय होवो. (संजय जय) उत्तम रीतीचें जय प्राप्त कर (स्व आहा) स्वात्मार्पण कर. (इमे जयन्तु) हे आमचे वीर जय प्राप्त करोत. (अमी पराजयन्तां) हे शत्रु सैनिक पराभवास प्राप्त होवोत (एभ्यः स्वाहा) त्यांच्यासाठीं शुभ वचनें (अमीभ्यः दुराहा) या शत्रूंसाठीं वाईट वचनें (नीललोहितेन अमून् अभि-अवतनोमि) असानीं आणि लोखंडासारख्या रंगाच्या रक्तानें या शत्रूंना सर्व प्रकारें खालीं पाडून टाकतो. (२४)

भावार्थ-- संवत्सर, परिवत्सर, विराट्, अग्नि हे अनुक्रमें रथ, बसण्याचें स्थान, दंड आणि रथमुख आहेत. इंद्र या रथांत डावीकडे बसतो आणि चंद्रमा सारथी आहे. (२३)

या प्रकारें जय प्राप्त कर, विजय संपादन कर, आत्मार्पणानें जय मिळतो. हे आमचे वीर जय प्राप्त करोत. शत्रूंचा पराजय होवो. तुम्हां लोकांचें शुभाशीर्वाद, शत्रूंचे शाप, सर्व शत्रूंचें पतन होवो. (२४)

पराक्रमानें विजय

युद्ध--नीति

युद्ध-नीतीचें वर्णन करणारी सूक्तें वेदांत अनेक आहेत. परंतु या सूक्तांत ' जाल-युद्ध ' वर्णिलें आहे. ही या सूक्ताची विशेषता आहे. जाळयामध्यें शत्रू सैन्यास पकडून बांधल्यानंतर शस्त्रास्त्रांनीं त्यांचा वध करावयाचा. याचें नांव आहे ' जाल-युद्ध .' वाचकांनीं जाळें पाहिलें असेल. कोळी लोक मासे पकडण्यासाठीं सुताचें जाळें तयार करतात. हें सुताचें जाळें युद्धांत उपयोगी होत नाहीं कारण शत्रु सैनिक जर कदाचित् अशा जाळयांत बांधले गेले तर ते त्यांच्या तीक्ष्ण शस्त्रांनीं असें जाळें सहज कापून टाकून त्यांतून बाहेर निसटून जातील. तेव्हां युद्धाचें जाळें अशा कांहीं मजबूत पदार्थाचें असलें पाहिजे कीं ते शत्रूला सहजासहजीं कापता येणार नाहीं.

हल्लीं युद्धांत तारांचें जाळें अथवा काटेरी तार अथवा तिचें जाळें वापरतात. ज्या इंद्र जाळयाचें वर्णन या सूक्तांत करण्यात आलें आहे तें अशाच प्रकारचें लोकांना सहज कापता येणार नाहीं असें लोखंडी काटेरी तारांचें असणें शक्य आहे. इंद्राचें शत्रु राक्षस आहेत. ते बलाढ्य आणि शस्त्रास्त्रसंपन्न असतात. ते सुताच्या जाळयांत सांपडतील, बांधले जातील आणि मरतील ही शक्यता फारच थोडी. पण या सूक्तांत इंद्रानें हजारों लाखों शत्रु बांधून, मारून टाकले असें वर्णन आहे. त्यावरून हें जाळें लोखंडीच असलें पाहिजे. त्यांचें वर्णन याप्रमाणें आहे.

बृहज्जालेन संदिताः क्षिप्रं भज्यन्ताम्। (मं. ४)
शक्रस्य अन्तरिक्षं जालं आसीत्। मही दिशः जालदण्डाः। तेन अभिधाय दस्यूनां सेनां अपावपत्। (मं. ५)
वाजिनीवतः शक्रस्य बृहत् जालम्। तेन सर्वान् शत्रून् न्युब्ज यथा एषां कतमश्चन न मुच्यते॥ (मं. ६)

हे शूर इन्द्र ! शतवीर्यस्य ते बृहत् जालम्। तेन दस्यूनां सहस्रं अयुतं जघान॥ (मं. ७)

' इंद्र स्वतः मोठा शूरवीर आहे. त्याच्याजवळ सैन्यसुद्धां पुष्कळ आहे. तो स्वतः शेकडों प्रकारचे पराक्रम करतो. त्यांच्या

जवळ एक मोठें मजबूत जाळें आहे. असें समजा कीं जणूं त्याचें जाळें अंतराळाएवढें विशाल आहे. चारी दिशा म्हणजे जणूं या जाळयास उभारण्यास खांब उभे केले आहेत. या विस्तृत जाळयांत शत्रुसैन्य पकडलें गेलें आहे. आणि एकदां सैन्य पकडलें गेलें म्हणजे त्यांतून एकहि वांचण्याची शक्यता नाहीं. अशा प्रकारच्या जाळयानें इंद्र युद्धांत शत्रुसेनेचे हजारों, लाखों सैनिक मारून टाकतो. ' या मंत्रभागांत हें वर्णन मोठें मनोरंजक आहे. आणि त्यामुळें जालयुद्धाचें महत्त्व सिद्ध होतें. एक वेळ शत्रु जाळयांत बांधला गेला म्हणजे त्याची सर्व हालचाल बंद होते. याप्रकारें जाळयांत सांपडलेल्या शत्रूंचा वध केला पाहिजे. आणि अशा जाळयांत सांपडलेल्या शत्रूंचा वध करणें सोपें काम असतें. कारण कीं अशा जाळयांत शत्रुसेनेस पकडल्यानंतर स्वतःच्या सैनिकांकरवीं त्यांचा वध करविण्यांत येई असें वर्णन पुढील मंत्रांत आहे—

शक्रः सेनया तेन (जालेन बद्धं) दस्यूनां सहस्रं जघान (मं. ७)

' इंद्र स्वतःच्या सेनेकडून त्या जाळयांत बांधलेल्या शत्रूंच्या हजारों सैनिकांना मारतो, ' या वर्णनावरून स्पष्ट होतें कीं, जाळयांत बांधल्या गेलेल्या शत्रुसेनेचा वध करणें अगदीं सोपें काम असे. हें जाळें पृथ्वीवर फार मोठ्या विस्तारावर पसरलेलें आहे या विषयीं खालील मंत्र पहा.

अयं महान् लोकः शक्रस्य जालं आसीत् ।
तेन इन्द्र जालेन सर्वान् तमसा अभिदधामि॥ (मं. ८)

साध्याः रुद्राः वसवः जालदण्डं उद्यम्य ओजसा यन्ति । आदित्यै एकः (दण्डः) उद्यतः ॥ (मं. १२)
विश्वेदेवाः ओजसा उपरिष्टात् यन्तु। अंगिरसः मध्येन सेनां घ्नन्तः यन्तु ॥ (मं. १३)

' या पृथ्वीवर इंद्राचें जाळें पसरलें आहे. या इंद्राच्या जाळयांत शत्रूला अंधारांत घेरण्यांत येतें. साध्य, रुद्र, वसु आणि आदित्य हे सर्व देव जाळयाचा एक एक खांब धरून वेगानें धांवतात. विश्वेदेव आणि आंगिरससुद्धां शत्रुसेनेच्यामध्यें शिरून आणि वरून हल्ला करतात. ' एवढा मोठा विस्तार या जाळयाचा आहे. या जाळयानें सर्व पृथ्वी आणि अंतरिक्षसुद्धां भरून जातें. अर्थात् शत्रूचें सर्व सैन्य या जाळयानें चारी बाजूंनीं घेरलें जातें. या मंत्रावरून असें वाटतें कीं ज्या प्रकारें शत्रुसैन्य फिरेल त्याप्रमाणें हें जाळें फिरविण्यांत येत असें एवढ्यासाठींच जाळयाचे खांब धरून, वसु, रुद्र, आदित्य आणि साध्य वेगानें धांवत असत. विश्वेदेव आपल्या सर्व सैन्यासह वरून हल्ला करीत असत आणि आंगिरसाची सेना मधून हल्ला करी, याप्रमाणें शत्रुसैन्यास युद्धांत गुंतवून ठेऊन वसु, रुद्र आणि आदित्य अशा प्रकारे जाळयाचे दांडे धरून वेगानें धांवत कीं, जाळें असें पसरलें जावें कीं शत्रुसैन्य लढत लढत आपोआप त्या जाळयांत फसून जखडले जात. ही युद्धकौशल्याची गोष्ट आहे आणि ती ज्या लोकांस युद्धकलेचें ज्ञान आहे. त्यांनाच समजेल. येथें मंत्रांनीं ती गोष्ट स्पष्ट केली आहे. या मंत्रभागाचें मनन करून वाचकांसुद्धां एतद्विषयक थोडेसें ज्ञान प्राप्त होऊं शकेल. येथें साध्य, वसु, रुद्र, आदित्य, विश्वेदेव, आंगिरसही सेनाध्यक्षांचीं नांवें आहेत. त्यांची विशेष कार्यें युद्धभूमींत असत. म्हणून अशीं भिन्न भिन्न नांवें आहेत. या सर्वांचा प्रमुख इंद्र आहे. त्याचें कार्य (**इन् + द्र**) शत्रूंस विदारण करण्याचें आहे. त्याच्या या कार्याचें वर्णन प्रथम मंत्रांत असें केलें आहे.

मन्थिता शूरः शक्रः पुरंदरः इन्द्रः मन्थतु । (मं. १)

' शत्रुसैन्याचें मंथन करणारा इन्द्र शूर आणि समर्थ होऊन (**पुरं-दरः**) शत्रूंच्या किल्ल्याचें भेदन करो. ' यांतील प्रत्येक शब्द इंद्राचें कार्य दर्शवितो. शत्रूच्या किल्ल्यास तोडण्याचें कार्य इंद्र करतो. या किल्ल्यांतून शत्रुसेनेस बाहेर काढून तिला स्वतःच्या जाळयांत बांधून मारून टाकतो. अशी या 'जालयुद्धाची' नीति आहे.

या प्रकारच्या 'जाल युद्धाचें' सामान जर आपणांजवळ असेल तर शत्रूवर विजय प्राप्त करण्याचा विश्वास स्वतःच्या सैनिकांत येईल आणि ते मग म्हणतील कीं—

अमित्राणां सहस्रशः सेनाः हनाम । (मं. १)
वधकः वधैः एनान् हन्तु । (मं. ३, ४)
अमून् निः शृणीहि । अमून् अजिरं खाद । (मं. ३)
मृत्यवे अमून् प्रयच्छामि । अमी मृत्युपाशैः सिताः । मृत्योः ये अघला दूताः तेभ्यः एनान् बद्ध्वा प्रतिनयामि ॥ (मं. १०)
मृत्युदूताः अमून् नयत । यमदूता अपोम्भत परः सहस्रा हन्यन्ताम् ॥ (मं. ११)
यथा अमुं सेनां हनन् । (मं. १४, २५)
उप्ताः मृत्युपाशाः यान् आक्रम्य न मुच्यसे । अमुष्याः सेनायाः इदं कूटं सहस्रशः हन्तु ॥ (मं. १६)

' शत्रूचे हजारों सैनिक आम्ही मारून टाकूं. वधाच्या साध-

नांनी त्यांस मारावें, या शत्रुसैन्यास मूळापासून उखडून मारून टाका. त्यांस मृत्यूच्या हवाली करतों. ते मृत्युच्या पाशानें बांधलेले आहेत. या शत्रूंना बांधून मीं त्यांना मृत्यूच्या हवाली करतों. यमदूत त्यांस घेऊन जावोत. यमदूत त्यांस खेंचून काढोत आणि हजारोंच्या संख्यांनीं मारून टाकोत. या समस्त सेनेचा नाश करण्यांत यावा. हे मृत्यूचे पाशच पसरलेले आहेत त्यांतून ते सुटूं नयेत. सुटूं शकणार नाहींत. आणि या शत्रुसैन्याच्या केंद्रास प्राप्त करून त्यांचे हजारों सैनिक मारून टाकण्यांत यावेत.

अशा प्रकारचें विश्वासपूर्ण भाषण तेव्हांच होऊं शकेल, जेव्हां शत्रूस पकडून त्याचा वध निश्चित असेल. जाळ्यांत पकडलेल्या शत्रूंचा वध निश्चित आणि सोपा आहे आणि म्हणूनच 'जालयुद्ध' करणारे शूरवीर या प्रकारचें निश्चयात्मक भाषणवाक्यें बोलूं शकतात. याचप्रकारचीं दुसरीं वाक्येंसुद्धां पहा—

पराजिताः अमित्राः प्रत्रसन्तां, ब्रह्मणा नुत्ताः धावत। बृहस्पतिप्रणुत्तानां अमीषां कश्चन मा मोचि॥ (मं. १९)

' पराजित झालेले शत्रु त्रास पावोत. पळवून लावलेले शत्रु धांवत पळून जावोत. पळून जात असतां सुद्धां त्यांच्यांतील कोणी न वाचो. हे शब्द शत्रुपराजय निश्चित सुचवीत आहेत. जालयुद्धांचें असें महत्त्व आहे कीं त्यांत एकदां शत्रु सांपडला की मग तो वांचणें अशक्यच. जाळ्यांत सांपडलेल्या शत्रूंची स्थिति कशी होते ती पहा–

एषां आयुधानि अवपद्यन्ताम् । इषुं प्रतिधां मा शकन् । एषां बहु बिभ्यतां इषवः मर्माणि घ्नन्तु। (मं. २०)

या शत्रूंची आयुधें खालीं पडून जावोत. आमच्या शस्त्रांचा मार ते सहन न करूं शकोत. या फार घाबरलेल्या शत्रुसेनेच्या मर्मस्थानीं आमचीं शस्त्रें आघात करोत. ' आणखी पहा--

ज्ञातारं प्रतिष्ठां मा विदन्त। मिथो विघ्नानाः मृत्युं उपयन्तु। (मं. २१)

' शत्रु भयभीत होऊन त्यास कोठेंहि आश्रय न मिळो. (मिळूं शकूं नये) त्यांना कोणीं उत्कृष्ट सल्ला देणारा न मिळो. ते आपसांत एकमेकांस विघ्न करीत मृत्युवश होवोत. ' शत्रूंची अशी अवस्था तेव्हांच होईल जर आपल्या विजयाची निश्चितता असेल.

इन्द्रः शर्वः च अक्षुजालाभ्यां अमूं सेनां हतम्। (मं. १८)

' इन्द्र आणि शर्व अक्षु जाळ्याच्या मदतीनें या सेनेस मारून टाकोत या मंत्रांत जालयुद्धाची शक्ति दाखविली आहे. शत्रूच्या सर्व सैन्यास मारून टाकणें जाळ्यानें शक्य आहे. जाळ्यांत सांपडलेल्या शत्रुसेनेवर केवढी भयानक आपत्ति येऊन पडते त्याची कल्पना पुढील मंत्रभागानें येऊं शकेल–

मृत्योः आषं क्षुधं सेदिं वधं भयं आपद्यन्ताम्। (मं. १८)

जाळ्यांत सांपडलेल्या शत्रूंवर ' मृत्युप्रमाणें कष्ट, भूक, बंधन, वध आणि भय येवून पडतें. शत्रूचा एकसुद्धां मनुष्य त्यांतून वांचूं शकत नाहीं. शत्रुसेनेवर अशी भयानक आपत्ति येते. यामुळेंच हें जालयुद्ध शत्रूला महाभयानक असतें. या मंत्रासह खालील मंत्र पहा—

सेदिः उग्रा व्यृद्धिः आर्तिः अनपवाचनाश्रमः तन्द्री मोहः च तैः अमून् सर्वान् अभिदधामि। (मं. ९)

' बंधन, उग्र आपत्ति, सांगता येणार नाहींत असे कष्ट, श्रम, आलस्य, मोह या सर्वांनीं आमचे शत्रु जर्जर होवोत. ' अशी सिद्धि मिळविण्यास युद्धांत जालप्रयोग निःसंशय महान् उपकारक आहे. जाळ्यांत सांपडलेला वीर कितीहि शक्तिसंपन्न असला तरी कोणत्याहि प्रकारचा प्रतिकार करण्यास अशक्त ठरतो. याप्रमाणें युक्तीनें शत्रुसेनेस जाळ्यांत बांधल्यानें त्यांचा समूळ नाश होतो. या सूक्तांत एक दुर्गन्धास्त्राचा प्रयोग वर्णिला आहे. तो सुद्धां एक मोठा भयंकरच प्रयोग आहे. पहा–

दुर्गंधियुक्त धूर

पूतिरज्जुः उपध्मानी अमूं सेनां पूतिं कृणोतु। (मं. २)

दुर्गंधयुक्त दोरी पेटवून या सर्व सेनेंत दुर्गंध पसरवून टाका.' कित्येक विशिष्ट रसायनांत ही दोरी भिजवलेली असते. त्या दोरीस पेटवून शत्रुसेनेंत फेंकली असतां अशी दुर्गंधी सर्वत्र पसरते कीं शत्रुसैनिक त्रासून जातात, आणि युद्ध करण्यास असमर्थ होतात. पण त्यामुळें केवढें भय निर्माण होतें तें पहा—

धूममग्निं परादृश्य अमित्रा हृत्स्वादधतां भयं। (मं. २)

पूर्वी सांगितलेला धूमाग्नि दुरून दृष्टीस पडतांच शत्रूंच्या लोकांच्या हृदयांत एक प्रकारची भीति निर्माण होते.' इतकें हें दुर्गंधास्त्र महाभयंकर आहे. एकदां ही (**पूतिरज्जु**) दुर्गंधियुक्त दोरी पेटूं लागली आणि दुर्गंध पसरूं लागला म्हणजे सर्व सैनिक कोणत्याहि कामास उपयुक्त होत नाहींत. ते असें समजूं लागतात कीं आतां आपला नाश जवळ आला आहे. जर हा जाळ्याचा आणि दुर्गंधास्त्राचा प्रयोग एकदम करण्यांत आला तर शत्रूचा तात्काळ

नाश करण्याचें काम अगदींच सोपें होईल. याप्रकारें हे दोन्ही प्रयोग केल्यानें आपणांस विजय प्राप्त होईल. म्हणून म्हटलें आहे–

विजय

इतो जय विजय संजय जय स्वाहा ।
इमे जयन्तु परामी जयन्तां स्वाहैभ्यो दुराहामीभ्यः ॥
(मं. २४)

' यापूर्वी सांगितलेल्या युक्तींनें जय आणि विजय प्राप्त करा. त्यामुळें तुमचा उत्तम जय होवो. हे तुमचे सैनिक विजयी होवोत. तुमच्या शत्रूंचा पराजय होवो. तुमचें उत्तम कल्याण होवो. तुमच्या शत्रूंचें अकल्याण होवो.' याप्रमाणें असें जालयुद्ध करणाऱ्यास अंतीं आशीर्वाद देण्यांत आला आहे.

याप्रकारें वेदांत जालयुद्धाचें वर्णनाचा उपदेश केलेला आहे. वाचकांनी त्यांचा विचार करून युद्धनीति नीट समजून घ्यावी.

' इन्द्र–जाल ' शब्द अध्यात्मिक बंधनभावसुद्धां दर्शवितो. त्या दृष्टीनें या सूक्ताचा कोणी विचार करावा. हा विषय संशोधनीय आहे.

विजयाची प्रार्थना

कांड ७, सूक्त ११८

(ऋषिः – अथर्वाङ्गिराः । देवता – चन्द्रमाः, बहुदैवत्यं)

मर्माणि ते वर्मणा छादयामि सोमस्त्वा राजामृतेनानु वस्ताम् ।
उरोर्वरीयो वरुणस्ते कृणोतु जयन्तं त्वानु देवा मदन्तु ॥ १ ॥

अर्थ— (ते मर्माणि वर्मणा छादयामि) तुझ्या मर्मस्थानांस मीं कवचानें झांकतों. (सोमः राजा त्वा अमृतेन अनुवस्तां) सोम राजा तुला अमृतानें आच्छादित करो (वरुणः ते उरोः वरीयः कृणोतु) वरुण तुझ्यासाठीं मोठ्यांत मोठें स्थान देवो. (जयन्तं त्वा देवा अनुमदन्तु) विजय मिळवणारा तूं, तुला पाहून सर्व देव आनंद करोत. (१)

युद्धास जातांना वीर पुरुषांनी शरीरें कवचांनीं झाकून टाकावींत. याप्रमाणें तयार होऊन वीर पुरुष शत्रुवर हल्ला करण्यासाठीं बाहेर निघोत आणि विजय प्राप्त करोत. मनांत त्यांनी निश्चय करावा कीं स्वपक्षांत राहून लढणाऱ्या सर्व वीरांना देव सहाय करतात. आणि त्यांच्या विजयांनीं आनंदित सुद्धां होतात. ज्यांच्या विजयानें देवांनांसुद्धां आनंद होतो असे वीर पुरुष आपणांमध्यें जन्मले पाहिजेत, वाढले पाहिजेत.

विजय सूक्त

कांड १, सूक्त २

(ऋषिः– अथर्वा । देवता – पर्जन्यः)

विद्मा शरस्य पितरं पर्जन्यं भूरिधायसम् । विद्मो ष्वस्य मातरं पृथिवीं भूरिवर्पसम् ॥ १ ॥

अर्थ— (शरस्य) शराचा, बाणाचा पिता (भूरि–धायस पर्जन्यं) अनेक प्रकारांनीं भरणपोषण करणारा पर्जन्य आहे (विद्म) हें आम्हीं जाणतो. तसेंच (अस्य) त्याची माता (भूरि–वर्पसं) अनेकविध कुशलतेनें युक्त पृथ्वी आहे याचीही आम्हांस (सुविद्म) चांगली माहिती आहे. (१)

भावार्थ— धारण आणि पोषण उत्तम प्रकारें करणारा पिता पर्जन्य आहे. कुशलतापूर्वक अनेक कार्य करणारी माता पृथ्वी आहे. या दोघांच्या संयोगानें बाणरूपी बळवान् पुत्र उत्पन्न होतो. (१) माता पुत्राच्या शरीरावर असा परिणाम करो कीं, ज्याच्यामुळें तो बळवान् होऊन शत्रूंचा पूर्णपणें पराभव करण्यास समर्थ होईल. (२)

ज्याके परि णो नमाश्मानं तन्वं कृधि । वीडुर्वरीयोऽरातीरप द्वेषांस्या कृधि ॥ २ ॥
वृक्षं यद्गावः परिषस्वजाना अनुस्फुरं शरमर्चन्त्यृभुम् । शरुमस्मद्यावय दिद्युमिन्द्र ॥ ३ ॥
यथा द्यां च पृथिवीं चान्तस्तिष्ठति तेजनम् । एवा रोगं चास्रावं चान्तस्तिष्ठतु मुञ्ज इत् ॥ ४ ॥

अर्थ—हे (ज्याके) माता ! (नः) आम्हां सर्व पुत्रांस (परिनम) बलवान् कर म्हणजे आमच्या (तन्वं) शरीरास (अश्मानं) दगडाप्रमाणें सुदृढ (कृधि) कर. (वीडुः) बलवान् होऊन (अ-रातिः) दान न करण्याच्या भावनेस तसेंच (द्वेषांसि) द्वेषाला म्हणजे सर्व शत्रूंना (वरीयः) पूर्णपणें (अपकृधि) दूर कर (२) (यत्) ज्या प्रकारें (वृक्षं) वृक्षाशीं (परिषस्वजानाः) लपेटलेल्या अथवा बांधलेल्या (गावः) गायी स्वतःच्या (ऋभुं शरं) तेजस्वी पुत्र शराला (अनुस्फुरं) स्फूर्तीनें, प्रेमानें (अर्चन्ति) चाहतात. त्याचप्रमाणें हे इंद्रा ! (अस्मत्) आमच्याकडून (दिद्युं शरूं) तेज पुत्र बाणाला (यावय) पुढें वाढीव, प्रगत कर. (३) ज्याप्रमाणें (द्यां) द्युलोक आणि पृथ्वीच्या (अन्तः) मध्यें (तेजनं) प्रकाश (तिष्ठति) असतो, (एव) त्याप्रमाणें हा (मुञ्जः) मुंज (रोगं च आस्रावं च) रोग आणि स्रावाच्या (अन्तः) मध्यें (इत् तिष्ठतु) निश्चयानें राहो (४)

भावार्थ— ज्याप्रमाणें झाडास बांधलेल्या गायी स्वतःच्या वासरास वेगानें प्राप्त करूं इच्छितात त्याप्रकारें हे ईश्वरा ! तेज शर आम्हांपासून पुढें वृद्धि पावो. (३) ज्याप्रमाणें द्युलोक आणि पृथ्वीच्यामध्यें प्रकाश असतो; त्याप्रमाणें रोग आणि स्राव-घावाच्या-मध्यें हा बाण अटकून राहो. (४)

विजय सूक्त

गुरु-शिष्य-धनुष्याच्या खेंचलेल्या दोरीचीं दोन्हीं टोकें ताणलेली रहातात त्याप्रमाणें, विद्यारूपी दोरीनें समाजाची गुरुशिष्यरूपी दोन्ही टोकें एकमेकांशीं संबंधित राहोत. ती कधींहि ढिली न पडोत.

हें संपूर्ण सूक्त शिष्यमुखानें उच्चार झाल्यासारखें आहे असें वाटतें. त्यावरून असें अनुमान करतां येते कीं, गुरूला आणण्याची व्यवस्था, त्यांस ठेवून घेणें त्यांची सर्व व्यवस्था आणि खर्चाची जबाबदारी शिष्य अथवा शिष्याच्या संरक्षकांवरच पूर्णपणें असे.

अनुसंधान

या प्रथम सूक्तांत ' मेधाजनन ' म्हणजे बुद्धीचें संवर्धन करण्याचे मूलभूत नियम सांगितले आहेत. गुरु, शिष्य, विद्यालय इत्यादींची व्यवस्था कशा प्रकारें केली पाहिजे, गुरूनें कसें शिकवावे, शिष्यानें कशा प्रकारें अभ्यास करावा, आणि दोघांनीं मिळून राष्ट्राची उन्नति कशाप्रकारें करावी त्याचा विचार करण्यांत आला आहे.

त्यानंतर विद्याध्ययनास प्रारंभ होतो. ज्यांत अपराजित गणांतील सूक्त ' विद्मा शरस्य पितरं ' हें आहे. अथर्ववेदांत हें दुसरें सूक्त आहे. तिसरें सूक्तहि याच वाक्यानें सुरू होत आहे. या दोन्ही सूक्तांचा आतां विचार करूं.

हा भावार्थसुद्धां परिपूर्ण नाहीं, कारण या मंत्रांचा मागला पुढला संबंध पाहून त्यांतून जो भाव प्रगट होईल तोच खरा भावार्थ समजला पाहिजे. तो भाव जाणण्यासाठीं पुढील स्पष्टीकरण पहावें —

(१) वैयक्तिक विजय

या सूक्तांत प्रथम वैयक्तिक विजय प्राप्त करण्याचा उपदेश असा आहे—

१. उत्तम मातापित्यापासून जन्म होवो. (१)
२. शरीर बलवान् करावें. (२)
३. रोगादि शत्रूंना दूर ठेवावें. (मं. २)
४. शरीरांत स्फूर्ति आणावी. (मं. ३)
५. जगांत स्वतःचें तेज पसरविण्याचा प्रयत्न करावा. (मं. ४)
६. संशोधनानें रोग दूर करावेत. (मं. ४)

वाचक जर नीट विचार करतील तर उक्त सहा भाव-वैयक्तिक उन्नतीचीं हीं साधनें-त्यांना पूर्वोक्त चारी मंत्रांत गुप्त रीतीनें आहेत हें ध्यानीं येईल. त्यांचा विशेष विचार करण्यासाठीं मंत्रांचे शब्द आणि त्यांचें स्पष्टीकरण येथें देण्यांत येत आहे.

(२) पित्याचे गुण-धर्म-कर्म

पूर्वोक्त मंत्रांत पित्याचे गुणधर्म दर्शविणारे शब्द असे आले आहेत, ' पिता, पर्जन्य, भूरिधायस्, वृक्ष, द्यौ, त्यांचे अर्थ नीट समजल्यानें पित्याच्या गुण-धर्म-कर्माचा बोध होईल. म्हणून त्यांचा आशय पहा—

१. **पिता- (माता)** रक्षक, संभाळ करणार.

२. **पर्जन्य- (पूर्ति+जन्यः)** पूर्णता करणारा, न्यूनतेला दूर करणारा.

३. **भूरिधायस्- (भूरि)** अनेक प्रकारांनीं **(धायस्)** धारण, पोषण करणारा, दाता उदारचरित.

४. **वृक्ष-** आधार, स्वतः उन्हांत तापून दुसऱ्यास सांवली देणारा.

५. **द्यौः-** प्रकाश देणारा, अंधःकाराचा नाश करणारा.

मुख्यतः हे पांच शब्द आहेत. ते उक्त मंत्रांत पित्याच्या गुण-धर्म-कर्माचा उल्लेख करीत आहेत. त्यांचा आशय असा आहे, ' पिता असा असावा कीं त्यानें पुत्रादिकांचें यथातथ्य पालन पोषण करावें, त्यांच्यांत ज्या उणीवा वा दोष असतील ते दूर करावे. आणि त्यांस पूर्णत्व द्यावे. म्हणजे स्वतःच्या संततीला उच्च गुणांनीं परिपूर्ण, बनविण्याची पराकाष्ठा करावी. त्यांचे हर प्रकारें पोषण करून त्यांस हृष्टपुष्ट बनवावें, तसेंच बलवान् करावें, स्वतः कष्ट करून सुद्धां त्यानें संततीची उन्नति करावी. आणि स्वतःच्या पुत्र-कन्यादिकांना ज्ञान देऊन उत्तम नागरिक बनवावें. '

(३) मातेचे गुण-धर्म-कर्म

' माता, पृथिवी, भूरिवर्पस्, ज्याका, गौ ' हे पांच शब्द पूर्वोक्त मंत्रांत मातेचे गुण प्रकट करतात. त्यांचें स्पष्टीकरण असें आहे—

१. **माता-** बालकांचें हित करणारी.

२. **पृथिवी-** क्षमाशील, सहनशील पुत्रांच्या उन्नतीसाठीं आवश्यक कष्ट करणारी.

३. **भूरिवर्पस्- (भूरि)** पुष्कळ, **(वर्पस्)** कुशलतेनें कार्य करण्यांत तत्पर. कर्मांत अत्यंत कुशल, नेहमीं काम करण्यांत दक्ष. परिवाराच्या उन्नतीसाठीं उत्तम कर्म करणारी.

४. **ज्या, ज्याका- (ज्या-जया)** जयाचें साधन करणारी माता, पृथ्वी, दोरी, बलशालिनी.

५. **गौ-** प्रगतिशील, दुग्धादिकांनीं पुत्रांना पुष्ट करणारी, किरण, स्वर्ग, रत्न, वाणी, सरस्वति, माता, जल, नेत्र, आकाश, सूर्य, इत्यादि शुभ गुणांनीं युक्त, आईचे गुणधर्म या शब्दांनीं व्यक्त होत आहेत.' ' पुत्र-कन्यांचें हित करणारी, क्षमाशील, पुत्रांच्या उन्नतीसाठीं करावयास योग्य अशा कामांत नेहमीं दक्ष असणारी, अत्यंत कुशलतेनें स्वतःच्या कुटुंबाची उन्नति करण्यांत समर्थ बलशालिनी, गाईप्रमाणें दुधा-तुपानें बालकांना हृष्टपुष्ट करणारी, किरणांप्रमाणें प्रकाश देणारी, स्वर्गाप्रमाणें सुखदायिनी, रत्नाप्रमाणें, घराची शोभा वाढविणारी, शुभ कल्याणकारक भाषण करण्यांत चतुर, विदुषी, पाण्याप्रमाणें शांती वाढविणारी, नेत्राप्रमाणें मार्गदर्शक, आकाशाप्रमाणें सर्वांना आश्रय देणारी, सूर्याप्रमाणें मुलांचा अज्ञानांधकार दूर करणारी, माता असली पाहिजे.

पित्याचे गुण धर्म कर्म प्रथम सांगितले आणि येथें आईचे सांगितले. असे मातापिता आदर्श होत. त्यांच्यापासून जो पुत्र निर्माण होईल तो उत्तम होईल, आणि त्यांचे लालन पालन, भरण पोषण व्यवस्थितपणें झालें असतां तो खरा शूरवीर पुत्रच होईल. तसेंच कन्या सुद्धां वीरा होतील यांत काय संशय !

(४) पुत्राचे गुण-धर्म-कर्म

पूर्वोक्त मंत्रांत पुत्राचे गुण धर्म, कर्म दर्शविणारे शब्द असे आहेत, **' शरः अश्मतनुः वीडुः, ऋभुः, शरुः, दिद्युः, तेजनः, मुञ्जः '** आणि त्यांचे अर्थ—

१. **शरः- (शृणोति)** जो शत्रूचा नाश करूं शकतो.

२. **अश्म-तनुः-** दगडाप्रमाणें सुदृढ शरीराचा.

३. **वीडुः-** बलिष्ठ, शूर.

४. **ऋभुः-** बुद्धिमान, कुशल, कारागीर, तेजस्वी.

५. **शरुः-** शत्रूचा नाश करणारा.

६. **दिद्युः-** तेजस्वी.


७. **तेजनः-** प्रकाशमान.

८. **मुञ्जः- (मुञ्जति मार्जयति)** शुद्धता आणि पवित्रता करणारा.

पुत्र असा असावा कीं ' जो शत्रूचा नाश करण्यांत समर्थ असेल. सुदृढ शरीराचा असेल, शूर, बुद्धिमान, कुशल कारागीर, तेजस्वी, यशस्वी आणि पवित्र आचारयुक्त असेल ' मातापित्यांनीं असे प्रयत्न करावेत कीं पुत्रामध्यें हे गुण धर्म आणि कर्में वाढीस लागावींत या गुणांच्या द्वारां कुलाचें यश पसरावे.

ही गोष्ट तर स्पष्टच आहे कीं वरील गुणांनीं युक्त माता पिता असतील तरच त्यांच्या कन्या पुत्रांमध्यें हे गुणधर्म उतरतील.

(५) एक अद्भुत अलंकार



या सूक्तांत, बाण, धनुष्य आणि दोरीच्या अलंकारानें एक महत्त्वाच्या गोष्टीचें स्पष्टीकरण केलें आहे, धनुष्याची मजबूत काठी ज्याच्यावर दोरी चढविण्यांत येते ती–तिला पुरुषरूप समजावें. दोरी मातारूप आहे आणि पुत्र बाणरूप आहे. पित्याच्या बळानें आणि मातेच्या प्रेरणेनें युक्त असलेला पुत्र संसारांत दाखल झाला म्हणजे स्वतःच्या शत्रूंचा नाश करून यज्ञाचा भागीदार होतो. या अलंकाराचा वाचकांनीं नीट विचार करावा म्हणजे त्यांना पुष्कळ बोध प्राप्त होईल. पुत्राच्या उत्पत्तींत पित्याचा हिस्सा किती, त्याची योग्य कल्पना या अलंकारानें वाचकांना येऊं शकेल.

दोरीशिवाय एकटें धनुष्य ज्याप्रमाणें शत्रुनाश करण्यास असमर्थ आहे त्याप्रमाणें स्त्रीशिवाय पुरुष असमर्थ आहे. तसेंच पुरुषावांचून एकटी स्त्री सुद्धां कोणतेंहि कार्य करण्यास असमर्थ आहे. माता–पित्याच्या योग्य प्रेरणा आणि शिक्षणानें सुशिक्षित झालेला पुत्र जगांत यशस्वी होतो. हा अलंकार गृहस्थांना मोठा बोधपर आहे.

पित्याचे सूचक ' पर्जन्य, वृक्ष ' इत्यादि शब्द तसेंच मातेचे सूचक ' पृथ्वी, इत्यादि शब्द त्यांचें ऋतुगामित्व आणि ब्रह्मचर्य त्यांचें सूचन करीत आहेत. त्याविषयीं स्वाध्याय मंडळातर्फे प्रकाशित ' ब्रह्मचर्य ' नांवाचें पुस्तक अथर्ववेदीय ब्रह्मचर्य सूक्ताच्या व्याख्येंत पृथ्वी, पर्जन्य आणि वृक्षांचे ब्रह्मचर्य प्रकरण अवश्य वाचून पहावें.

(६) कुटुंबाचा विजय

व्यक्तीच्या उन्नतीविषयीं प्रथमच सांगितलें आहे कीं वैयक्तिक विजयाच्या सूचना या सूक्तांत कशा प्रकारें आहेत, कुटुंबाच्या अथवा परिवाराच्या विजयाचा संबंध वरील अलंकार आणि स्पष्टीकरण पाहिलें असतां समजेल, कुटुंबाचा विजय माता-पित्यांनीं कर्तव्याचें उत्तम पालन केलें असतां आणि सुप्रजा-निर्माण करण्यानेंच प्राप्त होऊं शकतो.

(मं. १) ज्याप्रमाणें, अनेक प्रकारें पोषण करणारा पर्जन्य पिता ऋतुगामी होऊन वर्षाऋतूमध्यें स्वतः जलरूप वीर्य सुपीक जमिनींत सिंचन करतो आणि शररूपी विजयी संतानाची उत्पत्ति करतो. ' त्याप्रमाणें माता–पित्यांनीं ऋतुगामी होऊन वीरपुत्र उत्पन्न करावा.

(मं. २) ' हे जयाचें साधन करणाऱ्या माते ! तुझ्या पुत्रांचें शरीर दगडासारखें सुदृढ कर, म्हणजे पुत्र बलवान होऊन स्वतः-च्या शत्रूंना दूर करील.

(मं. ३) ' ज्याप्रमाणें वृक्षाशीं बांधलेल्या गायी स्वतःच्या प्रभावशाली वासरास चाहतात (त्याचप्रमाणें पित्यासह रहाणारी माता स्वतःसाठीं तेजस्वी पुत्र उत्पन्न होण्याची इच्छा करो) अथवा ' (वृक्षं) धनुष्याबरोबर रहाणारी दोरी, तेजस्वी शर (बाण) अत्यंत वेगानें सोडूं शकते. ' (त्याचप्रमाणें पतीची उपासना करणारी पत्नी वीरपुत्र उत्पन्न होण्याचीच इच्छा करो. ' हे (इन्द्र) परमात्म्या ! आमच्यापासून तेजस्वी (शरुः) बाणासारखा तेजस्वी पुत्र वृद्धि पावो, पुढें येवो, उन्नति साधो ' (मातापित्यांनीं परमात्म्याची अशी प्रार्थना करावी कीं हे ईश्वरा, आम्हांला असा पुत्र व्हावा कीं जो जगांत दूरवर जाऊन विजय प्राप्त करील.)

(मं. ४) ' ज्याप्रमाणें (पिता) द्युलोक आणि (माता) पृथ्वी यांचेमध्यें विद्युत् इत्यादि तेजस्वी पदार्थ पुत्ररूपानें रहातात. ' (त्याप्रमाणें मातापित्यांच्यामध्यें तेजस्वी सुंदर बाळक चमकावें, शोभावें) ' ज्याप्रमाणें मुंज शर आणि स्राव यांचेमध्यें रहातो. ' म्हणजे त्यांना दूर करतो, त्याचप्रमाणें (हा पवित्रता उत्पन्न करणारा पुत्र, रोग आणि जखमेच्यामध्यें राहून सुद्धां स्वतः स्वतःचा बचाव करो आणि कुलाचा उद्धारहि करो.)

हा भाव पहिल्यापेक्षां जास्त विस्तृत आहे. आणि त्यांत स्पष्टीकरणासाठीं पूर्वापार संबंध असणारीं अधिक वाक्यें जोडलीं आहेत. तीं एवढ्यासाठीं कीं वाचकांना कुटुंबविजय कसा होतो. त्याची माहिती मिळावी. जात अथवा राष्ट्राच्या विजयाचा पाया अशा प्रकारच्या कुटुंबाच्या सुस्थितीवर तसेंच सुप्रजा निर्माण होण्या-वरच अवलंबून आहे. जे लोक राष्ट्राची उन्नति इच्छितात त्यांनीं

स्वतःच्या उन्नतीचा पाया जे कुटुंब तें मजबूत बनवावें. आदर्श कुटुंब व्यवस्थाच सर्व विजयाचें मुख्य साधन आहे.

(७) पूर्वापर संबंध

प्रथम सूक्तांत विद्या शिकविण्याचा उपदेश आहे. या दुसऱ्या सूक्तांत शिक्षणाचा प्रारंभ होत आहे. विद्येचा आरंभ अगदीं साधारण विषयापासून करण्यांत आला आहे. गवताच्या उगण्याची गोष्ट तर प्रत्येक स्थानच्या मनुष्यास बरोबर माहित आहे. ' मेघांतून वृष्टि होते आणि पृथ्वींतून गवत निर्माण होते. म्हणजे गवताचा पिता मेघ आणि माता भूमि आहे. ' इतकाच विषय सूक्तांत प्रारंभीं दिला आहे. इतक्या सामान्य गोष्टींवरून उपदेश देता देता पिता-माता-पुत्ररूपी कुटुंबाच्या उन्नतीचें शिक्षण वेदानीं कशा प्रकारें दिलें आहे तें यावरून वाचकांच्या ध्यानीं येईल. गवतांत शर अथवा मुंज नांवाचें एक गवत होतें. हें बाणासारखें गवत एकटेंच स्वतः शत्रूचा नाश करण्यास समर्थ होत नाहीं कारण तें अत्यंत कोमल, नाजुक असतें. परंतु जेव्हां त्याला लोखंडाचा फाळ बसविण्यांत येतो. अथवा मागें पिसें लावण्यांत आलीं म्हणजे त्याच कोंवळ्या गवताची काठी धनुष्यावर चढून दोरी खेचल्यानें शीघ्र गति मिळून शत्रूचा नाश करण्यास समर्थ होते. त्याचप्रमाणें कोमल बालक गुरुगृहीं कठिण तपश्चर्या करीत ब्रह्मचर्यरूपी कठिण वज्रानें युक्त होऊन, उन्नतीचे नियम पाळून, स्वतःच्या गतीला एका मार्गावर केंद्रित करीत स्वतःच्या जातीच्या आणि राष्ट्राच्या शत्रूस पळवून लावण्यास समर्थ बनतो.

पहिल्या सूक्ताच्या तिसऱ्या मंत्रांत धनुष्याची उपमा देऊन दाखविलें आहे कीं— ' गुरु आणि शिष्य हीं दोन धनुष्याचीं टोंके विद्यारूपी दोरीनें बांधली आहेत. ' प्रथम सूक्तांत हा अलंकार भिन्न उपदेश देत आहे. आणि या सूक्तांतील धनुष्याचा दृष्टांत भिन्न उपदेश देत आहे. दृष्टांतात एकदेशीय गोष्ट पहावयाची असते. त्यामुळें एकाच दृष्टांतानें भिन्न उपदेश देणें हा कांहीं दोष होत नाहीं. प्रथम सूक्तांत सुद्धां दोरीला विद्या माता म्हणजे सरस्वती देवीला दोरीचें स्थान दिलें आहे तें मातृत्वास सदृश आहे.

जंगलांत झाडाला बांधलेली गायसुद्धां आपल्या वासराची आठवण करीत असते. गायीचें वासरांवर सर्वांत जास्त प्रेम असतें. तसेंच प्रेम मातेच्या हृदयांत स्वतःच्या बालकांवर असतें. स्वतःचें मूल अत्यंत तेजस्वी व्हावे, सर्वांत यशस्वी व्हावें, हीच भावना माता स्वतःच्या मनांत धारण करते-आणि याच भावनेनें जी माता आपल्या मुलास आपलें स्तन्य पाजतें त्यामुळें वर सांगितलेले गुण त्या बालकांत निःसंदेह उतरतीलच. याविषयीं तिसरा मंत्र मनन करण्यासारखा आहे.

(८) कुटुंबाचा आदर्श

चौथ्या मंत्रांत आदर्श कुटुंबाचा नमुना आपणांसन्मुख ठेवला आहे. द्युलोक पिता, भूलोक माता आणि त्यांच्या मधील तेजस्वी गोलोक हा त्यांचा तेजस्वी पुत्र आहे. स्वतःच्या घरांत सुद्धां असाच आदर्श असावयास हवा. आकाश आणि पृथ्वीच्या मध्यें ज्याप्रमाणें सूर्य आहे, त्याचप्रमाणें पिता आणि मातेच्या मध्यें बालक चमकलें पाहिजे. किती उच्च आदर्श आहे ! हरेक गृहस्थानें त्याचें स्मरण ठेवावें.

(९) औषधि प्रयोग

मुंज गवताच्या रसानें अनेक रोग आणि रक्तस्राव बरे होतात. कारण कीं मुंज शोधक, शुद्धता आणि निर्मळता उत्पन्न करणारा आहे. यावरून स्पष्ट होते कीं जर शोधकता, शुद्धता, पवित्रता हे गुण आपणांमध्यें वाढविले तर रोगादि दूर जातील. प्रत्येकाला ही सूचना आचरणीय आहे.

मुंज अथवा शर औषधीचा प्रयोग करून रक्तस्रावाचे तसेंच मूत्राघातासारखे रोग दूर होऊं शकतात. याविषयीं सूचक उपदेश या सूक्तांत शेवटीं दिला आहे. वैद्यांनीं त्याचा अवश्य विचार करावा.

(१०) राष्ट्राचा विजय

व्यक्ति, कुटुंब, जात, देश तसेंच राष्ट्राच्या विजयपूर्ण अभ्युदयाचे नियम सर्वत्र समानच आहेत. वाचकांना ही गोष्ट उत्तम प्रकारें माहित आहेच. फक्त व्यक्तीचें कार्यक्षेत्र लहान असतें आणि राष्ट्राचें फार विस्तृत असतें. लहानपणआणि मोठेपण दूर केलें तर नियमांच्या एकरूपतेचा अनुभव दोन्ही स्थानीं येऊं शकतो.

राष्ट्र हें विस्तृत कुटुंबच आहे. असे मानून पूर्वस्थानीं एक घर अथवा एक कुटुंबाविषयीं जो उपदेश दिला तोच विस्तृत रूपानें राष्ट्राच्या बाबतींत जर वाचक लागू करतील तर राष्ट्रीय उन्नतीचा विषय पूर्वोक्त प्रकारानें त्याच्या नीट ध्यानीं येईल.

घरांत पिता शासक असतो. राष्ट्रांत राजा शासक असतो. घरांत प्रपंच चालविणारी माता असते. राष्ट्रांत प्रजेनें निवडून दिलेल्या सभासदांची लोकसभा राष्ट्रप्रपंच करीत असते. घरांत पुत्रास वीर बनविण्यांत येतें, राष्ट्रांत बालचमूंत वीरता वाढविण्याचा कार्यक्रम असतो. याप्रमाणें साम्य पाहून हें सूक्त राष्ट्रीय विजयाचा हि उपदेश कशा प्रकारें देत आहे तें वाचकांच्या ध्यानीं येईल.' पूर्वी वर्णिलेले पिता, माता आणि पुत्राचे गुण, धर्म कर्म याचप्रकारें राष्ट्रांत ताडून पाहिले असतां वाचकांस ही गोष्ट स्पष्टपणें समजेल म्हणजे राष्ट्रीय दृष्टीनें या सूक्ताचा भावार्थ खालीं दिल्याप्रमाणें होईल.

प्रजेचें उत्तम पालन पोषण आणि रक्षण करणारा राजाच शूर वीरांचा खराखुरा पिता आणि त्यांची माता अनेक कार्यांची प्रेरणा देणारी मातृभूमि होय. (१) हे मातृभूमि ! आमचीं सर्वांचीं शरीरें अत्यंत सुदृढ बनावींत म्हणजे त्यामुळें आम्हीं सर्व बलवान् होऊन आमच्या आणि राष्ट्राच्या शत्रूंचा नाश करूं. (२) ज्याप्रमाणें गाय स्वतःच्या वासराचें कल्याण नेहमीं इच्छितें त्याप्रमाणें हे ईश्वरा मातृभूमीच्या प्रेमानें उत्तेजित झालेले हे वीर पुढें होवोत. (३) ज्याप्रमाणें आकाश आणि पृथ्वीच्यामध्यें तेजोगोल आहे त्याप्रमाणें राजा आणि प्रजा यांच्यामध्यें वीर चमकते राहोत तसेच ते पावित्र्य संभाळून रोगादिकांस दूर करोत. ' (४)

हें स्पष्टीकरण साधारणतः संक्षेपतः दिलें आहे. वाचकांनी त्याचें नीट मनन करून वेदाचा आशय समजून घ्यावा.

विजय-प्राप्ति

कांड २, सूक्त २७

(ऋषिः- कपिञ्जलः । देवता – १-५ वनस्पतिः, ६ रुद्रः, ७ इन्द्रः)

नेच्छत्रुः प्राशं जयाति सहमानाभिभूरसि । प्राशं प्रतिप्राशो जह्यरसान्कृण्वोषधे ॥ १ ॥
सुपर्णस्त्वान्वविन्दत्सूकरस्त्वाखनन्नसा । प्राशं प्रतिप्राशो जह्यरसान्कृण्वोषधे ॥ २ ॥
इन्द्रो ह चक्रे त्वा बाहावसुरेभ्य स्तरीतवे । प्राशं प्रतिप्राशो जह्यरसान्कृण्वोषधे ॥ ३ ॥
पाटामिन्द्रो व्याश्नादसुरेभ्य स्तरीतवे । प्राशं प्रतिप्राशो जह्यरसान्कृण्वोषधे ॥ ४ ॥
तयाहं शत्रून्त्साक्ष इन्द्रः सालावृकाँ इव । प्राशं प्रतिप्राशो जह्यरसान्कृण्वोषधे ॥ ५ ॥
रुद्र जलाषभेषज नीलशिखण्ड कर्मकृत् । प्राशं प्रतिप्राशो जह्यरसान्कृण्वोषधे ॥ ६ ॥
तस्य प्राशं त्वं जहि यो न इन्द्राभिदासति । अधि नो ब्रूहि शक्तिभिः प्राशि मामुत्तरं कृधि ॥७॥

अर्थ— (**शत्रुः प्राशं न इत् जयाति**) प्रतिपक्षी निश्चयें करून माझ्या या प्रश्नावर विजय मिळवूं शकणार नाहीं कारण कीं तूं (**सहमाना अभिभूः असि**) जयवंत आणि प्रभावशाली आहेस. (**प्राशं प्रतिप्राशः जहि**) प्रत्येक प्रश्नावर प्रतिपक्षास जिंका. (**औषधे ! अरसान् कृणु**) हे औषधे ! तूं प्रतिपक्ष्याला नीरस कर. (**सुपर्णः त्वा अनु अविन्दत्**) गरुडानें तुला पकडलें आहे आणि (**सूकरः त्वा नसा अखनत्**) डुकरानें तुला नाकानें खोदलें आहे. (२) (**इन्द्रः असुरेभ्यः स्तरितवे त्वा बाहौ ह चक्रे**) इन्द्रानें राक्षसांपासून स्वतःच्या रक्षणासाठीं तुला बाहूवर धारण केली होती. (३) (**असुरेभ्यः स्तरीतवे**) राक्षसापासून वांचण्यासाठीं (**इंद्रः पाटां व्याश्नात्**) इन्द्रानें ही पाटा नांवाची वनस्पति खाल्ली होती. (४) (**अहं तया शत्रून् साक्षे**) मीं त्या वनस्पतीनें शत्रूंचा पराजय करतो (**इंद्रः सालावृकान् इव**) ज्याप्रमाणें इंद्र हिंस्र पशु आणि लांडग्यांस दूर करतो, त्याप्रमाणें० । (५) हे (**जलाष-भेषज**) पाण्यानें चिकित्सा करणाऱ्या (**नील शिखण्ड**) निळ्या शेंडीच्या (**कर्मकृत् रुद्र**) पुरुषार्थी रुद्रा ! (**प्राशं प्रतिप्राशः**) प्रत्येक प्रश्नासाठीं प्रतिवाद्याला (**जहि**) जिंकून घे. (**ओषधे अरसान् कृणु**) हे औषधि तूं प्रतिपक्ष्याला शुष्क कर. (६) हे इंद्रा ! (**यः नः अभिदासति**) जे आम्हांस दास करूं इच्छितात (**तस्य प्राशं त्वं जहि**) त्यांच्या प्रश्नांना तूं जिंकून घे (**शक्तिभिः नः अभिब्रूहि**) शक्तीसह तूं आम्हांस सांग आणि (**प्राशि मां उत्तरं कृधि**) प्रश्न आणि त्यांच्या प्रतिप्रश्नांत मला अधिक उत्तम कर (७)

भावार्थ— माझ्या प्रश्नांनीं प्रतिपक्षाचा पराजय होईल. कारण माझी शक्ति जयवति आणि प्रभावशाली आहे. म्हणून प्रत्येक प्रश्नानें प्रतिपक्षाचा पराजय होईल. औषधिसुद्धां प्रतिपक्षास शुष्क करोत. (१) ही वनस्पति गरुडपक्षी प्राप्त करतो आणि डुक्कर ती खोदून काढतें. (२) इन्द्रानें राक्षसांचा पराजय करण्यास ही वनस्पति स्वतःच्या शरीरावर धारण केली होती. (३) तसेंच तिचें सेवनहि केलें होतें. (४) तिनें शत्रूला पळवून लावतो. (५) हे जलचिकित्सक निळ्या शेंडीच्या उत्तम पुरुषार्थी रुद्र देवा ! प्रति-प्रश्नांनी प्रतिपक्षीयांस हरव. आणि हे औषधि ! प्रतिपक्षाला शुष्क कर. (६) हे इंद्रा ! जे आम्हांस दास करण्याचा प्रयत्न करतात त्यांना प्रतिप्रश्नांत जिंकून घे आणि शक्तीसह तूं आम्हांस सांग. (७)

विजयप्राप्ति

विजयाचीं क्षेत्रें

एक प्रकारचा विजय वादविवादांत होतो. दुसरा युद्धांत होतो. या दोन्ही विजयाच्या प्राप्तीसाठीं भिन्नभिन्न शक्तींची आवश्यकता असते.

वादी आणि प्रतिवादी

प्रश्न विचारणाऱ्यास ' प्राश ' म्हणजे वादी, त्याच्या प्रतिपक्षीयाला ' प्रतिप्राश ' म्हणतात. वादी आणि प्रतिवादी या दोन शब्दांचे समानार्थकच ' प्राश आणि प्रतिप्राश ' शब्द आहेत. वाचकांनीं त्यांत समानार्थ पहावा. प्रथम मंत्रांत आणि नंतरच्या सुद्धां कित्येक मंत्रांत म्हटलें आहे कीं प्रश्नकर्त्यानें असें समजावें कीं प्रतिवादी अथवा उत्तरदात्यास आपल्या पक्षाचेंही भरपूर ज्ञान आहे. ही गोष्ट लक्षांत घेऊन सुद्धां प्रश्नकर्त्यानें अशा कुशलतेनें प्रश्न विचारावे कीं थोड्याशा प्रश्नांनीच प्रतिपक्षाचें तोंड उतरून जावें. कित्येक हुषार लोक असे असतात कीं ते एक दोनच पण असे मुद्याचे प्रश्न विचारतात कीं त्याचें उत्तर देतां देतां तो प्रतिपक्षी स्वतःच पराजित होतो. स्वतःच्या विषयांत इतकें ज्ञान प्राप्त केलें पाहिजे आणि प्रश्न विचारण्याचें कौशल्य असें वाढविलें पाहिजे. वादविवादांत सहज विजय प्राप्त व्हावा. या सूक्ताच्या मंत्रभागांत अशी तयारी करण्याच्या सूचना वारंवार दिल्या आहेत. विजय प्राप्त करण्याचा आत्मविश्वास स्वतःमध्यें असावा आणि कोणत्याहि बाबतींत शंकेस स्थान नसावें. हें वादविवादांतील विजयाविषयीं सांगितलें.

युद्धांत विजय

आतां दुसरा विजय युद्धांत शत्रूवर विजय मिळण्याचा पाहूं. त्यांत सुद्धां स्वतःची पूर्व तयारी करण्याची आवश्यकता असतेच. ही तयारी अशी असली पाहिजे कीं स्वतःचा विजय निश्चयेंकरून व्हावा. त्यासाठीं शंकेला कांहीं जागा राहूं नये.

दोन्ही प्रकारच्या युद्धांत पूर्व तयारी आवश्यकच आहे. आणि जितकी पूर्व तयारी अधिक तितकी विजयाची शक्यता अधिक असणार !

पाटा औषधि

या सूक्तांत विजयासाठीं एक औषधिप्रयोग सांगितला आहे. या औषधीचें नांव आहे ' पाटा अथवा पाठा ' (मं. ४) या औषधीचे गुणधर्म असे आहेत.

तिक्ता गुरुरुष्णा वातपित्तज्वरघ्नी ।
भग्नसंधानकरी पित्तदाहातिसारशूलघ्नी च ।

(राज. नि. व. ६)

श्रेयसी मुखवाचिका । कफकण्ठरुजावहा । (भाव.प्र.)

' ही पाटा अथवा पाठा वनस्पती तुरट, गुरु, उष्ण आहे, वात पित्तज्वर नाशक, मोडलेल्या भागांना जोडणारी, पित्त, दाह, अतिसार यांचा नाश करणारी, ही श्रेय करणारी, मुखांतील बोलण्याचे दोष दूर करणारी, तसेंच गळ्याची पीडा नाहीशी करणारी आहे. पाठ वनस्पतीला चक्रपाठा, आकनामी, निमुखा, ' अशीं नांवें आहेत.

वादविवादाचे वेळीं ही वल्ली तोंडांत ठेवली अथवा गळ्यावर बांधली तर बोलतांना गळ्यावर ताण पडत नाहीं. वाणी स्वच्छ, स्पष्ट मोकळी रहाते. ही गोष्ट भावप्रकाशादि ग्रंथांतसुद्धां सांगितली आहे. गळ्यांत कफ दाटल्यानें अथवा अन्य कांहीं कारणानें शब्दोच्चार स्पष्ट होत नसेल अथवा बोलतांना कष्ट होत असले तर ते सर्व या प्रयोगानें होत नाहींत म्हणूनच या औषधीनें वादविवादांत जय प्राप्त होतो असें वर्णन या सूक्तांत केलें आहे. तसेंच त्यांत उत्तेजकता हा गुण असल्यानें थकवा वाटत नाहीं. त्यानें सुद्धां विजय होण्यांत सहाय्य मिळतें.

युद्धांतसुद्धां ही वनस्पति फार उपयोगी आहे. कारण तिनें तुटलेले अवयव पुनः जोडले जातात. घाव त्वरित भरून येतात. महाभारतांत सुद्धां भारतीय युद्धांतील वीर एक प्रकारच्या वनस्पतीचें सेवन करीत असत आणि अंगावर चोळीत असत असें वर्णन वाचावयास मिळतें. आणि त्यामुळेंच रात्रपूर्ण होतांच पुनः वीर युद्धास तयार असत. नाहून आदल्या दिवशीं घायाळ झालेला वीर दुसऱ्या दिवशीं लढण्यास कसा तयार होऊं शकेल ? या शंकेचें निराकरण येथें या वेदमंत्रानें केलें आहे. महाभारतांत औषधीचें नांव कोठेंहि दिलेलें नाहीं. मात्र औषधी, जडीबुट्टी सेवन करण्यांत येत असे एवढाच उल्लेख आहे. या सूक्तांत ' पाठा ' नांव दिलें आहे. ज्ञानी वैद्यांनीं त्याचें संशोधन करावें कीं ही वनस्पति कोणती आणि तिचा उपयोग कोणत्या रीतीनें करण्यांत येत होता.

ही औषधि स्वतःजवळ ठेवावी. दंडावर अथवा गळ्यांत बांधावी,

तोंडांत ठेवावी अथवा खावी, सेवन करावी, म्हणजे ती लाभकारक आहे. पहा—

१. **इंद्रः बाहौ चक्रे ।** (मं. ३)
२. **इन्द्रः पाटां व्याश्नात् ।** (मं. ४)

या मंत्रभागांत हीच वनस्पति शरीरावर धारण करण्याचा आणि पोटांत सेवन करण्याचा स्पष्ट उल्लेख आहे. जर ज्ञानी वैद्य या वनस्पतीचा योग्य शोध करतील आणि त्याच्या सेवनविधीचा जर निश्चय करतील तर समाजावर फार उपकार होतील. भारतीय युद्धसमयीं वीरलोक त्याचा उपयोग करीत असत आणि लाभ करून घेत असत. बाणांनीं घायाळ झालेले वीर आणि घोडे सायंकालीं या वनस्पतीच्या सेवनानें दुसऱ्या दिवशीं युद्ध करण्यास समर्थ होत असत. जर ही निव्वळ कविकल्पना नसेल– आणि या मंत्रांत सुद्धां तेंच सांगितलें आहे– तर त्याचें अन्वेषण-संशोधन होणें आवश्यक आहे.

शक्तीसह वक्तृत्व

सातव्या मंत्रांत एक गोष्ट विशेष महत्त्वाची सांगितली आहे पहा—

शक्तिभिः अधिब्रूहि । (मं. ७)

' अनेक शक्ति स्वतःच्या जवळ तयार ठेऊन जें बोलावयाचें तें बोलावें. आपल्यापाशीं शक्ति नसतां बोलणें आणि महान् वक्तृत्व करणें यांत कांहीं अर्थ नाहीं. अशा शक्तिहीन वक्तृत्वानें कोणतेंहि कार्य अथवा हेतु सिद्ध होत नाहीं. म्हणून स्वतःजवळ कार्यकारिणी शक्ति किती आहे अथवा केवढ्या शक्तीचा आपणास पाठिंबा आहे, त्याचा विचार करूनच काय बोलायचें तें बोलावें, अथवा करणें तें करावें हें योग्य होय. स्वशक्तीपेक्षां जास्त बोललेल्याचा शत्रूवर सुद्धां कांहीं प्रभाव पडत नाहीं आणि त्यामुळें स्वतःचें बळ कांहीं वाढत नाहीं. म्हणून ही महत्त्वपूर्ण सूचना वाचकांनीं अवश्य ध्यानांत ठेवावी. तसेंच,

यः नः अभिदासति तं जहि । (मं. ७)

' जे आम्हांस दास करूं इच्छितात त्यांस जिंकून घ्या.' हा उपदेश सुद्धां पूर्वोक्त आदेशाच्या अनुसंधानांत अमलांत आणण्यांत आला तर पुष्कळच लाभदायक होऊं शकेल. स्वतःचें बळ वाढविणें, जितकें करून दाखवितां येईल तेवढेंच बोलणें, इतकें झाल्यानंतर स्वतःला दास करूं इच्छिणाऱ्याचा पराभव करावा. अशा रीतीनें हळू हळू स्वतःची शक्ति वाढवीत स्वतःचें कार्यक्षेत्र विस्तीर्ण करणें हाच योग्य मार्ग आहे.

कोणास गुलाम (दास) करण्याचा निषेध

वेदांत ठिकठिकाणीं कोणास दास (गुलाम) करण्याचा निषेध केलेला आपल्याला पाहायला मिळतो. हा निषेध इतका तीव्र आणि पराकोटीला जाऊन केलेला आहे कीं ' अभिदास ' याचा अर्थ ' विनाश ' असा झाला आहे. पूर्ण नाश होणें अथवा गुलाम होणें या दोन्ही गोष्टी वेदाच्या दृष्टीनें एकच आहेत. कोणत्याहि परिस्थितींत वेद दास, गुलाम होणें पसंत करीत नाहीं. वाचकांनीं या गोष्टीचें मनन करावें आणि स्वतःमध्यें धर्ममय वीरवृत्ति वाढण्याचा प्रयत्न करावा.

जलचिकित्सक

सहाव्या मंत्रांत जलचिकित्सक, निळया शेंडीच्या पुरुषार्थी रुद्राचें वर्णन आहे. ' जलाषभेषज ' शब्द जलचिकित्सेचा भाव दर्शवितो. जलाषचा अर्थ पाणी असाच आहे. नीलशिखंडीचा अर्थ निळी शेंडी असणारा असा आहे. ही गोष्ट तरुण आरोग्ययुक्त माणसास बोध देत आहे. वृद्धाची शेंडी सफेत असते. तरुणाची शेंडीच निळी वा काळी असणार. **' कर्मकृत् '** शब्द पुरुषार्थवाचक आहे. स्वतःच्या चिकित्सा कार्यांत कुशल. **' रुद्र '** शब्दाचा अर्थ आहे (**रुद्+द्र**) रडविणार, रोगांस दूर करणार हे सर्व शब्द उत्तम चिकित्सकाचा भाव दाखवितात. या चिकित्सकाचें नांव येथें एवढ्यासाठीं आलें आहे कीं, युद्धांत घायाळ झालेल्या वीरांना आरोग्य प्राप्त करून देण्याचा संबंध त्याच्याशीं आहे. त्याचप्रमाणें पाठा औषधीचा सुद्धां उपयोग करावयाचा आहे. त्यासाठीं सुविद्य वैद्याची (चिकित्सकाची) आवश्यकता आहे. हें सूक्त जो विषय प्रतिपादन करीत आहे तो प्रत्यक्ष अनुभवण्याचा विषय आहे. यासाठीं वैद्यानींच तो प्रत्यक्षांत आणण्याचा प्रयत्न करावा. नाहून ती विद्या मात्र शब्दांत आणि पुस्तकांतच राहून जाईल.

विजयप्राप्ति

कांड ५, सूक्त ३

(ऋषि- बृहद्दिवोऽथर्वा: । देवता- अग्निः । विश्वेदेवाः)

ममाग्ने वर्चो विहवेष्वस्तु वयं त्वेन्धानास्तन्वं पुषेम ।
मह्यं नमन्तां प्रदिशश्चतस्रस्त्वयाध्यक्षेण पृतना जयेम ॥ १ ॥
अग्ने मन्युं प्रतिनुदन्परेषां त्वं नो गोपाः परि पाहि विश्वतः ।
अपाञ्चो यन्तु निवता दुरस्यवोऽमैषां चित्तं प्रबुधां वि नेशत् ॥ २ ॥
मम देवा विहवे सन्तु सर्व इन्द्रवन्तो मरुतो विष्णुरग्निः ।
ममान्तरिक्षमुरुलोकमस्तु मह्यं वातः पवतां कामायास्मै ॥ ३ ॥
मह्यं यजन्तां मम यानीष्टाकूतिः सत्या मनसो मे अस्तु ।
एनो मा नि गां कतमच्चनाहं विश्वे देवा अभि रक्षन्तु मेह ॥ ४ ॥

अर्थ — हे (**अग्ने**) अग्निदेवा ! (**विहवेषु मम वर्चः अस्तु**) सर्व युद्धांत माझें तेज प्रकाशित होवो, (**वयं त्वा इन्धानाः तन्वं पुषेम**) आम्हीं तुला प्रदीप्त करीत आमच्या शरीरास पुष्ट करूं. (**चतस्रः प्रदिशः मह्यं नमन्तां**) चारी दिशा माझ्या सन्मुख नम्र होवोत. (**त्वया अध्यक्षेण पृतनाः जयेम**) तुझ्या अध्यक्षतेखालीं आम्हीं संग्रामांत विजय प्राप्त करूं. (१)

हे अग्नि ! (**परेषां मन्युं प्रतिनुदन्**) शत्रूंच्या क्रोधास दूर करीत (**त्वं गोपाः सन्**) तूं रक्षक होऊन (**नः विश्वतः परिपाहि**) आमचें सर्व बाजूंनीं रक्षण (पालन) कर, (**दुरस्यवः पराञ्चः निवताः यन्तु**) दुःख देणारे, दूर करण्यालायक नीच लोक, दूर जावोत. (**एषा प्रबुधां चित्तं अमा विनेशत्**) हे दुष्ट लोक ज्ञानी झाले तरी त्यांचे चित्त त्या बरोबरच नष्ट होऊन जावो. (२)

(**सर्वे देवाः इन्द्रवन्तः मरुतः विष्णुः अग्निः**) सर्व देव म्हणजे इन्द्रासह मरुत, विष्णु आणि अग्नि (**विहवे मम सन्तु**) युद्धांत माझ्या पक्षांत राहोत. (**मम अन्तरिक्षं उरुलोकं अस्तु**) माझें अंतरिक्ष विशेष विस्तृत होवो. (**वातः मह्यम् अस्मै कामाय प्रवतां**) वायु मला या कार्यांत मदत करण्यास राहो. (३)

(**मम यानि इष्टां मह्यं यजन्तां**) मला जे अभीष्ट असेल तें मला प्राप्त होवो, (**मे मनसः आकूतिः सत्या अस्तु**) माझ्या मनांतील संकल्प सत्य होवो. (**अहं कतमच्चन एनः मा नि गां**) मीं कोणतेंहि पाप न करावें. (**विश्वे देवाः इह मा अभिरक्षन्तु**) सर्व देव माझें येथें रक्षण करोत. (४)

भावार्थ— हे ईश्वरा ! सर्व प्रकारच्या स्पर्धांत माझें तेज प्रकाशित होवो. तुला आम्हीं आमच्यांत प्रकाशित करून आम्हीं आमचें शरीर पुष्ट आणि बलवान् करू. सर्व दिशा आणि उपदिशांतून रहाणारे लोक माझ्यासमोर नम्र होवोत. तुझ्या अध्यक्षतेखालीं आम्हीं सर्व स्पर्धांत विजयी होऊं. (१)

हे देवा ! शत्रूचा क्रोध दूर करून तूं आमचें सर्व प्रकारें रक्षण कर. दुःख देणारे नीच लोक आम्हांपासून दूर जावोत. जर ते शत्रु बुद्धिमान् असतील तर त्यांची ती दुष्ट बुद्धीहि नष्ट होवो. (२)

स्पर्धेच्या वेळीं सर्व देवांचें सहाय्य आम्हांस प्राप्त व्हावें. इंद्र, विष्णु, अग्नि, मरुत्, अन्य देव आवश्यकतेप्रमाणें अनुकूल वर्तोत. (३)

माझ्या सर्व इच्छा परिपूर्ण होवोत. माझ्या मनांतील संकल्प सत्य होवो, माझ्याकडून कोणतेंहि पाप कर्म न व्हावें आणि सर्व देवांनीं माझें रक्षण करावें. (४)

मयिं देवा द्रविणमा यंजन्तां मय्याशीरस्तु मयिं देवहूंतिः ।
दैवा होतारः सनिषन्न एतदरिष्टाः स्याम तन्वा सुवीराः ॥ ५ ॥
दैवीः षडुर्वीरुरु नः कृणोत विश्वे देवास इह मादयध्वम् ।
मा नो विददभिभा मो अशस्तिर्मा नो विदद्वृजिना द्वेष्या या ॥ ६ ॥
तिस्रो देवीर्महि नः शर्म यच्छत प्रजायै नस्तन्वे यच्च पुष्टम् ।
मा हास्महि प्रजया मा तनूभिर्मा रधाम द्विषते सोम राजन् ॥ ७ ॥
उरुव्यचा नो महिषः शर्म यच्छत्वस्मिन्हवे पुरुहूतः पुरुक्षु ।
स नः प्रजायै हर्यश्व मृडेन्द्र मा नो रीरिषो मा परा दाः ॥ ८ ॥

अर्थ- (देवाः मयि द्रविणं आयजन्तां) देव माझ्यासाठीं द्रव्य देवोत. (मयि आशीः मयि देवहूतिः अस्तु) मला आशीर्वाद मिळोत आणि देवांस बोलवण्याची शक्ति माझ्यामध्यें राहो. (दैवाः होतारः नः एतत् सनिषन्) दिव्य होतागण आम्हांस तें देवो. आम्हीं (तन्वाः अरिष्टाः सुवीराः स्याम) आमच्या शरीरानें निरोगी व्हावें आणि उत्तम वीर व्हावें. (५)

(दैवीः षट् ऊर्वीः) हे सहा दिव्य महान् दिशांनो ! (नः उरु कृणोत) आमच्यासाठीं विशाल स्थान निर्माण करा (विश्वे देवासः) सर्व देव हो ! (इह मादयध्वं) येथें आम्हांस आनंदित करा. (अभिभाः नः मा विदत्) निस्तेजता आम्हांस कधीं पण प्राप्त न होवो. (अशस्तिः मा उ) अकीर्ति न येवो. (या द्वेष्या वृजिनं न मा विदत्) जें द्वेष करण्यासारखें पाप आहे तें आमच्या जवळ न येवो. (६)

हे (तिस्रः देवीः) तीन देवींनों ! (नः महि शर्म यच्छत्) आम्हांस पुष्कळ सुख प्रदान करा. (यत् च पुष्ट नः तन्वे प्रजायै) जे कांहीं पोषक पदार्थ आहेत ते आमच्या शरीरासाठीं आणि प्रजेसाठीं द्या. (प्रजया मा हास्महि) आम्ही संततिहीन नें व्हावें, (मा तनूभिः) आमचीं शरीरें सुद्धां कृश न होवोत. हे (राजन् सोम) राजा सोमा ! (द्विषते मा रधाम) शत्रूमुळें आम्हीं पीडित न व्हावें. (७)

(ऊरुव्यचाः पुरुहूतः महिषः अस्मिन् हवे नः पुरुक्षु शर्म यच्छतु) विशाल, शक्तिशाली, प्रशंसा पावलेला देव या यज्ञांत आम्हांस पुष्कळ अन्नयुक्त सुख देवो. हे (हर्यश्व इन्द्र) रसहरण करणाऱ्या किरणयुक्त देवा ! प्रभो ! (नः प्रजायै मृड) आमच्या संततीला सुख दे. (नः मा रीरिष) आमचा नाश करूं नको. (मा परादाः) आमचा त्याग करूं नको. (८)

भावार्थ-सर्व देव मला धन्य करोत, त्यांचे आशीर्वाद मला प्राप्त होवोत. देवांची उपासना करण्याची निष्ठा माझ्या मनांत दृढ होवो. ती निष्ठा देवांच्या कृपेनें मला प्राप्त होवो. आम्ही शरीरानें निरोगी आणि बलवान् होऊन वीर व्हावें. (५)

दिव्य दिशा आम्हांस विस्तृत स्थान देवोत. सर्व देव आम्हांस आनंदित करोत. निस्तेजता, अकीर्ति, तसेंच घृणित पातक आम्हांपासून दूर होवो. (६)

तीन देवी आम्हांस पुष्कळ सुख देवोत. आमची शरीरें आणि प्रजा पुष्टि पावोत. आमचीं शरीरें आणि प्रजा नष्ट न होवोत. आणि शत्रुत्वाने आम्हीं पीडिलें न जावें. (७)

विशाल शक्तीचा ईश्वर आम्हांस उत्तम सुख देवो. आमची प्रजा सुखी राहो, आमचा कधीं नाश न होवो. आणि आम्हीं कधीं विभक्त न व्हावें (८)

धाता विधाता भुवनस्य यस्पतिर्देवः सविताभिमातिषाहः ।
आदित्या रुद्रा अश्विनोभा देवाः पान्तु यजमानं निर्ऋथात् ॥ ९ ॥
ये नः सपत्ना अप ते भवन्त्विन्द्राग्निभ्यामव बाधामह एनान् ।
आदित्या रुद्रा उपरिस्पृशो न उग्रं चेत्तारमधिराजमक्रत ॥ १० ॥
अर्वाञ्चमिन्द्रममुतो हवामहे यो गोजिद्धनजिदश्वजिद्यः ।
इमं नो यज्ञं विहवे शृणोत्वस्माकमभूर्हर्यश्व मेदी ॥ ११ ॥

अर्थ-(धाता विधाता) धारक आणि निर्माण करणारा (यः भुवनस्य पतिः आभिमातिषाहः सविता देवः) जो भुवनांचा पालक, संचालक, घमेंडी शत्रूनां जिंकणारा देव आहे (आदित्याः रुद्राः) आदित्य आणि रुद्र तसेंच (उभा अश्विना) दोघे अश्विनीकुमार हे सर्व देव (निर्ऋथात् यजमानं पान्तु) यजमानाला विनाशांतून वांचवोत. (९)

(ये नः सपत्नाः ते अप भवन्तु) जे आमचे वैरी आहेत ते दूर जावोत. (इन्द्राग्निभ्यां एनान् अव बाधामहे) इन्द्र आणि अग्नीच्या सहाय्यानें त्यांना आम्हीं प्रतिबंध करतों. (आदित्याः रुद्राः उपरिस्पृशः) आदित्य रुद्र आणि वरच्या भागास स्पर्श करणारे सर्व देव (नः उग्रं चेत्तारं अधिराज्यं अक्रत्) आमच्यासाठीं उग्र चेतना देणाऱ्या मुख्य अधिराजाला निर्माण करीत आहेत. (१०)

(यः गोजित्, धनजित् यः अश्वजित्) जो गायी, धन आणि घोड्यास जिंकणारा आहे तो (अर्वाञ्चं इंद्रं अमुतः हवामहे) आमच्या जवळच्या इंद्राची तेथून स्तुति करीत आहेत. (नः विहवे इमं यज्ञं शृणोतु) विशेष स्पर्धेनें केलेल्या आमच्या यज्ञास ऐकोत. हे (हर्यश्व) रस हरण करणाऱ्या किरणयुक्त देवा! (अस्माकं मेदी अभूः) तूं आमचा स्नेही हो. (११)

भावार्थ— ईश्वर तसेंच इतर सर्व देवांनीं आम्हांस पापापासून वांचवावें. (९)

जो आमचा वैरी अथवा दुष्मन आहे तो आम्हांपासून दूर होवो. त्यासाठींच आम्हीं शत्रूला अडवितों. तसेंच आदित्यादि सर्व देव आम्हांसाठीं तेजस्वी, उग्र, बुद्धिवान् राजा देवोत (१०)

जो गाय घोडा वगैरे विविध धन देणारा आहे त्या प्रभूची आम्हीं अंतःकरणापासून स्तुति करतों. हे प्रभो! ही आमची प्रार्थना ऐकून प्रत्येक स्पर्धेत आम्हांस सहाय्य कर आणि आमचा स्नेही हो! (११)

विजयाची प्राप्ति

स्वतःच्या विजयासाठीं प्रार्थना

या सूक्तांत स्वतःचा विजय व्हावा म्हणून ईश्वरापासून शक्ति प्राप्त करून घेण्याची इच्छा प्रगट केली आहे. मनुष्य नेहमीं एक अथवा दुसऱ्या प्रकारे स्पर्धेत गुंतलेला असतोच. हें जीवनच एक प्रकारची स्पर्धा आहे. या स्पर्धांत विजय प्राप्त करण्याची इच्छा प्रत्येक मनुष्याला असते. परंतु तो विजय प्राप्त करण्यासाठीं मनांत कोणत्या प्रकारचे विचार धारण केले पाहिजेत, बुद्धींत कोणते संकल्प स्थिर केले पाहिजेत आणि शरीरानें कोणती कर्मे केलीं पाहिजेत त्याचा विचार मनुष्य करीत नाहीं. मन, बुद्धि, चित्त इत्यादि अंतःशक्ति तसेंच शरीरादि बाह्य शक्तींचें उत्तम सहकार्य आणि उत्तम प्रभावानेंच मनुष्य विजयी होऊं शकतो. म्हणून हें स्पष्ट होतें कीं विजय प्राप्त होणें अथवा न होणें हें स्वतःच्या शक्तीवरच अवलंबून आहे. बुद्धि, मन आणि चित्तांत जे विकार जागृत रहातील त्याचाच परिणाम जय अथवा पराजयांत होईल. त्याचा परस्पर संबंध असा आहे कीं मनांतील शुभाशुभ विचाराप्रमाणें हातून म्हणजे शरीराकडून शुभाशुभ कार्ये होतात. आणि त्यांचा अंतिम परिणाम ईश्वरीइच्छेनुसार, नियमानुसार जय अथवा पराजयांत होतो. त्यासाठीं विजयी विचार नेहमीं मनांत धारण

केलें पाहिजेत म्हणजे विजयप्राप्तीची शक्यता जास्त. या सूक्तांत विजयी विचार दिले आहेत ते मनांत धारण केल्यानें मनुष्याचा निःसंदेह विजय होईलच. आतां ते विचार कोणते आहेत तें आपण पाहूं-

विजयी विचार

विजयी विचार नेहमीं मनांत धारण केले पाहिजेत. हीन आणि क्षुद्र विचार केव्हांहि मनांत येऊं देतां कामा नये या सूक्ताच्या आरंभापासून अंतापर्यंत विजयी विचार दर्शविले आहेत. त्यामुळें या सूक्ताच्या मननानें वाचकाच्या मनांत विजयी विचार स्थिर राहूं शकतील. आणि त्यांचा विजय निःसंदेह होऊं शकेल. आतां ते विचार कोणते ते पहा-

१ विहवेषु मम वर्चः अस्तु । (मं. १)

२ पृतना जयेम । (मं. १)

' युद्धांत माझें तेज प्रकाशित होवो आणि युद्धांत शत्रूच्या सेनेला आम्हीं पराजित करूं.' असा मनाचा निश्चय असला पाहिजे. मनांत असा विचार ठेवला पाहिजे कीं मीं शत्रूचा पराजय अवश्य करीनच. आणि विजय संपादन करीन.

३ पतान् अव बाधामहे । (मं. १)

' या शत्रूंना आम्हीं पूर्णपणें प्रतिबंध करतों. म्हणजे कोणत्याहि रस्त्यानें जरी शत्रु आला तरी आम्हीं त्याला अडवूं आणि पुढें येऊं देणार नाहीं. या मंत्रभागावरून आपली युद्धाची तयारी कशी असावी या विषयीं सूचना मिळूं शकते. कोणत्याहि मार्गानें शत्रु येणार असला तरी त्याला अडविण्याची आपली तयारी असली पाहिजे. स्वतःच्या शत्रूला अडविण्यास जेवढी तयारी पाहिजे तितकी प्रत्येक मनुष्यानें ठेवावी आणि शत्रूपासून स्वतःचें रक्षण करावें. ज्याची अशी तयारी असेल तोच युद्धांत विजय प्राप्त करूं शकतो. याप्रमाणें विजयाच्या बाबतींत व्यक्ति असो कीं राष्ट्र असो, दोन्हींची क्षेत्रें लहान मोठीं असतां दोन्ही सारखीच आहेत. आणि शत्रूला अडवून ठेवण्यासाठीं दोघांनीहि प्रत्येक प्रकारें तयारी करून ठेवणें अवश्य आहे. याप्रकारें पूर्व तयारीनें विजय मिळविल्यावर तो म्हणूं शकतो कीं-

४. चतस्रः प्रदिशः मह्यं नमन्ताम् । (मं. १)

चारी दिशास रहाणारे लोक माझ्यासमोर नम्र होऊन राहोत. म्हणजे आमच्यावर हल्ला करण्याची शक्ति आणि इच्छा त्यांच्यांत शिल्लक न राहो. याप्रमाणें—

५. मम अन्तरिक्षं उरु लोकं अस्तु । (मं. ३)

' माझें अन्तरिक्ष विस्तृत स्थानाचें होवो. ' प्रत्येक मनुष्याचें अंतरिक्ष त्याच्या कर्तृत्वशक्ति अनुसार लहान अथवा मोठें असतें. जे प्रबलपुरुषार्थी असतात त्यांच्यासाठीं ह्या संपूर्ण विश्वासारखें विशाल अन्तरिक्ष असतें आणि आळशी तसेंच आत्मघातकी लोकांसाठीं अगदीं लहान अन्तरिक्ष असतें. स्वतःच्या अधिकार-कक्षेंत केवढें अंतरिक्ष आलें आहे आणि स्वतःचें शासन केवढ्या अंतरिक्षावर चालतें तें पाहून मनुष्य स्वतःच्या योग्यतेचा निश्चय करूं शकतो. घटकाभर असेंच समजाना कीं ही एक आत्मपरीक्षेची कसोटीच आहे. वाचक जर या पांच वाक्यांचा संबंध एकदुसऱ्याशीं नीट पाहतील तर त्यांना विजय प्राप्त करण्यासंबंधीं पुष्कळ बोध मिळेल. या विजयासाठीं स्वतःच्या शत्रूंना दूर करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. याबाबतींत खालील आदेश पहा—

शत्रूला दूर करणें

शत्रूंना दूर करावें, त्यांचा नाश करावा, त्यांची सांवली सुद्धां घेऊं नये. शत्रूंस दाबांत ठेवावें, त्यांना उभेसुद्धां राहूं देऊं नये, असें करणें हें विजयासाठीं अत्यंत आवश्यक आहे. या विषयीं हा मंत्रभाग पहा—

६. सपत्ना अप भवन्तु । (मं. १०)

७. दुरस्यवः निवताः अपाञ्चः यन्तु । (मं. २)

' वैरी दूर होवोत, तसेंच दुष्ट लोक नीच गतीनें अधःपतनाच्या मार्गे जावोत.' म्हणजे त्यांनीं आपलें डोकें सुद्धां वर करूं नये. तसेंच आणखी पहा-

८. अभिभाः अशस्तिः द्वेष्या वृजिना मा नो विदन् । (मं. ६)

निस्तेजता, अकीर्ति, आणि द्वेष करण्यायोग्य कुटिलता आमच्याजवळ न येवोत. म्हणजे हे आंतरिक शत्रु दूर राहोत. यांतील कोणत्याहि शत्रूनें डोकेंसुद्धां वर करूं नये. या मंत्रभागांत व्यक्तीच्या अंतर्गत आणि बाह्य तसेंच समाजाचे सुद्धां अंतर्गत आणि बाह्य सर्व शत्रु दूर करण्याची सूचना मिळते. खरा विजय प्राप्त करणाऱ्या मनुष्यासाठीं सर्व शत्रूंना दूर करणें, प्रयत्नपूर्वक दूर ठेवणें, आणि स्वतःच्या अभ्युदयाचा मार्ग खुला करणें हें योग्य होय.

कामनांची तृप्ति

स्वतःचा विजय आणि शत्रूचा पराजय हें सर्व स्वतःच्या कामनापूर्तीसाठीं आहे. मनुष्याच्या अंतःकरणांत कित्येक विशिष्ट कामना असतात. जर त्याची कामनापूर्ति झाली तर त्यास स्वतःच्या जीवनाची सार्थकता झाली असें वाटूं लागतें. एरवीं तो स्वतःचें जीवन निरर्थक समजतो. याविषयीं मनुष्याच्या कामना अथवा इच्छा कशा प्रकारच्या असतात तें पहा—

९. मह्यं अस्मै कामाय वातः पवताम् । (मं. ३)

१०. यानि मम इष्टानि मह्यं यजन्ताम् । (मं. ४)
११. मे मनसः आकूतिः सत्या अस्तु । (मं. ४)
१२. देवा मयि द्रविणं, आशीः देवहूतिः च आ यजन्ताम् । (मं. ६)
१३. तिस्रो देवीः नः महि शर्म यच्छत । (मं. ७)
१४. नः प्रजायै मृड । (मं. ८)

' माझ्या या इच्छेस अनुकूल असे प्राण अथवा वायू चालोत, जे माझे इष्ट मनोरथ आहेत ते परिपूर्ण होवोत, माझ्या मनांतील सर्व संकल्प सत्य होवोत. सर्व देव मला धन, आशीर्वाद आणि देवभक्ति देवोत. तीन देवी म्हणजे, मातृभूमि, मातृभाषा आणि मातृसभ्यता (म्हणजे आपली संस्कृति) मला पुष्कळ सुख देवोत. ईश्वर आमच्या प्रजेला सुखी करो. ' अशा प्रकारच्या कामना न्यूनाधिक्यानें प्रत्येक मनुष्याच्या मनांत असतात. मनुष्याचीं सुख-दुःखें या कामनांच्या कमीजास्ती पूर्ततेवर अवलंबून असतात. म्हणून मनुष्यानें शक्य तो शुभ कामना ठेवाव्यात हें योग्य होय. त्यानें अशुभ वासना मनांत आणूं नयेत. अशी मनाची उच्च स्थिति ठेवावी. उन्नति साधावयाची असली तर हें त्यांत अगदीं आवश्यक आहे. अशा प्रकाच्या भावनांच्या शुद्धीसाठीं ईश्वराची उपासना आवश्यक आहे. या हेतूनेंच म्हटलें आहे कीं—

ईश्वर उपासना

१५. इन्द्रं हवामहे । (मं. ११)

' प्रभूची प्रार्थना आणि उपासना आम्हीं करतों, ' ईश्वर सर्वश्रेष्ठ गुणांनीं विभूषित आहे. म्हणून त्याच्या गुणाचें मनन करण्यानें मनुष्याच्या मानसिक भावना शुद्ध होतात, कामना निर्दोष होतात, संकल्प शुद्ध बनतात. हीच गोष्ट खालील मंत्रांत सांगितली आहे.

निष्पाप होणें

१६. अहं कतमच्चन एनः मा निगाम् । (मं. ४)

' मीं कोणत्याहि प्रकारचें लहान अथवा मोठें पाप करणार नाहीं, अथवा पापाच्या छायेंतसुद्धां जाणार नाहीं. ' मंत्रांत सांगितलें आहे कीं ' पापाची सावलीसुद्धा पडूं देणार नाहीं ' स्वतः पाप करणें आणि पापाच्याजवळ जाणें या दोन्ही अगदीं वेगळ्या गोष्टी आहेत. स्वतः पाप करण्यापेक्षां पापाच्या जवळ जाणें सोपें, सहज होणारें कार्य आहे. मनुष्य प्रथम पापकर्माचें वर्णन ऐकतो त्यानंतर दुसऱ्यांनीं केलेलीं पापकर्में पहातो, त्यानंतर तसें पापाचरण करण्यास तो प्रवृत्त होतो. अशी या पापाची परंपरा आहे. एवढ्यासाठींच मंत्रभागांत उपदेश आहे कीं मनुष्यानें पापकर्माच्या जवळ सुद्धां न जावें. वाचकांनीं या अमूल्य उपदेशाचें महत्त्व जाणावें आणि तदनुसार स्वतःचें आचरण सुधारून उन्नतीच्या मार्गानें पुढें जावें. अशा प्रकारें निष्पाप होऊन ईश्वराची प्रार्थना करावी कीं—

ईश प्रार्थना

१७. इमं यज्ञं निहवे शृणोतु । (मं. ११)

' या उपासनमय स्तुतीस, प्रार्थनामय यज्ञास ईश्वर ऐको. ' म्हणजे मीं जी प्रार्थना करतों ती परमेश्वरानें ऐकावी. येथें वाचकानें लक्षांत ठेवावें कीं जे वर सांगितल्याप्रमाणें निष्पाप होऊन शुद्धाचरणी होऊन उन्नतीच्या मार्गें जाऊं इच्छितात त्यांचीच प्रार्थना परमेश्वर ऐकतो. अशा प्रकारच्या मनुष्यांस देवतांचें साहाय्य अवश्य मिळतें. देवतांच्या सहाय्याचे तेच अधिकारी आहेत. अशा वेळीं उपासकांत किती श्रद्धा असते तें खालील मंत्रभागांत पहा. कारण असें पहा, प्रत्येक मनुष्य यशस्वी होण्यास परमेश्वराचें सहाय्य इच्छित असतो. आणि प्रार्थना सुद्धां करीत असतो. पण पूर्वोक्त प्रकारें शुद्ध, पवित्र झालेल्या मनुष्यासच देवांचें सहाय्य मिळतें.

देवांचें सहाय्य

बहुधा मनुष्य संकटसमयीं देवतांचे सहाय्य इच्छितो. जर पूर्वोक्त प्रकारें आत्मशुद्धि करून देवतांचें सहाय्य मनुष्य इच्छील तर त्याला निःसंशय मदत मिळेल. याविषयीं या सूक्तांचें कथन काय आहे तें पहा—

१८. विहवे सर्वे देवा मम सन्तु । (मं. ३)
१९. इह विश्वे देवाः मा अभिरक्षन्तु । (मं. ४)
२०. विश्वे देवासः इह मादयध्वम् । (मं. ६)
२१. धाता विधाता भुवनस्य यस्पतिः अन्ये च देवाः निर्ऋथात् पान्तु । (मं. ७)
२२ अस्मिन् हवे पुरुहूतः महिषः पुरुक्षु शर्म यच्छतु । (मं. ८)
२३. अस्माकं मेदी अभूः । (मं. ११)
२४. देवीः षट् उर्वीः नः उरु कृणोतु । (मं. ६)
२५. परेषां मन्युं प्रतिनुदन् नः विश्वतः परिपाहि । (मं. २)

' युद्धाचे वेळीं सर्व देव माझे सहाय्यक होवोत. सर्व देव माझें रक्षण करोत. सर्व देव माझा आनंद येथें वाढवोत. धाता, विधाता, भुवनपति, आणि अन्य देव दुःखापासून आमचें रक्षण करोत. या यज्ञाचे वेळीं महान् प्रशंसित प्रभु पुष्कळ भोगपूर्ण सुख आम्हांस देवो. प्रभू आमचा सहाय्यक होवो, दिव्य सहा दिशा आमच्यासाठीं मोठें विस्तृत कार्यक्षेत्र निर्माण करोत.

शत्रूंच्या क्रोधास दूर करून सर्व प्रकारें आमचें रक्षण करोत.'

शत्रूस दूर करण्याविषयीं या इच्छा मनुष्यमात्राच्या मनांत नेहमीं असतात. विजय प्राप्त करूं इच्छिणाऱ्यानें सुद्धां स्वतःच्या मनांत याच इच्छा धारण केल्या पाहिजेत. वर दिलेल्या वाक्यांतील शेवटच्या वाक्यांत 'शत्रूचा क्रोध दूर करण्याची प्रार्थना आहे. ही प्रार्थना विशेष महत्त्वाची आहे. 'शत्रूचा क्रोध दूर करून त्यांची शुद्धि कर.' असा आशय या प्रार्थनेंत आहे. शत्रूचा नाश करण्यापेक्षां त्याचें दुष्टत्व नाहींसें होऊन आणि क्रोध जाऊन जर तो भला मनुष्य होईल तर तें फारच बरें. या दृष्टिकोनानें हा उपदेश मनन करण्यासारखा आहे. शत्रूचे दोष दूर करून त्यास शुद्ध करून घेण्याचे प्रथम प्रयत्न करणें हें वैदिक धर्मीयांस उचित होय. जर तसें होऊं शकलें नाहीं तरच त्यांना दूर करावें अथवा त्यांचा नाश करावा. असा नीतीचा उत्तम नियम या वेद मंत्रानें दाखविला आहे.

राज्यव्यवस्था

स्वतःच्या उत्तम राज्य व्यवस्थेमुळें सुद्धां विजयी होतां येतें आणि राज्य शासनाच्या अव्यवस्थेनें हानी होते. त्यासाठीं स्वतःच्या शासक राजाचे गुणधर्म कसे असले पाहिजेत त्याविषयीं १० व्या मंत्रांतील वाक्य मननपूर्वक पहाण्या योग्य आहे—

१६. देवाः चेत्तारं उग्रं अधिराजं अक्रत। (मं. १०)

'सर्व देव आमच्यासाठीं चेतना देणारा शूरवीर राजा बनावोत.' अर्थात् आमचा राजा प्रजेला चेतना देवो, नवजीवन संचारित करो आणि स्वतः प्रतापी, तेजस्वी आणि शूर वीर होवो. राष्ट्रांत तेजस्वितेची स्फूर्ति उत्पन्न करणारा राजा असावा. प्रजेचें तेज कमी करणारा राजा कधींहि गादीवर न बसावा. हा उपदेश येथें प्राप्त होतो. विजयप्राप्तीच्या मार्गांत पुढें जाणाऱ्यासाठीं या उपदेशाचें महत्त्व सहज ध्यानीं येऊं शकेल.

शारीरिक बळ

विजयप्राप्तीसाठीं शारीरिक बळाची वृद्धि आणि मानसिक तसेंच बौद्धिक शक्तीचा विकास करणें अत्यन्त आवश्यक आहे. याविषयीं खालील मंत्रभाग पहा—

२७. तन्व पुषेम। (मं. १)
२८. तन्वा अरिष्टाः सुवीराः स्याम (मं. ५)
२९. नः तन्वे प्रजायै पुष्टम्। (मं. ७)
३०. तनूभिः प्रजया मा ह्रासिषम् (मं. ७)
३१. नः मा रीरिषः। (मं. ८)

आमच्या शारीरिक शक्तीला वाढवून आम्हीं पुष्ट करूं. शरीरानें दुर्बळ न होतां आम्हीं उत्तम वीर होऊं. आमचीं शरीरें आणि संतति हीन आणि दीन न होवो. आम्हीं दुर्बल न व्हावें.' या प्रमाणें शारीरिक बळ आणि पुष्टि वाढविण्याची सूचना देणारे मंत्रभाग या सूक्तांत वर प्रमाणें आहेत. वाचकांनीं या सर्व मंत्रभागांचें क्रमपूर्वक मनन करावें. म्हणजे या सूक्तांत विजयप्राप्तीसाठीं साधनें कशा प्रकारचीं सांगितली आहेत हें त्यांच्या ध्यानीं येईल. व्यक्ति, समाज, आणि राष्ट्र यांची विजय साधनें या सूक्तांत सांगण्यांत आलीं आहेत त्याविषयीं उपदेश वाचक मनांत धारण करोत. आणि या उपदेशापासून अनुकूल आचरण ठेवतील तर तो विजयाचा मार्ग त्यांना सुद्धां खुला होऊन ते भयरहित होतील.

विजयी स्त्रीचा पराक्रम

कांड १, सूक्त २७

(ऋषिः – अथर्वा। देवता – इन्द्राणीः)

अमूः पारे पृदाक्वस्त्रिषप्ता निर्जरायवः।
तासां जरायुभिर्वयमक्ष्या३वपि व्ययामस्यघायोः परिपन्थिनः ॥ १ ॥

अर्थ— (अमूः पारे) पलिकडच्या काठाहून (निर्जरायवः) पाण्याच्या प्रवाहांतून निघालेली, (त्रि सप्ताः) तीन वेळ सात (पृदाकः) नागिणीप्रमाणें सेना आहेत (तासां) त्यांच्या (जरायुभिः) झांकणांनीं (वयं) आम्ही (अघ-आयोः परिपंथिनः) पापी दुष्ट शत्रूंचे (अक्ष्यौ) दोन्ही डोळे (अपि व्ययामसि) झांकून टाकतों. (१)

भावार्थ— कात टाकून बाहेर पडलेल्या नागिणीप्रमाणें शत्रुसेना तीन गुणिले सात म्हणजे एकवीस विभागांनीं युद्धासाठीं बाहेर पडली आहे. तिच्या हालचालीनें आम्हीं सर्व पापी दुष्टांची दृष्टि बंद करून टाकतों. (१)

विषूच्येतु कृन्तती पिनाकमिव बिभ्रती । विष्वक्पुनर्भुवा मनोऽसमृद्धा अघायवः ॥ २ ॥
न बहवः समशकन्नार्भका अभि दाधृषुः । वेणोरद्गा इवाभितोऽसमृद्धा अघायवः ॥ ३ ॥
प्रेतं पादौ प्र स्फुरतं वहतं पृणतो गृहान् । इन्द्राण्येतु प्रथमाजीतामुषिता पुरः ॥ ४ ॥

अर्थ— (पिनाकं इव बिभ्रती) धनुष्य धारण करणारी आणि शत्रूंना (कृन्तती) कापून टाकणारी वीर सेना (विषुची एतु) चारी बाजूंनीं पुढें होवो. त्यामुळें (पुनर्भुवाः) एकत्रित झालेल्या शत्रु सेनेचें (मनः विष्वक्) मन इकडे तिकडे भ्रमण करील आणि त्यामुळें (अघायवः) पापी शत्रु (असमृद्धाः) निर्धन होतील. (२) (बहवः न समशकन्) पुष्कळ शत्रु त्याच्या समोर टिकूं शकत नाहींत. त्यानंतर (अर्भकाः) जीं बालकें आहेत तीं (न अभि दाधृषुः) धीर धरूं शकत नाहींत. (वेणोः अद्गाः इव) कळकाच्या अंकुराप्रमाणें (अभितः) चारी बाजूंनीं (अघायवः) पापी लोक (असमृद्धाः) निर्धन होवोत. (३) हे (पादौ) दोन्ही पाय हो ! (प्रेतं) पुढें व्हा. (प्रस्फुरतं) पुष्कळ स्फूर्ति बाळगा. (पृणतः गृहान् वहतं) संतोष देणाऱ्या घराकडे आम्हांस घेऊन जा. (अजीता) न जिंकली गेलेली (अ-मुषिता) न लुटली गेलेली आणि (प्रथमा) प्रमुख बनलेली (इन्द्राणी) महाराणी (पुरः एतु) सर्वांच्या पुढें जावो. (४)

भावार्थ— शस्त्रें धारण करणारी आणि शत्रूला कापून काढणारी वीरांची सेना चारी दिशेनें पुढें जावो. त्यामुळें शत्रुसेनेचें मन अस्थिर होवो आणि पापी शत्रु निर्धन होवोत. (२) अशा शूरवीर सेनेसमोर जर पुष्कळ शत्रु उभे राहूं शकत नाहींत तर निर्बल बाळकें कशी टिकूं शकतील ? कळकाच्या कोंवळ्या आणि निर्बल अंकुराप्रमाणें, चारी बाजूंनीं शत्रुसेना निर्धन होऊन नाश पावो. (३) विजयी, अपराजित आणि न लुटली गेलेली वीर स्त्री महाराणी अथवा अग्रणी स्त्री पुढें होवो. बाकी लोकांनीं तिच्या पाठीमागून जावें दरेक शूरवीराचें पाऊल पुढें पडो. शरीरांतील स्फूर्ति वाढो आणि सर्व मनुष्यें संतोष वाढविणाऱ्यांच्या घरापर्यंत पोहोचोत. (४)

विजयी स्त्रीचा पराक्रम

इन्द्राणी

' इंद्र ' शब्द राजाचा वाचक आहे. जसें नरेंद्र (मनुष्यांचा राजा), मृगेंद्र पशूंचा राजा, खगेंद्र (पक्ष्यांचा राजा) इत्यादि केवळ इन्द्र शब्दही राजाचाच वाचक आहे. आणि ' इन्द्राणी ' शब्द, ' इंद्राची राणी, राजाची राणी, महाराणी, ' चा वाचक आहे. ही इन्द्राणी सेनेची प्रेरक देवी आहे. ही गोष्ट तैत्तिरीय संहितेंत सांगितली आहे. पहा—

इन्द्राणी वै सेनाया देवता । (तै. सं. २।२।८।१)

' इन्द्राणी सेनेची देवता आहे, ' कारण तिच्या प्रेरणेनें सैनिक स्वतःचा पराक्रम दाखवितात आणि विजय प्राप्त करतात.

वीर स्त्री

' इन्द्राणी म्हणजे राणी सेनेची प्रमुख होऊन सेनेस प्रोत्साहन देत पुढें होवो. प्रत्येक सैनिकाचें पाऊल पुढें पडो. प्रत्येकाचें मन उत्साहानें युक्त होवो. संतोष वाढविणाऱ्यांच्या घरीं लोक जावोत. ' परंतु जे लोक संतोष संपुष्टांत आणतात, उत्साहाचा नाश करणारे आणि मानसिक आकांक्षांचा घात करणारे असतील त्यांच्या जवळ कोणीं जाऊं नये. कारण असे लोक स्वतःच्या हीन भावनेनें इतर मनुष्यांस निरुत्साहित करतात. हा चौथ्या मंत्राचा भाव विचार करण्यासारखा आहे.

ज्या राष्ट्रांतील स्त्रिया याप्रमाणें शूर असतील तें राष्ट्र नेहमीं विजयी होईल यांत काय संशय ? ज्या देशांतील स्त्रिया सेनेला प्रेरणा देऊं शकतात आणि सेनेचें नेतृत्व करूं शकतात त्या राष्ट्रांतील पुरुष किती शूर, कसे बहादूर असतील बरें ! अशा शूरवीर रमणींनां कोणी हीन मनाचे पुरुष धमकाऊं-दबकाऊं शकतील काय ? आणि अशा वीर स्त्रियांची बेअब्रू कोणीं कोठें करूं शकेल काय ? म्हणून आत्मसंमान सुरक्षित राखूं इच्छिणाऱ्यांना हेंच योग्य कीं त्यांनीं स्वतः तर शूरवीर मर्द व्हावेंच, परंतु स्वतः-

च्या स्त्रियांनाही असें शिक्षण द्यावें की त्यासुद्धां शूरवीर धाडसी होऊन स्वतःच्या सन्मानाचें रक्षण करूं शकतील.

' हातांत शस्त्र धारण करीत, शत्रूस कापीत, मारीत पुढें जाणारी, जिचा वेग पाहून शत्रूचें मन उत्साहरहित व्हावें आणि शत्रु निर्धन म्हणजे कष्टप्रद अवस्थेस पोहोंचावेत.' हा दुसऱ्या मंत्राचा भावार्थहि चौथ्या मंत्राच्या अर्थासह पहाण्यासारखा आहे. कारण हा मंत्रसुद्धां वीरस्त्रीच्या पराक्रमाचें वर्णन करीत आहे. सेनेचें वर्णन करून वीरस्त्रीचें सुद्धां वर्णन तो करीत आहे. (मं. २)

वीर स्त्रियांना कांत टाकून बाहेर पडलेल्या नागिणीची उपमा या सूक्तांत दिलेली आहे. नागीण स्वभावतःच उग्र असते. आणि मोठ्या स्फूर्तीनें शत्रूवर हल्ला करते. परंतु ती कांत टाकून बाहेर येते त्यावेळीं तर ती फारच तेजस्वी आणि अत्यंत चपल असते कारण त्यावेळीं ती नव्या जीवनरसानें परिपूर्ण असते. वीर स्त्री अशीच असते. स्त्री स्वभावतःच चपल असते पण जेव्हां ती एकाद्या कामासाठीं अथवा राष्ट्रावरील आपत्तीनें प्रेरित होऊन, आत्मसन्मानाच्या रक्षणासाठीं स्वतःची अंतर्गृहरूपी कांत टाकून मैदानांत उतरते, तेव्हां तिच्या तेजस्वितेचें काय वर्णन करावें? त्यावेळीं ती खरोखरच नागिणीप्रमाणें चमकत, विजेप्रमाणें तेजस्वी होऊन वीरसेनेला उत्तेजन देते, उत्साहित करते, त्यावेळचा तिचा उत्साह कल्पनेनें वीरपुरुषच समजूं शकतील,' तिच्या तेजानें शत्रूचे डोळे निस्तेज होतात, दिपून जातात आणि तिचे सर्व शत्रु निःसत्त्व होतात. (मं. १)

जेथें अशा समर्थ वीरांगना आहेत तेथें त्यांच्यासमोर शत्रु टिकूंच शकत नाहीं, मग अल्प शक्तीच्या निर्बल, मनुष्यांची गोष्टच काय सांगावी! ' गवताच्या काड्यांप्रमाणें त्यांचा नाश होतो. (मं. ३)

या सूक्तांत कित्येक शत्रुवाचक शब्द आले आहेत त्यांचा विचार करणें आवश्यक आहे—

शत्रुवाचक शब्द

१. **अघायु**- स्वतःचें सर्व जीवन ज्यानें पापें करण्यांत घालविलें.
२. **परिपन्थिन्**- वाईट रस्त्यानें जाणारा कुमार्गी.

हे पापी लोक आहेत. आणि त्यांच्या खराब आचरणामुळेंच, त्यांचें शत्रुत्व करणें योग्य आहे. ' **असमृद्धाः अघायवः** ' हा शब्दप्रयोग या सूक्तांत दोनदां आला आहे. ' पापी माणसें समृद्धिरहित असतात ' असा त्याचा अर्थ आहे. पापानें कधीं समृद्धि होणार नाहीं. पापानें मनुष्याचें पतनच होतें. असा भाव त्यांत पहाण्यासारखा आहे. जीं मनुष्यें पापकर्मानें धनाढ्य होऊं इच्छितात, त्यांनीं हा मंत्र अवश्य पहाण्यासारखा आहे. हा मंत्र असा उपदेश देत आहे कीं, ' पापी कधींहि उन्नति पावूं शकत नाहीं. जर कोणत्याहि कारणानें अथवा स्थितींत तो धनवान झाला तर त्याचें तें धन त्याच्या नाशाचें मूळ अवश्य होतें. यांत कांहीं संदेह नाहीं. तात्पर्य परिणामतः एवढेंच स्पष्ट समजावयाचें कीं पापी लोकांचा अवश्य नाश होतो.

तीन वेळ सात

सेनेचे एकवीस विभाग असतात. रथी, गजारूढ, अश्वारूढ, पदाती, दुर्गरक्षक, जलसेना आणि कूटयोद्धे, अशा सात प्रकारचे सैनिक असतात. प्रत्येकांत अधिकारी, प्रत्यक्ष युद्ध करणारे आणि सहाय्यक असे तीन भेद असतात म्हणून सेनेच्या एकवीस विभागांचा उल्लेख तीन वेळ सात असा वेदामध्यें केला आहे.

निर्जरायु

' जरायु ' शब्दाचा अर्थ पातळ जाळी असा आहे. परंतु येथें तो श्लेषार्थानें वापरला आहे. त्याचा अर्थ **(जरा+आयु)** वृद्धावस्था, जीर्णावस्था, थकवा आणि आयुष्य. (**निः+जरा+आयुः**) म्हणजे जे जीर्णता, थकवा, वृद्धावस्था अथवा आयुष्याची परवा न करणारे असतात, अर्थात् जे स्वतः जीवनमरणाची परवा केल्यावांचून लढतात, जे स्वतःची अवस्था अथवा सुखदुःख याची पर्वा केल्यावांचून स्वतःच्या यशासाठीं लढत रहातात, त्यांना ' निर्जरायु ' म्हणजे जरा आणि आयुष्याच्या विचारापासून मुक्त असें म्हणतात. जीवनाची आशा सोडून लढणारे सैनिक.

या सूक्तांतील मंत्र वीर स्त्री तसेंच सेनेविषयींचे आहेत. त्यामुळें हे मंत्र विशेष मननपूर्वक वाचण्यासारखे आहेत. तसेंच यांत कित्येक शब्द द्वेष असा अर्थ दाखविणारे सुद्धां आहेत, जे वर दिलेच आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करून जर वाचक या सूक्ताचा अभ्यास करतील तर त्यांस निःसंशय पुष्कळच बोध मिळेल.

वाचकांनीं स्वतःच्या राष्ट्रांत वीर स्त्रिया आणि वीर पुरुष उत्पन्न करावेत आणि स्वतःचें यश वृद्धिंगत करावें.

हें सूक्त ' **स्वस्त्ययनगणां** ' तील आहे. म्हणून त्या गणांतील अन्य सूक्तांबरोबर या सूक्ताचा विचार वाचकांनीं करावा.

कर्म आणि विजय

कांड ७, सूक्त ५०

(ऋषिः – अंगिराः । देवता – इन्द्रः)

यथा वृक्षमशनिर्विश्वाहा हन्त्यप्रति । एवाहमद्य कितवानक्षैर्बध्यासमप्रति ॥ १ ॥
तुराणामतुराणां विशामवर्जुषीणाम् । समैतु विश्वतो भगो अन्तर्हस्तं कृतं मम ॥ २ ॥
ईडे अग्निं स्वावसुं नमोभिरिह प्रसक्तो वि चयन्कृतं नः ।
रथैरिव प्र भरे वाजयद्भिः प्रदक्षिणं मरुतां स्तोममृध्याम् ॥ ३ ॥
वयं जयेम त्वया युजा वृतमस्माकमंशमुदवा भरेभरे ।
अस्मभ्यमिन्द्र वरीयः सुगं कृधि प्र शत्रूणां मघवन्वृष्ण्या रुज ॥ ४ ॥

अर्थ— (यथा अशनिः) ज्याप्रमाणें विद्युत् (वृक्षं विश्वाहा अप्रति हन्ति) वृक्षांचा नेहमीं अवर्णनीय रीतीनें नाश करते (एवं अहं अद्य अक्षैः कितवान्) त्याप्रमाणें मीं आज फाशांनीं जुगाऱ्यांना (अप्रति वध्यासं) अमाप रीतीनें मारीन. (१)

(तुराणां अतुराणां) त्वरा करणाऱ्या उत्साही तसेंच, (अवर्जुषीणां विशां) दुष्टतेस अटकाव करणाऱ्या प्रजेचें, (भगः विश्वतः समैतु) ऐश्वर्य सर्व बाजूंनीं एकत्रित होऊन तें (मम अन्तर्हस्तं कृतं) माझ्या हातीं असावें असें होवो. (२)

(स्वावसुं अग्निं नमोभिः ईडे) स्वतःच्या धनानें युक्त प्रकाशमान् देवाची नमस्कारांच्या योगें मीं पूजा करतों (इह प्रसक्तः नः कृतं विचयत्) येथें राहिलेला देव आमच्या कित्येक कृत्यांना संग्रहीत करो, (वाजयद्भिः रथैः इव प्रभरे) अन्नानें भरलेल्या रथांनीं हें स्थान भरून टाको त्यानंतर मीं (मरुतां प्रदक्षिणं स्तोमं ऋध्यां) मरुतांचें श्रेष्ठ स्तोत्र म्हणतों. (३)

(वयं त्वया युजा वृतं जयेम) आम्हीं तुझ्या सहाय्यानें वेढणाऱ्या शत्रूला जिंकूं. (भरे भरे अस्माकं अंशं उद् अव) प्रत्येक युद्धांत आमच्या कार्यभागाचें उत्कृष्ट रक्षण कर. हे इंद्रा ! (अस्मभ्यं वरीयः सुगं कृधि) आम्हांला धन सहज प्राप्त होईल असें कर. हे (मघवन्) धनवान् इंद्रा ! (शत्रूणां वृष्ण्या प्ररुज) शत्रूंच्या बळास तोडून टाक. (४)

भावार्थ-- ज्याप्रमाणें विजेनें वृक्षांचा नाश होतो त्याप्रमाणें मी फाशांनीं जुगाऱ्यांचा नाश करतों. (१)

कोणतेंहि कार्य त्वरेनें समाप्त करणारे अथवा आळसानें विलंबानें समाप्त करणारे अथवा दुष्टतेला दूर करणारे प्रजाजन असतील त्या सर्वांचें धन एके ठिकाणीं एकत्रित होवो आणि तें त्यांचें धनहि माझ्या हातांत असलेल्या धनासारखें माझ्याकडे राहो. (२)

मीं ईश्वराची भक्ति आणि उपासना करतों. हा देव आमच्या कार्याचें निरीक्षण करो. ज्याप्रमाणें गाड्यांत भरून धन एकत्रित करण्यांत येते त्याप्रमाणें आमच्या सर्व सत्कर्मांचें फळ एकत्रित होवो. आम्ही उत्तम स्तोत्रांचें गान करतां करतां आनंदानें राहूं. (३)

ईश्वराच्या मदतीनें आम्हीं सर्व शत्रूंना जिंकून घेऊं. ईश्वराच्या कृपेनें सर्व युद्धांत आमचे प्रयत्न सुरक्षित राहोत. हे देवा ! आमच्या शत्रूंचे बळ कमी कर आणि आम्हांला वरिष्ठ स्थान प्राप्त होवो. (४)

अजैषं त्वा संलिखितमजैषमुत संरुधम् । अविं वृको यथा मथदेवा मथ्नामि ते कृतम् ॥ ५ ॥
उत प्रहामतिदीवा जयति कृतमिव श्वघ्नी वि चिनोति काले ।
यो देवकामो न धनं रुणद्धि समित्तं रायः सृजति स्वधाभिः ॥ ६ ॥
गोभिष्टरेमामतिं दुरेवां यवेन वा क्षुधं पुरुहूत विश्वे ।
वयं राजसु प्रथमा धनान्यरिष्टासो वृजनीभिर्जयेम ॥ ७ ॥
कृतं मे दक्षिणे हस्ते जयो मे सव्य आहितः । गोजिद्भूयासमश्वजिद्धनंजयो हिरण्यजित् ॥ ८ ॥
अक्षाः फलवतीं द्युवं दत्त गां क्षीरिणीमिव । सं मा कृतस्य धारया धनुः स्नाव्नेव नह्यत ॥ ९ ॥

अर्थ-(**सं लिखितं त्वा अजैषं**) वाटेल त्याप्रकारें कुरतडणाऱ्या तुझ्या शत्रूला मीं जिंकतो. (**उत संरुधं अजैषं**) आणि अवरोध करणाऱ्या शत्रूला सुद्धां जिंकतो. (**यथा अविं वृकः मथत्**) ज्याप्रमाणें मेंढ्याला लांडगा खाऊन, फाडून टाकतो, (**एवा ते कृतं मथ्नामि**) तसा तुझ्या केलेल्या शत्रुत्वाच्या कार्यास मीं विस्कटून टाकतों. (६)

(**उत अतिदीवा प्रहां जयति**) आणि अत्यंत विजय इच्छिणारा वीर प्रहार करणाऱ्याला सुद्धां जिंकून घेतो. (**श्वघ्नी [स्व-घ्नी] काले कृतं इव विचिनोति**) स्वतःच्या धनाचा नाश करणारा मूढ समयानुसार स्वतःच केलेल्या कर्मांची फळें विशेष रीतीनें प्राप्त करतो. (**यः देवकामः धनं न रुणद्धि**) जो देवांची तृप्ति करणारें धन फक्त स्वतः-साठीं ठेवीत नाहीं (**ते इत् रायः स्वधाभिः संसृजति**) त्याला सर्व धन स्वतःच्या धारकशक्तीनें उत्तम प्रकारें प्राप्त होतें. (६)

(**दुरेवां अमतिं गोभिः तरेम**) दुर्गतिरूप कुमतीला गायीच्या मदतीनें पार करून जाऊं. हे (**पुरुहूत**) पुष्कळांनीं स्तविलेल्या देवा ! (**विश्वे यवेन वा क्षुधं**) आणि आम्हीं सर्व आमची भूक जवांनीं पुरी करूं. (**वयं राजसु प्रथमाः अरिष्टासः**) आम्हीं सर्व राजांत श्रेष्ठ आणि उत्कृष्ट होऊन विनाशास प्राप्त न होतां (**वृजनीभिः धनानि जयेम**) स्वतःच्या शक्तीनें धन जिंकूं. (७)

(**कृतं मे दक्षिणे हस्ते**) पुरुषार्थ माझ्या उजव्या हातांत आणि (**मे सव्ये जयः आहितः**) माझ्या डाव्या हातांत विजय राहिलेला आहे. म्हणून मीं (**अतः गोजित् अश्वजित्**) गाय आणि घोड्यांचा विजेता (**हिरण्यजित् धनंजयः भूयासं**) सुवर्ण आणि धनाचा विजेता व्हावें (८)

हे (**अक्षाः**) ज्ञान आणि विज्ञान ! (**क्षीरीणीं गां इव**) दूध देणाऱ्या गायीप्रमाणें (**फलवतीं दत्त**) फलवती विजिगीषा आम्हांस द्या. (**स्नाव्न धनुः इव**) ज्याप्रमाणें दोरीनें धनुष्य ओढण्यांत येतें त्याप्रमाणें (**कृतस्य धारया मा संनह्यत**) मला कृतकर्माच्या फलांच्या प्रवाहानें युक्त करा. (९)

भावार्थ- विजयाची इच्छा करणारा वीर घातक शत्रूंना जिंकून घेतो. आत्मघात करणारा मूढ मनुष्य स्वतःच्या केलेल्या कर्माचें फळ भोगतो. जो मनुष्य देवकार्यासाठीं स्वतःचें धन समर्पण करतो आणि अशावेळीं स्वतःजवळ संग्रहून ठेवीत नाहीं त्याला विशेष धन प्राप्त होतें. (६)

दुर्गति आणि कुमतीला गायीचें रक्षण करून पळवून लावूं त्याचप्रमाणें जव खाऊन भुकेला दूर करूं. आणि स्वशक्तीनें यथेच्छ धन कमावूं. (७)

माझ्या उजव्या हातांत पुरुषार्थ आहे आणि डाव्या हातांत विजय आहे. त्यामुळें आम्हीं गायी घोडे सुवर्ण आणि धन प्राप्त करूं. (८)

ज्ञानविज्ञान माझे डोळे होवोत. त्यांतून पुष्कळ दूध देणाऱ्या गायीप्रमाणें फल देणारी विजयेच्छा आम्हांमध्यें स्थिर राहो. ज्याप्रमाणें धनुष्याचीं दोनीं टोकें दोरीनें जोडलेलीं असतात त्याप्रमाणें माझा पुरुषार्थ मला फळानें युक्त करो. (९)

कर्म आणि विजय

पुरुषार्थ आणि विजय

या सूक्ताचा अष्टम मंत्र प्रत्येक मनुष्यानें ध्यानीं ठेवण्यासारखा आहे, त्याचा पाठ असा आहे.

कृतं मे दक्षिणे हस्ते जयो मे सव्य आहितः ।
गोजित् भूयासम् अश्वजित् धनंजयो हिरण्य-जित् ॥ ८ ॥

' पुरुषार्थ माझ्या उजव्या हातांत आणि विजय डाव्या हातांत आहे त्यामुळें मीं गाय घोडा, धन, आणि सुवर्ण जिंकून प्राप्त करणारा होईन. '

मनुष्यानें स्वतःच्या मनांत असेच विचार धारण केले पाहिजेत आणि त्यानें असे प्रयत्न केले पाहिजेत कीं स्वप्रयत्नानें आपला विजय चोहोंकडे व्हावा. स्वतःचा विजय कोणत्या बाह्य प्रयत्नानीं किंवा साधनांनीं होत नाहीं. परंतु तो स्वतःच्या आंतरिक बळानें प्राप्त होतो. त्यासाठीं स्वतःमध्यें एवढें बळ वाढविलें पाहिजे व त्यासाठीं प्रयत्न करणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे.

' कृत, त्रेता, द्वापार आणि कली अशीं चार प्रकारचीं मनुष्याची कर्में असतात. त्यांचीं लक्षणें अशीं आहेत.

कलिः शयानो भवति संजिहानस्तु द्वापरः ।
उत्तिष्ठंस्त्रेता भवति कृतं संपद्यते चरन् ।
(ऐ. ब्रा. ७।१६)

' झोंपून जाणें हा कलि आहे, निद्रेचा त्याग हा द्वापर आहे, उठून तयार होणें हें त्रेतायुगाचें लक्षण आहे आणि कार्य करणें तें कृतयुग होय. ' म्हणजे आळस अथवा सुस्ति हें कलियुगाचें लक्षण आहे. तसेंच पूर्ण पुरुषार्थ हें कृतयुग होय. त्या दोघांची मधली स्थिति ते द्वापर आणि त्रेतायुग आहे. कृत, त्रेता, द्वापर आणि कलि हीं पुरुषार्थाचीं चार रूपें सुचविणारी नांवें आहेत. जो पुरुष प्रयत्न करून कृतनामक पुरुषार्थ स्वतःचे हातीं घेतो तो निश्चयेंकरून दुसऱ्या हातानें विजय मिळवितो. ' कृत ' पुरुषार्थ एक महान् जलप्रवाहाची प्रचंडधारा आहे. त्याधारेनें निःसंदेह विजय मिळतोच--

कृतस्य धारया मा सं नह्यत् । (मं. ९)

' कृत नांवाच्या श्रेष्ठ प्रवाहधारेनें मीं उद्दिष्ट स्थानीं पोहोंचेन.' कृत नांवाच्या पुरुषार्थाचें लक्षण काय आहे, कृताबरोबर, ' सत्य, अहिंसा, प्रबळ पुरुषार्थ शक्ति, उद्यम, सरलता, धैर्य इत्यादि सात्विक गुण हमेशा एकत्रित राहिलेले असतात. कृतयुगासच सत्ययुगहि म्हणतात. सत्ययुगांतील मनुष्यांचे जे गुण पुराणांत वर्णिले आहेत तसेच सात्विक शुभगुण, या कृत नांवाच्या पुरुषार्थाबरोबर असतात, असें येथें समजलें पाहिजे. तरच कृत पुरुषार्थाचें महत्त्व ध्यानीं येईल.

' कलि ' हा कांहीं कोणी पुरुषार्थ नाहींच. उलटपक्षीं हा शब्द पुरुषार्थहीनत्वाचा द्योतक आहे. जेथें कांहीं पुरुषार्थ नाहीं तेथें कलि रहातो. आपापसांतील भांडणें, अनाचार, अधर्म, अनीति, अधःपात वगैरेचें आचरण कलीबरोबर असतें. त्यानें मनुष्याची अधोगति होते. म्हणूनच मनुष्यानें त्याच्यापासून स्वतःस वांचविलें पाहिजे. मधले दोन पुरुषार्थ हे या दोन स्थितींच्यामध्यें आलेले आहेत.

जुगाऱ्यांस दूर करणें

आपल्या समाजांतून जुगाऱ्यांस दूर करण्याविषयीं पहिला मंत्र मोठा बोध देत आहे. पहा--

यथा वृक्षमशनिर्विश्वाहा हन्त्यप्रति ।
एवाहमद्य कितवानक्षैर्बध्यासमप्रति ॥ (मं. १)

' ज्याप्रमाणें आकाशांतील वीज वृक्षांचा नाश करते त्याच रीतीनें मीं फांशासह जुगाऱ्यांना आपल्या समाजांतून दूर करतों. ' म्हणजे समाजांत एकाहि जुगाऱ्यास राहूं देणार नाहीं. समाजांतून जुगाऱ्यांस दूर करणें हेंच त्यांना वध करण्यासारखें आहे. वध म्हणजे फक्त शरीरनाशानेंच होतो आणि इतर कोणत्याहि प्रकारें होऊं शकत नाहीं असें नाहीं. समाजांत जों पावेतों जुगारी रहातील तोपर्यंत पुरुषार्थाचें सामर्थ्य समाजांत वाढणार नाहीं, कारण थोड्या प्रयत्नानीं पुष्कळ धनवान् होण्याचा मार्ग जुगारानेंच वाढतो, म्हणून समाजानें पुरुषार्थी व्हावें म्हणून समाजांत जुगार रहाताच कामा नये अशी व्यवस्था व्हावयास पाहिजे.

तीन प्रकारचे लोक

समाजांत तीन प्रकारचे लोक असतात. ' **तुर, अतुर** आणि **अवर्जुष** ' म्हणजे त्वरेनें कार्य करणारे, घाईनें कार्य करून कार्य बिघडविणारे, फार घाई करणारे, त्यांना पुरुषार्थी म्हणतां येणार नाहीं. ते पुरुषार्थास योग्य नाहींतच. कारण ते हातीं घेतलेलें कार्य घाईमुळें बिघडवून टाकतात. दुसरा प्रकार ' **अतुर** ' म्हणजे

शिथिल प्रकृतीचीं माणसें. अथवा सुस्त, आळशी. हीं मनुष्यें आळसामुळें कार्य बिघडवितात. म्हणून तेहि पुरुषार्थासाठीं निरुपयोगीच. तिसरा प्रकार **' अवर्जुष '** म्हणजे दूर करण्या-लायक दोषांनांहि जे दूर करीत नाहींत. जे दुष्टतेस स्वतःजवळ ठेवतात. असे लोकहि कधीं पुरुषार्थ करून स्वतःची उन्नति साधूं शकत नाहींत. या तीनहि प्रकारचे लोक नेहमीं हीनावस्थेंत रहा-तात. त्यांच्या उन्नतीची आशाच नाहीं. त्यासाठीं मंत्रांत म्हटलें आहे—

तुराणामतुराणां विशामवर्जुषीणाम् ।
समैतु विश्वतो भगो अन्तर्हस्तं कृतं मम ॥ (मं. २)

' घाई करणारा, सुस्तींत रहाणारा, आणि दुष्टतेस दूर न कर-णारा असे जे तीन प्रकारचे लोक आहेत ते स्वतःची उन्नति साधूं शकत नाहींत. ते नेहमीं दुर्भाग्यांतच असतात व रहातील. म्हणून त्यांच्या जवळ असणारें धन माझ्याजवळ राहिलें पाहिजे म्हणून तें माझ्या हातांत येऊन राहो. कारण कीं मी पुरुषार्थ करतो. ' याचा आशय असा कीं पूर्वोक्त तीन दोषांनीयुक्त माणसें नेहमीं दुर्भाग्यांतच रहातील, आणि विश्वाच्या धनांतील जो भाग त्यांना प्राप्त व्हावयाचा तो पुरुषार्थी लोकांच्या हातीं येईल. उदाहरणार्थ असें समजा कीं जगांत १०० रु. आहेत. आणि जगांत १० मनुष्यें आहेत. त्यांत पांच पुरुषार्थी आणि पांच त्रिदोषयुक्त भाग्यहीन. तर असें होईल कीं हे रु. १०० त्या पांच पुरुषार्थी लोकांत वांटले जातील आणि बाकी पांच जण दुर्भाग्यानें पीडलेले रहातील. या मंत्राचा वाचकांनीं या दृष्टीनें विचार करावा. एकाच गांवांत कित्येक पुरुषार्थी पैसा मिळवितात आणि कित्येक आळसामुळें निर्धनावस्थेंत रहातात. त्याचें कारण या मंत्रांत उत्तम प्रकारें सांगितलें आहे.

तिसऱ्या मंत्रांत म्हटलें आहे कीं प्रकाशित देवाची आम्ही उपासना करतों, आणि त्यामुळें पुरेसें धन आम्हांस मिळेल. चवथ्या मंत्रांत हाच आशय स्पष्ट केला आहे.

वयं जयेम त्वया युजा । (मं. ६)

' आम्ही तुझ्या (ईश्वराच्या) बरोबर रहाण्यानें विजय प्राप्त करूं शकतो. ' ईश्वरासह रहाण्यानें म्हणजे ईश्वराचा भक्त बन-ण्यानें विजय मिळतो. हा विजय खरा विजय असतो. ईश्वराचे सत्यभक्त होण्यानें मोठी शक्ति प्राप्त होते. याविषयीं पांचव्या मंत्रांत म्हटलें आहे--

अजैषं त्वा संलिखितमजैषमुत संरुधम् । (मं. ५)

' विविध प्रकारें दुःख देणारे आणि अडचणी निर्माण करणाऱ्या अशा तुझ्यासारख्या दुष्ट शत्रूंना मी जिंकतों. म्हणजे मीं ईश्वराचा भक्त असल्यानें मला सत्य मार्गानें पुढें जाण्यास कोणतीहि भीति नाहीं. मीं माझ्या पुरुषार्थानें माझी उन्नति खचितच करून घेईन. पुरुषार्थ सिद्ध करण्यासंबंधीं एक नियम आहे. तो असा कीं धार्मिक दृष्टीनें निर्दोष पुरुषार्थ आणि प्रयत्न करणाराच जय मिळवितो. शेवटीं त्याचाच विजय होतो. अधार्मिकांचा जय होत आहे असें थोडा वेळ जरी वाटलें तरी अखेर त्यांचा नाश निश्चयें करून होतो. याविषयीं सहाव्या मंत्रां-तील घोषणा विचार करण्यासारखी आहे.–

उत प्रहामति दीवा जयति ।
कृतमिव श्वघ्नी विचिनोति काले ॥

' निःसंदेह ही गोष्ट सत्य आहे कीं (**अति दीवा**) अत्यंत बिकट विजय प्राप्त करण्याची इच्छा करणारा पुरुषार्थी मनुष्य (**प्रहां जयति**) प्रहार करणाऱ्याला जिंकतो आणि (**श्वघ्नी-स्व-घ्नी**) स्वतःचा आत्मघात करणारा मनुष्य (**काले**) योग्यवेळीं स्वतःच्या कृतकर्मांची फळें भोगतो. '

या मंत्रांत दोन शब्द महत्त्वाचे आहेत. त्यांचा विचार करणें अत्यंत आवश्यक आहे.

१. (**श्व-घ्नीः, स्व-घ्नीः**) आत्मघात करणारा मनुष्य. जो मनुष्य, स्वतःचा नाश होईल अशी कुकर्मे करीत रहातो, ज्यानें अधोगति होईल अशी कुकर्मे करतो तो आत्मघातकी होय. आत्मघातकी लोकांना अधोगति प्राप्त होते याविषयीं वर्णन ईशा-वास्योपनिषद् (वा० य०. ४०।३) मध्यें आहे तें वाचकांनीं अवश्य पहावें.

२. **अतिदीवाः** या शब्दांत ' **दिव्** ' धातु ' विजिगीषा, व्यवहार, स्तुति, मोद, गति ' वगैरे अर्थांचा वाचक आहे. म्हणून ' **दीवा** ' शब्दाचा अर्थ विजिगीषा म्हणजे जयाची इच्छा करणारा, व्यवहार उत्तम रीतीनें करणारा, स्तुति किंवा ईश भक्ति करणारा, आनंद वाढविण्याचीं कार्यें करणारा, प्रगति करणारा, अशा प्रकारचा होतो. ' **अतिदीवा** ' शब्दाचा अर्थ ' अत्यंत विजयासाठीं पुरुषार्थ करणारा ' अशा प्रकारचा होतो. अशा प्रकारें विजय मिळविणारा स्वतःच्या शत्रूस अवश्य जिंकून घेतो. या अर्थानुरोधानें वाचकांनीं या मंत्राचा योग्य विचार करावा.

देवकाम मनुष्य

कित्येक मनुष्यें देवकार्य करणारी असतात. आणि कित्येक असुर कार्यें करणारी असतात. देवांसारखी ज्यांची इच्छा असते त्यांना ' देवकामी ' (काम =इच्छा) मनुष्य म्हणतात आणि ज्यांच्या इच्छा राक्षसी असतात त्यांना असुरकामी मनुष्यें समजावें. ही मनुष्यें काय करतात ? त्यांचें वर्णन या मंत्रांत केलें आहे. तें

आतां पाहूं. या मंत्रातील शब्द खालील पद्धतीनें लिहिले असतां दोघांचीहि लक्षणें स्पष्ट होतील-

देव कामः धनं न रुणद्धि ।
(असुर कामः धनं रुणद्धि ॥) (मं. ६)

' देवाप्रमाणें इच्छा असणारा आपलें धन स्वतःजवळच जमवून ठेवीत नाहीं परंतु आसुरी कामना असणारा स्वतःचे धन स्वतःजवळ अडकवून ठेवतो. ' हा मंत्रभाग या दोघांचेंहि व्यवहारी स्वरूप फार चांगल्या रीतीनें दाखवितो. कंजूष मनुष्यें धन संग्रह करून ठेवतात. तें व्यवहारांत आणून त्याची हेरफेर होऊं देत नाहींत. अथवा स्वतःच्या स्वार्थी भोगासाठीं राखून ठेवतात. म्हणून त्यांस राक्षसी कामना म्हणतात. परंतु जो मनुष्य दैवी प्रवृत्तीचा असतो तो धन स्वतःजवळ कधीं अडकवून ठेवीत नाहीं परंतु स्वतःचें सर्वस्व सर्व जनतेच्या भलाईसाठीं समर्पित करतो. स्वतःची संपूर्ण शक्ति तो त्याच कार्यांत खर्च करतो. हीं मनुष्यें उन्नतीचे भागीदार होतात. ही गोष्ट या मंत्राच्या अंतीं सांगितली आहे.

तं रायः स्वधाभिः संसृजाति । (मं. ६)

' त्यांना सर्व प्रकारचें धन स्वतःच्या सर्व धारकशक्तीसह प्राप्त होतें. ' जे स्वतःचें धन देवकार्यांत वापरतात तेच विशेष धन प्राप्त करूं शकतात आणि तेच मोठा विजय प्राप्त करूं शकतात.

आतां येथें देवकार्य कशास म्हणावें त्याचा विचार केला पाहिजे. साधुजनांचें रक्षण करणें, दुष्ट कर्म करणाऱ्यांचा नाश करणें आणि धर्ममर्यादेची स्थापना करणें, या विविध कार्यांना देव-कार्य म्हणतात. म्हणजे या विरुद्ध जीं कर्में असतील तीं राक्षसी अथवा आसुरी कार्यें समजावींत. अशा देवकार्यांत पैसा जो खर्च करतो, अथवा स्वतः अशीं देवकार्यें करतो, त्याला देव-काम मनुष्य म्हणतात. याहून विपरीत कार्य करणारा तो आसुरी कामना असणारा म्हटला जातो आणि त्याला अवनति प्राप्त होते.

गोरक्षा

सातव्या मंत्रांत गोरक्षणाचें महत्त्व वर्णिलें आहे. जर दुर्गतींतून वांचण्याचा एखादा खरा मार्ग असला तर तो एकमात्र गोरक्षणाचा आहे. पहा-

दुरेवां अमतिं गोभिः तरेम । (मं. ७)

' वाईट अवस्थेची बुद्धिहीन स्थिति आहे ती आम्हीं गायींच्या रक्षणानें दूर करूं. ' म्हणजे गायींच्या सहाय्यानें आम्हीं आमची दुरवस्था दूर करूं. देशांत उत्तम प्रकारें गोरक्षण व्हावें आणि विपुल प्रमाणांत सर्वांस दूध प्राप्त व्हावें, म्हणजे देशाची दुरवस्था निःसंदेह दूर होईल. मनुष्यास सुधारण्यास हा एकमात्र उपाय आहे.

विश्वे यवेन क्षुधं (तरेम) । (मं. ७)

' आम्ही सर्व यवांनीं आमची भूक दूर करूं. ' म्हणजे जव इत्यादि भक्षण करूनच आम्ही आमची भूक शमवूं. येथें मांस वगैरे पदार्थांनीं भुकेची निवृत्ति करावी असा कोठेंहि उल्लेख नाहीं ही गोष्ट विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. गायींचें दूध प्यावें आणि जव, गहूं, तांदुळ वगैरे धान्याचें सेवन करावें. या दोन प्रकारानें मनुष्याचें जीवन उन्नत होतें आणि तो अत्यंत सुखी होतो. आतां अंतिम मंत्राचा उपदेश पहा-

अक्षः फलवतीं द्युवं दत्त । (मं. ९)

' हे ज्ञान-विज्ञान हो ! फळ देईल असा विजय आम्हांस द्या. ' येथें अक्ष शब्द वापरला आहे- या शब्दाचे कोषांत अर्थ खालीं दिल्याप्रमाणें आहेत- गाडीचा दोन चाकांमधील आंस, त्याचा आधारस्तंभ, गाडी, चक्र, तराजूची मधली दांडी, तोलण्याचीं वजनें (कर्ष) भिलावा, रुद्राक्षांचा वृक्ष, रुद्राक्ष, इन्द्राक्ष ,सर्प, गरुड, आत्मा, ज्ञान, सत्यज्ञान, विज्ञान, तारक ज्ञान, ब्रह्मज्ञान, कायदा (law) कायद्याची कार्रवाई, विधि, नियम ' आमच्या मते येथें ज्ञान व विज्ञान या अर्थी हा शब्द आला आहे म्हणून त्याचा अर्थ आम्हीं ज्ञानविज्ञान असा केला आहे.

द्यु अथवा दिव्याची उत्पत्ति एकाच दिव्-धातूपासून झाल्यामुळें ' अतिदीवा शब्दाचा जो अर्थ वर दाखविला आहे तोच ' द्युवं ' चा येथें होतो. ' विजिगीषा ' असा अर्थ येथें घेणें जास्त श्रेयस्कर, ' ज्ञान विज्ञानानें आम्हांस फलयुक्त विजय प्राप्त होवो. ' हा मंत्रभागाचा आशय आहे. ज्ञानविज्ञानानेंच सफल विजय प्राप्त होतो.

ज्याप्रमाणें (**क्षीरिणां गां इव**) नेहमीं गाय दूध देते त्याप्रमाणें विजय असा असला पाहिजे कीं विजय प्राप्त करण्यानें त्याचीं मधुर फळें भविष्यकाळीं मिळत रहातील आणि त्यामुळें आमचें अधःपतनहि कधीं होणार नाहीं असा आशय आहे.

कृतस्य धारया मा संनह्यत । (मं. ८)

' माझ्यापूर्वी केलेल्या कार्यांच्या धाराप्रवाहानें मी सरळ मार्गानें उन्नतीस जाईन. ' या मध्यें कोणत्याहि प्रकारचा अडथळा शिल्लक रहाणार नाहीं. जे ज्ञानविज्ञानाच्या सहाय्यानें अशा प्रकारें विजय मिळवतील तेच परम पुरुषार्थ करतील आणि तेच निःसंदेह यशाचे भागीदार होतील.

पुरुषार्थाने विजय प्राप्त करून देणाऱ्या या सूक्ताचा या प्रकारें विचार केला पाहिजे म्हणजे इष्ट तो बोध प्राप्त होईल.

वर्चः प्राप्ति सूक्त

कांड. ३, सूक्त २२

(ऋषिः- वसिष्ठः । देवता - वर्चः, बृहस्पतिः, विश्वेदेवाः)

हस्तिवर्चसं प्रथतां बृहद्यशो अदित्या यत्तन्वः संबभूव ।
तत्सर्वे समदुर्मह्यमेतद्विश्वे देवा अदितिः सजोषाः ॥ १ ॥
मित्रश्च वरुणश्चेन्द्रो रुद्रश्च चेततु । देवासो विश्वधायसस्ते माञ्जन्तु वर्चसा ॥ २ ॥
येन हस्ती वर्चसा संबभूव येन राजा मनुष्येष्वप्स्वन्तः ।
येन देवा देवतामग्र आयन्तेन मामद्य वर्चसाग्ने वर्चस्विनं कृणु ॥ ३ ॥
यत्ते वर्चो जातवेदो बृहद्भवत्याहुतेः । यावत्सूर्यस्य वर्च आसुरस्य च हस्तिनः ।
तावन्मे अश्विना वर्च आ धत्तां पुष्करस्रजा ॥ ४ ॥
यावच्चतस्रः प्रदिशश्चक्षुर्यावन्समश्नुते । तावत्समैत्विन्द्रियं मयि तद्धास्तिवर्चसम् ॥ ५ ॥

अर्थ— (यत् आदित्याः तन्वः) जो अदितीच्या शरीरापासून (संबभूव) उत्पन्न झाला आहे तो (हस्तिवर्चसं बृहत् यशः) हत्तीच्या शक्तीप्रमाणें महान् यश (प्रथतां) पसरो. (तत् एतत्) तें हें यश (सर्वे सजोषाः विश्वे देवाः अदितिः) सर्व एकचित्त झालेले देव आणि अदिति (मह्यं सं अदुः) मला देतात. (१)

(मित्रः च इन्द्रः च रुद्रः च वरुणः च) मित्र, रुद्र, इन्द्र आणि वरुण (चेततु) उत्साह देवोत. (ते विश्वधायसः देवाः) ते विश्वास धारण करणारे देव (वर्चसा मा अञ्जन्तु) तेजानें मला युक्त करोत. (२)

(येन वर्चसा हस्ती संबभूव) ज्या तेजानें हत्ती उत्पन्न झाला आणि (येन मनुष्येषु अप्सु च अन्तः राजा सं बभूव) ज्याच्या तेजानें मनुष्यांत आणि जलप्रवाहांत राजा झालेला आहे. आणि (येन देवाः अग्रे देवतां आयन्) ज्या तेजानें देवांनीं प्रथम देवत्व प्राप्त केलें (तेन वर्चसा) त्या तेजानें, हे अग्ने ! (मां अद्य वर्चस्विनं कृणु) मला आज तेजस्वी कर. (३)

हे (जातवेदः) जातवेद ! (ते यत् वर्चः आहुतेः बृहत् भवति) आहुतीनीं तुझें तेज जें वाढतें (यावत् सूर्यस्य, आसुरस्य, हस्तिनः च वर्चः) आणि सूर्याचें तसेंच आसुरीचें व हत्तीचें [मेघाचें] जें बळ आणि तेज असतें, हे (पुष्करस्रजौ अश्विनौ) पुष्पमाळा धारण करणाऱ्या अश्विदेवहो ! (तावत् वर्चः मे आधत्तां) तितकें तेज मजसाठीं धारण करा. (४)

(यावत् चतस्रः प्रदिशः) चारी दिशा जितक्या दूर आहेत (यावत् चक्षुः समश्नुते) जेथपर्यंत दूरवर दृष्टि पोंहोचते, (तावत् मयि तत् हस्तिवर्चसं इन्द्रियं) तितकें माझ्यामध्यें त्या हत्तीप्रमाणें इंद्रियांचें बळ (सं एतु) एकत्र व्हावें. (५)

भावार्थ— प्रकृतीमध्यें जी मुख्य शक्ति आहे ती, जी शक्ति हत्ती इत्यादि पशूंमध्यें अवतरली आहे. ती माझ्यांत येवो. सर्व देवता एक मताच्या होऊन मला बल देवोत. (१)

मित्र, वरुण, इंद्र आणि रुद्र या विश्वाचे धारक देव मला उत्साह देवोत, ज्ञान देवोत आणि तेजानें युक्त करोत. (२)

ज्या बलानें हत्ती सर्व पशूंमध्यें बलवान् झाला आहे, ज्या बलानें मनुष्यांत राजा बलवान् असतो आणि भूमि तसेंच जलावर अधिराज्य चालवतो, ज्या बलानें पूर्वी देवांनीं देवत्व प्राप्त करून घेतलें, हे तेजाच्या देवा ! तें बल मला आज प्राप्त होवो. (३)

उत्पन्न झालेल्यानां जाणणाऱ्या हे देवा ! अग्नींत आहुति दिल्यानें जें तेज वाढतें, जें तेज सूर्यांत आहे, जें तेज असुरांत तसेंच हत्तींत आणि मेघांत आहे, हे अश्विदेव हो ! तें तेज मला द्या. (४)

चार दिशा दूरवर जेथपर्यंत पसरल्या आहेत, जेथपर्यंत दूरवर माझी नजर जाते तेथपर्यंत माझ्या सामर्थ्याचा प्रभाव पसरो. (५)

हस्ती मृगाणां सुषदामतिष्ठावान्बभूव हि । तस्य भगेन वर्चसाभि षिञ्चामि मामहम् ॥ ६ ॥

अर्थ—(हि सुषदां मृगाणां) ज्याप्रमाणें चांगल्या प्रकारें बसणाऱ्या पशूंमध्यें **(हस्ती अतिष्ठावान् बभूव)** हत्ती फारच प्रतिष्ठित झाला आहे **(तस्य भगेन वर्चसा)** त्याच्या ऐश्वर्याने आणि तेजाने **(अहं मां अभिषिञ्चामि)** मी मला स्वतःला अभिषेक करतों. (६)

भावार्थ— ज्याप्रमाणें हत्ती हा सर्व पशूंत श्रेष्ठ बलवान् आहे तसें बल आणि ऐश्वर्य मीं प्राप्त करीत आहें. (६)

वर्चःप्राप्ति सूक्त

शाकाहारानें बलवृद्धि

शरीराचें बल, तेज, आरोग्य, वीर्य वगैरे वाढविण्यासंबंधींचा उपदेश हें सूक्त देत आहे. प्राण्यांमध्यें हत्तीचें शरीर (**हस्ति वर्चसं** मं. १) फार मोठें आणि बलवान् असतें. हत्ती शाकाहारी प्राणी आहे, त्याचा आदर्श वेदांनीं येथें घेतला आहे. सिंह वाघांचा आदर्श घेतलेला नाहीं. यावरून असें सूचित होतें कीं मनुष्य शाकाहारी असतांहि स्वतःचें बल वाढवून बलवान् होऊं शकतो. शाकाहाराची वेदाज्ञा या सूक्तानें अप्रत्यक्ष व्यक्त झाली आहे, ही गोष्ट वाचकांनीं येथें विशेष ध्यानीं बाळगावी.

बलप्राप्तीची रीत

' अदिति ' प्रकृतीचें नांव आहे. त्या मूल प्रकृतींत महान् शक्ति असते. या शक्तीमुळेंच प्रकृतीला ' अदिति ' म्हणजे ' अ-दीन ' होय. या प्रकृतीचेच सूर्य चंद्र वगैरे देवपुत्र आहेत. एवढ्यासाठींच या प्रकृतीला देवांची माता, सूर्यादि देवांची माता म्हटलें आहे. मूल प्रकृतीचेंच बल विविध देवांत विविध प्रकारें प्रकट झालें आहे. सूर्यांत तेज, वायूमध्यें जीवन, जलांत शीतलता इत्यादि गुण देवांना त्यांच्या अदितिमातेकडूनच मिळाले आहेत म्हणून प्रथम मंत्रांत म्हटलें आहे ' या सर्व देवांकडून मला प्रकृतीचें अमर्याद बळ प्राप्त होवो. (मं. १) ' खरोखर मनुष्यास जें बल प्राप्त होतें तें पृथ्वी, तेज, आप, वायु, इत्यादि देवांच्या सहाय्यानेंच प्राप्त होतें. दुसऱ्या कोणत्याहि रीतिनें होत नाहीं. हें बल प्राप्त करण्याची सुद्धां रीत आहे. या देवांशी संबंध वाढविण्यानें आपल्या शरीराचें बलसुद्धां वाढतें. पाण्यांत तरणें, वायूंत भ्रमण करणें, अथवा खेळ खेळून उन्हांत शरीर तापविण्यानें म्हणजे शरीराच्या कातडीशीं या देवांचा संबंध वाढविल्यानें बल वाढतें. यावरून हें सिद्ध होतें कीं लहानशा घरांत कोंडून रहाण्यानें बल कमी होतें.

दुसरा मंत्र म्हणतो कीं, (**मित्रः**) सूर्य, (**वरुणः**) जल-देव, (**इन्द्रः**) विद्युत्, (**रुद्रः**) अग्नि अथवा वायु हे विश्व-धारक देव माझी शक्ति वाढवोत. ' (मं. २) जर त्यांच्या रस-पूर्ण अमृतप्रवाहरूपी जीवनापासून आपला संबंध सुटला तर ते देव आमची शक्ति कशी वाढवूं शकतील ? म्हणून बल वाढवूं इच्छिणाऱ्यांनीं आपल्या शरीराच्या कातडीचा संबंध या देवांच्या अमृतप्रवाहाशीं योग्य प्रमाणांत होऊं द्यावा हें योग्य आहे. असें केल्यानें त्यांचा अमृतरस शरीरांत प्रवेश पावेल आणि आपलें बल वाढेल. दुसऱ्या मंत्राचा आशय स्पष्ट आहे. निर्बल अथवा बलवान् होण्याची कारणें येथें या सूक्तानें स्पष्ट केलीं आहेत. जे वाचक या सूक्ताच्या उपदेशानुसार स्वतःचें आचरण ठेवतील ते निःसंशय बल, वीर्य, दीर्घायु, आरोग्य प्राप्त करून घेतील.

ज्ञान आणि शौर्याची तेजस्विता

कांड ३, सूक्त १९

(ऋषिः– वसिष्ठः । देवता – विश्वेदेवाः, चंद्रमाः, इंद्रः)

संशितं म इदं ब्रह्म संशितं वीर्यं१ बलम् । संशितं क्षत्रमजरमस्तु जिष्णुर्येषामस्मि पुरोहितः ॥१॥

समहमेषां राष्ट्रं स्यामि समोजो वीर्यं१ बलम् । वृश्चामि शत्रूणां बाहूननेन हविषाहम् ॥ २ ॥

नीचैः पद्यन्तामधरे भवन्तु ये नः सूरिं मघवानं पृतन्यान् ।

क्षिणामि ब्रह्मणामित्रानुन्नयामि स्वानहम् ॥ ३ ॥

तीक्ष्णीयांसः परशोरग्नेस्तीक्ष्णतरा उत । इन्द्रस्य वज्रात्तीक्ष्णीयांसो येषामस्मि पुरोहितः ॥ ४ ॥

एषामहमायुधा सं स्याम्येषां राष्ट्रं सुवीरं वर्धयामि ।

एषां क्षत्रमजरमस्तु जिष्ण्वेऽषां चित्तं विश्वेऽवन्तु देवाः ॥ ५ ॥

अर्थ— (मे इदं ब्रह्म संशितं) माझें हें ज्ञान तेजस्वी झालें आहे आणि माझें हें (वीर्यं बलं संशितं) वीर्य आणि बळ तेजस्वी झालें आहे. (संशितं क्षत्रं अजरं अस्तु) त्याचें तेजस्वी झालेलें क्षात्रबळ कधींहि क्षीण न होवो. (येषां जिष्णुः पुरोहितः अस्मि) ज्यांचा मीं विजयी पुरोहित आहें. (१)

(अहं एषां राष्ट्रं संस्यामि) मीं यांच्या राष्ट्राचें तेज वृद्धिंगत करतों आणि त्यांचें (ओजः वीर्यं बलं संस्यामि) बळ, वीर्य आणि सैन्य तयार करतों. आणि (अनेन हविषा) या हवनानें (शत्रूणां बाहून् वृश्चामि) शत्रूंचे हात तोडतों. (२)

ते शत्रु (नीचैः पद्यन्ताम्) खालीं पडोत. (अधरे भवन्तु) ते अवनतीस जावोत, (ये नः मघवानं सूरिं पृतन्यान्) जे आमच्या धनवान् आणि विद्वानांवर सैन्यासह चढाई करतात. (अहं ब्रह्मणा अमित्रान् क्षिणामि) मीं माझ्या ज्ञानानें शत्रूंना क्षीण करतों आणि (स्वान् उन्नयामि) स्वतःच्या लोकांची उन्नति करतों. (३)

(परशोः तीक्ष्णीयांसः) कुऱ्हाडीपेक्षां जास्त तीक्ष्ण (उत अग्नेः तीक्ष्णतराः) आणि अग्नीपेक्षां अधिक तीक्ष्ण (इन्द्रस्य वज्रात् तीक्ष्णीयांसः) इंद्राच्या वज्रापेक्षां सुद्धां अधिक तीक्ष्ण त्यांचीं अस्त्रें होवोत, (येषां पुरोहितः अस्मि) ज्यांचा मीं पुरोहित आहें. (४)

(अहं एषां आयुधा संस्यामि) मीं त्यांच्या आयुधांस उत्तम प्रकारें तीक्ष्ण करतों. (एषां राष्ट्रं सुवीरं वर्धयामि) त्यांचें राष्ट्र उत्तम वीरतेनें युक्त करून तें वाढवितों. (विश्वेदेवाः एषां चित्तं अवन्तु) सर्व देव त्यांच्या चित्ताला उत्साहयुक्त करोत. (५)

भावार्थ— मीं ज्या राष्ट्राचा पुरोहित आहें त्या राष्ट्राचें ज्ञान मीं तेजस्वी केलें आहे. आणि शौर्यवीर्यही अधिक तीक्ष्ण केलें आहे. ज्यामुळें या राष्ट्राचें क्षात्रतेज कधींहि क्षीण होणार नाही. (१)

मीं आपल्या राष्ट्राचें तेज वाढवितों. आणि त्याचें शारीरिक बळ, पराक्रम आणि उत्साह सुद्धां वाढवितों. त्यांनीं मी शत्रूंच्या बाहूंस कापतों–तोडतों. (२)

जे शत्रु आमच्या ज्ञानी आणि धनिकांवर हल्ला करतात, ते अधोगतीस जातात. कारण मी माझ्या ज्ञानानें शत्रूचा नाश करतों. आणि त्यामुळें आमच्या लोकांस उत्तेजित करतों. (३)

ज्या राष्ट्राचा मीं पुरोहित आहें त्या राष्ट्राचीं शस्त्रें कुऱ्हाडीपेक्षां तीक्ष्ण, अग्नीपेक्षां अधिक दाहक आणि इंद्राच्या वज्रापेक्षांहि मीं अधिक संहारक बनविलीं आहेत. (४)

मीं त्यांच्या शस्त्रास्त्रांस अधिक तीक्ष्ण करतों. त्या राष्ट्रांत उत्तम वीर तयार करून त्यांना पुढें वाढवितों–त्यांची प्रगति करतों. त्यांच्या शौर्याला कधीं क्षीण न होणारें आणि सदा विजयी असें करतों. सर्व देवता त्यांच्या चित्तास अधिक उत्साहयुक्त करोत. (५)

उद्धर्षन्तां मघवन्वाजिनान्युद्वीराणां जयतामेतु घोषः ।
पृथग्घोषा उलुलयः केतुमन्त उदीरताम् देवा इन्द्रज्येष्ठा मरुतो यन्तु सेनया ॥ ६ ॥
प्रेता जयता नर उग्रा वः सन्तु बाहवः ।
तीक्ष्णेषवोऽबलधन्वनो हतोग्रायुधा अबलानुग्रबाहवः ॥ ७ ॥
अवसृष्टा परा पत शरव्ये ब्रह्मसंशिते ।
जयामित्रान्प्र पद्यस्व जह्येषां वरंवरं मामीषां मोचि कश्चन ॥ ८ ॥

अर्थ — हे (**मघवन्**) धनवान् ! त्याचें (**वाजिनानि उद्धर्षन्तां**) बळ उत्तेजित होवो. (**जयतां वीराणां घोषः उत एतु**) विजय मिळविणाऱ्या वीरांचा घोष उंच जावो. (**केतुमन्तः उलुलयः घोषाः**) जयध्वज घेऊन चढाई करणाऱ्या वीरांचा संघघोष (**पृथक् उत् ईरताम्**) निरनिराळा वर चढो. (**इन्द्रज्येष्ठा मरुतः देवाः**) इंद्राच्या प्रमुखतेखालीं सर्व मरुत् देव (**सेनया यन्तु**) स्वतःच्या सेनेसह जावोत. (६)

हे (**नरः**) लोक हो ! (**प्र इत**) पुढें चला. (**जयत**) विजय मिळवा. (**वः बाहवः उग्राः सन्तु**) तुमचे बाहु शौर्यानें युक्त होवोत. हे (**तीक्ष्णेषवः**) वीरांनो ! पुढें पुढें चला, तीक्ष्ण बाण, प्रतापी शस्त्रास्त्रें आणि समर्थ बाहू धारण करूं. (**उग्रायुधाः उग्रबाहवः**) उग्र आयुधें आणि बलयुक्त भुज असणाऱ्या (**अ-बलधन्वनः अबलान् हत**) आपल्या शत्रूंना निर्बल करा आणि त्यांना मारून टाका. (७)

हे (**ब्रह्म संशिते शरव्ये**) ज्ञानानें तेजस्वी झालेल्या शस्त्रा ! (**अवसृष्टा परापत**) तुला मुक्त केलें आहे. तूं दूर जा. आणि (**अमित्रान् जय**) शत्रूला जिंकून घे. (**प्र पद्यस्व**) पुढें हो. (**एषां वरं वरं जहि**) या शत्रूच्या प्रमुख वीरांना मारून टाक. (**अमीषां कश्चन मा मोचि**) त्यांतून कोणीहि न वांचो. (८)

भावार्थ— हे प्रभो ! त्यांचें बल उत्साहानें पूर्ण होवो. त्यांच्या विजयी वीरांच्या जयजयकारानें सर्व आकाश भरून जावो. ध्वज उचलून विजय मिळविणाऱ्या त्यांच्या वीरांचे शब्द वेगवेगळे ऐकूं येवोत. ज्याप्रमाणें इंद्राच्या प्रमुखत्वाखालीं मरुतांची सेना विजय प्राप्त करते त्याचप्रमाणें आमची सेना सुद्धां विजय मिळवो. (६)

हे वीर हो ! पुढें व्हा आणि विजय प्राप्त करा. तुमचे बाहू प्रतापयुक्त करा. तीक्ष्ण बाण, प्रतापी शस्त्रास्त्रें आणि समर्थ बाहु धारण करून तुमच्या शत्रूंना निर्बल बनवून त्यांना कापून काढा. (७)

ज्ञानानें तेजस्वी झालेलीं शस्त्रें जेव्हां वीरांच्या प्रेरणेनें सोडण्यांत येतात तेव्हां तीं दूरपर्यंत जाऊन शत्रूंवर पडतात. आणि तीं शत्रूंचा नाश करतात. हे वीर हो ! शत्रूंवर चढाई करा आणि शत्रूच्या मुख्य मुख्य वीरांना निवडून मारून टाका. त्यांची अशी कत्तल करा कीं त्यांतून कोणीहि न वांचो. (८)

ज्ञान आणि शौर्याची तेजस्विता

राष्ट्रीय उन्नतीमध्यें पुरोहिताचें कर्तव्य

राष्ट्रांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि निषाद असे पांच वर्ग असतात. त्यांत ब्राह्मणाचें कर्तव्य पुरोहिताचें कार्य करण्याचें आहे. पूर्ण हित करणाराास पुरोहित हें नांव दिलें जातें. यजमानाचें पुरेपुर हित करण्याचें कार्य करणारा पुरोहित असला पाहिजे. जेव्हां समग्र राष्ट्राचा विचार करण्याचा असतो तेव्हां समग्र राष्ट्र यजमानस्थानी असतें आणि समग्र ब्राह्मणजात पुरोहित स्थानीं आहे असें समजावयाचें. त्यामुळें संपूर्ण राष्ट्राचें समग्र हित साधण्याचा भार पुरोहितावर असतो. ज्ञानज्योत सर्व राष्ट्रांत पेटवून, प्रगटवून त्या ज्ञानानें राष्ट्राचें हित करण्याचें, राष्ट्राचा अभ्युदय साधण्याचें, राष्ट्राला निःश्रेयस प्राप्त करून देण्याचें कर्तव्य पुरोहिताचें आहे. हें कर्तव्य या सूक्तांत स्पष्टपणें वर्णिलें आहे राष्ट्रां-

तील ब्राह्मणांनी या सूक्ताचें मनन करून स्वतःचें कर्तव्य जाणून घ्यावें आणि तद्वत् आचरण करावें.

या सूक्ताचे ऋषि वसिष्ठ आहेत. आणि वसिष्ठ हें ब्रह्मनिष्ठ ब्राह्मणाचें नांव सुप्रसिद्ध आहे. त्या दृष्टीनें सुद्धां या सूक्ताचें मनन होणें, ब्राह्मणांनीं तसें करणें आवश्यक आहे. आतां या सूक्ताचा आशय पहा.

ब्रह्मतेजाची ज्योति

राष्ट्रांत ब्रह्मतेजाची ज्योति वाढविणें आणि त्या ज्योतीनें राष्ट्राची उन्नति साधण्याचें कार्य सर्वांत महत्त्वाचें आणि अत्यंत आवश्यक आहे. याविषयीं या सूक्ताचें कथन असें आहे—

मे इदं ब्रह्म संशितम् । (मं. १)
ब्रह्मणा अमित्रान् क्षिणामि (मं. ३)
उन्नयामि स्वान् अहम् । (मं. ३)
अवसृष्टा परापत शरव्ये ब्रह्मसंशिते । (मं. ८)
जय अमित्रान् । (मं. ८)

' माझ्या प्रयत्नानें या राष्ट्राचें ज्ञानतेज चमकत आहे. ज्ञानाच्या प्रतापानें शत्रूंचा नाश मीं करतों आणि त्या ज्ञानानें माझ्या राष्ट्रांतील लोकांची उन्नति साधतों. ज्ञानानें उत्तेजित झालेलें शस्त्र दूरपर्यंत परिणामकारक होतें. त्यानें शत्रूंना जिंका.

हे मंत्रभाग राष्ट्रांस ब्रह्मतेजाच्या कार्याचें स्वरूप दाखवितात. ज्ञान राष्ट्रीय उन्नतींत मोठें कार्य करीत असतें. जगांत अनेक राष्ट्रें असतात, परंतु त्यांतील ज्ञानसंपन्न राष्ट्रेंच अग्रभागीं चमकतात. जर ज्ञान नसेल तर अभ्युदय अशक्य आहे. उन्नतीला अवरोध करणारें कांहीं विरुद्ध तत्त्व असलें तर तें अज्ञानच होय. अज्ञानानें बंधन प्राप्त होतें परंतु ज्ञानानें मुक्ति मिळते, बंधनांचा नाश होतो. म्हणून राष्ट्रांत जे ब्राह्मण असतील त्यांचें हें कर्तव्यच आहे कीं त्यांनीं स्वतः तर ज्ञानसंपन्न व्हावेंच. पण राष्ट्रांतील सर्व लोकांनाहीं ज्ञानसंपन्न करावें. क्षत्रिय, वैश्य, शूद्र यांनाहि ज्ञान आवश्यक आहेच. त्यांच्या व्यवसायांना उत्तम रीतीनें चालविण्यासाठीं ज्ञानाची परम आवश्यकता आहे.

ज्ञानानें स्वतःचे हितकर्ते मित्र कोण आणि शत्रु कोण त्याचा निश्चय होऊं शकतो. स्वतःच्या ज्ञानानें राष्ट्राचे शत्रु ओळखावे आणि त्यांना दूर करण्यास ज्ञानानेंच उपाययोजना करावी. ही उपाययोजना करण्याचें कार्य हें ब्राह्मणांचें परम कर्तव्य आहे. शत्रूवर केव्हां हल्ला करावा ? शत्रूचीं शस्त्रास्त्रें कशा प्रकारचीं आहेत, त्यांच्यापेक्षां आपलीं शस्त्रें जास्त प्रभावशाली कशी करावीत, शत्रूंच्या शस्त्रास्त्रांचा प्रभाव जितका दूर पडत असेल त्यापेक्षां जास्त दूर पर्यंत आपलीं शस्त्रास्त्रें प्रभाव कसा पाडूं शकतील, त्यासाठीं काय केलें पाहिजे वगैरे गोष्टी ज्ञानानेंच सिद्ध होतात. आपल्या राष्ट्रांत याविषयीं सिद्धता करण्याचें कार्य ब्राह्मणांचें आहे. म्हणजे ब्राह्मणांनीं स्वतःच्या ज्ञानानें त्याचा विचार करावयाचा आणि स्वतःच्या राष्ट्रांत अशी प्रेरणा करावयाची कीं ज्यामुळें राष्ट्रांत उक्त परिवर्तन व्हावें, ही गोष्ट खालील मंत्रांत सांगितली आहे—

अवसृष्टा परापत शरव्ये ब्रह्मसंशिते । (मं. ८)

' ज्ञानानें तीक्ष्ण झालेलीं शस्त्रास्त्रें शत्रूंवर पडोत, ' त्यांत ज्ञानानें उत्तेजित झालेलीं शस्त्रास्त्रें प्रेरित केलीं तर तीं जास्त तीक्ष्ण आणि प्रभावशाली असतात असें वर्णन आहे. अन्य देशांचीं शस्त्रास्त्रें पाहून, त्यांचा वेग जाणून, त्यांच्या परिणामांचा अनुभव पाहून त्यापेक्षां जास्त वेगाचीं आणि अधिक परिणामकारी शस्त्रास्त्रें तयार करवून घेऊन स्वतःच्या देशांतील वीरांना देण्यांत आलीं, तर अन्य परिस्थिति समान असली तरी स्वतःचा जय निश्चयानें होईल यांत कोणताहि संदेह नाहीं.

पुरोहिताची प्रतिज्ञा

' ज्या राष्ट्राचा मीं पुरोहित आहें त्या राष्ट्राचें ज्ञान, वीर्य, बल, पराक्रम, शौर्य, धैर्य, विजय, उत्साह कधीं क्षीण न होवो. (मं. १)

' ज्या राष्ट्राचा मीं पुरोहित आहे तें राष्ट्र पराक्रम, वीर्य, शौर्य, उत्साह इत्यादि गुणांनीं वाढो, प्रगति करो (म्हणजे मीं तें कार्य करीन) आणि शत्रूचें बल कमी करीन. ' (मं. २)

' जे शत्रु आमच्या ज्ञानी आणि धनवान् लोकांवर म्हणजे आमच्या देशांतील युद्ध न करणाऱ्या लोकांवर सेनेसह हल्ला करतात त्यांचा मीं माझ्या ज्ञानानें नाश करीन. आणि माझ्या राष्ट्रांतील लोकांची माझ्या ज्ञानाच्या बलानें उन्नति साधीन. (मं. ३)

' ज्यांचा मी पुरोहित आहे. त्यांचीं शस्त्रास्त्रें मीं अधिक तेजस्वी करीन. (मं. ४)

' त्यांचीं शस्त्रास्त्रें मीं अधिक धारदार तीक्ष्ण बनवितों. उत्तम वीरांची संख्या या राष्ट्रांत वाढून या राष्ट्राची उन्नति साधतों आणि त्यांचें शौर्य वाढवितों. ' (मं. ५)

हे मंत्रभाग पुरोहिताच्या राष्ट्रीय कर्तव्याचें ज्ञान असंदिग्ध शब्दांनीं देत आहेत. पुरोहिताचीं हीं कर्तव्यें आहेत. पुरोहितानें क्षत्रियाला क्षात्रविद्या शिकवावयाची, वैश्याला व्यापार, धनाची देवघेव शिकवावयाची आणि शूद्रादिकांना कलाकुसरीचें, कारागिरीचें शिक्षण द्यावयाचें आणि ब्राह्मणांना अशा विशेष ज्ञानानें युक्त करावें. याप्रमाणें चारी वर्णांना तेजस्वी करून संपूर्ण राष्ट्राचा

उद्धार स्वतःच्या ज्ञानशक्तीनें करावयाचा. जे पुरोहित हीं कर्तव्यें पार पाडतील तेच वेदाच्या दृष्टीनें खरे पुरोहित होत. जे पंडित पुरोहिताचें कार्य करीत असतील त्यांनीं या सूक्ताचा विचार करावा आणि स्वतःच्या कर्तव्याचें ज्ञान प्राप्त करावें.

युद्धाची नीति

सहा, सात आणि आठव्या मंत्रांत युद्धनीतीचा उपदेश या प्रमाणें केला आहे. 'वीरांच्या टोळ्या (पथकें) आपापले ध्वज उंचावून युद्धगीत गात आणि आनंदपूर्वक विजयसूचक शब्दांचा घोष करीत शत्रुसेनेवर हल्ला करोत आणि विजय मिळवोत. अशाच प्रकारें आपल्या राजाच्या आणि सेनापतीच्या आधिपत्याखालीं आमचे वीर शत्रूवर हल्ला करोत आणि विजय प्राप्त करोत. (मं. ६)

'वीर हो ! पुढें व्हा. तुमचे बाहू प्रभावशाली होवोत. तुमचीं शस्त्रें शत्रूच्या शस्त्रांपेक्षां अधिक तीक्ष्ण होवोत. तुमची शक्ति शत्रुशक्तीपेक्षां अधिक पराक्रम प्रकाशित करणारी होवो. याप्रमाणें युद्ध करतां करतां तुम्हीं निर्बल शत्रूंस मारून टाका. (मं. ७)

'ज्ञानानें उत्तेजित झालेलीं तुमचीं शस्त्रें शत्रूचा नाश करोत. अशा तीक्ष्ण शस्त्रांनीं तूं शत्रूचा विनाश कर. (मं. ८)

या तीन मंत्रांत याप्रमाणें उपदेश देऊन मग आठव्या मंत्राच्या अंतीं अत्यंत महत्त्वाची युद्धनीति सांगितली आहे. त्यांतील शब्द पहाण्यासारखे आहेत—

१. जह्येषां वरं वरं,

२. मामीषां मोचि कश्चन ॥ (मं. ८)

'या शत्रूंच्या मुख्य मुख्य वीरांना मारून टाका आणि त्यांच्यांतील कोणी वांचणार नाहीं, अशी काळजी घ्या.' या दोन्ही सूचना युद्ध विषयांत अत्यंत महत्त्वाच्या आहेत. शत्रुसेनेचे जे प्रमुख वीर आणि संचालक असतील त्यांचा वध केला पाहिजे. प्रमुख संचालकांतील कोणीहि वांचू नये. अशी तयारी असेल आणि अशी परिस्थिति येईल तर शत्रुसेना सहज हरेल. ही युद्धनीति नीट मनन करण्यासारखी आहे.

स्वतःच्या सेनेंत असे वीर दाखल करावयाचे कीं जे युद्धाच्या वेळीं शत्रूंतील वीर शोधून काढून त्यांस मारून टाकतील. जेव्हां अशा वीरांचा वध होईल आणि शत्रुसेनेचा प्रमुख वीर उरणार नाहींत, त्यावेळीं शत्रुसेनेवर हल्ला केला असतां, त्या शत्रुसेनेचा पराजय होण्यास कांहींच वेळ लागणार नाहीं.

जर वाचक राष्ट्रहिताच्या दृष्टीनें स्वतःच्या कर्तव्याचा विचार करतील तर या सूक्ताच्या मननानें त्यांना आपलें राष्ट्रविषयक कर्तव्य काय तें कळेल आणि तें आचरणांत आणून स्वतःच्या राष्ट्राचा अभ्युदय ते साधतील.

तेजस्वितायुक्त अभ्युदय

कांड ३, सूक्त २०

(ऋषिः- वसिष्ठः । देवता - अग्निः, मन्त्रोक्तदेवता)

अयं ते योनिर्ऋत्वियो यतो जातो अरोचथाः । तं जानन्नग्न आ रोहाधा नो वर्धया रयिम् ॥ १ ॥

अग्ने अच्छा वदेह नः प्रत्यङ् नः सुमना भव । प्र णो यच्छ विशां पते धनदा असि नस्त्वम् ॥ २ ॥

अर्थ— हे अग्ने ! (**अयं ते ऋत्वियः योनिः**) हे तुझें ऋतूशीं संबंधित उत्पत्तिस्थान आहे. (**यतः जातः अरोचथाः**) ज्यापासून प्रकट होऊन तूं प्रकाशित झाला आहेस. (**तं जानन् आरोह**) तें जाणून तूं उन्नत हो. (**अध नः रयिं वर्धय**) आणि आमच्यासाठीं धनाची वृद्धि कर. (१)

हे अग्ने ! (**इह नः अच्छा वद**) येथें आमच्याशीं चांगल्या रीतीनें बोल (**प्रत्यङ् नः सुमनाः भव**) आम्हांस सामोरा येऊन आमच्याविषयीं चांगली आस्था बाळगणारा हो. हे (**विशांपते**) प्रजेच्या स्वामी ! (**नः प्रयच्छ**) आम्हांस दान दे, कारण कीं (**त्वं नः धनदाः असि**) तूं आम्हांस धन देणारा आहेस. (२)

भावार्थ— हे अग्ने ! ऋतूशीं संबंध ठेवणारें हें तुझें उत्पत्तिस्थान आहे. जेथून तुझा जन्म होतांच तूं प्रकाशित झालास. स्वतःच्या उत्पत्तिस्थानास जाणत तूं स्वतःस उन्नत कर आणि आमच्या धनाची वृद्धि कर. (१)

हे अग्ने ! येथें स्पष्ट वाणीनें बोल. आमच्या समक्ष उपस्थित होऊन तूं आमच्याविषयीं उत्तम भावना दाखविणारा हो. हे प्रजापालका ! तूं आम्हांस धन देणारा आहेस म्हणून तूं आम्हांस धन दे. (२)

प्र णो॑ यच्छत्वर्य॒मा प्र भगः॒ प्र बृह॒स्पति॑ः । प्र दे॒वीः प्रोत सू॒नृता॑ र॒यिं दे॒वी द॑धातु मे　　॥ ३ ॥
सोमं॒ राजा॑नमव॑से॒ऽग्निं गी॒र्भिर्ह॑वामहे । आ॒दि॒त्यं विष्णुं॒ सूर्यं॑ ब्र॒ह्माणं॑ च॒ बृह॒स्पति॑म् ।　　॥ ४ ॥
त्वं नो॑ अग्ने अ॒ग्निभि॒र्ब्रह्म॑ य॒ज्ञं च॑ वर्धय । त्वं नो॑ देव॒ दात॑वे र॒यिं दाना॑य चोदय　　॥ ५ ॥
इन्द्र॒वा॒यू उ॒भावि॒ह सु॒हवे॒ह ह॑वामहे ।
यथा॑ नः॒ सर्व॒ इज्जनः॒ संग॑त्यां सु॒मना॒ अस॒द्दान॑कामश्च॒ नो॒ भुव॑त्　　॥ ६ ॥
अ॒र्य॒मणं॒ बृह॒स्पति॒मिन्द्रं॒ दाना॑य चोदय । वातं॒ विष्णुं॒ सर॑स्वतीं सवि॒तारं॑ च वा॒जिन॑म्　　॥ ७ ॥
वाज॑स्य॒ नु प्र॑स॒वे सं ब॑भूवि॒मेमा च॒ विश्वा॒ भुव॑नान्य॒न्तः ।
उ॒तादि॑त्सन्तं दापयतु प्रजा॒नन् र॒यिं च॑ नः॒ सर्व॑वीरं॒ नि य॑च्छ　　॥ ८ ॥

अर्थ— (अर्यमा नः प्रयच्छतु) अर्यमा देव आम्हांस धन देवो, (भगः बृहस्पतिः प्र प्रयच्छतु) भग आणि बृहस्पति ही आम्हांस धन देवो, (देवीः प्र) देवी आम्हांस धन देवो. (उत सूनृता देवी मे रयिं प्रदधातु) आणि सरळ स्वभावाची देवी मला धन देवो. (३)

राजा सोम, अग्नि, आदित्य, विष्णु, सूर्य, ब्रह्मा आणि बृहस्पतीला (अवसे गीर्भिः हवामहे) आमच्या रक्षणासाठीं बोलावतों. (४)

हे अग्ने ! (त्वं अग्निभिः) तूं अग्नींसह (नः ब्रह्म यज्ञं च वर्धय) आमचें ज्ञान आणि यज्ञ वाढव. हे देवा ! (त्वं नः दातवे दानाय रयिं चोदय) तूं आमच्या दानी पुरुषांना दान देण्यासाठीं धन पाठव. (५)

(उभौ इन्द्रवायू) इंद्र आणि वायु दोघेहि (सु-हवौ) उत्तम बोलावण्या योग्य आहेत. म्हणून (इह हवामहे) त्यांना येथें बोलवत आहोंत. (यथा नः सर्व इत् जनः) ज्यामुळें आमचे सर्व लोक (संगत्यां सुमनाः असत्) संगतींत उत्तम मनानें युक्त होवोत. (च नः) आणि आमचे लोक (दानकामः भुवत्) दान देण्याची इच्छा करणारे होवोत. (६)

अर्यमा, बृहस्पति, इंद्र, वायु, विष्णु, सरस्वती आणि (वाजिनं सवितारं) वेगवान् सवित्याला (दानाय चोदय) आम्हांस दान देण्यास प्रेरित कर. (७)

(वाजस्य प्रसवे संबभूविम) बलाच्या उत्पत्तींतच आम्हीं संघटित झालों आहोत. (च इमा विश्वा भुवनानि अन्तः) आणि हीं सर्व भुवनें त्यांच्यामध्यें आहेत. (प्रजाजनन्) जाणणारा (अदित्सन्तं उत दापयतु) दान न देणाऱ्यांना निश्चयपूर्वक दान देण्यास प्रेरणा करो. (च नः सर्ववीरं रयिं नियच्छ) आणि आम्हांस सर्व प्रकारच्या वीरभावानें युक्त असें धन देवो. (८)

भावार्थ— अर्यमा, भग, बृहस्पति, देवी आणि वाग्देवी हे सर्व आम्हांस धन देवोत. (३)

राजा सोम, अग्नि, आदित्य, विष्णु, सूर्य, ब्रह्मा आणि बृहस्पति यांचीं आम्ही प्रार्थना करतों की ते आमचें योग्य प्रकारें रक्षण करोत. (४)

हे अग्ने ! तूं अनेक अग्नींसह आमचें ज्ञान आणि कर्मशक्ति वाढव. हे देवा ! दान देणाऱ्या दात्यांना ते पुष्कळ दान देवोत एवढ्यासाठीं ते पुष्कळ धन देवोत. (५)

आम्हीं इंद्र आणि वायु या दोघांची प्रार्थना करतों. म्हणजे आमचे सर्व लोक संघटित भावनेनें एकत्र होतील आणि उत्तम मनाचे आणि दान देण्याची इच्छा करणारे होतील. (६)

अर्यमा, बृहस्पति, इंद्र, वायु, विष्णु, सरस्वती आणि बलवान् सविता हे सर्व दान देण्यासाठीं आम्हांस पुष्कळ द्रव्य देवोत. (७)

बल निर्माण करण्यास संघ स्थापतों. ज्याप्रमाणें हीं सर्व भुवनें आंतून संघटित झालेलीं आहेत, त्याप्रमाणें ही गोष्ट जाणून, ती जाणणाऱ्या कंजुष मनुष्यालाहि दान देण्याची प्रेरणा देवो आणि आम्हांस पुरेपूर वीरभावनेनें युक्त धन देवो. (८)

दुह्रां मे पञ्च प्रदिशो दुह्रामुर्वीर्यथाबलम् । प्रापेयं सर्वा आकूतीर्मनसा हृदयेन च ॥ ९ ॥
गोसनिं वाचमुदेयं वर्चसा माभ्युदिहि । आ रुन्धां सर्वतो वायुस्त्वष्टा पोषं दधातु मे ॥ १० ॥

अर्थ— (ऊर्वीः पञ्च प्रदिशः) या मोठ्या पांच दिशा (यथा बलं मे दुह्रां) यथाशक्ति मला बल देवोत, (मनसा हृदयेन च) मनानें आणि हृदयानें (सर्वाः आकूतिः प्रापयेयम्) सर्व संकल्प पूर्ण करूं शकूं. (९)

(गोसनिं वाचं उदेयं) इंद्रियांना प्रसन्न करणारी वाणी मीं बोलेन. (वर्चसा मां अभ्युदिहि) तेजासह मला प्रकाशित कर. (वायुः सर्वतः आ रुन्धाम्) प्राण मला सर्व बाजूंनीं घेरो. (त्वष्टा मे पोषं दधातु) त्वष्टा मला पुष्टि देत राहो. (१०)

भावार्थ— या महान् विस्तीर्ण पांच दिशा आम्हांस यथाशक्ति पोषक रस देवोत. ज्यामुळें आम्ही मनानें आणि हृदयानें बलवान् होऊन आमचे सर्व संकल्प पूर्ण करूं. (९)

प्रसन्नता वाणविणारी वाणी मीं बोलेन. तेजानें युक्त असा अभ्युदय मला प्राप्त होवो. सर्व बाजूंनीं माझे प्राण उत्साहित करोत आणि जगताची रचना करणारा देव मला सर्व प्रकारें पुष्ट करो. (१०)

तेजस्विता आणि अभ्युदय

अग्नीचा आदर्श

या सूक्तांत अग्नीच्या आदर्शानें मनुष्याचा अभ्युदय साधण्याच्या मार्गाचा उत्तम उपदेश केलेला आहे. या सूक्ताचें ध्येयवाक्य आहे–

वर्चसा मा अभ्युदिहि । (मं. १०)

' तेजासह माझा सर्व प्रकारें उदय कर.' ही प्रत्येक मनुष्याची इच्छा असली पाहिजे. हें साध्य सिद्ध करण्याचा आवश्यक मार्ग या सूक्तांत उत्तम प्रकारें सांगितला आहे. त्याचा विचार करण्यापूर्वी अग्नीच्या आदर्शानें जी गोष्ट दाखविली आहे ती आपण पाहूं.

' यज्ञांत जो अग्नि घेण्यांत येतो तो लाकडांतून निर्माण केलेला असतो. लांकडें स्वतः प्रकाशित असत नाहींत परंतु त्यांतून प्रगटलेला अग्नि (**जातः अरोचथाः ।**) (मं. १) उत्पन्न होतांच प्रकाशित होतो. त्यानंतर त्यास हवनकुंडांत स्थापित करतात. तेथें तो (**रोह**) (मं. १) स्वतःच वाढतो आणि दुसऱ्याला सुद्धां प्रकाशित करतो. त्यावेळीं त्याच्या चारी बाजूस ऋत्विज लोक (**गीर्भिः हवामहे ।**) (मं. ४) मंत्रपाठ करतात आणि हवन करतात. त्यावेळीं या अग्नीसह (**अग्निः अग्निभिः**) (मं. ५) अनेक हवनकुंडांत अनेक अग्नि प्रज्ज्वलित होतात. आणि त्यामुळें (**ब्रह्म यज्ञं च वर्धय ।**) (मं. ५) ज्ञान आणि यज्ञाची वृद्धि होते. यज्ञांत सर्व लोक (**जनः संगत्यां सुमनाः**) (मं. ६) एकत्र येऊन विचारपूर्वक कार्य करतात. तसेंच (**प्रसवे संबभूविम ।**) (मं. ८) ऐश्वर्यप्राप्तीसाठीं एकत्र येऊन कार्य करतात. आणि अशा प्रकारच्या यज्ञानें तेजस्वी होऊन स्वतःचा अभ्युदय सिद्ध करतात. '

ही यज्ञप्रक्रिया येथें संक्षेपतः सांगितली आहे. यांत लाकडांतून प्रगट झालेल्या यःकश्चित् ठिणगीचें यश कसें वाढतें आणि हा अग्नि प्रत्येक मनुष्याची उन्नति करण्यास किती समर्थ होतो ही गोष्ट वाचकांनीं पहावी. जर अग्नीची एक लहानशी ठिणगी तेजासह वाढून इतका अभ्युदय प्राप्त करूं शकते तर मनुष्यांत असलेली चैतन्याची ठिणगी याप्रमाणें प्रकाशाच्या मार्गानें पुढें जात केवढा अभ्युदय प्राप्त करूं शकेल, त्याचा विचार वाचकांनींच करावा. याविषयीं उपदेश पूर्वोक्त अग्नीच्या दृष्टान्तानें या सूक्तांत दर्शविला आहे.

उत्पत्तिस्थानाचें स्मरण

सर्वांत प्रथम आपल्या उत्पत्तिस्थानाचें स्मरण करण्याचा उपदेश पहिल्या मंत्रांत केला आहे. ' हें तुझें उत्पत्तिस्थान आहे, जेथें तूं उत्पन्न होतांच प्रकाशतोस, हें जाणून तूं स्वतःच पुढें होण्याचा प्रयत्न कर आणि आमची शोभा वाढव. ' (मं. १) हा उपदेश मनन करण्यासारखा आहे. उत्पत्तिस्थानें अनेक प्रकारचीं असतात. स्वतःचें कुळ, स्वतःची जात, स्वतःचा देश हीं सर्व स्थूल दृष्टीला दिसणारी उत्पत्तिस्थानें आहेत. या उत्पत्तिस्थानाचें स्मरण करीत उन्नति साधली पाहिजे. दुसरें उत्पत्तिस्थान अध्यात्मिक

आहे ज्याचा संबंध निसर्ग (प्रकृति) माता आणि परमात्मा (परमपिता) यांच्याशीं आहे. आपल्या अध्यात्मिक उन्नतीसाठीं त्याचें मनन करणें योग्य आहे. उत्पत्तिस्थानाचा विचार करतांना ' मी आलों कोठून आणि मला जावयाचें आहे कोठें ' त्याचा विचार करणें योग्य असतें ज्या कोणत्या स्थानीं उत्पत्ति झाली असेल तेथून स्वतःच्या शक्तीनें प्रकाशित व्हावयाचें, वाढावयाचें आणि दुसऱ्यास प्रकाशित करावयाचें.

(**इह अच्छा वद**) येथें सर्वांशी सरळ भाषण कर. (**प्रत्यङ् सुमनाः भव**) प्रत्येकाशीं उत्तम मनोभावानें वाग, तुझ्याजवळ जें असेल तें दुसऱ्याच्या कल्याणासाठीं (**प्रयच्छ**) दान कर. या दुसऱ्या मंत्रांतील तीन उपदेश वाक्शुद्धि, मनःशुद्धि, आत्मशुद्धीसाठीं अत्यंत उत्तम आहेत. या मार्गानेंच त्यांची पवित्रता होऊं शकते.

पुढील दोन मंत्रांत कोण कोणत्या शक्तींनीं आपणांस सहाय मिळते त्याचा उल्लेख केलेला आहे.

सर्व प्रथम (**देवीः**) देवी आणि मातांचें सहाय मिळतें. त्यांच्या कृपेवांचून मनुष्याचा उद्धार अशक्यच आहे. त्यानंतर (**सूनृता देवी**) सरळ वाणीनें सहाय प्राप्त होतें. मनुष्याजवळ सरळपणें भाषण करण्याची भावना नसली तर त्याची उन्नति होणें असंभवनीयच आहे. त्यानंतर (**अर्य+मन्=आर्य+मन्**) श्रेष्ठ मनानें जें सहाय्य मिळतें तें तर अपूर्वच होय. त्यानंतर (**बृहस्पतिः**) ज्ञानी आणि (**ब्रह्मा**) ब्रह्मज्ञानी हे सहाय करतात. त्यांत ब्रह्मा तर अंतिम स्थानापर्यंत मदत करतो. हे सर्व उन्नतीचे उपाय योग्य (**राजा अवसे**) राजाच्या अधिकाराखालींच शक्य होऊं शकतात. एरवीं अशक्य. त्याबरोबरच (**सोमः आदित्यः सूर्यः**) वनस्पति आणि सर्व शक्ति देणारा सूर्यप्रकाश हा बळ आणि आरोग्यवर्धक असल्यानें सहाय्यक आहे. आणि अंतीं महत्त्वाचें सहाय (**विष्णुः**) सर्वव्यापक देवतेचें, जो सर्वतोपरि असल्यानें सर्वांचा परिपालक आणि सर्वांचा चालक आहे आणि त्याचें सहाय्य सर्वांनांच आवश्यक आहे. जन्मापासून मुक्तीपर्यंत या प्रकारचें सहाय्य मिळतच असतें. आणि त्यांच्या सहाय्यानें मनुष्य स्वतःच्या उत्पत्तिस्थानापासून येथें येऊन येथून परत फिरतो तो तेथेंच पोहोंचतो. या शब्दांनीं सूचित होणाऱ्या दुसऱ्या अर्थाचाहि वाचकांनीं विचार करावा.

संभूय समुत्थान

या सूक्तांत एकतेचा पाठ स्पष्ट शब्दांनीं दिला आहे. (**वाजस्य नु प्रसवे संबभूविम**) (मं. ८) ' बलाच्या उत्पत्तीसाठीं आम्हीं आपली संघटना करतों. ' संभूय-समुत्थानाशिवाय शक्ति मिळूं शकत नाहीं. म्हणून स्वतः सहकारितेनें शक्ति वाढविण्याचा उपदेश येथें दिला आहे. (**सर्वो जनः संगत्यां सुमनाः असत्**) (मं. ६) सर्व लोक जेव्हां सहकार्य करूं लागतील तेव्हां ते परस्पर उत्तम मनानें व्यवहार करोत. ' जर असें ते करणार नाहींत तर संघशक्ति वाढणार नाहीं. हा उत्तम मानसिक सद्भावनेचा व्यवहार सिद्ध होण्यासाठीं (**ब्रह्म यज्ञं च वर्धय**) ' ज्ञान आणि आत्मसमर्पणाची भावना वाढवा (मं. ६). संघशक्तीसाठीं त्यांची फार आवश्यकता आहे. मनुष्याची उन्नति तर व्यक्तिशः आणि सांघिक व्हावयास हवी. यासाठीं प्रथम वैयक्तिक उन्नतीचा उपदेश देऊन नंतर सांघिक उन्नतीचा निर्देश केला आहे. याप्रकारें दोन्हीं मार्गांनीं उन्नति होईल तरच ती पूर्ण उन्नति होऊं शकेल. '

' **वाजस्य प्रसवे संबभूविम** ' (मं. ८) हा मंत्र अनेक दृष्टिबिंदूतून मनन करण्यासारखा आहे. येथें ' **वाजः** ' शब्दाचा अर्थ पहा– ' युद्धांत जय, अन्न, पाणि, शक्ति बल, धन, गति, वाणीचें बल, ' हे अर्थ ध्यानांत घेतले असतां, या मंत्रभागाचा अर्थ याप्रमाणें होतो– ' आम्ही युद्धांत विजय प्राप्त करण्यासाठीं संघटन करीत आहोंत. अन्न, जल, खाद्य पेय पदार्थ आणि धनादि ऐश्वर्योपभोगाचे पदार्थ प्राप्त करण्यासाठीं आपापसांत ऐक्य करतों. स्वतःच्या वाणीचें बळ वाढविण्यासाठीं म्हणजे आमच्या मताचा प्रभाव वाढविण्यासाठीं आमची संघटना करतों. आम्ही एकमतानेंच शब्द बोलूं आणि ते अधिक प्रभावशाली होतील. तसेंच आमची उन्नति आणि प्रगति यांचा वेग वाढविण्यासाठीं सुद्धां आम्हीं सहकार्य करूं. सद्भावना वाढवूं. ' वाचकांनीं या मंत्राचा विचार करतांना हा अर्थ अवश्य ध्यानीं घ्यावा.

उन्नतीस कंजुषपणाचा भाव घातक आहे. म्हणूनच म्हटलें आहे की (**अ-दित्सन्तं दापयतु ।**) (मं. ८) कृपणाला सुद्धां म्हणजे जो दान देत नाहीं त्याला दान देण्यास प्रवृत्त कर.' कारण उदारतेनें संघटना होते. आणि अनुदारतेनें बेदिली वाढते. आपणांजवळ धन तर असलेंच पाहिजे. परंतु तें (**सर्ववीरं रयिं नियच्छ**) (मं. ८) ' संपूर्ण वीरत्वाच्या गुणांसह धन पाहिजे. अन्य मार्गानें मिळविलेलें धन कोणी घेऊन जाईल, लुटलें जाईल. यासाठीं वीरतेनें धन मिळविण्याचा उपदेश येथें केला आहे.

याप्रकारें उन्नति केलेला मनुष्यच म्हणूं शकतो ' पांची दिशा मला यथाशक्ति बलप्रदान करोत आणि मनानें तसेंच हृदयानें जे संकल्प मीं करतों ते पूर्ण होवोत.' (मं. ९) त्याचे ते संकल्प निःसंदेह पूर्ण होतातच.

प्रत्येकाच्या मनांत अनेक संकल्प उठतात परंतु त्यांतील किती जणांचे सिद्धीस जातात. पाठीस प्रबल शक्ति असली तरच संकल्प

सिद्धीस जातात. अन्यथा संकल्पसिद्धि अशक्य आहे. या सूक्तांत संकल्पाचे पाठीशीं शक्ति उत्पन्न करण्याविषयीं मोठें आंदोलन प्रगट केलें आहे. त्याचा विचार वाचकांनीं अवश्य करावा. सूक्ताच्या सुरवातीपासूनच हा विषय घेण्यांत आला आहे.

' स्वतःच्या उत्पत्तिस्थानाचा विचार कर, स्वतःची उन्नति करण्यास कंबर कसून तयार हो. (मं. १) साधें सरळ भाषण करावें, मनांतील भाव उत्तम राखावेत. (मं. २) ज्ञान आणि त्यागाची भावना वाढवावी. (मं. ५) प्राप्त धनाचा विनियोग परोपकारांत करावा (मं. ५). सर्व मनुष्यांनीं उत्तम विचार धारण करावेत. ऐक्य वाढवावें आणि परोपकारास प्रवृत्त व्हावें (मं. ६). सामर्थ्य वाढविण्यास आपापसांत संघटन वाढवावें. (मं. ८) स्वतःमध्यें असलेल्या संकुचित विचारांस उदार बनवावें. (मं. ८) या सर्व पूर्व तयारीनंतरच मानसिक संकल्प सिद्धीस जाण्याची शक्यता आहे.' संकल्पापूर्वी इतकी सहायकशक्ति उत्पन्न व्हावयास हवी, तरच संकल्प सिद्धीस जाईल. असा विचार करून वाचकांनीं तशी शक्ति प्राप्त करण्याच्या कार्यास लागावें. त्यानंतर ' सर्व स्थानीं त्याला प्राणशक्तीचा साक्षात्कार होतो. सर्व स्थळीं त्यास पुष्टि मिळते. तो नेहमीं प्रसन्नता वाढविणारी भाषा बोलतो. म्हणजेच तो तेजस्वितेसह अभ्युदय प्राप्त करतो. (मं. १०) '

या दहाव्या मंत्रांत, ' **गोसनिं वाचं उदेयं** ' असें वाक्य आहे. ' गो ' चा अर्थ आहे. 'इंद्रिय, गाय, भूमि, प्रकाश, स्वर्ग सुख, वाणी, ' हे अर्थ घेतले असतां इंद्रियांची प्रसन्नता, वाणीची प्रसन्नता, प्रकाशाचा विस्तार, मातृभूमीचें सुख वगैरेचीं सिद्धता होवो अशी भाषा मीं बोलतो ' असा अर्थ त्यामुळें व्यक्त होतो. पुढें ' तेजस्वितेसह अभ्युदय प्राप्त करण्याचा विषय सांगितला आहे. त्याच्यासह ही प्रसन्नता वाढविणारी भाषा बोलणें हें किती आवश्यक आहे त्याचा विचार वाचकांनींच करावा. याप्रमाणें या सूक्तांतील वाक्यांचा परस्पर संबंध पाहून जर वाचक मनन करतील तर त्यांस विशेष बोध प्राप्त होईल.

या सूक्ताचें हें संक्षेपतः विवेचन आहे. वाचक जितका अधिक विचार करतील तितका अधिक बोध प्राप्त होईल. अधिक विचार करण्यास आवश्यक ते संकेत येथें दिले आहेत. म्हणून हें स्पष्टीकरण अधिक वाढविण्याची आवश्यकता नाहीं. अग्निवर्णनाच्या मिषानें केलेल्या सामान्य सूचना मनुष्याच्या उन्नतीच्या कशा निदर्शक होतात त्याचा अनुभव वाचकांनीं करावा. वेदाची ही एक अपूर्व शैली आहे.

तेजस्वितेची प्राप्ति

कांड ६, सूक्त ३८

(ऋषिः– अथर्वा वर्चस्कामः । देवता – त्विषिः, बृहस्पतिः)

सिंहे व्याघ्र उत या पृदाकौ त्विषिरग्नौ ब्राह्मणे सूर्ये या ।
इन्द्रं या देवी सुभगा जजान सा न ऐतु वर्चसा संविदाना ॥ १ ॥
या हस्तिनि द्वीपिनि या हिरण्ये त्विषिरप्सु गोषु या पुरुषेषु ।
इन्द्रं या देवी सुभगा जजान सा न ऐतु वर्चसा संविदाना ॥ २ ॥

अर्थ— (**या त्विषिः**) जें तेज (**सिंहे, व्याघ्रे, उत पृदाकौ**) सिंह, वाघ आणि साप यांच्यांत आहे. (**या अग्नौ, ब्राह्मणे, सूर्ये**) जें तेज अग्नि, ब्राह्मण, सूर्य यांच्यांत आहे (**या सुभगा देवी इन्द्रं जजान**) जें भाग्ययुक्त दैवी तेज इन्द्राला म्हणजे राजाला उत्पन्न करतें (**वर्चसा संविदाना सा नः ऐतु**) अन्न आणि बलानें युक्त होऊन तें तेज आम्हांस प्राप्त होवो. (१)

(**या त्विषिः**) जें तेज (**हस्तिनि द्वीपिनि**) हत्ती आणि वाघांत आहे (**या हिरण्ये, अप्सु, गोषु, पुरुषेषु**) जें तेज सोनें, पाणी, गायी आणि मनुष्यांत असतें, ज्या भाग्ययुक्त तेजानें राजा उत्पन्न होतो तें तेज आम्हांस प्राप्त होवो. (२)

रथे॑ अ॒क्षेषु॑ वृष॒भस्य॒ वाजे॒ वाते॑ प॒र्जन्ये॒ वरु॑णस्य॒ शुष्मे॑ ।
इन्द्रं॒ या दे॒वी सु॒भगा॑ ज॒जान॒ सा न॒ ऐतु॒ वर्च॑सा संविदा॒ना ॥ ३ ॥
रा॒ज॒न्ये॑ दुन्दु॒भावाय॑तायामश्व॑स्य॒ वाजे॒ पुरु॑षस्य मा॒यौ ।
इन्द्रं॒ या दे॒वी सु॒भगा॑ ज॒जान॒ सा न॒ ऐतु॒ वर्च॑सा संविदा॒ना ॥ ४ ॥

अर्थ-(**रथे अक्षेषु ऋषभस्य वाजे**) जें तेज रथ, अक्ष, आणि बैलाच्या शक्तींत आहे, आणि (**वाते पर्जन्ये वरुणस्य शुष्मे**) वायु पर्जन्य आणि वरुणाच्या सामर्थ्यांत आहे आणि ज्यामुळें राजा उत्पन्न होतो तें तेज आम्हांस प्राप्त होवो. (३)

जें तेज (**राजन्ये आयतायां दुन्दुभौ**) क्षत्रियांत आणि खेंचलेल्या नगाऱ्यांत असतें आणि (**अश्वस्य वाजे पुरुषस्य मायौ**) घोड्याच्या शक्तींत आणि मनुष्याच्या चित्तांत जें बल असतें, ज्यामुळें राजा निर्माण होतो तें तेज मला प्राप्त होवो. (४)

तेजस्वितेची प्राप्ति

तेजाचीं स्थानें

या सूक्तांत तेज कोठें असतें त्याचें उत्तम वर्णन आहे. मनुष्यानें त्यांना गुरु केलें पाहिजे आणि त्यांच्यापासून बोध प्राप्त केला पाहिजे-

१. **सिंहः**- सिंहांत तेज आहे म्हणून तर त्यास वनाचा राजा म्हणतात. सिंहाची उग्रता पाहून सामान्य मनुष्य त्याच्यासमोर उभा राहूं शकत नाहीं.

२. **व्याघ्रः**- वाघसुद्धां तेजस्वी असतो. त्याची उग्रता प्रसिद्धच आहे. यामुळेंच उग्र प्रकृतीच्या मनुष्याला ' नरसिंह अथवा नरव्याघ्र म्हणतात. कारण कीं हे पशु अन्य पशूपेक्षां अत्यंत तेजस्वी असतात.

३. **पृदाकुः**- सापसुद्धां फार तेजस्वी असतो. चपल आणि उग्र असतो.

४. **अग्निः**- अग्नीचें तेज, प्रकाश, उष्णता सर्वांस माहित आहेच.

५. **ब्राह्मणः**- ब्राह्मणांमध्यें ज्ञान आणि विज्ञानाचें बल असतें.

६. **सूर्यः**- सूर्य तर सर्व तेजाचें केंद्रच आहे. त्याच्या इतका तेजस्वी पदार्थ दुसरा एकहि नाहीं.

७. **हस्तिः**- हत्तींमध्यें गंभीरपणाचें तेज आहे. त्याची शोभा महान् उत्सवांत दिसते. त्याची शक्तिसुद्धां महान् असते.

८. **द्वीपिः**- हें नांव वाघ अथवा तरसाचें आहे. हा प्राणीसुद्धां उग्र आणि तेजस्वी असतो.

९. **हिरण्यं**- सोन्याचें तेज तर सर्व जाणतात.

१० **आपः**- पाणी सुद्धां तेजस्वी असतें. ' त्याच्यांत पाणी नाहीं. ' असा भाषेचा रूढ प्रयोग एखाद्या निस्तेज मनुष्याबद्दल करतात. पाण्यांत तेज असल्यानेंच हा शब्द जीवन या अर्थी सुद्धां योजतात.

११. **गौः**- गायींत तेज आहे. गायीच्या चपलतेची जर म्हशीच्या मंदपणाशी वाचक तुलना करतील तर त्यांना गायीचें तेज कळून येईल.

१२. **पुरुषः**- मनुष्यांत तेज असतेंच.

१३. **वृषभः**- याच्या तेजाचा अनुभव सर्वांना आलेला असतो. मनुष्यांत श्रेष्ठ असेल त्याला ' **नरर्षभः** ' म्हणजे मनुष्यांत बैलासारखा असें म्हणतात, बैल मोठा बलवान् आणि तेजस्वी असतो.

१४. **वायुः पर्जन्यः**- वायु जरी अदृश्य आहे तरी तो प्राणरूपानें शरीरांत तेजाला स्थापित करतो. प्राणावांचून मनुष्य निस्तेज होतो. पर्जन्य पाणीरूपानें सर्वांस जीवन (पाणी) देतो.

१५. **क्षत्रियः**- क्षत्रियामध्यें इतर मनुष्यापेक्षां जास्त तेज आणि उग्रता असते. तसेंच क्षत्रिय राज्याचें शासन करूं शकतो.

१६. **दुन्दुभिः, अश्वः**- नगारा वाजतांच मनुष्याच्या मनांत पुष्कळ उत्साह वाढतो. घोडा सुद्धां प्रभावशाली असतो.

वाचकांनीं विचार केला तर त्यांच्या ध्यानीं येईल कीं या सर्वांत निरनिराळया प्रकारचें तेज असतें. आणि हीं सर्व प्रकारचीं तेजें मनुष्यांत स्थिर व्हावयास हवींत. भिन्न भिन्न तेजाच्या कल्पनेसाठीं पहा- सूर्य, चन्द्र, विद्युत्, अग्नि या सर्वांमध्यें तेज आहे पण तें परस्पर भिन्न आहे. प्रत्येक पदार्थाच्या तेजांत भिन्नता असते. वाघाचें आणि गाईचें तेज परस्पर भिन्न आहे. मनुष्यानें विचार करून त्यांची तेजें स्वतःमध्यें धारण करण्याचा प्रयत्न करावा.

अग्नींत तेज आहे. त्याची गति ऊर्ध्व दिशेकडे असते. तो स्वतः जळतो आणि दुसऱ्यास प्रकाशित करतो. तो नेहमीं उग्र स्थितींत असतो. त्याप्रमाणें मनुष्यानें स्वतःमध्यें तेज वाढविलें पाहिजे. म्हणजे मनुष्यानें तेजस्वी झालें पाहिजे. उच्चस्थितीकडे स्वतःची प्रगति करावी, स्वतः कष्ट सहन करावे आणि इतरांना प्रकाशित करावें आणि नेहमीं उग्र होऊन रहावें. अग्नीच्या तेजापासून मनुष्यानें हा उपदेश घ्यावा. याचप्रमाणें दुसऱ्या सर्व तेजाविषयीं जाणावें. वाचकांनीं प्रत्येकाच्या तेजस्वितेपासून मिळविण्याचा बोध मिळवून स्वतः तेजस्वी व्हावें.

या जगांत प्रत्येक पदार्थ मनुष्यास बोध देण्यासाठीं तत्पर आहे. परंतु मनुष्य तो बोध स्वीकारण्यास तयार असला पाहिजे. जर वाचक याप्रमाणें या सूक्ताचा जास्त विचार करतील तर त्यांस खचितच पुष्कळ बोध मिळेल. बोध घेण्याच्या दृष्टीनें हें सूक्त पुष्कळच महत्त्वपूर्ण आहे.

अभ्युदयाची दिशा

कांड ३, सूक्त २७

(ऋषिः– अथर्वा । देवता – अग्न्यादयः)

प्राची दिगग्निरधिपतिरसितो रक्षितादित्या इषवः ।
तेभ्यो नमोऽधिपतिभ्यो नमो रक्षितृभ्यो नम इषुभ्यो नम एभ्यो अस्तु ।
योऽस्मान्द्वेष्टि यं वयं द्विष्मस्तं वो जम्भे दध्मः ॥ १ ॥

अर्थ— (प्राची दिशा) पूर्व दिशेचा (अग्निः अधिपतिः) तेजस्वी स्वामी (अ-सितः रक्षिता) बंधनरहित रक्षक आणि (आदित्याः इषवः) प्रकाशरूप शस्त्र आहे. (तेभ्यः) त्या (अधिपतिभ्यः) तेजस्वी स्वामींनां सुद्धां (नमः) माझा नमस्कार असो. (रक्षितृभ्यः नमः) बंधनरहित संरक्षकांसाठीं आम्हीं आदर बाळगितों (इषुभ्यः नमः) प्रकाशाच्या शस्त्रांसमोर सुद्धां आम्हीं नम्र होतों. (यः) जो एकटा (अस्मान्) आम्हा सर्व आस्तिकांचा (द्वेष्टि) द्वेष करतो आणि (यं) ज्या एकट्या दुष्टाचा (वयं) आम्हीं सर्व धार्मिक पुरुष (द्विष्मः) द्वेष करतों (तं) त्या दुष्टाला आम्हीं सर्व (वः) तुम्हां सर्व सज्जनांच्या (जंभे) न्यायाच्या जबड्यांत (दध्मः) सोंपून देतों. (१)

भावार्थ— प्राची दिशा, अभ्युदय, उदय आणि उन्नतीची सूचक आहे. सूर्य, चंद्र, नक्षत्रें वगैरे सर्व दिव्य पदार्थांचा उदय आणि उन्नति या दिशेकडूनच होतात. आणि उदय झाल्यानंतर त्यांना पूर्ण प्रकाशाची अवस्था प्राप्त होते. म्हणजे खरोखर ही प्रगतीची दिशा आहे. ज्याप्रमाणें या उदयाच्या दिशेकडून सर्वांचा उदय आणि वर्धन होत आहे त्याचप्रमाणें आम्हा सर्व मनुष्यांचा अभ्युदय आणि संवर्धन व्हावयास हवें. ही पूर्व दिशा सर्व मनुष्यांस उदय प्राप्त करण्याची सूचना देत आहे. या सूचनेप्रमाणें आपण सर्व मिळून अभ्युदयाची तयारी केली पाहिजे. सूचना आणि शिक्षण ग्रहण करून मीं माझा स्वतःचा तसेंच जनतेचा अभ्युदय साध्य करण्याचा अवश्य प्रयत्न करीन. उदयाच्या दिशेचा (**अग्निः**) अग्रणी ज्ञानी, आणि वक्ता अधिपति आहे. उदयाचा मार्ग ज्ञानी उपदेशकाकडूनच ज्ञात होऊं शकतो म्हणून आम्हीं सर्व लोक ज्ञानी उपदेशकापाशीं जाऊन, खूपच जागरूक राहून त्याचा उपदेश ग्रहण करूं. आतां झोंपण्याचा काळ नाहीं. उठा ! जागृत होण्याच्या समयाचा प्रारंभ झाला आहे. चला ! तेजस्वी ज्ञानयुक्त गुरूंजवळ जाऊं आणि त्यांच्याजवळून ज्ञानाचा प्रकाश प्राप्त करूं. या उदयाच्या दिशेला (अ-सितः) बंधनापासून दूर रहाणारा, स्वतंत्रतेचा विचार धारण करणाराच रक्षक होऊं शकतो. ज्ञान्याबरोबर रहाण्यानें ज्ञान आणि स्वतंत्रतेच्या रक्षकाबरोबर रहाण्यानें स्वातंत्र्याची प्राप्ति होऊं शकते. स्वतंत्रतेवांचून उन्नति होऊं शकत नाहीं. म्हणून स्वातंत्र्याचें रक्षण करणें आवश्यक आहे. या संरक्षणाचीं शस्त्रास्त्रें (**आदित्याः**) प्रकाशाचीं किरणें आहेत. प्रकाशाबरोबर स्वातंत्र्य रहात असतें. विशेषतः ज्ञानाच्या प्रकाशानें, स्वातंत्र्याचें संवर्धन व्हावयास हवें. प्रकाश ज्याप्रमाणें अज्ञानाचा नाश करतो, त्याचप्रमाणें ज्ञानसूर्य अज्ञानास घेऊन टाकणाऱ्या अंधःकारमय प्रतिबंधांना दूर करतो. अभ्युदय प्राप्त करण्यासाठीं स्वसंरक्षण होणें अत्यावश्यक आहे आणि प्रतिबंध दूर केल्यानें आपणांत स्वसंरक्षणशक्ति वाढते. तेजस्विता, ज्ञान, वक्तृत्व, आत्मसंमान वगैरे अग्निगुणांच्या आधिपत्यानें अभ्युदय साधतां येतो. यासाठीं तेजस्वी अधिपति, स्वतंत्रतेचे संरक्षक आणि प्रतिबंध निवारक प्रकाशमयशक्तीचा आम्हीं आदर करतों. त्यापेक्षां विरुद्ध गुण ज्यांच्यांत आहेत त्यांचा आम्हीं कधीं आदर करणार नाहीं.

दक्षिणा दिगिन्द्रोऽधिपतिस्तिरश्चिराजी रक्षिता पितर इषवः ।
तेभ्यो नमोऽधिपतिभ्यो नमो रक्षितृभ्यो नम इषुभ्यो नम एभ्यो अस्तु ।
योऽस्मान्द्वेष्टि यं वयं द्विष्मस्तं वो जम्भे दध्मः ॥ २ ॥
प्रतीची दिग्वरुणोऽधिपतिः पृदाकू रक्षितान्नमिषवः ।
तेभ्यो नमोऽधिपतिभ्यो नमो रक्षितृभ्यो नम इषुभ्यो नम एभ्यो अस्तु ।
योऽस्मान्द्वेष्टि यं वयं द्विष्मस्तं वो जम्भे दध्मः ॥ ३ ॥

अर्थ-(दक्षिणा दिक्) दक्षतेच्या दिशेचा (इन्द्रः अधिपतिः) शत्रुनाशक शूर स्वामी अधिपति (तिरश्चिराजी रक्षिता) मर्यादेचें उल्लंघन न करणारा संरक्षक आणि (पितरः इषवः) पितृशक्ति म्हणजे प्रजजनशक्तीचें शस्त्र आहे. आम्ही सर्व त्या शत्रुनिवारक शूर अधिपतींना, स्वतःच्या मर्यादेचें कधीं अतिक्रमण न करणाऱ्या संरक्षकांना तसेंच सुप्रजा-निर्माणासाठीं समर्थ पितृशक्तींचा सुद्धां आम्हीं आदर करतों. जे आम्हां आस्तिकांचा विरोध करतात आणि ज्यांचा आम्हीं सर्व आस्तिक विरोध करतों त्यांना आम्हीं सर्व आपणांसारख्या स्वामी आणि संरक्षकांच्या न्यायाच्या जबड्यांत सोंपून देतों. (२)

(प्रतीची दिक्) पश्चिम दिशेचा स्वामी (वरुणः अधिपतिः) अर्थात् श्रेष्ठ अधिपति (पृत्-आ-कुः रक्षिता) स्पर्धेत उत्साह धारण करणारा संरक्षक आणि (अन्नं इषवः) अन्न बाण आहेत. त्या श्रेष्ठ अधिपतीसाठीं त्या उत्साही संरक्षकांसाठीं तसेंच त्या अभीष्ट अन्नासाठीं आम्हीं आदर बाळगतों. जे आम्हां सर्वांशीं कलह करतात, त्यामुळें सर्व भद्र पुरुष ज्यांचा विरोध करतात, त्यांस अशा उक्त अधिकाऱ्यांच्या आणि संरक्षकांच्या न्यायाच्या जबड्यांत आम्हीं सोंपून देतों. (३)

भावार्थ — जो एकटा दुष्ट मनुष्य सर्व धार्मिक आणि भद्र पुरुषांस पीडा देतो, त्याच्या प्रगति आणि उन्नतींत विघ्न करतो, तसेंच तो दुष्ट आहे हें सर्व भद्र पुरुषांस मान्य असतें, माहित असतें. अर्थात् तो खरोखरच दुष्ट असतो, त्यास शिक्षा करण्याचें कार्य सुद्धां आम्हीं हातीं घेऊं इच्छित नाहीं, परंतु हे तेजस्वी स्वामीनों ! आणि स्वातंत्र्य अर्पणाऱ्या संरक्षकांनो ! आपल्या न्यायाच्या जबड्यांत आम्ही सर्व त्यास सोंपून देतों. जो दंड त्यास देणें योग्य असेल तो तुम्हींच त्यास द्या. समाजाच्या शांतीस हें आवश्यक आहे. अत्यंत दुष्ट आणि अपराधी व्यक्तीस सुद्धां शिक्षा करण्याचा अधिकार स्वतःच्या हातांत न घेतां त्या अपराध्याला अधिपति आणि संरक्षक न्यायसभेसमोर उभा करावा म्हणजे पूर्वोक्त अधिपति आणि संरक्षक ज्यांचा आम्हीं नेहमीं आदर करतों, ते त्याचा योग्य न्याय करतील आणि त्यास शिक्षा देतील. प्रत्येक मनुष्यानें न्यायाचा विजय व्हावा म्हणून तत्पर राहिलें पाहिजे. (१)

दक्षिण दिशा दाक्षिण्याचा मार्ग सूचविते. दक्षता, चातुर्य, कौशल्य, कर्मप्रविणता, शौर्य, धैर्य, वीर्य, इत्यादि शुभ गुणसूचक ही दिशा आहे. यासाठींच शरीराच्या उजव्या बाजूस दक्षिणांग म्हणतात. आणि सरळ मार्ग म्हणजे दक्षिण मार्ग, या दक्षिणदिशेनेंच दाखविण्यांत येतो. म्हणजे दक्षिणदिशेनें सरल मार्गाची सूचना मिळते. शत्रूंचें निवारण करणारे, स्वतःच्या नियमांच्या मर्यादेचें उल्लंघन करणारे आणि उत्तम प्रजा निर्माण करण्याची शक्ति असलेले अनुक्रमें या मार्गाचे अधिपति, संरक्षक आणि सहायक आहेत. त्यांचा आदर आणि सन्मान करणें योग्य आहे. स्वतःच्या उन्नतीचें साधन करण्यासाठीं, (इन्-द्र) शत्रूंना विदारण करण्याचा आवश्यकता असते. शत्रूचा पराजय केल्यानें आपला मार्ग निष्कंटक होतो. शत्रूशीं युद्ध केल्यानें आपलें बळ वाढतें. आणि शत्रूचें दमन केल्यानें आपणांतील उत्साह स्थिर रहातो. म्हणून माझ्या आणि समाजाच्या शत्रूंचें शमन करण्यासाठीं उपायांचें अवलंबन करणें माझ्यासाठीं आवश्यक गोष्ट आहे. समाजाच्या शांतीसाठीं स्वतःच्या मर्यादेचें उल्लंघन न करणाऱ्या संरक्षकांची आवश्यकता आहे. कोणी संरक्षकानें स्वतःच्या मर्यादेचें उल्लंघन करून अत्याचार करूं नये. मीं सुद्धां माझ्या मर्यादांचें आणि नियमांचें उल्लंघन करणार नाहीं. समाजाच्या सुस्थितीसाठीं, उत्तम प्रजा निर्माण करण्याच्या शक्तींची, उत्तम पितृशक्तीची आवश्यकता आहे. सुप्रजा निर्माण झाल्यानें समाज अमर राहूं शकतो. यासाठीं प्रत्येक पुरुषांत उत्तम पुरुषत्व आणि प्रत्येक स्त्रींत उत्तम स्त्रीत्व विकास पावलें पाहिजे. तात्पर्य एक प्रकारचे शत्रुनिवारक अधिपति, नियमानुकूल व्यवहार करणारे संरक्षक, आणि उत्तम पितर जेथें असतात तेथेंच दाक्षिण्य व्यवहार असतो. अशा प्रकारची व्यवस्था अवश्य सुदृढ करण्याचा मीं प्रयत्न करीन. जो सर्वांस हानिकारक आहे आणि ज्याला समाज खराब म्हणतो त्याला उक्त अधिकारी, संरक्षक आणि सहायक पितरांच्या न्यायालयांत आम्हीं सर्व पोहोंचवितों. तेच त्याच्या दोषांचा योग्य विचार करतील. प्रत्येक मनुष्यानें सरळ मार्गानें चालावें आणि समाजाच्या उन्नतीसह स्वतःची उन्नति उत्तम प्रकारें साध्य करावी. (२)

उदीची दिक्सोमोऽधिपतिः स्वजो रक्षिताशनिरिषवः ।
तेभ्यो नमोऽधिपतिभ्यो नमो रक्षितृभ्यो नम इषुभ्यो नम एभ्यो अस्तु ।
योऽस्मान्द्वेष्टि यं वयं द्विष्मस्तं वो जम्भे दध्मः ॥ ४ ॥
ध्रुवा दिग्विष्णुरधिपतिः कल्माषग्रीवो रक्षिता वीरुध इषवः ।
तेभ्यो नमोऽधिपतिभ्यो नमो रक्षितृभ्यो नम इषुभ्यो नम एभ्यो अस्तु ।
योऽस्मान्द्वेष्टि यं वयं द्विष्मस्तं वो जम्भे दध्मः ॥ ५ ॥

अर्थ- (उदीची दिक्) उत्तर दिशेचा (सोमः अधिपतिः) शांत अधिपति (स्व-जः रक्षिता) स्वतःसिद्ध रक्षक आणि (अशनिः इषवः) विद्युत् हे बाण होत. त्या शांत अधिपति, स्वयंसिद्ध संरक्षक आणि तेजस्वी इषूंना आमचें वंदन असो. जे सर्वांचा द्वेष करतात, आणि ज्यांचा सर्व द्वेष करतात, त्यांस उक्त अधिकारी आणि संरक्षकांच्या न्यायाच्या जबड्यांत आम्हीं सोंपून देतों. (४)

(ध्रुवा दिक्) स्थिर दिशेचा (विष्णुः अधिपतिः) सर्वत्र प्रवेश करणारा अधिपति (कल्माष-कर्मास-ग्रीवः रक्षिता) कर्मकर्ता संरक्षक आणि (वीरुधः इषवः) वनस्पति इषु आहेत. या सर्व अधिपति आणि रक्षकाविषयीं आम्हांस आदरभाव आहे. (५)

भावार्थ—पश्चिम दिशा, विश्रामाची दिशा आहे. कारण चंद्र, सूर्य वगैरे दिव्यज्योति या पश्चिमदिशेस जाऊन आराम करतात, गुप्त होतात म्हणजे अशा प्रकारें ते मनुष्यांस जगांतील स्वतःचीं कामें संपवून त्यानंतर विश्राम घेण्याची सूचना देतात. पूर्वदिशेकडून प्रवृत्तिरूप पुरुषार्थाची सूचना मिळाली. आतां पश्चिम दिशेकडून गुप्तस्थानांत प्रवेश करण्याची, तेथें विश्रांति आणि शांति प्राप्त करण्याची अर्थात् निवृत्तिरूप पुरुषार्थ साध्य करण्याची सूचना मिळते. श्रेष्ठ, उत्साही, महात्मे या मार्गाचे अनुक्रमें अधिपति संरक्षक, आहेत. विश्राम आणि आरामाचें मुख्य साधन येथें अन्न आहे. श्रेष्ठ आणि उत्साही अधिपति आणि संरक्षकांचा सर्वांनीं आदर आणि सत्कार करावा हें योग्य होय. त्याचप्रमाणें अन्नाकडेहि सन्मान्य दृष्टीनें पहावें. जे सर्वांच्या मार्गांत विघ्नें करतात त्यामुळें ज्यांना कोणी जवळ येऊं देण्यास तयार नाहीं, त्यांस अधिपति आणि संरक्षकांच्या न्यायसभेच्या आधीन करणें योग्य आहे. समाजाच्या हितासाठीं त्यांनीं न्यायानेंच स्वतःचें आचरण ठेवावें आणि कोणास उपद्रव करूं नये हें त्यांना उचित होय. (३)

उत्तरदिशा उच्चतर स्थितीची सूचक आहे. प्रत्येक मनुष्यानें स्वतःची स्थिति उच्चतर करण्याचा प्रयत्न प्रत्येकवेळीं केला पाहिजे. या उच्चतर मार्गांत शांत स्वभावाचें आधिपत्य आहे. आळसाचा त्याग करून नेहमीं सिद्ध आणि उद्यत राहून धर्मपूर्वक या मार्गावर चालणाऱ्याचें संरक्षण होतें. व्यापक उदार, तेजस्वी स्वभावानें या मार्गावरील सर्व आपत्ति दूर होतात. म्हणून मी या गुणांना धारण करीन. आणि शांत स्वभाव धारण करणारा अधिपति, सदा सिद्ध आणि उद्योगरत संरक्षक हे नेहमींच सन्माननीय आहेत. यांबरोबर सर्वोपयोगी व्यापक तेजस्वीतेचा आदर होणें हें मुद्दा योग्य आहे. जो सर्वांची हानि करतो आणि सज्जन ज्याचा आदर करीत नाहींत त्याला वर सांगितलेल्या अधिपति आणि संरक्षकांसन्मुख उभा करण्यांत यावें. ते लोक स्वतःच त्यास शिक्षा करोत. अधिपति निःपक्षपातीपणें त्याचा न्याय करोत. समाजाची उच्चतर स्थिति करण्यासाठीं अशा प्रकारचा स्वभाव बनविण्याची फार आवश्यकता आहे. (४)

ध्रुवदिशा, स्थिरता, दृढता, आधार इत्यादि शुभ गुणांची सूचक आहे. चंचलतेस दूर करून स्थिरता सिद्ध करण्यासाठींच सर्व नियम असतात. उद्यमी आणि पुरुषार्थी पुरुष येथील अधिपति आणि संरक्षक आहेत. कारण कर्म करण्यानेंच जगाची स्थिरता टिकते म्हणून कर्मावांचून कोणाची स्थिरता किंवा दृढता होऊं शकत नाहीं. या दृढतेच्या मार्गाचे संचालक उद्यमी आणि पुरुषार्थी लोकच आहेत. औषधि आणि वनस्पति या दोष निवारण करून त्यांस सहाय्य करतात. जे दोष दूर करणारे आहेत ते सर्व या मार्गाचे सहायक आहेत. उद्यमी आणि पुरुषार्थी अधिपति आणि संरक्षकांचा सन्मान सर्वांनीं करावा हें योग्य होय. (५)

ऊर्ध्वा दिग्बृहस्पतिरधिपतिः श्वित्रो रक्षिता वर्षमिषवः ।
तेभ्यो नमोऽधिपतिभ्यो नमो रक्षितृभ्यो नम इषुभ्यो नम एभ्यो अस्तु ।
योऽस्मान्द्वेष्टि यं वयं द्विष्मस्तं वो जम्भे दध्मः ॥ ६ ॥

अर्थ— (ऊर्ध्वा दिक्) ऊर्ध्व दिशेचा (बृहस्पतिः अधिपतिः) आत्मज्ञानी स्वामी आहे. (श्वित्रः रक्षिता) पवित्र संरक्षक आहे आणि (वर्ष इषवः) अमृत जल बाण आहेत. आत्मज्ञानी स्वामी आणि पवित्र संरक्षकांचाच सर्वांनी सन्मान केला पाहिजे. शुद्ध अमृत जलाचाहि सर्वांनी सन्मान करावा. (६)

भावार्थ– ऊर्ध्व दिशा आत्मिक उन्नतेचा मार्ग सुचविते. खरा आत्मज्ञानी आप्त पुरुषच या मार्गांचा अधिपति आणि मार्गदर्शक आहे. जो अंतर्बाह्य पवित्र असेल तोच येथील संरक्षक होऊं शकेल. आत्म्याचा अनुभव आणि त्याचें पावित्र्य यांचें येथें स्वामित्व आहे. आत्मिक उच्चतेचें अवलंबन करतांना आत्मज्ञानी आप्तपुरुषाच्या आधिपत्यांत तसेंच सदाचारी सत्पुरुषाच्या संरक्षणांत राहून या मार्गाचें आक्रमण करण्यानें इष्ट सिद्धीची प्राप्ति होते. आत्मिक अमृत जलाचा रसास्वाद घेण्याचा हाच एक योग्य मार्ग आहे. मीं या मार्गाचें अवलंबन अवश्य करीनच. आणि दुसऱ्यांच्या मार्गास सुद्धां यथाशक्ति सुगम करीन. मीं नेहमीं वर सांगितलेल्या सदाचारी आणि संयमी आत्मज्ञानी आणि शुद्ध पवित्र आचरणाच्या पुरुषांचा सन्मानच करीन. (६)

अभ्युदयाची दिशा

दिशांच्या वर्णनानें मानवी उन्नतीचें तत्त्वज्ञान

उन्नतीचीं सहा केंद्रें

या सूक्तांतील सहा मंत्रांत मानवी उन्नतीचीं सहा केंद्रें दिशांनीं सूचित केलीं आहेत. (१) प्राची, (२) दक्षिण, (३) प्रतीची, (४) उदीची, (५) ध्रुवा, (६) ऊर्ध्वा या सहा दिशा क्रमानें (१) प्रगति, (२) दक्षता, (३) विश्राम, (४) उच्चता, (५) स्थिरता, (६) आणि आत्मिक उन्नतीचा भाव दाखवतात. असें जें वरील सहा मंत्रांनीं सूचित केलें आहे तें विशेष विचार करण्यायोग्य आहे. उपासकांनीं या दिशांमध्यें होणाऱ्या नैसर्गिक घटना विचाराच्या दृष्टीनें पहाव्यात. या सृष्टीच्या विविध घटनांच्या योगें सर्वव्यापक परमात्मा प्रत्यक्ष उपदेश देत आहे. अशी भावना मनांत स्थिर करून उपासकांनीं सृष्टीकडे पहाणें आवश्यक आहे. या सृष्टींत जड भाव नाहीं परंतु परमात्म्याच्या चैतन्य शक्तीनें हीं सृष्टि ओतप्रोत भरली आहे, अशी भावना मनांत स्थिर केली पाहिजे. कारण कीं, ' ही समग्र सृष्टि पूर्ण परमेश्वरामुळेंच उदय पावली आहे आणि ती संपूर्ण ईश्वराची शक्तीच या सृष्टींत दिसत आहे. ' याप्रमाणें स्थिर विचारानें जे उपासक सांगितलेल्या सहा दिशांकडून स्वतःच्या उन्नतीच्या सहा केंद्रासंबंधीं उपदेश ग्रहण करतील तर व्यक्ति आणि समाजाच्या उन्नतीच्या स्थिर आणि निश्चित मार्गाचें ज्ञान त्यांना होऊं शकेल.

या केंद्रांचें उत्तम प्रकारें ज्ञान मिळावें यासाठीं पूर्वोक्त वैदिक सूक्तांत सांगितलेल्या दिशांच्या ज्ञानासाठीं कोष्टक येथें दिलें आहे. आणि त्यांचें स्पष्टीकरण पण काव्य दृष्टीनें संक्षिप्त रीतीनें करतों.

दिशा कोष्टक (१) [अथर्व ३।२७।१–६]

दिशः	अधिपतिः	रक्षिता	इषवः
प्राचीः	अग्निः	असितः	आदित्यः
दक्षिणा	इन्द्रः	तिरश्चिराजी	पितरः
प्रतीची	वरुणः	पृदाकुः	अन्नम्
उदीची	सोमः	स्वजः	अशनिः
ध्रुवा	विष्णुः	कल्माषग्रिवः	वीरुधः
ऊर्ध्वा	बृहस्पतिः	श्वित्रः	वर्षम्

या सूक्तांतील मंत्रांचा अभ्यास केल्यानें या कोष्टकांचें ज्ञान होऊं शकतें. आतां वेदांत अन्य स्थानीं आलेल्या दिशा विषयक उल्लेखांचा विचार करावयाचा आहे. याविषयीं खालीं लिहिलेले मंत्र पहा—

येऽस्यां स्थ प्राच्यां दिशि हेतयो नाम देवास्तेषां वो अग्निरिषवः । ते नो मृडत ते नोऽधिब्रूत तेभ्यो वो नमस्तेभ्यो वः स्वाहा ॥१॥ येऽस्यां स्थ दक्षिणायां दिश्यविष्यवो नाम देवास्तेषां वः काम इषवः । ते नो० ॥२॥ येऽस्यां स्थ प्रतीच्यां दिशि वैराज नाम देवास्तेषां व आप इषवः । ते नो० ॥ ३ ॥ येऽस्यां स्थोदीच्यां दिशि प्रविध्यन्तो नाम देवास्तेषां वो वात इषवः । ते नो० ॥ ४ ॥ येऽस्यां स्थ ध्रुवायां दिशि निलिम्पा नाम देवास्तेषां व ओषधीरिषवः । ते नो० ॥ ५ ॥ येस्यां स्थोर्ध्वायां दिश्यवस्वन्तो नम देवास्तेषां वो बृहस्पति रिषवः। तेनो० ॥ ६ ॥ (अथर्व ३।२६।१-६)

' प्राची वगैरे दिशामध्यें हेति इत्यादि देव आहेत आणि अग्नि वगैरे इषु आहेत. हे सर्व (**नः**) आम्हां सर्वांस (**मृडत**) सुखी करोत ते आम्हां सर्वांस (**अधिब्रूत**) उपदेश देवोत. त्या सर्वांस आमचा नमस्कार असो. त्यांच्यासाठी आमचें हें समर्पण आहे. ' असा या मंत्रांचा भावार्थ आहे. आतां त्याचें खालीं दिल्याप्रमाणें कोष्टक तयार करूं—

दिशाकोष्टक '(२)' [अथर्ववेद ३।२६।१-६]

दिशः	देवाः	इषवः
प्राची	हेतयः	अग्निः
दक्षिणा	अविष्यवः	कामः
प्रतीची	वैराजा	आपः
उदीची	प्रविध्यन्तः	वातः
ध्रुवा	निलिंपाः	औषधीः
उर्ध्वा	अवस्वन्तः	बृहस्पति

पहिल्या कोष्टकाची या दुसऱ्या कोष्टकाशीं तुलना करूं. पहिल्या कोष्टकांत ' प्राची आणि ऊर्ध्वा ' याचे ' अग्नि आणि बृहस्पति ' हे अधिपति आहेत. तेच येथें बाण (इषु) बनले आहे. ' ध्रुवा ' दिशेचे इषु पहिल्या कोष्टकांत ' वीरुधः ' आहेत आणि येथें ' ओषधिः ' आहेत. या दोन्ही शब्दांचा अर्थ एकच आहे ' प्रतीची दिशेचा इषु दोन्ही कोष्टकांत, ' **अन्नं** ' आणि '**आपः**' आहे. खाण्यापिण्याचा निकटचा संबंध आहे. दक्षिण दिशेचे इषु दोन्ही कोष्टकांत ' **कामः** ' आणि ' **पितरः** ' आहेत. कामाच्या उपभोगानेंच पितृत्व प्राप्त होतें. ' उदीची ' दिशेचे इषु ' **वात** ' आणि ' **अशनि** ' आहेत. अशनीचा अर्थ विद्युत् आहे आणि त्याचें स्थान मध्यस्थान म्हणजेच वायूचें स्थान मानण्यांत येतें. यावरून वाचकांना दिसून येईल कीं, केवळ '**प्राची** आणि **ऊर्ध्वा** ' दिशांचे इषु बदलले आहेत. एवढेंच नाहीं परंतु पहिल्या कोष्टकांत जे अधिपति होते तेच दुसऱ्या कोष्टकांत इषु झालेले आहेत. इतर दिशांचे इषु समान अथवा परस्पर संबंध ठेवणारे आहेत. अथर्व वेदाच्या तिसऱ्या कांडाच्या २६ व २७ व्या सूक्तांत एवढा भेद आहे. या भेदावरून एवढेंच स्पष्ट होतें कीं इषु अधिपति, हे शब्द वास्तविक नव्हेत परंतु आलंकारिक आहेत. आतां खालील मंत्र पहा—

**प्राचीमा रोह गायत्री त्वाऽवतु रथंतरं साम ।
त्रिवृत्स्तोमो वसन्त ऋतुर्ब्रह्म द्रविणम् ॥ १० ॥
दक्षिणामा रोह त्रिष्टुप् त्वा ऽवतु बृहत्साम
पञ्चदश स्तोमो ग्रीष्मऋतुः क्षत्रं द्रविणम् ॥ ११ ॥
प्रतीचीमारोह जगती त्वाऽवतु वैरूपं साम
सप्तदश स्तोमो वर्षा ऋतुर्विट् द्रविणम् ॥ १२ ॥
उदीचीमा रोहानुष्टुप्त्वाऽवतु वैराजं
सामैकविंश स्तोमः शरदृतुः फलं द्रविणम् ॥ १३ ॥
उर्ध्वामारोह पंक्तिस्त्वावतु शाक्वररैवते सामनी
त्रिणवत्रयस्त्रिंशौ स्तोमौ हेमन्तशिशिरावृतू वर्चो
द्रविणम् ॥ १४ ॥** (यजु. अ. १०)

प्राची इत्यदि दिशां मध्यें (**ब्रह्म द्रविणं**) ज्ञान वगैरे धन आहे.

या मंत्रांचें स्पष्टीकरण खालील कोष्टकावरून होऊं शकेल.

दिशाकोष्टक (३) (यजु. १०।१०-१४)

दिशः	रक्षकः छन्दः	साम	स्तोमः	ऋतुः	द्रविणं धनं
प्राची	गायत्री	रथंतरं	त्रिवृत्	वसन्तः	ब्रह्म
दक्षिणा	त्रिष्टुप्	बृहत्	पंचदश	ग्रीष्मः	क्षत्रं
प्रतीची	जगती	वैरूपं	सप्तदश	वर्षा	विट्
उदीची	अनुष्टुप्	वैराजं	एकविंशः	शरद्	फलं
ध्रुवा ऊर्ध्वा	पंक्तिः	शाक्वरं रैवतं	त्रिणवत्रयस्त्रिंशौ	हेमन्तः शिशिरः	वर्चः

या कोष्टकांतील दिशांच्या धनाचें अवश्य मनन करावें. (१) प्राचीदिशेचें धन (ब्रह्म) ज्ञान आहे. (२) दक्षिणदिशेचें धन (क्षत्र) शौर्य आहे. (३) उदीची दिशेचें धन फळ, परिणाम, लाभ वगैरे आहे. (५) ध्रुवा ऊर्ध्वा दिशाचें धन शक्ति, बळ, वगैरे आहे. ज्ञान, शौर्य, पुरुषार्थ, प्रयत्न, लाभ, वीर्य, आणि तेज हें बाकी दिशांचें धन आहे. त्यांची तुलना कोष्टक १ शीं केली असतां अर्थाचा बोध स्पष्टपणानें होईल. वाचकांच्या येथें हें ध्यानांत आलें असेल कीं उक्त गुण विशेष वर्णांचे असल्यानें उक्त दिशांचा संबंध उक्त वर्णांशीं आहे. ब्राह्मणाचें ज्ञान, क्षत्रियानें शौर्य, वैश्याचा पुरुषार्थ, शूद्रांचा हुन्नर उद्योगाचा लाभ आणि जनतेचें वीर्य तेज सर्व राष्ट्राच्या उद्धाराचें कारण आहे. त्याप्रमाणें प्रत्येक व्यक्तींमध्यें ज्ञान, शौर्य, पुरुषार्थ, फलप्राप्तिपर्यंत प्रयत्न करण्याचा गुण आणि वीर्यतेज असलें पाहिजे. याप्रमाणें व्यक्तीमध्यें आणि राष्ट्रामध्यें वरील गुणांचा संबंध आहे. या संबंधाचें स्मरण ठेऊन वाचकांनीं खालील मंत्र पहावे—

प्राच्यां दिशि शिरो अजस्य धेहि ।
दक्षिणायां दिशि दक्षिणं धेहि पार्श्वम् ॥ ७ ॥
प्रतीच्यां दिशि भसदमस्य धेहि ॥
उत्तरस्यां दिश्युत्तरं धेहि पार्श्वम् ॥
ऊर्ध्वायां दिश्यजस्यानूक्यं धेहि ॥
दिशि ध्रुवायां धेहि पाजस्यम् ॥ ८ ॥ (अथर्व. ४।१४)

' प्राची दिशेमध्यें (**अजस्य**) अजन्मा जीवाचें शिर ठेवा तसेंच अन्य दिशेस अन्य अवयव ठेवा ' या मंत्रांत अवयवांचा संबंध दिशांच्यासह दाखविला आहे. खालील कोष्टक पाहिलें असतां तो भेद स्पष्ट होईल—

दिशाकोष्टक (४) (अथर्व. ४।१४।७।८)

प्राची	**शिरः**	**मस्तक**
दक्षिणा	**दक्षिणं पार्श्वं**	उजवी बगल
प्रतीची	**भसदं**	गुप्तभाग
उदीची	**उत्तरं पार्श्वं**	डावी बगल
ध्रुवा	**पाजस्यं**	पोट
ऊर्ध्वा	**आनूक्यं**	पाठीचीं हाडें

या कोष्टकांशी पूर्वोक्त तिसऱ्या कोष्टकाची तुलना करा. ज्ञान, शौर्य, पुरुषार्थ आणि फळाचा संबंध डोकें, बाहू, मध्यभाग, आणि खालच्या भागाशीं येथें दिला आहे. ज्ञान, शौर्य, पुरुषार्थ यांचा संबंध गुणरूपानें प्रत्येक व्यक्तींत आहे. आणि वर्णरूपानें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्यांत अर्थात् राष्ट्र-पुरुषाच्या अवयवांत आहे. याप्रमाणें वर्णांचा संबंध दिशाशीं स्पष्ट आहे. हा संबंध ध्यानांत ठेऊन विचार करून आतां खालील मंत्र पहा—

प्राचींप्राचीं प्रदिशमा रभेथामेतं लोकं श्रद्धानाः सचन्ते । यद्वां पक्वं परिविष्टमग्नौ तस्य गुप्तये दंपती सं श्रयेथाम् ॥ ७ ॥
दक्षिणां दिशमभि, नक्षमाणौ पर्यावर्तेथामभि पात्रमेतत् । तस्मिन्वां यमः पितृभिः संविदानः पक्काय शर्म बहुलं नियच्छात् ॥ ८ ॥
प्रतीचीं दिशामियमिद्वरं यस्यां सोमो अधिपा मृडिता च । तस्यां श्रयेथां सुकृतः सचेथामधा पक्कान् मिथुना संभवाथः ॥ ९ ॥
उत्तरं राष्ट्रं प्रजयोत्तरावद्दिशामुदीचीं कृणवन्नो अग्रम् । पांक्तं छंदः पुरुषो बभूव विश्वैर्विश्वांगैः सह संभवेम ॥ १० ॥
ध्रुवेयं विराण्नमो अस्त्वस्यै शिवा पुत्रेभ्य उत मह्यमस्तु । सा नो देव्यदिते विश्ववार इर्य इव गोपा अभि रक्ष पक्वम् ॥ ११ ॥ (अथर्व. १२।३)

(१) (**प्राचीं**) पूर्वदिशा प्रगतीची दिशा आहे. त्यांत (**आरभेथां**) उत्साहमय पुरुषार्थ आरंभ करा. (**एतं लोकं**) या उन्नतीच्या लोकांत (**श्रद्धानाः**) श्रद्धा धारण करणारेच पोहोंचूं शकतात. जे (**वां**) तुम्ही दोघे अग्नींत प्रवेश करून (**पक्वं**) परिपक्व अन्न असेल (**तस्य गुप्तये**) त्याच्या रक्षणासाठीं (**दंपती**) स्त्री-पुरुष (**संश्रयेथां**) प्रयत्न करो. (२) या दक्षिण दिशेला जेव्हां तुम्हीं (**अभिनक्षमाणौ**) सर्व बाजूंनीं प्रगति करतां करतां याल (**पात्रं**) योग्य अथवा संरक्षक कर्माचें (**अभि पर्यावर्तेथां**) सर्व प्रकारें वारंवार अनुष्ठान कराल तेव्हां आपल्या (**पक्काय**) परिपक्वतेसाठीं (**पितृभिः**) रक्षकांसह (**संविदानः यमः**) ज्ञानी नियामक (**बहुलं शर्म**) पुष्कळ सुख देतो. (३) (**प्रतीचीं**) पश्चिम दिशाही खरोखर (**वरं**) श्रेष्ठ दिशा आहे. तिच्यांत (**सोमः**) विद्वान् आणि शांत अधिपति आणि (**मृडिता**) सुख देणारा आहे. या दिशेचा आश्रय करा. सुकृत करून परिपक्वता (**सचेथां**) प्राप्त करा आणि (**मिथुना**) स्त्री-पुरुष मिळून (**संभवाथः**) उत्तम संतान निर्माण करा. (४) उत्तर दिशा (**प्र-जया**) विजयशाली राष्ट्रीय दिशा आहे. यासाठीं आम्हां सर्वांस ही उत्तर दिशा (**अग्रं**) अग्रभागीं घेऊन जावो. (**पांक्तं**) पांची वर्णांना-राष्ट्रीय विभागांना-(**छंदः**) छंद हाच पुरुष होतो. या

सर्व अंगांसहित आम्हीं सर्व (**सं भवेम**) मिळून राहूं. (५) ही ध्रुव दिशा (**विराट्**) फार मोठी आहे तिला नमस्कार असो. ती मला तसेंच माझ्या प्रजेला (**शिवा**) कल्याणकारक होवो. हे (**अ-दिते देवि**) स्वतंत्रता देवि ! (**विश्व-वारे**) सर्व आपत्तींचे निवारण करणाऱ्या देवि ! तूं (**गोपा**) आम्हा सर्वांचें रक्षण करीत आमची परिपक्वता सुरक्षित राख.

या मंत्रांत दिशांविषयीं आणखी कांहीं जास्ती गोष्टी सांगितल्या आहेत. त्यांतील सूचक शब्दांचे कोष्टक असें होतें.

दिशाकोष्टक ५ (अथर्व. १२।३।८-११)

दिशः	कर्म	साधन	साधक	क्रिया
प्राची	आरंभः	श्रद्धानः	दंपती	संश्रयेथां
दक्षिणा	पर्यावर्तनं	नक्षमाणः	यमः संविदानः	नियच्छात्
प्रतीची	आश्रयः	सुकृतः	मिथुनः	संभवाथः
उदीची	प्र-जयः	पांक्त छंदः	पुरुषः	सह संभवेम
ध्रुवा	वि-राट्	शिवा	विश्ववारा अदितिः	रक्ष

या कोष्टकावरून साधारणपणें कळेल की दिशांची वरील नांवें कोणत्या गोष्टींची सूचक आहेत. आणि या सूचक नांवांत केवढें तत्त्वज्ञान भरलें आहे. या मंत्रांचें अध्ययन केल्यानें खाली दिलेल्या गोष्टी कळून येतात—

१. प्राची दिशा- (प्र-अंत = पुढें जाणें, उन्नति करणें पुढील भागीं जाणें) हा मूळ अर्थ **'प्रांच'** धातुचा आहे. त्यापासून ' प्राची ' शब्द झाला आहे. ' प्राची दिशे ' चा अर्थ उन्नतीची दिशा, वृद्धीचा मार्ग असा होता.

उन्नतिसाठीं विविध कर्मांचा प्रारंभ करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. पुरुषार्थाच्या प्रारंभाशिवाय उन्नतीची आशा व्यर्थ आहे. उत्साहानें पुरुषार्थ करण्यासाठीं श्रद्धा पाहिजे. श्रद्धेशिवाय उत्साह प्राप्त होत नाहीं. जगांत स्त्री पुरुष मिळून विविध पुरुषार्थांचें साधन करतात. त्यांचा परस्परांशी सलोखा चांगला असला म्हणजे संसारांतील सर्व भागांची परिपक्वता आणि (**गुप्ति**) संरक्षण होऊं शकतें. याप्रमाणें पूर्वदिशेकडून उपदेश मिळतो.

२. दक्षिण दिशा- ' दक्षिण ' शब्दाचा अर्थ दक्ष, चांगल्याप्रकारें, योग्य, प्रबुद्ध, सरळ, सत्य वगैरे आहे. ' दक्षिण दिशा ' शब्दाचा मूळ अर्थ सरळ मार्ग, खरा मार्ग असा होता. मागाहून त्याचा अर्थ ' उजव्या बाजूची दिशा ' असा झाला.

उन्नतिसाठीं सरळ आणि सत्य मार्गानें चाललें पाहिजे. आणि (**नक्षमाण**) गति अथवा हालचाल अथवा प्रयत्न केला पाहिजे. एरवीं सिद्धि मिळणें अशक्य आहे. एकावेळीं प्रयत्न करून सिद्धि न मिळाली तर वारंवार पुरुषार्थ करणें आवश्यक आहे. त्याची ही सूचना (**पर्यावर्तेथां, परि-आ-वर्तेथां**) वारंवार प्रयत्न करा या शब्दांनीं या मंत्रांत दिली आहे. ' **यम** ' शब्द नियमांचा सूचक, ' **पितृ** ' शब्द जनन शक्ति आणि स्वसंरक्षण सूचक आणि ' **संविदान** ' शब्द ज्ञानाचा सूचक आहे. नियम, स्वसंरक्षण, आणि ज्ञानानेंच शर्म म्हणजे सुख होतें हा बोध दक्षिण दिशेकडून मिळतो.

३. प्रतीची दिशा- प्रत्यंच-आंत प्रवेश करणें, अंतर्मुख होणें, प्रतीची दिक् शांतीची दिशा. मूळ स्थानावर येण्याची दिशा, स्वस्थानीं येण्याचा मार्ग, अंतर्मुख होण्याचा मार्ग असे या शब्दाचे मूळ अर्थ आहेत. पूर्वदिशेला पुढें वाढण्याचा मार्ग म्हटलें आहे. आणि पश्चिम दिशेला पुनः मागें वळून स्वतःच्या मूळस्थानीं येऊन विश्राम घेण्याचा मार्ग असें म्हटलें आहे.

प्रतिची	प्राची
(प्रति-अंच)	**(प्र+अंच्)**
प्रति-गति	**प्र+गति**
प्रति+गमन	**प्र+गमन**
नि+वृत्ति	**प्र+वृत्ति**

दिशांच्या नांवांनीं जे भाव व्यक्त होतात ते या कोष्टकावरून समजतील. वैदिक शब्दांचें महत्त्व या रीतिनें समजलें पाहिजे.

निवृत्ति, विश्रांति अथवा स्वस्थतेचें स्थानच श्रेष्ठ (**वरं**) असतें. शांतिहून निराळी श्रेष्ठता दुसरी कोणती असणार ? सोम ही शांतीची देवता आहे. सूर्याच्या प्रखर प्रचंड किरणांच्या तापानें संतप्त मनुष्य चंद्रा (**सोम**) च्या शीतलप्रकाशानें किती शांत संतुष्ट आणि आनंदित होतो ? सुकृत म्हणजे धार्मिक पुण्य कर्मांचा मार्गच अशी शांति प्राप्त करून देऊं शकतो, इत्यादि भाव या मंत्रांत आहेत.

(४) उत्तर दिशा (उत्+तर) अधिक उच्चतर अधिक श्रेष्ठ अवस्था प्राप्त करण्याचा मार्ग असा त्याचा मूळ अर्थ आहे. मनुष्याला उच्चतर अवस्था प्राप्त होण्यासाठीं राष्ट्राची

भक्ति कारणरूप होते. कारण की—

भद्रमिच्छन्त ऋषयः स्वर्विदस्तपो दीक्षामुपनिषेदुरग्रे। ततो राष्ट्रं बलमोजश्च जातं तदस्मै देवा उपसंनमन्तु (अथर्व. १९।४१।१)

'सर्वांचें कल्याण करण्याची इच्छा असणाऱ्या ज्ञानी ऋषीमुनींनीं तप केलें आणि दक्षतेचें व्रत घेतलें. त्यामुळें राष्ट्र, बल आणि ओज उत्पन्न झालें. म्हणून सर्व देव त्या राष्ट्रीयते सन्मुख नम्रता धारण करोत. राष्ट्रीयतेसह लोककल्याणाची भावना याप्रकारें वेदांत वर्णिली आहे. लोककल्याण हीच लोकांची उच्चतर स्थिति आहे. राष्ट्रीय भावनेंत (**नः अग्रं कृण्वन्**) 'सर्वांच्या अग्र भागीं होण्यासाठीं आम्हांस प्रयत्न करणें आवश्यक आहे' राष्ट्र (**पांक्त**) पांचविभागांत विभक्त आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, आणि निषाद अथवा ज्ञानी, शूर, व्यापारी, कारागीर, आणि साधारण सामान्य सर्व जनता मिळून राष्ट्राचे पांच अवयव होतात. या पांच प्रकारच्या लोकांचें कल्याण करण्याची (**छंद**) प्रबळ इच्छा ज्याच्यांत असेल तोच खरा 'पुरुष' म्हटला जातो. पुरुष त्यालाच म्हणतात जो (**पुरि**) नगरींत (**वसति**) निवास करतो. नागरिक जन जो 'लोक कल्याण' करतो तोच खरा पुरुष आहे. सर्वांग परिपूर्ण तो असतो आणि उन्नतिसाठीं (**सं भवेम**) सर्व मिळून एकत्रित होण्याची आवश्यकता आहे हा बोध उत्तर दिशेच्या मंत्रांतील शब्दांनी प्राप्त होतो.

५. **ध्रुवा-दिक्**- स्थिरतेचा गुण येथें सांगितला आहे. मनुष्याच्या व्यवहारांत चंचलता चांगली नाहीं. स्थिरता, दृढता, निश्चितता या सर्व उन्नतीला साधक आहेत. सर्वांचें (**शिवा**) कल्याण या गुणानींच होतें. स्थिरतेचा मार्ग हाच खरा योगमार्ग आहे. त्यांतच चंचलतेस दूर करून स्थिरतेची प्राप्ति होते. त्यामुळें सर्वांचें हित साधतां येतें. हीच (**अ-दिति**) अविनाशाची देवता अथवा स्वातंत्र्याची देवता आहे. स्थिरतेशिवाय स्वतंत्रतेची प्राप्ति होऊं शकत नाहीं. (**गो-पा**) इंद्रियांचें संरक्षण या मार्गांत अत्यंत आवश्यक आहे. याप्रमाणें ध्रुव दिशेच्या मंत्रापासून बोध मिळतो.

मंत्रांची शब्दयोजना किती अर्थपूर्ण आहे त्याचा विचार वाचक येथें करूं शकतात. असो. दिशांच्या विषयीं ऋग्वेदांत उल्लेख नाहीं. आतां पर्यंतच्या सर्व विवरणाचें एकीकरण केलें पाहिजे. त्यापूर्वी खालील मंत्र पहा—

प्राच्यै त्वा दिशेऽग्नयेऽधिपतयेऽसिताय रक्षित्र आदित्यायेषुमते। एतं परि दद्मस्तं नो गोपायतामस्माकमैतोः। दिष्टं नो अत्र जरसे नि नेषज्जरा मृत्यवे परि णो ददात्वथ पक्वेन सह सं भवेम ॥५५॥ दक्षिणायै त्वा दिश इन्द्रायाधिपतये तिरश्चिराजये रक्षित्रे यमायेषुमते ॥ एतं० ॥ ५६॥ प्रतीच्यै त्वा दिशे वरुणायाधिपतये पृदाकवे रक्षित्रेऽन्नायेषुमते। एतं० ॥ ५७॥ उदीच्यै त्वा दिशे सोमायाधिपतये स्वजाय रक्षित्रेऽशन्या इषुमत्यै ॥ एतं० ॥ ५८॥ ध्रुवायै त्वा दिशे विष्णवेऽधिपतये कल्माषग्रीवाय रक्षित्र ओषधीभ्य इषुमतीभ्यः ॥ एतं० ॥ ५९॥ ऊर्ध्वायै त्वा दिशे बृहस्पतयेऽधिपतये श्वित्राय रक्षित्रे वर्षायेषुमते ॥ एतं ॥ ६०॥ (अथर्व १२।३)

'प्राची दिशा अग्नि अधिपति, असित रक्षिता आणि इषुमान् आदित्यासाठीं (**एतं**) हें दान (**परिदद्मः**) देत आहे. (**अस्माकं आ-एतोः**' आमच्या सत्य भावानें आम्हां सर्वांचें (**नः गोपायतां**) संरक्षण होवो. (**अत्र**) येथें (**नः**) आम्हां सर्वांचें (**दिष्टं**) धर्माची सर्व प्रेरणा (**जरसे**) वृद्धावस्थेपर्यंत (**नि नेषत्**) घेऊन जावो. (**जरा**) वृद्धावस्था (**नः मृत्यवे परिददातु**) आम्हां सर्वांस मृत्युप्रत नेवो. (**अथ**) आणि (**पक्वेन**) परिपक्वतेसह (**संभवेम**) संभूति म्हणजे उन्नति प्राप्त करूं. हा प्रथम मंत्राचा अर्थ आहे. बाकी मंत्रांचा असाच सुगम आहे.

या मंत्रांत (१) दान (२) स्वसंरक्षण, (३) दुष्ट भावना दूर करणें. (४) धर्माच्या प्रेरणेसह पूर्ण वृद्धावस्थेचा अनुभव घेतल्यानंतर म्हणजे दीर्घ आयुष्याच्या समाप्तिनंतर मारण्याची कल्पना आणि (५) परिपक्व (बुद्धिवान् सज्जनां) सह म्हणजे सत्संगतींत राहण्याचा उपदेश केला आहे. प्रारंभापासून येथपर्यंत दिशांची जीं कोष्टकें आणि मंत्र दिले आहेत त्या सर्वांचा एकीकरणपूर्वक विचार केल्यानें या मंत्रांपासुन अधिक बोध होण्याचा संभव आहे.

प्राची दिगग्निरधिपतिरसितो रक्षिताऽऽदित्या इषवः। तेभ्यो नमोऽधिपतिभ्यो नमो रक्षितृभ्यो नम इषुभ्यो नम एभ्यो अस्तु। योऽस्मान् द्वेष्टि यं वयं द्विष्मस्तं वो जम्भे दध्मः ॥ १ ॥ (अथर्व ३।२७)

या मंत्राचा आतां विचार करावयाचा आहे. याचा विचार करण्यानें बाकी सर्व मंत्रांचा विचार होऊं शकतो. वर जेथें दिशांचें दुसरें कोष्टक दिलें आहे तेथें असें दाखविलें आहे कीं अधिपति, इषु, रक्षिता वगैरे शब्द आलंकारिक आहेत. म्हणून त्यांचा अर्थ

काव्य कल्पनेनेंच बसविला पाहिजे.

(१) अधिपति, रक्षिता इषव इत्यादि शब्द आलंकारिक आहेत कारण की वीरुधः वगैरेंना सुद्धां बाण म्हटलें आहे. वस्तुतः ते बाण नाहींतच. म्हणून कवीच्या आलंकारिक दृष्टीनें त्याचा अर्थ करणें योग्य होईल.

(२) मंत्राच्या प्रथम पादांत अधिपति, रक्षिता हे शब्द एकवचनीं आहेत परंतु द्वितीय चरणांत याच शब्दांचें बहुवचन घेण्यांत आलें आहे. एकवचनी शब्द परमेश्वराकडे लावता येतील परंतु **' अधिपतिभ्यः रक्षितृभ्यः '** बहुवचनी असल्यानें परमेश्वराकडे लावतां येणार नाहीं. आदरार्थी बहुवचन समजावयाचें तर प्रथम पादांत एकवचन कां ? असा प्रश्न येथें येतो. वेदांत कोणत्याहि ठिकाणीं एकाच मंत्रांत परमेश्वर वाचक शब्द एकवचनी आणि बहुवचनी असे आलेले नाहींत, त्यामुळें येथें हे शब्द फक्त परमेश्वरासाठीं वापरले आहेत काय अशी शंका येते ?

(३) प्रत्येक दिशेचा अधिपति रक्षिता आणि इषु भिन्न आहेत. जर एकच परमेश्वर वाचक हे शब्द असतील तर भिन्नतेचा कांहीं अर्थ करतां येणार नाहीं.

(४) तिसऱ्या चरणांत ' जे आमचा सर्वांचा द्वेष करतात आणि आम्ही सर्व ज्याचा द्वेष करतों त्याला (**वः जम्भे**) आम्ही तुम्हां सर्वांच्या जबड्यांत सोंपून देतों अशा अर्थाचे शब्द आले आहेत. त्यावरून या मंत्राचा भाग निव्वळ समाजपर (सामाजिक स्वरूपाचा) आहे हें स्पष्ट आहे. दुष्टांस शिक्षा करण्याचा हा विषय आहे आणि शिक्षा करणारा एकटा नाहीं परंतु ते (**वः**) अनेक आहेत. (**वः जम्भे**) ' तुम्हां पुष्कळांच्या जबड्यांत त्या दुष्टांना आम्हीं सोंपतो. ' तुमच्या इच्छेनुरूप त्यास शिक्षा करा. शिक्षा करण्याचें आम्हीं आमच्या हातांत घेत नाहीं. तुम्हां सर्वांस त्याल शिक्षा करण्याचा अधिकार आहे. हा आशय या मंत्रभागांत स्पष्ट दिसत आहे. त्यांत न्यायाची व्यवस्था स्पष्टपणें लिहिली आहे.

(**अ**) अनेक सज्जनांनीं एकत्र येऊन न्याय करावा.

(**आ**) स्वतःच्या मर्जीनुरूप शिक्षा करावी हें कोणासच उचित नाहीं. तो अधिकार न्याय सभेचा आहे.

(**इ**) बहुमत आहे म्हणून द्वेष करावयाचा नाहीं. मूळ द्वेष करणेंच वाईट आहे. स्वसंमति (शिक्षेस अनुकूलता) प्रगट करणें हा द्वेष नाहीं.

(**ई**) बहुमत असणाऱ्यांनीं सुद्धां हें लक्षांत ठेवावें कीं त्यांनीं स्वमतानें कोणास दंड देऊं नये. बहुमती आणि अल्पमतीचा जरी मतभेद असला तरी न्यायसभेकडून योग्यायोग्याचा निश्चय केला पाहिजे. आणि न्यायसभेचा निश्चय सर्वांनीं मान्य केला पाहिजे.

इत्यादि गोष्टी या मंत्रावरून स्पष्ट सिद्ध होत आहेत. येथें परमेश्वराच्या जबड्यांत सोंपून देण्याची कल्पना नाहीं, हें स्पष्ट आहे. आतां येथें जम्भ शब्दाचा अर्थ पहाणें योग्य होईल—

(**जंभ**)- शब्दाचे अर्थ दांत, हत्तीचा दांत, तोंड, जबडा, वज्रदंड वगैरे होतात. मंत्रांत **' वः जम्भे '** म्हणजे अनेक लोकांचा जबडा ' असें म्हटलें आहे. प्रत्येक प्राण्याला एकच जबडा असणें शक्य आहे. परंतु येथें अनेक मनुष्यांचा एकत्रित एकच जबडा म्हटला आहे. वास्तविक अनेक मनुष्यांचा सुद्धां एकच जबडा असूं शकत नाहीं, परंतु येथें म्हटला आहे. म्हणजे हा जबडा काल्पनिक आहे, वास्तविक नाहीं. खालीं दिलेल्या कोष्टकावरून व्यक्तिगत आणि सामाजिक जबड्याची कल्पना येऊं शकेल.

व्यक्तीचा जबडा	**समाजाचा जबडा**
जंभ	न्यायालय
मुख	मुख्य
ज्ञानेंद्रिय पंचक	ज्ञानीजन-पंच
दांत—द्विज	त्रैवर्णिक-द्विज
दंतपंक्ति	द्विज-सभा
चर्वण, चर्वितें चर्वण	विषय-चर्चा
अन्न-चर्वण	प्रमाण-विचार

सिंह-व्याघ्र इत्यादि हिंस्र पशु स्वतःचें भक्ष्य जबड्यांत ठेऊन खातात. स्वतःच्या शत्रुला जबड्यांत धरून खाण्याची कल्पना नीच प्राण्यांमध्यें आहे. क्रोधी मनुष्य वेड्यासारखा होऊन शत्रूला चावण्यास धांवतो. परंतु विचारी मनुष्य अशी पशुवृत्ति दाबून टाकून स्वतःस समाजाचें एक अंग समजून स्वतःच्या शत्रूस सुद्धां समाजाचें अंग समजतो. या कारणानें तो शत्रूला स्वतःच्या एकट्याच्या हातानें शिक्षा न करतां, अथवा शिक्षा करण्यास प्रवृत्त न होतां न्यायसभेस शरण जातो. कारण तो समाजाचा जबडा आहे. या न्यायालयांत द्विजांची (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य) सभा भरत असे. आणि ती अनुकूळ प्रतिकूळ गोष्टींचा समन्वय साधून मनन करून अपराध्यास दंड देत असे. आणि सज्जनांस स्वातंत्र्य अर्पण करीत असे. हा समाजाचा जबडा—न्यायसभा असा ' जंभ ' शब्दाचा अर्थ करणें उचित होईल. असाच अनेक मनुष्यांचा एक जबडा होणें किंवा असणें शक्य आहे.

तं वो जंभे दध्मः ।

(**तं**) त्या दुष्टाला आम्हीं सर्व (**वः**) आपल्या अनेकांच्या (**जंभे**) जबड्यांत अर्थात् न्यायसभेंत (**दध्मः**) धारण करतों म्हणजे आपल्या आधीन करतों. येथें न्यायसभेचें श्रेष्ठत्व दाखविलें आहे.

येथील (वः) शब्द पूर्वोक्त '**अधिपतिभ्यः रक्षितृभ्यः**' हे शब्द सूचित करतो. समाजाचे अथवा राष्ट्राचे अधिपति आणि रक्षक ' वः ' शब्दानें सूचित होतात. सर्वांचा द्वेष करणारा दुष्ट या पंचांच्या स्वाधीन केला पाहिजे, असा या मंत्राचा स्पष्ट आशय आहे. त्यामुळें अधिपति वगैरे शब्दांचें बहुवचन मंत्रांत आलें आहे आणि या कारणामुळेंच बहुवचन योग्य आणि अर्थानुकूल आहे.

शत्रूला पंचाच्या आधीन करण्याच्या वृत्तीनें शत्रूला स्वतःच शिक्षा करण्याची आणि न्याय स्वतःच्या हातांत घेण्याची घमेंडी वृत्ति कमी होते आणि पंचांमार्फत न्याय प्राप्त करण्याची सात्त्विक प्रवृत्ति वाढते. अशा प्रकारची प्रवृत्ति समाजाच्या हितासाठीं आवश्यक आहे.

या उद्देशामुळें स्वतःला समाजाचा एक घटक अथवा अवयव समजण्याची भावना वाढीस लागते. मी जनतेचा एक अंश आहे, माझा जनतेशीं अतूट संबंध आहे. ही भावना अत्यंत श्रेष्ठ आहे. या उच्च भावनेचें बीज किती उत्तम प्रकारें येथें व्यक्त करण्यांत आलें आहे. हें वैदिक धर्माचें महत्त्व येथें पहावें.

' **तेभ्यो नमः** ' हीं दोन पदें प्रत्येक मंत्रांत आहेत. हीं दोन पदें सहा मंत्रांत वारंवार आलेली आहेत. मंत्रांचा वारंवार जो पाठ करण्यांत येतो त्याला ' अभ्यास ' म्हणतात. विशेष महत्त्वपूर्ण मंत्रांचा याप्रमाणें वारंवार अभ्यास वेदांत करण्यांत येत असतो. त्यावरून असें सिद्ध होतें कीं मंत्रांत हा भाग मुख्य आहे, आणि त्याला अनुकूल असाच शेष मंत्राचा अर्थ केला पाहिजे म्हणजेच या सूक्ताचा अर्थ सार्वजनिक आहे हें उघड आहे.

[१]

(१ प्राची दिशा) प्रगतीची दिशा, (**२ अग्निः अधिपतिः**) तेजस्वी स्वामी, (**३ असितः रक्षिता**) स्वतंत्र संरक्षक आणि (**४ आ-दित्या इषवः**) स्वतंत्रता पूर्ण वक्तृत्व या चार गोष्टी आल्या आहेत.

प्रत्येक दिशा विशेष मार्गाची सूचक समजण्यांत येते आणि त्या विशिष्ट मार्गाचे साधक तीन गुण आहेत. प्रत्येक दिशेमध्यें हे गुण निश्चित आहेत. पूर्वदिशेच्या अनुसंधानांत प्रगतीच्या मार्गाचा उपदेश केला आहे. तेजस्विता, स्वतंत्रता आणि वक्तृत्व हे ते तीन गुण होत. हे तीनहि गुण उन्नतीचे साधक आहेत. अर्थापत्तीनें हें सिद्ध होतें कीं निस्तेज, निर्वीर्य राजा, पराधीन रक्षक आणि परतंत्र वक्ता कोणत्याहि प्रकारें उन्नति साध्य करूं शकत नाहीं. याप्रमाणेंच अन्य दिशांचा विचार करून बोध मिळविणें उचित होय.

[१] प्रगतीचा निश्चित मार्ग, [२] तेजस्वी स्वामी, [३] स्वाधीनतेची धारणा करणारा रक्षक आणि [४] स्वतंत्रता पूर्ण वक्तृत्व या चार गोष्टी मानवी उन्नतीला आवश्यक आहे. अशा प्रकारच्या स्वामी, संरक्षक आणि वक्त्यांचा सत्कार होणें आवश्यक आहे. जो आम्हां सर्वांचा द्वेष करतो आणि आम्ही सर्व ज्याचा द्वेष करतों त्याला आम्हीं आपणासारख्या अधिपतींच्या सभेच्या स्वाधीन करतों. असा या मंत्राचा सरळ आशय आहे. मनुष्याच्या भलाईचा उपदेश येथें आहे. याप्रकारें अर्थाचें मनन करणें उचित आहे. आतां मुख्य शब्दांच्या मूळ अर्थाचें मनन करूं—

(१) ' अग्नि ' शब्द वैदिक वाङ्मयांत ब्राह्मण आणि वक्तृत्वाचा प्रतिनिधि आहे. दिशाकोष्टकांत पहा. त्यांत प्राची दिशेचें धन ' ब्रह्म ' म्हणजे ज्ञानच सांगितलें आहे.

(२) ' अ-सित ' शब्दाचा अर्थ बंधनरहित, स्वतंत्र, स्वाधीन असा होतो. ' **सि-बंधने** ' या धातूपासून ' **सित** ' शब्द झाला आहे. ज्याचा अर्थ ' परस्वाधीन ' असा आहे. ' **अ-सित** ' अबद्ध, स्वतंत्र.

(३) ' आ-दित्य ' शब्द ' **अ-खंडनीय** ' अर्थानें प्रयुक्त केला आहे. ' **दो-अवखंडने** ' धातूपासून ' **दिति** ' शब्द झाला आहे. त्याचा अर्थ ' खंडित ' असा आहे. ' **अ-दिति** 'चा अर्थ ' **अ-खंडित** ' असा आहे. अदितीचा भाव आदित्य असा आहे. अखंड, अमर्याद, बंधनरहित, स्वतंत्रतेचा भाव येथें आहे. येथें अज्ञानाचें बंधन नाहींच.

(४) ' इषु ' ' इष्-गतौ ' धातूपासून हा शब्द बनला आहे. ' गति, हालचाल ' हा भाव या शब्दांत मुख्य आहे. त्यानंतर त्याचा अर्थ हालचालीचा प्रयत्न करणें, वक्तृत्व करणें, घोषणा करणें, उन्नति करणें. असा झाला आहे. या धातूच्या अर्थाचा भाव इषवः शब्दांत आहे. याप्रमाणें प्रथम मंत्राचा आशय आहे. आतां दुसरा मंत्र पाहूं—

[२]

[१] ' **दक्षिणा दिक्** ' दक्षतेची दिशा. [२] ' **इन्द्रः अधिपतिः** ' शत्रुनिवारक स्वामी. [३] ' **तिरश्चिराजी रक्षिता** ' ओळीनें चालणारा संरक्षक आणि [४] ' **पितरः इषवः** ' वीर्यवान् हालचाल करणारा, या चार गोष्टी उन्नतीच्या साधक आहेत. या प्रकारच्या स्वामी, रक्षक आणि चालकांचा सत्कार होवो. जे आस्तिकांचा द्वेष करतात आणि आस्तिक ज्यांचा द्वेष करतात त्या सर्वांना आम्हीं आपणासारख्या अधिपतींच्या सभेच्या स्वाधीन करतों.

[५] ' इन्द्र ' - (इन् शत्रून् द्रावयति) (१०१८) शत्रूंचे निवारण करणारा, विजयी.

[६] ' तिरश्चिराजी '- (तिरः) मधून (अंच्) जाणें (राजी) ओळ, रेघ, मर्यादा स्वतःच्या मर्यादेचें उल्लंघन न करणारा.

[७] ' पिता ' पातीति पिता ' पिता संरक्षक आहे. वीर्य धारण करून उत्तम संतति निर्माण करणारा वीर्यवान् पुरुषच पिता असतो.

असा भाव दुसऱ्या मंत्राचा आहे. आतां तिसरा मंत्र पाहूं—

[३]

[१] (प्रतीची दिक्) अंतर्मुख होण्याची दिशा. [२] (वरुणः अधिपतिः) सर्वसंमत स्वामी [३] (पृदाकुः रक्षिता) स्पर्धेत उत्साही असा रक्षक आणि [४] (अन्नं इषवः) अन्नाची वृद्धि या चार गोष्टी अभ्युदयाच्या साधक आहेत.

[४]

[१] (ऊदीची दिग्) उत्तर दिशा, उच्चतर होण्याची दिशा. [२] ' सोमः ' (अधिपतिः) शांत स्वामी. [३] (स्व-जः रक्षिता) स्वयंसिद्ध संरक्षक आणि [४] (अशनिः इषवः) तेजस्वी प्रगति या चार गोष्टी उन्नतीच्या आहेत.

[५]

[१] (ध्रुवा दिक्) स्थिर दिशा, [२] (विष्णुः अधिपतिः) कार्यक्षम स्वामी [३] (कल्माषग्रीवः रक्षिता) कर्मकर्ता संरक्षक आणि [४] (वीरुधः इषवः) औषधींची वृद्धि हीं चार तत्त्वें उत्कर्षासाठीं आहेत.

[६]

[१] (उर्ध्वा दिक्) उच्च दिशा [२] (बृहस्पतिः अधिपतिः)ज्ञानी स्वामी, [३] (श्वित्रः रक्षिता) शुद्ध संरक्षक, [४] (वर्षं इषवः) वृष्टीची गति या चार गोष्टी उन्नति करणाऱ्या आहेत.

आतां या शब्दार्थांचें मनन करूं. शब्दांचे मूळ धात्वर्थ खालीं दिले आहेत—

[१] ' वरुणः-वर-वृ '-- वरणें पसंत करणें. जो पसंत करण्यांत येतो त्याला वरुण म्हणतात. सर्व संमत, सर्व श्रेष्ठ.

[२] ' पृदाकुः '- (पृत्-आ-कुः) पृत्चा अर्थ आहे युद्ध, संग्राम, स्पर्धा, स्पर्धेच्यावेळीं उत्साह युक्त शब्द बोलणाऱ्यास पृदाकु म्हणतात. कु = शब्द.

[३] ' सोमः ' शांतीचा सूचक चंद्र अथवा सोम आहे. त्याचा दुसरा अर्थ ' स+उमा ' म्हणजे विद्येसह रहाणारा अर्थात् ज्ञानी असा आहे. ' सु-प्रसवपेश्वर्ययोः ' या धातुपासून सोम शब्द झाला आहे. ज्याचा अर्थ ' उत्पादक, प्रेरक, ऐश्वर्यवान् असा होतो.

[४] ' स्व-जः ' (स्व+जः) स्वतःच्या शक्तीनें रहाणारा. ज्याला दुसऱ्याच्या शक्तीचें अवलंबन करण्याची आवश्यकता नाहीं. स्वावलंबनशील. ज्याचें यश स्वतःच चारी दिशांस पसरतें.

[५] ' अशनिः ' हें विद्युत्‌चें नांव आहे. तेजस्वीतेचा बोध या शब्दानें होतो. ' अश् ' धातूचा अर्थ व्यापणें असा आहे. व्यापक शक्तीचें नांव अशनि आहे.

[६] ' विष्णुः ' सर्व व्यापक, कर्ता, उद्यमी.

[७] " कल्माष ग्रीवः ", ' कल्मन् ' चा अर्थ " कर्मन् " अर्थात् कर्ता, कार्य उद्योग असा आहे. " (कल्माष) " (कल्म-स) कर्मद्वारें अनिष्टाचा, वाईटाचा नाश करणारा. (कर्मणा अनिष्टं स्यति इति कर्माषः एव कल्माषः) पुरुषार्थानें दुष्टतेस दूर करून सुष्टुतेस नजीक आणणारा. याप्रकारचे पुरुषार्थाचे भाव सदा मनांत धारण करणारा, " ' (कल्माष-ग्रीव) ' अथवा ' कर्मास-ग्रीव ' म्हटला जातो.

[८] " बृहस्पतिः " महान ज्ञानाचा स्वामी, ज्ञानी, स्तुति अथवा भक्तीचें अधिष्ठान.

[९] (श्वित्रः) – शुद्ध, पवित्र, श्वेत.

याप्रमाणें मुख्य शब्दांचा अर्थ आहे. वाचकांनीं त्याचा जास्त विचार करून योग्य बोध प्राप्त करून घ्यावा.

पूर्व, दक्षिण, पश्चिम, उत्तर, ध्रुव आणि ऊर्ध्व या सहा दिशा क्रमानें प्रगति, चातुर्य, शांति, उन्नति, स्थिरता, आणि श्रेष्ठता या सहा गुणांच्या सूचक आहेत. या सहा गुणांचे साधन " गुण चतुष्टया " च्या योगानें पूर्वोक्त मंत्रांत वर्णिलें आहे. (१) दिशा, (२) अधिपति, (३) रक्षक आणि (४) इषु हे चार शब्द विशेष सांकेतिक आहेत आणि या शब्दांत असाधारण विशिष्ट गूढ अर्थ राहिलेला आहे. या गोष्टीचें स्मरण वाचकांच्या मनांत पूर्णपणें रहावें. वारंवार मनन करून त्यांचें गूढ ज्ञान प्राप्त करणें हें आपलें सर्वांचें कर्तव्य आहे.

या मंत्रांत ' इषु ' शब्द विलक्षण अर्थानें योजला आहे. त्याचा दुसऱ्या कोणत्याहि अन्य भाषेंत अर्थ करणें कठीणच आहे. कोणत्याहि एकाच पर्याय शब्दानें त्याचा भावार्थ व्यक्त होऊं

शकत नाहीं. म्हणून या मंत्राचें विशेष विचारपूर्वक मनन केलें पाहिजे.

उत्तम अधिपति आणि श्रेष्ठ संरक्षकांचा सन्मान होण्यानें जनसमाजाची स्थिति उत्तम रहाते, आणि राज्यशासन चांगल्या प्रकारें चालतें. अधिपति हा मुख्य असतो आणि संरक्षक त्याच्या आधीन राहून कार्य करणारा असतो. अधिपति आणि संरक्षका विषयीं जनतेंत निरादर नसावा. अधिपति आणि संरक्षकाचे गुण जे या सूक्तांत वर्णन केले आहेत, असे गुणयुक्त पुरुष जेथें असतील तेथें जनतेच्या मनांत त्यांच्याविषयीं पूज्यभाव अवश्य उत्पन्न होईलच. दुष्टांस शिक्षा करण्याचा अधिकार त्यांचाच आहे. स्वतः न्याय हातीं घेऊन अपराध्यास शिक्षा करणें हें कोणाहि मनुष्यास योग्य नाहीं. त्यामुळें अशांति आणि अराजकता फैलावेल. यासाठीं प्रत्येक मंत्रांत म्हटलें आहे कीं " आम्हीं श्रेष्ठ आणि योग्य अधिपतीचा आदर करतों आणि दुष्टांचें शासन करण्यासाठीं त्यांना त्या अधिपति सभेच्या स्वाधीन करतों, ' सर्व लोकांमध्यें ही भावना किंवा असे संस्कार जागृत होणें अत्यंत आवश्यक आहे.

मनानें सार्वजनिक परिस्थितीचें निरीक्षण करणें आणि मानवी हित साधण्याचा विचार करणें हा या मंत्रांचा मुख्य उद्देश आहे. या मंत्रांतून जनतेची उन्नति करणाऱ्या विचारांची सूचना मिळते. वैदिक धर्मांत व्यक्ति आणि समाज या दोघांची एकी करून सुधारणा करावी असें सांगितलें आहे. एकट्या व्यक्तीची अथवा एकट्या समाजाची सुधारणा सांगितलेली नाहीं. दोघांची एकी सांगितली आहे. व्यष्टि आणि समष्टि, दोघे एकत्र मिळाले तर त्यांची उन्नति होते. प्रत्येक मंत्राची पहिली ओळ सामान्य सिद्धांत सांगत आहे. आणि बाकीच्या मंत्रांत तो सिद्धांत जनतेस लागू करून दाखविला आहे. या दृष्टिनें वाचकांनीं या मंत्रांचा अधिक विचार करावा.

दिशांचें तत्त्वज्ञान
वैदिक दृष्टि

वैदिक तत्त्वज्ञान इतकें विस्तृत, व्यापक आणि सर्वगामी आहे कीं त्याचा उपदेश फक्त वैदिक सूक्तांतील शब्दानींच व्यक्त होत नाहीं, तर त्या वेद सूक्तांनीं वाचकांत जी दिव्यदृष्टि-उत्पन्न होते आणि ज्या दृष्टिमुळें पदार्थमात्रांकडे विशेष भावनेनें पहाण्याचें जें ज्ञान अनेक वैदिक धर्मीयांच्या मनांत निर्माण होतें, तें महत्त्वाचें आहे. हा दृष्टिकोन उत्पन्न करणें हेंच वेदाला अभीष्ट आहे. ज्या वाचकांत हा दृष्टिकोन उत्पन्न होणार नाही, त्यांना वैदिक मंत्राचा अर्थ समजणें अशक्य होईल. वेदमंत्रांची रचना तसेंच ते समजण्याची रीत, वैदिक उपदेशाची पद्धति तसेंच वैदिक दृष्टि इतकी विलक्षण आणि आजकालच्या स्थितीपासून भिन्न आहे कीं तशी दृष्टि आपणांत उत्पन्न करण्यास महा प्रयत्न केले पाहिजेत. कारण आज कालच्या जनसमाजाची स्थितिच अशी झाली आहे. आजकाल जडवादाचे अवलंबन करण्याच्या कारणानें ती परिशुद्ध मानसिक अवस्था आणि ती दिव्यदृष्टि आमच्यांत राहिली नाहीं, जी प्राचीन आर्यांत वैदिक धर्माच्या कारणानें होती.

कोणत्याहि नीरस आणि शुद्ध हृदयांत काव्याची भाषा प्रभाव उत्पन्न करूं शकत नाहीं. काव्याचा रस जाणण्यासाठीं वाचकांचीं, तसेच श्रोत्यांचीं हृदयें विशेष संस्कारी असलीं पाहिजेत. कवीच्या दृष्टीनें काव्याचा रस ग्रहण केला पाहिजे. अन्यथा जर कवि दृष्टि नसली, तर कोणतेंच काव्य वाचकांच्या हृदयांत प्रेमभाव उत्पन्न करूं शकणार नाहीं. उच्च कविता जंगली मनुष्याच्या हृदयावर कांहीं इष्ट परिणाम उत्पन्न करूं शकत नाही त्याचा हेतु हाच आहे. ज्याप्रमाणें वीणेची एक तार वाजविल्यानें तिच्या स्वराशी मिळालेली दुसरी तार आपोआप तो स्वर काढूं लागते, परंतु जी तार त्या स्वराशीं मिळविली नाहीं ती कधींही वाजणार नाहीं. काव्याचा आस्वाद घेण्याचाहि हाच नियम आहे. जीं हृदयें कवि हृदयाइतकीं उच्च असतात तींच काव्य श्रवणानें डोलू लागतात. परंतु जीं हृदयें भिन्न प्रकारच्या भावनांनी भरलेलीं असतात, त्यांच्यावर कांहींच परिणाम होत नाहीं. वेद " देवाचें काव्य " आहे. तें समजण्यास, त्यांतील वास्तविक आनंद घेण्यास सुद्धां तशीच उच्च कोटीचीं हृदयें असलीं पाहिजेत.

येथें जो प्रश्न उत्पन्न होतो तो असा कीं जर वरील स्पष्टीकरण सत्य असेल तर वेद हे सामान्य मनुष्याच्या कांहींच उपयोगाचे नाहींत. परंतु वास्तविक तसें नाहीं. ज्याप्रमाणें परमेश्वर निर्मित सृष्टि सर्व मनुष्यासाठीं समान आहे, तसेच वेद सुद्धां सर्व मनुष्यासाठीं आहेत. परंतु स्वतःची योग्यता आणि पात्रता तसेच स्थिति याप्रमाणें प्रत्येक मनुष्य वेदापासून लाभ घेऊं शकतो.

ज्याप्रमाणें सामान्य मनुष्य जलानें तृषा शांत करतो आणि अग्नीनें शीत निवारण करतो आणि त्या पदार्थांचा उपयोग करून समजतो कीं मीं सृष्टीचा उपयोग केला आहे. त्याप्रमाणें सामान्य मनुष्य वेदाचा स्थूल अर्थ समजतो आणि त्यामुळें तो असेंच मानतो कीं ' मीं वेदांचा अर्थ जाणला. ' ज्याप्रमाणें, " **अग्निं ईळे** " चा अर्थ लोक समजतात कीं मीं त्या तेजस्वी

आत्म्याची प्रशंसा करतो. " बस एवढेंच तो समजतो.

ज्याप्रमाणें महान् उच्च कोटीचे वैज्ञानिक आणि यंत्रकला विशारद तेंच जल आणि अग्नि यंत्रांत एकत्र कोंडून त्यांच्या संयोगानें मोठमोठीं यंत्रें चालवितात आणि असें समजतात कीं आम्हीं सृष्टीचा उपभोग घेतला. त्याप्रमाणें महान् योगी आत्मज्ञानी पुरुष त्याच वेदमंत्रांचें काव्यदृष्टीनें अवलोकन करतात आणि परमात्म तत्त्व जाणतात. ज्याप्रमाणें 'अग्निं ईडे' चा अर्थ योगी समजतात कीं 'मी त्या तेजस्वी आत्म्याची प्रशंसा करतों.'

ज्याप्रमाणें सृष्टीचा उपभोग दोघेहि आपापल्या परि घेत आहेत, त्याचप्रमाणें वेदाचा अर्थ सुद्धां दोघे समजतात. परंतु एकाची साधारण अथवा जड दृष्टि आहे आणि दुसऱ्याची असाधारण अथवा काव्यदृष्टि आहे. वेद हें दिव्य काव्य असल्यानें अशा प्रकारच्या असाधारण काव्य दृष्टिनेंच त्याचा आशय पहाणें योग्य होईल. जरी अशी दृष्टि कांहीं सर्वांस साध्य होत नाहीं तरी ज्यांना ती साध्य झाली आहे त्यांच्या सहाय्यानें अन्यांनीं त्यांत गति प्राप्त करून घ्यावी हें त्यांस योग्य होय. आचार्यांनीं दर्शविलेल्या मार्गानें जावें हेंच त्याचें तात्पर्य आहे.

वेद मंत्राचा अर्थ जाणण्यासाठीं मात्र वेदमंत्रच विशेषदृष्टीनें पहाण्याची आणि विशेष पद्धतीनें त्यांचा अर्थ करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. परंतु सृष्टिकडेहि विशेष आत्मिक भावनेनें पहाण्याची अत्यंत आवश्यकता आहे. सर्व साधारण लोकांना सृष्टिकडे जड दृष्टीनें पहाण्याची आजकाल संवय झाली आहे. ही संवय फार घातक आहे. जो पावेतों जनतेंत जड दृष्टि आहे तो पावेतों वैदिक दृष्टी प्राप्त होणें शक्य नाहीं. ज्या स्थितींत सर्व भूतमात्र आत्मरूप होऊन जातात, त्या स्थितीमध्यें एकत्वाचें सर्व स्थळीं दर्शन झाल्यानें शोक, मोह होत नाहीं (यजु. ४०।७) हीच ती दृष्टि जीनें सृष्टिकडे पाहावयास हवें. याप्रकृतींत जो परमात्म्याचा विकास झाला आहे तीच खरी दृष्टि आहे. या दृष्टीला 'आत्मरूप दृष्टि' म्हणतात.

जडदृष्टीचे लोक स्वतःच्या शरीराकडेहि जडदृष्टीनें पहातात आणि केवळ हाडे मज्जा आणि मांसाचें हें शरीर बनलें आहे असें ते मानतात, व तसें बोलूनहि दाखवतात. या जड पदार्थाशिवाय दुसरा कोणताहि पदार्थ त्यांस या शरीरांत दिसत नाहीं. पण इतरहि कांहीं सुविद्य लोक आहेत जे या शरीराकडे चेतनदृष्टीनें पहातात आणि शरीराच्या प्रत्येक अवयवांत त्यांना आत्मशक्तीचा विकास आणि आभास दिसतो. ही दुसरी दृष्टि वेदाला इष्ट आहे या दृष्टी बिन्दुनेंच सृष्टि निरीक्षण करण्याचा तसेंच वेदाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या विचारांचें विशेष स्पष्टिकरण करण्यासाठीं या दिशांच्या लेखाचा विषय घेतला आहे. वाचकांनीं या भावनेनें तो वाचावा.

" प्राचीदिशा " पूर्वदिशेची विभूति

पूर्वदिशेसाठीं वेदांत " **प्राची दिक्** " शब्द येतो. त्याचा मूळ अर्थ खालीं दिल्याप्रमाणें आहे.

(१) **प्राची**– (प्र+अंच्) 'प्र' चा अर्थ " आधिक्य प्रकर्ष, पुढें, सन्मुख " असा आहे. (**अंच्**) चा अर्थ – 'गति, पूजन, असा आहे म्हणजे पुढें जाणें, प्रगति करणें, चालणें, हालचाल करणें, सत्कार आणि पूजा करणें. प्राची शब्दाचा अर्थ पुढें जाणें, उन्नति करणें, अग्रभागीं चालणें, प्रगतिसाठीं साधनें एकत्र करणें. उदयास येणें, अभ्युदय संपादन करणें, वर चढणें इत्यादि प्रकारें होतो.

(२) **दिक्** – दिशेचा अर्थ, समोर निशाण अथवा लक्ष्य साधणें, उपदेश, आज्ञा, निशाण, लक्ष्य, चिन्ह, सरळ रस्ता अथवा मार्ग वगैरे होतात.

वरील दोन्ही शब्द एकत्रित करण्यानें "**प्राची दिक्**" चा अर्थ [१] पुढें सरण्याची दिशा. [२] उदयाचा मार्ग, [३] अभ्युदय प्राप्त करण्याचा रस्ता, [४] सत्कार आणि पूजेचा पंथ, [५] उन्नतीसाठीं हालचाल, चळवळ, [६] उच्च गतीचा साधा मार्ग, इत्यादि प्रकारें होतो. प्राची दिशेचा मूळ अर्थ चढतीची अथवा उन्नतीची दिशा, अभ्युदयाचा मार्ग वृद्धीचा मार्ग असे आहेत.

या अर्थास मनात धारण करून वाचकांनीं पूर्वदिशेकडे सकाळीं पहावें. विचारपूर्वक पाहिल्यानें वाचकांला वेदांत पूर्वदिशेचें नांव " **प्राची दिक्** " कां ठेवण्यांत आलें तें सहज समजेल. विचारपूर्वक दृष्टीनें रात्रीच्या वेळीं सुद्धां वाचकांनीं पूर्वदिशेकडे पहावे. पूर्वदिशेची अपूर्वता सकाळीं आणि रात्रीच समजूं शकते. दिवसा सूर्याच्या प्रचंड तेजामुळें या दिशेचें महत्त्व ध्यानीं घेऊं शकत नाहीं. यासाठी सकाळी आणि रात्रींच पूर्व दिशेच्या महत्त्वाचें चिंतन केलें पाहिजे.

तार्किक लोक दिशांना जड म्हणतात. त्यांना खुशाल तसें म्हणूं द्या. कारण त्यांची दृष्टि भिन्न आहे. वेद वाचतांना आपण सर्वांकडे पूर्ण चैतन्य दृष्टिनेंच पहावें. ज्याप्रमाणें पूर्वदिशेकडे त्याचप्रमाणें अन्य दिशांना सुद्धां चैतन्यविकास होऊन राहिला आहे, अशी शुद्ध कल्पना करावी. जर त्या दिशांना एक क्षण भर आपण देवता स्वरूप मानलें तर तें आपल्या प्रस्तुत कार्याला फारच उपयुक्त वा लाभकारी होइल.

प्रभातकाळीं पूर्वदिशेकडे तोंड करून उभें रहा. किती तारे उदय पावत असतात, तर कित्येक उदय पावून वर आलेले आकाशांत

असतात, असें तुम्हांस दिसेल. अनेक तारागणांना जन्म देणारी, त्यांस उदयास आणणारी ही पूर्व दिशा आहे. तेजस्वीतेचा प्रकाश या दिशेकडूनच येत आहे. प्रतिक्षण या दिशेचें तेज वाढत जातें कारण की तेजरूपी सूर्यनारायणाचा उदय होण्याचा समय आहे पहा. थे ड्याच वेळांत सहस्ररश्मि सूर्यभगवान् उदय पावेल आणि संपूर्ण जगाला नवजीवनानें संचारित करील. तमोगुणी अंधकाराचा नाश होईल आणि सत्वगुणी प्राणमय प्रकाश सर्व बाजूस चमकूं लागेल. पहा आतां सूर्योदय होऊन गेला आहे. हें सूर्यबिंब किती मनोरम, रमणीय, स्फूर्तिदायक, आनंद वाढविणारें, तेज अर्पण करणारें आणि सहस्र शुभ गुणानीं युक्त आहे. पहा तुम्हीं त्याला जड म्हणाल काय ? छे तो तर आम्हां सर्वांचा प्राण आहे. तो स्थावरजंगमाचा जीवनदाता आहे. त्याच्या अस्तित्वानें तर आम्हीं सर्व जीवित आहोंत. जर तो नसता तर आमचा मृत्युच झाला असता. असा हा सूर्य नारायण आमचा जीवनाधार परमेश्वरी अद्वितीय तेजाचा हा सूर्य निःसंशय तेजाचा पुंज आहे. त्याच्या तुलनेनें परमेश्वराच्या तेजस्वितेची कल्पना करतां येते. अशा उच्च दृष्टीनें त्याचें निरीक्षण करा. उदय होतांच त्याचें तेज वाढूं लागतें. तात्पर्य ही पूर्व दिशा उदयमार्गाची सूचना सर्वांस देत आहे. अभ्युदयाचा मार्ग दाखवित आहे. स्वतःची तेजस्वीता वाढविण्याचा उपदेश देत आहे. वेद म्हणतात की ही ' उदयाची दिशा आहे. सर्वांचा उदय येथूनच होत आहे. हे मनुष्या ! तूं प्रतिदिवशीं त्याचें ध्यान कर आणि स्वतःच्या उदयाचा मार्ग आचार.

सूर्य, चंद्र, तारागण यांच्या उदयानें आपणांस आपल्या उदयाच्या मार्गाची सूचना निःसंदेह मिळते जर एकदां अस्तास गेलेला सूर्य सर्व पुरुषार्थानें पुन स्वतःच्या परिपूर्ण तेजस्वितेसह उदय पावतो, जर क्षय लागल्यानें अत्यंत क्षीण झालेला चंद्र प्रतिदिन हळूंहळूं प्रयत्न करून पुनः पूर्णिमेच्या दिवशीं स्वतःच्या पूर्ण वैभवानें याच पूर्वदिशेतून उदय पावतो, त्याचप्रमाणें सर्व तारे, ग्रह, नक्षत्रें, एकवार अस्त झाल्यावर पुनः पूर्ववत् उदय प्राप्त करूं शकतात, तर काय मनुष्य कितीहि अवनतीस पोहोंचला असला तरी स्वतःची उन्नति पुनः करून घेऊं शकत नाहीं काय? ज्या मनुष्याच्या अंतरीं प्रत्यक्ष आत्मा बसलेला आहे, ज्या मनुष्यशरीरांत सर्व सूर्यचंद्रादि देवतानी प्रत्यक्ष जन्म घेतला आहे, असा मनुष्य ज्याच्यांत ३३ कोटी देवतांचें वास्तव्य आहे, जो स्वतः ३३ कोटी देवतांचा सत्वरूप आहे तो पुरुषार्थ करील तर अवनत स्थितींत काय म्हणून राहील ? अभ्युदयावर त्याचा परिपूर्ण अधिकार आहे, एवढेंच नाहीं तर स्वावलंबनानें आणि पुरुषार्थानें तो वाटेल तसा अभ्युदय निःसंदेह प्राप्त करील. व्यक्तिशः आणि सामुदायिक म्हणजे स्वतःचा आणि स्वजातीचा अथवा स्वतःचा आणि स्वराष्ट्राचा उदय त्या दृढ भावनेनें तो साधील. प्रयत्नानें साधूं शकेल. पूर्व दिशेच्या अवलोकनानें मनांत असे विचार उत्पन्न होऊं शकतात.

पश्चिम दिशेची विभूति

दिशांच्या विभूतींचें वर्णन करतांना वर पूर्वदिशेची वैदिक कल्पना सांगितली. आतां या लेखांत पश्चिम दिशेची कल्पना सांगावयाची आहे. वैदिक क्रमानें पहावयाचें म्हणजे पूर्वदिशेनंतर ओळीनें दक्षिण दिशेचें वर्णन यावयास हवें. आणि ती वैदिक दृष्टि बरोबरहि आहे. कारण उदयमार्गाबरोबरच दाक्षिण्याचा मार्ग असलाच पाहिजे. अभ्युदय आणि दक्षतेचें सहाय्य सनातन आहे. उदयाच्या इच्छेबरोबरच दाक्षिण्याचें अवलंबन आवश्यकच आहे. त्यांत शंकेला स्थानच नाहीं. तरीसुद्धां पूर्ण आणि पश्चिम दिशेच्या विभूतींचा परस्परसापेक्ष संबंध आहे. त्यामुळें वैदिक कल्पनेची स्पष्टता होण्याच्या इच्छेनेंच पूर्व दिशावर्णनानंतर पश्चिम दिशेचें वर्णन करण्याचा संकल्प केला आहे. हा सापेक्षतेचा संबंध असा आहे पहा.

पूर्व	पश्चिम
उदय	अस्त (अस्तं गृहं)
जन्म	मृत्यु (स्व-रूप प्राप्ति)
प्रकाशाचा आरंभ	अंधःकाराचा आरंभ
प्र-वृत्ति	नि-वृत्ति
पुरुषार्थ	विश्रांति
प्राची	प्रतीची
प्र+अंच्	प्रति+अंच्
हालचाल	शांति
जागृति	सुषुप्ति
दिवस	रात्र

हे या दोन दिशांचे परस्पर सापेक्ष संबंध पाहिले असतां वैदिक कल्पना अधिक स्पष्ट होईल. म्हणून क्रम प्राप्त दक्षिण दिशेचा विचार न करतां पश्चिम दिशेचाच येथें प्रथम विचार करावयाचा आहे.

पश्चिम ही शांतिची दिशा आहे. या दिशेचा अधिपति जलाधीश वरुण आहे. कारण पाण्याचा गुणच शांति आहे. आणि तें वरुणाधीन आहे. म्हणून त्यास वर म्हणजे श्रेष्ठ म्हटलें आहे. आणि 'वर' शब्दाचा गौण अर्थ घेतला तर तो उदक वाचक आहे. ज्याच्याजवळ वर म्हणजे पाणी आहे त्याला वरुण म्हणतात. जलाधिपतीचा संबंध अस्ताशीं असणें स्वाभाविक आहे.

जलावांचून अन्नाची उत्पत्ति होत नाहीं. अन्नाचें भोजन करण्यानें आणि जलप्राशन करण्यानें क्षुधाशान्ति आणि तृषाशान्ति होते. म्हणजे खानपानाची शांति झाल्यानें, प्राण्यांत परिपूर्ण शांति झाल्यानें उत्साह वाढतो. याप्रमाणें या दिशेशीं जनतेच्या शांतीचा संबंध आहे.

आतां पश्चिमदिशेच्या विभूति पाहूं. देहांत गुह्य भाग, आयुष्यांत तारुण्यावस्था, दिवसांत सायंकाळची वेळ. दिवसास पुरुष मानलें तर तो स्वतःच्या स्त्री- रात्रीस भेटावयास जात आहे. हेंच दिवसरात्रीचें जोडपें आहे. याप्रमाणें स्त्रीपुरुषाचें जोडपें होतें. म्हणून पश्चिमदिशा तारुण्यावस्था आहे. चोवीस तासांचा अहोरात्र अथवा एक पूर्ण दिवस होतो. त्यांत बारा तास व्यतीत होतात ते आयुष्याच्या मध्य अवस्थेचे अथवा तारुण्यावस्थेचे द्योतक होत. यावेळीं सूर्य विश्रांतीसाठीं पश्चिमदिशेस जातो. ऋतूमध्यें वर्षाऋतु, महिन्यांत श्रावण-भाद्रपद, काळामध्यें पर्जन्यकाळ, वर्णांत वैश्यवर्ण, आश्रमांत गृहस्थाश्रम, पुरुषार्थांत काम, युगामध्यें द्वापरयुग, अवस्थेमध्यें सुषुप्ति इत्यादि पश्चिमदिशेच्या विभूति आहेत. त्यांचा विचार करून त्यांत न्यूनाधिक्य करणें उचित होईल. साधारणपणें येथें संक्षेपतः तिच्या रूपाचें वर्णन केलें आहे.

पश्चिमदिशेला आपण याप्रमाणें अपूर्ण आणि व्यापक मानूं. एक विशेष भाव या शब्दानें लक्षांत घेण्यासारखा आहे, सामान्य माणसें पश्चिमदिशा म्हणजे सूर्यास्त होण्याची दिशा समजतात. परंतु त्यापेक्षां केवढातरी मोठा अभूतपूर्व उच्च आणि व्यापक भाव वेदामध्यें आहे. त्याचें ज्ञान झाल्यावांचून वैदिक मंत्रांतील दिशाबोधक शब्दांचा आशय समजूं शकणार नाहीं,

'प्रति + अंच्' धातूनें 'प्रतीची' शब्द झाला आहे. या धातूचा अर्थ मागें सरणें, निवृत्त होणें, अंतर्मुख होणें विश्रांतीची तयारी करणें ' वगैरे होतो. संपूर्ण दिवस प्रवृत्तिरूप कार्य करून सूर्य विश्राम घेण्याच्या तयारीनें पश्चिमदिशेचा आश्रय घेतो. असेंच समजाना कीं समग्र जगतास दिवसभर प्रकाश दिल्यावर विश्रांतीसाठीं तो स्वतःच्या घरीं येतो. आणि रात्रीशीं संलग्न होतो. या हेतूनें रात्री ' रमयित्री ' अर्थात् रमण करणारी आहे असें म्हणण्यांत येतें. पुरुषसुद्धां याप्रमाणें सर्व दिवसाच्या व्यवहारानें थकून घरीं येवून स्वतःच्या पत्नीसह राहून शांति प्राप्त करतो. सूर्य तापतो म्हणजे तो तपस्वी आहे. त्याचें हें तेज ब्रह्मचर्याचें आहे. या ब्रह्मचर्यानंतर रात्रीशी संलग्न झाल्यानें तो गृहस्थ होतो. हेंच त्याचें पश्चिमदिशेचें कार्य आहे. इकडे ब्रह्मचर्याश्रमांत नियमबद्ध राहून व्रताचरण करणारा, तप करण्यांत ब्रह्मचारीसुद्धां गृहस्थाश्रमांत प्रवेश करतांच शांत होतो. हें व्यक्तीचें पश्चिमदिशेचें कार्य आहे. वर्णांपैकीं ब्राह्मणवर्ण यमनियम पाळून तप करतात. हा ब्राह्मणवर्ण तपश्चर्येसाठींच आहे. परंतु वैश्यवर्ण शांतीपूर्वक घरांत राहतो, व्यवहार करतो, धन मिळवितो, आनंद प्राप्त करून घेतो. या वर्णाला ब्राह्मणाप्रमाणें कष्ट नाहींत. क्षत्रियाप्रमाणें युद्धचिंता नाहीं, शांतीसह गृहसौख्य भोगत असल्यानें हा वैश्यवर्ण चातुर्वर्ण्यांत शांति आणि विश्राम म्हणजे पश्चिमदिशेचें स्थान आहे. ऋतूमध्यें वसंत आणि ग्रीष्म तापणारे आहेत परंतु वर्षाऋतूंत सर्वच जलवृष्टि होऊन नदि, महानदि, तलाव विहिरी, पाण्यानें कांठोकाठ भरून जातात आणि सर्वच शेतकरी शेतीचीं कामें सुरू करतात. सर्व भूमी हिरव्या रंगाची दिसूं लागते, सुंदर शांत होते म्हणून वर्षाऋतूला ऋतूमधील पश्चिमदिशेची विभूति मानतात. या दृष्टीनें इतरत्र पहाण्याचा प्रयत्न केला तर पश्चिमदिशेच्या विभूति दिसून येतील. या प्रकारची भावना वैदिक मंत्रांत आहे. म्हणूनच त्याची यथावत् कल्पना करतां आली तरच मंत्रांचा आशय हृदयांत विकसित होऊं शकेल.

उत्तरदिशेच्या विभूति

प्रथमच्या दोन परिच्छेदांत ' पूर्व आणि पश्चिम ' दिशांच्या विभूतींचें वर्णन करण्यांत आलें त्या क्रमाप्रमाणें या परिच्छेदांत उत्तरदिशेचा विचार करावयाचा आहे. आणि त्या दिशेच्या विभूतींचें अवलोकन करावयाचें आहे. पश्चिमदिशेनंतर क्रमप्राप्त ' उत्तर दिशा ' आहे. उत्तरदिशेचा भाव खालीं दिल्याप्रमाणें पहाण्यांत येतो—

उत्तर	उदीची
उत्-तर	उत्+अंच्
उच्च-तर	उच्च गति

(**उत्**) उच्चतेने (**तर**) अधिक उच्च होण्याचा जो भाव आहे. तो उत्तर अथवा उच्चतर शब्दानें दर्शविला आहे. उच्चतेची दिशा, अधिक उच्चतेच्या भावनेची दिशा असा या शब्दांचा आशय आहे. ज्याप्रमाणें प्रथम दोन परिच्छेदांत ' प्राची आणि प्रतीची ' दिशा क्रमशः ' प्रगति आणि विश्राम , सूचक आहेत असें दाखविण्यांत आलें, त्याप्रमाणें ही ' उदीची दिशा ' उच्चगतीची सूचक आहे. व्यक्तीच्या शरीरांत ही उत्तर

दिशा, ' डाव्या बाजूला ' आहे.

शरीरांत डावी बाजू उत्तरदिशा आहे. त्यांत हृदय मुख्य आहे. त्याचा अधिपति आत्मा आहे. अंगुष्ठमात्र पुरुष हृदयांत राहतो असें उपनिषदांतील वर्णन येथें पहाण्यासारखें आहे. त्याचा रक्षिता, ' **स्वज** ' आहे. ' **स्व-ज** ' शब्द स्वत्वापासून उत्पन्न होणाऱ्या शक्तीचा बोधक आहे. आत्मतत्त्वाच्या स्वकीय शक्तीनें येथील रक्षण होतें, बाह्य शक्तीनीं येथील कार्य होण्याची शक्यताच नाहीं. आत्म्याच्या निजशक्तीचा प्रभाव असणेंच आवश्यक आहे. आत्म्याच्या प्रेमानें तसेंच परमात्म्याच्या भक्तीनें हृदय शुभ मंगलमय होण्याची संभावना येथें स्पष्ट आहे.

उत्तरं राष्ट्रं प्रजयोत्तराविद्दिशामुदीची
कृणवन्नो अग्रम् । पांक्तः छंदः पुरुषो बभूव
विश्वैर्विश्वांगैः सह संभवेम ॥ १० ॥

' **उत्तरं राष्ट्रं प्रजया उत्तरावित्** ' उत्तरदिशा नेहमीं विजयाची राष्ट्रीय दिशा आहे म्हणून (**नः**) आम्हां सर्वांस (**अग्रं**) पुढील भागीं नेण्याची इच्छा धारण करून या उच्चतर दिशेनें प्रयत्न केला पाहिजे. (**पांक्तं**) पांच वर्णांत विभक्त (**पुरुषः**) नागरिकच तिचा छंद आहे. म्हणून सर्व अंगासह आम्ही सर्व (**सह संभवेम**) मिळून राहूं अर्थात् एकतेनें पुरुषार्थ करूं. '

राष्ट्रांत उच्च होण्याची भावनाच उत्तर अर्थात् उच्चतर दिशा आहे. या दिशेची प्रगतीची साधनें आणि अभ्युदयाच्या मार्गाचें अवलंबन करणाऱ्या राष्ट्राच्या प्रत्येक मनुष्यांत ही भावना असली पाहिजे कीं मीं (**अग्रं**) पुढें जाऊन पुरुषार्थ करीत उन्नतीला पोंहोचीन. मीं कधींहि माघार घेणार नाहीं. मागें रहाणार नाहीं. राष्ट्रांत पांच वर्ण असतात. ज्ञानासाठीं ब्राह्मणांचा श्वेतवर्ण, क्षात्रधर्मामुळें रजोगुण प्रधान असल्यानें क्षत्रियांचा रक्तवर्ण, वसून धनप्राप्तीचीं व्यापारादी कार्यें करणाऱ्या वैश्यांचा पीतवर्ण, कारागीर आणि श्रमाचीं कार्यें करणाऱ्या शूद्रांचा नीलवर्ण आणि असच्छूद्र जंगली निषादांचा कृष्णवर्ण असतो. सर्व जनता या पांच वर्णांत विभागली आहे. म्हणून पंच जनांच्या राष्ट्राचें वैदिक नांव ' पांच-जन्य ' आहे. पांचजन्याचा महानादच जनतेचें सार्वमत समजलें पाहिजे. जे पुरी म्हणजे नगरींत रहातात त्यांचें नांव पुरुष अथवा नागरिक होय. (**पुरि-वस्, पुर्-वस्, पुर्-उष् पुरुष**) हे पुरुष म्हणजे नागरिक पहिल्या चार वर्णांचे आहेत आणि पांचवा निषादवर्ण नागरिकांपासून भिन्न आहे. कारण ते जंगलांत राहतात. अरण्यवासी हा सुद्धां राष्ट्राचाच भाग आहे. ज्याप्रमाणें नागरिक हा राष्ट्राचा भाग त्याप्रमाणेंच. ' पांचजन्य राष्ट्रांत सर्व लोकांचा समावेश होतो. ज्याप्रमाणें वैदिक पांचजन्याच्या कल्पनेंत सर्वच पांची प्रकारच्या लोकांचा अंतर्भाव होतो. त्याच प्रकारचा ' पांचजन्य राष्ट्र ' चा अर्थ आणि आशय स्पष्ट करणार। दुसरा एकहि शब्द कोणत्याही भाषेंत नाहीं. यावरून हें ध्यानीं येईल कीं वैदिक राष्ट्रीयतेची कल्पना केवढी उच्च आणि किती व्यापक आहे, सर्व अवयव आणि अंगासह जेव्हां प्रेमरूप एकतेचा भाव जन्मतो तेव्हांच राष्ट्रीय एकतेची अद्भुत शक्ति निर्माण होते. त्यामुळें राष्ट्राला उच्चतर दिशेच्या अभ्युदयमार्गानें जाणें सुगम होते. या प्रकारें उत्तरदिशेची विभूति आहे.

जगताची जी उत्तरदिशा आहे ती सर्व लोकांस माहित आहे. ही उत्तरदिशा व्यक्तीच्या शरीरांत डावी बगल आहे. राष्ट्रांत उत्तरदिशा धनोत्पादक कारागीरवर्ग आहे. ऋतूमध्यें उत्तरदिशा शरदृतु आहे. महिन्यामध्यें आश्विन-कार्तिक महिने आहेत. वर्णांत सच्छूद्र कारागीरवर्ग आहे, छंदांत अनुष्टुप् छंद, भावनेंत उच्च होण्याची महत्त्वाकांक्षा. याप्रमाणें या उत्तरदिशेच्या विभूति आहेत. या दृष्टिबिंदुप्रमाणें उत्तरदिशेच्या विभूति पाहून वाचकांनीं बोध प्राप्त करावा.

वाचकांनीं याचप्रमाणें अन्य दिशांविषयीं विचार करून आणि या दोन सूक्तांचें मनन करून आवश्यक बोध घ्यावा.

रक्षणासाठीं प्रार्थना

कांड ६, सूक्त ३

(ऋषिः – अथर्वा । देवता–नानादेवता)

पातं न इन्द्रापूषणादितिः पान्तु मरुतः ।
अपां नपात्सिन्धवः सप्त पातन पातु नो विष्णुरुत द्यौः ॥ १ ॥
पातां नो द्यावापृथिवी अभिष्टये पातु ग्रावा पातु सोमो नो अंहसः ।
पातु नो देवी सुभगा सरस्वती पात्वग्निः शिवा ये अस्य पायवः ॥ २ ॥
पातां नो देवाश्विना शुभस्पती उषासानक्तोत नं उरुष्यताम् ।
अपां नपादभिह्रुती गयस्य चिद्देव त्वष्टर्वर्धय सर्वतातये ॥ ३ ॥

अर्थ — (इन्द्रापूषणौ नः पातं) इंद्र आणि पूषा हे देव आमचें रक्षण करोत. (अदितिः मरुतः पान्तु) अदिति आणि मरुत् देव आमचें रक्षण करोत. (अपां न-पात् सप्त सिन्धवः पातन) पाऊस न पाडणारा पर्जन्य देव आणि सात समुद्र आमचें रक्षण करोत. (विष्णुः उत द्यौः नः पातु) व्यापक देव आणि द्युलोक आमचें रक्षण करो. (१)

(द्यावापृथिवी अभिष्टये नः पातां) द्युलोक आणि पृथ्वीलोक अभीष्ट स्थिति प्राप्त होण्यासाठीं आमचें रक्षण करोत, (ग्रावा सोमः नः अंहसः पातु) दगड आणि सोम औषधि आम्हांस पापापासून वांचवोत, (सुभगा सरस्वती देवी नः पातु) उत्तम ऐश्वर्य असणारी विद्यादेवी आमचें रक्षण करो. (अग्निः पातु) अग्नि आमचें रक्षण करो आणि (ये अस्य पायवः) जे त्याचे रक्षक गुण आहेत ते सुद्धां आमचें रक्षण करोत. (२)

(शुभस्पती अश्विनौ देवौ नः पातां) उत्तम पालक अश्विनीदेव आमचें रक्षण करोत. (उत् ऊषासानक्ता नः ऊरुष्यतां) तसेंच उषा आणि रात्र आमचें रक्षण करोत. (अपां न-पात् त्वष्टः देव) पाण्यास खालीं न पडूं देणाऱ्या हे त्वष्टा देवा ! (गयस्य अभिह्रुती चित्) घराची दुरवस्था सुद्धां दूर करून (सर्वतातये वर्धय) सर्व प्रकारच्या विस्तारासाठीं आमची वृद्धि कर. (३)

रक्षणासाठीं प्रार्थना

देवांकडून आमचें रक्षण

या सूक्तांत कितीतरी देवांना हांका मारून आमचें रक्षण करण्याची प्रार्थना केली आहे. त्यांत पृथ्वीवर रहाणारे देव असे आहेत—

१. पृथिवी– भूमि, जिच्यावर सर्व मानवजाती रहातात.

२. सप्त सिन्धवः - सात समुद्र ज्यांत पाणी भरपूर आहे.

३. अग्निः– अस्य पायवः च= अग्नि आणि त्याच्या सर्व रक्षकशक्ति.

४. सोमः– सोम वगैरे सर्व वनस्पति आणि औषधि.

५. ग्रावा:– दगड तसेंच अन्य खनिज पदार्थ.

हे पांच देव पृथ्वीस्थानीय आहेत. ते स्वतःच्या शक्तीनें आमचें रक्षण करोत. त्यांच्यांत विविध शक्ति आहेत. म्हणून

त्या शक्तींनीं मनुष्याचें सुख वाढेल अशा उपायांचें अवलबनं केलें पाहिजे. उदाहरणार्थ अग्नीचा उपयोग स्वयंपाक वगैरे कामांत करण्यानें लाभ आणि घरें वगैरे जाळून टाकण्यांत केल्यानें हानि होतें. याचप्रमाणें इतर सर्व देवताविषयीं जाणावें. आतां अंतरिक्षांत रहाणाऱ्या देवाविषयीं विचार करूं—

६. इन्द्रः– जो पर्जन्य पाडतो, विद्युत् संचार करतो.

७. मरुतः– सर्व प्रकारचे वायु, जे प्राणादिरूपांनीं सर्वांचें रक्षण करतात.

८. अपां नपात्– मेघांत पाणी धारण करणारा देव.

९. त्वष्टा– जो मोडतोडीचें कार्य करतो आणि जो रूपें (सौंदर्य) निर्माण करीत आहे.

हे देव सुद्धां विविध शक्तींनीं मनुष्याचें रक्षण करतात त्यामुळें त्यांच्या शक्तींनीं मनुष्यास लाभ व्हावा आणि कधीं नुकसान होऊं नये अशी व्यवस्था केली पाहिजे.

आतां द्युस्थानीय देवता पहा.

१०. द्यौः–द्युलोक, जेथें सर्व तेजोधारी सूर्यादि गोल रहातात.

११. पूषा– सूर्य जो स्वतःच्या किरणांनीं सर्वांचें पोषण करतों.

हे देव द्युलोकांत रहात असून सुद्धां मनुष्यांचें रक्षण करीत आहेत. याशिवाय अन्य देवांविषयीं पहा—

१२. अश्विनौ– श्वास, आणि उच्छ्वास, प्राण आणि अपान, तारक (जर्भरि) आणि मारक (तुर्फरि) शक्ति त्या या प्राणशक्ति होत.

१३ उषासानक्ता– उषा आणि रात्री, हा काल आहे.

१४. सरस्वती– विद्यादेवी, ज्ञानदेवता, शास्त्रविद्या, सभ्यता.

१५. अदितिः– अखंडित मूळ शक्ति

१६. विष्णुः– सर्वव्यापक देव, ईश्वर.

हे सर्व देव आणि देवता मनुष्याचें रक्षण करतात. मनुष्यानें त्यांच्याशीं असें वर्तन ठेवावें कीं ज्यामुळें त्यांची शक्ति त्यांना सहायक होईल आणि कधींहि विरोध होणार नाहीं.

त्यांच्यांतील सर्व शक्ति एक अद्वितीय सर्व व्यापक देवापासून येते. तरीसुद्धां मनुष्याचा त्यांच्याशीं वेगळा वेगळा संबंध येतो आणि त्यामुळें मनुष्याचीं विविध कार्यें सुद्धां सिद्ध होतात. बरें त्यांचा विरोध झाला तर मनुष्यांची पुष्कळ हानि होणें सुद्धां शक्य आहे. म्हणून त्यांच्या सहायासाठीं येथें याचना केली आहे.

दोन उद्देश

मानवी उन्नतीचे दोन उद्देश आहेत. (१) (**गयस्य अभिन्हुतौ**) घराची हानि, कुटिलता वगैरे दूर करणें आणि (२) (**सर्व-तातये वर्धय**) सर्व प्रकारचा विस्तार होण्यासाठीं विस्तार पावणें. उक्त देवांच्या शक्तींनीं हे दोन उद्देश सिद्ध होतील असा व्यवहार केला पाहिजे. वरील सर्व देव आपल्या शरीरांत अंशरूपानें आहेत. त्यांच्या शक्तींच्या उन्नतीनें सुद्धां पुष्कळ लाभ होतो. या सूक्ताचा याप्रमाणें विचार करण्यानें पुष्कळ बोध मिळेल व लाभ होईल.

पुढील सूक्तही याच विषयाचें आहे तें आतां पाहूं—

रक्षणासाठीं प्रार्थना

कांड ६, सूक्त ४

(ऋषिः– अथर्वा । देवता – नानादेवताः)

त्वष्टा॑ मे॒ दैव्यं॒ वचः॑ प॒र्जन्यो॒ ब्रह्म॑ण॒स्पतिः॑ । पु॒त्रैर्भ्रातृ॑भि॒रदि॑ति॒र्नु पा॑तु नो दु॒ष्टरं॒ त्राय॑माणं॒ सहः॑ ॥ १ ॥

अर्थ— (त्वष्टा) सर्वांचें निर्माण करणारा पर्जन्य ब्रह्मणस्पति आणि (पुत्रैः मातृभिः अदितिः) पुत्र आणि बंधूंसह अदिति देवी (मे दैव्यं वचः) माझी दिव्य प्रार्थना ऐकोत आणि (नः दुष्टरः त्रायमाणं सहः पातु) आम्हां सर्वांच्या अजेय आणि पालन करण्याच्या बळाचें रक्षण करोत. (१)

अंशो भगो वरुणो मित्रो अर्यमादितिः पान्तु मरुतः ।
अप तस्य द्वेषो गमेदभिह्रुतो यावयच्छत्रुमन्तितम् ॥ २ ॥
धिये समश्विना प्रावतं न उरुष्या ण उरुज्मन्नप्रयुच्छन् । द्यौ३ष्पितर्यावय दुच्छुना या ॥ ३ ॥

अर्थ—अंश, भग, वरुण, मित्र, अर्यमा, अदिति आणि मरुत् हे सर्व देव माझें (पान्तु) रक्षण करोत. (तस्य अभिन्हुतः द्वेषः अपगमेत्) त्या शत्रूचा कुटिक द्वेष दूर होवो. (अन्तितं शत्रुं यावयत्) ते सर्व जवळ आलेल्या या शत्रूंना दूर पळवून लावोत. (२)

(अश्विनौ) अश्विनौ देव हो! (धिये नः सं प्रावतं) बुद्धीसाठीं आमचें उत्तम रक्षण करा. हे (उरु-ज्मन्) विशेष गति असणारा (अप्रयुच्छन्) चूक न करणारा तूं (नः उरुष्य) आमच्या सर्वांचें रक्षण कर. हे (द्यौः पितः) द्युलोकाच्या पालका! (या दुच्छुना यावय) जी दुर्गति आहे ती दूर कर. (३)

रक्षणासाठीं प्रार्थना

या सूक्तांत पहिल्या सूक्तांत आलेलीं देवतांचीं नांवें आलीं आहेत तीं, 'त्वष्टा, अदिति, मरुतः' ज्या देवांचीं नांवें पूर्व सूक्तांत आलीं नाहींत नव्यानें येथें आलीं आहेत तीं 'पर्जन्य, ब्रह्मणस्पति, अंश, भग, वरुण, मित्र, अर्यमा, द्योष्पिता' हीं आहेत. पहिल्या सूक्ताच्या अनुसंधानानेंच या सूक्ताचा अर्थ पाहिला पाहिजे.

१. पर्जन्यः = मेघ, पाणी देणारा देव.
२. ब्रह्मणस्पतिः = ज्ञानाचा स्वामी, ज्ञान देणारा.
३. अंशः = प्रकाश देणारा.
४. भगः = भाग्यवान्, भाग्य देणारा.
५. वरुणः = वरिष्ठ देव, सर्वांहून श्रेष्ठ देव.
६. मित्रः = सर्वांस हितकारी देव.
७. अर्यमा = श्रेष्ठ कोण त्याचा निश्चय करणारा.
८. द्योष्पिता = द्युलोकाचा पालक देव.
९. पुत्रैः भ्रातृभिः सह अदितिः = पुत्र आणि बंधूं-सह अदिति देवी.

अखंडित मूळ शक्तीचें नांव अदिति आहे. तिच्यापासूनच सूर्य चंद्रादि जे जे गोल निर्माण झाले आहेत, म्हणजे ते सर्व तिचे पुत्र आहेत. तसेंच त्यांच्यासारखे जे इतर तेजोगोल असतात ते त्यांचे बंधु आहेत. अर्थात् मूळशक्ति अथवा प्रकृति, अग्नि, त्यांच्यापासून उत्पन्न झालेले सर्व पदार्थ हे या मंत्रांत आहेत असें समजणें योग्य आहे. हे सर्व दैवी शक्तीने आमचें रक्षण करोत.

रक्षणाचें कार्य

रक्षण करणें याचें तात्पर्य काय तें या सूक्तांत सांगितलें आहे. म्हणून त्याचीं सूचक वाक्यें पहा. रक्षणासाठीं आपली बुद्धि उत्तम राहिली पाहिजे हें दर्शविण्यासाठीं म्हटलें आहे.

१. धिये नः सं प्र अवतं- 'उत्तम बुद्धीचा विस्तार होण्यासाठीं आमचें सर्वांचें उत्तम प्रकारें रक्षण करो.' मनुष्यास विशेष बुद्धीचीच आवश्यकता आहे. मनुष्याचें रक्षण, एवढ्या-साठींच ती आवश्यक आहे. यासाठीं मनुष्याची बुद्धि विशेष शुद्ध पवित्र, निर्दोष आणि कुशाग्र व्हावी आणि कधींहि हीन होऊं नये. (मं. ३)

२. मे दैव्यं वचः- माझें भाषण दिव्य होवो. म्हणजे त्यांत देवांच्या गुणांचें वर्णन असावें. शुद्ध भाव असावा. कधींहि हीन भाव नसावा. वाणीची याप्रकारची शुद्धि झाल्यानेंच बुद्धीची उन्नति होऊं शकते. या सूक्तांत एका वाणीचा उल्लेख करून सर्व अन्य इंद्रियांच्या प्रवृत्ति शुद्ध करण्याचा उपदेश सूचित केला आहे. ज्या नियमांनीं वाणीची शुद्धता होऊं शकते त्याच नियमांनीं नेत्र, कर्ण इत्यादि इतर इंद्रियांची सुद्धां शुद्धि होते. इंद्रियांना शुभकर्मांत सर्वदा निमग्न ठेवल्यानें सर्व इंद्रियांची सुद्धां शुद्धि होऊं शकते. हा नियम सर्व इंद्रियांसाठीं एकसारखाच आहे. आपल्या इंद्रियांमध्यें 'दिव्य भाव' स्थिर केला पाहिजे; हें या विवरणाचें तात्पर्य आहे, या प्रकारें सर्व इंद्रियें शुद्ध होण्यानें बुद्धि-सुद्धां या योगानेंच शुद्ध होते आणि विकसित होते. (मं. १)

३. द्वेषः अपगमेत्- द्वेष भाव, निंदा करण्याचा स्वभाव

शत्रुत्व करण्याचा हेतु अंतःकरणांतून दूर व्हावा. हाच पवित्र होण्याचा मार्ग आहे. द्वेषभाव मनांतून पूर्णपणें दूर झाला म्हणजे मन शुद्ध होणारच. (२)

४. **दुच्छुना यावय**- सर्व दुर्गतीला दूर कर ! स्वतःची इंद्रियें हीन कर्मांत प्रवृत्त राहिल्यानेंच सर्व प्रकारची दुर्गति होते. म्हणून पूर्वोक्त प्रकारें आत्मशुद्धि झाली तर दुर्गति आपणाजवळ फिरकणार सुद्धां नाहीं. (मं. ३)

५. **शत्रुं यावय**- शत्रूंस दूर घालवून या. आपणामध्यें काम, क्रोध वगैरे शत्रु आहेत. जे कामी अथवा क्रोधी आहेत ते समाजाचे शत्रु आहेत. ते राष्ट्राचे सुद्धां शत्रु आहेत. या सर्व शत्रूंस दूर केलें पाहिजे. पूर्वी सांगितलेल्या मार्गानें आत्मशुद्धि केल्यानें सर्व आंतरिक शत्रु दूर होतात. सामाजिक आणि अन्य राष्ट्रीय शत्रु दूर करण्यासाठीं सुद्धां हाच उपाय आहे, कीं तेथील शुद्धि केली पाहिजे. या कार्यासाठीं आपणांत बळ असलें पाहिजे. त्याचा उपदेश या प्रकारें केला आहे—

६. **नः दुष्टरं त्रायमाणं सहः**- शत्रु ज्यास सहसा पार करूं शकणार नाहीं आणि ज्यामुळें आमचें रक्षण होईल अशा प्रकारचें बळ आम्हांत असावें. बलाचीं दोन लक्षणें येथें सांगितलीं आहेत. ते बळ असें असले पाहिजे कीं ज्याचें (**दुः+तरं**) शत्रु उल्लंघन करूं शकणार नाहीं. जेव्हां शत्रु आक्रमण करील तेव्हां तो पूर्णपणें पराजित व्हावा असें बळ आपणांत असलें पाहिजे. याप्रमाणें त्या बळानें प्रत्येक कठीण प्रसंगांतून आमचें रक्षण व्हावें, असें आमचें बळ असलें पाहिजे. याप्रकारें बळ वाढल्यानें सर्व शत्रु आपोआप दूर होतील.

याप्रकारें बळ वाढविण्याचें कार्य ब्रह्मणस्पतीचें आहे. ब्रह्मणस्पति हा ज्ञानविज्ञानाचा देव आहे. तो स्वतःच्या ज्ञानदानानें पूर्वी सांगितलेलें बळ मनुष्यांत वाढवितो. यासाठीं त्याची उपासना आणि स्तुति अथवा प्रार्थना मनुष्यानें केली पाहिजे. उपासनेच्या वेळीं याप्रकारें मनन करण्यानें आणि श्रद्धाभक्तियुक्त अंतःकरणानें उपासना केली असतां हीं सर्व फळें प्राप्त होतात.

आपलें रक्षण

कांड ६, सूक्त ५३

(ऋषिः- बृहच्छुक्रः । देवता – नानादेवताः)

द्यौश्च म इदं पृथिवी च प्रचेतसौ शुक्रो बृहन्दक्षिणया पिपर्तु ।
अनु स्वधा चिकितां सोमो अग्निर्वायुर्नः पातु सविता भगश्च ॥ १ ॥
पुनः प्राणः पुनरात्मा न ऐतु पुनश्चक्षुः पुनरसुर्न ऐतु ।
वैश्वानरो नो अदब्धस्तनूपा अन्तस्तिष्ठाति दुरितानि विश्वा ॥ २ ॥

अर्थ— (**प्र-चेतसौ द्यौः च पृथिवी च**) उत्तम ज्ञानयुक्त द्युलोक आणि भूलोक (**बृहन् शुक्रः दक्षिणया**) महा सामर्थ्यवान् सूर्य दक्षतेसह (**मे इदं पिपर्तु**) माझें आणि या सर्वांचें रक्षण करो. (**सोमः अग्निः**) सोमादि वनस्पति आणि अग्नि हे (**स्वधा अनु चिकितां**) स्वतःच्या धारणशक्तीचें ज्ञान अनुकूलतेनें देवोत. (**वायुः सविता भगः च नः पातु**) वायु, सविता, आणि भग हे आम्हां सर्वांचें रक्षण करोत. (१)

(**प्राणः नः पुनः एतु**) प्राण परत आम्हांपाशीं येवोत. (**आत्मा नः पुनः एतु**) आत्मा पुनः आम्हांपाशीं येवो. (**पुनः चक्षुः पुनः असुः नः एतु**) पुनः चक्षु आणि पुनः प्राण आमच्या जवळ येवोत. (**अ-दब्धः तनू-पाः वैश्वानरः**) न दबणारा शरीराचा रक्षक सर्वांचा नेता आत्मा (**नः विश्वा दुरितानि**) आमच्या सर्व पापांस जाणत असून (**अन्तः तिष्ठति**) आंत रहात आहे. (२)

भावार्थ— द्युलोकांतील महान् शक्तिशाली भाग्यवान् सूर्य, अंतरिक्षांतील वायु आणि भूलोकांतील अग्नि, सोम वगैरे आमचें रक्षण करोत. आणि आम्हांस अनुकूल होवोत. (१)

आमचा आत्मा, प्राण, चक्षु, इत्यादि सर्व शक्ति पूर्वोक्त प्रकारें आम्हांस पुनः प्राप्त होवो. आम्ही लपून छपून पाप करूं शकत नाहीं. कारण कीं ज्ञानी आत्मा आमच्यांत नेहमीं जागृत रहातो. (२)

सं वर्चसा पयसा सं तनूभिरगन्महि मनसा सं शिवेन ।
त्वष्टा नो अत्र वरीयः कृणोत्वनु नो मार्ष्टु तन्वोऽ यद्विरिष्टम् ॥ ३ ॥

अर्थ—(**वर्चसा पयसा सं**) तेज आणि पुष्टिकारक दुधानें आम्हीं युक्त व्हावें (**तनूभिः सं**) उत्तम शरीरानीं आम्हीं युक्त व्हावें. (**शिवेन मनसा सं अगन्महि**) कल्याणमय विचारयुक्त मनानें आम्हीं युक्त व्हावें. (**त्वष्टा नः अत्र वरीयः कृणोतु**) श्रेष्ठ कारागीर परमात्मा आम्हांस येथें उत्तम करो. (**यत् नः तन्वः विरिष्टं**) जो आमच्या शरीरांत कष्ट देणारा भाग आहे (**अनु मार्ष्टु**) तो त्याला अनुकूलतेनें शुद्ध करो. (३)

भावार्थ- आम्हांस पुष्टिकारक अन्न, तेज, उत्तम शरीर, उत्तम कल्याणमय विचार करणारें मन प्राप्त होवो. आमच्या शरीरांत जे कांहीं हानिकारक पदार्थ दाखल झाले असतील ते परमेश्वराच्या योजनेनें दूर होवोत आमची शुद्धि होवो. (३)

आपलें रक्षण

या सूक्तांत आपलें सर्व प्रकारें रक्षण व्हावें या विषयीं उत्तम प्रार्थना आहे. दुसऱ्या मंत्रांत म्हटलें आहे—

आत्मा, प्राणः असुः, चक्षुः नः पुनः एतु । (मं. २)

' आत्मा, प्राण, डोळे (दृष्टि) या सर्व शक्ति पुनः आम्हांजवळ येवोत, ' म्हणजे रोगादि कारणांनीं ज्या आपत्ति शरीरावर येतात त्यांत डोळे वगैरे इंद्रियें विकल होऊन जातात. कित्येक वेळां तर तीं इंद्रियें पूर्णपणें नाश पावतात (म्हणजे इंद्रियें जाग्यावर असतात परंतु त्यांची मूळची शक्ति सर्व नष्ट होते, आत्मा आणि प्राण सुद्धां निघून जातात म्हणजे तो मनुष्य मृत्यु पावतो. शरीर इतकें रोगी होतें कीं मनुष्य मरून जातो. एवढा रोग झाला असतांहि आत्मा, प्राण, चक्षु, श्रोत्र वगैरे सर्व शक्ति पुनः आमच्या शरीरांत पूर्ववत् उत्तम अवस्थेंत येऊन राहोत. अर्थात् रोग वगैरे आपत्ति आल्या तरी आम्हांस पूर्ववत् आरोग्य प्राप्त होवो. हें आरोग्य कोणत्या रीतीनें प्राप्त होऊं शकेल त्याचा विचार प्रथम मंत्रांत केला आहे. तो पहा···

(**द्यौः बृहन् शुक्रः भगः सविता**) द्युलोकाचा महा सामर्थ्यशाली शुद्धि करणारा सूर्य (**वायुः**) अन्तरिक्षांतील वायु, आणि (**पृथिवी अग्निः सोमः**) पृथ्वीवरील अग्नि आणि सोमादि वनस्पति (**अनु स्वधा चिकितां, पातु, पिपर्तु**) अनुकूलतेनें स्वतःच्या धारकशक्ति देवोत आणि आमचें रक्षण करोत आणि पूर्णता करोत. (मं. १)

द्युलोकांत जो सूर्य आहे तो स्वतःच्या प्रकाशित किरणांनीं सर्वांची शुद्धता करतो. सर्व शक्ति देतो आणि सर्वांची वृद्धि करतो. अंतरिक्षांत जो वायु आहे तो सर्वांचा प्राण होऊन सर्वांना जीवन देतो, पवित्र आणि पुष्ट करतो आणि दीर्घआयुष्य देतो. पृथ्वीवरील सोम वगैरे वनस्पती रोग दूर करून सर्वांचें आरोग्य वाढवितात. आणि सर्वांना दीर्घायु करतात. म्हणजे आत्मा, प्राण, आणि चक्षु पुनः शरीरांत स्थिर होण्यानें (१) सूर्यप्रकाश (२) वायु आणि (३) वनस्पति आम्हांस सहाय करण्यास आरंभ करोत. त्यांच्या यथायोग्य सेवनानें आसन्नमरण झालेला मनुष्य सुद्धां पुनः स्वस्थ, निरोगी होऊं शकतो. म्हणून—

पयसा वर्चसा, शिवेन मनसा सं अगन्महि । (मं. ३)

दुग्धादि अन्नपान, तेजस्विता आणि शुभ विचारयुक्त मन प्राप्त होऊं शकतें. ' आरोग्य इच्छिणाऱ्या मनुष्यानें स्वतःचें मन शुभ मंगल विचारांनीं युक्त करावें. कारण विचार शुद्ध रहातील तर दुष्टपणा, खोटेंपणा, वाईटपणा जवळ सुद्धां येणार नाहीं. स्वभाव तेजस्वी करावा आणि उत्तम शुद्ध दुग्धाहारानें आरोग्ययुक्त व्हावें. इतकें केल्यावरहि जर कांहीं दोष अथवा रोगबीजें शरीरांत शिरलीं किंवा शिल्लक राहिलीं असलीं तर अशी प्रार्थना करावी—

त्वष्टा नः तन्वः यत् विरिष्टं मार्ष्टु । (मं. ३)

' ईश्वर आमच्या शरीरांतील रोगांस दूर करून आमची शुद्धता करो !' कारण मनुष्य प्रयत्न करीत असून सुद्धां, अशुद्धि होते, आणि दोष प्रवेश करतातच. ईश्वराची प्रार्थना केल्यानें ते सर्व दोष दूर होतात. कारण कीं परमेश्वराची प्रार्थना केल्यानें

मनांत एक प्रकारचें अद्भुत बल प्राप्त होतें. त्यामुळें सर्व दोष आणि रोगबीजें तसेंच आपत्तिहि दूर होतात आणि मनुष्य निर्दोष होतो. कोणी असें समजूं नये कीं देवाला नकळत कोणी कांहीं पाप करूं शकेल. असें कधीं होणेंच शक्य नाहीं. कारण कीं–

वैश्वानरः अदब्धः तनूपाः विश्वा दुरितानि अन्तः तिष्ठति । (मं. २)

' सर्व जगताचा नेता, कधीं न दबून जाणारा, शरीराचें रक्षण करीत आणि आमच्या सर्व पापांचे निरीक्षण करीत आमच्यांत रहातो. ' जर तो जागृत राहून अंतर्यामींच रहाणारा आहे तर त्याच्यापासून लपवून कोण कसें कसलें पाप करूं शकणार ? अर्थात् तें सर्वथा अशक्यच आहे. आमच्या सर्व चांगल्या–वाईट कर्मांस तो जाणतो. यासाठीं त्याची प्रार्थना केली पाहिजे कारण त्यामुळें आत्मिक बल प्राप्त होतें.

या प्रकारें मनुष्य निरोगी होऊं शकतो आणि स्वतःची उन्नति साधूं शकतो.

स्वतःचें रक्षण

कांड ६, सूक्त १०७

(ऋषिः – । शन्तातिः । देवता – विश्वजित्)

विश्वजित्त्रायमाणायै मा परि देहि । त्रायमाणे द्विपाच्च सर्वं नो रक्ष चतुष्पाद्यच्च नः स्वम् ॥१॥
त्रायमाणे विश्वजिते मा परि देहि । विश्वजिद् द्विपाच्च सर्वं नो रक्ष चतुष्पाद्यच्च नः स्वम् ॥२॥
विश्वजित्कल्याण्यै मा परि देहि । कल्याणि द्विपाच्च सर्वं नो रक्ष चतुष्पाद्यच्च नः स्वम् ॥३॥
कल्याणि सर्वविदे मा परि देहि । सर्वविद् द्विपाच्च सर्वं नो रक्ष चतुष्पाद्यच्च नः स्वम् ॥४॥

अर्थ— हे (विश्वजित्) जगतास जिंकणाऱ्या (मा त्रायमाणायै परिदेहि) मला रक्षण करण्याची शक्ति दे. हे (त्रायमाणे) रक्षक शक्ती ! (नः द्विपात् चतुष्पात् च सर्वं रक्ष) आमच्या द्विपाद आणि चतुष्पाद सर्वांचें रक्षण कर आणि (यत् नः स्वं) जें आमचें स्वतःचें धन आहे त्याचें सुद्धां रक्षण कर. (१)

हे (त्रायमाणे) रक्षक शक्ति ! (मा विश्वजिते देहि) मला जग जिंकणाऱ्याजवळ घेऊन जा. हे जगज्जेता ! माझें धन, द्विपाद आणि चतुष्पाद या सर्वांचें रक्षण कर. (२)

हे (विश्वजित्) जगज्जेता ! (मा कल्याण्यै परिदेहि) मला कल्याण करणाऱ्या शक्तीच्या आधीन कर हे कल्याणि ! माझें धन, द्विपाद आणि चतुष्पाद यांचें रक्षण कर. (३)

हे कल्याणि ! (मा सर्व-विदे परि देहि) मला सर्वज्ञाजवळ पोंहोचव. हे सर्वज्ञ ! माझें धन, द्विपाद आणि चतुष्पादांचें रक्षण कर. (४)

भावार्थ— जग जिंकण्याची इच्छा करणाऱ्याच्या स्वाधीन रक्षणीय वस्तु मात्र करा. तो रक्षक सर्वांचें यथायोग्य रक्षण करो. रक्षक त्या सर्व पदार्थांस विश्वाचा विजय करणाऱ्याजवळ देवो. आणि तो विश्वास जिंकणारा सर्वांचें रक्षण करो. हें सर्व रक्षण सर्वांच्या कल्याणासाठीं असो. म्हणजे सर्वांच्या रक्षणानें सर्वांचें यथायोग्य कल्याण होवो. कल्याण होवो याचा अर्थ असा कीं सर्वांनीं विशेष ज्ञान्यांजवळ रहावें, कारण कीं सर्व प्रकारचें कल्याण ज्ञानानेंच होतें. (१–४)

या सूक्तापासून पुढीलप्रमाणें बोध प्राप्त होतो. (१) प्रत्येकानें स्वतःचें रक्षण करण्याची स्वतःची शक्ति वाढविली पाहिजे, (२) मी विजय प्राप्त करीनच अशी महत्त्वाकांक्षा बाळगिली पाहिजे. (३) सर्वांनीं जास्तींत जास्त कल्याण करण्यासाठीं प्रयत्न केला पाहिजे. (४) ज्ञान्याच्या संगतींत सर्वांनीं राहून खरें ज्ञान प्रत्येकानें प्राप्त करून घेतलें पाहिजे.

रक्षणासाठीं प्रार्थना

कांड ७, सूक्त ५१

(ऋषिः – अङ्गिराः । देवता – इन्द्राबृहस्पती ।)

बृहस्पतिर्नः परि पातु पश्चादुतोत्तरस्मादधरादघायोः ।
इन्द्रः पुरस्तादुत मध्यतो नः सखा सखिभ्यो वरीयः कृणोतु ॥ १ ॥

अर्थ— (बृहस्पतिः नः पश्चात्, उत उत्तरस्मात्) ज्ञानाचा स्वामी आम्हांस पाठीमागून, उत्तरेकडून (अधरात् अघायोः पातु) खालून पापी मनुष्यांपासून वांचवो. (सखा इन्द्रः) मित्र प्रभु (पुरस्तात् उत मध्यतः) पुढून आणि मधून (सखिभ्यः वरीयः नः कृणोतु) मित्रांत आम्हांस श्रेष्ठ करो. (१)

भावार्थ— ज्ञान देणारा मागून, वरून आणि खालून अर्थात् सर्व बाजूंनी आमचें रक्षण करो; आणि मित्र इन्द्र आमचें रक्षण समोरून (पुढून) आणि मधून करो. (१)

ज्ञान देणारा आणि सहायक मित्र हे दोघे रक्षण करतात. एक बाहेरून रक्षण करतो आणि एक आंतून रक्षण करतो. परमात्मा ज्ञान देऊन बाहेरून आणि मित्र होऊन आंतून आणि सर्व बाजूंनीं रक्षण करतो. वाचकांनीं अशा रक्षणाचा अनुभव घ्यावा आणि त्यांनीं परमात्म्यास स्वतःच खरा मित्र मानावें.

सुरक्षिततेसाठीं प्रार्थना

कांड ५, सूक्त २४

(ऋषिः – अथर्वा । देवता – ब्रह्मकर्मात्मा, नानादेवताः ।)

सविता प्रसवानामधिपतिः स मावतु ।
अस्मिन्ब्रह्मण्यस्मिन्कर्मण्यस्यां पुरोधायामस्यां प्रतिष्ठायामस्यां
चित्त्यामस्यामाकूत्यामस्यामाशिष्यस्यां देवहूत्यां स्वाहा ॥ १ ॥
अग्निर्वनस्पतीनामधिपतिः स मावतु ।
अस्मिन्ब्रह्मण्यस्मिन्कर्मण्यस्यां पुरोधायामस्यां प्रतिष्ठायामस्यां
चित्त्यामस्यामाकूत्यामस्यामाशिष्यस्यां देवहूत्यां स्वाहा ॥ २ ॥

अर्थ— (अस्मिन् ब्रह्मणि) या ब्रह्मयज्ञांत, (अस्मिन् कर्मणि) या कामांत (अस्यां पुरोधायां) या पुरोहिताच्या अनुष्ठानांत, (अस्यां प्रतिष्ठायां) या प्रतिष्ठेंत (अस्यां चित्त्यां) या चिंतनांत (अस्यां आकूत्यां) या संकल्पांत, (अस्यां आशिषि) या आशीर्वादांत (अस्यां देवहूत्यां) या देवांच्या प्रार्थनेंत (स्व-आ-हा) आत्मसर्वस्वाचें समर्पण करतों. यावेळीं (सः प्रसवानाम् अधिपतिः सविता मा अवतु) त्या सर्व चेतनांचा अधिपति प्रेरक परमेश्वर माझें रक्षण करो. (१) (सः वनस्पतीनां अधिपतिः अग्निः मा अवतु) तो सर्व वनस्पतींचा अधिपति अग्नि माझें रक्षण करो. (२)

द्यावापृथिवी दातॄणामधिपत्नी ते मावताम् ।
अस्मिन्ब्रह्मण्यस्मिन्कर्मण्यस्यां पुरोधायामस्यां प्रतिष्ठायामस्यां
चित्त्यामस्यामाकूत्यामस्यामाशिष्यस्यां देवहूत्यां स्वाहा ॥ ३ ॥
वरुणोऽपामधिपतिः स मावतु ।
अस्मिन्ब्रह्मण्यस्मिन्कर्मण्यस्यां पुरोधायामस्यां प्रतिष्ठायामस्यां
चित्त्यामस्यामाकूत्यामस्यामाशिष्यस्यां देवहूत्यां स्वाहा ॥ ४ ॥
मित्रावरुणौ वृष्ट्याधिपती तौ मावताम् ।
अस्मिन्ब्रह्मण्यस्मिन्कर्मण्यस्यां पुरोधायामस्यां प्रतिष्ठायामस्यां
चित्त्यामस्यामाकूत्यामस्यामाशिष्यस्यां देवहूत्यां स्वाहा ॥ ५ ॥
मरुतः पर्वतानामधिपतयस्ते मावन्तु ।
अस्मिन्ब्रह्मण्यस्मिन्कर्मण्यस्यां पुरोधायामस्यां प्रतिष्ठायामस्यां
चित्त्यामस्यामाकूत्यामस्यामाशिष्यस्यां देवहूत्यां स्वाहा ॥ ६ ॥
सोमो वीरुधामधिपतिः स मावतु ।
अस्मिन्ब्रह्मण्यस्मिन्कर्मण्यस्यां पुरोधायामस्यां प्रतिष्ठायामस्यां
चित्त्यामस्यामाकूत्यामस्यामाशिष्यस्यां देवहूत्यां स्वाहा ॥ ७ ॥
वायुरन्तरिक्षस्याधिपतिः स मावतु ।
अस्मिन्ब्रह्मण्यस्मिन्कर्मण्यस्यां पुरोधायामस्यां प्रतिष्ठायामस्यां
चित्त्यामस्यामाकूत्यामस्यामाशिष्यस्यां देवहूत्यां स्वाहा ॥ ८ ॥
सूर्यश्चक्षुषामधिपतिः स मावतु ।
अस्मिन्ब्रह्मण्यस्मिन्कर्मण्यस्यां पुरोधायामस्यां प्रतिष्ठायामस्यां
चित्त्यामस्यामाकूत्यामस्यामाशिष्यस्यां देवहूत्यां स्वाहा ॥ ९ ॥

अर्थ— (ते दातॄणां अधिपत्नी द्यावापृथिवी मा अवतां) त्या दात्यांच्या अधिपत्नी द्यावापृथिवी माझें रक्षण करोत. (३) (सः अपां अधिपतिः वरुणः मा अवतु) तो जलांचा अधिपति वरुण माझें रक्षण करो. (४) (तौ वृष्ट्या अधिपती मित्रावरुणौ मा अवतां) ते दोघे वृष्टीचे अधिपति मित्र आणि वरुण माझें रक्षण करोत. (५) (ते पर्वतानां अधिपतयः मरुतः मा अवन्तु) ते पर्वतांचे अधिपति मरुत माझें रक्षण करोत. (६) (सः वीरुधां अधिपतिः सोमः मा अवतु) तो औषधींचा अधिपति सोम माझें रक्षण करो. (७) (सः अन्तरिक्षस्य अधिपतिः वायुः मा अवतु) तो अन्तरिक्षाचा अधिपति वायु माझें रक्षण करो. (८) (सचक्षुषां अधिपतिः सूर्यः मा अवतु) तो नेत्रांचा अधिपति सूर्य माझें रक्षण करो. (९)

चन्द्रमा नक्षत्राणामधिपतिः स मावतु ।
अस्मिन्ब्रह्मण्यस्मिन्कर्मण्यस्यां पुरोधायामस्यां प्रतिष्ठायामस्यां
चित्त्यामस्यामाकूत्यामस्यामाशिष्यस्यां देवहूत्यां स्वाहा ॥ १० ॥
इन्द्रो दिवोऽधिपतिः स मावतु ।
अस्मिन्ब्रह्मण्यस्मिन्कर्मण्यस्यां पुरोधायामस्यां प्रतिष्ठायामस्यां
चित्त्यामस्यामाकूत्यामस्यामाशिष्यस्यां देवहूत्यां स्वाहा ॥ ११ ॥
मरुतां पिता पशूनामधिपतिः स मावतु ।
अस्मिन्ब्रह्मण्यस्मिन्कर्मण्यस्यां पुरोधायामस्यां प्रतिष्ठायामस्यां
चित्त्यामस्यामाकूत्यामस्यामाशिष्यस्यां देवहूत्यां स्वाहा ॥ १२ ॥
मृत्युः प्रजानामधिपतिः स मावतु ।
अस्मिन्ब्रह्मण्यस्मिन्कर्मण्यस्यां पुरोधायामस्यां प्रतिष्ठायामस्यां
चित्त्यामस्यामाकूत्यामस्यामाशिष्यस्यां देवहूत्यां स्वाहा ॥ १३ ॥
यमः पितृणामधिपतिः स मावतु ।
अस्मिन्ब्रह्मण्यस्मिन्कर्मण्यस्यां पुरोधायामस्यां प्रतिष्ठायामस्यां
चित्त्यामस्यामाकूत्यामस्यामाशिष्यस्यां देवहूत्यां स्वाहा ॥ १४ ॥
पितरः परे ते मावन्तु ।
अस्मिन्ब्रह्मण्यस्मिन्कर्मण्यस्यां पुरोधायामस्यां प्रतिष्ठायामस्यां
चित्त्यामस्यामाकूत्यामस्यामाशिष्यस्यां देवहूत्यां स्वाहा ॥ १५ ॥
तता अवरे ते मावन्तु ।
अस्मिन्ब्रह्मण्यस्मिन्कर्मण्यस्यां पुरोधायामस्यां प्रतिष्ठायामस्यां
चित्त्यामस्यामाकूत्यामस्यामाशिष्यस्यां देवहूत्यां स्वाहा ॥ १६ ॥
ततस्ततामहास्ते मावन्तु ।
अस्मिन्ब्रह्मण्यस्मिन्कर्मण्यस्यां पुरोधायामस्यां प्रतिष्ठायामस्यां
चित्त्यामस्यामाकूत्यामस्यामाशिष्यस्यां देवहूत्यां स्वाहा ॥ १७ ॥

अर्थ-- (सः नक्षत्राणां अधिपतिः चन्द्रमाः मा अवतु) तो नक्षत्रांचा अधिपति चंद्र माझें रक्षण करो. (१०) (सः दिवः अधिपतिः इन्द्रः मा अवतु) तो द्युलोकाचा अधिपति इंद्र माझें रक्षण करो. (११) (सः पशूनां अधिपतिः मरुतां पिता मा अवतु) तो शत्रूंचा अधिपति मरुत्पिता माझें रक्षण करो. (१२) (सः प्रजानां अधिपतिः मृत्युः मा अवतु) तो प्रजांचा अधिपति मृत्यु माझें रक्षण करो. (१३) (सः पितृणां अधिपतिः यमः मा अवतु) तो पितरांचा अधिपति यम माझें रक्षण करो. (१४) (ते परे पितरः मा अवन्तु) ते पूर्व पितर माझें रक्षण करोत. (१५) (ते अवरे तताः मा अवन्तु) ते तत्पूर्वींचे पितामह माझें रक्षण करोत. (१६) (ते ततः ततामहाः मा अवन्तु) आमचे प्रपितामह आमचें रक्षण करोत. (१७)

स्वतःची सुरक्षितता

ज्ञानोपदेशाचें कर्म, इतर दुसरे पुरुषार्थ, यजन-याजन, सर्वांची स्थिरता आणि सुदृढता वाढविणारें कर्म, चित्तानें चिंतन, मनन इत्यादि कर्म, कर्म-संकल्प, आशीर्वाद देणें आणि घेणें, ईश्वराची स्तुति, प्रार्थना इत्यादि कर्म, तसेंच जें जें कर्तव्यकर्म मनुष्य करतो, त्यांत सर्व देवता आणि त्या देवतांचा प्रेरक परमात्मा माझें रक्षण करो. ही प्रार्थना या सूक्तांत आहे. आशय स्पष्ट आहे, म्हणून अधिक स्पष्टीकरणाची जरुरी नाहीं.

स्वतःच्या रक्षणासाठीं प्रार्थना

कांड, ६ सूक्त ४७

(ऋषिः – अंगिराः प्रचेताः । देवता – १ अग्निः, २ विश्वेदेवाः, ३ सुधन्वा ।)

अग्निः प्रातःसवने पात्वस्मान्वैश्वानरो विश्वकृद्विश्वशंभूः ।
स नः पावको द्रविणे दधात्वायुष्मन्तः सहभक्षाः स्याम ॥ १ ॥
विश्वे देवा मरुत इन्द्रो अस्मानस्मिन्द्वितीये सवने न जह्युः ।
आयुष्मन्तः प्रियमेषां वदन्तो वयं देवानां सुमतौ स्याम ॥ २ ॥
इदं तृतीयं सवनं कवीनामृतेन ये चमसमैरयन्त ।
ते सौधन्वनाः स्वरानशानाः स्विष्टिं नो अभि वस्यो नयन्तु ॥ ३ ॥

अर्थ— (वैश्वानरः) विश्वाचा चालक, (विश्वकृत्) विश्वाचा निर्माता, (विश्वशंभूः) विश्वाला शांति देणारा (अग्निः) प्रकाश देव (प्रातः सवने अस्मान् पातु) प्रातःकाळच्या यज्ञांत आमचें रक्षण करो. (सः पावकः नः द्रविणे दधातु) तो पवित्र करणारा आम्हां सर्वांस धनांत ठेवो आणि त्यामुळें आम्हीं (आयुष्मन्तः सहभक्षाः स्याम) दीर्घ आयुष्य युक्त आणि सहभोजन करणारे व्हावें. (१)

(विश्वेदेवाः मरुतः इन्द्रः) सर्व देव, मरुत् आणि इंद्र हे सर्व (अस्मान् अस्मिन् द्वितीये सवने न जह्युः) या द्वितीय यज्ञांत ते आम्हांस दूर न करोत. (आयुष्मन्तः) दीर्घायु आणि (प्रियं वदन्तः) गोड-प्रिय बोलणारे होऊन (वयं एषां देवानां सुमतौ स्याम) आम्हीं या देवांच्या सन्मतींत रहावें, म्हणजे त्यांचे उत्तम आशीर्वाद आम्हांस मिळोत. (२)

(ये चमसं ऐरयन्त) जे चमसाला-चमच्याला-हवनासाठीं प्रेरित करतात (कवीनां ऋतेन) त्या कवींच्या सत्य पालनानें (इदं तृतीयं सवनं) हा तिसरा यज्ञभाग होत आहे. (ते सौधन्वनाः स्वः आनशानाः) ते उत्तम धनुष्य धारण करणारे वीर आत्म्याचें तेज प्राप्त करतां करतां (नः स्विष्टिं वस्यः अभिनयन्तु) आमच्या उत्तम यज्ञानें उत्तम फळाप्रत आम्हांस घेऊन जावोत. (३)

ईश्वराचे गुण

या सूक्तांत प्रथम मंत्रांत ईश्वराचे गुणबोधक शब्द आले आहेत त्यांचा विचार असा आहे.

१. वैश्वानरः– सर्व विश्वाचा चालक, जो सर्व विश्व व्यापून रहातो आणि विश्वास प्रकट करतो.

२. विश्वकृत्– सर्व विश्व निर्माण करणारा, जगतांतील यच्चयावत् वस्तुजात-संपूर्ण जगच-तयार करणारा.

३. विश्व-शं-भूः– ज्याच्यापासून विश्वाला सुख आणि शांति मिळते.

४. अग्निः– प्रकाश देणारा, चेतना देणारा देव.

हे सर्व शब्द विशेषतः पहिले तीन शब्द सर्वांचा निर्माता एक प्रभु आहे त्याचे द्योतक आहेत. हा ईश्वर आम्हा सर्वांचें रक्षण करो. त्याच्या कृपेनें आमचें आयुष्य वाढो आणि आमच्या सर्व मंगल कामना सिद्ध-सफल-होवोत. आम्ही आपापसात (**प्रियं वदन्तः**) प्रिय संभाषण करूं आणि असें आचरण करूं कीं, ज्यामुळें (**वयं देवानां सुमतौ स्याम**) आम्हीं देवांचा उत्तम आशीर्वाद प्राप्त करूं, आमच्या विषयीं देवांची उत्तम बुद्धि स्थिर होवो आणि (**स्वः आनशानाः**) आमचा आत्मा प्रकाशित होवो.

या सूक्ताचा उत्तम उपदेश वाचकांनी ध्यानांत ठेवावा.

आमचें रक्षण

कांड ६, सूक्त ७९

(ऋषिः - अथर्वा । देवता - संस्फानम् ।)

अयं नो नभसस्पतिः संस्फानो अभि रक्षतु । असमातिं गृहेषु नः ॥ १ ॥
त्वं नो नभसस्पत ऊर्जं गृहेषु धारय । आ पुष्टमेत्वा वसु ॥ २ ॥
देवं संस्फान सहस्रपोषस्येशिषे ।
तस्य नो रास्व तस्य नो धेहि तस्य ते भक्तिवांसः स्याम ॥ ३ ॥

अर्थ— (**अयं संस्फानः नभसः पतिः**) हा वृद्धि करणारा आकाशपालक देव (**नः अभिरक्षतु**) आमचें रक्षण करो. तसेंच तो (**नः गृहेषु असमातिं**) आमच्या घरांत पुष्कळ धन ठेवो. (१)

हे (**नभसः पते**) आकाशाच्या स्वामी देवा ! (**त्वं नः गृहेषु**) तूं आमच्या घरांत (**नः ऊर्जं धारय**) आम्हांस पुष्कळ अन्न दे, आणि (**पुष्टं वसु आ एतु**) पुष्टिकारक धन सुद्धां आम्हांजवळ येवो. (२)

हे (**देव संस्फानः**) वृद्धि करणाऱ्या देवा ! तूं (**सहस्र पोषस्य ईशिषे**) हजारों पुष्टींचा स्वामी आहेस म्हणून (**तस्य नः रास्व**) त्या पुष्टि आम्हांस दे. (**तस्य नो धेहि**) तो ती आम्हांस देवो. (**तस्य ते भक्तिवांसः स्याम**) अशा तुझे आम्हीं भागीदार व्हावें. (३)

भावार्थ— हे वृद्धि करणाऱ्या ईश्वरा ! आमचें रक्षण कर आणि आमच्या घरांत धनसमृद्धि प्रदान कर. (१)

हे ईश्वरा ! तूं आमच्या घरांत धन, बुद्धि आणि बल दे. (२)

हे वृद्धि करणाऱ्या देवा ! तुझ्याजवळ हजारों पोषक शक्ति आहेत. त्यांतून थोड्या आम्हांस दे. तुझ्या पोषण सामर्थ्याचें आम्हीं भागीदार व्हावें. (३)

ईश्वराचा भक्त

परमेश्वर सर्वांचा पोषणकर्ता आहे. तो सर्वांस धन, ऐश्वर्य, अन्न, तेज आणि पुष्टि देतो. त्यासाठीं तो देव आम्हांस पोषणाचें सहाय्य देवो ! आणि त्यांचा योग्य उपयोग करून आम्हीं सर्वांनीं हृष्टपुष्ट आणि धनधान्य संपन्न व्हावें.

बळ प्राप्त करणें

कांड ६, सूक्त १०१

(ऋषिः – अथर्वाङ्गिराः । देवता – ब्राह्मणस्पतिः ।)

आ वृषायस्व श्वसिहि वर्धस्व प्रथयस्व च । यथाङ्गं वर्धतां शेपस्तेन योषितमिज्जहि ॥ १ ॥
येन कृशं वाजयन्ति येन हिन्वन्त्यातुरम् । तेनास्य ब्रह्मणस्पते धनुरिवा तानया पसः ॥ २ ॥
आहं तनोमि ते पसो अधि ज्यामिव धन्वनि । क्रमस्वर्श इव रोहितमनवग्लायता सदा ॥ ३ ॥

अर्थ— **(आवृषायस्व)** तूं बलवान् हो, **(श्वसिहि)** उत्तम प्राण धारण कर, **(वर्धस्व प्रथयस्व च)** वृद्धि पाव आणि तुझ्या अंगांना विस्तृत कर. **(यथा शेपः अङ्गं वर्धताम्)** ज्यामुळें पुरुषांग पुष्ट होवो आणि तूं **(तेन योषितं इत् जहि)** त्यामुळें स्त्रीला जिंक. (१)

हे **(ब्रह्मणस्पते)** ज्ञानी ! **(येन कृशं वाजयन्ति)** ज्यामुळें दुबळा क्षीण मनुष्य पुष्ट होतो, **(येन आतुरं हिन्वन्ति)** ज्यामुळें रोग्यास समर्थ केलें जातें. **(तेन)** त्या उपायानें **(अस्य पसः धनुः इव आतानय)** त्याचें अंग धनुष्याप्रमाणें पसरो. (२)

(अहं ते पसः तनोमि) मीं तुझ्या इंद्रियास पसरवितों, **(धन्वनि अधिज्याम् इव)** ज्याप्रमाणें धनुष्यावर दोरी खेंचून बांधतात **(ऋशः रोहितम् इव)** ज्याप्रमाणें अस्वल हरणावर तुटून पडतें त्याप्रमाणें **(अनवग्लायता सदा क्रमस्व)** न थकतां आक्रमण कर. (३)

भावार्थ— हे मनुष्या ! तूं बलवान् हो. प्राणाचें बळ वाढव, शरीर पुष्ट कर, आणि खूप बलवान तसेंच उत्साह युक्त कर. याप्रमाणें सर्व शरीर पुष्ट झाल्यानंतर स्त्री प्राप्त कर. (१)

हे ज्ञानी पुरुषा ! ज्या उपायानें क्षीण मनुष्यास पुष्ट करतात आणि रोग्यास निरोगी बनवितात, त्या उपायानें तुमचे सर्व रोगी आणि निर्बल लोक बलवान् होवोत. (२)

धनुष्याच्या दोरीप्रमाणें शरीरांत चिवटपणा आला पाहिजे. आणि असें बल प्राप्त करावें कीं ज्याप्रमाणें अस्वल हरणावर हल्ला करतें, त्याप्रमाणें न थकतां तूं नेहमीं हल्ला कर. (३)

चार प्रकारचें बळ

या सूक्तांत चार प्रकारचें बळ सांगितलें आहे. प्रत्येकानें तें चारही प्रकारचें बळ प्राप्त केलें पाहिजे. (१) **आ वृषायस्व**– हें वीर्याचें बळ आहे, शरीर वीर्यवान् असावें. (२) **श्वसिहि**– प्राणाचें बळ वाढो. श्रमाचें सहज कार्य करतांना दमल्यासारखें होऊं नये (३) **वर्धस्व**– शरीराची लांबी रुंदी योग्य प्रमाणांत वाढावी. मनुष्य खूप पुष्ट आणि उत्साहयुक्त दिसला पाहिजे. आणि (४) **प्रथयस्व**– दरेक अवयव उत्तम रीतीनें धष्टपुष्ट झालेला असावा. असें चार प्रकारच्या बळांचें वर्णन आहे. मनुष्यानें हें चारही प्रकारचें बळ प्राप्त केलें पाहिजे. वीर्य, प्राण, शरीराची वृद्धि आणि पुष्टि हे ते चार प्रकार होत. प्रत्येक मनुष्यानें स्वतःचें शरीर या चतुर्विध बळांनीं युक्त केलें पाहिजे.

कोणीहि मनुष्य कोणत्याहि कारणानें रोगी अथवा दुबळा झाला असेल तर त्यानें सुयोग्य वैद्याकडून चिकित्सा करून घेऊन निरोगी आणि हृष्टपुष्ट व्हावें. उत्तम निरोगी हृष्टपुष्ट बळवान् मनुष्यानेंच स्त्रीशीं संयोग करावा. अन्य अशक्त दुबळ्या मनुष्यानें स्त्री-पासून दूर रहावें. तसेंच मनुष्यानें बळवान् होऊन नेहमीं पराक्रम करावा.

स्वशक्तीचा विस्तार

कांड ६, सूक्त ४१

(ऋषिः – ब्रह्मा । देवता – चन्द्रमाः, बहुदैवत्यम् ।)

मन॑से चेत॑से धि॒य आकू॑तय उ॒त चित्त॑ये । म॒त्यै श्रु॒ताय॒ चक्ष॑से वि॒धेम॑ ह॒विषा॑ व॒यम् ॥ १ ॥

अ॒पा॒नाय॑ व्या॒नाय॑ प्रा॒णाय॒ भूरि॑धायसे । सर॑स्वत्या उरु॒व्यचे॑ वि॒धेम॑ ह॒विषा॑ व॒यम् ॥ २ ॥

मा नो॑ हासिषु॒र्ऋष॑यो॒ दैव्या॒ ये त॑नू॒पा ये न॑स्त॒न्व॑स्तनू॒जाः ।
अम॑र्त्या॒ मर्त्याँ॑ अ॒भि नः॑ सचध्व॒मायु॑र्धत्त प्रत॒रं जी॒वसे॑ नः ॥ ३ ॥

अर्थ— (मनसे, चेतसे, धिये) मन, चित्त, बुद्धि (आकूतये चित्तये) संकल्प, स्मृति, (मत्यै श्रुताय उत चक्षसे) मति, श्रवण आणि दर्शनशक्तीच्या वृद्धीसाठीं (वयं हविषा विधेम) आम्हीं हवींनीं यज्ञ करतों. (१)

अपान, व्यान (भूरिधायसे प्राणाय) पुष्कळ प्रकारें धारण करणारा प्राण आणि (उरूव्यचे सरस्वत्यै) फार विस्तृत प्रभावशाली विद्यादेवीच्या वृद्धिसाठीं (वयं हविषा विधेम) आम्हीं हवींनीं यज्ञ करतों. (२)

(ये तनूपाः) जे शरीराचें रक्षण करणारे आहेत ते (ये नः तन्वः तनू-जाः) जे आमच्या शरीरांत उत्पन्न झालेले आहेत, ते (दैव्याः ऋषयः) दिव्य ऋषि (नः मा हासिषुः) आम्हांस न सोडोत. हे (अमर्त्याः मर्त्यान् नः अभिसचध्वं) अमर देव आम्हां मर्त्यांसह मिळून राहोत. (नः प्रतरं आयुः जीवसे धत्त) आम्हीं उत्कृष्ट आयुष्य दीर्घ जीवनासाठीं धारण करावें. (३)

स्वतःच्या शक्तीचा विचार

आपली शक्ति

मन, चित्त, धारणाशक्ति, संकल्पशक्ति, स्मृति, मति, श्रवणशक्ति, दृष्टि, प्राण, अपान, व्यान, विद्या, ज्ञान, विचार, इत्यादि अनंतशक्ति मनुष्यांत आहे. त्यांचा विकास व्हावयास हवा. या शक्तींचा जेव्हां विकास होतो आणि त्या प्रशस्ततर सत्कर्मांसाठीं वापरल्या जातात तेव्हांच मनुष्याचा विकास होतो. प्रथम मंत्रांत अंतःकरणांतील शक्ति वर्णिल्या आहेत, आणि ज्ञानेंद्रियांचाहि उल्लेख आहे. दुसऱ्या मंत्रांत प्राणाचें वर्णन आहे आणि विद्येचा उल्लेख आहे. या मंत्रांत जरी कर्मेंद्रियें आणि अनेक शक्तींचा उल्लेख नाहीं, तथापि वर दिलेल्या इंद्रियशक्तींच्या अनुसंधानात अन्य इंद्रियें, अवयव आणि शक्तिसुद्धां आहेत हें गृहीत धरणें योग्य आहे. अर्थात् स्वतःमधील संपूर्ण शक्तींचा उत्कर्ष करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

ऋषि

या सूक्तांतील तिसऱ्या मंत्रांत ऋषींचा निश्चित उल्लेख केलेला आहे. त्यामुळें ऋषींचे आश्रम कोठें आहेत तें ज्ञान निश्चित होऊं शकतें. पहा—

तनूजाः तनूपाः दैव्यः ऋषयः । (मं. ३)

' शरीरांत उत्पन्न होऊन शरीराचें रक्षण करणारे हे इंद्रियरूपी ऋषि येथें आहेत. ' आणि हें शरीरच त्यांचा आश्रम आहे. या आश्रमांत ते रहातात. आणि येथील सर्व कार्यें करतात. त्या इंद्रिय शक्ति—

अमर्त्याः दैव्याः ऋषयः । (मं. ३)

' हे इंद्रियरूपी ऋषि दैवीशक्तीनें युक्त आहेत, आणि त्यांच्यांत जी शक्ति आहे ती अमर शक्ति आहे. ' या दैवीशक्ति शरीरांत विकसित व्हाव्या आणि या विकसित शक्तीच्या सहाय्यानें मनुष्यानें दीर्घायुष्य प्राप्त करावें, या विषयीं पुढील उपदेश पहा—

अमर्त्याः दैव्याः ऋषयः नः मर्त्यान् अभिसचध्वम् । (मं. ३)

' या अमर शक्तीनें युक्त दिव्य ऋषि म्हणजे इंद्रियें (त्यांची शक्ति) आम्हां मर्त्य मानवांच्या सर्व बाजूस प्राप्त होवोत. ' आणि—

प्रतरं आयुः जीवसे नः धत्त । (मं. ३)

' उत्तम आयुष्य दीर्घजीवनासाठीं आम्हांस प्राप्त होवो. ' म्हणजे आमच्या इंद्रियांत त्या दैवी शक्ति उत्तम प्रकारें कार्य करण्यास समर्थ होवोत.

सप्तऋषि शब्द मनुष्याच्या शरीरांतील इंद्रियवाचक आहे. दोन नेत्र, दोन कान, दोन नाकपुड्या आणि एक तोंड (**वागिन्द्रिय**) हे सात ऋषि अथवा त्वचा, नेत्र, कान, जिह्वा, नाक, मन आणि बुद्धि हे आपले सप्तऋषि होत. त्यांच्यांत दैवीशक्ति आहे. असें जाणून त्यांस देवतारूप करण्याचा प्रयत्न मनुष्यानें करावा आणि सर्व प्रकारें समर्थ होऊन कृतकृत्य व्हावें.

आत्मबळ

कांड ५, सूक्त १६

(ऋषिः - विश्वामित्रः । देवता - एकवृषः ।)

यद्येकवृषोऽसि सृजारसोऽसि ॥ १ ॥ यदि द्विवृषोऽसि सृजारसोऽसि ॥ २ ॥
यदि त्रिवृषोऽसि सृजारसोऽसि ॥ ३ ॥ यदि चतुर्वृषोऽसि सृजारसोऽसि ॥ ४ ॥
यदि पञ्चवृषोऽसि सृजारसोऽसि ॥ ५ ॥ यदि षड्वृषोऽसि सृजारसोऽसि ॥ ६ ॥
यदि सप्तवृषोऽसि सृजारसोऽसि ॥ ७ ॥ यद्यष्टवृषोऽसि सृजारसोऽसि ॥ ८ ॥
यदि नववृषोऽसि सृजारसोऽसि ॥ ९ ॥ यदि दशवृषोऽसि सृजारसोऽसि ॥ १० ॥
यद्येकादशोऽसि सोऽपोदकोऽसि ॥ ११ ॥

अर्थ— (**यदि एकवृषः, द्विवृषः, त्रिवृषः, चतुर्वृषः, पञ्चवृषः, षड्वृषः, सप्तवृषः, अष्टवृषः, नववृषः, दशवृषः असि**) जर तूं एक, दोन, तीन, चार, पांच, सहा, सात, आठ, नऊ, दहा शक्तींनीं युक्त असशील तर (**सृज**) बळ उत्पन्न कर, नाहींतर (**अरसः असि**) तूं निःसत्वच रहाशील. तसेंच जर तूं (**एकादशः असि**) अकरावा असशील तर (**अपउदकः असि**) तूं प्राकृतिक जीवनरसरहित आहेस. (१-११)

मनुष्यांत दहा इंद्रियशक्ति आहेत. प्रत्येक इंद्रियांत महान् वृषशक्ति अथवा अश्वशक्तिहि आहे. शरीरांत रहाणारा आत्मा हा सर्व शक्तींनीं युक्त असतो. शरीरांत घुसलेल्या आत्म्यानें स्वतःचें बळ वाढवावें हें त्यास उचित होय. जर त्यानें बळ वाढविलें नाहीं तर निःसंदेह आहे तेंहि बळ कमी होईल. बळ कमी होऊं नये यासाठीं तें वाढविण्याचा प्रयत्न चालू ठेवणें हेंच योग्य. जेव्हां (अकरावा) शुद्ध आत्मा म्हणजे देहरहित आत्मा होतो त्यावेळीं त्याच्याजवळ प्राकृतिक शक्ति नसतात. यावेळीं तो केवळ आत्मिक शक्तीनें युक्त रहातो, आणि ती अखंडित शक्ति असते. त्यामुळें तिच्यांत कांहीं कमीजास्ती होऊं शकत नाहीं.

सत्याचा विजय

कांड ५, सूक्त १५

(ऋषिः - विश्वामित्रः । देवता - मधुला वनस्पतिः ।)

एका च मे दश च मेऽपवक्तार ओषधे । ऋतंजात ऋतावरि मधु मे मधुला करः ॥ १ ॥
द्वे च मे विंशतिश्च मेऽपवक्तार ओषधे । ऋतंजात ऋतावरि मधु मे मधुला करः ॥ २ ॥

अर्थ— हे (**ऋतावरि ऋतजाते ओषधे**) सत्यपालक आणि सत्यानें उत्पन्न झालेल्या औषधि तूं (**मधुला**)

तिस्रश्च मे त्रिंशच्च मेऽपवक्तारं ओषधे । ऋतंजात ऋतावरि मधु मे मधुला करः ॥ ३ ॥
चतस्रश्च मे चत्वारिंशच्च मेऽपवक्तारं ओषधे । ऋतंजात ऋतावरि मधु मे मधुला करः ॥ ४ ॥
पञ्च च मे पञ्चाशच्च मेऽपवक्तारं ओषधे । ऋतंजात ऋतावरि मधु मे मधुला करः ॥ ५ ॥
षट् च मे षष्टिश्च मेऽपवक्तारं ओषधे । ऋतंजात ऋतावरि मधु मे मधुला करः ॥ ६ ॥
सप्त च मे सप्ततिश्च मेऽपवक्तारं ओषधे । ऋतंजात ऋतावरि मधु मे मधुला करः ॥ ७ ॥
अष्ट च मेऽशीतिश्च मेऽपवक्तारं ओषधे । ऋतंजात ऋतावरि मधु मे मधुला करः ॥ ८ ॥
नव च मे नवतिश्च मेऽपवक्तारं ओषधे । ऋतंजात ऋतावरि मधु मे मधुला करः ॥ ९ ॥
दश च मे शतं च मेऽपवक्तारं ओषधे । ऋतंजात ऋतावरि मधु मे मधुला करः ॥ १० ॥
शतं च मे सहस्रं चापवक्तारं ओषधे । ऋतंजात ऋतावरि मधु मे मधुला करः ॥ ११ ॥

मधुरता उत्पन्न करणारी होऊन (**मे मधु करः**) माझ्यासाठीं सर्वत्र मधुरता उत्पन्न कर (**मे एका च दश अपवक्तारः**) माझ्यासाठीं एक अथवा दहा निंदा करणारे भले असोत ! याप्रकारें (**द्वे विंशतिः च**) दोन आणि वीस, (**तिस्रः त्रिंशत् च**) तीन आणि तीस, (**चतस्रः चत्वारिंशत् च**) चार आणि चाळीस, (**पञ्च च पञ्चाशत्**) पांच आणि पन्नास, (**षट् षष्टिः च**) सहा आणि साठ, (**सप्त च सप्ततिः च**) सात आणि सत्तर (**अष्ट अशीतिः च**) आठ आणि ऐंशी, (**नव नवतिः च**) नऊ आणि नव्वद, (**दश शतं च**) दहा आणि शंभर, (**शतं च सहस्रं च**) शंभर आणि हजार (**अपवक्तारः**) निंदक उभे असले तरी मीं सत्यानेंच त्यांचा प्रतिकार करीन, त्यामुळें सर्वत्र मजसाठीं मधुरता पसरेल. (१-११)

सत्यानें यश

या सूक्तांत ऋतावरी व ऋतजाता या औषधींचीं नांवें आहेत. त्या कोणत्या असाव्यात हें माहित नाहीं. परंतु या सूक्ताच्या बाकी अर्थावरून असें वाटतें कीं, येथें कांहीं औषधिप्रयोग सांगितलेला नाहीं, परंतु जे निंदक आहेत त्यांस सत्यपालन आणि सत्य-व्यवहार करून, खऱ्या मार्गानें जाऊन सत्याचें महत्त्व आपल्या आचरणानें सिद्ध करावें असें सांगितलें आहे. सत्यपालन करणारासाठीं सर्व दिशा मधुरतेनें भरून गेलेल्या दिसतात, म्हणजे त्यास कोणाचा विरोध रहात नाहीं. सत्यपालन करणारा मनुष्य शत्रुरहित होतो. असेंच म्हणा कीं सत्यपालन व्रत हें सर्व दोष धुवून टाकणारी दोषौषधि आहे. या सूक्तांतील संख्यांचा भाव कांहीं योग्य रीतीनें समजत नाहीं.

बलसंवर्धन

कांड ४, सूक्त ४

(ऋषिः - अथर्वा । देवता - वनस्पतिः ।)

यां त्वा गन्धर्वो अखनद्वरुणाय मृतभ्रजे । तां त्वा वयं खनामस्योषधिं शेपहर्षणीम् ॥ १ ॥

अर्थ— (**यां त्वा**) जी तुला (**गन्धर्वः मृत-भ्रजे वरुणाय अखनत्**) गंधर्वानें शक्तिहीन वरुणासाठीं खोदली होती, (**तां त्वा शेपहर्षणीं ओषधीं**) ती तुझ्या इंद्रियाचें सामर्थ्य वाढविणारी औषधि आहे असें पाहून (**वयं खनामसि**) आम्हीं खोदितों. (१)

भावार्थ— तरुण मनुष्य शक्तिहीन झाला असल्यास त्याला पुनः शक्तिसंपन्न करण्यासाठीं वैद्यानें इंद्रियशक्ति वाढविणाऱ्या औषधि त्यास द्याव्यात. (१)

उदुषा उदु सूर्य उदिदं मामकं वचः। उदेजतु प्रजापतिर्वृषा शुष्मेण वाजिना ॥ २ ॥
यथा स्म ते विरोहतोऽभितप्तमिवानति । ततस्ते शुष्मवत्तरमियं कृणोत्वोषधिः ॥ ३ ॥
उच्छुष्मौषधीनां सार ऋषभाणाम् । सं पुंसामिन्द्र वृष्ण्यमस्मिन्धेहि तनूवशिन् ॥ ४ ॥
अपां रसः प्रथमजोऽथो वनस्पतीनाम् । उत सोमस्य भ्रातास्युतार्शमसि वृष्ण्यम् ॥ ५ ॥
अद्याग्ने अद्य सवितरद्य देवि सरस्वति । अद्यास्य ब्रह्मणस्पते धनुरिवा तानया पसः ॥ ६ ॥
आहं तनोमि ते पसो अधि ज्यामिव धन्वनि । क्रमस्वर्श इव रोहितमनवग्लायता सदा ॥ ७ ॥
अश्वस्याश्वतरस्याजस्य पेत्वस्य च । अथ ऋषभस्य ये वाजास्तानस्मिन्धेहि तनूवशिन् ॥ ८ ॥

अर्थ- (वाजिना शुष्मेण) शक्ति आणि बलाच्या प्रभावानें (उषाः उदेजतु) उषेचा प्रकाश वर येवो. (उ सूर्यः उत्) सूर्य वर येवो, (इदं मामकं वचः उत्) हें माझें बोलणें प्रभावी होवो आणि याप्रकारें (वृषा प्रजापतिः उत् एजतु) बलवान् प्रजापति उन्नत होवो. (२)

(यथा स्म ते विरोहतः) ज्याप्रमाणें तुझी वृद्धि होण्याच्या वेळीं (अभि तप्तं इव अनति) तापल्याप्रमाणें श्वास वाढतो, (ततः ते शुष्मवत्तरं) त्याप्रमाणें तुला अधिक बलवान् (इयं ओषधिः कृणोतु) ही औषधि करो. (३)

(ऋषभाणां ओषधीनां शुष्मा सारा उत्) ऋषभक नांवाच्या औषधींचें बलवर्धक सार तुझी शक्ति वाढवो. हे (तनुवशिन् इन्द्र) शरीरास ताब्यांत ठेवणाऱ्या इंद्रा ! (पुंसां वृष्ण्यं अस्मिन् धेहि) पुरुषांचें बळ याच्यामध्यें स्थापन कर. (४)

(वनस्पतीनां अपां प्रथमजः रसः) वनस्पतींतील जलांशाचा प्रथम उत्पन्न होणारा रस (अथ उत सोमस्य भ्राता असि) आणि सोमाचा रस बंधुसमान पोषणकर्ता आहे. (उत आर्शं वृष्ण्यं असि) आणि तो उन्नति करणारा आणि बळ वाढविणारा आहे. (५)

हे अग्नि ! (अद्य) आज, हे सविता (अद्य) आज, हे सरस्वती देवी ! (अद्य) आज, हे ब्रह्मणस्पति ! (अद्य) आज (अस्य पसः धनुः इव आतानय) त्याच्या इंद्रियाला धनुष्याप्रमाणें पसरव. (६)

(अहं ते पसः तनोमि) मीं तुझ्या इंद्रियाची वृद्धि करतों (धन्वनि अधि ज्यां इव) ज्याप्रमाणें धनुष्याची दोरी खेंचावी. (ऋशः रोहितं इव) ज्याप्रमाणें हिंसक पशु हरणावर झडप घालतो त्याप्रमाणें तूं (अनवग्लायता सदा क्रमस्व) न थकतां शत्रूवर हल्ला कर. (७)

(अश्वस्य अश्वतरस्य अजस्य पेत्वस्य च) घोड्याचें, खेचराचें आणि मेंढ्याचें (अथ ऋषभस्य) आणि बैलाचें (ये वाजाः) जें बळ आहे, हे (तनू-वशिन्) शरीरास वश करणाऱ्या तूं (तान् अस्मिन् धेहि) त्या बळास याच्यामध्यें धारण कर. (८)

भावार्थ- ज्याप्रमाणें उषा प्रकाशते, सूर्य उदयानंतर चमकूं लागतो, आणि वक्त्याचे शब्द वाढत जातात, त्याप्रमाणें या औषधीच्या सेवनानें संतानाचा पिता पुनः बलवान् होवो. (२)

या औषधीनें शरीर जास्त बलवान् होतें आणि इंद्रियांच्या शक्ति वाढतात. (३)

ऋषभक औषधींचा हा शक्तिवर्धक अर्क आहे. शरीरास स्वाधीन ठेवणारा मनुष्य बलवान् पुरुषाप्रमाणें शक्तिवर्धक या अर्करूपी औषधीस सेवन करून बलवान् होवो. (४)

या औषधींचा सत्त्वरस सोमवल्लीप्रमाणें या वल्लीचा रस सर्व शक्ति वाढविणारा आहे. (५)

हे देवा ! आज त्याच्या सर्व इंद्रियांची शक्ति वाढव. (६)

त्याच्या इंद्रियाला मीं बलवान् आणि पुष्ट करतों. ज्याप्रमाणें हिंस्र पशु हरणाला पकडतो त्याप्रमाणें न थकतां त्यानें हल्ला करावा. (७)

घोडे, खेचर, मेंढे आणि बैल यांच्यांत ज्या शक्ति आहेत त्या सर्व शक्ति, हे शरीरास ताब्यांत ठेवणाऱ्या मनुष्या ! तूं शरीरांत धारण कर. (८)

बलवर्धन

इंद्रियांचें बल वाढविणाऱ्या वनस्पतींचें या सूक्तांत वर्णन आहे. विशेषतः पुरुषांच्या जननेंद्रियशक्तीला पुनः पूर्ववत् करण्यासाठीं ऋषभक औषधींच्या रसाचें सेवन करण्याचा उपदेश त्यांत सांगितला आहे. ऋषभक आणि जीवक औषधि सोमवल्लीप्रमाणेंच हिमालयाच्या शिखरावर उत्पन्न होतात. म्हणून ऋषभकाला सोमवल्लीचा भाऊ असें ५ व्या मंत्रांत म्हटलें आहे. ही ऋषभक औषधि वीर्यवर्धक आहे. वाजीकरणासाठीं ती अत्यंत उपयोगी आहे. या विषयीं आम्हांस कांहीं जास्त लिहावयाचें नाहीं, सुयोग्य वैद्य या औषधींच्या प्रयोगाविषयीं अधिक विचार करोत. ही औषधी वीर्यवर्धनासाठीं अत्यंत गुणकारी औषधि आहे असें या सूक्तावरून दिसतें.

क्षात्रबल-संवर्धन

कांड ४, सूक्त २२

(ऋषिः – वसिष्ठः, अथर्वा । देवता – क्षत्रियो राजा, इंद्रश्च)

इ॒मामि॑न्द्र व॒र्धय॑ क्ष॒त्रियं॑ म इ॒मं वि॒शामे॑कवृ॒षं कृ॑णु॒ त्वम् ।
निर॒मित्रा॑नक्ष्णुह्यस्य॒ सर्वा॒स्तान्र॑न्धयास्मा अहमुत्त॒रेषु॑ ॥ १ ॥
एमं भ॑ज॒ ग्रामे॒ अश्वे॑षु॒ गोषु॒ निष्टं भ॑ज॒ यो अ॒मित्रो॑ अ॒स्य ।
वर्ष्म॑ क्ष॒त्राणा॑म॒यम॑स्तु॒ राजेन्द्र॒ शत्रुं॑ रन्धय॒ सर्व॑म॒स्मै ॥ २ ॥
अ॒यम॑स्तु॒ धन॑पति॒र्धना॑नाम॒यं वि॒शां वि॒श्पति॑रस्तु॒ राजा॑ ।
अ॒स्मिन्नि॑न्द्र॒ महि॒ वर्चां॑सि धेह्यव॒र्चसं॑ कृणु॒हि॒ शत्रु॑मस्य ॥ ३ ॥

अर्थ— हे इंद्रा ! तूं (**मे इमं क्षत्रियं वर्धय**) माझ्या या क्षत्रियाला वाढव. आणि (**मे इमं विशां एकवृषं त्वं कृणु**) या माझ्या क्षत्रियाला प्रजेमध्यें अद्वितीय बलवान् तूं कर. (**अस्य सर्वान् अमित्रान् निरक्ष्णुहि**) त्याच्या सर्व शत्रूंस निर्बल कर आणि, (**अहं उत्तरेषु**) मीं श्रेष्ठांत श्रेष्ठ होण्याच्या अशा या प्रकारच्या स्पर्धेत (**तान् सर्वान्**) त्या सर्व शत्रूंचा (**अस्मै रन्धय**) त्याच्यासाठीं नाश कर. (१)

(**इमं ग्रामे अश्वेषु गोषु आभज**) या क्षत्रियाला या गांवाचा, घोड्यांचा आणि गायींचा योग्य भाग दे. (**यः अस्य अमित्रः तं निः भज**) जो त्यांचा शत्रु आहे, त्यास कोणीहि भाग न देवो. (**अयं राजा क्षत्राणां वर्ष्म अस्तु**) हा राजा क्षात्रगुणांची मूर्ति होवो. हे इन्द्रा ! (**अस्मै सर्वं शत्रुं रन्धय**) त्यासाठीं सर्व शत्रूंना नष्ट कर. (२)

(**अयं धनानां धनपतिः अस्तु**) हा सर्व धनाचा स्वामी होवो. (**अयं राजा विशां विश्पतिः**) हा राजा प्रजेचा पालक होवो. हे इंद्र ! (**अस्मिन् महि वर्चांसि धेहि**) त्याच्यांत महान् तेजांची स्थापना कर. (**अस्य शत्रुं अवर्चसं कृणुहि**) त्याच्या शत्रूंस निस्तेज कर. (३)

भावार्थ— हे प्रभो ! या माझ्या राष्ट्रांत जे क्षत्रिय आहेत त्यांचें क्षात्रतेज वाढव, आणि या राजाला सर्व प्रजाजनांत अद्वितीय बलवान् कर. आमच्या या राजाचे सर्व शत्रु निर्बल होऊन जावोत आणि सर्व स्पर्धांमध्यें त्याला कोणी प्रतिस्पर्धि न राहोत. (१)

प्रत्येक गांव, गाय आणि घोडा यांतून या राजाला त्याचा योग्य भाग मिळो, त्याचे शत्रु निर्बल होवोत. हा राजा सर्व प्रकारच्या क्षात्रतेजाची मूर्ति होवो आणि त्याचे सर्व शत्रु दूर होवोत. (२)

या राजास सर्व प्रकारचें धन प्राप्त होवो. हा राजा सर्व प्रजाजनांचा उत्तम पालक होवो. या राजामध्यें सर्व प्रकारचें तेज वाढो, आणि त्याचे सर्व शत्रु निस्तेज होवोत. (३)

अस्मै द्यावापृथिवी भूरिं वामं दुंहाथां घर्मदुघे इव धेनू ।
अयं राजा प्रिय इन्द्रस्य भूयात्प्रियो गवामोषधीनां पशूनाम् ॥ ४ ॥
युनज्मि त उत्तरावन्तमिन्द्रं येन जयन्ति न पराजयन्ते ।
यस्त्वा करदेकवृषं जनानामुत राज्ञामुत्तमं मानवानाम् ॥ ५ ॥
उत्तरस्त्वमधरे ते सपत्ना ये के च राजन्प्रतिशत्रवस्ते ।
एकवृष इन्द्रसखा जिगीवां छत्रूयतामा भरा भोजनानि ॥ ६ ॥
सिंहप्रतीको विशो अद्धि सर्वा व्याघ्रप्रतीकोऽव बाधस्व शत्रून् ।
एकवृष इन्द्रसखा जिगीवां छत्रूयतामा खिदा भोजनानि ॥ ७ ॥

अर्थ— हे द्यावापृथिवी ! (घर्मदुघे धेनू इव) दूध काढीत असतां दूध देणाऱ्या दोन गाईंप्रमाणें (अस्मै भूरि वामं दुहाथां) त्याला पुष्कळ धन द्या. (अयं राजा इंद्रस्य प्रियः भूयात्) हा राजा इंद्राला प्रिय होवो. तसेंच (गवां पशूनां ओषधीनां प्रियः) गायी पशु आणि औषधी यांनाहि प्रिय होवो. (४)

(ते उत्तरावन्तं इंद्र युनज्मि) तुझ्याशीं श्रेष्ठ गुणांनीं युक्त अशा प्रभूला मीं संयुक्त करतों. (येन जयन्ति) ज्यामुळें त्यांचा विजय होतो आणि कधींहि (न पराजयन्त) पराजय होत नाहीं. (यः त्वा जनानां एकवृषं) ज्या त्याला मनुष्यामध्यें अद्वितीय बलवान् आणि (उत मानवानां राज्ञां उत्तमं करत्) मनुष्यांमध्यें व राजांमध्यें त्याला उत्तम करतील (५)

हे राजा ! (त्वं उत्तरः) तूं अधिक उच्चतर हो. (ते सपत्नाः) तुझे शत्रु आणि (ये के च ते प्राति-शत्रवः) जे कोणीं तुझे शत्रु असतील ते (अधरे) खालीं पडोत. तूं (एक वृषः) अद्वितीय बलवान् (इन्द्रसखा) प्रभूचा मित्र (जिगीवान्) जयशाली होऊन (शत्रूयतां भोजनानि आभर) शत्रूप्रमाणें आचरण करणाऱ्याचीं भोजनें येथें आण. (६)

(सिंहप्रतीकः सर्वाः विशः अद्धि) सिंहासारखा प्रभावशाली होऊन सर्व प्रजेपासून भोग प्राप्त कर. (व्याघ्र-प्रतीकः शत्रून् अव बाधस्व) वाघाप्रमाणें बलवान् होऊन तुझ्या शत्रूंना मागें परतव. (एकवृषः इन्द्रसखा जिगीवान्) अद्वितीय बलवान् प्रभूचा मित्र आणि विजयी होऊन (शत्रूयतां भोजनानि आ खिद) शत्रूप्रमाणें वागणाऱ्याचें भोजनाचें साधन पळवून घेऊन ये. (७)

भावार्थ- हे दोन्ही द्यावा पृथिवी लोक त्यास धन देवोत. हा राजा सर्वांस प्रिय होवो आणि ईश्वर, मनुष्यें, पशु पक्षी आणि औषधि या सर्वांविषयीं त्यास प्रेम वाटो. (४)

हा राजा ईश्वराशीं स्वतःचा आंतरिक संबंध जोडो. त्यामुळें त्याचा नेहमीं जय होवो. पराजय कधींहि न होवो. हा राजा याप्रमाणें मनुष्यांमध्यें अद्वितीय बलवान् आणि मनुष्यांच्या सर्व राजांमध्यें श्रेष्ठ होवो. (५)

हा राजा उच्च होवो, आणि त्याचे सर्व शत्रु अधोगतीस जावोत. तो अद्वितीय बलवान्, ईश्वराचा भक्त आणि विजयी होऊन शत्रूचा पराजय करो आणि त्यांच्या उपभोगाचे सर्व पदार्थ याला प्राप्त होवोत. (६)

सिंह-वाघाप्रमाणें प्रतापी होऊन हा राजा सर्व प्रजेपासून योग्य भोग प्राप्त करो आणि सर्व शत्रूंना दूर करो. अद्वितीय बलवान्, प्रभूचा भक्त आणि विजयी होऊन आणि शत्रूचा पराजय करून त्याचें द्रव्य स्वतःच्या राज्यांत घेऊन येवो. (७)

क्षात्रबल-संवर्धन

स्पर्धा

' **अहं-उत्तरेषु** ' हे शब्द प्रथम मंत्रांत आहेत. ते स्पर्धा-वाचक आहेत. ' मीं सर्वश्रेष्ठ व्हावें ही इच्छा सर्व मानवांमध्यें असतेच. ' मीं सर्वांत पुढें जाईन, मीं सर्वांत अधिक यश प्राप्त करीन, मी सर्वांत अधिक यश, धन आणि प्रभुत्व वगैरे प्राप्त करून सर्वांपेक्षां अधिक प्रतापी, यशस्वी आणि समर्थ होईन, ' अशी इच्छा प्रत्येकाला असतेच. धर्मभावनेनें या इच्छेचा उपयोग करून मनुष्य उच्च होऊं शकतो. अशा प्रकारें उच्च होण्यास स्वतःची शक्ति शत्रूपेक्षां वाढविली पाहिजे. शत्रूनें जी विद्या, बल, कला आणि हुन्नर प्राप्त केले असतील त्यापेक्षां स्वतःची विद्या, बल, कला आणि हुन्नर जास्त झाले तरच तो उन्नति साधून शत्रूस जिंकू शकेल. या व्यतिरिक्त उन्नतीचा दुसरा कोणताहि मार्ग नाहींच.

या सूक्तांत सामान्यपणें क्षत्रियास स्वतःचें यश वाढविण्याचा उपदेश आहे, आणि विशेषतः राजाचें बळ वाढविण्याचा उपदेश आहे. सर्व जगांत स्वतःचें राष्ट्र अग्रस्थानीं चमकेल असें उन्नत करणें हें प्रत्येक राजाचें आवश्यक कर्तव्य होय. प्रत्येक कार्यक्षेत्रांत जे जे शत्रु असतील त्यांस खाली पाडून स्वतःच्या वीरांची उन्नति साधल्यानें उक्त सिद्धि प्राप्त होते.

प्रत्येक मनुष्यानें अशी इच्छा केली पाहिजे कीं माझ्या राष्ट्राचे वीर अत्यंत विजयी व्हावेत. आमचें राष्ट्र इतर कोणत्याहि राष्ट्राच्या मार्गे पडूं नये. मीं सर्वांत पुढें असेन. माझें राष्ट्र सर्व राष्ट्रांच्या अग्रभागीं राहील. त्या सिद्धीसाठीं प्रत्येकानें प्रयत्न करावयास हवा. प्रत्येक मनुष्यानें स्वतःच्या गुण-कर्म-वृद्धीची पराकाष्ठा करून स्वतःला आणि स्वतःच्या राष्ट्राला उच्चस्थानीं नेण्याचा प्रयत्न करावा. हा भाव ' **अहं उत्तरेषु** ' या शब्दांत आहे. प्रत्येक मनुष्यांत ज्याप्रमाणें क्षात्रतेज असतें तद्वत् प्रत्येक राष्ट्रांतहि असतेंच. त्या गुणाचा उत्कर्ष व्हावयास हवा. या गुणाच्या उत्कर्षानेंच शत्रु कमी होऊं शकतील.

राजानें स्वतःच्या राष्ट्रांत शिक्षणाची अशी व्यवस्था केली पाहिजे कीं सर्व प्रजा एकाच उद्देशानें प्रेरित होऊन ती सर्व शत्रूंचा पराजय करण्यास समर्थ होईल. प्रत्येक कार्यक्षेत्रांत कोणत्याहि प्रकारें असमर्थता होऊं नये. ' **विशां एक-वृषं कृणु त्वं** ' (मं. १) प्रजेमध्यें अद्वितीय बल निर्माण करणारा तूं हो. हें गुप्त तात्पर्य या मंत्रांत आहे. हीच विजयाची गुरुकिल्ली आहे. राजाचें मुख्य कर्तव्यच हें. त्यानें प्रजेमध्यें अद्वितीय बल वाढवावें. या बलाचे चार प्रकार आहेत. ज्ञानबल, वीर्यबल, धनबल आणि कलाबल. हें चार प्रकारचें बल स्वतःच्या राष्ट्रांत वाढवून स्वतःच्या राष्ट्रास जगाच्या अग्रस्थानी आणून उच्चस्थानीं स्थापित केलें पाहिजे. तेव्हांच सर्व शत्रु कमी होतील. येथें इतरांस खालीं पाडण्याचा उपदेश नाहीं, तर स्वतः उन्नत होण्याचा आणि स्वतःच्या राष्ट्राचा उद्धार करण्याचा उपदेश केला आहे. इतरांचीहि उन्नति व्हावी आणि आमचीहि उन्नति व्हावी. उन्नतीसाठीं स्पर्धा व्हावयास हवी. मंत्रांतील पद, ' **अहं-उत्तरेषु** ' आहे, ' **अहं नीचेषु** ' असें नाहीं. वाचकांनीं या दिव्य उपदेशाचें अवश्य मनन करावें.

हें सूक्त अगदीं सरळ आहे आणि मंत्रांचा अर्थ आणि भावार्थ वाचल्यानें सर्व आशय मनांत स्पष्ट होतो. म्हणून त्याच्या स्पष्टीकरणार्थ आणखी लिहिण्याची आवश्यकता नाहीं.

सत्याचें बळ

कांड ४, सूक्त ३६

(ऋषिः – चातनः । देवता – सत्यौजा अग्निः ।)

तान्त्सत्यौजाः प्र दहत्वग्निर्वैश्वानरो वृषा । यो नो दुरस्याद्दिप्साच्चाथो यो नो अरातियात् ॥ १ ॥

अर्थ— (सत्य-ओजाः वैश्वा-नरः) सत्य बलवान्, विश्वाचा नेता (वृषा अग्निः) बलवान् तेजस्वी देव (तान् प्रदहतु) त्यांस भस्म करून टाको. (यः नः दुरस्यात्) जे आम्हांस वाईट स्थितींत टाकतात अथवा (च दिप्सात्) आमचा नाश करतात (अथो यः नः अरातीयात्) आणि जे आम्हांशीं शत्रूप्रमाणें वर्तन करतात. (१)

भावार्थ— जे लोकांना दुरवस्थेंत ठेवतात, मनुष्यांचा नाश करतात आणि शत्रुत्व करतात त्यांना, सत्य बल असणारा विश्वव्यापक देव जाळून भस्म करो. (१)

यो नो दिप्सदर्दिप्सतो दिप्सतो यश्च दिप्सति। वैश्वानरस्य दंष्ट्रयोरग्नेरपि दधामि तम् ॥ २ ॥
य आगरे मृगयन्ते प्रतिक्रोशेऽमावास्ये। क्रव्यादो अन्यान्दिप्सतः सर्वांस्तान्त्सहसा सहे ॥ ३ ॥
सहे पिशाचान्त्सहसैषां द्रविणं ददे। सर्वान्दुरस्यतो हन्मि सं म आकूतिर्ऋध्यताम् ॥ ४ ॥
ये देवास्तेन हासन्ते सूर्येण मिमते जवम्। नदीषु पर्वतेषु ये सं तैः पशुभिर्विदे ॥ ५ ॥
तपनो अस्मि पिशाचानां व्याघ्रो गोमतामिव। श्वानः सिंहमिव दृष्ट्वा ते न विन्दन्ते न्यञ्चनम् ॥ ६ ॥
न पिशाचैः सं शक्नोमि न स्तेनैर्न वनर्गुभिः। पिशाचास्तस्मान्नश्यन्ति यमहं ग्राममाविशे ॥ ७ ॥

अर्थ- (यः अदिप्सतः नः दिप्सत्) जो निरपराधी अशा आम्हां सर्वांचा नाश करूं इच्छितो अथवा (यः च दिप्सतः दिप्सति) जो नाश करणाऱ्यांना दुःखी करतो, (वैश्वा-नरस्य अग्नेः दंष्ट्रयोः) विश्वचालक तेजस्वी देवाच्या दोन्ही दाढांत (तं अपि दधामि) मीं त्याला ढकलून देतों. (२)

(ये आगरे) जे घरांत, (प्रति क्रोशे अमावास्ये) भांडणतंट्याच्या वेळीं आणि अमावास्येच्या रात्रीं (मृगयन्ते) शोधीत फिरतात. (अन्यान् दिप्सतः क्रव्यादः तान् सर्वान्) दुसऱ्यांस घातक आणि मांसभक्षण करणाऱ्या त्या सर्वांना मी (सहसा सहे) आपल्या बळानें पराभूत करतों. (३)

(पिशाचान सहसा सहे) रक्तपिपासूंचा मीं बळानें पराभव करतों. (एषां द्रविणं ददे) त्यांचें धन मीं घेतों. (दुरस्यतां सर्वान् हन्मि) दुष्ट अवस्थेस पोहोंचविणाऱ्या सर्व दुष्टांचा नाश करतों. (मे आकूतिः सं ऋध्यतां) माझा हा संकल्प सफल होवो. (४)

(ये देवाः तेन हासन्ते) जे दिव्यजन त्याच्यासह आनंद करतात, (सूर्येण जवं मिमते) आणि सूर्याच्या वेगाशीं तुलना करतात त्यांच्यापासून आणि (नदीषु पर्वतेषु ये तैः पशुभिः) नदीमध्यें आणि पर्वतावर रहाणाऱ्या प्राण्यांशीं आणि पशूंशीं मीं (सं विदे) मित्रत्व करतों. (५)

ज्याप्रमाणें (गोमतां व्याघ्रः इव) गायींचें पालन करणाऱ्यांस वाघाचें भय असतें त्याप्रमाणें मीं (पिशाचानां तपनः अस्मि) रक्त पिणाऱ्यांना तापविणारा आहे. (सिंहं दृष्ट्वा श्वानं इव) सिंहाला पाहून कुत्रा ज्याप्रमाणें घाबरतो, त्याप्रमाणें माझ्या प्रभावानें (ते न्यञ्चनं न विन्दते) ते दुष्ट लोक स्वतःस रक्षणाचें स्थान मिळवूं शकत नाहींत. (६)

(यं ग्रामं अहं आविशे) ज्या गांवात मी प्रवेश करतों तेथील (पिशाचैः न सं शक्नोमि) रक्त पिणाऱ्यांशीं मीं मित्रत्व करूं शकत नाहीं. (न स्तेनैः) त्याप्रमाणेंच चोरांशीं सुद्धां आणि (न वनर्गुभिः) जंगली शत्रूंशीं सुद्धां मीं मित्रत्व करूं शकत नाहीं. त्यामुळें (तस्मात् पिशाचाः नश्यन्ति) त्या गांवांतून रक्त पिणारे, चोर लुटारु पळून जातात. (७)

भावार्थ-- जे दुष्ट आम्हां निरपराध्यांवर हल्ला करतात, अथवा आमचा थोडा अन्याय झाला असतां जे स्वतःच्या हातांत अधिकार घेऊन आमचा नाश करतात, त्यांना विश्वचालक तेजस्वी देवाच्या दाढेंत मीं ढकलून देतों. (२)

जे घरांत भांडणतंट्याच्या वेळीं अथवा अमावास्येच्या अंधाऱ्या रात्रीं शोधून शोधून लोकांस त्रास देतात, त्या सर्वांना मी स्वतःच्या बलानें दूर करतों. (३)

रक्त पिणाऱ्या दुष्टांना मीं दूर करतों, आणि त्यांचें धन हरण करतों. पीडा देणाऱ्या त्या दुष्टांचा मीं समूळ नाश करतों. ही माझी इच्छा सफळ होवो. (४)

जे सज्जन नेहमीं स्वतःच्या निजानंदांत मग्न रहातात आणि सूर्याच्या गतीनें स्वतःची गति मापतात, मीं त्यांच्याशीं मित्रत्व करतों. इतकेंच नव्हे तर नदींत रहाणाऱ्या मत्स्यादिकांशींहि तसेंच पर्वतावर रहाणाऱ्या चतुष्पाद प्राण्यांशी सुद्धां मीं मित्रत्व करितों. (५)

गायी ज्याप्रमाणें वाघाला भितात, त्याप्रमाणें रक्तपिपासु दुष्ट मला भितात. ज्याप्रमाणें सिंहासमोर कुत्रा टिकूं शकत नाहीं त्याप्रमाणें माझ्यासमोर ते दुष्ट सुखाचें स्थान प्राप्त करूं शकत नाहींत. (६)

मीं ज्या गांवांत जाऊन पोहोंचतों त्या गांवांतून रक्तपिपासु, चोर, लुटारू वगैरे सर्व दुष्ट दूर जातात. (७)

यं ग्राममाविशत इदमुग्रं सहो मम । पिशाचास्तस्मान्नश्यन्ति न पापमुप जानते ॥ ८ ॥
ये मा क्रोधयन्ति लपिता हस्तिनं मशका इव । तानहं मन्ये दुर्हितान् जने अल्पशयूनिव ॥ ९ ॥
अभि तं निर्ऋतिर्धत्तामश्वमिवाश्वाभिधान्या । मल्वो यो मह्यं क्रुध्यति स उ पाशान्न मुच्यते ॥ १० ॥

अर्थ — (मम इदं उग्रं सहः) माझें हें उग्र बळ (यं ग्रामं आविशते) ज्या गांवांत प्रवेश करतें (तस्मात् पिशाचाः नश्यन्ति) तेथून रक्त पिणारे नाश पावतात, आणि (पापं न उपजानते) पापांस सुद्धां जाणत नाहींत. (८)

(हस्तिनं मशकाः इव) हत्तीस ज्याप्रमाणें मच्छर त्याप्रमाणें (ये मां लपिताः क्रोधयन्ति) जे मला बडबड करून क्रोधित करतात, (तान् अल्पशयून् इव) त्यांना क्षुद्र जंतूंप्रमाणें (अहं जने दुर्हितान् मन्ये) मीं लोकांत दुःख वाढविणारे असें समजतों. (९)

(तं निर्ऋतिः अभिधत्तां) त्यास दुर्गति प्राप्त होवो. (अश्वाभिधान्या अश्वं इव) घोड्याला बांधण्यास ज्याप्रमाणें दोरी बांधतात, (यः मल्वः मह्यं क्रुध्यति) जो मलिन पुरुष मला क्रोधित करतो, (सः उ पाशात् न मुच्यते) तो पाशांतून सुटत नाहीं. (१०)

भावार्थ- माझें उग्र शौर्य ज्या गांवांत चमकतें तेथून मांसभक्षक मनुष्यें नष्ट होतात आणि यदाकदाचित् तीं तेथें राहिलींच तर तीं आपले दुष्ट विचार सोडून देतात. (८)

जे दुर्जन स्वतःच्या दुराचारांनीं मला क्रोधित करतात, ते नाश पावतात; कारण कीं त्यांच्यामुळेंच जनतेस पीडा होते हें मीं जाणतों. (९)

जे मलिन आचरणाचे आहेत, ते निःसंदेह दुर्गतीस जातात, आणि ते बंधनांत पडतात. (१०)

सत्याचें बळ

सत्याचें बळ केवढें महान् असतें, त्याचें मनोरंजक वर्णन या सूक्तांत करण्यांत आलें आहे. सातव्या आणि आठव्या मंत्रांत म्हटलें आहे कीं, ' ज्या गांवांत सत्यानें बलवान् झालेला मनुष्य जातो त्या गांवांतून चोर, लुटारू, डाकू आणि दुष्ट लोक आणि दुसऱ्यांचें रक्त पिणारे लोक दूर होतात. ज्या गांवांत सत्यनिष्ठ मनुष्य रहातात त्या गांवांत दुष्ट मनुष्य रहात नाहींत. ज्या गांवांतील लोकांमध्यें सत्याचें बळ असतें त्या गांवांतून दुष्ट मनुष्यें दूर जातात, अथवा तीं जर तेथेंच राहिलीं तर आपले दुष्ट विचार तीं सोडून देतात. (मं. ७-८)

गांवांत जरी असा एकच मनुष्य सत्यनिष्ठ झाला, तरी सर्व गांव सुधारून जातें. एक मनुष्य सत्यनिष्ठ असल्यानें म्हणजे वाचा मनसा त्याचे कुविचार नष्ट झाल्यानें तो मनुष्य सत्याच्या बलानें सर्व गांवच्या मनुष्यांची उक्त प्रकारें सुधारणा करूं शकतो.

यावरून वाचकांच्या ध्यानीं येईल कीं सत्याचें बळ केवढें मोठें आहे तें; आणि मनुष्याची उन्नति या सत्यनिष्ठेनेंच साधते. स्वतःच्या गांवांत जर चोर, डाकू, लुटारू रहात असले तर समजावेंच कीं आपणामध्यें जितकी पाहिजे तितकी सत्यनिष्ठा अद्याप विकास पावली नाहीं. आपल्या गांवाबरोबर आपलीहि परीक्षा होते, आणि आपल्या उन्नतीसह गांवाची उन्नति सुद्धां साधते. याप्रमाणें व्यक्तीचा समाजावर आणि समाजाचा व्यक्तीवर परिणाम होतो.

अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह तसेंच शौच, संतोष, तप, स्वाध्याय आणि ईश्वरप्रणिधान हे यमनियम जर एकाच मनुष्यांत वाढतील आणि स्थिर होतील, तर त्याच्या अंतःकरणांतील पवित्रतेमुळें सर्व गांव सुधारतें. म्हणूनच या सत्याचें बळ स्वतःमध्यें जितकें जास्तींत जास्त विकसित होईल, तेवढा प्रयत्न प्रत्येक मनुष्यानें करावा.

दुष्ट मनुष्य

या सूक्तांत दुष्ट मनुष्याचीं कित्येक लक्षणें सांगितलीं आहेत, त्यांचा आतां आपण विचार करूं.

(१) **दुरस्यात्**- दुसऱ्यांना जे वाईट, दुष्ट मनुष्य खराब स्थितींत टाकतात ते. मं. १)

(२) दिप्सात्- दुसऱ्याची जे हत्या किंवा नाश करतात. (मं. १,२)

(३) अरातीयात्- जे शत्रुत्व करतात अथवा निंदा आणि द्वेष करतात. जे शत्रूप्रमाणें आचरण करतात. (मं. १)

(४) अदिप्सतः दिप्सत्- दुसऱ्यांस कधींहि कष्ट न देणाऱ्या सज्जनांना ते क्लेशदायक, तापदायक होतात. (मं. २)

(५) दिप्सतः दिप्सति- थोडे कष्ट होतांच न्याय स्वतःच्या हातांत घेऊन दुसऱ्याचें अपरिमित नुकसान करतात. (मं. २)

(६) आगरे दिप्सति- जे घरांत शिरून विनाकारण मारपीट अथवा हत्या करतात.

(७) प्रतिक्रोशे दिप्सति- थोडी बोलाचाल होतांच रागावून जे दुसऱ्याशीं मारामारी करतात. (मं. ३)

(८) अमावास्ये मृगयन्ते- अमावास्येच्या रात्रीं जे शोधून शोधून लूट करतात, दरोडा घालतात. (मं. ३)

(९) पिशाचाः- कच्चें मांस आणि रक्त खाणारीं क्रूर मनुष्यें. (मं. ४,६–८)

(१०) स्तेनः- चोर, लुटारू, डाकू वगैरे. (मं. ७)

(११) वनर्गुः- जंगली लोक जे गांवांत रहाणाऱ्या लोकांना त्रास देतात. (मं. ७)

(१२) जने दुर्हितान्- लोकांचें अहित करणारे. (मं. ९)

(१३) अल्पशयून्- रात्रीं थोडी झोंप घेणारे म्हणजे रात्रीच्या बाकीच्या वेळीं लूट, दरोडे घालणारे. (मं. ९)

(१४) मलवः- मलिन आचरण असणारे, वाईट लक्षणें असणारे दुष्ट. (मं. १०)

दुष्ट माणसांचीं हीं चौदा कुलक्षणें या सूक्तांत दिलीं आहेत यांचा विचार केला तर त्यावरून आपल्या गांवांत कोणता मनुष्य कशा प्रकारचा दुष्ट आहे तें समजूं शकतें. आणि त्यांना सुधारता तरी येईल अथवा त्यांना गांवांतून काढून लावून गांवाची सुधारणा तरी करता येईल. आठव्या मंत्रांत म्हटलें आहे, ' सत्यनिष्ठ मनुष्य ज्या गांवांत रहातो, त्याच्या त्या प्रभावानें, सत्याच्या बळानें, एक तर दुष्ट मनुष्यें तो गांव सोडून जातात अथवा ते स्वतःचें दुष्टत्व सोडून सज्जन होऊन रहातात.' हीच ग्राम सुधारणेची रीत आहे. वाचकांनीं याप्रमाणें विचार करून स्वतःच्या स्थानाची सुधारणा करावी.

वैश्वानराचा जबडा

दुष्ट मनुष्याला, अपराधी मनुष्याला आपण स्वतःच शिक्षा करूं नये, परंतु ' वैश्वानराच्या जबड्यांत ' त्यास टाकावें, हा उपदेश सूक्ताच्या दुसऱ्या मंत्रांत सांगितला आहे. आतां हा ' वैश्वानराचा जबडा ' म्हणजे काय त्याचा अवश्य विचार व्हावयास हवा.

' विश्व ' शब्दाचा अर्थ ' सर्व ' असा आहे, आणि नर शब्द मनुष्यवाचक आहे. म्हणजे ' विश्वानर ' शब्द मनुष्यसमूहाचा वाचक झाला. सर्व मानवांच्या एकरूपसंघाची कल्पना ' वैश्वानर ' शब्दानें येणें शक्य आहे. त्याचा जबडा अथवा न्यायालय अथवा पंचायत नांवानें प्रख्यात आहे. त्या न्यायालयासमोर त्या अपराध्यास उभा केला पाहिजे.

कोणीहि कायदा म्हणजे शासनाधिकार स्वतःच्या हातांत घेऊं नये, परंतु पंचाच्या शासननिर्णयावर संतुष्ट रहावें. हा अत्यंत सभ्यतेचा आदेश या सूक्तांत वेदानें दिला आहे. ग्राम, नगर आणि राष्ट्रांत शांति ठेवण्यासाठीं या नियमाचें पालन अत्यंत आवश्यक आहे आणि जीं मनुष्यें या नियमाविरुद्ध कायदा स्वतःच्या हातांत घेतात, तीं सभ्य समजलीं जात नाहींत.

पूर्वीं वर्णिलेल्या दुष्ट मनुष्यांस समाजांतून दूर केलें पाहिजे. कारण कीं, ते (पिशाचाः) स्वतःच्या स्वार्थासाठीं दुसऱ्याचें रक्त पितात. वैदिकधर्म आत्यंतिक अहिंसा स्थापन करूं इच्छितो. म्हणून हिंसकाचा हिंसाभाव दूर करण्याचे उपाय त्यांत अनेक प्रकारें वर्णिले आहेत. यामुळेंच तर या सूक्ताच्या ५ व्या मंत्रांत नदी आणि पर्वतावर निवास करणारे हिंसक प्राणी यांच्याशीं (सं विदे) सद्भावना, स्थापण्याची सूचना देण्यांत आली आहे. ' संवेदने ' चा अर्थ ज्याप्रमाणें आपणांस दुःख होतें त्याचप्रमाणें त्या प्राण्यांनाहि सुखदुःख असतें, समजतें ही भावना मनांत जागृत राहिली पाहिजे.

ये नदीषु पर्वतेषु (पशवः सन्ति) ते पशुभिः संविदे ॥ (मं. ५)

' जे नदी-पर्वतांत जीवजंतु रहातात त्यांना मीं माझी सहृदयता पोंहोचवितों. ' अशी अहिंसेची प्रतिज्ञा प्रत्येक मनुष्यानें केली पाहिजे. ' माझ्याकडून कोणत्याहि जीवजंतूचें कांहींहि नुकसान होणार नाहीं अथवा त्यांना मजपासून भय पोंहोंचणार नाहीं, असा संकल्प केला पाहिजे. याप्रकारें अहिंसा आणि निर्भयता आपल्या अंतःकरणांत स्थिर झाली पाहिजे. असा भाव निर्माण झाला तरच सर्व प्रकारच्या उन्नतीची शक्यता आहे. आपल्या हृदयाची एवढी तयारी झाल्यावर—

ये देवाः तेन हासन्ते, सूर्येण जयं मिमते ।
(मं. ५)

' जे देव त्या आत्मानंदानें नेहमीं हसतात आणि स्वतःच्या उन्नतीचा वेग सूर्याच्या गतीनें मापतात. ' त्यांच्याशीं सहवास, मैत्री, व आत्मभाव ठेवला पाहिजे. जेव्हां प्रथम एकदां आपल्या मनांत अहिंसा स्थिर झाली तर अशा सज्जनांच्या सहवासानें-संगतीनें लाभ होईलच. अर्थात् सुधारणेचे दोन उपाय आहेत. एक आपल्या स्वतःच्या अंतःकरणास पवित्र करणें; दुसरा दिव्य जनांशीं मैत्री जोडणें, या प्रकारें मनुष्य न चुकतां उन्नतीच्या मार्गानें जाऊं शकतो.

असा सत्यनिष्ठ श्रेष्ठ महात्मा ज्या गांवांत जातो, त्या गांवांत दुष्ट मनुष्य राहूंच शकत नाहीं, आणि कदाचित् राहिला, तर तो त्याची दुष्टता सोडून देतो. हें सातव्या आणि आठव्या मंत्राचें कथन विचारशील वाचकांनीं मनन करण्यास योग्य आहे. ही कसोटी स्वतःला लावून पहावी आणि उन्नतीच्या मार्गानें मनुष्यानें आपली प्रगति चालू ठेवावी.

आत्मशुद्धीसाठीं प्रार्थना

कांड ६, सूक्त १९

(ऋषिः - शन्तातिः । देवता - चन्द्रमाः, नानादेवताः ।)

पुनन्तु मा देवजनाः पुनन्तु मनवो धिया । पुनन्तु विश्वा भूतानि पवमानः पुनातु मा ॥ १ ॥
पवमानः पुनातु मा क्रत्वे दक्षाय जीवसे । अथो अरिष्टतातये ॥ २ ॥
उभाभ्यां देव सवितः पवित्रेण सवेन च । अस्मान्पुनीहि चक्षसे ॥ ३ ॥

अर्थ— (देवजनाः मा पुनन्तु) दिव्यजन मला शुद्ध करोत, (मनवः धिया पुनन्तु) मननशील मनुष्यें स्वतःच्या बुद्धीनें मला पवित्र करोत, (विश्वा भूतानि पुनन्तु) विश्वांतील सर्व भूतें मला पवित्र करोत आणि (पवमानः मा पुनातु) पवित्र करणारा देव मला पवित्र करो. (१)

(क्रत्वे दक्षाय जीवसे) कर्म, बल आणि दीर्घायुष्यासाठीं (अथो अरिष्टतातये) आणि कल्याणाच्या विस्तारासाठीं (पवमानः मा पुनातु) पवित्र करणारा देव मला पवित्र करो. (२)

हे (देव सवितः) सर्वांच्या उत्पादक देवा । (चक्षसे) तुझें दर्शन व्हावें म्हणून (उभाभ्यां पवित्रेण) दोन्ही पवित्र विचार आणि (सवेन च) यज्ञानें (अस्मान् पुनीहि) आम्हां सर्वांस पवित्र कर. (३)

स्वतःची कार्यशक्ति, शारीरिक आणि मानसिक शक्ति, दीर्घ जीवन होण्यासाठीं आणि कल्याणाच्या प्राप्तीसाठीं विचाराची आणि आचाराची पवित्रता वाढविणें हें प्रत्येक मनुष्याचें उचित कर्तव्य आहे. त्या कार्यासाठीं ही प्रभूची उत्तम प्रार्थना आहे. जे मनोभावानें ही प्रार्थना करतील, त्यांचें पावित्र्य निश्चित वाढेल यांत कांहींच शंका नाहीं.

मी उत्तम होईन

कांड ६, सूक्त १५

(ऋषिः - उद्दालकः । देवताः -- वनस्पतिः ।)

उत्तमो अस्योषधीनां तव वृक्षा उपस्तयः । उपस्तिरस्तु सोऽस्माकं यो अस्माँ अभिदासति ॥१॥

अर्थ— (ओषधीनां उत्तमः असि) तूं औषधीमध्यें उत्तम आहेस. (वृक्षाः तव उपस्तयः) इतर वृक्ष तुझ्या खालीं आहेत. (अतः यः अस्मान् अभिदासति) म्हणून जो आम्हांस दास करून आमचा नाश करण्याची इच्छा करतो, (सः अस्मान् उपस्तिः अस्तु) तो आमच्या खालीं राहो. (१)

सबन्धुश्चासबन्धुश्च यो अस्माँ अभिदासति । तेषां सा वृक्षाणामिवाहं भूयासमुत्तमः ॥२॥
यथा सोम ओषधीनामुत्तमो हविषां कृतः । तलाशा वृक्षाणामिवाहं भूयासमुत्तमः ॥३॥

अर्थ- (सबंधुः असबंधुश्च) बंधुसह अथवा बंधुरहित (यः अस्मान् अभिदासति) जो आमचा नाश करतो. (वृक्षाणां सा इव) वृक्षामध्यें ज्याप्रमाणें तो उत्तम आहे त्याप्रमाणें (अहं तेषां उत्तमः भूयासं) मीं त्यांच्यापेक्षां उत्तम होईन. (२)

(यथा सोमः हविषां ओषधीनां उत्तमः कृतः) ज्याप्रमाणें हव्य पदार्थांमध्यें आणि औषधींमध्यें सोम हा उत्तम आहे आणि (वृक्षाणां तलाशा इव) वृक्षामध्यें ज्याप्रमाणें तलाश वृक्ष हा उत्तम असतो त्याप्रमाणें (अहं उत्तमः भूयासं) मी उत्तम होईन. (३)

मी श्रेष्ठ होईन

'मी उत्तम होईन, श्रेष्ठ होईन' अशी महत्त्वाकांक्षा मनुष्यांत असली पाहिजे. मनुष्याची उन्नति, अभ्युदय, निःश्रेयस या त्याच्या इच्छेवरच अवलंबून आहेत. शत्रूची अवनति केल्यानें, त्याला खालीं पाडल्यानें, दाबून टाकल्यानें आपली स्थिति उच्च होऊं शकेल. परंतु येथें असा प्रयत्न करण्यास सांगितला आहे कीं आपण दुसऱ्यापेक्षां श्रेष्ठ व्हावें, दुसऱ्यांस खालीं पाडावयाचें नाहीं तर आपण सर्वांपेक्षां उच्च व्हावयाचें आहे.

यः अस्मान् अभिदासति सः अस्माकं उपस्तिः अस्तु । (मं. १)

' जे आमचा नाश करण्याची इच्छा करतात ते आमच्यापेक्षां खालीं पडोत आणि आम्हांस वश होवोत. ' तसेंच

तेषां अहम् उत्तमः भूयासम् । (मं. २)

' त्यांच्यापेक्षां मीं श्रेष्ठ व्हावें. ' मीं आपली योग्यता अशी वाढवीन कीं माझे सर्व शत्रु माझ्या आश्रयानें रहाणारे होतील.

स्वतःची उन्नति करूं इच्छिणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें स्वतःच्या मनांत अशी इच्छा धारण करावी, आणि जगांत जे उन्नतीच्या साधनेचे नियम आहेत, ते जाणून घेऊन स्वतः श्रेष्ठ व्हावें.

या सूक्तांत आलेले ' उत्तम, तलाशा ' हीं औषधीचींच नावें असावींत परंतु त्या औषधींचा हल्लीं शोध लागलेला नाहीं. ' सोम ' सुद्धां सध्यां प्राप्त होत नाहीं.

सर्वांहून श्रेष्ठ हो !

कांड ६, सूक्त ८६

(ऋषिः – अथर्वा । देवता – एकवृषः ।)

वृषेन्द्रस्य वृषा दिवो वृषा पृथिव्या अयम् । वृषा विश्वस्य भूतस्य त्वमेकवृषो भव ॥ १ ॥
समुद्र ईशे स्रवतामग्निः पृथिव्या वशी । चन्द्रमा नक्षत्राणामीशे त्वमेकवृषो भव ॥ २ ॥

अर्थ— (इन्द्रस्य वृषा) इंद्राच्या बळानें समर्थ (दिवः वृषा) द्युलोकाहून श्रेष्ठ (अयं पृथिव्याः वृषा) या पृथ्वीपेक्षांहि श्रेष्ठ (विश्वस्य भूतस्य वृषा) सर्व भूतमात्रांहून श्रेष्ठ हो आणि तूं (त्वं एकवृषः भव) एकटाच सर्वांमध्यें श्रेष्ठ हो. (१)

(स्रवतां समुद्रः ईशे) वहाणाऱ्या पाण्यामध्यें समुद्र सर्व श्रेष्ठ आहे. (पृथिव्याः अग्निः वशी) पृथ्वीला ताब्यांत ठेवणारा अग्नि आहे. (नक्षत्राणां चंद्रमा ईशे) नक्षत्रांचा स्वामी चंद्र आहे. त्याप्रमाणें (त्वं एकवृषः भव) तूं अद्वितीय असा सर्वश्रेष्ठ हो. (२)

सम्राडस्यसुराणां ककुन्मनुष्याणाम् । देवानामर्धभागसि त्वमेकवृषो भव ॥ ३ ॥

अर्थ— (**असुराणां सम्राट् असि**) तूं असुरांचा सम्राट् आहेस, (**मनुष्याणां ककुत्**) मनुष्यांमध्यें तूं मुख्य आहेस आणि (**देवानां अर्धभाक् असि**) देवांचा अर्धा भाग तूं आहेस असा तूं (**एकवृषः भव**) सर्वश्रेष्ठ हो. (३)

भावार्थ— सूर्य, द्युलोक, पृथ्वी, सर्व प्राणी त्यांच्यांत जी शक्ति आहे त्यापेक्षां जास्त श्रेष्ठ होण्याचा प्रयत्न करावा. ज्याप्रमाणें सर्व जलप्रवाहांत समुद्र श्रेष्ठ आहे, प्रबल आहे, पृथ्वीला वश करणारा अग्नि समर्थ आहे आणि नक्षत्रांत चंद्र श्रेष्ठ आहे, त्याप्रमाणें सर्व मनुष्यांत तूं समर्थ आणि श्रेष्ठ हो ! असुर वृत्तींच्या लोकांवर तूं स्वामित्व गाजव आणि मनुष्यांत तूं श्रेष्ठ हो. तसेंच देवांच्या अर्ध्या आसनावर बसण्याच्या योग्यतेचा तूं हो. (१-३)

सर्वांहून श्रेष्ठ व्हावें

स्वतःचें सामर्थ्य वाढवून सर्वांहून श्रेष्ठ होण्याचा परम पुरुषार्थ करावा. हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. त्याचीच प्रशंसा होते, आणि जो श्रेष्ठ नाहीं तो मागें रहातो. हें ध्यानीं ठेऊन स्वप्रयत्नानें श्रेष्ठ स्थान प्राप्त करावें आणि सर्वांत श्रेष्ठ व्हावें हेंच प्रत्येक मनुष्यास उचित होय.

यशस्वी होणें

कांड ६, सूक्त ३९

(ऋषिः - अथर्वा (वर्चस्कामः) । देवता - त्रिविधिः, बृहस्पतिः ।)

यशो हविर्वर्धतामिन्द्रजूतं सहस्रवीर्यं सुभृतं सहस्कृतम् ।
प्रसर्स्राणमनु दीर्घाय चक्षसे हविष्मन्तं मा वर्धय ज्येष्ठतातये ॥ १ ॥
अच्छा न इन्द्रं यशसं यशोभिर्यशस्विनं नमसाना विधेम ।
स नो रास्व राष्ट्रमिन्द्रजूतं तस्य ते रातौ यशसः स्याम ॥ २ ॥
यशा इन्द्रो यशा अग्निर्यशाः सोमो अजायत ।
यशा विश्वस्य भूतस्याहमस्मि यशस्तमः ॥ ३ ॥

अर्थ— (**इन्द्रजूतं सहस्रवीर्यं सुभृतं**) ईश्वराजवळून प्राप्त झालेलें, सहस्रवीर्यानें युक्त उत्तम, भरपूर (**सहस्कृतं हविः यशः वर्धतां**) बलानें प्राप्त केलेलें यज्ञरूपी माझें यश वृद्धि पावो. त्यामुळें (**दीर्घाय ज्येष्ठतातये**) पुष्कळ श्रेष्ठतेस पसरविणारी (**चक्षसे**) दृष्टि प्राप्त होण्यासाठीं (**प्रसर्स्राणं हविष्मन्तं मा अनुवर्धय**) प्रगति करणारा जो मीं अन्नमय आहें त्या मला अनुकूलतेनें पुढें माझी प्रगति कर. (१)

(**यशोभिः यशसं यशस्विनं इन्द्रं**) अनेक यशांनीं युक्त असल्याकारणानें यशस्वी प्रभूला (**नमसानाः न अच्छ विधेम**) आमच्या उदयाच्या हेतूनें त्याला नमस्कार करून उत्तम प्रकारें त्याची पूजा करतों. (**सः इन्द्रजूतं राष्ट्रं नः रास्व**) त्या प्रभूनें दिलेलें राष्ट्र आणि तेज तूं आम्हांस दे. (**तस्य ते रातौ यशसः स्याम**) त्या तुझ्या धनानें आम्हीं यशस्वी होऊं. (२)

(**इन्द्रः यशाः**) प्रभू यशस्वी आहे. (**सोमः यशाः अजायत**) सोम सुद्धां यशस्वी झालेला आहे. (**विश्वस्य भूतस्य यशाः**) समस्त भूतमात्रांच्या यशानें (**अहं यशस्तमः अस्मि**) मी यशस्वी झालों आहे. (३)

यशस्वी होणें

प्रभु-भक्ति

यश प्राप्त करण्यासाठीं प्रभुभक्ति अवश्य केली पाहिजे—

यशस्विनं इन्द्रं नमसानाः विधेम । (मं. २)

' यशस्वी प्रभूला नमस्कार करीत आम्हीं त्याची भक्ति करूं. ' जे लोक प्रभूची भक्ति करतात त्यांचीं अंतःकरणें पवित्र आणि शुद्ध असतात, आणि ते यशाचे भागीदार होतात. म्हणून अशी प्रार्थना केली पाहिजे —

नः राष्ट्रं रास्व । (मं. २)

' हे प्रभो ! आम्हांस राष्ट्र आणि तेज दे. ' आम्हांस असें राष्ट्र दे कीं जें आमचें यश वाढविण्यास सहाय्यक होईल.

या जगांत इंद्र, अग्नि, सोम, भूतमात्र हे सर्व स्वतःच्या यशानें यशस्वी झाले आहेत, त्या सर्वांचें तेज प्राप्त करून मीं यशस्वी होईन, अशी इच्छा मनांत असली पाहिजे. पहा-

अहं यशस्तमः अस्मि । (मं. ३)

' मी यशस्वी होईन. ' म्हणजे ज्याप्रमाणें हे सर्व स्वतःच्या यशानें यशस्वी झाले आहेत, त्याप्रमाणें मीं सुद्धां माझ्या स्वतःच्या तेजानें तेजस्वी होईन. अशी इच्छा प्रत्येक मनुष्यानें स्वतःच्या मनांत धारण करावी, आणि स्वतःच्या प्रयत्नानें उच्च अवस्था प्राप्त करावी आणि चारी पुरुषार्थ सिद्ध करावेत.

हजारों शक्ति

मनुष्यानें हजारों प्रकारचें (**सहस्र वीर्यं**) सामर्थ्य प्राप्त केलें पाहिजे, कारण मनुष्याची उन्नति सामर्थ्यानेंच होते. सामर्थ्यहीन मनुष्य निरर्थक समजला जातो. हें सामर्थ्य (**सहस्कृतं**) स्वतःच्या बलानें प्राप्त केलें पाहिजे. दुसऱ्याच्या बलानें प्राप्त झालेली उच्चता, त्याचें बल नाश पावलें असतां ती उच्चताही नाश पावते. म्हणून आपलें स्वतःचें बल वाढवूनच यशाची वृद्धि केली पाहिजे. हें यश (**हविः यशः**) हवनाप्रमाणें यज्ञरूपी यश आहे. म्हणजे सर्वांच्या कल्याणासाठीं आत्मसमर्पण केल्यानें प्राप्त होणारें आहे. जेव्हां कोणी मनुष्य सकल जनतेच्या कल्याणासाठीं स्वतःच्या सर्वस्वाचें बलिदान अथवा त्याग करतो तेव्हां त्याला (**इन्द्रजूतं यशः**) प्रभूजवळून हें यश प्राप्त होतें.

यशाचें स्वरूप

दीर्घाय ज्येष्ठतातये चक्षसे । (मं. १)

' दीर्घ दृष्टीनें आणि श्रेष्ठतेनें यश प्राप्त करणें शक्य आहे. ' संकुचित दृष्टीनें यशाची हानि होते. आणि लघुत्व हें क्षीणत्वाचें द्योतक आहे. म्हणून यशासह दीर्घदृष्टि आणि श्रेष्ठता अवश्य असली पाहिजे. म्हणजे ज्याच्यामुळें दीर्घदृष्टि आणि श्रेष्ठतेचा संबंध आहे असेंच यश प्राप्त केलें पाहिजे.

यशाची इच्छा

कांड ६, सूक्त ५८

(ऋषिः - अथर्वा (यशस्कामः) । देवता- बृहस्पतिः, मन्त्रोक्ताः ।)

यशसं मेन्द्रो मघवान्कृणोतु यशसं द्यावापृथिवी उभे इमे ।
यशसं मा देवः सविता कृणोतु प्रियो दातुर्दक्षिणाया इह स्याम् ॥ १ ॥
यथेन्द्रो द्यावापृथिव्योर्यशस्वान्यथाप ओषधीषु यशस्वतीः ।
एवा विश्वेषु देवेषु वयं सर्वेषु यशसः स्याम ॥ २ ॥

अर्थ— (**मघवान् इन्द्रः मा यशसं कृणोतु**) महिमावान् प्रभु मला यशस्वी करो. (**उभे इमे द्यावापृथिवी मा यशसं**) हे दोनही द्यावा पृथिवी मला यशस्वी करोत. (**सविता देवः मा यशसं कृणोतु**) भगवान सविता मला यशस्वी करो. (**अहं दक्षिणायाः दातुः प्रियः स्याम्**) आणि मी दक्षिणा देणाऱ्यांना प्रिय व्हावें. (१)

(**यथा इंद्रः द्यावा-पृथिव्योः यशस्वान्**) ज्याप्रमाणें इंद्र द्यु आणि पृथ्वीमध्यें यशस्वी झाला आहे. (**यथा आपः ओषधीषु यशस्वतीः**) ज्याप्रमाणें जल औषधीमध्यें रसरूपानें यशस्वी आहे. (**एवा विश्वेषु देवेषु**) त्याप्रमाणें सर्व देवांमध्यें आणि या विश्वांत (**सर्वेषु वयं यशसः स्याम**) सर्वांमध्यें आम्हीं यशस्वी व्हावें. (२)

भावार्थ— द्युलोक, भूलोक, सूर्य, इंद्र वगैरे सर्व देवता मला साह्य करोत म्हणजे मी यशस्वी होईन. (१)
या सर्व लोकांत सूर्य तेजस्वी आहे, औषधीमध्यें रस मुख्य भाग आहे, त्याप्रमाणें मीं सर्व मनुष्यांत श्रेष्ठ व्हावें. (२)

यशा इन्द्रो यशा अग्निर्यशाः सोमो अजायत । यशा विश्वस्य भूतस्याहमस्मि यशस्तमः ॥ ३ ॥

अर्थ—(इंद्रः यशाः) इंद्र यशस्वी आहे (**अग्निः यशाः**) अग्नि यशस्वी आहे. (**सोमः यशाः अजायत**) सोम यशस्वी आहे. (**विश्वस्य भूतस्य यशाः**) सर्व भूतमात्रांच्या यशानें (**अहं यशस्तमः अस्मि**) मीं अधिक यशस्वी होतों. (३)

भावार्थ— इंद्र, अग्नि अथवा सोम यशस्वी झाले, त्याप्रमाणें मीं अधिक श्रेष्ठ यशयुक्त व्हावें. (३)

मनुष्यानें असें कार्य करावें कीं त्या योगें त्याचें उत्तम यश सर्वत्र पसरावें. मनुष्यानें स्वतःसमोर, इंद्र, अग्नि, सोम असे आदर्श ठेवावे. सूर्य सर्वांस प्रकाश देतो. इंद्र चेतना देतो. अग्नि उष्णता देतो. सोम रोग बरे करतो. याप्रमाणें मनुष्यानें सुद्धां परोपकार करून यशस्वी व्हावें. सूर्यादि सर्व देव स्वार्थ सोडून परोपकारासाठीं स्वतःला वाहून घेतात. त्यांच्या यशाचें बीज या परोपकारांत आहे. जो मनुष्य याप्रमाणें निःस्वार्थ जनसेवा करील तो सुद्धां त्यांच्याप्रमाणेंच प्रशस्त यशानें युक्त होईल.

यशासाठीं प्रार्थना

कांड ६, सूक्त ६९

(ऋषिः – अथर्वा । देवताः – बृहस्पतिः, अश्विनौ ।)

गिरावरगराटेषु हिरण्ये गोषु यद्यशः । सुरायां सिच्यमानायां कीलाले मधु तन्मयि ॥ १ ॥
अश्विना सारघेण मा मधुनाङ्क्तं शुभस्पती । यथा भर्गस्वतीं वाचमावदानि जनाँ अनु ॥ २ ॥
मयि वर्चो अथो यशोऽथो यज्ञस्य यत्पयः । तन्मयि प्रजापतिर्दिवि द्यामिव दृंहतु ॥ ३ ॥

अर्थ—(गिरौ) पर्वतावर (**अरगराटेषु**) यंत्र चक्रांत (**हिरण्ये गोषु यद् यशः**) सुवर्ण आणि गाईंयांत जें यश आहे तसेंच (**सिच्यमानायां सुरायां**) वर्षणाऱ्या पर्जन्य धारांमध्यें तसेंच (**कीलाले मधु**) अन्नांत जी मधुरता आहे (**तत् मयि**) ती माझ्यांत असो. (१)

(**शुभस्पती अश्विनौ**) कल्याण करणारे दोघे अश्वि देव (**सारघेण मधुना मा अंक्तं**) सारयुक्त मधुरतेनें मला युक्त करोत. (**यथा भर्गस्वतीं वाचं**) ज्यामुळें भाग्यशाली वाणी (**जनान् अनु आवदानि**) लोकांमध्यें मीं बोलेन. (२)

(**मयि वर्चः**) तेज माझ्यांत असो, (**अथो यशः**) त्याचप्रमाणें यश सुद्धां असो. (**अथो यज्ञस्य यत् पयः**) आणि यज्ञाचें जें सार आहे. (**प्रजापतिः तत् मयि दृंहतु**) प्रजापालक देव तें माझ्यांत दृढ करो; (**दिवि द्यां इव**) ज्या प्रमाणें द्युलोकांत प्रकाश आहे त्याप्रमाणें. (३)

डोंगरावर-पर्वतावर तपश्चर्या करणाऱ्या ऋषि-मुनींमध्यें अथवा चक्रयंत्र चालविणाऱ्या अथवा रथावर चढणाऱ्या वीरांमध्यें जें यश आहे, उत्तम वृष्टि, जल आणि श्रेष्ठ शुद्ध अन्नाविषयीं जी प्रशंसा तशी माझी प्रशंसा होत राहो. म्हणजे मीं सुद्धां त्यांच्या प्रमाणें इतरांच्या उपयोगी कार्यांत स्वतःस अर्पित करीन आणि यशस्वी होईन. माझे प्राण आणि बल वर सांगितल्याप्रमाणें परोपकाराच्या कार्यांत समर्पित होवोत. माझ्या वाणींत असा जोम आणि कल्याण असावें कीं त्यामुळें जनतेचें भाग्य वाढावें. या प्रकारें आत्मयज्ञ करण्यानें माझ्यामध्यें तेजस्विता आणि यश वाढेल. आकाशांतील सूर्याप्रमाणें माझें यश वाढो.

या सूक्तांत आत्मयज्ञानें यश आणि तेज प्राप्त करण्याचा उपदेश केला आहे.

निर्भयतेसाठीं प्रार्थना

कांड ६, सूक्त ४०

(ऋषिः - अथर्वा । देवता - मन्त्रोक्ताः ।)

अभयं द्यावापृथिवी इहास्तु नोऽभयं सोमः सविता नः कृणोतु ।
अभयं नोऽस्तूर्व१न्तरिक्षं सप्तऋषीणां च हविषाभयं नो अस्तु । ॥ १ ॥
अस्मै ग्रामाय प्रदिशश्चतस्र ऊर्जं सुभूतं स्वस्ति सविता नः कृणोतु ।
अशत्र्विन्द्रो अभयं नः कृणोत्वन्यत्र राज्ञामभि यातु मन्युः ॥ २ ॥
अनमित्रं नो अधरादनमित्रं न उत्तरात् । इन्द्रानमित्रं नः पश्चादनमित्रं पुरस्कृधि ॥ ३ ॥

अर्थ— हे द्यावापृथिवी ! (इह नः अभयं अस्तु) येथें आम्हांस अभय असावें. (सोमः सविता नः अभयं कृणोतु) सोम आणि सविता आमच्यासाठीं निर्भयता उत्पन्न करोत. (उरु अन्तरिक्षं नः अभयं अस्तु) हें महान् अंतःरिक्ष आमच्यासाठीं अभयदायी होवो आणि (सप्त-ऋषीणां च हविषा नः अभयं अस्तु) सप्त ऋषींच्या हवीनें आम्हांस अभय प्राप्त होवो. (१)

(सविता) सर्वांचो उत्पत्ति करणारा देव (अस्मै नः ग्रामाय) या आमच्या नगरासाठीं (चतस्रः प्रदिशः) चारी दिशामध्यें (ऊर्जं सुभूतं स्वस्ति कृणोतु) बळ, ऐश्वर्य आणि कल्याण करो. (इंद्रः नः अशत्रु अभयं कृणोतु) प्रभु आम्हां सर्वांस शत्रुरहित अभय करो. (राज्ञां मन्युः अन्यत्र अभियातु) राजाचा क्रोध दुसऱ्यांकडे जावो. (२)

हे (इन्द्र) प्रभु ! (नः अधरात् अमित्रं) आमचे खालचे शत्रु दूर होवोत. (नः उत्तरात् अनमित्रं) आमच्यासाठीं वरील भागीं निर्वैरत्व उत्पन्न होवो (नः पुरः अनमित्रं कृधि) आमच्या समोरहि निर्वैरत्व उत्पन्न कर. (३)

भूमि, अन्तरिक्ष, द्युलोक, सोम, सविता, सप्त ऋषि, दिशा, इन्द्र राजा या सर्वांपासून आम्हांस अभय प्राप्त व्हावें. अशी प्रार्थना या सूक्तांत केली आहे. अभय प्रार्थनेसाठीं हें फार उत्तम सूक्त आहे.

हे सर्व देव आपल्या शरीरांतहि रहातात. सप्त इंद्रियांच्या रूपानें ते आपल्या शरीरांत वास्तव्य करतात. सूर्य डोळ्यामध्यें, चंद्र मनामध्यें, दिशा कानाच्या ठिकाणीं, इंद्र मनामध्यें, भूमि स्थूल शरीरांत, अन्तरिक्ष हृदयांत, द्युलोक मस्तकांत, या प्रकारें सर्व देवांच्या अंशरूपानें हें शरीर बनलें आहे. हे देव आमच्या शरीरांत निर्भयता उत्पन्न करोत. म्हणजे शत्रुरूपी रोग आणि कुविचार दूर करून आम्हांस आंतरिक निर्भयता त्या देवांनीं प्राप्त करून द्यावी. जेव्हां सर्व इंद्रियें सत्कर्मांत प्रवृत्त असतील म्हणजे या देवतांचे अंश शत्रूंच्या ताब्यांत नसतील तेव्हांच असें होणें शक्य आहे. असा विचार केल्यानें निर्भय होण्याचा मार्ग सन्मार्गानें चालणें आहे हें समजूं शकतें. वाचकांनीं ध्यानीं ठेवावें कीं आंतरिक पवित्रता आणि शुद्धता असणें आवश्यक आहे म्हणजे निर्भयता आंतूनच प्रगट होते, ती बाहेरून मिळवावयाची नसते.

कल्याणप्राप्तीसाठीं प्रार्थना

कांड, ६ सूक्त ४८

(ऋषिः - अंगिराः प्रचेताः । देवता - मन्त्रोक्ताः ।)

श्येनोऽसि गायत्रच्छन्दा अनु त्वा रभे । स्वस्ति मा सं वहास्य यज्ञस्योदृचि स्वाहा ॥ १ ॥
ऋभुरसि जगच्छन्दा अनु त्वा रभे । स्वस्ति मा सं वहास्य यज्ञस्योदृचि स्वाहा ॥ २ ॥

वृषासि त्रिष्टुप्छन्दा अनु त्वा रभे । स्वस्ति मा सं वहास्य यज्ञस्योदृचि स्वाहा ॥ ३ ॥

अर्थ— हे देव (गायत्र--छन्दाः श्येनः असि) सर्वांचे प्राण रक्षण करणारा छंद धारण करणाऱ्या श्येन पक्ष्याच्या गतिप्रमाणें गति धारण करणारा तूं आहेस, म्हणून (त्वा अनु आरभे) तुझ्यासाठीं आम्हीं सत्कार्याचा आरंभ करतों. (जगत् छन्दाः ऋभुः असि) जगताच्या कल्याणाचा छंद धारण करणारा तूं फारच कर्मकुशल आहेस. त्यामुळें (अनु०) तुझ्यासाठीं आम्हीं यज्ञाचा आरंभ करतों. (त्रिष्टुभ् छन्दाः वृषा असि) तीन अध्यात्म, आधिभूत आणि आधिदैवत या संबंधीं-साध्य-साधनाचा छंद धारण करणारा तूं महाबलवान् बैलासारखा सामर्थ्यशाली हो. त्यामुळें (अस्य यज्ञस्य उद्दचि) या यज्ञाच्या समाप्तिपर्यंत (मां स्वस्ति संवह) मला सुखानें वृद्धिंगत कर. (स्व-आ-हा) मी माझ्या शक्तीचा सर्वांच्या कल्याणासाठीं त्याग करतों. (१-३)

कल्याणासाठीं प्रयत्न

कांड ६, सूक्त ९९

(ऋषिः - अथर्वा । देवता - इन्द्रः सोमः सविता च ।)

अभि त्वेन्द्र वरिमतः पुरा त्वांहूरणाद्धुवे । ह्वयाम्युग्रं चेत्तारं पुरुणामानमेकजम् ॥ १ ॥

यो अद्य सेन्यो वधो जिघांसन्न उदीरते । इन्द्रस्य तत्र बाहू समन्तं परि दद्मः ॥ २ ॥

परि दद्म इन्द्रस्य बाहू समन्तं त्रातुस्त्रायतां नः ।

देव सवितः सोम राजन्त्सुमनसं मा कृणु स्वस्तये ॥ ३ ॥

अर्थ— हे इन्द्रा ! (पुरा अंहूरणात्) पापकर्म होण्यापूर्वींच (वरिमतः त्वा अभि हुवे) तुझ्या श्रेष्ठ कर्मामुळें नेहमीं तुलाच आह्वान करतों. तसेंच (उग्रं चेत्तारं) शूरवीर, चेतना देणारा (एकजं पुरु नामानं ह्वयामि) एकटा असूनहि अनेक यशांनीं संपन्न अशा पुरुषाची आम्हीं प्रशंसा करतों. (१)

(यः अद्य सेन्यः वधः) आज सैन्यांत जीं शस्त्रें आम्हांस मारण्यासाठीं (उत् ईरते) वर उचललीं जातात (तत्र इन्द्रस्य बाहू समन्तं परिदद्मः) तेथें प्रभूचे हात आम्हीं चारी बाजूस आड धरतों. (२)

(इन्द्रस्य बाहू समन्तं परिदद्मः) प्रभूचे बाहू सर्व बाजूस आम्हीं आड धरतों, (त्रातुः नः त्रायतां) त्या रक्षकाचे ते बाहू आमचें रक्षण करोत. हे (सोम राजन् देव सवितः) सोमराजा ! देवा ! प्रभो ! (स्वस्तये मा सुमनसं कृणु) कल्याणासाठीं मला उत्तम मनाचा कर. (३)

भावार्थ— ज्याच्या हातुन पापकर्म होत नाहीं आणि जो श्रेष्ठ कर्म करतो त्याची प्रशंसा केली पाहिजे. त्याचप्रमाणें जो शूर वीर जनतेसे चेतना देणारा आहे आणि अनेकप्रकारें यश प्राप्त करणारा आहे, त्याचें गुणगायन करणें योग्य आहे. (१)

जेव्हां सैन्यांचें समोरासमोर युद्ध होतें आणि अनेक शूरवीर शस्त्रांनीं एकदुसऱ्यास घायाळ करतात, त्यावेळीं त्या प्रभूचे हातच रक्षण करतात. (२)

अशा आणि इतरहि कठिण प्रसंगांत प्रभूचे हातच आपलें रक्षण करतात. मनुष्य जर स्वत: कल्याण साधन करूं इच्छित असेल तर त्यानें स्वतःचें मन शुभ विचारांनीं परिपूर्ण करावें. (३)

कल्याणाचें मुख्य साधन

या सूक्तांत कल्याणाचें मुख्य साधन सांगितलें तें असें आहे—

स्वस्तये सुमनसम् । (मं. ३)

' कल्याण प्राप्त करण्यास मन उत्तम असलें पाहिजे. ' मनुष्याचें मन जर खरोखर शुभ विचारांनीं युक्त असेल तर मनुष्याचें

खरोखर कल्याण होऊं शकेल. मनांत जर दोष असला तर कष्ट होतील. त्याचप्रमाणें वाटेल तशीं संकटें आलीं तरी प्रभूचा वरदहस्त आपल्या मस्तकावर आहे असा दृढ विश्वास असला पाहिजे. या विषयीं पहा—

सेन्यः वधः जिघांसन् उदीरते तत्र इन्द्रस्य बाहुः समन्तं नः त्रायताम् ॥ (२-३)

' जेव्हा सैन्याचे हात वध करण्याच्या इच्छेनें वर उचलले जातील तेव्हां प्रभूचे हात सर्व बाजूंनीं आमचें रक्षण करोत. ' प्रभूचें हात आमचें सर्वतोपरि रक्षण करीतच आहेत, असा विश्वास मनुष्याची शांति आणि उत्साह वाढवितो. याशिवाय मनुष्यानें तीन गोष्टी ध्यानांत ठेवल्या पाहिजेत. (१) पाप न करणें, (२) श्रेष्ठ कर्म करणें, (३) उग्र होऊन जनतेस श्रेष्ठ कर्म करण्याची प्रेरणा देणें. हीं तीन कर्में करण्यामुळेंच मनुष्य श्रेष्ठ आणि यशस्वी होतो. वाचकांनीं या सूक्ताचें फार मनन करावें कारण हें सूक्त लहान असलें तरी पुष्कळ उपदेश देत आहे आणि मनुष्याला श्रेष्ठ होण्याची प्रेरणा देत आहे.

आपलें पावित्र्य

कांड ६, सूक्त ६२

(ऋषिः – अथर्वा । देवता – रुद्रः, मन्त्रोक्ताः ।)

वैश्वानरो रश्मिभिर्नः पुनातु वातः प्राणेनेषिरो नभोभिः ।
द्यावापृथिवी पयसा पयस्वती ऋतावरी यज्ञिये नः पुनीताम् ॥ १ ॥
वैश्वानरीं सूनृतामा रभध्वं यस्या आशास्तन्वो वीतपृष्ठाः ।
तया गृणन्तः सधमादेषु वयं स्याम पतयो रयीणाम् ॥ २ ॥
वैश्वानरीं वर्चस आ रभध्वं शुद्धा भवन्तः शुचयः पावकाः ।
इहेडया सधमादं मदन्तो ज्योक्पश्येम सूर्यमुच्चरन्तम् ॥ ३ ॥

अर्थ – (**वैश्वानरः रश्मिभिः नः पुनातु**) सर्व मनुष्यांत रहाणारा अग्नि स्वतःच्या किरणांनीं आम्हांस शुद्ध करो. (**वातः प्राणेन**) वायु प्राणरूपानें आम्हांस पवित्र करो, (**इषिरः नभोभिः**) जल स्वतःच्या विविध रसांनीं आम्हांस शुद्ध करो. (**पयस्वती ऋतावरी**) रसयुक्त, जलयुक्त (**यज्ञिये द्यावापृथिवी**) पूजनीय द्युलोक आणि भूलोक (**पयसा नः पुनीतां**) स्वतःच्या पोषक रसानें आम्हांस पवित्र करोत. (१)

(**सूनृतां वैश्वानरीं आरभध्वं**) सत्य आणि सर्व मनुष्यद्वारा प्रेरित ईशस्तुतीस प्रारंभ करा. (**वीतपृष्ठाः आशाः यस्याः तन्वः**) ज्यांना पृष्ठभाग नाहींत अशा दिशा, ज्यांच्या वाणींना शरीरें आहेत तीं (**सध-मादेषु**) सर्व मिळून आनंदित होण्याच्या वेळीं (**तया गृणन्तः वयं** , त्यांच्याशीं बोलत आम्हीं सर्व (**रयीणां पतयः स्याम**) धनांचे स्वामी व्हावें. (२)

(**शुचयः शुद्धाः पावकाः भवन्तः**) शुद्ध, पवित्र आणि दुसऱ्यांना शुद्धां पवित्र करणारे होऊन (**वैश्वानरीं वर्चसे आरभध्वं**) सर्व मनुष्यांनीं केलेल्या ईशस्तुतिरूप वाणी तेजस्वितेसाठीं उच्चारण्यास आरंभ करावा. (**इह इडया सधमादं मदन्तः**) येथें स्तुतिरूपी वाणीनें आनंदित होत (**ज्योक् उच्चरन्तं सूर्यं पश्येम**) चिरकालपर्यंत उंच उगविणाऱ्या सूर्याला आम्हीं पहात रहावें. (३)

भावार्थ— अग्नि वाणीरूपानें, वायु प्राणरूपानें, जल विविध रसांच्यारूपानें, तसेंच द्युलोक आणि पृथ्वीलोक स्वशक्तीनें आम्हांस शुद्ध करोत. म्हणजे या देवता आमच्या शरीरांत येऊन राहिल्या आहेत आणि त्यांनीं येथें हीं रूपें घेतलीं आहेत, त्यांनीं आम्हांस शुद्ध करावें. (१)

सर्व मनुष्यांनीं सत्य बोलावें आणि ईश्वराचें गुणगान करावें. अशा वाणीला हें परमेश्वर गुणवर्णनाचें क्षेत्र अमर्याद आहे. अशा स्तुति वचनांनीं आम्हीं धन प्राप्त करूं. (२)

आम्हीं अंतर्बाह्य शुद्ध रहावें. आमच्या साथीदारांस पवित्र करावें. शुभ वाणी बोलावी आणि एकत्र येऊन आनंदित दीर्घायुष्य प्राप्त करावें. (३)

उत्तम मार्गाचें आक्रमण

आपल्या शरीरांत सर्व देवता अंशरूपानें रहात आहेत. येथें अग्नि वाणीरूपानें आहे. वायूनें प्राणाचें रूप धारण केलें आहे. जलानें रसाचें रूप धारण केलें आहे. द्युलोक मस्तकांत राहिला आहे. पायाच्या स्थानीं पृथ्वी आहे. याप्रमाणें इतर देवता बाकी अवयवांत राहिल्या आहेत. या सर्व देवता कधींहि अमृतयुक्त न होतां सत्यांत स्थिर होवोत, आणि आम्हांस पवित्र करोत. सत्य वाणी, सत्य विचार आणि सत्य आचार या तीहींसाठीं पाहिजे तेवढें विस्तृत कार्यक्षेत्र आहे. हे सत्यांश स्थिर करणारे एकमेकांशीं खेळीमेळीनें राहून आणि सहकार्य करीत सत्याचरणानें पवित्र होऊन धन मिळवोत आणि धनवान होवोत. शरीराची शुद्धि करोत, अंतःकरणास पवित्र करोत, आणि आपल्या उच्चार-आचार-विचारांनीं दुसऱ्यांना शुद्ध आणि पवित्र करीत स्वतःच्या उद्धाराचा मार्ग आक्रमण करोत. सत्यामुळें निर्भय झालेले आणि सत्यनिष्ठ, तसेंच ईश्वराच्या गुणांचें चिंतन करीत स्वतःस पवित्र करणारे लोक निःसंशय दीर्घजीवन प्राप्त करतात आणि आपलें सर्व जीवन आनंदयुक्त करतात; म्हणून मनुष्यानें पवित्र होण्याचा उद्योग करावा आणि कृतकृत्य व्हावें.

उत्तम मार्गानें जावें

कांड ६, सूक्त ५५

(ऋषिः – ब्रह्मा । देवता – विश्वेदेवाः, रुद्र ।)

ये पन्थानो बहवो देवयाना अन्तरा द्यावापृथिवी संचरन्ति ।
तेषामज्यानिं यतमो वहाति तस्मै मा देवाः परि धत्तेह सर्वे ॥ १ ॥
ग्रीष्मो हेमन्तः शिशिरो वसन्तः शरद्वर्षाः स्विते नो दधात ।
आ नो गोषु भजता प्रजायां निवात इद्वः शरणे स्याम ॥ २ ॥
इदावत्सराय परिवत्सराय संवत्सराय कृणुता बृहन्नमः ।
तेषां वयं सुमतौ यज्ञियानामपि भद्रे सौमनसे स्याम ॥ ३ ॥

अर्थ— (**ये देवयानाः बहवः पन्थानः**) जे देवांचे जाण्यायेण्याचे पुष्कळ मार्ग (**द्यावापृथिवी अन्तरा संचरन्ति**) द्युलोक आणि भूलोकाच्या मध्यें चालू आहेत, (**तेषां यतमः अज्यानिं वहाति**) त्यापैकीं जो मार्ग समृद्धि आणणारा आहे, हे (**सर्वे देवाः**) सर्व देव हो ! (**इह तस्मै मा परिधत्त**) येथें त्या मार्गासाठीं मला सर्वप्रकारें धारण करा. (१)

वसन्त, ग्रीष्म, वर्षा, शरद्, हेमन्त, शिशिर हे सर्व ऋतु (**नः स्विते दधात**) आम्हांस उत्तम अवस्थेंत धारण करोत. (**नः गोषु प्रजायां आ भजत**) आम्हांस गायी आणि प्रजेमध्यें सुखाचे भागीदार करोत. (**वः इत् निवाते शरणे स्याम**) तुम्हांलाह निश्चयेंकरून आम्हीं वातादि उपद्रवरहित घरांत रहावें. (२)

(**इदावत्सराय परिवत्सराय, संवत्सराय** , क्रमानें प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षासाठीं (**बृहत् नमः कृणुत**) पुष्कळ अन्न उत्पन्न करा. (**तेषां यज्ञियानां सुमतौ**) त्या यज्ञकर्त्यांच्या उत्तम बुद्धीनें तसेंच (**सौमनसे भद्रे अपि स्याम**) उत्तम मनानें आणि कल्याणानें युक्त होऊन आम्हीं रहावें. (३)

भावार्थ— उत्तम विद्वान् सज्जनांचे जाण्यायेण्याचे अथवा व्यवहार करण्याचे जे अनेक मार्ग आहेत, त्यांत जो मार्ग निर्दोष असेल त्यानें जाणेंच उचित होय. (१)

सहाही ऋतूंत उत्तम सुख लाभावें असें आचरण करावें आणि प्रजेच्या हिताचें साधन करावें आणि घरांत कांहीं दोष असूं नयेत. (२)

दर वर्षीं पुरेसें अन्न पिकवावें आणि ज्यांनीं आपलें जीवन यज्ञमय केलें आहे त्यांच्या उत्तम शुभ संस्कारयुक्त मन आणि बुद्धि-यांच्याशीं अनुकूल राहून म्हणजे त्यांची आपणाविषयीं सन्मति राहील असें आचरण करावें. (३)

' संवत्सर, परिवत्सर, इदावत्सर, अनुवत्सर आणि इद्वत्सर हीं संवत्सरांचीं पांच नांवें, क्रमानें प्रभव संवत्सरापासून पांच वर्षांच्या युगांचीं आहेत. त्यास पंचयुगी म्हणतात. त्याचप्रमाणें कृत, त्रेता, द्वापर आणि कलि हीं वर्षांच्या चतुर्युगांचीं नांवें आहेत.

सज्जनांचे व्यवहाराचे जे शुभ मार्ग आहेत त्यामध्यें जे सर्वांत श्रेष्ठ आहेत त्याच मार्गांनीं आपण चाललें पाहिजे. आपलें आचरण जर शुद्ध असलें तर सर्व ऋतु आपणास सारखेच लाभदायक होतील. आणि आपणांत कांहीं दोष असला तर हानि होईल. प्रत्येकानें असें आचरण ठेवावें कीं त्यामुळें सज्जन प्रसन्न होतील. दरवर्षी शेतीनें इतकें धान्य उत्पन्न केलें पाहिजे कीं तें आपणांस पुरून थोडें शिल्लक उरावें.

अंतर्बाह्य शुद्धता

कांड ६, सूक्त ५१

(ऋषिः - शन्तातिः । देवता - आपः, वरुणः ।)

वायोः पूतः पवित्रेण प्रत्यङ् सोमो अति द्रुतः । इन्द्रस्य युज्यः सखा ॥ १ ॥
आपो अस्मान्मातरः सूदयन्तु घृतेन नो घृतप्वः पुनन्तु ।
विश्वं हि रिप्रं प्रवहन्ति देवीरुदिदाभ्यः शुचिरा पूत एमि ॥ २ ॥
यत्किं चेदं वरुण दैव्ये जनेऽभिद्रोहं मनुष्याश्चरन्ति ।
अचित्त्या चेत्तव धर्मा युयोपिम मा नस्तस्मादेनसो देव रीरिषः ॥ ३ ॥

अर्थ— (वायोः पवित्रेण पूतः) वायूच्या पवित्र करण्याच्या गुणानें पवित्र झालेला (प्रत्यङ् अति द्रुतः सोमः) प्रत्यक्ष गाळलेला सोम (इन्द्रस्य युज्यः सखा) इंद्रशक्तीचा योग्य मित्र आहे. (१)

(मातरः आपः अस्मान् सूदयन्तु) मातेसमान कल्याणकारक जल आम्हांस पवित्र करो. (घृतप्वः नः घृतेन पुनन्तु) पवित्र करणारें जल आम्हांस जलानें पवित्र करो. (देवीः हि विश्वं रिप्रं प्रवहन्ति) दिव्य जल सर्व दोषांस वाहून नेवो. (आभ्यः उत् इत् शुचिः पूतः आ एमि) यानेंच शुद्ध आणि पवित्र होऊन मी प्रगति करतों. (२)

हे वरुणा ! (मनुष्याः यत् किं च इदं अभिद्रोहं) साधारण मनुष्य जे कांहीं दुराचार (दैव्ये जने चरन्ति) दिव्यजनांच्या बाबतींत करतात. (च इत् अचित्त्या तव धर्मा युयोपिम) आणि जे अजाणतेपणीं तुझ्या नियमधर्माचें उल्लंघन करतात, हे देवा ! (नः तस्मात् एनसः मा रीरिषः) आम्हां सर्वांस त्यापापामुळें नष्ट करूं नकोस. (३)

सोमाचें महात्म्य

प्रथम मंत्रांत सोमाचें वर्णन आहे. हा सोम प्रथम एका भांड्यांत गाळण्यांत येतो, नंतर त्यास हवेंत उघडा ठेऊन एका भांड्यांतून दुसऱ्या भांड्यांत बदलतात. जेव्हां तो अशाप्रकारें सिद्ध होतो, तेव्हां त्याच्यांत असमान्या शक्तीस तो वाढविणारा होतो; म्हणजे तो प्याला असतां शरीराची इन्द्रियशक्ति वाढते.

जलाचें महात्म्य

दुसऱ्या मंत्रांत जलाचें महात्म्य सांगितलें आहे. जल प्राण्यांस शांति देतें, पवित्र करतें, शरीराचे सर्व दोष दूर करतें. आणि अंतर्बाह्य शुद्ध करून अति महत्त्वाचें आरोग्य अर्पण करतें.

द्रोह करूं नये

तिसऱ्या मंत्रांत सांगितलें आहे कीं कोणीही इतरांचा द्रोह अथवा कांहीं अपराध करूं नये. अजाणतेपणीं हातून कांहीं घडलें असल्यास त्यासाठीं परमेश्वराची प्रार्थना करून क्षमा मागितली पाहिजे.

या तीनहि मंत्रांत शुद्धीनें शक्ति वाढविण्याचा उपदेश आहे. सोम शुद्ध झाल्यानें शक्ति वाढविण्यास सहाय करतो. जल शुद्ध करून आरोग्य देतें आणि अहिंसावृत्तीनें आत्मशुद्धि झाली तर आत्मिक बळ वाढतें. या तीनहि मंत्रांचा आशय ध्यानीं घेण्यासारखा आहे. शुद्धीमुळें बल वाढतें हें सर्वांचें सार आहे.

पुष्टीसाठीं प्रार्थना

कांड ७, सूक्त ४८

(ऋषिः - अथर्वा । देवता - राका ।)

राकामहं सुहवां सुष्टुती हुवे शृणोतु नः सुभगा बोधतु त्मना ।
सीव्यत्वपः सूच्याच्छिद्यमानया ददातु वीरं शतदायमुक्थ्यम् ॥ १ ॥
यास्ते राके सुमतयः सुपेशसो याभिर्ददासि दाशुषे वसूनि ।
ताभिर्नो अद्य सुमना उपागहि सहस्रापोषं सुभगे रराणा ॥ २ ॥

अर्थ— (अहं सुहवा सुष्टुती राकां हुवे) उत्तम बोलावण्यास योग्य आणि स्तुतीस पात्र, पूर्ण चन्द्राप्रमाणें आल्हाददायक अशा देवीला आम्हीं बोलावितों. (शृणोतु) ती आमचें बोलावणें ऐको, आणि (सुभगा नः त्मना बोधतु) ती उत्तम ऐश्वर्ययुक्त देवी आम्हांस स्वतःच्या शक्तीनें जागृत करो. (अच्छिद्यमानया सूच्या अपः सीव्यतु) कधीं न तुटणाऱ्या सुईनें तिनें स्वतःचे कपडे शिवण्याचें काम करावें आणि (उक्थ्यं शतदायं वीरं ददातु) ती आम्हांस प्रशंसनीय शेंकडो दानें देणाऱ्या वीर पुत्रांचें प्रदान करो. (१)

हे (राके) शोभा देणाऱ्या देवी ! (याः सुपेशसः सुमतयः) ज्या तुझ्या उत्तम सुंदर बुद्धि आहेत, (याभिः दाशुषे वसूनि ददासि) ज्यांयोगानें तूं दात्यांना धन देतेस, हे (सुभगे) उत्तम ऐश्वर्ययुक्त देवी ! (ताभिः रराणा सुमनाः) त्या शक्तींनीं शोभणाऱ्या उत्तम मनाच्या देवी (अद्य नः सहस्रपोषं उपागहि) आज आम्हांस हजारों पुष्टींच्या जवळ आणून पोंहोचव. (२)

राका ही पूर्णचंद्रयुक्त असते. तेजानें जेवढी प्रसन्नता उत्पन्न होते त्यापेक्षां कितीतरी पट जास्त प्रसन्नता तिच्यापासून मिळते. या वरून वाचक तिच्या तेजाचें अनुमान करूं शकतील. या सूक्तांत पूर्ण चंद्राच्या प्रकाशवर्णनानें परमात्म्याच्या शक्तीचें वर्णन केलें आहे. ही परमात्मशक्ति आम्हांस ज्ञान देवो. अज्ञानांतून दूर करून प्रबुद्ध करो, आणि ज्ञान देऊन आमची उन्नति करो. याप्रमाणें पुष्टि आणि उत्तम वीर संतति देवो आणि आम्हांस सर्व प्रकारची उन्नति अर्पण करो.

सुखासाठीं प्रार्थना

कांड ७, सूक्त ४९

(ऋषिः - अथर्वा । देवता - देवपत्नी ।)

देवानां पत्नीरुशतीरवन्तु नः प्रावन्तु नस्तुजये वाजसातये ।
याः पार्थिवासो या अपामपि व्रते ता नो देवीः सुहवाः शर्म यच्छन्तु ॥ १ ॥

अर्थ-- (उशतीः देवानां पत्नीः नः अवन्तु) आमची उन्नति करणाऱ्या देवपत्न्या आमचें रक्षण करोत. त्या (तुजये वाजसातये नः प्रावन्तु) संतान आणि आमच्या बळासाठीं आमचें रक्षण करोत. (याः पार्थिवासः) ज्या पृथ्वीवर रहात आहेत आणि (याः अपां व्रते अपि) ज्या कार्यांच्या नियमामध्यें स्थित आहेत . (ताः सुहवाः देवीः) त्या उत्तम प्रशंसनीय देवी (नः शर्म यच्छन्तु) आम्हांस सुख देवोत. (१)

उत ग्ना व्यन्तु देवपत्नीरिन्द्राण्य१ग्नाय्यश्विनी राट् ।
आ रोदसी वरुणानी शृणोतु व्यन्तु देवीर्य ऋतुर्जनीनाम् ॥ २ ॥

अर्थ-(उत देवपत्नीः ग्नाः व्यन्तु) आणि देवपत्न्या, या देवी आमच्या हिताची इच्छा करोत. (इन्द्राणी) इन्द्र पत्नी (अग्नायी) अग्नीची पत्नी (अश्विनी राट्) अश्विदेवांची पत्नी राणी (रोदसी) रुद्राची पत्नी (वरुणानी) जलदेव वरुणाची पत्नी (आशृणोतु) आमची प्रार्थना ऐकोत. (जनीनां यः ऋतुः) स्त्रियांच्या ऋतुकालसमयीं (देवीः व्यन्तु) या देवी आमचें हित करोत. (२)

देवतांची शक्ति त्यांच्या पत्न्या आहेत. अग्नि, जल, पृथ्वी, वायु, आदि अनेक देव आहेत. त्यांच्या शक्ति विविध आहेत. त्याच त्यांच्या पत्न्या. पत्नी पालन करणारी असते. अग्निशक्ति अग्नीचें पालन करते. वायुशक्ति वायूचें पालन करते. याच प्रकारें इतर देवांच्या शक्ति त्या त्या देवांस त्यांच्या स्वरूपांत ठेवतात. जितके देव तितक्या त्यांच्या पत्न्या (अथवा शक्ति). या सर्व देवशक्ति आम्हां सर्व मानवांस सुख आणि शान्ति देवोत.

उत्तम ज्ञान

कांड ७, सूक्त ५२

(ऋषिः – अथर्वा । देवता – सांमनस्यं, अश्विनौ ।)

संज्ञानं नः स्वेभिः संज्ञानमरणेभिः । संज्ञानमश्विना युवमिहास्मासु नि यच्छतम् ॥ १ ॥
सं जानामहै मनसा सं चिकित्वा मा युष्महि मनसा दैव्येन ।
मा घोषा उत्स्थुर्बहुले विनिर्हते मेषुः पप्तदिन्द्रस्याहन्यागते ॥ २ ॥

अर्थ— हे (अश्विनौ) अश्वि देव हो ! (नः स्वेभिः संज्ञानं) आम्हांस स्वजनांसह उत्तम ज्ञान प्राप्त होवो. तसेंच (अरणेभिः संज्ञानं) खालील वर्गाचे जे लोक आहेत त्यांसह उत्तम ज्ञान प्राप्त व्हावें (इह) या जगांत (युवं अस्मासु संज्ञानं नियच्छतं) तुम्ही दोघे आम्हां सर्वांमध्यें उत्तम ज्ञान ठेवा. (१)

(मनसा संजानामहै) आम्हीं मनानें उत्तम ज्ञान प्राप्त करावें, (चिकित्वा सं) ज्ञान प्राप्त करून एकमतानें रहावें. (मा युष्महि) परस्पर विरोध करूं नये (दैव्येन मनसा) दिव्य मनानें युक्त व्हावें (बहुले विनिर्हते घोषा मा उत् स्थुः) पुष्कळांचा वध होण्यामुळें दुःखाचे शब्द न निर्माण होवोत. (आगते अहनि) भविष्यकाळीं (इन्द्रस्य इषुः मा पप्तत्) इन्द्राचा बाण आम्हांवर न पडो. (२)

बंधनांतून सुटणें

कांड ६, सूक्त १२१

(ऋषिः – कौशिकः । देवता – मंत्रोक्ताः ।)

विषाणा पाशान्वि ष्याध्यस्मद्य उत्तमा अधमा वारुणा ये ।
दुष्वप्न्यं दुरितं नि ष्वास्मदथ गच्छेम सुकृतस्य लोकम् ॥ १ ॥

अर्थ— (ये अधमाः उत्तमाः ये वारुणाः) वरुणदेवाचे जे अधम आणि उत्तम पाश आहेत ते (पाशान् विषाणा अस्मत् अधि विष्य) पाश तोडून त्या पाशांतून आम्हांस मुक्त कर. (दुष्वप्न्यं दुरितं अस्मत् निष्व) दुष्ट स्वप्नें आणि पापें यांस आमच्यापासून दूर कर. (अथ सुकृतस्य लोकं गच्छेम) आणि आतां आम्हीं पुण्य लोकांत जाऊं. (१)

यद्दारुणि बध्यसे यच्च रज्ज्वां यद्भूम्यां बध्यसे यच्च वाचा ।
अयं तस्माद्गार्हपत्यो नो अग्निरुदिन्नयाति सुकृतस्य लोकम् ॥ २ ॥
उदगातां भगवती विचृतौ नाम तारके । प्रेहामृतस्य यच्छतां प्रैतु बद्धकमोचनम् ॥ ३ ॥
वि जिहीष्व लोकं कृणु बन्धान्मुञ्चासि बद्धकम् ।
योन्या इव प्रच्युतो गर्भः पथः सर्वां अनु क्षिय ॥ ४ ॥

अर्थ-(**यत् दारुणि यत् च रज्ज्वां बध्यसे**) जे लांकडाच्या खांबाशीं दोरीनें बांधले जातात आणि (**यत् भूम्यां**) जे भूमीमध्यें आणि (**यत् च वाचा बध्यसे**) जे वाणीनें बांधले जातात, (**तस्मात्**) त्या बंधनांतून (**अयं गार्हपत्यः अग्निः**) हा गार्हपत्य अग्नि (**नः सुकृतस्य लोकं इत् उत् नयाति**) आम्हांस सुकृताच्या लोकीं घेऊन जातो. (२)

(**भगवती विचृतौ नाम तारके**) भाग्यवान् मुक्त करणारी आणि तारणारी अशा या दोन देवता (**उदगातां**) उदयास प्राप्त झाल्या आहेत. त्या दोघी (**अमृतस्य प्रयच्छतां**) अमृताचा भाग देवोत म्हणजे हा जीव (**बद्धक-मोचनं प्रैतु**) बद्ध अवस्थेंतून मुक्त होण्याचीं साधनें प्राप्त करो. (३)

(**विजिहीष्व**) विशेष प्रगति कर. (**लोकं कृणु**) स्वतःसाठीं योग्य स्थान तयार कर. (**योन्याः प्रच्युतः गर्भः इव**) योनीमधून बाहेर आलेल्या बालकाप्रमाणें (**बन्धात् बद्धकं मुञ्चासि**) बंधनांतून बंधनाचें कारण दूर कर. (**सर्वान् पथः अनु क्षिय**) सर्व मार्गांत अनुकूलतेप्रमाणें रहा. (४)

भावार्थ— खालील, मध्यम आणि उत्तम स्थान यांवर बंधनरूपी पाश आहेत, ते दूर करण्याचा प्रयत्न कर. मनुष्यानें पाप-रहित व्हावें आणि त्याचें सूचक चिन्ह असें त्यास उत्तम स्वप्न यावें. असा अनुभव त्यास येवो. याप्रमाणें निर्दोष होऊन तो पुण्यलोकास प्राप्त होवो. (१)

जीं अनेक प्रकारचीं बंधनें आहेत त्या सर्वांतून ईश्वराच्या कृपेनें सुटून जावें आणि आम्हांस पुण्यलोक प्राप्त व्हावा. (२)

बंधनांतून मुक्ति देणारी आणि रक्षण करणारी अशा दोन शक्ति आम्हांस अमृताचा भाग देवोत. त्यामुळें आम्हीं बंधनांतून मुक्त होऊन पूर्ण स्वतंत्र होऊं. (३)

विशेष प्रगति कर, पुण्यस्थान प्राप्त कर. बंधनांतून मुक्त हो, ज्याप्रमाणें पूर्ण स्थितीला पोहोंचलेलें मूल आईच्या उदरांतून सुटून बाहेर येतें त्याप्रमाणें या जगांत अनुकूल स्थितीमध्यें विराज व मुक्त हो. (४)

सर्व प्रकारच्या बंधनांतून मुक्त झालें पाहिजे, आणि पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त केलें पाहिजे. त्याच्या सिद्धीसाठीं मनुष्यानें प्रथमपासून प्रयत्नशील व्हावें. केव्हांहि पापाचा विचार सुद्धां करूं नये. विचार शुद्ध झाले असतां स्वप्नें सुद्धां उत्तम पडतात आणि वाईट स्वप्नें पडत नाहींत.

पापांतून मुक्ति मिळविली असतां बंधनें दूर होण्याची शक्यता आहे, आणि मनुष्यांना उत्तम लोक प्राप्त होतो. पुण्यानें बंधनें दूर करण्याची शक्ति आणि आत्मरक्षण करण्याची शक्ति प्राप्त होऊं शकते. त्यामुळें पुढें अमृताचा लाभ होतो, आणि बंधनें पूर्णपणें दूर होऊन पूर्ण स्वाधीनतेचा लाभ होणें शक्य आहे.

यासाठीं हे मनुष्या ! तूं विशेष प्रयत्नानें उन्नतीचा लाभ करून घेऊन पुण्यवान हो. बंधनांतून मुक्त होऊन पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त कर, आणि जगांत अनुकूल परिस्थिति प्राप्त करून घेऊन आनंदानें आणि सुखानें नांद.

बंधनांतून मुक्ति

कांड ७, सूक्त ७७

(ऋषिः - अंगिराः । देवता - मरुतः ।)

सांतपना इदं हविर्मरुतस्तज्जुजुष्टन । अस्माकोती रिशादसः ॥ १ ॥
यो नो मर्तो मरुतो दुर्हृणायुस्तिरश्चित्तानि वसवो जिघांसति ।
द्रुहः पाशान्प्रति मुञ्चतां सस्तपिष्ठेन तपसा हन्तना तम् ॥ २ ॥
संवत्सरीणा मरुतः स्वर्का उरुक्षयाः सगणा मानुषासः ।
ते अस्मत्पाशान्प्र मुञ्चन्त्वेनसः सांतपना मत्सरा मादयिष्णवः ॥ ३ ॥

अर्थ— हे (सांतपनाः मरुतः=मर्+उतः) शत्रूंना उत्तम प्रकारें त्रासविणाऱ्या आणि मरण्यास तयार असणाऱ्या वीरांनो ! (इदं तत् हविः जुजुष्टन) हें हविष्याचें सेवन करा, हे (रिश+अदसः) शत्रूंचा नाश करणाऱ्यांनो ! (अस्माका ऊती) आमचें रक्षण करा. (१)

हे (वसवः मरुतः) निवासक मरुत हो ! (यः नः मर्तः दुर्हृणायुः) आमच्यापैकीं जो मनुष्य दुष्ट भावानें युक्त होऊन (चित्तानि तिरः जिघांसति) आमच्या चित्तांस गुप्त रीतीनें नाश करूं इच्छितो, (सः द्रुहः पाशान् प्रतिमुञ्चतां) त्याच्यावर द्रोह्याचे पाश सोडा आणि (तं तपिष्ठेन तपसा हन्तन) त्याला तापदायक पीडेनें मारून टाका. (२)

(संवत्सरीणाः सु-अर्काः) वर्षभर प्रकाशणारे, (सगणाः उरुक्षयः) सेनेसह मोठमोठ्या घरांत रहाणारे (मानुषासः) मानवी वीर, (सांतपना मादयिष्णवः मत्सराः) शत्रूला संताप देणारे, हर्ष वाढविणारे, प्रसन्न असे (ते मर्+उतः) ते मरेपर्यंत लढणारे वीर (एनसः पाशान् अस्मत् प्रमुञ्चन्तु) पापाच्या पाशांतून आमची मुक्तता करोत. (३)

भावार्थ— शत्रूंना त्रासविणारे वीर आम्हीं दिलेला अन्नभाग स्वीकारून शत्रूंचा नाश करोत आणि आमचें रक्षण करोत. (१)
आमच्यापैकीं कोणीं दुष्ट मनुष्य जर गुप्तपणें आमच्या मनाचा नाश करूं इच्छित असेल तर त्याला पाशांत बांधून मारून टाका. (२)
वर्षभर रहाणारे, तेजस्वी, अनुयायांसह मोठ्या घरांत रहाणारे, शत्रूंना त्रासविणारे मानवी वीर आम्हांस पापांपासून वाचवोत. (३)
या सूक्तांत क्षत्रियधर्म दाखविला आहे. क्षत्रियानें शत्रूस ताप देणारा शूर वीर व्हावें. स्वजनांचें रक्षण करावें. आपणांमध्यें जर कोणी दुष्ट मनुष्य असला तर त्यास योग्य ती शिक्षासुद्धां करावी. सर्वांस निर्भय करावें आणि जनतेस पापांपासून दूर ठेवावें

बंध-मुक्तता

कांड ७, सूक्त ७८

(ऋषिः - अथर्वा । देवता - अग्निः ।)

वि ते मुञ्चामि रशनां वि योक्त्रं वि नियोजनम् । इहैव त्वमजस्र एध्यग्ने ॥ १ ॥

अर्थ— हे अग्ने ! (ते रशनां विमुञ्चामि) तुझ्या दोरीला-बंधनाला-मी मोकळें करतों. (योक्त्रं वि) तुझ्या जुवालाहि सोडतों. (नियोजनं वि) तुला खेंचून बांधलेल्या दोरीला सुद्धां मुक्त करतों. (इह एव त्वं अजस्रः एधि) येथेंच तूं अहिंसामुक्त होऊन रहा. (१)

भावार्थ— प्रथम, मध्यम आणि अधम अशीं तीन प्रकारचीं बंधनें तोडून मीं तुला मुक्त करतों. याप्रमाणें मुक्त होऊन तूं येथें ये. (१)

अस्मै क्षत्राणि धारयन्तमग्ने युनज्मि त्वा ब्रह्मणा दैव्येन ।
दीदिह्यस्मभ्यं द्रविणेह भद्रं प्रेमं वोचो हविर्दां देवतासु ॥ २ ॥

अर्थ— हे अग्ने ! (अस्मै क्षत्राणि धारयन्तं त्वा) त्यासाठीं क्षात्रधर्म धारण करणाऱ्या तुला (दैव्येन ब्रह्मणा) दिव्य ज्ञानासह (युनज्मि) युक्त करतों. (अस्मभ्यं इह द्रविणा दीदिहि) आमच्यासाठीं येथें धन दे. (इमं देवातासु हविर्दां प्र वोचः) याला देवतांना हवि समर्पण करणारा म्हणून त्याचें वर्णन करण्यांत येतें. (२)

भावार्थ— वीरता धारण कर, दिव्य ज्ञानानें युक्त हो, धन समर्पण कर, देवतांना हवि अर्पण कर. त्यानेंच तुझें यश वाढेल. (२)

तीन बंधनें

बंधनें तीन प्रकारचीं असतात. एक मनाचें बंधन. दुसरें आणि मध्यम बंधन वाणीचें आणि अधम बंधन देहाचें. या तीन बंधनांनीं मनुष्य बांधलेला आहे. म्हणजे तो बद्ध आहे, म्हणून त्यांतून मुक्तता मिळविली पाहिजे. ह्या बंधनांतून जेव्हां तो मोकळा होतो तेव्हांच मनुष्य मुक्त होतो. तोंपर्यंत तो बंधनांत आहे, बद्ध स्थितींत आहे, असें म्हटलें जातें.

बंधनांतून सुटण्यास क्षत्र म्हणजे पुरुषार्थ करण्याचें सामर्थ्य अवश्य असलें पाहिजे. त्यावांचून कोणी मनुष्य बंधनमुक्त होण्याचा प्रयत्नसुद्धां करूं शकत नाहीं. त्यानंतर त्यास ज्ञान प्राप्त व्हावयास हवें. ज्ञानावांचून बंधनांतून मुक्ति प्राप्त होत नाहीं. ज्ञानाचा अर्थ (मोक्षे धीर्ज्ञानं) बंधन मुक्त होण्याचा उपाय असें समजावें. पुरुषार्थानें धन प्राप्त करावें आणि प्राप्त धन ईश्वरास अर्पण करावें, अशी बुद्धि होणें, या दोन्ही बाबी मनुष्यानें करण्यास योग्य आहेत. त्यामुळें मनुष्याचीं बंधनें दूर होतील. विशेषेंकरून स्वतःच्या धनाचें समर्पण म्हणजे त्याग (देवतासु हविर्दां) देवतांना समर्पण केल्यानें मनुष्य बंधनांतून मुक्त होतो.

हें सूक्त थोडें अस्पष्ट आहे. तरीसुद्धां वरप्रमाणें त्याचा विचार केला असतां त्यांतील भाव समजूं शकतो.

क्रोधाचें शमन

कांड ६, सूक्त ४३

(ऋषिः – भृग्वंगिराः (परस्परचित्तैकीकरणकामः) देवता – मन्युशमनम् ।)

अयं दर्भो विमन्युकः स्वाय चारणाय च । मन्योर्विमन्युकस्यायं मन्युशमन उच्यते ॥ १ ॥
अयं यो भूरिमूलः समुद्रमवतिष्ठति । दर्भः पृथिव्या उत्थितो मन्युशमन उच्यते ॥ २ ॥
वि ते हनव्यां शरणिं वि ते मुख्यां नयामसि । यथावशो न वादिषो मम चित्तमुपायसि ॥ ३ ॥

अर्थ— (अयं दर्भः स्वाय चारणाय च विमन्युकः) हा दर्भ स्वतःसाठीं स्वतःचा आणि इतरांचा सुद्धां क्रोध दूर करणारा आहे. आणि (अयं मन्योः विमन्युकस्य) हा रागीट मनुष्याचा राग दूर करणारा, आणि (मन्यु-शमनः उच्यते) क्रोधास शांत करणारा समजला जातो. (१)

(यः अयं भूरिमूलः) जो हा पुष्कळ मुळें असलेला (समुद्रं अवतिष्ठति) समुद्राच्या जवळ असतो. असा (पृथिव्याः उत्थितः दर्भः) भूमींतून उगवलेला दर्भ (मन्यु-शमनः उच्यते) क्रोधास शांत करणारा म्हटला जातो. (२)

(ते हनव्यां शरणिं वि) तुझ्या हनुवटीच्या आधारानें रहाणाऱ्या क्रोधाच्या चिन्हास दूर करतो. (मुख्यां विनयामसि) तुझ्या मुखांत जो क्रोध आहे त्यासहि दूर करतो. (यथा मम चित्तं उपायसि) ज्यामुळें तूं माझ्या चित्तास अनुकूल होशील. (अवशः न अवादिषः) परवश होऊन क्रोधयुक्त भाषण करूं नकोस. (३)

दर्भ

येथें या सूक्तांत दर्भाला क्रोध शांत करणारा म्हटलें आहे. हा संशोधनाचा विषय आहे. वैद्यकीय ग्रंथांत दर्भाचा असा कांहीं उल्लेख नाहीं. जर वैद्यलोक अधिक तपास करतील आणि समुद्रकांठीं उगवणाऱ्या पुष्कळ मुळ्यांच्या गवताच्या रसांत हा गुण आहे कीं काय हें नक्की करतील तर क्रोधी मनुष्यास शांत करण्यास, त्याचा स्वभाव बदलण्यास त्याचा फार उपयोग होईल.

कौशीतकी सूक्तांत (कौ. सू. ४।१२) ' अयं दर्भ इत्यौषधिवत् ' असें म्हटलें आहे. त्यावरून असें वाटतें की समुद्रकांठीं उगणाऱ्या दर्भाचीं मूळें काढून तीं डोक्यावर अथवा शरीरावर बांधावयाची अथवा त्यांच्या रसाचें सेवन करण्याचें विधान या सूक्तांत आहे. अर्थात् दर्भमूळाच्या रसांत मस्तक शांत करण्याचा गुण असणें संभवनीय आहे. मस्तक शांत झाल्यानें क्रोधास शांत करण्यास तो सहायक होत असेल. परंतु ही सर्व विधिपुर्वक करून पहाण्याची क्रिया आहे. जे कोणी करूं शकतील असे असतील त्यांनीं वैद्याच्या सल्ल्यानें अनुभव घेऊन पहावा, आणि नंतर स्वतःचा अनुभव लोककल्याणासाठीं प्रसिद्ध करावा.

सिद्धीसाठीं प्रार्थना

कांड ७, सूक्त ४६

(ऋषिः – अथर्वा । देवता – सिनीवाली ।)

सिनीवालि पृथुष्टुके या देवानामसि स्वसा । जुषस्व हव्यमाहुतं प्रजां देवि दिदिड्ढि नः ॥ १ ॥
या सुबाहुः स्वङ्गुरिः सुषूमा बहुसूवरी । तस्यै विश्पत्न्यै हविः सिनीवाल्यै जुहोतन ॥ २ ॥
या विश्पत्नीन्द्रमसि प्रतीची सहस्रस्तुकाभियन्ती देवी ।
विष्णोः पत्नि तुभ्यं राता हवींषि पतिं देवि राधसे चोदयस्व ॥ ३ ॥

अर्थ— हे (सिनीवाली पृथु-ष्टुके) अन्नयुक्त आणि पुष्कळांकडून प्रशंसित देवी (या देवानां स्वसा असि) जी तूं देवांची बहिण आहेस, हे देवी ! तूं (आहुतं हव्यं जुषस्व) हवनांत टाकलेल्या आहुतींचा स्वीकार कर आणि (नः प्रजां दिदिड्ढि) आम्हांस उत्तम संतान दे. (१)

(या सुबाहुः स्वङ्गुरिः) जी उत्तम बाहूंनीं युक्त आणि उत्तम बोटांनीं युक्त (सुषूमा बहु-सूवरी) उत्तम अवयवांनीं-अंगानीं-युक्त आणि उत्तम संतान उत्पन्न करण्यास समर्थ आहे. (तस्यै विश्पत्न्यै सिनीवाल्यै) त्या प्रजापालक अन्नयुक्त देवतांसाठीं (हविः जुहोतन) हवि प्रदान करा. (२)

(या विश्पत्नी इन्द्रं प्रतीची असि) जी प्रजापालन करणारी तूं प्रभूच्या सन्मुख रहातेस (सहस्र-स्तुका देवी अभियन्ती) हजारों कवींकडून प्रशंसित झालेली तूं देवी पुढें जात आहेस. हे (विष्णोः पत्नी) विष्णुपत्नी ! हे देवि ! (तुभ्यं हवींषि राता) तुझ्यासाठीं मीं हवन अर्पण करतों. आमच्या (राधसे पतिं चोदयस्व) सिद्धीच्या प्राप्तीसाठीं आपल्या पतीला प्रेरित कर. (३)

या सूक्तांत ' विष्णु ' म्हणजे व्यापक देवाची पत्नी म्हणजे त्याच्या शक्तीची प्रार्थना आहे. ही व्यापक ईश्वरशक्ति संपूर्णपणें अन्य देवतामध्यें जाऊन कार्य करते, सर्व जगाचें पालन या शक्तीनें होते. हजारों ज्ञानीजन या शक्तीचा अनुभव घेऊं शकतात आणि ते हिची विविध प्रकारांनीं स्तुति करतात. ही शक्ति आपला पति सर्वव्यापक ईश्वर त्यास प्रेरित करो आणि तो आम्हांस सर्व प्रकारची सिद्धि देवो.

युद्ध-साधन रथ

कांड ६, सूक्त १२५

(ऋषिः - अथर्वा । देवता - वनस्पतिः ।)

वनस्पते वीड्वङ्गो हि भूया अस्मत्सखा प्रतरणः सुवीरः ।
गोभिः संनद्धो असि वीडयस्वास्थाता ते जयतु जेत्वानि ॥ १ ॥
दिवस्पृथिव्याः पर्योज उद्भृतं वनस्पतिभ्यः पर्याभृतं सहः ।
अपामोज्मानं परि गोभिरावृतमिन्द्रस्य वज्रं हविषा रथं यज ॥ २ ॥
इन्द्रस्यौजो मरुतामनीकं मित्रस्य गर्भो वरुणस्य नाभिः ।
स इमां नो हव्यदातिं जुषाणो देव रथ प्रति हव्या गृभाय ॥ ३ ॥

अर्थ— हे (**वनस्पते**) वृक्षापासून बनविलेल्या रथा ! (**वीडु + अंगः हि भूयाः**) तूं सुदृढ अवयवांनीं युक्त हो. तूं (**अस्मत्सखा प्रतरणः सुवीरः**) आमचा मित्र तारण करणारा आणि उत्तम वीरांनीं युक्त आहेस. तूं (**गोभिः संनद्धः असि**) गायीच्या चामड्याच्या दोरीनें दृढ बांधलेला आहेस. तूं (**वीडयस्व**) आम्हांस सुदृढ कर आणि (**ते आस्थाता जेत्वानि जयतु**) तुझ्यावर स्वार होणारा वीर विजय मिळवो. (१)

(**दिवः पृथिव्याः ओजः परि उद्भृतं**) द्युलोकाचें आणि पृथ्वीलोकाचें बल या रथरूपानें प्राप्त झालें आहे आणि (**वनस्पतिभ्यः सहः पर्याभृतं**) वृक्षांपासून तें संग्रहीत केलें आहे. (**अपां आत्मानं गोभिः परि आवृतं**) पाणीरूपी आत्म्यानें युक्त वृक्षापासून उत्पन्न झालेला आणि गायीच्या चामड्यानें बांधलेला (**इन्द्रस्य वज्रं रथं**) इंद्राच्या वज्रासारखा सुदृढ रथ (**हविषा यज**) अन्नानें युक्त कर. (२)

हे (**देव रथ**) दिव्य रथा ! तूं (**इंद्रस्य ओजः**) इंद्राचें बल आहेस. तूं (**मरुतां अनीकं**) मरुतांचा सेनासमूह, (**मित्रस्य गर्भः**) मित्राचा गर्भ आणि (**वरुणस्य नाभिः**) वरुणाची नाभि आहेस. (**सः त्वं**) असा तूं (**नः इमां हव्यदातिं जुषाणः**) आमच्या या अन्नदानाचें सेवन करीत करीत (**हव्या प्रति गृभाय**) हवनीय अन्नाचें ग्रहण कर. (३)

भावार्थ— रथ वृक्षाच्या लांकडापासून बनवितात. हा रथ आमचा खरा मित्र आहे. कारण कीं तो आम्हांस युद्धांतील आपत्तींतून वांचवितो. हा रथ गाईच्या चामड्याच्या वादीनें दृढ बांधला आहे. या सुदृढ रथानें आमचा निश्चित विजय होईल. (१)

पृथ्वी आणि द्युलोकाचें बल आणि वृक्षाचें सामर्थ्य या रथांत एकत्रित झालें आहे. जलानें वृक्ष उत्पन्न होतात आणि वृक्षांतून रथ निर्माण होतो, यासाठीं जलच रथांचा आत्मा आहे. याला गाईच्या चामड्यानें मढवून सुदृढ केला आहे. आतां हा इंद्राच्या वज्रासमान दृढ झाला आहे. या रथांत अन्नादि पदार्थ भरपूर ठेव. (२)

हा रथ इन्द्राचें बल, मरुतांची सेना, मित्राचा गर्भ आणि वरुणाची नाभि आहे. म्हणजे देवांचें सत्वरूप हा रथ आहे. हा रथ आमच्या हव्याचें सेवन करो म्हणजे या रथासह रहाणारे वीर आमच्या अन्नानें संतुष्ट होवोत. (३)

युद्धाचें मोठें महत्त्वाचें साधन रथ आहे. वीर याच्यावर आरूढ होऊन युद्ध करतात आणि विजय मिळवतात, हा रथ वृक्षाच्या लांकडापासून तयार होतो आणि गायीच्या चामड्याच्या वादीनें त्यास बांधून सुदृढ करतात. पृथ्वीवर हा रथ ही एक मोठी शक्ति आहे. जणूं काय त्यांत देवांचें बलच भरलें आहे. म्हणून रथाला व्यवस्थित ठेवलें पाहिजे. आणि रथाच्या कर्मचाऱ्यांना यथायोग्य अन्नानें पुष्ट केलें पाहिजे.

दुंदुभि

कांड ६, सूक्त १२६

(ऋषिः - अथर्वा। देवता - दुन्दुभिः।)

उप॑ श्वासय पृथि॒वीमु॒त द्यां पु॑रु॒त्रा ते॑ वन्वतां॒ विष्ठि॑तं॒ जग॑त् ।
स दु॑न्दुभे स॒जूरिन्द्रे॑ण दे॒वैर्दू॒राद्दवी॑यो॒ अप॑ सेध॒ शत्रू॑न् ॥ १ ॥
आ क्र॑न्दय॒ बल॒मोजो॑ न॒ आ धा॑ अ॒भि ष्ट॑न दुरि॒ता बाध॑मानः ।
अप॑ सेध दुन्दुभे दु॒च्छुना॑मि॒त इन्द्र॑स्य मु॒ष्टिर॑सि वी॒डय॑स्व ॥ २ ॥
प्रामूं ज॑या॒भी३॒॑मे ज॑यन्तु के॒तुम॑द्दुन्दु॒भिर्वा॑वदीतु ।
सम॑श्वप॒र्णाः प॑तन्तु नो॒ नरो॒ऽस्माक॑मिन्द्र र॒थिनो॑ जयन्तु ॥ ३ ॥

अर्थ— हे (दुन्दुभे) नगाऱ्या ! तूं (पृथिवीं) पृथ्वीवर (उत द्यां उपश्वासय) आणि द्युलोकांत सुद्धां जीवन उत्पन्न कर. (पुरुत्रा विष्ठितं जगत् ते वन्वतां) पुष्कळ प्रकारें, विशेषरूपानें राहिलेलें जगत् तुझ्या आश्रयानें राहो. (सः इन्द्रेण देवैः सजूः) असा तूं इन्द्र आणि देवांसह राहाणारा (दूरात् दवीयः) दूरांत दूर असलेल्या (शत्रून् अप सेध) शत्रूंचा नाश कर. (१)

हे (दुन्दुभे) नगाऱ्या ! (आक्रन्दय) शत्रुसेनेस रडव, (नः ओजः बलं आधाः) आम्हांत बल आणि वीर्य धारण कर. (दुरिता बाधमानः अभि स्तन) पाप्यांस बाधित करीत गर्जना कर (दुच्छुनां इतः अप सेध) दुःख देणाऱ्या शत्रुसेनेला येथून पळवून लाव. तूं (इन्द्रस्य मुष्टिः असि) इंद्राची मूठ आहेस. तूं (वीडयस्व) सुदृढ रहा.(२)

हे इन्द्रा ! (अमुं प्रजय) या शत्रुसेनेचा पराजय कर (इमे अभि जयन्तु) या वीरांना विजयी कर. (केतुमत् दुन्दुभिः वावदीतु) ध्वजयुक्त नगारा मोठा नाद करो. (नः नरः अश्वपर्णाः सं पतन्तु) आमचे वीर घोड्यांवरून हल्ला करोत आणि (अस्माकं रथिनः जयन्तु) आमचे रथी वीर जय प्राप्त करोत. (३)

भावार्थ— दुन्दुभीच्या (नगाऱ्याच्या) नादानें लोकांत एक प्रकारचें नवचैतन्य प्रकट होतें. म्हणून युद्धांत वीरांना चेतना (स्फूर्ति, उत्साह) येण्यासाठीं या नगाऱ्याचा उपयोग करतात. यामध्यें दिव्य शक्ति आहे त्यामुळें तो शत्रूंना दूर पळवून लावतो. (१)

दुन्दुभीचा भयानक अवाज ऐकून शत्रुसेना घाबरून जाते आणि आपल्या सैन्याला बल आणि वीर्य प्राप्त होतें. आपल्या सैन्याचे दोष दूर होतात आणि शत्रुसैन्य पळून जातें. म्हणजे दुन्दुभि हें एक प्रकारचें बल आहे. (२)

ही दुन्दुभि शत्रुसेनेचा पराजय करो. आणि आमच्या सैन्याचा विजय होवो. आपल्या राष्ट्रीय झेंड्यासह दुन्दुभि भला मोठा नाद करो. त्या शब्दांसह आमचे घोडेस्वार शत्रूवर चढाई करोत. आणि आमचे रथी जय प्राप्त करोत. (३)

युद्धस्थानीं दुन्दुभीचा शब्द मोठा उत्साह वाढविणारा आहे. म्हणून प्रत्येक सेनेबरोबर एक दुन्दुभि असते. हें एक विजयप्राप्तीचें साधन आहे. या दृष्टीनें हें दुंदुभि काव्य मोठें मनोरंजक आणि बोधप्रद आहे.

दुन्दुभीचा घोष

कांड ५, सूक्त २०

(ऋषिः – ब्रह्मा देवताः – वनस्पतिः, दुन्दुभिः)

उच्चैर्घोषो दुन्दुभिः सत्वनायन्वानस्पत्यः संभृत उस्रियाभिः
वाचं क्षुणुवानो दमयन्त्सपत्नान्त्सिंह इव जेष्यन्नभि तंस्तनीहि ॥ १ ॥
सिंह इवास्तानीद् द्रुवयो विबद्धोऽभिक्रन्दन्नृषभो वासितामिव ।
वृषा त्वं वध्रयस्ते सपत्ना ऐन्द्रस्ते शुष्मो अभिमातिषाहः ॥ २ ॥
वृषेव यूथे सहसा विदानो गव्यन्नभि रुव संधनाजित् ।
शुचा विध्य हृदयं परेषां हित्वा ग्रामान्प्रच्युता यन्तु शत्रवः ॥ ३ ॥
संजयन्पृतना ऊर्ध्वमायुर्गृह्या गृह्णानो बहुधा वि चक्ष्व ।
दैवीं वाचं दुन्दुभ आ गुरस्व वेधाः शत्रूणामुप भरस्व वेदः ॥ ४ ॥
दुन्दुभेर्वाचं प्रयतां वदन्तीमाशृण्वती नाथिता घोषबुद्धा ।
नारी पुत्रं धावतु हस्तगृह्यामित्री भीता समरे वधानाम् ॥ ५ ॥

अर्थ— (उच्चैर्घोषः सत्व-नायन्) जिचा शब्द उंच आहे आणि जी शक्ति वाढविते अशा प्रकारची (वानस्पत्यः दुन्दुभिः) वनस्पतीपासून तयार केलेली दुन्दुभि (उस्रियाभिः संभृतः) गायीच्या चामड्यानें आच्छादिलेली (वाचं क्षुणुवानः) शब्द करीत (सपत्नान् दमयन्) शत्रूंना दाबून टाकीत आणि (सिंह इव जेष्यन्) सिंहासारखी विजय इच्छिणारी ही दुन्दुभी (अभिसंस्तनीहि) गर्जत राहो. (१)

तूं (द्रुवयः विबद्धः) वृक्षापासून निर्माण झालीस आणि विशेष प्रकारें बांधलेली (सिंह इव अस्तानीत्) सिंहाप्रमाणें गर्जत आहेस, (वासितां वृषभः अभिक्रन्दन् इव) गायीसाठीं बैल जसा डरकाळया फोडतो. (त्वं वृषा) तूं बलवान् आहेस. (ते सपत्नाः वध्रयः) तुझे शत्रु निर्बळ झाले आहेत आणि (ते ऐन्द्रः शुष्मः अभिमातिषाहः) तुझें इन्द्रासारखे प्रभावशाली बल शत्रुनाशक आहे. (२)

(यूथे गव्यन् वृषा इव) गायींच्या समुदायांत गायीची इच्छा करणाऱ्या सांडाप्रमाणें तूं (सहसा संधनाजित्) बलानें विजय प्राप्त करणारा आणि (विदानः) जाणता असा तूं (अभिरुव) गर्जना कर. (परेषां हृदयं शुचा विध्य) शत्रूचें हृदय शोकानें युक्त कर. (शत्रवः ग्रामान् हित्वा प्रच्युताः यन्तु) शत्रु गांव सोडून पडतझडत पळून जावोत. (३)

हे दुन्दुभि ! (ऊर्ध्व-मायुः पृतनाः संजनयन्) फार मोठा अवाज करणारी, शत्रुसेनेस पराजित करीत (गृह्याः गृह्णानः बहुधा विचक्ष्व) शत्रूंना पकडणारी तूं पुष्कळ प्रकार पहा. (दैवीं वाचं आगुरस्व) दिव्य नादाचा उच्चार कर, (वेधाः शत्रूणां वेदः आभरस्व) विधाता होऊन शत्रूंचें धन आणून भरून टाक. (४)

(दुन्दुभेः प्रयतां वदन्तीं) दुन्दुभीचे स्पष्ट बोल, (वाचं आ शृण्वतीं घोषबुद्धा) शब्द ऐकणारी आणि गर्जनेनें जागी झालेली (भीता नाथिता अमित्री नारी) घाबरलेली दुःखी शत्रुस्त्री (समरे वधानां पुत्रं) युद्धांत मेलेल्या वीरांच्या पुत्रांचे (हस्तगृह्य धावतु) हात धरून धांवत राहो. (५)

पूर्वो दुन्दुभे प्र वदासि वाचं भूम्याः पृष्ठे वद रोचमानः ।
अमित्रसेनामभिजञ्जभानो द्युमद्वद दुन्दुभे सूनृतावत् ॥ ६ ॥
अन्तरेमे नभसी घोषो अस्तु पृथक्ते ध्वनयो यन्तु शीभम् ।
अभि क्रन्द स्तनयोत्पिपानः श्लोककृन्मित्रतूर्याय स्वर्धी ॥ ७ ॥
धीभिः कृतः प्र वदाति वाचमुद्धर्षय सत्वनामायुधानि ।
इन्द्रमेदी सत्वनो नि ह्वयस्व मित्रैरमित्राँ अव जङ्घनीहि ॥ ८ ॥
संक्रन्दनः प्रवदो धृष्णुषेणः प्रवेदकृद्बहुधा ग्रामघोषी ।
श्रेयो वन्वानो वयुनानि विद्वान्कीर्तिं बहुभ्यो वि हर द्विराजे ॥ ९ ॥
श्रेयः केतो वसुजित्सहीयान्त्संग्रामजित्संशितो ब्रह्मणासि ।
अंशूनिव ग्रावाधिषवणे अद्रिर्गव्यन्दुन्दुभेऽधि नृत्य वेदः ॥ १० ॥
शत्रूषाण्नीषाडभिमातिषाहो गवेषणः सहमान उद्भित् ।
वाग्वीव मन्त्रं प्र भरस्व वाचं सांग्रामजित्यायेषमुद्वदेह ॥ ११ ॥

अर्थ— हे नगाऱ्या ! (**पूर्वः वाचं प्रवदसि**) सर्व प्रथम तूं उद्घोष करतोस. (**भूम्याः पृष्ठे रोचमानः वद**) पृथ्वीच्या पाठीवर प्रसरणारा (फैलावणारा) असा शब्द तूं कर. हे नगाऱ्या ! (**अमित्रसेनां अभिजञ्जभानः**) शत्रुसेनेचा नाश करीत तूं (**द्युमत् सूनृतावत् वद**) प्रकाशयुक्त सत्य गर्जना कर. (६)

(**इमे नभसी अन्तरा घोषः अस्तु**) द्युलोक आणि पृथ्वीच्यामध्यें तुझा घोष होऊं दे. (**ते ध्वनयः शीभं पृथक् यन्तु**) तुझा ध्वनि त्वरित चारी दिशांस पसरूं दे. (**उत्पिपानः श्लोककृत्**) वृद्धि पावणारा आणि यश मिळविणारा (**मित्रतूर्याय स्वर्धी**) मित्रहितासाठीं संपन्न होत (**अभिक्रन्द, स्तनय**) अवाज कर, गर्जना कर. (७)

(**धीभिः कृतः वाचं प्रवदाति**) बुद्धीनें तयार केलेला नगारा अवाज करीत आहे. (**सत्वनां आयुधानि उद्धर्षय**) वीरांच्या आयुधांस वर उठव. (**इन्द्रमेदी सत्वनः नि ह्वयस्व**) शूरवीरांना आनंद देणारा तूं वीरांना बोलाव, (**मित्रैः अमित्रान् अव जङ्घनीहि**) मित्रांकडून शत्रूंना मारून टाक. (८)

(**संक्रंदनः प्रवदः**) शब्दोच्चार आणि घोषणा करणारा (**धृष्णुसेनः प्रवेदकृत्**) विजयी सेनेनें युक्त, चेतना देणारा, (**बहुधा ग्राम-घोषी**) अनेक प्रकारें गांवांत घोषणा करणारा (**श्रेयः वन्वानः**) कल्याण प्राप्त करविणारा (**वयुनानि विद्वान्**) सर्व घोषणांचीं कार्यें जाणणारा तूं नगाऱ्या (**द्विराजे**) दोन राजांमध्यें होणाऱ्या युद्धांत (**बहुभ्यः कीर्तिं विहर**) पुष्कळ मनुष्यांना कीर्ति प्राप्त करून दे. (९)

हे (**दुन्दुभे**) नगाऱ्या ! तूं (**श्रेयः केतः वसुजित्**) श्रेष्ठ मिळविणारा, धन मिळविणारा, (**सहीयान् संग्रामजित्**) बलवान्, युद्धास जिंकणारा, (**ब्रह्मणा संशितः असि**) ज्ञानानें तुला तयार केला आहे. (**आधिषवणे अद्रिः ग्रावा अंशून् इव**) सोमरस काढण्याच्यावेळीं ज्याप्रमाणें दगड सोमावर नाचतो त्याप्रमाणें तूं (**गव्यन् वेदः अधिनृत्य**) भूमी जिंकण्याची इच्छा करणारा तूं शत्रूंच्या धनावर नाच. (१०)

(**शत्रुषाड् नीषाड्**) शत्रूंना जिंकणारा, नित्य विजयी (**अभिमातिषाहः गवेषणः**) वैऱ्यांस वश ठेवणारा, शत्रूंचा शोध करणारा, (**सहमानः उद्भित्**) बलवान् आणि उखडून टाकणारा तूं, हे दुन्दुभे ! (**वाचं प्रभरस्व**) तुझा अवाज सर्वत्र पसरून टाक. (**वाग्वी मंत्रं इव**) जसा वक्ता आपला उपदेश श्रोत्यांमध्यें फैलावतो-प्रसार करतो- (**संग्राम- जित्याय इह इषं उत् वद**) संग्राम जिंकण्यासाठीं येथें अन्नाविषयीं महान् घोषणा कर. (११)

अच्युतच्युत्समदो गमिष्ठो मृधो जेता पुरएतायोध्यः ।
इन्द्रेण गुप्तो विदथा निचिक्यद्धृद्द्योतनो द्विषतां याहि शीभम् ॥ १२ ॥

अर्थ— (अच्युत-च्युत्) न पडलेल्या शत्रूंस पाडून टाकणारा (स-मदः गमिष्ठः) आनंदयुक्त, यात्रा करणारा (मृधः जेता) युद्धांत जिंकणारा (पुर-एता अयोध्यः) पुढें जाणारा परंतु युद्ध करण्यास-सामना देण्यास-कठिण (इन्द्रेण गुप्तः) इंद्राकडून चांगल्या प्रकारें रक्षण केला गेलेला, (विदथा निचक्यत्) युद्धकर्म जाणणारा (द्विषतां हृद्-द्योतनः) शत्रूंच्या हृदयांस घाबरवून सोडणारा तूं हे नगाऱ्या ! (शीभं याहि) सत्वर शत्रूंवर हल्ला कर. (१२)

दुन्दुभीचा घोष

कांड ५, सूक्त २१

(ऋषिः - ब्रह्मा । देवताः – वनस्पतिः, दुन्दुभिः ।)

विहृदयं वैमनस्यं वदामित्रेषु दुन्दुभे ।
विद्वेषं कश्मशं भयममित्रेषु नि दध्मस्यवैनान्दुन्दुभे जहि ॥ १ ॥
उद्वेपमाना मनसा चक्षुषा हृदयेन च । धावन्तु बिभ्यतोऽमित्राः प्रत्रासेनाज्ये हुते ॥ २ ॥
वानस्पत्यः संभृत उस्रियाभिर्विश्वगोत्र्यः । प्रत्रासममित्रेभ्यो वदाज्येनाभिघारितः ॥ ३ ॥
यथा मृगाः संविजन्त आरण्याः पुरुषादधि ।
एवा त्वं दुन्दुभेऽमित्रानभि क्रन्द प्र त्रासयाथो चित्तानि मोहय ॥ ४ ॥
यथा वृकादजावयो धावन्ति बहु बिभ्यतीः ।
एवा त्वं दुन्दुभेऽमित्रानभि क्रन्द प्र त्रासयाथो चित्तानि मोहय ॥ ५ ॥

अर्थ— हे (दुंदुभे) नगाऱ्या ! तूं (अमित्रेषु विहृदयं वैमनस्यं वद) शत्रूंच्या हृदयांत व्याकुळता आणि उदासीनता निर्माण कर. (विद्वेषं कश्मशं भयं अमित्रेषु निदध्मसि) द्वेष, मत्सर, भांडणें, भय, सर्व शत्रूंमध्यें होऊं देत. हे दुंदुभी ! (एनान् अवजहि) त्यांना (शत्रूंना) काढून टाक. (१)

(आज्ये हुते) तुपाची आहुति देतात एवढ्या थोड्या वेळांत, (अमित्राः प्रत्रासेन) शत्रु घाबरून जाऊन (मनसा चक्षुषा हृदयेन च बिभ्यतः) मन, डोळे आणि हृदय हीं भयग्रस्त अवस्थेंत असतां (धावन्तु) पळून जावोत. (२)

(वानस्पत्यः उस्रियाभिः संभृतः) वनस्पतींतून म्हणजे लांकडातून उत्पन्न झालेला नगारा ज्याच्यावर चामड्याच्या दोऱ्या बांधल्या आहेत (विश्वगोत्र्यः) सर्व प्रकारचे भूमीचा रक्षक आणि (आज्येन अभिघारितः) तुपानें शिंपडलेला तूं (अमित्रेभ्यः प्र त्रासं वद) शत्रूसाठीं कष्ट प्राप्त होण्याची घोषणा कर. (३)

(यथा आरण्याः मृगाः पुरुषात् अधि संविजन्ते) ज्या प्रकारें वनांतील मृग, मनुष्यांना भिऊन पळून जातात (एवा त्वं अमित्रान् अभिक्रंद) त्याप्रमाणें तूं शत्रूंवर गर्जना कर, (प्रत्रासय) त्यांस घाबरून सोड, आणि (अथो चित्तानि मोहय) त्यांच्या चित्तांस मोहित कर. (४)

(यथा अजावयः वृकात् बहु बिभ्यतीः धावन्ति) ज्याप्रमाणें मेंढरें-बकरीं लांडग्याला भिऊन पळून जातात (एवा त्वं अमित्रान् अभिक्रन्द) अशा प्रकारें तूं शत्रूंवर गर्जना कर. (प्रत्रासय) त्यांस घाबरवून सोड आणि (अथो चित्तानि मोहय) त्यांच्या चित्तांस मोहित कर. (५)

यथा॑ श्ये॒नात्प॑त॒त्रिणः॑ सं॒विज॑न्ते॒ अह॑र्दि॒वि सिं॒हस्य॑ स्त॒नथो॒र्यथा॑ ।
ए॒वा त्वं दु॑न्दुभे॒ऽमित्रा॑न॒भि क्र॑न्द॒ प्र त्रा॑सया॒थो॑ चि॒त्तानि॑ मोहय ॥ ६ ॥
परा॒मित्रा॑न्दुन्दु॒भिना॑ हरि॒णस्या॒जिने॑न च । सर्वे॑ दे॒वा अ॑तित्रस॒न्ये सं॑ग्रा॒मस्येश॑ते ॥ ७ ॥
यैरिन्द्रः॑ प्र॒क्रीड॑ते पद्घो॒षैश्छा॒यया॑ स॒ह । तैर॒मित्रा॑स्त्रसन्तु॒ नो॒ऽमी ये यन्त्य॑नीक॒शः ॥ ८ ॥
ज्या॒घो॒षा दु॑न्दु॒भयो॒ऽभि क्रो॑शन्तु॒ या दिशः॑ । सेनाः॒ परा॑जिता य॒तीर॒मित्रा॑णामनीक॒शः ॥ ९ ॥
आदि॑त्य॒ चक्षु॒रा द॑त्स्व॒ मरी॑चयो॒ऽनु॑ धावत । प॒त्सङ्गि॒नीरा स॑जन्तु॒ विग॑ते बाहुवी॒र्ये॑ ॥ १० ॥
यू॒यमु॒ग्रा म॑रुतः॒ पृश्नि॑मातर॒ इन्द्रे॑ण यु॒जा प्र मृ॑णीत॒ शत्रू॑न् ।
सोमो॒ राजा॒ वरु॑णो॒ राजा॑ महादे॒व उ॒त मृ॒त्युरिन्द्रः॑ ॥ ११ ॥
ए॒ता दे॑वसे॒नाः सूर्य॑केतवः॒ सचे॑तसः । अ॒मित्रा॑न्नो जयन्तु॒ स्वाहा॑ ॥ १२ ॥

अर्थ— (यथा पतत्रिणः श्येनात् संविजन्ते) ज्याप्रमाणें पक्षी ससाण्याला भिऊन पळून जातात (यथा स्तनथोः सिंहस्य अहः दिवि) ज्याप्रमाणें गर्जना करणाऱ्या सिंहाला प्रतिदिन भितात त्याप्रमाणें हे नगाऱ्या ! तूं शत्रूंवर गर्जना कर, त्यांना भिववून सोड आणि त्यांच्या चित्ताला मोहित कर. (६)

(ये संग्रामस्य ईशते) जे युद्धाचे स्वामी असतात ते (सर्वे देवाः) सर्व देव (हरिणस्य अजिनेन दुंदुभिना च) हरिणाच्या चामड्यानें तयार केलेल्या नगाऱ्यानेंच (अमित्रान् परा अतित्रसन्) शत्रूंना फार घाबरवून सोडतात. (७)

(इन्द्रः यैः पद्-घोषैः) इन्द्र ज्या पायांच्या घोषांनीं आणि (छायया सह) छायारूपसेनेसह (प्रक्रीडते) युद्धाची क्रीडा करतो. (तैः नः अमीः अमित्राः त्रसन्तु) त्यामुळें आमच्या या शत्रूंना त्रास होवो- कीं (ये अनीकशः यन्ति) जे सेनेच्या रांगांनी हल्ला करतात. (८)

(ज्या-घोषाः दुन्दुभयः) धनुष्याच्या दोरीच्या शब्दासह ढोल (याः दिशः अभिक्रोशन्तु) ज्या दिशा आहेत तिकडे शब्द करो, ज्यामुळें (अमित्राणां अनीकशः पराजिताः यतीः) शत्रूंची संघशः सेना पराजित होऊन पळून जावो. (९)

हे (आदित्य) सूर्या ! (चक्षुः आदत्स्व) शत्रूची दृष्टि हरण करून घे. (मरीचयः अनुधावत) प्रकाशकिरण आम्हांस अनुकूल धांवोत. (बाहुवीर्ये विगते) बाहुवीर्य कमी झाल्यानें (पत्-संगिनीः आ सजन्तु) पायांस बांधण्याच्या दोऱ्या शत्रूच्या पायांस बांधल्या जावोत. (१०)

(पृश्निमातरः उग्राः मरुतः) हे भूमीस माता मानणाऱ्या शूर आणि मरण्यास तयार अशा वीरांनो ! (इन्द्रेण युजा शत्रून् प्रमृणीत) इन्द्र म्हणजे शूर सेनापतीसह राहून शत्रूस मारून टाका. सोम, वरुण, महादेव, मृत्यु आणि इंद्र हे सर्व शूरांस सहाय्य करणारे देव आहेत. (११)

(एताः देवसेनाः सूर्यकेतवः) या दिव्यसेना सूर्याचा ध्वज घेऊन चालणाऱ्या (सचेतसः) उत्तम चित्तानें युक्त होऊन (नः अमित्रान् जयन्तु) आमच्या शत्रूंचा पराभव करोत. विजयासाठीं आमचें (स्व-आ-हा) स्वात्मार्पण होवो. (१२)

नगारा (दुन्दुभि, ढोल)

हीं दोन्हीं सूक्तें नगाऱ्याचें वर्णन करीत आहेत. हें वर्णन स्पष्ट आणि सरळ समजूं शकेल असें असल्यानें भावार्थ आणि विवरण करण्याची खास आवश्यकता नाहीं.

आर्यांचा ध्वज— बाराव्या मंत्रांत सूर्यचिन्ह युक्त ध्वजाचें वर्णन आहे. हें वर्णन वाचलें असतां आर्यांचा ध्वज सूर्यचिन्ह युक्त होता ही गोष्ट स्पष्ट होते.

राजाची स्थिरता

कांड ६, सूक्त ८७

(ऋषिः – अथर्वा । देवता – ध्रुवः ।)

आ त्वा॑हार्षम॒न्तर॑भूर्ध्रु॒वस्ति॒ष्ठावि॑चाचलत् । विश॑स्त्वा॒ सर्वा॑ वाञ्छन्तु॒ मा त्वद्रा॒ष्ट्रमधि॑ भ्रशत् ॥१॥
इ॒हैवैधि॒ माप॑ च्योष्ठाः॒ पर्व॑त इ॒वावि॑चाचलत् । इन्द्र॑ इ॒वेह ध्रु॒वस्ति॑ष्ठे॒ह रा॒ष्ट्रमु॑ धारय ॥२॥
इन्द्र॑ ए॒तम॑दीधरद् ध्रु॒वं ध्रु॒वेण॑ ह॒विषा॑ । तस्मै॒ सोमो॒ अधि॑ ब्रवद॒यं च॒ ब्रह्म॑ण॒स्पति॑ः ॥३॥

अर्थ— (त्वा आहार्षं) तुला येथें राजगादीवर आणलें आहे. (अन्तः भूः) आम्हां सर्वांमध्यें ये. (ध्रुवः अविचाचलत् तिष्ठ) स्थिर आणि अविचलित होऊन येथें रहा. (सर्वा विशः त्वा वाञ्छन्तु) सर्व दिशांमधील प्रजाजन तुला चाहोत. (राष्ट्रं त्वत् मा अधिभ्रशत्) राष्ट्र तुझ्याकडून-तुझ्यामुळें भ्रष्ट न होवो. (१)

(इह एव एधि) येथें ये, (मा अप च्योष्ठाः) केव्हांहि कधींहि पडूं नकोस, (पर्वत इव अविचाचलत्) पर्वताप्रमाणें अविचलित आणि (इन्द्रः इव ध्रुवः) इंद्राप्रमाणें स्थिर होऊन (इह तिष्ठ) येथें रहा आणि (राष्ट्रं उ धारय) राष्ट्राचें पालन कर. (२)

(इंद्रः ध्रुवेण हविषा) इन्द्र स्थिर समर्पणानें (एतं ध्रुवं अदीधरत्) याला स्थिर करून धारण करतो. (तस्मै सोमः) त्याला सोमानें आणि (अयं च ब्रह्मणस्पतिः) या ज्ञानपतीनें (अधिब्रवत्) उपदेश दिला आहे. (३)

भावार्थ— हे राजा ! तुला आम्हीं सर्वांनी निवडून या राज्यगादीवर स्थापिलें आहे. आतां तूं या राज्यसभेंत ये आणि स्थिर होऊन राज्य कर. चंचलता सोडून दे. सर्व दिशांत रहाणारे तुझे प्रजाजन तुझ्याविषयीं संतोष प्रकट करोत. तुझ्याकडून या राज्याची अधोगति न होवो. (१)

या राज्यावर स्थिर हो. येथून खालीं पडूं नकोस. स्थिर होऊन येथील कार्य कर. तुझ्या स्थानावरून पदच्युत होऊं नकोस. आणि राष्ट्राचा उद्धार कर. (२)

इन्द्रानें आत्मसमर्पणानें स्थिर राज्य प्राप्त केलें होतें. आणि ज्ञानी ब्रह्मणस्पतीनें त्याला उपदेश दिला होता. त्याप्रमाणें तूं सुद्धां आत्मसमर्पणानें स्थिर हो. या राज्याचें शासन कर आणि येथील ज्ञानी लोक ज्याप्रमाणें सल्ला देतील त्याप्रमाणें राष्ट्राचें शासन कर. (३)

राजाची स्थिरता

राजा राज्यावर स्थिर कसा होऊं शकतो त्या विषयींचा उपदेश या सूक्तांत दिला आहे. (१) राजा सर्व प्रजाजनांनीं निवडावा. (२) राजानें अशा प्रकारें राज्यशासन चालवावें कीं जेणेंकरून सर्व प्रजा त्याच्यावर प्रसन्न राहील आणि स्वतःची उन्नति करून घेईल. (३) राजामध्यें चंचल वृत्ति नसावी. (४) प्रजेच्या मनास आकर्षित करणारा राजा असावा. (५) त्याच्या राज्यशासनानें राज्याची अवनति न व्हावी. (६) राजानें राष्ट्रांतील विद्वानांच्या सल्ल्यानें राज्य चालवावें. याप्रमाणें राजा जर स्वतःचे व्यवहार करील तर तो राज्यावर स्थिर होईल. नाहून त्यास राज्यावरून पदच्युत करण्यांत येईल. यावरून राजामध्यें कोणते दुर्गुण असल्यास तो राज्यभ्रष्ट होतो तेंहि कळतें. पहा—

(१) प्रजेच्या अनुमतीशिवाय जो राज्यावर येतो (बसतो). (२) जो प्रजेचा संतोष प्राप्त करूं शकत नाहीं. (३) जो चंचलवृत्तीचा असतो. (४) प्रजा ज्याचें अहित इच्छिते. (५) ज्याच्या राज्यशासनामुळें राष्ट्राची अधोगति होते. (६) ज्या राष्ट्रांतील विद्वानांच्या सल्ल्याविरुद्ध राजा राज्यशासन चालवितो. याप्रमाणें जो राजा राज्य चालवितो तो राज्यापासून वंचित होतो. त्याचें राज्य नाश पावतें.

प्रत्येक प्रजाजनानें आणि राजानें या सूक्ताचा विचार करावा. या सूक्ताच्या मननानें प्रजेलासुद्धां कळून येईल कीं कोणता राजा उत्तम आहे आणि कोणता अधम आहे, कोणत्या राजास गादीवर स्थिर होऊं द्यावें आणि कोणास पदच्युत करावें. राजाला सुद्धां कळेल कीं राज्यांत त्याला स्थिरत्व कसें प्राप्त होईल आणि कोणत्या कारणानें राज्याची अधोगति होईल. राजा आणि प्रजा दोघांसहि या सूक्तानें उत्तम बोध प्राप्त होईल.

शूर वीर

कांड ७, सूक्त ६२

(ऋषिः - मरीचिः । काश्यपः । देवता - अग्निः ।)

अयमग्निः सत्पतिर्वृद्धवृष्णो रथीव पत्तीनजयत्पुरोहितः ।
नाभा पृथिव्यां निहितो दविद्युतदधस्पदं कृणुतां ये पृतन्यवः ॥ १ ॥

अर्थ— (अयं अग्निः) हा अग्रेसारखा तेजस्वी पुरुष (सत्पतिः वृद्धवृष्णः) सज्जनांचा पालक महाबलवान् (पुरः-हितः) सर्वांचा अग्रणी (रथी इव पत्तीन् अजयत्) महारथी ज्याप्रमाणें पायदळाला जिंकतो त्याप्रमाणें हा विजयी होतो. (पृथिव्यां नाभा निहितः) हा भूमीवर मुख्य ठिकाणीं ठेवला आहे. (दविद्युतत्) तो प्रकाशत आहे. (ये पृतन्यवः अधस्पदं कृणुतां) जे सेना घेऊन आमच्यावर चढाई करतात त्यांना पायांखालीं दाबून टाका. (१)

भावार्थ— हा तेजस्वी पुरुष सज्जनांचें पालन करो. हा बलवान होवो. जनतेचा अग्रणी होऊन शत्रुसेनेचा पराजय करो, महारथी होवो, पृथ्वीच्या केंद्रस्थानीं आरूढ होवो, तेजानें प्रकाशित होवो आणि सैन्य घेऊन चढाई करणाऱ्यांना पायांखालीं दाबून टाको. (१)

मनुष्यानें याप्रकारें आपले गुण प्रकाशित करावे, आणि आपल्या राष्ट्राच्या केन्द्रस्थानीं विराजमान् व्हावें.

वीर पुरुष

कांड ३, सूक्त ६

(ऋषिः - जगद्बीजं पुरुषः । देवताः - वनस्पतिः, अश्वत्थः)

पुमान्पुंसः परिजातोऽश्वत्थः खदिरादधि । स हन्तु शत्रून्मामकान्यानहं द्वेष्मि ये च माम् ॥ १ ॥
तानश्वत्थ निः शृणीहि शत्रून्वैबाधदोधतः । इन्द्रेण वृत्रघ्ना मेदी मित्रेण वरुणेन च ॥ २ ॥
यथाश्वत्थ निरभनोऽन्तर्महत्यर्णवे । एवा तान्त्सर्वान्निर्भङ्ग्धि यानहं द्वेष्मि ये च माम् ॥ ३ ॥

अर्थ- ज्याप्रमाणें (खदिरात् अधि अश्वत्थः) खैराच्या झाडावर वाढलेला पिंपळ वृक्ष त्याचप्रमाणें (पुंसः परिजातः) वीर पुरुषापासून वीरपुरुष उत्पन्न होत असतो. (सः मामकान् शत्रून् हन्तु) तो माझ्या शत्रूंचा वध करो. (यान् अहं द्वेष्मि, ये च माम्) ज्यांचा मीं द्वेष करतों आणि जे माझा द्वेष करतात. (१) हे (अश्वत्थ) अश्वासमान बलिष्ठ वीरा ! (तान् वैबाधदोधतः शत्रून्) त्या विविध बाधा करणाऱ्या शत्रूंना (निः शृणीहि) मारून टाक. (वृत्रघ्ना इन्द्रेण मित्रेण वरुणेन च मेदी) वृत्राचा नाश करणाऱ्या इंद्र, मित्र आणि वरुणांशीं मित्रत्व कर. (२) हे अश्वत्था ! (यथा महति अर्णवे निरभनः) ज्याप्रमाणें महान समुद्रांत तूं भेदन करतोस, (एव) त्याचप्रकारें (तान् सर्वान् निर्भङ्ग्धि) त्या सर्वांस छिन्नभिन्न कर. (यान् अहं द्वेष्मि ये च मां) ज्यांचा मीं द्वेष करतों आणि जे माझा द्वेष करतात. (३)

भावार्थ— खैराच्या वृक्षावर अश्वत्थ वृक्ष उगतो आणि त्यावरच वाढतो त्याप्रमाणें वीरपुरुषापासून वीरसंतति उत्पन्न होते आणि वीरासह वाढते. असे वीर आमच्या शत्रूंस हटवोत. (१) हे वीरा ! तूं शत्रूनाश करणाऱ्या वीरांत मिसळून विशेष बाधा करणाऱ्या शत्रूंना मारून टाक. (२) हे शूरा ! ज्याप्रमाणें नौकेच्या सहाय्यानें महान समुद्राच्या सुद्धां पलीकडे जातात त्याप्रमाणें तूं त्या सर्व शत्रूंचें भेदन करून पार हो ! (३)

यः सहमानश्चरसि सासहान इव ऋषभः । तेनाश्वत्थ त्वया वयं सपत्नान्त्सहिषीमहि ॥ ४ ॥
सिनात्वेनान्निर्ऋतिर्मृत्योः पाशैरमोक्यैः । अश्वत्थ शत्रून्मामकान्यानहं द्वेष्मि ये च माम् ॥ ५ ॥
यथाश्वत्थ वानस्पत्यानारोहन्कृणुषेऽधरान् । एवा मे शत्रोर्मूर्धानं विष्वग्भिन्द्धि सहस्व च ॥ ६ ॥
तेऽधराञ्चः प्र प्लवन्तां छिन्ना नौरिव बन्धनात् । न वैबाधप्रणुत्तानां पुनरस्ति निवर्तनम् ॥ ७ ॥
प्रैणान्नुदे मनसा प्र चित्तेनोत ब्रह्मणा । प्रैणान्वृक्षस्य शाखयाश्वत्थस्य नुदामहे ॥ ८ ॥

अर्थ— हे अश्वत्था ! (**यः सहमानः सासहानः**) जो तूं शत्रूला दाबून टाकणारा, बलवान् (**ऋषभः इव**) बैलासारखा बलवान् होऊन (**चरसि**) विचरत आहेस. (**तेन त्वया वयं सपत्नान् सहिषीमहि**) त्या तुझ्यायोगानें आम्हीं शत्रूस पराजित करूं. (४) हे अश्वत्था ! ज्यांचा मीं द्वेष करतों आणि जे माझा द्वेष करतात. (**निर्ऋतिः मृत्योः अमोक्यैः पाशैः एनान् मामकान् शत्रून् सिनातु**) या माझ्या शत्रूंनां आपत्ति, मृत्यूच्या न तुटणाऱ्या पाशांनीं बांधून टाकोत, (५) हे अश्वत्था ! (**यथा आरोहन् वानस्पत्यान् अधरान् कृणुषे**) ज्याप्रमाणें तूं वर राहणाऱ्या अन्य वृक्षानां खालीं करतोस, (**एवा**) त्याचप्रमाणें (**मे शत्रोः मूर्धानं विष्वक् भिन्धि**) माझ्या शत्रूच्या मस्तकास तोड आणि (**सहस्व च**) त्यास जिंकून घे. (६) (**बन्धनात् छिन्ना नौः इव**) बन्धनापासून सुटलेल्या नौकेप्रमाणें (**ते अधराञ्चः प्रप्लवन्तां**) ते अधोगतीच्या मार्गानें वहात जावोत. (**वैबाध-प्रणुत्तानां पुनः निवर्तनं न अस्ति**) विशेष बाधा करणाऱ्यांचें पुनः परत येणें होत नाहीं. (७) (**एनान् मनसा प्रनुदे**) या शत्रूंना मीं मनानें हटवितों. (**चित्तेन उत ब्रह्मणा प्र**) मीं चित्तानें आणि ज्ञानानें हटवितों. (**अश्वत्थस्य वृक्षस्य शाखया**) अश्वत्थ वृक्षाच्या शाखेनें (**एनान् प्र नुदामहे**) त्यांना आम्ही हटवितों. (८)

भावार्थ— हे बलवान् ! तूं बलिष्ठ होऊन शत्रूस दाबून सर्वत्र संचार करतोस, अशा तुझ्या सहाय्यानें आम्हीं सर्व शत्रूंस पराजित करूं शकतों. (४) हे शक्तिमान् ! माझे वैरी आपत्तींच्या पाशांनीं बांधले जावोत म्हणजे ते आपत्तींत सांपडोत. (५) ज्याप्रमाणें पिंपळ दुसऱ्या झाडावर उगवतो आणि त्यास खालीं दाबून टाकतो, त्याप्रमाणें वीर माझ्या शत्रूस खालीं दाबून टाको आणि त्यांचीं मस्तकें तोडो. (६) विशेष बाधा करणारे शत्रु अधोगतीनें खालीं जावोत आणि एकदा पडले म्हणजे पुनः कधीं वर डोकें न काढोत. (७) मनानें, चित्तानें आणि ज्ञानानें मीं शत्रूला दूर करीत आहें. (८)

वीर पुरुष

अश्वत्थाची अन्योक्ति

हें सूक्त अश्वत्थाची अन्योक्ति आहे. अन्योक्ति अलंकार वाचकांच्या माहितीचा आहे. एकाचा प्रत्यक्ष उल्लेख करून दुसऱ्याच्या विषयीं सांगणें याचें नांव अन्योक्ति. त्याप्रमाणें येथें अश्वत्थ वृक्षाच्या वर्णनाच्या मिषानें वीरपुरुषाचें वर्णन केलें आहे. म्हणून त्यास अश्वत्थान्योक्ति म्हणावें.

अश्वत्थ शब्दाचे पुष्कळ अर्थ आहेत. (१) पिंपळ (वृक्ष); (२) [**अश्व-स्थ**] अश्वाप्रमाणें बलवान् होऊन रहाणारा वीर, (३) [**अ-श्व-स्थ**] जे उद्या (जिवंत) असेलच असें सांगता येत नाहीं असा, नश्वर (४) सूर्य. (५) अश्विनी नक्षत्र, इत्यादि अनेक अर्थ या शब्दाचे आहेत. येथें पहिले दोन अपेक्षित आहेत.

अश्वत्थ म्हणजे पिंपळाचें झाड दुसऱ्या वृक्षावर उगलेलें दिसतें '**यथा अश्वत्थ वानस्पत्यान् आरोहन् अधरान् कृणुषे** ।' (मं. ६) ' या दृश्यावर कवीच्या दृष्टीनें अलंकार होऊं शकतो, तो असा कीं हा अश्वत्थ वृक्ष महान् वीर आहे, तो इतरांना आपल्या पायांखालीं दाबून टाकतो आणि त्यांच्या मस्तकावर पाय देऊन उभा रहातो. ज्याप्रमाणें वीरपुरुष शत्रूच्या

डोक्यावर पाय देऊन उभा रहातो तसेंहें पिंपळाचें कृत्य आहे. म्हणून आम्हीं म्हणतों की अश्वत्थ वृक्षाच्या अन्योक्तीनें या सूक्तांत शूर पुरुषाचें वर्णन केलें आहे. वाचकांनी या दृष्टीनें हें सूक्त पहावें.

आनुवंशिक संस्कार

या सूक्ताच्या पहिल्या मंत्रांत म्हटलें आहे की **' पुंसः पुमान् परिजातः '** वीर पुरुषापासून वीर संतति जन्मते. वीर कुळांतच वीर उत्पन्न होतात. याचा अर्थ असा नव्हे की अन्य कुळांत वीर उत्पन्न होत नाहींत. परंतु येथें संतान निर्माण होण्यास अनुकूल क्षेत्र-वातावरण कोणतें तें सांगितलें आहे. लहानपणीं वीरत्वाच्या गोष्टी ऐकल्यानें वीरांचीं मुलें वीरत्वयुक्त होणें हें स्वाभाविक आहे, हेंच वरील वाक्याचें तात्पर्य आहे.

हा वीर सर्व प्रकारच्या शत्रूस जिंकील असेंच सर्व मंत्रांत म्हटलें आहे. आणि मंत्रांचा आशय सरळ असल्यानें त्याचें अधिक स्पष्टीकरण करण्याची कांहीं आवश्यकता नाहीं.

शत्रूंचीं लक्षणें

या सूक्तांत **(वै-बाध)** विशेष बाधा करणें हें सुद्धां एक शत्रुत्वाचें लक्षण सांगितलें आहे. (मं. २, ७) वैयक्तिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक इत्यादि अनेक प्रकारचे शत्रु असतात. आणि या केंद्रांत हे शत्रु विशेष प्रकारच्या अडचणी उभ्या करतात. हा अनुभव वाचकांना असेलच. या सर्व शत्रूंस दूर केलें पाहिजे आणि जनतेचें सुख वाढविलें पाहिजे. हें या सूक्ताच्या उपदेशाचें सार आहे. शत्रूंना दूर करण्याचा उपाय याप्रमाणें आहे—

मनसा चित्तेन उत ब्रह्मणा एतान् प्रनुदे । (मं. ८)

' मन, चित्त, आणि ज्ञानानें शत्रूंना दूर करण्याच्या उपायाचा विचार केला पाहिजे. ' आणि त्या उपायाचें मनन केलें पाहिजे. चित्तानें त्या गोष्टीचें चिंतन केलें पाहिजे. आणि स्वतःचें ज्ञान वाढवून त्या ज्ञानद्वारें अशी योजना केली पाहिजे की त्यामुळें शत्रूचा त्वरित नाश होईल. तात्पर्य हरेक प्रकारच्या युक्तिप्रयुक्तींनीं शत्रूला दूर केलें पाहिजे.

अधःपतनाचा मार्ग

जे लोक विशेष अडचणी उपस्थित करतात, जे जनतेस सतावितात, जे लोकांस उपद्रव करतात. ते स्वकर्तव्यापासून च्युत होतात, खालीं पडतात, स्वतःच्या दुष्ट कृत्यामुळें स्वतःच अधोगतीच्या मार्गानें जातात. याविषयीं ७ व्या मंत्राचें कथन प्रत्येक मनुष्यानें मनन करण्यायोग्य आहे.

बन्धनात् छिन्ना नौः इव, ते अधराञ्चः प्र प्लवन्ताम् । वैबाध-प्रणुत्तानां पुनः निवर्तनं नास्ति ॥ (मं. ७)

' बंधनापासून सुटलेली नौका जशी जलप्रवाहाबरोबर खालीं खालीं वहात जाते, तद्वत् जनतेस विशेष बाधा करणारे लोक अधोगतीनें खाली पडोत. त्यांच्या परत उठण्याची कांहीं आशा नाही. ' जे दुष्ट जनतेस विशेष बाधा करतात आणि त्यामुळें पतित होतात त्यांच्या पुनरुत्थानाची कांहीं आशा नाहीं.

या मंत्रानें वाचकांस सावध केलें आहे कीं आपणांकडून तर कोणास विशेष कष्ट पोंहोचत नाहींना याचा विचार प्रत्येकानें करावा. कारण जे दुसऱ्यास कष्ट देतात त्यांच्या उन्नतीची कांहीं आशा नाही. एक मनुष्य दुसऱ्यास कष्ट देईल, एक जात दुसऱ्या जातीस उपद्रव देईल, एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रास सतावील तर त्या सतावणाऱ्यांना निश्चयाने अधःपातच प्राप्त होतो त्यांतून पुनरुद्धाराची त्यांस कांहींच आशा नाहीं. जें राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रास पारतंत्र्यांत ठेऊं इच्छितें तें स्वतःच गर्तेंत पडतें. साम्राज्यमदाच्या कारणानें हें पतन होत असतें. जर कोणास दाबून एकास्थानीं ठेवावयाचें तर त्याच्यावर देखरेख ठेवावयास दबविणाऱ्यासहि तेथेंच रहावें लागतें. याप्रकारें वाचक इतर गोष्टी समजूं शकतीलच. तात्पर्य असें की जर कोणतीहि जात दुसऱ्यावर अत्याचार करील तर ती स्वतः अधोगतीस जाईलच. आणि जो पावेतों तो अत्याचार दूर होणार नाहीं तोपर्यंत त्याचा उद्धार होण्याचा दुसरा कांहीं मार्ग नाहीं. हें जाणून कोणीहि दुसऱ्यावर अत्याचार करूं नये. दुसऱ्यावर अत्याचार न करण्यानेंच स्वतःच्या उन्नतीचा मार्ग खुला रहातो.

विजयाची तयारी

या सूक्तांत **' सहमान, सासहान '** (मं. ४) असे दोन शब्द आले आहेत. इतर ठिकाणीं **' सहमान, असह्य '** असें शब्द आहेत ते विजयाच्या तयारीचे सूचक आहेत.

१ **सहमान**— शत्रूचा हल्ला झाला असताहि जे आपलें स्थान सोडीत नाहींत.

२ **असह्य, सासहान**,—यांचा हल्ला शत्रूवर झाला असतां त्या हल्ल्यास शत्रु तोंड देऊं शकत नाहीं. पळून जातो.

विजय प्राप्त करण्यास अशी तयारी केली पाहिजे तेव्हां विजय होतो.

वाचकांनी या दृष्टीनें या सूक्ताचा विचार करावा. आणि शत्रूस दूर पळवून लावण्यासाठीं योग्य तो बोध प्राप्त करून घ्यावा.

अथर्ववेदाचा सुबोध अनुवाद
'मातृभूमि आणि स्वराज्यशासन' यांतील
सुभाषितें

(अथर्व. १२।१)

१. सत्यं बृहद् ऋतं उग्रं दीक्षा तपो ब्रह्म यज्ञः पृथिवीं धारयन्ति। (मं. १)–सत्य, बृहद्भाव, सरलता, उग्रत्व, दक्षता, तप, कष्ट सहन करण्याची शक्ति, ज्ञान आणि यज्ञ हे गुण मातृभूमीचें धारण करतात. (यज्ञ–सज्जनांचा सत्कार करणें आपापसांत संघटना साधणें आणि निर्बलांना दान देणें त्याचें नांव यज्ञ आहे.)

२. सा नो भूतस्य भव्यस्य पत्नी उरुं लोकं पृथिवी नः कृणोतु। (मं. १)– ती मातृभूमि आमचें भूतकालीं रक्षण करणारी होती, तशीच ती भविष्यकाळीं, सर्व परिस्थितींतहि रक्षण करणारी आहे. ती आम्हांस विस्तृत कार्यक्षेत्र देवो.

३. असंबाधं बध्यतो मानवानां यस्य उद्वतः प्रवतः समं बहु। (२)– जरी आमच्या मातृभूमींत रहाणाऱ्या मानवांमध्यें उच्चता आणि नीचता पुष्कळ आहे तथापि त्याबरोबरच समता सुद्धां पुष्कळ आहे.

४. पृथिवी नः प्रथतां राध्यतां नः (मं. २)–आमची मातृभूमि आमचें यश सर्वत्र फैलावो.

५. यस्यां अन्नं कृष्टयः संबभूवुः (मं. ३–४) आमच्या मातृभूमींत शेतकरी सहकार्यानें आणि संघटनेनें पुष्कळ अन्न उत्पन्न करोत.

६. सा नो भूमिः पूर्वपेये दधातु (३)– ती आमची मातृभूमि आम्हांस अपूर्व खानपान देवो.

७. सा नो भूमिः गोष्वप्यन्ने दधातु (४)– ती आमची मातृभूमि आम्हांस गायीं आणि अन्न यामध्यें धारण करो.

८. यस्यां पूर्वे पूर्व जनाः विचक्रिरे (५)– ज्या मातृभूमींत आमच्या पूर्वजांनीं विशेष पराक्रम केले.

९. यस्यां देवा असुरानभ्यवर्तयन् (५)–ज्या मातृभूमींत देवांनीं असुरांचा पराजय करून त्यांस पळवून लावलें.

१०. गवामश्वानां वयसश्च विष्ठा भगं वर्चः पृथिवी नो दधातु (५)– आमची मातृभूमि गायी घोडे आणि पशुपक्षी इत्यादींना सुद्धां रहाण्यास स्थान देते, ती आम्हांस भाग्य आणि तेज देवो.

११. विश्वंभरा वसुधानी प्रतिष्ठा हिरण्यवक्षा जगतो निवेशनी द्रविणे नो दधातु (मं. ६)– सर्वांचें भरणपोषण करणारी, धनाच्या खाणींना आपणामध्यें आधार देणारी, सोन्याला आपल्यामध्यें आश्रयस्थान देणारी, हालचाल करणाऱ्या म्हणजे जिवंत प्राण्यांस आश्रय देणारी आमची मातृभूमि आम्हांस धन देवो.

१२. यां रक्षन्त्यस्वप्ना विश्वदानीं देवा भूमिं पृथिवीमप्रमादम् सा नो मधु प्रियं दुहां, अथो उक्षतु वर्चसा (७)– आळस न करणारे देव प्रमाद न करतां आमच्या मातृभूमीचें रक्षण करतात. ती आम्हांस प्रिय मध देवो आणि तेजानें आम्हांस युक्त करो. (७)

१३. यां मायाभिरन्वचरन् मनीषिणः (८)–ज्ञानी मनुष्य कुशलतेनें ज्या मातृभूमीची सेवा करतात.

१४. सा नो भूमिः त्विषिं बलं राष्ट्रे दधातूत्तमे (८)– ती आमची मातृभूमि आमच्या उत्तम राष्ट्रांत तेज आणि बल धारण करो.

१५. यस्यां आपः परिचराः समानीरहोरात्रे अप्रमादं क्षरन्ति (९)–मातृभूमीचे सेवक जलप्रवाहाप्रमाणें रात्रंदिवस भ्रमण करीत लोकांची सेवा करीत आहेत.

१६. सा नो भूमिः भूरिधारा पयो दुहामथो उक्षतु वर्चसा (९)– ती आमची मातृभूमि आम्हांस अनेक धारांनीं दूध देऊन आम्हांस तेजयुक्त करो.

१७. यामश्विनावमिमातां विष्णुर्यस्यां विचक्रमे, इन्द्रो यां चक्र आत्मनेऽनमित्रां शचीपतिः। सा नो

भूमिर्विसृजतां माता पुत्राय मे पयः (१०)- अश्विनी देवांनीं जिला मापलें आहे, विष्णूनें जिच्यावर पराक्रम केले आहेत, शक्तिशाली इंद्रानें जिला शत्रुरहित केली आहे, ती आमची मातृभूमि आम्हांस, तिच्या पुत्रांस दूध देवो.

१८. गिरयस्ते पर्वता हिमवन्तोऽरण्यं ते पृथिवि स्योनमस्तु (११)- हे मातृभूमि ! तुझे पर्वत हिमशिखरें आणि अरण्यें आम्हांस सुख देणारी होवोत.

१९. अजीतोऽहतो अक्षतोऽध्यष्ठां पृथिवीमहम् (११)- अजिंक्य, ज्यास मार लागला नाहीं असा, ज्याच्यावर घाव पडला नाहीं असा मी या माझ्या मातृभूमींत अध्यक्ष होऊन राहीन.

२०. यास्त ऊर्जस्तन्वः संबभूवुः तासु नो धेहि, अभि नः पवस्व (१२)- तुझ्या पाठीवर जे तेजस्वी वीर जन्मले आहेत, त्यांच्यांत आम्हांस धारण कर आणि आमचें रक्षण कर.

२१. माता भूमिः पुत्रो अहं पृथिव्याः (१२)- ही माझी मातृभूमि आणि मी तिचा पुत्र आहें.

२२. सा नो भूमिर्वर्धयद् वर्धमाना (१३)- ती आमची मातृभूमि स्वतः वाढतां वाढतां आमचें संवर्धन करो.

२३. यो नो द्वेषत् पृथिवि, यः पृतन्यात्, योऽभिदासान्मनसा, यो वधेन, तं नो भूमे रन्धय पूर्वकृत्वरि (१४)- हे मातृभूमि ! जे आमचा द्वेष करतात, जे आम्हांवर सैन्य पाठवितात, जे मनानें आम्हांस दास करूं इच्छितात, जे वध करून आमचा नाश करूं इच्छितात, हे अपूर्व कार्य करणाऱ्या मातृभूमि ! त्यांचा तूं नाश कर.

२४. त्वज्जातास्त्वयि चरन्ति मर्त्यास्त्वं बिभर्षि द्विपदस्त्वं चतुष्पदः (१५)- तुझ्यामध्यें जन्मलेले हे मानव तुझ्या पाठीवरच संचार करतात. तूंच द्विपाद आणि चतुष्पादांना धारण करून त्यांचें भरणपोषण करतेस.

२५. तवेमे पृथिवि पञ्च मानवा येभ्यो ज्योतिरमृतं मर्त्येभ्यः उद्यन्त्सूर्यो रश्मिभिरातनोति (१५) हे पांच प्रकारचे मानव तुझेच आहेत. ज्यांच्यासाठीं सूर्य उदय पावल्यानंतर आपल्या किरणांचे तेज आणि अमृत देतो. (१५)

२६. ता नः प्रजाः सं दुह्रतां समग्रा वाचो मधु पृथिवि धेहि मह्यम् (१६)- हे आमच्या मातृभूमे ! ही आमची प्रजा सर्व एकत्र होऊन आपापसांत मधुर भाषण करो आणि मजशीं सुद्धां मधुर भाषण करो.

२७. पृथिवीं धर्मणा धृतां शिवां स्योनामनुचरेम विश्वहा (१७)- धर्मानें धारण केलेल्या ह्या आमच्या मातृभूमीची सेवा आम्ही सदा सर्वदा करीत रहावें.

२८. महांस्त्वेन्द्रो रक्षत्यप्रमादं (१८)- महान् इन्द्र कांहीं प्रमाद केल्यावांचून तुझें रक्षण करतो.

२९. सा नो भूमे प्ररोचय (१८) - हे मातृभूमे, आम्हांस तेजस्वी कर.

३०. मा नो द्विक्षत कश्चन (१८, २३-२५)- कोणी आमचा द्वेष न करो.

३१. पृथिव्यासितज्ञुः त्विषीमन्तं संशितं मा कृणोतु (२१)- पृथ्वीवर अग्नि आहे तो मला तेजस्वी आणि प्रसिद्ध करो. (**असित-ज्ञुः**)= वाममार्गें जाणें-वाममार्गानें जाणारा अग्नि).

३२. भूम्यां मनुष्या जीवन्ति स्वधयान्नेन मर्त्याः (२२)- पृथ्वीवर मनुष्यें धारणाशक्ति वाढविणाऱ्या अन्नानें जीवित रहातात.

३३. भूम्यां देवेभ्यो ददति यज्ञं हव्यं अरंकृतम् (२२)- मातृभूमीवर देवांसाठीं अलंकृत हवनसामग्रीनें यज्ञ करतों.

३४. सा नो भूमिः प्राणमायुर्दधातु, जरदष्टिं मा पृथिवी कृणोतु (२२)- ती आमची मातृभूमि आम्हांस प्राण आणि आयुष्य देवो. आणि वृद्धावस्थेपर्यंत रहाण्यास योग्य असे आम्हांस करो.

३५. तेन मा सुरभिं कृणु (२३-२४)- त्यानें मला सुगंधित कर.

३६. तस्यै हिरण्यवक्षसे पृथिव्या अकरं नम (२६)- त्या स्वतःच्या छातीमध्यें सोनें धारण करणाऱ्या मातृभूमीस मीं नमन करतों.

३७. पृथिवीं विश्वधायसं धृतामच्छा वदामसि (२७)- सर्वांस धारण करणाऱ्या मातृभूमीविषयीं आम्हीं नेहमीं चांगलेंच बोलूं.

३८. मा व्यथिष्महि भूम्याम् (२८)- मातृभूमीमध्यें आम्हीं दुःख निर्माण करणार नाहीं.

३९. त्वाभि नि षीदेम भूमे (२९)- हे मातृभूमि ! मीं तुझा आश्रय करीन.

४०. शुद्धा न आपः तन्वे क्षरन्तु (३०)- आमच्या शरीरासाठीं शुद्धतेसाठीं स्वच्छ जल वहात राहो.

४१. यो नः सेदुरप्रिये तं निदध्मः (३०)- जे आम्हांस

कष्ट देतात त्यांना ती मातृभूमि अप्रिय दुःखांत ठेवते.

४२. पवित्रेण पृथिवी मोत्पुनामि (३०)– हे मातृभूमि ! पवित्रतेनें मीं स्वतःला पवित्र करतों.

४३. याः प्रदिशः स्योनास्ता मह्यं चरते भवन्तु (३१)– सर्व दिशा चालत असतां माझें कल्याण करणाऱ्या होवोत.

४४. मा निपप्तं भुवने शिश्रियाणः (३१)– जेथें आम्ही रहातों तेथें आमचें पतन न होवो.

४५. स्वास्त भूमे नो भव (३२)– हे मातृभूमि ! आम्हांस तूं कल्याणकारक हो !

४६. मा विदन् परिपन्थिनः (३२)– शत्रु मला न जाणोत.

४७. वरीयः यावया वधम् (३२)– आमचे श्रेष्ठ वीर आमच्या शत्रूंचा वध करण्यास जावोत.

४८. मे चक्षुः मा मेष्ट उत्तरामुत्तरां समाम्। (३३)– माझे डोळे मला उत्तरोत्तर आयुष्यांत (वृद्धापकाळांत) प्रकाश देत राहोत.

४९. ऋतवस्ते विहिता हायनीरहोरात्रे पृथिवि नो दुहाताम् (३६)– हे मातृभूमि ! तुझ्यावर होणारे सर्व ऋतु व दिवसरात्र माझ्यासाठीं सुखदायक पदार्थ देवोत.

५०. यस्यां पूर्वे भूतकृत ऋषयो गा उदानृचुः सप्त सत्रेण वेधसो यज्ञेन तपसा सह (३९)– ज्या या आमच्या भूमींत प्राचीन समयीं अद्‌भुत कार्य करणारे ऋषि मुनि तप, यज्ञ आणि सत्रामध्यें स्तुति गात होते.

५१. सा नो भूमिरादिशतु यद्धनं कामयामहे (४०)– ती मातृभूमि आम्हीं इच्छूं तें, तितकें, व तसलें धन आम्हास देवो.

५२. यस्यां गायन्ति नृत्यन्ति भूम्यां (मर्त्याः) (४१)– ज्या मातृभूमींत मानव (आनन्दानें) गातात आणि नाचतात.

५३. युध्यन्ते यस्यां आक्रन्द्रो यस्यां वदति दुन्दुभिः (४१)– ज्या मातृभूमीसाठीं वीर पुरुष युद्ध करतात आणि युद्धसमयीं दुंदुभींचा नाद गर्जतो.

५४. सा नो भूमिः प्रणुदतां सपत्नान्, असपत्नं मा पृथिवी कृणोतु (४१)– ती आमची मातृभूमि शत्रूंना दूर करून मला शत्रुरहित करो.

५५. यस्यामन्नं व्रीहियवौ यस्यामिमाः पञ्च कृष्टयः (४२)– ज्या मातृभूमींत तांदुळ आणि जव उत्पन्न होतात आणि पांच प्रकारचे लोक जिच्या पाठीवर रहातात.

५६. यस्याः पुरो देवकृतः क्षेत्रे यस्याः विकुर्वते (४३)– ज्या मातृभूमींत देवांनीं वसविलेलीं नगरें आहेत आणि ज्या क्षेत्रांत वीर पुरुष विशेष पराक्रम करतात.

५७. प्रजापतिः पृथिवीं विश्वगर्भा आशामाशां रण्यां नः कृणोतु । (४३)– प्रजापति सर्वांस गर्भांत धारण करणाऱ्या आमच्या या मातृभूमीस प्रत्येक दिशेस रमणीय करो.

५८. निधिं बिभ्रती बहुधा गुहा वसु मणिं हिरण्यं पृथिवी ददातु मे (४४)– आमची मातृभूमि अनेक प्रकारचें धन स्वतःमध्यें धारण करते ती आम्हांस रत्नें आणि सुवर्ण देवो.

५९. जनं बिभ्रती बहुधा विवाचसं नानाधर्माणं पृथिवी यथौकसम् । (४५)– आमची मातृभूमि अनेक भाषा बोलणाऱ्या आणि अनेक धर्म अनुसरणाऱ्या मनुष्यांस एक घरांतील माणसांप्रमाणें धारण करते.

६०. सहस्रं धारा द्रविणस्य मे दुहां ध्रुवेव धेनुरनपस्फुरन्ती (४५)– न हलणाऱ्या गायीप्रमाणें ही आमची मातृभूमि आम्हांस हजारों धारांनीं धन देवो.

६१. यस्ते सर्पो वृश्चिकः तन्नः सर्पन् मोप सृपत् (४६)– जे सर्प वृश्चिकादि प्राणी पृथ्वीच्या पाठीवर आहेत ते मजजवळ न येवोत.

६२. यच्छिवं तेन नो मृड (४६, ४७)–जें कल्याणकारक आहे त्याच्या योगानें आम्हांस सुखी कर.

६३. ये ते पन्थानो बहवो जनायना, रथस्य वर्त्मानसश्च यातवे, यैः संचरन्त्युभये भद्रपापास्तं पन्थानं जयेमानमित्रं अतस्करम् (४७)– तुझ्या पाठीवर लोकांचे जे जाण्यायेण्याचे आणि रथांचे मार्ग आहेत, ज्यावरून पापी आणि निष्पाप लोक जातात येतात, त्या रस्त्यांना आम्ही शत्रुरहित आणि चोररहित करून प्राप्त करूं आणि विजयी होऊं.

६४. रक्षो अप बाधयास्मत् (४९)– राक्षसांस आमच्यापासून दूर ठेव.

६५. पिशाचान्त्सर्वा रक्षांसि तानस्मद्‌भूमे यावय (५०)– हे मातृभूमि ! सर्व पिशाचांना आणि राक्षसांना आमच्यापासून दूर कर.

६६. सा नो दधातु भद्रया प्रिये धामनि धामनि (५२)– ती मातृभूमि आम्हांस, आमच्या प्रियघरांत कल्याणासह ठेवो.

६७. अहमस्मि सहमान उत्तरो नाम भूम्याम् । अभीषाडस्मि विश्वाषाडाशामाशां विषासहिः (५४)

–मी विजयी आणि उच्चतर, श्रेष्ठ होऊन मातृभूमींत रहातों. मीं सर्व बाजूस विजयी होऊन शत्रूंचा पराजय करतों.

६८. ये ग्रामा यदरण्यं याः सभा अधि भूम्याम् ये संग्रामाः समितयस्तेषु चारु वदेम ते (५६)- जीं गावें, जीं अरण्यें, ज्या सभा आमच्या मातृभूमींत आहेत आणि जीं युद्धें होतात. या सर्व ठिकाणीं तुझ्याविषयीं आम्हीं उत्तमच बोलूं.

६९. यद्वदामि मधुमत्तद्वदामि (५८)- जें मी बोलेन तें मधुरच बोलेन.

७०. त्विषीमानस्मि जूतिमान् अवान्यान् हन्मि दोधतः (५८)- मीं तेजस्वी ज्ञानी आहें. जे घातकी कृत्यें करतात त्यांचा मीं नाश करतों.

७१. यत् त ऊनं तत्त आपूरयाति प्रजापतिः प्रथमजा ऋतस्य (६१)- जी तुझ्यांत न्यूनता असेल ती प्रजापालक, सत्याचा प्रथम प्रवर्तक पूर्ण करील.

७२. उपस्थास्ते अनमीवा अयक्ष्मा अस्मभ्यं सन्तु पृथिवि प्रसूताः (६२)- तुझ्यापासून उत्पन्न झालेलों आम्हीं निरोगी व आरोग्यसंपन्न होऊन हे मातृभूमि ! तुझ्याजवळ उपस्थित राहूं.

७३. दीर्घं नः आयुः (६२)-आमचें आयुष्य दीर्घ होवो.

७४. प्रतिबुध्यमाना वयं तुभ्यं बलिहृतः स्याम (६२)- ज्ञानी होऊन आम्हीं तुझ्यासाठीं बळी आणणारे होऊं.

७५. भूमे मातर्निधेहि मा भद्रया सुप्रतिष्ठितम् (६३)- हे मातृभूमि मला उत्तम रीतीनें कल्याणयुक्त प्रतिष्ठित कर.

७६. संविदाना दिवा कवे श्रियां मा धेहि भूत्याम् (६३)- हे ज्ञानी ! मला नेहमीं ज्ञानयुक्त सर्वज्ञाता तूं कर आणि ऐश्वर्यांतहि आम्हांस जास्त ऐश्वर्ययुक्त कर.

विराट् (कां. ८।१०)

१. विराड् वा इदमग्र आसीत्, तस्या जातायाः सर्वमबिभेद् इयमेवेदं भविष्यतीति (१)- राजा नव्हता अशी राजावांचूनची स्थिति पूर्वी होती. असें असल्यानें सर्वांस असें भय वाटलें कीं ही राज्यविहीन अवस्थाच कायम रहाणार की काय ? (१)

२. सोऽदक्रामत् सा गार्हपत्ये न्यक्रामत् (२)- ती प्रजाशक्ति उत्क्रांत होऊन पुढें वाढली आणि गृहपतिसंस्थेंत परिणत झाली.

३. सोऽदक्रामत् सा सभायां न्यक्रामत् (८)- ती प्रजाशक्ति उत्क्रांत होऊन ग्रामसभेंत परिणत झाली.

४. सोऽदक्रामत् सा समितौ न्यक्रामत् (१०)- ती प्रजाशक्ति उत्क्रांत होऊन ती राष्ट्रसमितींत परिणत झाली.

५. सोऽदक्रामत् सा मन्त्रणे न्यक्रामत् (१२)- ती प्रजाशक्ति उत्क्रांत होऊन मंत्रिमंडळांत परिणत झाली.

राष्ट्रीदेवी (कां. ४।३०)

१. अहं राष्ट्री संगमनी वसूनां चिकितुषी प्रथमा यज्ञियानाम् (१)- मीं राष्ट्रीय शक्ति आहे. मीं धन एकत्रित करतें, मीं ज्ञानी आहें आणि पूजनीयांमध्यें पूजनीय आहें.

२. तां मा देवा व्यदधुः पुरुत्रा भूरिस्थात्रां भूर्यावेशयन्तः (२)- पुष्कळ उत्साह वाढविणारे देव सर्व स्थळीं असलेल्या माझ्या राष्ट्रशक्तीला विशेष प्रकारें आपणांत धारण करतात.

३. अहमेव स्वयमिदं वदामि जुष्टं देवानामुत मानुषाणाम् (३)- मानवांत आणि देवांत ती शक्ति आदरणीय आहे हें मीं स्वतःच सांगत आहें.

४. यं कामये तं उग्रं कृणोमि, तं ब्रह्माणं, तं ऋषिं तं सुमेधाम् (३)- मी राष्ट्रशक्ति ज्याची उन्नति करूं इच्छिते त्याला उग्र वीर करते. त्यास ब्राह्मण, ऋषि आणि उत्तम बुद्धिशाली करते.

५. मया सोऽन्नमत्ति, यो विपश्यति, यः प्राणिति, य ईं शृणोत्युक्तम् (४)- माझ्या कृपेनेंच तो अन्न खातो, पाहूं शकतो, जिवंत रहातो, आणि आमचें भाषण ऐकतो.

६. अमन्तवो मां त उपक्षियन्ति श्रुधि, श्रुत, श्रद्धेयं ते वदामि (४)- माझा (राष्ट्रशक्तीचा) जे अपमान करतात त्यांस विनाश प्राप्त होतो. हे विद्वान् पुरुषा ! हें ऐक. श्रद्धा ठेवण्यास योग्य असें भाषण मीं तुला ऐकवीत आहें.

७. अहं रुद्राय धनुरातनोमि ब्रह्मद्विषे शरवे हन्तवा उ- (५)- मीं रुद्र (उग्र, भयंकर अशा) वीरास धनुष्य आकर्ण ओढून सज्ज करून देतें त्यामुळें ज्ञानाचा द्वेष करणाऱ्या दुष्टांचा नाश होतो.

८. अहं जनाय समदं कृणोमि अहं द्यावापृथिवी आविवेश (५)- मीं लोकांसाठीं हर्ष देणारे पदार्थ देतें. मीं द्युलोकापासून पृथ्वीपर्यंत पसरलेली आहें.

९. अहं सुवे पितरमस्य मूर्धन् (७)- मीं या राष्ट्रासाठीं राष्ट्राचा रक्षक निर्माण करते.

राष्ट्रसभेची अनुमति (कां. ७।१२)

१. सभा च मा समितिश्चावतां प्रजापतेर्दुहितरौ संविदाने (१) सभा आणि समिति या दोन राजाच्या कन्या

आहेत त्या राजाचें संरक्षण करतात.

२. येना संगच्छा उप मा स शिक्षात् (१)- ज्या सभासदास मीं भेटेन तो मला योग्य सल्ला देवो.

३. चारू वदानि पितरः संगतेषु (१)- हे सभासद हो ! मीं सभेंत उत्तम भाषण करीन.

४. ये ते के च सभासदः ते मे सन्तु सवाचस, (२)- तुझे जे सभासद आहेत ते मजशीं समभावानें भाषण करणारे होवोत.

५. विद्म ते सभे नाम नरिष्टा नाम वा असि (२)- हे सभे ! तुझें नांव आम्हीं जाणतों. तुझें नांव अहिंसक आहे.

६. एषामहं समासीनानां वर्चो विज्ञानमा ददे (३)- या सभासदांजवळून मी तेज आणि ज्ञान प्राप्त करतों.

७. अस्याः सर्वस्याः संसदो मामिन्द्र भगिनं कृणु (३)- या सर्व सभांचा मला (राजाला) हे इन्द्रा ! भागीदार कर.

(कां. ७।९१)

१. बाधतां द्वेषो अभयं नः कृणोतु (१)- शत्रूंस बाधा करा आणि आम्हांस निर्भय करा.

२. सुवीर्यस्य पतयः स्याम (१)- उत्तम वीरत्वाचे आम्हीं स्वामी होऊन राहूं.

(कां. ७।९२)

१. अस्मदाराच्चिद्द्वेषः सनुतर्युयोतु (१)- आमचा द्वेष करणारे आमचे शत्रु दूर होवोत.

२. वयं भद्रे सौमनसे स्याम (१)- आम्हीं कल्याणकारक मनाच्या उत्तम स्थितींत रहावें.

(कां. ७।९३)

१. इन्द्रेण मन्युना वयमभिष्याम पृतन्यतः । घ्नन्तो वृत्राण्यप्रति (१)- उत्साहरूपी इंद्रासह राहून आम्हीं चढाई करणाऱ्या शत्रूला जिंकतो आणि घेरणाऱ्या शत्रूंना सैन्यासह मारून टाकतों.

(कां. ७।८४)

१. क्षत्रभृत् दीदिहीह (१)- क्षत्रियांचें भरणपोषण करून येथें प्रकाशित हो.

२. विश्वा अमीवाः प्रमुञ्चन् (१)- सर्व रोगांस दूर कर.

३. मानुषीभिरद्य शिवाभिरद्य परिपाहि नो गयम् (१)- मानवांच्या कल्याणदायक संघटनेनें आमच्या घराचें संरक्षण कर.

४. अपानुदो जनममित्रयन्तं (२)- शत्रूंच्या सहाय्यकांना दूर करा.

५. उरुं देवेभ्यो अकृणोरु लोकम् (२)- दिव्य जनांसाठीं विस्तृत स्थान तयार करा.

६. सृकं संशाय पविमिन्द्र तिग्मं, वि शत्रून् ताढि, वि मृधो नुदस्व (३)- बाण आणि वज्र तीक्ष्ण कर. शत्रूंना ताडण कर आणि हिंसकांना दूर कर.

(कांड ७।८८)

१. ध्रुवो राजा विशामयं (१)- या प्रजेमध्यें राजाला स्थिर कर.

२. राष्ट्रं धारयतां ध्रुवम् (२)- राष्ट्रास स्थिरतापूर्वक धारण कर.

३. ध्रुवोऽच्युतः प्रमृणीहि शत्रून्, शत्रुयतोऽधरान् पादयस्व (३)- अधोगतीस न जातां स्थिर होऊन शत्रूचा नाश कर. शत्रुत्व करणाऱ्या दुष्टांना खालीं पाडून टाक.

४. ध्रुवाय ते समितिः कल्पतामिह (३)- तुझ्या स्थिरतेसाठीं राष्ट्रसमिति समर्थ होवो.

(कां. ६।५४)

१. अस्य क्षत्रं श्रियं महीं वृष्टिरिव वर्धया तृणम् (१)- ज्याप्रमाणें वृष्टि (पाऊस) धन धान्य-गवत इत्यादि वाढविते त्याप्रमाणें या राजाच्या क्षात्रतेजानें धन आणि भूमि वाढो.

२. इमं राष्ट्रस्याभीवर्गे कृणुतं युज उत्तरम् (२)- या राजास राष्ट्रांतील मुख्य पुरुषांमध्यें योग्य आणि अधिक श्रेष्ठ करा.

३. सबन्धुश्चासबंधुश्च यो अस्मान् अभिदासति सर्वं ते रन्धयामासि (३) -आमचा प्रत्यक्ष भाऊ अथवा इतर कोणी परका मनुष्य असो, जो आम्हांस दास करूं इच्छितो त्या सर्वांचा आम्ही नाश करतों.

(कां. ४।८)

१. (यो) भूतेषु पय आदधाति, स भूतानामधिपतिर्बभूव । (१)- जो प्राणीमात्रांस दूध वगैरे उपयोगी पदार्थ देतो तो भूतांचा अधिपति होतो.

२. स राजा राज्यमनु मन्यतामिदम् (१)- तो राजा या राष्ट्रास अनुमोदन देवो.

३. अभिप्रेहि, माप वेन, उग्रश्चेता सपत्नहा (२)- पुढें हो, मागे सरूं नकोस, उग्र वीर, चेतना देणारा आणि

शत्रूंचा नाश करणारा हो.

४. आतिष्ठ मित्रवर्धन (२)– हे मित्र वाढविणाऱ्या तुझ्या स्थानीं स्थिर हो.

५. श्रियं वसानश्चरति स्वरोचिः (३)– संपत्ति प्राप्त करून स्वतःच्या तेजानें (तो) संचार करतो.

६. विक्रमस्व दिशो महीः (४)– महान् दिशामध्यें पराक्रम कर.

७. विशस्त्वा सर्वा वाञ्छन्तु (४)– सर्व प्रजाजन राजाच्या स्थानीं तूं रहावें असें इच्छोत.

(कां. ३।५)

१. बली बलेन प्रमृणन्त्सपत्नान् (१)– स्वतःच्या बलानें जे शत्रूंचा नाश करतात तेच खरे बलवान् होत.

२. मयि धारयताद्रयिम् (२)– माझ्या ठिकाणीं धन ठेवा.

३. अहं राष्ट्रस्याभीवर्गे निजो भूयासमुत्तमः (२)– मीं राष्ट्रांतील उत्तम आणि हितकारी पुरुषांत उत्तम आणि निज होऊन राहीन.

४. अस्मभ्यं सहायुषा देवा ददतु भर्तवे (३)– दीर्घायुष्यासह भरणपोषणासाठीं देव त्याला आम्हांस देवो.

५. तं प्रियासं बहु रोचमानो दीर्घायुत्वाय शत शारदाय, (४)– मीं अत्यंत तेजस्वी होऊन सर्वांस दीर्घायुत्व प्राप्त व्हावें म्हणून त्याचें प्रिय करतों.

६. ये धीवानो रथकाराः कर्मारा ये मनीषिणः उपस्तीन् पर्ण मह्यं त्वं सर्वान् कृण्वभितो जनान् (६)– जे बुद्धिमान्, जे रथकार, जे ज्ञानी लोहार, आहेत त्या सर्वांना हे पर्णमणे ! तूं माझ्यासमोर उपस्थित कर.

७. ये राजानो राजकृतः सूता ग्रामण्यश्च ये उपस्तीन् पर्ण मह्यं त्वं सर्वान् कृणु, अभितो जनान् (७)– जे सरदार, राजा निर्माण करणारे सूत आणि ग्रामनेते आहेत त्यांना तूं मजजवळ उपस्थित कर.

(कां. ३।४)

१. आ त्वा गन् राष्ट्रं सह वर्चसोदिहि (१)– तुजकडे हें राज्य आलें आहे. तेजानें तूं त्यांत उदित कर. (स्वपराक्रमानें प्रकाशित कर.)

२. प्राङ् विशांपतिरेकराट् त्वं विराज (१)– प्रजेचा एक प्रमुख स्वामी, एक राजा होऊन तूं विराज.

३. सर्वास्त्वा राजन् प्रदिशो ह्वयन्तु (१)- हे राजा ! सर्व दिशांमध्यें रहाणारी तुझी प्रजा तुला बोलवो.

४. उपसद्यो नमस्यो भवेह (१)– जवळ जाण्यास योग्य आणि नमस्कारास लायक हो.

५. त्वां विशो वृणतां राज्याय त्वां इमाः प्रदिशः पञ्च देवीः (२)– या सर्व दिशांत रहाणारी तुझी पांच प्रकारची प्रजा तुला राज्यासाठीं पसंत करो.

६. वर्ष्मन् राष्ट्रस्य ककुदि श्रयस्व ततो न उग्रो विभजा वसूनि (२)– राज्यांत उच्चस्थानीं आरूढ होऊन, शूरवीर होऊन आम्हांस धन वांटून दे.

७. जायाः पुत्राः सुमनसो भवन्तु बहुं बलिं प्रति पश्यासि उग्रः (३)–पत्नी आणि पुत्र उत्तम मनाचे होवोत. उग्र वीर होऊन (प्रजेकडून) तूं करभार गोळा कर.

८. पथ्या रेवतीर्बहुधा विश्वरूपाः सर्वाः संगत्य, वरीयस्ते अक्रन् (७)– सन्मार्गानें चालणारी, धनयुक्त अनेक स्वरूपाची सर्व प्रजा मिळून तुझ्यासाठीं श्रेष्ठ स्थान तयार करीत आहे.

९. तास्त्वा सर्वाः संविदाना ह्वयन्तु (७)– ते सर्व प्रजाजन एकमतानें तुझी प्रशंसा करोत.

१०. दशमीमुग्रः सुमना वशेह (७)– शंभर वर्षांचें पूर्णायुष्य मिळवून उत्तम मनाचा होऊन येथें तूं स्वतःस वश होऊन रहा.

(कां. ६।९८)

१. इन्द्रो जयाति न पराजयातै (१)– इन्द्र विजय प्राप्त करतो. त्याचा कधींहि पराजय होत नाहीं.

२. अधिराजो राजसु राजयातै (१)– तूं राजांमध्यें अधिक तेजस्वी होऊन अधिराजा हो.

३ चर्कृत्य ईड्यः वन्द्यश्चोपसद्यो नमस्यो भवेह (१) शत्रूंचा नाश करणारा म्हणून स्तुति करण्यास योग्य, वन्दन करण्यास योग्य, प्रणाम करण्यास योग्य, त्याप्रमाणेंच जवळ जाण्यास योग्य असा होऊन येथें रहा.

४. श्रवस्युस्त्वं भूरभिभूतिर्जनानाम् (२)– तूं कीर्तिवान् आणि लोकांस समृद्ध करणारा हो.

५ त्वं दैवीर्विश इमा विराज (२) तूं या दिव्य प्रजाजनांवर विराजमान् हो.

६. आयुष्मत् क्षत्रं अजरं ते अस्तु (२) तूं दीर्घायुषी हो. तुझे क्षत्रियत्व नित्य तरुण नवें असूं दे.

(कां. ३।३)

१. ह्वयन्तु त्वा प्रतिजना प्रतिमित्रा अवृषत (५)- प्रत्येक प्रकारचे लोक तुला मदतीसाठीं बोलावोत. मित्र तुझें बल वाढवोत.

२. विश्वेदेवास्ते विशि क्षेममदीधरन् (५)- सर्व देव तुझ्या प्रजेचें क्षेम धारण करोत.

(कां. २।५)

१. अहन्नहिं पर्वते शिश्रियाणं त्वष्टाऽस्मै वज्रं स्वर्यं ततक्ष (३)- पर्वतावर रहाणाऱ्या अहिला त्यानें मारलें. त्याच्यासाठीं त्वष्टयानें तीक्ष्ण वज्र तयार केलें.

(कां १।२१)

१. स्वस्तिदा विशांपतिः (१)- प्रजेला सुख देणारा राजा होवो.

२. नीचा यच्छ पृतन्यतः (२)- सैन्यासह आक्रमण करणाऱ्या शत्रूंस खालीं पाड.

३. अधमं गमया तमो यो अस्माँ अभिदासति (२)- जे आम्हांस दास करूं इच्छितात, त्यांस घोर अंधारांत पोंहोचव.

४. वि रक्षो वि मृधो जहि (३)- राक्षसांचा आणि दुष्टांचा वध कर.

५. अपेन्द्र द्विषतो मनोऽप जिज्यासतो वधम् (४)- द्वेष करणारें मन द्वेषापासून दूर कर आणि आमच्या आयुष्याचा नाश करणाऱ्यास दूर कर.

६. वि महच्छर्म यच्छ (४)- महान् सुख आम्हांस दे.

७. वरियो यावया वधम् (४)- वध करणाऱ्यांस दूर कर.

(कां. १।३१)

१. स्वस्ति मात्र उत पित्रे नो अस्तु, स्वस्ति गोभ्यो जगते पुरुषेभ्यः (४)- आमच्या मातापितरांचें कल्याण होवो. गाई, प्राणी आणि पुरुषांसाठीं कल्याण प्राप्त होवो.

२. विश्वं सुभूतं सुविदत्रं नो अस्तु (४)- सर्व प्रकारची उत्तम स्थिति आम्हांस प्राप्त होवो.

३. ज्योगेव दृशेम सूर्यम्- आम्हीं सूर्यास चिरकाल- दीर्घकाल- पर्यंत पहात रहावें. आम्हांस दीर्घजीवन प्राप्त होवो.

(कां १।२९)

१. अस्मान् ब्रह्मणस्पतेऽभि राष्ट्राय वर्धय (१)- हे ब्रह्मणस्पते ! आम्हांस राष्ट्रासाठीं वाढव. आमची वृद्धि -उन्नति कर.

२. अभिवृत्य सपत्नानभि या नो अरातयः, अभि पृतन्यन्तं तिष्ठ, अभि यो नो दुरस्यति (२)- शत्रूंना पराजित कर, दुष्टांना दूर कर, सैन्यासह चढाई करणाऱ्यांशीं सामना कर आणि जे दुःख देतात त्यांना तोंड दे.

३. राष्ट्राय मह्यं बध्यतां सपत्नेभ्यः पराभुवे (४)- राष्ट्राच्या हितासाठीं आणि शत्रूंचा पराजय करण्यासाठीं तो मणि माझ्या शरीरावर बांधा.

४. यथाहं शत्रुहोऽसानि असपत्नहा (५)- मीं शत्रूचा पराजय करून, शत्रूचा वध करून शत्रुरहित होईन.

५. सपत्नक्षयणो वृषाऽभिराष्ट्रो विषासहिः यथाहमेषां वीराणां विराजानि जनस्य च (६)- शत्रूंचा नाश करणारा, बलवान्, स्वतःच्या राष्ट्राचें हित करणारा, शत्रूचा पराभव करणारा होऊन या लोकांत आणि वीरांत मी तेजस्वी होईन.

(कां. ३।२९)

१. यत् राजानो विभजन्त इष्टापूर्तस्य षोडशं यमस्यामी सभासदः (१)- नियमानुसार चालणाऱ्या या राजाच्या सभेचे सभासद उत्पन्नाचा सोळावा भाग कररूपानें घेतात.

२. अविस्तस्मात् प्रमुञ्चति दत्तः शितिपात् स्वधा (१)- हा कर प्रजेचें रक्षण करतो, तिला विनाशापासून वांचवितो आणि स्वतःची धारणाशक्ति वाढवितो.

३. यो ददाति शितिपादं अविं लोकेन संमितम्, स नाकं अभ्यारोहति, यत्र शुल्को न क्रियते अबलेन बलीयसे (३)- जे हा लोकसंमत रक्षक कर देतात ते जेथें निर्बलास बलवानाला कांहीं द्यावें लागत नाहीं अशा स्वर्गांत जातात.

(कां. ८।३)

१. स नो दिवा स रिषः पातु नक्तम् (१)- तो आम्हांस दिवस आणि रात्रीमध्यें शत्रूपासून वांचवो.

२. परा शृणीहि तपसा यातुधानान् पराग्ने रक्षसो हरसा शृणीहि (१३)- यातना देणाऱ्यांचा तुझ्या तापानें नाश कर. हे अग्ने ! तुझ्या उष्णतेनें राक्षसांचा नाश कर.

३. यः पौरुषेयेण क्रविषा समङ्क्ते यो अश्व्येन पशुना यातुधानः। यो अघ्न्याया भरति क्षीरमग्ने तेषां

शीर्षाणि हरसापि वृश्च (१५)- जे मनुष्याचें अथवा घोड्याचे मांस खातात, जे गाईचें दूध भरून चोरून नेतात त्या दुष्टांचीं मस्तकें बलपूर्वक तोडून टाका.

(कां. ८।४)

१. तपतं रक्ष उब्जतं, न्यर्पयतं, वृषणा तमोवृधः (१)- हे बलवान् वीर हो ! राक्षसांस त्रासवून मारून टाका, अंधःकार वाढविणाऱ्या दुष्टांस खालीं पाडून टाका.

२. परा शृणीतमचितो न्योषतं हतं नुदेथां नि शिशीतमत्रिणः (१)- जे अंतःकरणरहित दुष्ट आहेत त्यांचा नाश करा, त्यांस नष्ट करा, मारा, पळवून लावा, दुसऱ्यांना खाऊन टाकणाऱ्यांस निर्बल करा.

३. ब्रह्मद्विषे क्रव्यादे, घोरचक्षुषे द्वेषो धत्तमनवायं किमीदिने (२)-ज्ञानाचा द्वेष करणारे, कच्चें मांस खाणारे, क्रूर दृष्टीचे खादाड लोक जे आहेत त्यांचा द्वेष करा.

४. दुष्कृतो वव्रे अन्तरनारम्भणे तमसि प्र विध्यतं (३)- दुष्कर्म करणारांस अगाध अंधःकारांत वेधून टाका.

५. यतो नैषां पुनरेकश्चनो दयत् (३)- दुष्ट लोकांतील एकसुद्धां पुनः उठणार नाहीं असें करा.

६. अघशंसाय तर्हणं (४)- पाप्यासाठीं विनाशक शस्त्र फेका.

७. तद्वामस्तु सहसे मन्युमच्छवः (३)- तें तुमचें उत्साहयुक्त बल शत्रुदमनासाठीं होवो (असावें).

८. येन रक्षो वावृधानं निजूर्वथः (४)-ज्यामुळें वृद्धि पावणाऱ्या राक्षसांचा नाश होईल असें करा.

९. हतं द्रुहो रक्षसो भङ्गुरावतः (७)- दोषकारी आणि विनाशक राक्षसांना मारा.

१०. यो मा पाकेन मनसा चरन्तं अभिचष्टे अनृतेभिर्वचोभिः (८)- मीं जो पवित्र मनानें वागतों त्या माझी जे असत्य वचनांनीं निंदा करतात त्यांस दूर करा.

११. सुविज्ञानं चिकितुषे जनाय सच्चासच्च वचसी पस्पृधाते। तयोर्यत् सत्यं यतरदृजीयस्तदित् सोमोऽवति हन्त्यासत् (१२)- ज्ञान प्राप्त करणाऱ्या मनुष्यास सांगण्यांत येतें कीं सत्य आणि असत्य भाषणांमध्यें स्पर्धा होते. त्यामध्यें जें सत्य आणि सरळ आहे त्याचें रक्षण सोम करतो आणि असत्याचा नाश करतो.

१२. न वा उ सोमो वृजिनं हिनोति (१३)- सोम कपट्यांना सहाय्य करीत नाहीं.

१३. न क्षत्रियं मिथुया धारयन्तं (१३)- खोटी धारणा करणाऱ्या क्षत्रियांना सोम मदत करीत नाहीं.

१४. हन्ति रक्षो, हन्त्यासद् वदन्तम् (१३)- राक्षस आणि असत्य बोलणारे यांस तो मारून टाकतो.

१५. यदि वाहमनृतदेवो अस्मि, मोघं वा देवाँ अप्यूहे अग्ने किमस्मभ्यं जातवेदो हृणीषे (१४)- जर मीं असत्याची उपासना करीन तर, जर मीं देवांची व्यर्थ प्रार्थना करीन, तर हे अग्ने ! तूं काय मजवर रागावशील ?

१६. द्रोघवाचस्ते निर्ऋथं सचन्ताम् (१४)- द्रोहयुक्त भाषा बोलणाऱ्यांचा विनाश होवो.

१७. अद्या मुरीय यदि यातुधानोऽस्मि (१५)- जर मी दुसऱ्यास यातना देणारा असेन तर आजच मीं मरावें.

१८. अधा स वीरैर्दशभिः वि यूया यो मा मोघं यातुधानेत्याह (१५)- जे मला व्यर्थ यातना देणारा म्हणतात त्यांच्यापासून दहाही वीर वियुक्त होवोत. (त्यांच्या दशेंद्रियांच्या शक्ति नष्ट होवोत.)

१९. यो मायातुं यातुधानेत्याह, यो वा रक्षाः शुचिरस्मीत्याह, इन्द्रस्तं हन्तु महता वधेन, विश्वस्य जन्तोरधमस्पदीष्ट (१६)- जो मला अहिंसकाला हिंसक म्हणतो, जो स्वतः राक्षस असून स्वतःला शुद्ध म्हणतो, इंद्र त्यास महान् शस्त्रानें मारून टाको. सर्व प्राण्यांमध्यें तो नीच अवस्थेस जावो.

२०. गृभायत रक्षसः संपिनष्टन- (१८)- राक्षसांस पकडा आणि त्यांस चूर्ण करून टाका.

२१. प्राक्तो अपाक्तो अधरादुदक्तोऽभि जहि रक्षसः पर्वतेन (१९)- समोरून, मागून, पुढून, खालून, वरून राक्षसांना पर्वतास्त्रानें मारा.

२२. इन्द्र जहि पुमांसं यातुधानं उत स्त्रियं मायया शाशदानाम्। विग्रीवासो मूरदेवा ऋदन्तु, मा ते दृशन्त्सूर्यमुच्चरन्तम् (२४)- हे इंद्रा ! यातना देणाऱ्यांचा नाश कर, तसेंच कपटयुक्त व्यवहार करणाऱ्या स्त्रीचासुद्धां नाश कर. मूर्खांच्या उपासकांचीं मस्तकें तोडण्यांत यावींत आणि ते उगवत्या सूर्यास सुद्धां पाहूं न शकोत.

(कां. ११।९)

१. दैवीर्मनुष्येषवो ममामित्रान् विविध्यत (२)- दैवी आणि मानवी सोडलेले बाण माझ्या शत्रूंवर जाऊन पडोत.

१. यो नः स्वो यो अरणः सजात उत निष्ट्यो यो अस्माँ अभिदासति रुद्रः शरव्ययैतान् ममामित्रान् वि विध्यतु (३)- जो स्वकीय अथवा परकीय, सजातीय अथवा नीच जातीचा, आम्हांस दास करण्याची इच्छा करतो रुद्र स्वतःच्या बाणांनीं माझ्या या शत्रूंना मारो.

२. यः सपत्नो योऽसपत्नो यश्च द्विषञ्छपाति नः देवास्तं सर्वे धूर्वन्तु ब्रह्म वर्म ममान्तरम् (४)- जे सपत्न आणि असपत्न शत्रु आमचा द्वेष करतात, आम्हांस शाप देतात, सर्व देव त्यांचा नाश करोत. माझें आंतरिक कवच ज्ञान आहे.

(कां. ६।१३५)

१. यदश्नामि बलं कुर्व इत्थं वज्रमा ददे स्कन्धानमुष्य शातयन् (१)- मीं जें खातों त्यानें मीं माझें स्वतःचें बळ वाढवितों. त्याचप्रमाणें मीं हातांत वज्र धारण करतों आणि शत्रूंचे खांदे-बाहू तोडतों.

(कां. ७।१४)

१. स्त्रीणां च पुंसां च द्विषतां वर्च आ ददे (१)- द्वेष करणारी स्त्री असो अथवा पुरुष असो मीं त्यांचें तेज हरण करतों.

(कां. ६।९७)

१. इमं वीरमनु हर्षध्वमुग्रं इन्द्रं सखायो अनु सं रभध्वम् ग्रामजितं, गोजितं वज्रबाहुं जयन्तमज्म प्रमृणन्तमोजसा (१)- हे मित्र हो ! उग्र स्वभावाचे वीर हो ! गांव आणि गायी जिंकणारा, वज्रासारख्या सुदृढ बाहूचा विजयी आणि त्वरेनें शत्रूंना मारून टाकणारा असा जो इंद्र त्याला अनुकूल व्यवहार करा.

(कां. ६।६६)

१. निर्हस्ताः सन्तु शत्रवोऽङ्गैषां म्लापयामसि (३)- शत्रु हाताशिवायचे होवोत. त्यांच्या अंगांना निर्बळ करतों.

(कां. ६।६७)

१. मुह्यन्त्वद्यामूः सेना अमित्राणां परस्तराम् (१)- शत्रुसेना मोहित होऊन दूर पळून जावो.

२. मूढा अमित्राश्चरताशीर्षाण इवाहयः (२)- शत्रु वेड्यासारखे होऊन भटकत राहोत. डोकीं नसलेल्या सापासारखे शत्रु होवोत.

३. तेषां वो अग्निमूढानामिन्द्रो हन्तु वरंवरम् (२)- त्या भ्रान्त झालेल्या शत्रुसैनिकांपैकीं श्रेष्ठ सैनिकांस इन्द्र मारून टाको.

(कां. ४।३)

१. परेणैतु पथा वृकः परमेणोत तस्करः, परेण दत्वती रज्जुः, परेणाघायुरर्षतु । (२)- लांडगा दूर पळून जावो. चोर दूर जावोत. नागीण दूर पळून जावो, आणि पापी सुद्धां दूर पळून जावोत.

(कां. ७।९०)

१. ओजो दासस्य दम्भय (१)-हिंसकाच्या बलाचा नाश कर.

(कां. १।७)

१. वि लपन्तु यातुधाना अत्त्रिणो ये किमीदिनः (३)- कष्ट, यातना देणारे खादाड लुटारु रडोत.

२. ब्रवीतु सर्वो यातुमानयमस्मीत्येत्य (४)- सर्व दुष्ट जवळ येऊन कबूल करोत कीं, आम्ही तेच (दुष्ट) आहोंत.

३. यातुधानान् विलापय (५)- दुष्टांस रडवा.

४. यातुधानानुपबद्धां इहा वह, अथैषामिन्द्रो वज्रेणापि शीर्षाणि वृश्चतु (७)- दुष्टांना बांधून येथें घेऊन या आणि इंद्र वज्रानें त्यांचीं मस्तकें तोडो.

(कां. ३।१)

१. विद्वान्प्रतिदहन्नभिशस्तिमरातिम् (१)- आमचे विद्वान् वीर मारामारी करणाऱ्या शत्रूंना जाळून टाकोत.

२. स सेनां मोहयतु परेषां निर्हस्तांश्च कृणवज्जातवेदाः (१)- तो अग्नि शत्रूंच्या सेनेला मोहित करो आणि तिला हस्तरहित करो.

३. ते वज्रः प्रमृणन्नेतु शत्रून् (४)- तुझें वज्र शत्रूस मारीत पुढें जावो.

४. इन्द्र सेनां मोहयामित्राणाम् (५)- हे इन्द्रा ! शत्रुसेनेला मोहित कर.

(कां. ३।२)

१. असौ या सेना मरुतः परेषां अस्मानैत्यभ्योजसा स्पर्धमाना । तां विध्यत तमसापव्रतेन यथैषामन्यो अन्यं न जानात् (६)- हे मरुत् हो ! ही शत्रुसेना जी स्पर्धा करीत आम्हांवर चाल करून येत आहे, तिला तमसास्त्रानें वेधून टाका, म्हणजे ते सैनिक एक दुसऱ्यास ओळखूं शकणार नाहींत.

(कां. ३।१०)

१. शतं जीवाति शरदस्तवायम् (२)- हा तुझा मनुष्य शंभर वर्षे जीवित राहो.

(कां. ७।११५)

१. रमन्तां पुण्या लक्ष्मीर्याः पापीस्ता अनीनशम् (४)- ज्या पुण्यकारक लक्ष्मी आहेत त्या आनंदानें येथें राहोत. ज्या पापी भावना आहेत त्या नष्ट होऊन जावोत.

(कां. ६।११५)

१. यद्विद्वांसो यदविद्वांसो एनांसि चकृमा वयम् यूयं नस्तस्मान्मुञ्चत विश्वे देवाः सजोषसः (१)- जाणून अथवा अजाणतेपणीं जर आम्हीं कांहीं पाप केलें तर हे विश्वेदेवांनों ! तुम्हीं एकमतानें आम्हांला त्या पापापासून मुक्त करा.

२. यदि जाग्रत् यदि स्वपन्नेन एनांस्योऽकरम्, भूतं मा तस्मात् भव्यं च द्रुपदादिव मुञ्चताम् (२) -जर जागेपणीं अथवा झोंपेंत मीं पापी होऊन कांहीं पाप केलें तर पशूंना ज्याप्रमाणें खांबास बांधले असल्यास सोडतात, त्याप्रमाणें भूत आणि भविष्यकाळच्या पापापासून मला मुक्त करा.

३. द्रुपदादिव मुमुचानः, स्विन्नः स्नात्वा मलादिव, पूतं पवित्रेणेवाज्यं विश्वे शुम्भन्तु मैनसः (३)- बंधनापासून ज्याप्रमाणें पशूस सोडतात, स्नानानें ज्याप्रमाणें मळ दूर करतात, गाळण्यानें ज्याप्रमाणें तूप स्वच्छ शुद्ध होतें त्याप्रमाणें सर्व देव मला पापापासून मुक्त करोत.

(कां. ४।३३)

१. अप नः शोशुचदघम् (१-५)- पाप आमच्यापासून दूर राहो.

(कां. ६।२६)

१. वशी सन्मृडयासि नः (१)- स्वतःस वश ठेवणारा तूं आम्हांस सुखी करतोस.

(कां. १६।२)

१. ऊर्जा मधुमती वाक् (२।१)- बल वाढविणारी मधुर वाणी आहे.

२. मधुमतीं वाचमुदेयम् (२।२)- मीं मधुर भाषण करीन.

३. सुश्रुतौ कर्णौ, भद्रश्रुतौ कर्णौ, भद्रं श्लोकं श्रूयासम् (२।४)- माझे दोन्ही कान चांगल्या गोष्टी ऐकोत, दोन्ही कान कल्याणकारक भाषणें ऐकोत. कल्याणकारक काव्य मी ऐकेन.

४. मूर्धाहं रयीणां, मूर्धा समानानां भूयासम् (३।१)- मी धनाचें उच्च स्थान होईन, समान लोकांचा नेता होईन.

५. असंतापं मे हृदयम् (३।६)-माझें हृदय शांत राहो.

६. मा मां प्राणो हासीन्मो अपानोऽवहाय परा गात् (४।३)- प्राण आणि अपान मला सोडून न जावोत.

७. अजैष्माद्यासनामाद्याभूमानागसो वयम् (६।१) -आज आम्हीं विजय प्राप्त करीत आहोंत. आज मिळवावयाचें आम्हीं मिळविलें आहे. आम्हीं निष्पाप झालों आहोंत.

८. जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् (८।१)- विजय, उदय, सरलता, तेज, ज्ञान, आत्मतेज, यज्ञ, पशु, प्रजा, वीर हीं आमचीं होवोत.

(कां. १७।१)

१. विषासहिं सहमानं सासहानं सहीयांसम्, सहमानं सहोजितं स्वर्जितं गोजितं संधनाजितं । ईड्यं नाम ह्व इन्द्रमायुष्मान्भूयासम् (१)- अत्यंत सामर्थ्यवान्, बलवान्, विजयी, शत्रूस दाबून टाकणारा, ओजस्वी, दिग्विजयी, स्वसामर्थ्यानें जिंकणारा, भूमि आणि धन जिंकणारा अशा प्रशंसनीय इंद्राची मीं प्रार्थना करतों. त्यामुळें मीं दीर्घायु होईन.

२. प्रियो देवानां भूयासम् (२)- देवांना मी प्रिय होईन.

३. प्रियः प्रजानां भूयासम् (३)- प्रजांना मी प्रिय होईन.

४. प्रियः समानानां भूयासम् (५)- समान मनुष्यांत मी प्रिय होईन.

५. द्विषंश्च मह्यं रध्यतु मा चाहं द्विषते रधम् (६) -द्वेष करणारे माझ्या ताब्यांत येवोत आणि मीं कधींहि शत्रूच्या ताब्यांत न जावें.

६. सुधायां मा धेहि परमे व्योमन् (१९)- परम आकाशांत अमृतांत मला ठेव.

७. ऊतिभिः शिवाभिः शंतमो भव (१०)- कल्याणकारक संरक्षणानें अत्यंत सुख देणारा तूं हो !

८. रुचिरसि रोचोऽसि (२१)- तूं तेजस्वी आणि प्रकाशयुक्त आहेस !

९. शुक्रोऽसि भ्राजोऽसि (२०)- तूं वीर्यवान् आहेस, तेजस्वी आहेस.

(कां. ८।८)

१. यथा हनाम सेना अमित्राणां सहस्रशः (१)- शत्रूंच्या हजारों सैनिकांस आम्हीं मारूं.

२. अमित्रा हृत्स्वा दधतां भयम् (२)- शत्रुहृदयें आमचें भय धारण करोत.

३. हस्त्वेनान्वधको वधैः (३-४) वधकर्ता शस्त्रांनीं त्या दुष्टांस मारो.

४. तेन शत्रूनभि सर्वान्न्युब्ज यथा न मुच्यातै कतमश्चनैषाम् (६)- सर्व शत्रूंस सर्व बाजूंनीं ताब्यात आण आणि त्यांच्यांतील कोणी पळून जाणार नाहीं असे कर.

५. नयतामून्मृत्युदूता यमदूता अपोम्भत । परः सहस्रा हन्यन्तां तृणेढ्वेनान्मत्यं भवस्य (११)- हे मृत्युदूत आणि यमदूत हो ! त्यांना घेऊन जा. हजारोंपेक्षां अधिक मारले जावोत. ईश्वराच्या मताप्रमाणें त्यांचा नाश करा.

६. मामीषां मोचि कश्चन (१९)- या शत्रूंपैकीं कोणी सुटून न जावो.

७. अव पद्यन्तामेषामायुधानि मा शकन्प्रतिधामिषुम् । अथैषां बहु बिभ्यतामिषवो घ्नन्तु मर्मणि (२०)- त्यांचीं आयुधें खालीं पडोत. प्रतिपक्षाचे बाण सहन करण्यास ते असमर्थ ठरोत. आतां पुष्कळ भ्यालेल्या त्या शत्रूंच्या मर्मस्थानांना आमच्या बाणांनीं वेधून टाका.

८. इतो जयेतो वि जय सं जय जय (२४)- येथून आतां पुढें जय प्राप्त होवो, येथून विजय होवो, त्यांना उत्तम प्रकारें जय मिळो.

९. इमे जयन्तु परामी जयन्तां (२४)- त्यांना जय मिळो, त्या शत्रूंचा पराजय होवो.

१०. स्वाहैभ्यो दुराहामीभ्यः (२४)- त्यांच्यासाठीं शुभवचन, शत्रूसाठीं शाप. स्वाहा= शुभाशीर्वाद; दुराह=शाप, वाईट शब्द.

(कां. ५।३)

१. मह्यं नमन्तां प्रदिशश्चतस्रस्त्वयाध्यक्षेण पृतना जयेम (१)- चारी दिशा माझ्यापुढें नम्र होवोत; तुझ्यासारख्या अध्यक्षाबरोबर राहून आम्हीं शत्रुसेनेस जिंकूं.

२. अरिष्टाः स्याम तन्वा सुवीराः (५)- आम्ही उत्तम वीर होऊन शरीरानें सुरक्षित राहूं.

३. मा नो विदद्भिजिना द्वेष्या या (६)- दुष्ट शत्रु आम्हांस न जाणोत.

४. मा नो रीरिषो मा परा दाः (८)-आमचा नाश न होवो, आमचा त्याग करूं नका.

५. ये नः सपत्ना अप ते भवन्तु (१०)- आमचे जे शत्रु आहेत ते दूर होवोत.

(कां. १।२७)

१. असमृद्धा अघायवः (२-३)- पापी आहेत ते समृद्ध न होवोत.

(कां. ७।२०)

१. कृतं मे दक्षिणे हस्ते जयो मे सव्य आहितः (८)- कर्तव्य माझ्या उजव्या हातीं आणि जय माझ्या डाव्या हातांत असो.

२. गोजिद्भूयासमश्वजिद्धनंजयो हिरण्यजित् (८)- गाई आणि घोडे जिंकणारा, धन आणि सुवर्ण जिंकणारा मीं व्हावें.

(कां. ३।२२)

१. येन देवा देवतामग्र आयन्तेन मामद्य वर्चसाग्ने वर्चस्विनं कृणु (३)- ज्या तेजानें देवांना देवत्व प्राप्त झालें त्या तेजानें आज मला तेजस्वी कर.

(कां. ३।१९)

१. संशितं म इदं ब्रह्म संशितं वीर्यं बलम् संशितं क्षत्रमजरमस्तु जिष्णुर्येषामस्मि पुरोहितः (१)- माझें हें ज्ञान तेजस्वी आहे, माझें हें बल तेजस्वी आहे. हें माझें तेजस्वी क्षात्रतेज क्षीण न होवो, ज्यांचा मीं पुरोहित आहें.

२. समहमेषां राष्ट्रं स्यामि समोजो वीर्यं बलम् । वृश्चामि शत्रूणां बाहून् (२)- मीं त्यांचें राष्ट्र तेजस्वी करतों, मीं त्यांचें सामर्थ्य, वीर्य आणि बल तेजस्वी करतों आणि शत्रूंचे बाहू तोडतों !

३. नीचैः पद्यन्तामधरे भवन्तु ये नः सूरिं मघवानं पृतन्यान् । (३)- जे आमच्या ज्ञानी आणि धनिकांवर सैन्य पाठवितात, ते अधोगतीस जावोत.

४. क्षिणामि ब्रह्मणामित्रानुन्नयामि स्वानहम् (३)- (मी) शत्रूंना क्षीण करतों आणि स्वकीयांना ज्ञानानें उन्नत करतों.

५. तीक्ष्णीयांसः परशोरग्नेस्तीक्ष्णतरा उत । इन्द्र

स्य वज्रात्तीक्ष्णीयांसो येषामस्मि पुरोहितः (४)- ज्यांचा मीं पुरोहित आहें त्यांचीं शस्त्रें, कुऱ्हाड, अग्नि आणि इंद्राचें वज्र यापेक्षांसुद्धां अधिक तीक्ष्ण अशीं करतों.

६. **एषामहमायुधा सं स्याम्येषां राष्ट्रं सुवीरं वर्धयामि । (५)-** त्यांचीं आयुधें मीं तीक्ष्ण करतों आणि त्यांच्या राष्ट्रांस उत्तम वीरांनीं युक्त करून वृद्धिंगत करतों.

७. **एषां क्षत्रमजरमस्तु जिष्ण्वेषां चित्तं विश्वेऽवन्तु देवाः (५)-** त्यांचें क्षात्रतेज क्षीण न होवो, विजययुक्त असो, त्यांचें चित्त सर्व देव सुरक्षित राखोत.

८. **उद्धर्षन्तां मघवन्वाजिनान्युद्वीराणां जयतामेतु घोषः । (६)-** त्यांचें सैन्य उत्तेजित होवो. जिंकणाऱ्या वीरांचा जयघोष उंच चढो.

९. **पृथग्घोषा उलूलयः केतुमन्त उदीरताम् (६)-** ध्वज घेऊन जाणाऱ्या सैन्याचा घोष वर चढो.

१०. **प्रेता जयता नर उग्रा वः सन्तु बाहवः (७)-** पुढें व्हा, विजय मिळवा, हे उग्र वीर हो ! आपले बाहू जिंकणारे आणि उग्र होवोत.

११. **तीक्ष्णेषवोऽबलधन्वनो हतोग्रायुधा अबलानुग्रबाहवः (७)-** तीक्ष्ण बाण असणारे, उग्र आयुधांचे, उग्र बाहू असलेले वीर निर्बल धनुष्यांच्या निर्बल शत्रुसैनिकांना मारोत.

१२. **जह्येषां वरंवरं मामीषां मोचि कश्चन (८)-** शत्रुसेनेंतील श्रेष्ठ सैनिकांना मारून टाका. कोणांससुद्धां सोडूं नका.

(कां. ३।२०)

१. **नो वर्धया रयिम् (१)-** आमचें धन वाढो.

२. **प्र णो यच्छ विशां पते धनदा असि नस्त्वम् (२)-** हे प्रजाजनांच्या स्वामी ! आम्हांस धन दे. तूं आमचा धनदाता आहेस.

३. **सूनृता रयिं देवी दधातु मे (३)-** सत्य, सरल स्वभावाची देवी मला धन देवो.

४. **सर्वं इज्जनः संगत्यां सुमना असद्दानकामश्च नो भुवत् (६)-** सर्व मनुष्यें सहवासास उत्तम मनाचीं आणि दान देणारीं होवोत.

५. **रयिं च नः सर्ववीरं नि यच्छ (८)-** सर्व पुत्रपौत्रादियुक्त धन आम्हांस द्या.

६. **प्रापेयं सर्वा आकूतीर्मनसा हृदयेन च (९)** मनानें आणि हृदयानें सर्व संकल्प आम्हीं प्राप्त करावेत.

(कां. ६।५३)

१. **पुनः प्राणः पुनरात्मा न ऐतु पुनश्चक्षुः पुनरसुर्न ऐतु । (२)-** प्राण, आत्मा, चक्षु आणि जीवनशक्ति पुनः मला प्राप्त होवो.

२. **सं वर्चसा पयसा सं तनूभिरगन्महि मनसा सं शिवेन । (३)-** तेज, दूध, शरीर, शुभसंकल्पयुक्त मन यांनीं आम्हीं युक्त व्हावें.

(कां. ६।४१)

१. **अमर्त्या मर्त्यां अभि नः सचध्वमायुर्धत्त प्रतरं जीवसे नः (३)-** सर्व देव मनुष्यांमध्यें राहोत, आणि आम्हीं दीर्घ जीवनासाठीं दीर्घ आयुष्य धारण करावें.

(कां. ४।२२)

१. **इममिन्द्र वर्धय क्षत्रियं म इमं विशामेकवृषं कृणु त्वम् । (१)-** हे इंद्रा ! या माझ्या राजास (क्षत्रियास) वृद्धीस ने, त्यास सर्व प्रजेमध्यें बलवान् कर.

२. **निरमित्रानक्ष्णुह्यस्य सर्वांस्तान्रन्धयास्मा अहमुत्तरेषु (१)-** त्याच्या सर्व शत्रूंना निर्बल कर, आणि त्या शत्रूंना त्याच्या स्पर्धेंत नष्ट कर.

३. **वर्ष्मं क्षत्राणामयमस्तु राजेन्द्र शत्रुं रन्धय सर्वमस्मै (२)-** क्षत्रियांमध्यें हा राजा श्रेष्ठ होवो. हे इंद्रा ! त्याच्या सर्व शत्रूंचा नाश कर.

४. **अयमस्तु धनपतिर्धनानामयं विशां विश्पतिरस्तु राजा । (३)-** तो धनाचा धनपति होवो. हा राजा प्रजेचा स्वामी होवो.

५. **अस्मिन्निन्द्र महि वर्चांसि धेह्यवर्चसं कृणुहि शत्रुमस्य (३)-** हे इन्द्रा ! त्याच्यांत महान् तेज धारण कर. आणि त्याच्या शत्रूस निस्तेज कर.

६. **येन जयन्ति न पराजयन्ते (५)-** ज्यानें नेहमीं जयच मिळतो, पराजय कधींच होत नाहीं.

७. **यस्त्वा करदेकवृषं जनानामुत राज्ञामुत्तमं मानवानाम् (५)-** जो तुला सर्व मानवांत श्रेष्ठ, उत्तम बलवान् आणि मानवांच्या राजांमध्यें उत्तम करतो.

८. **उत्तरस्त्वमधरे ते सपत्ना ये के च राजन्प्रतिशत्रवस्ते । (६)-** तूं उच्च हो, तुझे शत्रु खालीं पडोत. जे कोणी तुझे शत्रु असतील ते अधोगतीस जावोत.

९. सिंहप्रतीको विशो अद्धि सर्वा व्याघ्रप्रतीकोऽव बाधस्व शत्रून् (७)- सिंहाप्रमाणें प्रजेपासून सर्व भोग प्राप्त कर. वाघाप्रमाणें सर्व शत्रूंना हैराण करणारा हो !

१०. एकवृष इन्द्रसखा जिगीवाँ छत्रूयतामा खिदा भोजनानि (७)- एकमात्र तूं बलवान् होऊन विजयी हो. तुझ्याशीं शत्रुत्व करणारे आहेत त्यांचें भोजन हिरावून घे.

(कां. ६।१९)

१. पुनन्तु मा देवजनाः पुनन्तु मनवो धिया, पुनन्तु विश्वा भूतानि पवमानः पुनातु मा (१)- दिव्यजन मला पवित्र करोत. मननशील लोक मला पवित्र करोत. विश्वांतील भूतमात्र माझ्या पावित्र्याचें रक्षण करोत. वायु माझें पावित्र्य राखो.

(कां. ६।१५)

१. सबन्धुश्चासबन्धुश्च यो अस्माँ अभिदासति तेषां सा वृक्षाणामिवाहं भूयासमुत्तमः (२)- आमचे नातेवाईक, बंधु अथवा शत्रु जे आमचा नाश करतात व सर्व वृक्षांमध्यें ज्याप्रमाणें-सोम वनस्पति श्रेष्ठ आहे त्याप्रमाणें त्या सर्वांत मीं उत्तम व्हावें.

(कां. ६।४०)

१. अनमित्रं नो अधरात् अनामित्रं न उत्तरात् इन्द्रानमित्रं नः पश्चादनमित्रं पुरस्कृधि (३)-खालून-वरून, मागून-पुढून सर्व बाजूंनीं आम्हांस शत्रुरहित कर.

(कां. ७।५२)

१. सं जानामहै मनसा, सं चिकित्वा मा युष्महि मनसा दैव्येन (२)- मनानें आम्हीं उत्तम ज्ञान प्राप्त करूं. ज्ञान प्राप्त करून एकमताचे होऊन राहूं. दिव्य मनानें युक्त होऊन आम्हीं आपसांत एक दुसऱ्याचा द्वेष न करावा.

(कां. ५।२०)

१. शत्रूषाण्नीषाडभिमातिषाहो गवेषणः सहमान उद्भित्। वाग्वीव मंत्रं प्र भरस्व वाचं सांग्रामजित्याय इषमुद् वदेह (११)- ज्याप्रमाणें उपदेशक आपल्या उपदेशाचा श्रोत्यांत प्रसार करतो. त्याप्रमाणें शत्रूस जिंकणारा नित्य विजयी सैन्यास वश राखणारा, शत्रूचा शोध करणारा बलवान् आणि शत्रूला त्याच्या जागेवरून उखडून टाकणारा तूं तुझ्या शब्दानें (आकाश पृथ्वी) भरून टाक. संग्राम जिंकण्यासाठीं अन्न आणि बळाची घोषणा कर.

(कां. ५।२१)

१. विहृदयं वैमनस्यं वदामित्रेषु दुन्दुभे, विद्वेषं कश्मशं भयं अमित्रेषु नि दध्मसि (१)- शत्रूंच्या मनांत उदासीनता व्याकुळता निर्माण कर. विद्वेष, कलह आणि भय शत्रूमध्यें उत्पन्न कर.

२. एता देवसेनाः सूर्यकेतवः सचेतसः अमित्रान् नो जयन्तु (१२)- या देवसेना सूर्यचिन्हयुक्त ध्वज घेऊन एकमतानें शत्रूंना जिंकोत.

(कां. ६।८७)

१. आ त्वाहार्षमन्तरभूर्ध्रुवस्तिष्ठ अविचाचलत्, विशस्त्वा सर्वा वाञ्छन्तु मा त्वद्राष्ट्रमधि भ्रशत् (१)- तुला राज्यांवर आणण्यांत आलें आहे. स्थिर हो. शांत ये. चांचल्य टाकून दे. सर्व प्रजाजन तुझी इच्छा करोत. तुझ्यामुळें राष्ट्र भ्रष्ट न होवो.

अथर्ववेदाचा सुबोध अनुवाद (भाग २ रा)

‘ मातृभूमि आणि स्वराज्यशासन ’

अनुक्रमणिका

अथर्ववेदाचा सुबोध अनुवाद (भाग २ रा)

' मातृभूमि आणि स्वराज्यशासन '

विषयानुक्रमणिका

कांडक्रमानुसार सूक्तांची

अनुक्रमणिका

अथर्ववेदाचा सुबोध अनुवाद (भाग २ रा)

‘मातृभूमि आणि स्वराज्यशासन’

वर्णानुक्रम-मंत्रसूची

अथर्ववेदाचा सुबोध अनुवाद (भाग २ रा)

‘ मातृभूमि आणि स्वराज्यशासन ’

उपमासूची